# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• स म ग्र वा ङ् म य •

खंड–६

## मुलाखतसंग्रह

**संपादक**

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

## खंड - ६

# मुलाखतसंग्रह


संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**



**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

**सन २०२४**

वाय १७८-१

▶▶ **पुस्तकाचे नाव :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड - ६ मुलाखतसंग्रह

▶▶ **संपादक :** डॉ. सुनीलकुमार लवटे

▶▶ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-९५-७

▶▶ **प्रथमावृत्ती -** २०२४

▶▶ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

▶▶ **© प्रकाशकाधीन :**

▶▶ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

▶▶ **मुखपृष्ठ :** गौरीश सोनार

▶▶ **किंमत :** रुपये ३१०/-

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकाची व लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होत. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध विषयांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंर्तभूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी

देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उलेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ, आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे., यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासुंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# संपादकीय

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' खंड-६ मुलाखतसंग्रह आहे. तर्कतीर्थांनी सन १९४९ ते १९९४ या आपल्या आयुष्यातील उत्तरार्धात सुमारे ७७ मुलाखती दिल्या. दैनिके, पाक्षिके, मासिके, दिवाळी अंक, ग्रंथ यांच्यासाठी दिलेल्या या मुलाखती प्रा. मे पुं रेगे, पु. ल. देशपांडे, प्रा म. द. हातकणंगलेकर, श्री. पु. भागवत, ग. दि. माडगूळकर प्रभृतींसारख्या दिग्गजांकडून घेतल्या गेल्या आहेत. 'मौज', 'शब्दरंजन', 'नवभारत', 'दै. केसरी', 'दैनिक सकाळ', 'ऋतुरंग', 'उगवाई'सारखी मान्यवर नियतकालिके आणि आकाशवाणीसारखी विश्वासार्ह माध्यमे यांतून प्रकाशित झालेल्या आहेत. साहित्य, संस्कृती, भाषा, राजकारण, समाजकारण इ. सर्व क्षेत्रांना पालाण घालणारे विषयवैविध्य तर्कतीर्थांच्या बहुश्रुतपणाची खूणगाठ आहे. 'The Telegraph' सारख्या कोलकाताच्या मान्यवर दैनिकाने इंग्रजीमध्ये मुलाखत घेऊन प्रकाशित करणे गौरवाचे खरे; पण त्यात मुलाखतकाराने तर्कतीर्थांच्या कार्य, विचार, दृष्टिकोनाचा केलेला गौरव एकप्रकारची समाजमान्यता होय. तर्कतीर्थांनी आपणास भूषणभूत असणाऱ्या अनेक व्यक्तींच्या जीवन, कार्य, विचारसंबंधी दिलेल्या मुलाखती तर्कतीर्थ थोरा- मोठ्यांचा आदर करत अनुकरण कसे करत राहिले, हे पाहणे मोठे रोचक होय. या मुलाखतीत अनेक प्रश्न, समस्या, प्रसंग इ. समयीची त्यांची प्रतिक्रिया व प्रतिसाद एका समजुतदार समाजपुरुषाचे जबाबदार मार्गदर्शन बनून वाटाड्याचे कार्य करतात.

या सर्व मुलाखती प्रदीर्घ अशा चिंतनाची फलश्रुती असल्याने त्या नुसत्या वाचून सोडता येत नाहीत. त्या तुम्हास नवी दृष्टी देत अंतर्मुख करतात. मुलाखत केवळ माहिती देणारी असेल तर ती सामान्य दर्जाची ठरते. तीच जर मत व्यक्त करणारी असेल (Statement ) तर तिला माध्यमात महत्त्व येते. कारण ती लोकमत तयार करत असते. तर्कतीर्थांच्या आत्मपर नि परात्मपर मुलाखती केवळ चरित्र सांगत नाहीत, तर त्या शिकवण, प्रेरणा, विचार, दृष्टी देणाऱ्या म्हणून

महत्त्वाच्या ठरतात. या प्रकल्पात आपण आवर्जून अशा मुलाखतींचा स्वतंत्र खंड अशासाठी केला, की नव्या पिढीस यातील विचार, इतिहास, संस्कृती म्हणून वारसा देतील. उद्याची पिढी तो ऐवज म्हणून जपेल.

दि. १८ डिसेंबर २०२०

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**
संपादक

# अनुक्रमणिका


- **अध्यक्षीय मनोगत** ........ तीन
- **संपादकीय** ........ पाच
- **प्रस्तावना :** तर्कतीर्थांच्या मुलाखती : समाजप्रेषिताची प्रवचने ........ अकरा

**मुलाखती**

**अ) आत्मपर**

१. मी व माझे वक्तृत्व ........ १
२. वेदांचे पावित्र्य माझ्या हृदयात खोल रुजले आहे ........ ४
३. माझी घडण ........ ८
४. तर्कतीर्थांच्या यशाचे गमक ........ १४
५. अध्ययन व वैचारिक वाटचाल ........ १८
६. जीवन आणि घडण ........ ६१
७. शास्त्री-पंडितांच्या सहवासातील ज्ञानसाधना ........ ७२
८. नव्वदीतही तर्कतीर्थ उत्साही, विनम्र ........ ८४
९. दीर्घायुष्याची सूत्रे ........ ८९
१०. असा मी, असा मी ........ ९३
११. जीवन, ज्ञानप्रवाहात पोहत रहाल, तरच तराल ........ ९६
१२. परमार्थ मंदिर किंवा मशिदीत नाही ........ १०५
१३. तर्कतीर्थ : कार्य व योगदान ........ ११३

**ब) परात्मपर मुलाखती**

१४. ज्ञानसक्तीसाठी पुनरुज्जीवन आवश्यक ........ १२१
१५. Of Marx and encyclopedias ........ १३२
१६. महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवन ........ १३६
१७. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ........ १४५

१८. सुटलेली कोडी ........................................ १५३

१९. ऋषितुल्य आधुनिक विचारवंत ........................................ १६४

२०. परंपरेला धक्के बसले, तरच परिवर्तन शक्य ........................................ १७६

२१. विश्वबंधु शास्त्रीजी ........................................ १९९


## क) व्यक्ती व विचार

### ❍ लोकमान्य टिळक


२२. लोकमान्य टिळक : लोकशाहीचा खंबीर पुरस्कर्ता ........................................ २११

२३. लोकमान्य टिळकांची वाङ्मयीन महात्मता ........................................ २१४

२४. साम्राज्यशाहीला धक्का देणारे महापुरुष :
लोकमान्य टिळक व महात्मा गांधी ........................................ २१९

२५. 'केसरी'चे पंचानन ........................................ २२४

२६. भारतीय राष्ट्रावादाचे महर्षी : लोकमान्य टिळक ........................................ २२९

२७. 'गीतारहस्य' हे आचारशास्त्रच ........................................ २३२

२८. लोकमान्य टिळक : एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ ........................................ २३४


### ❍ अन्य व्यक्तींच्या मुलाखती


२९. अजूनही यशवंतराव चाचपडत आहेत ........................................ २४१

३०. स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ...... २४७

३१. सत्तेपासून दूर राहिलेला संघटक व क्रांतिकारक : किसन वीर ........................................ २६६

३२. वऱ्हाडचे टिळक : बापूजी अणे ........................................ २७०

३३. मानवेंद्रनाथ रॉय यांची वैचारिक वाटचाल ........................................ २७४

३४. विश्व संस्कृतीची मूल्ये जपणारा नेता : पंडित नेहरू ........................................ २९६

३५. बहुस्पर्शी विद्वान : लोकहितवादी देशमुख ........................................ २९९

३६. प्रतिभासंपन्न संगीततज्ज्ञ : कुमार गंधर्व ........................................ ३०२

३७. कृष्णाकाठचा माणूस : सुसंस्कृत नेतृत्व ........................................ ३०४

३८. यशवंतराव चव्हाण : बांधिलकी आणि साहित्य विशेष ........................................ ३१९

३९. शिवाजीराव नि शास्त्रीबुवा ........................................ ३२२


## ड) धर्म, संस्कृती व तत्त्वज्ञान संबंधी मुलाखती


४०. भारतीय संस्कृती : काही समस्या ........................................ ३२९

४१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित समाज ........................................ ३३९

४२. सती प्रथेला धर्मशास्त्राचा आधार नाही ........................................ ३४४

४३. धर्मांतर थांबविण्यासाठी चार शंकराचार्य एकत्र येणे अभिनंदनीय,
पण आता विलंब झाला आहे ........................................ ३४६

४४. समान संधी देणारी राज्यपद्धती अनुभवास यायला हवी ........................ ३५०
४५. मानवी जीवनात तत्त्वज्ञानाइतकेच तंत्रज्ञानास महत्त्व ........................ ३५२
४६. बुद्धिप्रामाण्यवाद : एक कठीण वसा ........................ ३६१
४७. तत्त्वज्ञानातून मी बाहेर पडलो आहे ........................ ३६७
४८. बंधनात टाकणाऱ्या श्रद्धांची चिकित्सा हवी ........................ ३७८
४९. तर्कतीर्थ : कृतिप्रवण विचारांची आगळीवेगळी खाण ........................ ३८०
५०. हिंदुत्वाचे राजकारण होऊ देऊ नये ........................ ३८५
५१. धर्मविरोध आणि राजकीय फारकत ........................ ३८८
५२. भारतीय संस्कृतीतील तरुणांना उपयुक्त ........................ ३९२
५३. चैतन्य हेच ईश्वराचे रूप ........................ ३९३
५४. भारतीय तत्त्वज्ञान आणि सर्वधर्मसमभाव ........................ ३९७

## इ) विविध दृष्टिकोनविषयक मुलाखती

### ❍ राजकारण

५५. लोकशाही शासन पद्धतीचा कायापालट जरूरी ........................ ४०१
५६. सार्वत्रिक निवडणुका : यशापयशाची मीमांसा ........................ ४०५
५७. मंडल आयोग : अहवालाची चिकित्सा ........................ ४०७
५८. विश्वराज्याच्या दिशेने वाटचाल ........................ ४११
५९. काँग्रेस (आय)च्या विजयाची मीमांसा ........................ ४१३
६०. अण्वस्त्र बंदी झाल्यासच विकास ........................ ४१७
६१. महाराष्ट्र : काल, आज, उद्या ........................ ४२१
६२. राष्ट्रासाठी जीवन समर्पण हाच राष्ट्रवाद ........................ ४३३
६३. विधेयकावर चर्चा आवश्यक ........................ ४३७
६४. राम जन्मभूमीला ऐतिहासिक आधार नाही ........................ ४३९
६५. मंडल आयोग मागे घ्यावाच लागेल ........................ ४४०
६६. लोकशाहीबाबत भविष्यकाळ आशावादी नाही ........................ ४४४
६७. भारताचे संविधान ........................ ४४८
६८. समान नागरी कायद्याची टाळाटाळ भोवणारी ........................ ४५०

### ❍ शिक्षण

६९. ग्रामीण कॉलेजे प्रभावी कशी होतील? ........................ ४५५
७०. राष्ट्रीय शिक्षणाचा इहवादी दृष्टिकोन ........................ ४५९
७१. कुटुंबच नैतिक शिक्षणाचे विद्यापीठ ........................ ४६३

❍ **भाषा आणि साहित्य**
७२. मराठी विश्वकोश : ज्ञानभांडाराचे कवाड ........ ४६७
७३. साहित्य संमेलनामुळे लोकशिक्षणाचे कार्य ........ ४७०
७४. विश्वकोश कार्य : एक कटाक्ष ........ ४७३
७५. प्राचीन भारतीय ग्रंथालये ........ ४७६
७६. मराठीवर मराठी माणसाचा विश्वास नाही ........ ४८१
७७. संस्कृतीचा मुख्य गाभा म्हणजे भाषा ........ ४८२

❍ **मुलाखती : संदर्भ सूची** ........ ४९१

❍ **परिशिष्टे**
१. ऋणनिर्देश ........ ४९९
२. परिचय : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ........ ५०३
३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथसूची ........ ५०७
४. परिचय : डॉ. सुनीलकुमार लवटे ........ ५१७

# प्रस्तावना

## तर्कतीर्थांच्या मुलाखती : समाजप्रेषिताची प्रवचने

### पार्श्वभूमी

मानवी जीवनात जिज्ञासा ही अशी वृत्ती आणि भावना आहे, की ती नित्य नव्याचा शोध घेत आपले जीवन उज्ज्वल बनवत असते. ज्ञानसंपादन आणि ज्ञानविकास यांची न संपणारी तहान घेऊन माणूस जन्माला आला. या तृषार्त वृत्तीमुळेच तो निसर्गाचे गूढ उकलू लागला, तद्वतच आपल्या भोवती असलेल्या आप्तेष्टांच्या जीवनाबद्दलचे कुतूहल शमविण्यासाठी धडपडू लागला. माणसाने लावलेले सारे शोध त्याच्या जिज्ञासेतून जन्मले. अग्नीचा शोध त्याच्या विकासाची ठिणगी जशी ठरली, तशी मनाची उकल करण्याची त्याची तळमळही! विविध ज्ञान - विज्ञान, साधने त्याने शोधून काढली ती निसर्गात हस्तक्षेप करत. निसर्गात हस्तक्षेप करण्याची क्षमता केवळ मानवात आहे. अन्य जीव-जंतूंमध्ये ती नाही. मानव संस्कृती निर्माण करू शकला, तो केवळ जिज्ञासा व जगण्याच्या धडपडीतूनच. आहे त्यापेक्षा उन्नत जीवन मिळावे म्हणून माणूस किती प्रयत्नशील असतो. अपराजित राहण्याच्या संकल्पातून त्याने अंक नि अक्षरे शोधली. त्यांच्या असीम विकासाच्या पाऊलखुणांचा शोध घेत त्याने भाषा संपादली. त्यातून साहित्यकला आत्मसात केली. आपले साहित्यसृजन अनेकांपर्यंत पोहोचावे म्हणून तो सूर्यकिरणांचे अनुकरण करीत तो प्रकाशाचा मागोवा घेत राहिला. त्याने मुद्रणकला हस्तगत केली. त्याने साहित्यकलेचे साहित्यशास्त्र बनविले, तसे मुद्रणकलेचेही पद्याला गद्यरूप देत त्याने कवितेबरोबर कथा, कादंबरी, नाटक, निबंधासारखे साहित्यप्रकार, विद्या विकसित केल्या. आपले मन मोकळे करण्यासाठी त्याने या विद्यांचा वापर केला, तसेच दुसऱ्याचे मन, जीवन, विचार जाणून घेण्याच्या जिज्ञासेने का, कुठे, कसे, केव्हा, कधी, कशाला, कुणासाठी असे सारखे प्रश्न विचारत समाज सवंगडी, त्यांचे विचार, दृष्टी, जीवन समजून घेण्यासाठी भेटू

लागला, मुलाखती करू, घेऊ लागला आणि माणसाला स्वत:पलीकडचे जग, जीवन, जगणे समजू लागले. त्यातून ऊर्मी घेत तो नवनवोन्मेषी मनोरथे करीत, मनीषा बाळगत जगाचा वेध घेत राहिला.

## मुलाखत : उगम आणि विकास

संवादाचे साधन, माध्यम म्हणून जेव्हापासून भाषा हाती आली, तेव्हापासून माणूस जगाचा कानोसा घेत आला आहे. हा कानोसा कधी एखाद्या प्रश्नाद्वारे असतो, तर कधी प्रश्नमालेद्वारे. जिज्ञासा छोटी, तर प्रश्न छोटे, जिज्ञासा मोठी, तर प्रश्नांची सरबत्ती. पूर्वीपासून माणूस एकमेकांची खुशाली, हालचाल पुसत, विचारत आला आहे. माणूस उपजत समाजशील प्राणी असल्याने त्याला स्वत:इतकेच दुसऱ्याबद्दलचे कुतूहल पूर्वापर चालत आलेले आहे. मी तर म्हणेन, की माणसाला स्वत:पेक्षा इतरेजनांचा हालहवाला जाणून घ्यायचा शौक जुना-पुराणाच आहे. संबंध नसतानाही दुसऱ्याचे जीवन जाणून घेण्याच्या उत्सुक वृत्तीतूनच 'चांभार-चौकशा'सारखा शब्द मराठी भाषेत रूढ झालेला आढळतो. मौखिकाकडून लिखिताकडे झालेल्या साहित्यप्रवासात पूर्वी प्रश्नोत्तर, संवाद, नाटक यांतून तो जे कार्य करायचा, मुद्रण कलेच्या विकासानंतर तो विस्ताराने लिहू लागला, तसा तो अधिक चौकस, सजग होत अनौपाचारिकतेकडून औपचारिकतेकडे अग्रेसर झाला. वृत्तपत्र, नियतकालिकांच्या कितीतरी आधी त्याच्याकडे ज्ञानसंपदा आली ती पोथ्या, बखरी, इतिहास रूपाने. मुद्रण विकासानंतर आधी ग्रंथ आले, नंतर वृत्तपत्रे, नियतकालिके. मुलाखत हा साहित्य प्रकार जगात सोळाव्या शतकापासून आढळून येत असला तरी तो प्रचलित झाला विसाव्या शतकात. मराठी साहित्यात त्याच्या पाऊलखुणा अव्वल इंग्रजी काळापासून (१८१८-१८८५) दिसून येतात. मराठी साहित्यात त्याला काहीएक रूप आले, ते स्वातंत्र्यचळवळीच्या काळात. 'मराठा', 'केसरी', 'ज्ञानप्रकाश'सारखी वृत्तपत्रे समाजजीवनाचे अभिन्न अंग बनली. 'विविध ज्ञान विस्तार', 'करमणूक', 'ज्योत्स्ना', 'मनोहर', 'अरुण', 'किर्लोस्कर','स्त्री'सारख्या नियतकालिकांनी मुलाखत साहित्यप्रकार रूढ केला. पुढे अनेकांचे मुलाखतसंग्रह प्रकाशित झाले. ती मुलाखत साहित्यप्रकार म्हणून मराठी साहित्यात रूढ झाल्याची निजखूण ठरली.

## मुलाखत : शब्द, अर्थ आणि व्युत्पत्ती

मराठीतील मुलाखत हा साहित्य प्रकार विविधभाषी संस्कार, परंपरेतून विकसित झालेला दिसून येतो. त्याची मुळे संस्कृतमध्ये आहेत, पण स्वरूप विस्तारावर असलेला प्रभाव मात्र इंग्रजीचा आहे. मुलाखतीचा उगम संवादाच्या मानवी असोशीतून झाला. संस्कृत साहित्यात पंडितांमध्ये जे वादविवाद, चर्चा, खंडन-मंडन होत, त्यातून विकसित झालेला हा साहित्य प्रकार आहे 'दर्शनम्'. या दर्शनम् आणि मुलाखतीमध्ये साम्य दिसून येते. 'दर्शनम्'चा अर्थ आहे भेट. पाहणे असाही त्याचा एक अर्थ आहे. 'ईश्वर दर्शनम्' शब्दातून तो स्पष्ट होतो. दर्शनाचा आणखी एक अर्थ संभवतो, तो म्हणजे ज्ञान, तत्त्वज्ञान. हिंदीत तो याच अर्थाने (Philosophy)

प्रचलित आहे. हिंदीत मुलाखतीस अनेक पर्यायवाची शब्द उपलब्ध आहेत, तसे प्रचलितही - भेंटवार्ता, साक्षात्कार, मुलाकात, साहब - सलामत, मेल - मिलाप, हेलमेल इ., पण साक्षात्कार हा मुलाखतीस अधिक समर्पक शब्द हिंदीतलाच. असे असले तरी मराठीतील मुलाखत शब्द मराठीत आला, तो मात्र हिंदी, उर्दूतून.

हिंदी, उर्दूतील 'मुलाखत' शब्द मूळ अरबी भाषेतील. त्याचे अनेक अर्थ आहेत - प्रत्यक्ष भेट, सक्षम, साक्षात्कार, परिचय, जान - पहचान, मेल - जोल. या साऱ्या वैविध्यातून एका अर्थाने मुलाखतीची व्याप्तीच स्पष्ट होते. इंग्रजीत मुलाखतीस 'Interview' शब्द वापरला जातो. हा शब्द मूळ फ्रेंच भाषेतून इंग्रजीत रुळला आहे. फ्रेंच शब्द 'S' entrevoir पासून तो बनला आहे. त्याचा अर्थ आहे 'See eachother' - परस्परांना भेटणे, एकमेकांना जाणून घेणे असा त्याचा अर्थ होतो. फ्रेंच 'Entrevue'पासून इंग्रजी 'Interview' शब्द तयार झाला. फ्रेंच मूळ शब्द 'Voir' चा अर्थ होतो - To see, पाहणे, भेटणे. 'Vue'पासून 'View' तयार झाला आहे. Inter + View = To see eachother. परस्परांना भेटणे, एकमेकांना जाणून घेणे. या अर्थाने मुलाखत (Interview) म्हणजे एखाद्यास समजून घेणे होय. मुलाखतीमध्ये मुलाखतकार (Interviewer) मुलाखतदारास (Interviewee) जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्न प्रश्नोत्तर, संवादाद्वारे केला जातो.

*** मुलाखत : व्याख्या**

मुलाखत एक साहित्य प्रकार म्हणून आपण जेव्हा पाहू लागतो, तेव्हा लक्षात येते की कालौघात त्याच्या स्वरूप, संकल्पना इत्यादींमध्ये कालोचित बदल होत गेले म्हणून त्याच्या व्याख्याही बदलत गेल्या आहेत -

१) 'एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचे मनोगत जाणण्यासाठी विचारलेले प्रश्न म्हणजे मुलाखत.'
 - (विकिपीडिया)

२) 'विशिष्ट विचाराच्या झरोक्यातून एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करणे म्हणजे मुलाखत होय.' - (अज्ञात)

३) 'पूर्वनियोजित व हेतुपूर्वक घडवून आणलेला संवाद म्हणजे मुलाखत.'
 - ('शब्दशिल्प' www.khandbahale. com)

४) 'साक्षात्कार से अभिप्राय उस रचना से है, जिसमें लेखक व्यक्ती - विशेष के साथ साक्षात्कार करने के बाद प्राय: किसी निश्चित प्रश्नमाला के आधार पर उसके व्यक्तित्व एवं कृतित्व के संबंध में प्रामाणिक जानकारी प्राप्त करता है और फिर अपने मन पर पडे प्रभाव को लिपिबद्ध कर डालता है |' - डॉ. नगेंद्र
 ('वाङ्मय'- हिंदी पत्रिका - 'साक्षात्कार' - प्रो. रमेश जैन. 24 मई, 2008)

5) 'Meeting a person face - to - face.
 (- Webster's Dictionary.)

6) 'Interview is dynamic form of cammunication.'

(-Twenty First Century communication : A Referance Handbook - Charls T. Stewart.)

7) 'Interview is a structured face to face conversation.'

(- indunote.com)

वरील सर्व व्याख्यांमधून मुलाखतीचे स्वरूप स्पष्ट होण्यास साहाय्य होते. मुलाखत ही प्रश्नोत्तरांतून साकार होत असते. ती नियोजनपूर्वक घेतली जाते. म्हणजे असे की मुलाखतकर्ता आपणास मुलाखतदात्याकडून कोणता प्रश्न, समस्या, विषय, प्रसंगांवर जाणून घ्यायचे आहे, ते क्षेत्र निश्चित करतो. नंतर त्याचा विस्तार करणाऱ्या विविधांगी प्रश्नमालेची तो निर्मिती करीत मुलाखतीचा नियोजनपूर्वक आराखडा तयार करतो. हे सारे हेतुपूर्वक घडवून आणले जाते. मुलाखतदार प्रश्नांच्या उत्तरातून आपले मनोगत, विचार, दृष्टिकोन स्पष्ट करतो, त्यातून विचारांचा एक रूपबंध आकारतो, तो म्हणजेच मुलाखत. यामध्ये त्या व्यक्तीला जाणून घेण्याची धडपड जशी असते, तशीच या मुलाखतीद्वारे समाजाला मार्गदर्शन व्हावे असा एक सुप्त वा अंत:स्थ हेतू असतो. मुलाखत ही प्रत्यक्ष भेटून घेतली जात असल्याने तिला एक हृदयस्थ संवादाचे रूप प्राप्त होत असते. मुलाखतीत विचारलेले प्रश्न दीर्घ चिंतन, मननातून आल्याने उत्तर देणारा मुलाखतदारही तितक्याच गांभीर्याने उत्तर देत असल्याने उत्तरांच्या मालिकेतून एक बहुआयामी वैचारिक आलेख तयार होत असतो. तो समाजासाठी पथदर्शक दीपस्तंभवत मार्गदर्शक ठरतो. साहित्य ही सहेतुक सृजन साधना असल्याने मुलाखत तिचे प्रतिरूप बनून साकारत असते. मौखिक काळात वादविवाद, खंडन-मंडनातून साकारलेली मुलाखत मुद्रणकाळात विस्तारत गेली. सूचना व संपर्कक्रांतीच्या वर्तमानकाळात ती वस्तुनिष्ठ व लघुत्तरी होत तिला आता साद-प्रतिसादाऐवजी क्रिया-प्रतिक्रियेचे रूप येत ती फटाक्यांच्या आतशबाजीशी स्पर्धा करीत कडाडणारी वीज (Rapid Fire), ठिणगी (Spark) बनत माध्यमांच्या युगात परिवर्तक रूप विसर्जित करीत प्रक्षोभक बनत आहे. किंबहुना त्यासाठीच आज प्रतिक्रियात्मक प्रश्नांची सरबत्ती करीत मुलाखत छोट्या चणीची; परंतु ज्वालाग्राही रूप धारण करत आहे, हा चिंता व चिंतनाचा प्रश्न बनला आहे.

## मुलाखत : स्वरूप आणि परिवर्तन

मुलाखतीचे वरील व्याख्यांमधून साकारणारे रूप आणि माहिती - तंत्रज्ञान युगाचा स्पर्श होत वृत्तपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, वार्षिक (दिवाळी अंक) यांतील मुलाखतीचे विस्तृत रूप आणि आजच्या बहुआयामी माध्यम युगातील मुलाखत यामध्ये जमीन-अस्मानाचे अंतर आलेले दिसते. आकाशवाणी, दूरदर्शन काळापर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील मुलाखती काहीएक प्रमाणात वृत्तपत्र युगाशी मेळ ठेवून होत्या; पण संगणक, इंटरनेट, मोबाइल्स आणि दूरदर्शनच्या विविध वाहिन्या (चॅनल्स) यांनी तिचे रूप बदलून टाकले. 'आपकी आदालत'सारखा

रजत कपूरचा मुलाखत कार्यक्रम, राजू परूळेकरांचा ‘संवाद’, निखिल वागळेंचा ‘ग्रेट भेट’[१] हे सारं पाहणं आणि नंतर पुस्तकरूपात आलेलं ‘ग्रेट भेट’ वाचणं, तरी एक प्रकारचं सुखद सृजन होतं. मराठी साहित्यात ‘लढणाऱ्यांच्या मुलाखती’[२] - उत्तम कांबळे, ‘सृजन - संवाद’[३] - गोपाळ अवटी, ‘ऐवज’[४] - अरुण शेवते, ‘रंगमुद्रा’[५] - माधव वझे या साहित्यकृती मराठी मुलाखतींचा साहित्यिक दस्तऐवज होय; पण नंतर फेसबुक, व्हॉटस्अॅप, इन्स्टाग्राम, ट्विटर, बाइट्स वाद - प्रतिवाद अशा रूपांतरात मुलाखतीचे संदर्भमूल्य, विचारधन, संस्कार क्षमता हरवून बसल्याची स्थिती आहे. वि. स. खांडेकरांचा ‘ऋतू न्याहाळणारं पान’[६]सारखा मुलाखतसंग्रह या साहित्य प्रकाराच्या प्रतिदर्श (रोल मॉडेल) वा शोभादर्शक (कॅलिडिओस्कोप) म्हणून जसा पुढे येतो, तसा माध्यमांच्या प्रतिक्रियात्मक मुलाखती मृत्युंजयी, चिरंजिवी न बनता त्या क्षणिका बनून उल्कापाताप्रमाणे विझू पाहत आहेत याचं वाईट वाटतं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या या मुलाखत खंडातील प्रा. मे. पुं. रेगे यांनी नवभारतसाठी घेतलेल्या मुलाखती पूर्वपठडीतील मुलाखती म्हणून विचारप्रवर्तक सिद्ध होतात. ‘सुटलेली कोडी’, ‘संस्थात्मक प्रवास’, ‘अध्ययन अध्यापन’ शीर्षक ‘नवभारत’[७] मासिकातील मुलाखती वाचणे, लेखकांशी हितगुज बनते.

मुलाखत म्हणजे काही जाणून घेण्यासाठी दोन व्यक्तींनी एकमेकांशी केलेला सहेतुक संवाद. या संवादात एक जिज्ञासू असतो, तर दुसरा निवेदक. जिज्ञासू ऐकण्यास, पाहण्यास, वाचण्यास उत्सुक असतो; तर निवेदक सांगण्यास, दाखवण्यास. मुलाखत सुनियोजित घडून येते. म्हणजे मुलाखतकार मुलाखतदाराशी संवाद साधण्यापूर्वी स्थल, काळ, वेळ, विषय, प्रश्न निश्चित करून आपले विचार, संकल्पना, धारणा व्यक्त करीत असतो. त्यातून एक वैचारिक पाथेय, भावनिक अभिव्यक्ती निर्माण होते. ती वाचक, श्रोता, प्रेक्षक यांना प्रभावित करते, प्रेरणा देते, दृष्टी देते आणि त्यांचे प्रबोधनही करते. मुलाखतीचे स्वरूप विविधांगी असते. मुलाखत एक व्यक्ती घेऊ शकते, तसे एकसाथ अनेक व्यक्ती (पॅनल) ही घेऊ शकतात. मुलाखत प्रकट असते आणि खासगी, व्यक्तिगतही. ती लिखित, श्राव्य, दृश्य, दृक-श्राव्य, महाजालीय, संक्षिप्त संवादी (व्हॉटस्अॅप चॅट), दूरपत्र (ई- मेल), दूरध्वनी (लँडलाईन, मोबाईल), दूरदर्शन संच, वाहिनी (सेट, चॅनल्स) इ.द्वारे घेतली जाऊ शकते. आजच्या काळात एका प्रश्नावर लोक अनेक मते व्यक्त करीत सामूहिकरीत्या अभिव्यक्त होतात. पूर्वी मुलाखत व्यक्तिगत अभिव्यक्ती होती, आता व्हॉटस्अॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटद्वारे तिला सामूहिक व्यक्तिकरणाचे, अभिव्यक्तीचे रूप आले आहे. त्यातून अनुकूल (लाईक), प्रतिकूल (डिसलाईक) असे समाजमन (जनमत) तयार होते. शिवाय एक अव्यक्त, तटस्थ जनमत असते. ते अव्यक्त जनमत शांत क्रांती घडवून आणत असते. व्यक्त, अव्यक्त, जनमताची नोंद घेत आजवर निर्णय घेण्याचा समाजप्रघात होता. इथून पुढच्या काळात शांत, तटस्थ, अव्यक्त जनमत जाणून घेण्याची प्रक्रिया सुरू व्हायला हवी, जे सनसनाटी प्रक्षोभक (व्हायरल, व्हायलंट) जनमत होते. आपण त्यास कौल (मँडेट) मानत आलो आहोत. वस्तुत: तो अल्पसंख्याकांचा प्रातिनिधिक उद्‌गार वा मत होते, हे आपण सोयिस्कर विसरतो. व्यक्तिगत मुलाखतीचे संक्षिप्त रूप म्हणजे माध्यमांतील प्रतिक्रिया, प्रतिसाद, बाईट्स इ. होत.

व्यक्त जनमत हिमनगाच्या दिसणाऱ्या एक अष्टमांश भागासारखे असते. अव्यक्त जनमत न दिसणारा सात अष्टमांश हिमनग होय. तो अदृश्य असला तरी बहुसंख्य व प्रचंड मोठा असतो. त्याचा आकार गृहीत न धरता एखादा कप्तान जसे जहाज चालवितो व अंदाज न आल्याने ते जहाज जसे अपघातग्रस्त होऊन छिन्नभिन्न होते, तसे वर्तमानात नित्य घडताना दिसते. प्रसंगोपात निर्माण होणाऱ्या त्वरित नि उत्साही प्रतिक्रिया प्रातिनिधिक असतात. म्हणून मग सर्वोच्च न्यायालय मूलभूत हक्कांची पायमल्ली झाली म्हणून जो निकाल देते, तो सत्तेच्या दुरुपयोगाकडे लक्ष वेधणारा ठरतो; पण खऱ्या अर्थाने तो निकाल कायदा, मूल्य, सामाजिक न्याय, मानवाधिकारावर उभा असतो, हे आपण लक्षात घ्यायला हवे. लोकतांत्रिक व्यवस्था असो वा एकतांत्रिक (हुकूमशाही) ती समाजहिताचे काय कार्य करते यावरच तिचे भविष्य नि भवितव्य जसे अवलंबून असते, तसे ते सत्ता, संपत्तीचा कार्यकाल ठरविणारेही असते. आणीबाणी, राज्यपाल नियुक्त्या व त्यांच्या भूमिका, राज्यकर्त्यांची आणि माध्यमांची भाषा व देहबोली, समाजास वेठीस धरून मतदार हित म्हणून घेतले जाणारे लोकप्रिय निर्णय यांचे फायदे जसे क्षणिक असतात, तसेच त्यातून निर्माण होणारी प्रतिमा व प्रतिष्ठा ही क्षणभंगुर असते. म्हणून मुलाखती या चिरंजिवी, मृत्युंजयी विधाने रेखांकित करत समाजमन घडवत राहतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मुलाखतींच्या स्वरूपाचा विचार करताना आपणास लक्षात येते की, त्या लोकप्रिय जनमत व्यक्त करणाऱ्या न ठरता, दीर्घकाळापर्यंत समाजास मार्गदर्शन करणाऱ्या एखाद्या प्रेषिताचे प्रवचन ठरते. म्हणून इथून पुढच्या काळात शांत मतदारांचे मनोगत जाणून घेण्याची यंत्रणा आपण उभारू शकू, तर मानवी विकासाचा खरा आराखडा बनवून सुनियोजित योजनेद्वारे प्रगल्भ व जबाबदार, कर्तव्यकेंद्री समाज निर्माण करू शकू. मुलाखतींची खरी शक्ती शक्यतांच्या सक्षम अंमलबजावणी व कार्यवाहीत असते.

वाचक, श्रोते, प्रेक्षकांचे कुतूहल, जिज्ञासांचे समाधान करणाऱ्या, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू समजावणाऱ्या, अनुभव कथन करणाऱ्या, वाङ्मयीन सौंदर्य स्पष्ट करणाऱ्या अशा विभिन्न स्वरूपांच्या मुलाखतींच्या भांडारांनी जगातील अनेक भाषांची भांडारे साहित्य लेण्यांनी समृद्ध आहेत. मराठी भाषा व साहित्य त्यास अपवाद नाही. ज्यांच्याजवळ 'सांगण्यासारखे' असते, अशांच्या मुलाखती घेतल्या जातात हे खरे आहे; पण ते अर्धसत्य होय. चकाकते ते जसे सोने नसते तसे बडबडणारे प्रत्येक प्रेषित नसतात, हेही आपण समजून घेतले पाहिजे. समाजहितार्थ जे निर्मितीमग्न असतात, अशा निर्मोही साधकांचा शोध घेऊन ती झाकली माणके समाजाप्रत पोहोचविण्याचे कार्य मुलाखत करीत असते. म्हणून पत्रकारिता जितकी शोधक, चौकस, चोखंदळ, चिकित्सक, मुलाखती तितक्याच प्रगल्भ, जबाबदार नि मार्गदर्शक ठरतात असा पूर्वानुभव आहे. तो विसरून चालणार नाही. वर्तमानात पीत पत्रकारितेचे पीक अमाप फैलावते आहे, ही आपल्या समाजप्रबोधनाची खरी शोकांतिका आहे. 'परिवर्तनाचा वाटसरू'[८]सारखे पाक्षिक असो 'साधना'[९] सारखे साप्ताहिक असो, 'ललित'[१०], 'नवभारत'[११], 'समाजप्रबोधन

पत्रिका'[१२] सारखे मासिक, त्रैमासिक असो, 'लोकसत्ता'[१३]सारखे दैनिक असो अशा अपवाद खेळीपण समाजस्वास्थ्य टिकवून ठेवत असतात. त्यांच्यामध्ये शक्यतांची शतशत परिवर्तने सामावलेली, दडलेली असतात. गाभाऱ्यातील शांत ठेवणारा नंदादीपच उद्याचा उष:काल घडवून आणतो, हे विसरून चालणार नाही. 'केला पोत बळेची खाले, ज्वाला तरी ते वरती उफाळे' हे लक्षात ठेवूनच प्रबोधनाची मशाल तेवत ठेवावी लागते. मुलाखती वाचायच्या, ऐकायच्या, पाहायच्या ते यासाठी. साहित्यिक, कलाकार, चिंतक यांच्या मुलाखतीत जे गांभीर्य सामावलेले असते ते चंदेरी दुनियेत व सत्ताकारणाच्या बाजारात नसते, हे ज्या दिवशी आपणास समजेल तो सुदिन, सुवर्णक्षण! उमज पडेल तर संभावनांचे क्षितिज इंद्रधनुषी सौंदर्याने न्हाऊन निघेल.

अभिनेते, लोकप्रतिनिधी, खेळाडू यांच्यापेक्षा उद्योजक, शेतकरी, संशोधक, वैज्ञानिक, शिक्षक, सैनिक, मजूर, कामगार, फेरीवाला, विचारवंत, लेखक अधिक समाजहिताचा हे समजून घेऊन मुलाखतींचा पट आणि नेपथ्य बदलण्याची गरज आहे. 'नेपथ्यावर नाटक अवलंबून असते. रंगमंचापेक्षा अधिक संभावना नेपथ्यात असतात,' हे हिंदी कवी दुष्यंतकुमार यांचे विधान आपण गांभीर्याने घ्यायला हवे. सामान्य, स्वकर्तृत्वसंपन्न, पुरुषार्थी माणूस मोठा, की जात, धर्म, वंश, घराणे, सत्ता, संपत्तीचे वारसदार हे ठरविण्याची वेळ येऊन ठेपली आहे. 'राजा तू चुकतोस' हे सांगण्याचे धारिष्ट्य हीच खरी मुलाखतीची शक्ती आणि सामर्थ्य असते. कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे उगवणारी बांडगुळे झुळूक निर्माण करतात. त्यांत मतांतर, मन्वंतर, युगांतर घडवून आणणारे वावटळी, वादळी सामर्थ्य नसते. त्सुनामी काय कामाची? सीतेच्या शांत पावलांची क्रांती स्थिरपद परिवर्तन घडविते यावर विश्वास ठेवत तशा मुलाखती योजण्यातच दूरदर्शिता सामावलेली असते.

आत्महत्याग्रस्त समाजमनात विजिगीषु वृत्ती निर्माण करणे हे मुलाखतीचे खरे कार्य असेल. गटातटापलीकडे, कोंडाळे, संप्रदाय, स्वार्थकेंद्री टोळयांची वाटमारी संपवून निरपेक्ष, निर्मोही साधकांच्या संघर्षातून तावून सुलाखून निघत ज्यांनी आपले सामर्थ्य नि क्षमता सिद्ध केलीय, अशा स्त्री - पुरुषांच्या मुलाखती प्रेरक आदर्श होत. खुश्कीच्या मार्गाने पुरस्कार व प्रतिष्ठा मिळवत मठपती बनलेल्या सुमारांच्या सद्दीच्या काळास शह द्यायचा, तर सेंद्रिय देशी वाणांचा शोध घेण्यास पर्याय उरत नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे वारसदार अशासाठी, की त्यांनी सनातन पठडीस छेद देत नवपथदर्शी प्रबोधन केले. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा फुले श्रेष्ठ अशासाठी, की त्यांनी मानवी वंचित वर्गाच्या उद्धाराचे कार्य केले.

## मुलाखत विकास

मुलाखतीच्या स्वरूप विकासाचा विचार करता वर्तमानकाळ 'मुलाखत युग' म्हणून ओळखला जातो. सन १९९० नंतरचा काळ दोन अंगांनी कायाकल्प करणारा ठरला. एक तर या

काळाने जागतिकीकरणामुळे व्यापार, राजकारण आणि साहित्यक्षेत्रातही वैश्विक भावना दृढमूल केली; पण या क्षेत्रातील वैश्विकीकरणाची संकल्पना दोन शतकांपूर्वीच एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी योहान वोल्फगांग फोन गटे (१७४९ - १८३२) यांनी मांडली होती. गटे हा जगविख्यात साहित्यिक, कवी, प्रवक्ता, समीक्षक, कलाकार, वैज्ञानिक, कादंबरीकार, नाटककार होते. जर्मन साहित्यावर त्यांनी आपल्या लेखणीचा अमीट ठसा उमटविला आहे. त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभाच्या तीन दशकांत लेख, पत्रे इ.द्वारे 'विश्वसाहित्य' (Weltliterature) संकल्पना स्पष्ट केली होती. त्यांच्या विचारानुसार, ''जगात मृत्युंजयी वाङ्मय वा विज्ञान असे काही असत नाही. जगात फक्त चांगले वाङ्मय वा विज्ञान असू शकते. ते परंपरा नि अनुवंशाच्या पृष्ठभूमीतून जन्म घेत ते समकालीन, समविचार, सहचारी वातावरणातून निर्माण होऊ शकते.'' गटेंचे मन उदार होते. त्यांचे जागतिक प्रगतीकडे लक्ष असायचे. सृजनात्मक प्रगतीबद्दल ते आशावादी व आस्थावान होते. साहित्य, काव्य, कला इ.मध्ये वंश, राष्ट्र सीमांच्या पलीकडे माणसाला बांधून ठेवण्याच्या, जगास एक करण्याच्या क्षमतेवर त्यांचा विश्वास होता. साहित्य, काव्य, कलांचे बहुविध व बहुव्याप्त (Cosmopolitan) रूप विश्व साहित्य (Weltliterature) निर्माण करू शकते अशी त्यांची धारणा होती.[१४]

दुसरीकडे याच काळात जगात माहिती व तंत्रज्ञानाधारे संगणकीय क्रांतीने माध्यमांचे युग निर्माण केले. उपग्रहीय दळणवळण, महाजाल विकास (इंटरनेट / नेटवर्क) यांनी साहित्य क्षेत्रात अभिव्यक्तीची नवी रूपे रूढ केली. मुद्रित माध्यमांची जागा इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी घेतली. त्यामुळे ब्लॉग्ज, ट्विटर, संकेतस्थळ, दृक-श्राव्य फिती, दूरदर्शन वाहिन्या, पॉडकास्टस् इ.मुळे मानवी संवादाचे रूप बदलून गेले. प्रयत्न लाघव, वाक्यांच्या जागी शब्द, शब्दांच्या जागी संक्षिप्त शब्दरूपे (Okey -> Ok -> K) संवादाची सुविधाजनक आकृती व आकृती बनत बहुप्रयोगित रूपे बनून गेली. भाषा आणि लिपीचे संबंध संपले. रोमन लिपीत मराठी लिहिणे संक्षिप्त संवाद (एस. एम. एस., व्हॉटस्अॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर इ.) शैली बनली. (Maze Kam Zale - माझे काम झाले) मराठी भाषा देवनागरीत लिहिणे इतिहासजमा झाले. या संवाद क्रांतीचा परिणाम मुलाखतीच्या स्वरूपावर झाला. विस्तृत मुलाखत वस्तुनिष्ठ उत्तरांच्या स्वरूपात तर आलीच, शिवाय तिने भाषेचे अल्पाक्षरी रूप धारण केले. (मी येत आहे -> येतोय) असे असले तरी वृत्तपत्रे, नियतकालिके आणि विविध वाहिन्यांवरूनही विस्तृत साहित्यिक मुलाखती अखंडपणे प्रकाशित होत आहेत. त्यांचे संग्रहपण प्रकाशित होत आहेत. मराठीबरोबर हिंदीसारख्या राष्ट्रीय भाषेत किताबघर प्रकाशनाने 'मेरे साक्षात्कार' शृंखलेत पन्नासएक साहित्यकारांचे मुलाखत संग्रह प्रकाशित केले आहेत. याशिवाय 'रंग साक्षात्कार', 'गुफ्तगू', 'अंतरंग साक्षात्कार', 'अंतर्वार्ताएँ', 'विचार - यात्रा', 'इंटरव्यू', 'मैं इनसे मिला', अशा अनेक मुलाखत संग्रहांनी हिंदी साहित्य समृद्ध आहे. इंग्रजीत 'Writer's At Work' सिरीज प्रसिद्ध आहेत. केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केलेल्या या मालिकेत 'द पॅरिस रिव्ह्यू' नियतकालिकातील साहित्यिक मुलाखती संग्रहित आहेत. चीनुआ अचिबे, जॉर्ज लुईस

बोर्गेस, पीटर कॅरी, ॲलेना फेरांटे, नॅडिन गॉर्डीमर, हा जीन, डॅनी लॅफेरिर, नागुइब महफूज, फ्रॅकॉइस मोरिॲक, हेटा मूलर, हारूकी मुराकामी, ऐसॅक सिंगर इ. मान्यवरांच्या मुलाखती या ग्रंथात वाचावयास उपलब्ध आहेत. पंजाबीमध्ये बऱ्याच वर्षांपूर्वी आपल्या 'सफरनामा' ग्रंथात 'आत्मसाक्षात्कार' लिहून अमृता प्रतिमनी स्वमुलाखत (Self Interview) प्रकार अस्तित्वात आणला होता. आता तो अन्य भाषांतही प्रचलित आहे. यात लेखक स्वत:च्या प्रश्नांना स्वत:च उत्तर देत असतो. यातून मुलाखतीस एक नवी कलात्मता व परिमाण प्राप्त होते.

महाजालावर आज श्रेष्ठ लेखक, विचारवंत, कलाकार यांच्या साहित्यिक, वैचारिक मुलाखती प्रकाशित करणारी अनेक संकेतस्थळे (वेबसाईटस्) आहेत. 'रायटर्स अँड ऑथर्स', 'बुक ब्राऊज', 'द राइट सेंस' त्यापैकी काही होत. लेखक व कलावंतांच्या मुलाखती प्रकाशित करणारा वार्षिकांक (इअर बुक) इंग्रजीत प्रकाशित होत असतो. हिंदी, इंग्रजीप्रमाणे असे उपक्रम मराठीत होतील, तर मराठी मुलाखतसाहित्य विकसित होत राहील. इंग्रजीत 'फोरा'सारखी दूरदर्शन वाहिनी मान्यवरांच्या मुलाखती नियमित प्रकाशित करीत असते. कमलेश्वर दूरदर्शनवर असताना 'चेहरे'सारखी शृंखला गाजली होती. हॉर्वर्ड विद्यापीठ 'फोरम नेटवर्क'अंतर्गत ज्या दृक्-श्राव्य मुलाखती प्रक्षेपित करीत असते, त्या उद्‌बोधक असतात. गेल्या शतकाच्या अखेरीस 'टेलिफोनिक इंटरव्ह्यू' प्रचलित होत्या. आज दूरदर्शनवर त्या प्रतिक्रियास्वरूप प्रक्षेपित होत असतात. 'दि न्यूयॉर्क टाइम्स' या इंग्रजी वृत्तपत्राने महत्त्वाच्या मुलाखती 'टाइम्स टॉक'अंतर्गत प्रकाशित करून मुलाखतींचे आदर्श रूप रूढ केले आहे. मराठीत असेच कार्य दैनिक 'केसरी', दैनिक 'सकाळ', दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स', दैनिक 'लोकसत्ता' यांनी इतिहासात केले आहे. जागतिक मुलाखत साहित्यात सनसनाटी मुलाखतींचाही प्रवाह सर्व भाषिक माध्यमांमध्ये दिसून येतो. त्यांचा म्हणून एक चटपटीत वाचणारा वर्ग आहे. साहित्यिक आणि वैचारिक मुलाखतींपुढे अशा वाचकांना प्रगल्भ नि अभिजात अभिरुचीसंपन्न करण्याचे आव्हान सर्वच काळात राहत आले आहे. पीत पत्रकारितेतील अशा मुलाखतींचे वर्णन करताना मार्क ट्वेन यांनी 'ॲन अनहॅपी इन्व्हेंशन'[15] म्हटले होते. कारण, यांत गप्पाटप्पा, टोमणे, कुजबूज (Gossips) इ. ची हीन अभिरूची दिसून येते, ती काही सुसंस्कृत समाजास भूषणावह ठरत नसते, म्हणून गंभीर मुलाखतींचे महत्त्व अधोरेखित होते.

श्राव्य मुलाखती हे या साहित्य प्रकारातले असे दालन आहे, जे आकाशवाणीच्या माध्यमातून मराठीत निरंतर विकसित होत राहिले आहे. भारतात ब्रिटिश साम्राज्य काळात 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' रेडिओ प्रसारण कार्य सुरू झाले. सन १९२६ मध्ये या हौशी आणि खासगी प्रसारण व्यवस्थेचे रूपांतर 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी लिमिटेड'ने मुंबई रेडिओ केंद्र सुरू केले. ते भारतातले पहिले आकाशवाणी केंद्र. हे खासगी कंपनीद्वारे प्रथम चालविले जायचे. सन १९३० मध्ये 'इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिस' सुरू झाली. तिचे जून १९३६ मध्ये 'ऑल इंडिया रेडिओ'मध्ये रूपांतर झाले. आजची आकाशवाणी, प्रसार भारती तिचे वर्तमान रूप होय! 'आकाशवाणी' हे भारतीय नाव ही रवींद्रनाथ टागोर यांची देणगी होय.

प्रथमपासूनच आकाशवाणीवरून मनोरंजक कार्यक्रमांबरोबर भाषणे, मुलाखती प्रसारित होत आल्या आहेत. भारत सरकारच्या प्रशासन विभागातर्फे त्यातील निवडक भाषणे, मुलाखती मुद्रित ग्रंथ, पुस्तिका, ध्वनिफिती, तबकडी (सीडी) इ. रूपात प्रकाशित होत आल्या आहेत. मराठीत अलीकडेच गोपाळ अवटी यांचे 'सृजन संवाद' (भाग १ आणि २ (२०२०) पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यात विविध केंद्रांतील विविध क्षेत्रांतील दिग्गजांच्या श्राव्य मुलाखतींचा लिखित दस्तावेज उपलब्ध झाला आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांनी या ग्रंथाचे वर्णन 'महाराष्ट्र प्रोफाईल'[१६] असे केले असून, ते समर्पक आहे. कारण, त्यात महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या मुलाखती आहेत. त्यातून महाराष्ट्राचे सांस्कृतिक चरित्र उभे राहते. आकाशवाणी केंद्रांमार्फत ज्येष्ठ नि नामवंतांच्या शाश्वत मूल्य (Archive Value) असलेल्या अनेक दीर्घ मुलाखती (Marathon Interviews) प्रक्षेपित झाल्या आहेत, त्या सर्व ऑडिओ बुक वा ग्रंथ रूपात येतील, तर तो महाराष्ट्र संस्कृतीचा इतिहास म्हणून पुढे येईल व सुवर्ण अक्षरात या मुलाखतींची नोंद होईल. हे आपले सांस्कृतिक संचित असून, हा वारसा आपण जनमनात प्रसारित केला पाहिजे.

सन १९५३ मध्ये 'दि पॅरिस रिव्हयू' ने विस्तृत साहित्यिक मुलाखतींचा उपक्रम सुरू केल्यावर 'Jemes Boswell's Life of Johnson' आणि 'Johnn Peter Eckermann's Conversations with Goethe'चे प्रकाशन केले. त्यास जगभर प्रसिद्धी मिळाली. या मुलाखतींची अनेक भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. अमेरिकेत १९८०च्या दशकात 'नॅशनल पब्लिक रेडिओ'मार्फत 'Morning Edition' आणि 'Weekend Edition'मधून प्रसिद्धी झालेल्या श्राव्य मुलाखती (Audio Interviews) बऱ्याच गाजल्या. १९९० आणि २००० अशा दोन दशकातील अमेरिकेतील दूरदर्शनवरील 'Oprah's Book Club' द्वारे विक्रम प्रस्थापित केला.

श्रेष्ठ वैचारिक मुलाखती एखाद्या कारागिरीतून निर्मित कलाकुसरीसारख्या असतात. त्या वाचणे म्हणजे एकप्रकारचे स्वयंशिक्षण जसं असतं, तसा तो स्वयंसंस्कारही असतो. तो तुम्हाला शब्द, विचारांगणिक समृद्ध नि प्रगल्भ बनवत राहतो. आजच्या धकाधकीच्या आणि गतिमान काळात ग्रंथांचे महत्त्व व वाचन कमी होते आहे. अशा काळात मुलाखतीचे महत्त्व मात्र वाढताना दिसते. मुलाखतीत वाचिक अभिनय, देहबोली यांचे महत्त्व आज वाढत आहे. अशा काळात मुलाखत कल्पनातीत प्रभावी ठरत आहे. कारण, मुलाखतीत जो अनुभवसंपन्न खजिना श्रोता नि वाचकांना वा प्रेक्षकांना लाभतो, तो ग्रंथांच्या तुलनेत खचितच वरचढ असतो. कारण, त्यात मुलाखतदाराची निरीक्षणे व चिंतन ओतप्रत भरलेले असते. ते वाचकास भारावून टाकते. सुमारे एक-दोनशे वर्षांपूर्वी विल्यम हॅझलिट (१७७८ - १८३०) या इंग्रजी निबंधकार, नाटककार, समीक्षक असलेल्या साहित्यिकाने म्हणून ठेवले आहे की, ''Authors are good

conversationalists, because there is more to be learnt from them than from their books.''[17] या विधानात ग्रंथकर्ता हा चांगला मुलाखतदार असल्याशिवाय तो चांगला साहित्यिक होऊ शकत नसल्याचे अप्रत्यक्ष सूचन मुलाखतीचे साहित्यिक लालित्य आणि वैचारिक सामर्थ्य स्पष्ट करणारे आहे.

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मुलाखती : मीमांसा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विविध दैनिके, नियतकालिके, आकाशवाणी केंद्रे यांना स्वातंत्र्योत्तर कालखंडात ७८ मुलाखती दिल्या आहेत. सन १९४९ ते १९९४ अशा ४५ वर्षांच्या काळात त्यांच्या अधिकांश मुलाखती या दैनिक 'केसरी' नि मासिक 'नवभारत'ने प्रकाशित केल्या आहेत. 'नवभारत'साठीच्या अधिकांश मुलाखती प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतल्या असून, त्या पूर्वनियोजित असल्याचे वाचताना लक्षात येते. शिवाय त्या बऱ्यापैकी सुदीर्घही आहेत. तर्कतीर्थांनी आपल्या हयातीत दिलेल्या अधिकांश मुलाखती दैनिक 'केसरी'साठी असून, त्या सर्व वाईचे तत्कालीन 'केसरी' प्रतिनिधी व प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईचे विद्यमान सचिव अनिल जोशी यांनी घेतलेल्या आहेत. वृत्तपत्रास आवश्यक प्रासंगिक विषयांवरील प्रतिक्रिया, प्रतिसाद, अभिमत असे त्या मुलाखतींचे स्वरूप असून, त्यांना वृत्तपत्रीय आटोप (संक्षिप्तता) आहे. काही प्रश्नोत्तररूपात, तर काही लेखरूपात त्या प्रकाशित झालेल्या आढळतात. दैनिक 'सकाळ'साठीही काही मुलाखती तर्कतीर्थांनी दिल्याचे दिसते. नियकालिकांच्या नियमित वा विशेषांकासाठीच्या काही मुलाखती आहेत, तर काही स्वतंत्र असून त्या विविध ग्रंथांत समाविष्ट असल्याचे दिसते. 'नवभारत'शिवाय 'मौज', 'ऋतुरंग', 'उगवाई', 'लोकराज्य'सारख्या नियतकालिकांना दिलेल्या मुलाखती दीर्घ, विषयकेंद्री व तर्कतीर्थांची विचारधारा, चिंतन स्पष्ट करणाऱ्या आहेत. पुणे, मुंबई, जळगाव, औरंगाबाद या आकाशवाणी केंद्रांसाठी घेतलेल्या मुलाखती ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे, श्रीराम पुजारी, प्रा. डॉ. सुधाकर पवार यांनी घेतलेल्या आहेत. पैकी औरंगाबाद केंद्रासाठी डॉ. सुधीर रसाळ यांनी घेतलेली मुलाखत शाश्वत मूल्य (Archiv Value) स्पष्ट करणारी म्हणून महत्त्वाची ठरते. या सर्व मुलाखतींचा विषय बहुआयामी असून भारतीय संस्कृती, स्वघडण, विविध व्यक्ती, विचार, कृती, राजकारण, समाजकारण, शिक्षण, भाषा, साहित्य, ईश्वर इत्यादी विषयांवरील तर्कतीर्थांचा दृष्टिकोन समजण्यास त्या उपयुक्त ठरतात. या सर्व मुलाखतींचा विचार इथे करण्यात येत आहे.

## मुलाखतींचे विषयनिहाय वर्गीकरण

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विविध वृत्तपत्रे, नियतकालिके, माध्यमे, व्यक्ती यांना वेळोवेळी ज्या पन्नासेक मुलाखती दिल्या, त्यांच्या विषयस्वरूपाचा विचार करताना लक्षात येते, की त्यात वैविध्य आहे. विषयनिहाय वर्गीकरण करायचे झाले तर ते खालीलप्रमाणे होऊ शकते.

अ) आत्मपर मुलाखती

ब) अध्ययन, अध्यापन, जडणघडणसंबंधी मुलाखती (परात्मपर)

क) व्यक्ती आणि विचारकेंद्री मुलाखती

ड) धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञानसंबंधी मुलाखती

इ) विविधविषयक दृष्टिकोन स्पष्ट करणाऱ्या मुलाखती

१) राजकारण

२) शिक्षण

३) भाषा आणि साहित्य

यातही 'स्व'पेक्षा 'पर'केंद्रित मुलाखती अधिक आढळतात. व्यक्ती व विचार, कार्य स्पष्ट करणाऱ्या मुलाखती अधिक आहेत. लोकमान्य टिळक, स्वामी केवलानंद सरस्वती, लोकनायक बापूजी अणे, किसन वीर, 'केसरी'चे पंचानन, (विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, गोपाळ गणेश आगरकर, साहित्यसम्राट न. चिं. केळकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर), मानवेंद्रनाथ रॉय, पंडित जवाहरलाल नेहरू, पंडित कुमार गंधर्व या नावांवरूनही तर्कतीर्थांपुढील विविध क्षेत्रीय आदर्श नि प्रेरणा स्पष्ट होतात. आत्मपर नि जडणघडणसंबंधी मुलाखतींतून त्यांच्या चरित्र नि व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर प्रकाश पडतो. धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान ही क्षेत्रे तर्कतीर्थांची आस्था केंद्रे आहेत. त्यासंबंधी प्रश्नांवर ते मुक्तकंठाने उत्तरे देतात. विविधविषयक दृष्टिकोन प्रकट करणाऱ्या मुलाखतीत तर्कतीर्थ राजकारण, समाजकारण, शिक्षण, भाषा व साहित्यासंबंधी आपल्या धारणा व संकल्पना विशद करतात. कोशकार्य हा त्यांचाच प्रांत. विश्वकोशाची यशोगाथा वाचत असताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची दूरदृष्टी व घेतलेली मेहनत लक्षात येते. आकाशवाणीच्या मुलाखतीतून भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील त्यांचे योगदान स्पष्ट होते . या सर्व मुलाखती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यास संदर्भसाधनाचे कार्य करतात.

**(अ) आत्मपर मुलाखती**

**१) मी आणि माझे वक्तृत्व (१९५३)**

स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रख्यात कीर्तनकार अनंत विष्णू पाटणकर यांनी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर तत्कालीन वक्त्यांना नऊ प्रश्न पाठवून त्या प्रश्नावलीद्वारे त्यांच्या वक्तृत्वविषयक सर्वांगांची माहिती संकलित, संपादित करून 'मी व माझे वक्तृत्व' शीर्षकग्रंथ सिद्ध करून सन १९५३ ला स्वत: प्रकाशित केला होता. प्रश्नावलीद्वारे घेतलेल्या लिखित मुलाखतींचा संग्रह म्हणून या ग्रंथाचे दस्तावेज म्हणून असाधारण महत्त्व आहे. या ग्रंथात स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकारण, समाजकारण, शिक्षण, साहित्य, भाषा, समीक्षा या क्षेत्रांतील पन्नासेक वक्त्यांच्या मुलाखती या ग्रंथात आहेत. प्रा. श्री. म. माटे, प्रा. ना. सी. फडके, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, आचार्य विनोबा भावे, साहित्यकार वि. स. खांडेकर प्रभृती मान्यवरांचा त्यात समावेश आहे.

प्रथम भाषण संदर्भ, वक्ता म्हणून घडण, वक्तृत्वाची तयारी, वक्तृत्वाचे विषय, वक्तृत्वाची व्याख्या, उत्तम वक्ते कोण ? इत्यादी प्रश्नांद्वारे पाटणकर यांनी लिखित मुलाखत घेऊन त्या त्या वक्त्याच्या वक्तृत्वकलेचा अभ्यास करून आढावा घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचाही अंतर्भाव होता. तर्कतीर्थांनी दिलेल्या उत्तरांनुसार सन १९२४ मध्ये त्यांचे पहिले भाषण सोनगीर (पश्चिम खानदेश) येथे 'हिंदू धर्म परिवर्तनशील आहे' याविषयी झाले होते. ते धर्मपंडित परिषदेतील भाषण असल्याने त्यास भारतभरचे पंडित उपस्थित होते. या मुलाखतीनुसार पंचवीसेक वर्षांत (१९२४ ते १९५०) हजाराहून अधिक व्याख्याने दिल्याचे स्पष्ट होते. आयुष्याचा विचार करता पाचएक हजार भाषणे तरी तर्कतीर्थांनी दिली असावीत. परंतु उपलब्ध भाषणे शतक ओलांडू शकत नाहीत, यावरून महाराष्ट्र समाजपरंपरेत आणि संस्कृतीत दस्तावेजीकरण व जतनसाक्षरतेचा अभाव दिसून येतो. तर्कतीर्थ पूर्वतयारी करून भाषणे देत, हे या मुलाखतीतून स्पष्ट होते. शास्त्रीय, तात्त्विक विषयांवर भाषण देण्याचा त्यांचा कल होता. भाषणातून प्रबोधन, उद्बोधन व्हावे, यावर त्यांचा कटाक्ष असे. स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य विनोबा त्यांचे वक्तृत्वातील आदर्श होत. विचारशील भाषणे देण्याची त्यांची वृत्ती होती.

**२) वेदांचे पावित्र्य माझ्या हृदयात खोल रुजले आहे (१९७३)**

ही आत्मकथनात्मक मुलाखत आहे. ती 'पुरुषार्थ' मासिकाच्या जुलै, १९७३ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. याचे एक निमित्त होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू नारायणशास्त्री मराठे ऊर्फ स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली सन १९२५ मध्ये सुरू झालेल्या 'धर्मकोश' प्रकल्पातील 'राजनीतिकाण्ड'चे प्रकाशन भारताचे उपराष्ट्रपती श्री. गोपालस्वरूप पाठक यांच्या हस्ते संपन्न झाले होते. 'पुरुषार्थ' मासिकाचे संस्थापक संपादक पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर होते. त्यांच्या पश्चात या मासिकाचे संपादक झालेल्या वसंत श्रीपाद सातवळेकर यांनी सदर मुलाखत घेतली होती.

त्र्याहत्तराव्या वर्षीही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रकृती उत्तम होती. आपल्या सुदृढ आरोग्याचे रहस्य उकलत या मुलाखतीत तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, घरची गरिबी धट्टीकट्टी होती. वाईत प्राज्ञपाठशाळेत ती राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा असल्याने आसने, प्राणायाम, खेळ, कुस्ती, जोर-बैठका, मल्लखांब सर्व असे. पोहणे नियमित होते. योग, प्राणायाम अजून नियमित करतो. यामुळे शारीरिक स्वास्थ्य लाभले आहे. मला मानसिक शक्ती धार्मिक उपासनेतून मिळाली. भविष्याची चिंता मला फारशी भोवली नाही. माझ्या जीवनातील इतक्या राजकीय उलथापालथी होऊनही ध्यानधारणा, योगाभ्यासावरील माझी निष्ठा ढळली नाही. सूर्योदयापूर्वी उठतो. फिरायला जातो. अल्पोपहार घेतो. गप्पाटप्पांत वेळ घालवत नाही. अलीकडे सिगारेट ओढू लागलो आहे. पारमार्थिक प्रभावामुळे मी स्वतःस लैंगिक आकर्षणापासून दूर ठेवले आहे.

प्राचीन व अर्वाचीन या दोन्ही विद्यांचा मला लाभ झाला. त्यामुळे मला भारतीय संस्कृतीचे गंभीर अध्ययन करता आले. पंडित सातवळेकर यांच्या सहवासाने व त्यांच्या ग्रंथवाचनाने वेदांचे

अर्थबोधपूर्वक वाचन करण्याकडे माझी प्रवृत्ती वाढली. या विषयातील ते माझे गुरू होत. त्यांच्या निधनानंतर त्यांची वैदिक साहित्य प्रचारपरंपरा अखंड रहावी, असे मला वाटते.

आत्मकथनात्मक मुलाखतींमध्ये उल्लेखनीय असलेल्या या मुलाखतीतून तर्कतीर्थ जडणघडण, दिनक्रम, परिपाठ इ.वर प्रकाश पडतो. व्यायाम व व्यसन या दोन्ही अंगांवर इथे ऊहापोह करण्यात आला आहे.

**३) माझी घडण (१९७५)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्म २७ जानेवारी, १९०१ रोजी झाला. सन १९७५ ला त्यांना ७४ वर्षे पूर्ण होऊन त्यांनी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्याचे औचित्य साधून प्रा. रा. ग. जाधव यांनी 'विचारशिल्प' या छोटेखानी लेखसंग्रहाचे संपादन केले. ते कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे यांच्यावतीने प्रकाशित करण्यात आले. असाच परंतु बृहत् 'लेखसंग्रह (खंड - १)' सन १९८२ साली तर्कतीर्थांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचे औचित्य साधून श्रीविद्या प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केला .

'विचारशिल्प' लोकसंग्रहात तर्कतीर्थांचे निवडक लेख, भाषणे, विश्वकोश नोंदी, प्रस्तावना असे प्रातिनिधिक १३ लेख आहेत. १३६ पृष्ठांचे हे पुस्तक. या संकल्पनेचा विस्तार म्हणजे सन १९८२ चा बृहत् 'लेखसंग्रह' (खंड - १). त्यात ६७ लेख, नोंदी, भाषणे, अनुवाद, निबंध, प्रस्तावना आहेत. ५९० पृष्ठांचा हा ऐवज. त्याला तर्कतीर्थांची प्रस्तावना आहे. 'विचारशिल्प' आकारत असताना प्रा. रा. ग. जाधव यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रश्न पाठवून त्यांची 'माझी घडण' ही लिखित मुलाखत साकारली होती. स्वतःच्या घडणीवर केलेले भाष्य म्हणून या आत्मपर मुलाखतीचे महत्त्व अशासाठी, की ते अमृतमहोत्सवी वर्षात केलेले जीवन चिंतन होय.

यात तर्कतीर्थ समजावतात की, आपली बालपणातील घडण धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर गावी झाली. ते गाव छोटे होते. सुधारणा व संपर्काच्या दृष्टीने दूरचे होते. या गावावर कीर्तनकार, पुरोहितांचा प्रभाव पुरातन काळापासून चालत आलेला होता. गावात साप्ताहिक 'केसरी'चे सामुदायिक वाचन होत असे. सरकारी अधिकाऱ्यांचा पोशाख (कोट - पाटलुणी) व साधने (बाइसिकल) यांमुळे गावास आधुनिकतेचे दर्शन घडे. तर्कतीर्थ संस्कृत पंडित बनायचे म्हणून १९१४ मध्ये वाईस प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. इथे नारायणशास्त्री मराठे (स्वामी केवलानंद सरस्वती) यांचा त्यांनी गुरू म्हणून स्वीकार केला. प्राज्ञपाठशाळा सनातनी वातावरणाची असली तरी समर्थ विद्यालयाच्या शिक्षक - विद्यार्थ्यांमुळे आधुनिक व राष्ट्रीय विचाराची बनली. याचा प्रभाव तर्कतीर्थांच्या घडणीवर होऊन ते क्रांतिकारी झाले. त्यांनी स्वातंत्र्यचळवळीचे नेतृत्व केले, तुरुंगवास भोगला. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, मानवेंद्र रॉय यांच्या सहवास, संपर्कातून ते नवमानवतावादी, पुरोगामी बनले. कोशकार्य त्यांचे जीवनकार्य बनले.

## ४) तर्कतीर्थांच्या यशाचे गमक (१९७५)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या आयुष्याची पंच्याहत्तरी सन १९७५ मध्ये पूर्ण केली. त्यांच्या या अमृतमहोत्सवाप्रीत्यर्थ साप्ताहिक 'समर्थ'ने त्यावर्षीच्या दिवाळी अंकात प्रभाकर श्रीधर अवचट यांनी घेतलेली मुलाखत आपल्या वाचकांसाठी प्रसिद्ध केली होती. यात विविध प्रश्नांसंबंधातील तर्कतीर्थांचा दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो.

संत वाङ्मयासंदर्भात त्यांचे म्हणणे असे की, या वाङ्मयापासून आपणास सात्विक आनंद मिळतो. संकटकाळी आपले मनोबल वाढते. आपण गलितगात्र होत नाही. कर्मकांडाच्या मागे न लागता भक्ती करायला हवी. आज राजसत्तेत सेवा जाऊन स्पर्धा आली आहे. सत्तास्थानांचा मोह वाढला आहे. विधायक कार्यात पुरोगामीपण हवे. आज राजकीय स्थैर्याच्या आश्वासनाची अधिक गरज आहे. पक्षीय हेवेदावे देशहिताचे नाहीत. तुम्ही व्यक्तिगत जीवनात कार्यमग्नतेत आनंद मानायला शिकले पाहिजे. स्पर्धा व संघर्षरहित जीवन जगायला माणसाने शिकले पाहिजे. मी गैरसमज करून घेत नाही. कुणी करून घेत असेल, तर अशा व्यक्तींविषयी द्वेष, निंदा, अहित इ. गोष्टी टाळून तटस्थ राहतो. माझ्या नित्य जीवन, कार्य, विचार, चिंतन, लेखन, मनन इ.वर परिणाम होऊ देत नाही. मी व्यक्तिगत जीवनात महत्त्वाकांक्षी नाही. सत्ता, संपत्ती, कीर्तीची मला हाव नाही. माझ्या पत्नीचा स्वभाव माझ्यासारखाच आहे. दोघेही एकमेकास समजून घेतो व संयम, मनःशांती राहील असे पाहतो.

सदर मुलाखत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यास उपयुक्त ठरणारी आहे. तर्कतीर्थ आपल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनातील विविध प्रश्न आणि समस्यांच्या संदर्भात जो दृष्टिकोन ठेवतात, तोच व्यक्तिगत जीवनात अंगिकारत असल्याने त्यांच्या जीवनात विसंगती आढळत नाही. जो नियम दुसऱ्याला तो आपल्यालाही, अशी स्वच्छ भावना व धारणा असल्याने त्यांच्या उत्तरायुष्यात एकप्रकारची कृतार्थता आहे नि वानप्रस्थ वृत्तीही. 'सब्र का फल मीठा' हे त्यांच्या जीवनाचे सार म्हणून सांगता येते.

## ५) अध्ययन आणि वैचारिक वाटचाल (१९८१)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९८१ मध्ये जीवनाची ८० वर्षे पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले. हा त्यांना लाभलेला सहस्रचंद्रदर्शन योग होता. त्याचे निमित्त साधून 'नवभारत' मासिकाच्या संपादकांनी (प्रा. मे. पुं. रेगे) तर्कतीर्थांना प्रश्न विचारून एक विस्तृत मुलाखत घेतली. या मुलाखतीचा उद्देश तर्कतीर्थांची वैचारिक वाटचाल कशा प्रकारच्या अभ्यास, वाचन, चिंतन, मनन, प्रभाव इत्यादींतून झाली ते जाणून घेण्याचा होता.

तर्कतीर्थांचे वाचन, अभ्यास व व्यासंग त्रैभाषिक असल्याचे ही मुलाखत वाचताना स्पष्ट होते. त्यांचे पायाभूत वाचन, अभ्यास संस्कृतचा. नंतर त्यांनी मराठी वाचन केले. आचार्य विनोबांनी त्यांना पौर्वात्य पठडीतून पाश्चात्त्य ज्ञानजगताचे महाद्वार दाखवले व ते इंग्रजी वाचू लागले.

संस्कृतमध्ये 'संतलीलामृत', 'पांडवप्रताप', 'हरिविजय'चे वाचन झाल्यावर तर्कतीर्थ

तत्कालीन 'संस्कृतचंद्रिका' मासिक नियमित वाचू लागले. संस्कृतचा त्यांचा अभ्यास शास्त्री - पंडितांच्या सनातनी पठडीचा (घोकंपट्टी / पाठांतर) होता. चरण, अर्धेली, ऋचा, सूक्त अशी अध्ययनाची पद्धत होती. 'षडंगवेद' अभ्यास तर्कतीर्थांनी केला. षडंगवेद म्हणजे चार वेद आणि सहा वेदांगे. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेदाचे तर्कतीर्थांनी गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली वाचन, पठन, सार्थ अध्ययन केले. नंतर शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिषी ही सहा वेदांगे शिकले. त्यानंतर त्यांनी 'प्रस्थानत्रयी'चा म्हणजे श्रुती, स्मृती, न्यायाचा अभ्यास केला. उपनिषद, भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्र म्हणजे प्रस्थानत्रयी होय. या संस्कृत वा प्राच्य विद्येच्या पायाभूत अभ्यासानंतर संस्कृतचे स्वाध्यायी शिक्षण सुरू केले. त्यात 'न्यायमुक्तावली'नंतर गदाधरी, दिनकारी, जागदीशी, पंचलक्षणी, चतुर्दशलक्षणी असा उत्तरोत्तर उच्चस्तरीय अभ्यास करीत पांडित्य संपादन केले. 'सिद्धांत लक्षण', 'तर्कदीपिका', 'वेदांतसार', 'पंचदशी', 'फलज्योतिष', 'बौद्धन्याय', 'जैन न्याय', 'दशक धर्मलक्षणम्'चा अभ्यास करीत त्यांच्या सनातन अध्ययनास शाश्वत, वैश्विक अध्ययनाचे परिमाण प्राप्त झाले ते मात्र 'नागार्जुन समग्र' अभ्यासाने.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या त्रैभाषिक अभ्यासाच्या क्रमाचा विचार करता लक्षात येते, की त्यांनी संस्कृतवर प्रभुत्व मिळविल्यानंतर मराठीअगोदर इंग्रजीचे अध्ययन, वाचन केले. विनोबा भावे यांनी त्यांना पाश्चात्य संस्कृती व साहित्याचे अभिजातपण समजावून सांगितले. इतकेच नव्हे तर शिकून अमेरिकेस जाण्याचा सल्ला दिला होता. यामागे तर्कतीर्थांच्या हुशारीची पारख होती. तर्कतीर्थ एकीकडे इंग्रजी वाचत. त्यांची मराठी भाषांतरे वाचत. तर्कतीर्थांचे मराठी वाचन वाढत गेले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'टॉलस्टॉय, सन्फर्ड अँड मर्टन'चे वाचन केले. त्याची मराठी भाषांतरे 'इनामदारांचा बाळू', 'हरी आणि त्र्यंबक' वाचले. 'टेल्स फ्रॉम शेक्सपिअर'ची त्यांना गोडी लागली. इंग्रजी ऐतिहासिक ग्रंथ त्यांना आवडू लागले. 'हिस्टरी ऑफ सिव्हिलायझेशन इन इंग्लंड' हा ग्रंथ त्यांनी अभ्यासला. नंतर गीबनलिखित 'डिक्लाईन अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर' मुळे जागतिक परिवर्तने लक्षात आली. टेन (Taine) लिखित' 'हिस्टरी ऑफ इंग्लिश लिटरेचर'मुळे साहित्य, इतिहास लेखनाची खुबी समजली. मिल (Mill)चे 'लॉजिक, लिबर्टी, रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट'मुळे राज्यशास्त्र समजले. इतिहास, साहित्य, राज्यशास्त्राच्या वाचनानंतर तर्कतीर्थांनी आपल्या वाचनाची दिशा बदलून अर्थशास्त्र, समाजशास्त्रांच्या कक्षा रुंदावायचे ठरवून कार्ल मार्क्सचे ग्रंथ वाचण्याचा सपाटा लावला. मार्क्सची ओळख प्रथम तुरुंगात असताना द्वा. भ. कर्णिक यांच्यामुळे झाली होती. ती 'मॅन्युफॅस्टो', 'अँटी ड्यूरिंग', 'डायलेक्टीस ऑफ नेचर', 'कॅपिटल' वाचून इतकी दृढमूल झाली, की तर्कतीर्थ चक्क मार्क्सवादी झाले. गांधीवादाकडून मार्क्सवादाकडे प्रवास करत तर्कतीर्थांनी 'हिंदुधर्माची समीक्षा'सारखा ग्रंथ मार्क्सवादी दृष्टिकोन स्वीकारून सिद्ध केला. पुढे त्यांनी हेगेलच्या 'फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी'चा अभ्यास केल्यानंतर 'वैदिक संस्कृतीचा

विकास' ग्रंथ सिद्ध केला. एम. एन. रॉय यांच्या संपर्क आणि सहवासाने ते रॉयवादी बनले, ते त्यांच्या 'इंडिया इन ट्रांझिट' वाचून लेनिनच्या 'मटिरिॲलिझम अँड इंपिरिको - क्रिटिसिझम'ने तर्कतीर्थांच्या मार्क्सवादी विचारधारेबद्दलचे पूर्वग्रह बदल. नंतर त्यांनी ज्युलियन हक्स्ली समग्र वाचला. त्यामुळे क्रांतीपेक्षा उत्क्रांती श्रेष्ठ असते याची जाणीव झाली.

वर स्पष्ट केल्याप्रमाणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मराठी वाचनाचा-व्यासंगपूर्ण मराठी साहित्य वाचनाचा-प्रारंभ इंग्रजी साहित्याच्या मराठी भाषांतराने झाला. कारण प्रारंभिक इंग्रजी वाचन, अभ्यास ते 'चुकत-शिकत'(Trail And Error Method) करत होते. इंग्रजी स्पेलिंग कच्चे असणे त्याचे कारण होते. आधुनिक मराठी वाचनात प्रारंभी इतिहासाच्या आवडीपोटी तर्कतीर्थांनी रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांच्या 'मराठी रियासत'चे खंड वाचले. नंतर त्यांनी आपल्या वाचनाचा मोर्चा मराठी कवितेकडे वळविला. केशवसुत, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, अनिल बोरकर यांच्याकडे वळविला. गद्य वाचनात विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाला'ने त्यांना प्रभावित केले. या निबंधशैलीने त्यांना मोहवून टाकले; पण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सनातनी पंडित–शास्त्रीला पुरोगामी, क्रांतिकारी सुधारक बनविले, ते मात्र गोपाळ गणेश आगरकरांच्या लेखनाने. त्यांच्याकडून तर्कतीर्थ सामाजिक उत्क्रांती काय असते, ते शिकले. मिल स्पेन्सरची मराठी भाषांतरे वाचून तर्कतीर्थ काही काळ अज्ञेयवादी (Agnosticism / Existencism) विचारांचे भोक्ते बनले होते. सिजविक, मूर प्रभावाचाही हाच काळ. नित्य नव्या विचार वादाचे अध्ययन हा घडणीच्या काळातील तर्कतीर्थांचा छंदच बनून गेला होता. शिवरामपंत परांजपेंचे 'काळ'मधील निबंध विचारप्रवण म्हणून आकर्षणाचे कारण बनले होते. ग्रंथ वाचनाबरोबरीने तर्कतीर्थ वृत्तपत्र, नियतकालिकांचे वाचन नियमित करीत होते, ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत. 'समाज प्रबोधन पत्रिका', 'साधना'सारखी प्रबोधनपर नियतकालिके, अग्रलेख, स्तंभ, स्फूट वाचन नियमित होते.

तर्कतीर्थांच्या या मुलाखतीतून त्यांची वैचारिक घडण व वाटचालीवर प्रकाश पडतो अन् लक्षात येते, की कोणत्याही माणसाची घडण ही तो काय वाचतो, विचार करतो यावर अवलंबून असते. तर्कतीर्थ बहुश्रुत होते तसे त्यांचे वाचन, अध्ययन, चिंतनही बहुभाषी, बहुआयामी होते. तर्कतीर्थांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाची उकल या कसोटीवरच होऊ शकते.

**६) जीवन आणि घडण (१९८६)**

आकाशवाणी केंद्र, पुणेसाठी सन १९८६ ला पु. ल. देशपांडे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची घेतलेली मुलाखत. आजवर तर्कतीर्थांनी कंठलेले आयुष्य जाणून घेण्याच्या उद्देशाने घेतलेल्या मुलाखतीत एकतर मोठी अनौपचारिकता होती, शिवाय तर्कतीर्थांबद्दलचा आदरही होता. पहिल्या जागतिक मराठी परिषदेत सन १९८९ मध्ये मुंबईत षण्मुखानंद सभागृहात १२ ऑगस्ट रोजी अनेक मराठी मान्यवरांचा गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला होता. त्या सर्वांतर्फे

आभार मानणारे एक भाषण पु. ल. देशपांडे यांनी केले होते. त्यावेळी तर्कतीर्थांची भलामण करताना ते म्हणाले होते की, "विद्वत्तेबद्दल आपण नेहमी प्रखर, तेजस्वी या विशेषणांचा वापर करीत असतो; पण ज्यांच्या विद्वत्तेत शारदीय चांदण्यांचा आनंद लाभतो, असे आमचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. विद्वत्ता ही किती शीतल आणि सुंदर असू शकते असे जर मला कोणी विचारले, तर मी सांगेन लक्ष्मणशास्त्री जोशींच्या सहवासात एक तास घालवा म्हणजे तुम्हाला चांदण्यांमध्ये न्हाऊन निघाल्यासारखे वाटते की नाही बघा. नाही वाटले तर तुम्ही जन्मोजन्मीचे गलिच्छ आहात असे समजा आणि जा, असा शापपण काहीजणांना देव देत असतो."

या मुलाखतीत पु. ल. देशपांडे यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांच्या उत्तरांतून तर्कतीर्थांनी आपले ८५ वर्षांचे आयुष्य उलगडून दाखविले. प्राज्ञपाठशाळेतील घडण, स्वातंत्र्यचळवळीतील सहभाग, महात्मा गांधींनी अहिंसक सत्याग्रहाचा दाखविलेला नवा मार्ग, एम. एन. रॉय यांच्या विचारांनी आकर्षित होऊन रॉयवादी बनणे आणि स्वातंत्र्योत्तर कार्यात केवळ बुद्धिजीवी कार्याला वाहून घेऊन साहित्य आणि संस्कृती कार्य करणे, कोश निर्मिती करणे या सर्वांवर या श्राव्य मुलाखतीत उभयतांनी दिलखुलास गप्पा मारत ही मुलाखत रंगतदार केली. मुलाखतीचा शेवट पु. ल. देशपांडे यांच्या फर्माईशीनुसार 'मधुवातारयते मधुक्षरंति सिद्धव:' या श्लोकाने झाला. लिखित मुलाखत वैचारिकदृष्ट्या कितीही प्रभावित करीत असली तरी श्रव्य वा दृक्-श्राव्य मुलाखती वा भाषणे अधिक जिवंत असतात. कारण, त्यात व्यक्ती आपण त्याच्या भाषेत अनुभवत असतो. त्यात हितगुज भाव व अनुभव अन्य मुलाखतींपेक्षा अधिक प्रत्यंकारी असतो. ही मुलाखत त्याचे उदाहरण होय.

**७) शास्त्री-पंडितांच्या सहवासातील ज्ञानसाधना (१९८७)**

यापूर्वी आत्मपर मुलाखतींमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या त्रैभाषिक वाचन, अध्ययन, चिंतन, मननाबद्दलच्या प्रा. मे. पुं. रेगे यांच्या प्रश्नांना उत्तरे देत आपला व्यासंग स्पष्ट केला आहे. इथे या मुलाखतीत तर्कतीर्थ प्रा. रेगे प्रश्नांना सामोरे जात 'तर्कतीर्थ' म्हणून त्यांची जी घडण झाली, त्या यांच्या अध्ययन-अध्यापन प्रकियेवर आणि गुरुपरंपरेवर प्रकाश टाकतात नि स्पष्ट करतात की, आपण कोणापासून काय शिकलो.

या मुलाखतीतून स्पष्ट होते, की तर्कतीर्थ प्राज्ञपाठशाला, वाई येथे आले, ते वडिलांच्या स्वप्नानुसार. वडिलांना वाटे, की आपल्या मुलाने संस्कृत पंडित व्हावे. ते तसे शास्त्री–पंडित झाले; पण येथे त्यांना गुरू म्हणून लाभलेले नारायणशास्त्री मराठे ऊर्फ स्वामी केवलानंद सरस्वती पठडीतले पंडित नव्हते, तर आधुनिक मनोवृत्तीचे शास्त्री होते. त्यांच्याशिवाय प्राज्ञपाठशाळेत त्यांना श्रीधरशास्त्री पाठक, धोंडशास्त्री डेंगवेकर, वासुदेवशास्त्री अभ्यंकरप्रभृती पंडितांनी शिकविले. प्राज्ञपाठशाळेत त्यावेळी शिक्षक-शास्त्री तीन प्रवाहांचे होते. १) स्वातंत्र्यचळवळ समर्थक, २) दर्शनशास्त्रे, न्याय इ. केंद्र मानून अध्यापन करणारे अध्यापक, ३) आगरकर-सावरकर प्रभावी धर्मसुधारक.

तर्कतीर्थांनी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत न्यायवेदांतावर प्रभुत्व प्राप्त केले आणि त्याच्या जोरावर काशीत जाऊन उच्च शिक्षण संपादन केले. अंतिमतः कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून सन १९२३ मध्ये 'तर्कतीर्थ' पदवी संपादन केली. तत्पूर्वी काशी (वाराणसी) येथे वामाचार्य भट्टाचार्य यांच्याकडे गदाधर भट्टांच्या 'दिधिती'मधील 'पंचलक्षणी', 'चतुर्लक्षणी', 'सिद्धांतलक्षण' ग्रंथांचे अध्ययन केले. महामहोपाध्याय पंत यांनी तर्कतीर्थांच्या अनेक शंकांचे निरसन केल्याने त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने प्राच्यविद्या संपादली. इथे वादविवाद शास्त्रार्थ, समयबंध इ.द्वारे खंडन-मंडन करण्याच्या पद्धतीचा सराव झाला. राजेश्वरशास्त्री द्रविडांकडे तर्कतीर्थ काही काळ शिकले. इथे त्यांना दाक्षिणात्य पंडितांचा सहवास लाभला. ज्ञानसाधनेत पूर्णत्व येण्यास इथे मोठे वातावरण होते. त्याचा तर्कतीर्थांना लाभ झाला.

**८) नव्वदीतही तर्कतीर्थ उत्साही, नम्र (२४ जानेवारी, १९९०)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे नव्वदीत पदार्पण करणार होते २७ जानेवारी, १९९० रोजी. त्याच्या पूर्वसंध्येस दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबईने २५ जानेवारी १९९०च्या अंकात आनंद परांजपे यांनी त्यांची घेतलेली मुलाखत प्रसृत केली होती. ती अनेक महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकणारी आहे.

त्यात प्रारंभी त्यांच्या पूर्वायुष्यावर प्रकाश पडतो. ते कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय होतात प्राज्ञपाठशाळेतील पंडितांची भूमिका बदलून. प्रारंभापासूनच तर्कतीर्थ सनातन धर्म स्वरूपावर प्रहार करीत सुधारवादी दृष्टिकोन स्वीकारताना लक्षात येतात. प्रसंगी ते त्यासाठी शंकराचार्यांचा रोष पत्करतात नि त्यांचा प्रतिवादही करतात. अशी टीका त्यांनी आपल्या जीवनात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सुरटी सोमनाथ मंदिर जीर्णोद्धारानंतरची प्राणप्रतिष्ठा अशा अनेक प्रसंगांत सहन केली आहे, हे या मुलाखतीतून लक्षात येते. त्यांना आयुष्यात शास्त्रज्ञ, गणिती, गायक असे बरेच काही व्हायचे होते; पण ते जमले नाही. सन १९३७ मध्ये त्यांनी पुण्यात 'युगांतर' दैनिक चालविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना ते जमले नाही. जे जमलं नाही, त्याचा त्यांनी कधीच विषाद बाळगला नाही. मराठी विश्वकोशाचा अधिकांश प्रकल्प त्यांनी अल्पखर्चात एक ते दीड कोटी रुपये खर्चून पूर्ण केला. तो भारतीय भाषांतील श्रेष्ठ ज्ञानकोश असल्याने त्याचे हिंदी भाषांतर व्हावे, अशी इच्छा होती. ती अद्याप अपूर्णच आहे. आपल्या या दीर्घायुष्याचे श्रेय ते नियमित दिनचर्येस देतात. सध्याचे हिंदुत्वाचे राजकारण त्यांना अमान्य होते. धर्मा-धर्मांमध्ये दुही माजविण्याने विभाजनाच्या धोक्याकडे लक्ष वेधतात. प्राचीन वाङ्मयात व काळात भारतीयत्वाचा उल्लेख आहे, हिंदुत्वाचा नाही. हेपण ते निदर्शनास आणून देतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कृतार्थ जीवन जगले. त्यांनी आपली सामाजिक कर्तव्ये जबाबदारीने पार पाडली. त्यांच्यात ब्राह्मण्याचा अहंकार नव्हता. दलित, वंचितांबद्दल करुणा, कणव होती. शेतकऱ्यांबद्दल आस्था होती. त्यांनी आयुष्यभर सर्वांशी समशील व्यवहार ठेवला.

आजीवन ते अजित, अदीन जीवन जगले. त्यंच्या या आत्मिक बळावर ते शतायुषी होतील, असा विश्वास ही मुलाखत व्यक्त करते.

**९) दीर्घायुष्याची सूत्रे (१९९१)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वृत्तपत्रातील मुलाखतींमध्ये सर्वाधिक प्रसिद्ध, प्रकाशित झाल्या त्या दैनिक 'केसरी', पुणेमध्ये. वाई येथील 'केसरी' प्रतिनिधी अनिल जोशी यांनी त्या एकटाकी घेतल्या आहेत. त्यांचे एक छोटेखानी पुस्तक 'संवाद : तर्कतीर्थांशी' शीर्षकाने प्रकाशित केले असून त्यात ३२ मुलाखती संग्रहित असून, ही त्यापैकी शेवटची मुलाखत होय. वृत्तपत्रातील प्रारंभिक कालच्या मुलाखती प्रश्नोत्तराच्या रूपात प्रकाशित होत; पण साठोत्तरी कालखंडात मुलाखतदारास भेटून केलेली बातचीत लेख वा घोषवाक्याच्या रूपात प्रकाशित होत राहिल्याचे निदर्शनास येते. सदरची मुलाखत याच स्वरूपाची.

तर्कतीर्थांना ९० वर्षे पूर्ण झाली. भारतीयांचे सरासरी आयुर्मान पाहता तर्कतीर्थांना दीर्घायुष्य लाभले. अनिल जोशी यांनी तर्कतीर्थांच्या दीर्घायुष्याचे रहस्य जाणून घेण्याच्या अनुषंगाने घेतलेली ही मुलाखत. पंचाहत्तरी ओलांडल्यावर तर्कतीर्थांनी (जिभेवर नियंत्रण ठेवले. ते मितभाषी झाले नाहीत. परंतु, मिताहारी नक्की झाले. नियमित शतपावली (तर्कतीर्थांचा शब्द चरणसाधना !), व्यायाम, योग हे त्यांनी आपल्या दीर्घायुष्याचे रहस्य असल्याचे या मुलाखतीत स्पष्ट केले आहे. 'जो चालतो, तो जगतो' यावर त्यांचा विश्वास होता. पूर्वी ते नियमित शीर्षासन करीत. वृद्धावस्थेत त्यांनी ते करायचे सोडले. योगासनात 'सर्वांगासन' त्यांना आवडत असे. निसर्गाची आवड म्हणून तर्कतीर्थांनी महाबळेश्वरला घर बांधले. अधूनमधून ते तिथे राहत. ते त्यांचे आवडते राहण्याचे ठिकाण (पुढे त्यांनी चिरविश्रांती स्वीकारली ती महाबळेश्वरमध्येच!).

ते मध्यंतरी अमेरिकेस जाऊन आले तसे प्रसन्न व उत्साही दिसू लागले. विचारणा केल्यावर तर्कतीर्थांनी सांगितले की, 'चिंतेच्या जगातून बाहेर पडल्यानंतरच अशा तऱ्हेचे तेज येऊ शकते'. तर्कतीर्थांनी आयुष्यभर भाषणे इ.निमित्ताने भ्रमंती केली. 'कायदा पाळा गतीचा, थांबला तो संपला' यावर त्यांचा विश्वास होता. 'चरैवेति' हा त्यांचा जणू जीवनक्रम आणि जीवनमंत्र होता. म्हणून ते नित्य नवे राहिले आणि चिरतरुणही. तर्कतीर्थांचे जीवन आरोग्याच्या अंगानेही आदर्श व अनुकरणीय ठरते.

**१०) असा मी, असा मी (८ फेब्रुवारी, १९९२)**

सकाळ वृत्तपत्रसमूह, पुणेमार्फत चालविण्यात येणाऱ्या साप्ताहिक सकाळ, पुणेने सन १९९२ मध्ये 'असा मी असा मी' हे सदर चालविले होते. संपादकांनी ३०-३२ प्रश्नांची सूची निश्चित केली होती. ती विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पाठविली जायची. त्यांची उत्तरे वरील सदरात प्रकाशित होत असत. मान्यवर कधी स्वत: लिहीत किंवा कोणीतरी निकटवर्ती वा संपादकीय सहाय्यक उत्तरांचे शब्दांकन करीत असत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या या मुलाखतीचं

/ प्रश्नावलीच्या उत्तरांचं शब्दांकन तर्कतीर्थांचे वाईचे स्नेही, सहकारी वसंतराव बोराटे यांनी केले होते.

या मुलाखतीचं वैशिष्ट्य असं की, प्रश्न असे होते की, त्यांची वस्तुनिष्ठ नि संक्षिप्त उत्तरं अपेक्षित होती. 'गागर में सागर' असं त्या उत्तरांचं रूप असलं, तरी समग्रतेनं ती व्यक्ती पूर्णत: आकळणं सोपं व्हायचं. त्यानुसार तीर्कतीर्थांचं मन (वय वर्षे ९१). आवडी-निवडींच्या पलीकडे उच्च तात्त्विक व वैज्ञानिक पुस्तके वाचावयाचा छंद जडलेला होता. विकासोन्मुख, जीवनदायी बातम्या पाहणे त्यांना आवडे. विद्यासंपादन करणे ही एकच महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनी होती. भारत ब्रिटिश साम्राज्यशाहीतून मुक्त झाला, तो त्यांच्या जीवनाचा सर्वोच्च आनंदी क्षण होता, तर हिटलरने संपविलेली लोकशाही निराशेचा! विश्व चैतन्यशक्ती त्यांच्या लेखी ईश्वर होता. शांत, निर्वेद राहणे त्यांना आवडे. कायद्याचं राज्य असावं, सत्ता जुलमी नसावी, समाजमनावर भीती नसावी, स्वातंत्र्य असावं या मताचे ते होते. विश्वकुटुंब त्यांचं स्वप्न, ध्येय होतं. एकच एक कोणी असा त्यांचा आवडता लेखक नव्हता. तीच गोष्ट पुस्तकांचीही. कुमार गंधर्व, भीमसेन जोशी त्यांचे आवडते गायक होते. ते चित्रपट पहात नसत. अनेक कला त्यांना आवडत. पु. ल. देशपांडे, प्रा. गोवर्धन पारीख, यशवंतराव चव्हाण, किसन वीर त्यांचे मित्र होते. गांधी टोपी, नेहरू शर्ट, जाकीट, धोतर-खादीचा पांढरा शुभ्र पोषाख त्यांना आवडे. स्वामी केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. मैत्री करणे त्यांना आवडत असे. जीवनशोध, विश्वजीवन, ईश्वर या गोष्टींचे कुतूहल त्यांच्या मनी होते. ईश्वर 'अप्रमेय' आहे, अशी त्यांची धारणा होती. ही मुलाखत नेमके तर्कतीर्थ उभी करते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर 'क्ष' किरण असं या मुलाखतीचं वर्णन करता येईल.

**११) जीवन, ज्ञानप्रवाहात पोहत रहा, तरच तराल (मे, १९९२)**

साकार बालविकास मंडळ, वाई (जि. सातारा) ही बालविकासाच्या क्षेत्रात कार्यरत अनौपचारिक स्वयंसेवी संस्था. बालसंस्कार तिचे ध्येय. डॉ. राजेंद्र प्रभूणे नि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुलभा प्रभूणे हे कार्य करतात. विविध सुट्टयांचा वापर करून वाचन, कथाकथन, सहल, मुलाखती, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे ते शिबिर, मेळावे इ.तून हे कार्य करतात. असेच मे, १९९२च्या उन्हाळी शिबिरात त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रकट मुलाखत मुलांमार्फत घेतली होती. निमित्त होतं त्यांना मिळालेल्या 'पद्मविभूषण' गौरवाचं. प्रारंभी छोटेखानी सत्कार झाला.

ही मुलाखत आत्मपर असली तरी तिचा रोख बालसंस्कार, मार्गदर्शन, स्मरणरंजन असा होता. तर्कतीर्थांच्या बालपणी गावात धार्मिक सलोखा होता. हिंदू-मुस्लिम सण एकत्र साजरे होत. लहानपणी तर्कतीर्थांना 'इसापनीती', 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'महाभारतातल्या गोष्टी' इ. पुस्तके वाचायला आवडत. मुलांनी 'शिवाजी महाराजांचे चरित्र', 'नेपोलिअन चरित्र' वाचावे, असे ते या मुलाखतीतून सुचवितात. त्यांना आचार्य विनोबांनी इंग्रजी शिकविले होते. त्यांनी

टॉल्सटॉय, वि. स. खांडेकर, हरिभाऊ आपटे यांचे साहित्य वाचले होते. पोहायला आवडते. टी.व्ही. पाहतो कधीतरी . तुम्हीही पहा. वाईस मी रेल्वे, बैलगाडीने प्रवास करीत आलो असे त्यांनी एका प्रश्नास उत्तर देत स्पष्ट केले. लहानपणी तर्कतीर्थांनी केलेलं पाठांतर अजून त्यांच्या लक्षात होतं. त्यांनी मुलांना एक श्लोक या मुलाखतीत म्हणून दाखविला. पाठांतराने स्मरणशक्ती वाढते, हे त्यांनी स्पष्ट केले. आपण तरुणपणात स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला होता. त्यांनी त्यातील काही आठवणी मुलांना सांगितल्या. तर्कतीर्थांना मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषा येत होत्या. त्यांनी मराठी विश्वकोश रचला. त्याची माहिती दिली. 'धर्मकोश' संपादिला ते सांगितले. मांसाहारापेक्षा शाकाहार चांगला, असे त्यांचे मत होते. 'पद्मभूषण' गौरव आपणास जीवनभरच्या कार्यासाठी देण्यात आल्याचे त्यांनी मुलांना समजाविले. आपल्या गुरूमुळे आपण तत्त्वनिष्ठ झाल्याचे त्यांनी मान्य केले. जीवनात प्रतिकूलता सर्वकाळात असते; पण त्यातून तो नेहमी सहीसलामत बाहेर पडत आला आहे.

आपल्या या मुलाखतीतून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नव्या पिढीस आपल्या अनुभवकथनाद्वारे जीवनमार्ग समजाविला. त्यात शिक्षण होते, तसेच शहाणपणही!

**१२) परमार्थ मंदिरात किंवा मशिदीत नाही (१९९२)**

'बखर' दिवाळी अंकातील (१९९२) ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांची मुलाखत. तिला बाबरी मशिद विवादाची तत्कालीन पार्श्वभूमी आहे.

यात तर्कतीर्थ आपल्या धार्मिक घडणीबाबत स्पष्टीकरण देत सांगतात की, मी तसा मूळचा सनातनी संस्कारात वाढलेला; पण पुढे वाचनाने मी प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज समजून घेतला, तसा जातिभेद नि धर्मभेदमुक्त होत विवेकवादी, बुद्धिवादी झालो. नंतर लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य' वाचले आणि मी कर्मयोग स्वीकारला. लोकहितवादींचा नाही; पण महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय यांचा प्रभाव आहे. मात्र, मी स्वतंत्र विचारी आहे. धर्मग्रंथ असो वा मार्क्सवाद, सर्वांची चिकित्सा झाली पाहिजे, असे माझे मत आहे. भारतीय विचार-दर्शनात विसंगती आहे. ती दूर करीत मी त्यांचा अंगिकार करतो. भौतिकवाद आणि चैतन्यवाद यांच्या समन्वयाने मी विचार करीत राहतो. समाजसेवा मला मान्य आहे. आपल्या मूल्यव्यवस्थेत उणिवा आहेत. त्या जायला अजून वेळ लागेल. आज जगात भेद कमी होत असून, विश्व एकात्म होत निघाले आहे. कुटुंब व समाज व्यवहारातील अंतर दूर करीत आपण भारतीय समाज एकात्म बनविला पाहिजे. आज मंदिर-मशिद वादावरून धार्मिक पुनरुज्जीवनाचे प्रयत्न चालले आहेत. त्यास प्रासंगिक यश आले तरी ते दीर्घकाळ टिकणारे नाही. कारण, हा वाद विभाजनवादी आहे. हे राजकारण आहे. हिंदू, शिख, मुसलमान भेद विसरून मानवी एकता व शाश्वत मूल्यांचा विचार महत्त्वाचा आहे. बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवादच खरा. उतारवय असले तरी मी निराश नाही, उत्साही आहे. भारतात केंद्र सरकार मजबूत हवे. फुटीरपणा राष्ट्रहिताचा नाही. दहशतवाद मानवी अवनती आहे. विश्वसंस्कृती ध्येय हवे. छोटे भेद मागे टाकले पाहिजेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची ही मुलाखत मूल्य, एकात्मता, विश्वात्मकता, शाश्वतता यांचा पुरस्कार करणारी आहे. धर्मप्रेमापेक्षा देशप्रेमाचे महत्त्व तर्कतीर्थ अधोरेखित करतात. कर्मकांडापेक्षा कर्मवादावर त्यांचा विश्वास असल्याने एकात्मविश्व त्यांचे जीवनस्वप्न असल्याचे स्पष्ट होते.

**१३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : कार्य व योगदान**

(कै.) रावबहादूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन हे श्रीमंत गृहस्थ. सामाजिक, शैक्षणिक कार्यास ते सढळ हाताने साहाय्य करीत. त्यांनी आपल्या मातोश्री सरस्वतीबाई यांच्या स्मरणार्थ वाई येथील प्राज्ञपाठशाळा मंडळाचे कार्य पाहून तिथे असलेला अनगळ वाडा खरेदी करून प्राज्ञपाठशाळेस देणगी म्हणून दिला. त्याचे नामकरण 'सरस्वती-सदन' असे करण्यात आले. अहमदनगरचे प्रतिथयश वकील हरी केशव पटवर्धन हे सीतारामपंतांचे बंधूच. त्यांनी आपला मुलगा अच्युत यास सीतारामपंतांना दत्तक दिले होते. तेच पुढे अच्युतराव पटवर्धन म्हणून स्वातंत्र्यलढ्यात जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव प्रभृतींबरोबर समाजवादी पक्ष स्थापनेत आघाडीवर होते. त्यांचे बंधू रावसाहेब पटवर्धनही स्वातंत्र्यचळवळीत सक्रिय होते. हे उभयता स्वातंत्र्यचळवळीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आयोजित संगमनेरमधील शिबिरात (१९३२) प्रथम सहभागी झाले आणि नंतर स्वातंत्र्यचळवळीत सक्रियतेने आघाडीवर राहिले. (कृपया पहा- यापूर्वीची 'परमार्थ मंदिर किंवा मशिदीत नाही' ही शीर्षक मुलाखत.)

प्राज्ञपाठशाळेची जुनी इमारत गैरसोयीची होती. 'सरस्वती-सदन' (सध्याचा प्राज्ञवाडा) मुळे प्राज्ञपाठशाळेची मोठी सोय झाल्याचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मधु पटवर्धन (अच्युतराव व रावसाहेब यांचे बंधू) व प्रा. मे. पुं. रेगे यांना यासंदर्भात दिलेल्या अनौपचारिक मुलाखतीत/संवादात स्पष्ट केले. ही मुलाखत प्राज्ञपाठशाळा, स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ यांच्या पूर्वेतिहास, कार्य, योगदानावर प्रकाश टाकणारी नि संदर्भ म्हणून महत्त्वाची ठरते. ही मुलाखत वा माहिती 'तीर्थस्वरूप' या (कै.) रावबहादूर सीतारामपंत विश्वनाथ पटवर्धन गौरव ग्रंथातून उद्धृत करण्यात आली आहे. मुलाखतीत गुरू-शिष्य कार्य अधोरेखित करण्यात आले आहे. प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज (अमरावती) यांचा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्याशी आदरपूर्वक स्नेह होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मराठी विश्वकोश', 'धर्मकोश', 'मीमांसाकोष', 'नवभारत' मासिक प्रकाशन, विविध ग्रंथ प्रकाशन इ. कार्यांद्वारे प्राज्ञपाठशाळेस लौकिक मिळवून दिला, हे या मुलाखत/संवादातून स्पष्ट होते.

## (ब) परात्मपर मुलाखती :

यापूर्वी आपण आत्मपर मुलाखतींमध्ये अशा मुलाखतींचा विचार केला, ज्यात (तर्कतीर्थ स्वतःच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल सांगतात. आत्मपर मुलाखतींचा असा एक भाग आहे, ज्यात अन्य (तर्कतीर्थांबद्दल सांगतात. या मुलाखतीत) तर्कतीर्थांच्या व्यक्तिगत जीवन, व्यक्तिमत्त्व

यापेक्षा त्यांचं सार्वजनिक कार्य, विचार, दृष्टिकोन समजून घेण्याची जिज्ञासा दिसते. माणसाने स्वतः आरशात पाहणे नि दुसऱ्याने आपणास पाहण्यात जे अंतर असते ते आत्मपर आणि परात्मपर मुलाखतीत आहे.

**१४) ज्ञानासक्तीसाठी पुनरुज्जीवन आवश्यक (मे, १९७५)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होतं, असं रूढार्थानी म्हणता येत असलं तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे असंख्य पैलू होते. संस्कृत पंडित, स्वतंत्रता सेनानी, कुशल संघटक, प्रभावी वक्ते, लेखक, संपादक, भाषांतरकार तर ते होतेच; पण त्यांना मुद्रणकलेच्या सर्वांगांची माहिती होती. 'मराठी विश्वकोश' (२३ खंड), 'धर्मकोश' (१९ खंड), 'मीमांसाकोष' (७ खंड) अशा नि अन्य अनेक कोशांच्या ('पदनाम कोश', 'स्थापत्य-शिल्प कोश' इ.) मिळून ५० हून अधिक खंडांचे संपादन, लेखन, मुद्रण, प्रकाशन कार्य त्यांनी केले असल्याने कागद, शाई, चित्रे, टंक इ.मध्ये त्यांना गती होती. हे लक्षात येऊन या व्यवसायाला वाहिलेल्या 'मुद्रा' मासिकाने आपल्या मे, १९७५च्या अंकासाठी तर्कतीर्थांची एक विविधांगांना स्पर्श करणारी मुलाखत घेतली होती. या अंकाचे तत्कालीन संपादक जयंत ग. देवकुळे यांनी ती घेतली होती. त्याकाळात तर्कतीर्थांनी वाईमध्ये मराठी विश्वकोशासाठी स्वतंत्र आधुनिक मुद्रणालय उभारले होते. (९ एप्रिल, १९७२) तसेच प्राज्ञपाठशाळेच्या प्रकाशनांसाठी स्वतंत्र कागद कारखाना उभारला होता. (१९६२) हे आज कुणाला सांगून खरेही वाटणार नाही. ही मुलाखत त्यांच्या 'अमृतमहोत्सवा'चे औचित्य साधून जयंत देवकुळे यांनी घेतली होती. ते शास्त्रीजींना फार पूर्वीपासून (१९२५) ओळखत होते. त्यांच्या वडिलांच्या सांगण्यामुळे (वन खाते अधिकारी) तर्कतीर्थांच्या वडिलांनी तर्कतीर्थांना शिक्षणार्थ वाईस आणले होते.

तर्कतीर्थ आपल्या या मुलाखतीत प्रारंभी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या उद्दिष्ट, कार्य आणि प्रगतीबद्दल माहिती देतात. मंडळाच्या नावात विज्ञान नाव नसल्याबद्दल ते सांगतात की, संस्कृती शब्द इतका व्यापक आहे की, त्यात सर्व ज्ञान-विज्ञाने येतातच. साहित्य, संस्कृती मंडळाच्या ग्रंथ विक्री, प्रसाराबाबत समाधान व्यक्त करीत ते स्पष्ट करतात की, काही ग्रंथांच्या तिसऱ्या आवृत्या येणे याचेच निदर्शक होय. पुस्तके मंदगतीने पण सतत खपतात हे महत्त्वाचे. शुद्ध विज्ञानाची उपासना करणारी ज्ञानपरंपरा आपणाकडे पाश्चात्यांप्रमाणे निर्माण न झाल्याने प्रगल्भ समाजघडण आपल्याकडे झाली नाही. वैचारिक प्रबोधन व सामाजिक क्रांती या व्यापक संकल्पना आहेत. आपला समाज त्यापासून कोसो दूर आहे. येथील शिक्षण प्रसार संख्यात्मक असून गुणात्मक नाही, हे तर्कतीर्थ समजावतात. मराठीपेक्षा बंगाली प्रगत आहे. मुद्रण व्यवसाय प्रगत असावा असे तर्कतीर्थांना वाटे.

**१५) Of Marx and encyclopaedias (1983)**

सन १९८३च्या मार्चमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी भारतीय संस्कृती संसद, कलकत्ता या संस्थेच्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमासाठी म्हणून गेले होते. त्यावेळी तेथील एशियाटिक

सोसायटी, संस्कृत साहित्य परिषद, महाराष्ट्र मंडळ या ठिकाणी इंग्रजी, संस्कृत, मराठीमध्ये अनेक कार्यक्रम झाल्याची नोंद एन. बी. मराठे, सहायक संपादक, इंडियन नॅशनल बिब्लिऑग्राफी, सेंट्रल रेफरन्स लायब्ररी, भारत सरकार बेल्वेदेर, कलकत्ता-७०००२७ यांचे श्री. राम कोल्हटकर, स्वीय सचिव (तर्कतीर्थ) यांना लिहिलेल्या दि. २६ मार्च,१९८३ च्या पत्रात आहे. याच पत्राबरोबर त्यांनी वरील कार्यक्रमांच्या निमित्ताने 'द टेलिग्राफ' या इंग्रजी दैनिकाचे प्रतिनिधी डी. मुजुमदार यांनी घेतलेली इंग्रजी मुलाखत, जी त्या दैनिकाच्या शनिवार, दि. २६ मार्च १९८३ च्या अंकात पृष्ठ १० वर प्रकाशित झाल्याचे कळवून पत्रासोबत त्याची प्रत पाठविल्याचे नमूद आहे.[१८] वरील पुस्तक प्रकाशन समारंभाचे छायाचित्र त्या संस्थेच्या फेसबुक पेजवरील छायाचित्र संग्रहात उपलब्ध आहे.[१९]

या मुलाखतीत डी. मुजुमदार यांनी स्पष्ट केले आहे की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महात्मा गांधींचे काही काळ अनुयायी राहिले असले तरी त्यांनी जीवनभर आपल्या मार्गाने गांधीवादाचे अनुकरणच केले आहे.

**१६) महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवन (१९८४)**

विषयविस्तार, कालसंदर्भ आणि वसावारसा या तीनही निकषांवर महत्त्वाची ठरावी अशी ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत. ती घेतली आहे प्रा. मे. पुं. रेगे यांनी. त्याला एक औचित्य आहे. प्रज्ञापाठशाळा, वाई या प्राच्यविद्या समृद्ध करणाऱ्या आणि तत्त्वज्ञानाला बळकटी आणणाऱ्या संस्थेच्या स्थापनेचे हे ८० वे वर्ष. महाराष्ट्राच्या संस्थात्मक जीवनाचे वर्तमान रूप चिंताजनक बनत असताना झालेली ही मुलाखत तिला आपसूकच सामाजिक संस्थांच्या स्थापना, कार्य आणि विकास/ऱ्हासासंबंधी सिंहावलोकनाचे रूप प्राप्त झाले आहे. ही मुलाखत 'नवभारत' मासिकाच्या मे-जून, १९८४ च्या जोड अंकात प्रकाशित झालेली आहे. प्रश्नोत्तर शैलीत साकारलेल्या या मुलाखतीचे प्रश्न व्यापक आशय व्यक्त करणारे होते. त्यामुळे तर्कतीर्थांनी त्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. परिणामस्वरूप ही मुलाखत प्रदीर्घ झाली आहे.

तर्कतीर्थांनी मुलाखतीच्या उत्तरांमधून स्पष्ट केले आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात ध्येयवादी व्यक्तींची रेलचेल होती. तो काळच ध्येयवादाचा, सुधारणांचा सुवर्णकाळ होता. अशा व्यक्तींनी स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय भावनेने शिक्षण, इतिहास, संशोधन, प्राच्यविद्या इ. क्षेत्रात प्राज्ञपाठशाळा, वाई, समर्थ वाग्देवता मंदिर, राजवाडे संशोधन संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, गोखले इन्स्टिट्यूटसारख्या संस्था सुरू केल्या. या संस्थांचा महात्मा गांधींना मोठा अभिमान वाटत असे. अशा संस्थांच्या तत्कालीन जाळयामुळे भारतात महाराष्ट्राची वेगळी ओळख होती. परंतु, स्वातंत्र्योत्तर काळात समाजात नि व्यक्तींमध्ये तो ध्येयवाद उरला नाही. परिणामी, ध्येयवादी संस्था नंतरच्या काळात यंत्रवत काम करू लागल्या. त्यांनी काळाची पावले ओळखून कार्यपद्धती बदलली नाही. चक्रनेमिक्रमाने अशा संस्थांना उतरती कळा आली. त्याग, समर्पण, ध्येयवाद, मूल्य यांचा समाजजीवनात ऱ्हास होणे, हे त्याचे प्रमुख कारण होय. त्यामुळे

कालौघात या संस्था निष्प्रभ नि निष्क्रिय झाल्या. तर्कतीर्थांचे हे विचार वर्तमान अंतर्मुख करणारे जसे आहे तसे पुन्हा ध्येयवादाचे अनुसरण करण्यास प्रेरणा देणारेही आहे. आजच्या कार्यरत संस्थांना डोळस बनवील.

गांधींचे अनुयायित्व सोडून ते रॉयवादी झाले. तिथेही अग्रणीच राहिले. तर्कतीर्थ एकीकडे क्रियाशील राजकारणी म्हणून सक्रिय होते, तर दुसरीकडे त्यांनी 'वैदिक संस्कृतीचा विकास' व 'धर्मकोश', 'विश्वकोश'च्या अनेक खंडांचे संपादन करून स्वतःस बुद्धिजीवी विचारवंत, संपादक, साहित्यिक म्हणून सिद्ध केले. सन १९५७ साली त्यांनी सोमनाथ मंदिराचे पौरोहित्य करून ते मंदिर हरिजनांसाठी खुले करून घेतले. ही घटना भारतीय सांस्कृतिक जीवनात सुवर्ण अक्षरात (Half Mark) नोंदविली गेली आहे. असाच कीर्तिमान त्यांनी कोशनिर्मिती करून स्थापन केला आहे. त्यांनी निर्माण केलेली कोश संपदा त्यांच्या ८३ वर्षांच्या आयुष्यास सार्थ ठरवते.

मुलाखतीत डी. मुजुमदार यांनी नोंदवलेली निरीक्षणेही तितकीच महत्त्वाची आहेत. ८३ व्या वर्षीही स्मरणशक्ती तल्लख आहे. भाषेवर अपूर्व असे प्रभुत्व आढळले. विधानांत एकप्रकारचे ठोसपण भरलेले आढळले. आपण जे बोलतो, ते नंतर मागे घ्यावे लागत नाही, दुरुस्त करावे लागत नाही किंवा सुधारावेही लागत नाही (Deleting, Correcting, Improving) हा त्यांनी व्यक्त केलेला स्वतःवरचा विश्वास अचंबित करणारा आहे.

मुलाखतीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या शिक्षणाविषयी दिलेली माहिती त्यांची प्रखर विद्वत्ता, बुद्धिमत्ता पाहता केवळ अविश्वनीय वाटावी अशी. त्यांचे सारे शिक्षण अनौपचारिकपणे झाले. तेही गुरुकुलात. आचार्य विनोबांनी त्यांना इंग्रजी विषय स्वगृही शिकविला. शिक्षणाविषयीचा त्यांचा समर्पित उत्साह (Patriotic Fervour) वाखाणण्यासारखा आहे. महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यातील प्राचीन संदर्भ शोधाद्वारे समर्थन व निवेदने प्रसृत करण्यातील त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. आंतरजातीय विवाहातील (देवदास गांधी व लक्ष्मी राजगोपाला चारी) त्यांची भूमिका महात्मा गांधींचा दृष्टिकोन बदलणारी ठरली. नंतर ते एम. एन. रॉय यांच्या प्रभावाने रॉयवादी बनले, तसे गांधींचा त्यांच्यातील स्नेह दुरावला. मार्क्सवादी होऊनही त्यांनी अहिंसेची पाठराखण सोडली नाही. कारण मार्क्सचे म्हणणे होते की, 'तत्त्वज्ञ जगाचे विश्लेषण करतात, आपले कार्य जग बदलण्याचे आहे.' या मुलाखतीत तर्कतीर्थांनी संसदीय लोकशाही, मार्क्सवाद, केंद्र सरकारची भूमिका इ.विषयी विस्ताराने आपले विचार व्यक्त केले.

**१७) भारतीय स्वातंत्र्य चळवळ (१९८५)**

सोलापूरच्या वाचन संस्कृतीस समृद्ध करणारे श्रीराम पुजारी मनुष्यसंग्रही गृहस्थ होते. साहित्य, संगीत, कला, नाटक, वक्तृत्व, प्रबोधन, काव्य अशा विविध क्षेत्रांत मुशाफिरी करणाऱ्या या

अवलियाचा स्नेह सर्व थरांतील लोकांशी होता, तसा तर्कतीर्थांशीही. आकाशवाणी जळगाव केंद्रासाठी श्रीराम पुजारी यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची घेतलेली मुलाखत २५ डिसेंबर, १९८५ रोजी ध्वनिमुद्रित केली होती आणि त्याच दरम्यान ती प्रक्षेपित झाली असावी.

'भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील तर्कतीर्थांचा सहभाग' या विषयावर आधारित या मुलाखतीत श्रीराम पुजारी यांनी विविध प्रश्न विचारून या विषयावर प्रकाश पाडला आहे. त्यानुसार आपणास समजते की, तर्कतीर्थांवर बालपणापासूनच भारतीय स्वातंत्र्यचळवळीविषयी आकर्षण होते. त्याचे कारण घर नि परिसरात असलेला टिळक युगाचा प्रभाव. तो काळ (१९१०) जनतेतील लोकमान्यांविषयीच्या आदर आणि आस्थेचा होता. लोकमान्यांना मंडालेच्या तुरुंगात डांबल्यावर भारतीयांच्या मनात ब्रिटिशविरोधी भावना शिगेला पोहोचली होती. तर्कतीर्थ ज्या प्राज्ञपाठशाळा, वाईमध्ये शिक्षण घेत, तेथील गुरू नारायणशास्त्री मराठे ऊर्फ स्वामी केवलानंद सरस्वती हेही टिळक भक्त होते. टिळकांनी प्राज्ञपाठशाळेत भेट दिली होती. त्यावेळी टिळकांनी केवलानंद सरस्वतींना 'गीतारहस्य' ग्रंथ भेट दिला होता. इथेच तर्कतीर्थांना आचार्य विनोबा भावेंचा सहवास लाभला. लोकमान्यांची नि तर्कतीर्थांची तीनदा भेट झाली. नंतर महात्मा गांधींचा सहवास लाभला तोही स्वातंत्र्यचळवळीतील सहभाग आणि तुरुंगवासामुळे. जमनालाल बजाज त्याचे कारण घडले. महात्मा गांधींनी स्वातंत्र्यचळवळीत समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना सहभागी केल्यामुळे ही चळवळ खऱ्या अर्थाने यशस्वी झाल्याचे निरीक्षण तर्कतीर्थांनी आपल्या या मुलाखतीत नोंदविले आहे. महात्मा गांधींचे दौरे, भाषणे, सत्याग्रह, उपवास, प्रार्थना या सर्वांचा परिणाम भारतीय जनमानसावर त्यावेळी होता. त्यावेळी कायदेभंग, करबंदी इ. चळवळीस मोठा प्रतिसाद लाभला होता अशी आठवण त्यांनी सांगितली आहे. स्वतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री सन १९३० च्या कायदेभंग चळवळीत संघटन, नेतृत्व करीत सक्रिय होते. त्यांना दोनदा तुरुंगवास घडला होता. ब्रिटिशांनी त्यांच्यावर अनेक खटले दाखल केले होते. भारतास एकजुटीमुळे स्वातंत्र्य मिळाल्याचे मत तर्कतीर्थांनी या मुलाखतीत शेवटी व्यक्त केले आहे. स्वातंत्र्यचळवळ जिवंत करणारी ही मुलाखत 'चक्षुर्वैसत्यम्' म्हणून ऐतिहासिक पुरावा होय.

### १८) सुटलेली कोडी (१९८८)

'रिडल्स इन हिंदुइझम' ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र शासनाने सन १९८७ मध्ये केले. हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९५६ मध्ये लिहिलेला होता. तो अपूर्ण होता. या ग्रंथात त्यांनी राम, कृष्ण इ. हिंदू देवतांवर लेखन केले आहे. प्रकाशन झाल्यावर ते वादग्रस्त ठरले. समर्थक व विरोधकांचे लेखन व आंदोलने झाली. शेवटी शासनाने 'या ग्रंथात व्यक्त झालेल्या मताशी महाराष्ट्र सरकार सहमत असेलच असे नाही' अशी तळटीप टाकण्याच्या तडजोडीवर वाद मिटविला गेला. या पार्श्वभूमीवर 'सुटलेली कोडी' शीर्षकांतर्गत प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतलेली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत 'नवभारत'मासिकाच्या मे, जून १९८८ च्या अंकात प्रकाशित झाली होती.

या मुलाखतीत तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म समजून घ्यायचा म्हणून जी टिपणे केली होती, ती प्रामुख्याने पाश्चिमात्य इंग्रजी विचारक मॅक्सम्युलर विल्सन, मूर इ. च्या ग्रंथांवरून. संस्कृतमधील त्यांचे संदर्भ भाषामर्यादेमुळे तोकडे होते. डॉ. आंबेडकरांना त्या काळात धर्मासंबंधी पडलेली कोडी बहुतांशाने सुटलेली आहेत. उदाहरण सांगायचे तर जन्मसिद्ध जातींवर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्था आता कायद्याने अमान्य आहे. दुसरी गोष्ट, पूर्वी वेद अपौरुषेय मानले जायचे, त्या कल्पनेतून समाज बाहेर आला आहे. तिसरे असे की, वेदांचे सार तरी काय? हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोधू, लिहू पाहत होते. त्यासंदर्भात तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, वेदांमध्ये 'ऋग्वेद' सर्वाधिक प्राचीन आहे. त्यात तात्त्विक महत्त्वाचे काहीच नाही. यासंदर्भातला महत्त्वाचा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पडलेला होता तो असा, की 'ऋग्वेद' बहुदेवतावादी आहे की एकदेवतावादी? त्याचे उत्तर 'एकं सद् विप्राःबहुधा वदन्ति' या पहिल्या मंडलातील ६४ व्या सूक्तात स्पष्ट आहे. सत्य एकच आहे; पण शहाणे लोक त्याचे वर्णन वेगवेगळ्या रूपात करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या टिपांत त्रुटी आहेत. प्राचीन ग्रंथ संदर्भ अध्याय, पाद आणि मग सूत्र असे सूक्ष्माने पाहिले पाहिजेत. केवळ सूत्र संदर्भ स्थूल ठरतात. प्राचीन धर्मग्रंथ अध्ययन, मीमांसा पद्धतीची एक परंपरा व पद्धती आहे. तिच्या ओघाने अभ्यास पूर्णत्वास जात असतो. हिंदू धर्म कालौघात बदलत गेला आहे. ते लक्षात घेऊन धर्मचिकित्सा झाली पाहिजे, मग वादाचे प्रसंग उद्भवत नाहीत. तर्कतीर्थांच्या या मुलाखतींवर आलेल्या प्रतिक्रिया 'नवभारत'च्या ऑगस्ट, १९८८ च्या अंकात आहेत. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' हेच खरे. सत्यशोध हा न संपणारा मानवी प्रवास व वाटचाल आहे.

या मुलाखतीतील विविध प्रश्नांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विस्तृत उत्तरे दिली आहेत. त्यातून लक्षात येते की, त्यांनी बालपणापासून ते वयाच्या ९० व्या वर्षापर्यंत अनेक बदलांना सामोरे जात ते आत्मसात केले आहेत. त्यांनी स्पष्ट केले आहे की, त्यांचा अध्यात्माकडून इहवादाकडे जो वैचारिक विकास घडून आला, त्याचे कारण शिक्षण होय. त्यांनी आयुष्याच्या वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या वळणांवर अनेक व्यक्तिविचार अनुभवले. स्वातंत्र्यचळवळ, गांधीवाद, मार्क्सवाद, रॉयवाद, नवमानवतावाद, काँग्रेस समाजवाद असे जे आयुष्यातले टप्पे आहेत, ते नवविचार ओढ नि आकर्षणातून निर्माण झाले. तर्कतीर्थांनी भौतिकवाद, भांडवलवाद अभ्यासला. अर्थशास्त्राचे अवगाहन (Awareness) आले ते या व्यासंगामुळेच. तर्कतीर्थांनी प्रसंगोपात जगाचा इतिहास, घडून आलेली विविध परिवर्तने यांचा अभ्यास केला होता. रशियन क्रांती (१९१७) ते गोर्बाचेव्ह यांच्या ग्लासनोस्त, पेरिस्त्रोइकापर्यंतच्या क्रांती, उत्क्रांतीची त्यांना चांगली जाणीव, समज असल्याचे या मुलाखतीतून स्पष्ट होते.

तर्कतीर्थ पुढे सांगतात की, या विविध अभ्यासातून सत्य आणि स्वातंत्र्याचा शोध घेणे शक्य झाले. तसे पाहता ही दोन तत्त्वे वा मूल्ये माणसाच्या मूलभूत गरजा होत. माणसाला बंधन नको असते, हवे असते स्वातंत्र्य. धर्म बंधन असते. विज्ञान माणसास स्वतंत्र करते. म्हणून जगात या

दोन तत्त्वांत नित्य संघर्ष दिसून येतो. नवतंत्रज्ञान हे सार्वत्रिकतेची शक्ती घेऊन जन्मत असल्याने त्याचा प्रचार, प्रसार गतीने होतो व ते अनिवार्य बनून जाते. त्यामुळे विकास घडून येतो. जीवनास गती येते. सूचना व संपर्क क्रांती समजून घेणे आवश्यक होते, ते तिच्या या व्यापक स्वरूपामुळे.

मी माझ्या समकालीनांपेक्षा वेगळा झालो ते माझ्या स्वागतशील वृत्तीमुळे असे मला वाटते, असे ते सांगतात. माणसात स्वागतार्हतेची वृत्ती बुद्धीवादातून येते, तर्कातून येते तशी ती नाकारण्याच्या साहसातूनही येत असते. ती शोध, जिज्ञासेतूनही जन्म घेत असते. जॉर्ज विल्यम रसेल (१८६७-१९३७) या इंग्रजी कवीच्या महत्त्वाच्या काव्यपंक्ती आहेत. त्या यावर प्रकाश टाकतात असे तर्कतीर्थांनी म्हटले असले तरी त्या काव्यपंक्ती मात्र अलेक्झांडर पोप यांच्या आहेत - "Nature and nature's law lay hid in Night, God said Let Newton be ! And all was light.'' - Alexander Pope (1688-1744)

निसर्गनियमांचा शोध म्हणजे प्रकाश. तो न्यूटनसारख्या अनेक वैज्ञानिकांनी केला तो जिज्ञासेपोटीच. तर्कतीर्थांचा 'वेद ते वेब' प्रवास, अभ्यास मला यापेक्षा वेगळा वाटत नाही.

समाज परंपरेने रूढीबद्ध असतो, तसाच तो धर्मबद्धही असतो. ही स्थिती बदलायची तर बुद्ध्या प्रयत्न करावे लागतात. आपल्या भारतीय समाजात आपण नवनवे परिवर्तनकारी कायदे केले; पण त्या अनुषंगाने समाजात जे बदल अपेक्षित होते ते झाले नाहीत, अशी खंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या मुलाखतीत व्यक्त केलेली आहे. नैतिक प्रेरणांचेही असेच असते. त्या धर्मप्रेरणांपेक्षा खरे तर श्रेष्ठ असतात. सत्य हे ईश्वरापेक्षा श्रेष्ठ खरे! सत्य आणि नैतिकता म्हणजेच ईश्वर आणि धर्म होय. गांधीजींचा यावर भरोसा होता.

मानवी विकासाचे 'ग्रँड डिझाइन' किंवा 'रोल मॉडेल' ना गांधी विचारात आहे ना रशियन क्रांतीत. मग काय करायचे? तर माणूस ज्या प्रेरणांनी बदलतो त्यांचे आकलन होण्याची गरज आहे. या शतकात (विसाव्या) अनेक चांगल्या गोष्टी घडल्याचा निर्वाळा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी देतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, विकास नवनिर्मिती करीत असतो. त्यातून अक्षर ज्ञाननिर्मिती होत असते. असे असले तरी मानवी समाज इतिहासात समता आणि न्यायाचे साम्राज्य आपणास स्थापन करता आलेले नाही. हे अपयश खरे तर राज्यसत्तांचे. भारतापुरते बोलायचे झाले तर इथे स्वातंत्र्यमूल्य म्हणून रुजले नाही. त्याचे कारण इथे परंपरेने शोषितांची संस्कृती राहत आलेली आहे. परिवर्तन हवे ते बदलासाठी. परंपरांना धक्के दिल्याशिवाय परिवर्तन घडून येत नाही, हे समजावण्याचा प्रयत्न परोपरीने तर्कतीर्थांनी या मुलाखतीतून केला आहे. हे पूर्णांशाने समजून घेण्यासाठी या खंडातील ही मुलाखत मुळातूनच वाचली पाहिजे. 'सुटलेली कोडी' अशाच प्रकारची मुलाखत आहे.

### १९) ऋषितुल्य आधुनिक विचारवंत (१९८७)

डॉ. म. वि. गोखले यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे ऋषितुल्य जीवन जाणून घ्यायचे म्हणून पूर्वनियोजन करून घेतलेली मुलाखत त्यांच्या 'साहित्यरंग' ग्रंथामध्ये संकलित आहे.

३१ मे, १९८७ रोजी वाई मुक्कामी त्यांची मुलाखत झाली. तत्पूर्वी मुलाखतकाराने पूर्वाभ्यास केलेला होता. मुलाखत प्रश्नोत्तर रूपात सादर करण्यात आली आहे.

या मुलाखतीत तर्कतीर्थांचे कोशकार्य, अभिव्यक्तिविषयक दृष्टिकोन, संस्कृत, संस्कृती, धर्मविचार, लेखनसंपदा इत्यादींबद्दलची चर्चा आहे. यात त्यांनी धर्मांतरसंबंधी आपली भूमिका त्यांच्या 'शुद्धिसर्वस्वम्'च्या अनुरोधाने प्रकट केली आहे. विदेशी आक्रमकांनी येथे येऊन अन्न-पदार्थांद्वारे बाटविल्याच्या कल्पना समाजातील धर्मविषयक भाबड्या समजुतीवर आधारित आहेत. अन्नग्रहण केल्यावर केवळ आहारदोष संभवतो, शिवाय धर्मांतर घडले तरी त्यावर प्रायश्चित्त उपाय आहे. तो शास्त्रसंमत आहे. तर्कतीर्थांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ व्याख्यानांचे संकलन आहे. यात धर्मकल्पनेचा विचार व समीक्षा ऐतिहासिक पद्धतीने आणि सामाजशास्त्राच्या आधारे करण्यात आल्याचे तर्कतीर्थ या मुलाखतीत स्पष्ट करतात.[२०] या ग्रंथात तर्कतीर्थांनी 'धर्मप्रमाण' संकल्पनेवर प्रकाशझोत टाकला आहे. त्यांचे आणखी दोन ग्रंथ आहेत. ते म्हणजे 'जडवाद' आणि 'आनंदमीमांसा', 'आनंदमीमांसा'मध्ये आनंद या भाव वा स्थितीचे विवेचन आहे, तर 'जडवाद'मध्ये भारतीय व पाश्चात्त्य दृष्टिकोनातून जडवाद (अनिश्वरवाद) मांडला आहे. आपल्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथासंबंधीच्या प्रश्नाच्या उत्तरात तर्कतीर्थांनी या मुलाखतीत स्पष्ट केले आहे की, "भारतीय संस्कृती महान समन्वयात भागीदार होऊन (नवीन मानव संस्कृती परंपरागत सर्व संस्कृतींच्या महासमन्वयाची शक्ती म्हणून अस्तित्वात आली पाहिजे यादृष्टीने) त्या विशाल शक्तीचे पोषण करू शकेल, अशा तिच्या अंतःप्रवृत्ती आहेत, ही गोष्ट आम्ही वैदिक संस्कृतीच्या विकासाच्या मीमांसेत सिद्ध केली आहे." ही मुलाखत तर्कतीर्थांच्या साहित्यसंपदेचे स्वरूप व लेखनविषयक भूमिका जाणून घेण्याच्या अनुषंगाने उपयुक्त सिद्ध झाली आहे. विचारांच्या नव्या कक्षा समजून घेण्याच्या संदर्भात ती महत्त्वाची ठरते.

### २०) परंपरेला धक्के बसले तरच परिवर्तन होणार (१९९४)

सन १९९१ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वेरळा विकास प्रकल्पाच्या सांगलीतील कार्यालयाच्या उद्घाटन समारंभाचे पाहुणे होते. त्या कार्यालयास कन्नड, इंग्रजी विद्वान, भारतीय ज्ञानपीठ विजेते साहित्यिक प्रा. व्ही. के. गोकाक यांचे नाव देण्याचा, नामकरणाचा समारंभ होता. त्यात त्यांचे अविस्मरणीय भाषण झाल्याचे प्रा. अरुण चव्हाण यांनी सांगितले. या प्रसंगाने प्रा. अरुण चव्हाण, दत्ता सावळे आणि प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी नव्वदी पूर्ण झाल्याचे औचित्य साधून तर्कतीर्थांना या मुलाखतीत जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. ती मुलाखत प्रा. हातकणंगलेकर व वसंत वनकुद्रे संपादित असलेल्या 'उगवाई' मासिकाच्या दिवाळी १९९४ च्या अंकात 'तर्कतीर्थ स्मृती' म्हणून प्रकाशित करण्यात आली होती. मुलाखत घेणारे कृतिशील विचारवंत असल्याने या मुलाखतीस एक वैचारिक बैठक होती. बौद्धिक विस्तृत मुलाखत म्हणूनही तिचे असाधारण महत्त्व आहे.

### २१) विश्वबंधू शास्त्रीजी (२७ जानेवारी, १९९१)

सन १९९१ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या आयुष्याची नव्वदी पूर्ण केली, तेव्हा वाईत एका घरगुती समारंभात पु. ल. देशपांडे, प्रा. मे. पुं. रेगे, प्राचार्य देवदत्त दाभोलकर, पत्रकार रामभाऊ जोशी इ. मित्रांनी मिळून त्यांचे घरगुती स्वरूपात अभिष्टचिंतन केले. रामभाऊ जोशी यांना दोन-तीन दिवसांचा सहवास, संवादयोग लाभला. त्याआधारे घडून आलेला हा संवाद तो नंतर रामभाऊंनी त्यांच्या (तर्कतीर्थ) मृत्यूनंतर लिहिला. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दीचे औचित्य साधून २७ मे, २००१ मध्ये यशवंत कळमकर यांच्या संपादत्वाखाली समिती गठित करून एक अंक (विशेषांक) प्रकाशित केला होता. त्यात हा संवाद समाविष्ट करण्यात आला आहे.

या संवादानुसार तर्कतीर्थांना जागतिक राजकीय परिस्थितीचं आकलन होतं. तिसऱ्या महायुध्दाचं भय नि त्यावर मात करण्याच्या उपायांबाबत ते सांगतात की, संघर्ष मिटविणे व मानवजातीमध्ये विश्वव्यापी बंधुतेची स्थापना करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यपूर्ण काळाइतकेच आज प्रबोधन महत्त्वाचे आहे. मी काही वय झाले तरी वटवृक्ष नाही. माझ्या गुरूंमुळे मी मोठा झालो नि पत्नीमुळे माझे कुटुंब सुस्थित झाले. तर्कतीर्थ हे विसाव्या शतकाचे साक्षीदार खरे! या शतकातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, नैतिक, सांस्कृतिक, बौध्दिक उलथापालथी त्यांनी अनुभवल्या होत्या. त्यामुळे कवी बा. भ. बोरकरांच्या शब्दात सांगायचे तर-

'जीवन त्यांना कळले हो,<br>
मीपण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो<br>
जळापरी मन निर्मळ ज्यांचे गेले तिथे मिळले हो'

अशी उत्तरायुष्यात त्यांची मन:स्थिती झाल्याचे मुलाखतकार रामभाऊ जोशी यांनी अनुभवले. या जगात नांदायचे तर विश्वबंधुत्वाच्या नात्याने वागावे लागेल, अशी त्यांची धारणा होऊन गेली होती. नव्वदीत त्यांच्या मनातील कृतार्थतेची आणि कृतकृत्येची भावना रामभाऊंनी अनुभवली. ती या संपूर्ण मुलाखतीत सर्वत्र दिसून येते. माणसं जेव्हा निरपेक्षतेने जीवन जगतात, कार्य करतात, तेव्हाच हे समाधान लाभते.

## (क) व्यक्तिविचारविषयक मुलाखती

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या ज्या पन्नास एक मुलाखती उपलब्ध आहेत, त्यापैकी पंधरा मुलाखती या व्यक्ती आणि विचारांना वाहिलेल्या आहेत. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, स्वामी केवलानंद सरस्वती, वऱ्हाडचे टिळक, बापूजी अणे, 'केसरी' पंचानन, मानवेंद्र रॉय, यशवंतराव चव्हाण, किसन वीर, कुमार गंधर्व इत्यादी चरित्रांचा विचार या वर्गात झालेला दिसतो.

❍ **लोकमान्य टिळक**

**२२) 'लोकशाहीचा खंबीर पुरस्कर्ता'**

या शीर्षकाने दैनिक 'केसरी'च्या २९ जुलै १९७३ च्या अंकात प्रकाशित ही मुलाखत लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या पार्श्वभूमीवर केलेले टिळक चिंतन होय. अनिल जोशी यांनी ते प्रश्नोत्तर शैलीत सादर केल्याने त्यास खऱ्या मुलाखतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार असून ते मी मिळविणारच' अशा आत्मविश्वासाने टिळक स्वातंत्र्यलढ्यात उतरले होते. त्यांना अभिप्रेत 'स्वराज्य' म्हणजे भारतीयांचे लोकशाही राज्य, का हिंदूंचे राज्य, तर तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, टिळकांना अपेक्षित स्वराज्य हे लोकशाहीवर आधारलेले हवे होते. तो काळ हिंदू-मुस्लीम संघर्षाचा होता हे खरे; पण टिळकांनी लखनौ कराराद्वारे मुस्लिमांना जवळ करण्याचा प्रयत्न केला होता; पण त्यामागे धर्मभावना नसून राष्ट्रीय ऐक्याचा विचार होता, हे तर्कतीर्थांनी या मुलाखतीत स्पष्ट केले आहे. टिळकांचा सामाजिक सुधारणांना विरोध होता असे सर्वसाधारण चित्र पुढे येते. त्याचे खंडन करीत तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, सामाजिक सुधारणांवर भर दिला तर समाजात सनातनी व सुधारक असे तट पडतील व स्वराज्य हे स्वातंत्र्यचळवळीचे जे लक्ष्य व केंद्र होते, त्यापासून समाज विचलित होईल. म्हणून राजकीय चळवळीवर लोकमान्य टिळक भर देत असत. स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे उलटली तरी स्वराज्य काळातील प्रश्न मिटले नाहीत, याबद्दल तर्कतीर्थांनी 'गरिबी हटाओ' घोषणेचा संदर्भ देत स्पष्ट केले की, शेती सुधारणेशिवाय देशाचे दारिद्र्य दूर होणार नाही. म्हणून टिळक स्वावलंबनाचे समर्थन करीत हे तर्कतीर्थ लक्षात आणून देतात. इतिहासावर आधारित वर्तमानाची उकल हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विश्लेषणाचे सूत्र नेहमीच राहिले आहे. ही मुलाखतही त्यास अपवाद नाही.

**२३) 'लोकमान्य टिळकांची वाङ्मयीन महात्मता'**

या विषयावरील एक मुलाखत दैनिक 'केसरी'च्या २७ जुलै १९७५ च्या अंकात प्रकाशित झाली आहे. श्री. अनिल जोशी यांनी घेतलेल्या या मुलाखतीस प्रा. बा. सी. मर्ढेकर यांच्या 'वाङ्मयीन महात्मता'[२१] शीर्षक निबंधाची पार्श्वभूमी आहे. तो निबंध याच शीर्षकाने प्रकाशित छोट्या ग्रंथांत समाविष्ट आहे. तो ग्रंथ सन १९४१ मध्ये रामकृष्ण प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केला होता.

प्रा. बा. सी. मर्ढेकरांनी एखादे साहित्य आपण जेव्हा श्रेष्ठ वा अभिजात मानतो, त्याच्या गुणवैशिष्ट्यासंबंधाने तीन घटकांची चर्चा केली आहे. १) वाङ्मयीन आत्मनिष्ठा, २) वाङ्मयीन तादात्म्य, ३) वाङ्मयीन महात्मता. उगो ओजट्टीने म्हटले आहे की, 'आत्मनिष्ठेत कलेची उत्पत्ती नसून ती परिणती आहे.' याचा अर्थ असा की, आत्मनिष्ठा गुणविशेष नसून कारण आहे, तर कार्य (परिणाम) वाङ्मय आहे. वाङ्मयीन तादात्म्यातून शब्दसृष्टी अवतरत असते. ते तादात्म्य सचेतन

(Dynamic) असते. वाङ्मयीन महात्मता जीवनानुभवाची व्यापकता घेऊन जन्मते. महात्मतेचा संबंध मूल्यवत्तेशीपण असतो. वाङ्मयात संगती असेल तर संकल्पना विकास संभवतो. वाङ्मयातील भाव-संगती समन्वयाचा संबंध विश्वरचना सौंदर्याशी असतो.

या कसोटीवर लोकमान्य टिळकांच्या साहित्याचे श्रेष्ठत्व जाणून घेण्याचा प्रयत्न मुलाखतकाराने केला आहे. तर्कतीर्थांनी अनेक प्रश्नांच्या उत्तरांतून स्पष्ट केले आहे की, 'लोकमान्य टिळक लेखसंग्रह'[२२] मी साहित्य अकादमीसाठी संपादिला असून, त्याच्या प्रस्तावनेत लोकमान्य टिळकांच्या साहित्याची महती वर्णिलेली आहे. आपल्या प्रस्तावनेत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, 'टिळकांच्या 'केसरी'तील लेखसंभाराला व 'गीतारहस्य'ला कलात्मक साहित्याची पदवी प्राप्त झाली आहे. हे नाकारणे म्हणजे प्रज्ञेचे सौंदर्य नाकारणे होय.'[२३] पुढे ते सांगतात की, 'टिळक व गांधी यांच्या लेखनातही वाङ्मयीन महात्मता प्रतिबिंबित झाली आहे. गांधींच्या लेखनात जी निष्ठा व आत्मप्रत्यय दिसतो, तोच टिळकांच्याही लेखनात दिसतो. आत्मप्रत्यय व प्रतिमा यांच्या संगमात साहित्यसौंदर्य निर्माण होते. हा संगम टिळकांच्या लेखनशैलीचे मूळ रहस्य आहे.'[२४] लोकमान्य टिळकांची प्रतिभासंपन्न व विचारघन लेखणी एक विलक्षण अमोघ शास्त्र होते. त्यात विलक्षण प्रवर्तकता होती. लोकमान्य टिळकांच्या साहित्यात भावनांना दुय्यम स्थान होते, हे खरे नाही. अनुभूतीची शुद्ध निष्ठा या प्रखर नि प्रमुख निकषावर टिळकांच्या साहित्याचे मूल्यमापन व्हायला हवे, असे तर्कतीर्थांना वाटते. लोकमान्यांचे साहित्य कलात्मक आहे, तसे ते तार्किकही आहे. भावनेपेक्षा विचार केव्हाही श्रेष्ठच असतो हे आपण विसरून चालणार नाही. लोकमान्य टिळकांचे साहित्य, मग ते वृत्तपत्रीय लेखन असो वा 'गीतारहस्य'सारखे तात्त्विक लेखन असो ते इतिहास घडविणारे असल्याने श्रेष्ठ ठरते. चिपळूणकरांची 'निबंधमाला' आणि टिळकांची 'गीतारहस्य' अशी तुलना करताना लक्षात येते की, लोकमान्य टिळकांच्या लेखनशैलीचे सारे सौंदर्य तिच्या सुबोधतेत सामावलेले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या मुलाखतीत लोकमान्य टिळकांना श्रेष्ठ साहित्यिक म्हणून कसे पाहतात हे पाहणे महत्त्वाचे. बऱ्याचदा राजकीय व्यक्तींच्या लेखनास साहित्यिक कसोट्या लावणे कठीण होऊन जाते; पण महात्मा गांधी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर अशी तुलना केल्यानंतरही लोकमान्य टिळकांचे साहित्य प्रभावाच्या अंगाने श्रेष्ठ सिद्ध होते. कारण ते आशयसंपन्न, आशयघन साहित्य होय. कृती प्रेरकतेच्या निकषावर त्या साहित्याकडे पाहता येते. साहित्याचा आशय हा श्रेष्ठतेचा निकष सर्वत्र मान्य कसोटी होय. रुसो, व्हॉल्टेअर, बायरन या साहित्यिक वा कवींचे श्रेष्ठत्व आशयघनतेत आहे. साहित्यमीमांसा करताना केवळ प्रचलित कसोट्यांचा विचार केला, तर गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. म्हणून ज्या साहित्याची मीमांसा करायची तिचे स्वरूप व परिणाम अशा उभय अंगांनी आपण विचार केला, तर मात्र ते साहित्य आपणास त्याच्या बलस्थानांकडे नेते. त्या आधारावर विचार करू, तर मात्र गफलत, गोंधळ

होण्याची शक्यता आपोआप कमी होऊन जाते. लोकमान्य टिळकांच्या साहित्यिक महात्मतेचा विचार करताना या सर्व बाबी लक्षात घेणे जरूरीचे ठरते.

### २४) 'साम्राज्याला धक्का देणारे दोन महापुरुष : लोकमान्य टिळक व महात्मा गांधी'

ही दैनिक 'केसरी'मध्ये प्रकाशित मुलाखत श्री. अनिल जोशी यांनी घेतली होती. या मुलाखतीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या दोन्ही महापुरुषांच्या व्यक्तिमत्त्वातील समानधर्मित्वावर भर दिला आहे, शिवाय काही मार्गविभेदावर प्रकाश टाकला आहे.

भारतातील ब्रिटिश साम्राज्यशाहीला धक्का देण्याचे प्रथम कार्य लोकमान्य टिळक यांनी केले. महात्मा गांधी यांनी तो मार्ग प्रशस्त करीत स्वातंत्र्य मिळवून दिले. हे दोघेही महापुरुष निःशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते होते. परंतु, लोकमान्य टिळक व्यवहारवादी, तर महात्मा गांधी मात्र ध्येयवादी होते असे तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे. या उभयतांनी सत्य, अहिंसा, नैतिक मूल्ये यावर भर दिला. लोकमान्य टिळक राजकीय स्वातंत्र्याचे समर्थक होते. महात्मा गांधींनी राजकीयबरोबर सामाजिक कार्य केले. दोघेही सुधारणावादी पक्षाचे समर्थक राहिले होते. शिक्षण, स्वदेश आणि अर्थकारण याबाबत दोन्ही महात्मे आग्रही होते; पण प्राप्तीच्या मार्गांबाबत भिन्नता होती. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन दोघांना मान्य होते. राष्ट्रीय शिक्षण व 'नई तालीम' दोन्ही राष्ट्रवादी शिक्षणच होते. फरक स्वरूपाचा होता, ध्येय मात्र एकच होते. महात्मा गांधींचा भर ग्रामसुधार आणि ग्रामविकासावर होता. वर्तमान भारताची वाटचाल मात्र महात्मा गांधींच्या नाही, तर लोकमान्यांच्या मार्गाने होत आहे, हे तर्कतीर्थांचे निरीक्षण व मत महत्त्वाचे आहे.

इथे एका गोष्टीची विशेष नोंद घेणे आवश्यक आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची घडण ज्या प्राज्ञपाठशाळा, वाई येथे झाली, तिथे विजापूरकर यांच्या समर्थ विद्यालय, तळेगाव येथील विद्यार्थी व शिक्षक येऊन सामील झाले होते. ते समर्थ विद्यालय सुरू होऊन स्थिर व्हावे म्हणून लोकमान्य टिळक यांनी व्याख्यान दौरे केले होते. एका भाषणात टिळक म्हणाले होते की, 'स्वतःच्या हिमतीवर पोट भरण्याचे सामर्थ्य जर राष्ट्रीय शिक्षणाने अंगी येणार नाही, तर ते राष्ट्रीय शिक्षणच नव्हे.'[२५] याबाबतही दोघा महापुरुषांचे एकमत होते.

### २५) 'केसरी'चे पंचानन (१९८१)

एखाद्या वृत्तपत्रास वा नियतकालिकास पिढ्यान्‌पिढ्या चांगले संपादक मिळत राहणे हे त्या वृत्तपत्र, नियतकालिक वा माध्यमाच्या दृष्टीने परंपरा समृद्धी करणारे असते, तद्वतच ते समाजहिताचेही राहते. स्वातंत्र्यपूर्व काळात असा समृद्ध संपादकीय वारसा दैनिक केसरी, पुणे या वृत्तपत्रास लाभला. त्याचे विवेचन करणारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची अनिल जोशींनी घेतलेली मुलाखत केवळ 'केसरी'संबंधी न राहता ती महाराष्ट्राच्याच नाही तर भारतीय वृत्तपत्र सृष्टीच्या योगदानाचा आढावा घेणारी ठरली आहे. सदर मुलाखत दैनिक 'केसरी'च्या ४ जानेवारी १९८१ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. तर्कतीर्थांच्या सहस्रचंद्रदर्शन वर्षाचे औचित्य साधून 'केसरी' प्रतिनिधींनी घेतलेला एक वैचारिक कानोसाच म्हणायचा.

दैनिक 'केसरी'चा महाराष्ट्र नि भारतीय वृत्तपत्र सृष्टीत जो दबदबा राहिला, तो दोन कारणांनी. एक तर स्वातंत्र्याविषयी जागृतीचे असाधारण कार्य 'केसरी' आणि 'मराठा' या दैनिकांनी केले. दुसरे असे की, या दैनिकांचे पहिले पाच (पंचानन) संपादक साहित्यिक सुधारक व नवमतवादी राहिले. सर्वश्री विष्णू कृष्ण चिपळूणकर (१८५०-१८८२), गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५), बाळ गंगाधर टिळक (१८५६-१९२०), नरसिंह चिंतामण केळकर (१८७२-१९४७) आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर (१८७२-१९४८) या संपादकांनी 'केसरी'च्या समांतर महाराष्ट्राच्या राजकारण, सामाजिक सुधारणा, वाङ्मय, कला, इतिहास आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात आपल्या कार्य-कर्तृत्वाने मोलाची भर घातली.

तर्कतीर्थांनी या मुलाखतीत या पाचही संपादक महोदयांच्या संपादकीय कारकीर्द, लेखनशैली, कार्य, योगदानविषयक आपली निरीक्षणे नोंदविली आहेत. ती तुलनात्मक असली तरी कोणास दुय्यम ते लेखत नाहीत. या सर्वांच्या निरंतर योगदानामुळे 'केसरी'चा पाया मजबूत झाला. आजही ते वृत्तपत्र पूर्वपरंपरा घेऊन वाटचाल करीत आहे, याचे श्रेय 'केसरी'च्या पंचाननाचे. वृत्तपत्र संपादक हा त्या वृत्तपत्राचा चेहरा बनतो, कारण त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यात पडत असते.

**२६) भारतीय राष्ट्रवादाचे महर्षी : लोकमान्य टिळक**

'लोकमान्य टिळक' शीर्षक मुलाखतही अनिल जोशी यांनीच घेतली असून, ती दैनिक 'केसरी'च्या १ ऑगस्ट १९९२ च्या अंकात प्रकाशित झाली होती. लोकमान्य टिळक स्मृतिदिनाच्या औचित्याने ही मुलाखत घेण्यात आली होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर लोकमान्य टिळकांचा प्रभाव बालपणापासूनच दिसून येतो. वाईच्या प्राज्ञपाठशाळेत शिकत असतानाच त्यांचे गुरुजी दिनकरशास्त्री कानडे हे लोकमान्यांचे भक्त होते. सन १९१५ ते १९२० या लोकमान्यांच्या अंतिम पर्वातील टिळक लिखित लेखांचे तर्कतीर्थांनी अक्षरशः पारायण केले होते. असा तो काळ टिळक प्रभावाचा होता. 'केसरी'कार लोकमान्य आणि 'सुधारक'कार आगरकर स्नेही असले तरी त्यांच्यात वैचारिक मतभेद होते; पण वैर नव्हते हे लोकमान्यांनी 'केसरी'च्या ४ जुलै १९१६ च्या अंकात आगरकरांच्या वाङ्मयीन मूल्यांचे रसभरीत वर्णन करणाऱ्या लेखावरून स्पष्ट होते. तीच गोष्ट गोपाळ कृष्ण गोखले यांच्याबाबतही दिसून येते. गोखलेंसंबंधी मृत्युलेखात टिळकांनी कबूल केले आहे की, 'आमचे कितीही मतभेद असले तरी निष्काम देशभक्ती या गुणाबद्दल मतभेद नाहीत.' न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्याबद्दलही लोकमान्यांनी 'केसरी'तून मतभेद नोंदवून आदर व्यक्त केलेला आढळतो.

जी गोष्ट भारतीय विचारवंतांबद्दल तीच पाश्चिमात्य तत्त्वज्ञांबद्दल. लोकमान्यांचे इंग्रजीवरील प्रभुत्व वादातीत आहे. मॅक्सम्युलर, स्पेन्सर त्यांनी चांगला वाचला होता. सामाजिक सुधारणांसंदर्भात जे अनुकरणीय, त्यांचा स्वीकार ही लोकमान्यांची वृत्ती होती. त्यामुळे

भेद ते गौण मानत असत. लोकमान्यांचे भारतीय राष्ट्रवादाचे प्रणेते म्हणून रूढ झालेली जी ओळख आहे, त्यामागे ही उदारवादी लेखनपरंपरा दिसून येते. लोकमान्यांचा ब्रिटिश विरोध हा साम्राज्यवादविरोधी जसा होता, तसा तो त्यांच्या 'फोडा नि झोडा'या भेदनीतीसही होता. म्हणून लोकमान्य टिळक आपणास राष्ट्रवादाचे द्रष्टे महर्षी वाटतात. शुद्ध राष्ट्रवाद हा लोकमान्य टिळकांचा ध्येयवाद होता व लक्ष्यही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या मुलाखतीतून लोकमान्यांविषयीचा आपला आदर अधोरेखित केला आहे.

### २७) 'गीतारहस्य' हे आचारशास्त्रच

या शीर्षकाची अनिल जोशी यांनी घेतलेली मुलाखत दैनिक 'केसरी'च्या ९ मार्च १९९४ च्या अंकात प्रकाशित झाली होती. सदर मुलाखतीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'गीतारहस्य' या लोकमान्य टिळकलिखित ग्रंथातील कर्मयोगावर प्रकाश टाकून त्यास आचारशास्त्र रूपात सादर केले आहे.

तर्कतीर्थांच्या विचारानुसार 'गीतारहस्य' ग्रंथ एकप्रकारे नीतिशास्त्र होय. ते मानवजातीला आचारसंबंधी मार्गदर्शन करते. ते जनतेस समर्पित करण्यात आले आहे. स्त्री, वैश्य, शूद्र हे पापयोनी असल्याचे गीतेचे मत नाही, हे तर्कतीर्थ या मुलाखतीत स्पष्ट करतात. कोणताही धर्मग्रंथ हा सदाचाराचेच समर्थन करीत असतो, याकडे ते लक्ष वेधतात. भारतात हिंदू धर्मातील विविध चालीरीती, रूढींमध्ये सुधारणा करण्याचे कार्य ब्राह्मो समाज, आर्य समाज यांनी केले. ब्राह्मो समाजाच्या तुलनेने आर्य समाज पुढारलेला होता. कारण, तो जातिभेद मानत नव्हता.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या मुलाखतीत हिंदू धर्मविषयक आपली मते व निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यानुसार हिंदू धर्म कोणतीही सुधारणा त्वरित स्वीकारीत नाही. सुधारणा तो स्तब्धपणे, सावकाशीने स्वीकारतो, हे इतिहासाद्वारे स्पष्ट केले आहे. 'गीतारहस्य' ग्रंथास तर्कटशास्त्र मानणाऱ्या टीकाकारांचा समाचार घेत तर्कतीर्थांनी त्यांचा प्रतिवाद करीत म्हटले आहे की, केवळ विरोध करणे पुरेसे नाही. आपल्या मताला विरोधक जोवर पुरावे देत नाहीत, आपले मत सप्रमाण सिद्ध करीत नाहीत, तोवर अशा मतांना फारशी किंमत राहत नाही. महाराष्ट्रातील अनेक सुधारणा या संघर्षातून झाल्या आहेत. महाराष्ट्रात धर्मनिरपेक्षता रुजली ती शिक्षणामुळे. इथे आंतरजातीय विवाह विरोधानंतर रुजले. आता तर त्यास कायदेशीर मान्यताच प्राप्त झाली आहे. लोकमान्य टिळक यांचा 'गीतारहस्य' ग्रंथ अशा अनेक अंगांनी मानवी आचारासंबंधी बाबींचे विवेचन करणारा ग्रंथ राहिल्याने तर्कतीर्थांनी त्याचे वर्णन आचारशास्त्र असे केले आहे.

दैनिक 'केसरी'मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या लोकमान्य टिळक यांना केंद्रात ठेवून घेतलेल्या मुलाखतीपैकी ही शेवटची. या मुलाखतीचा काळ अज्ञात आहे. मुलाखतकार अनिल जोशींशी संपर्क करूनही तो उपलब्ध झाला नाही. दैनिक 'केसरी'च्या इतक्या दीर्घ इतिहासात शोधणे अवघड. मुलाखतीतही कोठे कालसूचन नाही.

**२८) 'लोकमान्य टिळक : एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ'**

हा विषय घेऊन ही मुलाखत घेतली आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर इथे इंग्रजी शिक्षणाबरोबरच पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू झाला. नवे विद्वान पुढे आले. स्वामी विवेकानंद, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, योगी अरविंद एकीकडे नि दुसरीकडे विद्यापीठीय नवविद्याविभूषित' पंडित. यात टिळकांचे स्थाननिर्धारण असा या मुलाखतीचा बाज आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या मते, लोकमान्य टिळक या सर्वांहून वेगळे तत्त्वज्ञ होत. लोकमान्य तर्कशास्त्रीय चिकित्सेने भरलेले पंडित नव्हते. ते चतुरस्र पंडित होते. केवळ बौद्धिक पांडित्यासाठी त्यांनी तत्त्वज्ञानाचा व्यासंग केला नाही. लोकमान्यांपुढील भारत हा राजकीय, सांस्कृतिक, नैतिकदृष्ट्या पराभूत भारत होता. लोकमान्यांना त्याचे पुनरुत्थान अपेक्षित होते, म्हणून त्यांनी 'गीतारहस्य'द्वारे कर्मयोगाचे प्रतिपादन केले. हे प्रतिपादन गोंधळात सापडलेल्या समाजास दिशादर्शक होते. जीवनदृष्टी देण्याचे सामर्थ्य हे टिळकांच्या तत्त्वज्ञानाचे बलस्थान होते. टिळक प्रज्ञावंत द्रष्टे होते. तत्त्ववेत्ता पंडित व प्रज्ञावंत द्रष्टा यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतो. ते गीतेच्या तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले. कारण, त्यांना अध्यात्मविद्येची पुनर्रचना करण्याची गरज भासली. या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट केले आहे की, 'टिळकांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे मूर्तिमंत प्रज्ञा होय. असे व्यक्तिमत्त्व विवेकानंद, राधाकृष्णन किंवा अरविंद यांचे नाही. विवेकानंदांची व्याख्याने आध्यात्मिक चिंतनाची स्फूर्ती देतात आणि योगी अरविंदांची ग्रंथसंपत्ती आपल्या गूढ अध्यात्मवादाला गंभीरता प्राप्त करून देते आणि राधाकृष्णन यांचे ग्रंथ आपल्या तात्त्विक विचारांना चतुरस्रता प्राप्त करून देतात. परंतु, राजकीय प्रज्ञेने भरलेले आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व हे केवळ टिळकांच्याच ठिकाणी पाहावयास सापडते.'[२६]

लोकमान्य आणि 'केसरी' दैनिकाचे अद्वैत प्रसिद्ध आहे. या दैनिक 'केसरी'च्या लौकिकात अनेक संपादकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यात सर्वश्री विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, स्वतः लोकमान्य टिळक, शिवाय साहित्यसम्राट न. चिं. केळकर, नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचा समावेश आहे. हे सर्व 'केसरी'च्या इतिहासात 'पंचानन' म्हणून ओळखले जातात. त्यांनी 'केसरी'ला जसा चेहरा दिला, तशी 'केसरी'ने त्यांना ओळख दिली. या सर्वांचा ऊहापोह 'केसरीचे पंचानन' शीर्षक मुलाखतीत करण्यात आला आहे. अनिल जोशींनी घेतलेल्या या मुलाखतीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उपरोल्लेखित महानुभावांचे 'केसरी' संबंधातील कार्याचे एका अर्थी मूल्यमापनच केले आहे. दैनिक 'केसरी', पुणेच्या ४ जानेवारी १९८१ च्या अंकात ती प्रसिद्ध झाली होती.

तर्कतीर्थांनी या मुलाखतीत स्पष्ट केले आहे की, विष्णुशास्त्री चिपळूणकरांना अवघे ३२ वर्षांचे आयुष्य लाभले. परंतु, त्यांनी 'केसरी' आणि आपल्या 'निबंधमाला'मधून जे लेखन केले त्यात स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा या तत्त्वत्रयीचा पुरस्कार केला. गोपाळ गणेश आगरकरांनी सामाजिक सुधारणांचे जोरदार समर्थन करीत आपण खऱ्या अर्थाने सुधारक आहोत, हे दाखवून

दिले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या प्रखर नि प्रभावी अग्रलेखांमधून राजकीय जागृती घडवून आणली. साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांनी साहित्य आणि वृत्तपत्रीय लेखन या दोन्हींतून समाज संघटन घडवून आणले. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांची प्रकृती नाटककाराची असली, तरी त्यांचे 'केसरी'तील लेखन लोकमान्य टिळकांइतकेच जहाल होते. या सर्वांनी एकोणिसाव्या शतकाचा उत्तर काळ नि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध म्हणजे सन १८८१-१९२० अशी चार दशके मराठी मनावर राज्य केले. त्या काळात 'केसरी', 'मराठा' ही वृत्तपत्रे राजकीय जागृती व संघटनेची साधने बनून केवळ कार्यरत होती असे नाही, तर याद्वारे त्यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व करीत संघटन व मार्गदर्शन केले. ब्रिटिशांना या वृत्तपत्राची भीती होती आणि धाकही!

**❍ अन्य व्यक्तीविषयक मुलाखती**

**२९) अजूनही यशवंतराव चाचपडत आहेत (८ ऑक्टोबर, १९७७)**

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील सन १९७५-७७ दरम्यानचा २१ महिन्यांचा काळ (२५ जून, १९७५ ते २१ मार्च, १९७७) हा राजकीय आणीबाणीचा होता. त्यानंतरची ही मुलाखत अर्थात जनता पक्ष सरकारच्या काळातील. तेव्हा यशवंतराव चव्हाण विरोधी पक्षनेते होते. साप्ताहिक 'माणसू'च्या ८ ऑक्टोबर, १९७७ च्या अंकात प्रकाशित झालेली ही मुलाखत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची साप्ताहिक 'माणूस'चे प्रतिनिधी म्हणून सतीश कामत यांनी घेतली असली, तरी तिचा केंद्र यशवंतराव चव्हाण होते. त्यांच्या एकंदर राजकीय प्रवासाचं विश्लेषण म्हणून ती महत्त्वाची ठरते.

यशवंतराव चव्हाण हे लोकसंग्रही नेते. त्यांची जडणघडण वाचन, चिंतन, मनन, विविध वाद-प्रवाहांचा अभ्यास शिबिरे यातून झाली; पण त्याचं प्रत्यंतर त्यांच्या वर्तनात दिसलं नाही. उलटपक्षी लोक त्यांनी संधीसाधू म्हणत राहिले, हे या प्रश्नकर्त्याचं मत खोडून काढत तर्कतीर्थ म्हणतात की, 'यशवंतरावांना संधीसाधू म्हणणं हा राजकीय विरोधकांच्या नीतीचा भाग असला, तरी यशवंतराव आजीवन काँग्रेसमध्येच राहिले. अंतर्गत गट बदलले असतील; पण काँग्रेस संस्कार, परंपरा, लोकसंघटन यांच्याशी त्यांनी कधीही फारकत घेतली नाही, हे लक्षात घेतलं पाहिजे. सन १९६२ ते १९७७ या काळातील केंद्रीय राजकारण व काँग्रेस नेतृत्वात ते शिखरस्थानी राहिले. महाराष्ट्राचे वादातीत नेते म्हणून कायम राहिले. केंद्रात गेले तरी महाराष्ट्राचे अजातशत्रू नेतृत्व अशीच त्यांची प्रतिमा राहिली. आज सत्तेवर जनता पक्ष असला तरी काँग्रेस संपली असे म्हणता येणार नाही. कारण, भारतभर संस्थात्मक व कार्यकर्त्यांचं समूळ लोकसंघटन असलेला तोच एक पक्ष आहे. ओहोटी लागली तरी त्याला भविष्य नाही असे म्हणता येत नाही, हे शास्त्रीजींचं या मुलाखतीतील निरीक्षण व मत त्यांची राजकीय जाण सिध्द करणारी आहे. आज यशवंतराव विरोधी पक्षनेते म्हणून आक्रमक भूमिका घेण्याची भाषा करीत असले तरी तो त्यांचा पिंड नाही, हे सांगण्यासही ते कचरत नाहीत. ते अजून चाचपडत आहेत. कारण, प्रथमच

ते विरोधी भूमिकेत वावरत आहेत. तर्कतीर्थांनी यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या घडणीच्या काळापासून पाहिले असल्याने त्यांच्यावरचा दुसरा भाष्यकार तर्कतीर्थांशिवाय कोण असणार?

### ३०) स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ

'स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ'सारख्या व्यापक विषयावरची तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एक दीर्घ मुलाखत प्रश्नोत्तरे रूपात 'नवभारत' मासिकाच्या डिसेंबर १९७८ व जानेवारी १९७९ या जोड अंकात प्रकाशित झालेली आहे. ती 'एक जिज्ञासू' या नावाने प्रकाशित असली तरी ती तत्कालीन संपादक प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतली असावी असे मुलाखतीच्या प्रश्नावलीवरून वाटते. या मुलाखतीचा उद्देश नारायणशास्त्री मराठे अर्थात ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांचे जीवन, व्यक्तिमत्त्व, कार्य, विचार समजून घेणे आहे. त्यातही अभ्यास, चिंतन, मनन इत्यादींद्वारे पुढे त्यांनी धर्मविषयक सुधारणांसंदर्भात जे कार्य केले, ते अधोरेखित करणे आहे.

स्वामी केवलानंद सरस्वतींची गुरूपरंपरा बहुविध असल्याचे तर्कतीर्थांनी या मुलाखतीत स्पष्ट केले आहे. त्यांनी 'ऋग्वेदा'चा अभ्यास मेणावलीकर जोशी शास्त्री यांच्याकडे केला. 'कृष्ण यजुर्वेद' ते बाळशास्त्री रानडे यांच्याकडून शिकले. 'न्यायवेदांत'चे अध्ययन स्वामी केवलानंद सरस्वतींनी धोंडशास्त्री डेंगवेकर यांच्याकडे केले. त्यांचे अधिकृत गुरू मात्र प्रज्ञानंद सरस्वती होते. स्वामीजींनी त्या काळात इंग्रजी औपचारिक शिक्षण घेण्यापेक्षा गुरुकुलमध्ये शिकणे पसंत केले. औपचारिक शिक्षणाला लागणारा पैसा त्यांच्याकडे नव्हता. घरची गरिबी होती. शिक्षणासाठी ते घर सोडून मिरजेस आले. मिरजेहून शिक्षणासाठी वाईस आले, शिकले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अध्यापन करायचे ठरवून सन १८९८ मध्ये आपले गुरू प्रज्ञानंद सरस्वती यांच्या स्मरणार्थ प्राज्ञपाठशाळा सुरू केली. या पाठशाळेची कीर्ती अल्पावधीत सर्वदूर पोहोचली. शिकतानाच्या काळात स्वामी केवलानंद सरस्वती, स्वत: माधुकरी मागून शिकले. त्या काळात रोज दहा-बारा घरी माधुकरी मागावी लागे. शेवटपर्यंत त्यांनी आपला चरितार्थ असाच चालविल्याचे तर्कतीर्थांनी या मुलाखतीत स्पष्ट केले आहे. स्वामी केवलानंद सरस्वतींनी आयुष्यभर नैष्ठिक ब्रह्मचर्याचे पालन केले. ते संन्यस्त जीवन जगले. 'सत्यं ज्ञानमन्तं ब्रह्मम् ।' हे ब्रीद आयुष्यभर जपले.

अशी ज्ञानपरंपरा वर्धिष्णू करणे हा स्वामींच्या ध्येयधोरणाचाच एक भाग होता. आपले संस्कृत साहित्याचे अध्ययन पूर्ण होताच स्वामींनी आपला मोर्चा इंग्रजी शिक्षणाकडे वळविला. इंग्रजी साहित्यातील मिल, स्पेन्सर यांची भाषांतरे त्यांनी वाचली. त्यामुळे जग नि जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन आधुनिक बनला. नंतरच्या काळात आपली प्राज्ञपाठशाळा त्यांनी अध्ययन – अध्यापन या दोन्ही स्तरांवर आधुनिक बनविल्याचे तर्कतीर्थ या मुलाखतीत सांगतात. इतकेच नव्हे तर नंतरच्या काळात स्वामी केवलानंद सरस्वती यांनी आपली पाठशाळा राष्ट्रीय शिक्षणाचे केंद्र बनविली. भारताच्या स्वातंत्र्यचळवळीस बळ मिळावे म्हणून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

स्वामी केवलानंद सरस्वती यांनी आपल्या पाठशाळेत पारंपरिक शास्त्रे, साहित्य शिकविले; पण त्याचबरोबर विज्ञानही शिकविले. भौतिकाचा विचार पुढे नेणारा आहे, असे स्वामींचे मत असल्याचे तर्कतीर्थांनी प्रश्नोत्तरात स्पष्ट केले. तर्कतीर्थांनी पुढे खुलासेवार सांगितले की, स्वामींनी त्यांना बहुआयामी शिक्षण दिले. म्हणजे असे की, त्यांनी 'वीणावादनतत्त्वज्ञः' शिकवले. वाद्य, स्वर, आनंद तत्त्व शिकवले आणि समजावले की, जीवनात दैहिक जितके महत्त्वाचे असते तितकेच आध्यात्मिकही ! तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर मुलाखतीत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या हिंदू धर्म सुधारणा चळवळीचा ऊहापोह विस्ताराने केला आहे. धर्मसुधारणा या कालसंगत असतात, त्या केल्या पाहिजेत, असे स्वामी केवलानंद सरस्वतींचे म्हणणे होते, हे तर्कतीर्थ या मुलाखतीत स्पष्ट करतात. धर्मसुधारणेचे भान राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, आर्य समाज, ब्राह्मो समाज या सर्वांना होते. लोकमान्य टिळक, महात्मा गांधींच्या चळवळीशी हा विचार जोडला गेलेला होता. स्वामी केवलानंद सरस्वतींना सुधारणेचे भान त्यांच्या बहुश्रुततेतून आलेले होते, असे निरीक्षण या मुलाखतीत तर्कतीर्थांनी नोंदविले आहे. स्वामी समन्वयवादी होते. स्वामीजींनी महात्मा गांधींना अस्पृश्यता निवारणार्थ दिलेले पुरावे, समर्थन याचे तर्कतीर्थ साक्षीदार होते, तसेच भागीदारही. त्याचे विस्तृत विवेचन मुलाखतीत आहे, ते वाचणे हा रोचक अनुभव होय. स्वामी नित्यांच्या शिष्यवृंदांनी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत धर्मसुधारणा चळवळ यशस्वी केली.

**३१) सत्तेपासून दूर राहिलेले संघटक व क्रांतिकारक : किसन वीर (१९८०)**

'सत्तेपासून दूर राहिलेला संघटक व क्रांतिकारक : किसन वीर' शीर्षक असलेली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत अनिल जोशी यांनी घेतली होती. ती दैनिक 'केसरी'च्या दि. २८ जानेवारी १९८० च्या अंकात प्रसिद्ध झाली होती.

किसन वीर सातारा जिल्ह्यातील काँग्रेसचे लोकप्रतिनिधी. स्वातंत्र्यपूर्व काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या भूमिगत क्रांतिकार्यात ते सक्रिय होते. स्वातंत्र्योत्तर कार्यात यशवंतराव चव्हाण यांचे समर्थक म्हणून कार्यरत राहिले. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी स्वातंत्र्यचळवळीच्या अनुषंगाने तुरुंगवास भोगला होता. तर्कतीर्थ आणि किसन वीर यांचा संबंध स्वातंत्र्यचळवळीपासूनचा. शिक्षण फारसे नसतानाही त्यांचे शहाणपण आणि राजकीय मुत्सद्देगिरी वाखाणण्यासारखी होती. किसन वीर कुशल संघटक म्हणून परिचित होते. स्वातंत्र्योत्तर काळात ते सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी राहूनही त्यांनी कधी पदाची अपेक्षा केली नाही. उलटपक्षी सत्ताधारी, पदासीन व्यक्ती 'रमा, रमी, रम'च्या मागे असल्याबद्दल ते काँग्रेस कार्यकर्ता शिबिरात टीका करीत. राजकारणात नैतिकतेचा आग्रह धरणाऱ्या अपवाद नेत्यांत किसन वीर यांचा समावेश करून तर्कतीर्थांनी या मुलाखतीत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एकप्रकारे प्रशंसाच केली आहे. सर्वसामान्यांबरोबर सद्भावपूर्ण वर्तन हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष होता. विरोधी पक्षातील एस. एम. जोशींसारख्यांबद्दल त्यांच्या मनातील आदर सचोटीवर उभा होता. तर्कतीर्थांमुळे

असेल; पण एम. एन. रॉय, अच्युतराव पटवर्धन, गोवर्धन पारीख, प्रा. न. र. फाटक, प्रा. वि. म. दांडेकर या सर्वांशी त्यांचे सौहार्द्रपूर्ण संबंध होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या या मुलाखतीतून त्यांची गुणग्राहक वृत्ती जशी दिसते, तसा सहकाऱ्यांबद्दलचा सद्भावही दिसतो. तो अगदी छोट्यातील छोट्या कार्यकर्ता, कर्मचारी यांच्याबद्दलही प्रत्ययास येतो. तर्कतीर्थ आपल्या सहकाऱ्याबद्दल कटू अपवादानेच बोलत. ही सकारात्मकता त्यांच्यात आली ती लेखन, वाचन, व्यासंगातून. शिवाय प्राज्ञपाठशाळेतील गुरू संस्कारातूनही !

**३२) वऱ्हाडचे टिळक : लोकनायक बापूजी अणे (१९८०)**

लोकमान्य टिळकांप्रमाणेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मनात 'वऱ्हाडचे टिळक' म्हणून प्रसिद्ध असलेले लोकनायक बापूजी अणे यांच्याबद्दल सद्भाव नि आदर होता, तो अनिल जोशी यांनी घेतलेल्या व दैनिक 'केसरी'च्या दि. २४ ऑगस्ट १९८० च्या मुलाखतीतून पुरेपूर लक्षात येतो.

लोकनायक बापूजी अणे यांची नि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची पहिली भेट नि ओळख पंडित मदनमोहन मालवीय यांच्यामुळे झाली. सन १९३४ मध्ये तर्कतीर्थ सनातन धर्म परिषद, प्रयागमध्ये भाग घेण्यासाठी म्हणून गेले असताना बापूजी अणेही मालवीय यांच्याकडेच राहण्यास म्हणून आलेले. ते सनातनी, पूजापाठ, कर्मकांड करणारे राजकीय कार्यकर्ते होते. लोकमान्यांबद्दल नि त्यांच्या कार्याबद्दल लोकनायकांच्या मनात अविचल आदर होता. वऱ्हाडात त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव व सार्वजनिक शिवजयंती उत्सव प्रचलित केला. ते व्हॉइसरॉय कौन्सिलचे सदस्य होते. दिल्लीत त्यांचा मुक्काम असे. तर्कतीर्थांनी दिल्लीत त्यांचे आतिथ्य उपभोगल्याची आठवण या मुलाखतीत आहे. त्यामुळे तर्कतीर्थांनी त्यांचा दिनक्रम व कार्य जवळून अनुभविले होते. पूजापाठ त्यांचा परिपाठ होता. त्यामुळे कार्यऊर्जा लाभते, अशी लोकनायक बापूजी अणे यांची श्रद्धा होती. ते उत्कृष्ट वादपटू होते. त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव देशबंधू चित्तरंजनदास, पंडित मोतिलाल नेहरू, बॅ. विठ्ठलभाई पटेल, सी. राजगोपालाचारी, सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान प्रभृती दिग्गजांवर होता, हे लक्षात आणून देऊन तर्कतीर्थांनी या मुलाखतीतून त्यांचे ज्येष्ठत्व सिद्ध केले आहे.

लोकनायक बापूजी अणे यांचे महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनाबद्दल मतभेद होते. म्हणून त्यांनी या आंदोलन काळात व्हॉईसरॉय कौन्सिलच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्यास नकार देऊन आपले विचारस्वातंत्र्य स्पष्ट केले होते. पटेल तेच करायचे, असा त्यांचा शिरस्ता होता. ते कट्टर राष्ट्रवादी म्हणून प्रसिद्ध होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यांच्यावर स्वतंत्र मुलाखत देऊन त्यांच्या आगळयावेगळया व्यक्तिमत्त्वाकडे लक्ष वेधले आहे.

## ३३) मानवेंद्रनाथ रॉय यांची वैचारिक वाटचाल (१९८७)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवन, कार्य आणि विचारांवर स्वामी केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी आणि एम. एन. रॉय या त्रयींचा प्रभाव स्पष्ट आहे. स्वामी केवलानंद सरस्वतींकडून त्यांनी प्राच्यविद्या प्रावीण्य संपादन केले. महात्मा गांधींच्या निमित्ताने व स्वामी केवलानंद सरस्वतींच्या विचारप्रभावामुळे सनातन धर्मश्रद्धांकडून प्रागतिक धर्मसुधारणांसंबंधीचे आकलन सुस्पष्ट होण्यास साहाय्य झाले. त्यातून धर्मसुधारणा, अस्पृश्यता निवारण, मंदिरात हरिजनांचा प्रवेश, आंतरजातीय विवाहसमर्थन कार्य तर्कतीर्थ करू शकले. या सर्वांपासून भिन्न अशा भौतिक तत्त्वज्ञानावर आधारित मार्क्सवादी क्रांती विचाराचे तर्कतीर्थ अनुयायी झाले. हा एम. एन. रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाचा करिष्मा जसा, तसा तो नवमानवतावादाविषयीचा आकर्षणाचाही भाग होय.

सन १९३० च्या दरम्यान महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीत सक्रिय असताना तर्कतीर्थ तुरुंगवास भोगत होते. त्या काळात त्यांनी कार्ल मार्क्सचे साहित्य वाचले. द्वा. भ. कर्णिक व वसंतराव कर्णिक या बंधूंमुळे ते मार्क्सवादाकडे ओढले गेले, तरी त्यावर मोहोर उठविण्याचे कार्य मात्र तत्कालीन डॉ. महमूद म्हणून वावरणाऱ्या एम. एन. रॉय यांच्या प्रभावामुळे. एम. एन. रॉय यांच्या विचारांची वाटचाल समजून घेण्याच्या उद्देशाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची सविस्तर मुलाखत प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतली. ती मासिक ‘नवभारत’च्या फेब्रुवारी, मार्च १९८७ च्या अंकात प्रकाशित झाली होती.

एम. एन. रॉय भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या कालखंडात पं. बंगालमध्ये सशस्त्र क्रांतीचे कार्यकर्ते म्हणून उदयाला आले (सन १९१०). सशस्त्र क्रांतीला जागतिक पाठिंबा व साहाय्य मिळविण्यासाठी त्यांनी विदेशी प्रयाण केले. शस्त्रांची जमवाजमव व अर्थसंकलन हा परदेशवारीचा मुख्य हेतू होता (सन १९१५). त्यांनी भारत सोडला तो काळ पहिल्या महायुद्धाचा होता. विदेशात ते सतत स्थलांतर, भ्रमण करीत. आंतरराष्ट्रीय मार्क्सवादी क्रांतीच्या विविध प्रयत्नांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध व सहभाग होता. अमेरिका, चीन, रशिया, मेक्सिकोसारख्या देशांतील कम्युनिस्ट क्रांती व मार्क्सवादी विचाराच्या प्रचार, प्रसारात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला (सन १९१५ ते १९३०). रशियन कम्युनिस्ट पार्टीशी त्यांचे मतभेद होऊन सन १९३० ला भारतात वेशांतर व नामांतर करून डॉ. महमूद म्हणून परतले. काँग्रेसशी जुळवून घेऊन इथे लोकक्रांती घडवून आणण्याची त्यांची योजना पंडित जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांनी धुडकावून लावली, ती मार्गाच्या मूलभूत मतभेदांमुळे (बुनियादी फर्क). ब्रिटिश पोलिसांना ते कानपूर कटाचे सूत्रधार म्हणून हवेच होते. त्यांनी डॉ. मेहमूद यांच्या खऱ्या रूपाचा शोध घेऊन अटक केली व त्यांना तुरुंगात पाठविले. ते १९३६ पर्यंत तुरुंगात होते. तुरुंगातून सुटून आल्यावर ते पुन्हा सक्रिय झाले व स्वतंत्र संघटनाच्या दृष्टीने प्रयत्न करीत राहिले. त्याला यश येऊन एम. एन. रॉय यांनी सन १९४० मध्ये ‘रॅडिकल डेमॉक्रेटिक पार्टी’ नावाने स्वतंत्र पक्ष स्थापन केला.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, द्वा. भ. कर्णिक, वसंतराव कर्णिक, व्ही. एम. तारकुंडे, गोवर्धन पारीख, अ. भि. शहा प्रभृती मान्यवर त्यांचे सक्रिय समर्थक बनून कार्यरत राहिले. सन १९४८ पर्यंत या मंडळींनी भरपूर प्रयत्न केले; परंतु त्यांना अपेक्षित यश लाभले नाही. सरतेशेवटी त्यांनी सन १९४८ च्या आपल्या पक्षाच्या कलकत्तास्थित वार्षिक अधिवेशनात पक्ष विसर्जनाची घोषणा केली. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते.

या मुलाखतीत वरील माहिती तर्कतीर्थांनी प्रा. मे. पुं. रेगे यांच्या विविध प्रश्नांच्या उत्तरांच्या रूपात प्रगट केली. या मुलाखतीत एम. एन. रॉय यांचे महात्मा गांधींसह अन्य काँग्रेसी नेत्यांशी झालेले मतभेद वाचणे म्हणजे वैचारिक वाटचालीचा मागोवा घेत माणसे, विचार समजून घेणेच होत राहते. एम. एन. रॉय यांचे वागणे, बोलणे, पोषाख हे बुद्धिजीवींचे आकर्षण ठरले तरी ते सामान्यांपासून दूरच राहिले. रॉय यांचे खाणे, पिणे पाश्चात्य नि पत्नीही. त्यामुळे हे भारतीय असले तरी संस्कृती पाश्चात्यच राहिली. ते पोथीनिष्ठ मार्क्सवादी नव्हते हे खरे; पण भारतीय बहुसंख्य समाज पारंपरिक असल्याने रॉय यांचे नवे विचार व दृष्टिकोन स्वीकारू शकला नाही, हे वास्तव होय.

### ३४) विश्वसंस्कृतीची मूल्ये जपणारा नेता : पंडित जवाहरलाल नेहरू (१९८८)

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा संपर्क, संवाद, भेट झाल्याचे त्यांच्या आत्मपर साहित्यावरून दिसून येत नाही. असे असले तरी तर्कतीर्थांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्व, विचार, कार्याची मोहिनी होती ती त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंवर त्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त 'नवभारत' मासिकाच्या नोव्हेंबर १९४९ च्या अंकात जो व्यक्तिलेख लिहिला आहे, त्यातून स्पष्ट होते. इथे तर्कतीर्थांनी दैनिक 'केसरी'साठी दिलेल्या मुलाखतीतून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या व्यक्तिमत्त्व नि कार्याची केलेली मीमांसा अधिक विचारणीय आहे. अनिल जोशी यांनी घेतलेली ही मुलाखत 'केसरी'च्या ४ डिसेंबर १९८८ च्या अंकात प्रकाशित झाली आहे.

तर्कतीर्थांच्या विवेचनानुसार पहिल्या महायुद्धानंतर रशियात समाजवादी राज्य स्थापन झाले. त्याचा वैचारिक पाया मार्क्सवाद होता. परंतु, पंडित जवाहरलाल नेहरूंनी तीन दशकांनंतर भारत स्वतंत्र झाला तेव्हा विकासासाठी समाजवादी विचारसरणीचा अंगीकार केला. तो समाजवाद रशियन समाजवादापेक्षा सर्वथा भिन्न स्वरूपाचा होता. भारतीय समाजवादात भांडवलशाही नष्ट करण्याचा मुद्दा अमान्य करण्यात आला. परंतु, उद्योगांच्या सार्वजनिकीकरणाचे धोरण स्वीकारण्यात आले. सन १९५५ च्या अखिल भारतीय काँग्रेस पक्ष अधिवेशनात 'सोशालिस्ट पॅटर्न ऑफ सोसायटी' शब्दाचा वापर करण्यात आला, हे इथे मी मुद्दाम नमूद करतो. त्यावरून आपल्या एक गोष्ट लक्षात येईल की, नेहरूंना अभिप्रेत समाजवाद हा अन्य राष्ट्रांच्या समाजवादापेक्षा सर्वथा भिन्न होता. एतद्देशीय समाजवादात भांडवलशाही समन्वित होती. नेहरूंना भारतात वर्गरहित समाजवाद अपेक्षित होता.

पंडित नेहरूंनंतर भारतात विशेषतः काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत लोकशाहीचा लोप झाला तरी देशात संसदीय लोकशाही टिकून आहे. आता जातीयवादी, धर्मवादी पक्ष डोके वर काढू लागल्याने भारताच्या धर्मनिरपेक्ष चरित्रास धोका निर्माण झाला आहे, हे मात्र खरे ! प्रांतवादाचा जोर देशात वाढतो आहे, तरीही इथे लोकशाही टिकून आहे, याचे श्रेय मात्र नेहरूंनाच जाते. नेहरूंनी भारतात लोकशाहीस सुसंगत अशी विश्वसंस्कृतीची बीजे मात्र निर्विवाद रुजवली.

**३५) विश्वस्पर्शी विद्वान : लोकहितवादी देशमुख (१९९१)**

'बहुस्पर्शी विद्वान : लोकहितवादी देशमुख' शीर्षक असलेली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत दैनिक 'केसरी'च्या दि. २७ ऑक्टोबर १९९१ च्या अंकात दिसते. ती अर्थातच अनिल जोशी यांनी घेतलेली आहे. मुलाखतीत ते स्पष्ट झालेले नसले तरी १९९१-९२ हे वर्ष लोकहितवादींच्या स्मृती शताब्दीचे वर्ष होते. त्या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थांनी या मुलाखतीद्वारे त्यांच्या जीवन व कार्याचे विहंगमावलोकन करून स्मरणांजलीच एक प्रकारे वाहिलेली लक्षात येते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख हे सन १८५२-५७ मध्ये वाई (जि. सातारा) येथे मुन्सफ व अन्य पदांवर कार्यरत होते. त्या काळात त्यांनी नेटिव्ह जनरल लायब्ररी (आताचे टिळक ग्रंथालय) सुरू केले होते. हाही एक या मुलाखतीचा दुवा म्हणून सांगता येतो.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख हे पंडित होते. त्यांची विद्वत्ता बहुमुखी होती. ते बुद्धिवादी समाजसुधारक होते. धर्मसुधारणांचे ते समर्थक होते. माणूस शंभर पावले चालेल तेव्हा त्यातील काही पावले नागमोडी असणार हे उघड आहे. त्यांच्या 'शतपत्रे'मध्ये अशी पावले दिसतात. त्यांचा दृष्टिकोन इतिहासनिष्ठ होता. संस्कृत ही बहुजनांची भाषा होऊ शकत नाही, हे पाहून त्यांनी संस्कृत धर्मग्रंथांची मराठी भाषांतरे केली. ते बहुभाषाकोविद होते. न्यायाधीश म्हणून कार्यरत असतानाचा मोठा काळ ते गुजरात राज्यात होते. गुजराती भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते.

वेदांना लोकहितवादींनी कधी अपौरुषेय मानले नाही. ते सश्रद्ध होते; पण धर्मांध नव्हते. ते आर्य समाज, प्रार्थना समाजसारख्या संस्थांशी संलग्न होते. यावरून धर्मविषयक सुधारणावादी वृत्ती स्पष्ट होते. सर्व धर्मांचा त्यांचा अभ्यास होता. धर्मविषयक त्यांचा दृष्टिकोन महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाशी मेळ खाणारा होता.

इंग्रजी राज्याबद्दल आणि स्वराज्याबाबतचा त्यांचा स्वतंत्र दृष्टिकोन 'इंग्रजी राज्यापासून लाभ', 'इंग्लिश राज्यापासूनची फळे' आणि 'राज्यतुलना'सारखे निबंध वाचले की स्पष्ट होतो. एतद्देशीय व परके यांजकडे ते आपपर भावाने न पाहता वस्तुनिष्ठ विचार करीत. तो 'राज्यतुलना' निबंधातून स्पष्ट होतो.

तर्कतीर्थांना त्यांच्याबद्दलचा आदर ते वाईशी संबंधित म्हणून नव्हता, तर तर्कतीर्थ आणि लोकहितवादींमध्ये आचार-विचारांची अनेक साम्यस्थळे आढळतात, यात आहे. असेच साम्य लोकहितवादी आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्यामध्ये दिसते. मात्र, लोकहितवादी अधिक निर्भय, स्पष्टवादी बुद्धिजीवी होते. त्यांच्या विचारांना कृतिशीलतेची जोड राहिली आहे.

जाईल तेथील सामाजिक कार्याशी ते स्वतःला जोडून घेत. माझी एक व्यक्तिगत आठवण त्याचा पुरावा म्हणून मी नमूद करतो. ते मुंबई प्रार्थना समाजाशी जुळून महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंप्रमाणे कार्यरत होते. प्रार्थना समाजाने धर्मकार्यास समाजकार्याची जोड आर्य समाज, सत्यशोधक समाजाप्रमाणे द्यावी म्हणून ते आग्रही होते. त्यानुसार प्रार्थना समाजाने सन १८७५ मध्ये वा. बा. नवरंगे बालकाश्रम व बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. त्यात लोकहितवादी देशमुख यांचा पुढाकार होता. तर्कतीर्थ स्वतःही वाईत ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज यांच्याशी संलग्न राहत कार्यरत असायचे. लोकहितवादींबद्दलची ही मुलाखत त्या सर्व दुव्यांसह अभ्यासल्याशिवाय त्यामागील आत्मीयता लक्षात येणार नाही. बालविवाह, हुंडा प्रथा, जाती भेद विरोध हे सर्व मानवहितवर्धक कार्यच त्यांना लोकहिताचे वाटायचे.

**३६) प्रतिभासंपन्न संगीततज्ज्ञ : कुमार गंधर्व (१९९२)**

"केल्याने देशाटन, पंडित् मैत्री, सभेत संचार।
शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ।।"

ही कोणा अज्ञात कवींनी रचलेली; परंतु मराठी माणसांच्या जिभेवर, ओठावर घोळणारी आर्या सार्थ करणारे जीवन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना लाभले होते खरे ! पु. ल. देशपांडे, श्रीराम पुजारी, कुमार गंधर्व, बा. भ. बोरकर यांच्यासह अनेक साहित्यिक, कवी, गायक, कलाकार, राजकारणी, बुद्धिजीवी इत्यादिकांचा सहवास, संपर्क तर्कतीर्थांना लाभला. म्हणून कुमार गंधर्व यांच्यासारखा देवास (मध्यप्रदेश) स्थित गायक वाईसारख्या आडगावी येऊन गातो, ही किमया देशाटनाची तशीच पंडित मैत्री, सभा संचाराचीही. शास्त्र, ग्रंथविलोकन सातत्यामुळे हे शक्य झाले. कुमार गंधर्व यांनी वाईत येऊन कबिरांचे दोहे गायिले (१९८९). तर्कतीर्थ १९८४ ला कुमार गंधर्वांच्या षष्ट्यब्दिपूर्ती समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी कुमार गंधर्वांच्या गायकीची भलामण करणारे सुश्राव्य भाषण तर्कतीर्थांनी केले होते. ते या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील खंड-२, भाषणसंग्रह (व्यक्ती व विचार) मध्ये आठव्या क्रमांकावर प्रकाशित आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची ही मुलाखत कुमार गंधर्वांचे निधन देवास (म. प्र.) मुक्कामी दिनांक १२ जानेवारी १९९२ रोजी झाल्याच्या पार्श्वभूमीवरची आहे. ती अनिल जोशी यांनी दैनिक 'केसरी'साठी घेतली होती. अनिल जोशी कुमार गंधर्वांच्या वाई भेट, तसेच मैफिलीचे साक्षीदार म्हणूनही तिचे महत्त्व आहे. ही मुलाखत दैनिक 'केसरी'च्या १९ जानेवारी १९९२ च्या अंकात प्रकाशित झाली होती

कुमार गंधर्वांच्या स्मृती जागवत, त्यांना श्रद्धांजली अर्पण करीत तर्कतीर्थ म्हणतात की, वैदिक काळात 'सामवेद' हा संगीताचा उच्चतम आविष्कार होता. वेदपाठकांनी तो भाषिक, वाचिक रूपात जिवंत ठेवला तरी त्यांची सांगीतिक कलात्मकता ते टिकवू, जपू शकले नाहीत. कुमार गंधर्वांसारख्या कलाकारांनी आपल्या प्रतिभेने शास्त्रीय संगीताच्या रूपाने त्याचे पुनरुज्जीवन

केले असे म्हटले पाहिजे. भारतातले श्रेष्ठ गायक म्हणून कुमार गंधर्वांनी कीर्ती संपादन केली होती. त्यांचे एक वैशिष्ट्य असे होते की, त्यांनी नवे राग निर्माण केले, नव्या बंदिशी बांधल्या. बंदिशी म्हणजे सूर नि संगीताच्या मिलाफातून तयार झालेली गायन रचना. तिला साहित्यिक महत्त्व असते. ते संगीत नि गायनाने कलात्मक रूप धारण करते. कुमार गंधर्वांनी संत कबीर, मीराबाई, गुरूनानक, रामदास, तुकाराम इत्यादींच्या रचनांना सूरसाज चढविला. संतांच्या रचना ईश्वरासाठी असतात; परंतु गायक सुरावलीद्वारे लोकरंजन करीत आपल्या भक्तिभावना व्यक्त करीत असतो. तो त्याचा आविष्कार जसा असतो, तसा मोक्षही ! मोक्षाप्रत पोहोचणारी ही सोपान परंपरा संगीत बहराने समृद्ध असते, ती समाधीप्रत गायक, श्रोते दोघांनाही पोहोचविते.

कुमार गंधर्व ही मोक्षावस्था स्वतः अनुभवत नि श्रोत्यांसह ती निर्माण करीत. हे त्यांचे खरे योगदान होते. स्वतःत मनोभूमिका बांधून ती इतरांमध्ये निर्माण करण्याचे कुमार गंधर्वांचे कौशल्य अपवाद नि असाधारण होते. स्वर, शब्द, अर्थाचा मेळ संगीतासह निर्माण केल्याने त्यांची गायकी अलौकिक होऊन जात असे. कुमार गंधर्वांनी गायिलेल्या चीजा, बंदिशीतून जे नृत्य साकारले, ते श्री नरनारी - नटेश्वर आराधना सिद्ध झाले. ईशस्तवन, शंकराराधना, सरस्वतीस्तवन, गुरूभजन, संगीतमहिमा, ऋतुवर्णन, विराणी (वियोगिनी काव्य), श्यामसुंदर बासरी या त्यांच्या बंदिशी ऐकल्या, पाहिल्या, अनुभवल्या की ब्रह्मानंद सहोदर होऊन जायला व्हायचे. हे अद्वैत, एकात्मता, समाधी त्यांच्या स्वरांची जादू केवळ !

भारतीय संगीत विकसित होते, की बंदिस्त, पारंपरिक राहते याचे उत्तर म्हणजे कुमार गंधर्वांचे गायन. नित्यनूतन, नवसर्जक म्हणून विकासशील! माळव्यातील जनसंगीताच्या सुरावली त्यांनी आपल्या गायकीत आणल्या नि आपली गायकी नवी वाट निर्माण करणारी बनविली. मागे सन १९८४ मधील भाषणात तर्कतीर्थ म्हणाले होते की, "आफ्रिकनांना युरोपियनांनी गुलाम केले. त्यांच्या वसाहती निर्माण केल्या. त्या वसाहतींचे संगीत, गायन, नृत्य हेच युरोपचे संगीत बनले." त्याची आठवण ही मुलाखत वाचताना झाली नाही तरच आश्चर्य !

### ३७) कृष्णाकाठचा माणूस : सुसंस्कृत नेतृत्व (१ मे, १९९३)

यशवंतराव चव्हाण आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे सन १९५६ ते १९६२ या काळातील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनातील अद्वैत होते. कोणी त्यांना गुरू-शिष्य मानत, तर कोणी सल्लागार; पण वास्तवात यशवंतराव चव्हाण तर्कतीर्थांना ज्येष्ठ मित्र, सल्लागार, स्नेही, सहकारी मानत. ते एकमेकांप्रति असलेल्या व्यवहार, व्याख्यान, लेख, पत्रे, मुलाखतींतून स्पष्ट होतं. अशीच एक महत्त्वपूर्ण मुलाखत 'ऋतुरंग' वार्षिकांकाचे संपादक, कवी, लेखक असलेल्या अरुण शेवते यांनी १ मे, १९९३ पूर्वी घेतली होती. मुलाखतीचे नायक अथवा केंद्र होते यशवंतराव चव्हाण. तर्कतीर्थांनी आपल्या या मुलाखतीतून उभयतांच्या संबंधांवर विविध प्रसंगांच्या, विचार-व्यवहाराद्वारे प्रकाश टाकला आहे. नामदार यशवंतराव चव्हाण यांचं अंतरंग व्यक्तिमत्त्व ही मुलाखत उलगडते. 'कृष्णाकाठचा माणूस' शीर्षक ग्रंथात ही मुलाखत संग्रहित आहे.

तर्कतीर्थ हे यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या शाळकरी वयापासून ओळखत. तर्कतीर्थांची सन १९२०, १९३० च्या असहकार चळवळ, कायदेभंग चळवळीतील भाषणे यशवंतराव चव्हाण उतरून काढत. त्यांनी प्रभावित होऊन शाळकरी वयातच त्यांना तुरुंगवास घडला. पुढे ते साताऱ्याचे, महाराष्ट्राचे काँग्रेसपुढारी झाले. संयुक्त महाराष्ट्र समिती आंदोलन काळात ते द्वैभाषिक महाराष्ट्राचे समर्थक राहिले. या संघर्ष काळात उभयतांनी खूप मानहानी सोसली. राष्ट्रवाद, भाषावार प्रांतरचना, भाषा, रॉयवाद, काँग्रेस इ. संदर्भात या उभयतांत मतभेद राहिले, तरी मैत्री अभेद्य राहिली. यशवंतराव चव्हाण आयुष्यभर एकनिष्ठ काँग्रेसी राहिले. महाराष्ट्राच्या सुसंस्कृत समाजघडणीत यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा राहिला. त्यांचं वाचन चतुरस्त्र होतं. पत्नी वेणुताई त्यांचं आराध्य होतं. वेणुताईंनी घराचा उंबरा न ओलांडता पतीचं राजकीय विश्व अभेद्य ठेवलं. यशवंतराव चव्हाण यांनी बेरजेचं राजकारण केलं. लोकशाही, समाजवाद, पुरोगामित्व, आधुनिकता, बहुजन समाजहित यामुळे ते कृष्णाकाठचे सुसंस्कृत नेतृत्व म्हणून अपराजेय राहिले. असा अष्टपैलू नेता परत होणे नाही हेच खरे!

**३८) यशवंतराव चव्हाण : बांधिलकी आणि साहित्य विशेष** (काळ अप्राप्त)

'यशवंतराव चव्हाण : सामाजिक बांधिलकी आणि साहित्य विशेष'मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एक मुलाखत 'संवाद : तर्कतीर्थांशी' शीर्षकाखाली अनिल जोशींच्या मुलाखत संग्रहात संकलित आहे; पण त्याचा संदर्भ आढळून येत नाही. लेखकाशी संपर्क साधूनही तो हाती लागला नाही.

असे असले तरी यशवंतराव चव्हाण यांची घडण आणि वाटचाल समजून घेण्यासाठी उपयुक्त अशी ही मुलाखत आहे. यात तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, यशवंतराव चव्हाण कार्यकर्ते म्हणून घडत असण्याचा काळ हा महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या स्वातंत्र्यचळवळीचा असला तरी सामाजिकदृष्ट्या तो सत्यशोधक चळवळ, ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचा होता. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ व सत्यशोधक चळवळीचे केंद्र कोल्हापूर होते. तिथेच ते महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. महाराष्ट्राचे त्यावेळचे राजकीय जीवन ब्राह्मण-ब्राह्मणेतर या संघर्षाने राष्ट्रीय एकात्मतेला बाधक होते आणि यशवंतराव चव्हाण ज्या मर्यादित प्रादेशिक क्षेत्रात (सातारा जिल्हा) स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेऊ लागले होते, तो प्रदेशही या संघर्षाचे महत्त्वाचे केंद्र होता. अशा स्थितीत यशवंतराव चव्हाण यांनी स्वतःस यापासून अलिप्त ठेवले. हे सोपे नव्हते. त्यावेळी आत्माराम पाटील हे काँग्रेसचे नेते तरुणांना स्वातंत्र्यचळवळीत आणत. स्वातंत्र्यपूर्व काळात परिसरातील रयत शिक्षण संस्था व कर्मवीर भाऊराव पाटील यांचा न जुळलेला सांधा स्वातंत्र्योत्तर काळात जुळून आला. जातीय संघर्षापासून यशवंतराव चव्हाण स्वतःस दूर ठेवू शकले, याचे श्रेय समाजवादी विचारसरणी व ध्येयवादास द्यावे लागेल. आर्थिक शोषणास ब्राह्मण, व्यापारी यांच्यापेक्षा ब्रिटिश साम्राज्यवाद अधिक जबाबदार होता. कारण शेतसारा, कर पद्धती त्यांच्या हाती होती, जिच्याद्वारे बहुजन समाजाचे शोषण मोठ्या प्रमाणात होत होते.

सन १९३० ते १९५० हा कालखंड यशवंतराव चव्हाण यांच्या वैचारिक व साहित्यिक घडणीचा होता. या काळात त्यांनी खाडिलकर, फडके, खांडेकर यांची नाटके, कथा, कादंबऱ्या वाचल्या. कुसुमाग्रजांचे 'गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार', 'कोलंबसाचे गर्वगीत' वाचले. राजकवी यशवंतांची 'आई' कविता वाचली आणि त्यांचा साहित्यिक पिंड सोशिक बनला. पुढे यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य भाषणे, पत्रे, आत्मकथा रूपात आले त्या सर्व साहित्यकृती- "सह्याद्रीचे वारे', 'ऋणानुबंध', 'भूमिका', 'युगांतर', 'कृष्णाकाठ'. सर्वांमधील सोज्वळ दृष्टीची मुळे या घडणीत आढळतात व ध्येयही ! त्यामुळे मुख्यमंत्री झाल्यावर 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ' स्थापन करणे, मराठी राजभाषा बनविणे व भाषा संचालनालय सुरू करणे या सर्वांमागे राज्य घडविण्याची व ते सर्वांचे असले पाहिजे, अशी खबरदारी घेणे यात व्यापकपणा आहे व राजकीय प्रौढत्वही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या सर्व काळात त्यांचे साथीदार, साक्षीदार, भागीदार, मार्गदर्शक राहत आल्याने त्यांच्या या आकलनास 'चक्षुर्वैसत्यम्'चे अधिष्ठान आहे. ग्रंथप्रेमी म्हणून यशवंतराव चव्हाण समजून घ्यायचे, तर त्यांचा बिशात ग्रंथसंग्रह अभ्यासावा लागेल. महाराष्ट्र राज्य वैज्ञानिक दृष्टीचे, तंत्रज्ञानसंपन्न व स्वभाषा समृद्ध करण्याचा त्यांचा ध्यास नि धडपड एक ध्यासपर्वच होते.

**३९) शिवाजीराव नि शास्त्रीबुवा (१९८९)**

पुण्यातील सभा-समारंभात 'सूत्रधार' म्हणून कार्य करणारे सुधीर गाडगीळ. सन १९८९ मध्ये महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात क्रीडा राज्यमंत्री झालेल्या नामदार शामराव अष्टेकरांचा नागरी सत्कार कऱ्हाडमध्ये लोकवर्गणीतून संपन्न झाला. त्या समारंभाचे सूत्रधारकार्य (सूत्रसंचालन) अर्थातच सुधीर गाडगीळ यांनी केले होते. समारंभासाठी आलेल्या पाहुणे मंडळींची व्यवस्था कऱ्हाडच्या शासकीय विश्रामगृहात करण्यात आली होती. समारंभपूर्व मिरवणूक काळ वाढल्याने पाहुणे विश्रामगृहात ताटकळत होते. त्याकाळात सुधीर गाडगीळ यांची पाहुणे म्हणून विश्रांती घेत असलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (अध्यक्ष) आणि प्राचार्य शिवाजीराव भोसले (प्रमुख वक्ते) यांची घेतलेली अनौपचारिक मुलाखत दैनिक 'सकाळ'च्या सन १९८९च्या एका रविवारच्या पुरवणीत 'थेट-भेट' या सदरात प्रसिध्द झाली होती.

तर्कतीर्थांच्या मुलाखतीत सुधीर गाडगीळ यांनी त्यांच्या नि नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या संबंधांवर व यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. दुसरीकडे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या मुलाखतीत त्यांचा आहार, आरोग्य, लोकसंग्रह, वक्तृत्व यांवरची माहिती दिली आहे. त्यानुसार ८८व्या वयातही तर्कतीर्थ दुपारी वामकुक्षी घेत नसत. यशवंतराव चव्हाण यांचा समाजव्यवहार जातनिरपेक्ष होता. मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी पेलताना ते भावनेपेक्षा व्यवहाराने निर्णय घेत, हे लक्षात येतं. ते विधानसभेत कधी गडबडून गेले नाहीत. पत्नी वेणुताई चव्हाण यांच्याशी त्यांचे संबंध सौहार्दाचे होते, हे राजाभाऊ जोशी संपादित 'विदेश दर्शन' पत्रसंग्रहातून स्पष्ट होतं, हे समजतं.

प्राचार्य शिवाजीराव भोसले आहार, आरोग्याकडे लक्ष देत. शाकाहार करीत. योग नियमित करत. त्यांना संत पठडीतले लोक भेटत. ज्ञानी माणसात त्यांची ऊठबस असे, हे कळंत.

मंत्री अष्टेकर साधे कार्यकर्ते होते. शपथविधीस गेले, तर ५०० रुपये जमवून त्यांनी मुंबई गाठली होती. त्यांचा सत्कार ३२०० रुपये लोकवर्गणीतून केल्याचे निरीक्षण सुधीर गाडगीळ नोंदवितात.

तर्कतीर्थ नि प्राचार्य दोघेही प्रबोधक. एक तपस्वी तर दुसरा साधक!

## (ड) धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञानविषयक मुलाखती

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवन, कार्य, विचारांच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान हे विषय त्यांच्या जीवनाचा पाया आहे आणि कळसही ! या तीन विषयांसाठीच त्यांनी आपले सारे जीवन खर्ची घातले. त्यामुळे त्यांच्या घेतलेल्या कितीतरी मुलाखती याच विषयांना केंद्र करून घेतलेल्या दिसतात. 'हिंदुधर्माची समीक्षा', 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'लेखसंग्रह', 'विश्वकोश नोंदी', भाषण नि लेख यांचे विषय, ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना, पुस्तक परीक्षणे, कोशनिर्मिती या सर्वांत धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान हे विषय अग्रभागी दिसतात. त्यांच्या ५० संकलित मुलाखतींपैकी ८-१० मुलाखती तरी याच विषयांवर आधारित आहेत. शिवाय अन्य मुलाखतींमधूनही या विषयांचा ऊहापोह प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे होताना दिसतो.

### ४०) भारतीय संस्कृती : काही समस्या (१९४९)

ही तर्कतीर्थांच्या जीवनातील पहिलीवहिली मुलाखत म्हणून तिचे ऐतिहासिक महत्त्व आहे. शिवाय ही पहिली मुलाखत तत्कालीन प्रसिद्ध अशा 'मौज' या वाङ्मयीन जगतात श्रेष्ठ मानल्या गेलेल्या नियतकालिकाच्या प्रारंभिककालीन दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली आहे. प्रख्यात मराठी संपादक, प्राध्यापक, समीक्षक श्री. पु. भागवत यांनी 'सत्यकथा' हे प्रख्यात वाङ्मयीन मासिक सन १९४५ मध्ये सुरू केले; पण 'मौज' सन १९२२ पासून प्रसिद्ध होत असलेले साप्ताहिक. ते अनंत हरी गद्रे ऊर्फ समतानंद यांनी सुरू केले असले तरी द. पु. भागवत, वि. पु. भागवत तथा श्री. पु. भागवत या त्रयींनी ते नावलौकिकास आणले. ही मुलाखत श्री. पु. भागवत यांच्या संपादक कारकीर्दीतील. त्यांनी प्रश्न देऊन घेतलेली ही मुलाखत. नंतर तर्कतीर्थांनी तिचा खर्डा लिहून दिला. त्यामुळे ती विस्तृत व सुस्पष्ट झाली आहे. भारतीय संस्कृतीसंबंधी तर्कतीर्थांचा दृष्टिकोन यातून स्पष्ट होतो.

शब्दांचे व कल्पनांचे अर्थ नीट समजून घ्यावयाचे तर त्यासाठी बुद्धिवादी संस्कृती उत्पन्न व्हावी लागते. सॉक्रेटिसने जसे हे स्पष्ट केले आहे, तसेच ते सूत्रकाळातील प्राचीन साहित्यात असंदिग्ध शब्दांचे ज्ञानमूल्य मान्य करण्यात आलेले आहे. भारतीय वा अभारतीय शब्द केवळ भौगोलिक नाही, तर सांस्कृतिकही आहेत. मानवी जीवन आणि कर्मपद्धती म्हणजे संस्कृती.

ती आंतरिक व बाह्य दोन्ही घटकांनी अस्तित्वात येत असते. तो एक मानवाचा सृजनशील आविष्कार असतो. काव्य, वाङ्मय, नीती, धर्म, आचार, तत्त्वज्ञान व विज्ञान या सृजनशीलतेचे अंतर्मुख आविष्कार होत. स्थापत्य, कृषी, पशुपालन, वाहन, वस्त्र, पात्र, हत्यारे, यंत्रे ही बाह्य आविष्कार. संस्कृती ही व्यवस्था (order) असते व प्रगती (Progress) ही. संस्कृतीची ही दोन प्रमुख लक्षणे होत. संस्कृती ही नित्यप्रवाही व परिवर्तनशील मानवी स्थिती आहे.

संस्कृती ज्या भौगोलिक परिस्थितीत आकाराला येत असते त्याचे वैशिष्ट्य संस्कृतीत प्रतिबिंबित होत असते. एकाच भौगोलिक परिस्थितीत भिन्न संस्कृती जन्मू शकतात आणि जन्मल्याही आहेत. आज भारतीय संस्कृती म्हणून जी ओळखली जाते, ती मूळ हिंदू संस्कृती. कालौघात मुसलमान, ख्रिश्चन, पारशी धर्म गट भारतात आले. त्यांच्यात देवाण-घेवाण होऊन आज जी भारतीय संस्कृती म्हणून ओळखली जाते, ती सर्वसमावेशक अशी सर्वधर्मी समानत्व मानणारी आहे. निष्काम कर्मयोग तिचा पाया आहे. अलीकडच्या काळात भारतीय संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृतीचा पगडा आहे. मूलभूत हक्क आणि विज्ञान या दोन गोष्टी या संस्कृतीने भारतास दिलेली देणगी होय. भारतीय संस्कृतीचा पुनरुद्धार वा पुनरुज्जीवन विचार सनातनी आणि आधुनिक वेगवेगळ्या दृष्टीने करतात. परंतु, पुनर्घटना म्हणून तिचा विचार करायचा तर शिक्षण हेच त्याचे साधन व माध्यम होऊ शकेल. सुसंस्कृतातील चिरंतनमूल्य हे सर्वव्यापी मानवी संस्कृतीचे शाश्वत वैभव होय. ते मान्य केले की, मग वर्तमानातील न्यून दूर सारून विश्वातील आदर्श भारतीय संस्कृतीत निर्माण करणे म्हणजे तिचा खरा विकास होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर मुलाखतीतून संस्कृतीची व्याख्या, तिचे स्वरूप, घटक तत्त्वे, आदानप्रदान, परिवर्तन इत्यादी बाबींवर आपली धारणा स्पष्ट केली आहे. ती वाचत असता लक्षात येते की, संस्कृतीसंबंधी त्यांचे आकलन वैश्विक पार्श्वभूमीवर तयार झालेले आहे. हिंदू, क्रिट, इजिप्त, सुमेर, बाबिलोन, ग्रीक, रोम या सर्व संस्कृतींच्या उगम, विकास, ऱ्हास इत्यादींचा इतिहास त्यांनी सूक्ष्मपणे सप्रमाण अभ्यासला आहे. त्यामुळे संस्कृती हा त्यांच्या दृष्टीने अभिमान, अभिनिवेशाचा भाग नाही. संस्कृती मानवी जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग असून, बुद्धी व भावनांच्या समन्वयाने परंतु तटस्थपणे विचार करण्याची ती गोष्ट आहे, असे तर्कतीर्थ मानतात.

### ४१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित समाज (१९७३)

सन १९७३ च्या 'अस्मितादर्श' दिवाळी अंकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत मराठी विश्वकोश कार्यालयात त्यांचे सहकारी म्हणून कार्य करणाऱ्या सतीश कुलकर्णी यांनी घेतली आहे.

या मुलाखतीत विविध प्रश्नांमधून तर्कतीर्थ सांगतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नि माझा परिचय आमचे समान मित्र असलेल्या श्री. चित्रे यांच्यामुळे झाला. चित्रे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माझे 'हिंदुधर्माची समीक्षा' पुस्तक वाचण्यास दिले होते. ते त्यांना आवडले.

त्यांनी भेटीची इच्छा व्यक्त केली व आमच्या भेटी नंतर होत राहिल्या. श्री. चित्रे यांचा आणि माझा परिचय महाड येथे झालेल्या माझ्या गणेशोत्सवातील व्याख्यानातून घडून आला. त्या भाषणात मी ब्राह्मणांच्या पिळवणूक तंत्रावर टीका केली होती. ती त्यांना आवडली नसली तरी चित्रे यांना पसंत पडली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तर्कतीर्थ यांच्यात वैचारिक मतभेद असले, तरी दोघे एकमेकांचा आदर करीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेद, स्मृति, श्रृति इ. ग्रंथ इंग्रजीतून अभ्यासले होते. तेव्हा त्यांच्या या साहित्य आकलनाच्या मर्यादा लक्षात घेता तर्कतीर्थ मूळ संदर्भ, आशय समजावत. त्यातून दोघेही एकमेकास समजून घेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य नेते (महात्मा गांधी, पंडित नेहरू, मानवेंद्रनाथ रॉय) यांच्या तुलनेत डॉ. आंबेडकर वादपटू होते. त्यांची विचारनिष्ठा त्यांच्या लेखनातून स्पष्ट होई. त्यांचा बौध्द धर्मावरील ग्रंथ तर्कतीर्थांना भावला होता. डॉ. आंबेडकरांचे ग्रंथ प्रक्षोभक व वादग्रस्त असले तरी तर्कतीर्थ हे विचारांना चालना देण्यासाठी प्रक्षोभकता व वादग्रस्तता आवश्यक मानत. डॉ. आंबेडकर यांच्या बौध्द धर्म स्वीकृतीसंदर्भात तर्कतीर्थांचे म्हणणे होते की, केवळ धर्मांतराने दलितांच्या अस्पृश्यतेत फरक पडणार नाही. तो पडेल केवळ समाज व दलित या दोहोंच्या शिक्षण, संस्कृती व समाज उन्नयनाने. तर्कतीर्थांच्या मतानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलितोध्दाराइतकेच महत्त्वाचे कार्य म्हणजे भारतीय राज्यघटनेची निर्मिती व लोकशाहीची स्थापना. दलित साहित्य केवळ दलितांनी लिहिलेली मानणे यापेक्षा त्याबद्दल सर्वांचे साहित्य अधिक व्यापकतेकडे नेणारे ठरेल.

### ४२) सती प्रथेला धर्मशास्त्राचा आधार नाही (१९८०)

सन १९८० मध्ये राजस्थानमध्ये एक तरुण महिला सती गेली. तिचे मंदिर बांधण्यात आले. ही घटना जुन्या सती प्रथेचे पुनरुज्जीवन करत तिचे समर्थन करणारी ठरत असल्याने भारतभर या घटनेचा निषेध करण्यात आला. या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मत, प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या उद्देशाने दैनिक 'केसरी' पुणेचे वाई येथील प्रतिनिधी अनिल जोशी यांनी संपर्क साधून पृच्छा केली होती. ही मुलाखत त्या दैनिकाच्या दि. १६ फेब्रुवारी १९८० च्या अंकात प्रकाशित झालेली होती.

या मुलाखतीच्या प्रारंभीच तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, "सतीची चाल ही माणुसकीचा घात करणारी आहे. कारण, अगणित निरपराध बालिका आणि महिला यांचे युगानुयुगे भारतीय खून पाडत होते हे नाकारण्यात अर्थ नाही." सतीची चाल भारतातील काही प्रदेशांमध्ये आणि काही जमातींमध्ये अतिप्राचीन काळापासून किंवा इतिहासपूर्व काळापासून हजारो वर्षे रूढ होती. 'मनुस्मृती' आणि 'याज्ञवल्क्य स्मृती'मध्ये तिचा उल्लेख नाही. परंतु, वैधव्य धर्माचा उपदेश मात्र आढळतो. 'महाभारत', 'विष्णुस्मृती'मध्ये तिचे उल्लेख आहेत. 'ऋग्वेद'मध्येही तो आहे. पती हा देव व स्त्री त्याची भक्त हा दास्य दृष्टिकोन होय. तो काळाच्या ओघात बदलत गेलेला दिसतो.

ब्रिटिश राजवटीत लॉर्ड बेंटिंगने ही चाल बंद करणारा कायदा केला. राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या समाजसुधारकांनी त्यासाठी जागृती घडवून आणली. वरील घटनेचा धिक्कार करत तर्कतीर्थांनी मुलाखतीच्या शेवटी हे स्पष्ट केले आहे की, ''सतीच्या चालीचा भयानक दुरुपयोग होत गेला आहे, याबद्दल कोणताही शहाणा, समंजस मनुष्य अथवा सज्जन मनुष्य वाद करणार नाही.''

या मुलाखतीतून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अनिष्ट रूढी, परंपराविरोधी दृष्टिकोन स्पष्ट होतो. तो त्यांना पुरोगामी विचारवंत सिद्ध करतो. तर्कतीर्थांची धर्म, संस्कृतीसंबंधी धारणा शब्दप्रामाण्याऐवजी नेहमीच बुद्धिप्रामाण्याचे समर्थन करणारी राहिली आहे. त्या धारणेस मानवतावादाचा स्पर्श नेहमीच राहिला आहे.

**४३) धर्मांतरे थांबविण्यासाठी चार शंकराचार्य एकत्र येणे अभिनंदनीय, पण आता विलंब झाला आहे. (५ सप्टेंबर, १९८१)**

जात, धर्मभेद वास्तवावर भाष्य करणारी ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची द. न. पटवर्धन यांनी घेतलेली व दैनिक 'तरुण भारत', पुणेच्या दि. ५ सप्टेंबर, १९८१ च्या अंकात प्रसिध्द झालेली मुलाखत अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या मुलाखतीची एक तत्कालीन पार्श्वभूमी आहे. ती अशी की, चार पीठांचे (जगन्नाथपुरी, ओरिसा), शारदामठ (गुजरात), ज्योतिर्मठ (उत्तराखंड), शंकराचार्य हरिजन कल्याणाचा कार्यक्रम आखण्यासाठी एकत्र येणार असल्याचे वृत्त प्रसिध्द झाले होते. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करणारी ही मुलाखत आहे.

तर्कतीर्थांचे म्हणणे असे की, धर्मांतरे थांबविण्यासाठी चारही शक्तिपीठांचे शंकराचार्य एकत्र येणार आहेत, पण ही अभिनंदनीय बाब असली तरी ही विलंब झालेली वा विलंबाने केलेली कृती होय. कारण असे की, महात्मा गांधींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी राखीव मतदार संघविषयक मतभेद झाल्यावर आमरण उपोषण सुरू केले होते. त्यात तडजोडीने २४ सप्टेंबर, १९३२ रोजी उभयतांमध्ये सामंजस्य करार झाला. तो 'पुणे करार' म्हणून ओळखला जातो. या प्रकरणानंतर महात्मा गांधी अस्पृश्यता निर्मूलनप्रश्नी अंतर्मुख होऊन गंभीर झाले व त्यांनी यासाठी सनातनी व पुरोगामी अशा दोन्ही धर्मपंडितांशी येरवडा कारागृहात ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर, १९३२ मध्ये दीर्घकाळ विचारविनिमय केला. तेव्हा तत्कालीन शंकराचार्यांनी महात्मा गांधींना सहकार्य केले नाही. त्यावेळी नारायणशास्त्री जोशी, डॉ. भगवानदास, आनंदशंकर ध्रुव, इंदिरारामण शास्त्री, डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी, पी. एच. पुरंदरेप्रभृती पुरोगामी पंडितांनी महात्मा गांधींच्या प्रयत्नास सकारात्मक साथ देत एक निवेदन जनहितार्थ तयार केले होते. ते महात्मा गांधींनी सुरू केलेल्या 'हरिजन' या इंग्रजी साप्ताहिकाच्या शनिवार, दि. ११ फेब्रुवारी, १९३३च्या पहिल्या अंकात पृष्ठ ६ वर प्रसिध्द झाले होते. त्यात अस्पृश्यता निर्मूलनाचे समर्थन व स्पष्टीकरण आहे.

त्याचबरोबर सुरटी सोमनाथ (गुजरात) मंदिराच्या जीर्णोध्दारानंतर त्याच्या प्राणप्रतिष्ठा कार्यात सहभागी होण्यास तत्कालीन द्वारकापीठ शंकराचार्यांनी विरोध केला. सन १९३२ व १९५१च्या या कृतीनंतर आज सकारात्मक विचार ही विलंबित गोष्ट होय. तेव्हाच सकारात्मक स्वीकार होता तर आजचे चित्र वेगळे होते.

शंकराचार्य धार्मिक नेते, तसेच समाजशिक्षक होत. धर्मांतराच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत असे लक्षात येते की, हजार-बाराशे वर्षांपूर्वी उत्तर प्रदेश, सिंध, काश्मीरमध्ये इस्लामी शासकांनी तलवारीच्या जोरावर मूळ हिंदूंची धर्मांतरे केली. तेव्हा हिंदू शक्तिपीठाच्या शंकराचार्यांनी कंबर कसली असती, तर धर्मांतराचा प्रश्न आज उग्र न होता ५०० वर्षांपूर्वी काश्मिरी धर्मांतरितांनी तत्कालीन ब्राह्मण नि धर्माचार्य यांच्याकडे मागणी केली तेव्हाही त्यांच्या धर्मांतरास (हिंदू होण्यास) विरोध करण्यात आला होता.

महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले इ. समाजसुधारकांनी आंदोलने केली; पण त्यास फारसे यश आले नाही. कारण, कायदा झाला तरी समाजातील सवर्णांची मानसिकता बदलली नाही. चातुर्वर्णीय व्यवस्था व जातिभेद यांवर आधारित हिंदू धर्म सोवळे-ओवळे मानतो. उच्चजातीय पुढारी आपल्या स्थानाला धक्का लागू नये अशी काळजी घेतात. ती ब्राह्मण जशी घेतात, तीच ती कर्नाटकात लिंगायतही घेताना दिसतात. यासंदर्भात ब्राह्मणांइतकेच सवर्ण उच्चजातीय जबाबदार आहेत. ब्राह्मणांच्या हाती अपवाद, तर सवर्णांच्या हाती सर्रास राज्यसत्ता होती नि आहे. स्वातंत्र्योत्तर काळात बहुजनांच्या हाती सत्ता असूनही अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी जे प्रयत्न व्हायला हवे होते, ते न झाल्याने जातीयता टिकून आहे. प्रा. आ. ह. साळुंखे म्हणतात की, मराठ्यांच्या हातची सत्ता गेली, ते चूक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तर महाराष्ट्राची सत्ता बहुजनांकडेच आहे; मराठ्यांकडेच आहे.

धर्म, जातसंबंधीचे प्रश्न कायद्याने नाही, तर रोजच्या व्यवहारात सर्व जाती-धर्माचे लोक प्रत्यक्षात काय व्यवहार करतात, यावर अवलंबून असतात. याकडे तर्कतीर्थांनी समाजधुरिणांचे लक्ष वेधले असून, ते विचार केवळ चिंतनाने नाही, तर कृतिशील वस्तुपाठ बनतील, तरच ते सुटतील; अन्यथा तो एक वदतोव्याघात ठरेल.

### ४४) समान संधी देणारी राज्यपध्दती प्रत्यक्ष अनुभवास यायला पाहिजे (१९८२)

'सांप्रदायिकता' या विषयावर आधारित ही मुलाखत 'अजिंठा' नियतकालिकाच्या (बहुधा दैनिक, औरंगाबाद) दिवाळी, १९८२ च्या अंकात प्रसिध्द झाली होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या मुलाखतीमध्ये सांप्रदायिकतेची प्रारंभीच व्याख्या करीत स्पष्ट केले आहे की, 'आपापल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरांना सर्वश्रेष्ठ मानण्याचा आग्रह म्हणजे सांप्रदायिकता होय.' या आग्रहापुढे राष्ट्रीय एकात्मता दुबळी होते. सांप्रदायिकता सर्व धर्मांमध्ये आढळते. सांप्रदायिक अहंकाराला आवर घातला तरच सांप्रदायिक सहजीवन

शक्य असते. खरे परधर्म सहिष्णुता हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्य होय. धर्मजीवनात येणारी ताठरता ही समाजजीवनास घातक असते. धार्मिक बंधुतेचे नाते निर्माण व्हायचे, तर व्यापक उदारता आवश्यक असते. धर्मबुध्दी व्यापक हवी. तोच खरा धर्म होय. आज त्याची अधिक गरज आहे.

धर्मांमध्ये प्रेषित, अवतार, चमत्कार यांचे महत्त्व असते. हिंदू धर्मात अवतार, चमत्कार, कल्पनांचे प्राबल्य आहे, तर ख्रिश्चन, इस्लाम धर्मात प्रेषित, चमत्कार इत्यादींचे. खरे पाहता प्रेषितांची दिव्य शक्ती, अवतार, कल्पना, चमत्कार इत्यादी गोष्टी अंधश्रध्देवर आधारित आहेत. प्रत्यक्ष प्रमाण या वैज्ञानिक निकषांवर त्या उतरत नाहीत. एकच एक धर्म श्रेष्ठ मानण्याची धर्मांधता धारण करणारे माथेफिरू सर्वच धर्मांमध्ये दिसून येतात. त्यामुळे जग नाशाकडे जात आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या मुलाखतीत सांप्रदायिक भावनेची चिकित्सा करीत स्पष्ट केले आहे की, ही भावना संकीर्णतेचे द्योतक आहे. कोणताही खरा धर्म हितकारी, व्यापक, उदार, निर्वैर असतो. तेच धर्माचे खरे पवित्र रूप होय. तेच मानवकल्याणी असते. परंतु, कालप्रवाहात विविध अहंता, संकीर्णता समाजात वाढीस लागून वैरभाव निर्माण होत असतो. त्याला छेद द्यायचा, तर व्यापक उदारता स्वीकारणे सर्वांच्या हिताचे ठरते. तसा प्रयत्नच समाजात एकात्मता, बंधुता आणि सहिष्णुता निर्माण करू शकतो. तसे प्रयत्नही आजच्या राज्यपध्दतीत समान संधी देऊन व्हायला हवा.

**४५) मानवी जीवनात तत्त्वज्ञानाइतकेच तंत्रज्ञानास महत्त्व (३ फेब्रुवारी, १९८५)**

आकाशवाणी, औरंगाबाद केंद्रासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत मराठीतील ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. सुधीर रसाळ यांनी ३ फेब्रुवारी, १९८५ रोजी घेतली नि लगेचच ती प्रक्षेपित करण्यात आली. सुमारे अर्धा तासाच्या या मुलाखतीत डॉ. रसाळ यांनी तर्कतीर्थांची घडण, वैचारिक परिवर्तने जाणून घेऊन त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन समजून घेण्याचा नि उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला होता.

डॉ. रसाळ यांनी विचारलेल्या स्पष्ट स्वरूपांच्या प्रश्नांना सामोरे जात या संवादात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले की, त्यांची घरची गरिबी होती. त्यामुळे त्यांना वाईच्या प्राज्ञपाठशाळेत शिकावे लागले. तिथं त्यांचा क्रांतिकारी विद्यार्थी सहकाऱ्यांशी परिचय झाला व ते क्रांतिकार्यात सक्रिय झाले. इथलं वातावरण आधुनिक नसलं तरी वेगळं होतं. त्याचा परिणाम तर्कतीर्थांच्या घडणीवर झाला. मी विनोबा भावे यांच्याकडून इंग्रजी शिकलो, त्यामुळे पश्चिमी विद्येशी माझा परिचय झाला. विनोबा इथे अपनिषद भाष्य शिकले. ते महात्मा गांधींना आपली प्रगती कळवीत असत की, 'ऐ गोरख तुमने मच्छिंद्र को जित लिया.' प्राज्ञपाठशाळेत वादशाळा भरत असे. त्या वाद-विवादातून कठीण कल्पना स्पष्ट होऊन ज्ञानात भर पडत असे. तर्कतीर्थांनी या मुलाखतीत खुलासा केला आहे की, त्यांना सशस्त्र क्रांतीचे आकर्षण असले, तरी ते शस्त्र चालविण्यास निपूण नव्हते. त्यांची शरीरस्थिती त्यास योग्य नव्हती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैचारिक प्रवासात सनातन पंडित, धर्मसुधारक, क्रांतिकारी, मार्क्सवादी, रॉयवादी, काँग्रेसी अशी वैचारिक परिवर्तने झाली. या परिवर्तनातून त्यांना ऐतिहासिक दृष्टीचा लाभ झाला. ते धर्मानुरागी ते धर्मातीत (Seculer) झाले. नंतर त्यांनी नव्या दृष्टीने धर्माची मांडणी केली. (हिंदुधर्माची समीक्षा). जगातील दर्शने विविध असली, तरी त्यांची विश्वदृष्टी एकच असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे परंपरावाद्यांनी आपली दृष्टी बदलली पाहिजे, या मताबद्दल त्यांची खात्री झाली. सन १९२७ ते १९३० या काळात धर्मसुधारणांना जो प्रखर विरोध होता, तो कालौघात शिथिल झाल्याचेही तर्कतीर्थांनी या मुलाखतीत नमूद केले आहे. त्याचे सविस्तर नि सोदाहरण स्पष्टीकरणही तर्कतीर्थांनी यात केले आहे.

अस्पृश्यता निवारण चळवळीसंबंधीच्या महात्मा गांधींच्या प्रयत्नात तर्कतीर्थांचा सक्रिय सहभाग होता. हिंदू धर्मातील सनातन धर्मपंडितांचा विरोध हा मतलबी होता. मूलत: हिंदू धर्मात स्वातंत्र्य आहे, याकडे तर्कतीर्थांनी येथे लक्ष वेधले आहे. हिंदू धर्माचा मूलाधार भारतीय संस्कृती होती, हे विसरून चालणार नाही, हेही तर्कतीर्थ सांगायला विसरत नाहीत. 'सर्व भूते हित रत' हीच धर्माची मूळ भूमिका असल्याचे त्यांनी इथे नि:संदिग्धपणे विशद केले आहे. हा विचार भारतीय संस्कृतीने जगाला दिलेले योगदान असल्याचे स्पष्ट करीत तर्कतीर्थांनी समजाविले आहे की, लोकशाही संकल्पना जगात विविध रूपात आहे. भारत, इंग्लंड, अमेरिका येथील लोकशाही भिन्न आहे. भारतीय लोकशाहीतील विचारस्वातंत्र्य आणि नैतिक समानता या दोन गोष्टी मूळ भारतीय संस्कृतीचे आधुनिक लोकशाहीस लाभलेले वरदान आहे.

आज विज्ञानप्रणित जी क्रांती दिसते, त्यातील तंत्रज्ञान पूर्वीच्या तत्त्वज्ञानाइतकेच महत्त्वाचे आहे. जुन्या धर्म नि तत्त्वज्ञानात जे कालबाधीत असते, ते बदलते नि बदललेच पाहिजे. सर्व धर्म आणि समाजांत असे कालबाधीत असते. ते टाकून देतच समाज पुढे जात असतो. अध्यात्म आणि इहवाद दोन विभिन्न जीवनपध्दती व दृष्टिकोन आहेत. दोघांचे महत्त्व आहे. केवळ एक एकांगी ठरेल. समन्वय लाभकारी होईल. वर्तमान काळ इहवादाचा असल्याने त्यास तंत्राच्या बरोबरीने चैतन्यतत्त्वाची जोड दिली तरच जग सुखी होईल.

या मुलाखतीतून तर्कतीर्थ आपल्या जीवनाचा उत्तरार्धात समन्वयवादी विचारक झाल्याचे स्पष्ट होते. ही मुलाखत त्याचा पुरावा होय.

### ४६) बुध्दिप्रामाण्यवाद : एक कठीण वसा (१ फेब्रुवारी, १९८७)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी २७ जानेवारी, १९८७ रोजी ८७ व्या वर्षात पदार्पण केले. त्यादरम्यान महाबळेश्वर येथे प्रकाशन परिषद संपन्न झाली होती. दैनिक 'लोकसत्ता'चे तत्कालीन संपादक माधव गडकरी या परिषदेचे प्रमुख पाहुणे होते. महाबळेश्वरची परिषद आटोपून परतीच्या प्रवासात त्यांनी वाईस थांबून तर्कतीर्थांशी संवाद साधला. मुलाखतीचा विषय होता 'बुध्दिवाद'. भारतासारख्या देव, दैव, नशिब इ. गोष्टींवर विश्वास ठेवणाऱ्या देशातील बहुसंख्याक समाजाचे

प्रबोधन करून त्यास इहवादी बनविण्याच्या उद्देशाने घेतलेली ही मुलाखत त्यावेळी चर्चेचा विषय बनली असल्यास नवल नाही. नंतर मुलाखतींवर आधारित पत्रव्यवहार दीर्घकाळ होत राहिला.

या मुलाखतीत माधव गडकरी यांनी तर्कतीर्थांना प्रथमच थेट प्रश्न विचारून विषयाची कोंडी फोडली. देव मानता का, या प्रश्नाचे 'नाही' असे नि:संदिग्ध उत्तर देऊन तर्कतीर्थांनी आपण प्रखर बुध्दिवादी असल्याचे स्पष्ट केले. इतकेच नव्हे तर आपण देऊळ, मंदिरात कधी भक्तीचा भाग म्हणून जात नाही. गेलोच तर मंदिर, मूर्तींची शिल्पकला अभ्यासायला जातो, हे स्पष्ट केले. इतकेच नव्हे तर दैव, नशीब इ. गोष्टींवर आपला विश्वास नाही, हेही ते स्पष्ट करतात. पत्नीचे निधन, मुलांचे शिक्षण इ. गोष्टीमागे नशीब, प्रारब्ध इत्यादी गोष्टी नसून वैज्ञानिक, भौतिक बाबी कारणीभूत होत्या. हे तर्कतीर्थ या मुलाखतीत स्पष्ट करताना दिसतात.

विज्ञान, प्रयोगादी निकषांवर जे 'सत्य' म्हणून उतरत नाही, ते आपण स्वीकारत नसल्याचे त्यांनी नि:संशय मान्य केले आहे. ईश्वर असता तर माणूस संकटग्रस्त, विषम कसा राहिला असता, असा प्रतिप्रश्न ते करतात. बुद्धीला अगम्य असे काही आहे का? योगायोग, नियती या गोष्टीपण तर्कतीर्थ निखालसपणे अमान्य करतात. त्यांचे खंडन करतात. विज्ञान, शास्त्रादी कसोटीवर जे सिध्द होत नाही, त्यावर विश्वास ठेवू नये असेही समजावतात. आपण पंचांग, मुहूर्त मानत नसल्याचेही त्यांनी या मुलाखतीत सांगितले आहे. याबाबतच्या लोकधारणांवर प्रकाश टाकत ते सांगतात की, रोगावर औषध असते तसे संकटात आधार म्हणून लोक श्रध्देने, अंधश्रध्देने देव, नशीब, कृपा, नवस इ. बाबी करतात. मानवी आचार, व्यवहार इ.चे तर्कतीर्थांचे विवेचन तर्क व बुध्दीवर आधारलेले असते. हे सदर मुलाखत वाचताना लक्षात येते.

मुलाखतीच्या दुसऱ्या भागात नैतिक सदाचरण हा सुखाचा नि आनंद प्राप्तीचा मार्ग सांगितला गेला आहे. माणसाच्या नैतिक जीवनाला दोन आधार असतात. १) गरज आणि २) सत्याचे मूल्य. करुणा, कर्तव्य इ. मूल्यांचे मानवी जीवनात असाधारण महत्त्व असते, त्यापोटी काही गोष्टी जीवनात होत राहतात नि कराव्याही लागतात. (संगोपन, पुनर्वसन इ.) अशाप्रसंगी हतबलता येते. तेथेही श्रध्दाशरण न होता माणसाने कार्यकारण मीमांसा तत्त्वाचा अवलंब करीत बुध्दिवादी राहिले पाहिजे. परलोक भयापेक्षा इहलोक सामर्थ्य, विश्वास आपले जीवन अधिक सुसह्य करतो, असे तर्कतीर्थांनी येथे सोदाहरण स्पष्ट केले आहे. त्यासाठी शिक्षण हे वरदायी तत्त्व असल्याचे तर्कतीर्थ स्वीकारतात. माता ही पहिली शिक्षिका असल्याचे तर्कतीर्थांनी या मुलाखतीत म्हटले आहे. जग संकटमुक्त करायचे असेल, तर समाज विज्ञाननिष्ठ, बुध्दिवादी झाला पाहिजे असे ते बजावतात.

भारतात राज्यकर्ते मतपेटीच्या मोहापोटी राज्यघटनेतील धर्मातीतता (Seculer) तत्त्वास तिलांजली देत असल्याचे स्पष्ट करत तर्कतीर्थांनी या मुलाखतीत सांगितले आहे की, धर्माचरण ही व्यक्तिगत नि खासगी गोष्ट होय. त्याचे प्रकटीकरण सार्वजनिक ठिकाणी व लोकप्रतिनिधी

आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात करता कामा नये, हेहे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले आहे. कर्मकांडमुक्ती हा त्यावरचा रामबाण उपाय असल्याचे तर्कतीर्थ सांगतात. व्यापार, शिक्षण आणि सांस्कृतिक जीवन या तीन क्षेत्रांत इहवादी विचारसरणीची अंमलबजावणी आवश्यकच नसून अनिवार्य असल्याचे त्यांनी मुलाखतीत म्हटले आहे. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्माला इहवादाची जोड दिली, त्यांनाच देव बनविणे हा बुध्दिवादाचा पराभव होय, हे ते सांगायला विसरत नाहीत. सदर मुलाखत स्पष्टोक्तीचे ठळक उदाहरण होय.

**४७) तत्त्वज्ञानातून आता मी बाहेर पडलो आहे (१९८३ दिवाळी)**

'बुध्दिवंतांचे भीष्माचार्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एक मुलाखत 'अक्षरदीप' मासिकाच्या दिवाळी अंकासाठी सर्वश्री डॉ. प्रदीप गोखले, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. सदानंद मोरे यांनी घेतली होती. ती धर्माची तात्त्विक चिकित्सा करते व त्याद्वारे वर्तमान वास्तवावर भाष्यही करते. ही मुलाखत तात्त्विक असली तरी व्यवहारशुध्दीकडे नेणारी म्हणून महत्त्वाची ठरते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १९२८ मध्ये 'आनंदमीमांसा' प्रबंध लिहिला. हा ग्रंथ एका अर्थाने दु:खवादाने भरलेल्या भारतीय दर्शनांना पर्याय देतो व अप्रत्यक्षपणे दु:खवादाची टीका करतो, असे त्याचे स्वरूप आहे. (याबाबत सदर प्रकल्पातील खंड क्र. ११ (संस्कृत व मराठी प्रबंधसंग्रह)मध्ये विस्तृत चर्चा आहे. ती जिज्ञासूंनी पहावी. भारतीय दर्शने मूलत: धर्म, अर्थ, काम या तीन पुरुषार्थांचीच चर्चा करतात. चौथा पुरुषार्थ मोक्ष हा यज्ञसंस्था नि कर्मकांड निर्मितीनंतर निर्माण झाला. धर्म, अर्थ, काम यात अध्यात्म नाही. ते पुरुषार्थ इहवादी आहेत. मोक्ष केवळ अध्यात्मवादी पुरुषार्थ होय, त्यामुळे मूळ भारतीय दर्शने इहवादी तसा 'आनंदमीमांसा' विचारही इहवादी. तर्कतीर्थ स्पष्टत: त्या विचाराचे समर्थक होते.

हा आनंद आणि शंकराचार्य वर्णित ब्रह्मानंद यात फरक आहे का? हे जाणून घेणाऱ्या प्रयत्नात सदर मुलाखतीत स्पष्ट होतं की, अंतर-बाह्य संबंधात (आत्मा-परमात्मा, जीव-सृष्टी, ईश्वर-भक्त, जड-चेतन इ. बाह्य) ग्राह्य ठरते. त्या अर्थाने तर्कतीर्थ बुध्द, चार्वाक विचार प्रमाण मानतात व शंकराचार्यांचा मायावाद, अद्वैत रूप (ईश्वर) नाकारतात. शंकराचार्य आपले मत अंतास नेत नाहीत, असे एक निरीक्षण तर्कतीर्थ या मुलाखतीस नोंदवितात, ते महत्त्वाचे आहे.

बौध्द धर्म भारतात राहिला नाही (अस्तित्व) याची चिकित्सा करीत तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, सर्वसामान्यांसाठी आवश्यक धार्मिक कर्मकांडाचे पौरोहित्य बौध्दांनी न केल्याने तो धर्म इथे टिकला नाही. परदेशात मात्र त्या धर्माचे रूप वेगळे झाले. जैन धर्मासंदर्भात त्यांनी स्पष्ट केले की, जैन धर्माचे कर्मकांड, पूजाविधी हिंदू ब्राह्मण करीत असत. शंकराचार्यांचे गुरू गौडपाद यांच्यावर बौध्द धर्माचा प्रभाव होता. त्यामुळे शंकराचार्यांना 'प्रछन्न (सुप्त) बौध्द' मानले जाते, ते आंशिक संमतीमुळेच. या मुलाखतीत हे स्पष्ट केले गेले आहे की, तर्कतीर्थांची भूमिका नागार्जुनसदृश राहिली आहे. याचा अर्थ असा की, प्रत्येक वादविवाद, चर्चेत ते वेगवेगळ्या भूमिकांतील त्रुटी

अधोरेखित करत जातात. कुठलीच भूमिका अंतिमत: टिकत नाही, हे दाखविणं हा त्यांच्या भूमिकेतला महत्त्वाचा भाग असतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे ते असे म्हणतात की, मी तत्त्वज्ञानातून बाहेर पडलो आहे. एकच एक तत्त्वज्ञानाचे ते समर्थक राहिलेले नाहीत.

या मुलाखतीत तर्कतीर्थ एका प्रश्नाच्या उत्तरात भारतीय व पाश्चात्य तर्कशास्त्रातील अंतर समजावून सांगतात. भारतीय मिथक प्रणालीचा त्यांनी इथे केलेला ऊहापोह म्हणजे त्यांच्या प्राचीन वाङ्मय व्यासंगाचा पुरावा होय. मिथक नि देवकल्पना भारतीय दर्शनात वेगळ्या करता येत नाहीत. त्यातील अद्वैत भाव तर्कतीर्थ इथे लक्षात आणून देतात. (Ritual and Myth go together) तर्कतीर्थांच्या पिढीवर लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य'चा प्रभाव राहिला आहे. तो तर्कतीर्थांवरही दिसतो. त्याअर्थाने तर्कतीर्थ कर्मयोग मानणारे होते, हे स्पष्ट होते. 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४२) मध्ये ते मार्क्सवादी पध्दतीने धर्माची चिकित्सा करीत भौतिकवादी धर्म स्वरूप स्पष्ट करतात. त्यातूनही हे स्पष्ट व्हायला वेळ लागत नाही की, तर्कतीर्थ अंतिमत: धर्मनिरपेक्ष (Seculer) गृहस्थ होते. बुध्दिप्रामाण्यवाद हा त्यांचा जगण्या-वागण्याचा पाया नि आधार होता. म्हणूनही ते भौतिकवादी, आनंदवादी, धर्मनिरपेक्ष इहवादी होते, हे सिध्द होते. धर्म नि राष्ट्र दोन स्वतंत्र गोष्टी ते मानत. धर्मास राष्ट्रवादाचे साधन बनवायच्या मूलतत्त्ववादी वृत्तीचे ते स्पष्ट विरोधक होते, हेही या मुलाखतीतून स्पष्ट होते. सदर मुलाखत मुळातून वाचणे म्हणजे तर्कतीर्थ समजून घेणे होय. तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, विज्ञान, धर्म, अध्यात्म इत्यादी संकल्पना नि:संशय स्पष्ट करणारे विचार यात आहेत.

**४८) बंधनात टाकणाऱ्या श्रद्धांची चिकित्सा व्हावी (१९८९)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना साहित्य अकादमीने सन १९८९ मध्ये 'महदत्तर सदस्यत्व' (Fellowship) देऊन गौरविले. त्याबद्दलची प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या दृष्टीने 'दै. केसरी' पुणेचे वाई प्रतिनिधी अनिल जोशी यांनी घेतलेली ही मुलाखत त्या दैनिकाच्या २६ फेब्रुवारी १९८९ च्या अंकात प्रकाशित झालेली आहे. विचारांची चिकित्सा ही प्रगल्भ संस्कृती आणि सभ्यतेचे लक्षण होय. त्या संदर्भातील तर्कतीर्थांचा दृष्टिकोन जाणून घेण्याच्या दृष्टीने या मुलाखतीचे महत्त्व आहे.

या मुलाखतीच्या पार्श्वभूमीचे दोन संदर्भ आहेत. एक वर सांगितल्याप्रमाणे साहित्य अकादमी गौरव. दुसरा संदर्भ बुकर पुरस्कार विजेते कादंबरीकार सलमान रश्दी यांच्या 'सटॅनिक व्हर्सेस'मधील टीकेच्या संदर्भात मुस्लीम धर्मगुरूंनी रश्दींच्या विरोधात काढलेला फतवा. सदर मुलाखतीच्या प्रारंभीच तर्कतीर्थांचे वक्तव्य आहे, "जे विचार श्रद्धा बनतात आणि वैचारिक प्रगतीला बंधन घालू लागतात, त्यांची चिकित्सा करत राहिले पाहिजे, असा माझा दृष्टिकोन आहे. म्हणून मी हिंदू धर्माच्या श्रद्धा जशा तपासल्या, तशा अद्ययावत श्रद्धापण तपासत असतो. आजचा सगळ्यात प्रगत मानला गेलेला विचार म्हणजे मार्क्सवाद, याचीपण मी मीमांसा केली आहे." पुढे ते म्हणतात की, "मी मीमांसक आहे. वैचारिक साहित्य लिहिणारा आहे. मी हिंदू

धर्माची चिकित्सा केलेली आहे. सामाजिक जीवनाला अनुकूल अशा हिंदू धर्मातील प्रवृत्ती कोणत्या आणि मागासलेपण दर्शित करणाऱ्या कोणत्या याची मी मुख्यतः मीमांसा केली आहे.''

भारतीय वैचारिक परंपरा ही श्रद्धाळू आणि चिकित्सक यांच्या संवादाची राहिली आहे. तर्कतीर्थांना या पार्श्वभूमीवर 'सटॅनिक व्हर्सेस'मधील कुराणाच्या टीकेवर सलमान रश्दी यांच्याविरुद्ध मुस्लिम धर्मगुरू आयातुल्ला खोमेनी यांचा फतवा गैर वाटतो, ते स्वाभाविकच म्हणायला हवे. वेदांवर चार्वाकांनी टीका केली आहे. त्याचा प्रतिवाद शंकराचार्यांनी केला आहे. शाब्दिक आक्षेपांना शाब्दिक उत्तर ही हिंदू विचारपरंपरा आहे. वादविवाद, खंडनमंडन आपण स्वागतार्ह मानत आलो आहोत. याची भलामण, प्रशंसा मॅक्सवेबर, टॉयमबीसारख्या विश्व इतिहासकारांनी केल्याकडे तर्कतीर्थांनी या मुलाखतीत लक्ष वेधले आहे. अशी बंधनात टाकणाऱ्या श्रद्धांची व विचारांची चिकित्सा होत राहिली पाहिजे. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' विचार या परंपरेतून जन्माला आला आहे.

**४९) तर्कतीर्थ : कृतिप्रवण विचारांची आगळीवेगळी खाण (२६ फेब्रुवारी, १९८९)**

साहित्य अकादमी, दिल्लीने सन १९८९ मध्ये ज्या अनेकभाषी साहित्यिकांना 'साहित्य अकादमी महदत्तर सदस्यत्व' (फेलोशिप) बहाल केलं, त्यात मराठी विचारवंत, संपादक, साहित्यिक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा समावेश होता. हे आचित्य साधून दैनिक 'सकाळ' कोल्हापूरचे तत्कालीन संपादक अनंत दीक्षित यांनी तर्कतीर्थांना विविध प्रश्न करीत संवाद साधला. या मुलाखतीतून देशापुढील नैतिकता, अंधश्रध्दा, धर्मविषयक भूमिका, अर्थकारण, राजकारण, समाजकारणविषयक प्रश्न विचारून मते जाणून घेतली. त्या मतांचा सारांश असा सांगता येईल.

आपल्या देशाचे प्रश्न सामुदायिकपणे तपासण्याची गरज आहे. इथल्या नागरिकांना स्वावलंबन व आत्मविश्वास वाढेल असे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळाले पाहिजे, जेणेकरून पारंपरिक बंधनातून समाज मुक्त होईल. शिक्षण पध्दतीचा पाया विवेकनिष्ठ असायला हवा. आधुनिकता नि धर्म, जात, मुक्ती निरंतर विवेकानेच शक्य आहे. धर्मातील उच्च-नीचता खोटी असते. आपल्याकडे स्त्रिया अधिक अंधश्रध्द नको. बुध्दिप्रामाण्यवादीपण श्रध्दाळू असतात; पण त्यांची श्रध्दा विवेकाधारित असते. भारतीय लोकशाहीचे प्रश्न अनेक आहेत. इथली संस्कृती सदोष आहे. ती श्रमाधारित नाही. भ्रष्टाचार, गुन्हेगारीचे आपले प्रश्न राजकारणाशी निगडित आहेत. आपले समाजजीवन उदात्त ध्येयाशी निगडित नाही.

मराठी साहित्य बंगालीच्या तुलनेने चळवळ दुर्बल आहे. आपल्याकडे वैचारिक साहित्याची वानवा आहे. महात्मा फुले यांच्याबद्दलची अनुदारता अक्षम्य आहे; पण अशा लेखनाकडे दुर्लक्ष करणेच योग्य. तीच गोष्ट सलमान रश्दींच्या लेखनाची आहे. वेदात दोष असतील म्हणून ते नाकारणे अयोग्य. महाराष्ट्रात आज नवे वारे वाहत आहे. त्याचे स्वागत केले पाहिजे. मानवाला आज जे जीवन लाभले आहे, त्यापेक्षा श्रेष्ठ दर्जाचे जीवन लाभावे असे प्रयत्न होणे आवश्यक

आहे. मुलाखतीतील हे विचार तर्कतीर्थांच्या आगळ्यावेगळ्या विचारपठडीचे द्योतक आहे. ते कृतिप्रवण होतील, तर नवा भारत घडण्यास वेळ लागणार नाही.

**५०) हिंदुत्वाचे राजकारण होऊ देऊ नये (२६ जानेवारी, १९९०)**

दि. २७ जानेवारी, १९९० रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी नव्वदीत पदार्पण करणार होते. त्याच्या पूर्वसंध्येस त्यांनी पत्रकारांशी संवाद साधून वर्तमान स्थितीवर भाष्य केले. त्याचा घोषवारा खालीलप्रमाणे-

हिंदुत्व ही धार्मिक नसून सांस्कृतिक संकल्पना आहे. खरं पाहिलं तर हिंदू हा शब्द प्राचीन साहित्यात आढळत नाही. श्रृती, स्मृती, पुराण, वेद, महाभारत इ. साहित्यात हा शब्द नाही. आपण भारतीय आहोत. घटनाकारांनी देशासाठी 'भारत' या शब्दाची निवड केली. त्याला प्राचीन आधार आहे. जगात अनेक धर्मांत विग्रह, हिंसा दिसून येते; पण हे तुम्हास हिंदू धर्मात दिसणार नाही. हिंदू धर्मास एकच एक देव वा धर्मग्रंथ नाही. हा धर्मसमुदाय आहे. सिंधू नदी वा संस्कृतीवर आधारित हे परकियांनी दिलेले अपभ्रंश रूप ('स' चा 'ह') होय. विश्वबंधुत्व याचे मुख्य तत्त्व आहे. 'एकं सद्विप्रात बहुधा वदंती' सूत्रानुसार हे एकाच सत् तत्त्वाचे अनेकविध रूप होय. या धर्मात भांडण असायचे कारण नाही. हिंदुत्वाचे राजकारण होऊ नये. तो राजकीय अदूरदर्शीपणा ठरेल.

आज जग नव्या व्यापक नैतिकतेकडे कूच करीत आहे. जग एकदम पालटले आहे. ते संघर्ष सोडून सहकार्य करीत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, दळणवळणाची साधने यांमुळे जग एकत्र आले आहे. 'मॅन लिव्हज इन ग्लोबल व्हिलेज'. माणूस एकमेकाजवळ आला आहे. या पार्श्वभूमीवर धर्माचे जग अगदीच लहान झाले आहे.

आपल्या या संवादात तर्कतीर्थांनी आपल्या पूर्वायुष्याचा धांडोळा घेत स्पष्ट केली की, आता नवे जग साहित्य, संस्कृती, भाषा, विज्ञान इ.द्वारे प्रगल्भ होत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ काळाची पावले ओळखून कार्य करीत आहे. मराठी विश्वकोश त्यातील स्वप्न प्रकल्प होय. त्याचे १७ खंड कल्पिले आहेत. हा एक यशस्वी प्रयोग होय. सदर मुलाखत म्हणजे शेवटच्या उंबारठ्यावरील सिंहावलोकन होय.

**५१) धर्मविरोध आणि राजकीय फारकत (१९९३)**

सन १९९२ मध्ये बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्याच्या घटनेचे भारतीय सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर मोठे गंभीर परिणाम घडून आले. त्यामुळे हिंदू-मुस्लीम एकतेची जी भावना स्वातंत्र्यानंतरच्या काँग्रेसी राजवटीत दृढमूल होत होती, तिला मोठा धक्का बसला. त्यामुळे भारतीय जनता पक्ष, ज्याचे विचारच मुळी एका विशिष्ट धर्माचे समर्थन करणे आहे, त्याचे डोके वर काढणे, राजकीय वर्चस्व वाढणे, धर्मनिरपेक्षतेच्या राज्यघटनेतील मूलभूत तत्त्वाला आव्हान देणारे ठरतात. परिणामी, देशाची पारंपरिक एकात्मता धोक्यात येण्याची शंका तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारख्या देशप्रेमी विचारवंतास वाटणे स्वाभाविकच म्हणायला हवे. या सर्व पार्श्वभूमीवर दैनिक 'केसरी'चे प्रतिनिधी अनिल जोशी यांनी तर्कतीर्थांची घेतलेली मुलाखत एक काँग्रेसप्रेमी वा समर्थक म्हणून विचारणीय ठरते. ती १० ऑक्टोबर १९९३ च्या 'केसरी' पुणेमध्ये प्रकाशित आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून ४५ वर्षे होत आली. या काळात केंद्र व बहुसंख्य राज्यांमध्ये अखिल भारतीय काँग्रेस वा तिचे नवे रूप धारण करणारा काँग्रेस पक्ष (इंदिरा) सत्तेत राहत आला. त्याच्या मताचा खंबीर पाया हिंदू-मुस्लिम एकता, धर्मनिरपेक्षता होता; पण बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्याने काँग्रेसचे भविष्य धूसर होत निघाले. परिणामी, सत्ता टिकवून धरण्यासाठी काँग्रेस जे नवनवे कायदे करू लागला, त्यामुळे देशात गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे, याबद्दल तर्कतीर्थ या मुलाखतीत चिंता व्यक्त करतात. निवडणूक सुधारणा कायद्याच्या निमित्ताने ही मुलाखत घडून आली होती, याची नोंद घ्यायला हवी. ज्याच्या योगे निवडणूक आयोग अस्तित्वात आला (७३ वी घटना दुरुस्ती, १९९२). भारतात धर्माच्या नावावर निवडणूक लढविता न येणे वा मत न मागता येणे यामागे भारताचे धर्मनिरपेक्षत्व सुरक्षित ठेवण्याची धडपड होती. तर्कतीर्थांचे म्हणणे होते की, धर्म व राजकारणाची फारकत धर्म विरोधाने करता येणार नाही. येथील विविधता सांभाळायला जुन्या तरतुदी पुरेशा आहेत. हिंदू धर्माचे स्वरूप अन्य ख्रिश्चन, मुस्लिम धर्मापेक्षा भिन्न आहेत. या धर्माला एकच एक संस्थापक नाही वा एकच एक धर्मग्रंथही नाही. या सर्व बाबींचा विचार करून काँग्रेसने सत्तेबाहेरच्या क्षेत्रात कार्य करण्याची गरज आहे. ही मुलाखत तर्कतीर्थांची राजकीय व राष्ट्रीय प्रगल्भता अधोरेखित करते.

**५२) भारतीय संस्कृतीतील उच्च दर्जाचे साहित्य तरुणांना उपयुक्त (१९९४)**

प्राज्ञपाठशाळा, वाईच्या अमृत महोत्सवी शुभारंभाच्या (दि. २५ जानेवारी १९९४) पार्श्वभूमीवर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनास ९३ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून 'सकाळ', पुणेचे तत्कालीन प्रतिनिधी बाबूराव शिंदे यांनी तर्कतीर्थांशी संपर्क साधून त्यांचे मनोगत, विचार जाणून घेण्याचा प्रयत्न या मुलाखतीतून केला आहे. त्यात तर्कतीर्थ प्राज्ञपाठशाळेचे योगदान व आपली घडण स्पष्ट करतात. ही मुलाखत दैनिक 'सकाळ', पुणेच्या दि. २५ जानेवारी १९९४ च्या अंकात प्रकाशित झाली होती.

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात वाई हे कृष्णा नदीच्या काठी वसलेले छोटे गाव वेदाध्ययनाचे केंद्र होते. त्यामुळेच तिथे प्राज्ञपाठशाळा सुरू झाली होती. तर्कतीर्थ तिथे सन १९१४ साली वेदाध्ययन करून पंडित होण्यासाठी म्हणून आलेले होते. त्या काळात वाई येथे पंडित भाऊशास्त्री लेले यांनी अनेक प्राचीन संस्कृत ग्रंथांची मराठी भाषांतरे केली होती. ती तर्कतीर्थांनी वाचली होती. पंडित भाऊशास्त्री लेले त्यावेळी वाईमधून 'धर्म' नावाचे मासिक चालवत. तर्कतीर्थ ते नियमित वाचत असत. तर्कतीर्थ आपले अध्ययन पूर्ण करून प्राज्ञपाठशाळेत अध्ययन करू लागले. त्यांचे गुरू व प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक नारायणशास्त्री मराठे (ब्र. भू. केवलानंद

सरस्वती) यांनी संन्यास ग्रहण केल्यानंतर तर्कतीर्थ प्राज्ञपाठशाळेचे व्यवस्थापन पाहू लागले. त्या शाळेस पुढे त्यांनी संपादन, प्रकाशन, कोशनिर्मिती, ग्रंथनिर्मिती, मासिकाचे प्रकाशन, चर्चासत्रे, प्रकाशन समारंभ, व्याख्यानमाला इत्यादींद्वारे तत्त्वज्ञानाचे प्रबोधन पीठ बनविले. भारतीय संस्कृतीचा इतिहास, हिंदू धर्मसंबंधी ग्रंथलेखन करून तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठशाळा महाराष्ट्राचे 'प्रज्ञापीठ' बनविले. वेदाध्ययनसारखी प्राच्यविद्या शाखा उपेक्षित होते आहे, याची खंत त्यांच्या मनात असली तरी नव्या तरुण पिढीस ते आवाहन करतात की, वेदाध्ययन कालौघात जीविकेचे साधन उरले नसले तरी जर नवी तरुण पिढी वैदिक वाङ्मयाचा अभ्यास करेल, तर ते नव्या ज्ञानविज्ञानाच्या शाखा विस्तारेल. कोणतेही ज्ञान कधीही कालबाह्य होत नसते असा विश्वास त्यांनी या मुलाखतीतून नव्या तरुण पिढीस दिला आहे. तर्कतीर्थ शेवटच्या श्वासापर्यंत 'मराठी विश्वकोश' आणि 'धर्मकोश' संपादनाचे कार्य करीत राहिले, यामागे त्यांचा हाच विचार होता.

**५३) चैतन्य हेच ईश्वराचे रूप (१९९४)**

'ऋतुरंग' मासिक आणि प्रकाशनाचे संस्थापक अरुण शेवते यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अहमदनगर येथे एका व्याख्यानमालेसाठी आलेले असताना घेतलेली मुलाखत. या मुलाखतीचे वैशिष्ट्य असे की थेट तर्कतीर्थ आस्तिक की नास्तिक की धर्मनिरपेक्ष याचा खुलासा करते. शिवाय ईश्वरासंबंधी तर्कतीर्थांच्या धारणांवर प्रकाश टाकते. ही मुलाखत 'ऋतुरंग' वार्षिकाच्या दिवाळी १९९४ च्या अंकात प्रकाशित झालेली आहे.

विश्वाचे चैतन्यमय अधिष्ठान म्हणजे ईश्वर होय. तो सच्चिदानंदस्वरूप आहे. श्वासाप्रमाणे मला ईश्वराचे अस्तित्व जाणवते. धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नसून ते मानवाचे सृजन होय. ईश्वर असताना जगात दुष्ट प्रवृत्ती, विचार, आचार आहेत, या पार्श्वभूमीवर ईश्वर अस्तित्वाची सुसंगती शोधणे मती कुंठित करणारे ठरते, हे खरे आहे, तरी संतांच्या काव्य, अभंगांतून त्याचे अस्तित्व सकारात्मक वाटत राहते. 'हे विश्वचि माझे घर' अशी व्यापक दृष्टी ईश्वरीय रूपच देते. त्यामुळे पूर्वी मी पूजाअर्चा इत्यादी कर्मकांड करायचो ते १९३० च्या तुरुंगवासात खंडित झाले. आता आहे, ती केवळ भक्ती. या भक्तिभावाचे अनेक रंग आहेत. तर्कतीर्थांनी या मुलाखतीदरम्यान हे स्पष्ट केले आहे की, ते आस्तिक आहेत. ते ईश्वर मानतात, ते केवळ चैतन्य रूपात. ते सामान्यांच्या आवाक्यापलीकडचे आहे; पण विज्ञानाने ते अस्तित्व निसर्गाच्या पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश रूपाने उमजते.

ही मुलाखत ईश्वर रूपाधारित आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मराठी विश्वकोश, खंड-२ मध्ये 'ईश्वरवाद : ईश्वराची भारतीय संकल्पना' शीर्षक नोंद लिहिली आहे. ती या प्रकल्पातील पहिल्या खंडात अंतर्भूत आहे. त्यात 'उपनिषद'मधील ईश्वर, महेश्वर, ब्रह्म, परब्रह्म, सत्, अक्षर, आत्मा, अंतर्यामी व परमात्मा इत्यादी संकल्पनांची चर्चा आहे. वरील सर्व शब्द

हे ईश्वराचे पर्यायवाची शब्द (Synonims) होत. या सर्व रूपाचे आकलन तर्कतीर्थांना आहे. त्यावरून अंतिमतः ते चैतन्यरूप तत्त्व म्हणजे ईश्वर या संकल्पनेवर येऊन स्थिर होतात, हे आपण यासंदर्भात लक्षात घेतले पाहिजे. आस्तिक आणि नास्तिक या दोन विचारांचे भान तर्कतीर्थांना जसे आहे, तसेच सर्व धर्मातील ईश्वर रूपांचा त्यांचा अभ्यास आहे. हे सर्व लक्षात घेऊन निष्कर्षाप्रत पोहोचलेली ही मुलाखत म्हणून अधिक महत्त्वाची ठरते.

**५४) भारतीय तत्त्वज्ञान आणि सर्वधर्मसमभाव**

भारतात निर्माण झालेले धर्म जगातील इतर धर्मांप्रमाणे विचार म्हणून वैश्विक मूल्ये सांगणारे असले तरी नंतरच्या काळात कर्मकांडातील विसंगतीमुळे ऱ्हास पावले नसले तरी प्रभाव हरवून बसले. असे असले तरी त्या धर्मातील तत्त्वज्ञान आणि सर्वधर्मसमभाव या वैचारिक अधिष्ठानात त्यांचे श्रेष्ठत्व सामावल्याचे विवेचन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे. दैनिक 'केसरी', पुणेसाठी घेतलेल्या एका मुलाखतीत हे विचार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'केसरी' प्रतिनिधी अनिल जोशींकडे व्यक्त केले.

आपल्या या मुलाखतीत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान व धर्म हे जगातील सर्वाधिक प्राचीन होत. पश्चिमी विचारक व संशोधक मॅक्सम्युलर यांनी हा काळ इसवी सन पूर्व १२०० ते १५०० असल्याचे मान्य केले आहे. जगात वेदांच्याद्वारे सर्वप्रथम सर्वधर्मसमभावाचा विचार मान्य करण्यात आला आहे. 'ऋग्वेद'मध्ये 'एकं सत्य विप्रा बहुधा वदंति' म्हटले आहे. त्याचा अर्थच मुळी असा आहे की, जगात सत्य एकच आहे (ईश्वर, धर्म इत्यादी आदर्श), विद्वान ते अनेक प्रकारे वर्णन करून सांगत असतात. हिंदू धर्मातील वामाचाराची प्रतिक्रिया (कर्मकांड) म्हणून जैन, बौद्ध धर्म निर्माण झाले. बौद्ध धर्माचा प्रचार, प्रसार जपान, चीन इत्यादी आशिया खंडातील देशांत झाला. तसा प्रचार, प्रसार भारताबाहेर जैन धर्माचा होऊ शकला नाही. कारण, कठोर व्रत-वैकल्यास जैन मुनी-प्रावकांनी त्यास बंदिस्त केले आहे.

आधुनिक काळात हिंदू धर्माचे सर्वधर्मसमभाव तत्त्वज्ञान सांगणारे, मान्य करणारे रामकृष्ण परमहंस, महात्मा गांधींसारखे श्रेष्ठ नेते होऊन गेले. त्यांनी आपल्या प्रार्थनांत सर्व धर्मांना स्थान दिले आहे. महात्मा गांधींचे राजकारण या अधिष्ठानावरच उभे होते; पण 'अलीकडे हिंदुत्ववादी हे हिंदुत्वाचे विश्वधर्मस्वरूप झाकाळून टाकत आहेत,' या विधानावरून ही मुलाखत बाबरी मशीद विद्ध्वंसन (१९९२) नंतरच्या काळातील असावी असे वाटते. या मुलाखतीतून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी हिंदू धर्माच्या मूळ तत्त्वज्ञान व विचाराकडे लक्ष वेधून त्याचे अनुकरण महत्त्वाचे असणे आवश्यक असल्याचे सूचित केले आहे.

## (इ) विविध दृष्टिकोनविषयक मुलाखती

यापूर्वी चर्चित मुलाखतींशिवाय राजकारण, समाजकारण, शिक्षण, भाषा, साहित्यविषयक मुलाखती आहेत. यातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा विविधविषयक व्यासंग आणि दृष्टिकोन लक्षात येतो.

❍ राजकारण

## ५५) लोकशाही शासनपद्धतीचा कायापालट होणे जरूरी (१९७६)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दि. २७ जानेवारी १९७६ रोजी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली. जीवनाचा अमृत महोत्सव साजरा करीत असतानाच्या पार्श्वभूमीवरचे हितगुज म्हणजे ही मुलाखत. ती प्रश्नोत्तर शैलीत प्रकाशित झालेली आहे. मुलाखतीचा काळ नोंदलेला नसला तरी ती जानेवारी १९७६ च्या दैनिक 'केसरी'च्या अंकात प्रकाशित झालेली असावी. अनिल जोशींनी ती घेतलेली आहे.

तर्कतीर्थांचा जन्म, बालपण, घडण पिंपळनेर (जि. धुळे) येथे झाली. घरी याज्ञिकी, वैदिकी, शास्त्री-पुराणिक, ज्योतिषीचा व्यवसाय. लोकमान्य टिळकांचा आजूबाजूस प्रभाव. कै. कृष्णराव करमरकर, कै. रामदासपंत वैद्य हे वडिलांचे स्नेही. तेही टिळकपंथी. वाड्यात तत्कालीन साप्ताहिक 'केसरी' जो मंगळवारी प्रकाशित व्हायचा; पण पिंपळनेरला पोहोचायला गुरुवार उजाडायचा. तर्कतीर्थांच्या घरच्या ओट्यावर दर गुरुवारी देशभक्त जमत आणि 'केसरी' वाचत. देशभक्तीवर चर्चा करीत. खुदीराम बोस, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या शौर्याचे पारायण व्हायचे. यातून बालपणापासूनच क्रांतीकडे तर्कतीर्थांची ओढ राहिली. प्राज्ञपाठशाळा, वाई येथे गेल्यावर तेथील क्रांतिकारी सहाध्यायींमुळे याला खतपाणी मिळाले. तरुणपणी स्वातंत्र्यचळवळीत संघटनात्मक सहभागामुळे क्रांतिकारी वृत्ती दृढमूल झाली. महात्मा गांधींची सर्वच आंदोलने, सत्याग्रहे काही अहिंसक नव्हती. 'भारत छोडो' आंदोलन हिंसकच होते. मानवेंद्र रॉय यांच्या विचार, प्रभावामुळे क्रांतिकारी विचार अधिक कृतिशील झाले; पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. स्वातंत्र्योत्तर काळ अहिंसक राहिला. आणीबाणीच्या काळात जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीच्या दिशेने आंदोलन केले, तेव्हा तर्कतीर्थ विचाराचे समर्थक असले, तरी तटस्थ नि मौन राहिले. याचे कारण, त्यांचे काँग्रेस समर्थक असणे हेच होते, असावे. मार्ग सापडत नाही म्हणून आपण 'मौन' आहोत, असा कबुलीजबाब तर्कतीर्थ या मुलाखतीत देतात नि स्पष्ट करतात की, ते नेहमीच क्रांतिसमर्थक राहिले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार 'अहिंसा' हे राजकीय शस्त्र म्हणून नेहमी उपयोगी पडणारे शास्त्र मानता येत नाही. पक्षहीन लोकशाहीचे राज्यशास्त्र हा नवा विचार आहे. तो व्यवहारात कसा येतो, यावर त्याचे यश अवलंबून आहे. हा नवा विचार व प्रकाश आहे. असे म्हणणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अमृत महोत्सवी वर्षातही नव्याचे स्वागत करण्यात कुचराई करत नाहीत, यातच त्यांचे नवस्वीकार तत्त्व स्पष्ट होते.

## ५६) सार्वत्रिक निवडणुका : यशापयशाची मीमांसा (१९७८)

२१ मार्च १९७७ रोजी इंदिरा गांधींनी पुकारलेली आणीबाणी मागे घेण्यात आली. त्यानंतर अखिल भारतीय काँग्रेसमधील मूळ काँग्रेसनिष्ठांनी इंदिरा गांधींचे नेतृत्व नाकारत रेड्डी काँग्रेसची स्थापना केली (१९७८). यात यशवंतराव चव्हाण, ब्रह्मानंद रेड्डी, देवराज अर्स, देवकांत बरुआ,

ए. के. अँटनी, शरद पवार, शरदचंद्र सिन्हा, प्रियरंजन दासमुंशी, के. पी. उन्नीकृष्णन प्रभृती मान्यवर होते. या विभाजनाचा परिणाम महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, गोवा काँग्रेसवर मोठ्या प्रमाणात झाला. यानंतर महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक मार्च १९७८ मध्ये झाली. त्यात जनता पक्ष ९९, इंदिरा काँग्रेस ६२, रेड्डी काँग्रेस (युनायटेड) ६९, अपक्ष व अन्य ५८ असे यश संपादून महाराष्ट्र विधानसभा त्रिशंकू राहिली. या निवडणुकीची मीमांसा करणारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची मुलाखत दैनिक 'केसरी', पुणेचे वाई प्रतिनिधी अनिल जोशींनी घेतली होती. ती ६ मार्च १९७८ च्या 'केसरी', पुणेच्या अंकात प्रसिद्ध झाली होती.

निवडणुकीतील उपरोक्त यशापयशावर भाष्य करीत या मुलाखतीत तर्कतीर्थ म्हणाले होते की, "महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष यशस्वी झाला. याचे कारण विरोधकांनी निर्माण केलेल्या इतिहासाच्या भ्रमापेक्षा व जातीयवादापेक्षा पवार यांनी मांडलेली यथार्थ वस्तुस्थिती पटली हे आहे." या निवडणुकीत अन्य राज्यांत काँग्रेसची पीछेहाट झाली; पण महाराष्ट्रात काँग्रेसने आपला गड राखला होता. निवडणुकीत सर्वाधिक जागा संपादन करणारा जनता पक्ष हा जुन्या काँग्रेसजनांचाच पक्ष होय, हे तर्कतीर्थ या मुलाखतीत लक्षात आणून देतात. शिवाय ते अन्य राज्यांच्या विकासापेक्षा महाराष्ट्रातील विकास व समाज कसा भिन्न आहे, ते दाखवून देतात. येथे आरक्षणास विरोध नसल्याचे ते स्पष्ट करतात. उत्तर भारतातील निकालांपेक्षा दक्षिण भारतातील निकाल भिन्न असण्याचे कारण येथील पुरोगामी परंपरा आहे, हेही तर्कतीर्थ सदर मुलाखतीतून लक्षात आणून देतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी रॉयवादी प्रभावाचे चाळीसचे दशक वगळता काँग्रेसीच होते. त्यामुळे विसाव्या शतकाचा काँग्रेसचा इतिहास त्यांच्यासमोर घडत होता. पारंपरिक उदारमतवादी काँग्रेसचे ते अनुयायी होते. त्यामुळे काँग्रेस विजय हा त्यांच्या मीमांसेचा विषय होणे स्वाभाविक होते.

### ५७) मंडल आयोग : अहवाल चिकित्सा (१९८०)

सन १९८० मध्ये केंद्र शासनाने मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची घोषणा होताच समर्थक आणि विरोधक यांच्यात संघर्ष सुरू झाला. या पार्श्वभूमीवर मंडल आयोगाबाबत मत जाणून घेण्यासाठी दैनिक 'केसरी', पुणेचे वाई प्रतिनिधी अनिल जोशी यांनी घेतलेली मुलाखत त्या दैनिकाच्या १२ सप्टेंबर १९८० च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर मुलाखतीत मंडळ आयोगाच्या शिफारशी आणि अंमलबजावणीच्या अनुषंगाने भारतीय समाज वास्तव मांडले.

तर्कतीर्थांच्या म्हणण्यानुसार मंडल आयोगाने अहवाल लेखन आणि शिफारशी करण्यापूर्वी भारतीय समाजजीवनाचा वास्तवाधारित अभ्यास करणे आवश्यक होते. भारतीय समाजात तीन

प्रकारचे मागासलेपण दिसून येते - १) अस्पृश्य आणि आदिवासी जीवनातले मागासलेपण, २) आर्थिक स्थितीच्या आधारे असलेले मागासलेपण, ३) बेरोजगारीमुळे येणारे मागासलेपण. खरे पाहता या तिन्ही वर्गांना आरक्षणाची गरज आहे.

मंडल आयोगाने ज्या शिफारशी केल्या त्या यापैकी एकाच वर्गाचा विचार करून केल्याचे दिसून येते. अन्य जात आणि अर्थ गटातील असुरक्षिततेची जी स्थिती आहे तिची उपेक्षा केल्याची भावना समाजात आहे. मंडल आयोगाचा विचार उच्च दर्जाच्या नैतिकतेचा असला तरी साधनांच्या मर्यादेमुळे त्यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणीत अडथळे दिसून येतात. राखीव जागांची अंमलबजावणी प्रशासकीय दिरंगाईमुळे होत नाही, असे दिसून येते. हे चित्र बदलले पाहिजे, शिवाय राखीव जागा कार्यक्षम मनुष्यबळाने भरल्या जातात, असा संदेश समाजात प्रसृत होणे तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्यापुढे शिक्षणाचा यक्षप्रश्न उभा आहे. सेवासुरक्षितता, सेवाशर्ती आणि सेवाशाश्वती यातून समाज जीवनात स्थैर्य येते, तद्वतच कार्यक्षम कार्यसंस्कृती रुजण्यासही त्यातून मदत होते. जपानचे उदाहरण आपणासमोर आहे. त्याचे अनुकरणही महत्त्वाचे ठरेल. कार्यप्रेरणा आणि कर्तव्यपरायणता या दोन्ही अंगांनी प्रयत्न होण्याची गरज आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी केवळ कागद आणि अक्षर असा विचार न करता त्यांच्या अर्थाचा संबंध मानवी जगण्याशी कसा निगडित आहे, याला ते या मुलाखतीत महत्त्व देताना दिसतात.

### ५८) विश्वराज्याच्या दिशेने वाटचाल (१९८९)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वैश्विक राजकारणविषयक आकलन पाहिले असता लक्षात येते की, त्यांचा राजकारणविषयक व्यासंग राज्य, राष्ट्र यांच्या सीमा ओलांडून वैश्विक परिप्रेक्ष कवेत घेणारा आहे. अमेरिकेचे भारतातील राजदूत गॉलब्रेथ यांनी रशिया अमेरिका यांचे अर्थकारण आणि राजकारण समन्वयाचे राहणार असल्याची ग्वाही इतिहास काळात दिल्याची आठवण त्यांच्या मनात होती. त्या पार्श्वभूमीवर ते रशिया-अमेरिका संबंधांवर भाष्य करतात. ही मुलाखत दैनिक 'केसरी'च्या २३ ऑगस्ट १९८९ च्या अंकात प्रसिद्ध असून ती अनिल जोशींनी घेतली आहे.

रशिया आणि अमेरिका या दोन जागतिक महासत्ता आहेत. या दोन सत्तांमध्ये भविष्यकाळात राजकारण आणि अर्थकारण अशा दोन्ही क्षेत्रांत समन्वयाचे जे भविष्यकालीन संकेत मिळतात. त्याचे स्वागत करत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या मुलाखतीत म्हणतात की, रशियामध्ये मिखाईल गोर्बाचोव्ह यांचा झालेला वर्तमान पाडाव चिरंतन मानण्याचे कारण नाही. जगात डावी आणि उजवी सत्ता आघाडी दुसऱ्या अर्थाने पाहता हुकूमशाही विरुद्ध लोकशाही अशीच आहे.

आज जग गोंधळलेल्या स्थितीतून मार्गक्रमण करीत आहे. भारतातील राजकारण हे समाजवादी विचारांचा आग्रह धरणाऱ्या भूमिकेवर उभे आहे. परंतु, त्याला भ्रष्टाचाराचे ग्रहण

लागलेले आहे. भारतातील राष्ट्रवाद हा अवास्तव अशा परिस्थितींच्या कचाट्यात जेरबंद आहे. राज्यांची स्वायत्तता टिकून राहून केंद्रीय सत्ता भारतास एकात्म ठेवील अशी असायला हवी. आज वाढता प्रादेशिकतावाद हा अस्मितेच्या अंगाने वाढतो आहे. हा देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला भविष्यकाळात धोक्याचा ठरू शकतो. रशियाच्या विभाजनापासून आपण काही शिकणार का? धडा घेणार का? हा खरा प्रश्न आहे.

असे असले तरी एकंदर जग हे दिवसेंदिवस विश्वराज्याच्या दिशेने वाटचाल करीत असून, तो लोकतांत्रिक, समाजवादी राज्यपद्धतीसाठी एक आशेचा किरण आहे. तर्कतीर्थांनी मुलाखतीच्या शेवटी प्रगट केलेला आशावाद हा त्यांच्या आजवरच्या विश्वभावनेशी सुसंगत आहे.

### ५९) काँग्रेस (आय)च्या विजयाची कारणमीमांसा (१९८५)

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यामुळे राजकीय घडामोडींशी ते प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निगडित असत. ३१ ऑक्टोबर १९८४ ला इंदिरा गांधींच्या हत्येनंतर डिसेंबर १९८४ ला झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस (आय) पक्षाला नेत्रदीपक यश मिळाले. त्यावर भाष्य करणारी मीमांसात्मक मुलाखत दैनिक 'केसरी', पुण्याचे वाई प्रतिनिधी अनिल जोशी यांनी घेतली होती. ती २ जानेवारी १९८५ च्या 'केसरी'मध्ये प्रकाशित आहे.

तर्कतीर्थांचे म्हणणे होते की, इतरांना भावली तशी सहानुभूतीची लाट मला दिसली नाही. याचे कारण, या निवडणुकीत तर्कतीर्थांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. निवडणुकीत जी लाट प्रत्ययास आली, ती खरे तर इंदिरा गांधींच्या हत्येला शोकग्रस्त मतदारांनी वाहिलेली श्रद्धांजली होती. तत्पूर्वी खलिस्तान आंदोलन त्यांनी हाताळून देश आंतरिक विभाजनातून वाचविला होता. त्यांचा एक मुलगा संजय गांधी हा विमान अपघातात त्यांनी गमावला होता. या पार्श्वभूमीवरची ही हत्या सहानुभूतीचे कारण बनली होती. विरोधी प्रबळ पक्ष नसणे हे पण या विजयाचे एक कारण तर्कतीर्थांनी या मीमांसेत स्पष्ट केले आहे. या बाबींचे जे स्पष्ट विवेचन तर्कतीर्थ या मुलाखतीत करतात, त्यातून राजकारणाचे नाजूक, सूक्ष्म पदर नि पक्ष जाणत होते, हे सिद्ध होते. शिवसेना आणि भाजपची महाराष्ट्रातील युती त्यांना महाराष्ट्रात भाषिक भेद निर्माण करणारी वाटते.

राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस (आय) पक्ष भविष्यकाळात वाटचाल करणार आहे. त्या वाटचालीत पंजाबच्या जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्याचे आव्हान राहील, हे त्यांनी नोंदविलेले निरीक्षण महत्त्वाचे ठरते. शिवाय शेजारी राष्ट्रांची वाढती शस्त्रसज्जता भारत कशी हाताळणार यावर देशाचे सार्वभौम अस्तित्व अवलंबून आहे, हे सांगायलाही तर्कतीर्थ विसरत नाहीत. राजीव गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची कालिदासांच्या 'रघुवंश' नाटकातील सुभाषित 'सत्याय मितभाषिणाम्' उद्धृत करून केलेले वर्णन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना राजकीय मुत्सद्दी सिद्ध करण्यास पुरेसे आहे. सदरची मुलाखत राजकारणाच्या विविध अंग नि प्रश्नांची तर्कतीर्थांना किती सूक्ष्म जाण होती, हे लक्षात आणून देत, त्यांची राजकीय प्रगल्भता अधोरेखित करते.

### ६०) अण्वस्त्रबंदी झाल्यासच विकास (१९८६)

सन १९८६ च्या मध्यास सारे जग अणुयुद्धाच्या छायेत जगत होते. कारण एकच होते की, अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांमध्ये अण्वस्त्रसज्जतेची स्पर्धा शिगेला पोहोचली होती. परिणामस्वरूप जग युनोच्या माध्यमातून जागतिक शांततेच्या शाश्वतीसाठी अण्वस्त्रबंदीची मागणी करू लागले होते. दोन्ही महासत्तांवर अण्वस्त्रबंदीसाठी बोलणीचा दबाव वाढत होता. या पार्श्वभूमीवरील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एक मुलाखत 'केसरी' प्रतिनिधी अनिल जोशी यांनी घेतली होती. ती त्या दैनिकाच्या १९ जून १९८६ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती.

सन १९८६ साली रोनाल्ड रेगन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते, तर मिखाईल गोर्बाचेव्ह रशियाचे. या दोन सत्ताधीशांत अण्वस्त्रबंदीबाबतच्या बोलणीच्या शक्यतेने जागतिक शांततेच्या आशा पल्लवित झालेल्या होत्या. तर्कतीर्थही आशावादी होते. साम्यवाद, लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद इत्यादी राजकीय ध्येयवादांमागे समाजकल्याणाचे उद्दिष्ट असते; परंतु व्यवहार भिन्न असतो. प्रगती ही परराष्ट्रावर अवलंबून असता नये. जपानसारख्या देशाने स्वसंशोधनावर भर दिला, तरच त्याची प्रगती होईल असे आपले मत नोंदवीत तर्कतीर्थांनी या मुलाखतीत रशिया आणि अमेरिकेतील वास्तविक आर्थिक प्रगती व समाजस्थितीवर प्रकाशझोत टाकला आहे. अमेरिकेत २४ टक्के लोकच समृद्ध असून, रशियात क्रांतीनंतरही व्यक्तिस्वातंत्र्य संकोच हा तिथला खरा प्रश्न आहे. आफ्रिका खंडाचे प्रश्न वर्ण, वंशभेद विषमतेचे आहेत. या सर्व प्रश्नांच्या संदर्भात विश्वशांतीचा विचार महत्त्वाचा ठरतो. अण्वस्त्र युद्धाचा वा हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी अमेरिकेने हाती घेतलेला 'स्टारवॉर्स' प्रकल्प - त्यामुळे जगाच्या आशा दुणावल्या आहेत. तसे झाले तर युद्धावरील होणारा खर्च विकासकामांवर होऊन जागतिक विकास घडून येईल, हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा आशावाद विश्वकल्याणाची भावना घेऊन कार्यरत राहणाऱ्या एका तत्त्वचिंतकाचा असल्याने त्याचे काहीएक समाजमूल्य आहे. जीवनाच्या सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट प्राप्तीसाठी आवश्यक असणारी शिक्षणपद्धती अमेरिकेने विकसित केली आहे. तिच्या जोरावर हे राष्ट्र जगावर राज्य करू शकेल. शस्त्रानेच राज्य करता येते असे नाही, तर शास्त्र शस्त्र म्हणून वापरायचे शहाणपण सांस्कृतिक विकास व दारिद्र्यनाश करू शकेल, हा तर्कतीर्थांचा विचार विकासाचे खरे स्वरूप समजावणारा आहे, त्याचा विचार व्हायला हवा.

### ६१) महाराष्ट्र : काल, आज, उद्या (१ मे, १९८५)

१ मे, १९८५ रोजी 'महाराष्ट्र राज्य' स्थापनेस अवलोकन वा विहंगमावलोकनास उचित असे दुसरे वर्ण असत नाही. भूतकाळाचा वेध घेत भविष्याची मांडणी वर्तमानाची चिकित्सा करीत एखाद्याने केली, तर त्यासारखे शास्त्रोक्त मूल्यमापन दुसरे असूच शकत नाही. असे मूल्यमापन करण्यास त्या लढ्यात सहभागी नि नंतरच्या वाटचालीत सक्रिय भागीदार असलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे यासंबंधीचे जे आकलन होते, ते पाक्षिक 'लोकाराज्य'ने तर्कतीर्थांची एक मुलाखत १ मे, १९८५ च्या अंकात प्रसिध्द केली होती. तिचे शब्दांकन रमेश जोशी यांनी केले होते.

या मुलाखतीत विविध प्रश्नांना उत्तरे देत तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, महाराष्ट्र राज्याची स्थापना भाषावार प्रांतरचनेच्या तत्कालीन भारत सरकारच्या धोरणातून झाली. त्यामागे मूळ प्रेरणा मराठी भाषा विकासाची होती. भाषा विकासार्थ राजकीय पाठबळ आवश्यक असते. ते अशा एकभाषिक समुदास केंद्रित राज्य स्थापनेमागे भारतीय भाषांच्या विकासाचे जसे ध्येय नि प्रेरणा होती, तशी महाराष्ट्र स्थापनेमागे मराठी भाषा, साहित्य, संस्कृती विकासाचे लक्ष्य समोर होते. राष्ट्र नि राज्य स्थापनेच्या वेळी १५० वेगवेगळी आंदोलने झाली. महाराष्ट्र स्थापनेमागे संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन होते, तसेच तत्कालीन मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांची मुत्सद्देगिरी कारणीभूत ठरली. केंद्रीय सत्ताशक्ती कमी होऊ न देता राज्य स्थापना ही यशवंतनीती यशस्वी ठरली. ब्रिटिश राज्यसत्ता काळात महाराष्ट्र आचार, विचार-धर्म विकासास वाव नव्हता. तो स्वतंत्र राज्य स्थापनेने मिळाला.

भारत स्वतंत्र झाल्यावर समाजवादी समाजरचनेच्या दृष्टीने सर्व सामान्यांच्या कल्याणाची दिशा व धोरण अंगिकारले गेले. महाराष्ट्राचा ग्रामीण भाग मागास होता. त्याची प्रगती निश्चित करण्यात आली. रोजगारासाठी ग्रामीण जनतेचे स्थलांतर होत असे. ते थांबविण्यासाठी ग्रामीण भागात रोजगारार्थ सहकार, शेती, उद्योगाचे नियोजन करण्यात आले. आर्थिक मागासलेल्या वर्गासाठी नादारी सुरू केली. मराठी विकासार्थ नवी विद्यापीठे स्थापून तिथे मराठीतून अध्ययन-अध्यापन सुरू करण्यात आले. शाळा-महाविद्यालये ग्रामीण भागात सुरू करण्यात आली. त्याचे सकारात्मक परिणाम आज रौप्यमहोत्सवी कालखंडाचे सिंहावलोकन करताना दृष्टोत्पत्तीस येतात.

नामदार यशवंतराव चव्हाण सन १९६२ ला केंद्रात गेले. त्यामुळे विकासाची गती मंदावली, तरी क्षीण झाली नाही. दलित वस्ती विकासाचे आव्हान आपणापुढे अजून आहे. शहरांतील झोपडपट्टी विकास अजून बाकी आहे. ही विकृती दूर व्हायला हवी. आपल्या प्रगतीस अद्याप गती नाही. कारण, गुणवत्ता विकास अजून व्हायचा आहे. शिक्षण विकासात गुणवत्तेस सवलत देऊ नये. आपली उत्पादन क्षमता अजून वाढली पाहिजे. अद्याप आपण शेतमालास हमी भाव देऊ शकलो नाही. तिकडे लक्ष पुरवायला पाहिजे. लोकप्रतिनिधी प्रगतीसाठी अधिक सजग असण्याची गरज आहे. महाराष्ट्राने प्रगतीसाठी अधिक सजग असण्याची गरज आहे. महाराष्ट्राने सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा राबविलेला प्रयोग राष्ट्रभर अमलात आणावा. म्हणजे राष्ट्र विकासात जनसहभाग वाढेल. त्यातील वर्तमान दोष दूर करण्यासाठी भविष्यात सुधारणा करणे शक्य आहे. त्यासाठी महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या नेतृत्वाचा विकास झाला पाहिजे. कृषी-औद्योगिक समन्वित विकासाचे धोरण भविष्यात अधिक फायदेशीर ठरेल, हे तर्कतीर्थांचे मत त्यांची राजकीय प्रगल्भता अधोरेखित करते. कृषी, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य अशी विकासाची पंचसूत्री ठरविली गेली तर महाराष्ट्र राज्य भारतातील प्रगत राज्य होईल. सांस्कृतिक प्रगतीही आर्थिक प्रगतीइतकीच महत्त्वाची आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळासारख्या संस्था या संदर्भमोलाचे योगदान देत आहेत.

**६२) राष्ट्रासाठी जीवन समर्पण हाच खरा राष्ट्रवाद (१९८६)**

"माझे राष्ट्र स्वतंत्र राहून प्रत्येक नागरिकाचे कल्याण होईल, याकरिता सतत प्रयत्नशील राहीन, मी माझ्या राष्ट्राचा नागरिक म्हणून त्या राष्ट्राच्या संरक्षणाकरिता आणि प्रगतीकरिता माझे जीवन समर्पित करीन, असा राष्ट्रवादाचा अर्थ आहे," हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जाणून होते. भारत-पाकिस्तानमधील वाढत्या सैनिकी तणावाच्या पार्श्वभूमीवरील या मुलाखतीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी राष्ट्रवादाचा इतिहासच आपणापुढे मांडतात. दैनिक 'ऐक्य', सातारासाठी अनिल जोशींनी घेतलेली ही मुलाखत या दैनिकाच्या १८ ऑक्टोबर १९८६ च्या अंकात प्रसिद्ध झालेली आहे.

नंतरच्या काळात लगेच डिसेंबर १९८६ मध्ये भारताने आपले सुमारे पाच लाख सैन्य राजस्थानच्या भारत-पाक सीमेवर 'ऑपरेशन ब्रासट्रॅक' अंतर्गत जनरल सुंदरजी यांच्या नेतृत्वाखाली तैनात केले होते. त्यामागे पाकिस्तानच्या अण्वस्त्र हल्ल्याचा धोका एक कारण होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने जात, धर्म, प्रांत, भाषा, वैविध्य असून एकसंध राष्ट्र निर्माण करून जगापुढे सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून प्रशंसा मिळविली होती. अशा देशापुढील राष्ट्रवादाचे आव्हान जगातील अन्य राष्ट्रांपेक्षा खचितच वेगळे होते, हे तर्कतीर्थ या मुलाखतीत पटवून देतात. जगात राष्ट्रवादाचा उदय अठराव्या, एकोणिसाव्या शतकात झाला. युरोपीय राष्ट्रांमधील राष्ट्रवाद व भारतामधील राष्ट्रवादात मूलभूत फरक आहे. युरोपीय राष्ट्रे एक धर्म, एक भाषा, एकवंश आधारित राष्ट्रवादावर निर्माण झालीत. भारत हा परंपरेने बहुवंशीय, बहुभाषी, बहुधर्मी राहत आला आहे. इथे विविधतेत एकता हे ध्येय नि आव्हान आहे. छोटी राष्ट्रे संघटित होणे सोपे असते; पण उपखंड सदृश देशाचे एकसंध राहणे आव्हान असते. भारताने ते सतत पेलून दाखविले आहे. इथला राष्ट्रवाद हा सांस्कृतिक समन्वयाच्या पायावर उभा आहे. तो इतरांशी युद्ध वा स्पर्धा करीत नाही. त्याचे ध्येय कधीच साम्राज्य विस्ताराचे राहिले नाही. स्वस्वातंत्र्य रक्षण हेच इथल्या राष्ट्रवादाचे ध्येय राहत आले आहे. इथला राष्ट्रवाद हा धार्मिक नसून तो इहवादी आहे. जगातील राष्ट्रे राष्ट्रवादाच्या जोरावर क्रीडा स्पर्धांत नैपुण्य व यश संपादन करतात. तशी वृत्ती भारतात निर्माण होईल, तर तोही जगातील बलाढ्य देश बनू शकेल. राष्ट्रवादाची संकल्पना या मुलाखतीतून पुरेशा तपशिलाने कळते.

**६३) विधेयकांवर चर्चा आवश्यक (१९८९)**

सन १९८४ डिसेंबर ते १९८९ ऑक्टोबर हा काळ भारतीय लोकशाहीतील काँग्रेस (आय) च्या बहुमताचा काळ होता. लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सदनात काँग्रेसचे बहुमत असल्याने विधेयके चर्चेविना मंजूर करण्याचा सपाटा काँग्रेसने लावलेला होता. ग्रामपंचायतीत स्त्री व दलितांना आरक्षण देऊन पंचायत राज्य व्यवस्था मजबूत करणारे महत्त्वाचे विधेयक

काँग्रेसने चर्चेविना संमत केले. एकीकडे काँग्रेस पक्ष अंतर्गत निवडणुका गेली १५-१६ वर्षे न घेता लोकशाहीची उपेक्षा करते नि दुसरीकडे ती तळागाळात रुजविण्याचे कायदे करते, या विसंगतीवर बोट ठेवणारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची ही मुलाखत दैनिक 'केसरी'साठी अनिल जोशी यांनी घेतली होती. ती 'केसरी'च्या १ ऑगस्ट १९८९ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती.

२६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान अमलात येऊन भारतीय संघराज्य अस्तित्वात आले. तेव्हापासून केंद्र व राज्य दोन्ही ठिकाणी अधिकांश राज्यात अधिकांश काळ काँग्रेसची सत्ता होती. तरी लोकशाही तळागाळापर्यंत रुजू न शकल्याने ग्रामपंचायत व्यवस्था मजबूत करून ती सर्वत्र कार्यरत करण्यासाठी म्हणून हे नवे विधेयक आणले, ही तर्कतीर्थांच्या दृष्टीने स्वागतार्ह बाब होय. या विधेयकामुळे गावपातळीवरील कारभारात स्त्री व दलित वर्गाचे प्रतिनिधित्व अस्तित्वात येईल, तद्वतच विकासाचे निर्णय व कार्य काही दिल्लीऐवजी गल्लीतून होईल. स्थानिकांचे प्रश्न स्थानिक पातळीवर व स्थानिकांकडून सोडविल्यामुळे खरे ग्रामस्वराज्य अस्तित्वात येईल.

अशी विधेयके संमत होण्यापूर्वी चर्चेकरिता प्रसिद्ध झाल्यास नागरिक आपली मते मांडू शकतील. सर्वांगीण चर्चा होऊन विधेयक संसदेने संमत करणे अधिक समंजसपणाचे ठरेल. अशा घिसाडघाईने मन अस्वस्थ होत असल्याची कबुली देत तर्कतीर्थांनी काँग्रेसच्या पक्षांतर्गत लोकशाही संकोचाच्या विसंगतीकडे लक्ष वेधले आहे. शिवाय लोकशाही मूल्यांची पर्वा न राहिल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. इतकेच नव्हे तर, 'त्यामुळे या पंचायत राज्य विधेयकाची रचना लोकशाहीच्या प्रेरणा अधिक स्वच्छ व सामर्थ्यशाली करील की नाही, याबद्दल मन साशंक होते,' असे म्हणत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जी आशंका व्यक्त करतात तेव्हा ती जीवनाचा अधिकांश काळ काँग्रेसमध्ये घालवलेल्या एका तत्त्वचिंतकाची आहे हे विसरता येत नाही. या ओळी लिहितानाची काँग्रेसची स्थिती पाहिली की तर्कतीर्थांची काळजी साधार होऊन जाते.

### ६४) राम जन्मभूमीच्या अस्तित्वाला ऐतिहासिक आधार नाही (१९८९)

राम जन्मभूमी आणि बाबरी मशीद हा वाद जुना असला तरी सन १९४९ पासून त्याला अलीकडच्या काळात महत्त्व प्राप्त झाले, ते भारतीय जनता पक्षाने लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या सोमनाथ ते अयोध्या रथयात्रेमुळे (२५ सप्टेंबर १९९०). जून १९८९ मध्ये भारतीय जनता पक्षाने विश्व हिंदू परिषदेस या कामी औपचारिक पाठिंबा दिला. जुलै १९८९ मध्ये रामललासंबंधी पाचवा खटला दाखल करण्यात आला. या सर्व पार्श्वभूमीवर दैनिक 'सकाळ', पुणेच्या नवी दिल्ली प्रतिनिधींनी दि. २३ ऑगस्ट १९८९ रोजी घेतलेली ही मुलाखत. ती या दैनिकाच्या २४ ऑगस्ट १९८९ च्या अंकात प्रकाशित आहे. साहित्य अकादमीचे 'महत्तर सदस्यत्व' (फेलोशिप) स्वीकारण्यासाठी ते नवी दिल्लीत आले होते.

तर्कतीर्थांच्या विचारानुसार जेथे बाबरी मशीद आहे, तिथे राम जन्मभूमी होती, असा दावा परंपरेच्या आणि श्रद्धेच्या आधारावर केला जातो; परंतु त्याला ऐतिहासिक प्रमाण नाही. बाबरी मशीद पाडून तिथे राम मंदिर बांधण्याची मागणी हिंदू तत्त्वज्ञानात बसत नाही. गेल्या हजारो वर्षांच्या काळात हिंदूंची देवालये, तीर्थक्षेत्रे पाडली जात होती, ती भ्रष्ट होत होती; परंतु हिंदू धर्माचे स्वरूप सहिष्णुतेचे राहिले आहे. मुसलमान, ख्रिश्चन आदींचा धर्म हाणून पाडणे, हा विचार हिंदू तत्त्वज्ञानाशी पूर्णपणे विसंगत आहे. हिंदू धर्माला परधर्म हिंसा मान्य नाही. या पुरोगामी दृष्टिकोनामागे हिंदूंनी आपली ताकद ठेवली नसल्याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी खंत व्यक्त करतात.

हिंदू राजकीयदृष्ट्या संघटित झाले नाही, याचे मूळ इथल्या जातीय व्यवस्थेत असल्याचे ते स्पष्ट करतात. ही मुलाखत तत्कालीन राजकीय, धार्मिक परिस्थिती पाहता अंतर्मुख करण्यास भाग पाडते. भारत हा परंपरेने बहुधार्मिक देश राहिला आहे. घटनेने प्रत्येकास धार्मिक स्वातंत्र्य आणि संरक्षण बहाल केले आहे. अल्पसंख्य धार्मिकांच्या भावनांचे रक्षण करणे सरकारचे कर्तव्य ठरते. या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थांचे वरील विचार संविधान व परंपरा दोन्हींचे समर्थन करणारे राहिले आहेत.

**६५) मंडल आयोग मागे घ्यावाच लागेल (२ सप्टेंबर, १९९०)**

७ ऑगस्ट, १९९० रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांनी मंडल आयोगाचा अहवाल स्वीकारून त्यातील शिफारशींच्या अनुरोधाने केंद्र सरकारच्या आस्थापनांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) नोकरीत २७ टक्के आरक्षण जाहीर केले. आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठीच्या या आरक्षण घोषणेचे सुधारवादी विचारकांनी स्वागत केले. परंतु, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मात्र यासंदर्भात प्रतिकूल मत दैनिक 'सकाळ', कोल्हापूरच्या प्रतिनिधींना दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केले होते.

त्यांच्या मतानुसार, जिथे समाजवादी क्रांत्या उलथून पडल्या, त्यामानाने मंडल अहवाल दुबळा आहे. आयोगाने धार्मिक परंपरांचा व धर्मशास्त्राचा नीट अभ्यास केलेला नाही. यातील 'महाभारत' संदर्भ चुकीचे आहेत. मागासवर्गीयांची स्थिती सुधारण्यासाठी हा आयोग होता. मंडल आयोग अहवालानुसार, ५२ टक्के प्रजा मागास ठरते. एवढ्या मोठ्या संख्येच्या प्रजेस आरक्षण देण्यास मोठी यंत्रणा उभारावी लागेल. मागास जातीची मापक लक्षणे ठरविणे गरजेचे आहे. परिणामांचा विचार न करता विचारशून्यरीत्या हा अहवाल व शिफारशी जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा आरक्षणात दलितांचा तोटा आहे. सहकार, शिक्षण इ. क्षेत्रांतील यापूर्वीचा अनुभव पाहता या निर्णयाने भ्रष्टाचार वाढेल. अद्याप समाजात समानता आलेली नाही. अशा परिस्थितीत लोकशाही दुबळी आहे. त्यामुळे प्रबोधन आवश्यक आहे. शासकीय नोकऱ्या जबाबदारीच्या असतात. त्यामुळे गुणांसदर्भात धरसोड योग्य नाही. जनतेतील न्याय भावना अशा निर्णयामुळे कमी होईल. धर्मासंदर्भात आयोगाच्या भूमिकेशी तर्कतीर्थ असहमत असल्याने त्यांनी या मुलाखतीत धर्मविषयक आपले आकलन स्पष्ट केले आहे.

या विषयासंदर्भात तर्कतीर्थांच्या आणखी दोन मुलाखती 'लोकसत्ता'चे संपादक माधव गडकरी यांनी आणि 'नवभारत' मासिकाचे संपादक प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतल्या आहेत. त्या वाचल्या की, तर्कतीर्थांची भूमिका स्पष्ट व्हायला मदत होते. आपल्या या मताबद्दल उठलेली प्रतिक्रिया लक्षात घेऊन आपले पूर्वमत बदलल्याचे लक्षात येते. आज इतका काळ उलटल्यानंतर मात्र तर्कतीर्थ दृष्टिकोन विचारणीय ठरतो.

**६६) लोकशाहीबाबत भविष्यकाळ आशावादी नाही (२६ जानेवारी, १९९१)**

२३ जानेवारी, १९९१ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा तिथीप्रमाणे ९१वा वाढदिवस. (तारखेप्रमाणे २७ जानेवारी). याच वेळी भारतीय प्रजासत्ताकाने आपल्या वाटचालीची चार दशके पूर्ण केलेली. स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय, राजकीय क्षेत्रात निरंतर सजग असलेल्या शास्त्रीजींना राष्ट्राने भवितव्य काय वाटते, हे जाणून घेण्याचा साहित्य समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी केलेला प्रयत्न खरोखरच स्तुत्य म्हणावा लागेल. ही मुलाखत दैनिक 'लोकसत्ता', मुंबईच्या शनिवार, दि. २६ जानेवारी, १९९१ च्या अंकात प्रसिध्द झाली होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवी समाज उन्नत व्हावा म्हणून विविधांगांनी गेली सहा दशके प्रयत्न केला होता. ते लक्षात घेता विसाव्या शतकाचे हे अंतिम दशक तेव्हा आदिमानवापासून ते आजवर मानवी विकास पदयात्रेचे वेगळेपण तर्कतीर्थ समजावतात. त्यांच्या म्हणण्यानुसार समाजवादी क्रांती आणि अणुशक्तीवर आधारित तंत्रज्ञान यांच्या समन्वयाने आपणास भारतीय जनतेचे सामाजिक जीवन विकसित करता येईल. समाजवादी क्रांतीच्या गेल्या ७० वर्षांच्या इतिहासाचे (१९७१ ते १९८५) विहंगमावलोकन करताना कार्ल मार्क्स, लेनिन आणि मिखाईल गोर्बाचेव्ह (ग्लासनोस्त आणि पेरिस्त्रोईका) अशा वाटचालीत रशियात सामुदायिक प्रयत्नांना महत्त्व दिले; पण व्यक्तीच्या स्वातंत्र्य नि स्वयंप्रेरणेस वाव राहिला नाही. तिकडे अमेरिकेत भांडवलशाही असून, तेथील कामगार व मध्यमवर्गाची आर्थिक स्थिती उंचावली. चीनमध्ये रशियासारखीच स्थिती दिसते. तिथेही साम्यवादी क्रांतीतून अपेक्षित समता प्रधान व संपन्न समाज निर्माण झाला नाही. गोर्बाचेव्ह यांचे प्रयत्न यासंदर्भात महत्त्वाचे ठरतात. त्यापूर्वी साठ वर्षे अगोदर या क्रांतीच्या प्रणेत्यांपैकी एक असलेल्या मानवेंद्रनाथ रॉय ६० वर्षांपूर्वी हा 'क्रांतीचा गर्भपात' असल्याचे केलेले वक्तव्य महत्त्वाचे होते. मार्क्सवादी युरोपीयन (स्वप्नभूमी) जगातल्या गेल्या दीड शतकांतील पिढ्या भारावल्या होत्या; पण त्यांच्या पदरी स्वप्नभंगाचेच दु:ख पडले. तरी मार्क्सवादी देवता अंतर्धान पावली असे म्हणता येणार नाही. कारण, मार्क्सवादाला वैचारिक पर्याय अद्याप मिळाला नाही. मानवी समाज आपणास खऱ्या अर्थाने उन्नत करायचा असेल तर पेट्रोल, डिझेलच्या मर्यादित ऊर्जेच्या जागी अपारंपरिक सौरऊर्जेसारखी न संपणारी ऊर्जाशक्ती शोधावी लागेल, तेव्हाच आपण पर्याय मिळविला, असे समाधान मानता येईल.

रशियन समाजवादी क्रांती फोल ठरल्याचे लक्षात घेता क्रांतिवाद अनाथ, पोरका झाला असे म्हणता येणार नाही, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात. मार्क्सवाद चिरंतन ठरायचा तर याची वैज्ञानिक अंमलबजावणी आवश्यक आहे. अपयश विचाराचे नसून कृतीचे आहे. एकेकाळी भारतास रशिया, चीनच्या क्रांतीची भुरळ होती, हे खरे आहे; पण आज तशी स्थिती राहिली नाही. भारतापुढे आज युरोपच्या संसदीय लोकशाहीचा आदर्श आहे.

तर्कतीर्थांनी मागे शतकभराच्या आयुष्याचे स्वप्न व्यक्त केले होते. ९१ वर्षे पूर्ण होत असताना त्यांना वाटले की, निसर्गाने मानवास शतायुषी जीवन बहाल केले आहे. तिथेपर्यंत निरोगी जीवन व स्मरणशक्ती शाबूत राहिली पाहिजे. आपणास जीवनाचा वीट आलेला नसून प्राप्त कर्तव्ये पूर्ण व्हावीत असे वाटते.

सदरची मुलाखत म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या दुर्दम्य आशावादाचे प्रतीक होय. तर्कतीर्थांचा एकूण जीवनपट पाहता त्यांनी स्वत:स निरंतर क्रियाशील ठेवलेले दिसते. सर्वच मुलाखतीचे सूत्र लक्षात घेता वा सूर लक्षात घेता ते नेहमी जीवनाकडे सकारात्मक आणि विधायक दृष्टीने पहात असल्याचे दिसते. सर्व ज्ञान-विज्ञानने आणि वादविद्या पारंगत तर्कतीर्थ मानवी प्रज्ञा नि प्रतिभेचे द्योतक आहे. अखंड ज्ञानसाधनेतून त्यांना जे संचित हाती येतं ते लेखन, प्रबोधन, संवाद यातून ते समाजाप्रत सतत पोहोचवत असतात. 'योग : कर्मसु कौशलम्' ध्येय उरी बाळगून नित्य ते विचार व कृतीचा समन्वय साधत जीवन संक्रमण करीत राहिले. त्यांच्या चरित्रात नित्य परिवर्तन दिसते. ते त्यांच्या चिरनूतन चिंतनशीलतेतून आलेले असते. म्हणून त्यांनी नित्य स्वत:स वाचन, चिंतन, मनन, लेखन, प्रबोधनाची कास धरली आहे.

**६७) भारताचे संविधान (१९९१)**

मुलाखतकार अनिल जोशींनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची घेतलेली मुलाखत 'सुशिंपाज' नामक नियतकालिकाच्या सप्टेंबर १९९१च्या अंकात प्रकाशित झाली होती. 'सुशिंपाज' हा कोकणी शब्द असून, त्याचा अर्थ 'नारळाचा कोंब' असा होतो.

या मुलाखतीची एक पार्श्वभूमी आहे. सन १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत केंद्रात कोणत्याही एका पक्षास बहुमत न मिळाल्याने काँग्रेस, भाजपा व राष्ट्रीय मोर्चा यांचे संयुक्त सरकार अधिकारावर आले. पी. व्ही. नरसिंह राव पंतप्रधान झाले. देशावर आर्थिक संकट होते. अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी आर्थिक सुधारणेसाठी उदार अर्थनीती अवलंबिली होती. या काळात घटनेस व त्यातील तरतुदींना असाधारण महत्त्व येऊन तिच्या स्वरूपावर आणि श्रेष्ठत्वावर चर्चा सुरू होती. तर्कतीर्थांनी या मुलाखतीत राष्ट्रसंकल्पनेवर प्रकाश टाकून तिच्या स्थैर्यासाठी घटना कशी अनिवार्य असते, ते स्पष्ट केले आहे. राष्ट्र म्हणजे विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील संघटित मानव समाजाचे एकध्येयी संघटन. ते हक्क आणि कर्तव्याच्या संकल्पावर उभे असते. मानवी मूलभूत हक्क हा राष्ट्राच्या स्थैर्याचा पाया असतो. भारत राष्ट्र विविध भाषा, प्रांत, धर्म, जाती, परंपरांचे असल्याने त्या सर्वांना बांधून ठेवणारी राज्यघटना महत्त्वाची असते.

भारतात आर्य आणि आर्येतर (द्रविड) मानव समुदायांचा देश आहे. तिच्या भाषा, संस्कृतीची मुळे युरोप आणि इराणमध्ये दिसून येतात. भारत स्वतंत्र झाल्यापासून भाषा, जात, धर्म मागे पडून राष्ट्रीय वृत्तीस महत्त्व आले. मूलभूत हक्क संरक्षण सर्वोपरी झाले. आपली राष्ट्रीयता ही मानवतेच्या पायावर तोललेली आहे. येथे फुटिरवादास थारा नाही. प्रादेशिक स्वायत्तता आहे; पण ती केंद्र नियंत्रित आहे. केंद्राचा राज्यांवर वाढणारा दबाव प्रदेशांची स्वायत्तता संकोचित आहे. हा चिंतेचा विषय आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे या मुलाखतीतील विचार 'राष्ट्र' या मूलभूत संकल्पनेकडे आपले लक्ष वेधून घेतात आणि तिच्या संघटित अस्तित्वावर राष्ट्र सुरक्षितता व स्थैर्य अवलंबून असल्याचे स्पष्ट करतात. प्रदेशांचे सहअस्तित्व व सहभागित्वातून राष्ट्र उदयाला येत असल्याने त्यांची काळजी घेणे हे केंद्र सरकारचे कर्तव्य ठरते, हे स्पष्ट करणारे विचार त्यांची राष्ट्रनिष्ठा लक्षात आणून देतात.

### ६८) समान नागरी कायद्याची टाळाटाळ भोवणारी (१९९३)

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडण्यात आली. त्यानंतर ६ जानेवारी १९९३ रोजी मुंबईत दंगल उसळून अनेकांचा बळी घेतला गेला. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर दैनिक 'सकाळ'च्या साताराच्या प्रतिनिधींनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मत व प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. ही मुलाखत दैनिक 'सकाळ', पुणेच्या २६ जानेवारी १९९३ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. तो दिवस भारतीय प्रजासत्ताकाच्या ४३ व्या वर्धापन दिनाचा जसा होता, तसा तर्कतीर्थांच्या ९३ व्या वर्षांत पदार्पणाचा पूर्वदिनही होता. या मुलाखतीत तर्कतीर्थांनी स्पष्ट शब्दात समान नागरी कायद्याचे समर्थन केल्याचे दिसून येते. त्यांच्या म्हणण्यानुसार राजकारणात धर्माला स्थान असता कामा नये. काँग्रेस सतत मुस्लिमांचा मतांसाठी अनुनय करते अशी लोकभावना आहे. ती शहाबानो खटल्यातही स्पष्ट झालेली आहे. सर्वांना बरोबर घेऊन जायचे तर कायदेही समान हवेत. बाबरी मशीद विध्वंस आणि मुंबई दंगल दोन्हींच्या संदर्भात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, हिंदू धर्म कोणाही धर्माच्या विरुद्ध नाही. मंदिर-मशीद भेद मानणे योग्य नाही. सर्वधर्मियांमध्ये बंधुभाव हा मुख्य धर्म मानून वर्तन व्हावे. आज देशाला उच्च दर्जाच्या नेतृत्वाची गरज आहे. आइन्स्टाईनने महात्मा गांधींची उच्चता वर्णिली होती, असे नेतृत्व हवे.

भारताचा गेल्या पाऊण शतकाचा इतिहास पाहता येथील मुस्लिमांनी गुण्यागोविंदाने राहून भारतीय संस्कृतीचे संवर्धन करायला हवे. ही संस्कृती मुळातच एक सहिष्णू संस्कृती आहे. आजच्या विज्ञान युगात इतिहास उकरून काढण्यात कोणतेच हशील नाही, हे स्पष्ट करून तर्कतीर्थ जगातील मुस्लीम, पारशी, यहुदी, ख्रिश्चन धर्मांचा दाखला देत या मुलाखतीत समजावतात की, ते सर्व धर्म आणि हिंदू धर्म यात मूलभूत अंतर आहे. हिंदू धर्माला कोणता एक प्रेषित जसा नाही तसा एकच एक धर्मग्रंथ नाही. ही या धर्माच्या व्यापकतेची खूण होय. त्यामुळे सर्वांना समान

कायदे असतील, तर सर्वांचा विकास होईल, हे विचार तर्कतीर्थांच्या उदारतेचे आहेत, तसेच प्रश्नाच्या नेमक्या वर्मावर नि मर्मावर बोट ठेवणारेही.

**❍ शिक्षण**

**६९) ग्रामीण कॉलेजे प्रभावी कशी होतील? (२५ मार्च, १९६५)**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पुढाकाराने जनू. १९६२ मध्ये प्राज्ञपाठशाळा मंडळामार्फत वाई येथे 'आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज'ची स्थापना करण्यात आली. कारण, वाईत तेव्हा एक नोंदणीकृत संस्था होती. पुढे हे मूळ 'मानव्य आणि वाणिज्य महाविद्यालय' 'जनता शिक्षण संस्था, वाई' या नवनोंदणीकृत संस्थेमार्फत १ एप्रिल, १९६८ पासून रीतसर चालविण्यास प्रारंभ झाला. सदर महाविद्यालय सुरू झाल्यावर तीन वर्षे पूर्व झाल्याचे निमित्त साधून केलेला हा संवाद म्हणजे यानिमित्ताने केलेले तर्कतीर्थांचे महाराष्ट्रातील ग्रामीण उच्च शिक्षणासंबंधीचा विचार होय.

शहरांबरोबर महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतरच्या काळात ग्रामीण भागात कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील शिक्षण देणारी महाविद्यालये सुरू झाली तरी ग्रामीण शिक्षण संस्थांची आर्थिक स्थिती शहरांच्या संस्थांच्या तुलनेत दुर्बलच राहिली आहे, शिवाय त्यांचा दर्जाही खालावलेलाच राहिला आहे. त्याचे कारण मॅट्रिक पात्रता असलेले शिक्षकच मॅट्रिकला शिकवितात असे दिसून आले आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयांना उच्चशिक्षित प्राध्यापक लाभत नाहीत. कारण, ते ग्रामीण भागातील सुविधा वंचित जगात येण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. आणखी म्हणजे ग्रामीण महाविद्यालयांकडे वसतिगृहांची सोय नाही. म्हणून पुरेसे विद्यार्थी मिळत नाही. निवास व भोजन सुविधांचा ग्रामीण भागातील सुविधा अभाव हे एक त्याचे कारण होय. शिवाय आपणास आपले महाविद्यालयीन शिक्षण ग्रामीण जीवन समस्या सोडविणारे करता आलेले नाही. ग्रामीण शिक्षित विद्यार्थी ग्रामीण भागात राहतील तर हा प्रश्न सुटू शकेल. ग्रामीण शेतीस पूरक उद्योग जोडले, तर ग्रामीण आर्थिक स्थिती सुधारेल. त्यातून शिक्षणपूरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांप्रमाणे ग्रामीण भागात वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाली, तर आजची अभावग्रस्त स्थिती बदलेल. व्यवसाय प्रधान शिक्षणाच्या संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्या पाहिजेत.

**७०) राष्ट्रीय शिक्षणाचा इहवादी दृष्टिकोन (१९७९)**

भारतातील वर्तमान शिक्षण व्यवस्था हा या मुलाखतीचा कळीचा मुद्दा. तो लोकमान्य टिळकप्रणीत राष्ट्रीय शिक्षण संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर मांडण्याचा इथे प्रयत्न दिसतो. विषयाच्या प्रासंगिकतेचा वा प्रस्तुततेचा संदर्भ लागत नाही. दैनिक 'केसरी', पुणेच्या २९ जुलै १९७९ च्या अंकात प्रकाशित ही मुलाखत अनिल जोशी यांनी घेतली आहे.

लोकमान्य टिळक कर्मयोगी होते. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यार्थ्यांत जाज्वल्य राष्ट्राभिमान निर्माण व्हावा म्हणून राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला होता. त्यानुसार ''अनेक

विज्ञाने, शास्त्रे, उद्योगधंदे, व्यापार व कला यांमध्ये निष्णात, पारंगत होऊन स्वपराक्रमाने व बुद्धिवैभवाने पुढे येणारी व नोकऱ्यांचा शोध न करणारी माणसे ज्या शिक्षणाने तयार होतील, तसेच देशाचे राजकीय, औद्योगिक, सामाजिक व बौद्धिक वैभव राखण्यास व वाढविण्यास समर्थ तरुण पिढी ज्या शिक्षणाने तयार होईल त्यास राष्ट्रीय शिक्षण म्हणता येईल," हा टिळकांचा राष्ट्रीय शिक्षणविषयक दृष्टिकोन आणि वर्तमान शिक्षण यांतील तफावत हा चिंता नि चिंतनाचा विषय होय. या पार्श्वभूमीवर वास्तव चित्र स्पष्ट करत तर्कतीर्थ म्हणतात की, स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण संस्था दसपट वाढल्या. विद्यापीठांची संख्या वाढली. तालुक्याला महाविद्यालये सुरू झाली. प्रत्येक तालुक्यात आठ ते दहा माध्यमिक शाळा सुरू झाल्या; परंतु शिक्षणाने इहवादी दृष्टिकोन निर्माण केला नाही. शिक्षक ध्येयवादी नसणे हे त्याचे प्रमुख कारण होय. तर्कतीर्थ या मुलाखतीत आपली खंत व्यक्त करत म्हणतात की, "विद्यार्थी वर्गाचा शिक्षणाच्या सामर्थ्यावरील विश्वास उडालेला आहे. विद्येवरील श्रद्धा नाहीशी झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी शक्ती (Student Power) उच्छृंखल, बेदरकार व बेलगाम बनलेली आहे. याचे कारण लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचे जे फलित ठरविलेले होते, ते फलित विद्यार्थी वर्गाच्या हाती लागत नाही. अशी ही स्वतंत्र भारताच्या शिक्षणाची समस्या अत्यंत गुंतागुंतीची झालेली आहे." यातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जे सांगू पाहत आहेत, त्यामागे त्यांची स्वतःची घडण प्राज्ञपाठशाळा, वाईसारख्या गुरुकुलात झाली होती, हा घडणीचा स्वानुभव जसा महत्त्वाचा तसे वर्तमान शिक्षणातील वैयर्थही !

### ७१) कुटुंब हेच नैतिक शिक्षणाचे विद्यापीठ (१९८४)

या मुलाखतीचा पूर्वसंदर्भ अनुपलब्ध असल्याने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी हे विचार कोणत्या घटना वा प्रसंगाने व्यक्त केले, ते समजायला मार्ग नाही. असे असले तरी त्यातून नैतिक शिक्षणविषयक भूमिका समजायला मदत होते. अनिल जोशी यांनी घेतलेली ही मुलाखत दैनिक 'केसरी', पुणेच्या २९ ऑक्टोबर १९८४ च्या अंकात प्रकाशित झालेली आहे.

तर्कतीर्थांच्या मतानुसार माणूस अनुकरणातून शिकतो, तसा नियंत्रित वर्तनातूनही. नैतिक शिक्षणाचे कुटुंब हेच खरे विद्यापीठ होय. या शिक्षणाचा प्रारंभ मानवाच्या जीवनापासूनच सुरू होतो. वागण्यातून नैतिक शिक्षण दिले, घेतले जाते. कुटुंब, समाज, निसर्गातून मिळणाऱ्या सूचना व मार्गदर्शनातून नैतिक शिक्षणाचे धडे माणसापर्यंत पोहोचत असतात. उत्तम अध्यापक कृतज्ञता, कौशल्य, प्रसन्नता, मोकळेपणा, स्नेह इत्यादी बाबी विद्यार्थ्यांना आपल्या आचरण, अध्यापनातून देत असतो. हे शिक्षण केवळ कुटुंब आणि शाळाच देते असे नाही. ते सामाजिक प्रश्नांतूनही मिळत असते. नैतिक शिक्षण व मूल्ये रुजविण्याची खरी जागा प्राथमिक शिक्षण, त्याचा दर्जा राहिला नाही, ही खेदाची गोष्ट होय.

भारतात ६५ टक्के लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन कंठत आहेत. अशा स्थितीत नैतिकता रुजणे दुरापास्त असते. तरी कुटुंब संबंध चांगले असतील तर गरिबीतही नैतिकता मूल्य म्हणून

जपली आणि जोपासली जाते. कितीतरी गरीब कुटुंबे समाजात सचोटीने जगत असतात. नैतिक शिक्षण प्रत्यक्ष देण्यापेक्षा ते अप्रत्यक्ष रुजणे महत्त्वाचे असते. वर्तन, अनुकरणातून मिळणारे नैतिक शिक्षण चिरंजीवी असते, शिवाय ते प्रभावीही सिद्ध होते. जीवन जर सामंजस्यपूर्ण असेल, तर तिथे सहानुभूतीचे वातावरण असते. अशा ठिकाणी नैतिकता निसर्गतः रुजते. नैतिक शिक्षण देणारे सचोटीचे शिक्षण जितके अधिक, तितके हे शिक्षण देणे सुकर होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्व आणि विचारांची घडण गुरुकुलात झाली. आपले गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांचा त्यांच्यावर गुरू म्हणून असलेला प्रभाव आजीवन राहिला. महात्मा गांधींच्या नैतिक आचार-विचारांचा तर्कतीर्थांवरील प्रभाव सर्वपरिचित आहे. अशा स्थितीत नैतिक शिक्षणाचे त्यांच्याद्वारे समर्थन स्वाभाविक ठरते.

**भाषा आणि साहित्य**

**७२) मराठी विश्वकोश : ज्ञानभांडाराचे कवाड (१९७७)**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने राज्य पुनर्रचनेचा कार्यक्रम हाती घेतला होता. त्यानुसार १९५६ मध्ये मराठी-गुजरातीचे द्वैभाषिक राज्य म्हणून मुंबई राज्य निर्माण केले होते. त्यात मध्यप्रांत बेरार ते हैदराबाद, विदर्भ, म्हैसूर, गुजरात असा संयुक्त प्रदेश समाविष्ट करण्यात आला होता. त्याविरोधात महाराष्ट्रात मराठी भाषा स्वतंत्र राज्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. त्याचे महत्त्व तत्कालीन द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी भारत सरकारला व तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना पटवून दिले. त्यानुसार १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापले गेले. त्याचेही पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण बनले. त्यांनी मराठी भाषा संचालनालय व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ स्थापून मराठी विकासास गती दिली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या नव्या मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांनी सन १९६२ ला मराठी विश्वकोश निर्मितीची योजना आखून कार्य सुरू केले. त्यानुसार पहिले चार खंड सन १९७६ साली, तर खंड ५ ते ७ सन १९७७ साली प्रकाशित झाले. २३ जुलै १९७७ च्या दैनिक 'केसरी', पुणेमधील अनिल जोशी यांनी घेतलेल्या मुलाखतीचे कारण सन १९७७ साली प्रकाशित मराठी विश्वकोशाच्या तीन खंडांच्या प्रकाशनाने या प्रकल्पाचा एक तृतीयांश भाग पूर्ण होणे हा होता.

सदर मुलाखतीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची योजना विस्ताराने स्पष्ट केली आहे. त्यानुसार संहिता खंडाचे १७ भाग प्रकाशित होणार असून, आज अखेर ७ संहिता खंड, एक परिचय ग्रंथ व परिभाषा खंड प्रकाशित झाल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात १० संहिता खंडांशिवाय १ नकाशासंग्रह आणि १ सूची खंड प्रकाशित व्हायचा आहे. हा प्रकल्प मराठी भाषा 'ज्ञानभाषा' म्हणून कशी समृद्ध होणार आहे, ते या मुलाखतीतून स्पष्ट होते.

आज सन २०२० साली आपण या मुलाखतीचा विचार करतो आहोत. आज हा प्रकल्प मूळ योजनेबरहुकूम पूर्ण झाला असून, तो संकल्पापेक्षा विस्तारला आहे. एकूण २२ खंड प्रकाशित असून, त्यातील मूळ २० संहिता खंड असून उर्वरित दोन परिभाषा व सूची खंड आहेत. नकाशा खंड प्रलंबित असून या प्रकाशित खंडातील नोंदी अद्यवत करण्यासाठी विविध ज्ञानमंडळे कार्यरत आहेत. एका ज्ञानसंकल्पनेचे हे वास्तवरूप. श्रेय तर्कतीर्थांचे.

**७३) साहित्य संमेलनांमुळे लोकशिक्षणाचे कार्य (१९७७)**

सन १९७७ मध्ये पुणे येथे ५२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले. या संमेलनाचे अध्यक्षपद कथाकार पु. भा. भावे यांनी भूषविले होते. सदर समारंभात अनेक वाद झडले. अखेरच्या दिवशी दंगा नि निषेधाचे प्रकार घडले. आणीबाणीची पार्श्वभूमी यामागे होती. सन १९७४ ला इचलकरंजी येथे संपन्न सुवर्णमहोत्सवी अ. भा. मराठी साहित्य संमेलनात साहित्यिक व्यासपीठावर राजकारणी असू नये असे मत व्यक्त झाल्याने साहित्य रसिक म्हणून उपस्थित असलेल्या केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण यांनी प्रेक्षकांत बसणे पसंत केले होते. त्यानंतर सन १९७५ च्या कऱ्हाड येथे संपन्न ५१ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष दुर्गाबाई भागवत होत्या. तिथे त्यांचे भाषण, स्वागताध्यक्ष म्हणून तर्कतीर्थांनी केलेले भाषण, वि. स. खांडेकरांनी जयप्रकाश नारायण यांच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून प्रार्थना करण्याची केलेली विनंती व त्यानंतरचे भाषण यात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा ऐरणीवरचा विषय बनला होता. आणीबाणीमुळे सन १९७६ चे संमेलन झाले नाही. सन १९७७ च्या संमेलनात पूर्वाध्यक्ष म्हणून दुर्गाबाई भागवत यांना नव्या अध्यक्षांकडे सूत्रे सोपविणारे भाषण करायचे होते. या सर्व पार्श्वभूमीवर झालेल्या घटनांची प्रतिक्रिया म्हणून पुण्याच्या 'केसरी' वृत्तपत्राचे वाई प्रतिनिधी अनिल जोशी यांनी घेतलेली मुलाखत. या संमेलनास तर्कतीर्थ उपस्थित होते. त्यात कोशकारांचे सत्कार झाले. त्यात तर्कतीर्थांचा समावेश होता. २८ नोव्हेंबर १९७७ च्या दैनिक 'केसरी'पुणे मध्ये प्रकाशित ही मुलाखत.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिवसेंदिवस वाद-वादंगांचे वाढते प्रस्थ, प्रकार हे तर्कतीर्थांसारख्या व्यासंगी विचारवंतास खंतावणारी गोष्ट होती. तर्कतीर्थांच्या विचारानुसार अशी साहित्य संमेलने ही सांस्कृतिक व्यासपीठे असतात. तिथला व्यवहार सुसंस्कृतच हवा. जे घडले ते निषेधार्ह असे मत व्यक्त करत ते या मुलाखतीत पुढे म्हणतात की, साहित्यिक आणि राजनैतिक यात मतभेद असण्यात गैर नाही; पण अन्यांचा अनादर मात्र गैरच ! दुर्गा भागवत या कोपिष्ट. दुर्वास ऋषीपण कोपिष्ट होते, तरी आपण त्यांचा विद्वत्तेमुळे आदर करतो. ती आपली संस्कृती आहे, तिचा विसर पडता कामा नये. साहित्य संमेलने केवळ साहित्यिकांची नसून ती सर्वांची असतात. महत्त्व साहित्यिकांना असते. अशा ठिकाणी सामंजस्य हवे. वर्तमान अध्यक्षपद निवड प्रक्रियेत त्रुटी आहेत. त्या दूर व्हाव्यात. शासकीय अनुदान व पुरस्कारांबद्दलची भूमिका सकारात्मक हवी. मुलाखतीतील ही सारी मते एका अनुभवी, ज्येष्ठ साहित्यिकाने दिलेला वडीलकीचा सल्ला म्हणून गंभीरपणे घेणे गरजेचे वाटते.

### ७४) विश्वकोश कार्य : एक कटाक्ष (१९८१)

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणेमार्फत वाई येथे चालविल्या जाणाऱ्या द्रविड हायस्कूलमार्फत 'वैनतेय' वार्षिक प्रतिवर्षी प्रकाशित होत असते. त्या वार्षिकाच्या सन १९८१च्या अंकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एक मुलाखत प्रसिध्द झाली होती. तिचा हेतू मराठी विश्वकोशाचे वाई येथे कसे कार्य चालते हे समजून घेते होते. त्या शाळेच्या सन १९८१ मध्ये इयत्ता ९ वीमध्ये शिकणाऱ्या कुमार जमदाडे, गोगटे, घोडवडेकर, देवकुळे, जोशी, महाशब्दे, बापट, महेंद्र कुलकर्णी, श्रीराम कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी ही मुलाखत घेतली होती.

मुलाखतीपूर्वी या विद्यार्थ्यांनी विश्वकोश कार्यालय, ग्रंथालय, छापखाना, कागद कारखाना इ.ना भेट देऊन कार्य समजून घेऊन मग तर्कतीर्थांना प्रश्न विचारले होते. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत तर्कतीर्थांनी सांगितले की, प्राज्ञपाठशाळेत मराठी विश्वकोशापूर्वी 'धर्मकोश', 'मीमांसाकोष' कार्य सुरू झाले होते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईची स्थापना स्वतंत्र महाराष्ट्र राज्य १ मे, १९६०ला स्थापन करण्यात आले. सन १९६२मध्ये यांचे नियोजन मंडळाने केले. मंडळाकडे अभ्यागत संपादक इ. कर्मचारी आहेत. ते अहोरात्र यासाठी झटत आहेत. नोंद लेखनास मार्गदर्शक साहित्य 'परिचय ग्रंथ'रूपाने प्रकाशित आहे. मंडळाचे ४०,००० संदर्भग्रंथांचे समृध्द ग्रंथालय आहे. नोंदींचे विधिवत संपादन करण्यात येते. या प्रकल्पपूर्तीस सुमारे १ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. येत्या आठ वर्षात मूळ १७ खंड, शिवाय परिभाषा खंड, सूची खंड, नकाशा खंड मिळून २० खंड नियोजित आहेत. यात प्राचीन व आधुनिकाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न आहे. धर्मशास्त्र आदेशानुसार बुध्दीची नित्य वाढ होईल, असे अध्ययन अपेक्षित आहे. भारतीयांनी आपल्या संस्कृतीच्या प्रेरणेने नवनवे आधुनिक ज्ञान संपादन केले, तर नव्या-जुन्याचा संगम साधणे शक्य आहे.

या मुलाखतीतून मराठी विश्वकोश नियोजन व कार्यवाहीवर प्रकाश पडतो.

### ७५) प्राचीन भारतीय ग्रंथालये (१९८१-८२)

लोकमान्य टिळक ग्रंथ संग्रहालय, वाई (जि. सातारा)ची स्थापना लोकमान्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंतन स्मारक करण्याच्या इराद्यापासून झाली. प्रारंभिक सोपस्कार पूर्ण करून प्रत्यक्ष ग्रंथालय सुरू होण्यास सन १९२८-२९ वर्ष उजाडावे लागले. नंतरच्या काळात वाईतील सन १८५२मध्ये लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या पुढाकारातून स्थापिलेल्या 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'मध्ये लोकमान्य टिळक ग्रंथ संग्रहालय विलीन झाले. या संस्थेचा सुवर्णमहोत्सव सन १९८१-८२ मध्ये साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने प्रकाशित स्मरणिकेत या संस्थेचे विश्वस्त व दैनिक 'केसरी'चे प्रतिनिधी अनिल जोशी यांनी घेतलेली 'प्राचीन भारतीय ग्रंथालय' विषयावरील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची मुलाखत प्रसिध्द झाली होती.

तर्कतीर्थांच्या मतानुसार भारतात लेखन कला कशी विकसित झाली, हे सांगणे कठीण. तथापि, ती ऋग्वेद काळात विकसित झाली असावी. कारण, ऋग्वेदात 'ऋचो अक्षरे' उल्लेख

आढळतो. वेदांत वर्ण शब्द येतो. अ, आ, इ, ई वर्ण शब्दांचा दुसरा अर्थ रंग आहे. वर्ण रंगाने लिहिले जात. शाईचे अनेक रंग आढळतात. ते चित्रात ही दिसून येतात. लेखन कला पाणिनीच्या काळात सुरू झाल्याचे लक्षात येते. पाच हजार वर्षांपूर्वी लेखनकला इजिप्तमधील असीरिअन, बॉबिलॉन संस्कृतीत सुरू झाली. तिचा प्रारंभ इष्टिका ग्रंथांतून झाला. पुस्तक नंतर अस्तित्वात आले. प्रथम गुंडाळया असत. त्यांच्या बांधणीतून पुस्तक आकारले. ग्रंथ संस्कृती ग्लेच्छांनी भारतात आणली. राजदरबारात लेखनिक असत. ग्रंथालयेही प्रथम तिथेच सुररू झाली. नंतर सार्वजनिक ग्रंथालयांचा उदय झाला. इजिप्तमधील अलेक्झांड्रिया शहरात मोठे ग्रंथालय होते. ते युध्दात उद्ध्वस्त झाले. भारतात 'सरस्वती भांडार' रूपात काशीत ग्रंथालय सुरू झाले. शिलालेख हे लेखन कलेचे विकसित रूप. ते इतिहास साधन बनले. पूर्वी नालंदा, तक्षशीला विद्यापीठात मोठा ग्रंथसंग्रह होता. ब्रिटिशांनी भारतात अनेक नेटिव्ह लायब्ररी सुरू करून तिला चळवळीचे रूप दिले. भारतीय प्राचीन ग्रंथांची अनेक भाषांतरे झाल्याचे दिसून येते.

**७६) मराठीवर मराठी माणसाचा विश्वास नाही (मे, १९८४)**

'ललित' मासिक, मुंबईच्या वतीने मुलाखती व 'मॅजेस्टिक गप्पा' कार्यक्रमाची परंपरा जुनी आहे, यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अनेक मुलाखतींचे संदर्भ आढळतात; पण सविस्तर संहिता हाती येत नाही, अशा मुलाखतींपैकी एक मुलाखतीचा संक्षिप्त वृत्तांत या मासिकाच्या मे, १९८४ च्या अंकात हाती लागतो. ८ एप्रिल, १९८४ रोजी झालेली ही मुलाखत माधव गडकरी, उमाकांत ठोंबरे आणि सुभाष भेंडे यांनी घेतली होती.

यातील मजकुरानुसार तर्कतीर्थांनी मुलाखतीत स्पष्ट केले आहे की, प्रारंभी मी माधुकरी मागून वाईत शिकत होतो. त्याकाळात जटाधारी होतो. लोक श्रध्देने माझ्या पाया पडत. गंमत म्हणजे जटा काढल्यावर लोकांचे पाया पडणे बंद झाले. आणखी गमतीची गोष्ट म्हणजे कुत्री अंगावर यायचीही बंद झालीत. तर्कतीर्थांनी इंग्रजीचे प्राथमिक धडे आचार्य विनोबा भावे यांच्याकडे गिरविले. तर्कतीर्थांनी आपल्या या मुलाखतीत नि:संदिग्ध शब्दात मान्य केले की, आजच्या काळात धर्मपीठांचा सामाजिक विकासासाठी अजिबात उपयोग नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार आज मराठी भाषेची फार कुचंबणा झालेली आहे. तिच्यामध्ये भावाविष्काराची मोठी शक्ती असूनही ती ज्ञान-विज्ञानाची भाषा झालेली नाही. त्यासाठी परिश्रमाची गरज आहे; पण तशी महत्त्वाकांक्षा विद्वानांमध्ये दिसत नाही. अलीकडे घरगुती पत्रेही इंग्रजीत लिहिली जातात. हे एकप्रकारचे भाषिक प्रदूषणच आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, मराठीवर मराठी भाषिकांचा विश्वास नाही. अशीच स्थिती भविष्यकाळात चालू राहिली तर मराठीचा विकास लटपटच होत राहणार.

तर्कतीर्थांच्या या चिंतनात मराठीविषयीची चिंता गांभीर्याने घेण्याची गरज असताना मराठी भाषा विकासविषयक धोरणे आणि व्यवहार यात टोकाची विसंगती दिसते. म्हणजे फलक मराठी लिहिण्याचा कायदा; पण फळयावर इंग्रजीच शिकविले जाईल असा बंदोबस्त! मराठी समाजमन इंग्रजाळलेले आहे हेच खरे!!

## ७७) संस्कृतीचा मुख्य गाभा म्हणजे भाषा (१९८९)

पहिली जागतिक मराठी परिषद १२ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबईत संपन्न झाली होती. तेव्हा महाराष्ट्र राज्याचे मुखपत्र असलेल्या पाक्षिक 'लोकराज्य'ने 'जागतिक मराठी परिषद विशेषांक' १६ ऑगस्ट १९८९ रोजी प्रसिद्ध केला होता. त्यात दत्ता कुलकर्णी यांनी घेतलेली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एक मुलाखत प्रसिद्ध झालेली आहे. भारतीय संस्कृती, मराठी भाषेचे भवितव्य, उद्याच्या उज्ज्वल महाराष्ट्राचे चित्र व त्यासाठी ध्येयधोरणे आणि जागतिक मराठी परिषद यासंदर्भातील तर्कतीर्थांचे विचार जाणून घेण्याच्या अनुषंगाने ही मुलाखत उल्लेखनीय झाली आहे.

तर्कतीर्थांनी भाषेस संस्कृतीचे संवाहक आणि संवर्धक साधन या अर्थाने ती संस्कृतीचा गाभा असल्याचे सांगून म्हटले आहे की, निसर्गात साधन निर्मित करून बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नांतून संस्कृतीची निर्मिती होत असते. यासंदर्भात भाषा संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे. प्राण्यांना फक्त आवाज असतो, माणसाला भाषा असते. माणसाने ध्वनीला अर्थाची जोड देऊन भाषा, लिपी, साहित्य निर्माण केले. अभिव्यक्ती आणि आविष्काराची घडण यातून झाली. लेखन कलेतून साहित्य, चित्रकला इत्यादी निर्माण झाले. भारतीय संस्कृती बहुभाषा आहे, तशीच बहुलिपिकही. साहित्य उन्नत संस्कृतीतच निर्माण होत असते. संस्कृती मानवनिर्मित असते. माणूस स्वतःत, समाजात बदल घडवून आणत जग बदलत असतो.

भाषेमुळे विज्ञान, ग्रंथ इत्यादी निर्मिती झाली आहे. त्यामुळे संस्कृती विकासास गती आली आहे. या गतीमुळेच सांस्कृतिक आदानप्रदान घडून येत असते. यातून वैश्विक संस्कृती साकारत असते. पद्याचे रूपांतर गद्यात होणे हा सांस्कृतिक परिणाम होय. जी संस्कृती देऊ शकत नाही, ती व्यर्थ असते. आज हिंदू संस्कृतीचे आकर्षण जगभर आहे. बौद्ध, जैन, शीख इत्यादी धर्म मुलतः हिंदूच आहेत. त्यांची मुळे आपल्या वैदिक संस्कृतीत आपणास पाहावयास मिळतात. ती संस्कृती श्रेष्ठ, कारण तिच्याकडे संस्कृतसारखी समृद्ध भाषा होती. भाषेमुळेच संस्कृतीस समृद्धी व श्रेष्ठता येते. मराठी भाषा इंग्रजी अवलंबित झाल्याने तिचा पुरेसा विकास होऊ शकला नाही. ती पराधीन भाषा राहिली. जोवर एखादी भाषा ज्ञान-विज्ञानवाहक होत नाही, तोवर ती समृद्ध होऊ शकत नाही. जात, धर्म, विचारांचे सामरस्य व मूल्यांचे संस्कार यातून श्रेष्ठ संस्कृती घडत असते. म्हणून आपली भाषा जागतिक व्हायची तर ती ज्ञानभाषा व्हायला हवी.

## मुलाखतींतून साकारणारे तर्कतीर्थ : चरित्र आणि व्यक्तिमत्त्व

इथंपर्यंत पाहिलेल्या सर्व मुलाखती या स्वातंत्र्योत्तर काळातील आहेत. वर्षाला सरासरी एक पडेल अशा, त्या अर्थाने त्या जीवनाच्या उतरार्धातील असल्या तरी पूर्वार्धावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. प्रा. मे. पुं. रेगे, पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, श्रीराम पुजारी, अनंत विष्णू पाटणकर, श्री. पु. भागवत, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. म. द. हातकणंगलेकर, प्रा. अरुण

चव्हाण, डॉ. म. वि. गोखले, दत्ता सावळे, प्रा. सुधाकर पवार, डॉ. सुधीर रसाळ, डी. मुजुमदार (प्रतिनिधी, द टेलिग्राफ, कलकत्ता), अनिल जोशी (प्रतिनिधी, दैनिक केसरी, वाई), बाबूराव शिंदे (प्रतिनिधी, दैनिक सकाळ, सातारा), दत्ता कुलकर्णी (पाक्षिक लोकराज्य, मुंबई) प्रभृती मान्यवरांनी या मुलाखती घेतल्या असल्याने त्या भाषा, साहित्य, शैली, रचना, आशय, वैविध्य, विचार इत्यादी अंगांनी समृद्ध आणि दर्जेदार आहेत. त्यात वाचनीयता, विचारप्रवणता, दृष्टी देण्याचे सामर्थ्य आणि मौलिकता आहे. दैनिक 'केसरी', दैनिक 'सकाळ', दै. 'द टेलिग्राफ', पाक्षिक 'लोकराज्य', मासिक 'मौज', 'शब्दरंजन', 'नवभारत', 'उगवाई', वार्षिक 'ऋतुरंग'सारख्या लब्धप्रतिष्ठित नियतकालिकांमधून सन १९४९ ते १९९४ अशा ४५ वर्षांत प्रसिद्ध झाल्या आहेत. पैकी काही ग्रंथांमधून तर काही विविध आकाशवाणी केंद्रांवरून (पुणे, जळगाव, औरंगाबाद इत्यादी) प्रकाशित वा प्रक्षेपित झालेल्या आहेत. स्वरूपाच्या अंगाने विचार करायचा झाला, तर अधिकांश मुद्रित, तर काही श्राव्य आहेत. एकूण मुलाखतींपैकी अधिकांश दैनिक 'केसरी'साठी अनिल जोशी यांनी घेतलेल्या आहेत. या मुलाखती प्रश्नोत्तर शैली, लेखरूप, प्रतिसाद, प्रतिक्रियारूप आहेत. काही दीर्घ तर काही संक्षिप्त आहेत. अपवाद मुलाखतीत वस्तुनिष्ठ उत्तरे आढळतात. अधिकांश मुलाखती विवेचन, विश्लेषण, मीमांसा, टीका-टिपणी करणाऱ्या आहेत. 'द टेलिग्राफ' मध्ये प्रकाशित इंग्रजी मुलाखतीचा अपवाद वगळता उर्वरित सर्व मुलाखती मराठीत आहेत. विषय स्वरूप लक्षात घेता त्या आत्मपर, परात्मपर, व्यक्तिविशेषांच्या चरित्रांचा उलगडा करणाऱ्या, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक प्रश्न, समस्यांचा उलगडा, मीमांसा, भाष्य करणाऱ्या, तोडगा सुचविणाऱ्या आहेत. विषयांची द्विरुक्ती नाही, चर्वितचर्वण नाही. प्रत्येक मुलाखतीच्या विषयाचे स्वतंत्र अस्तित्व नि दृष्टी आहे. तर्कतीर्थांचे चरित्र व व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणाऱ्या या मुलाखती माणूस, समाज, राष्ट्र, विश्व समजून घ्यायचा वस्तुपाठ आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्म २७ जानेवारी १९०१ रोजी पिंपळनेर (जि. धुळे) येथे झाला. वडिलांचे नाव बालाजी, तर आईचे नाव चंद्रभागा होते. घरी याज्ञिकी, ज्योतिषी, पौरोहित्य करण्याचा पारंपरिक व्यवसाय होता. वडिलांना आपल्या मुलाने संस्कृत पंडित व्हावे असे वाटे, म्हणून त्यांनी लक्ष्मणास वयाच्या चौदाव्या वर्षी प्राज्ञपाठशाळा, वाई (जि. सातारा) येथे दाखल केले. नारायणशास्त्री मराठे त्यांचे गुरू झाले. येथे ते आपल्या गुरूंकडून न्याय - वेदान्त शिकले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी काशीस प्रयाण केले. तेथील शिक्षण पूर्ण करून त्यांनी शासकीय संस्कृत महाविद्यालय, कलकत्ता येथून सन १९२३ मध्ये 'तर्कतीर्थ' पदवी संपादन केली आणि वडिलांच्या स्वप्नाप्रमाणे संस्कृत पंडित म्हणून अध्यापन करू लागले. आपले गुरू नारायणशास्त्री मराठे संन्यस्त झाले व स्वामी केवलानंद सरस्वती नाम धारण करून संस्थागत संन्यास धारण करून 'धर्मकोश', 'मीमांसाकोश' निर्मितीत मग्न झाले. तर्कतीर्थ स्वामींच्या या कार्यास हातभार लावीत. तद्वतच स्वामींबरोबर विविध धर्मसभा, पंडित परिषदा, वाद-विवाद,

चर्चा इत्यादींमध्ये सक्रिय सहभागी होत. सर्वत्र धर्मसुधारणा, प्राचीनास आधुनिकाशी जोडणे इत्यादींमुळे ते सनातन वृत्तीच्या पंडितांना परंपराविरोधी वाटत. सर्वच ठिकाणी वाद, संघर्ष ठरलेला असायचा.

या शब्दप्रामाण्याचा कंटाळा येऊन त्यांनी स्वतःस क्रांतिकारी सहकाऱ्यांच्या साहचर्य व प्रभावामुळे स्वातंत्र्यचळवळीस जोडून घेतले. सन १९३० च्या कायदेभंग सत्याग्रहात ते प्रभावी वक्ते, कुशल संघटक व नीडर नेते म्हणून उदयास आले. कळवण (जि. नाशिक) च्या जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केले. या काळात त्यांना धुळे, येरवडा येथे प्रत्येकी सहा महिन्यांचा असा तीनदा तुरुंगवास भोगावा लागला. इथे त्यांची भेट जमनालाल बजाज, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, द्वा. भ. कर्णिक, गुलजारीलाल नंदा, काकासाहेब गाडगीळ प्रभृती मान्यवरांशी झाली. प्राज्ञपाठशाळेत शिकत असताना विनोबा भावे त्यांचे सहाध्यायी होते. तेव्हा नि नंतर विनोबांनी तर्कतीर्थांना इंग्रजी शिकविले होते. तुरुंगवासात त्यांनी विशेषत्वाने मार्क्सवाद, गांधीवाद, रशियन क्रांती इत्यादींचे वाचन केले. संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी साहित्य वाचनाने ते चतुरस्र ज्ञानार्थी बनले. तुरुंगातून सुटताच महात्मा गांधींपर्यंत त्यांच्या पांडित्याची व स्वतंत्र मीमांसा करण्याच्या क्षमतेची वार्ता पोहोचली.

महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणसदृश सामाजिक कार्यात स्वतःस वाहून घेण्याचे ठरवून हळूहळू ते सक्रिय राजनीतीपासून येरवडा (पुणे) कारागृहातील वास्तव्य काळात दूर करत गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर झालेल्या राखीव मतदार संघसंबंधी मतभेद, त्याचे एक कारण ठरले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, स्वामी केवलानंद सरस्वती व अन्य धर्मपंडितांकडून महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणसंबंधी सनातनी व पुरोगामी पंडितांचे दृष्टिकोन सप्रमाण समजून घेतले व त्यांनी अस्पृश्यता निवारणसंबंधी कार्यक्रमास अंतिम रूप दिले. आपला कनिष्ठ मुलगा देवदास याचा विवाह सी. राजगोपालाचारी यांची कन्या लक्ष्मीशी करण्यासंदर्भातील आंतरजातीय विवाहसंबंधी धर्मप्रमाणे समजून घेऊन संमती दिली, ती तर्कतीर्थांकडून प्रायश्चित्त विधान जाणून घेऊनच. पुढे महात्मा गांधींनी आयुष्यभर केवळ आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांनाच उपस्थित राहण्याचा संकल्प करून एकापरीने अशा प्रागतिक विवाह पद्धतीचे समर्थन केले. इतकेच नव्हे तर आपल्या आश्रमातील अशा विवाहांना त्यांनी प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोरटी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारास प्रारंभ केला, तेव्हा महात्मा गांधींनी हा जीर्णोद्धार लोकवर्गणीतून करण्याचा, शिवाय जीर्णोद्धारानंतर हे मंदिर सर्व जाती, धर्मांच्या लोकांना खुले करण्याविषयी सुचविले. हे मंदिर पूर्ण झाल्यावर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर पुरोहितवर्गाने बहिष्कार घातला, त्याचे एकमेव कारण हे मंदिर हरिजनांना खुले होणार होते म्हणून. महात्मा गांधींच्या संपर्कामुळे डॉ. राजेंद्र प्रसादांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व केवलानंद सरस्वती यांना पौरोहित्याची विनंती केली. ते पौरोहित्य केले म्हणून तर्कतीर्थांवर वाईच्या ब्रह्मवृंदांनी बहिष्कार टाकला. या नि अशा अनेक प्रकारच्या

प्रसंगातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरोगामी, कृतिशील धर्मपंडित म्हणून उदयास आले. उपनिषद भाषांतर, भारतीय संविधानाचे संस्कृत भाषांतर (१९५२), धर्मकोश संपादन इत्यादी सर्व कार्यातून त्यांची ख्याती प्राच्यविद्या पंडित म्हणून सर्वदूर पोहोचली. पुढे भारत सरकारने 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' म्हणून त्यांचा सन्मान केला (१९७३).

सन १९३५ नंतरच्या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, एम. एन. रॉय यांच्या क्रांतिकारी विचारांनी प्रभावित होऊन रॉयवादी बनले. सन १९४० ते १९४८ ते 'रेडिकल डेमॉक्रेटिक पार्टी' या पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते, पदाधिकारी म्हणून सक्रिय होते, ते पक्ष विसर्जनापर्यंत. सन १९४८ मध्ये कलकत्ता येथे संपन्न झालेल्या पक्षाच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनात भारतीय समाज क्रांतीस अनुकूल नसल्याची नोंद घेण्यात येऊन पक्ष बरखास्त करण्यात आला आणि नवमानवतावादाची स्थापना करण्यात आली.

स्वातंत्र्योत्तर काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुनश्च काँग्रेसमध्ये प्रवेश करून यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वास समर्थन देण्याचे धोरण अंगीकारले. त्यामुळे महाराष्ट्र काँग्रेस संयुक्त महाराष्ट्र समिती आंदोलनात द्वैभाषिक राज्याचे समर्थन करत राहिली; पण जनक्षोभ व जनाकांक्षा लक्षात घेऊन मराठीचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या मागणीचा पुरस्कार करण्याचे धोरण महाराष्ट्र काँग्रेसने अंगीकारले व महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी होऊन यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून राज्याची धुरा स्वीकारली. मराठी राजभाषा बनवून तिचे स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्याबरोबरीने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. तिचे अध्यक्षपद तर्कतीर्थांना दिले गेले. तर्कतीर्थांनी मराठीस ज्ञानभाषा बनविण्यासाठी विविध ज्ञान-विज्ञानाची मराठी पुस्तके, भाषांतरे, कोश निर्मितीचे धोरण अंगीकारून मराठी विश्वकोश निर्मितीचा महत्त्वाकांक्षी संकल्प सोडला. सन १९७६ मध्ये पहिले चार खंड, परिभाषा खंड, विश्वकोश परिचय ग्रंथ यांची निर्मिती नि प्रकाशन करून दमदार सुरुवात केली. आपल्या हयातीत १५ खंडांचे प्रकाशन करून त्यांनी ज्ञाननिष्ठा सिद्ध केली.

या कार्यास समांतर त्यांनी स्वसाहित्याची निर्मिती करून स्वतंत्र प्रज्ञेचा परिचय करून दिला. 'शुद्धिसर्वस्वम्' (१९३४), 'आनंदमीमांसा' (१९३८), 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४१), 'जडवाद' (१९४१), 'ज्योति-निबंध' (१९४७), 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१), 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत' (१९७३), 'लेखसंग्रह' (१९६४) इत्यादी ग्रंथांचे लेखन, प्रकाशन केले, तसेच साहित्य अकादमीसाठी 'लोकमान्य टिळक लेखसंग्रह' (१९६९), 'राजवाडे लेखसंग्रह' (१९६४) चे संपादन केले. त्यांच्या साहित्याची इंग्रजी, हिंदीत भाषांतरे झाली आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पट्टीचे वक्ते होते. वरील जे साहित्य उपलब्ध आहे, ते अनेक विद्यापीठे, व्याख्यानमालांतील व्याख्यानांचे लिखित रूपच होय. तर्कतीर्थांनी आपली व्याख्याने

एकतर पूर्वनियोजन व पूर्वचिंतन करून दिली. दुसरे असे की, अनेक व्याख्याने नंतर शिस्तबद्ध रीतीने लिहून संबंधित संस्थांना ग्रंथनिर्मितीसाठी सुपूर्द केली. त्यांना सन १९५५ चा मराठी भाषेसाठीचा पहिला पुरस्कार ज्या ग्रंथास लाभला, तो 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१) ग्रंथ भाषणसंग्रहच आहे. महाराष्ट्रात त्यांनी सुमारे ५००० व्याख्याने दिली असावीत.

तर्कतीर्थांचे वाचन व स्मरण तल्लख असायचे. त्यांच्या प्रज्ञाविस्तारात प्राच्यविद्या ग्रंथांचा मोठा वाटा आहे. वेद, उपनिषद, पुराण, ब्राह्मणग्रंथ यांचे केवळ वाचन, पाठांतर नव्हते, तर त्यांच्या मीमांसेची क्षमता त्यांनी आपल्या अध्ययन आणि वैचारिक वाटचालीत विकसित केली होती. 'अध्ययन आणि वैचारिक वाटचाल' (१९८१) हे शीर्षक असलेली मुलाखत तर केवळ वाचन व्यासंगावर बेतलेली आहे. संस्कृतशिवाय मराठी, इंग्रजी, हिंदी ते चांगले वाचत नि बोलतही. 'मराठी विश्वकोश', 'धर्मकोश', 'मीमांसाकोश', 'पदनामकोश', 'परिभाषाकोश' यामुळे त्यांचे वाचन चतुरस्र बनले.

त्यांना ९३ वर्षांचे आयुष्य लाभले. आपले दीर्घायुष्याचे रहस्य त्यांनी 'दीर्घायुष्याची सूत्रे' (१९९१) शीर्षक मुलाखतीत स्पष्ट केले आहे. ते नित्य फिरायला जात. पोहणे त्यांना आवडे. नदी स्नानाचा त्यांचा रिवाज होता. योग नियमितपणे करीत. भोजनोत्तर शतपावलीचा नियम त्यांनी कधी मोडला नाही. त्यासाठी ते 'चरणसेवा' शब्दाचा वापर करीत. 'Long you Walk, Long you live' वर त्यांचा विश्वास होता. शास्त्री, पंडित, विद्वानांच्या सहवासात वेळ घालविणे म्हणजे स्वतःला समृद्ध करणे अशी त्यांची धारणा होती; पण वस्तुस्थिती अशी होती की, त्यांच्या ऐकण्या-बोलण्याने इतरेजन समृद्ध होत.

'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार ।
शास्त्र ग्रंथ विलोकन, मनुजा येतसे चातुर्य फार ॥'

ही आर्या त्यांच्या जीवनाचे सार्थ प्रतिबिंब होय. प्रवास नित्याचा. प्रवासात वाचन ठरलेले. प्रवासात पुस्तके अनिवार्यपणे हाती असे. त्यांच्या ज्ञानसाधनेचा तो आवश्यक भाग होता.

सन १९८३ ला तर्कतीर्थ भारतीय संस्कृती संसद, कलकत्ता यांच्या एका पुस्तक प्रकाशन सोहळ्यास कलकत्त्यास गेले होते. तेव्हा 'द टेलिग्राफ'चे प्रतिनिधी डी. मुजुमदार यांनी घेतलेली मुलाखत 'Of Marx and encyclopaedias' (1983) या खंडात आहे. त्यात तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीच्या काही नोंदी आढळतात. त्यानुसार "त्र्याऐंशीव्या वर्षीही स्मरणशक्ती तल्लख आहे. भाषेवर अपूर्व असे प्रभुत्व आढळले. आपण जे बोलतो, ते नंतर मागे घ्यावे लागत नाही, दुरुस्त करावे लागत नाही किंवा सुधारावेही लागत नाही. हा त्यांनी स्वतःवर व्यक्त केलेला विश्वास अचंबित करणारा आहे.'' अशा प्रकारे त्यांच्या चरित्र आणि व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे लेखन उपलब्ध आहे. श्री. शं. नवरे, द्वा. भ. कर्णिक, प्रा. मे. पुं. रेगे, यशवंतराव चव्हाण, रा. ना. चव्हाण, प्रा. यु. म. पठाण, प्रा. श्री. म. भावे, प्रा. रा. ग. जाधव, गोवर्धन पारीख, एम. एन. रॉय, प्रा. य. दि. फडके, माधव गडकरी, श्री. ग. माजगावकर, नरेंद्र चपळगावकर, प्राचार्य

शिवाजीराव भोसले प्रभृती मान्यवरांनी सहवासातून चितारलेले तर्कतीर्थ वाचणे हा ब्रह्मानंद वाटावा असा.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील त्यांच्या सहभागावर प्रकाश टाकणाऱ्या दोन मुलाखती पु. ल. देशपांडे आणि श्रीराम पुजारी या त्यांच्या स्नेह्यांनी 'आकाशवाणी'साठी घेतलेल्या होत्या. त्यातून त्यांच्या स्वातंत्र्यचळवळीतील योगदानावर प्रकाश पडतो. ब्रिटिश इंटेलिजन्स रिपोर्टस् उपलब्ध आहेत. त्यात तर्कतीर्थांचे वर्णन प्रमुख कार्यकर्ते म्हणून असणे यातून त्यांचे चळवळीतील योगदान व सक्रियत्व स्पष्ट होते.

एखाद्या प्रश्न, समस्येची उकल करणारे भाष्य करावे ते तर्कतीर्थांनीच. 'सुटलेली कोडी' (१९८८), 'भारतीय संस्कृती.....काही समस्या' (१९४९), 'राजकीय क्षेत्रातील नीतिमत्ता' (१९६२), 'मंडल आयोगाची मीमांसा' (१९८०) सारख्या मुलाखती वाचताना हे प्रकर्षाने लक्षात येते. मुलाखतीला तर्कतीर्थांची निवेदने सप्रमाण व तर्कशुद्ध असतात हे विशेष. काही ठिकाणी त्यांचे मौन मोठे सूचक असते. हा त्यांच्या मुत्सद्दी राजकारणी व्यक्तिमत्त्वाचा पुरावा होय. ते प्राज्ञपुरुष, पंडित, बुद्धिजीवी, विचारवंत, ज्ञानी होते खरे; परंतु मुरब्बी राजकारण्यांमधील त्यांची नित्याची ऊठबस, सहवास, संपर्क 'फुलासंगे मातीस गंध' की 'मृदगंधे कुंभ शोभायमान' याचा निर्णय करणे मात्र अवघड. हे अद्वैत ते लीलया जपत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना ज्या महापुरुषांचा सहवास, संपर्क, साहचर्य लाभले, त्यातून त्यांच्यातला प्रखर विचारक, कुशल संघटक आणि पुरोगामी प्रबोधक घडला हे मात्र निर्विवाद. इथे त्यांनी अनेक मान्यवरांवरील दिलेल्या मुलाखती आहेत. अशाच अनेक मान्यवरांवर केलेले त्यांचे लेख, व्यक्तिचित्रे उपलब्ध आहेत. हा मनुष्यसंग्रह या माणसाचे थोरपण अधोरेखित करणारा ठरतो. वरिष्ठांबद्दल आदर, सहकाऱ्यांबद्दल कृतज्ञता आणि कनिष्ठांबद्दल सद्भाव हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे वैभवी रूप लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित मदनमोहन मालवीय, एम. एन. रॉय, यशवंतराव चव्हाण, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, लोकनायक बापूजी अणे, गोवर्धन पारीख, कुमार गंधर्व, पु. ल. देशपांडे प्रभृती मान्यवरांचे सख्य व सहयोग हेवा वाटणारे ठरते. यातील काहींबद्दलच्या येथील मुलाखती परस्परांना समृद्ध करणाऱ्या आहेत.

धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञाने ही तर्कतीर्थांच्या मुशाफिरीची आवडती क्षेत्रे. याच विषयांवर त्यांचे अधिकांश लेखन, व्याख्याने आणि विश्वकोषातील नोंदी आढळतात. मुलाखतींमध्येही या विषयांवरची त्यांची भाष्ये तर्कतीर्थांचा अधिकार सिद्ध करणारी आहेत. अशा विवेचनात संज्ञा, व्याख्या, परिभाषा उद्धृत करणे, सुभाषित वापर, तुलनात्मक संदर्भ देणे यातून त्यांच्या स्मरणशक्तीचा विस्मयकारी प्रत्यय नित्य येत असतो. प्राच्य आणि आंग्ल दोन्ही धारेचे त्यांचे वाचन, चिंतन, मनन तोडीस तोड देणारे राहिले आहे. प्राच्य विद्याशाखेवर त्यांचे प्रेम आहे; पण वृथा अभिमान त्यांनी कधी बाळगला नाही. प्राच्य वाङ्मय त्यांच्यादृष्टीने सदैव वैश्विक

राहत आले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आस्तिक की नास्तिक असा वस्तुनिष्ठ निवाडा घ्यायचा झाला, तर ते आस्तिकच. तशी कबुली त्यांनी 'चैतन्य हेच ईश्वराचे रूप' (१९९४) या अंतिम काळातील मुलाखतीत स्पष्ट केले आहे. श्री. शं. नवरे यांनी 'शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे' शीर्षकाचा लेख सन १९४४ मध्ये दैनिक 'लोकमान्य'मध्ये लिहिला होता. त्यात त्यांनी 'शास्त्रीबुवा, आयुष्याचे शेवटी पुन्हा सनातनी होऊन पृथ्वी गोल आहे, हे तुम्ही पुन्हा सिद्ध करून देणार'[२७] असे केलेले भाष्य आणि वर्तविलेले भविष्य खरे ठरले म्हणायचे. आयुष्यभर पुरोगामीपणाची पाठराखण करणारे तर्कतीर्थ रूढ अर्थाने मात्र सनातनी नव्हते.

निकराच्या क्षणी स्पष्ट व कणखर भूमिका घेण्याचे तर्कतीर्थांनी जे धाडस दाखविले त्याची अनेकदा त्यांना अवमान, उपेक्षा, टीका, बहिष्कार इत्यादी रूपात किंमतही मोजावी लागली आहे, तरी ते आपल्या मतावर ठाम राहिले आहेत. संयुक्त महाराष्ट्र समिती लढा, सती प्रथा, मंडल आयोग, मंदिर प्राणप्रतिष्ठा पौरोहित्य अशा अनेक प्रसंगांमधील त्यांच्या भूमिका पुरोगामी राहत आल्या आहेत. असे असले तरी मतभेद आणि मनभेद यातील अंतर ते समजत असल्याने अपवाद क्षणी त्यांच्या भूमिका सामंत्र्याच्याच राहिल्या आहेत. पक्षप्रचारार्थ वाईस आले असता अटलबिहारी वाजपेयी यांनी सभेस उपस्थित राहण्याचे हार्दिक निमंत्रण दिले. पक्षभेद विसरून तर्कतीर्थ त्या सभेस उपस्थित राहिले आहेत. शंकराचार्यांनी चातुर्वर्ण्याचे समर्थन केल्यावर त्यांच्याशी प्रतिवाद करणारे तर्कतीर्थ अगोदर लोटांगण घालून अभिवादन करतात; पण नंतर प्रश्नांची सरबत्ती करून आपली मते मुलाहिजा न ठेवता मांडतात. यातून व्यक्ती, पद आदराची सुसंस्कृतता दाखवत ते विवेकवादी विचारांचे रक्षण करतात, अशी एकाच वेळी लव्हाळ्याची नम्रता व महावृक्षाची कठोरता अंगी बाणतात.

या खंडातील सर्व मुलाखती म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या आयुष्यातील उत्तरार्धात झालेल्या वैचारिक विकासाचा आलेख होय. ती एका समाजप्रेषिताची प्रवचने वाटावी असे दीपस्तंभसदृश मार्गदर्शन समाजास मिळते. ज्यांना कुणाला धर्म, संस्कृती, भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान, राजकारण, समाजकारण, शिक्षण इत्यादी क्षेत्रांतील न सुटणारी कोडी, प्रश्न, समस्या असतील त्यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय', खंड-६ (मुलाखतसंग्रह) वाचावा. तुम्हास तुमच्या प्रश्न, समस्येचे उत्तर मिळाल्याशिवाय राहणार नाही.

सदर खंड साकारणारे सर्व मुलाखतकार, ते प्रकाशित करणारे संपादक, आकाशवाणी केंद्रे व त्यांचे संचालक, विविध ग्रंथालये, अन्य ज्ञात-अज्ञात साहाय्यक सर्वांचे आभार. 'केसरी'चे अनिल जोशी यांचे विशेष आभार. त्यांच्या 'संवाद : तर्कतीर्थांशी' ग्रंथ संपादन, प्रकाशनामुळे 'Well bigining is half done' म्हण सार्थक वाटली. सलामीसच मी अर्धी लढाई जिंकू शकलो.

दि. १८ डिसेंबर २०२०

**- डॉ. सुनीलकुमार लवटे,**
संपादक

**संदर्भ**

१) वागळे, निखिल: **ग्रेट भेट** - अक्षर प्रकाशन, मुंबई (२०१३)

२) कांबळे, उत्तम: **लढणाऱ्यांच्या मुलाखती** - मनोविकास प्रकाशन, पुणे (२००८)

३) अवटी, गोपाळ: **सृजन संवाद - संवाद** (भाग १ आणि २), भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर (२०२०)

४) शेवते, अरुण: **ऐवज** - ऋतुरंग प्रकाशन, मुंबई (२०१०)

५) वझे, माधव: **रंगमुद्रा** - राजहंस प्रकाशन, पुणे

६) खांडेकर, वि. स. (संपा.) लवटे, डॉ. सुनीलकुमार: **ऋतू न्याहाळणारं पान** - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (२००८)

७) रेगे, प्रा. मे. पुं. (संपा.): **नवभारत** (मासिक)- प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (१९८१, १९८४, १९८८)

८) कांता, अभय (संपा.):**परिवर्तनाचा वाटसरू** - पुणे (२०२०)

९) शिरसाठ, विनोद (संपा.): **साप्ताहिक साधना** - ४३१, शनिवार पेठ, पुणे (२०२०)

१०) कोठावळे, अशोक (संपा.):**ललित** (मासिक) - गोरेगाव, मुंबई - ४००००४ (२०२०)

११) रेगे, प्रा. मे. पुं. (संपा.): **नवभारत** (मासिक) - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (१९८०)

१२) चौसाळकर, डॉ. अशोक (संपा.): **समाज प्रबोधन पत्रिका** (त्रैमासिक), रत्नाप्पा कुंभारनगर, कोल्हापूर (२०२०)

१३) कुबेर, गिरीश (संपा.):**लोकसत्ता** (दैनिक) - इंडियन एक्स्प्रेस ग्रुप, मुंबई (२०२०)

१४) लवटे, डॉ. सुनीलकुमार: **भारतीय भाषा व साहित्य** - साधना प्रकाशन, पुणे- ३० (२०१७), पृ. १७३, १७४.

15) Fay, Sarah: **The Pricarious State of Literary Interview** - (The Atlantic / May, 23, 2012). https://www.theatlantic.com,Page - 4.

१६) अवटी, गोपाळ: **सृजन संवाद** (भाग १ आणि २), भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर (२०२०), पृ. १२.

17) Fay, Sarah: **The Precarious State of Literary Interview** - (The Atlantic, May, 23, 2012), Page-5

१८) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **श्री. एन. बी. मराठे यांनी श्री राम कोल्हटकर यांना लिहिलेले दि. २६-३-१९८३ चे पत्र**. (अध्यक्षीय पत्रव्यवहार, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई)

१९) भारतीय संस्कृती संसद: **m.facebook.com** > community.

२०) गोखले, डॉ. म. वि.: **साहित्यरंग** - श्रद्धा प्रकाशन, पुणे ४११०३७ (मे. १९९०), पृ. ९२

२१) मर्ढेकर, बा. सी.: **वाङ्मयीन महात्मता** - रामकृष्ण प्रकाशन, मुंबई, १९४०, पृ. ११ ते ५७

२२) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.):**लोकमान्य टिळक लेखसंग्रह** - साहित्य अकादमी, नवी दिल्ली (१९६९), प्रस्तावना

२३) -- **(तत्रैव)** --- पृ. ५१

२४) -- **(तत्रैव)** --- पृ. ५१

२५) जोशी, अनिल: **संवाद ; तीर्कतीर्थांशी** - यशदा प्रकाशन, पुणे (२६ मे २०१०), पृ. २२

२६) -- **(तत्रैव)** --- पृ. २८

२७) नवरे, श्री. शं.: **'शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे'**, दैनिक लोकमान्य, दि. १५ डिसेंबर १९४४, पृ. ४.

○○○

(अ)

# आत्मपर मुलाखती

१

# मी व माझे वक्तृत्व

मुलाखतकार - **अनंत विष्णु पाटणकर**

**प्रश्न - जाहीर सभेत प्रथम आपण कोणत्या साली व कोणत्या प्रसंगी भाषण केलेत? त्याप्रसंगी आपल्याला एकदम धीटपणे बोलता आले का? नसल्यास तसे घडण्यास कोणती कारणे झाली?**

**उत्तर -** मी प्रथम १९२४ साली सोनगीर (पश्चिम खान्देश) येथील पंडित परिषदेत ''हिंदू धर्म परिवर्तनशील आहे'' या विषयावर अर्धा तास भाषण केले. पुणे, काशी, कलकत्ता, मद्रास, इंदूर इत्यादी ठिकाणचे पट्टीचे संस्कृत पंडित व अनेक मठांचे जगद्गुरू आचार्य उपस्थित होते. मी अत्यंत सावधपणे बोललो. धीटपणा म्हणण्यापेक्षा आत्मविश्वास चांगला होता.

**प्रश्न - आजपर्यंत आपली सामान्यपणे जाहीर व्याख्यानांची संख्या कुठपर्यंत गेली आहे?**

**उत्तर -** एक सहस्रापेक्षा अधिक भाषणे आजपर्यंत दिली असतील.

**प्रश्न - भाषण करण्यापूर्वी आपल्याला काही तयारी करावी लागते का? व्याख्यानांची टिपणे करून घेण्याची सवय चांगली का वाईट?**

**उत्तर -** महत्त्वाचा विषय असेल तर तयारी करूनच बोलतो. अगोदर तयार केलेला वा अभ्यासिलेला विषय असेल तर तयारी नाही केली तरी निभावून नेतो. व्याख्यानाची टिपणे करण्याची माझी सवय आहे. व्याख्यानात टिपणे न करता भाषण करणे वाईट, फारच वाईट, त्यामुळे सुसंगती राहत नाही, भाषण उथळ होते. अत्यंत स्फूर्तिदायक प्रसंग यास अपवाद होय. मी व्याख्यान चालू असताना टिपण बहुधा वापरीत नाही, मात्र विश्वविद्यालयीन पद्धतीच्या व्याख्यानांत टिपण वापरावेच लागते.

**प्रश्न - सामान्यपणे आपल्याला कोणत्या विषयावर भाषण करणे जास्त आवडते?**

**उत्तर -** शास्त्रीय वा तात्त्विक विषय अधिक पसंत.

**प्रश्न - वक्तृत्व कला साध्य करण्यास आपल्याला काही अडचणी आल्या का? असल्यास त्या कोणत्या व त्याचा परिहार आपण कसा केलात? वक्तृत्व कला संपादण्यासाठी आपण काही विशेष परिश्रम घेतले आहेत का? असल्यास कोणते?**

**उत्तर -** मूळचा स्वाभाविक वक्ता, या कोटीतला मी नाही. वादविवादाची सवय केवळ तत्त्वचिकित्सेच्या हेतूने लागली. त्यामुळे विचारांची वाढ होऊन हळूहळू स्फूर्ती येऊ लागली. वक्तृत्वाकरिता कसलेही श्रम घेतले नाहीत. विचार वाढीस लागले म्हणून स्फूर्ती येऊ लागली. देशकार्य व धर्मकार्य करताना भाषण देणे अगदी आवश्यक झाले. देशभक्ती व धर्मश्रद्धा यांच्या वाढीतून वक्तृत्व निपजले; पण वक्तृत्व माझ्याठायी 'हुकमी' नाही. मात्र प्रसंगविशेषी सर्वांच्याही पुढे जाऊ शकते.

**प्रश्न - वक्तृत्व म्हणजे काय? वक्तृत्व अंगी येण्यास कोणत्या गुणांची प्राप्ती करून घेतली पाहिजे असे आपले मत आहे?**

**उत्तर -** प्रतिपाद्य विषय मनोज्ञ रीतीने बिंबविण्याची भाषणपद्धती म्हणजे वक्तृत्व. विद्वत्ता, सफाईदार वाक्यरचना, विषयांची माहिती व मनन, प्रतिपादनास आवश्यक अशी कळकळ हे गुण अवश्य पाहिजेत.

**प्रश्न - मराठी भाषेतील वक्तृत्वात काही दोष आहेत काय? असल्यास ते काढून टाकण्याचे उपाय कोणते?**

**उत्तर -** विषयाच्या यथायोग्य मांडणीची आवश्यकता वाटत नाही. वाहवत जाणे, अलंकार किंवा विनोद यांस फाजील महत्त्व, अस्खलितपणाची फाजील मातब्बरी, लांबलचक बोलण्याची सवय, विचारप्रवणतेपेक्षा दणदणीतपणाचे स्तोम. प्रश्न ६ च्या उत्तरांतील गुणांचे संपादन केल्याशिवाय हे दोष जाणार नाहीत.

**प्रश्न - महाराष्ट्रीयनांनी इंग्रजी भाषेत वक्तृत्व करण्याची कला संपादन करण्यासाठी काय काय गोष्टी करणे जरूरी आहे?**

**उत्तर -** इंग्रजीची वाक्यरचना फारच निराळी. ती रचना अंगवळणी पडली तरच इंग्रजी वक्तृत्व शक्य. हिंदी भाषा सोपी; परंतु लकब व उच्चार साधण्याकरिता हिंदी भाषिक प्रांतांत एखादे वर्ष काढणे इष्ट.

**प्रश्न - महाराष्ट्रात आपल्या मताने उत्तम असे वक्तृत्व कोणाकोणाचे आहे व ते कोणत्या गुणांमुळे?**

**उत्तर -** विनोबा भावे - उच्च भावुकता व प्रसाद. बॅ. सावरकर - प्रतिभाशक्ती व ध्येयनिष्ठ स्वप्नशीलता. डॉ. जयकर - ऐट, इंग्रजीचा झोकदारपणा. प्रा. श्री. म. माटे - वेधक भाषा व विवेचकता. म. म. पोतदार - स्वाभाविक वाचाशक्ती : पुष्कळ अवलोकन. दादा धर्माधिकारी

- ध्येयवादीपणा व खोचक विनोदचातुर्य. न. वि. गाडगीळ - समयसूचकता, कोटिक्रम- कुशलता. प्रा. गोवर्धन पारीख - स्वाभाविक वाचाशक्ती, विचारशीलता व कोटीक्रमचातुर्य. आचार्य अत्रे - विनोद बुद्धी, उत्साह व भाषाचातुर्य. यशवंतराव चव्हाण - मर्मज्ञता व समयज्ञता. दि. ल. कानडेशास्त्री - गांभीर्य व ओजस्विता. श्री. शं. नवरे - कोटीक्रम व मुद्देसूदपणा.

**(मी व माझे वक्तृत्त्व - अनंत विष्णु पाटणकर, १९५३)**

○○○

२

# वेदांचे पावित्र्य माझ्या हृदयात खोल रुजले आहे

मुलाखतकार - **वसंत श्रीपाद सातवळेकर**

गेल्या 56 वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या प्राज्ञपाठशाला मंडळ, वाई या संस्थेच्या संशोधन शाखेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे व प्रकाशनाचे कार्य गेल्या ३५ वर्षांपासून सुरू आहे. प्रस्तुत धर्मकोशाच्या राजनीतिकाण्डाचे प्रकाशन नुकतेच जानेवारीमध्ये भारताचे उपराष्ट्रपती श्री. गोपाल स्वरूप पाठक यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रस्तुत धर्मकोशाचे व विश्वकोशाचे संपादक व प्राज्ञ पाठशाळा मंडळाचे अध्यक्ष ही दुहेरी जबाबदारी माननीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पार पाडीत आहेत. वैदिक वाङ्मयाचे अभ्यासक, संशोधक व हितचिंतक या नात्याने माननीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची वेद वाङ्मयाच्या सध्याच्या प्रसार-प्रचार कार्याबद्दलची मुलाखत 'पुरुषार्थ' च्या वाचकांसाठी मुद्दाम घेतली आहे. ती आमच्या वाचकांना खचित उद्बोधक व चिंतनपर वाटेल अशी खात्री बाळगतो. - संपादक )

सध्या आपल्याला त्र्याहत्तरावे वर्ष आहे. वयाच्या मानाने आपली प्रकृती बरीच निकोप व सशक्त दिसते. आपण बारा-चौदा तास सातत्याने कामात गुंतलेले दिसता. आपल्या हालचाली वयस्क माणसासारख्या मंदगतीच्या दिसत नाहीत, उलट सार्वजनिक भाषणाच्या वेळी बसून भाषण करण्याची विनंती करण्यात आली, तरी ती आपण नाकारता व उभे राहून, आवाजाची उंची राखून आपण तास-दीडतास अस्खलित व ओघवती भाषेत विषयातील मुद्यांचे प्रतिपादन करता.

आपला प्रवासही सतत चालू असतो. शेकडो मैल आपण एकसारखा प्रवास करून कधीही थकल्याभागल्यासारखे दिसत नाहीत. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत रोज पाच-सहा सभा व शेकडो मैल प्रवास जसा आपला कार्यक्रम अनेक आठवडेपर्यंत असून देखील आपण ताजेतवाने दिसत असत. थकवा कधीही दिसला नाही.

''आपली स्वस्थ प्रकृती किवा अविश्रांत कार्यमग्नता यासोबतच आपण अध्ययन, संशोधन, संपादन करीत असता व तेही अविरत, अखंडित, तेव्हा या सर्वच गोष्टींचा, उलगडा होत नाही. म्हणून आपल्याला त्यासंबंधाने काही प्रश्न विचारण्याची माझी इच्छा आहे. विचारू काय ?'' -मी

"होय विचारा. '' मा. शास्त्रीजींचे उत्तर.

"लहानपणी आपण निरोगी व सशक्त असणार, कारण त्याशिवाय आपल्या आजच्या या उमेदीच्या रहस्याचा उलगडा होत नाही. तेव्हा आपली मूळची घरची परिस्थिती विशद करू शकाल काय ?" मी आणि त्यावर मा. तर्कतीर्थांचे उत्तर-

"घरची परिस्थिती म्हणजे धट्टीकट्टी गरिबी, वडिलांचा व्यवसाय भिक्षुकीचा. वडीलही अत्यंत सशक्त प्रकृतीचे होते. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत मला गाईच्या दुधावरच वाढविले होते.. गाईचे दूध घरात मुबलक नाही, असे कधीही नसे. घरातील वातावरण अत्यंत धार्मिक, माझे उपनयन झाल्यानंतर मी धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे ब्रह्मचर्याश्रमाचे नियम पाळू लागलो. अग्नीची नित्य उपासना करीत असे. त्रिकाल संध्या, सूर्यनमस्कार व योगासनेही करीत असे. योगासनाचे शिक्षण मला माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी वडिलांनी दिले. ते दक्षिणमार्गी शाक्त व शैव होते. सप्तशतीचे अनुष्ठान व नवरात्र वडील करीत असत. संध्याकाळी त्यांची प्रदोषपूजा पाच खास रात्री अकरा वाजेपर्यंत चाले. ती माझ्या कानावर पडत असे. घरीच वेदाध्ययन केले. शुक्ल यजुर्वेद शिकलो. वेदाध्ययनाने चांगले अन्नपचन होई. पुढे मी वाईस १९१४ साली फेब्रुवारी महिन्यात आलो. प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे ) हे बालब्रह्मचारी होते. पाठशाळेचे मानसिक वातावरण धार्मिक व राष्ट्रीय होते, आसने, प्राणायाम व अन्य प्रकारचे व्यायाम प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी करीत. कुस्ती, जोरबैठका, मल्लखांब, हेही प्रकार त्यात होते. पाट्यापाट्या, खो खो व राष्ट्रीय स्वयंसेवकाची कवायत या गोष्टीही चालत. मी कुस्ती, मल्लखांब, आट्यापाट्या, खो खो, यांत मागासलेला राहिलो. परंतु योगासने, सूर्यनमस्कार आणि संध्याकाळची सहल व विशेषतः कृष्णेत पोहण्याचा कार्यक्रम माझा चालत असे. मी काशीत १९१७-१८ साली होतो. गंगानदीचे काशीचे पात्र स्थिर पण विस्तृत आहे. त्यात मी तासन्तास पोहत असे. मला मानसिक शक्ती धार्मिक उपासनेने मिळाली. ती पुष्कळच अपुरी आहे; कारण उपासनेत १९३९ सालानंतर वारंवार खंड पडले. योगासनाचा व्यायामही अनेक वर्षे खंडित पडला, परंतु १०-५ वर्षानंतर पुनः पुन्हां योगासनांचा उपक्रम अवलंबित असतो. ''

"ठीक. मला आपला पूर्वायुष्याचा उपक्रम कळला. आपली ही धट्टीकट्टी गरिबी किती वर्षेपर्यंत होती ?'' माझा प्रश्न त्याला ते उत्तर देणार एवढ्यात माझ्या मनात आलेली एक शंका मी बोलून गेलो,

धट्टीकट्टी असली, तरी तो गरिबीच. या गरिबीमुळे आपल्या मनात सारखी विवंचना खिळून राहिली असेल ? आणि याचा परिणाम आपल्या मानसिक स्वास्थ्यावर काही तरी झालाच असेल? ''

किंचित स्मित करीत मा. शास्त्रीजी म्हणाले, ''भविष्याची चिंता माझ्या मनाला फारशी भोवली नाही. वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत मला जे मिळत असे, ते महिन्यापुरेतच असायचे, संचयाची शक्यताच नव्हती; परंतु तरी प्रापंचिक चिंता कधीही वाटली नाही. कारण मी व माझी

पत्नी विशेषसे आजारीच पडलो नाहीत. चार मुले झालीत, ती निरोगी आहेत. त्यांचे सर्व शिक्षण पदवीधर होईपर्यंत विनासायास पार पडले. या संबंधाने देवाने मला कधी कमी पडू दिले नाही. संचय नाही झाला, तरी कौटुंबिक परिस्थिती कधी बिघडली नाही. ''

"आपण महात्मा गांधींचा मार्ग सोडून भौतिकवादी व साम्यवादी एम्. एन्. रॉय यांच्या पक्षात १९३७ साली शिरलात. त्यानंतर आपला योगाभ्यास, विशेषतः ध्यानधारणा चालू राहिली काय ?'' माझी एक शंका. आणि त्यावर त्यांचे उत्तर-

"मधून मधून खंडित झाली खरी; परंतु कायम अशी कधी ती मी सोडली नाही. विचाराने मी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा निश्चितपणे गेली ३०-३७ वर्षे पुरस्कार करीत आहे. कोणत्याही प्रकारची धार्मिक वा पौराणिक श्रद्धा माझ्या बुद्धिवादाला मर्यादा घालू शकली नाही. बुद्धिवादाची ठाम भूमिका मी घेतली आहे. धर्मग्रंथ ईश्वराचे अस्तित्व यांच्या प्रामाण्याचा मी पुरस्कार करून वैज्ञानिक दृष्टिकोनाला मर्यादा घालू इच्छित नाही; परंतु योगाभ्यास व ध्यानधारणा यांवरील माझी निष्ठा कधीही ढळली नाही. बाह्यकर्मकांडाला मी कधीच महत्त्व देत नाही.

यानंतरची माझी एक पृच्छा, ती अशी-

"अलीकडे आपला नित्य दैनंदिन कार्यक्रम कसा काय असतो ?'' आणि त्यावर मा. शास्त्रीजींचे उत्तर ते असे-

"सूर्योदयाच्या यात माझी झोप संपते. लगेच चहा पितो. प्रातःस्नान झाल्यावर एक तासपर्यंत माझा योगाभ्यास चालतो. आसन, प्राणायाम व ध्यान. मी वाईत असताना जवळ जवळ एकांतातच असतो. ध्यानधारणा झाल्यावर सुमारे साडे आठ वाजता मी अल्पाहार घेतो. विश्वकोश व प्राज्ञपाठशाळेची धर्मकोशादी कामे पाहतो. वाई गावात अनेक मित्र व ओळखीचे लोक आहेत. त्यांच्याकडे कधीही जात नाही. विश्वकोशातील विद्वान कार्यकर्त्यांना केवळ कामापुरताच भेटतो. चार मंडळी जमली आहे, आणि गप्पागप्पा चालल्या आहेत, असे बहुधा कधीही होत नाही. माणसांच्या गाठीभेटी केवळ कामापुरत्याच घेतो. पुणे-मंबई इत्यादी महाराष्ट्रातील शहरात पुष्कळ मित्रमंडळ आहे, परंतु त्यांच्या सुद्धा गाठीभेटी सहज मजेत घेतल्या आहेत, असे कधीही होत नाही.

दुपारी १२ ते १ च्या दरम्यान भोजन घेतो. माझ्या घरी मांसाहार नाही. मी शाकाहारी आहे. मांसाहार अलीकडे शहरात मित्रांकडे उतरल्यावर घेतो. पण त्याची आवड नाही. संध्याकाळी सात वाजेपर्यंत लेखन-वाचनाचा कार्यक्रम सुरू असतो. कादंबऱ्या, नाटके इत्यादी ललित साहित्य केव्हा तरी वाचनात येते; परंतु नित्य अध्ययन व वाचन हे शास्त्रग्रंथांचेच असते. वेदांचे अवलोकन नेहमीच चालू असते. भारतीय दर्शनांचे संस्कृतातील ग्रंथ माझ्या वाचनात नेहमी असतात. इंग्रजी, हिंदी व मराठी वृत्तपत्रांचे वाचन मी नियमितपणे एक तास करतो. रात्री दहा वाजता झोपी जातो. झोप हा सुद्धा माझ्या योगाभ्यासाचाच एक भाग आहे, रात्रीचे भोजन दिवसापेक्षा निम्मे असते. आहारात चमचमीत मसाल्याचे पदार्थ कमी असतात. दूध, लोणी व तूप यांचा आहारात कोणत्या ना कोणत्या प्रकारे नियमित समावेश केलेला असतो. मला एकच व्यसन आहे, ते म्हणजे सिगारेटचे, व तेही अलीकडेच जडले आहे. परंतु त्यात मर्यादा खूप

राखली आहे. ती मर्यादाही, ते व्यसन सोडण्याची इच्छा आहे म्हणून पडते. तंबाखूचे कोणत्याही प्रकारचे व्यसन अनिष्ट आहे, याबद्दल मला शंका नाही. मला आजपर्यंत याशिवाय कोणतेच व्यसन जडले नाही. सुपारी व विडा यांचेसुद्धा नाही. मी आधुनिक सुशिक्षित स्त्री-पुरुष मित्रांच्या मेळाव्यात कित्येकदा भाग घेतो, परंतु शक्यतोवर त्यातील लैंगिक आकर्षक बाजू टाळतो. याचे कारण मनःस्वास्थ्य राखणे हे होय. कौटुंबिक जीवन हे पूर्ण समाधानाने व शांतीने चालल्याशिवाय मनःस्वास्थ्य राहात नाही.

मनःस्वास्थ्याशिवाय आरोग्य नाही व आरोग्याशिवाय दीर्घसुख नाही. यात अपवाद सापडतात, पण मी अपवाद ठरू इच्छित नाही. कारण मला ते जमण्यासारखे नाही. पारमार्थिक मार्ग माझ्यासमोर आहे. त्या मार्गाचे मला विलक्षण आकर्षण आहे.''

"आपण लहानपणी 'यजुर्वेद व उपनिषदे मुखोद्गत केलीत. तेव्हा या प्रकारचे अध्ययन न करता आधुनिक शिक्षणांचा जर आपण लाभ करून घेतला असता, वर आपल्याला आयुष्यात त्याचा अधिक फायदा नसता का मिळाला? वेदाध्ययनाचा काळ चार-पाच वर्षांचा असणार, ह्या अमोल काळात आपण आधुनिक विद्या हस्तगत केली असती तर त्याचा आपल्याला अधिक फायदा नसता का झाला ?'' मी.

"अमुक केले असते, तर तमुक झाले असते अशा जरतरचा विचार करून आयुष्याचे मूल्यमापन करता येत नसते. प्राचीन व अर्वाचीन अशा दोन्ही विद्यांचा लाभ मला काही प्रमाणात झाला आहे. पण मी वेदविद्या शिकलो नसतो, तर मला भारतीय संस्कृतीचे गंभीर अध्ययन करता आले नसते. ते एकांगी झाले असते. मी वेद सनातन्यांप्रमाणे प्रमाण मानीत नाही; परंतु भारतीय संस्कृतीची ती अनुपम वैचारिक संपत्ती आहे याबद्दल मला यत्किंचितही शंका वाटत नाही. वेदांचे पावित्र्य माझ्या हृदयात खोल रुजले आहे. वेदांचे अध्ययन किंवा अर्थावाचून पठण मी लहानपणी केले. कै. पं. सातवळेकर यांच्या सहवासाने व त्यांच्या ग्रंथांच्या वाचनाने वेदांचे अर्थबोधपूर्वक अध्ययन करण्याकडे माझी प्रवृत्ती वाढली. कै. पं. सातवळेकर हे माझे या विषयातील महान् गुरू आहेत. त्यांनी वेदसाहित्याची जी सेवा केली त्याला तोड नाही. त्यांनी वेदांचे मननपूर्वक विवरण केले; मराठी व हिन्दी भाषांमध्ये भाषांतर केली. वेदसंभार सामान्य जनांपर्यंत पोचविण्याचे कार्य त्यांनी केले. हे कार्य असेच चालले पाहिजे. होशियारपूर येथे वैदिक वाङ्मयाचे फार महत्त्वाचे संशोधन सुरू आहे. पुणे येथील वैदिक संशोधन मंडळही महत्त्वाचे कार्य करीत आहे; परंतु कै. पं. सातवळेकरांच्या निधनानंतर वैदिक-साहित्य सौरभ सामान्य जनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य मंदावू नये; याची मला सारखी चिंता वाटत आहे."

माननीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी या शेवटच्या वाक्यावर जोर देऊन आपली इच्छा प्रकट केली आणि आमचा मुलाखतीचा कार्यक्रमही येथेच थांबला.

**(पुरुषार्थ मासिक, जुलै १९७३, पृ.३४३ ते ३४५)**

○○○

३

# माझी घडण

## मुलाखतकार - **रा. ग. जाधव**

*(तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व विचारांचा वेध घेण्यासाठी काही प्रश्न त्यांच्यापुढे ठेवले होते. ते प्रश्न आणि त्यांना शास्त्रीजींनी दिलेली उत्तरे पुढे देत आहे. शास्त्रीजींच्या जीवनाची घडण कशी होत गेली, याची काहीशी कल्पना या प्रश्नोत्तरांवरून येईल असे वाटते. - संपादक)*

**प्रश्न १ : वयाच्या १४ व्या वर्षी आपण वाईच्या प्राज्ञपाठशाळेत अध्ययनार्थ दाखल झाला. आज या संस्थेचे आपण अध्यक्ष आहात. म्हणजे गेली साठाहून अधिक वर्षे आपला या संस्थेशी अतूट संबंध आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत व विचारविकासात या संस्थेचा प्रभाव कशा प्रकारचा आहे, असे आपणास वाटते?**

**उत्तर :** शहरापासून दूर असलेल्या पिंपळनेर नामक एका तीन हजार वस्तीच्या गावात माझे बालपण गेले. जुन्या रूढींना अत्यंत पवित्र मानून त्या रूढीच्या बंधनात समाधान मानणाऱ्या, जातपातीचे निर्बंध कडक रीतीने पाळणे, हे अत्यंत प्रशस्त मानणाऱ्या आणि सोवळ्या - ओवळ्याचे निर्बंध अत्यंत पवित्र मानणाऱ्या एका संकुचित जगात ते खेडेगाव वसलेले. नव्या जगाचा संपर्क खेड्यात मधून मधून येणाऱ्या कोट-पाटलुणी पोषाख केलेल्या फौजदार, जमादार व तहसीलदार यांच्यातर्फेच व्हायचा. मॅट्रिकपर्यंत शिकलेला तेथे तेव्हा कोणीच नव्हता. महिनापंधरा दिवसांत केव्हातरी वरील सरकारी अधिकाऱ्यांची 'बायसिकल' दृष्टोत्पत्तीस यायची. आठवड्याचा केसरी' आमच्या घराच्या ओटीवर सामुदायिक रीतीने वाचला जायचा, तो वाचल्यानंतर ज्या गप्पागोष्टी व्हावयाच्या त्यावरून देशभक्त व सुधारक यांची नावे कानावर पडायची. गावासत शास्त्री, पुराणिक, कीर्तनकार यांच्या वारंवार भेटी व्हावयाच्या. त्यांची राहणी व विचारसरणी यांचा मात्र माझ्यावर खूप खोल प्रभाव पडत असे.

वाईस चौदाव्या वर्षी आलो, तो खरोखरच अगदी वेगळ्या जगात प्रवेश केल्यासारखे

वाटले; परंतु माझे लहानपणचे जग व येथील जग यांच्यात एक प्रकारची क्रमवार सलगता होती. जीवनपद्धती सनातनी; परंतु विचारांचा संसार म्हणजे नव्याजुन्या विचारांचा एकत्रित येऊन होणारा संघर्ष होता. केवलानंद सरस्वती म्हणजे पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे वयाने पस्तीस ते चाळीसच्या घरात होते. उंच व भव्य शरीरबांधा, अत्यंत तेजस्वी पुरुष, नैष्ठिक ब्रह्मचारी, वेदज्ञ व षट्शास्त्रज्ञ, प्राज्ञ पाठशाळेचे प्रमुख होते. त्यांच्या सान्निध्यात वाईस येऊन राहिलो. त्यांच्यापाशी तीस-पस्तीस तरुण विद्यार्थी वेदशास्त्राचे शिक्षण घेत होते; परंतु पाठशाळेचे वातावरण जुन्या पठडीतील, रूढीनिष्ठ, देशकालपरिस्थितीशी विमुख अशा परंपरावादी शास्त्री-पंडितांचे नव्हते. येथे मराठेशाही का बुडाली व ब्रिटिश सत्ता का स्थापन झाली याची चर्चा, विवेकानंद, रामतीर्थ यांच्या विचारांचे परिशीलन आणि टिळक व अरविंद घोष यांच्या जीवननिष्ठेची चर्चा सतत चालावयाची. स्वामी दयानंदांच्या 'सत्यार्थप्रकाशा'ची आलोचना चालावयाची. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जप्त झालेले 'मॅझिनीचे चरित्र' गुप्त रीतीने विद्यार्थ्यांच्या मध्ये एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात वाचनार्थ दिले जात होते. आपला देश पश्चिमी राष्ट्रांच्या मागे का राहिला या एका मुख्य सूत्राभोवती, आठवड्याच्या सुट्टीच्या दिवशी होणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांच्या सभेत अनेक विषयांची साधकबाधक चर्चा होत असे. इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, रामायण-महाभारतादी प्राचीन साहित्य, धर्मशास्त्रग्रंथ या सर्वांचा ऊहापोह या आठवड्याच्या सभेमध्ये चालत असे. तळेगाव-दाभाडे येथे 'समर्थ विद्यालय' नावाची राष्ट्रीय शिक्षणाची संस्था होती. त्या संस्थेतील शिक्षक आणि विद्यार्थी हे ब्रिटिश राज्य उलथवून पाडण्याचा कट करीत आहेत, अशा संशयाच्या निमित्ताने ब्रिटिश सरकारने ती संस्था १९१० साली बंद पाडली. त्यातीलच अनेक प्रौढ विद्यार्थी व शिक्षक येथे वेदान्त आणि धर्मशास्त्र शिकण्याकरिता येऊन राहिले होते व त्यांच्याच प्रभावाखाली प्राज्ञपाठशाळा ही संस्था काम करीत होती. मी व्यक्तिशः जुन्या शास्त्री-पंडितांच्या परंपरेतील शिक्षण घेतलेला असूनही अगदी आधुनिक, सर्वात पुरोगामी अशा विचारांचा पुरस्कर्ता कसा झालो, असा प्रश्न मला युरोपात व अमेरिकेत गेलो असता अनेक विद्वानांनी विचारला. त्याचे उत्तर वरील प्राज्ञपाठशाळेचे विशिष्ट वातावरण व वळण हे होय. जुने जग व नवे जग ही येथे विचारांच्या क्षेत्रात एकमेकांशी संघर्ष व सुसंवाद करीत एकत्र नांदत होती.

**प्रश्न २ : आपले बालपणातील कौटुंबिक संस्कार व मोठेपणीचे कुटुंबजीवन यांचा आपल्या सामाजिक, राजकीय जीवनाशी कशा प्रकारचा संबंध आहे? या दोहोतील समतोल आपण साधलेला आहे, असे जे दिसते, ते बरोबर आहे काय? तसे असल्यास याचे रहस्य कशात असावे?**

**उत्तर :** लहानपणीच मला मातृवियोग झाला. बालपणी कौटुंबिक संस्कार मिळाले ते पिताजींपासून आणि माहेरी कायम परत आलेल्या वडील बहिणीपासून. तरुणपणाचा प्रारंभीचा विवाहपूर्व काळ वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत गेला. येथे कुटुंबजीवन नव्हतेच. हे विद्यार्थी वसतिगृह होते. गुरुजनांची सक्त देखरेख होती. बारा वर्षे विद्यार्थी वसतिगृहात काढल्यानंतर माझा

गृहस्थाश्रम सुरू झाला. त्यामुळे पती-पत्नी हे नाते जुन्या जमान्याच्या आकृतिबंधाचे राहिले नाही. कारण तो आकृतिबंध मला माहीतच नव्हता. म्हणजे अगदी बरोबरीचे नाते. हे नाते माझ्या सामाजिक सुधारणेच्या ध्येयवादाशी मिळतेजुळते असेच निर्माण झाले. जुन्या पद्धतीचे संस्कार व व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली सुधारकी जीवनपद्धती, असा विरोध माझ्या कौटुंबिक जीवनात उत्पन्नच झाला नाही. कारण वडील विधुर होऊन माझ्या विवाहापर्यंत चोवीस वर्षे लोटली होती. मी वडिलांच्या मिळकतीत माझ्या प्रपंचाची मांडणी केलीच नाही. सगळेच मुळापासून नवे कुटुंब उभे राहिले. माझ्या वडील बंधूंचा प्रपंच जुन्या कुटुंबपद्धतीचा होता; परंतु आम्ही दोघांनी प्रथमपासून वेगळेच प्रपंच मांडले. त्यामुळे अंतर्गत विसंगती कशी ती मला माहीतच नाही. माझी पत्नी विश्वविद्यालयीन शिक्षित नसल्यामुळे तिचे व्यक्तिमत्त्व हे माझ्याशी मिळतेजुळते असेच विकसित झाले. तिचा विवाह लहानपणी म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षीच झाला. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ माझ्या छायेखालीच झाली. ती जुने सनातनी संस्कार घेऊन माझ्याशी प्रपंच करू लागली हे खरे; परंतु त्या जुन्या संस्कारांच्या बंधनात, म्हणजे व्रतवैकल्ये, सोवळ्या-ओवळ्याचा घोळ यात, ती कधीच सापडली नाही. सर्व जातीचे व सर्व धर्मांचे मित्र, स्त्री-पुरुष आले, तर त्यांना माझ्या घरात धर्मभेद आणि जातिभेद या संस्कारांचा वास यत्किंचितही कधी आला नाही. कारण माझ्या नव्या सुधारकी विचारांचा स्वीकार माझ्या कुटुंबामध्ये विनासायासे होत गेला, म्हणून कुटुंब जीवनामध्ये जुन्या-नव्यांचा वैचारिक संघर्ष म्हणून ज्याला म्हणतात, त्याचा मला कधीच त्रास झाला नाही. जो संघर्ष झाला तो केवळ माझ्याच मनातील जुन्या - नव्यांचा.

**प्रश्न ३ : वैचारिक लेखन करण्याची प्रेरणा आपणास कशी लाभली? या संदर्भात कोणकोणते मराठी व इतर परदेशी लेखक आपणास प्रेरक वाटले?**

**उत्तर :** 'निबंधमाला'कार चिपळूणकर, 'गीतारहस्य'कार टिळक, 'सुधारक'चे संपादक आगरकर व इतिहास संशोधक राजवाडे या मराठी निबंधकारांचे वाचन माझ्या वयाच्या पंधराव्या वर्षांपासून केवळ बौद्धिक विकास साधण्याच्या हेतूने मी करू लागलो. म्हणजे त्यांचे विचार समजावून घेण्याच्या दृष्टीने करू लागलो. या वेळी माझे संस्कृतचे अध्ययन बरेच प्रगत झाले होते. न्याय, मीमांसा, वेदान्त, सांख्य, बौद्ध इत्यादी दर्शनांच्या अध्ययनात माझी अनिर्वेध प्रगती होत गेली. ही सर्व शास्त्रे चर्चात्मक शास्त्रे आहेत. म्हणजे त्यांची मांडणी पूर्वोत्तर पक्ष पद्धतीची आहे. या पद्धतीमध्ये सिद्धांतपक्षही पूर्वपक्ष बनतो व पूर्वपक्ष कित्येक वेळा सिद्धांतपक्षाचे रूप घेऊन अवतरतो. त्यामुळे प्रत्येक विचार साधकबाधक पद्धतीने तपासला जातो. या माझ्या अध्ययनाला मराठीमध्ये भाषांतरित झालेल्या जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर, सिज्विक इत्यादिकांच्या मौलिक ग्रंथांच्या वाचनाचीही चांगली जोड मिळाली. माझ्या वैचारिक लेखनाची अशी ही पार्श्वभूमी आहे. मी पहिला निबंध 'आनंदमीमांसा' हा लिहिला. या निबंधात सामाजिक जीवन व तत्त्वज्ञान यांचा एकमेकांत गुंतलेला म्हणजे वेदकालीन समाज जीवनाचा ऐतिहासिक संबंध

मी दाखविला आहे. म्हणजे माझा पहिलाच निबंध हा माझ्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचा निदर्शक आहे.

**प्रश्न ४ : काव्य, कथा, नाटक यासारख्या ललित साहित्य निर्मितीकडे कधी आपण आकृष्ट झाला होता काय? साहित्य समीक्षेकडे आपण कसे वळला?**

**उत्तर :** ललित साहित्य निर्मितीकडे मी कधीच आकृष्ट झालो नाही. ललित साहित्यातील एक उत्कृष्ट दालन म्हणजे संस्कृतमधील व्यास, वाल्मीकी, कालिदास, भवभूती इत्यादिकांचे साहित्य होय. ते मी माझ्या पहिल्या उमेदीतच वाचले; पण स्वतःहून संस्कृत कविता करण्याची इच्छा मला केव्हाच झाली नाही. ललित साहित्याची मला नितांत आवड आहे, त्याबद्दल विलक्षण प्रेम आहे; परंतु त्याच्या सर्जनाची प्रवृत्ती माझ्यात नाही. त्याची खूप आवड असल्यामुळे त्याची निवडही मी मोठ्या साक्षेपाने करतो. मोठमोठ्या समीक्षकांची समीक्षणे वाचल्यानंतरही माझा 'पण', 'परंतु' कधी संपायचा नाही. लोकप्रियता हा माझा कलेचा निकष असूच शकत नाही; परंतु लोकप्रियतेबद्दल मला अनादरही नाही. मी आवर्जून समीक्षालेखनाकडे कधीच प्रवृत्त झालो नाही; परंतु वेळोवेळी सभासंमेलनामध्ये किंवा आयोजित व्याख्यानमालांमध्ये साहित्य समीक्षेला किंवा कलासमीक्षेला धरून भाषणे केली आहेत. अशी भाषणे करण्याचे प्रसंगही खूप वेळा आले आहेत. समीक्षेकडे मी केव्हा वळलो, याचे मला नेमके उत्तर देता येणार नाही; परंतु बा. म. जोशी यांची 'रागिणी' प्रसिद्ध झाली, तिच्यावरील समीक्षा प्रसिद्ध झाल्या, त्यानंतर मी ती वाचली व माझीही विशिष्ट समीक्षा वाचतानाच तयार झाली. कोणतीही साहित्यकृती किंवा कलाकृती ही मी वाचली किंवा पाहिली, तर वाचताना किंवा पाहतानाच माझी समीक्षाही तयार होत असते. अधिक साफसफाई त्यानंतर केली जाते.

**प्रश्न ५ : आपल्या वैचारिक घडणीत कोणकोणत्या विचारप्रणालींचा व विचारवंतांचा प्रभाव विशेषत्वाने आहे, असे आपणास वाटते?**

**उत्तर :** माझ्या विचारप्रणालीची साधारणपणे आंतरराष्ट्रीय ऐहिक मानवतावाद आणि उदारमतवाद ही दोन सूत्रे मुख्यतः सांगता येतील. परलोकवादी वा वेदांती वा धार्मिक दृष्टिकोन माझ्या विचारांची बैठक नव्हे. अमुक एका विचारप्रणालीच्या विद्वानांचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला, असे म्हणता येत नाही. मानवी ज्ञानाच्या क्षेत्रात आधुनिक युगात अत्यंत महत्त्वाची अशी वैशिष्ट्यपूर्ण विचारसरणी सांगणारे फार मोठमोठे विचारवंत झाले आहेत. त्यापैकी मी ज्यांचे ज्यांचे चिंतनपूर्वक वाचन केले त्यांची त्यांची विचारसरणी मी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु त्यांच्यापैकी मला जास्त जवळचे कोणते व कोणते नाहीत, हे सांगणे अत्यंत कठीण आहे. निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या जागतिक कीर्तीच्या विचारवंतांचा माझ्यावर प्रभाव पडला आहे. उदा. नामनिर्देशच करायचा झाला तर कार्ल मार्क्स, हर्बर्ट स्पेन्सर, व्हाइटहेड, बर्ट्रांड रसेल, मॅक्स वेबर, मॅरिनोस्की, फ्रॉइड, कासिरर इत्यादी कितीतरी नावे सांगता येतात.

**प्रश्न ६ : म. गांधी, नेहरू व रॉय या भारतीय विचारवंतांशी आपला संबंध आला.**



वाय १७८-८

**त्यांच्याविषयी आपल्याला काय वाटते?**

**उत्तर :** म. गांधी व मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी माझा दीर्घ निकटचा संबंध आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जवळ मी कधीच गेलो नाही. कारण तशी संधी प्राप्त झाली नाही. या दोन्ही व्यक्तिमत्त्वांच्या गंभीर विशालतेचा वारंवार प्रत्यय मला आलेला आहे. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे विलक्षण तेजस्वी पैलू पाहून वारंवार मी विस्मित झालो आहे; परंतु मी माझे वैचारिक स्वातंत्र्य गमावून त्यांच्याशी पूर्ण ऐकमत्य झाले आहे, असे माझ्या अनुभवास कधीही आले नाही. याचे कारण माझे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे दर्शन हे होय. या तत्त्वदर्शनात गौतम मुनींचे विचार कपिल मुनी खंडित करतो, कपिल मुनींचे विचार द्वैपायन व्यास मुनी खंडित करतो आणि या सर्वांचे विचार बौद्ध तत्त्वज्ञानी नागार्जुन अमान्य करतो. अशी ही उच्च विचारांची मीमांसा माझ्या विचार पद्धतीचा अविभाज्य भाग बनली आहे.

**प्रश्न ७ : आधुनिक मराठीतील वैचारिक साहित्याबद्दल आपणास काय वाटते? वैचारिक निबंधाचा आजचा घाट कसा आहे, असावा, असे आपणास वाटते? त्यात लालित्याला कितपत वाव आहे?**

**उत्तर :** विद्यमान मराठी साहित्यामध्ये वैचारिक साहित्याला फारसे महत्त्वाचे स्थानच राहिलेले नाही. राजनीती, अर्थशास्त्र, सामाजिक संस्था, समाजरचना, धर्म, सामाजिक मानसशास्त्र इत्यादी विषयांच्यावर स्वतंत्र रीतीने सतत लेखन करण्याची प्रथाच मराठीमध्ये राहिली नाही. ललित साहित्य व ललित साहित्याची चर्चा यालाच सध्या प्राधान्य आहे. वैचारिक निबंध हा साहित्यप्रकार मराठीमध्ये अपवादात्मकच दिसतो. दोन-तीन मासिके किंवा नियतकालिके - उदा. 'नवभारत', 'समाज प्रबोधन पत्रिका' अशासारखी प्रकाशने अपवादादाखलच आहेत. वैचारिक निबंधात लालित्याला वाव आहेच, कारण विचारांचा आविष्कार करण्याची ललित शैली असू शकते. ललित शैली आणि तार्किक संगती ही एकरूपपणे राहू शकते.

**प्रश्न ८ : मराठी लेखनशैलीच्या बाबतीत आपल्यापुढे काही आदर्श होते काय? कोणते?**

**उत्तर :** माझ्यापुढे लेखनशैलीच्या बाबतीत कोणीही मराठी लेखक आदर्श म्हणून माझ्या मनात कधीही नव्हता.

**प्रश्न ९ : धर्मकोश व विश्वकोश हे आपल्या जिव्हाळ्याचे प्रकल्प आहेत. सांस्कृतिक दृष्टीने त्यांचे महत्त्व कोणते?**

**उत्तर :** धर्मकोश व विश्वकोश ही माझ्या आयुष्याच्या अखेरच्या चौथ्या भागातील महत्त्वाची कार्ये आहेत. धर्मकोश पूर्ण झाल्यास हिंदू धर्मासंबंधी लहान - मोठ्या विषयांवरील प्रश्नांचे तपशीलवार उत्तर संशोधकाला मिळू शकेल. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. विश्वकोषाच्या योगाने मराठी भाषेला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या आविष्काराचे महत्त्वाचे साधन उपलब्ध होणार आहे. या मोठ्या प्रकल्पाची पूर्णता झाल्यावर सामाजिक व भौतिक विज्ञानवेत्ते व तंत्रज्ञ यांना मराठीमध्ये आपले लेखन करण्यास आवश्यक

अशी भाषेची अनुकूलता लाभणार आहे.

**प्रश्न १० : एक आदर्श विचारवंत म्हणून आपणाकडे पाहिले जाते. आदर्श विचारवंत कसा असतो, याबद्दल आपली कल्पना सांगाल काय?**

**उत्तर :** आदर्श विचारवंत म्हणजे जो विचारांची उपासना पूर्ण झाली असे मानत नाही आणि विचारांच्या नव्या कक्षांकडे सतत ओढला जातो, तो होय.

**('विचार शिल्प' - रा. ग. जाधव, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५)**

ooo

४

# तर्कतीर्थांच्या यशाचे गमक

## मुलाखतकार - **प्रभाकर श्रीधर अवचट**

*(तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त खास 'समर्थ'च्या वाचकांसाठी घेतलेली मुलाखत - संपादक)*

महाराष्ट्रातील थोर विचारवंत, गाढे अभ्यासक, राजकारण धुरंधर, विद्वान पंडित माननीय तर्कतीर्थ डॉ. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा आणि माझा एक तपाहून अधिक परिचय आहे. महाराष्ट्र रा. साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, साहित्य अकादमीचे प्रादेशिक सल्लागार, प्राज्ञपाठशाळा मंडळाचे अध्यक्ष इत्यादी शासकीय व खाजगी संस्थेशी श्री. शास्त्रीजींचा निकटचा संबंध आहे. अशा थोर व्यक्तीला जवळून पाहाण्याची संधी मला लाभली आहे, हे मी माझे महत्भाग्य समजतो.

श्री. शास्त्रीजींनी १९७५ साली अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले आहे. त्यानिमित्त महाराष्ट्राचे लाडके नेते, भारताचे परराष्ट्रमंत्री माननीय नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार समिती स्थापन केलेली आहे.. त्या समितीतर्फे श्री. शास्त्रीजींचा फेब्रुवारीच्या १५ तारखेस वाई येथे भव्य प्रमाणावर सत्कार करण्यात आला. याच वर्षात श्री. शास्त्रीजींचा महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागात व महाराष्ट्राबाहेरही भव्य प्रमाणावर सत्कार समारंभ साजरे होत आहेत. याच वर्षात मुंबई विद्यापीठाने श्री. शास्त्रीजींना 'डी. लिट्' पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

अशा थोर व्यक्तीची मुलाखत घेण्याचा मी बरेच वेळा आटोकाट प्रयत्न केला. परंतु ते साधले नाही. काहीवेळा वैयक्तिक अडचण उपस्थित होत होती, तर काहीवेळा विश्वकोशासारख्या महान कार्यामुळे त्यांना मुलाखत देण्यास वेळ मिळत नव्हता. परंतु 'समर्थ'च्या वाचकांसाठी मुलाखत द्यावी म्हणून मी श्री. शास्त्रीजींचे स्वीय सहाय्यक श्री. रामभाऊ कोल्हटकर यांच्याकडे एकसारखा ससेमिराच लावला. अखेर श्री. शास्त्रीजींनी मुलाखत देण्याचे मान्य करून मला बोलावले.

मुलाखतीसाठी मी गेलो तेव्हा श्री. शास्त्रीजी वाचनात मग्न होते. पुस्तक बाजूला ठेवून ते म्हणाले, ''हं. अवचट, तुम्हाला काय विचारायचे ते विचारा.''

''आबा मला 'समर्थ'च्या वाचकांसाठी आपण दोन-तीन प्रश्नांची उत्तरं दिल्यास मी आपला फार आभारी होईन. त्यातला माझा पहिला प्रश्न असा-

आपण श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सातशेव्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त अनेक व्याख्याने देता तर त्याबद्दलचा प्रश्न आहे तो-

संत वाङ्मयाबद्दल आपले मत काय आहे ?

''संत वाङ्मयाने सात्विक आनंद प्राप्त होतो. प्रापंचिक माणसाला अनेक आपत्तीतून जात असता मनोबल संतवाङ्मयाने प्राप्त होते. कर्मकांडाचा धार्मिकक्रियाकल्पांचा पसारा न मांडता केवळ देवाच्या भक्तीने पुण्यप्राप्तीचा मार्ग सुलभरीतीने दिसतो. सदाचरणी प्रेरणा त्यातून मिळते. उत्कृष्ट काव्याचा आस्वाद त्यापासून मिळतो. मन पवित्र होते.''

माझा दुसरा प्रश्न असा की,

आजच्या संघर्षात्मक परिस्थितीत राजकीयदृष्ट्या भारतीयांची कर्तव्ये कोणती असावीत ?

''सत्तेची स्थाने काबीज करण्याच्या मोहाने अनेक भारतीय राजकीय कर्त्यामध्ये स्पर्धा आतापर्यंत सुरू होती. ती आता कमी केली पाहिजे. स्पर्धाशील कार्यकर्त्यापेक्षा विधायक कार्यक्रमाला वाहून घेऊन जनतेला विधायक कार्यक्रमाचे मार्गदर्शन करणारी व्यक्ती ही राजकीयदृष्ट्या अधिक पुरोगामी होय असे मानले पाहिजे. वीस कलमी कार्यक्रम देशापुढे आपल्या नेत्यांनी ठेवला आहे. त्या कार्यक्रमाला कार्यवाहीत आणण्यासाठी प्रत्येक भारतीयाने मनापासून झटले पाहिजे. वीस कलमी आर्थिक कार्यक्रम हा आता आपल्या देशाची आर्थिक शक्ती वाढवून राजकीय स्थैर्याचा आधार बनेल अशी निष्ठा भारतीय नागरिकांच्या ठिकाणी निर्माण व्हावयास पाहिजे. अलीकडे एकाच पक्षाच्या राजकीय कार्यकर्त्यामध्ये देखील हेवेदावे किंवा व्यक्तिद्वेष फार वाढू लागले आहेत. त्यांना आळा घालण्याचा आणि बंधुत्वाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.''

मी आणि आता शेवटचा प्रश्न

**प्रश्न : माझ्या १२-१३ वर्षांच्या पाहाण्यामध्ये आपले व्यक्तिगत जीवन सुखासमाधानाचे दिसते त्याचे इंगित काय आहे ?**

**उत्तर :** ''प्राप्तकर्तव्यात आपल्या सगळया शक्तीचा योग्य उपयोग होत आहे; अशा जाणिवेमुळे माझे मन शांतरीतीने कार्यात विमग्न राहाते. मी शक्यतो ज्या कार्यक्षेत्रात स्पर्धा असेल त्या कार्यक्षेत्रातून बाहेर राहण्याचा प्रयत्न करतो. परंतु कोठेही सार्वजनिक जीवनात स्पर्धा ही अटळच असते. परंतु स्पर्धेतील वैयक्तिक हेवेदावे वाढणार नाहीत; याबद्दल मी दक्षता घेतो. जशास तसे वागावे ही नीती मी प्रमाणभूत मानत नाही. दुसरा स्पर्धा करतो, द्वेष करतो, हेवा करतो, हे जरी माझ्या लक्षात आले, तरी मी शक्यतो स्पर्धा, द्वेष, हेवा या दुसऱ्यांच्या भावनांच्यामुळे उत्पन्न

होणारा खटका किंवा संघर्ष युक्ती- प्रयुक्तींनी टाळतो. टाळण्याचा प्रयत्न करूनही यश येतेच असे नाही. माझ्या नशिबात असे दिसते की, आतापर्यंत स्पर्धाशील द्वेष्ट्या व्यक्तींना अखेर माझ्या क्षेत्रातून बाहेर पडावे लागावे. त्या व्यक्तीचे कसलेही आपल्याकडून नुकसान होऊ नये, यासंबंधी मात्र मी आवर्जून प्रयत्नशील राहिलो आहे.''

श्री. शास्त्रीजी पुढे म्हणाले,

''माझ्यासंबंधी गैरसमज असलेले पुष्कळ लोक मला माहीत आहेत. त्यांचा गैरसमज अनाठायी आहे; ही गोष्टही मी शक्यतो त्यांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु पुष्कळवेळा नाईलाज होतो अशा स्थितीत मी त्या व्यक्तीच्या बद्दल अहितवृत्ती न बाळगता तटस्थ राहण्याचा प्रयत्न करतो. द्वेष व निंदा करणाऱ्याबद्दल माझ्या मनात एक प्रकारची सहानुभूतीच असते. म्हणून माझे मन:स्वास्थ व शांत राहाते. माझ्या अध्ययनात व चिंतनात त्यामुळे कसलाही व्यत्यय येत नाही.''

''मी महत्त्वाकांक्षी नाही. मला संपत्ती किंवा कीर्ती यांचे विशेष आकर्षण नाही. त्यामुळे सुद्धा माझे मन निश्चिंत राहाते.''

**मना रे, प्रपंच सोडू नको**

परमार्थास्तव संसाराचा, डाव तूं मोडु नको
मना रे, प्रपंच सोडू नको ॥धृ॥

प्रपंचात रे स्वार्थ जळावा
लोकासाठी देह झिजावा
करतांना रे तू जनसेवा
स्वार्थ तुझा तूं साधु नको ॥१॥

काम तुझे तूं नित्य करावे
कर्तव्याचे माप भरावे
देश देवरे तत्त्व ठसावे
द्रोह कधी तूं करू नको ॥२॥

अकरूप रे परमेशाचे
प्रपंच आणि परमार्थाचे
ओळख जीवन श्रीकृष्णाचे
कर्मयोग तूं विसरू नको ॥३॥

- योगेश्वर अभ्यंकर

**आपण आताच आपल्या यशाचे रहस्य सांगितले, यात सौ. सतीकाकूंचा वाटा कितपत आहे ?**

‘‘सौ. सतीकाकूंचाही स्वभाव जवळजवळ माझ्यासारखाच आहे. क्रोधाचा किंवा मन:स्तापाचा प्रसंग आल्यास आम्ही दोघेही एकमेकांना मनःशांतीचा उपदेश करीत असतो व त्यामुळे क्षुब्ध मनःस्थिती लवकरच शांत होते.’’

आपण अमृतमहोत्सवी वर्षानिमित सर्वसामान्य वाचकांना दिलेली माहिती बहुमोलाची आहे. आपणापेक्षा मी खूपच लहान असून आपली शंभरी साजरी करण्याचे भाग्य मलाच नव्हे तर महाराष्ट्रातील आम जनतेला लाभावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**(साप्ताहिक समर्थ, दीपावली अंक, १९७५, पृ. १२ व १३)**

ooo

५

# अध्ययन आणि वैचारिक वाटचाल

मुलाखतकार - **प्रा. मे. पुं. रेगे**

**मनुष्योऽस्मि खलु । न यत्किंचिन्मानुष्यं तस्मिन्ममौदासिन्यं संभवति ।**

**प्रश्न : शास्त्रीजी, तुम्ही प्रथम जे अध्ययन केले आणि नंतर स्वतःच्या प्रयत्नाने जो वेगवेगळ्या शास्त्रांचा व्यासंग केला त्याच्याविषयी आपण प्रथम बोलू. नंतर तुमच्या राजकीय आणि सामाजिक कार्याविषयी बोलू. तुम्ही जे सांगाल तो तुमच्या सार्वजनिक आत्मचरित्राचा भाग असेल असे म्हणता येईल. तेव्हा मी अगदी प्रारंभापासून सुरुवात करतो. तुमचे अध्ययन तुमच्या घरीच सुरू झाले असे तुम्ही मला एकदा सांगितले होते असे मला आठवते. माझी आठवण खरी आहे का?**

**उत्तर -** होय खरी आहे. माझे उपनयन व्हायच्या अगोदर, म्हणजे वयाच्या साधारण सातव्या वर्षी, माझ्या वडिलांनी मला अमरकोश शिकविला. मी ज्या गावामध्ये जन्मलो त्याच्यावर वारकरी संप्रदायाचा फार मोठा प्रभाव होता. माझ्या घरासमोरचे घर हे देशमुखांचे होते, ते अर्थात ब्राह्मण गृहस्थ होते. ते वयाच्या चाळीसाव्या वर्षीच संसारातून विरक्त होऊन घरातच जटाभार धारण करून राहू लागले. बाबासाहेब देशमुख असे त्यांचे नाव होते. ते नित्य सकाळ-संध्याकाळ संतवाङ्मयाचे पठण करीत. एकनाथी भागवत, तुकारामांचे अभंग, कबिराच्या उक्ती ह्या त्यांच्या पठणात असत. हे पठण सतत माझ्या कानी पडत असे. त्यामुळे संतवाङ्मयाकडे माझे लक्ष गेले. मी पहिल्यांदा महिपतीचा संतलीलामृत वाचला. पांडवप्रताप, हरिविजय इत्यादी श्रीधरांचे जे प्रासादिक ग्रंथ आहेत, ते वाचले. शिवलीलामृताचा मी पाठ करीत असे. उलट इकडे अमरकोश पाठ झाल्यावर माझे वडील मला काही सुभाषिते म्हणायला लावीत.

त्यानंतर माझ्या नवव्या वर्षी माझी मुंज झाली. आठव्या वर्षी होते; पण माझा सर्वांत वडील भाऊ माझ्या आठव्या वर्षी न्युमोनियाने वारल्यामुळे त्यावर्षी माझी मुंज झाली नाही, ती पुढल्या वर्षी झाली. मुंजीच्या वेळेस व्रताचा उपदेश असतो. एका मुलाच्या मुंजीच्या वेळी व्रताचा उपदेश

चालू असताना मी उपस्थित होतो. बटू होकार देताना खान्देशाच्या पद्धतीप्रमाणे 'होजी', 'होजी' म्हणत होता. मी वडिलांना विचारले हे "होजी काय आहे?" माझे वडील पुरोहित होते. त्यांनी मला, बटू ब्रह्मचर्याचे व्रत स्वीकारण्याची प्रतिज्ञा करतो, असा त्याचा अर्थ समजावून दिला. मी त्यांना विचारले, "हा बटू खरोखरच असा राहणार आहे का?" ते म्हणाले, "असे राहण्याची आता पद्धती नाही. फार प्राचीन काळी ऋषिमुनींच्या काळी तसे राहत असत." मी विचारले, "मी असा राहू का?" ते म्हणाले, "असे राहणे फार कठीण असते. तू कसा राहू शकशील?" पण मी मुंजीनंतर समिधाधान, म्हणजे अग्नीची उपासना सुरू केली आणि वेदाध्ययन सुरू केले. माझी शाखा शुक्ल यजुर्वेदान्तर्गत माध्यंदिन शाखा आहे. तिचे अध्ययन मी वडिलांकडे आणि वडिलांच्या मित्राकडे सुरू केले. ते शिकत असताना मी काही कर्मकांडही शिकलो आणि ती कर्मकांडाची पद्धती आमच्या घरातच असल्यामुळे आणि बरेचजण ती शिकायला माझ्या वडिलांकडे येत असल्यामुळे ती याज्ञिकीसुद्धा मी शिकून घेतली. तेव्हा ही जी जुनी, अगदी कट्टर परंपरा आहे ती मी पाहिली आणि शिकलो. त्याचप्रमाणे माझी संहिता झाली, सूत्र झाले. शतपथब्राह्मण हे माझ्या शाखेचे ब्राह्मण सर्वांत मोठे ब्राह्मण आहे. ऋग्वेदाची श्लोकसंख्या साधारण दहा हजार आहे, तर याची जवळ जवळ पंधरा हजार आहे (शतपथब्राह्मण हे गद्यात्मक आहे; पण ते श्लोकसंख्येत मोजायची पद्धत आहे) त्यातले काही भाग मी म्हटले.

नंतर त्या गावी एक देवकुळे नावाचे वनाधिकारी होते. ते योगाभ्यासी होते. त्यांनी माझ्या वडिलांना सांगितले की, "हे लहान गाव आहे. या ठिकाणी या मुलाचे अध्ययन चांगले व्हायचे नाही. तुम्ही त्याला चांगल्या ठिकाणी पाठवा." तेव्हा वडिलांनी मला त्यासंबंधी विचारले. माझ्या वडिलांना मी म्हटले की, मी हरिद्वारला गुरुकुलाला जातो. तेव्हा ते रेंजर म्हणाले, "याला इतके लांब आता पाठवू नका." वाईचे नारायणशास्त्री मराठे - पुढे केवलानंद सरस्वती - हे त्यांचे मित्र होते. त्यांच्याविषयी ते म्हणाले, "हे बालब्रह्मचारी आहेत. तेजस्वी महापुरुष आहेत. ते वाईला उत्तम रीतीने पाठशाला चालवितात. तेव्हा याला तेथे पाठवा. हा लहान आहे. हरिद्वारला याची देखभाल कोण करणार? वाईला चांगली देखभाल करतात, थोडे विद्यार्थी - तीस-पस्तीस विद्यार्थी- असतात, त्यांची चांगली काळजी घेतात." तेव्हा वडिलांनी मला वाईला नेले.

वाईला मी गेलो त्याच्या काही काळ पूर्वी अप्पाशास्त्री राशिवडेकर हे 'संस्कृतचंद्रिका' हे संस्कृत भाषेतील मासिक काढीत. ते फार चांगले असे. आधुनिक राष्ट्रीय विचार, उदा. स्वदेशीविषयीचा विचार अतिशय सुरेख संस्कृतमधून ते मांडत असत. मी वाईला गेलो, तेव्हा राशिवडेकरशास्त्री वारले होते आणि मासिक बंद पडले होते; पण त्याचे अंक उपलब्ध होते. त्यातील मजकूर आमच्या गुरुजींचे एक शिष्य गंगाधरशास्त्री सोहनी शिकवीत असत. पाठशाळेची पद्धत अशी असे की, जे मुख्य गुरुजी असत त्यांच्यापाशी उच्च अध्ययन करणारे शिष्य खालचे वर्ग चालवीत. मला संस्कृतच्या अगदी प्राथमिक वर्गात बसविले होते. वर्गात दहा-बारा विद्यार्थी होते. त्यांचे अध्ययन पाच-सहा महिने झाले होते. वर्गात बसल्यावर मी पाहिले की,

संस्कृतचंद्रिकेतील गोष्टी मला काही कळेनात. दोन-चार दिवसांत गंगाधरशास्त्री सोहनींच्याही हे ध्यानात आले. त्यांनी माझी परीक्षा घेतली आणि ते मला म्हणाले, 'अरे ! तुला काही येत नाही. तू माध्यंदिन बुद्धिहीन आहेस.' त्यांची ही निंदा मला खुपली नाही; पण मला काही समजत नव्हते हे मला खुपत होते. माझे वडील तेव्हा तेथे होतेच. ते दोन महिने वाईला राहिले होते आणि मग परत पिंपळनेरला गेले. मी त्यांच्याकडे गेलो तेव्हा माझ्या डोळ्यात पाणी होते. त्यांनी मला विचारले, "अरे, तुझ्या डोळ्यात पाणी का?" मी म्हटले, "वर्गात काय चालते ते मला समजत नाही. मी हरिद्वारला जातो." ते म्हणाले, "आपण शास्त्रीबुवांकडे जाऊ." शास्त्रीबुवा म्हणजे माझे गुरू, त्यांना त्यावेळेस वाईत शास्त्रीबुवा म्हणत. ते शास्त्रीबुवांकडे गेले आणि म्हणाले, "हा रडला आज. आपल्याला काही समजत नाही असे तो म्हणतो." तेव्हा माझ्याबरोबर पठण करणारे जे दुसरे गृहस्थ होते - दामोदरशास्त्री कोनकर - त्यांना माझ्या गुरुजींनी बोलावून घेतले आणि म्हटले, "अरे, काय चालले आहे? लक्ष्मणला काही समजत नाही, असे तो म्हणतो." दामोदर म्हणाला, "आम्ही चार महिने शिकत आहोत. लक्ष्मण दोन दिवसांपूर्वी आला, त्याला समजेल कसे?" "असे होय !" ते म्हणाले आणि त्यांनी स्वतः मला रूपावली आणि समासचक्र ही समजावून दिली, सगळे समास समजावून दिले आणि धातू आणि नामांची सगळी रूपे माझ्याकडून तयार करून घेतली. सरासरी दोन महिन्यांमध्ये माझी ही प्राथमिक तयारी झाली.

**प्रश्न : थांबा, शास्त्रीजी माझे दोन-तीन प्रश्न आहेत. हा काळ आता फार जुना झाला आहे. तेव्हा त्यावेळची शिक्षणपद्धती मला समजून घ्यायची आहे. तेव्हा पहिला प्रश्न असा की, 'तुम्ही लिहायला, वाचायला कुठे शिकला? शाळेत गेला होता की घरीच शिकला?'**

**उत्तर -** लिहायला, वाचायला मी शाळेत शिकलो. त्यावेळेला 'बिगर' इयत्ता असे. नंतर पहिली, दुसरी, तिसरी अशा इयत्ता करून मी चौथ्या इयत्तेपर्यंत शिकलो. त्यावेळचे चौथ्या इयत्तेपर्यंतचे जे शिक्षण होते ते आजच्या सातव्या इयत्तेपर्यंतच्या शिक्षणाएवढे असे. मी शाळेत इतिहास, भूगोल, गणित हे विषय शिकलो.

**प्रश्न : तुमच्या वडिलांनी तुम्हाला अमरकोश शिकविला. ही शिकवायची पद्धत काय होती?**

**उत्तर -** शिकविले म्हणजे त्याचा अर्थ समजावून सांगितला नाही, तर त्याचे पठण करून घेतले. "अमरा निर्जरा देशास्त्रिदशा विवुधा : सुरा :'' असे म्हणवून घ्यायचे आणि उच्चार नीट पाहायचे. म्हणजे वेदाध्यापनाची जी पद्धत तीच याचीही पद्धत होती. वेदाध्यापनात पठणच असे. अर्थ समजावणे नसे. पहिल्यांदा चरण, नंतर अर्धेली, नंतर सबंध ऋचा, नंतर ते जे सूक्त वा अनुवाक असेल किंवा वर्ग असेल तो सबंध म्हणायचा. अशा रीतीने सरासरी अडीचशे ते तीनशे ऋचांचा अध्याय मी एका महिन्यात पाठ करायचा. अशी ही पद्धत होती. गुरूने जवळ बसायचे आणि स्वर म्हणून घ्यायचे. स्वर बरोबर होतात की नाही पाहायचे आणि बरोबर सूर लावायचा. अशा रीतीने विद्यार्थी शिकत असल्यामुळे, अक्षरे, पदे यांच्यात कोणताही दोष राहत नसे.

**प्रश्न : तुमचे वडील हे सर्व कुठे शिकले?**

**उत्तर -** माझे वडील नाशिकला शिकले. नाशिकला तेव्हा वेदशाळा चांगल्या होत्या. ते उत्तम याज्ञिक आणि वैदिक होऊन आले.

**प्रश्न : याज्ञिक म्हणजे काय आणि वैदिक म्हणजे काय?**

**उत्तर -** याज्ञिक म्हणजे हे जे कर्मकांड घरोघरी होत असते ते चालविणारा, श्राद्ध, एखादी मोठी पूजा, मंदिराची, देवतेची प्रतिष्ठापना, वर्षाच्या काठी श्रावणीला उपाकर्म आणि उत्सर्जन ही जी कर्मे होत असतात ती, उपनयन, विवाह, हे सर्व कर्मकांड असते ते जो करतो तो याज्ञिक आणि वैदिक म्हणजे नुसते वेदपठण करतो तो. म्हणजे ज्याला शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, व ज्योतिष ही सहा वेदांगे ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद, हे चार वेद = षडंगवेद - षडंग वेद म्हणतात. ज्याच्यामध्ये मूळ संहिता, पद, क्रम आणि पुढच्या विकृती सामावतात, ते पाठ म्हणणारा तो वैदिक. मी संहिता शिकलो. पद आणि पुढच्या विकृती शिकलो नाही. जो नुसता वैदिक किंवा याज्ञिक म्हणून राहतो तो पुढे संस्कृतकडे विशेष वळत नाही; परंतु माझ्या वडिलांनी मला सांगितले, ''संस्कृत शिकायला पाहिजे, नुसते याज्ञिक किंवा वैदिक बनून काही उपयोग नाही. तू पंडित, शास्त्री हो.'' हे माझ्या मनावर बिंबले. अनेक शास्त्रीपंडितांची कीर्ती मी ऐकत होतो. ऋषिकुलातील, गुरुकुलातील लोकांच्या कथा मी ऐकत असे. त्यामुळे मी संस्कृतकडे वळलो.

**प्रश्न : वाईला तुम्ही आल्यावर तुमचे संस्कृत भाषेचे अध्ययन सुरू झाले. आता, तुम्ही असे म्हणाला की, पाठशाळेतील पद्धती अशी की, मुख्य गुरू ज्यांना शिकवितो ते खालच्या वर्गांना शिकवितात. म्हणजे तुम्हाला प्रथम शिकविणारे हे स्वामीजींचे शिष्य होते?**

**उत्तर -** सुरुवातीला स्वामीजींच्या शिष्यांनी मला शिकविले; पण पुढे स्वामीजींच्या लक्षात आले की, हा आपल्याकडे असावा. कारण मी रडलो ह्याच्यातूनच त्यांना फार आनंद झाला. मला समजत नाही असे मला आढळून आल्यावर मी उठलो आणि जायला निघालो, हे पाहून त्यांनी मला स्वतःकडे घेतले. त्यांनी थोड्याच वेळात, दीड-दोन महिन्यांमध्ये मला रघुवंश शिकवायला प्रारंभ केला. रघुवंशातले, ज्या सर्गामध्ये शृंगार नाही असे सर्ग मला शिकवायला घेतले, - कालिदासात अशी जागा सापडणे कठीण आहे !

**प्रश्न : उदाहरणार्थ?**

**उत्तर -** दुसरा सर्ग शुभ मानतात. पहिल्यामध्ये शाप आहे. तो शिकवीत नसत; पण तो फार सुरेख आहे. त्यात शृंगार नाही; पण तो शिकवीत नसत. दुसऱ्या सर्गामध्ये दिलीप गोसेवेला निघाला ही कथा आहे. त्याच्यापासून प्रारंभ करीत. पण मला पाचव्या सर्गापासून शिकवायला सुरुवात केली. रघुराजाकडे वरतंतु ऋषीचा शिष्य कौत्स हा गुरूची दक्षिणा आपल्याला द्यायची

आहे यासाठी दान मागायला आला. रघूने त्याला चौदा कोटी धन अर्पण केले आणि सबंध धन त्याला देऊन स्वतः ऋषीसारखा कुटीमध्ये राहू लागला. हा जो त्यागाचा अध्याय आहे तो स्वामींनी मला पहिल्यांदा सांगितला. अशा रीतीने जी पंचमहाकाव्ये आहेत त्यातील काही निवडक सर्ग मला शिकविले.

दहा एक महिन्यांनंतर माझी व्युत्पत्ती चांगली झाली आहे, हे त्यांच्या लक्षात आले. व्युत्पत्ती म्हणजे स्वतः होऊन, गुरुशिवाय, साहित्यग्रंथ समजून घेऊन वाचता येणे असा पहिला अर्थ. ही साहित्य ग्रंथाविषयीची जी व्युत्पत्ती, तिला नुसती व्युत्पत्ती म्हणतात. पुढे शास्त्रव्युत्पत्ती येते. माझी व्युत्पत्ती चांगली झाली आहे असे पाहून स्वामींनी मला रघूचा चौदावा आणि पंधरावा सर्ग भाषांतराला दिला. हे सर्ग मला शिकविलेले नव्हते. त्यांचे भाषांतर मी त्यांना लिहून दिले. ते त्यांनी तपासून मला ९९ गुण दिले. मी विचारले, 'शंभर का नाही दिले?' ते म्हणाले, 'अखेर शून्य आकडा आहे, तेथे जाऊ नये.'

**प्रश्न : आणि एकशे एक देता येत नाहीत.**

**उत्तर -** बरोबर ! अशा रीतीने मी दोन सर्गांचे भाषांतर करून दिल्यावर स्वामीजी म्हणाले, "तुझी व्युत्पत्ती झाली आहे. आता तू स्वतः ग्रंथ वाचायला लाग." मी म्हटले, "कादंबरी राहिली आहे बाणाची." ते म्हणाले, "तू स्वतः वाच टीका असते. तुझा अमरकोश तयार आहे. तुझे व्याकरणही चांगले झाले आहे (कारण साहित्यग्रंथ वाचत असतानाच व्याकरणाची सूत्रे वगैरे सांगतात आणि व्याकरणाची तयारी होत जाते). तेव्हा तू आता शास्त्रांकडे चल."

त्यांनी मला एक वर्ष पुरे झाल्याबरोबर शास्त्रांकडे वळविले. आम्ही तेव्हा उन्हाळ्यात दोन महिने कोकणात राहायला गेलो. रोहे गावापासून जवळ असलेल्या एका शेतामध्ये जमीनदाराचे घर होते. जवळ एक कुवा होता. तेथे पंचवीस - तीस विद्यार्थ्यांना घेऊन गुरुजी राहत होते. मला न्याय व इतरांना ते इतर विषय शिकवीत असत. उदा. काहींना भागवत शिकवीत असत. कारण भागवत हासुद्धा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ आहे. 'विद्यावतां भागवते परीक्षा.' भागवताची रचना अशी आहे की, त्याचे श्लोक नीट लावता येऊ लागले की, त्यावरून दोन गोष्टींची तयारी दिसते. एक व्याकरण आणि दोन, वेदान्त.

काही विद्यार्थी शास्त्रांकडे जातच नसत. व्युत्पत्ती झाल्यानंतर पुराणिक होण्यासाठी किंवा कीर्तनकार होण्यासाठी काही प्राथमिक ग्रंथ शिकून ते पुढचा अभ्यास करीत. आमच्या पाठशाळेत कीर्तनाची कला शिकवीत. आमच्या गुरूंना संगीताची माहिती उत्तम होती आणि ते आपल्या गळ्यातून निरनिराळे राग दाखवीत; परंतु नित्य प्रातः स्नान थंड पाण्याने, म्हणून त्यांच्या घशावर नेहमीच त्याचा परिणाम असायचा. आवाज सुरेल नव्हता; पण संगीतातील बारकावे त्यांना चांगले माहीत होते. त्यांच्यापाशी कीर्तनकार होण्यासाठी लोक संगीतही शिकत असत. उदा. महादेवशास्त्री दिवेकर. हे फार मोठे कीर्तनकार होऊन गेले, ते माझ्या गुरूपाशी संगीत शिकले.

पण माझ्या गुरूंनी मला प्रथम न्याय वैशेषिक शिकविले. हातात पोथी न घेता, बागेत चंक्रमणा

करीत असतानाच ते मला शिकवीत. त्यांनी सात-आठ दिवसांत तर्कसंग्रहातील सर्व मुद्दे मला समजावून सांगितले आणि लगेच त्यांनी मला विश्वनाथ न्यायपञ्चाननाचा ‘भाषापरिच्छेद,’ त्यावरील टीकेसह, म्हणजे न्यायमुक्तावलीसह शिकवायला सुरुवात केली.

**प्रश्न : मी जरा मागे वळतो. तुमची व्युत्पत्ती, साधारण नऊ महिन्यांत तयार झाली, नाही का?**

**उत्तर -** होय. व्युत्पत्ती तयार झाली याचा अर्थ असा की, संस्कृत साहित्यग्रंथ गुरूच्या साहाय्याशिवाय स्वतः वाचण्याची शक्ती आली. उदा. बाणभट्टाची कादंबरी त्यांनी मला शिकविली नाही; पण मी वाचू लागलो तेव्हा ती मला समजली. नैषधचरित्राचे दोन-तीन सर्ग त्यांनी मला शिकविले; पण नैषधचरित्राच्या काही सर्गातील एकेका श्लोकाचे तीन-चार अर्थ होतात. हे काव्य महापंडिताने लिहिले आहे. त्यात ग्रंथग्रंथी आहेत; पण हे सर्व श्लोक मला नीट समजू लागले, तेव्हा आमची व्युत्पत्ती झाली असे गुरुजी म्हणाले. आता शास्त्रव्युत्पत्ती म्हणजे असेच आहे. शास्त्रातील जे मूलभूत किंवा प्राथमिक ग्रंथ आहेत, त्यांचे चांगले अध्ययन प्रथम करावे लागते. उदा. न्यायमुक्तावली ही तर्कशास्त्राचा, न्यायवैशेषिक दर्शनाचा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. तो समग्र व्हायचा म्हणजे त्या शास्त्राची सबंध व्याप्ती ध्यानात यायची. त्याच्यावरची टीका, जी ‘दिनकरी’ ती मी शिकलो. आणि नंतर ‘जागदीशी’ व ‘गादाधरी’ हे जे तत्त्वचिंतामणीचे टीकाग्रंथ, त्यांच्याकडे मला गुरुजींनी वळविले. त्यांनी ‘पंचलक्षणी’ म्हणजे व्याप्तीची पाच लक्षणे, ‘चतुर्दशलक्षणी’ म्हणजे व्याप्तीची चौदा लक्षणे, नंतर ‘सिद्धांतलक्षण’ असे ग्रंथ घेतले. सबंध जागदीशी, सबंध गादाधरी त्यांनी शिकविली नाही, तर त्यातील निवडक प्रकरणे घ्यायची, ती व्यवस्थित रीतीने शिकवायची. ती अशा रीतीने शिकवायची की, त्यानंतर उरलेली, न शिकविलेली गादाधरी - म्हणजे ३/४ गादाधरी - स्वतः वाचून समजली पाहिजे. वेदान्तशास्त्रात जर तुम्ही अद्वैत वेदान्तातील काही प्रकरणग्रंथ म्हणजे प्राथमिक ग्रंथ शिकलात आणि नंतर शाङ्करभाष्यांतील दोन अध्याय शिकलात, तर तिसरा व चौथा अध्याय शिकवायचे नसतात. ते स्वतःलाच वाचून समजले पाहिजेत. म्हणजे ही शक्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे, अशी जुनी पद्धती होती आणि ही शक्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे की नाही याची परीक्षा पूर्वोत्तरपक्षाच्या स्वरूपात नेहमी होत असे. म्हणजे त्या विषयाचे विद्यार्थी आणि गुरू हे आठवड्याच्या किंवा पंधरवड्याच्या ठरलेल्या दिवशी - ज्या दिवशी अनध्याय असेल त्या दिवशी - एकत्र बसत असत आणि विद्यार्थ्यांची तो शिकत असलेल्या शास्त्रामध्ये व्यवस्थित बैठक बसली आहे की नाही याची कसोटी घेत. प्राज्ञपाठशाळेत अशी एकत्र बैठक दर आठवड्याला होत असे. या बैठकीमध्ये शास्त्रार्थ होत असे.

या बैठकीच्या कार्यक्रमाची एक पद्धती होती. प्रारंभी वेदांतील सूक्ते म्हणण्यात येत असत. आमच्या येथे तीन वेदशाखा होत्या. माझी माध्यंदिन शुक्ल यजुर्वेदी शाखा. हिचे दोन तीन विद्यार्थी होते. मी सूक्ते म्हणत असे. नंतर दुसरी कृष्ण यजुर्वेदी, आपस्तंब शाखा. त्याला

सत्याषाठही म्हणतात. कोकणस्थ ह्या सत्याषाठ शाखेचे आहेत. त्यांचे आपस्तंब सूत्र नाही, सत्यापाठ सूत्र आहे; पण अर्थ एकच आहे. कृष्ण यजुर्वेद म्हणण्याची पद्धती अधिक ऐटबाज आहे. तिसरी म्हणजे ऋग्वेदी. ऋग्वेदी मंत्रोच्चारात एवढी ऐट नाही; पण सुरेलपणा आहे. अशा रीतीने सूक्ते म्हणण्यात आल्यानंतर शास्त्रार्थ व्हायचा.

गुरूंना उद्देशून 'शास्त्रसेवामवधारय' असे म्हणून सुरुवात व्हायची. मग व्याकरण, न्याय, वेदान्त यांचा पूर्वोत्तरपक्ष सुरू व्हायचा. अलंकारशास्त्राचा पूर्वोत्तरपक्ष व्हायचा; पण कोणत्याही शास्त्राच्या पूर्वोत्तरपक्षामध्ये व्याकरण आणि वाक्यमीमांसा हे भाग अटळपणे असायचे. उदा. वेदान्तातील विषय घेतला तरी त्याच्यात व्याकरण आणि वाक्यमीमांसा चालत असत. उदा. 'ह्या ठिकाणी ही करणतृतीया आहे का?', 'ही कर्मणि षष्ठी आहे की संबंधसामान्य षष्ठी आहे?' असा विचार होत असे. म्हणजे एका शास्त्राचा (उदा. वेदान्ताचा) दुसऱ्या शास्त्राशी (उदा. व्याकरणाशी) असलेला संबंध स्पष्ट होत असे. वाक्यमीमांसा चालत असताना लक्षणा कुठे मानायची, व्यंजना कुठे मानायची, ह्या स्वरूपाच्या सिद्धांतांची चर्चा होत असे. एक शास्त्र व्यवस्थित रीतीने म्हणणाऱ्या माणसाला इतर शास्त्रांचा चांगला स्पर्श होत असे.

पूर्वोत्तरपक्ष होत असताना असा 'शास्त्रांतरसंचार' होत असे; पण विषयांतरसंचार होऊ देत नसत. विषयांतर होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली, की गुरुजी सांगत की, "आता ही चर्चा पुरी झाली, मूळ मुद्याकडे परत येऊया." यावर जर कुणी म्हणाला, "पण चर्चा अर्धवट राहिली आहे," तर गुरुजी म्हणत, "या विशिष्ट विषयावर स्वतंत्र शास्त्रार्थ करू" आणि ते तसा घडवून आणीत. उदा. समजा वेदान्तामध्ये 'अविद्येचे लक्षण काय आहे?' या विषयावर शास्त्रार्थ चालू असताना त्याच्याशी संबंधित उपविषयांवर विस्ताराने पूर्वोत्तरपक्ष होऊ लागले तर गुरुजी सांगत की, हा उपविषय येथे तूर्त संपवू, त्याच्यावर पुढे स्वतंत्रपणे शास्त्रार्थ करू आणि अविद्येचे लक्षण हा जो आजचा विषय आहे त्याकडे परत वळू.

अशा तऱ्हेचा शास्त्रार्थ सतत होत असल्यामुळे शास्त्रविचार पक्का करून घेण्याकडे या शिक्षणपद्धतीची प्रवृत्ती होती.

'पंक्ती लावणे' ही या शिकण्या-शिकविण्यातील मध्यवर्ती प्रक्रिया होती. पंक्तीमधील प्रत्येक पद आणि अवांतर वाक्ये यांचे परस्परांशी सांधे योग्य रीतीने जोडता आले पाहिजेत हे उद्दिष्ट असे. जर हे सांधे विकल्पाने जोडता येतात असे दिसले की वाद सुरू होत असे.

मी मघा म्हटल्याप्रमाणे माझी न्यायमुक्तावली झाल्यानंतर गुरुजींनी मला गादाधरी- गदाधरभट्टाचा नव्यन्यायावरील मोठा ग्रंथ - शिकवायला सुरुवात केली. त्याच्यामध्ये मुख्य तत्त्वचिंतामणि, त्याच्यावर रघुनाथभट्टाची दीधिति आणि त्यावर गादाधरी. गादाधरीतील काही वादांचे, पंचवाद आणि उत्तरवाद यांचे गुरूजवळ अध्ययन होत असे. तेवढे झाले की, हे गादाधरीच्या अनुमानखंडाचे तृतीयांशाएवढे असतील - बाकीचे स्वतः नीट समजून घ्यायचे आणि ते नीट समजले आहेत की नाहीत हे त्यातील विषयावर होणाऱ्या पूर्वोत्तरपक्षाच्या प्रसंगी

समजून येत असे. हे नव्यन्यायातील उदाहरण आहे; पण वेदान्त आणि इतर शास्त्रांच्या बाबतीतही हीच अध्ययन-अध्यापनाची पद्धती होती.

**प्रश्न : आता मला असे सांगा की, पाठशाळेतील सर्वसाधारण अभ्यासक्रम काय होता? कारण काही विद्यार्थी कीर्तनकार किंवा प्रवचनकार होण्याकडे पुढे वळत, असे तुम्ही म्हणालात. तेव्हा प्राथमिक आणि सर्वसाधारण असा अभ्यासक्रम काय होता?**

**उत्तर -** कुणाला कीर्तनकार किंवा पुराणिक व्हायचे झाले तरी त्याला सर्व शास्त्रांचे प्राथमिक प्रकरण ग्रंथ शिकवीत असत. कीर्तनकाराला तर वेदान्त सांगावाच लागतो; पण त्याला काही न्यायही पाहिजे. तेव्हा 'तर्कदीपिका' व्हायची. त्याला पूर्वमीमांसाही काही अवगत असावी लागे. तेव्हा त्याचा 'अर्थसंग्रह' करून घेत असत. 'वेदान्तसार' आणि 'पञ्चदशी' यांचे वेदान्तासाठी अध्ययन होत असे. व्याकरणातील 'लघुसिद्धांतकौमुदी' होत असे. अलंकारशास्त्रावरील अप्पय्य दीक्षितांचा कुवलयानंद हा ग्रंथ व्हायचा. असे हे प्राथमिक प्रकरणग्रंथ सर्व विद्यार्थ्यांना शिकविले जात. ही प्राथमिक तयारी होऊन मग तो कीर्तनकार व्हायचा.

**प्रश्न : समजा, साहित्यिक व्युत्पत्ती व्हायला एक वर्ष लागायचे. मग हे प्राथमिक ग्रंथ शिकविले जात. हे एकामागून एक असे शिकवीत की, एकाच वेळी शिकवीत?**

**उत्तर -** एकाच वेळी शिकवीत. सकाळी 'तर्कसंग्रह' किंवा 'तर्कदीपिकेचा' पाठ व्हायचा, तर दुपारी 'वेदान्तसारा'चा व्हायचा किंवा 'पंचदशी'चा व्हायचा. संध्याकाळी पूर्वमीमांसेच्या 'अर्थसंग्रहा'चा व्हायचा. म्हणजे दिवसातून तीन-चार विषयांचे एकदमच पाठ होत असत आणि जे या प्राथमिक ग्रंथांच्या पलीकडे गेले आहेत त्यांचा मुख्यतः एकच विषय असे. तो स्वतः इतर काही अध्ययन करीत असेल; पण त्याचा पाठ जो व्हायचा दोन-अडीच तास, तो त्याच्या मुख्य विषयाचा असायचा. या विषयामध्ये त्याने पारंगत व्हावे हे या शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट असे. 'हा नैयायिक आहे' या म्हणण्याचा अर्थ असा असे की, इतर काही त्याला येत असेल; पण न्यायात तो पारंगत आहे. हा वैय्याकरण आहे, तेव्हा त्याचे व्याकरण यथासांग झालेले असले पाहिजे.

**प्रश्न : हे सर्व आवश्यक प्राथमिक ग्रंथ घेतले तर त्यांचे अध्ययन पुरे व्हायला साधारण किती वेळ लागत असे?**

**उत्तर -** साधारणपणे एक ते दीड वर्ष.

**प्रश्न : आता समजा, हे शिकल्यानंतर त्याला कीर्तनकार व्हायचे असेल तर त्याचा पुढचा अभ्यासक्रम काय असे?**

**उत्तर -** मग त्याला पूर्वरंगाचे विषय व उत्तररंगाची कथानके आणि त्याला जोड म्हणून संगीत शिकवीत. गाणी म्हणण्याची पद्धती, मराठी अभंग, आर्या इत्यादी हे सर्व पाठशाळेतच शिकविण्यात येत असे.

**प्रश्न : पण समजा, तो शास्त्राकडे वळला, तर त्याला कोणते तरी एक शास्त्र निवडून त्याच्यात पारंगत व्हावे लागत असेल, नाही का?**

**उत्तर -** हो, पण आमच्या पाठशाळेच्या एका वैशिष्ट्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तिच्यात आधुनिक शिक्षणही देण्यात येत असे. इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्रांची प्राथमिक माहिती हे सर्व शिकविण्यात येत असे. मराठी व्याकरण, काही गणित, काही ज्योतिष हेही शिकविण्यात येत असे. म्हणजे माध्यमिक शाळेत जे शिक्षण असे ते आमच्याकडे देण्यात येत असे. मी स्वतः लहानपणीच फलज्योतिष शिकलो. म्हणजे मुहूर्तज्योतिष. हे मी वडिलांकडे शिकलो आणि नंतर वाईला गेलो.

दुसरी गोष्ट अशी की, विद्यार्थी पाठशाळेत शिकत असताना त्याच्या कर्मकांडाकडे लक्ष असे. तो संध्यावंदन करतो की नाही, स्तोत्रपठण करतो की नाही इत्यादी. दर आठवड्याला सोमवारी स्तोत्रपाठ होत असे, असा नित्यक्रम असे.

**प्रश्न : आता मध्यवर्ती अभ्यासक्रमाविषयी असे म्हणता येईल की, साधारणपणे एक वर्ष व्युत्पत्ती होण्यासाठी लागत असे, दीड वर्ष प्राथमिक, प्रकरणग्रंथाच्या अध्ययनासाठी लागत असे आणि मग विद्यार्थी एका विशिष्ट शास्त्रात पारंगत होण्यासाठी म्हणून त्याचे अध्ययन करीत असे. हे अध्ययन किती काळ चालायचे?**

**उत्तर -** हे अर्थात, प्रत्येकाच्या कुवतीवर अवलंबून असे. कित्येकास एका शास्त्रात पारंगत होण्यासाठी तीन-चार वर्षे लागत, कित्येकांना बारा वर्षे लागत. याला मर्यादा नसे. ज्याची त्याची कुवत, धारणाशक्ती, वादशक्ती भिन्न असते. कित्येकांना ग्रंथ वाचून चांगले सांगता येई; पण पूर्वोत्तरपक्ष करताना ते अडत. काही पूर्वोत्तरपक्षात चमकत पण त्यांची मूळची ग्रंथाध्ययनाची तयारी कमी पडत असे. उत्कृष्ट, स्वभावसिद्ध वक्ता सभा जिंकतो; पण त्याचे मुद्दे कमी असू शकतात. त्यांचा विस्तार करण्यात तो तरबेज असतो. त्याप्रमाणे चांगला वादपटू असला तरी त्याचे मूळ अध्ययन कमी असण्याची शक्यता असते; पण चार वादपटू जमले तर त्यांना एकमेकांशी तोंड देताना अध्ययनाची चांगली सामग्री आवश्यक असे. अशा रीतीने हे शास्त्रार्थ होत असत.

**प्रश्न : स्वतः पाठशाळा स्थापन करून ती चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी एखाद्या माणसाला किती तयारी करावी लागत असे.**

**उत्तर -** बारा ते चौदा वर्षे. कारण स्वतः पाठशाळा चालवायची तर स्वतःचा विषय सोडून जे इतर विषय शिकविले जात असतील ते कशाप्रकारे शिकवले जात आहेत याची चांगली कल्पना प्रमुखाला असावी लागते. समजा तो वैय्याकरण आहे, तर तो न्यायाचे अध्यापन करू शकणार नाही; पण न्याय कशा रीतीने शिकविला जात आहे हे त्याला समजले पाहिजे आणि त्याच्यामध्ये काही गडबड आहे का हे तर त्याला कळलेच पाहिजे. म्हणजे त्याचा प्रत्येक विषय पक्का असला पाहिजे. मी स्वतःला कधी वैय्याकरण म्हणत नाही; पण मी कौमुदी अशा रीतीने शिकलो

आहे की, वैय्याकरण काय सांगतो आहे आणि ते बरोबर सांगतो आहे की नाही हे माझ्या बरोबर ध्यानात येते. उदा. माध्ववेदांत हा माझा विषय नाही; पण मी तो वाचला आहे. हा एक विशेष शिस्तीचा विषय आहे. तो कसा शिकविला जात आहे हे प्रमुखाला समजलेच पाहिजे. तेव्हा प्रमुखाला सर्व विषयांचे आकलन पाहिजे.

**प्रश्न : पाठशाळेतील विद्यार्थ्यांचा दिनक्रम कसा असे?**

**उत्तर -** प्रातःकाळी ५ वाजता पाठशाळेची घंटा व्हायची. तेव्हा सर्वजण उठून प्रार्थना म्हणत. तिच्यात राष्ट्रीय प्रार्थनाही असे. कारण आमच्या पाठशाळेत तेव्हा तळेगावच्या समर्थ विद्यालयातील देशभक्त सशस्त्र क्रांतिवादी मंडळी आली होती. आमच्या गुरूंचाही त्या राष्ट्रीय वातावरणाशी घनिष्ठ संबंध होता. तेव्हा प्रातःकाळच्या प्रार्थनेत राष्ट्रीय प्रार्थनाही अंतर्भूत झाली होती. त्यानंतर आम्ही स्नानाला जात असू. गुरू व सर्व विद्यार्थी शीतोदकस्नान करीत. मग संध्यावंदन व्हायचे.

**प्रश्न : सामुदायिक संध्यावंदन होत असे का?**

**उत्तर -** नाही; पण प्रत्येकजण करीत असे. फारतर पन्नास-साठ विद्यार्थी असत. त्यामुळे कोण कुठे आहे, काय करीत आहे हे कळत असे. मग सूर्यनमस्कार होत. ते सक्तीचे नव्हते. कित्येकजण तर बाराशेपर्यंत सूर्यनमस्कार घालीत; पण माझ्यावर या बाराशेवाल्याचा काही परिणाम होत नसे. माझे काही अत्यंत चांगले मित्र बाराशे नमस्कार घालायचे. मी दीडशे घालीत असे; पण मी योगासने करीत असे. मी ती घरी शिकलो होतो. योगसूत्रांचाही मी स्वतः अभ्यास केला होता. योगाकडे अलीकडे जगाचे फार लक्ष गेले आहे; परंतु माझे लहानपणापासून योगाकडे लक्ष आहे. योगामध्ये जो सिद्धिपाद आहे त्याच्यात अष्टसिद्धी सांगितल्या आहेत. त्या खऱ्या की खोट्या आहेत असा वाद पाठशाळेत चालत असे. आमचे गुरू जुन्या पद्धतीने सर्व जीवन जगणारे होते; पण ते म्हणायचे, 'हा अर्थवाद आहे, स्तुतिपर आहे, असे खरोखर घडत नाही.' त्यावेळीही खूप दैवीशक्तीचे साधुपुरुष, जसे आज दिसतात तसे होते. नारायणमहाराज वगैरे. ते चमत्कार करतात अशी अनेकांची समजूत होती; पण आमचे गुरुजी सांगत, 'चमत्कार होऊ शकत नाही' आणि याचे उदाहरण ते असे देत की, 'व्यासासारख्यांना दिव्यदृष्टी होती; पण ती आपल्यासारख्यांना नाही,' असे प्रत्यक्ष शंकराचार्यांनी म्हटले आहे. देवताधिकरणामध्ये त्यांनी हे म्हटले आहे. तेव्हा चमत्कार असे काही असत नाहीत, असे त्यांचे म्हणणे असे.

हा विवेकवाद किंवा बुद्धिवाद हा आमच्या पाठशाळेच्या शिक्षणाचा भाग होता. राष्ट्रीय वृत्ती हा दुसरा भाग. इतिहासाचे अध्ययन या दृष्टिकोनातून होत असे. गेल्या हजार वर्षांत भारताचा वारंवार पराभव का झाला याची सतत मीमांसा चालू असे. त्यामुळे लोकमान्य टिळक, दादासाहेब नौरोजी यांचे विचार आमच्याकडे यायचे. सुधारकी विचारही यायचे; पण आमच्या गुरुजींना सुरुवातीला आगरकरी सुधारकी विचार मान्य नव्हते.



वाय १७८-९

**प्रश्न : थांबा. दिनक्रमाकडे परत वळूया. आपले सूर्यनमस्कार घालून झाले आहेत.**

**उत्तर -** नमस्कार घातल्यानंतर सकाळची न्याहरी व्हायची आणि नंतर पाठ सुरू होत. सकाळचे पाठ सरासरी ११.३० वाजेपर्यंत चालत. ८ ते ११.३० ही सकाळच्या पाठाची वेळ असे. त्यानंतर भोजन. आम्ही काही मधुकरी असू, काही विद्यार्थ्यांचा खर्च त्यांचे वडील पाठवीत असत आणि पाठशाळेला ज्या देणग्या मिळत असत त्यातून काही विद्यार्थ्यांची सोय करण्यात येत असे. असे तीन प्रकारचे विद्यार्थी असत. मी जवळजवळ चार वर्षे माधुकरी मागून राहत असे. माझा अनुभव असा आहे की, प्रत्येक दिवशी, भिक्षापात्र घेऊन बाहेर पडताना जिवावर यायचे. कधीही कोणत्याही दिवशी भिक्षा मागायला बाहेर पडताना जिवावर आले नाही असे झाले नाही. प्रथम मी माझ्या ब्रह्मचर्याच्या व्रताचा भाग म्हणून भिक्षा मागत असे. पुढे आमच्याकडे ज्या चर्चा चालत असत त्यांचा माझ्या मनावर परिणाम झाला. आमच्याकडे खूप चर्चा होत. विनोबा भावे आमच्याकडे आले होते. ते जवळजवळ एक वर्ष येथे होते. राष्ट्रीय चळवळीत काम करणारी क्रांतिकारक तरुण मंडळी आली होती. ते अनेक प्रश्नांची चर्चा करीत. त्यामुळे माझा जो परंपरानिष्ठ दृष्टिकोन होता - स्नानसंध्या, स्पर्शास्पर्श विचार, सोवळ्यात कायम राहायचे- हे जे विचार होते ते सतराव्या वर्षी साफ नाहीसे झाले आणि माझा नवा राजकीय दृष्टिकोन तयार होऊ लागला.

**प्रश्न : ठीक. आता तुम्ही भोजन उरकले आहे असे समजू या. साधारणपणे १२ वाजेपर्यंत भोजन उरकले जात असेल?**

**उत्तर -** १२.३० वाजेपर्यंत. नंतर तासभर विश्रांती व्हायची व साधारणपणे २ वाजता परत पाठ सुरू व्हायचे. पाठाचा एक क्रम असे. पूर्वावलोकन, प्रत्यक्ष पाठ आणि चिंतनिका असा क्रम असे. पूर्वावलोकन सामुदायिक असे. म्हणजे जो पुढे पाठ व्हायचा तो कितपत समजतो हे पूर्वावलोकनात पाहण्यात येत असे. नंतर प्रत्येक पाठ. नंतर हा पाठ आपल्याला कितपत समजला आहे हे पाहण्यासाठी म्हणून विद्यार्थी तो एकमेकांना समजावून सांगत असत. अशा रीतीने ते अध्ययन चालायचे.

**प्रश्न : चिंतनिका चालताना गुरू तेथे हजर असत का?**

**उत्तर -** नाही. काय व्हायचे, पाठ सुरू झाला की, आदला पाठ कितपत समजला आहे याची दहा मिनिटे तपासणी व्हायची. ही तपासणी झाली की नवा पाठ सुरू होत असे. शिवाय नव्या पाठाशी मागच्या पाठाचा संबंध असे. यामुळे विद्यार्थ्यांचा तो पाठ तयार आहे की नाही हे समजून येत असे. शिवाय वरच्या वर्गात, शास्त्राच्या वर्गात, चार-पाच विद्यार्थी असत. साहित्यव्युत्पत्तीच्या वर्गात दहा-पंधरा विद्यार्थी असत; पण शास्त्राच्या वर्गात चार-पाच विद्यार्थी असत. त्यामुळे विद्यार्थ्यांची तयारी होत आहे की नाही, हे वर्गातच कळून येत असे. तो तयार होतच जायचा. कारण रोजच त्याची परीक्षा होत असे. अशी अध्ययनाची पद्धती होती. परीक्षा कधी आहे, परीक्षेची तयारी कधी करायची असा प्रश्न नसे. यामुळे जुन्या काळातले शास्त्रीपंडित

नवीनांना परीक्षा कसल्या देत बसला आहात, असे विचारायचे. त्याचे म्हणणे असे की, तुम्ही जर विशिष्ट वेळी परीक्षेला बसत असाल तर तुमची रोज परीक्षा होत नाही असा त्याचा अर्थ होतो. म्हणजे तुम्ही नुसती श्रवणभक्ती करता. तुम्ही जे ऐकता ते एका कानात शिरून दुसऱ्या कानातून बाहेर पडते असेही होत असेल, असे त्यांचे म्हणणे असे.

**प्रश्न : पाठ दोन ते चार वाजेपर्यंत चालत असे का?**

**उत्तर -** नाही. प्रत्येक पाठ साधारणपणे ५० मिनिटे चालत असे. त्यानंतर दुसरा पाठ सुरू होत असे. दुपारचे पाठ दोन वाजेपासून सूर्यास्तापूर्वी पंधराएक मिनिटापर्यंत चालत असत. सूर्यास्ताच्यावेळी सर्वजण संध्यावंदन करीत. त्यानंतर स्तोत्रपाठ होत. मग रात्रीचे भोजन.

**प्रश्न : भोजनानंतर?**

**उत्तर -** भोजनानंतर काही नाही.

**प्रश्न : मग तुम्हाला स्वतःचा अभ्यास करायला कधी वेळ मिळत असे.**

**उत्तर -** पाठाच्या मधून वेळ मिळत असे. शिवाय पूर्वावलोकन आणि चिंतनिका हा स्वतः केलेला अभ्यास असे.

**प्रश्न : पण खाजगी रीतीने अभ्यास करायला वेळ कधी असे?**

**उत्तर -** रात्री हा वेळ मिळत असे. कारण भोजनानंतर रात्री काहीही नसे. मी रात्री ११ वाजेपर्यंत वाचन करीत असे. वेगवेगळया विषयांचे, त्याला काही मर्यादा नसे.

**प्रश्न : पाठशाळेला देणग्या कशा मिळत?**

**उत्तर -** यासाठी प्रचारक असत. महादेवशास्त्री दिवेकर, त्याचप्रमाणे गोविंदबुवा देव, महादेवशास्त्री वाटवे, वासुदेवशास्त्री कोनकर, शंकरराव जोशी हे प्रचारक होते. ते देणग्या गोळा करीत. लोक देणग्या देत असत.

**प्रश्न : या देणग्यांवर पाठशाळा साधारणपणे व्यवस्थितपणे चालत असे, नाही का?**

**उत्तर -** व्यवस्थितपणे चालत असे. त्याच्यात कधी खंड पडला नाही. शिवाय आमच्या माधुकरीची त्याला जोड असे ना?

**प्रश्न : म्हणजे या पद्धतीच्या अध्ययन - अध्यापनाला सार्वजनिक पाठिंबा होता !**

**उत्तर -** होय ! अशी त्यावेळी परिस्थिती होती.

**प्रश्न : तुमच्या स्वतःच्या अध्ययनाकडे फिरून वळूया. तुमची जागदीशी, गादाधरी झालेली आहे. पुढे काय झाले?**

**उत्तर -** नंतर, म्हणजे १९१७ साली विनोबाजी प्राज्ञापाठशाळेतील आपले शांकर भाष्याचे अध्ययन आटोपून परत गेले. ते म्हणत असत हे जे प्राचीन अध्ययन आहे, घटपटाची खटपट आहे, त्याने देशाचा काही उद्धार व्हायचा नाही, तर आधुनिक शिक्षण घेतले पाहिजे आणि या देशामध्ये यंत्रोद्योग आले पाहिजेत. 'त्याच्यासाठी तुला अमेरिकेत जरी जावे लागले तरी जा,' असे ते मला म्हणाले. मी स्वामी सत्यदेव यांचे हिंदीमधील निबंध वाचले होते. हे स्वामी सत्यदेव

एक कामगार नेते होते; पण होते संन्यासी. त्यांचा आशयही असाच होता. याचा माझ्या विचारावर फार परिणाम झाला. मी तोपावेतो आगरकरांचेही निबंध वाचले होते आणि जुन्या परंपरेवरील माझी श्रद्धा ढिली झाली होती. नेस्तनाबूत नव्हती झाली. तेव्हा मी विनोबांबरोबर स्वामींना न सांगताच बडोद्याला त्यांच्या घरी शिकायला गेलो. माझ्याबरोबर दामोदरशास्त्री कोनकर होते आणि तिसरे धुंडिराज देव. हे पुढे सेनापती बापटांचे सहकारी झाले. असे आम्ही तिघे गेलो. त्यावेळी दिनकरशास्त्री कानडे हे राजकीय नेते, क्रांतिकारक आणि उत्कृष्ट वक्ते आमच्या पाठशाळेच्या संस्थापकांपैकी होते. त्यांनी आमचा सुगावा काढला. मी कुणाला न सांगता निघून गेलो. कारण मला सरळ परवानगी मिळणार नाही, अशी माझी खात्री होती. विशेष गोष्ट ही की, मी कुठे गेलो याचा पत्ता पोलिसांनाही लागला नसता. कारण माझा वेश तोपर्यंत गोसाव्याचा होता. म्हणजे जटा होत्या, मिशा नव्हत्या. कारण मी सतरा वर्षांचा होतो. मी बडोदा स्टेशनवर पोहोचलो. तेव्हा तेथे जवळच केस कापून घेतले आणि गोटा केला. आम्ही तिघे विनोबांच्या घरी गेलो. त्यांनी आमची व्यवस्था केली होती. तिथे एक विद्यार्थीमंडळ होते. रावपुऱ्यामध्ये तिथे आम्ही राहिलो. विनोबांनी मला इंग्रजी शिकविले. हे माझे शिक्षणही व्युत्पत्तीपद्धतीने झाले. म्हणजे तर्खडकरांची भाषांतरमाला - तीन पुस्तकांची - तीन महिन्यांत पुरी झाली. त्यानंतर 'टीचिंग ऑफ ख्राइस्ट' हे टॉलस्टॉयचे सोप्या भाषेतील पुस्तक, 'सॅन्फर्ड अॅण्ड मर्टन'.

**प्रश्न : याची 'इनामदारांचा बाळू' आणि 'हरी आणि त्र्यंबक' अशी दोन रूपांतरे मराठीत आहेत, नाही का?**

**उत्तर -** हो ! तेव्हा हे पुस्तक आणि लॅबचे 'टेल्स फ्रॉम शेक्स्पीअर' हे पुस्तक, अशी तीन पुस्तके मी सहा महिन्यांत वाचली. अर्थात माझे स्पेलिंग कच्चे होते. ते अजूनही आहे; परंतु वाक्यरचना, संदर्भ वगैरे व्यवस्थित येऊ लागले. मी शुद्ध वाक्येही बनवीत असे. विनोबा मला जुन्या पद्धतीनेच शिकवीत होते. जेव्हा ते मला 'लँब्स टेल्स' शिकवू लागले तेव्हा मी त्यांना म्हटले, की तुम्ही मला शिकविण्या ऐवजी, मला समजते का नाही हे पाहूया. तेव्हा एक गोष्ट वाचून मी बिनचूक त्यांना सांगितली. 'अरे तुला समजले की सगळे!' ते म्हणाले. पुढे म्हणाले, 'इंग्रजी शिकून झाले. आता आपण साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमामध्ये जायचे आणि तिथे सेवा करायची.'

हे ऐकून मला धस्स झाले. मी अमेरिकेला जाण्यासाठी इंग्रजी शिकत होतो आणि त्याच्याऐवजी विणकाम करायचे, चरखा चालवायचा हे काही मला पटेना. तेव्हा मी तिथूनही गुपचूप रीतीने रात्री पळून गेलो. म्हणजे मी आणि दामोदरशास्त्री कोनकर असे पळून आलो. धुंडिराज देव अगोदरच तिथून निघाला होता. कारण मध्यंतरात कानडेशास्त्री यांनी आम्हाला शोधून काढले होते आणि त्यांनी वाईला लिहिले होते की, हे तिघे येथे बडोद्याला सुखरूप आहेत. माझ्या गुरुजींना मी पळून गेलो आणि बेपत्ता झालो याचे फार वाईट वाटले होते. त्यांनी माझ्या वडिलांना त्याविषयी एक पत्र लिहिले. माझ्या वडिलांनी गुरुजींना उलट लिहिले की, तुम्ही काही काळजी

करू नका. तो धावेल, धावेल, थकेल आणि परतेल आणि त्यांनी म्हटल्याप्रमाणे मी परत आलो आणि कानडेशास्त्र्यांना भेटलो. मग गुरुजींची भेट घेतली, त्यांच्या पाया पडून त्यांना शरण गेलो, क्षमा मागितली. ते म्हणाले, 'क्षमा कसली मागतोस? आलास ना? याच्यात सर्व आले.'

यामुळे अमेरिकेत जाऊन आधुनिक शिक्षण घेण्याची माझी वासना तशीच अतृप्त राहिली. मी इंग्रजी वाचत होतो; पण फार नाही. मी शाास्त्रेच जास्त वाचीत होतो. नंतर मला असे वाटू लागले की, आपण एखादी पदवी घ्यावी म्हणून मी वाराणसीला गेलो. तेथे आमच्या स्वामींचे एक शिष्य योगानंद म्हणून होते. त्यांचा एक सुरेख मठ बिंदुमाधव घाटावर होता. तिथून समोरच गंगेचे दर्शन घडत असे. तो सबंध मठच मला मिळाल्यासारखा झाला. कारण योगानंद तेथे नव्हते, ते प्रचारासाठी महाराष्ट्रात निघून आले होते. ते मूळचे सोलापूरचे होते; पण येथे आल्यावर त्यांना पोटाची काही व्याधी जडली आणि ते लवकरच निवर्तले. मी मठात राहत असे. जवळच्याच मोहल्ल्यामध्ये लक्ष्मणशास्त्री द्रविड यांची पाठशाळा होती. तिच्यात ते स्वतः, त्यांचे चिरंजीव राजेश्वरशास्त्री आणि इतर मंडळी, उदा. नित्यानंद पर्वतीयशास्त्री. पर्वतीयशास्त्री हे चतुःशास्त्री होते.

**प्रश्न : चतुःशास्त्री म्हणजे कोणत्या चार शास्त्रांचे अधिकारी?**

**उत्तर -** व्याकरण, न्याय, मीमांसा.

**प्रश्न : आणि अलंकारशास्त्र?**

**उत्तर -** छे ! छे ! अलंकारशास्त्र हे तसे मोठे शास्त्रच नव्हे. त्याची व्युत्पत्ती करून घ्यावी लागत नाही, ते सोपे असते. उदा. मी अलंकारशास्त्र कधी शिकलोच नाही; परंतु मी त्याचे पाठ दिले आहेत. 'रसगंगाधर' तर नव्यन्यायाच्या शैलीत आहे; पण तोही मी शिकविला आहे, चौथे शास्त्र म्हणजे वेदान्त.

या सर्व पंडितांकडे, राजेश्वरशास्त्री, पर्वतीयशास्त्री यांच्याकडे मी थोडे थोडे पाठ घेतले; पण आमच्या वाईच्या पाठशाळेत गुरुजींनी काहीशी पश्चिमी शिस्त आणली होती. उदा. ९ वाजून ५ मिनिटांपासून तो १० वाजेपर्यंत एक पाठ, इत्यादी वेळापत्रक लावलेले असे; पण या पंडितांच्या घरी वेळापत्रक नसे. तुम्ही सकाळी पाठासाठी गेला तर दुपारी, संध्याकाळी कधीही पाठ होईल. मला या पश्चिमी शिस्तीची सवय झाली होती. मी मूळचा खेड्यातला. मला तशी म्हणण्यासारखी शिस्त नव्हती; पण प्राज्ञपाठशाळेत आल्यापासून शिस्त माझ्या अंगवळणी पडली. आपल्याला स्वराज्य, स्वातंत्र्य मिळवायचे आहे, त्यासाठी लष्करी शिस्त आपल्या अंगी बाणली पाहिजे, असा पाठशाळेतला विचार होता. आमचे स्वामी जरी जुन्या पद्धतीचे अनुष्ठान करणारे शास्त्री होते, तरी लष्करी शिस्त आणि आधुनिक भौतिक विद्या यांच्याविषयी त्यांना फार आदर होता. मी पाच वर्षे पाठशाळेत राहिलो होतो म्हणून या शिस्तीची मला सवय जडली होती. म्हणून मी एका गुरूकडे राहायचे नाही; पण अनेक गुरूंचे पाठ ऐकायचे असे ठरविले. उदा. राजेश्वरशास्त्र्यांचे गुरू वामाचरण भट्टाचार्य हे महानैय्यायिक होते. त्यांच्याकडे जाऊन मी पाठ ऐकत असे. त्यांचा

पाठ इतका सोपा असे की, सुरेख असे की, काही विचारू नका. राजेश्वरशास्त्री नुकतेच न्यायाचार्य झाले होते. त्यांचा पाठ अतिशय कठीण असे. कारण विद्यार्थ्यांना समजेल अशा रीतीने पाठ द्यायची शिस्त त्यांना अजून लागायची होती. पुढे लागली असेल. ते त्रिखंडपंडित मानले जातात; पण वामाचरण भट्टाचार्यांकडे गेल्यानंतर मला फार समाधान झाले.

**प्रश्न : राजेश्वरशास्त्र्यांनी लिहिलेले असे काही आहे का हो?**

**उत्तर -** थोडे आहे. त्यांनी भारतीय राजनीतीवर काही लिहिले आहे. मी त्यातले काही वाचायला घेतले; पण आधुनिक राजनीतीचा अभ्यास मी केला असल्यामुळे मला त्याचे काही विशेष वाटले नाही.

**प्रश्न : त्यांनी न्यायावर काही लिहिले आहे का?**

**उत्तर -** थोडे लिहिले आहे. दिनकरी - रामरुद्री जी आहे न्यायमुक्तावलीवर - तिच्या शेवटच्या भागात जिथे रामरुद्री नाही तिथे तिची पुरवणी राजेश्वरशास्त्र्यांनी लिहिली आहे; पण त्यांनी फार लिहिले नाही हे खरे आहे. त्यांनी लिहिले असते तर ते फार चांगले झाले असते.

**प्रश्न : काशीला तुम्ही किती वर्षे राहिलात?**

**उत्तर -** मी तीन वर्षे राहिलो; पण उन्हाळ्यात मी वाईला यायचो व मग परत जायचो. काशीला मी नियमाने पाठ आणि शास्त्रार्थ ऐकत असे. नियमाने एका गुरूकडे का राहिलो नाही ते मी मघा सांगितलेच. काशीला संस्कृत महाविद्यालय होते. पण मी तेथे गेलो नाही. तेथे व्यवस्थितपणे पाठ चालत. मी तेथे का गेलो नाही हे मला आता आठवत नाही; पण गेलो नाही हे खरे.

**प्रश्न : तुम्ही काशीला मुख्यतः न्याय शिकला का?**

**उत्तर -** न्याय, वेदान्त, शाब्दबोध - म्हणजे व्युत्पत्तीवाद, याच्यात व्याकरणाचा विषय येतो. म्हणून तुलनात्मक व्युत्पत्तीवाद झाला माझा. म्हणजे वैय्याकरण, मीमांसक आणि नैय्यायिक या सर्वांचा शाब्दबोध व्यवस्थित रीतीने झाला माझा. वेदान्ताचाही शास्त्रार्थ मी केलेला आहे.

**प्रश्न : वेदान्ताचे कोण प्रमुख शास्त्री होते?**

**उत्तर -** पर्वतीयशास्त्री.

**प्रश्न : हे मराठी गृहस्थ होते का?**

**उत्तर -** मूळचे मराठी. म्हणजे हिमालयाकडे जी महाराष्ट्रीय मंडळी गेली आणि अनेक पिढ्या राहिली, तिच्यातले ते होते; पण काशीमध्ये मराठी मोहल्ल्यात राहिल्यामुळे त्यांना मराठी येत असे. नित्यानंद पंडितांचा अधिकार सर्वांना मान्य होता.

**प्रश्न : न्यायाचे प्रमुख पंडित म्हणजे वामाचरण भट्टाचार्य नाही का?**

**उत्तर -** हो.

**प्रश्न : हे आजचे प्रा. शिबजीवन भट्टाचार्य यांचे वडील का?**

**उत्तर -** नाही. ते वेगळे. तेही महान नैय्यायिक होते. त्यांचे नाव पंचानन तर्करत्न भट्टाचार्य.

त्यावेळी काशीला अव्वल दर्जाचे दहा ते बारा नैय्यायिक असावे. हे नैय्यायिक बौद्धन्याय, जैनन्याय ही शास्त्रेही शिकवीत. त्यांच्याकडे जैनन्याय शिकायला जैन मंडळी येत असे. बौद्धन्याय आणि जैनन्याय राखला या लोकांनी.

**प्रश्न : बौद्धन्याय शिकायला कुणी येत असे का?**

**उत्तर -** आपलीच मंडळी बौद्धन्याय शिकायची; पण जैन मंडळी मात्र जैनन्याय शिकायला यायची.

**प्रश्न : कुणी परदेशी बौद्ध बौद्धन्याय शिकायला येत का?**

**उत्तर -** नाही.

**प्रश्न : काशीला तीन वर्षे राहून न्याय, मीमांसा, वेदान्त आणि व्याकरण शिकून मग कलकत्त्याला गेला ना?**

**उत्तर -** कलकत्त्याला मी प्रथम 'तर्कतीर्थ' या पदवीची माध्यमिक परीक्षा दिली आणि नंतर अंतिम परीक्षा दिली; पण अंतिम परीक्षेसाठी मी वाईहून कलकत्त्याला गेलो. मी १९२२ साली या अंतिम परीक्षेसाठी गेलो, माझ्यापाशी आहे ते प्रमाणपत्र. कोणती तरी पदवी पाहिजे म्हणून मी ती मिळविली. पदवीकरता शिकायचे असते, तर तिथे मी राहिलो असतो आणि सात-आठ पदव्या मिळविल्या असत्या. त्या क्रमाने मिळत; पण माझे तिकडे लक्ष नव्हते.

**प्रश्न : तेव्हा असे म्हणून की, या वेळेपर्यंत न्याय, मीमांसा आणि वेदान्त यांच्यात तुमची पक्की बैठक बसली आणि नंतर तुमचे पुढील अध्ययन चालूच राहिले.**

**उत्तर -** ते चालूच राहिले. कारण हे विषय शिकवीत राहिलो. एकवीस सालापासून तो तीस सालापर्यंत हे विषय मी वाईला शिकवीत होतो. माझे शिकविण्याचे तीन पर्याय झाले. मी अलंकारशास्त्र शिकवीत असे, न्याय आणि वेदान्त शिकवीत असे, पूर्वमीमांसाही मी काही काळ शिकविलेली आहे. उदा. गोस्वामी पांडुरंगशास्त्री हे माझे न्यायाचे आणि वेदान्ताचे विद्यार्थी. मग ते काशीला गेले. मी काशीला शिकून आलो ना तेव्हा त्यांचाही काशीकडे ओढा लागला. तसेच रघुनाथशास्त्री कोगजे, तर्कतीर्थ हे माझे विद्यार्थी. ते धर्मनिर्णय मंडळाचे संचालक होते. त्यांचे तर्कतीर्थ या पदवीपर्यंत नव्हे; पण माध्यमिक परीक्षेपर्यंतचे अध्ययन मी करून घेतले. नंतर बळवंतराव खरे हे माझे विद्यार्थी होते. ते धर्मकोशात काम करीत. ते मॅट्रिक झाले होते व पुढे लष्करात गेले. त्यांना मी न्याय व वेदान्त शिकविला. एक गोखले होते, मिरजेचे. हे घराणे गायनासाठी प्रसिद्ध होते. 'महादेवशास्त्री' हे त्यांचे नाव. हे पुढे हायस्कूल शिक्षक झाले. हे माझ्यापाशी न्याय शिकले. तर्कतीर्थ झाले. ते गवई घराण्यातले असल्यामुळे एके दिवशी माझा स्तोत्रपाठ ऐकून ते म्हणाले, "शास्त्रीबुवा, तुम्ही चांगले गवई व्हाल. तुम्ही गाणे शिका." पाठशाळेत आमचे गाण्याचे शिक्षक रावजी जोशी होते. ते मोठ्या गवई घराण्यातले होते. ते सुरेल, आकर्षक गात असत; पण त्यांचे शास्त्र पक्के. गाणे शिकण्यास त्यांच्यापाशी जाऊन मी आठ दिवस रोज सकाळी बसलो. ते म्हणाले, "तुम्हाला गाणे येणार नाही." मग मी महादेवला

म्हटले, "अरे, तू गवई घराण्यातला. चांगले गाणे गातोस, गाण्यावर चांगले निबंध लिहितोस. तू म्हणतोस मला गाणे येईल आणि रावजी म्हणतात की, मला गाणे येणार नाही, तर आता मी काय करू?" तो म्हणाला, "मला रावजी जोशींचे मत पसंत नाही." पण मी गाण्याचा नाद सोडून दिला.

या काळामध्ये मी मराठीत बरेच वाचन केले. सरदेसाईंच्या सर्व रियासती वाचल्या...

**प्रश्न : तुम्ही आधुनिक मराठी साहित्य जे वाचले त्याचा तुमच्या मनावर काय संस्कार झाला?**

**उत्तर -** केशवसुत, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, अनिल, बोरकर इत्यादी कवी मी वाचले, अजून वाचतो. मी संतवाङ्मय लहानपणापासून वाचीत होतो. त्या पार्श्वभूमीवर असे म्हणता येईल की, आधुनिक मराठी कविता मला आवडते; परंतु माझे मन पूर्ण आनंदाने भरून गेले आहे, असा काही अनुभव मला तिच्यामुळे आला नाही; पण अजूनही ही कविता मला आवडते.

**प्रश्न : आणि मराठी गद्याविषयी तुम्ही काय म्हणाल?**

**उत्तर -** 'निबंधमाला' तर आमच्या अध्ययनात होती. कारण मराठी आम्हाला शिकवीत असत. 'निबंधमाला' मी सबंध वाचली होती. तिची शैली मला आवडत असे. तिची पल्लेदार वाक्यरचना मला आवडत असे; परंतु मला आगरकर आणि टिळक जास्त आवडत. टिळक तर मला फार आवडत. टिळकांची सरळ मराठी शैली, प्रसन्न गद्य मला अतिशय रुचे. त्यांचे मी नित्य वाचन करीत असे. आगरकरांचेही करीत असे. आगरकरांनी माझे विचार पालटून टाकले. त्यांच्यापासून मी सामाजिक उत्क्रांतिवाद शिकलो. स्पेन्सरची भाषांतरे मराठीत होती. मिलची भाषंतरेही उपलब्ध होती. 'ऑन लिबर्टी' चे भाषांतर उपलब्ध होते. मिलची भाषांतरे मला तितकीशी आवडली नाहीत; पण मी स्पेन्सरची सर्व भाषांतरित पुस्तके वाचली. सिज्विकचे 'राजनीतिशास्त्र' वाचले. सिज्विकची शैली शास्त्रार्थाची आहे. ती मला फार आवडली. मला वाटते, मूर हा सिज्विकचा शिष्य आहे.

- हो.

- स्पेन्सरचा अज्ञेयवाद मराठीत आहे. तोही मी वाचला. हे पश्चिमी समाजविज्ञान मला फार आकर्षक वाटले.

**प्रश्न : शिवरामपंत परांजपे यांचे निबंध?**

**उत्तर -** शिवरामपंतांचे निबंध मी वाचीत असे; पण माझी ही जी परंपरागत शिक्षणाची पद्धती होती आणि बोध थोडक्यात करून दिला पाहिजे हे जे तिचे तत्त्व होते त्याच्यामुळे - जरी त्यांचे वक्तृत्व मला आवडत असे, तरी - त्यांचे लेख वाचताना माझा विरस होत असे.

**प्रश्न : आता तीस सालापासून तुम्ही पद्धतशीर रीतीने इंग्रजी वाचू लागला, होय ना? कोणकोणते प्रमुख ग्रंथ तुम्ही सुरुवातीला वाचले?**

**उत्तर -** मी बकलचा 'हिस्टरी ऑफ सिव्हिलिझेशन इन इंग्लंड' हा ग्रंथ वाचला. तो मला फार आवडला. गिबनचे 'डिक्लाइन ॲण्ड फॉल ऑफ धि रोमन एम्पायर' वाचले.

**प्रश्न : सबंध वाचले?**

**उत्तर -** हो, सबंध वाचले. त्याची शैली मला अतिशय आवडली. तेंन (Taine) चा इंग्रजी साहित्याचा इतिहास वाचला. माझा ओढा कठीण पुस्तकांकडे होता. त्यांच्याकडे माझे लक्ष इतिहासाचार्य राजवाड्यांनी वेधले. ते मला म्हणाले, 'तू न्याय इतका शिकला आहेस, तर युरोपियन न्याय वाच की.' तेव्हा मी मिलचे लॉजिक सबंध वाचले. ते मला बरे वाटले; पण अनुमानात आपण विशिष्टाच्या ज्ञानाकडून विशिष्टाच्या ज्ञानाकडे जातो हा सिद्धांत काही मला पटला नाही. या सिद्धांताचे काही अनुयायी आपल्याकडेही आहेत. नंतर मी मिलचे 'लिबर्टी' आणि 'रेप्रेझेन्टेटिव्ह गवर्मेन्ट' वाचले. त्यामुळे पश्चिमी राजकीय विचारांचे व्यवस्थित आकलन होऊ लागले आणि लोट्झे म्हणून एक जर्मन तत्त्ववेत्ता होता, त्याचे 'लॉजिक' आहे. ते कठीण आहे. तेही मी वाचले. सिग्व्हार्टही मी वाचला.

त्यावेळी मार्क्सवादी चळवळीला या देशात जोरात प्रारंभ झाला होता. तेव्हा मी मार्क्स वाचला. तुरुंगात मी मार्क्स वाचायला सुरुवात केली. रॉय यांचे निबंधही तुरुंगात गुप्त रीतीने येत असत. ते मी वाचले. कारण त्यावेळी द्वा. भ. कर्णिक यांची आणि माझी ओळख झाली होती. हा परिचय १९३० साली तुरुंगात झाला. त्यांच्यामुळे हे वाङ्मय माझ्याकडे येऊ लागले.

मी ३२ साली धुळे जेलमधून बाहेर आलो तेव्हा अस्पृश्यतानिवारणाची चळवळ गांधीजींनी सुरू केली होती. तेव्हा जमनालाल बजाज यांनी गांधीजींना लिहिले की, 'येथे आमच्या तुरुंगात जे एक शास्त्री आहेत ते अस्पृश्यतेच्या बाबतीत आपल्या विचाराचे आहेत आणि ते शास्त्राच्या आधारे अस्पृश्यता निवारणाचे समर्थन करतात. त्यांच्या चर्चा मी ऐकल्या आहेत, तर त्यांना बोलावून घ्या.' पुणे येथे हरिभाऊ फाटक म्हणून गांधीजींचे एक म्हातारे शिष्य होते. त्यांच्यामार्फत गांधींनी मला निरोप पाठविला आणि धुंडीराज देव, जे माझ्याबरोबर लहानपणी होते आणि पुढे सेनापती बापटांचे अनुयायी झाले, त्यांच्यासोबत वाईला हा निरोप आला की, महात्मा गांधींच्या दर्शनाकरिता तुम्हाला बोलावले आहे. मला आनंद झाला. मी म्हटले, 'हे कसे काय?' ते म्हणाले, ''तुम्हाला हरिभाऊ सांगतील.' हरिभाऊंकडे गेलो. ते म्हणाले, ''जमनालाल बजाजांनी लिहिले आहे, म्हणून जेलमध्ये तुम्हाला बोलावलेले आहे.' मी गेलो. गेल्यावर माझ्या नेहमीच्या पद्धतीने मी प्रणाम केला आणि बसलो. मग हिंदीमध्ये आमची चर्चा झाली. गांधीजींनी, 'तुम्ही तुमची भूमिका कशी काय मांडता?' म्हणून मला प्रश्न केला. मी म्हटले, साधारणधर्म जो आहे - दशक धर्मलक्षणम् - तो सनातन म्हणजे शाश्वत आहे आणि बाकीचे धर्म परिवर्तनशील आहेत. याची उदाहरणे सांगितली व या आधारावर अस्पृश्यता पाळू नये, कारण तिच्यातून सामुदायिक द्वेष व्यक्त होतो, हे माझे मत मांडले. 'अद्वैषरागिभि : हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्य निबोधत' अशी मनूची प्रतिज्ञा आहे; पण पुढे मनुस्मृती अस्पृश्यतेचे समर्थन आहे; पण मनुस्मृतीमध्ये, साधारणधर्म हेच श्रेष्ठ आहेत आणि ते सर्व आश्रम, वर्ण आणि जाती यांना लागू आहेत, असे म्हटले आहे, आणि हा पाया धरला की असा विचार करता येतो, असे मी सांगितले.

देवलस्मृतीतील काही वचनेही सांगितली; पण ती महत्त्वाची नाहीत. माझी तात्त्विक भूमिका साधारणधर्माच्या संकल्पनेवर आधारलेली आहे.

त्यानंतर प्राचार्य आनंदशंकर ध्रुव आले. आठ-दहा दिवसांनी. दहा-पंधरा दिवसांनी बाबू भगवानदास आले. या सगळ्यांची चर्चा झाल्यावर त्यांना गांधीजींनी लेख लिहायला सांगितले. नंतर आमचे गुरुजी डॉ. भाऊजी दप्तरी आणि म. म. पाठक वगैरे मंडळींना मी त्यांच्याकडे आमची बाजू सांगण्याकरिता नेले आणि आमचा शास्त्रार्थ सुरू झाला. गांधींनी एके दिवशी आमच्या गुरुजींना निरोप पाठविला होता की, तुम्ही दहा वाजता या. मी म्हटले, 'की आमचे स्वामी संन्यासी आहेत. बारा वाजता त्यांच्या भिक्षेची वेळ होते.' गांधीजी म्हणाले, 'मी भिक्षा देतो.' त्याप्रमाणे ते आले. सगळी मंडळी - बाबू भगवानदास, स्वामीजी, म. म. पाठकशास्त्री इत्यादी - जमली आणि गांधींनी सांगितले की, जुन्या परंपरेच्या या लोकांनी एक जाहीरनामा काढावा. या जाहीरनाम्याचे सूत्र काय असावे असा प्रश्न निघाला. तेव्हा गांधींनी स्वामींना सांगितले की, तुम्ही सूत्र द्या. स्वामींनी सांगितले, 'हा देईल.' त्यांनी माझ्याकडे बोट दाखविले आणि म्हणाले, 'हा जरूर देईल.' बाबू भगवानदास म्हणाले, 'बरोबर आहे. यांच्याकडे द्या.' दप्तरीही तसेच म्हणाले. त्याप्रमाणे मी ती सूत्रे तयार केली, त्यांच्यापुढे ठेवली, गांधींनी दोन-तीन शब्द बदलले.

पण भाऊजी दप्तरी काही त्यांच्यावर सही करायला तयार होईनात. 'अस्पृश्यांनी प्रथम स्वच्छ व्हावे आणि मग त्यांची अस्पृश्यता जावी,' असे त्यांचे म्हणणे होते. यावर आम्ही सर्व हसलो. 'अहो' म्हटले, 'आपल्या घरात वेगवेगळी कामे करणारी माणसे, बायका अनेकदा अस्वच्छ असतात.' 'त्यांचे ते अस्वच्छ धंदे !' भाऊजी म्हणाले. 'अहो ! ते धंदे समाजोपकारक आहेत. म्हणून हे तुमचे म्हणणे काही बरोबर नाही,' आम्ही म्हणालो. अशी आमची भाऊजींबरोबर दोन-तीन तास चर्चा झाली; पण तत्त्वतः आम्ही एकच होतो. मग भाऊजींची सही झाली. म. म. पाठकशास्त्र्यांनी सही करायचे नाकारले. त्यांनी सांगितले की, 'हे मला मान्य आहे; पण मी यावर सही केली तर आमच्या घरावर दगड येतील.' हा सरळपणा गांधीजींना आवडला. अर्थात ते म्हणाले की, यांना अशी भीती वाटावी हे काही बरे नाही; परंतु पाठकशास्त्र्यांविषयी त्यांचा आदर कायम राहिला. हा जाहीरनामा 'हरिजन'च्या चौथ्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. सह्यांसह इंग्रजी, हिंदी आणि गुजराती आवृत्त्यांमध्ये. गांधींना मी का मान्य झालो? तर बाबू भगवानदासांनी एक निबंध व ध्रुवांनी एक निबंध लिहून आणला होता. हे दोन्ही निबंध हिंदीमध्ये होते. त्यांच्यात मीमांसादृष्ट्या काय अडचणी आहेत हे मी गांधीजींना सांगितले. गांधी हे अतिशय तल्लख बुद्धीचे, वकिली बुद्धीचे असल्यामुळे माझे मुद्दे त्यांच्या ध्यानात पट्दिशी आले.

राजगोपालाचारी एके दिवशी आले, त्यांनी गांधींना विचारले, 'हे लक्ष्मणशास्त्री जोशी कोण आहेत? बाकीचे मला माहिती आहेत.' गांधी म्हणाले, 'उद्या येतील.' कारण जवळजवळ दोन महिने मी रोज येरवडा जेलमध्ये गांधींकडे दहा वाजता जात असे. भारतातील अनेक निरनिराळ्या प्रकारचे लोक तेथे येत असत. कुणी शास्त्री आले तर मी त्यांच्याशी चर्चा करीत असे. दुसऱ्या

दिवशी मी गेल्यावर राजगोपालाचारी भेटले. त्यांनी मला बाजूच्या खोलीत नेऊन इंग्रजीमध्ये तासभर माझ्याशी चर्चा केली. त्यांनी माझ्या बोलण्यातल्या इंग्रजीच्या चुका दुर्लक्षिल्या. बाहेर येऊन ते बापूजींना म्हणाले, 'धर्मशास्त्रदृष्ट्या आपल्या भूमिकेचे अतिशय उत्कृष्ट असे समर्थन यांनी केले. माझे काही प्रश्न सुटत नाहीत. यांचे म्हणणे असे की, ते सुटतात. एवढाच भेद राहिला आहे; पण समर्थन उत्तम आहे.' हे माझ्या देखत त्यांनी गांधींना सांगितले. गांधींना समाधान झाले.

पुढे देवदास गांधी यांच्या विवाहाचा प्रसंग आला. हा विवाह मी लावावा असे काका कालेलकरांनी गांधींना सांगितले. कारण गांधींनी प्रथम कालेलकरांना हे पौरोहित्य करायला सांगितले होते; पण 'अत्यंत योग्य पठडीतला मनुष्य असताना हे काम तुम्ही मला का सांगता?' असे कालेलकरांनी म्हटल्यावर गांधींनी मला बोलावून घेतले. त्यांचा एकवीस दिवसांचा उपवास संपला होता. गांधी मला म्हणाले, 'हा जो विवाह होतो आहे तो परंपरेच्या विरुद्ध आहे नाही का?' मी म्हणालो, 'हो. याला प्रतिलोम विवाह म्हणतात. वधू ब्राह्मणकन्या आहे आणि वर वैश्यपुत्र आहे....' गांधी म्हणाले, 'मला कोणी शूद्रही म्हणतात.' मी म्हटले, 'या म्हणण्याला आधार आहे. कारण परंपरेने आलेला द्विजत्वसंस्कार तुमच्यावर झालेला नाही आणि परंपरागत द्विजत्वसंस्कार जर झालेला नसेल, तर 'शूद्रत्वमाप्नुयात्' ।'मी पुढे म्हटले, 'ब्राह्मणही असा शूद्र होतो. जर ब्राह्मणावर परंपरागत संस्कार झाले नाहीत तर एका पिढीनंतर तो 'व्रात्य' बनतो.' मग त्यांनी विचारले. 'हा विवाह होऊ शकतो की नाही?' मी म्हटले, 'जातिनिष्ठ वर्णव्यवस्था मानणारा मी नाही म्हणून हा समानवर्णी विवाह आहे असे मी मानतो. हा विवाह होऊ शकतो. दोन घरांत जर समान संस्कृती, समान आचार असतील तर विवाह टिकतात आणि तुमच्या दोन कुटुंबांची परिस्थिती अशी आहे. जातिव्यवस्था काल्पनिक आहे. वर्णव्यवस्था कर्ममूलक आहे, असा सिद्धांत महाभारतात दोन-तीन ठिकाणी सांगितला आहे.'

मग गांधींनी विचारले. 'तुम्ही या ठिकाणी मंत्र म्हणून सर्व संस्कार कराल का?' मी म्हटले, 'जरूर करू.' पण गांधी पुढे म्हणाले, 'काही लोक म्हणतात की, प्रायश्चित्त घ्यावे लागेल.' मी म्हटले, 'सर्वांनाच प्रायश्चित्त घ्यावे लागते. माणूस नेहमीच प्रायश्चित्तीय असतो. असा कालच नसतो की, जेव्हा माणसाच्या हातून पाप घडत नाही. नेहमीच पाप घडत असते आणि नेहमीच त्यांचे क्षालन करावे लागते.' गांधीजींनी विचारले, 'हे कसे काय?'

मी म्हटले, 'संध्यावंदन घ्या ना, त्यात म्हणावे लागते. यद्रात्र्यां पापमकार्षं मनसा वाचा हस्ताभ्यां पद्भ्यामुदरेण शिस्ना रात्रिस्तदवलम्पतु । यदन्हा पापमकार्षं मनसा वाचा हस्ताभ्यां पद्भ्यामुदरेण शिस्ना...' तर अशा रीतीने दिवसा आणि रात्री सर्व इंद्रियांकडून नकळत पाप होत असतात आणि त्यांचे क्षालन करावे.' ते म्हणाले, 'म्हणजे व्रात्यस्तोम विधी होईल का?' मी म्हटले, 'त्याला काहीही म्हणा; पण प्रायश्चित्तविधी होईल एक दिवस.' म्हणजे गांधींना हे जाचत होते की, देवदासाला प्रायश्चित्त देणार आहेत. माझे म्हणणे असे की, सगळेच प्रायश्चित्तीय

असतात, पाप घडतच असते आणि म्हणून त्याचे क्षालन नित्यकर्माने करावयाचे असते. नित्यकर्म नाही केले, तर पाप लागते असे जे म्हटले जाते त्याचा अर्थ असा की, पाप सुरूच असते'. गांधी म्हणाले, 'हा विशेष विचार आहे.'

मग पहिल्या दिवशी मी देवदासांकडून होमहवन करवले. मी मोठ्याने मंत्र म्हणत होतो. जवळ जवळ दीड तास कर्मकांड चालले होते. त्यांना फार आनंद झाला. ते शांत रीतीने ऐकत होते. त्या मंत्रांचा त्यांच्या मनावर फार चांगला परिणाम झाला. दुसऱ्या दिवशी सार्वजनिक विवाह समारंभ झाला. राजगोपालाचारींनी कन्यादान केले आणि आमचा जो धर्मनिर्णयमंडळाचा संस्कारविधी आहे - फार दीर्घ नाही, मध्यम आहे - तो करण्यात आला. देशातले मोठमोठे लोक हजर होते.

विधी झाल्यानंतर गांधी म्हणाले. 'लक्ष्मणशास्त्री. तुम्ही या दोघांना आता उपदेश करा.' मी म्हटले, 'तो माझा अधिकार नाही. कारण तुमचे जे विचार आहेत ते त्यांना सांगायचा माझा अधिकार नाही. कारण तुम्ही त्यांना सांगणार की, तुम्ही ब्रह्मचर्य पाळा. मी काही त्यांना तसे सांगू शकणार नाही. तो माझा अधिकार नाही.' गांधीजींना हे म्हणणे चमत्कारिक वाटले. त्यांनी स्वतः वधू-वरांना उपदेश केला; पण त्यापूर्वी माझा 'a man of great learning and spotless character' असा निर्देश केला. हा माझा गौरव वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाला, तेव्हा माझे मित्र 'तुम्ही spotless चारित्र्याचे का?' असा प्रश्न मला विचारू लागले. अनेक spots दृष्टीस पडू द्यायचे नसतात, झाकायचे असतात. या अर्थाने माझे चारित्र्य spotless आहे आणि हे गृहीत धरूनच गांधींनी माझा तसा निर्देश केला आहे. 'आतापर्यंतचा माझा जो आयुष्यक्रम आहे तो असा आहे की, माझ्या हातून झालेल्या चुका जगाच्या निदर्शनास येणे कठीण आहे,' असा मी खुलासा करीत असे. माझ्या आयुष्याच्या दृष्टीने त्यांचा हा मला मिळालेला आशीर्वाद होता, असे मी मानतो.

अस्पृश्यता निवारणाच्या दृष्टीने तेव्हा जे प्रयत्न चालू होते त्यात मला देशातून अनेक निमंत्रणे येत आणि गांधींकडे कुणी आले की, मला निरोप येत असे की, तुम्हाला वेळ असेल तर या. मदनमोहन मालवीयजींनी मला बोलावले. त्यांची सनातन धर्मपरिषद होती. ती प्रयागला व्हायची होती. त्यांनी गांधींकडे विचारले. आम्ही लक्ष्मणशास्त्र्यांना पाठवू, असे गांधीजींनी त्यांना सांगितले. मी गेलो. तेथे कलकत्ता - काशीची पंडितमंडळी जमली होती. ती मालवीयांच्या विचारांची होती; पण एकंदरीत सनातनी वळणाची होती. परिषदेत मी काही शास्त्रार्थ मांडला. पंचानन तर्करत्न भट्टाचार्य हे तेथे होते व इतर विद्वान होते. मी माझे मत मांडले; पण ते काही त्या मंडळीला पटले नाही; परंतु मी मालवीयांना सांगितले की, पुराणात जी संबंधित वाक्ये आहेत त्यांचा अर्थ अर्थवादपर लावता येतो. नीलकंठ शिवाचार्य यांचे 'श्रीकंठभाष्य' हे ब्रह्मसूत्रावरील विशिष्टाद्वैती शैव भाष्य आहे. 'शिवार्क मणिदीपिका' म्हणून त्याच्यावर अप्पय्या दीक्षितांची मोठी विस्तृत टीका आहे. या भाष्यात असे वाक्य आहे : 'अपि वा यश्चंडाल : शिव इति वाचं वदेत, तेन सह संवदेत, तेन सह संवसेत, तेन सह भुञ्जीत'. हे वाक्य कठोपनिषदातील, असा

उल्लेख भाष्यात आहे; पण ते उपलब्ध कठोपनिषदात नाही; पण एकेका शाखेची अनेक उपनिषदे असू शकतात. तेव्हा हे दुसऱ्या लुप्त उपनिषदातील असू शकेल. 'शिव इति वाचं वदेत्' यातील 'शिवा'च्या जागी विष्णू, हनुमान, गणेश इत्यादी इतर कुणी देव असेल; पण भारतातील अस्पृश्य अशा एखाद्या देवाचे उपासक असतात आणि म्हणून त्यांच्याशी संभाषण करावे, त्यांच्या घरी राहावे, आपल्या घरी त्यांना राहू द्यावे, त्यांच्याबरोबर भोजन करावे, असा या वाक्याचा अर्थ आहे. जे देवाची भक्ती करीत नाहीत त्यांच्याबरोबर हे व्यवहार करू नयेत, असे त्यात अभिप्रेत आहे. शास्त्रार्थाच्या वेळी अशी शंका निघाली की, देवाची भक्ती न करणारे जे ब्राह्मणादी आहेत त्यांच्याबरोबर हे व्यवहार आम्ही करतो की नाही? तर माझे उत्तर असे होते की, तुम्ही करता पण करू नये. ब्राह्मणाने जर संध्यावंदन केले नाही तर तो 'त्र्यहेण पतति' तीन दिवसांत पतित होतो. तेव्हा जो परमेश्वराची कोणत्यातरी रूपाने उपासना करीत नाही, असा कोणताही त्रैवर्णिक सहभोज्य नाही आणि स्पृश्य नाही, असा माझा शास्त्रार्थ होता. तो मी त्या पंडितसभेमध्ये हिंदीत सांगितला. त्यावेळी मला हिंदी चांगले येत होते. आता परिचय राहिला नाही म्हणून येत नाही. त्यावेळी मी 'टूटीफूटी' हिंदीमध्ये सांगीन अशी प्रस्तावना करून बोलल्यानंतर पंडित मदनमोहन मालवीय म्हणाले, ही टूटीफूटी हिंदी नाही, ठीक हिंदी आहे. मी भाषण करून शास्त्रार्थ मांडला; पण आमचे काही जमले नाही. अस्पृश्य मानले गेलेल्यांकडून देवमंदिर प्रवेश होऊ शकतो ही गोष्ट त्या सनातन धर्मपरिषदेत मान्य झाली नाही; परंतु चर्चा झाली हेच समाधान.

मग मालवीयजींच्या बरोबर मी वाराणसीला त्यांच्या घरी गेलो. तेथे बापूजी अणे आले. ते रात्री आले. सकाळी ते ऋग्वेदातील एक सूक्त 'प्रातर्भग प्रातरिन्द्रं हवामहे' हे प्रात:काळचे सूक्त म्हणत होते. मीही ते म्हणू लागलो. ते माझ्याकडे आले. 'तुम्ही इथे का?' ते म्हणाले. 'मी इथे शास्त्रार्थाकरिता आलो आहे' मी उत्तर दिले. तेसुद्धा जुन्याच मताचे होते. म. गांधींविषयी आदर, त्यांच्या राजकारणात सामील हे सर्व खरे; पण मत जुनेच.

**प्रश्न : शास्त्रीजी, तुमच्या दृष्टीने टिळक हे जुन्या मताचे होते की नव्या मताचे?**

**उत्तर -** ते मताने नवे होते; पण जुन्या मताच्या लोकांना सोडून त्यांनी राजकारण केले नाही. याचे कारण, त्या काळामध्ये स्वराज्याच्या लढ्याला लोकांना जर उद्युक्त करायचे तर सुधारणेचे प्रश्न नेत्यांनी उपस्थित करता कामा नयेत. कारण नाही तर लोकांत मतभेद माजतील आणि लोक पाठीशी यायचे नाहीत, अशी त्यांची कल्पना होती. सुधारणेला लोकच विरुद्ध आहेत, ब्राह्मणच विरुद्ध आहेत असे नाही, तर लोकच विरुद्ध आहेत, असे त्यांना दिसत होते. हा अनुभव जोतीराव फुल्यांनाही आला. त्यांच्या आई-बापांनी त्यांना घराबाहेर काढले. मुलींची आणि अस्पृश्यांची शाळा काढायला इतका विरोध होता. सबंध समाजच सुधारणेच्या विरुद्ध होता. या ठिकाणी युरोपियन इतिहासाशी तुलना होत नाही. युरोपियन समाजात अधिकृत, सत्ताधारी धर्मपीठ होते आणि त्याचा समाजावर जबरदस्त पगडा होता. तेव्हा धर्मपीठाशी विरोध करून त्याची शक्ती कमी केली की प्रश्न सुटत होता; पण येथे समर्थ धर्मपीठ नव्हते. धर्मपीठाच्या जागी लोकांची परंपरा

होती आणि ती दृढ होती. एखादा ब्राह्मण पुरोहित जर वेगळ्या मताचा झाला तर त्याच्याविषयी त्यांना आदर राहत नसे, असा माझा स्वतःचा अनुभव होता. कारण जेव्हा मी माझ्या पिंपळनेर गावी मधूनमधून जात असे तेव्हा, जोपर्यंत मी गांधींबरोबर अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीत भाग घेतो आहे हे लोकांना माहीत नव्हते, तोपर्यंत लोक माझ्या पाया पडत असत. ही गोष्ट माहीत झाल्याबरोबर लोक पाया पडायचे आणि भोजनाला बोलवायचे थांबले. समाजसुधारणेला इथे जो विरोध होता आणि आहे तो समाजाचा आहे. समाज परंपराप्रिय आहे. ही एक निराळी मीमांसा आहे म्हणून तिच्याकडे पाहिले पाहिजे. टिळकांना राजकारण करायचे होते. राजकीय शक्तींमध्ये एकजूट पाहिजे म्हणून हे प्रश्न आणू नयेत असे त्यांचे म्हणणे होते. स्वतः ते जुन्या मताचे नव्हते. कर्मकांड किंवा संध्या करीत नव्हते, सोवळे नेसत नव्हते. त्यावेळचे, त्यांच्या पिढीचे लोक, ज्या सनातन्यांचा त्यांना पाठिंबा होता ते लोक सोवळे नेशीत, संध्या करीत, गंध लावीत. टिळक, आगरकरांच्याच विचारांचे होते. म्हणून आगरकरांचे एक वाक्य आहे, 'हे तुमचे नव्हत.'

**प्रश्न : आता मार्क्सकडे वळू या. तुमचे मार्क्सचे थोडे अध्ययन तुरुंगात झाले होते.**

**उत्तर -** पुढे बाहेर आल्यावर मार्क्सवादाचे चौतीस-पस्तीस साली मी अधिक अध्ययन केले. मी एंगल्स वाचला. विशेषतः 'अँटी ड्युरिंग', 'डायालेक्टिस ऑफ नेचर' इत्यादी. रायझानोव्हच्या भाष्यासह कार्ल मार्क्सचा 'मॅनिफेस्टो ऑफ धि कम्युनिस्ट पार्टी' याचे अध्ययन केले. पहिल्यांदा उत्तम अध्ययन केले. म्हणजे जसे 'तर्कसंग्रहदीपिका' आणि 'न्यायमुक्तावली' हिचे अध्ययन केले. तसे 'मॅनिफेस्टो ऑफ धि कम्युनिस्ट पार्टी' याचे अध्ययन केले. कॅपिटलची मधली मधली प्रकरणे - सबंध ग्रंथ नव्हे - मार्क्सचे विचार समजून घेण्यासाठी मी वाचली आणि मार्क्सच्या सर्व उपपत्ती समजून घेण्यासाठी मी व्यवस्थित अध्ययन करीत होतो. प्लेखानोव्ह मी सबंध वाचला आहे. कारण प्लेखानोव्ह हा लेनिनचा गुरू, रशियन मार्क्सवादाचा संस्थापक आहे.

डायालेटिक्स समजण्यासाठी मी स्टेसचे 'हेगेल'वरचे सबंध पुस्तक वाचले. स्टेस मला फार आवडला. कारण हेगेलमधील काही भाग गोंधळात टाकणारा, न समजण्यासारखा आहे असे मानण्यात येते; पण स्टेसमध्ये मला तसे काही आढळले नाही. स्टेस मला सबंध उकलला. म्हणजे वादाचे प्रश्न राहतात; परंतु स्टेसचे म्हणणे काय आहे हे मला उत्तम रीतीने समजले.

**प्रश्न : पण तुम्ही खुद्द हेगेलकडे वळला नाही?**

**उत्तर -** वळलो की. हेगेलचे 'इतिहासाचे तत्त्वज्ञान' मी वाचले. विशेषतः त्याची शंभर पानांची प्रस्तावना मी तीन वेळा वाचली. इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर मी अनेक महत्त्वाची पुस्तके वाचली.

**प्रश्न : मग मार्क्सवाद तुम्हाला एकंदरीत पटला का?**

**उत्तर -** एकंदरीत पटला. असे एखादे सर्वंकष सामाजिक तत्त्वज्ञान पटण्यात दोन गोष्टी असतात. भावना आणि युक्तिवाद. आपल्या ज्या उच्च भावना असतात त्यांना पोषक असलेला जर युक्तिवाद असला तर तो समजतो, रुचतो आणि पटतो. शंकराचार्यांनी म्हटले आहे,

'श्रुत्यनुग्राहकस्तर्कः अनुसंधेयः ।' श्रुतीला मदत करणारा तर्क स्वीकारावा. श्रुती साक्षात् प्रमाण असतात. तशा आपल्या उच्च भावनाही साक्षात प्रमाण असतात. त्या भावनांना अनुग्राहक असा तर्क मार्क्सने रचलेला आहे.

**प्रश्न : शास्त्रीजी, तुम्ही भारतीय परंपरेतील शास्त्रे आणि दर्शने यांचे अध्ययन केले आणि इंग्रजीतून पाश्चात्त्य वैचारिक साहित्य तुम्ही १९३० पासून वाचायला लागला असे म्हणता येईल. त्यापूर्वी मुख्यतः मिल, स्पेन्सर इत्यादिकांच्या इंग्रजी पुस्तकांची रूपांतरे आणि भाषांतरेच तुम्ही वाचत होतात. चोखपणे इंग्रजी वैचारिक साहित्य तुम्ही १९३० पासून वाचू लागला. जेव्हा पाश्चात्त्य वैचारिक साहित्याशी तुमचा साक्षात परिचय झाला, तेव्हा भारतीय वैचारिक परंपरेच्या पार्श्वभूमीवर या साहित्याचे आणि त्यातील विचारांचे कोणते गुणविशेष तुमच्या नजरेत भरले, प्रभावी वाटले? पाश्चात्त्य परंपरेत ज्या स्वरूपाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत, ज्या पद्धतीने ते उपस्थित करून त्यांची उत्तरे शोधण्यात आली आहेत. या गोष्टी पाहता ही परंपरा आणि भारतीय वैचारिक परंपरा यांच्यात कोणते साम्यभेद तुमच्या मनात भरले?**

**उत्तर -** पाश्चात्त्य परंपरेचे मला जाणवलेले वैशिष्ट्य असे की, या भौतिक जगाच्या ज्ञानात पाश्चात्त्यांनी जी विशेष प्रगती केली आहे तिचा संदर्भ ध्यानात घेऊन ते तत्त्वज्ञानाचा विचार करतात. आता ही गोष्ट आपल्याकडेही दिसते; पण आपले भौतिक ज्ञान वाढले नाही आणि म्हणून आपले तात्त्विक विचार एका विशिष्ट चक्रात सापडल्यासारखे झाले. यामुळे भाष्य, टीका, त्यांची विवरणे यांच्यामध्येच आपले विचारवंत फार रमले. उदा. न्यायशास्त्र घ्या. त्याच्यात ही अवस्था आढळते. नवीन विचार आणि ज्ञानाची प्रगती होत गेल्यामुळे उपलब्ध झालेले नवीन ज्ञान यांचे अनुसंधान पश्चिमी विचारात नेहमीच राहिले. आता या बाबतीत दोन प्रकार आढळतात. परंपरागत ज्ञानाला, विशेषतः धार्मिक परंपरेचे अधिष्ठान असलेल्या ज्ञानाला सुसंगत रूप देण्याचा प्रयत्न हा एक प्रकार, दुसरा प्रकार म्हणजे या परंपरेला टाकून द्यायचे, तिच्यातून बाहेर यायचे. ही क्रांतिकारक दृष्टी पश्चिमी जगात वाढत गेली. तिसरा एक प्रकारही आढळतो; पण तो तितकासा प्रभावी नाही. नवीन ज्ञान जे लाभते आहे ते उथळ आहे, मानवी आहे आणि दिव्य, धार्मिक ज्ञान त्याच्यामुळे अबाधित राहते असाही एक सूर पश्चिमी जगात ऐकू येतो; पण तो गौण आहे. जुने ज्ञान नवीन ज्ञानाशी जुळवून घेण्याची वृत्तीच प्रभावी आहे. भारतात नवीन ज्ञान आल्यानंतर, दोन प्रकारची प्रतिक्रिया झाली. एक अशी की, पश्चिमी ज्ञानाचा स्वीकार आणि त्याच्याशी जुळवून घेऊन आपल्या परंपरागत ज्ञानाची मांडणी करायची. दुसऱ्या प्रकारची प्रतिक्रिया अशी की, हे ज्ञान ऐहिक आहे, उथळ आहे, वस्तूच्या अंतरंगाचा भेद करणारे ते दिव्य ज्ञान नाही, असे दिव्य ज्ञान, खरी अंतर्दृष्टी परंपरेतच आढळते, असे मानून नवीन ज्ञानाची दखल घ्यायची. भारतात एकंदरीत ही दुसरी वृत्तीच अधिक प्रभावी ठरली आहे. अर्थात विज्ञानाशी जुळवून घेणारे, नवीन आकार देणारे फार मोठे लोक भारतात होऊन गेले. त्यातील पहिले राजा

राममोहन रॉय. त्यांनी परंपरा एका अर्थाने टाकली. सबंध जगाशी जुळेल असा एक नवीन धर्मग्रंथ येथे यावा, तो अनुभवनिष्ठ असावा, ग्रंथांचे साहाय्य घ्यावे; परंतु आपला जो उच्च अनुभव आहे त्याच्याशी जुळतील एवढीच ग्रंथांतील वचने स्वीकारायची हा त्यांचा दृष्टिकोन होता. परंपरेला महत्त्व द्यायचे; पण आधुनिक जगाशी तिचा सांधा जुळवायचा आणि प्रगतीचा वेग वाढवायचा हा विवेकानंदांचा दृष्टिकोन होता. परंपरागत जे ग्रंथ आहेत त्यांचाही महिमा सांगायचा ही अरविंदांची परंपरा. मानवी जगाचे, विश्वाचे ऐक्य स्वीकारणारा, विश्व हे एक कुटुंब आहे असे मानणारा जो दृष्टिकोन आधुनिक भारतीय द्रष्ट्यांमध्ये - विवेकानंद, गांधी, अरविंद यांच्यामध्ये - आढळतो, तो मला अत्यंत महत्त्वाचा वाटतो.

पण या वेगवेगळ्या विचारधारांमध्ये काही प्रमाणात चमत्कारवादाचा स्वीकार आढळतो. विवेकानंदांनी चमत्कारवाद धरला आणि सोडला. तिथे धरसोड दिसते. चमत्कारवाद अरविंदांमध्येही काही प्रमाणात आहे.

**प्रश्न : खूपच प्रमाणात आहे**

**उत्तर -** परंतु चमत्कारवाद पूर्णपणे टाकून देऊन आधुनिक विचारांचे स्वागत करायचे आणि त्यांना धरून पुढे जायचे ही दृष्टी महाराष्ट्रात विशेष आढळते. टिळकांनी 'गीतारहस्या'च्या योगे परंपरेला उजाळा दिला. तिचा नवीन अर्थ लावला; परंतु त्यांनी कुठेही चमत्काराचा उल्लेख केला नाही किंवा त्याचे समर्थन केलेले नाही. हे महाराष्ट्राच्या परंपरेचे एक वैशिष्ट्य आहे. उदा. भाऊजी दप्तरी घेतले, तर युरोपीय प्रबोधनकाली जो एक दृष्टिकोन होता, त्याचाच पुरस्कार त्यांनी केलेला आढळतो. ईश्वराने सृष्टी निर्माण केली आहे व तिचे नियम त्यानेच घालून दिले आहेत. तेव्हा तो ते नियम कधी मोडू शकणार नाही. म्हणून भौतिक सृष्टीचे जे नियम आहेत त्यांना अपवाद असू शकत नाही, असे दप्तरी सांगत. आमचे गुरूही हेच सांगत. ते ब्रह्मवादी होते; पण भौतिक शास्त्रांना धरूनच आपण चालले पाहिजे, त्यामुळेच जीवन अधिक चांगले, सुखी होईल, अशी त्यांची शिकवण होती.

मानवजातीची एकता हे भारतीय प्रबोधनातील प्रमुख सूत्र होते असे मी मघाशी म्हटले. या मानवी एकतेच्या भावनेत राष्ट्रीय अहंकाराचा सूर नव्हता असे नाही; पण हा अहंकार मर्यादित होता. अमर्याद राष्ट्रीय अहंकाराचा आविष्कारही आधुनिक भारतात आढळून येतो; पण तसा तो युरोपमध्येही आढळून येतो. युरोपातला आक्रमक राष्ट्रवाद, तसेच भारतातला आक्रमक हिंदुत्ववाद किंवा आक्रमक इस्लामवाद यातून मानवजातीचे एक स्वरूप दिसून येते; पण यातून मानवजातीचे दुर्दैव ओढवण्याची शक्यता आहे. मानवजात म्हणजे एक कुटुंब आहे अशी प्रत्यक्ष परिस्थिती भविष्यात निर्माण केली पाहिजे हा जो विचार आहे तो विचार नष्ट होऊ देता कामा नये. हातात शस्त्र घेता कामा नये. भगवान बुद्धाचा जो मार्ग आहे तो सर्वांत श्रेष्ठ मार्ग आहे. त्याच्या धर्माने, राजकीय सत्तेचा कमीत कमी उपयोग करून आपला श्रेष्ठ संदेश जगाला दिलेला आहे.

**प्रश्न : शास्त्रीजी, मी मघाशी विचारलेला एक प्रश्न परत काहीशा वेगळ्या स्वरूपात मांडतो. न्यायदर्शन घ्या. त्याच्या मांडणीत आणि त्याच्या झालेल्या विकासात बौद्धिक चोखपणा आढळतो. विधान नेमकेपणे मांडायचे, प्रत्येक विधान तपासून घ्यायचे, त्याला अनुकूल किंवा प्रतिकूल असा जो काही पुरावा असेल तो स्पष्ट करायचा इ. या बौद्धिक सद्गुणाचे तुम्हाला आकर्षण आहे. तुम्ही जे पाश्चात्त्य दार्शनिकांचे ग्रंथ वाचले ते भारतीय बौद्धिक परंपरेचे हे संस्कार घेतलेल्या मनाने वाचले, तर बौद्धिक गुणांच्या दृष्टीने पाश्चात्त्य दर्शनात तुम्हाला काही वैशिष्ट्ये आढळली का?**

**उत्तर -** एक वैशिष्ट्य आढळले. ते असे की विचारांची वेगळी वेगळी नवी मांडणी, पूर्वीच्या मांडणीहून निराळी ठरेल अशी मांडणी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात वारंवार करण्यात आलेली आढळली. याचे मला अतिशय महत्त्वाचे उदाहरण म्हणजे कांटचे वाटते. त्याने वैज्ञानिक संशोधनाची जी पद्धती आहे तिच्याशी जुळवून घेण्याकरिता आणि तिचे समर्थन करण्याकरता मानवी बुद्धीच्या घडणीची जी उपपत्ती मांडली ती अभिनव आहे. अर्थात कांटच्या या उपपत्तीवर ती अंतर्मुखवादी (सब्जेक्टिव्हिस्ट) आहे असा आक्षेप घेण्यात येतो. हा आक्षेप कांट वाचत असताना माझ्या ध्यानात ताबडतोब आला. माझ्या भारतीय दर्शनांच्या अध्ययनामुळे माझ्या बुद्धीवर जे संस्कार झाले होते त्यांचा परिणाम असा झाला की, कोणतेही पाश्चात्त्य दर्शन वाचताना मला त्याच्या बौद्धिक रचनेपासून आनंद होत असे; पण त्यातील अडचणीही माझ्या ताबडतोब ध्यानात येत असत. अनेक वेळा त्यातील तर्कदुष्टता-ॲब्सर्डिटी मला दिसत असे. तर्कदृष्टतेचे अनेक प्रकार आहेत; पण या संदर्भात 'ॲब्सर्डिटी' या अर्थाने मी 'तर्कदुष्टता' हा शब्द वापरीत आहे. उदा. कांट 'नाउमिनन' (वस्तू जशी स्वतः आहे तशी) आणि 'फिनॉमिनन' (भासमान वस्तू) असा भेद करतो; पण 'फिनॉमिनन' ही 'नाउमिनन' असली पाहिजे. कारण फिनॉमिनन ही स्वयं वस्तू असली पाहिजे. ती असल्याशिवाय ती नाउमिननची प्रतिनिधी होऊ शकणार नाही. म्हणजे ती फिनॉमिनन म्हणूनही असू शकणार नाही. हा भेद प्लेटोपासून आलेला आहे आणि म्हणून व्हाइटहेडने म्हटले आहे की, सगळे पाश्चात्त्य तत्त्वज्ञान म्हणजे प्लेटोच्या फुटनोटस् आहेत. कांट हा महापुरुष महाज्ञानी होऊन गेला; पण प्लेटोचा 'गुहे'चा जो सिद्धांत आहे, तोच त्याने एका अर्थी मांडला आहे. अर्थात परिष्कार वेगळा आहे..

सारांश, पश्चिमी तत्त्ववेत्ते जे अंतिम सिद्धांत मांडतात त्यात मला काही दोष दिसतात; पण हे दोष माणसामध्ये अपरिहार्य आहेत. सर्वसंग्राहक असे अंतिम तत्त्वज्ञान जेव्हा तुम्ही मांडू जाता याला आपण विश्वदर्शन आणि आत्मदर्शन असे म्हणू या- तेव्हा त्याच्यामध्ये अडचणी कायम राहणारच आणि त्या अनुल्लंघ्य आहेत, अशी माझी समजूत आहे. कार्ल मार्क्सने आपल्या फॉइरबाखवरील थीसिसमध्ये म्हटले आहे की, जग कसे आहे हा प्रश्न तत्त्ववेत्त्यांनी उलगडण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला आहे; परंतु खरा प्रश्न जग बदलण्याचा आहे आणि ते आपण बदलतो हाच वास्तव विश्व आहे, आत्म्याच्या स्वतःच्या बाहेर असलेले विश्व आहे, याचा पुरावा आहे,



वाय १७८-१०

असे त्याचे म्हणणे आहे; पण या विधानानेही फारसा काही उलगडा होत नाही. याचा अर्थ एवढाच की, मार्क्सचे माणसाला असे सांगणे आहे की, जग बदलायला लाग. जग कसे आहे याच्या खोल चर्चेत शिरून हाती निश्चित असे काही लागत नाही, असा मार्क्सच्या भूमिकेचा मी अर्थ घेतो.

याच दृष्टीने मी भारतीय तत्त्वज्ञानाकडे पाहतो. उदा. मायावादाचा अर्थ पुष्कळ लोक असा लावतात की, हे जग मिथ्या आहे, हे नुसते स्वप्न आहे, हा भ्रम आहे; पण भ्रमाचे अनेक पर्याय आहेत. उदा. शुक्तीवरील रजताचा भाग हा तात्पुरता भ्रम आहे - प्रातिभासिक सत्ता, स्वप्न असेच आहे. आणि काही कायम टिकणारे भ्रम आहेत - व्यावहारिक सत्ता = बाह्यविश्व. यांच्यातही काही अडचणी आहेत; पण 'मायावाद' या शब्दाने आपण घाबरून जाता कामा नये. मायावादसुद्धा काही काळपर्यंत एक प्रकारचे बौद्धिक समाधान देतो, तरी खोल मनात असमाधान कायमचे राहील. तसाच, जैनांचा स्यादवाद घ्या. माझ्या खोल मनातील असमाधानाचेच स्यादवाद समर्थन करतो. याचा आशय असा की, कोणतेही तत्त्वज्ञान एका मर्यादेपर्यंतच बरोबर असते. 'स्यात्' याचा अर्थ क्वचित; हा एक नवीन पारिभाषिक शब्द यांनी बनविला आहे. म्हणूनच मला नागार्जुनाचार्यांचे तत्त्वज्ञान अतिशय आवडते. कित्येक वेळा मला असे वाटते की, मी नागार्जुनाचार्यांच्या बरोबर चाललेलो आहे. त्यांचे म्हणणे असे की, कोणतेही तत्त्वज्ञान जे आहे ते तुम्ही लक्षात घ्या; पण नंतर त्याच्याबाहेर पडा, ही माझी स्थिती आहे. आधुनिक ज्ञानाचा विचार करताना माझी स्थिती अशी असते आणि ती केवळ ऑंटॉलॉजी (वस्तुशास्त्र) यासारख्या अमूर्त, ॲब्स्ट्रॅक्ट विषयाच्या बाबतीतच नव्हे, तर सामाजिकशास्त्रांच्या बाबतीतसुद्धा.

पारंपरिक शास्त्रांच्या माझ्या अध्ययनाच्या संस्कारामुळे निश्चित विधाने प्रस्थापित करता येतात, याविषयीचे काही दंडक माझ्या मनात दृढ आहेत. समाजशास्त्रामध्ये सामाजिक शक्ती कल्पिण्यात येतात; पण या शक्तीच्या कार्याचे मापन करता येत नाही. त्यांच्याविषयीच्या कार्यकारणात्मक नियमांची परिमाणात्मक (क्वांटिटेटिव्ह) मांडणी करता येत नाही. शिवाय मानवी मन ही सुद्धा एक प्रचंड सामाजिक शक्ती आहे. ही सामुदायिक मने कशी कार्ये करतात याचे मोजमाप सापडत नाही. या सामुदायिक मनापासून क्रांती व्हायची आहे, त्याच्या प्रवृत्तीपासून आणि कृतीपासून क्रांती व्हायची आहे; पण ही प्रवृत्ती आणि कृती यांचे मोजमाप सापडत नाही. कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद एक प्रकारचा 'नियततावाद' (डिटरमिनिझम) आहे. ऐतिहासिक शक्ती अपरिहार्य रीतीने बदल घडवून आणणारच आणि प्रगतीकडे नेणारच असे त्याचे सार आहे. हा मार्क्सचा आशावाद एकोणिसाव्या शतकातील आशावादाचा एक पर्याय आहे आणि मार्क्स एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावरच आहे. विसाव्या शतकामध्ये कार्यकारणभावाची जी बारीक, गणितागत पद्धती आली आहे तिच्या दृष्टीने पाहता असे म्हणावे लागते की, सामाजिक शक्तींचा कार्यकारणभाव या प्रकारे मांडण्यासाठी त्यांचे गणिती मापन करणे आवश्यक आहे. ते करता येत नाही. संख्याशास्त्राची पद्धती वापरून सामाजिक घटनांचे काही प्रमाणात मोजमाप करता येते

आणि तसा प्रयत्न चालू आहे. मी मार्क्सिस्ट झाल्यानंतर माझ्या ठिकाणी जो क्रांतिवादी निश्चय होता तो ढासळला आहे. मी निराशावादी नाही; पण सावधानवादी आहे. माझा आताचा निष्कर्ष असा आहे की, अनुभवाने प्रयत्नशील व्हा, उच्च ध्येयवाद मनात बाळगा, त्याला 'युटोपिया' म्हणा. युटोपियाची माणसाला गरजच आहे. माणसाचा सबंध इतिहास जर पाहिला तर असे दिसते की, माणूस पृथ्वीवर किंवा स्वर्गात आदर्श निर्माण करतो. 'धि सिटी ऑफ गॉड'चा - देवनगरीच्या, पृथ्वीवरच्या किंवा स्वर्गातल्या - माणसाला ध्यास असतोच. भारतीयांनीही हा दृष्टिकोन बाळगला होता. त्यांनी पृथ्वीवर कृतयुगाची कल्पना केली होती. जेथे राज्य नाही, राजा नाही, लोक परस्परांच्या सहकार्याने नांदतात, रागलोभाने अभिभूत होत नाहीत असे कृतयुग होते असे मानीत. हा युटोपिया होता.

आणि कार्ल मार्क्सचा विचारही मला युटोपियन वाटतो. कोणत्याही युटोपियाला तुम्ही बिलगून राहिला की तुम्ही हिंसक आणि विध्वंसक बनता. युटोपियाने तुमच्या मनाला उच्च प्रेरणा आणि उच्च ध्येय दिले पाहिजे आणि ही जी पृथ्वी आहे, हे जे वास्तव जग आहे त्याच्या शक्तीबाहेर असलेले आदर्श आपण वास्तवतेत आणू पाहतो, असा युटोपियन वृत्तीचा अर्थ लावला पाहिजे. माणसाच्या आणि पृथ्वीच्या ताकदीबाहेर असलेलाही उच्च, उदात्त आदर्श आपण वस्तुस्थितीत उतरवू पाहतो. याच्या पाठीमागे काहीतरी नैसर्गिक खोल प्रक्रिया आहे. युटोपिया ही एक प्रकारची 'मिथ' आहे; पण 'मिथ' निर्माण करण्याची प्रक्रिया माणसाच्या जन्मापासूनची आहे. आजही आहे. म्हणून 'मिथ' पासून माणूस कधी सुटू शकत नाही. स्वार्थी माणूस कदाचित सुटलेला असतो; पण ज्यांना काहीतरी मोठे घडवायचे असते, उच्च भवितव्यासाठी जे धडपडत असतात त्यांना पौराणिक आदर्शवादाकडून प्रेरणा मिळत असते, असा माझा हल्लीचा दृष्टिकोन आहे.

कुणी म्हणतात मी जडवादी आहे. मी जडवादी नाही; पण मी जडवादावर निबंध लिहिलेला आहे. तो मी एच. जी. वेल्स आणि ज्युलियन हक्स्ली यांच्या 'सायन्स ऑफ लाइफ' - या पुस्तकाचे वाचन केल्यावर लिहिला. ज्युलियन हक्स्ली हा फार सावध विचारवंत होता. टिल्यार्द द शार्दी (PIERRE TEILHARD DE CHARDIN) हा जो जीवशास्त्रज्ञ कॅथलिक धर्मगुरू होता, त्याचा ग्रंथ मला फार आवडला. त्याने मानवजातीला व्यापणारे असे 'नुस्फिअर' - 'मनोमंडल' - असते ते मानवांनीच निर्मिलेले आहे, असा सिद्धांत मांडला आहे. हीसुद्धा एक मिथ आहे. ही मिथ एक महत्त्वाचे सत्य दाखविते असे मला वाटते आणि ते म्हणजे मनुष्यजात एक व्हायचा प्रयत्न करते आहे, आपले एक सर्वसमावेशक असे मनोविश्व निर्माण करण्याचा प्रयत्न करते आहे. कारण तिला या विश्वातून नष्ट व्हायचे नाही. परस्परविद्रोहामुळे मानवजाती नष्ट होण्याची शक्यता आहे. म्हणून भिन्न संस्कृती एकत्र येणे, भिन्न लोक आणि वंश लैंगिक व अन्य व्यवहारांतून एकमेकांत मिसळून जाणे ही मोठी गरज आहे. भिन्न जमाती एकत्र आल्या तर त्यांची परस्परांमध्ये लग्ने का होतात? लग्न होऊ दिले नाही, तर लैंगिक संबंध का प्रस्थापित

होतात? भिन्न मानवी वंश एकत्र आले तर ते नेहमी एकमेकांत मिसळलेले का आढळतात? 'नुस्फिअर' निर्माण करणारी जीवीय प्रेरणा हे त्याचे उत्तर होय. 'नुस्फिअर'चा हा सिद्धांत मला अतिशय आवडतो. मानवतावादाच्या दृष्टीने, मानवजातीच्या उच्च भवितव्याच्या दृष्टीने शार्दीचा हा विचार अतिशय प्रेरक आहे.

वैज्ञानिक विश्लेषणाच्या दृष्टीने, कार्ल पिअर्सनचे 'विज्ञानाच्या मर्यादा' - धि लिमिटेशन्स ऑफ सायन्स - हे पुस्तक मला अतिशय महत्त्वाचे वाटते. पुष्कळ लोक ते टाकून देतात, महत्त्वाचे मानीत नाहीत; पण मी तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी आहे. त्यामुळे मला हे माहीत आहे की, विज्ञानाच्या योगे ज्यांचा उलगडा होणार नाही अशी गृहीतकृत्ये विज्ञानाचीच आहेत. उदा. 'जाती' - युनिव्हर्सल - किंवा 'सामान्य' हे विज्ञानाच्या दृष्टीने काय आहे हे सांगताच येत नाही. नाममात्रवादी (नॉमिनलिस्ट) पंथाचे तत्त्ववेत्ते आहेत, ते 'सामान्य' मानत नाहीत; परंतु सामान्ये गृहीत धरल्याशिवाय चालत नाही. विज्ञानाच्या मुळाशी मौलिक अशी पॉसचुलेट्स - गृहीतकृत्ये - आहेत. विज्ञानाकडून त्यांचे खंडनही होत नाही आणि विज्ञानाकडून त्यांना अर्थवत्ताही लाभत नाही, अशी विज्ञानाची तार्किक रचना आहे. उदा. ही साधी गोष्ट घ्या. माझे हे म्हणणे लोकांना पटणार नाही; पण 'एक' ही संख्या घ्या. 'एकत्व' ही संख्या कल्पनामात्र आहे; पण एक ही वस्तू आहे हे मानावेच लागते. कारण जेव्हा तुम्ही रसायनशास्त्रामध्ये अनेक वस्तूंचे संबंध येऊन एक नवीन वस्तू बनते असे मानता, तेव्हा विशिष्ट संख्या ही त्या वस्तूंमध्ये असावीच लागते. संख्या ही काल्पनिक आहे की वास्तविक आहे हा गहन प्रश्न आहे. नीलरूप किंवा रक्तरूप घेतले तर त्याचा अर्थ विज्ञानाच्या पद्धतीने सांगता येतो. सूर्यकिरणांच्या द्वारा त्यांचा अर्थ सांगता येतो. तसा एकत्व, द्वित्व हा गुणांचा अर्थ विज्ञानाच्या साहाय्याने सांगता येत नाही. शिवाय एकत्व, द्वित्व इत्यादी गुण अनेक प्रकारचे आहेत. कारण संख्येवर संख्या राहते ना ! शंभर ही एक संख्या आहे. तेव्हा असे अनेक मुद्दे असतात की, जे विज्ञानाच्या तपासणीच्या बाहेर आहेत; पण विज्ञानाच्या पाठीशी आहेत. म्हणजे वस्तूच्या यथार्थ स्वरूपाचा शोध घेण्याची जी बौद्धिक साधने आहेत ती वैज्ञानिक पद्धतीला आणि संकल्पनांना व्यापून त्यांच्या पलीकडे जाणारी आहेत, असे मला वाटते.

विज्ञानाला अनाकलनीय असलेली दुसरी गोष्ट म्हणजे 'सेल्फ कॉन्शसनेस' आत्मप्रतीती, आत्मसंवित. आजच्या जीवशास्त्राच्या संदर्भात ही जी आत्मसंवित आहे तिचा अर्थ आपण काय लावणार? तर अर्थ लावता येणार नाही. ती आहे एवढेच आपण मान्य करू शकू. ती नाकारता येणार नाही आणि म्हणून ती आहे हे आपल्याला मान्य करावे लागते. ही आत्मसंवित वस्तुमात्रात आहे की, जीवमात्रातच आहे, की मनुष्यमात्रातच आहे, याविषयी आपल्याला काही सांगता येत नाही. तुम्ही म्हणाल की, या आत्मसंवितचे तुम्ही फारच स्तोम माजवीत आहात; पण माझे म्हणणे असे आहे की, ही एक कठीण गोष्ट आहे. विज्ञानाच्या पद्धतीने जिचा अर्थ लावता येत नाही अशी ती एक गोष्ट आहे. असा माझा आजचा दृष्टिकोन आहे. मी जडवादी, म्हणजे

भौतिकवादी आहे, की अध्यात्मवादी आहे हा प्रश्न माझ्या दृष्टीने आता तितकासा महत्त्वाचा राहिलेला नाही.

**प्रश्न : शास्त्रीजी, आता परत इतिहासाकडे वळू या. १९३० सालापासून मार्क्स तुमच्या वैचारिक जीवनात शिरला आणि त्याला त्याने वळणही दिले.**

**उत्तर -** कृतीलाही दिले.

**प्रश्न : ठीक. कृतीलाही दिले. तुमची 'हिंदुधर्मसमीक्षा' हे मार्क्सवादी दृष्टिकोनातून लिहिलेले पुस्तक आहे.**

**उत्तर -** मार्क्सच्या प्रभावाखाली लिहिलेले पुस्तक आहे. 'धर्माची समीक्षा ही सर्व समीक्षेची सुरुवात असते,' हे जे मार्क्सचे वाक्य आहे ते अतिशय खोल वाक्य आहे. हे अर्थात शब्दशः घ्यावे असे वाक्य नाही. धर्माची समीक्षा करण्यापूर्वी इतर समीक्षा माणूस करीत होता. धर्म ही गोष्ट माणसाच्या मनात आणि समाजव्यवस्थेत खोलपर्यंत रुजलेली गोष्ट असल्यामुळे त्याच्या समीक्षेला फार महत्त्व आहे एवढाच त्याचा अर्थ आहे. आता तुमच्या लक्षात येईल की, परंपरागत अध्ययन केले असल्यामुळे प्रत्येक वाक्य तपासून मग त्याचा अर्थ मी लावतो.

**प्रश्न : म्हणजे मार्क्सचे हे वाक्य काहीसा अर्थवाद आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे.**

**उत्तर -** बरोबर. अर्थवाद आहे.

**प्रश्न : आता एम. एन. रॉय यांचा आणि तुमचा संबंध मार्क्सवादातून जुळून आला नाही का?**

**उत्तर -** होय. कारण भारतीय परिस्थितीला मार्क्सवाद कसा लावायचा हा एक प्रश्न होता. मार्क्सच्या दृष्टीने भारतीय समाजरचनेचा अर्थ नीट लागत नाही. मार्क्सने युरोपियन समाजाच्या इतिहासाच्या वेगवेगळ्या अवस्था दाखविल्या आहेत; परंतु आशियाबद्दल 'एशियाटिक फॉर्म ऑफ इकॉनाशी' असा निर्देश तो करतो; पण म्हणजे काय? एका शब्दप्रयोगाने सबंध आशिया गुंडाळला आहे; पण प्रत्येक देशातील शेतीसंस्थेचे स्वरूप वेगळे आहे. वर्गरचना निरनिराळी आहे. रॉयसाहेबांमुळे मी या तपशिलाकडे ओढला गेलो. उदा. त्यांनी 'इंडिया इन ट्रॅन्झिशन'मध्ये भारतीय राष्ट्रवादाची मीमांसा केली आहे. ती मला पसंत पडली. पुढे भारतीय क्रांतीचे नेतृत्व भारतीय कामगारवर्ग करील हे म्हणणे मांडले. ते वाचीत असतानाच मला ते पटले नाही. कारण हा वर्ग भारतात तुरळक होता आणि भारतीय समाजव्यवसथा ग्रामीण संस्थांवर आधारलेली, ग्रामीण विचारपद्धतीत मुरलेली अशी आहे.

**प्रश्न : शास्त्रीजी, माझे दोन प्रश्न आहेत. एक असा, की समजा १९३० सालच्या सुमाराला जर एखाद्या व्यक्तीचा मार्क्सवादाशी परिचय झाला आणि तिला मार्क्सचा विचार एकंदरीत पटला, अगदी पूर्णपणे पटला असेही नव्हे, तर एकंदरीत हा योग्य दृष्टिकोन आहे, अशी तिची धारणा झाली, तर तिने स्वाभाविकपणे काय केले असते? ती भारतीय**

**कम्युनिस्ट पक्षात शिरली असती. आता तुम्ही आणि तुमचे सहकारी रॉयकडे जे गेलात त्याचे रहस्य काय? रॉयविषयी हे आकर्षण तुम्हाला का वाटले?**

**उत्तर -** तुम्ही अगदी बरोबर प्रश्न विचारला. माझी जी परंपरा आहे, आता मी परत परत माझी परंपरा म्हणतो याच्यात आत्मगौरवाचा दोष होतो. 'इंद्रोऽपि लघुता याति स्वगुणप्रख्यापनेन ।' आपले गुण सांगत बसल्याने इंद्राला पण लहानपणा येतो. तेव्हा ही मुलाखत देतानाच मला चमत्कारिक वाटत आहे.

**प्रश्न : त्याला काही इलाज नाही शास्त्रीजी.**

**उत्तर -** तर माझी परंपरा अशी आहे. ज्या माणसांचा माझा फार चांगला आणि जवळचा संबंध आला आणि ज्यांचा माझ्यावर फार प्रभाव पडला ते लोक म्हणजे सशस्त्र क्रांतिकारक. आणि हा प्रभाव माझ्यावर कायमचा राहिला. याचे कारण जेव्हा मी तपासतो तेव्हा ब्रिटिशांचा द्वेष हे ते कारण नव्हे हे मला दिसते. क्रांतिकारकांचा आत्मसमर्पणाचा भाव हे ते कारण आहे. त्यांच्या या आत्मसमर्पणाच्या तयारीने मी फार प्रभावित झालो. माझा जो कोणत्याही ध्येयवादाकडे कल होतो, कोणत्याही ध्येयवादाचे मला जे आकर्षण वाटते त्याच्या मुळाशी माझ्या भावना असतात, हे माझ्या ध्यानात आले आहे. त्यामुळे एम. एन. रॉय यांचे पूर्वाश्रमीचे चरित्र मला अतिशय आकर्षक वाटले. रॉय यांचे वैयक्तिक चरित्र मला जसे आकर्षक वाटले तसे इतर कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे वाटले नाही. मी कम्युनिस्ट पक्षात का गेलो नाही आणि रॉय यांच्या पाठीमागून का गेलो याचे केवळ हे वैयक्तिक कारण आहे.

**प्रश्न : पण तुमचे इतर जे सहकारी होते त्यांना रॉयविषयी जे आकर्षण वाटले. केवळ फॅसिनेशन या अर्थाने मी आकर्षण हा शब्द वापरीत नाही, तर आपण मार्क्सवादी आहोत; पण मार्क्सवादाचा भारतीय संदर्भात योग्य प्रकारे अर्थ लावून पुढे काय करावे याविषयीचे योग्य मार्गदर्शन रॉय हेच करू शकतात म्हणून. अधिकृत कम्युनिस्ट पक्षात आणि त्यांच्यात काही बेबनाव असला तरी आपल्या परिस्थितीच्या संदर्भात आपण रॉय यांच्यामागेच उभे राहावे, असे त्यांना जे वाटले त्याची कारणे काय?**

**उत्तर -** रॉय यांचे आकर्षण जे अनेकांना वाटले त्याची दोन कारणे मला दिसतात. एक त्यांचे अद्भुतरम्य जीवन. दुसरे असे की, भारतीय संदर्भात मार्क्सवादाचे प्रतिपादन ते जे करीत त्याच्यात अस्पष्ट असे काही नसे. रॉयमध्ये वक्तृत्व अजिबात नव्हते; पण ते जे विचार मांडत त्यांच्यामध्ये स्वच्छता असे, युक्तिवाद चांगले असत आणि मार्क्सवादी परंपरेचा कोणताही आधार न घेता मार्क्स असे म्हणतो आणि लेनिन असे म्हणतो अशा तऱ्हेचा आधार न घेता ते प्रश्नांचे विश्लेषण करीत. मार्क्सच्या तत्त्वांचा आणि सद्य:परिस्थितीचा सांधा ते नीट जुळवीत. त्यांच्या वैचारिक मांडणीत भक्कमपणा आणि प्रसन्नता होती.

**प्रश्न : शास्त्रीजी, तुम्ही गोवर्धन पारीख किंवा व. भ. कर्णिक यांच्यासारखी माणसे घ्या. आता ही गोष्ट त्यांनी स्वतः मान्य केली नसती; पण ही अतिशय ध्येयनिष्ठ अशी माणसे आहेत. कारण खोल ध्येयनिष्ठा असल्याशिवाय माणूस व्यापक सामाजिक क्रांती करू पाहणाऱ्या पक्षाशी एकरूप होऊ शकणार नाही; पण या माणसांची दुसरी बाजू होती. हे अतिशय चोखपणे विचार करणारे लोक होते. भावनेच्या भरात वाहून जातील असे हे लोक नव्हते, किंवा एखादी आयडिऑलॉजी - सर्वंकष विचारसरणी - एकदा स्वीकारतील, मग विचार करण्याचे सोडून देतील, त्या विचारसरणीचे जे अधिकृत प्रतिनिधी असतील त्यांची वेळोवेळची मते स्वीकारून कामे करीत राहतील, अशा वृत्तीचे हे लोक नव्हते. हे तपासून पाहणारे लोक होते. विवेकवादी विवेकनिष्ठ होते. हे लोक रॉयकडे वळले याचे कारण ही ध्येयनिष्ठा ध्येयवादी वृत्ती हा एक त्यांना जोडणारा धागा होता. दुसरे कारण, तुम्ही म्हणाला त्याप्रमाणे रॉय यांची विचार करण्याची पद्धत, स्वतः विचार करून काढलेले निष्कर्ष रॉय मांडत आणि भारतीय वास्तव परिस्थिती व मूलभूत मार्क्सवादी तत्त्वे यांची ते योग्य प्रकारे सांगड घालीत. हा वैचारिक धागाही रॉय आणि ही मंडळी यांना समान होता. आता माझा दुसरा प्रश्न असा आहे की, रॉय यांनी आपली सैद्धांतिक भूमिका वेळोवेळी बदलली. एक बाहेरचा माणूस म्हणून मला जे नवल वाटते ते असे की, दरवेळेला रॉय यांची सैद्धांतिक भूमिका बदलली की इतरांचीही बदलत असे. याचे रहस्य काय? रॉय यांचा फार मोठा प्रभाव या गटावर होता असे होते की, तुमच्यात सतत चर्चा होत असत आणि जो कॉन्सेन्सस - संमती - निर्माण होत असे तो रॉय मांडत?**

**उत्तर -** परस्परातील विचारविनिमय ही गोष्ट सतत चालत असे. एक उदाहरण मी देतो. अ. भि. शाह हे आमच्यात उशिरा आले. ते अनेक वेळा आक्षेप घेत. रॉयसाहेबांना त्याच्यात आनंद वाटे. चर्चेत जर एखादा नवा विशेष महत्त्वाचा मुद्दा कुणी मांडला आणि जरी तो अध्यात्मवादी असला तरी रॉय त्याला महत्त्व देत. एकमेकांसमोर बसायचे आणि आपली पार्श्वभूमी मार्क्सवादी असली तरी ती गोष्ट विसरून आपला जो काही विचार असेल तो सरळ मांडायचा ही गोष्ट म्हणजे स्वतः विचार करण्याची प्रवृत्ती त्यांना अतिशय रुचत असे. अर्थात, कामे करण्यालाही खूप महत्त्व होते; पण विचार करण्यालाही महत्त्व होते. एक उदाहरण देतो. लेनिनने 'मटीरिॲलिझम ॲण्ड इंपीरिको-क्रिटिसिझम' - 'जडवाद आणि आनुभविक मीमांसा' हा ग्रंथ लिहिला आहे आणि त्याच्यात कित्येक वैज्ञानिकांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी प्रतिपादन केलेल्या अंतरंगनिष्ठतावादावर - सब्जेक्टिव्हिझमवर - टीका केली आहे. हा ग्रंथ मी वाचला, तेव्हा लेनिनची चर्चा करण्याची जी पद्धती आहे ती मला पटली नाही. विचारांचा सामना सरळ विचाराने केला पाहिजे. लेनिन असे करीत नाही. उदा. भौतिकशास्त्रामध्ये ज्यांनी महत्त्वाची भर घातली आहे अशा वैज्ञानिकांनी मांडलेल्या सिद्धांतांवरही त्याने 'It is a headless philosophy' अशी टीका केली आहे.

म्हणजे या तत्त्ववेत्त्यांनी डोके मानले नाही, मेंदू मानला नाही, असा त्याचा आक्षेप आहे.

आता मेंदूचे अस्तित्व आणि कार्य मान्य केल्यानंतर, बाह्य विश्व आहे, त्याचे एक विशिष्ट असे स्वरूप आहे आणि आपल्या प्रत्यक्षानुभवाद्वारा या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान आपल्याला होते असे मानण्यात काही अडचणी आहेत. वस्तूंचा आपल्याला जो प्रत्यक्षानुभव येतो त्याच्या मागे आपल्या इंद्रियांची आणि मेंदूची एक विशिष्ट रचना असते. या इंद्रियांचे व मेंदूचे जे कार्य चालते त्यापासून इंद्रियानुभव निष्पन्न होतो. इंद्रियात व मेंदूत ज्या प्रक्रिया घडतात त्या रासायनिक असतात आणि या प्रक्रियांवर इंद्रियानुभवाचे स्वरूप आधारलेले असते. उदा. स्वाद घ्या. स्वाद ही रासायनिक प्रक्रियेतून निष्पन्न होणारी गोष्ट आहे. वस्तू स्वादिष्ट आहे याचा अर्थ त्या वस्तूमुळे स्वाद निर्माण झाला असा केला पाहिजे. त्या वस्तूमध्ये स्वाद आहे असे मानायला निश्चित आधार नाही. तसेच डोळयांना जो वस्तूचा आकार दिसतो, त्याचा डोळयाच्या रचनेशी संबंध असतो हे आता सिद्ध झाले आहे. उलट डोळयांची वा मेंदूची रचना अनुभवावरून सिद्ध होते. अनुभवाचे स्वरूप इंद्रियांवरून व इंद्रियस्वरूप अनुभवावरून सिद्ध होते ही तर्कदुष्टता कायम राहते.

हे जे आनुभविक - मीमांसक होते, ज्यांनी भौतिकीमध्ये फार महत्त्वाची भर घातली होती ते जेव्हा अशा तऱ्हेच्या बुचकळयात पडतात, तेव्हा त्यांच्यावर सहज हल्ला करायचा आणि त्यांना बाजूला फेकायचे ही काही तत्त्ववेत्त्यांची भूमिका होऊ शकत नाही. ती क्रांतिवादाची भूमिका आहे. लेनिन क्रांतिवादी होता. आपल्या अनुयायांना त्याला आनुभविक - मीमांसावादाकडे वळू द्यायचे नव्हते. त्याच्या हल्ल्यात असा हेतुवाद आहे आणि तो मला मान्य नव्हता. मी रॉयसाहेबांना सांगितले, की हे काही तत्त्ववेत्त्याचे पुस्तक नव्हे, हे क्रांतीच्या प्रचारकाचे पुस्तक आहे.

मी असे म्हटले, ही गोष्ट त्यांना विलक्षण वाटली. या हिंदुस्तानामध्ये, महाराष्ट्रामध्ये ही माणसे मार्क्सवादी होतात, लेनिनबद्दल त्यांना आदर वाटतो, लेनिनच्या क्रांतिकार्याचे ते गुणगान करतात; पण लेनिनचे पुस्तक घेतले तर त्याची चिकित्सा करतात, ही गोष्ट त्यांना विचित्र वाटली. त्यामुळे त्यांना आमच्याबद्दल, अशा प्रत्येक पाळीला, अधिकच आस्था वाटू लागली. आमच्या चर्चा सतत होत असत.

**प्रश्न : असे काही महत्त्वाचे इतर मुद्दे उपस्थित झाले असले तर त्यांचा निर्देश करता का? आणि दुसरी गोष्ट, नवमानवतावाद किंवा तुमचे बावीस सिद्धांत जे उदयाला आले त्याच्यात तुमचा बराच सहभाग होता, असे तुम्ही मला सांगितले आहे. त्याच्याविषयीही मोकळेपणे बोला.**

**उत्तर -** सुरुवात अशी झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळी म. गांधी असहकारिता आणि ‘चलेजाव’च्या चळवळीपर्यंत आले. तेव्हा माझी प्रतिक्रिया अशी झाली की, फॅसिस्ट हुकूमशाही ही एक अतिशय हिंसक अशी शक्ती आहे. ती कोणत्याही उच्च नैतिक मूल्याला थारा देत नाही; पण ही गोष्ट न ओळखता गांधीजी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात उभे राहिले आणि

'चलेजाव'चा आदेश देण्यापर्यंत ते गेले. राजगोपालाचारी, नेहरू यांची दुसऱ्या महायुद्धाच्या काळी मानसिक स्थिती स्पिरिच्युअल टॉर्मेन्टेशनची होती. त्यांना दोस्त राष्ट्रांची बाजू अधिक समर्थनीय वाटत होती. उच्चतम नैतिक मूल्ये शाश्वत आहेत ही गोष्ट या परिस्थितीत माझ्या मनावर चांगली ठसली. ही मूल्ये इतिहासात सापेक्षतेने अवतरतात हा मार्क्सवादी मुद्दा मला अमान्य नाही; पण नैतिक मूल्ये स्वरूपतःच सापेक्ष असतात असे मानले तर त्यांचा अर्थ लावता येणार नाही. मी रॉयसाहेबांना म्हटले, गांधीजी विचाराने आणि भावनेने अहिंसावादी आहेत. मग त्यांना फॅसिझममधला हा भयानक हिंसावाद कसा दिसत नाही?

रॉयसाहेब म्हणाले, तुम्ही अशी भूमिका स्वीकारली तर लोक तुम्हाला 'आयडिअलिस्ट' चिद्वादी म्हणतील. तुम्ही शाश्वत, नैतिक तत्त्वे मानता. इतिहासवाद मानीत नाही. मी म्हटले, म्हणू द्या. इतिहासवादाचा अर्थ मला समजू शकतो; पण अहिंसावाद हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. हिंसा हे एक पाप आहे हा विचार भारतामध्ये फार जुन्या काळी आला. बुद्धाच्या काही संवादात तो व्यक्त झाला आहे. राजाने युद्ध टाळावे असे तो सांगतो. हिंदू परंपरेमध्येसुद्धा युद्ध हे पाप आहे, अनिवार्य असे पाप आहे, असा विचार आहे. महाभारतात तो आला आहे. माझे असे म्हणणे होते की, युद्ध ही नेहमीची आवश्यक संस्था मानणारे फॅसिस्ट व हा सिद्धांत न मानणारी दोस्त राष्ट्रे यांच्यातला हा झगडा आहे. दोस्त राष्ट्रे साम्राज्यवादी होती ही गोष्ट खरी आहे; पण फॅसिस्ट राजवटी ज्या अर्थाने युद्धवादी होत्या त्या अर्थाने ती युद्धवादी नव्हती. या प्रस्तुत युद्धात ते नाइलाजाने उतरले होते. तेव्हा आपण फॅसिस्ट राजवटीच्या विरुद्ध आणि दोस्तराष्ट्रांच्या बाजूने उभे राहिले पाहिजे असे माझे मत झाले.

यानंतर आमची सगळ्यांची विचारचक्रे फिरू लागली. अर्थात रॉयसाहेबांच्या मनातही हा शाश्वत मूल्यांचा विचार दृढ होऊ लागला. महायुद्ध सुरू झाले आणि स्टालिन गप्प बसला ही त्यांना अतिशय अस्वस्थ करणारी परिस्थिती होती. आणि ज्या दिवशी हिटलरने सोव्हिएट युनियनवर हल्ला केला तेव्हा त्यांनी आनंदाने टाळ्या पिटल्या. आता, म्हणाले, 'हे लोक काही सुटत नाहीत. फॅसिस्ट आणि नात्सी हे काही आता पराभवाच्या कचाट्यातून सुटत नाहीत. 'हिटलरचे चुकले.' ते म्हणाले, 'स्ट्रेट्समधून' आशियात उतरायचे आणि सोव्हिएट युनियनला घेराव करायचा. हे केले नाही हिटलरने. सरळ आत घुसला.' मला रॉय त्यांचे वैशिष्ट्य हे वाटते की, ते केवळ ध्येयवादी, क्रांतिवादी नव्हते, तर 'वस्तुवादी' होते, रणनीती जाणत आणि ही रणनीती मला त्यांनी त्यावेळी सांगितली. राजकीय व्यवहारातहीसुद्धा ते अशी रणनीती सांगत. म्हणून त्यांची व लेनिनची दोस्ती झाली. लेनिनला ते अग्रणी वाटले, कारण व्यवहाराचे पृथक्करणही ते चांगल्या प्रकारे करीत.

आमचा असा विचार सुरू झाल्यानंतर ही शाश्वत तत्त्वे कोणती हा प्रश्न पुढे आला. माझ्यावर बौद्धांचा फार खोल संस्कार आहे ही गोष्ट तुमच्या ध्यानात आलीच असेल. बौद्ध पंडित धर्मकीर्ती आचार्यांचे जे वाक्य वाचस्पतिमिश्रांनी उद्धृत केले आहे. "तथा च बाह्या अप्याहुः सत्पक्षापातोहि

धियां स्वभाव." मानवी बुद्धीचा स्वभाव सत्याकडे कलणे. सत्य दिसले, स्पष्टपणे प्रकट झाले की लगेच बुद्धी अगोदरची धारणा टाकून देते. हा बुद्धीचा स्वभाव ध्यानात धरून विचार केला पाहिजे. आता सत्य आणि अहिंसा ही शाश्वत तत्त्वे देशकालाच्या मानाने ऐतिहासिक परिस्थितीप्रमाणे एका अर्थी बदलतात ही गोष्ट खरी आहे; पण काही गोष्टी त्याच स्वरूपात लख्खपणे कायम राहतात असेही मानावे लागते. उदा. साधी गोष्ट घ्या. शरीरपोषक द्रव्यांचे मूल्य हे काही इतिहासकालात बदलत गेलेले नाही. ते कायम राहिलेले आहे. तसेच ज्ञानामुळे माणसांची जीवनक्षमता वाढत असते. हा सिद्धांत जीवशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचा आहे. माणसाला जी बिनचूक माहिती असते तिचे त्याच्या जगण्याच्या दृष्टीने फार महत्त्व असते.

ही 'इन्फर्मेशन थिअरी' आता एकपेशी जीवापर्यंत नेऊन भिडवली आहे. थोड्याशा अलंकारिक भाषेत असे म्हटले आहे की, मधमाशीच्या बीजशक्तीमध्ये पाचशे पीएच. डी. थिसिस साठलेले असतात, आणि पाचशे पानांच्या पाच हजार ग्रंथांत राहील इतकी माहिती माणसाच्या बीजामध्ये साठलेली आहे. डोळे, नाक, कान, स्नायू इत्यादी कसे बनवायचे याची अभियांत्रिकी या बीजामध्ये साठलेली आहे. तेव्हा सत्याची गरज जीवनमात्राला आहे आणि मानवी जीवनाच्या संदर्भात ही गोष्ट अधिकच स्पष्ट झाली आहे. कारण त्याच्या ज्ञानाची पार्श्वभूमी फार मोठी असते. तेव्हा सत्य हा जीवनाचा आधार आहे हा शाश्वत सिद्धांत आहे. तो इतिहाससापेक्ष नाही. अर्थात, विज्ञानाची प्रगती चालू असते, एकेकाळी ज्ञान म्हणून मानलेल्या समजुती अधिक चांगल्या समजुती प्राप्त झाल्यावर टाकून दिल्या जातात ही गोष्ट खरी आहे. विज्ञानाच्या प्रगतीला इतिहास असतो. पण मार्क्सने मानवी समाजरचनेचा जो इतिहास सांगितला आहे- प्राथमिक समाज, प्राचीन समाज, सरंजामी समाज, भांडवलशाही समाज - त्या इतिहासाहून स्वतंत्र असलेला असा हा इतिहास आहे. मानवी समाजाच्या इतिहासामुळे ज्ञानाच्या इतिहासाचा उलगडा होऊ शकत नाही. त्या त्या संस्कृतीतील ज्ञान त्या संस्कृतीच्या धारक असलेल्या समाजाच्या रचनेशी संबंधित असतेच असे नाही.

तेव्हा निसर्गशास्त्रे आणि जीवशास्त्र यांच्या पार्श्वभूमीवर आपले सिद्धांत आपण आधारले पाहिजेत, असा विचार आम्ही केला. कार्ल मार्क्सच्या सिद्धांतांना ही पार्श्वभूमी नाही. जीवशास्त्र हे अलीकडच्या काळात खूपच विकसित झाले आहे. मार्क्सचा काळ हा डार्विनचा काळ. मार्क्स आपला कॅपिटल हा ग्रंथ डार्विनला अर्पण करायला निघाला होता; पण डार्विनने नकार दिला. तो शुद्ध वैज्ञानिक होता. मार्क्सचे विचार त्याच्या वैज्ञानिक दृष्टीशी जुळणारे नव्हते, म्हणून त्याने नकार दिला. नंतर मेंडेलिअन उपपत्तीचा विकास झाला. आता तर वीजशक्तीचे पृथक्करण झाले आहे, तिचे व्याकरण वा वर्णमाला सापडली आहे; आणि सबंध जीवजातीची जी दोन प्रमुख घटकद्रव्ये आहेत ती सापडली आहेत. हे जे नवे शास्त्र आहे, त्यांच्या आधारावर आपले सिद्धांत आपण मांडू असे मी रॉयसाहेबांना म्हटले.

मी जुलियन हक्स्लीचा वाचक होतो, त्याचे धर्माविषयीचे पहिले विचार मी वाचले होते

आणि तो त्यांच्यापुढे गेला होता हेही मला माहीत होते. तेव्हा या ज्ञानाच्या आधारे आपले सिद्धांत आपण मांडू असे मी म्हटले आणि रॉयसाहेबांनी त्यांची व्यवस्थित मांडणी केली. या मांडणीतले मुख्य मुद्दे म्हणजे सत्याचा शोध - सर्च फॉर ट्रूथ आणि स्वातंत्र्याची साधना - क्वेस्ट फॉर फ्रीडम - या मानवी अस्तित्वाला आधारभूत असलेल्या, मानवी प्रवृत्तीचा गाभा असलेल्या गोष्टी होत. हे मी एका अधिवेशनात मांडले होते. मग त्या दृष्टीने हा सर्व विचार रॉयसाहेबांनी व्यवस्थित रीतीने मांडला. मूलगामी लोकशाही, 'ग्रासरूट्स डेमॉक्रसी', पक्षहीन लोकशाही ही त्यांची कल्पना. ती मला एकदम आवडली; पण तीसुद्धा चर्चेचा विषय होऊन बसली. सत्तेसाठी पक्ष निर्माण होतात आणि मग लोकशाहीलाही मर्यादा पडतात हा विचार सर्वांना पटला. ही जी सिद्धांतमाला आहे तिच्यात मला अजूनही काही चूक आढळत नाही. या नवमानवतावादाचा काहींना विवाद्य वाटणारा पहिला सिद्धांत असा आहे : "नियमबद्ध निसर्गाच्या अधिष्ठानावर मानव जन्मला आहे, म्हणून त्याला नियमबद्धरीतीने विचार करण्याची स्वाभाविक बुद्धी प्राप्त झाली आहे. या बुद्धीमुळेच मानवास हिताहिताचा विवेक म्हणजे नैतिकता प्राप्त झाली आहे." हे विधान आरशासारखे स्वच्छ आहे.

जीवनाच्या अंतिम मूल्यांचा निर्देश करूनच सामाजिक कृतीविषयीचे आपले सिद्धांत मांडले पाहिजेत आणि याची गरज सामाजिक क्रांती करू पाहणाऱ्यांना अधिकच असते. कारण क्रांतिकारकांचा ओढा अंतिम मूल्यांकडे असतो. जेव्हा मी मार्क्सवादी झालो तेव्हापासूनच मी मानवतावादी झालो. हिंदू धर्म, इस्लाम, ख्रिश्चन धर्म या सर्वांविषयी मला ऐतिहासिक दृष्टीने आदर आहे; पण जोतीराव फुले यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक धर्मग्रंथ ही माणसाची कृती आहे आणि प्रत्येक धार्मिक परंपरा ही माणसाची परंपरा आहे, आणि म्हणून तिच्यात दोष असतात व ते साफ करावे लागतात. म्हणून कुठे दिव्य शक्तीचा आविष्कार आहे किंवा कुठे दिव्य उपदेश आहे असे मी मानत नाही. भगवद्गीता दिव्य उपदेश आहे असे मी मानत नाही. पण तिच्यातला जो मोक्षधर्म आहे तो मला फार आवडतो. तो अगदी आदर्श आहे. पृथक्करण केले, तर लक्षात येते की, मनुष्याचे जे मन आहे त्याला आकर्षक वाटेल असा तो धर्म आहे; पण त्याला झेपेल असा तो धर्म नाही.

**प्रश्न : आता रॉय यांच्या थीसिसकडे वळू या. रॉय यांना असे वाटले का, की कम्युनिस्ट चळवळीची जी उद्दिष्टे होती, ती सोव्हिएट रशियात जी राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था प्रत्यक्षात अस्तित्वात आली होती तिच्यात पूर्णपणे प्रतिबिंबित झाली नाहीत, उलट ती विकृत झाली. तेव्हा कम्युनिस्ट चळवळीचा मार्ग मूलतः चुकला आणि याचे कारण तिचे आधारभूत सिद्धांत कित्येक बाबतीत मूलतः चुकलेले होते. अशा तऱ्हेची जाणीव रॉयसाहेबांना आणि तुम्हा मंडळींना आली होती का?**

**उत्तर -** फारच आली होती. उदा. ध्येयवाद, विचार ही कायम प्रवर्तक शक्ती आहे. म्हणून ऐतिहासिक भौतिकवादाला अनुसरून मार्क्सने भौतिक पाया आणि आधारित रचना हा जो भेद

केला त्याने फार गोंधळ माजला आहे असे म्हटले पाहिजे. कामगारवर्गाची तयारी करा आणि त्याला लढायला लावा; पण यासाठी त्यांना विचार दिला पाहिजे, समाजाला विचार दिला पाहिजे. विचारही तितकीच मोठी शक्ती आहे. मार्क्सवाद हाच आधी मोठा विचार आहे. तो श्रमजीवी वर्गाची आत्मप्रतीती - सेल्फकॉन्शसनेस - आहे आणि ती आधारित रचनेचा भाग मानला आहे. तेव्हा पाया आणि आधारित रचना या द्वंद्वाचा अर्थच समजू शकत नाही. आधारित रचना म्हणजे विचार, तत्त्वज्ञान, मूल्ये हेसुद्धा भौतिक शक्तीचे उच्चतम, अधिक सशक्त असे रूप आहे. ज्याप्रमाणे लोखंडापासून तयार केलेल्या रचनेची, यंत्राची शक्ती लोखंडापेक्षा अधिक असते त्याप्रमाणे मानवी मेंदूच्या रचनेवर आधारलेली विचारशक्ती ही भौतिक शक्तीपेक्षा अधिक मोठी आहे. उदा. बुद्धीने शोधून काढलेली शून्य ही अंकगणितातील संकल्पना घ्या. तिच्या ठिकाणी प्रचंड शक्ती आहे. शून्य सापडल्याबरोबर माणसाची मोजण्याची शक्ती वाढली व म्हणून त्याची भौतिक शक्तीही वाढली. म्हणजे भौतिक शक्ती वाढविण्याची ताकद विचारात असते. अर्थात तो विचार वास्तवाशी अनुरोधी पाहिजे. हा सिद्धांत स्पष्टपणे मार्क्सवादामध्ये मांडलेला नाही. मार्क्सच्या वा एंगल्सच्या लिखाणात तो कुठे कुठे आढळतो; एखादे वाक्य आढळते; पण तो व्यवस्थित रीतीने एकच असा आम्ही मांडला.

**प्रश्न : पण याचा अर्थ काय होतो ते पाहा. संकल्पना आणि विचार यांचे क्षेत्र एका अर्थी स्वायत्त बनते. म्हणजे हे केवळ भौतिक अधिष्ठानावर आधारलेले त्याचे प्रतिबिंब नव्हे.**

**उत्तर -** म्हणजे विचार, हा केवळ 'एपिफिनॉमिनन' (उपघटना) नाही. मार्क्सवादी चर्चेत 'एपिफिनॉमिनन' हा शब्द तेव्हा फार येऊ लागला होता. विचार ही केवळ उपघटना नाही, विचार हा तितक्याच ताकदीचा असतो. भौतिक क्षेत्र आणि भावना विचार आणि यांचे बनलेले मानसिक क्षेत्र परस्परांवर अवलंबून असतात आणि परस्परांवर कार्य करतात, आणि कोणत्या संदर्भात कोणत्या क्षेत्राची ताकद मोठी आहे हे अनुभवाने ठरवावे लागते. उदा. अन्न हा भौतिक पदार्थ आहे आणि त्याची ताकद फार मोठी आहे. अन्न जर मला मिळाले नाही तर माझे विचार आणि माझे मनन संपुष्टात येईल. हिमपात होत असेल आणि मला आसरा नसेल, तर मी मरेन आणि माझे विचार नष्ट होतील. तेव्हा भौतिक अधिष्ठान आणि त्यावर आधारलेले क्षेत्र ही कोणत्या बाबतीत तुल्यबळ आहेत आणि कोणत्या बाबतीत त्यातील एक क्षेत्र दुसऱ्या क्षेत्राहून अधिक वरचढ असते हे अनुभव आणि विचार यांच्या आधारे ठरवावे लागते. सामान्यपणे असे म्हणता येते की, ही दोन क्षेत्रे परावलंबी आहेत, ती एकमेकांवर परिणाम करतात, आणि केव्हा एकाचा आणि केव्हा दुसऱ्याचा परिणाम अधिक बलवान असतो. आणि ही गोष्ट अर्थात अशा अस्पष्ट स्वरूपातच मांडता येईल. तेव्हा अशा रीतीने आम्ही मार्क्सवादाच्या पुढे गेलो. आम्ही नव-मार्क्सवादी (निओ-मार्क्सिस्ट) आहोत.

**प्रश्न : शास्त्रीजी, तुमच्या या विवेचनाचा सारांश असा मांडता येईल : तुमच्या बावीस सिद्धांतांमागची भूमिका आणि मार्क्सवादी भूमिका यांच्यात दोन मूलभूत मुद्यांविषयी**

**भेद आहे. एक असा : सर्व मानवी मूल्ये इतिहाससापेक्ष आहेत असे तुम्ही मानीत नाही. काही मानवी मूल्ये ही माणसाची प्रकृती, माणसाचा एका विशिष्ट घडणीच्या निसर्गाशी असलेला संबंध यांच्यावर आधारलेली असतात आणि ती शाश्वत, कायम टिकणारी, इतिहासनिरपेक्ष अशी मूल्ये आहेत असे तुम्ही मानता. उलट मार्क्सवाद सर्व मूल्ये इतिहाससापेक्ष आहेत असे मानतो. दुसरा भेद असा : विचार किंवा संकल्पना यांच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यकारित्व आहे असे तुम्ही मानता. उदा. न्यूटनचा सिद्धांत घ्या. त्याच्यामुळे गतिशास्त्रात क्रांती झाली आणि गतिशास्त्राची वेगाने प्रगतीही झाली; पण न्यूटनच्या या सिद्धांताचा त्यावेळच्या भौतिक अधिष्ठानाशी असा काही संबंध जोडून दाखविता येणार नाही, की अशी विशिष्ट स्वरूपाची भौतिक परिस्थिती असल्यामुळे हा विशिष्ट सिद्धांत उदयाला आला आणि मान्य झाला. असा काही या दोहोत सांधा जोडता येणार नाही.**

**आता तिसरा एक मूलभूत भेद आहे असे मला वाटते. तुमच्या बावीस सिद्धांतांत व्यक्ती ही प्रधान मानली आहे आणि समाज - म्हणजे सामाजिक संस्थांचे जाळे ही व्यक्तीला पोषक ठरू शकेल अशी, आवश्यक अशी यंत्रणा आहे, असे मानले आहे. हे बरोबर आहे ना?**

**उत्तर -** हे अगदी बरोबर आहे. कारण काय? तर समाजाला मन आहे हे अलंकारिक विधान आहे. सामुदायिक विचार असतो हे म्हणणे अलंकारिक आहे. कारण तुम्ही जर वस्तुवादी असाल, मार्क्सच्या भाषेत तुम्ही जर भौतिकवादी असाल तर विचार हा मेंदूत असतो आणि मेंदू व्यक्तीचा असतो हे तुम्हाला मानावेच लागते. समाजपुरुष किंवा विश्वपुरुष ही कल्पना वेदांमध्ये आहे. समाज ही सेंद्रिय, ऑरगॅनिक संघटना आहे हा व्हाइटहेडचा विचार वेदांमध्येही प्रतिबिंबित झालेला आहे. हे विश्व हा एक सेंद्रिय संबंध (ऑर्गनिझम) आहे आणि त्याच्यात सेंद्रिय संबंध सामावलेले असतात - ऑर्गनिझम्स विदिन ऑर्गनिझम्स - असे व्हाइटहेड मानतो. ही कल्पना वेदांत आहे; पण ती अर्थात काव्यमय, प्रतिकात्मक रीतीने व्यक्त झाली आहे. त्यांना या कल्पनेचा काव्यमय, इंट्युइटिव्ह प्रत्यय आला असणार; पण प्रत्यक्षात पाहता विचार हा व्यक्तीमध्येच असतो; पण हेही मान्य केले पाहिजे की, सामाजिक संघटनेचे स्वरूप हे सजीवासारखेच असते. आमच्या बावीस सिद्धांतांत व्यक्तीला इतके महत्त्व देण्यात आले आहे की, त्याच्या मानाने सामाजिक यंत्रणा दुय्यम ठरते; पण समाजयंत्रणेतच व्यक्ती वसत असते. समाजयंत्रणेच्या बाहेर व्यक्ती असू शकत नाही. म्हणून रॉयसाहेबांना मी व्हाइटहेडचे हे वाक्य सांगितले, “Things live in societies”, ‘वस्तू समाजात जगत असतात.’ तारांगणाकडे पाहून तो हे म्हणाला होता. यासंबंधी माझी रॉयसाहेबांकडे चर्चा झाली नाही. त्यांनी मला आव्हान दिले होते; पण ते तसेच राहिले. माझे असे म्हणणे होते की, समाजनिरपेक्ष अशी व्यक्ती जगात सापडायचीच नाही. रॉयसाहेबांचे म्हणणे असे की, “म्युटेशन होऊन जो माणूस प्रथम अस्तित्वात आला तो एकच

होता.” मी म्हटले, “म्युटेशन व्यापक क्षेत्रात होते. कारण ज्या भौतिक घटकांमुळे म्युटेशन होते ते एका व्यक्तीपुरते मर्यादित नसतात, पुष्कळ ठिकाणी असतात. म्युटेशनने निदान एक मानवी पुरुष आणि एक मानवी स्त्री अस्तित्वात आली पाहिजे, म्हणजे येथे परत दोन आले.”

भाषा ही जी मानवी जीवनातली मूलभूत गोष्ट आहे ती नैसर्गिक आहे आणि कृत्रिम आहे. तिची प्रवृत्ती नैसर्गिक आहे. म्हणजे नैसर्गिक मसाला - रॉ मटीरियल - माणसामध्ये तयार आहे आणि ती घडविण्यासाठी मेंदूची जी प्रवर्तकता आवश्यक आहे तीही तेथे आहे. म्हणून भाषेशिवाय मानवी समाज आढळत नाही. भाषा हा माणसाच्या सामुदायिकतेचा आविष्कार आहे. मी आणि तू हे दोघे असल्याशिवाय भाषा असू शकत नाही. मीच केवळ आहे, तू माझ्यातच अंतर्भूत आहे, हा जो अद्वैताचा सिद्धांत आहे आणि काही पश्चिमी तत्त्ववेत्त्यांचा - ‘सॉलिप्सिस्टां’चा - सिद्धांत आहे, त्याला उत्तर असे की, भाषा हा जीवनातला असा आविष्कार आहे; की मी आणि तू अशा दोन भिन्न व्यक्ती गृहीत धरल्याशिवाय त्याचा व्यवस्थित उलगडाच होऊ शकत नाही. माझ्या विचाराचे माध्यम म्हणून भाषा मला उपयुक्त असते ही गोष्ट खरी आहे, तरी पण भाषेची मूळ प्रेरणा जी आहे ती ‘तू’ शी बोलण्याकरिता आली आहे आणि हा मूळ ‘तू’ कोण? तर आई. मूल जे बडबडत असते, नैसर्गिक रीतीने बडबडत असते त्याला पुढे भाषेचा आकार लाभतो. माणसाचे नैसर्गिक भाषिक कर्तृत्व, त्याला निसर्गाकडून लाभलेली शक्ती यातून विविध भाषा जन्माला येतात. माणसाच्या नैसर्गिक कर्तृत्वाचा भाषेत आविष्कार आहे, स्वयं आपले जग निर्माण करण्याची ताकद त्याच्यात आहे; परंतु निसर्गाने भाषिक शक्तीच्या रूपाने ती त्याला पुरविली आहे. माझे असे म्हणणे आहे की, आमच्या बावीस सिद्धांतांत हा विचार अत्यंत अस्पष्ट आहे. व्यक्तिवादाला आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्व दिले आहे, अशी माझी या बावीस सिद्धांतांवर टीका आहे; पण या माझ्या टीकेवर चर्चा व्हायची राहून गेली.

**प्रश्न : शास्त्रीजी, तुम्ही नागार्जुनाचार्यांचा उल्लेख केला. म्हणजे सर्व ‘दृष्टी’पलीकडे जायचा तुमचा प्रयत्न आहे.**

**उत्तर -** मी सर्व दृष्टींपलीकडे आहेच. म्हणून मी तटस्थ वृत्तीने कोणत्याही सिद्धांताचा आग्रह न धरता सर्व विचारांचे परीक्षण करतो. माझा आग्रह नैतिक मूल्यांविषयीचा आहे. ते माझे बंधन आहे. म्हणजे मी पापपुण्याच्या पलीकडे गेलेलो नाही. ब्रह्मवादी वेदांती पापपुण्याच्या पलीकडे गेलेला असतो. तसा मी गेलेलो नाही. नैतिक दृष्टीपलीकडे मी गेलेलो नाही.

**प्रश्न : पण वैज्ञानिक ज्ञानाचे प्रामाण्य तुम्ही मानता.**

**उत्तर -** अतिशय मानतो; पण हे प्रामाण्य कसे आहे?

**प्रश्न : ते मर्यादित आहे हे तुम्ही सांगितले. विज्ञानापलीकडचे काही प्रश्न राहतात. या वैज्ञानिक ज्ञानात तुम्ही सामाजिक विज्ञानांचा अंतर्भाव करता?**

**उत्तर -** सामाजिक विज्ञान हे सर्वांत दुबळे विज्ञान आहे. याविषयीचा एक विचार तुम्हाला सांगतो. हाही नागार्जुनासारखा विचार आहे. या ज्या सर्व दृष्टी आहेत त्यांच्यामधून जावे,

तसेच हे जे विविध सामाजिक विचार आहेत, त्यांच्यामधून जावे. ते जवळ ठेवावे. नागार्जुन सर्व दृष्टींमधून जावे; पण त्या सोडून द्याव्यात असे म्हणतो. तसे मी म्हणत नाही. हे विचार जवळ ठेवावे; पण अनुभवाने पुढे जावे. म्हणजे कार्यक्रम आखावे आणि ते अमलात आणताना येणाऱ्या अनुभवांच्या आधारे पुढे जावे. काही सामाजिक प्रश्न पूर्णपणे सुटतात असे सामाजिक क्रांतिकारक म्हणतात; आणि आपल्या अभिनिवेशात ते रंगले की मग ते एकदम पुढे जातात; पण हे करताना एक तात्त्विक अलिप्तता आवश्यक असते. ती असल्याशिवाय आपल्या देशाच्या किंवा जगाच्या पुढे असलेले प्रश्न सोडविण्याचा मार्ग सापडणार नाही. माणसाने 'फंडॅमेन्टलिस्ट' बनता कामा नये. हिंदू किंवा इस्लामी किंवा मार्क्सवादी फंडॅमेन्टलिस्ट हे जगाला दुःखात, 'शून्या'त लोटणार आहेत. म्हणून सर्व प्रश्न लवकर सुटतात, काही दीर्घकालाने सुटतात, आणि काही सुटत नाहीत हे ओळखले पाहिजे. ते सोडवण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे; पण ते पूर्णपणे सुटणार नाहीत ही खूणगाठही मनात बाळगली पाहिजे. कारण लायन्निट्झप्रमाणे हे जग त्यातल्या त्यात चांगले जग आहे, असे काही मी मानत नाही. हे जग बदललेच पाहिजे, हा मार्क्सचा सिद्धांत मी पूर्णपणे मानतो. हे जग बदललेच पाहिजे, ते सुधारलेच पाहिजे. हे पापी जग आहे असे मी मानतो. त्याच्यात विषमता आहे. खाजगी संपत्ती चौर्य आहे असे मी म्हणत नाही; पण ती शोषणावर आधारलेली आहे हे मी मानतो. समाजात शोषण आहे; पण ते कुठे कुठे आहे याचा शोध घेणे अतिशय कठीण आहे. शोषणरहित समाज असावा, त्यात पूर्ण स्वातंत्र्य असावे, विश्व हे एक कुटुंब असावे हा जो दृष्टिकोन आहे तो अद्भुतरम्यतावादी आहे; पण तो माझ्या मनाची पकड सोडीत नाही.

**प्रश्न : शास्त्रीजी, आता दोनच प्रश्न राहिले. तुमच्यावर बौद्धिक प्रभाव टाकणारी माणसे म्हणजे तुमचे गुरुजी, रॉय, आणखी कोण?**

**उत्तर -** गांधीजी.

**प्रश्न : गांधींचा प्रभाव नैतिक होता की, बौद्धिकही होता?**

**उत्तर -** बौद्धिकही होता. गांधी हे परंपरेच्या शक्तीचा उपयोग व्हावा असे म्हणणारे; पण तिच्या पलीकडे पाहणारे होते. १९३२ साली येरवडा कारागृहात एक वाद व्हायचा होता, अस्पृश्यतेविषयी. राजेश्वरशास्त्री आणि पंधरा-वीस चांगली शास्त्रीमंडळी आली होती. मी आत गांधीजींजवळ होतो आणि माझे शिष्य आणि मित्र रघुनाथशास्त्री कोकजे माझ्याबरोबर होते. शास्त्रीमंडळींना आत बोलावले तर समयबंध (वादाच्या अटी) झाल्याशिवाय आत येणार नाही असा त्यांचा निरोप आला. समयबंधासाठी म्हणून त्यांनी सात-आठ मुद्दे संस्कृत व हिंदीमध्ये लिहून पाठविले. 'हिंदूंच्या देवमंदिरात अस्पृश्यांचा प्रवेश शास्त्रसंमत आहे' ही बाजू आम्ही मांडायची आणि शास्त्रीमंडळींनी विरुद्ध बाजू मांडायची अशी वादाची योजना होती. समयबंधाविषयी शास्त्र्यांचा पहिला मुद्दा असा की, श्रुतिस्मृतिपुराणांचे प्रामाण्य उभयपक्षी मान्य असावे. मी हा मुद्दा मान्य केला. असे सात-आठ मुद्दे त्यांनी पाठविले होते. ते सर्व मी मान्य केले.

फक्त एकाच शब्दाचा फरक त्यात केला. तो असा : त्यांनी जेथे ‘अस्पृश्य’ हा शब्द वापरला होता तेथे ‘मी आज ज्यांना अस्पृश्य मानण्यात येते ते’ असा शब्दप्रयोग घातला. एवढाच फरक केला. गांधींनी विचारले, ‘हा फरक तुम्ही का केला?’ मी म्हटले, “आता शास्त्रार्थ व्हायचा आहे. आता हे न्यायालय आहे. समयबंधाला अनुसरून वाद करायचा आहे. तेव्हा अशा स्थितीमध्ये आपले जे म्हणणे म्हणून मांडायचे ते पक्के असले पाहिजे. आता धर्मशास्त्रात अशी काही वाक्ये आहेत की, त्यांच्याप्रमाणे अस्पृश्य बहिष्कार्य आहेत. त्यांच्या मंदिर प्रवेशाला बंदी आहे, अशा अर्थांची अनेक वाक्ये आहेत आणि ती एकत्र घेतली तर जबरदस्त ठरतात; पण धर्मशास्त्रात अस्पृश्य म्हणजे काय हे जे सांगितले आहे ते आजच्या अस्पृश्याला लागू पडत नाही. कारण अस्पृश्याची व्याख्या ‘ब्राह्मण स्त्रीच्या ठिकाणी शूद्राकडून जन्माला आलेला तो अस्पृश्य’ अशी त्यात केली आहे. ही व्याख्या आज अस्पृश्य मानण्यात येणाऱ्या कोणत्याही जातीला लागू पडत नाही. कारण आज अस्पृश्य मानण्यात येणारी कोणतीही जात स्वतःला आपण संकरज आहोत असे मानीत नाही. ती स्वतःला शुद्धवंशीयच मानते. शास्त्रीपंडित त्यांना संकरज मानतात; पण तो पुरावा होऊ शकत नाही. सामान्य माणसे त्यांना संकरज मानीत नाहीत. ते अस्पृश्य मानले गेले आहेत; पण ते संकरज नाहीत. त्यांचे तसे वर्णन तुम्ही केले तर त्यांना राग येईल.” गांधी म्हणाले, “हे तुमचे म्हणणे अगदी योग्य आहे; पण मग शास्त्राचे जे म्हणणे आहे ते मानायला मी तयार नाही. उच्च असे जे सिद्धांत आहेत तेच मी मानीन.” ही जी गांधीजींची भूमिका आहे ती केवळ नैतिक नाही, तर बौद्धिक व नैतिक अशा दोन भूमिकांचा उत्तम संगम तिच्यात आहे. गांधीजींचे म्हणणे ऐकून मला अतिशय आनंद झाला. कारण शास्त्राच्या आधारे अस्पृश्यतानिवारणाचे समर्थन करणे अतिशय कठीण आहे. ही माझी अडचण त्यांच्या ध्यानात आली आहे हे मला कळले. मी गांधीजींना सांगितले की, सर्व शास्त्रवचनांचा अर्थ अस्पृश्यता निवारणाच्या आंदोलनाला अनुकूल ठरेल अशा रीतीने मी लावू शकतो; परंतु असा अर्थ लावणे आवश्यक आहे की नाही याविषयी मला शंका आहे. सांगायची गोष्ट अशी की, मी मघा सांगितलेला बदल केल्यानंतर शास्त्रीमंडळी वादासाठी आलीच नाही.

**प्रश्न : बरे. आणखी कोण तुम्हाला अतिशय उंच वाटलेली, ज्यांच्याशी तुमचा साक्षात परिचय होता अशी मंडळी?**

**उत्तर -** उदा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे. हे मला बौद्धिक दृष्टीने फार पक्के वाटले. लोकांना माहीत नाही ते किती पक्के होते. आम्हाला माहीत आहे, कारण ते आमच्या गुरूकडे यायचे. प्राज्ञपाठशाळेत त्यांचा महिना महिना मुक्काम असायचा. त्यांची निवासाची सर्व व्यवस्था आम्ही करीत असू. मग चर्चा व्हायच्या. चर्चेमध्ये ते फार मौलिक विचार मांडायचे. भौतिकशास्त्रे हीच खरी शास्त्रे, तेच खरे ज्ञान असे ते म्हणायचे. इतिहास वस्तुवादी असला पाहिजे असे ते मानीत. पोपचा इतिहास लिहिणाऱ्या रांकेप्रमाणे इतिहासाच्या घटना तेवढ्या मांडाव्या, त्या काय बोलायचे ते बोलतील ही इतिहासाची योग्य पद्धती आहे असे ते म्हणत. पश्चिमेत प्रचलित

असलेल्या इतिहासाच्या ज्या पद्धती होत्या त्या सर्वांच्या अभ्यासावर आधारलेले, व्यवस्थित ज्ञान त्यांना होते हे लोकांना माहीत नाही. आम्ही जी ऐतिहासिक पद्धती स्वीकारली ती बावीस साली स्वीकारली. तेव्हापासून समाजसुधारणेसाठी भारतीय धर्मग्रंथांकडे ऐतिहासिक पद्धतीने पाहावे, मीमांसा पद्धतीने म्हणजे समन्वय पद्धतीने त्या सर्वांचा अर्थ एकच आहे असे मानू नये असे आम्ही तेव्हापासून म्हणू लागलो. राजवाड्यांच्या सहवासामध्ये मीमांसापद्धती आणि ऐतिहासिक पद्धती असे दोन शब्द आम्ही तयार केले.

राजवाडे जरा तऱ्हेवाईक होते आणि कोपिष्ट होते; पण आम्हाला ते आवडत असत. ते काहीसे खट्याळ होते. त्यांचे बंधू वैजनाथ काशीनाथ राजवाडे. तेही असे तऱ्हेवाईक होते. 'ऋग्वेदात अशुद्धे संभवतात काय?' अशा मथळ्याचा लांबलचक निबंध त्यांनी लिहिला आहे. दोन्ही भावांत पाखंडीपण भरपूर होते. त्यांनी निरुक्ताचे उत्कृष्ट भाषांतर - विवरण करणारा हजार पानांचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

**प्रश्न : आजची माणसे तुम्हाला फार ठेंगू वाटत असतील.**

**उत्तर -** तसे काही नाही; पण त्यांचा फारसा प्रभाव पडत नाही.

**प्रश्न : दुसरा माझा प्रश्न असा की, महाराष्ट्राचे वैचारिक जीवन निकोप, बळकट करायला काय करता येईल? की ही आशाच धरू नये?**

**उत्तर -** आशा धरावी की. 'समाजप्रबोधनपत्रिका', 'तात्पर्य' इत्यादी नियतकालिकांतून चांगले वैचारिक साहित्य प्रकाशित होत असते.

**प्रश्न : शास्त्रीजी, ज्ञानसाधना हीच जीवनातील मुख्य साधना मानून जगण्याची परंपरा खंडित झाल्यासारखी वाटते. तिचे पुनरुज्जीवन कसे करता येईल हा प्रयत्न आहे. आपली महाविद्यालये आणि विद्यापीठे या बाबतीत निष्फळ ठरली आहेत.**

**उत्तर -** काय आहे, की मला असे वाटते की, ओर्तेगाय गासते (स्पॅनिश तत्त्ववेत्ता) याने ज्या झुंडीच्या समाजाचे वर्णन केले आहे ती झुंड विद्यापीठात शिरली आहे. विद्यापीठामध्ये विद्येची जी एकांत उपासना होत राहिली पाहिजे, तशी ती होत नाही.

**प्रश्न : वैचारिकदृष्ट्या आपल्याला योग्य ती संगत लाभत नाही, ज्यांच्याशी विचारविनिमय करावा या पातळीचे लोक कमी झाले आहेत, असे तुम्हाला वाटते की नाही?**

**उत्तर -** सारखे वाटते.

**प्रश्न : या दृष्टीने पाहता गेल्या पंचवीस-तीस वर्षांत आपल्या बौद्धिक जीवनाची अवनती झाली आहे, असे म्हणता येईल. पुढे तुम्ही कोणते काम हाती घेणार आहात? भारतीय तत्त्वज्ञानाचा किंवा समजा, न्यायदर्शनाचा सांगोपांग इतिहास लिहावा अशी इच्छा तुम्हाला होते का?**

**उत्तर -** भारतीय तत्त्वज्ञानाची मांडणी करावी असे मला वाटते. मी जी परवा मोक्षधर्मावर

व्याख्याने दिली त्यांचा विस्तार करावा, असे मला वाटते. त्यांच्यात एका तऱ्हेने मी नागार्जुनाचा दृष्टिकोन स्वीकारला आहे. पण मला असे आढळून आले आहे की, नास्तिक हाही मोक्षधर्मी असू शकतो. म्हणजे जो ईश्वर, पुनर्जन्म मानत नाही असा मोक्षधर्मी नास्तिक उपनिषत्काली होता. याचे थोडे प्रत्यंतर श्वेताश्वतर उपनिषदात मिळते. 'स्वभावमेके कवयो वदन्ति कालं तथाऽन्ये परिमुह्यमानाः' स्वभाववादी, कालवादी होऊन गेले. नियतिवादी म्हणजे हे विश्वचक्र कुणी परमेश्वर, अदृष्ट चालवीत नाही, ते स्वतःच्या स्वभावानेच चाललेले आहे. त्याच्यामागे अपरिहार्य कालक्रम आहे, कार्यकारणभाव आहे, असे मानणारे विचारवंत वैराग्यशील आणि मोक्षधर्मी होते. याची दोन उदाहरणे - असुरांची उदाहरणे - आढळतात. बळी आणि नमुची. तिसरा प्रल्हाद. प्रल्हाद तर पुढे वैष्णवच केला आहे भागवतात. यातून बोध घ्यायचा तो असा की, विवेकी मनुष्य अमुक एक तत्त्वज्ञान स्वीकारीत असला तरच विरागी होतो असे नाही; पण त्याला तत्त्वज्ञान असावे लागते. वैराग्यासाठी सबंध विश्वाकडे पाहण्याची दृष्टी असावी लागते; पण ती अमुकच दृष्टी असली पाहिजे असे नसते, हे माझे आजचे तत्त्वज्ञान आहे.

**संदर्भ :**

१. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष ही सहा वेदाङ्गे; ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद हे चार वेद - षडंगवेद.

**(नवभारत, फेब्रुवारी - मार्च, १९८१, पृ. १ ते ३३)**

OOO

६

# जीवन आणि घडण

मुलाखतकार - **पु. ल. देशपांडे**

**पु. ल. - नमस्कार शास्त्रीजी !**

**शास्त्रीजी -** नमस्कार !

**पु. ल. - आज आपणाशी थोडासा संवाद साधावा म्हणून आपण इथे आलेलो आहोत, तर काही अशा गोष्टी विचारायच्या आहेत की, ज्याच्यामध्ये मला स्वतःला नव्हे तर महाराष्ट्रातील जवळजवळ प्रत्येक सुसंस्कृत माणसाला हे आपल्याकडून ऐकावं अशी इच्छा आहे. कारण ज्ञानाच्या क्षेत्रातच नव्हे, तर सामान्य माणसाच्या जीवनाच्या क्षेत्रातसुद्धा आपलं अस्तित्व इतकं जाणवलेलं आहे, आपल्या विचाराने व आपण प्रत्यक्ष कार्य केल्यामुळे ते आपल्याकडून ऐकावं, अशी लोकांची नेहमीच इच्छा असते. त्यामुळे आत्ता या ८६ व्या वर्षीसुद्धा मला वाटतं रोज आपणास एक व्याख्यान कुठे तरी द्यावं लागतच.**

**शास्त्रीजी -** बरोबर आहे.

**पु. ल. - आणि ते आवडतंही आपल्याला द्यायला.**

**शास्त्रीजी -** मला आवडतं पण अपरिहार्य होतं. कारण वस्तुतः आता ताण पडतो आणि कामाचे इतके ताण आहेत की, हा अधिक ताण सहन होणं कठीण जातं; परंतु लोकांना नकार देता येत नाही.

**पु. ल. - पण त्याबरोबरच मला महाराष्ट्राचंही कौतुक वाटतं, की आपल्यासारख्यांचे विचार ऐकावेत ही ओढही मराठी माणसाच्या मनात असणे ही चांगली गोष्ट आहे. तर आज मी आपणाला जे एक-दोन प्रश्न विचारणार आहे, त्यातील एक आता आपणाला ८६ वं वर्ष लागलं असं आताच मी म्हटलं... या शतकाची नि आपली वर्ष सारखीच आहेत...**

**शास्त्रीजी -** हो, सारखीच आहेत.

**पु. ल. - मला वाटतं १९०१ च्या जानेवारी २७ ला आपला जन्म झाला.**

**शास्त्रीजी -** हो, जन्म झाला.

**पु. ल. - म्हणजे या शतकाबरोबरच २७ दिवसांच्या फरकाने आपण जन्माला आला.**

**शास्त्रीजी -** बरोबर आहे.

**पु. ल. - ही ८६ वर्षे कमालीची महत्त्वाची वर्षे आहेत, आपल्या देशाच्या दृष्टीने.**

**शास्त्रीजी -** मोठी इतिहासाची परंपरा निर्माण झाली आहे, उलथापालथी झालेल्या आहेत आणि देशाचं सगळं भवितव्य जे आहे ते एका नवीन अशा दिशेनं चाललेलं आहे.

**पु. ल. - ते घडत असताना तुम्ही त्याचे साक्षी आहात.**

**शास्त्रीजी -** अगदी प्रत्यक्ष दर्शनच झालेलं आहे.

**पु. ल. - तुम्ही नुसते साक्षीदारच नाही, तर कृतित्व नि कर्तृत्वाने त्यात उतरलेले आहात.**

**शास्त्रीजी -** त्यात भाग घेतलेला आहे.

**पु. ल. - त्या दृष्टीने मला आपणास विचारायचं होतं की, आपल्या आयुष्याचा पहिला कालखंड म्हणजे अध्ययनाचा कालखंड आहे, तो अजूनही चालूच आहे, तो थांबलेला नाहीच आहे; पण अगदी विद्यार्थी या भूमिकेतून जे अध्ययन असतं ते आपण वाईला केलंत ना?**

**शास्त्रीजी -** वाईला नारायणशास्त्री मराठे, जे नंतर केवलानंद सरस्वती यांच्या अध्यक्षतेखाली प्राज्ञपाठशाळा मंडळ कार्य करीत होतं, त्या पाठशाळेत मला माझ्या वडिलांनी पाठवलं. ती संस्कृत वेदपठनाची पाठशाळा होती.

**पु. ल. - कुठून पाठवलं आपणाला?**

**शास्त्रीजी -** मी खान्देश - पश्चिम खान्देशमध्ये माझा जन्म एका खेडेगावात, एका गरीब, भिक्षुकी घराण्यात झाला. माझ्या वडिलांची अपेक्षा होती की, मी वेदशास्त्रात अध्ययन करावं आणि कीर्तनकार, पुराणिक, आवाज असेल तर कीर्तनकार व्हावं या दृष्टीनं पाठवलं; परंतु इथे प्राज्ञ पाठशाळेत आल्यावर मला वेदशास्त्रांचं अध्ययन चालल्याचं दिसलं. तसाच राष्ट्रीयतेचा विचारही तिथे दिसला. तिथे प्राज्ञपाठशाळेत नवक्रांतिकारकांचा अड्डा होता.

**पु. ल. - वाईला?**

**शास्त्रीजी -** हो, पाठशाळेतच आणि ते म्हणजे तळेगाव दाभाडे येथे समर्थ विद्यालय म्हणून जे होतं... ते राष्ट्रीय शिक्षणाचं केंद्र म्हणून प्रसिद्ध होतं. ते ब्रिटिश सरकारने मोडलं. तर तेथील काही विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेत आले. ते क्रांतिकारी होते. ते अड्यात आल्यामुळे क्रांतीचा विचारही तिथे ऐकू येऊ लागला.

**पु. ल. - म्हणजे परंपरेचं अध्ययन चाललेलं असताना ज्याच्यामध्ये सामान्यपणे भूतकाळाच्या ज्ञानाचा संग्रह करत असताना वर्तमानाचं भान आपणाला तितकच जोरकस होतं तर?**

**शास्त्रीजी -** ते भान इतकं विलक्षण होतं, की अनेक विद्यार्थ्यांनी वेदशास्त्रांचं अध्ययन करायचं सोडून ते राजकारणामध्ये गुंतले. मी मात्र गुंतलो नाही, याचं कारण असं आहे की, माझे गुरू नारायणशास्त्री मराठे हे स्वतः उत्तम शास्त्रज्ञ असूनदेखीलही राजकीय प्रज्ञा त्यांच्यामध्ये होती आणि आपलं जे प्राचीन ज्ञान आहे, त्याचा भारताच्या राष्ट्रीयत्वासाठी उपयोग होतो असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे ते आधुनिक विचारसुद्धा स्वीकारत असत. उदाहरणार्थ - स्पेंसरचे समाजशास्त्राचे विचार त्यांनी आत्मसात केले होते. कारण त्यावेळी मराठीत सगळा स्पेंसर भाषांतरित होता.

**पु. ल. - त्या वेळी स्पेंसर हा लोकप्रिय तत्त्वज्ञानी होता ना?**

**शास्त्रीजी -** हो, त्या वेळी मिल आणि स्पेंसर हे विद्वानांमध्ये अतिशय लोकप्रिय होते. विकासवाद रूढ होत होता. म्हणजे समाज बदलतो आहे, बदलत्या समाजाला भूतकाळाचा जसा आधार लागतो तशी परंपराही बदलणे गरजेचे असते, हा विचार नारायणशास्त्री मराठे सांगायला लागले. कारण भारताचा पराभव झाला, तो कशाने झाला हा विचार तिथे क्रांतिकारक करत होते. शस्त्रे तोटकी पडली, कारण शास्त्र तोटके होते, असा विचार तिथे आला, तर आपण नवीन शास्त्रेही शिकली पाहिजेत, हा नारायणशास्त्री मराठे यांचा दृष्टिकोन होता. त्या दृष्टीने त्यांनी तिथे वातावरण तयार केले. तेथील विद्यार्थी राजकारणात जाऊ लागले; पण मला त्यांनी जाऊ दिले नाही. मला त्यांनी न्यायवेदांताचं अध्ययन करायला लावलं.

**पु. लं. - अलीकडच्या काळामध्ये अध्ययन हा शब्द वापरला जातो, तेव्हा जीभ चाचपडते... कारण आता परीक्षा मार्काच्या हेतूनेच होते... आपण प्राज्ञपाठशाळेत गेलात ते ज्ञान पदरात पडलं पाहिजे, ते अंगात मुरलं पाहिजे, या दृष्टीने तिथे गेलात ना? तिथं अध्ययनाची काय पद्धत होती?**

**शास्त्रीजी -** पद्धत अशी होती की, ग्रंथ गुरुजींनी शिकवायचा... तिथे विद्यार्थी थोडेच असायचे, चार-पाचच विद्यार्थी. त्यामुळे दुसऱ्या दिवशी, आदल्या दिवशी जे शिकवलेलं आहे, त्याची सगळी परीक्षा अर्धा तास होत असे. मग पुढचं अध्ययन व्हायचं. म्हणजे असं की, आपण पाणिनीचा एक नियम शब्द शिकलो, उदाहरणार्थ - 'वृद्धी' शब्द घेऊ, तर वृद्धी होते म्हणजे काय होते? सिद्ध्योपास्य: म्हणजे सिद्ध + उपास्यः - याचा अर्थ ज्ञानी माणसाची उपासना करावी. तर 'सिद्ध्योपास्यः'चा असा अर्थ होतो. म्हणजे व्याकरणाचा नियम शिकत असताना त्याची उदाहरणे व्यवस्थित रीतीने आली पाहिजे, नवी उदाहरणे सोडविता आली पाहिजे. म्हणजे हा विद्यार्थी ज्ञानाचा नि नियमांचा व्यवस्थित उपयोग करतो की नाही.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर शिकलेले व्यवस्थित वापरू शकतो की नाही, हे पाहिलं जात होतं.

**पु. ल. - म्हणजे अध्ययन नुसते पाठांतर नव्हते ना?**

**शास्त्रीजी -** नव्हते. अध्ययन म्हणजे चर्चा होती. ती गुरू-शिष्यांमधील चर्चा असायची. तो एक मोठा विषय होय. गुरू शिष्याची उलटी-सुलटी तपासणी करायचा. यात गुरूचं अध्ययन किती प्रखर आहे याची कल्पना विद्यार्थ्यास येत असे. अशा रीतीने दोघांचेही अध्ययन तेजस्वी रीतीने होत असे.

**पु. ल. - म्हणजे गुरूचीही परीक्षाच असायची? तर तेही परीक्षेला बसत...**

**शास्त्रीजी -** गुरूचीपण परीक्षा व्हायची. 'तेजस्विनोधि तमस्तुः' आमचं दोघांचंही अध्ययन तेजस्वी होवो... अशी ती प्रार्थना असायची. ही जी प्रार्थना आहे, त्यात तो अर्थ आहे.

**पु. ल. - हा काळ तुमच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा काळ असेल ना?**

**शास्त्रीजी -** होय, अतिशय आनंदाचा काळ होता. चोवीस तास कार्यक्रम असत.

**पु. ल. - त्यावेळी कसा काय दिनक्रम असायचा?**

**शास्त्रीजी -** पहाटे पाचला म्हणजे 'पंच पंच उषःकाली' आम्ही उठत असू आणि वेदातील प्रार्थना मंत्र म्हणत असू. भूपाळयाही म्हणायचो. ते झाल्यानंतर मग आम्ही पुढचे विधी करायचो. नंतर स्नान, संध्या वगैरे व्हायची. सूर्यनमस्कार झाल्यावर एकत्र येऊन सबंध पाठशाळेची सामुदायिक प्रार्थना व्हायची. त्यामध्ये वेदमंत्र, आधुनिक संत, कवींच्या कविता यांचाही अंतर्भाव असायचा. त्यामुळे जुने शास्त्री हे संतांच्या वाङ्मयाचे भोक्ते होते, हे त्यातून दिसून यायचं. तिथे कीर्तनाचेही अध्ययन होत असे. कीर्तनकाराला सगळेच शिकावे लागे. अशा तऱ्हेने कवी मोरोपंत शिकले जात असायचे.

**पु. ल. - तुम्ही जे संस्कृत ग्रंथ शिकत होता, ते तत्त्वज्ञानाचे म्हणा, व्याकरणाचे म्हणा; पण ललित साहित्यातील संस्कृतही तुम्हाला शिकवले जायचे का?**

**शास्त्रीजी -** पहिल्यांदा 'पंच काव्य' आम्ही शिकायचो. उदा. 'रघुवंश' नाटक.

**पु. ल. - तुम्हाला 'रघुवंश' कुणी शिकवलं?**

**शास्त्रीजी -** स्वामीजींनीच. म्हणजे केवलानंद सरस्वतीजींनीच शिकवलं. नुसता 'रघुवंश' नाही, तर 'किरातार्जुनीय' किंवा इतर महाकाव्ये शिकवली जात, नाटके शिकवली जात असत. अशा रीतीने दीड वर्षापर्यंत साहित्याचं अध्ययन होत असे आणि त्यामध्ये मग अलंकारांचाही भाग शिकवला जात असे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतंत्र एक विद्याशाख घ्यायची म्हणजे निवडायची. कुणाला व्याकरणाचं जास्त अध्ययन करायचं त्यांनी व्याकरणाची निवड करायची, त्या शाखेकडे जायचे. व्याकरण सगळयांना आलं पाहिजे; परंतु बरोबर जर कुणाला वेदान्त पाहिजे असेल, पूर्वमीमांसा पाहिजे असेल तर तेही. सर्व

विषयांचं अध्यापन होत असे. त्यावेळी चर्चा व्हायची.

**पु. ल. - हल्ली शिक्षणात नेहमी असं म्हटलं जातं की, मास्तरांनी, शिक्षकांनी सांगायचं नि विद्यार्थ्यांनी ऐकायचं असं न करता उभयपक्षी बोलण्याचा तो व्यवहार झाला पाहिजे...**

**शास्त्रीजी -** असा व्यवहार झाल्याने ते तेजस्वी होते... (अध्ययन, अध्यापन).

**पु. ल. - पूर्वापार तीच पद्धती होती ना? आपण वाईला आलात तेव्हा चौदावं वर्ष सुरू होतं.**

**शास्त्रीजी -** होय, चौदा वर्षांचा होतो.

**पु. ल. - तेव्हापासून किती वर्षे होतात हे अध्ययन करत?**

**शास्त्रीजी -** अठराव्या वर्षांपर्यंत. म्हणजे चार वर्षे !

**पु. ल. - तुमचा ओढा अध्ययनाचा कोणत्या विषयाकडे होता?**

**शास्त्रीजी -** तत्त्वज्ञानाकडे होता. भारतीय दर्शन आणि तत्त्वज्ञानाकडे होता. त्यात सर्व दर्शनांचे म्हणजे आस्तिक, नास्तिक दर्शनाचे अध्ययन होत असे. त्यामुळे कोणताही एक वाद म्हणजे अद्वैतवादी, द्वैतवादी असं काही नव्हते.

**पु. ल. - म्हणजे कोणतं लेबल नाही लावून घेतलंत?**

**शास्त्रीजी -** कारण काय आहे की, अद्वैतवादावर द्वैतवादाचे जे आक्षेप आहेत, ते तयार असावे लागत. त्यावेळी असं म्हटलं जात असे की चांगल्या उत्तम पंडितात... ते पूर्वोत्तर पक्षात बसले की, जो अद्वैतवादाची भूमिका घेईल, तो द्वैती असला तरी अद्वैतवादाचंच अखेरपर्यंत समर्थन करेल. अशा रीतीने विचारांची मीमांसा अखेरपर्यंत करायची आणि कोणत्याच एका तत्त्वज्ञानाचं समर्थन अखेरपर्यंत करत राहायचं नाही, असा दार्शनिक पाठशाळांचा नियम होता.

**पु. ल. - पण हा तर अत्याधुनिक असा विचार आहे ना?**

**शास्त्रीजी -** अशा तऱ्हेने विचारस्वातंत्र्य तयार होत असे.

**पु. ल. - हा ऽऽ.**

**शास्त्रीजी -** म्हणजे असं पाहा, जैन तत्त्वज्ञानाचं अध्ययन करायचं तर बौद्धांचंही अध्ययन करायचं. झापड लावायची नाही. ते जे ग्रंथ आहेत, ते झापड लावलेले ग्रंथ नाहीत. ते एकमेकांचे विचार समजून घेण्यासाठी वाचत नि तपासून घेत; आणि शेवटी आपली बाजू खरी कशी आहे, हे दाखवत असत. असे ते ग्रंथ होते.

**पु. ल. - म्हणजे त्या विद्वानांनी विचारांमध्ये जर अपूर्णता असेल तर ते गृहीत धरलेलं असायचं.**

**शास्त्रीजी -** हो, गृहीत धरलेलं असायचं.

**पु. ल. - म्हणजे मी मांडतो तेच सत्य असं नासायचं.**

**शास्त्रीजी -** नसायचं !

**पु. ल. - अहंकार असा कुणाचा नसायचा.**

**शास्त्रीजी -** नसायचा ! त्यावेळी या विषयावरच्या ज्या चर्चा व्हायच्या...

**पु. ल. - त्या वेळी चर्चा, वादविवादाची काय पद्धती होती?**

**शास्त्रीजी -** वादविवाद व्हायचे म्हणजे... अगदी उदाहरण म्हणून सांगायचं झालं तर आठवड्यातून एक दिवस ठरवला जायचा. त्या दिवशी स्वाध्याय नसायचा. शिकणारे जे सगळे विद्यार्थी असत, ते एकत्र जमायचे आणि त्यांच्यात चर्चा व्हायच्या. त्या चर्चा होत असताना एक मध्यस्थ असायचा. त्या मध्यस्थाने पूर्व पक्ष आणि उत्तर पक्ष करायला लावायचा आणि कोणाची बाजू अधिक चांगली आहे, ते शेवटी त्याने दाखवून द्यायचं. अशा रीतीने चर्चा होत असे.

**पु. ल. - पण दाखवून द्यायला प्रमाण, पुरावे काय असत?**

**शास्त्रीजी -** तो (मध्यस्थ) कायम नसे. बदलत असे. आळीपाळीने मध्यस्थ असे. तो कित्येक वेळी पूर्वपक्षी असे, तर दुसऱ्यांदा एखादा उत्तरपक्षी असे. तो विद्यार्थ्यांपैकीच असे.

**पु. ल. - नारायणशास्त्रींच्या जोडीला आणखी शिक्षक असत?**

**शास्त्रीजी -** हो, अन्य शिक्षक असत. शिवाय स्वतः नारायणशास्त्री मराठेही उपस्थित असत. शिवाय दिनकरशास्त्री कानडे असत. महादेवशास्त्री दिवेकर असायचे. गंगाधरशास्त्री सोहनी होते. अन्य मंडळी होती.

**पु. ल. - ही निरनिराळ्या विषयांची तज्ज्ञ मंडळी होती तर?**

**शास्त्रीजी -** हो, ती वेगवेगळ्या विषयांची होती.

**पु. ल. - आता इथे हे जे तुमचं शिक्षण चाललेलं होतं... तुम्ही असं म्हणालात की त्यावेळी भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे वारे होते... आणि १९१४-१५-१६ ते १८ सालापर्यंत सबंध देशभर दुमदुमत होतं लोकमान्य टिळकांचं नाव. आपल्याला दर्शन झालं होतं का टिळकांचं?**

**शास्त्रीजी -** वाईला ते येऊन गेले होते, ते १९१६ साली. तेव्हा त्यांना भाषण करायची बंदी होती, तरी सभा भरली. त्यांच्या दर्शनाकरिता लोक आले. खाडिलकर त्यांच्याबरोबर होते. नाटककार कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकर. त्यांचं भाषण झालं. मात्र लोकमान्यांचं भाषण नाही झालं. त्यांना सोलापूर जिल्ह्यात, नगर जिल्ह्यात, अमक्या ठिकाणी जायच नाही अशी बंदी होती. असा तो काळ होता. त्या काळानंतर जालियनवालाबाग प्रकरण झालं. तिथे जे मोठं हत्याकांड झालं, त्यावेळी देशाची हवा, राजकीय हवा बदलणं

विलक्षण होतं, आणि पंजाबमध्ये जायला महात्मा गांधी निघाले, तर गव्हर्नरने त्यांना तिथे यायला बंदी केली. तेव्हा त्यांनी ती बंदी मोडली. हा आम्हाला लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधींमध्ये फरक दिसला. दुसरा एक फरक असा की, लोकमान्य टिळक हे अध्यात्मवादी होते. गांधी पण अध्यात्मवादी होते; पण अध्यात्मवादी संत एखाद्या शूर, वीर, सशस्त्र क्रांतिवाद्यासारखा निर्भय असतो, याचं दर्शन आम्हाला त्या काळात झालं. त्यामुळे गांधीवादाचा प्रभाव, असहकारितेची चळवळ या गोष्टी मी स्वतः डोळ्यांनी पाहिल्या आहेत आणि पहिल्यांदा देश बदललेला आम्हाला १९२० साली दिसला.

**पु. ल. - काय बदल दिसला तुम्हाला त्यावेळी?**

**शास्त्रीजी -** दिसला म्हणजे राजकारणाची चर्चा गावच्या चावडीत कधी होत नसे. देशात काय चाललंय याचं भान नव्हतं. १९०८ साली टिळकांना शिक्षा झाली, तेव्हा पांढरपेशा वर्गामध्ये हळहळ होती आणि चर्चा होत होती; परंतु १९२० साली सबंध देशामध्ये, खेड्यापाड्यांमध्ये पाटलांच्यामध्येसुद्धा, बहुजन समाजातील शेतकरी वर्गातसुद्धा स्वातंत्र्यचळवळीचं लोण पोहोचलं होतं.

**पु. ल. - हे लोण कसं गेलं असेल? मला तर नेहमी याचं कुतूहल पडलेलं आहे. आता पाहा, प्रचाराची एवढी साधनं आहेत; पण तरी सरकारी प्रचार लोकांपर्यंत नीट जात नाही आणि गांधींच्या काळात १९२० साली अशी प्रचाराची साधने व यंत्रणा काहीच नव्हती.**

**शास्त्रीजी -** त्यावेळी माणसं पकडली जात. त्यावेळी लोकांत जेलचं जे भय होतं... पण पकडलेली माणसं निर्भयपणे तुरुंगात जाताना पाहिली की, त्याचा खोल परिणाम लोकांवर होत असे व तो दूरवर परिणाम व्हायचा आणि तो जेलमध्ये गेलाय... जेलमध्ये जाणं ही किती भीतीची गोष्ट होती आणि तो जेलमध्ये गेलाय... निधड्या छातीने आणि हसत हसत गेला हे पाहिल्याबरोबर लोकांवर त्याचा फार परिणाम होत असे.

**पु. ल. - म्हणजे लोकांना यातून 'अभय साधनेचं' दर्शन झालं तर?**

**शास्त्रीजी -** हो. आणि त्यामुळे लोकमान्य टिळकांचा अनपेक्षित अस्त झाला आणि गांधी पुढे आले. तर त्या गांधींमध्ये आम्ही तरुण मंडळी विचार करत होतो. कारण मला ही राजकीय विचारांची पार्श्वभूमी मिळालेली होती. तेव्हा १९२१ साली मी बारडोलीला गेलो. तिथल्या सत्याग्रहात भाग घेणार होतो... बारडोलीच्या करबंदी सत्याग्रहात... परंतु चौरीचौरा हत्याकांडामुळे दंगा होऊन पोलीस मारले गेले आणि गांधींनी उपवास सुरू केला... पाच दिवसांचा. त्यावेळी मी तिथे होतो. प्रार्थनेमध्ये मी भाग घेत असे. 'भगवद्गीता' म्हणत असे. 'उपनिषद' म्हणत असे आणि नंतर गांधी पकडले गेले. त्यांच्यावर खटला झाला आणि ६ वर्षांची शिक्षा झाली, तर त्या ६ वर्षांच्या शिक्षेमध्ये गांधींनी सांगितलं की, "मला अभिमान वाटतो की, ज्या कारणास्तव, ज्या कायद्याखाली टिळकांना शिक्षा झाली होती त्याच

कायद्याखाली मला शिक्षा होते आहे, हा माझा अभिमानाचा, गौरवाचा विषय आहे.'' पण आम्हाला इथेही टिळक-गांधींमध्ये फरक दिसला. त्यावेळी टिळक म्हणत होते 'मी नाही अपराध केला' आणि गांधी म्हणाले की, 'मी जरूर अपराध केला आहे.' हा फरक गांधींमध्ये आम्हाला दिसल्यामुळे आणि एक साधू पुरुष लोकांमध्ये हिंडतो, फिरतो आहे, याचा सामान्य लोक व आमच्यासारखे लोक यावर परिणाम दिसतच होता.

**पु. ल. - हा सर्वथा नवा चमत्कार होता नाही का? आत्तापर्यंत युद्ध म्हणजे यांनी काठी मारायची आणि मग त्यांनी पण काठी मारायची अशा प्रकारे व्यवहार चालायचा, तर हे सत्याग्रहाचं नवं युद्धतंत्र जे आहे ते नवं युद्धतंत्र पाहिल्यानंतर आणि त्या युद्ध तंत्रामुळे सामान्य माणसंपण जेलमध्ये जाऊ लागली हे पाहिल्यावर तर....**

**शास्त्रीजी -** आणि त्यात मोठ्या प्रमाणात स्त्रिया आल्या...

**पु. ल. - हो?**

**शास्त्रीजी -** आणि अशिक्षित स्त्रियाही या चळवळीत त्यावेळी भाग घेत. स्त्रियांना राजकारणाची दीक्षा जास्त प्रमाणात ज्या राजकीय चळवळींनी दिली ती देशातल्या असो वा जगातल्या, ती म्हणजे गांधींची स्वातंत्र्यचळवळ. इतक्या मोठ्या प्रमाणात स्त्रीजमात यापूर्वी राजकारणात उतरली नव्हती. याचं कारण गांधींची चळवळ अहिंसक (नॉन व्हायलंट) होती. त्यामुळे स्त्रिया राजकारणात भाग घेऊ लागल्या. कोणत्याही युरोपियन संस्कृती असलेल्या देशामध्ये राजकारणामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात स्त्रिया दिसल्या नाहीत. नंतरच्या या काळात स्त्रिया राज्यपाल झाल्या, मंत्री झाल्या स्त्रिया, हे जे चित्र आहे, ते केवळ गांधींच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर घडलं.

**पु. ल. - परंतु राजकारणात त्या काळात ज्या हिरीरीने शेकड्यांच्या संख्येने स्त्रिया भाग घेताना आपण पाहतो... मी आपल्यापेक्षा लहान आहे; पण मीही सन १९३१ च्या चळवळीत (सविनय कायदेभंग) स्त्रियांना भाग घेताना पाहिले आहे, तर ती एक आंच त्यावेळी स्त्रियांमध्ये दिसली की, या देशाचं बरं व्हावं. ती आंच नंतरच्या काळात दिसली नाही. ती त्या संख्येनं आज मला दिसत नाही...**

**शास्त्रीजी -** नाही, हे खरंय ! आता काय आहे की, ते जे स्वातंत्र्यप्राप्तीचं युग होतं, स्वातंत्र्य प्रयत्नाचं युग होतं आणि झगड्याचंही. त्या युगामध्ये ज्या तऱ्हेच्या उदात्त, उच्च भावना होत्या, त्या भावनांच्या योगाने एवढं मोठं राष्ट्र हे एक झालं आणि उत्तम तऱ्हेची राज्यघटना या देशाला मिळाली, संसदीय लोकशाही मिळाली आणि युरोपपेक्षा किंवा अमेरिकेपेक्षा निराळा राष्ट्रवाद इथे आला. भाषांच्या पलीकडचा राष्ट्रवाद इथे आला. इथे १४ भिन्न भाषिक राज्ये आहेत मोठमोठी. धर्मांच्या पलीकडचा राष्ट्रवाद इथे आला. कोणत्याही मोठ्या मुस्लिम राष्ट्राइतकी मुस्लिम प्रजा या देशामध्ये आहे, हे जे वातावरण इथे तयार

झालं, आलं, ते निराळं आहे. या दृष्टीने हा राष्ट्रवाद, भारतीय राष्ट्रवाद जगातील कोणत्याही देशांतील राष्ट्रवादापेक्षा श्रेष्ठ आहे. या श्रेष्ठतेचं श्रेय टिळक आणि गांधी यांना आहे.

**पु. ल. - शंकाच नाही; पण मी आपणाला विचारतो की, राष्ट्रीय चळवळीत आपण आलात त्यावेळी आपणाबरोबर जे जुन्या राष्ट्रीय ज्ञानाचं जे संचित होतं ते प्राचीन होतं. आपल्यासारखे आपल्या जोडीला हे शिक्षण घेतलेले इतर कोणी लोक आले का त्या काळामध्ये?**

**शास्त्रीजी -** नाही आले.

**पु. ल. - आपण आलात या चळवळीत हिरीरीने. आपण असे पहिले विद्वान असाल की परंपरेचं शिक्षण घेऊन सामान्य माणसांशी पण जे सहजगतीने सामावले, तर ही क्रिया कशी घडली? वाईला राहिल्यामुळे?**

**शास्त्रीजी -** हो, वाईला राहिल्यामुळे ! आणि गांधीवादामध्ये आल्यामुळे.

**पु. ल. - पण...**

**शास्त्रीजी -** १९२० सालापासूनच गांधीवादाकडे आकर्षित झाल्यामुळे असेल. गांधींच्या भोवती सामान्य जनच अधिक होते; आणि त्यामुळे तिथे नवा विचार पुन्हा येऊ लागला. रशियन राज्यक्रांतीचे परिणाम इथे उमटू लागले. आणि सामाजिक क्रांती, आर्थिक क्रांती व्हायला पाहिजे; आणि हा आर्थिक क्रांतीचा विचार, हा जो भांडवलदार वर्ग आहे यांना वगळून करण्यात येणाऱ्या आर्थिक क्रांतीचा विचार हा गांधींपाशी नव्हता. आणि हा जो नवा विचार आला तो मला एम. एन. रॉय यांच्यापासून मिळाला.

**पु. ल. - आपल्या आयुष्यामध्ये तीन माणसे महत्त्वाची ठरली, नाही का?**

**शास्त्रीजी -** हो.

**पु. ल. - एक स्वतः तुमचे गुरुजी नारायणशास्त्री मराठे (स्वामी केवलानंद), नंतर महात्मा गांधी आणि तिसरे तितक्याच तोलामोलाचे एम. एन. रॉय नाही का?**

**शास्त्रीजी -** एम. एन. रॉयसुद्धा मला आकर्षित करू शकले, याचं कारण त्यांचं आयुष्य सशस्त्र राष्ट्रीय क्रांतिकारकाचं होतं.

**पु. ल. - त्यांची आपली पहिली भेट केव्हा झाली?**

**शास्त्रीजी -** त्यांची माझी पहिली भेट १९३६ साली झाली. ते जेलमधून ६ वर्षांच्या शिक्षेतून बाहेर आले तेव्हा; पण त्या अगोदर त्यांची भेट त्यांच्या ग्रंथांतून झाली होती. ते ग्रंथ मी वाचीत होतो. कर्णिक मंडळीं जी आहेत - त्यांचा नि एम. एन. रॉय यांचा संबंध १९३० साली आला. आणि ते जेव्हा या ठिकाणी गुप्त वेशात राहत होते. त्यावेळी कर्णिकांचा नि माझा जेलमध्ये संबंध आला आणि त्यांनी मला एम. एन. रॉय यांच्याबद्दल प्रथम सांगितलं. त्यांनी मला रॉय यांचे निबंध वाचायला दिले. म्हणून मला त्यांची माहिती झाली.

**पु. ल. - वसंतराव कर्णिक का?**

**शास्त्रीजी -** हो वसंतराव, दुसरे द्वा. भ. कर्णिक. दोघांनी मला रॉय यांचे निबंध वाचायला दिले. ते मी वाचले. ते सुलभ असं इंग्रजी होतं. मार्क्सवाद त्यामुळे समजला.

**पु. ल. - एक व्यक्तिगत प्रश्न विचारू का? तुम्ही इंग्रजी शिकायची सुरुवात कितव्या वर्षी केली?**

**शास्त्रीजी -** मी इंग्रजी शिकायला लागलो... शिकायला सुरुवात केली ती वयाच्या १७ व्या वर्षी. म्हणजे विनोबा भावे यांच्याकडे.

**पु. ल. - तुम्हाला इंग्रजी शिकायला एवढे मोठे गुरू मिळाले तर?**

**शास्त्रीजी -** त्या चार महिन्यांत खूप शिकवलं. नंतर मी वाचत राहिलो.

**पु. ल. - मोठे मोठे ग्रंथ... मार्क्स वगैरे सगळंच वाचलं ना? सॉरी... आपण रॉय यांच्याबद्दल सांगत होता...**

**शास्त्रीजी -** एम. एन. रॉय हे व्यक्तिमत्त्व जे आहे ते फार महत्त्वाचं आहे, असे नारायणशास्त्री मराठे गोरेपान, सहा फूट उंचीचे आणि उत्तम तऱ्हेचं शास्त्र मुखोद्गत असलेले आणि संगीताचा व्यासंग असलेले. ते वेद म्हणायचे ते सुद्धा संगीतच होतं. इतकं ते उत्कृष्ट ! एम. एन. रॉय पण ६ फूट उंचीचा भक्कम क्रांतिकारक होता.

**पु. ल. - मी पण पाहिलंय त्यांना.**

**शास्त्रीजी -** त्यांच्या विचारात स्वच्छता फार. शिवाय खोली होती. जिच्या योगे सामाजिक क्रांती व्हायला पाहिजे, आर्थिक क्रांती व्हायला पाहिजे हा मार्क्सचा विचार मी त्यांच्यातर्फे शिकलो. आणि त्यांचं व्यक्तिमत्त्व असं होतं की, ते केवळ पंडित नव्हते. ते क्रियावान पंडित होते. त्यांचा प्रभाव माझ्यावर पडत गेला. म्हणजे एकतऱ्हेने मी भावनाविवश होणाराच मनुष्य होतो.

**पु. ल. - त्या शिवाय अशी कार्ये होतच नसतात ना? लोकांच्यामध्ये जाण्याची.**

**शास्त्रीजी -** हो !

**पु. ल. - मग आपल्या पुस्तकांचा क्रम असतो मनुष्य बदलण्याचा...**

**शास्त्रीजी -** हो !

**पु. ल. - पण आत्ता तुमचा जो कार्यक्रम मी पाहतो, या दिवसांमध्ये जो चालू आहे, तो पाहता त्यामध्ये विश्वकोशाचं कार्य मोठं आहे, तर मी शेवटचा एकच प्रश्न विचारतो की, आपल्या आयुष्यामध्ये अत्यंत धन्यता वाटावी अशा प्रकारचं कुठलं कार्य आपल्या हातून झालं? असं आपणास वाटतं...**

**शास्त्रीजी -** असं काही सांगता यायचं नाही...

**पु. ल. - तरी पण...**

**शास्त्रीजी -** नाही... नाही सांगता येणार. मला काही सांगता येत नाही.

**पु. ल - तुम्ही नाही तर आम्ही सांगू... तुम्ही धर्मकोशाचं, विश्वकोशाचं कार्य केलं... इतरही अनेक कार्ये आहेत...**

**शास्त्रीजी -** हो... पण... मला काही सांगता येणार नाही.

**पु. ल. - दुसरं असं की, पारंपरिक वातावरणामध्ये राहूनसुद्धा आपल्या विचारांमध्ये परंपरेच्या आधारे ज्याला आपण नास्तिकता म्हणतो, अशा प्रकारचा एक आपला मोठा विचार आहे...**

**शास्त्रीजी -** हो, बुद्धिप्रामाण्यवादाप्रमाणे मी वागतो...

**पु. ल. - त्याला तुमच्या परंपरागत वातावरणात वाढण्यात धक्का नाही का लागला?**

शास्त्रीजी - नाही. नाही लागला. असं आहे की, परंपरेचा मला बुद्धिप्रामाण्यवादाच्या संदर्भात फायदा, उपयोगच झाला. कारण प्राचीन षड्दर्शन मी शिकल्यामुळे चर्चा कशा कराव्यात नि एकमेकांचे विचार कसे खोडावेत, हे मला समजल्यामुळे मला एकतऱ्हेचं आधुनिक विचारांचं जे आकर्षण आहे नि बुद्धिप्रामाण्यवाद जो आहे, आणि अंधश्रद्धेच्या विरुद्ध जो भारत झाला पाहिजे, हा दृष्टिकोन मला फार महत्त्वाचा वाटतो आहे.

**पु. ल. - एकच सांगतो आता. मघाशी तुम्ही म्हणालात की, लहानपणी मोठ्याने वेदपठन करत होतात, तर अलीकडे चांगलं ऐकायला काही मिळत नाही, तर एखादी ऋचा जर आठवणारी म्हणून दाखवली...**

**शास्त्रीजी -** आता त्या पद्धतीत मी काही म्हणू शकणार नाही, कारण हा आता म्हातारा आवाज आहे...

मधुवातारायते मधुक्षरंति सिद्धवः
माध्विः न संतोषयति: मधुनप्ततो मधु शतो मधु पार्थवितो रजः
मधुत्यरस्तो पिता: मधुमान्नो वनस्पतिः
मधुमानस्तो सूर्य: माध्विर्गावोतुनः
ओम शांति: शांति: शांति:

**पु. ल. - नमस्कार !**

**(सौजन्य - आकाशवाणी केंद्र, पुणे, ध्वनिमुद्रण - २३ एप्रिल, १९८६)**

○○○

७

# शास्त्री-पंडितांच्या सहवासातील ज्ञानसाधना

मुलाखतकार - **प्रा. मे. पुं. रेगे**

**शास्त्रीजी, तुम्ही भारतीय शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन केले. त्याविषयी काही प्रश्न विचारायचे आहेत.**

**प्रश्न - प्रेरणा तुम्हाला प्रथम कशी झाली ?**

**उत्तर -** माझ्या वडिलांची माझ्याबद्दल अशी महत्त्वाकांक्षा होती की, मी संस्कृत शास्त्रे शिकावीत आणि पुण्यासारख्या शहरी वसंत व्याख्यानमालेत भाषणे करता येतील या दर्जाचे ज्ञान मी संपादन करावे, अशा व्यासपीठावरून प्रभावी भाषणे करता येतील, अशी शक्ती मी कमवावी. ही प्रेरणा घेऊन मी प्राज्ञपाठशाळेत दाखल झालो. ही माझ्या दृष्टीने सुदैवाची गोष्ट ठरली. कारण प्राज्ञपाठशाळेचे वातावरण या दोन्ही गोष्टींना अतिशय अनुकूल होते. पाठशाळेतील काही मंडळी स्वातंत्र्यवीर सावरकरांची अनुयायी होती. सकस उच्च दर्जाचे शास्त्राध्ययन करून व्यवहारात पडावे यापेक्षा स्वातंत्र्याच्या लढ्यात सामील व्हावे असा त्यांचा ध्येयवाद होता. या ध्येयवादाचा परिणाम माझ्यावर होत होताच; पण वाईत आल्यावर मी लवकरच शास्त्राचे अध्ययन करू लागलो. माझी साहित्याची व्युत्पत्ती वर्ष-दीड वर्षात पुरी झाली. नंतर शास्त्रांकडे वळल्यावर माझ्या गुरूंनी - नारायणशास्त्री मराठे, केवलानंद सरस्वती - माझी दृष्टी व्याकरणापेक्षा न्यायशास्त्रावर केंद्रित केली. महाराष्ट्रात त्या वेळी व्याकरणशास्त्राचा प्रभाव खूप होता. पुण्याला वासुदेवशास्त्री अभ्यंकर गाजत होते. श्रीधरशास्त्री पाठक डेक्कन कॉलेजात अध्यापक होते. तेही वैय्याकरण होते. आमच्या गुरूंचे गुरू धोंडशास्त्री डेंगवेकर हे मात्र नव्यन्यायाचे होते. ते नुकतेच निवर्तले होते.

प्रज्ञानंद हे माझ्या गुरूंचे अद्वैताचे गुरू, आध्यात्मिक गुरू होते. त्यांनी तारुण्यातच संन्यास घेतला होता. त्यांच्या परंपरेला साक्षात्कारी परंपरा असे म्हणता येईल. ही माझ्या गुरूचीही परंपरा होती. एकदा ब्रह्मसूत्रभाष्याचा पाठ चालू असताना एका मुद्यावर ते आले असताना आपल्याला अनुभव आला असे त्यांना वाटले, अशी साक्षात अनुभवाची परंपराही पाठशाळेत होती.

प्राज्ञपाठशाळेत त्या वेळी तीन परंपरा प्रतिबिंबित झाल्या होत्या. स्वातंत्र्याच्या चळवळीकडे ओढा असलेली काही मंडळी होती. त्यांच्याविषयी पाठशाळेचे प्रमुख असलेल्या आमच्या गुरूंना आदर होता. परंपरागत दर्शनशास्त्रे, व्याकरण यांच्यात पारंगतता मिळवावी अशी एक प्रवृत्ती होती, तर काही मंडळी आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पंथाची होती. ते जे वैचारिक मंथन करीत होते त्याचाही माझ्यावर प्रभाव पडत होता.

**प्रश्न - एक प्रश्न विचारतो. डेंगवेकर शास्त्र्यांनी स्वतःची शिष्यपरंपरा तयार केली नाही?**

**उत्तर -** नाही. आमच्या गुरूंना त्यांनी नव्यन्याय शिकविला आणि इतरही अनेकजण त्यांच्याजवळ शिकून गेले; पण ते प्रभावीपणे पुढे आले नाहीत.

**प्रश्न - तुमचे इथे जे न्यायाचे शिक्षण झाले ते कोणत्या पातळीपर्यंत झाले?**

**उत्तर -** ते वस्तुतः वरच्या पातळीपर्यंत गेले; पण न्यायाच्या अध्ययनाला जे अनुकूल वातावरण लागते ते येथे नव्हते. अनेक नव्यन्यायाचे विद्यार्थी आणि अध्यापक एकत्र असावे लागतात, ते येथे नव्हते. तेव्हा माझ्या गुरूंनी मला सांगितले की, तू आता वाराणसीला जा आणि तेथे नव्यन्यायाचे अध्ययन कर. १९१४ साली मी येथे आलो, चार वर्षे येथे अध्ययन केले आणि मग वाराणसीला गेलो. इथे जे संस्कार होते ते संमिश्र होते. वाराणसीमध्ये जे शास्त्री-पंडित होते ते परंपरेचे कट्टर समर्थक होते आणि गाढे विद्वान होते. अशी गाढी विद्वत्ता, एखाद्या शास्त्राची उत्कृष्ट तयारी, त्यावेळी महाराष्ट्रात नव्हती असे नाही. पुणे आणि काही अंशी कोल्हापूर आणि नाशिक येथे व्याकरणाचे अध्ययन - अध्यापन चांगले चालले होते; परंतु दार्शनिक आणि इतर विद्यांमधील सर्वांगीण पारंगतता मला वाराणसीमध्ये दिसली. उत्तम नैय्यायिक, उत्तम वैय्याकरण, वरच्या दर्जाचे धर्मशास्त्रज्ञ, वेदांती, वेदाध्यायी मोठ्या संख्येने मला तेथे आढळले. प्राचीन विद्यांचे अतिशय उत्कृष्ट अध्ययन केंद्र असे वाराणसीचे रूप मला दिसले. त्यामुळे आपल्याला जवळ जवळ काहीच येत नाही, अशा प्रकारची भावना माझ्या मनात निर्माण झाली.

**प्रश्न - एक विचारतो, शास्त्रीजी व्याकरणाप्रमाणे पूर्वमीमांसेचे अध्ययन महाराष्ट्रात होत होते की नाही?**

**उत्तर -** स्वामी (केवलानंद सरस्वती) करीत होते; पण एकंदरीत महाराष्ट्रात पूर्वमीमांसेचे फारसे अध्ययन, अध्यापन होत नव्हते. मात्र पूर्वमीमांसेच्या परीक्षा घेण्यात येत असत. वेदशास्त्रोत्तेजक सभा या परीक्षा घेत असे. प्राचीन भारतीय शास्त्रांचे परस्परसंबंध असे असत की, एखाद्याची एखाद्या शास्त्रात चांगली तयारी असली की त्याला इतर शास्त्रांचीही चांगली माहिती असे. तेव्हा पूर्वमीमांसेच्या परीक्षा घेता येतील, अशी परिस्थिती येथे होती. वेदशास्त्रोत्तेजक सभा ही त्या वेळी भारतीय विद्यांत परीक्षा घेणारी उत्तम संस्था होती. परीक्षा घेण्यासाठी परप्रांतांतले पंडितही बोलावण्यात येत असत आणि सर्व शास्त्रांच्या परीक्षा घेण्यात येत असत.

**तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मे. पुं. रेगे यांनी घेतलेली मुलाखत.**

**प्रश्न - व्याकरणाच्या अध्ययन-अध्यापनाची परंपरा महाराष्ट्रात होती असे तुम्ही सांगितले. इतर प्रांतांतल्या पंडितांनीही मला ते सांगितले आहे. व्याकरणशास्त्रात जो दार्शनिक भाग आहे त्याचेही अध्ययन होत असे का?**

**उत्तर -** म्हणजे स्फोटवाद इत्यादी? हो त्याचेही अध्ययन होत असे. तसेच ज्याला 'शाब्दबोध' म्हणतात, त्याचीही व्यवस्थित चर्चा होत असे. नागोजी भट्टांचा शाब्दबोधाविषयीचा विचार, कोंडभट्टांनी नव्यन्यायाच्या परिभाषेत मांडलेला याच विषयावरील विचार यांचे चांगले अध्ययन येथे होत असे.

**प्रश्न - आता वाराणसीला तुम्ही गेल्यावर काय झाले तिकडे वळू या.**

**उत्तर -** मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मला तेथे दिग्गजांसारखे पंडित दिसले. मी नव्यन्यायाचे पुढचे अध्ययन करण्यासाठी राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्याकडे गेलो. ते नुकतेच न्यायाचार्य झाले होते. दुसरे एक भंडारीशास्त्री म्हणून होते. तेही न्यायाचार्य होते. मी दोघांकडे अध्ययनासाठी जाऊ लागलो; पण त्यांच्या अध्यापनात, ज्याला सुबोधता म्हणतात, ती नव्हती. मग त्यांचे गुरू वामाचरण भट्टाचार्य होते त्यांच्याकडे मी जाऊ लागलो.

पण प्राज्ञपाठशाळेत जी शिस्त होती ती वाराणसीच्या पाठशाळांत मला आढळली नाही. प्राज्ञपाठशाळेत वेळापत्रक असे. सकाळी ८ ते ९ न्यायाचा पाठ, ९ ते १० मीमांसेचा पाठ, दुपारी २ ते ३ धर्मशास्त्राचा पाठ इत्यादी. अशी शिस्त या खाजगी पाठशाळांत नव्हती. खाजगी पाठशाळेचे स्वरूप म्हणजे एक गुरू आणि त्याच्याकडे शिकणारे शिष्य असत, गुरू बहुधा अत्यंत पारंगत असत. शिष्य आपापले ग्रंथ घेऊन त्यांच्याकडे जात. एका खोलीत पाठ चालत. गुरू आयत्या वेळी सांगत. आज सकाळी न्यायाचा पाठ होईल, दुपारी मीमांसेचा इत्यादी. कोणाचा कधी पाठ होईल याचा काही नियम नसे. कार्यक्रमाची शिस्त या पाठशाळांत नसे. यामुळे प्राज्ञपाठशाळेत जी शिस्तबद्ध व्यवस्था होती तिचे महत्त्व वाराणसीला गेल्यावर माझ्या मनावर ठसले.

**प्रश्न - वामाचरण भट्टाचार्यांकडे तुम्ही कोणते ग्रंथ वाचले?**

**उत्तर -** गदाधरभट्टाच्या तत्त्वचिंतामणीवरील दिधितीमधील पञ्चलक्षणी, चतुर्दशलक्षणी आणि सिद्धांतलक्षण अशी व्याप्तीच्या लक्षणावरील तीन प्रकरणे मी त्यांच्यापाशी शिकलो. त्यांच्याद्वारा नव्यन्यायाच्या पद्धतीने परिष्कार कसा करावा हे मी चांगल्या प्रकारे उमगलो. अर्थात मला इतर दर्शनांविषयीही जिज्ञासा होती. उदा. मी पूर्वमीमांसेचे स्वतः वाचन करीत असे. म. म. पंत म्हणून तेव्हाचे एक प्रसिद्ध विद्वान होते. एक परिणतप्रज्ञ पंडित म्हणून काशीमध्ये त्यांना मोठा मान होता. त्यांच्याकडे मी कित्येक वेळा प्रश्न घेऊन जात असे. काशीची प्रथा अशी असे की, या पंडितांकडे आपण कधीही जावे. त्यांचे पाठ आटोपले की ते चर्चा करायला मोकळे असत. ते अगदी प्रसन्नपणे चर्चा करीत असत. पंतजी पूर्वमीमांसक, वेदांती आणि

वैय्याकरणही होते. त्यांच्याकडे जाऊ लागल्यावर मी त्यांना जो पहिला प्रश्न केला तो असा होता : आपण जे वेदप्रामाण्य स्वीकारतो, ते केवळ श्रद्धेने स्वीकारतो. ते सिद्ध करता येत नाही. कारण 'औत्पत्तिकस्तु शब्दस्य अर्थेन संबंध: तस्य ज्ञानम् उपदेशः, तत्प्रमाणं बादरायणस्य अनपेक्षत्वात्' हे जे जैमिनीसूत्र आहे यावरून वेद हे अपौरुषेय आहेत हे सिद्ध होत नाही. ते गृहीत धरलेले आहे. सूत्राचे शब्द जर पाहिले तर 'अर्थाचा आणि शब्दाचा संबंध औत्पत्तिक आहे, म्हणजे स्वाभाविक आहे, शब्द येतो तो अर्थ घेऊनच येतो, म्हणजे त्याच्याजवळ अर्थ असतोच, त्याला अर्थ दिलेला नसतो, तो त्याच्याशी स्वाभाविकपणे निगडितच असतो' एवढेच त्यात सांगितलेले आहे; पण शब्द म्हणजे वेदवाक्ये अपौरुषेय आहेत असे काही या सूत्रात सांगितलेले नाही आणि ती अपौरुषेय आहेत असे का मानावे, याचे काही प्रमाण मीमांसासूत्रात नाही. ही केवळ श्रद्धा आहे. कुराणावर जशी मुसलमानांची श्रद्धा आहे किंवा बायबलवर जशी ख्रिश्चनांची श्रद्धा आहे, तशीच आपली वेदांवर आहे असे आपण का मानू नये? नैय्यायिक हे वेद ईश्वरप्रणीत आहेत असे मानतात. कुराणातील शब्द किंवा बायबलमधील शब्द प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे ईश्वराचे असे मुसलमान किंवा ख्रिस्ती जसे मानतात त्याच स्वरूपाचे नैय्यायिकांचेही मत आहे असे मानणे योग्य होईल. अशा तऱ्हेची चर्चा मी त्यांच्याशी करीत असे.

**प्रश्न - त्यांचे उत्तर काय होते?**

**उत्तर -** त्यांचे उत्तर असे होते : वेद अपौरुषेय आहेत म्हणजे काय? हे कसे सिद्ध होते? तर असे अनुमान मांडण्यात येते : 'यद् यद् वेदाध्ययनं तद् तद् गुर्वध्ययनपूर्वकम् ।' वेदाध्ययनाचे कोणतेही उदाहरण घेतले तर ते करणारा जो (शिष्य) असतो तो आपल्यापूर्वी वेदाध्ययन केलेल्या गुरूपासून वेद शिकत असतो. म्हणजे जो, जो गुरू असतो त्याला, त्याला त्याचा गुरू असतो. तेव्हा वेद हे अनादिसिद्ध आहेत. त्यांना प्रारंभ नाही.

**प्रश्न - पण तुम्ही ज्या जैमिनीसूत्राचा उल्लेख केला त्याचा आणि या युक्तिवादाचा काही संबंध नाही हे ते मान्य करीत होते का?**

**उत्तर -** होय. हे ते मान्य करीत; पण हा त्यांचा युक्तिवाद आहे. सृष्टी अनादि आहे असे मानले तर तो टिकतो, नाही तर नैय्यायिकांचा ईश्वर मानावा लागेल. आता सृष्टीची उत्पत्ती व प्रलय हे आपल्या पुराणांनी आणि अनेक दर्शनांनी मानले आहेत. उदा : 'जन्माद्यस्य यतः' (ज्याच्यापासून ह्याचा - ह्या दृश्य विश्वाचा - जन्म इत्यादी होतात) हे बादरायणसूत्र घ्या किंवा उपनिषदांमध्ये 'ही पंचमहाभूते ज्याच्यापासून उत्पन्न होतात, ज्याच्यात स्थिरावतात आणि ज्याच्यात विलीन होतात ते ब्रह्म होय' असे ब्रह्माचे व्याख्यान केले आहे किंवा लक्षण सांगितले आहे. यामुळे पूर्वमीमांसक जरी सृष्टीची उत्पत्ती मानीत नसले तरी सृष्टीला उत्पत्ती, स्थिती आणि लय आहे असे मत होतेच. पूर्वमीमांसक सृष्टीची उत्पत्ती अमान्य करतात. कारण त्यांना ती मान्य करणे अडचणीचे आहे. मग (वेदप्रामाण्यासाठी) ईश्वर मानावा लागतो; पण जसे निरीश्वर पूर्वमीमांसक आहेत तसे काही सेश्वर पूर्वमीमांसकही होते. जसे निरीश्वर आणि सेश्वर सांख्य आहेत, म्हणजे

ईश्वर मानणारे आणि ईश्वर न मानणारे सांख्य आहेत, तसेच सेश्वर आणि निरीश्वर पूर्वमीमांसक असू शकतात. आपण काहीही मानले तरी वेदांचे शब्दप्रामाण्य का मानायचे हा प्रश्न शिल्लक राहतोच, असा युक्तिवाद मी करीत होतो.

त्याचे उत्तर असे होते की, तर्काने हा विषय सिद्ध होणार नाही. हा श्रद्धेचाच विषय आहे. श्रद्धेनेच आपण संध्यावंदनादी करतो, विवाहादी संस्कार करतो, श्रद्धेनेच आपण खरे बोलतो, खोटे बोलत नाही. श्रद्धेनेच अहिंसादी व्रताचे आचरण करतो, तेव्हा श्रद्धा आवश्यक आहे आणि श्रद्धा ही आपल्या मनात असतेच असे पंतजी मला उत्तर देत असत.

**प्रश्न - तुम्ही वामाचरण भट्टाचार्यांकडे किती वर्षे अध्ययन केले?**

**उत्तर -** एक वर्ष. मला नव्यन्यायाची व्युत्पत्ती जमल्यानंतर मी स्वतंत्रपणे अध्ययन करू लागलो. कारण वाराणसीच्या पाठशाळेतील जी अव्यवस्था होती तिच्याशी जुळवून घेणे मला कठीण गेले. 'तर्कतीर्थ या परीक्षेसाठी नव्यन्यायाचे काही महत्त्वाचे ग्रंथ होते. त्यांचे अध्ययन मी केले व परीक्षा दिली.'

**प्रश्न - नव्यन्यायाचे कोणते ग्रंथ 'तर्कतीर्थ' या परीक्षेसाठी होते?**

**उत्तर -** जागदीशी होती, पञ्चवाद आणि उत्तरवाद हे अनुमानखंडातील, प्राचीन न्यायातील फक्त न्यायसूत्रे आणि त्यांच्यावरील विश्वनाथ पञ्चाननाची वृत्ती एवढेच ग्रंथ होते. त्यामुळे या परीक्षेमुळे माझी नव्यन्यायाची व्युत्पत्ती तयार झाली.

मी तेथून वाईला लवकर परतलो. मी १८ साली वाईहून निघालो आणि २२ साली परीक्षा देऊन वाईला परतलो, आणि मग परत मी वाराणसीला गेलो नाही; पण तेवढ्या अवधीत तेथील विद्वानांचे जे जग होते त्याच्याशी माझा चांगला परिचय झाला होता. नित्य होणाऱ्या चर्चांमुळे माझ्या चांगल्या ओळखीपाळखी झाल्या होत्या.

धर्मशास्त्राच्या बाबतीतही नेहमी अशी चर्चा होत असे. उदा. ऐतिहासिक दृष्टिकोन आणि समन्वयवादी दृष्टिकोन या बाबतीत त्यांचे - माझे वाद व्हायचे.

**प्रश्न - तुम्ही विद्यार्थी म्हणून काशीला असताना हे वाद होत असत का?**

**उत्तर -** होय ! कारण मी धर्मशास्त्र वाचीत असे, आणि ते वाचताना मला धर्मशास्त्राच्या आदेशामध्ये फरक होत गेलेला दिसत असे. उदा. कन्यांच्या विवाहाचे वय हा विषय घेतला तर काही ठिकाणी प्रौढ विवाह सांगितलेले आहेत व काही ठिकाणी बालविवाह सांगितलेले आहेत असे दिसते. तसेच काही ठिकाणी ब्राह्मणांना चारी वर्णांच्या स्त्रिया सांगितल्या आहेत, तर काही ठिकाणी इतर वर्णांच्या स्त्रिया निषिद्ध ठरविल्या आहेत; पण अशी ठिकाणे थोडी आहेत. असाही भेद करण्यात आलेला दिसतो की, जरी चारी वर्णांच्या स्त्रिया ब्राह्मणांना संमत असल्या तरी शूद्र स्त्री ही भोगार्थ असते, धर्मार्थ नसते असे सांगितले आहे. हा पुढे आलेला निर्बंध दिसतो. सुरुवातीला तो नव्हता हे पुराणकथांवरूनही दिसून येते.

**प्रश्न - पण धर्मशास्त्राप्रमाणे असे नाही का, की एका पत्नीला पुत्र झाल्यानंतर इतर**

**स्त्रियांशी जर एखाद्या पुरुषाने विवाह केला तर त्या भोगार्थच असणार - मग त्या ब्राह्मण असोत वा शूद्र असोत.**

**उत्तर -** बरोबर आहे. पहिला पुत्र हाच धर्मपुत्र असतो; पण भेद असा आहे की, ज्या त्रैवर्णिक भार्या असत त्या धर्मकार्यामध्ये सहभागी होऊ शकत असत, शूद्र भार्यांना हा अधिकार नव्हता.

**प्रश्न - हे तुमचे जे वादविवाद होत ते इतर विद्यार्थ्यांशी होत की पंडितांशी होत?**

- दोघांशी. सहाध्यायांशी आणि पंडितांशी. आणि त्यांच्यामुळे हे दिसून येत असे की, ऐतिहासिक दृष्टीने धर्मशास्त्रातील वचनांची जशी संगती लावता येत असे तशी समन्वयवादी दृष्टीने लावता येत नसे. समन्वयवादी दृष्टीने व्यवस्था लावण्यासाठी युगभेदाचा आश्रय घ्यावा लागत असे. म्हणजे जी परस्परविरुद्ध वचने होती ती वेगवेगळ्या युगांसाठी होती, असे मानावे लागे. उदा. अमुक वचने अन्य युगासाठी होती, ती कलियुगासाठी नाहीत अशी भूमिका घ्यावी लागे.

**प्रश्न - त्या वेळी वाराणसीला पद्धतशीर रीतीने शास्त्रार्थ होत असत का?**

**उत्तर -** हो. पद्धतशीरपणे सतत शास्त्रार्थ होत असत. ते दोन तऱ्हांनी. एक, ज्येष्ठ महिन्यामध्ये गंगेचा नऊ दिवस उत्सव होत असे व त्यात दर दिवशी म्हणजे नऊ दिवस शास्त्रार्थ चालत असे. पूर्वोत्तरपक्ष होत असत आणि मध्यस्थ असे. या शास्त्रार्थामध्ये मुख्यतः न्याय आणि व्याकरण यातील विषय असत. क्वचित वेदांतावरही शास्त्रार्थ होत असे; पण विशेष नाही.

**प्रश्न - एक प्रश्न असा : हे शास्त्रार्थ म्हणजे लुटुपुटीची वाग्युद्धे होती असे म्हणता येईल. कारण एखादा मुद्दा सिद्ध होई तो प्रमाण ग्रंथातील वचनाच्या आधारे सिद्ध होई; पण एखादा नवीन सिद्धांत या शास्त्रार्थातून सिद्ध झाला असे कधी होत असे का?**

**उत्तर -** असे कधी होत नसे. परंपरागत पद्धतीनेच सर्व प्रश्नांची उत्तरे मिळत असत.

**प्रश्न - पद्धती परंपरागतच राहणार हे मी मान्य करतो, तसेच जो मुद्दा मान्य होईल तो रघुनाथ, गदाधर, जगदीश इत्यादी अधिकारी पंडितांच्या वचनांच्या आधारेच सिद्ध होणार; पण असे कधी होत असे का, की अशा वचनांच्या अर्थाचे तोपर्यंत जे निरूपण करण्यात येत असे, तोपर्यंत सर्वमान्य असे जे निरूपण असे, त्याच्याहून वेगळे निरूपण स्वीकारार्ह आहे असे एखाद्या शास्त्रार्थापासून निष्पन्न झाले?**

**उत्तर -** अशा तऱ्हेने शास्त्रार्थ होत असत. उदा : गौरव-लाघव विचार हा न्याय, मीमांसा आणि व्याकरण या तिन्ही शास्त्रांमध्ये चालत असतो. एखादे मत जर अनुभवाने बाधित होत नसेल, तर गौरव-लाघव विचाराच्या निकषावर त्याची परीक्षा होत असे. उदा : 'निषादस्थपति याजयेत्' हे वचन घ्या. निषाद असलेला जो स्थपती, म्हणजे गवंडी, त्याच्याकडून यज्ञ करवावा, हे श्रुतिवाक्य आहे; परंतु शूद्र हा द्विज नाही. तो एकजाति आहे. त्याला उपनयनाचा अधिकार नाही. म्हणून त्याला वेदाध्ययन नाही. म्हणून त्याला यज्ञाचा अधिकार नाही. आता 'निषादस्थपति' याचा अर्थ निषादांचा स्थपती असा घेतला तर हा स्थपती त्रैवर्णिक असू शकेल; पण निषाद असलेला

स्थपती असा त्याचा अर्थ घेतला तर तो अर्थात शूद्र असेल. तर इथे 'निषादस्थपति' हा समास कर्मधारय समजायचा - निषाद असलेला स्थपति अशा अर्थाने घ्यायचा - की षष्ठी तत्पुरुष म्हणून घ्यायचा - निषादांचा स्थपती अशा अर्थाने घ्यायचा - असा प्रश्न आहे. आता तो कर्मधारय समास मानला तर काही सामान्य नियमांना अपवाद आहे असे मानावे लागेल. म्हणजे गौरव आला. पण हा 'फलमुखगौरव' आहे. लाघवाला अनुसरून अर्थ लावला असता पुढे येणारा हा गौरव आहे म्हणून तो स्वीकारार्ह आहे.

**प्रश्न - शास्त्रीजी, तुम्ही म्हणाला की, त्या वेळी दोन प्रकारचे शास्त्रार्थ व्हायचे. एक म्हणजे ज्येष्ठ महिन्यात गंगेच्या उत्सवात.**

**उत्तर -** होय. त्या वेळी जोरदार शास्त्रार्थ व्हायचे. पाणिनीच्या एका सूत्रावर नऊ दिवस शास्त्रार्थ होत असे इतके पांडित्य चालायचे, परिष्कार व्हायचा.

**प्रश्न - जो मध्यस्थ असे त्याची भूमिका किंवा कार्य काय असे?**

**उत्तर -** त्याची भूमिका अशी की, जर विषयांतर होऊ लागले तर तो सांगायचा हा प्रकृत विषय नव्हे. अगोदर केलेल्या विधानाशी विसंगत असे विधान जर कुणी केले तर ही विसंगती तो दाखवून देत असे. कोण जिंकला हेही तो जाहीर करीत असे.

**प्रश्न - तुमच्या प्रत्येक वादाला किंवा शास्त्रार्थाला समयबंध आवश्यक असे हे खरे ना?**

**उत्तर -** होय, पण समयबंध गृहीत असे. तो सांगायची जरूरी नसे.

**प्रश्न - समयबंधामध्ये काय काय अंतर्भूत असे?**

**उत्तर -** एक तर त्या शास्त्राची जी प्रामाण्यपद्धती असे ती मान्य करण्यात येत असे. उदा. बौद्ध पूर्वपक्ष असेल तर त्याचे खंडन करताना श्रुतिवाक्याचा आधार घ्यायचा नाही. कारण बौद्धांना श्रुतिप्रामाण्य मान्य नाही. जैनांनाही मान्य नाही. तेव्हा उभयसंमत अशी जी प्रमाणपद्धती असेल ती प्रथम निर्णीत करावी लागे. हा समयबंधाचा एक भाग. दुसरा, ज्या विषयावर चर्चा व्हायची तो विषय स्पष्ट असावा लागे. उदा. ऋतुप्राप्तीच्या पूर्वी कन्येचा विवाह हाच शास्त्रशुद्ध विवाह होय हा जर पक्ष असेल तर तो स्पष्टपणे मांडला पाहिजे. विवाहाच्या वेळी कन्येचे वय काय असावे याची चर्चा करीत असताना नेमकी कशाची चर्चा करायची आहे याची स्पष्ट प्रतिज्ञा करावी लागत असे.

दुसऱ्या प्रकारचे जे शास्त्रार्थ होते त्याचे स्वरूप असे होते : काशीमध्ये मी जाण्याच्या पूर्वी मोठमोठे शास्त्रार्थ झाले होते. उदा. स्वामी दयानंदांनी असे शास्त्रार्थ घडवून आणले होते. ते मोठे वैय्याकरण होते. बाळशास्त्री रानडे हे परंपरेचे समर्थक, ते धर्मसुधारक होते. स्वामी दयानंद आणि बाळशास्त्री रानडे यांचे मोठे शास्त्रार्थ झाले. ते मोठ्या सार्वजनिक सभांमध्ये होत असत. जशा टुर्नामेंट्स असतात तसे या शास्त्रार्थाचे स्वरूप होते. धर्मसुधारक आणि सनातनी यांच्यामधील असे शास्त्रार्थ माझ्या देखतही वाराणसीमध्ये झाले. आर्य समाजाला स्मृती आणि पुराणे यांचे

प्रामाण्य मान्य नव्हते. त्यांना फक्त वेदच प्रमाण आणि वेदांतील फक्त मंत्रभाग प्रमाण होता, ब्राह्मणे प्रमाण नव्हती.

**प्रश्न - तुम्ही ज्या तीन मोठ्या पंडितांचा उल्लेख केला ते म्हणजे राजेश्वरशास्त्री द्रविड, पंतजी आणि वामाचरण भट्टाचार्य. याशिवाय कोणते उल्लेखनीय पंडित तुमच्या स्मरणात आहेत?**

**उत्तर -** अंबादासशास्त्री म्हणून एक होते. ते जैनन्यायही शिकवीत. ते राजेश्वरशास्त्री इ. पंडितांसारखेच ब्राह्मण पंडित होते; पण जैन न्याय शिकण्यासाठी अनेक जैन विद्यार्थी त्यांच्याकडे येत असत. त्याचप्रमाणे पञ्चानन तर्करत्न भट्टाचार्य हे मोठे नैय्यायिक होते.

**प्रश्न - मी असे ऐकले की, त्या वेळी तेथे मैथिली नैय्यायिक व बंगाल नैय्यायिक यांच्यात स्पर्धा असे.**

**उत्तर -** होय. बालकृष्ण मिश्र हे मोठे नैय्यायिक त्यावेळी होते, तसेच लक्ष्मीनाथ झा हेही मोठे नैय्यायिक होते. तीस-पस्तीस तरी प्राचीन पंडित त्या वेळेस काशीमध्ये वाखाणले जात.

**प्रश्न - राजेश्वरशास्त्री द्रविड यांचे या पंडितात एक विशिष्ट स्थान होते, नाही का?**

**उत्तर -** राजेश्वरशास्त्री हे उत्कृष्ट वादपटू होते. सभेत बसल्यानंतर इतरांना अडविण्यात ते वाक्बगार हाते. त्यांचे नव्यन्यायाचे अध्ययन अत्यंत सखोल होते, अशी त्यांची ख्याती होती. ते किती सखोल आहे याची कल्पना मला यावी या स्वरूपाची त्यांची-माझी चर्चा त्या वेळी झाली नाही, पुढेही कधी झाली नाही.

**प्रश्न - वाराणसीहून तुम्ही वाईला परतल्यानंतर या प्रकारच्या पंडिती वातावरणातून तुम्ही मनाने बाहेर पडला असे म्हणणे बरोबर होईल का?**

**उत्तर -** नाही. मी त्या वातावरणात बरीच वर्षे राहिलो. कारण त्या प्रकारचे वातावरण महाराष्ट्रातही होते. धर्मसुधारणा झाली पाहिजे असे म्हणणारे पंडित आणि परंपरेला चिकटून राहणारे पंडित हा भेद महाराष्ट्रातही आढळून येत होता.

**प्रश्न - धर्मसुधारणेसाठी प्राज्ञपाठशाळेने केलेले कार्य मोठेच आहे यात शंका नाही; पण नव्यन्याय, मीमांसा यात रमलेले पंडित महाराष्ट्रात होते का?**

**उत्तर -** मी मघा म्हटल्याप्रमाणे व्याकरणात रमलेले आणि पारंगत असे वासुदेवशास्त्री अभ्यंकर होते. वस्तुतः सर्व शास्त्रांचा त्यांचा व्यासंग होता आणि व्याकरण हा त्यांचा मुख्य विषय होता.

**प्रश्न - प्राज्ञपाठशाळेत परतल्यावर तुम्ही अध्यापन कसले केले?**

**उत्तर -** तिन्ही विषयांचे केले. मीमांसेमध्ये 'आपदेवी' किंवा 'मीमांसान्यायप्रकाश' म्हणून ग्रंथ आहे. तो मी दोनदा शिकविला. या ग्रंथात पूर्वमीमांसेच्या सिद्धांताची व्यवस्थित परिष्कारपूर्वक अशी मांडणी केली आहे. त्याचप्रमाणे नव्यन्याय आणि वेदान्त हे विषयही मी शिकवीत असे.

तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोगजे हे माझे विद्यार्थी पांडुरंगशास्त्री गोस्वामी हेही नव्यन्यायाचे माझे विद्यार्थी. त्यांनी शंकराचार्यांच्या स्तोत्राचे भाषांतर केले आहे.

**प्रश्न - प्राज्ञपाठशाळेच्या तीन प्रेरणा तुम्ही सांगितल्या. प्राचीन शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन जागृत ठेवावे अशी त्यातील जी प्रेरणा होती तिचे महत्त्व हळूहळू कमी झालेले दिसते.**

**उत्तर -** शास्त्रांच्या अध्ययनासाठी विद्यार्थीच येईनातसे झाले. महाराष्ट्रात शास्त्री होते; पण आता महाराष्ट्रात शास्त्री कुठे आहेत?

**प्रश्न - नव्यन्यायाचा परिचय करून देणारा किंवा त्यांचे सखोलपणे विवरण करणारा ग्रंथ मराठीत लिहावा अशी इच्छा तुम्हाला झाली नाही का?**

**उत्तर -** मी पुढे राजकीय चळवळीत पडल्यामुळे ही वासना उरली नाही. हा विषय चांगल्या रीतीने तपासून पाहिला पाहिजे असे आता मला वाटते. उदाहरण म्हणून सांगतो. मुक्तावलीचा शब्दखंड गेल्या महिन्यात मी एका विद्यार्थ्याला सांगितला. न्यायाच्या सिद्धांतांचा किंवा संकल्पनांचा गेल्या हजार वर्षांत काही विकास झाला आहे का, असा प्रश्न प्रा. दयाकृष्ण यांनी मला अलीकडे विचारला होता. त्याचे उत्तर असा विकास झाला आहे असे आहे. शाब्दबोधाचे उदाहरण घ्या. शाब्दबोध जो होतो त्याच्यामध्ये शब्दांच्या दोन वृत्ती मानल्या आहेत. म्हणजे शब्दांचे दोन प्रकारचे वर्तन मानले आहे. ‘वर्तन’ हा शब्द येथे लाक्षणिक अर्थाने घेतला पाहिजे. या दोन वृत्ती म्हणजे शक्ती आणि लक्षणा. या दोघांमध्ये शब्दाचा, पदाचा जो अर्थ आहे तो स्पष्ट होऊन जातो. शाब्दबोध जो होतो त्याच्यामागे शब्दाचे जे वर्तन असते ते दोन प्रकारचे असते : शब्दाचा वाच्यार्थ, किंवा शक्तीने होणारा अर्थ आणि दुसरा लक्ष्यार्थ. म्हणजे वाच्यार्थाला धरून असलेले इतर अर्थ. यांच्यामध्ये सर्व शाब्दबोध संपतो.

पण शब्दाची जी शक्ती किंवा वाचकता आहे ती काय आहे? तर मीमांसकांच्या दृष्टीने शब्दाच्या ठिकाणी स्वाभाविक अशी वाचकता आहे. शब्द हा नित्य आहे आणि त्याच्या ठिकाणी नित्य अशी शक्ती आहे. त्यांना वेदांची नित्यता सांभाळण्यासाठी हा सिद्धांत स्वीकारावा लागला. पण त्याच्या योगाने सगळीच भाषा नित्य ठरते. ‘अस्यात् पदात् अयम् अर्थ: बोद्धव्य:’ या पदाने हा अर्थ जाणावा - असा जो संकेत आहे तो ईश्वरी संकेत आहे, असे प्राचीन नैय्यायिकांनी मानले आहे. हा सिद्धांत मीमांसकांच्या सिद्धांतापासून फारसा दूर नाही. ईश्वराचा संकेत काय किंवा अनादि संकेत काय, हे जवळजवळ येतात पण संकेत मानावा लागतो. या शब्दापासून हा अर्थ व्हावा, असा बोध व्हावा असा हा संकेत असतो. नव्यन्यायामध्ये असा एक पंथ निघाला की, ‘या पदापासून हा अर्थ व्हावा’ असा संकेत भाषिक व्यवहारामागे असतो हे मान्य केले, की मग शक्ती आणि लक्षणा असा भेद करण्याचे कारण उरत नाही. कारण पदे उच्चारणारा जो आहे त्याच्या मनामध्ये त्यांच्यापासून असा अर्थ बोध व्हावा असे असतेच. शक्ती आणि लक्षणा यातील भेद एवढाच की, लोकांनी नेहमी स्वीकारलेला रूढार्थ म्हणजे संकेत, म्हणजे या पदापासून या अर्थाचा बोध व्हावा असा जनांनी स्वीकारलेला संकेत म्हणजे शक्ती आणि या

पदापासून या अर्थाचा बोध व्हावा असा वक्त्याने स्वीकारलेला संकेत म्हणजे लक्षणा एवढा भेद व्यवस्थेसाठी स्वीकारावा लागतो. मुलाचे आपण नामकरण करतो. त्याच्यातही या पदांपासून या अर्थाचा बोध व्हावा अशीच इच्छा व्यक्त झालेली असते. ती पित्याची इच्छा असते 'पिता नाम करोति' आणि 'गङ्गाया घोषः' अशी लक्षणा जेव्हा असते तेव्हा वक्त्याची 'गङ्गातीरावर घोष आहे,' असे म्हणण्याची इच्छा असते, वक्त्याचे तात्पर्य असते, म्हणून कशापासून काय अर्थबोध व्हावा ही वक्त्याची इच्छा येथे व्यक्त झालेली असते. वक्त्याची नसेल तर सामाजिक इच्छा असते - या पदापासून हा अर्थबोध व्हावा, अशी सामाजिक इच्छा असते. भाषिक व्यवहारामध्ये या संकेतापलीकडे काही नसते, येथपर्यंत नव्यनैय्यायिक आले होते.

**प्रश्न - म्हणजे ईश्वर बाजूला सारला गेला.**

**उत्तर -** तात्पर्य, अर्थात मानावेच लागते. 'सैन्धव आण' हे वाक्य भोजनाच्या प्रसंगी उच्चारले गेले असताना 'सैन्धव' म्हणजे मीठ असा अर्थबोध होतो; पण गावाला जाण्याचा प्रसंग असताना 'सैन्धव' म्हणजे घोडा असा अर्थबोध होतो. तेव्हा वक्त्याला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे वक्त्याची इच्छा, ही मानावीच लागते; पण वक्त्याची इच्छा हेच केवळ अर्थबोधाचे साधन नाही. कारण ग्रंथापासून अर्थबोध आपल्याला होतो; पण तेथे ग्रंथकाराची इच्छा काय आहे हे समजायचे साधन नसते. येथे सामाजिक किंवा सार्वजनिक इच्छा गृहीत धरावी लागते. वाक्यार्थाचे जे नियम आहेत - मीमांसेने विवरण केलेले किंवा शाब्दबोधमीमांसेने दाखविलेले - त्यांना अनुसरून आपण अर्थबोध करून घेतो. एकंदरीत शाब्दबोधाची नव्यन्यायामध्ये जी चर्चा झालेली आहे ती सखोल झालेली आहे.

**प्रश्न - तुम्हाला मोठे दाक्षिणात्य शास्त्री वाईत किंवा अन्यत्र भेटले का?**

**उत्तर -** हो. मी १९२९ साली काशीत ब्राह्मण परिषदेला उपस्थित होतो. ही अखिल भारतीय परिषद होती आणि जवळजवळ सातशे पंडित तिला उपस्थित होते. नवीन, सुधारणावादी मत मांडणारा मी जवळजवळ एकटाच होतो. तेथे मला तातसुब्बरायशास्त्री हे मोठे वैय्याकरण भेटले आणि दक्षिणेतील अनेक नैय्यायिक भेटले. धारवाडचे नागेशशास्त्री उप्पनबेट्टिगिरी आणि त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे दोघे महान नैय्यायिक आणि अद्वैतवेदान्ती. म्हणजे 'अद्वैतसिद्धी' शिकविणारे आणि 'गादाधरी' आणि 'जागदीशी' शिकविणारे. नागेशशास्त्री उप्पनबेट्टिगिरी यांचे पुत्र आज धारवाडची पाठशाळा चालवितात.

**प्रश्न - हे पंडित न्याय आणि अद्वैत यांची सांगड कशी घालतात? न्याय शिकविताना न्यायसिद्धांत स्वीकारायचे आणि अद्वैत शिकविताना अद्वैतसिद्धांत स्वीकारायचे असे ते करतात का?**

**उत्तर -** होय, अद्वैत शिकवताना न्यायाचे सप्तपदार्थ स्वीकारायचे नाहीत.

**प्रश्न - पण नव्यन्यायाचे अवच्छेदकता, आधारता इत्यादी जे पदार्थ आहेत ते स्वीकारायचे का?**

**उत्तर -** हो. ते सर्व अद्वैत्यांनी घ्यायचे.

**प्रश्न - आता शेवटचा प्रश्न विचारतो. तुम्ही नव्यन्यायाच्या अंतरंगात प्रवेश केला. नंतर ॲरिस्टॉटलचे आकारिक तर्कशास्त्रही तुम्ही वाचले. त्या दोहोत तुम्हाला साम्यभेद काय आढळले?**

**उत्तर -** अन्वयव्याप्ती आणि व्यतिरेकव्याप्ती या दोन्ही व्याप्ती ॲरिस्टॉटलमध्ये आहेतच. ॲरिस्टॉटलचे जे 'व्हॅलिड मूड्स' आहेत - प्रमाणभूत न्यायशरीरे किंवा अनुमानशरीरे - त्यांना अन्वयव्याप्ती आणि व्यतिरेकव्याप्ती यांच्यात सामावून घेता येते. परंतु एक प्रश्न मला या अभ्यासापासून उत्पन्न झाला. जे ग्रीक येथे आले त्यांचे ज्योतिषशास्त्र भारतीयांनी घेतले. 'म्लेंच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम् । ऋषित्तेपि पूज्यन्ते किं पुनः दैवविद् द्विजा: ।।' असे वराहमिहिराने म्हटले आहे. तसेच ग्रीक ॲरिस्टॉटीलिअन पंडित जर येथे आले असते तर त्यांच्या तर्कशास्त्राचा, तत्त्वज्ञानाचा स्वीकार भारतीयांकडून झालाच असता असे मला वाटते. गेल्या हजार एक वर्षांत आपला जो संकुचित दृष्टिकोन बनला आहे तो त्या वेळी नव्हता. भारतीय आणि पाश्चात्त्य दृष्टिकोनांचा समन्वय साधण्याची ही मोठी संधी हुकली. मग येथले दार्शनिक विचार वेगळ्या पद्धतीने विकसित झाले असते; पण अलेक्झांड्रियामध्ये ज्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर वैचारिक स्वातंत्र्य निर्माण झाले होते तसे वैचारिक स्वातंत्र्य भारतामध्ये कायम होते. जैन, बौद्ध इत्यादी अवैदिक पंथ येथे नांदले आणि त्यांना राजाश्रयही मिळाला. एखादा राजा असहिष्णू असे; पण सामान्यपणे राजे सर्व पंथांना मान्यता देत असत. कदाचित राजांना असे दिसत नसे की, आपल्या कक्षेतील सर्वांना शैव बनविणे किंवा वैष्णव बनविणे शक्य कोटीतील आहे, ज्यांना तशा प्रकारची शक्ती होती आणि तसे प्रयत्न ज्यांनी केले त्यांना प्रतिकार झाला असणार.

- कदाचित असे फारसे प्रयत्नही झाले नसतील. खिश्चन धर्म हाच खरा धर्म आहे, अशी एक खोल श्रद्धा असल्यामुळे सर्व प्रजाजनांनी ख्रिस्ती - किंवा एका विशिष्ट पंथाचे ख्रिस्ती - असले पाहिजे असा आग्रह धरण्यात येत असे. पण येथे अनेक आध्यात्मिक, धार्मिक पंथ असू शकतात आणि ते प्रमाण असू शकतात, अशी दृष्टी होती.

- ही तात्त्विक जाणीव वेदकाळापासूनची आहे. हे सर्व भिन्न संप्रदाय जे आहेत ते एकाच अंतिम, अनिर्वचनीय सत्याकडे जातात, एकाच अंतिम सत्याचे भिन्न आविष्कार असू शकतात हा उपनिषदांचा दृष्टिकोन आहे आणि या दृष्टिकोनाला बौद्धांनी व जैनांनी अप्रत्यक्ष आधार दिला. जैन अनेकान्तवादी. म्हणजे एका दृष्टीने हेही मत योग्य आहे आणि एका दृष्टीने ते विरोधी मतही योग्य आहे असे मानणारे. तेव्हा हटवादामध्ये परपक्षाचा निःपात करण्याचा जो उग्र आग्रह असतो तो जैनांच्या स्याद्वादामध्ये, अनेकान्तवादामध्ये नाही. बौद्धांचे मत असे की, हे काहीही असले तरी चित्तशुद्धीशिवाय मोक्ष नाही आणि चित्तशुद्धी झाल्यानंतर तुम्ही द्वैती की अद्वैती याला काही महत्त्व नाही. हा बौद्धांचा दृष्टिकोन फार महत्त्वाचा आहे. आणि त्याचा येथे प्रभाव पडला. उदा. भगवद्गीतेवर त्याचा प्रभाव पडला. स्थितप्रज्ञाची जी संकल्पना आहे तिचा विश्वाचे अंतिम तत्त्व काय आहे याच्याशी काही संबंध नाही.

प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान्।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥

ही परमशांती, विकारावर विजय मिळवून, तुम्ही मिळवली, की तिच्यात मोक्ष आला. ब्रह्मात्मक निर्वाण तुम्हाला लाभते. हा उच्च विचार बुद्धकालीच निर्माण झाला.

- दुसऱ्या बाजूने पाहिले तर चित्तशुद्धीच्या तुलनेने बौद्धिक शास्त्रांना त्यांनी गौण मानले.

- नाही. त्या शास्त्रांनाही त्यांनी मान्यता दिली. नाही तर ही शास्त्रे वाढलीच नसती. सांख्यदर्शन किती सुरेख वाढले आहे !

**प्रश्न - हा एक प्रकारचा खेळ होता?**

**उत्तर -** शास्त्रे पूरक होती. प्रत्येक विश्वविचार शांतीकडे नेतो अशी त्यांची श्रद्धा होती. समग्र विश्वाचा तुम्ही कोणत्याही दृष्टीने विचार करा; पण करा असा त्यांच्या भूमिकेचा अर्थ लावता येईल. 'शमाय शास्त्रं जगतो जगाद।' असे न्यायवार्तिककार म्हणतात.

नव्यन्यायाचे प्रस्थापक गङ्गेशोपाध्याय आपल्या 'तत्त्वचिंतामणि' या ग्रंथाच्या शेवटी म्हणतात, 'अतः सिद्धं चत्वारि प्रमाणानि इति उपरम्यते।' (वरच्या प्रतिपादनावरून चार प्रमाणे सिद्ध होतात असे म्हणून आता थांबतो.) पुढे

धीरा : कुशाग्रमतयो भवतः प्रणम्य।
मौलो निधाय करवारिरुहे समीहे।
वाणीयं अर्थरहितापि विश्रृंखलापि।
सानुग्रहेण हृदयेन विलोकनीया ॥

(हे विद्वानांनो, तुमची कुशाग्रमती आहे. दोन हात मस्तकावर जोडून तुम्हाला प्रणाम करतो. माझी ही वाणी अर्थरहित, विस्कळीत असली तरी हृदयामध्ये अनुकंपा ठेवून तिचे अवलोकन करा.)

पण विरुद्ध प्रवृत्तीही दिसते : रघुनाथशिरोमणी म्हणतात,

विदुषां निवहै : इहैकमत्या।
यदटंकि यच्च दुष्टम्।
मयि जल्पति कल्पताधिनाथे।
रघुनाथे मनुतां तदन्यथैव ॥

(विद्वानांच्या संघाने एकमताने जे दुष्ट म्हणून किंवा अदुष्ट म्हणून सांगितले असेल ते अनुमानाचा अधिपती असा हा मी रघुनाथ बोलत असताना - वाद करीत असताना - मी म्हणतो तेच बरोबर आहे, त्यांचे चूक आहे असे माना.)

**(नवभारत मासिक, सप्टेंबर-ऑक्टोबर, १९८७, पृ. ९९ ते १०८)**

○○○

८

# नव्वदीतही तर्कतीर्थ उत्साही, विनम्र

मुलाखतकार - **आनंद परांजपे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी यांचा जन्म खानदेशातील पिंपळनेर येथे २७ जानेवारी १९०१ रोजी झाला. पण पिंपळनेर ही त्यांची जन्मभूमी कुलभूमीच राहिली. मातृसुख न लाभलेल्या लक्ष्मणशास्त्री जोशी यांना पितृसुखाचा फारसा लाभ झाला अशातला भाग नाही. धर्मशास्त्र जाणणारे व भिक्षुकी करणाऱ्या बाळाजी जोशी यांनी वयाच्या १४ व्या वर्षीच मुलाला भारतीय संस्कृतीचे अध्ययन करण्यासाठी हरिद्वारला पाठवण्याऐवजी वाईला पाठवले. वडिलार्जित असलेली भिक्षुकी तर्कतीर्थांच्या मागूनही सुटली नाही. तीन वर्षे माधुकरी मागितली. त्यांनी भारतीय तर्कशास्त्रांचा अभ्यास सुरू केला. दीड वर्षानंतर नागपूर येथे न्यायशास्त्रावर संस्कृत भाषेतून होणाऱ्या चर्चेत भाग घेतला. त्यात ते यशस्वी झाले आणि विद्यार्थ्यासाठी असलेली १४ रुपयांची शिष्यवृत्ती सुरू होऊन त्यांच्यामागची माधुकरी सुटली. १९२२ मध्ये कलकत्ता संस्कृत महाविद्यालयाने लक्ष्मणशास्त्रीचा "तर्कतीर्थ" ही पदवी प्रदान करून गौरव केला.

पुढे १९३० साली संस्कृतचे अध्ययन, प्राज्ञपाठशाळा, गुरू केवलानंद सरस्वतीचे विचार या सर्व गोष्टींचा त्याग करून ते महात्मा गांधींच्या सत्याग्रहात सामील झाले व धुळ्याच्या तुरुंगात गेले. १९३० ते १९३३ च्या काळात शास्त्रीजींची विनोबा भावे, जमनालाल बजाज, महात्मा गांधी या सर्वांशी गाठभेट झाली. आपल्या विचारपद्धतीने शास्त्रीजींनी सर्वांना भारावून टाकले. धर्मग्रंथात अस्पृश्यता नाही, चातुर्वर्ण्याचं अध:पतन जातीसंस्थेत झाले, अशासारख्या विचारपद्धतीने शास्त्रीजींनी सनातन्यांना निरुत्तर केले.

समाजावर प्रभाव असणाऱ्या सनातन्यांविरुद्ध शास्त्रीजींनी अनेकदा दंड थोपटले. गोपाळ गणेश आगरकरांची समाजसुधारणा करण्याबद्दल प्रेतयात्रा काढण्यात अग्रेसर असणारे सनातनी लक्ष्मणशास्त्रांच्या बाबतीतही मागे राहिले नाहीत. महात्मा गांधीचे चिरंजीव देवदास याचे राजाजींच्या मुलीशी लग्न ठरले. वैश्य ब्राह्मण विवाहाचे धार्मिक संस्कार करणाऱ्या तर्कतीर्थांविरुद्ध वाई येथे निषेध सभा भरवली गेली. संकेश्वरच्या शंकराचार्यांनी लक्ष्मणशास्त्री नरकवासात जाणार

असल्याचे सूचित केले. तेव्हा तर्कतीर्थांनी विनम्रपणे, स्वर्गात सुख उपभोगण्यापेक्षा नरकात राहून सेवा करीन असे सांगून भगवी रेशमी वस्त्रे परिधान करून केवळ सुखच उपभोगणाऱ्या शंकराचार्यांची मात्र निर्भर्त्सना केली. तसेच मूर्तिपूजा न करणाऱ्या तर्कतीर्थांनी सोरटी सोमनाथची पूजा करून व मूर्तीची प्रतिष्ठापना करून अस्पृश्यांनाही मंदिरात केवळ प्रवेशच नव्हे तर पूजेचा मान मिळवून दिला. गझनीच्या महमदाने फोडलेल्या या सोरटी सोमनाथच्या प्रतिष्ठापनेसाठी देशातील आचार्यांनी आणि शास्त्र्यांनी नकार दिला होता. तेव्हा पाच लाख लोकांसमोर तर्कतीर्थांनी हे धार्मिक संस्कार केले.

तर्कतीर्थाशी प्रश्नोत्तर रूपाने झालेली ही चर्चा :

**प्रश्न - तुमच्यावर आयुष्यात कडवी टीका झाली का ?**

**उत्तर -** कठोर टीका झाली नाही. सद्बुद्धीने होते. त्याचा मला रागही येत नाही. लोकांनी टीका जरूर करावी. १९८०-८१ साली विश्वकोष हा ज्ञानकोश नसून तो अज्ञात (कोश आहे भ्रमकोश आहे, अशीही टीका झाली. मी विनम्रपणे त्यांना उत्तर दिले. आपण काम करायचं, टीका विरून जाते. टीकेने मी अस्वस्थ होत नाही.

१९५६ सालची घटना. ऑगस्टला कोल्हापूरला १ लोकमान्य टिळकांवर भाषण देण्यासाठी गेलो. मला मारहाण होणार असल्याचे पोलिसांना आगाऊ कळल्याने त्यांनी मला तशी सूचना दिली. भाषण सुरू होताच एकजणाने त्याच्या जुन्या जोड्याने माझ्या गालफडात ठेवून दिली. दुसऱ्याने जोड्याची माळ घातली. पोलीस हस्तक्षेप झाला. मोरारजी देसाई त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्याच्या कानावर हा वृत्तांत गेला. आरोपींना शिक्षा होतील, असे पहा असा आदेश मोरारजींनी दिला. खटला उभा राहिला आणि बऱ्याच जणांनी विनंती केली, 'शास्त्रीजी चूक झाली. पण चळवळयांना शिक्षा होता कामा नये. ' मी ठीक आहे एवढेच म्हटले. आरोपींच्या ओळख परेडमध्ये मी कोणालाही ओळखले नाही आणि चळवळीतील बंडखोर सुटले.

**प्रश्न - आयुष्यात काही राहून गेलेय, हे व्हायला पाहिजे होते असे वाटते का ?**

**उत्तर -** हो. नेहमीच तसं वाटतं मी शास्त्रज्ञ व्हायला हवे होते. पण मार्ग सापडला नाही. गणिती व्हायला पाहिजे होते. पण त्याकरिता प्रयत्न केले नाहीत. प्रयत्न केले असते तर जमलं असतं. मला संगीताची फार आवड होती. प्राज्ञपाठशाळेत संगीताचे गुरू होते. यांच्याकडे जाऊन बसलो. तीन दिवस गेले. इतर विद्यार्थ्यांबरोबर सूर लावला. चौथ्या दिवशी एकटाच गेलो. गरुजी म्हणाले, 'तुला हे येणार नाही. जमणार नाही. तुझ्या आवाजात गाण्यासाठी आवश्यक असलेली गोष्ट नाही. तू स्त्रोत्रच म्हण. ' पण त्याचा राग आला नाही.

मी वृत्तपत्र चालवायला घेतले 'युगांतर' पुण्यात १९३७ साली. जमलं नाही. शेवटी सोडून दिलं. अपयश आले. वृत्तपत्र चालविण्याकरिता मंडळीचा संच पाहिजे तो जमला नाही. तो विचारच केला नाही.

**प्रश्न - तुमचे हे प्रचंड ज्ञान, विद्वत्ता परिपूर्ण आहे असे वाटते की ?**

**उत्तर -** छे, छे ? अहो कसले आले परिपूर्ण. मला काहीच मिळाले नाही. सापडले नाही. न्यूटनला एक कण तरी मिळाला. पण त्याने केवढं जग उभं केलं. तसंही नाही मला मिळालं.

**प्रश्न - आयुष्यातील एखादा कटू प्रसंग?**

**उत्तर -** यशवंतराव चव्हाणांचे माझे संबंध चांगले. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नात मी त्यांना रोखून धरले. पंडित नेहरू भाषावार प्रांतरचनेच्या विरुद्ध होते. यामुळे नवीन राष्ट्रच निर्माण होईल, ही त्यांना भीती होती. त्यांचं मत बदलल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र झालाच नसता. मी यशवंतरावांना सांगितले, ‘तुम्ही देव व हिरे यांच्या नादी लागू नका. तुम्ही द्विभाषिक राबवा. ‘ मोरारजींनी १०५ बळी घेतले. माझ्या कारकीर्दीमध्ये कोणावर जबरदस्ती होणार नाही असे जाहीर करा. विरोधी पक्षीयांशी जमवून घेतलं तरच उत्तम प्रशासक.

१९६० सालची निवडणूक आली. पंडितजी औरंगाबादला आले. विमानातून जाताना यशवंतरावांनी पंडितजींना सांगितले, ‘महाराष्ट्रात यापुढची निवडणूक काँग्रेसला मिळणार नाही. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रकरणामुळे मते मिळणार नाहीत.’ पंडितजींना ते आवडले नाही. त्यांनी यशवंतरावांना दिल्लीला बोलावले. यशवंतरावांनी मला निरोप पाठवला. मी व किसनवीर मुंबईला गेलो. बहुतेक हा प्रश्न निघेल असे ते म्हणाले. मी काय करू ? मी यशवंतरावांना सल्ला दिला. त्यावेळी केळकर आडनावाचा एक वार्ताहर बाहेर उभा होता. त्याने विचारले, ‘काय झालं ? ‘ मी म्हणालो, ‘काही नाही!'

यशवंतराव चव्हाण दिल्लीला चालले. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुटतोय. दिली बातमी त्या केळकरने. मी काहीही बोललो नाही. तरीही बातमी आली. यशवंतरावांनी डोंगऱ्यांना (त्यांचे खाजगी सचिव) विचारले. शास्त्रीजी बोलले काय ? डोंगरे म्हणाले, ‘दिसतंय तसं.’ तो केळकर वार्ताहरही म्हणत होता शास्त्रीजीकडून क्ल्यू मिळाला. मी दिला नव्हता. मी काही बोललोच नाही हाच ‘क्ल्यू'. यशवंतराव व मी दोघेही अस्वस्थ झालो होतो.

**प्रश्न - नव्वदीमध्ये प्रवेश केल्यानंतर आता थकल्यासारखे वाटते का ? विश्वकोशाचे काम पूर्ण होईल का ?**

**उत्तर -** विश्वकोशाचे ३ खंड राहिलेत. १७ खंड कल्पिले होते. १३ खंड पूर्ण झालेत. १४ वा खंड महिनाभरात पूर्ण होईल. १ सूची खंड मराठीत. जगाच्या सगळ्या राष्ट्रांचे नकाशा खंड काढणार आहे. एक परिभाषा खंडही निघणार आहे. इतका मोठा कुठल्याही भाषेत नाही. भारतीय भाषांत आधुनिक ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञान सांगता येते. त्याचा हा यशस्वी प्रयोग आहे. भारताबद्दल सविस्तर माहिती एनसायक्लोपीडियामध्ये देखील नाही विश्वकोशाच्या सर्व खंडांचे हिंदीत भाषांतर करण्याची परवानगी द्या म्हणून पत्र आलंय. हे सर्व खंड संपादित करण्यासाठी केवळ दीड कोटी रुपये खर्च आलाय. सरकारला १५ ते २० कोटीपर्यंत खर्च आला असता.

**प्रश्न - शास्त्रीजी, दीर्घायुष्याचे रहस्य काय?**

**उत्तर -** कितीही आयुष्य असले तरी ते थोडंच दिसतं. दीर्घ जीवनात कोण रमणार? हा प्रश्न आहे. जे दीर्घ आहे ते अल्पही आहे. मी माझं अवलोकन करतो. मी थकलो का नाही? याचं एक कारण मी निष्काळजी आहे. माझ्या लहानपणी गरिबी होती. वाराणसीत एक जेवायला मिळायचं. पण चिंता नाही. माणसाला फार चिंता असते. मला चिंता नाही.

**प्रश्न - सध्याची आपली दिनचर्या कशी आहे?**

**उत्तर -** सध्या वेगळे काही नाही. गेली नव्वद वर्षे अशीच आहे. ४-३० ते ५ वाजता जाग येते. छान वाटतं. प्रसन्न वाटतं. साखरझोप असते ती. घ्यावीशी वाटते. पण घेत नाही. लगेच उठतो. स्नान करतो. फिरायला जातो. योगासने, प्राणायाम, शीर्षासन करतो. मी कधीही सूर्योदयानंतर उठलो नाही. आयुष्यात उजाडण्यापूर्वी उठलोय. ८ वाजता अभ्यासिकेत जातो. महत्त्वाचे वाचन सुरू करतो. इंग्लिश, संस्कृत, मराठी वाचन असतं. १२ वाजता भोजन घेतो. दिवसा झोपत नाही. आडवा होतो. झोप येत नाही. पुन्हा कामाला लागतो. रात्री ९ वाजता झोपतो. मी शाकाहारी, मांसाहारी दोन्हीही आहे. मांसाहार आवडतो. वयाच्या ४० वर्षांपर्यंत मांसाहार घेतला नव्हता. रॉयवादी झाल्यानंतर खाऊ लागलो.

नाटक, सिनेमा पहावयाला आवडते. पण वाईमध्ये कुठं आले नाट्यगृह? त्यावेळी पाहिली असती तर बरं झालं असतं. बालगंधर्व त्या वयात उभारीत होते. मी त्यांची नाटके पाहिली असती तर बरं झालं असतं. संगीताचे जलसे पाहिले पाहिजेत असं वाटतं. संगीताची मला फार आवड आहे.

**प्रश्न - एक शेवटचा प्रश्न. सध्या जे हिंदुत्वाचे राजकारण चालले आहे त्याबद्दल आपले काय मत आहे?**

**उत्तर -** हिंदू धर्म हा शब्द धर्मग्रंथ, श्रुतिस्मृती-पुराणे, वेद-उपनिषदांत कोठेही नाही. भारतीयत्व हा शब्द आहे. रामायण, महाभारतातदेखील हिंदू हा शब्दप्रयोग नाही व शास्त्रामध्ये धर्माची व्याख्या 'धारयतेधर्म' म्हणजे समाजाची धारणा करणारे. ऋग्वेद काळापासून, वेदकाळापासून हिंदू हा मात्र कोठेही शब्द नाही. हिंदू हा शब्द परकीयांनी दिलेला आहे. भारताच्या पलीकडे असलेल्या सिंधू नदीच्या पलीकडे असलेल्या लोकांना निर्दिष्ट केले आहे. पर्शियन भाषेमध्ये 'स'चा 'ह' होतो . सिंधूचा हिंदू! नद्या आणि देशाचे वाचक शब्द हे प्रजांचेही वाचक शब्द होऊ शकतात, तर विश्वबंधुत्व हे त्याच्या हिंदूंच्या सांस्कृतिक मूल्याचे रहस्य आहे. या भारतात वेदकालापासून आतापर्यंत निरनिराळ्या जातीजमाती निर्माण झाल्या. परंतु त्यांच्यामध्ये हिंसक विग्रह कधीही नाही हे लक्षात ठेवले पाहिजे, असा माझा भारतीयत्व पर्यायाने हिंदुत्व यांबद्दल दृष्टिकोन आहे. ही माझी भारतीयत्वाची हिंदुत्वाची मीमांसा आहे.

हिंदुत्वाचे राजकारण होऊ नये. कारण व्यावहारिक फार मोठी अडचण आहे. तो राजकीयदृष्ट्या अदूरदर्शीपणाच होईल. आणि निराळा मुद्दा म्हणजे आता जग या दोन वर्षांत एकदम पालटलंय.

मनुष्याला विसंगती, दारिद्र्य आणि अवनतीतून बाहेर काढावयाचे असा दृष्टिकोन आता प्रभावी होणार आहे. जगातील ज्या दोन शक्ती आहेत. त्या अमेरिका आणि रशिया त्यांच्यातील संघर्ष नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. जगाचे राजकारण एका दिशेला होते आहे. दोन विरोधी शक्ती विरोध विसरून सहकार्याने जवळ येत आहेत. अशावेळी हे हिंदू, मुसलमान लहानसे क्षुद्र झगडे कशाला हवेत? कशाकरिता हिंदुत्वाचे राजकारण करता? हा क्षुद्रतेचा परमावधी आहे आणि हिंदू धर्माचा अभिमान कसला बाळगता? धर्म हा मानवाला मुक्त करणारा, उच्च दर्जाचे नैतिक जीवन देणारा आहे. अभिमान कसला बाळगता? ही काय अभिमान बाळगायची वेळ आहे का, गोष्ट आहे? आणि हिंदुत्वाच्या राजकारणाला समाज मान देत असेल, निवडणुकीच्या मतपेटीमध्ये हिंदुत्वाच्या बाजूने कौल देत असेल तर हा समाज अवनतीकडे चालला आहे. जगाचा जो मुख्य प्रवाह आहे तो बाजूला करून कसे चालेल? जोतिबा फुल्यांच्या विरोधात सनातनी लोक होते. विठ्ठल रावजी शिंदे अस्पृश्य वस्तीत काम करीत होते. मराठा समाजाने त्यांना बाजूला टाकले होते. वेडा ठरवले होते. त्यांना बाजूला टाकणाऱ्यांचं आज काय झालं? व्यापक नैतिकतेची नवी दिशा हे जग घेत आहे. अशा काळामध्ये सामान्य जनांना समजत नसेल तर न समजू द्या, अशा तऱ्हेने ते मतदान करत असतील तर ते चुकताहेत. हिंदू-मुसलमान दुय्यम भेद आहेत.

शास्त्रीजी आज कृतार्थ आहेत. सारी सामाजिक कर्तव्ये त्यांनी मनःपूर्वक पार पाडली आहेत. ब्राह्मण्याचे तेज त्यांचे ठिकाणी आहे. पण ब्राह्मण्याचा अहंकार यत्किंचितही नाही. समानतेवरील श्रद्धा हा त्यांच्या जीवनाचा पाया आहे. प्राज्ञपाठशाळेत विचारविनिमयासाठी येणारे कोणतेही उच्चपदस्थ आणि आठवडयाच्या बाजाराला येणारा शेतकरी या साऱ्याचे स्वागत ते सारख्याच जिव्हाळ्याने करतात. शास्त्रीजी समोरच्या कुणाही माणसाशी सारख्याच समरसतेने बोलू शकतात. साऱ्या व्यापात असतानाही ते मग्न असतात. आत्मिक बळामुळेच ते असे अजित अ-दीन जीवन जगू शकले. या आत्मिक बळावरच ते शतायुषीही होतील.

**(दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दि. २५ जानेवारी, १९९०)**

ooo

९

# दीर्घायुष्याची सूत्रे

मुलाखतकार - **अनिल जोशी**

अखंड ज्ञानसाधना आणि तत्वचिंतन यामध्ये जीवनाचा बराचसा भाग ज्यांनी खर्च केला त्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना स्वतःच्या दीर्घायुष्याचा सार्थ अभिमान आहे. आज या शतकाच्या अखेरच्या दशकातून वाटचाल करताना त्यांना गतायुष्यातील अनेकविध घटना आणि प्रसंग सातत्याने आठवत असतात. ते कधी सुखावतात तर कधी चिंताग्रस्त होतात; पण चिंतेपेक्षा चिंतनाला त्यांनी अधिक महत्त्व दिले असल्याने कोणत्याही कटू प्रसंगातून तात्काळ बाहेर पडण्याची त्यांच्या मनाची तयारी म्हणजे एक प्रकारचे गूढच आहे.

तर्कतीर्थ जोशी यांना शतकाच्या अखेरच्या टप्प्यात पदार्पण करताना आपणास आता काय वाटते, असा प्रश्न विचारला असता प्रसंगी समाधान, तर प्रसंगी जागतिक घडामोडींच्या परिणामांबद्दल निराशा ऐकावयास मिळते. शास्त्रीजींना खरा आनंद मिळतो तो ज्ञानसाधनेतच. अखंडपणे सुमारे ८० वर्षे त्यांनी ज्ञानसाधनेत घालविली आहेत आणि आजही ज्ञानाच्या क्षेत्रात येणाऱ्या नवीन विचारांचे स्वागत करण्यासाठी, ते समजावून घेण्यासाठी, त्यांची चिकित्सा करण्यासाठी त्यांचे मन आसुसलेले असते.

## वेदाध्ययनाची संधी

वास्तविक एका विशिष्ट परंपरेमध्ये वावरणाऱ्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. धर्मशास्त्राचा अभ्यास ही त्यांच्या घराण्याची परंपरा. त्यातून वयाच्या चौदाव्या वर्षी वाई येथे आल्यानंतर ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली वेदाध्ययन करण्याची त्यांना फार मोठी संधी लाभली; पण संपूर्ण जीवनाचा अर्थ लावण्यासाठी आणि जगातील माणसाला समजून घेण्यासाठी अनेक नवीन विचारांचा, नवीन तत्त्वज्ञानांचा, विविध संस्कृतीचा अभ्यास करणे आवश्यक असल्याची गरज त्यांना जाणवू लागली. शास्त्रीजींनी त्याकडे जाणीवपूर्वक मन वळवले. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांचा सखोल अभ्यास केला. अखेर मानवी

विकासाला रोखू पाहणाऱ्या रूढी, परंपरा यांच्यावर स्वतंत्र बुद्धीने प्रसंगी हल्ला चढवून अनेक चर्चा, संमेलने शास्त्रीजींनी गाजविली.

प्रत्येक धर्मामध्ये त्याज्य काय, याचे माप परखडपणे लोकांच्यासमोर ठेवले. रूढी-परंपरेने ग्रस्त असलेल्या अनेक धर्ममार्तंडांनी तर्कतीर्थांच्या या भूमिकेवर कडाडून हल्लेही चढविले; पण शास्त्रीजींनी त्याची कधी फारशी दखल घेतली नाही. किंबहुना ज्या धर्ममार्तंडांनी शास्त्रीजींच्या नवीन विचारांवर व आचारांवर टीकेची झोड उठविली, तेच धर्ममार्तंड शास्त्रीजींचाच विचार वेगळ्या शब्दांत लोकांसमोर मांडू लागले. समाज बदलतो आहे आणि तो बदलला पाहिजे, या विचारावर शास्त्रीजी नेहमीच ठामपणे उभे आहेत. बदल हा चांगल्यासाठी, हे सूत्र त्यांनी अनेक वेळा लोकांसमोर मांडलेले आहे. छोट्या छोट्या प्रसंगांतूनही जीवनातील विविध घटनांचा त्यांनी अनेक वेळा अर्थ उलगडून दाखविलेला आहे.

## ज्ञानतपस्व्याचे जीवन

शास्त्रीजींचे संपूर्ण जीवन हे एका ज्ञानतपस्व्याचे आहे. तत्त्वज्ञान हा त्यांचा आवडीचा विषय. असे असूनदेखील त्यांच्या जीवनाला व विचाराला कुठेच रुक्षपणा आलेला नाही. खासगी चर्चेत असो वा सभासंमेलनात असो - एखाद्या गंभीर विचाराची तत्त्वज्ञानातील एखाद्या अवघड सिद्धांताची उकल करतानादेखील शास्त्रीजींचा चेहरा फार गंभीर बनल्याचे कोणाच्याच स्मरणात नाही. विचार कितीही अवघड असला तरी तो सोपा करून सांगणे हे त्यांचे फार मोठे कौशल्य आहे. अवघड शब्दांची वाक्ये शास्त्रीजींनी समोर टाकण्याचे अनेक वेळा टाळलेले आहे. समोरच्या श्रोत्यांना विचार समजला पाहिजे, हा त्यांचा नेहमीच आग्रह असतो. लहानांनाही मोठा विचार सोपा करून सांगणारे शास्त्रीजी म्हणजे एका यशस्वी शिक्षकाची जाणीवपूर्वक भूमिका बजावत जगणारे व्यक्तिमत्त्व आहे. ते कधी मोठ्यांमध्ये लहान दिसले नाहीत आणि लहानांना कधी अवघड वाटले नाहीत. घरी येणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या त्याच्या कुवतीनुसार त्याच्यापुढील समस्यांची उकल करून दाखवणे व ते करीत असताना एखादा नवीन विचार देणे हे शास्त्रीजींचे वेगळेपण आहे.

शास्त्रीजींना माणसाचे, त्याच्या जीवनाचे, त्याच्या जीवनविकासाचे प्रचंड प्रेम आहे. अमेरिका व रशिया यांच्यातील वैमनस्य संपुष्टात आले, या घटनेने शास्त्रीजी कितीतरी दिवस एका वेगळ्या आनंदाचा आस्वाद घेत होते. संहारापासून माणूस मागे हटला याचा विलक्षण आनंद त्यांना झाला. रशियामधली राजकीय लोकशाहीची चळवळ त्यांना वेगळे समाधान देणारी ठरली. गोर्बाचोव्ह यांचे धोरण म्हणजे रशियातील दुसरी क्रांती असेच त्यानी मानले. आज सुरू असणाऱ्या इराक-अमेरिका यांच्यातील युद्धाने त्यांना बेचैन करून सोडले आहे. वैज्ञानिक विकास विनाशाकडे वाटचाल करतो आहे, ही घटना त्यांना अस्वस्थ करून सोडणारी आहे. मानवी जीवनातील स्वास्थ्य आणि सुख यांकडेच त्यांच्या मनाने व विचाराने सातत्याने ओढ घेतलेली आहे.

## जिभेवर नियंत्रण

शास्त्रीजींशी बातचीत करणे हा फार मोठा आनंद देणारा भाग आहे. एकतर समस्येची मुळापासून उकल करून दाखवणे यात त्यांना स्वतःलाच मोठा आनंद मिळतो. बारीकसारीक घटनांतून एखाद्या मार्गदर्शक विचाराची ते मांडणी करीत असतात. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारे शास्त्रीजी ज्या वेळी माणसाच्या शरीररचनेविषयी आपली मते मांडतात, त्या वेळी त्यांना दीर्घायुष्याचे सूत्र सापडले आहे याची खात्रीच पटते. ज्याने जीभ सांभाळली त्यास दीर्घायुष्य लाभले, असे त्यांच्याकडून वेळोवेळी ऐकायला मिळते. वयाची ७५ वर्षे पूर्ण करीपर्यंत शास्त्रीजींनी अनेकविध गोष्टींचा आस्वाद घेतलेला आहे; पण गेली १५ वर्षे त्यांनी आपल्या जिभेवर कमालीचे नियंत्रण ठेवले आहे. दिवसातून एकच वेळ सकस आहार आणि आवश्यक तेवढा व्यायाम, हा त्यांचा नित्याचा क्रम होऊन बसला आहे. वयाच्या ७५ च्या वर्षांपर्यंत कृष्णेच्या प्रचंड प्रवाहातदेखील पोहण्याचा आनंद त्यांनी लुटलेला आहे. व्यायाम म्हणून गंगास्नान हे त्यांना अधिक प्रिय वाटले. ऐन पंचाहत्तरीत वाईच्या दक्षिणेस उभ्या असणाऱ्या सोनजाईच्या डोंगरावर अथकपणे जाऊन येण्याची त्यांनी केलेली तयारी व त्याची अंमलबजावणी अनेकांना चकित करून सोडणारी ठरली. 'जो चालतो तो जगतो' हे सूत्र त्यांच्याकडून अनेक वेळा ऐकायला मिळते. वयाची ९० वर्षे पूर्ण करूनदेखील दररोज तीन मैलांची चाल हा त्यांचा नित्यक्रम आहे. आजही विविध प्रकारची आसने करण्याची त्यांची रोजची तयारी आहे. सर्वांगासन हा त्यांचा आवडता प्रकार. लोकांना भीती वाटते म्हणूनच त्यांनी शीर्षासन गेल्या काही दिवसांपासून थांबवले; पण 'लाइफ इज बॅलन्स' हे त्यांचे सूत्र त्यांनी मनापासून जपले आहे हे फार थोड्यांना माहिती आहे. तोल सांभाळणे, मग तो मनाचा असो वा शरीराचा असो, हे त्यांना साधले आहे.

अशाच एका वाढदिवसाच्या निमित्ताने शास्त्रीजींचे शुभचिंतन करण्यासाठी आलेल्या एका पुढाऱ्याला शास्त्रीजींनी ऐकवलेले दीर्घायुष्याचे सूत्र फार मार्मिक होते. शास्त्रीजींचा तो ८४ वा वाढदिवस होता. त्यांना पुष्पहार अर्पण करून झाल्यानंतर तो पुढारी म्हणाला, "तुमच्या शंभरीमध्ये तुम्हाला पुष्पहार अर्पण करण्याची संधी आम्हाला लाभावी, एवढीच इच्छा आहे." त्यावर शास्त्रीजी म्हणाले, "हे कठीण आहे. कारण मी शंभरी गाठेन; पण तुमचे काय?" शास्त्रीजींच्या या प्रश्नाने तो पुढारी व इतर सर्वजण चकित झाले. स्पष्टीकरण करताना शास्त्रीजी म्हणाले, "दीर्घायुष्यासाठी जिभेवर नियंत्रण हवे. मी ते ठेवलेले आहे व तुम्ही ते ठेवत नाही, एवढाच फरक."

## मनाचे वेगळेपण

शास्त्रीजी कोणाकडेही गेले आणि त्यांच्या स्वागतासाठी व पाहुणचारासाठी कोणताही पदार्थ त्यांच्या हाती ठेवला, तर त्याचे आनंदाने ते स्वागत करतात. इतरांना तो पदार्थ कसाही वाटला तरी शास्त्रीजींची प्रतिक्रिया म्हणजे एकच शब्द असतो, 'सुरेख !' याचे कारण सांगताना

शास्त्रीजी सांगतात, जो आपल्याला देतो त्याची भावना ही फार मोलाची असते आणि त्या भावनेबद्दलच 'सुरेख' ही प्रतिक्रिया असावी लागते. चिंतन हे त्यांच्या मनाचे वेगळेपण आहे. शास्त्रीजी चिंतेमध्ये फार राहत नाहीत. अमेरिकेतील तीन महिन्यांचे वास्तव्य संपवून आल्यानंतर त्यांच्या भेटीस गेलो असता ते अत्यंत आनंदी व तेजस्वी दिसले. "आपल्या चेहऱ्यावर तेज आहे व अमेरिकेहून आपण तारुण्य आणलेले दिसतेय."

शास्त्रीजी म्हणाले, "खरेच आहे. चिंतेच्या जगातून बाहेर पडल्यानंतर अशा तऱ्हेचे तेज येऊ शकते, हा माझा अनुभव आहे."

निसर्गातील बदल हापण त्यांच्या आनंदाचा विषय आहे. कवीची प्रतिभा प्रफुल्लित होण्यासाठी निसर्ग भोवताली असावा लागतो, याचा वारंवार ते उल्लेख करतात. म्हणून महाबळेश्वरसारख्या निसर्गरम्य ठिकाणी होत असलेली वृक्षतोड त्यांच्या मनाला क्लेश देते. दूरवर पसरलेला निळाभोर जलाशय बघितल्यानंतर शास्त्रीजींचे मन प्रफुल्लित होते. त्या जलाशयाच्या काठावर उभ्या असलेल्या चार-दोन वृक्षांच्या सावलीचा आधार घेऊन समोरील दृश्य न्याहाळताना त्यांचे मन आनंदित होते. 'स्थळ रमणीय आहे,' असे शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडतात.

शरीराच्या पोषणासाठी सकस आहाराची आवश्यकता जितकी महत्त्वाची तितकीच बुद्धीच्या पोषणासाठी सकस विचारांची आवश्यकता असते, हे त्यांच्याकडून अनेक वेळा ऐकावयास मिळाले. ते स्वतः आज सात तास वाचनामध्ये घालवतात. आळस त्यांना माहीत नाही. जे चांगले दिसते, त्याचा ते आस्वाद घेतात. कवितेचे रसग्रहण करतात. अशा तऱ्हेने जीवनातील विविध घटनांचा आस्वाद घेत घेत शास्त्रीजी आता या शतकाच्या अखेरच्या दशकाची त्याच उमेदीने वाटचाल करीत आहेत. शास्त्रीजी तत्त्ववेत्ते आहेत, धर्मशास्त्राचे अभ्यासक आहेत, विज्ञानविषयक ग्रंथांचे खोल वाचन करणारे आहेत, समीक्षक आहेत, राजनीतिज्ञ आहेत, सामाजिक विकासाचे विचार मांडणारे आहेत, साहित्यिक आहेत, बुद्धिप्रामाण्यवादाचे पुरस्कर्ते आहेत, संस्कृत पंडित आहेत आणि जीवनातील विविध प्रकारच्या सौंदर्यांचा मनमुराद आस्वाद घेणारे या सगळयांपेक्षा आगळावेगळा 'माणूस' आहेत.

**(केसरी, २३ जानेवारी, १९९१)**

○○○

१०

# असा मी, असा मी

## मुलाखतकार - **संपादक, साप्ताहिक सकाळ, पुणे**

**पूर्ण नाव :**

लक्ष्मण बाळाजी जोशी

**पत्ता :**

प्राज्ञपाठशाळा, गंगापुरी, वाई.

**दूरध्वनी क्रमांक :**

२६.

**टोपणनाव :**

नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात.

**जन्मतारीख :**

२७ जानेवारी १९०१.

**वाढदिवस साजरा करता का?**

लहानपणी रथसप्तमीला साजरा होई. हल्ली नियमाने नाही.

**कुटुंबातील व्यक्तींची माहिती :**

१) मुलगी सुमन खंडकर, मुंबईला तत्त्वज्ञानाची प्राध्यापक

२) मुलगी मालती कुलकर्णी

अमेरिकेत; १) मुलगा डॉ. मधुकर इंजिनिअर, आता निवृत्त, अमेरिका, २) मुलगा वासुदेव स्वीय सहायक.

**मूळ गाव :**

पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे.

**शिक्षण :**

परंपरागत वेदशास्त्र पाठशाळा,

तर्कतीर्थ - कलकत्ता विद्यापीठाची पदवी.

**शाळा / कॉलेज :**

नाही.

**व्यवसाय :**

अध्यापन, शिक्षक.

**पुन्हा संधी मिळाली तर कोण व्हायला आवडेल ?**

आवडी-निवडीच्या पलीकडे मन गेलं आहे. अनंत विश्वामध्ये आपण एक कण आहोत, हा अनुभव सर्व वासनांपलीकडे आहे. सर्व विश्वाबद्दल आदर उत्पन्न होतो.

**विशेष छंद :**

उच्च तात्त्विक आणि वैज्ञानिक ग्रंथांचे, नव्या संशोधनांचे वाचन.

**टी.व्ही.वर काय आवडते ?**

विकासाभिमुख जीवनाबद्दल आशा उत्पन्न करणाऱ्या घटना.

**महत्त्वाकांक्षा काय होती ?**

विद्यासंपादन. ती करीत राहिलो.

**आनंदाचा एखादा प्रसंग ?**

देश साम्राज्यशाहीच्या दोरखंडातून मुक्त झाला तो स्वातंत्र्यदिन !

**निराशेचा क्षण?**

हिटलरने लोकशाही, जगातील मांगल्य नष्ट करण्याचा निर्णय घेतला तो क्षण.

**देव मानता का ?**

विश्वाची चैतन्यशक्ती मानतो. पण ही अवर्णनीय व अनिर्वचनीय आहे. या शक्तीचा विश्वचिंतनाबरोबर अनुभव येतो.

**आपला स्वभाव कसा आहे असे तुम्हाला वाटते ?**

शांत, निर्वेध, मधुर राहावे असा नित्य प्रयत्न असतो.

**राजकीय मते :**

समाज लोकसंमत कायद्याने चालावा. राजसत्ता जुलमी होण्याचे भय असते, अशी सत्ता समाजावर कधी असू नये. स्वातंत्र्य हे जीवनमूल्य आहे. सर्व मानवजात विश्वकुटुंबात्मक होईल असा विकास होणे आवश्यक आहे. अण्वस्त्रे ही मानवी जीवनाला धोकादायक आहेत, ती नाहीशी होऊन सर्व सुखी व्हावेत.

**आवडते लेखक ?**

लेखक आवडतात; पण नेमके सांगता येणार नाही.

**आवडलेली पुस्तके ?**

प्रश्न विचार करायला लावणारा आहे. पुस्तके आवडतात; पण नेमकी सांगता येणार नाहीत.

**आवडती नाटके ?**

कालिदास आणि शेक्सपियरची नाटके आवडतात. गडकऱ्यांचीही आवडतात.

**आवडते गायक / गायिका?**

कै. कुमार गंधर्व, भीमसेन जोशी.

**आवडते चित्रपट?**

पाहत नाही; कसे सांगणार.

**आवडते कलावंत?**

कला पुष्कळ आहेत. त्यांची यादी करावी लागेल.

**आवडते गाव / शहर :**

वाई.

**आवडते गाणे/ कविता ?**

आठवत नाही.

**मित्र?**

पु. ल. देशपांडे, गोवर्धन पारीख, यशवंतराव चव्हाण, किसन वीर,नानजकर.

**आवडता पोशाख ?**

गांधी टोपी, नेहरू शर्ट, जाकीट, खादीचा पांढरा शुभ्र!

**आवडता खाद्यपदार्थ ?**

खूप आहेत.

**आवडता खेळ/ खेळाडू ?**

खेळ आवडतात; पण नेमके नाव नाही.

**जीवनावर प्रभाव टाकणारी व्यक्ती ?**

याबाबत मी भाग्यवान आहे.

केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे), महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय.

**सर्वात प्रिय गोष्ट ?**

सांगणे कठीण - पण मैत्री.

**जीवनविषयक तत्त्वज्ञान :**

विश्वजीवनविषयक अनेक प्रश्न उलगडले नाहीत. जीवन का अस्तित्वात आले, याचा उलगडा होत नाही; आणि होईल असे वाटत नाही. अस्तित्व हे महान गूढ आहे. ईश्वराची संकल्पना सर्वांना प्रिय आहे. ईश्वर हे अंतिम सत्य आहे, असे सर्व धर्म मानतात. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल तर्कशुद्ध पुरावा अजून कोणालाचा देता आलेला नाही; म्हणून तो श्रद्धेचा विषय आहे. 'अप्रमेय' असे ईश्वराचे विशेषण आहे.

संकलन : वसंतराव बोराटे, वाई

**(साप्ताहिक सकाळ, पुणे, दि. ८ फेब्रुवारी, १९९२)**

○○○

११

# जीवन, ज्ञानप्रवाहात पोहत रहाल, तरच तराल

मुलाखतकार - **साकार बालविकास मंडळ, वाई**

**- विद्यार्थी व डॉ. श्री. व. सौ. राजेंद्र प्रभुणे**

**सूत्रधार**

वाई... वाई... वाई... एक तीर्थक्षेत्र. कृष्णाकाठी वसलेलं कृष्णेच्या उगमानंतरचं पहिलं तीर्थक्षेत्र! नदीकाठाच्या असंख्य देवळांपैकी हे प्रसिद्ध महागणपती मंदिर महाबळेश्वरपासून, उड्या मारत खळाळत येणारी कृष्णा इथं पहिल्यांदा विसावली. शांत अन् संयत... सुंदर, शांत, पवित्र आणि दैवी तेजाचं स्पर्श लाभलेलं तीर्थक्षेत्र वाई... नदीकाठावरचे सुंदर घाट आणि अखंड वाहणारी कृष्णामाई, गंगा आणि ज्ञानगंगा ... आपापल्या कुवती कुणीही कितीही जलपान आणि ज्ञानप्राप्ती करावी. तीर्थक्षेत्र नि तर्कतीर्थांचं गाव.. सूर्याचं प्रखर तेज आणि तेजाच्या सूक्ष्म कणांचा स्पर्श होण्याचं भाग्य लाभल्यानं उजळून गेलेली पालवी. साकार बालविकास मंडळाच्या उन्हाळी शिबिरातील मुलांनी तर्कतीर्थ ऊर्फ अबांची मुलाखत घेतली. हे तर्कतीर्थांचं निवासस्थान. या निवासस्थानातील तर्कतीर्थांच्या अभ्यासिकेतील विद्वत्ता आणि संस्कारानी भारलेल्या वातावरणात मुलं आणि शिक्षकांनी घेतलेला हा आस्वाद, अनुभव या मुलाखतीच्या निमित्तानी मुलांनी मराठी विश्वकोश निर्मितीची माहिती घेतली. आणि त्यानिमित्तानी सहजच तर्कतीर्थांचं आयुष्य आपल्यापुढे उभे राहील. लक्ष्मण... लक्ष्मणशास्त्री.... तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि पद्मविभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजेच आपले अबा....

**डॉ. प्रभुणे :** माननीय अबा, म्हणजेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि वाईतील, सन्माननीय प्रतिष्ठित नागरिक, सर्व पालक आणि मुलांनो,

आज साकार बालविकास मंडळाच्या वतीने आपण हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. आज आपण अबांशी गप्पागोष्टी करणार आहोत. आपल्या मनात जे प्रश्न आहेत, ते आपण त्यांना विचारणार आहोत. ते त्यांची उत्तरे देतील. त्यासाठी ते वेळात वेळ काढून आपल्यासाठी आले आहेत. तुम्हाला माहित असेल, त्यांना नुकतीच पद्मविभूषण ही पदवी मिळाली. अशी पद्मविभूषण ही पदवी मिळालेली थोर व्यक्ती आपल्या वाईची आहे, याचा आपल्या सर्वांना

खूप अभिमान वाटतो. त्यांच्याशी आपण सहज बोलू शकतो, गप्पागोष्टी करू शकतो, त्यांना आपण काही प्रश्न विचारू शकतो तर जसे आज आपण इथे जमलोत नि प्रश्न विचारणार आहोत. ही आपणा सवांसाठी भाग्याची गोष्ट आहे. आज त्यांचं वय ९२ वर्षांचं आहे. म्हणजेच या शतकाच्या आरंभी त्यांचा जन्म झाला. म्हणजे तुमच्या नि त्यांच्यामध्ये जवळजवळ पाच पिढ्यांचं अंतर आहे. तर हा एका दृष्टीनी दुर्मीळ असा योग आहे. अशा अर्थानी हे पाच पिढ्यांचं अंतर ओलांडून आपण आज एकमेकांशी संवाद करणार आहोत, एकमेकांशी बोलणार आहोत. त्यामुळे आजचा हा कार्यक्रम दुर्मीळ असा झालेला आहे. मुलांना त्यांच्याबद्दल जे प्रेम आहे, जो आदर वाटतो तो व्यक्त करण्यासाठी अनिल जोशी इथं येईल व त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त करेल -

**अनिल जोशी :** अबांना नुकतीच 'पद्मविभूषण' ही पदवी मिळाली आहे. त्याबद्दल त्यांचे अनेक सत्कार झाले आहेत. आम्ही लहान मुले त्यांचा तसा सत्कार कसा करणार? प्रथेप्रमाणे आम्ही त्यांना शाल, श्रीफल व गुच्छ देत आहोत, त्याचा त्यांनी स्वीकार करावा.

**तर्कतीर्थ -** वाऽऽ याऽऽ. (टाळयाऽऽ)

**डॉ. प्रभुणे -** मुलांनी आपल्या मनात पडलेले प्रश्न आमच्याकडे दिले होते. ते मी एकेक मुलाला बोलावतो. तो मुलगा आपला प्रश्न आपणास विचारेल.

**सिद्धार्थ ओसवाल - तुमच्या बालपणीची एक आठवण सांगाल का आम्हाला?**

**तर्कतीर्थ -** इथे मला पिंपळनेरहून येऊन ६८ वर्षे होऊन गेली. १९१४ साली इथे मी आलो. इतकी वर्षे होऊन गेली आणि आता तुम्ही म्हणता की मी तिथली एखादी आठवण सांगा. (पक्षांचा किलबिलाटऽऽ) आमच्या गावाला मुसलमानांचे सणवार फार चांगले साजरे होतात. त्याच्यामध्ये ताबूत म्हणजे डोले. वाई पेक्षा तिप्पट मोठा आमचा गाव. तिथे ताबूतांची मोठी जत्रा भरत असे. रस्ते तुडुंब भरत असत ताबूत इतके चमकदार असतात. लोक निर्माण करतात ताबूत. आणि नंतर बुडवून टाकतात. ताबूत फार सुंदर की तुम्हास पटायचे नाही, तर मला माझ्या गावचे लहानपणीचे ताबूत आठवतात. ताबूताची जत्रा आठवते. आता दुसरा प्रश्न विचारा.

**मंगेश किरकिरे - तुम्हाला लहानपणी कोणकोणती पुस्तके वाचावयास आवडत होती?**

**तर्कतीर्थ -** मला लहानपणी 'इसापनीती' फार आवडायची. गोष्टी आवडायच्या, ओवीबद्ध असल्याने सूर काढून वाचायला ते काव्य आवडायचे. म्हणजे 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'राम विजय', 'रामायणातल्या गोष्टी', 'महाभारतातल्या गोष्टी', 'पांडवांच्या गोष्टी' मला वाचायला मिळत होत्या. तुम्हाला पांडव माहीत आहेत की नाही? कौरव माहीत आहेत का?

**सर्व विद्यार्थी -** आहेऽऽत

**तर्कतीर्थ -** माहीत आहेत ना ! कौरव-पांडवांच्या खूप गोष्टी मी वाचत होतो. मला त्या खूप आवडत होत्या. 'कृष्ण चरित्र' आवडे.

**मंगेश किरकिरे: गोष्टींची आवड तुम्हाला कुणी लावली?**

**तर्कतीर्थ -** पुस्तकांनी लावली. पुस्तके आपण वाचू लागलो की ती आवडू लागतात. आपोआप आवडायला लागतात.

**डॉ. प्रभुणे - मुलांनी पुस्तकांबद्दल तुम्हाला विचारलं. मला एक गोष्ट आपणास विचारावी वाटते की मुलांनी लहान असताना अथवा मोठी झाल्यावर आवर्जून वाचावीत अशी काही पुस्तके तुम्ही सांगाल का?**

**तर्कतीर्थ -** त्यांची मातृभाषा आहे मराठी. मराठीमधून शूर पुरुषांची चरित्रे वाचावीत, 'शिवाजी महाराजांचे चरित्र', 'नेपोलियन चरित्र', अशीघर पुरुषांची चरित्रे मुलांनी वाचावीत असे मला वाटले. ती वाचली की गंमत वाटते, उत्साह वाढतो.

**डॉ. प्रभुणे- आणि मुले मोठी झाली... इतर भाषा शिकली की त्यांनी काय वाचावं?**

**तर्कतीर्थ -** इतर भाषा, शिकली की म्हणजे काय? तर पहा मला चार भाषा येतात. संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी... मी अगोदर संस्कृत शिकलो. मग इंग्रजी... त्यानंतर मग मराठी, हिंदी मला फार चांगलं बोलणाऱ्यांनी त्या त्या भाषा शिकवल्या. १९१६ साली मी बडोद्याला विनोबा भावे यांच्याकडे जाऊन इंग्रजी शिकले. ते उत्तम शिकवत होते. त्यामुळे मला चांगलं इंग्रजी वाचता आलं. विनोबा भावे माझे इंग्रजीचे गुरू केवढा मोठा मनुष्य तो. तुम्ही त्यांच्याबद्दल ऐकलं असेलच?

**डॉ. प्रभुणे :** हो

**तर्कतीर्थ :** विनोबा भावेंनी मला इंग्रजी शिकवलं. त्यांच्यापाशी मी राहिलो होतो. त्यांनी मला 'जीसस क्राइस्ट' पुस्तक वाचवयाला दिले. टॉल्सटॉय हा जगातला मोठा रशियन, कादंबरीकार. त्यांची पुस्तके दिली. मराठीतले उत्तम कादंबरीकार हरिभाऊ आपटे, त्याप्रमाणे वि. स. खांडेकर. जगातला श्रेष्ठ कादंबरीकार टॉल्सटॉय मी वाचला. त्यामुळे मला साहित्याची गोडी लागली. महात्मा गांधींचा मुलगा देवदास आणि राजगोपालाचारी यांची कन्या लक्ष्मी यांचा विवाह की केला. महात्मा गांधींनी मला हे लग्न लावायला सांगितले आणि मी लग्न लावले.

**अमीत जोशी : तुम्ही लहानपणी आमच्यासारखे कोणकोणते खेळ खेळत होता?**

**तर्कतीर्थ :** खोखो, कबड्डी… हुतूतू त्याला म्हणतात… आट्यापाट्या… मला पुष्कळ खेळ आवडत होते. पण मला सगळ्यात पोहायला आवडायचं. वाईत महापूर यायचा. आता जास्तीत जास्त बुरूज बुडतात. पण त्यावेळी या भिंतीपर्यंत पाणी जायचं. आणि त्यावेळी मी त्यावर चढून उडी मारायचो. त्यावेळी इतका पाऊस असे. लोकांना भिती वाटायची. परंतु आम्ही नव्या पुरात नाही पडायचो. कारण त्यात साप असायचे. एक दोन पूर येऊन गेले, पाणी स्वच्छ दिसायला लागलं की मग मी पोहत असे. पण पोहोण्याची माझी भिती गेली काशीला. मी वाराणशीला शिकायला होतो. गंगेच्या काठावरच मला रहायला माझ्या मित्राने जागा मिळवून

दिली होती. योगानंद म्हणून एक स्वामी होते. त्यांच्या मठात सोय होती माझी. ते केवलानंद सरस्वतींचे शिष्य होते. तिथे मी गंगेत पोहत असे. तिथे पोहोण्याची भिती गेली. कारण तिथे अथांग पाणी होते. पण वाटून जायची भिती नव्हती. तुम्हाला एकदा चांगले पोहता आले की तुम्ही तरू शकता. तिथे पाण्यात सुसरी-मगरी असायच्या. तिल्या भटजी लोकांनी मला सांगितले होते, 'सुसर आदमी को पकडती है'... असं आहे की पोहोताना ती लांब दिसे. साठ वर्षानंतरही मला सर्व आठवतं.

**कु. शीतल पाटणकर : तुमच्यावेळी टी.व्ही. होता का?**

**तर्कतीर्थ :** टी. व्ही. आत्ता आला...

**कु. शीतल पाटणकर : तुम्ही पहाता का?**

**तर्कतीर्थ :** क्वचित! माडीवर आहे. पहा जाऊन.

**शिक्षक : मुलांनी टी. व्ही. पहावा का?**

**तर्कतीर्थ :** होऽ सर्वांनी पहा. आनंद घ्यावा.

**अनुप हिंगमिरे : तुम्ही इथे कसे आला?**

**तर्कतीर्थ :** १९१४ साली मधल्या आळीमध्ये आलो. तेव्हा इथे कृष्णाबाईचा उत्सवाचे भोजन सुरु होता. इथे देवकुळेंच्या घरी उतरलो होतो. माझ्या गावी देवकुळे होते. त्यांचे वडील बंधु इथे रहात. दातारांचा मठ होता. तिथे खोली घेऊन राहिलो, आणि शिकायला नारायण शास्त्री मराठे उर्फ केवलानंद सरस्वती यांच्याकडे त्यांच्या मित्रांनी मला पाठवले.

**अनुप हिंगमिरे : तुम्ही त्यावेळी वाईस कोणत्या वाहनाने आला?**

**तर्कतीर्थ :** पुष्कळ वाहनांनी आलो. म्हणजे माझे गाव पिंपळनेर. तिथून धुळे ४३ मैल. एक कुलकर्णी म्हणून होते. त्यांनी टांगा दिला. टांग्यानी मी धुळयास आलो. धुळयाहून रेल्वेने चाळीसगावला आलो. चाळीसगावहून रेल्वेने कल्याणला आलो. तिथून रेल्वेने पुण्यास आलो. पुण्याहून रेल्वेने वाठारला आलो. वाठारहून इथे वाईस बैलगाडीने आलो होतो.

**अश्विनी भंडारी : आम्हाला पाठांतर जमत नाही. तुम्हास ते कसे यायचे?**

**तर्कतीर्थ :** म्हणत रहायचे. मग आपोआप पाठ होते. पाठांतरामध्ये देशात गाजलेले लोक होते त्याकाळात. मी मूळचा वेदपाठी ब्राह्मण. आता आधुनिक बनलो.

**डॉ. प्रभुणे : पाठांतरासाठी वेगळी दैवी, बौद्धिक देणगी लागते का?**

**तर्कतीर्थ :** नाही. निरनिराळ्या मुलांना पाठांतराला वेगवेगळा वेळ त्याच्या स्मरणशक्तीच्या कुवतीनुसार लागतो. कोण एकपाठी असतो. अशी एक पाठी म्हणून प्रसिद्ध असलेली माणसं मी पाहिलेली आहेत. एकपाठी तात्पुरतं स्मरण असतं. एक पाठी ही अख्यायिका आहे. दहा-पाच वेळा म्हटलं तर ते चिरस्मरण होतं.

**डॉ. प्रभुणे : मग अशी काही जुनी पाठकेलेली कविता वगैरे आज आठवते का?**

**तर्कतीर्थ :** मी एखादा संस्कृत श्लोक म्हणून दाखवू शकतो –

महिम्न: पारं ते परमविदुषो यद्यसदृशी
स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि गिर:।
अथाऽवाच्य: सर्व: स्वमतिपरिणामावधि गृरन्
ममाप्येष्य स्तोत्रे हर निरपवाद: परिकर: ॥
(शिव महिम्न स्तोत्रम्)

हा पहिला झाला. आता दुसरा श्लोक म्हणतो ....

अविनयमपनय विष्णो दमय मन: शमय विषयमृगतृष्णाम्।
भूतदया विस्तारय तारय संसारसागरत: ॥१॥
दिव्यधुनीमकरन्दे परिमलपरिभोगसच्चिदानन्दे ।
श्रीपतिपदारविन्दे भवभयरवेदच्छिदे वन्दे ॥२॥
सत्यपि भेदापगमे नाथ तराडहं न मामकोनस्त्वं ।
सामुद्रो हि तराङ्ग: स्वचन समुद्रो न तारङ्ग: ॥३॥
उद्धतनग नगभिदनुज दनुजकुलमित्र मित्रशशिदृष्टे ।
दृष्टे भवति प्रभवति न भवति किं भवतिरस्कार: ॥४॥
मत्स्यादिभिरवतारैरवतारताऽवता सदा वसुधां ।
परमेश्वर परिपाल्यो भवता भवतापभीतोडहं ॥५॥
दामोदर गुणमन्दिर सुन्दरवदनारविन्द गोविन्द ।
भवगलधिमथनमन्दर परमं दरमपनय त्वं मे ॥६॥
नारायण करूणामय शरणं करवाणि तावको चरणौ ।
इतिषट्पदी मदीये वदनसरोजे सदा वसतु ॥
(विष्णु षट्पदी स्तोत्रम्)

अशी खूप येतात पाठांतरे.

**डॉ. प्रभुणे : मुलांना पाठांतराला वेळ लागेल. पण पाठ होणारच नाही असं नाही.**

**तर्कतीर्थ :** प्रयत्न केलाच पाहिजे. नाही तर तो बोलू कसा शकणार? बोलतो म्हणजे भाषा आहे. भाषा म्हणजे शब्द. शब्द म्हणजे अर्थ शब्द काही जन्मजात असत नाहीत. कितीही मठ्ठ मुलगा असेल तर तो भाषा बोलणारे म्हणजे स्मरणशक्ती (मेमरी) आहेच. अस्तित्व हे मानसशास्त्रीय सिद्धांतानुसार असतेच. लहान मूल एकदम स्तनपान करायला लागतं. मेमरी आहे त्यामागे शास्त्रीय. बाळ दूध शोषतं ते स्मरणाच्याच आधारे. भूक जोरदार असेल तर जोराने शोषणार त्याला मग पुरे म्हणून बाजूला करावं लागतं. हे सर्व सेल्समधे साठलेल्या मेमरीवर घडतं. वाळू खाल्ली तर पचणार नाही. पण बेदाणे खाल्ले तर पचणार. कारण स्नायुंना, स्मरणानं,

सवयीनं. त्याला कळतं. शक्ती आहे त्याच्यात पचवायची. हा सर्व जगण्याचा त्याचा आधार आहे सगळी मेमरी हे करते.

**चिंतामणी बोधे : तुम्ही स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता असं ऐकून आहोत.**

**तर्कतीर्थ :** स्वातंत्र्याच्या चळवळीत मी संगठक होतो. मी कराडला महात्मा गांधींनी दांडी मार्च सुरू केल्यावर सलग दहा व्याख्याने दिली. त्यावेळी यशवंतराव चव्हाण विद्यार्थी होते. माझी भाषणे ऐकायला ते नियमित येत. मी सत्याग्रहांचे संगठन केले. तिकडे कळवण, सटाणाकडे बागलाण, नामपूर इ. गावे आहेत. तिथे सत्याग्रह केले. दुसरे संगमनेरला शिबिरे केली. दीडशे स्वातंत्र्य सैनिकांचे शिबिर मी दोन महिने चालविले. तेथील ब्रिटिश कलेक्टरनी ते शिबिर उद्ध्वस्त केले... बंद पाडले. तिथून मी बागलाण तालुक्यातील नामपूरला गेलो. तिथे शिबिर लावलं. तिथे नरहर शेठ म्हणून चांगले गृहस्थ होते. ते सर्व शिबिरार्थी, संग्रामार्थींना जेवायला घालायचे. तिथले वाणी मदत करायचे. अशा रितीने फार मोठी शिबिरे मी त्याकाळी चालविली.

**डॉ. प्रभुणे : त्यात तुम्ही तुरुंगातही गेला ना?**

**तर्कतीर्थ :** हो.. दोनदा मी तुरुंगात गेलो. दोन्ही वेळेला धुळ्याच्याच तुरुंगात होतो. स्वातंत्र्य सैनिक म्हणून... एकदा १९३० साली... दुसऱ्यांदा १९३३ साली. माझ्याबरोबर विनोबा भावे, धुळे जेलमध्ये होते. त्याची गीता प्रवचने प्रसिद्ध आहेत. ती त्यांनी यावेळीच जेलमध्ये केली होती. मी ती ऐकायला होतो. समोर बसून मी ती एकलीत. जवळ जवळ १००-१२५ स्वातंत्र्य सैनिक ती नियमित ऐकत... सुंदर होती ती... वक्तृत्व संपन्न, विचार संपन्न, तत्त्वज्ञान संपन्न. अशी इतर मान्यवरांची भाषणे पण मी तिथे ऐकली आहेत. साने गुरूजीही आमच्या बरोबर होते. त्यांनी विनोबांची ती प्रवचने लिहून घेतली होती. डिक्टेशनच्या गतीने लिहित. मेमरी उत्तम. ती आज प्रसिद्ध आहेत. ते ती तिथेच ऐकून लिहित असंत. नंतर ते रिवाइज करत होते. नंतर त्याचं पुस्तक झालं. सानेगुरूजी त्यावेळी दोन कामे गोष्टी करत... प्रवचने लिहित व सत्याग्रहींचं दळण दळून देत असत. शिक्षा म्हणून दळावे लागे. ज्याला जमतनसे त्याचे ते दळून देत. स्वत:च काम करून ते हे अधिकचं काम करत.

**योगेश शिंदे : तुम्ही संस्कृतमध्ये भाषण केले आहे का?**

**तर्कतीर्थ :** हो. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृतमध्ये ही भाषणे दिली आहेत. १९२९ साली वारणसीला धर्मपरिषदेत मी धर्मसुधारणांवर प्रश्न संस्कृतमध्ये मांडत होतो. तिथे सर्व संस्कृत पंडितच होते. मराठी जाणणारे थोडे होते. हिंदी तमीळी, तेलगू, बंगाली, कानडी असे सर्व भाषेचे विद्वान पंडीत होते. त्यांना काय मराठी कळणार? संस्कृतमध्येच बोलत होतो.

**नूतन कुलकर्णी / हर्षदा जोशी : तुम्ही किती वर्षे विश्वकोशाचे कार्य केले?**

**तर्कतीर्थ :** ३० वर्षे काम केले.

**निवेदन :** (महिलास्वर) विश्वकोशाची स्थापना झाल्यापासून अबा हे कार्य करीत आहेत. अबांचे गुरु केवलानंद सरस्वतींच्या इमारतीतच विश्वकोशाचे कार्य चालते... आज वयाच्या ९२ व्या वर्षी ही अबांचा उत्साह नि तडफ जराही कमी झालेली नाही. विश्वकोश इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात त्यांचे कार्य सुरु असते... आजही अबांच्या कार्याचा झपाटा आणि उरक विलक्षण व तरुणांना लाजवेल असा आहे... वाचन, चिंतन, लेखन, मनन, संपादन, प्रशासन कार्याचे मार्गदर्शन या कामातून वेळ काढून ते जगातील विविध विषयातील जास्तीत जास्त ज्ञान अद्ययावत करून थोडक्यात परंतु पूर्ण स्वरूपात संदर्भासाठी एकत्र करून देऊन ते मराठीत सादर करतात. हा विश्वकोशाचा उद्देशच आहे. विश्वकोशातील मानव्य व शास्त्र कक्षेतील संपादक, अनेक विषयातील तज्ज्ञ कार्य करीत आहेत. त्यांच्या मदतीला विश्वकोशाचा उद्देच आहे. विश्वकोशातील मानव्य व शास्त्र कक्षेतील संपादक, अनेक विषयातील तज्ज्ञ कार्य करीत आहेत. त्याच्या मदतीला विश्वकोशाचं सुसज्ज ग्रंथालय आहे... १४ वर्षांवरील कोणत्याही व्यक्तीस उपयोगी होईल अशा प्रकारची माहिती देण्याचा प्रयत्न विश्वकोशात करण्यात आला आहे... त्याहून लहान मुलांसाठी 'बाल विश्वकोशांचं' कामही नुकतच सुरु झालं आहे. 'धर्मकोश' निर्मितीचं कामही इथं सुरू आहे. मराठी विश्वकोशाचं स्वरूप कसं असावं इथ पासून ते एखाद्या नोंदीचं लेकन कसं असावं इथपर्यंत निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर अबांचा सहभाग व मार्गदर्शन आहे. गुरू केवलानंद सरस्वती यांच्या आशीर्वादाने हे काम सुरू आहे आणि पुढे ही हे सुरू राहील.

**हर्षदा जोशी : आमच्या सारख्या लहान मुलांना विश्वकोशाचा काय उपयोग आहे?**

**तर्कतीर्थ :** सध्या नाही, पण तुम्ही मॅट्रिक व्हाल तेंव्हा तुम्हाला त्याचा उपयोग होईल.

**माणिक जोशी : या वयातही तुमची प्रकृती चांगली आहे. त्यासाठी तुम्ही काय काय करता?**

**तर्कतीर्थ :** लहानपणापासून आत्तापर्यंत मी रोज व्यायाम करत आलो आहे. सूर्यनमस्कार करतो. २५० सूर्यनमस्कार मी वयाच्या २२ व्या वर्षांपर्यंत घालत होतो. रोज फिरायला जातो. चरणपूजा करतो. चरण म्हणजे पाय. पूजा म्हणजे चालणे. त्यात अडचण मानायची नाही. चालायचे म्हणजे चालायचेच. त्याशिवाय खाल्लेले पचणार कसे? नाही पचले तर रोगराई होणारच. रोगराई म्हणजे हळूहळू वरचा रस्ता!

**डॉ. प्रभुणे : आहारामध्ये काही बदल असतो का?**

**तर्कतीर्थ :** आहारामध्ये साधारणपणे फार काही नाही... दूध भाकरी खातो. दूध पोळी इतकेच...

**डॉ. प्रभुणे : काही लोकांना वाटतं मांसाहार केला पाहिजे म्हणजे जास्त शक्ती येते...**

**तर्कतीर्थ :** मांसाहार लागतो चांगला... नाही असं नाही... पण मांसाहारापेक्षा दूध-भाकरी

उत्तम. मांसाहार करायलाच पाहिजे असं मात्र नाही.

**मंगेश किरकिरे : तुम्हाला तर्कतीर्थ पदवी कशी मिळाली?**

**तर्कतीर्थ :** मी पदवी साठी तीन परीक्षा दिला – प्रथमा, मध्यमा नि उत्तमा. अशा तीन परीक्षा दिल्यानंर कलकत्याला प्रबंध सादर केला. टायपिंग करून.

**मालविका प्रभुणे : तुम्ही आजपर्यंत अनेक मोठमोठी कामे केली. मग तुम्हाला 'पद्मविभूषण' पदवी कोणत्या कामाबद्दल मिळाली?**

**तर्कतीर्थ :** अमक्या एका कामीसाठी नाही… पुष्कळ कामाचा विचार करून ती दिली गेली. सरकारने इतके वर्षे आयुष्यांचे काम पाहून दिली. ९२ वर्षांचं आयुष्य झालं… सर्वांचा विर करून पदवी दिली…

निवेदन : 'पद्मभूषण' पदवी प्रदान सोहळयाचे दृक्-श्राव्य प्रक्षेपण

प्रस्तुती (व्हिडिओ क्लीप)…

**प्रश्न : तुम्हाला तुमच्या आयुष्यातलं कोणतं काम मोठं वाटतं?**

**तर्कतीर्थ :** असं काही नाही सांगता येणार… जी कामं आली ती केली… लहान-मोठं असं काही नाही.

**अभिमन्यू प्रभुणे : तुमच्या आयुष्यातील आनंदाचा आणि निराशेचा प्रसंग कोणता?**

**तर्कतीर्थ :** असं सांगणं कठीण आहे. पण पुष्कळ आनंदाचे प्रसंग आले. आणि अनेक निराशेचे ही प्रसंग आले… पण काही सांगता येणार नाही. आठवावं लागेल… पण.. आता आठवत नाही.

**अभिमन्यू प्रभुणे : तत्त्वनिष्ठ वागायची सवय तुम्हाला कशी लागली आणि कोणी लावली?**

**तर्कतीर्थ :** ती पहिल्यापासून आहे. ती सवय गुरूमुळे लागली. मी तसा विचार करत होतो. गुरू उत्तेजन देत होते. ती वृत्ती होती.

**डॉ. प्रभुणे : स्वतंत्र विचार मांडायचा तर एक प्रकारचा निर्भयपणा लागतो ना?**

**तर्कतीर्थ :** हो, पण तो स्वाभाविक असतो. मनुष्य निर्भय असतो. कुणी दाबलं म्हणून तो बधत नाही. विचार सुचला की मनुष्य विचारतोच…

**डॉ. प्रभुणे : तुमची आणि ही मुलांची पिढी यात पाचपिढ्यांचं अंतर आहे. दरम्यान खूप बदल झाले. या बदलांबद्दल एकूणपणे तुम्हाला काय वाटतं?**

**तर्कतीर्थ :** मला ते बदल इतके काही लक्षात येत नाहीत. बदलून गेलय सर्व हे स्वरं आहे…

**डॉ. प्रभुणे :** आम्ही पालक मुलांच्या दृष्टीनी विचार करत असतो नेहमी… मुलांचया दृष्टीनी मला दोन प्रश्न पडले आहेत… वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे सर्वत्र हिंसाचार, दहशतवाद यासारखी

सगळी अस्थिर परिस्थिती आहे. अशा प्रकारचं जे अस्थिर वातावरण मुलांच्या पुढे येतं…

**तर्कतीर्थ :** ते पहिल्यापासूनच आहे. असं अहो की पहिलं महायुद्ध झालं, १९१४ साली. मग दुसरं झालं. त्यावेळी जगाला वायलं की जगाची फार वाईट स्थिती झाली आहे. .. माणूस फार भलत्या मार्गाला चाललाय.. त्यातून तो पडतो बाहेर… मग शांतता परिषदा होतात… लढाया हो नये यासाठी प्रयत्न चालू असतात. युनायटेड नेशन्स (युनो) ही जी संस्था आहे. जगातील ११० राष्ट्रांची… ती लढाया होऊ नये असा प्रयत्न करते… आणि तिला बरचसं यश येतंय…

**डॉ. प्रभुणे : फार बदल होतोय आणि विद्यार्थ्यांची कुचंबणा होतेय.**

**तर्कतीर्थ :** असं काही नाही… त्यातून सर्व बाहेर पडतात.

**डॉ. प्रभुणे : मुलांना तुम्ही असं काही सांगू शकाल कां…. संदेश… आशीर्वाद…**

**तर्कतीर्थ :** मुलांनी चांगली चांगली पुस्तकं वाचावीत… निसर्गाचा अर्थ सांगणारी… मजेदार आणि ज्ञानदेणारी अशी पुस्तकं वाचावीत… निसर्गाचा अर्थ सांगणारी… मजेदार आणि ज्ञानदेणारी अशी पुस्तकं वाचावीत… सतत वाचावीत… गमतीदार, काल्पनिक पुस्तकंही वाचायला हरकत नाही. त्याच्यातूनच वाचायची सवय झाली की झालं.

डॉ. प्रभुणे : अबा आले नि त्यांनी मुलांना मार्गदर्शन केलं, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, कृतज्ञता व्यक्त करतो. ही मुलाखत यशस्वी करण्यासाठी ज्या सर्वांनी सहकार्य केलं, त्यांचेही मी आभार मानतो. (टाळ्या)

**(साकार बालविकास मंडळ, वाई, प्रस्तुत / मे, १९९२., मूळ दृक्-श्राव्य फितीवरून तयार करण्यात आलेल्या श्राव्य फितीचे शब्दांकन – डॉ. सुनीलकुमार लवटे, निर्मिती/ संयोजन : डॉ. राजेंद्र प्रभुणे / सौ. सुलभा प्रभुणे, संकल्पना : डॉ. अ. वि. प्रभुणे, दृक्-श्राव्य चित्रण : सुधीर क्षीरसागर)**

❍❍❍

# १२

# परमार्थ मंदिर किंवा मशिदीत नाही

## मुलाखतकार - **संपादक, 'बखर' दिवाळी अंक**

आपल्या जाती-धर्माच्या कर्मठ परंपरेत वाढलेल्या व्यक्ती बहुधा आधुनिक पाश्चिमात्य विचारांची दखल घेत नाहीत, याबाबत आपल्या दृष्टिकोनात कसकसे बदल घडत गेले? त्यात परिस्थितीने कसा हातभार लावला, याबाबत जरा सांगा.

याबाबत पहिली गोष्ट म्हणजे, धुळे जिल्ह्यातील माझ्या गावात, म्हणजे पिंपळनेरला प्रार्थना समाजाचा विचार काही मंडळी बोलत. पुणे, मुंबई येथे प्रामुख्याने प्रभाव असलेला प्रार्थना समाज हा सर्व धर्मांचं श्रेष्ठत्व मानणारा असा आहे. परंतु त्याचबरोबर कोणत्याही धर्माचं वेगळं असं श्रेष्ठत्व न मानणाराही आहे. त्याचा परिणाम माझ्या मनावर हळूहळू व्हायला लागला. माझ्या मनात धर्माभिमान व देशाभिमान याचं एकच असं रूप होतं. परंतु धर्माभिमान व देशाभिमान हे वेगळे आहेत हे मला फार उशिरा कळायला लागलं. प्रार्थना समाज हा कोणत्याही जातीचा उच्च-नीच भेद न मानणारा आहे, तर राजा राममोहन रॉय यांनी कलकत्त्याला स्थापन केलेला ब्राह्मो समाज, हा कोणताही धर्मग्रंथ सर्वश्रेष्ठ न मानणारा; पण उपनिषदांना मात्र प्राधान्य देणारा होता. ब्रह्म हे उपनिषदांचं तत्त्व त्यांनी स्वीकारलं म्हणून तो ब्राह्मो समाज, सगळ्या धामामध्ये ब्रह्म, म्हणजे परमेश्वर आहे, असं ते म्हणत. याचा परिणाम माझ्या विचार करण्याच्या पद्धतीवर पहिल्यांदा झाला. मूळचा मी सनातनी. विशेषत: माझे आचार प्रात:संध्या, वेदाध्ययन, जपजाप्य इ. गोष्टी मी करत असे. परंतु या प्रार्थना समाज व ब्राह्मो समाजाच्या आधुनिक विचारांचा माझ्या मनावर खूप परिणाम झाला आणि हळूहळू धार्मिक चालीरीती व जातीच्या चालीरीती या एक नव्हेत, असा विचार येऊ लागला. धर्म म्हणजे ईश्वर भक्ती, धर्म भक्तीच्या अनुषंगाने आणि मुख्यतः महादेव गोविंद रानडे, भांडारकर यांची धर्मपर व्याख्यानं मी वाचू लागलो. त्यामुळे व्यापक धर्मविचार मला समजू लागले. लक्षात येऊ लागले. मी मात्र परंपरागत धर्मविचारांचा होतो. टिळकांच्या गीतारहस्याचा माझ्यावर विशेष परिणाम झाला. आणि त्यामुळे कर्मयोगी विचार मला मान्य झाला. संन्यासापेक्षा कर्मयोग हाच मनुष्याला अधिक शुद्ध करील, कारण

कर्मयोगात जबाबदारी आहे. संन्यासात मात्र ती नाही. जबाबदारीमुळे माणसं संयमाने, सावधगिरीने वागतात व जीवनात संयम, सावधगिरी, विवेक याची फार गरज आहे. विवेकपूर्ण धर्माची कटाक्षाने जीवनात गरज आहे आणि विवेक म्हणजे, सगळी माणसं सारखीच आहेत. सगळ्यांशी न्यायाने वागलं पाहिजे, हा दृष्टिकोन मी स्वीकारला. आर्य समाज, प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज या सगळ्यांच्या नवयुगधर्मांचा माझ्यावर परिणाम झालेला आहे. भारतात हिंदू धर्मात नव्या युगाला योग्य असं परिवर्तन आलं, हे हिंदू धर्माचं वैशिष्ट्य आहे. मुसलमानांमध्ये ते का येऊ शकलं नाही, ते अजूनही मला कळलं नाही. अर्थात काही मुस्लिमधर्मीय म्हणतील, 'असं परिवर्तन आमच्यातही आलेलं आहे'. मी एवढंच म्हणेन, 'शक्य आहे'.

**प्रश्न - लोकहितवादींचा काही परिणाम तुमच्यावर झाला आहे का?**

**उत्तर -** माझ्यावर लोकहितवादींचा परिणाम झाला नाही. लोकहितवादी मला आकर्षित करत होते, पण त्यांचा परिणाम विशेष असा झाला नाही. लोकहितवादी मी वाचला. त्यांची शतपत्रही वाचलीत. त्याची टीका मला पसंत असे. परंतु वर म्हटलेल्या नवयुगधर्मांइतका लोकहितवादींचा परिणाम मात्र माझ्यावर झाला नाही.

**प्रश्न - आपण वाईला आल्यावर पुन्हा काही बदल झालेत का?**

**उत्तर -** मुख्यतः माझ्यात वाईत आल्यावरच बदल झालाय. कारण वाचन जे झालं, ते इथल्या नारायणशास्त्री मराठे, केवलानंद सरस्वती यांच्या ग्रंथालयाचाच मला फार उपयोग झाला, त्यांचं वेगळं ग्रंथालय होतं. ते निरनिराळे ग्रंथ खरेदी करत, वाचत व जतन करून ठेवत. गीतारहस्य प्रसिद्ध झाल्याबरोबर मी ते वाचलं. गीतारहस्य १९१५ साली प्रसिद्ध झाले. १९१७ साली विनोबा भावे वाईत होते. विनोबा भाव्यांचा स्वभाव अतिशय तीक्ष्ण; पण ते अतिशय हुशार, बुद्धिमानही होते. त्यांच्याजवळ मी इंग्रजी शिकलो. ते फार चांगले शिक्षक होते. त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीनं मला इंग्रजी शिकवलं, त्याबरोबरच त्यांच्यासोबत चर्चाही खूप होत असे. गीतारहस्य मी दोनदा वाचलं. मी त्यांना म्हटलं, 'हे गीतारहस्य माझ्या चांगलं लक्षात राहिलं आहे. तुम्ही विचारा', ते म्हणाले, 'काय विचारु?' मी म्हटलं, 'कोणताही भाग विचारा, विशेषतः तुम्ही कुठलीही दोन-तीन पाने वाचा, विषय काय चाललाय हे मी सांगीन.' त्याप्रमाणे त्यांनी माझी परीक्षा घेतली. ते एक दोन वाक्य वाचत नि विचारत, 'हे कोणतं प्रकारण आहे?' आणि मी जवळजवळ सगळ्या प्रकरणांची शीर्षकं सांगितली. ते म्हणाले, 'तू तर अगदी परीक्षेचाच अभ्यास केलास', आणि त्यांचं 'गीतारहस्य' त्यांनी मला दिलं. त्यावर 'भाई लक्ष्मण यास' असं त्यांनी लिहिलं होतं. मात्र पुढे ते पुस्तक बापट नावाच्या स्नेह्यांनी नेलं.

**प्रश्न - पुढे तुम्ही रॉयवादी आणि मार्क्सवादी झालात?**

**उत्तर -** रॉयकडे मी आकर्षित झालो, कारण ते मोठे क्रांतिकारक म्हणून. आमच्या त्या काळात जे सशस्त्र क्रांतिकारक असत त्यांच्याबाबत आदर असे. पूज्यबुद्धी असे. उदा. सावरकर.

त्यांनी मराठीत भाषांतरित केलेल्या मॅझनीच्या चरित्राची प्रस्तावना मी वाचली. सावरकरांनी लिहिलेल्या त्या प्रस्तावनेचाही माझ्यावर परिणाम झाला. आणि मी हळूहळू एम. एन. रॉय यांच्याकडे आकर्षित होत गेलो. आणि पुढे ते मार्क्सवादी झाले. म्हणून मीही मार्क्सवादी झालो. परंतु नंतर मी एम.एन. रॉयना सांगितलं, की मी वेद, गीता वगैरे हे ग्रंथ, देवाचे ग्रंथ आहेत म्हणून नव्हे, तर ते माणसांचे ग्रंथ आहेत, या दृष्टीने त्यांच्याकडे पाहतो आणि मार्क्सचे ग्रंथही हे माणसाने लिहिलेले आहेत, यामुळे मी ते शंभर टक्के मान्य करणार नाही.

एम. एन. रॉय हे एक मोठा कटाचा खटला या देशात उभारलेला होता, त्यात आरोपी होते. त्यावेळी ते परदेशात होते. भारतात आल्यावर ते १९३१ साली पकडले गेले. सहा वर्षे ते तुरुंगात होते. १९३६ साली ते सुटून आले. नंतर ते काँग्रेसमध्ये सामील झाले व तिथे आमचा योगायोग जुळल्यानंतर पुढे ते माझे मार्गदर्शक व मित्र बनले. असा तो इतिहास आहे.

**प्रश्न - पूर्वीचा तुमचा पारंपरिक भारतीय तात्त्विक विचार व हा आधुनिक विचार या विरोधामुळे तुम्हाला काही मानसिक अस्वस्थता जाणवली का?**

**उत्तर -** नाही. त्याचं काय आहे, की भारतीय विचारामध्ये अंतर्गत विरोध आहे. उदाहरणार्थ ज्ञानेश्वर महाराजानी, त्याचं फार चांगलं वर्णन केलं आहे. "देखा, षट्‌दर्शने म्हणीतती, तेची भूजांची आकृती विशम्यते आयुधे हाती" म्हणजे सहा दर्शने ही विसंगत आहेत. त्यामुळे भिन्न भिन्न तत्त्वज्ञान लक्षात घेणं ही भारतीय परंपराच आहे. आणि ही भारतीय परंपराच मला होती. त्यामुळे मानसिक अस्वस्थता वाटण्याचं काही कारण नव्हतं.

**प्रश्न - आज भौतिकवादी तत्त्वज्ञानाबद्दल तुमची काय भूमिका आहे ?**

**उत्तर -** आज भौतिक आणि चैतन्यवाद, हे जे तत्त्वज्ञानातले प्रवाह आहेत, त्याबद्दल सांगणं जरा कठीण आहे. कारण हे विश्व चेतन आहे की भौतिक? याबद्दल दोन्ही बाजूने बोलता येतं. त्यात व्यवस्था आहे, सुसंगती आहे, नियमबद्धता आहे. त्यामुळे त्याच्यामध्ये एक तऱ्हेचे चैतन्य आहे. त्याच्यामागे हेतू आहे की नाही? जर हेतू असेल तर ते चैतन्य आहे. हेतू नसेल तर आपोआप घडलं आहे, हे सांगणं कठीण आहे. कारण माणसासारखा विलक्षण प्राणी या विश्वात उत्पन्न झाला आहे. माणूस हा केवढा विलक्षण प्राणी सगळ्या विश्वाचं आकलन एवढ्याशा डोक्यात करतो. असा हा माणूस निर्माण झाला, त्यामुळे हे सगळं आश्चर्य आहे. विश्व हेच आश्चर्य आहे आणि हे आश्चर्य मनाला प्रसन्न करतं. हे विश्व अनंत आहे आणि आश्चर्य आहे. म्हणून हे विश्व अनंत आश्चर्य आहे, असं वाटतं.

**प्रश्न - आपण जर वेगळा निर्णय घेतला असता तर पुढील आयुष्य वेगळं घडलं असतं, असं वाटण्याजोग्या काही घटना तुमच्या आयुष्यात घडल्या का?**

**उत्तर -** सांगता येत नाही. जे वळण लागलं ते लागलं.

**प्रश्न - आयुष्यामध्ये मागे वळून पाहिल्यावर आपल्याला जे साधलं किंवा जे साधलं नाही, याबाबत तुमच्या भावना काय आहेत ?**

**उत्तर -** असं आहे की, साधायचं काय होतं, हे मला माहीत नाही. म्हणजे माझा आयुष्यक्रम हा उद्देशपूर्ण नव्हता, असं म्हणता येईल. परंतु हे जीवन समजून घेण्याचा, सभोवतालची परिस्थिती, हे विश्व, हा समाज समजून घेण्याचा माझा दृष्टिकोन होता. या समाजाची सेवा करावी हा विचारसुद्धा या दृष्टिकोनाचाच भाग होता. म्हणून मी काँग्रेस पक्षात गेलो, स्वातंत्र्यलढ्यात सामील झालो. स्वातंत्र्यलढ्यातील सैनिकांनी शिबिरं भरवली. संगमनेरला मी शिबीर काढलं होतं. नगरला मी अच्युत पटवर्धनकडे उतरत असे. तेव्हा रावसाहेब आणि अच्युतराव म्हणाले, 'आम्ही तुमच्या शिबिरात येऊ का?' त्यांच्यासारखे नेते हवेच होते. मी म्हणालो, 'या'. कारण लोकांनासुद्धा त्यांच्यासारख्याचं मोठेपण माहीत होतं. ते शिबिरात आले. त्यांचे मित्र जयप्रकाश नारायण. त्यामुळे माझा संबंध पुढे नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण इत्यादींशी आला. महात्मा गांधींशीही एका वेगळ्या कारणानं संबंध आला. हिंदू धर्माचा अस्पृश्यतेबद्दल काय दृष्टिकोन आहे? याबाबतची चर्चा करण्याच्या योगानं माझा गांधींशी संबंध आला. मी म्हणालो, 'हिंदू धर्माचे दोन भाग आहेत. एक साधारण हिंदू धर्म; म्हणजे सर्वांना लागू असणारा धर्म. त्यात अस्पृश्यता नाही. सगळ्यांना आत्मीयतेनं, बंधुत्वानं वागवायचं, असं हा धर्म सांगतो. हा जो आत्मीयभाव आहे, दृष्टिकोन आहे तो जर स्वीकारला तर अस्पृश्यता ही स्मृतीतल्या चालीरीती आहेत याला महत्त्व राहत नाही, असा दृष्टिकोन मी स्वीकारला'. महात्मा गांधी मला म्हणाले, 'आमच्या मुलामुलींची लग्नं तुमच्या हाताने लावाल का?' त्यांची धार्मिक संस्कारांवर श्रद्धा होती आणि म्हणून मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे धार्मिक संस्कार केले.

**प्रश्न - वेगानं होणाऱ्या या सामाजिक आणि वैचारिक स्थित्यंतराचं जे दर्शन, तुमच्या दीर्घायुष्याला तुम्हाला घडलं, त्याबद्दल काही भाष्य करता येणं शक्य आहे का?**

**उत्तर -** मूल्यव्यवस्थेत मुख्यतः दोन फरक आहेत. एक म्हणजे सामाजिक जन्मजात उच्च-नीचभाव कोलमडून पडतो आहे. तो कायद्याने कोलमडून पडला आहे. आणि व्यवहारातूनही हळूहळू तो जाईल. अर्थात त्याला वेळ लागेल. तसा सहजासहजी तो जाणं कठीण आहे. पण तो घालवला पाहिजे. कारण हिंदू समाजातला तो एक मोठा दोष आहे. उच्च-नीचभाव मानणं हा हिंदू समाजातला मोठा दोष संपूर्णत: जायला अजून खूप वेळ लागेल.

दुसरी गोष्ट अशी की, सगळी मानवजात एक आहे, अशी एक संस्कृती जगामधे निर्माण होते आहे. सामाजिक, राजकीय अशा सर्वच पातळ्यांवर या मानवजातीचं संमेलन होते आहे. हे जे सामाजिक, सांस्कृतिक मीलन होते आहे, त्यामुळे एक नवी, आधुनिक विश्वसंस्कृती तयार होत आहे. त्यात सगळी माणसं आहेत. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर, देशस्थ, कोकणस्थ, स्पृश्य - अस्पृश्य हे सगळे भेद नष्ट होताहेत. आता प्रशासनामध्ये जातीभेद नाहीत. त्यामुळे महारसुद्धा तुमच्या शाळेचा प्रिन्सिपॉल होऊ शकतो. कायद्यात झालेला बदल, प्रशासनात

झालेला बदल यामुळे सगळी मानवजात हळूहळू एका संस्कृतीमध्ये येते आहे. आज तुमचं ज्ञान एक आहे. इंग्लंड, अमेरिका, रशिया इथला माणूस जे गणित शिकतो, जगाचा इतिहास शिकतो, जो धर्मेतिहास शिकतो, तेच सगळ्या जगातले लोक शिकतात. ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्म हे अतिशय चिवट धर्म आहेत. पण हिंदू धर्म हा इतर धर्मांशी लवकर जुळवून घेणारा धर्म आहे. कारण त्याची मूळ बैठकच जुळवून घेण्याची आहे. हे हिंदू धर्माचं वैशिष्ट्य आहे. सर्वधर्मसमन्वय हा हिंदू धर्माचा दृष्टिकोन आहे.

**प्रश्न - कौटुंबिक व्यवहार आणि सामाजिक व्यवहार यात वेगवेगळ्या मूल्यव्यवस्था आढळतात, असं म्हणता येईल का?**

**उत्तर -** असं काही विशेष नाही. कारण काय आहे, कुटुंबव्यवस्थेत आज जातिव्यवस्था आढळते. समजा उदाहरण घ्यायचं झालं, तर शेजारच्या कुटुंबातली तेल्याची सून काही तुमच्या स्वयंपाकघरात येऊन बसणार नाही. पण शेजारची ब्राह्मण कुटुंबातली सून मात्र तुमच्या स्वयंपाकघरात येऊन बसेल. कौटुंबिक व्यवहार असे वेगळे आहेत. ते बदलायला दोनशे वर्ष लागतील.

**प्रश्न - आज जो धार्मिक पुनरुज्जीवनवाद भारतात तसेच जगात आलेला आहे हा श्रद्धांच्या मोडतोडीमुळे आलेला आहे की, मूल्यांच्या ऱ्हासामुळे आलेला आहे, आपल्याला काय वाटतं? उदा. अयोध्या मंदिर-मशीद वाद...**

**उत्तर -** मला वाटतं, हे धार्मिक पुनरुज्जीवन टिकणारं नाही. हे तात्पुरतं आहे. या आजच्या भावना आहेत, त्या उद्या टिकायच्या नाहीत. हिंदू आणि मुसलमान पाहिजे तितके एकजीव झालेले आज तुम्हाला दिसत नसले तरी मला पुढची पन्नास वर्ष नजरेसमोर दिसताहेत. अन् येत्या काळात ते एकजीव होतील. हा भेद का टिकून राहिला, त्याचं कारण जर बघितलंत, तर तुम्ही एकत्र जेवत नव्हता, ही एक मोठी अडचण होती. आता तुम्ही एकत्र जेवायला लागल्यानंतर हळूहळू तुमच्यातले भेद आपोआप कमी होतील.

आता बाबरी मशीद-रामजन्मभूमी वाद म्हणाल, तर हिंदूंचा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन जो आहे, की मंदिर, मशीद या गोष्टी मिथ्या आहेत, काल्पनिक आहेत. लादून घेतलेल्या आहेत. परमार्थ जो आहे तो मंदिर किंवा मशिदीत नाही, तर अंत:करणातल्या ईश्वराबाबतच्या भक्तीत तो आहे. या मंदिर आणि मशीद वादात परमार्थ नाही तर ते एक राजकारण आहे.

**प्रश्न - या वादाबाबत हिंदूंची किंवा मुसलमानांची भूमिका ही पुनरुज्जीवनवादी नाही का?**

**उत्तर -** हे पुन्हा सांगतो, हे एक राजकारण आहे.

**प्रश्न - आता शीख आणि मुसलमान यांच्यातला धार्मिक पुनरुज्जीवनवाद व हिंदूंच्यामधला धार्मिक पुनरुज्जीवनवाद यात काही फरक आहे का?**

**उत्तर -** फारच फरक आहे. हिंदू हा एका तऱ्हेनं एकदेवतावाद आहे आणि एका तऱ्हेनं बहुदेवतावाद आहे. म्हणजे एखादा हिंदू दत्ताला जास्त मानतो, एखादा देवीला मानतो, एखादा शिवपूजक असतो, एखादा विष्णुपूजक असतो. परंतु तरीही एका बाजूला तो सर्व देवांना मानतो. हा जो हिंदू आहे, हा खरा हिंदू. शीख, मुसलमान यांचे जे आग्रह आहेत ते हळूहळू खाली जाताहेत.

**प्रश्न - ही जी धर्मावर आधारलेली दर्शनं आहेत ती माणसाला आश्वासनं देणारी आहेत. पण बुद्धिप्रामाण्य आणि विज्ञाननिष्ठा यांच्या तपासणीत टिकणारं, मानवी जीवनाचं समग्र संगती लावणारं दर्शन आज उपलब्ध नाही.... त्याबाबत तुम्हाला काही सांगता येईल का?**

**उत्तर -** खरी गोष्ट आहे. असं दर्शन उपलब्ध नाही. असं आहे, शेवटी तुम्ही स्वतःच्या चित्ताचा शोध घेतलात तर लहानपणापासून तुम्ही ज्या वातावरणात राहिला आहात, त्याच्याबद्दल एक प्रकारची आस्था, आग्रह तुमच्या बुद्धीला असतो. हा आग्रह तुमच्या संस्कारामुळे आलेला आहे. लहानपणी कोणत्याही प्रकारचा संस्कार मनावर झालेला असेल तर त्याबाबतचा आग्रह असतो. आणि विचार केल्यानंतर हळूहळू त्या संस्काराची पकड कमी होते. पण ती नाहीशी होत नाही, अशी परिस्थिती आहे.

**प्रश्न - आधुनिक विचार मानणाऱ्या माणसांची मानसिक अस्वस्थता, समाजवरान्मुखता किंवा मूल्यविषयक निर्णयाच्या वेळी आढळणारी संदिग्धता यातून या गोष्टी उद्भवल्यात का?**

**उत्तर -** मूल्य हे व्यक्ती जसं बांधत असते तसं ते गट बांधतात, समाजही बांधतात, त्यामुळे मूल्य हे केवळ व्यक्तीच बांधत नाहीत, तर समाजही ते बांधत असल्यामुळे मूल्यव्यवस्था ही सामाजिकच असते.

**प्रश्न - बुद्धिप्रामाण्य सांगणाऱ्या ज्या थोड्या व्यक्ती आहेत...**

**उत्तर -** तुम्ही नीट विचार केलात, तर सगळी माणसं ही अंतिम अर्थानं बुद्धिप्रामाण्यवादीच आहेत, असं दिसेल. कारण तुम्हाला जे मनातून भावतं, पटतं तेच तुम्ही बोलता.

**प्रश्न - आधुनिक विचार करणारी माणसं ही समाजपरान्मुख आहेत, असं वाटतं का?**

**उत्तर -** नाही, तसं नाही; कारण सामाजिक जीवन ते जगतच असतात आणि समाजाच्या कलाप्रमाणे वागतही असतात.

**प्रश्न - पण त्यांना मग फॉलोइंग नाही असं वाटतं....**

**उत्तर -** करायचं काय आहे फॉलोइंग. ते स्वतःच फॉलो करतात. लोकांच्या पाठीमागे जातात.

**प्रश्न - वाढत्या वयाबरोबर माणसाची वैचारिक वाढ होत राहते. की काही काळानंतर ती मंदावत जाते, की ती थांबते?**

**उत्तर -** भिन्न भिन्न माणसांच्या बाबतीत वेगवेगळा फरक पडू शकतो. काहींची ती वाढते, काहींची थांबते. काहींची बदलते, कमी होते. असंही घडतं.

**प्रश्न - आता समजा एखाद्या गोष्टीचं नवीन आकलन झालं, तर त्या आकलनामुळे तारुण्यात होणारा आनंद व आता उतारवयात होणारा आनंद हे सारखेच उत्कट असतात का?**

**उत्तर -** उतारवयात उत्साह कमी असतो. परंतु हा आनंद प्रकृतीवर अवलंबून आहे. उतारवयातही प्रकृती चांगली असेल, तिच्या कुरबुरी नसतील तर एकप्रकारचं शांततामय उत्साहाचं वातावरण असतं. पण तरीही तरुणपणी बुद्धीला एखादी गोष्ट कळली, की जसा आनंद होत असे तसा तो उतारवयात होत नाही.

**प्रश्न - तुम्हाला आकलन झालेल्या व इतरांना आवर्जून सांगाव्या असं वाटणाऱ्या काही गोष्टी किंवा विचार आपण सांगू शकाल का? काही अनुभव, काही प्रश्न किंवा असं काही तरी, की जे लोकांना सांगावं असं तुम्हाला वाटतं ?**

**उत्तर -** असं काही माझ्यापाशी नाहीय.

**प्रश्न - काही गोष्टी मिळवायच्या राहिल्यात असं कधी वाटतं का?**

**उत्तर -** पुष्कळच गोष्टी मिळवायच्या राहिल्या आहेत.

**प्रश्न - अतिशय कृतार्थ जीवन आपण जगलेले आहात. खूप गोष्टी आपण मिळवल्यात. म्हणजे तुमचं जीवन हे 'सफल' आहे असं आमच्यासारख्यांना वाटतं. केंद्र सरकारनं आपल्याला 'पद्मविभूषण' हा सन्मान दिलेला आहे. आणि एका अर्थानं सबंध राष्ट्रानं आपली कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. आपल्या कार्याबद्दल आपल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आदर व्यक्त केलेला आहे. त्यासंबंधी आपली प्रतिक्रिया काय?**

**उत्तर -** ठीक आहे. मी शांत आहे.

**प्रश्न - आणखी काही सांगण्यासारखं म्हणजे काही प्रश्न किंवा हल्लीच्या संदर्भात काही सांगावंसं वाटतं का?**

**उत्तर -** असं आहे की, हल्लीच्या संदर्भात एक लक्षात ठेवलं पाहिजे की, आपले निरनिराळे प्रदेश आणि केंद्र यांचा जर विचार केला तर केंद्र हे सबल व्हायला पाहिजे अशी प्रवृत्ती असते. पण तसं करू नये, असं मला वाटतं. कारण त्यातून केंद्र तर सबल होणार नाहीच. उलट फुटीरपणा वाढत जाईल, सगळ्यांना एक स्वतःची स्वायत्तता आहे, ती लक्षात घेऊन वागावं. त्यांची ती स्वायत्तता हिसकावून घेतली जाऊ नये. तसा प्रयत्नही करू नये, कारण या नाही तर पुढच्या पिढीला दोष जाईल, नष्ट होईल. परंतु त्या स्वायत्ततेला जर मान्यता दिली तर ती स्वायत्तता ठेवून आपलं संघराज्य कायम राहू शकेल. केंद्रवर्ती सत्ता प्रबळ ही कल्पना आपल्याला बाधेल.

त्यामुळे तसं करू नये असं मला वाटतं. इंग्लंडमध्ये, संपूर्ण युरोप एक होण्याची जी चळवळ सुरू आहे आणि ते होण्याची शक्यता आहे. परंतु इंग्लंडमधली काही मंडळी या एकीकरणाला मानणार नाहीत.

**प्रश्न - दहशतवादासंबंधी आपण काय म्हणाल?**

**उत्तर -** ही मानसिक अवनती आहे.

**प्रश्न - त्यावर काही उपाय वगैरे...**

**उत्तर -** तुमची संघटना किती परिणामकारक आहे, यावर उपाय अवलंबून राहतील.

**प्रश्न - भ्रष्टाचार हा सर्व ठिकाणी वाढलेला आहे, असं म्हटलं जातं. यावर तुमचं मत काय?**

**उत्तर -** भ्रष्टाचार हा नेहमीच वाढलेला होता. 'परिस्थिती ही निराशाजनक आहे,' असा एक दृष्टिकोन नेहमीच असतो आणि मी त्या दृष्टिकोनाचा नाही.

**प्रश्न - विश्वसंस्कृतीचा मुद्दा, जो तुम्ही मघाशी मांडलात, त्याविषयी आणखी जरा सांगा.**

**उत्तर -** विश्वसंस्कृती म्हणजे, आजचं जे सगळ्या प्रकारचं ज्ञान आहे, समाजविषयक, विश्वविषयक. तर हे सगळ्या प्रकारचं ज्ञान एक होतं आहे. जेव्हा सगळं ज्ञान मुख्यतः एक होतं, तेव्हा संस्कृतीही ज्ञानातून येते. आज जगाचं ज्ञानच एक होतं आहे, वनस्पतीशास्त्र किंवा नक्षत्रशास्त्रच नव्हे, तर मानव देहाचं शास्त्र, अन्नविषयक शास्त्र ही सगळीच शास्त्र जगात एक होताहेत. उदाहरणार्थ आज आहाराला कोणते पदार्थ योग्य आहेत, असा जर प्रश्न विचारला तर त्याबाबत, अमेरिका, इंग्लंड, भारत किंवा जगातल्या कुठल्याही देशातल्या माणसांचे विचार एक आहेत. देह हा सगळ्या माणसांचा एकच असल्याने, त्याच्या पोषणाबाबतचे हे विचारही एकच आहेत. पुढे कौटुंबिक व्यवस्थासुद्धा हळूहळू एक होत जाणार आहे. बायकांचे शिक्षण वाढत गेलं की एक निराळी समाजव्यवस्था तयार होणार आहे. भारतात बायकांचे शिक्षण नसल्यामुळे अजून अशी कौटुंबिक व्यवस्था तितकी सुदृढ नाही, पण ती तशी होईल अशा परिस्थिती आहे, आणि ती तशी व्हायला पाहिजे.

**(* 'बखर' १९९२ पृ. १२७ ते १३१)**

ooo

१३

# तर्कतीर्थ : कार्य व योगदान

मुलाखतकार - **प्रा. मे. पुं. रेगे व मधु पटवर्धन**

१९१७ मध्ये सीतारामपंत कालवश झाले. त्या पूर्वी वाई येथील प्राज्ञपाठशाळा या संस्थेला कृष्णानदीकाठचा अनगळ यांचा वाडा खरेदी करून त्यांनी दान दिलेला होता. या संबंधी अधिक माहिती घ्यावी या हेतूने सुजित व बाळासाहेबांच्या बरोबर श्री. लक्ष्मणशास्त्री यांना वाई येथे भेटायला गेलो असता प्रथम त्यांनी आमचे हार्दिक स्वागत केले. श्री. लक्ष्मणशास्त्री व पटवर्धन बंधू श्री. रावसाहेब तसेच अच्युतराव यांचा अनेक वर्षे निकटचा संबंध आलेला आहे.

श्री. लक्ष्मणशास्त्री यांचे वयोमान पाहता स्मृती हुकमी पत्त्याप्रमाणे चालतेच असे नाही. पण आम्ही गेलो तो सुयोग असावा. शास्त्रीजींनी प्रथम जुनी शाळा बऱ्याच गैरसोयींची होती व त्यामुळे प्राज्ञपाठशाळेचे स्थलांतर सरस्वती सदन (सीतारामपंतांच्या मातोश्रींचे नाव) मध्ये झाल्यामुळे पाठशाळेतील पंचवीसएक विद्यार्थी तसेच श्री केवलानंद सरस्वती व त्यांचे सहकारी श्री. महादेवशास्त्री दिवेकर व इतरांची खूपच सोय झाली असे आवर्जून सांगितले. दिनक्रमाची माहिती देताना शास्त्रीजी म्हणाले की, आम्ही रोज स्नान करण्यासाठी कृष्णा नदीवर जात असू. बलसंवर्धनासाठी रोज सकाळी सूर्यनमस्कार घालावे लागत व संध्याकाळी कुस्तीचा सराव करावा लागे. श्री केवलानंद सरस्वती व त्यांचे सहकारी व्याकरण, न्याय, मीमांसा, धर्मशास्त्र व वेदांताचे ग्रंथ असे विविधांगी शिक्षण देत असत. पाठांतरावर साहजिकपणे अधिक भर असे.

प्राज्ञपाठशाळेच्या कार्याला साहाय्य गोळा करण्याचे कामही एक गट करीत असे व मोठ्या सुट्टीत पंडित महादेवशास्त्री दिवेकर यांच्या बरोबर अर्थसाहाय्य गोळा करण्याच्या कामगिरीवर लक्ष्मणशास्त्री यांना जावे लागे.

समाजाची प्रगती ज्ञानाच्या डोळ्याविना होऊच शकत नाही व नुसते ज्ञान असूनही भागत नाही. त्या ज्ञानाला नीतीची जोड द्यावी लागते. ‘अवघे धरू सुपंथ’ अशी जाणीव आवश्यक होऊन बसते. श्री केवलानंद सरस्वती यांचे चारित्र्यसंपन्न व्यक्तित्व व प्रकांड विद्वत्ता यांबद्दल संपूर्ण आदर तसाच विश्वास सीतारामपंत यांना वाटत होता व या प्राज्ञपाठशाळेतून महाराष्ट्राचा

तेजोमय विकास घडून येण्याची खात्री सीतारामपंत यांना वाटली म्हणूनच हे दान त्यांनी स्वेच्छेने केलेले आहे.

प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक श्री केवलानंद सरस्वती यांचा शांकरदर्शनाच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे अधिकारी भाष्यकार असा लौकिक असल्याने माधान अमरावतीचे प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांनी शास्त्रीजींना भेटून आपल्या अनध्यस्त विवर्तत्व कल्पनेची मांडणी त्यांना निवेदन केलेली होती असा स्पष्ट उल्लेख महाराजांच्या चरित्रात आढळतो.

प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज ज्यांना मानताहेत त्या केवलानंद सरस्वती यांनाच प्राज्ञपाठशाळेसाठी वाई येथे अनगळांचा वाडा खरेदी करून दान देतात या घटनेमागे सीतारामपंतांची निवड किती अचूक होती हे जसे सिद्ध होते, तितकेच त्यांचा शांकरदर्शनाचा - भारतीय संस्कृतीचा अभिमानही सहज सिद्ध होतो.

आजही प्राज्ञपाठशाळेमार्फत विशेष गाजावाजा न करता धर्मकोशाचे काम चालू आहे. नवभारत हे नियतकालिक वाङ्मय , समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र इत्यादी महत्त्वपूर्ण शाखांत दर्जा सांभाळून प्रबोधनाचे कार्य करीत आहे. प्राज्ञपाठशाळांचा प्रकाशन विभाग समृद्ध आहे.

१९३२ सालचा जंगल सत्याग्रह नगर जिल्ह्यात संगमनेर - अकोला तालुक्यांत मोठ्या प्रमाणावर झाला. तसाच गाजलाही होता. कै. दादासाहेब चौधरी, श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, अच्युतराव पटवर्धन, केशवराव गरुड, वृत्तपत्र प्रतिनिधी म्हणून कै. श्री. रा. टिकेकर तसेच अनेक तरुणांचा त्यात सहभाग होता. त्या सत्याग्रहाची अनेक छायाचित्रे श्री. रा. टिकेकर यांच्या कॅमेऱ्याने टिपली आहेत. एका चित्रात ते केवळ कासेच्या लंगोटीवर सर्व सामान डोक्यावर सांभाळून एक ओढा कंबरेच्यावर पाणी असता ओलांडत आहेत असे चित्र होते.

हे सर्व सांगताना लक्ष्मणशास्त्री खूपच प्रफुल्लित होते. शास्त्रीजींनी श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या वैचारिक नेतृत्वाचा स्वीकार केल्यापासून ते काही काळ ब्रिटिशांच्या सत्तेला आव्हान देणाऱ्या महात्माजींच्या नेतृत्वाखालील प्रवाहापासून थोडे दूर गेले होते. तो सर्व कालपट नजरेसमोर साकारत असावा अशा स्वरूपात हसत हसत शास्त्रीजी म्हणाले की, अच्युतरावांचे राजकीय भविष्य खरे ठरले. अच्युतरावांनी स्वच्छ सांगितले होते - 'शास्त्रीजी, कॉंग्रेस मानवेंद्रनाथ रॉय यांचा स्वीकार करू शकणार नाही.' शास्त्रीजी म्हणाले, 'रावसाहेब हा अनेकांना अधिक जवळचा आधार वाटत असे' पण अच्युतरावांची नियुक्ती कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य म्हणून झाल्यापासून 'राष्ट्रीय नेता' अशा दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले व १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामाचे श्रेष्ठ क्रांतिकारक असे त्यावर शिक्कामोर्तब झाले.

अच्युतरावांच्या व्यक्तित्वाला लक्षणीय असा एक सांस्कृतिक धागा होता व तो त्यांनी अखेरपर्यंत जपलेला होता. हिंदी-मराठी-इंग्रजी या तिन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. एक निर्विवाद असा मोठा मनुष्य होता तो.

आमची मुलाखत संपलेली होती. प्राज्ञपाठशाळेच्या जवळच पूर्वाश्रमीचे श्री. नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद यांचे स्मारक उभे आहे. डॉ. राजेंद्रप्रसाद राष्ट्राध्यक्ष असता त्यांच्या शुभहस्ते त्या भव्य वास्तूचे उद्घाटन झाले.

## धर्मकोश आणि विश्वकोश

पण या सर्वांपेक्षा श्री केवलानंद सरस्वती यांचे स्मारक म्हणजे श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रमुखत्वाखाली प्रसिद्ध झालेला विश्वकोश असेच मानावे लागेल आणि हा ज्ञानयोगी तपस्वी सीतारामपंतांनी हिरेपारख करणाऱ्या नजरेने हेरला होता व आपल्या आईच्या नावाने 'सरस्वती-सदन' त्यांनी प्राज्ञपाठशाळेला अर्पण केले, ही त्यांच्या सामाजिक जाणिवेची साक्ष मानावी लागेल.

स्वामी केवलानंद सरस्वती ह्यांच्या प्रेरणेने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी अंगावर घेतलेले सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे धर्मकोशाची रचना होय.

'धर्म' ही भारतीय संस्कृतीतील एक मूलभूत संकल्पना आहे. ह्या संदर्भात धर्म म्हणजे व्यक्तीच्या आणि समाजाच्या आचरणाचे नियमन करणारे तत्त्व किंवा तत्त्वे होत.

सामाजिक रचना, कायदे, राजकीय, आर्थिक व सामाजिक संस्था, त्यांचे व्यवहार, व्यक्तीवर करण्यात येणारे संस्कार, व्रते, उपासनापद्धती, आध्यात्मिक साधना इ. ह्या सर्वांचे नियमन धर्माकडून होते. धर्मकोशात धर्माच्या ह्या सर्व अंगांचा ऊहापोह करण्यात आला आहे. तेव्हा धर्मकोश हा धर्मविषयीचा ज्ञानकोश आहे असे त्याचे वर्णन करणे योग्य ठरते.

वेद किंवा श्रुती आणि स्मृती हे धर्माला आधारभूत असलेले ग्रंथ होत. पण ह्याशिवाय रामायण, महाभारत इ. महाकाव्ये, श्रुती आणि स्मृती ह्यांवरील मान्यता पावलेली भाष्ये व टीका आणि अधिकारी विद्वानांनी धर्मशास्त्रात अंतर्भूत असलेल्या विषयांवर लिहिलेले निबंध ह्यांचाही धर्मशास्त्राच्या प्रमाण साहित्यात अंतर्भाव होतो. निबंधकारांची ही परंपरा १८व्या शतकापर्यंत अखंडित होती. आणि एका अर्थाने आजही ती चालू आहे. म्हणजे ३० शतकांहून अधिक ऐतिहासिक काल व्यापणारे हे साहित्य आहे. ह्या सर्व साहित्याचा परामर्श धर्मकोशात घेण्यात आला आहे.

धर्मकोशाच्या रचनेचे तत्त्व असे आहे : धर्मशास्त्रात अंतर्भूत असलेला कोणताही विषय घेतला, म्हणजे धर्माचे एखादे विशिष्ट अंग घेतले तर त्याविषयी जी वचने या साहित्यसंभारात आढळत असतील ती कालक्रमाने धर्मकोशाच्या त्या विभागात रचलेली असतात. उदा. स्त्रीधर्म हा असा एक विषय आहे. आयुष्याच्या वेगवेगळ्या अवस्थांत - बालपणी, तारुण्यात, प्रौढावस्थेत इ. - वेगवेगळ्या वर्णाच्या स्त्रियांनी कसे वागावे, त्यांचे अधिकार काय असतात, त्यांची कर्तव्ये काय असतात, कोणत्या प्रकारची मालमत्ता त्यांना बाळगता येते, तिचा विनियोग कसा करता येतो, कुटुंबात त्यांनी कसे वागावे, कोणते आदर्श स्वीकारावेत, कोणत्या प्रकारची उपासना करावी इत्यादी प्रश्नांविषयी वेदांत, सर्व स्मृतींत, महाभारत - रामायण इत्यादींत जे म्हटले

असेल, जी वचने असतील ती सर्व कालक्रमाने रचून धर्मकोशात संग्रहित केलेली आहेत. पण एवढेच नव्हे. ह्या वचनांचा अन्वयार्थ कसा लावण्यात आला आहे आणि नंतरच्या निबंधकारांनी ह्या भाष्यांचा अर्थ कसा लावला आहे, ह्याविषयीची वचनेही कालक्रमाने धर्मकोशात देण्यात आली आहेत. स्त्री धर्मावरील धर्मकोशातील हा विभाग जर एखाद्याने अथपासून इतिपर्यंत वाचला तर स्त्रियांच्या आदर्श आचरणाविषयीचा विचार आणि स्त्रियांचे रूढ आचार ह्यांत कशी कशी स्थित्यंतरे होत गेली ह्याचे ऐतिहासिक चित्र त्याच्या डोळ्यापुढे उभे रहाते. धर्माच्या सर्व अंगांविषयीचा मूळ अधिकृत वचनांच्या माध्यमातून काढलेला ऐतिहासिक आलेख असे धर्मकोशाचे स्वरूप आहे.

स्वामीजी आणि लक्ष्मणशास्त्री ह्यांची धर्मकोशाच्या रचनेमागची जी प्रेरणा होती ती केवळ पंडिती नव्हती. भारतीय संस्कृती, भारतीय समाजशास्त्र, भारताचा सामाईक इतिहास, भारतीय नीतिशास्त्र इ. विषयांच्या अभ्यासकांना धर्मकोश अत्यंत उपयुक्त आहे ह्यात शंका नाही. पण विद्वानांना असा ग्रंथ उपलब्ध करून देणे एवढेच धर्मकोशाचे प्रयोजन नव्हते. ह्याशिवाय धर्मकोशाचे एक व्यावहारिक प्रयोजनही होते. सर्वसामान्य हिंदूंना त्यांच्या धर्मविषयीचे एक महत्त्वाचे तत्त्व पटवून देणारी सामग्री संग्रहित करणे हेही धर्मकोशाचे उद्दिष्ट होते. हे तत्त्व असे की, धर्माची मूलभूत तत्त्वे जरी चिरंतन, अपरिवर्तनीय असली तरी ह्या तत्त्वांना अनुसरून जो सामाजिक व्यवहार होत असे तो वेळोवेळी बदलला गेला आहे. त्यात सुधारणा करण्यात आली आहे म्हणजे वेळोवेळी ज्या आचरणाला त्या त्या वेळचे लोक आपला धर्म मानीत, त्या धर्मात परिवर्तन होत आहे आणि सुधारणा करण्यात आली आहे, ही सुधारणा त्या त्या युगात धर्मशास्त्रज्ञांनी केली आहे. ह्यापासून काढायचा निष्कर्ष असा की, ह्या तत्त्वाला अनुसरून आज प्रचलित असलेल्या आचरणात - धर्मात - सुधारणा करण्याची जबाबदारी आजच्या धर्मशास्त्रज्ञांवर आहे आणि तसे करण्याचा त्यांना अधिकार आहे. आज हे तत्त्व सर्वांना पटलेले आहे, पण धर्मकोशाच्या रचनेला प्रारंभ झाला तेव्हा शास्त्रीपंडितांना हे पाखंडी तत्त्व वाटत होते.

धर्मकोशाची पुढील काण्डे संकल्पित आहेत : ह्यांतील उपनिषत्कांड, राजनीतिकांड, व्यवहारकांड ही प्रसिद्ध झाली आहेत. वर्णाश्रमधर्मकांडावर सध्या काम चालू आहे. ह्या कांडाचा एक भाग प्रसिद्ध झाला आहे.

विश्वकोश म्हणजे ज्ञानकोश. आज जे मानवी ज्ञान उपलब्ध आहे त्याची मराठीत मांडणी करून ते मराठी वाचकांना उपलब्ध करून देणे हे विश्वकोशाचे उद्दिष्ट आहे. संपूर्ण मानवी ज्ञानाची तीन क्षेत्रे आहेत असे मानता येईल : १) गणित व तर्कशास्त्र, भौतिकी (फिजिक्स), रसायनशास्त्र, जीवशास्त्र, इ. निसर्गशास्त्रे आणि त्यांवर आधारलेले तंत्रज्ञान, २) समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र इ. सामाजिक शास्त्रे, ३) इतिहास, सर्व जागतिक भाषा आणि त्यांतील ललित साहित्य, कला, तत्त्वज्ञान इ. मानव्यविद्या (ह्युमॅनिटीज्). आज ह्या क्षेत्रात जे ज्ञान उपलब्ध आहे त्याचा मराठी वाचकांसाठी संग्रह करणे हे विश्वकोशाचे प्रयोजन आहे.

विश्वकोशाची रचना मूळ एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका ह्या इंग्रजी विश्वकोशाच्या नमुन्यावर आखण्यात आली आहे, म्हणजे त्यातील नोंदी ह्या अकारविल्हे देण्यात आल्या आहेत. उदा. 'मोगल साम्राज्य' ह्या विषयावरील नोंद ही 'म' ह्या अक्षराने सुरूवात होणाऱ्या नोंदीमध्ये आढळेल. 'महाराष्ट्र' ह्या वरील नोंदही 'म' वर्गाच्या नोंदीमध्ये असेल. उलट 'अकबर' हा मोगल साम्राज्याचा इतिहासातील महत्त्वाचा बादशहा आहे. मोगल साम्राज्यावरील नोंदीत अकबराविषयीची काही माहिती येईल; पण अधिक सविस्तर माहिती 'अकबर' ह्या नोंदीत दिली जाईल आणि ही नोंद 'अ' वर्गातील नोंदीत असेल. 'अंकगणित' ही महत्त्वाची नोंद अर्थात 'अ' वर्गातील नोंदीमध्ये असेल.

विश्वकोशाचे एकंदर २० खंड संकल्पित आहेत. त्यांतील १७ खंड शरीर खंड आहेत. म्हणजे सर्व विषयांवरील नोंदी पहिल्या १७ खंडात सामावलेल्या असतील. १८वा खंड हा नकाशा खंड होय. हा जगाचा मराठी ॲटलास असेल. असा जागतिक ॲटलास कोणत्याही भारतीय भाषेत अजून प्रसिद्ध झालेला नाही. विश्वकोशात जी मराठी परिभाषा वापरण्यात आली आहे तिची माहिती करून देणारा 'परिभाषा खंड' हा एकोणिसावा खंड असेल आणि शेवटचा २०वा म्हणजे सूची-खंड.

श्री. लक्ष्मणशास्त्री प्रमुख संपादक होते तेव्हा प्रा. रा. ग. जाधव उपसंपादक म्हणून मानवी (ह्युमॅनिटीज) विभागाचे प्रमुख होते, शास्त्रीजींच्या दुःखद निधनानंतर प्रा. रा. ग. जाधव निवृत्तीपर्यंत प्रमुख होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक आहेत आणि त्यांच्याच प्रेरणेने हे प्रचंड काम महाराष्ट्र सरकारने हाती घेऊन त्यांच्यावर सोपविले आहे. ह्या कामाचे नियोजन करून ते योग्य रीतीने 'पार' पाडले जावे म्हणून त्याच्यावर देखरेख करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जे विश्वकोशनिर्मिती मंडळ नेमले आहे त्याचे अध्यक्षही लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत.

**(* कै. रावबहाद्दूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन गौरवपर स्मृतिग्रंथ 'तीर्थस्वरूप' मधून.)**

OOO

*

(ब)

# परात्मपर मुलाखती

*

१४

# ज्ञानसक्तीसाठी पुनरुज्जीवन आवश्यक

मुलाखतकार - **जयंत देवकुळे**

पुणे-महाबळेश्वर रस्त्यावर घाटचढणीपूर्वी लागणारे सुस्त वाई गाव आता शहरी मंडळींच्या फारसे मनात भरत नाही. या गावाला तसे दर्शनी सौंदर्य राहिलेले नाही किंवा व्यापारी महत्त्वही नाही. तथापि, महाबळेश्वरच्या पर्वतराजीत जन्म पावलेली कृष्णा नदी वाईमधून संथ वाहते आणि सरदार रास्त्यांनी वाईतील गंगापुरी, गणपतीआळी, धर्मपुरी या आळयांच्या आणि अन्य मराठी सरदारांनी या राण्यांनी ब्राम्हणशाही आदी आळयांतून कृष्णा तीरावर सुंदर दगडी घाट व मंदिरे बांधलेली आहेत. यामुळे वाईच्या परिसरास एक आगळेच सौदर्य उत्पन्न झाले आहे. कृष्णा या महानदीच्या अस्तित्वामुळे वाईला श्रीक्षेत्र म्हटले जाते, आणि वाईसभोवतालच्या उंच उंच डोंगरांमुळे या भागाला वाई खोरे म्हटले आहे. शिवाजी महाराजांच्या हत्येचा विडा उचलून विजापूरहून निघालेला अफजलखान प्रतापगडावर पोहोचण्यापूर्वी वाईतच तळ ठोकून राहिला होता.

तथापि पन्नास-साठ वर्षांपूर्वी वाईचे नाव इंग्रजी अमलात उभ्या महाराष्ट्रात दुमदुमले ते तेथे कै. नारायणशास्त्री मराठे (नंतरचे नाव केवलानंद सरस्वती) यांनी स्थापन केलेल्या प्राज्ञपाठ शाळेमुळे. इंग्रजी समवेत संस्कृतचे अध्यापन व राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामाची प्रेरणा हे प्राज्ञपाठशाळेचे वैशिष्ट्य होते आणि खरोखरच त्या वेळचे या विद्यामंदिराचे स्वरूप प्राचीन काळच्या ऋषींच्या आश्रमासारखे अत्यंत पवित्र होते. कै. नारायणशास्त्री अत्यंत तेजस्वी ब्रह्मचारी पुरुष. त्यांचा प्रभाव सबंध गावावर होता. अशा विशिष्ट पद्धतीत साहित्य संस्कृती मंडळाचे संचालक आणि मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे व्यक्तिमत्त्व तयार झाले, भावी आयुष्यक्रमाचे वळणही तेथेच निश्चित झाले.

त्यांचे पहिले दर्शन मला त्यांच्या ऐन तारुण्यात वाईच्या गंगापुरी घाटावर एका शांत संध्याकाळी झाले. त्या वेळी ते होते प्राज्ञपाठशाळेत अध्यापक आणि नारायणशास्त्रींचे श्रेष्ठ शिष्य म्हणून. ब्राह्मणी पद्धतीने नेसलेले धोतर आणि खांद्यावर पंचा, सावळा, सुदृढ शरीरबांधा,

रेखीव तजेलदार मुद्रा, विद्यासंपादनाचे तेज त्या तरुणाच्या मुखावर विलसत होते. लांबलचक दगडी घाटावर एका टोकापूसन दुसऱ्या टोकापर्यंत त्या समवयस्क तरुणांची 'जलमिति भस्मलमितिभस्म' यावर तत्त्वपूर्ण चर्चा चालू होती. उत्सुकतेने मी मित्रमंडळात चौकशी केली, 'कोण हे गृहस्थ?' प्राज्ञपाठशाळेत जाणाऱ्या दत्तू देशपांडे या माझ्या दोस्ताने सांगितले, 'हे लक्ष्मणशास्त्री जोशी. नारायणशास्त्रींचे कल्याण शिष्य?'

शास्त्रीजी सहज बोलतात पण त्यात तत्त्व असतं. त्यानंतर मला जे शास्त्रीजींचे दर्शन झाले ते सर्वस्वी वेगळ्या वेषात-मुद्दाम पालटलेल्या नामजोशी यांच्या वाड्यातील तिसऱ्या मजल्यावर, कायदेभंगाचे ते दिवस होते आणि काही काळ ते भूमिगत होते. बाकी पोशाख सुखवस्तू व्यापाऱ्याला साजेसा होता. मी प्रथम त्यांना ओळखलेच नाही. पण ओळखले तेव्हा नाकावर बोटे ठेवून तेच म्हणाले, 'चूप!'.

आणखी कित्येक वर्षे उलटली. शास्त्रीजींच्या विद्वत्तेची प्रभा भारतभर पसरू लागली होती. 'वैदिक संस्कृतीचा विकास' या त्यांच्या ग्रंथाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले होते. विचाराने ते पुष्कळच वर्षे रॅयिस्ट बनले होते. या काळातच श्री. यशवंतराव चव्हाणांचे ते वैचारिक सुहृद होते, आणि आज घडीलासुद्धा श्री. यशवंतराव शास्त्रीजींना मानतात. दिल्ली मुक्कामी १९५४ साली कै. काकासाहेब गाडगीळांच्या प्रयत्नाने भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भारतीय किर्तीचे मराठी विद्वान म्हणून शास्त्रीजींनाच बहाल झाले होते. दिल्लीत येते वेळी शास्त्रीजींनी आपल्या सोबत आपले पूजनीय गुरुदेव कै. केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांना आणले होते. त्या वेळी दिल्लीच्या कम्युनिटी हॉलमधील संमेलनाच्या व्यासपीठाला या अलौकिक गुरुशिष्यांची जोडी काही आगळीच शोभा देत होती. (या संमेलनाच्याच उद्घाटन प्रसंगी कै. काकासाहेब गाडगीळांवर दोषारोप करण्याच्या हेतूने आदल्या रात्री दिल्लीत कोसळलेल्या अवेळी पावसाबद्दलचा सर्व दोष आचार्य अत्रे यांनी काकासाहेबांवर ठेवला होता.)

आता शास्त्रीजींनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे. तरीमुद्धा विचाराने व वृत्तीने ते चिरतरुण आहेत. या संदर्भात त्यांना भेटावे, जिव्हाळयाच्या सामाजिक प्रश्नांवर त्यांचे विचार ऐकावेत, त्यांच्या मतप्रणालीचा पण अंदाज घ्यावा या दृष्टीने त्यांची मी भेट घेण्याचे ठरविले. वास्तविक ते साहित्य संस्कृती मंडळाच्या कामासाठी वारंवार मुंबईस येतात पण अनुकूल वातावरणासाठी त्यांची भेट वाई मुक्कामी त्यांच्या पन्नाससाठ वर्षांच्या बैठकीवरच घ्यावी असे मी प्रथमपासून ठरवले होते. १५ फेब्रुवारी १९७५ रोजी वाईत त्यांचा अमृत महोत्सवाचा सोहळा आयोजित झाला होता. तेव्हा सोहळ्याची सर्व धांदल संपल्यावर त्यांनी मला वाईस बोलावले माझेही जन्मगाव वाई असल्यामुळे वाईस जायला आणि वाईचे नव्याने बदललेले स्वरूप पाहण्यास माझ्या परीने उत्सुक होतोच,

निदान गंगापुरी या भागाचा तोंडवळा खरोखर खूपच बदललेला दिसला. एकतर जेथे मातीची

काही पडकी, छोटी घरे आणि एक गवताळ निरुपयोगी आवार होते, त्या जागी मराठी विश्वकोश कार्यालयाची भव्य वास्तू 'केवलानंद स्मारक मंदिर' उभे राहिलेले दिसले. तसेच नदीवरच्या घाटाला लागून असलेल्या जुनाट आणि गांधी हत्येनंतर अर्धवट जळलेल्या रास्ते वाड्यात विश्वकोश मुद्रणासाठी एक छोटीशी पण अत्यंत रेखीव प्रामुख्याने स्वच्छ मुद्रणालय शासनाने थाटलेली आहे. या मुद्रणालयात एक वर्षाच्या अवधीत मराठी विश्वकोशाचे १००० पृष्ठांचे दोन खंड छापून तयार आहेत. त्यांच्या विश्वकोशासारख्या प्रचंड आणि ग्रंथाचे स्वरूप माहीत असेल त्यांनाच या छोट्या मुद्रणालयाचे प्रावीण्य आणि मूक कामावरचे प्रेम ध्यानात येऊ शकेल.

मराठी विश्वकोशासारख्या खरोखरच विश्वरूपी कार्यापूर्वी २५ वर्षे शास्त्रीजींनी 'धर्मकोशा'वरील खंड तयार करण्याची आणखी एक अवघड जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या प्रत्येक ६०० ते हजार पृष्ठांच्या नियोजित २५ भागांपैकी अकरा भाग आत्ताच छापून प्रसिद्ध झाले आहेत. ते सर्व संस्कृतमध्ये आहेत. असा हा धर्मकोश त्यांनी तयार करावा अशी त्यांच्या गुरुदेवांची आज्ञा होती. याचा अर्थ असा की साहित्य, संस्कृती व समाज उद्बोधन या तीन महत्त्वपूर्ण सामाजिक घटकांबाबतचे उत्तरदायित्व निदान महाराष्ट्रापुरते तरी शास्त्रीजींकडे आहे.

स्वातंत्र्यप्राप्ती झाली. सर्व जगातील मोठे लोकशाहीप्रधान राष्ट्र अशी दिगंत कीर्तीही मिळाली, परंतु राष्ट्राचे लोकांचे दैन्य संपले नाही. उलट शिवरायांच्या काळात वाईच्या दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करणारे राष्ट्रसंत समर्थ यांनी पुढील शब्दात वर्णिलेली परिस्थिती आजही असावी, यामुळे विलक्षण उद्विग्नता वाटते.

जन बुडाले बुडाले । पोटेविण गेले।
बहुत कष्टले कष्टले । किती एक मेले।।

असे का व्हावे? सध्याचे अस्वस्थ जीवन कसे सुधारू शकेल, भारतीय परंपरेत तत्त्वज्ञान आणि संस्कृतीतच या दैन्याचे अस्वस्थतेचे बीज आहे हा विचार मनाला व्यथित करणारा आहे. या प्रश्नांची मीमांसा अधिकारवाणीने करू शकणाऱ्या विद्वानांत शास्त्रीजींचे विशेष स्थान आहे. कारण वेद उपनिषदे, गीता आणि ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ त्यांनी आत्मसात केलेच आहेत, पण त्याबरोबर पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विशेष मार्क्सवाद यातही अवगाहन केले आहे. शंकराचार्यांच्या वेदांताप्रमाणे कांट, रसेल, व्हाईट हेड आदी आधुनिक तत्त्ववेत्त्यांवरही ते अधिकारवाणीने बोलू शकतात. थोडक्यात म्हणजे वैचारिक मार्गदर्शन करण्याचा त्यांचा अधिकार मोठा आहे. म्हणूनच 'मुद्रा'च्या वाचकांसाठी त्यांचे विचार जाणून घेण्यास उत्सुक आहे. मुलाखत ठरलेल्या दिवशी पुण्याहून निघून सकाळी ११ वाजता वाईस पोहोचलो. पोहोचताक्षणी शास्त्रीबुवांचे स्वीय सचिव श्री. कोल्हटकर यांचेकडे शास्त्रीबुवांकडे देण्यासाठी अगोदरच तयार केलेली प्रश्नपत्रिका दिली. कारण मुलाखतीची वेळ दुपारी दोनची होती. तोपर्यंत वाईतील शासकीय मुद्रणालय, विश्वकोश कार्यालय आदी गोष्टी मला नीटपणे पहावयाच्या होत्या. माझ्या मनाला आणखी एका गोष्टीचा आनंद होता, त्याच दिवशी दुपारी चार वाजता शास्त्रीजींचे हस्ते विश्वकोशाच्या चौथ्या खंडाच्या


वाय १७८-१५

जुळणीस समारंभपूर्वक प्रारंभ होणार होता. त्यासाठी शासकीय मुद्रण लेखन सामग्री संचालक श्री. स. आ. सप्रे मुंबईहून मुद्दाम वाईस आले होते.

दुपारी दोनच्या मानाने शास्त्रीजींच्या प्राज्ञपाठशाळेतील खाजगी कार्यालयात मी जाऊन बसल्या ठिकाणाहून जाड जाड गजांच्या खिडकीतून गंगापुरीच्या घाटाचे दृश्य दिसत होते. कार्यालयाची खोली विविध विषयांवरील ग्रंथांनी भरून गेली होती. त्या जागी प्रथम दृष्टिपथात येणारी, आणि मग सर्व वेळ नजरेसमोर राहणारी वस्तू म्हणजे ग्रंथ! ग्रंथ!!

एकच विचार मनात पुन्हा पुन्हा येत होता. हे सर्व ग्रंथ नुसते वाचायला व त्यातील विचार पचवायला आयुष्य पुरेल का ? समाजसुधारणेसाठी त्याचा उपयोग करता येईल का ?

तेवढ्यात तिथे शास्त्रीजींचे आगमन झाले आणि उत्तरे न मिळणाऱ्या निष्फळ विचारांतून माझी सुटका झाली. समोरच्या सोफ्यात शास्त्रीजी बसले. माझ्याकडे बघून त्यांनी हास्य केलं.

'खूप दिवसांनी आलात वाईला', ते म्हणाले.

'येण्याचे कामच पडत नाही', मी त्यांना सांगितले, 'आज मात्र मी काम घेऊन आलोय.'

'आमचा छापखाना पाहिलात?' त्यांनी विचारले, 'छोटासा आहे!'

'पण त्याची कामाची ताकद दांडगी आहे. विश्वकोश छपाईसारखं अतिशय क्लिष्ट काम तिथली मंडळी चांगल्या रीतीने करीत आहेत. शासकीय छापखाना असूनही त्याची उत्पादन-क्षमता उत्कृष्ट आहे, टापटीप व स्वच्छता दृष्ट लागण्याजोगी आहे', मी म्हटले.

''तुमच्यासारखा मुंबईचा प्रेसवाला आमच्या प्रेसची प्रशंसा करतो यात सर्व काही आम्हाला मिळाले,'' शास्त्रीजी उद्गारले.

'विशेष म्हणजे या छापखान्यातले कर्मचारी डिव्होटेड' म्हणजे स्वत: ध्येयवादी दिसले, आपण काही विशेष स्वरूपाचे आहोत, हीच भावना तेथील तरुण व्यवस्थापकापासून सर्वांमध्ये आढळली. हे आपले यश महत्त्वाचे आहे. या भावनेमुळे त्यांचा मला हेवा वाटला,' मी म्हटले, 'यातून माझ्या मते एक नवं तत्त्व प्रस्थापित होत आहे.'

'कोणतं ?' माझी परीक्षा घेण्यासाठीच कदाचित शास्त्रीजींनी प्रश्न केला असावा.

'हेच की, कोणतंही काम करीत असताना आपण एक समाजोपयोगी कार्य करीत आहोत आणि त्यातून जनजागृती होणार आहे. ही शासकीय कर्मचाऱ्यांची किंवा कामगारांची श्रद्धा असली तर त्याच्या कामात आपोआपच दर्जेदारपणा येतो.'

शास्त्रीजींनी स्मितपूर्वक मान हलवली. माझे निदान त्यांना पटले असावे. मग ते म्हणाले, 'तुमचे प्रश्न मला मिळाले, मी त्यावर विचार करून ठेवला आहे. तेव्हा तुम्ही एकेक प्रश्न वाचा. माझी उत्तरे लिहून घ्या. चालेल ना?'

'जरूर!' मी म्हटले. माझी टिपणवही आणि फाउंटनपेन सरसावून बसलो. मग मी पहिला प्रश्न वाचला

**प्रश्न : साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्याची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या कोणत्या ?**

**उत्तर :** याबाबत आमच्यासमोर दहा कलमी योजना आहे. त्यात साहित्य, संस्कृती,

इतिहास या क्षेत्रातील संशोधनाला चालना देणे, तसेच अशा संशोधनांचे मराठीतून प्रकाशन करण्यास मदत करणे वा स्वतः मंडळाने छापवून प्रकाशित करणे व स्वतंत्र व विद्वत्मान्य प्रबंध, ग्रंथ, नियतकालिके त्याचप्रमाणे ज्ञान विज्ञानाच्या कोणत्याही शाखेची अन्य मराठी भाषांतरे करण्यासाठी साहाय्यभूतपणे दिल्लीच्या साहित्य अकादमीने अगोदरच भाषांतरासाठी घेतलेले ग्रंथ वगळून मराठी व भारतीय व परदेशी भाषा यातील उत्कृष्ट ग्रंथांची मराठीत भाषांतर करून घेणे हे आमच्या मंडळाचे काम आहे. महाराष्ट्राचा इतिहास व संस्कृती यांची आधारभूत अशी महत्त्वाची प्रकाशित किंवा अप्रकाशित साधनसामुग्री संपादित करणे मराठीत भाषांतरित करून ती प्रसिद्ध करणे. याचप्रमाणे महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय सांस्कृतिक व वाङ्मयीन इतिहासाचे संपादन व प्रकाशन करण्याबाबतच्या योजनांना चालना देणे अशी काही आमची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. शिवाय मराठी साहित्याच्या आभिवृद्धीच्या दृष्टीने ज्ञान विज्ञानाच्या कोणत्याही शाखेत संशोधन कार्य, नव्या मार्गाचा शोध घेणे, पर्यायाने खुद्द मंडळ आणि अन्य खाजगी संस्था व विद्वान यांनी हाती घेतलेल्या वेगवेगळ्या वाङ्मयीन कार्याच्या प्रगतीबाबत शासनास वेळोवेळी माहिती देण्याची जबाबदारी मंडळाने स्वीकारली आहे. इतिहासाविषयी संशोधन व साहित्याची आभिवृद्धी याबाबतचे धोरण आखण्यास शासन सहाय्यभूत होणे हेसुद्धा आमचे काम आहे.

या संदर्भातच आम्ही वाङ्मयीन कार्यक्रम आखले असून याबद्दलची सर्व संकलित माहिती एका पुस्तिकेत संग्रहित केली आहे. ही पुस्तिका तुम्ही चाळली तर तुम्हाला आमच्या साहित्य संस्कृती मंडळाच्या उद्दिष्टांची पर्यायाने आमच्या एकंदर कार्यक्रमाची सहज कल्पना येऊ शकेल.

बोलता बोलता त्यांनी माझ्या हातात दिलेले ‘महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळः उद्दिष्टे, कार्यक्रम व प्रगती’ असा मथळा असलेल्या पुस्तिकेवर मी झर्रकन नजर फिरवली व नंतरचा प्रश्न विचारला.

**प्रश्न: आपल्या मंडळाच्या नावांध्ये विज्ञानाचा उल्लेख नाही हे कसे?**

**उत्तर:** संस्कार म्हणजे नवगुण निर्मिती. ज्ञान विज्ञान हा मानवाने संपादिलेला पहिला गुण होय. संस्कृती या शब्दाच्या अर्थामध्येच मनुष्याने निर्माण केलेल्या सर्व इष्ट अशा परंपरांचा अंतर्भाव होतो. त्यात ज्ञान विज्ञानाची परंपरा ही मूलभूत गोष्ट आहे. त्याशिवाय संस्कृतीला स्थापन स्वरूप येऊ शकत नाही. विज्ञानाशिवाय मनुष्याची या जगातील वस्ती टिकून शकत नाही. भोवतालच्या जगाचा अर्थ नीटपणे समजणे म्हणजेच विज्ञान. आणि खरं म्हणजे भोवतालच्या जगाचा अर्थ कळल्याशिवाय मनुष्याचा या पृथ्वीवरचा संसार चालू शकणार नाही. संस्कृती या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे.

**प्रश्न: साहित्य संस्कृती मंडळाच्या ग्रंथांचा प्रसार आणि खप अपेक्षेप्रमाणे होत आहे का?**

**उत्तर**: साहित्य संस्कृती मंडळाच्या कक्षेत खपाचा प्रश्न येत नसला तरी आम्ही तो आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. शासनप्रणित ग्रंथाच्या खपाची यंत्रणा अजून व्यवस्थित रीतीने निर्माण झालेली नाही. तथापि त्या दिशेने आमचे प्रयत्न चालू आहेत. ज्या ग्रंथाचा प्रत्यक्ष आर्थिक

उत्पादनाशी किंवा यंत्र संचालनाशी संबंध येतो, अशा तंत्रसंबंधी ग्रंथाचा खप मात्र चांगल्या प्रमाणात होतो, असे आमच्या निदर्शनास आले आहे. कुशल कामगारांना उपयुक्त असे ग्रंथ लवकरच आम्ही निर्माण करणार आहोत.

उदाहरणार्थ, 'रेडिओ रचना' व 'रेडिओ दुरुस्ती' किंवा 'कातण यंत्राचे अंतरंग', 'रेकॉर्ड प्लेयर' इत्यादी पुस्तके भराभर खपत आहेत. काहींच्या तर तिसऱ्या आवृत्ती छपाईस गेल्या आहेत. अशा प्रकारे ग्रंथ ही साहित्य संस्कृती मंडळ तज्ज्ञांच्याकडून लिहवून घेत आहे.

उलट तात्त्विक विषयांवरील ग्रंथ सावकाशपणे स्वस्तात, उदा. अणुयुग, प्राणिसृष्टी, मानवी देह, वनश्रीसृष्टी अशांसारखे ग्रंथ सामान्य, जिज्ञासू वाचनवर्गाला विज्ञानाचे विषय समजावून देण्यासाठी प्रकाशित झाले आहेत. परंतु त्यांच्या खपाला मात्र पाहिजे तेवढा वेग नाही. आमचा दुसरा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे, तो म्हणजे आंतरभारती, आपल्या भारतातील ज्या मराठीसारख्या प्रगत भाषा आहेत, त्यांचे कोश, भाषा, भाषाप्रवेश व साहित्य परिचय अशा तीन विषयांवरील ग्रंथ आम्ही प्रकाशित करीत आहोत. उदा. बंगाली, गुजराती, कन्नड, तामीळ, उर्दू इत्यादी ज्या भारतीय अशा भाषा आहेत, त्या मराठी माध्यमातून प्रौढ विद्यार्थ्यांना स्वतः शिकता याव्यात, म्हणून अशा प्रकारचे ग्रंथ प्रकाशित करण्याची योजना आहे. माणूस माणसाला ओळखतो, किंबहुना माणूस माणसाशी एकरूप होऊ शकतो; ते मुख्यत्वे भाषेमुळे. भारतातील भिन्न प्रदेशातील भिन्न भाषिक परस्परांशी समरस होण्यासाठी संस्कृतीची प्रतिबिंबे एकमेकांत सतत उमटत राहिली पाहिजेत.युरोपात काय चालले आहे, विशेषतः इंग्लिश, फ्रेंच, जर्मन आणि रशियन साहित्यक्षेत्रात काय चालले आहे, हे जेवढे आपल्याला लवकर कळू शकते, तितके शेजारच्या तामिळनाडूमध्ये काय चालले आहे, हे तितक्या सहजरीत्या आपल्याला कळू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. आपली राष्ट्रीय एकात्मता सुदृढ होण्यास भाषिक म्हणजेच साहित्यिक देवाणघेवाण करणारी प्रत्येक प्रांतात हजार-पाचशे तरी माणसे तयार व्हावयास पाहिजेत. सीमाभागातील लोक द्विभाषिक असतात. पण वैचारिक पातळीवर परस्पर भाषिकांची देवाणघेवाण व्हावी अशी उत्सुकता त्यांना असणे शक्य नसते. त्यासाठी भाषांचे व साहित्याचे अभ्यसन मुद्दाम समजून उमजून, परिश्रमपूर्वक करणारी माणसे आवश्यक आहेत.

मी मध्ये विचारले, 'या दृष्टीने साहित्य संस्कृती मंडळाची आंतरभारतीवरची पुस्तके कशी काय खपतात?

लक्ष्मणशास्त्रींनी नकारार्थी मान हलवली. ते म्हणाले, 'आमच्या मंडळाच्या या विषयावरील पुस्तकांचा खप फार मंद गतीने होतो.'

'मग यावर उपाय काय?' मी प्रश्न केला.

'एवढाच की, आम्हाला त्याकरिता महाराष्ट्रातील ग्रंथालय आंदोलनाचा संपर्क साधण्याची आवश्यकता आहे,' शास्त्रीजी म्हणाले, या बाबतीत महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्रालयाने आमच्या मंडळाच्या कार्यालयाकडे आस्थेने आणि जाणीवपूर्वक लक्ष पुरविण्याची गरज आहे. कारण

साहित्य-संस्कृती मंडळ आणि शिक्षणखाते यांचे नाते शासन या दृष्टीने अत्यंत जवजळचे आहे.

शास्त्रीजी बोलायचे थांबलेले पाहताच, मी पुढचा प्रश्न विचारला.

**प्रश्न : आपल्या समाजात ज्ञानाबद्दल खरीखुरी आसक्ती निर्माण झाली आहे काय? नसल्यास त्यासाठी उपाय काय?**

**उत्तरः** ज्ञानाची खरीखुरी आसक्ती समाजातील अत्यंत निवडक व मर्यादित अशा वर्गात व संस्थांतून निर्माण होत असते. आपण या बाबतीत युरोपिअन देश, अमेरिका, जपान आदी प्रगत देशांकडे पाहिले तरी हेच दिसते. दीर्घकालीन व खोलवर रुजलेल्या अशा ज्ञानलालसेच्या परंपरा काही निवडक प्रज्ञावंतांची घराणी व विद्यापीठीय संस्था चालू ठेवत असतात. सगळयाच विद्यापीठांतून ही परंपरा निर्माण होत नाही, रुजू शकत नाही. अध्यापन, अध्ययन आणि लेखन या कार्यार्थ आयुष्य वाहून घेतलेली गुरुशिष्य परंपरा असते. तिचाही विचार केला पाहिजे. इंग्लंडमध्ये हॉरवर्ड, प्रिन्स्टन इत्यादी विद्यापीठेसुद्धा अशाच गुरुशिष्य परंपरांची उत्कृष्ट उदाहरणे होत.

भारतातही प्राचीन काळापासून ते थेट विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापार्यंत शुद्ध ज्ञानोपासनेला वाहिलेल्या गुरुशिष्य परंपरा अस्तित्वात होत्या. वाराणशी, कलकत्ता, नाशिक आणि होय, आमची वाईपण, तसेच शंकराचार्यांचा शृंगेरी मठ, मध्वाचार्यांचा उत्तरादी मठ, तिरुपती आदी ठिकाणी उदाहरणादाखल सांगता येतील. अर्थात मी दिलेली ही उदाहरणे प्राचीन वेदशास्त्रविद्यांच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहेत. आधुनिक विज्ञानसाधनेची परंपरा आता निर्माण होण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. परंतु अजून आत्मविश्वासाने, निश्चितपणे दृढ झालेली परंपरा कोठे आहे असे कोणी विचारील तर विचारच करावा लागतो.

परंतु शुद्ध विज्ञानाची उपासना करणारी पाश्चात्त्यांच्या बरोबरीची परंपरा मात्र अजून निर्माण व्हावयाची आहे. तथापि, प्रयुक्त विज्ञाने व तांत्रिक विज्ञाने यासंबंधी भारताचे पाऊल निश्चितपणे पुढे पडत आहे, याची चांगली चिन्हे दिसू लागली आहेत. अर्थात काही झाले तरी आपण पाश्चात्त्यांचे अनुकरण करण्याच्या अवस्थेत आहोत. आपल्या स्वतःच्या बौद्धिक व वैचारिक पातळीवर विसंबून पुढील यात्रा आपण निःशंकपणे करू शकू यासंबंधी निर्वाळा देण्यासारखे मात्र अजून काहीही घडलेले नाही. अजून तरी आपल्याला त्यांच्या आधाराने पुढील यात्रा करणे भाग आहे.

**प्रश्न: वैचारिक क्रांती व सामाजिक प्रबोधन आदी शब्दप्रयोग आपण सहजपणे वापरतो, त्यांचा निश्चित अर्थ काय?**

**उत्तर :** वैचारिक क्रांती व सामाजिक प्रबोधन हे दोन्ही शब्द काही बाबतीत समान अर्थाचे आणि काही बाबतीत फरकाचे आहेत. सामाजिक प्रबोधन ही वैचारिक क्रांतीची पूर्वतयारी होय. आणि वैचारिक क्रांती हे सामाजिक प्रबोधनाचे फलित होय, असे म्हणता येईल.

आपल्या देशातील सामाजिक प्रबोधन ही कल्पना युरोपातील चौदा-पंधराव्या शतकातील 'रेनिसान्स' वरून आली. 'रेनिसान्स' अथवा वैचारिक संक्रमण युरोपात निरनिराळ्या क्षेत्रांत सुरू झाले. पवित्र धर्मग्रंथामध्ये जे जे सांगितले. आहे, ते अंतिम सत्य आहे, म्हणून पवित्र धर्मग्रंथांच्या

विरोधी असलेले विचार किंवा ज्ञान हे दंडनीय पाखंड आहे, असे मध्य युरोपातील समाज व धर्मसंस्था मानत होती. पवित्र धर्मग्रंथांची मर्यादा उल्लंघून सृष्टीविषयक व जीवनविषयक चिंतन व विचार सुरू झाला, तेव्हा विज्ञानाची प्रभात उजाडली. मनुष्याचा विचार हा मुख्य. मानवी जीवन हे सर्वश्रेष्ठ मूल्य होय, हा युरोपातील प्रबोधनविषयक मुख्य सिद्धांत होता. या सिद्धांताचा प्रभाव कला, काव्य, साहित्य आदी उपक्रमांवर पडून त्यांच्या दिशा व विषय बदलले. राज्यशास्त्राचाही विचार केवळ प्लेटो, अरिस्टॉटल यांच्या विचारानुरूप चालत होता. त्याची दिशा मॅकव्हॅलीने बदलली. या युरोपिअन प्रबोधन युगासारखे युग भारतातही एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरू झाले.

परंतु जवळजवळ दीडशे वर्षे गेली. परंतु आमच्या विचारांनी दिशा पूर्णपणे बदलली नाही. आमचा परलोकप्रधान आध्यात्मिक विचार हाच अजूनही मोठमोठ्या विचारवंतांना घेरतो. त्यामुळे आपल्या ऐहिक, सामाजिक वा मानवी जीवनात मौलिक बदल करण्याची जिद्द आमच्यात निर्माण झाली नाही. आमचा दृष्टिकोन तटजोडवादी आहे. वैचारिक कांती या शब्दाने तडजोडवादाचा पराभव सूचित होतो. सामाजिक परिवर्तन, मौलिक परिवर्तन तडजोडवादाला मूठमाती दिल्याशिवाय राहणार नाही. आमच्या राजकारणात, आर्थिक व्यवहारात, शैक्षणिक संस्थांमध्ये, साहित्यात किंबहुना सर्वत्र तडजोड दिसून येते. त्यामुळे सामाजिक अन्याय, सामाजिक विषमता यांच्याबाबत आमच्या राजकारणी, सत्ताधारी प्रशासनाधिकारी, शिक्षणाधिकारी आदी सर्व अधिकारी वैचारिक या गोंधळलेल्या मनःस्थितीत किंबहुना विचारपराङ्मुख असतात. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरदेखील जे सामाजिक परिवर्तन अपेक्षित होते, ते मंदगतीने वाटचाल करीत आहे. 'वाटचाल' हा मराठीत आवडता शब्द झाला आहे. पाऊलवाटेने रमत रमत चालणे म्हणजे वाटचाल. त्यात कसलीही घाई वाटत नाही. विवेकबुद्धीची टोचणी नाही. यामुळे अनेक बाबतींत गांजलेला फार मोठा दुःखी समाज शहरांतून तसेच खेड्यांतून निपचित पडलेला दिसून येतो.

आपल्या वैचारिक क्रांतीची काही सूत्रे मी येथे निर्दिष्ट करतो:

१. आमच्यात परंपरागत पावित्र्याच्या कल्पना या सामाजिक उच्चनीचतेच्या कल्पनेशी बांधलेल्या आहेत. त्या पावित्र्य वा अपावित्र्याच्या कल्पना आपल्या जीवनकल्पनेतून साफ नाहीशा झाल्या पाहिजेत. वाईच्या गंगापुरीत किंवा पुण्याच्या सदाशिव पेठेत एकाद्या महाराचे किराणा मालाचे दुकान किंवा रेस्टॉरंट गेली दीडशे वर्षे झाली तरी अजून निर्माण होऊ शकले नाही. याचे कारण ही पावित्र्याची वंचक समाजद्रोही भावना !

२. आमच्या शिक्षणसंस्था, पाणीपुरवठ्याच्या योजना, व्यापारधंद्याची कार्यालये, बँका, इत्यादी ठिकाणी आमचे पूजाअर्चादी समारंभ चालतात, याचा अर्थ आमच्या ऐहिक जीवनामध्ये पारलौकिक देवदानवांची भीती ही आमच्या पूर्ण रोमरोमी खिळली आहे. आमच्या ऐहिक व्यवहारामध्ये तर्कशुद्ध विचाराला कमी महत्त्व आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन हा दुय्यम मानला जातो.

ऐहिक व्यवहारात शुद्ध वैज्ञानिक दृष्टी ठेवणे हे वैचारिक क्रांतीचे महत्त्वाचे लक्षण मानले पाहिजे.

३. युरोपमध्ये ज्याप्रमाणे पवित्र धर्मग्रंथांच्या प्रामाण्यातून किंवा श्रद्धेतून बुद्धीची सुटका झाली, तशी भारतीय मनाची आणि बुद्धीची पवित्र धर्मग्रंथांच्या प्रामाण्यातून वा श्रद्धेतून पुरी सुटका झाल्याखेरीज वैचारिक क्रांतीचा प्रारंभ होऊ शकणार नाही.

**प्रश्न : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रामध्ये काही महत्त्वपूर्ण सांस्कृतिक बदल झाले आहेत काय ?**

**उत्तर :** स्पष्ट दिसतील अथवा सांगता येतील असे सांस्कृतिक बदल सांगता येणे कठीण आहे.

**प्रश्न : शिक्षणाचा प्रसार पुष्कळच झाला आहे, पण शिक्षणाचा दर्जा मात्र खालावला आहे, याचे कारण काय ?**

**उत्तर :** याचे कारण एकच. उत्तम शिक्षक निर्माण होत नाहीत. व्हाईटहेडने आपल्या शिक्षणविषयक निबंधात म्हटले आहे की, विद्यालये किंवा विद्यापीठे म्हणजेच शिक्षक,

**प्रश्न : वाढत्या शास्त्रीय ज्ञानाबरोबर नवे- धार्मिक संप्रदाय (उदा. ध्यानमार्ग, हरेकृष्ण पंथ, कुंडलिनी जागृती) निर्माण होत आहेत, याची मीमांसा कशी लावता येईल?**

**उत्तर :** हे संप्रदाय जुनेच आहेत. त्यात नव्या उत्तर : परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काही निराळा रंग येत आहे. युरोप वा अमेरिका यांमध्ये या परंपरा नव्हत्या त्या आता शिरल्या आहेत; हीच नवी पार्श्वभूमी, विमाने, रेडिओ इत्यादी संपर्कसाधने मोठ्या प्रमाणावर पसरणारी उपलब्ध झाल्यामुळे ज्या ठिकाणी भारतीय धार्मिक परंपरांना प्रवेश नव्हता तेथे प्रवेश मिळू लागला आहे. युरोप-अमेरिकेतील विचारस्वातंत्र्याचे व संघटना स्वातंत्र्याचे वातावरणही येथे भारतीय धार्मिक विचारांचे व प्रवृत्तीचे प्रसरण होण्यास उपयोगी पडत आहे. एकंदरीत धर्म, परमेश्वर, भक्ती, इ. गोष्टी ज्या प्रकारच्या मनोभूमिकेतून तयार होतात तीच मनोभूमिका सुधारलेल्या पश्चिमेकडील माणसांमध्येदेखील मोठ्या प्रमाणावर आढळते, ते म्हणजे संत्रस्त व निराधार मन.

**प्रश्न : 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' आदी ग्रंथांचा सर्वसामान्य जनतेच्या मनावर होणारा परिणाम आर्थिक विकासाच्या कार्यास अनुकूल आहे काय ?**

**उत्तर :** माणसामध्ये कळत नकळत परस्परविरोधी असे विचारप्रवाह आणि भावनाप्रवाह चालू असतात. पारलौकिक विषय हा परंपरेने प्राप्त झालेला असतो आणि ऐहिक विचार जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून तावून सुलाखून निघत असतो. अत्यंत उद्योगी माणसामध्येसुद्धा 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' यांच्यावरील श्रद्धा सापडते. याचे कारण हे मनांचे व भावनांचे परस्परविरोधी दोन स्तर होत. 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' यांच्या योगाने मनुष्य दैववादी बनतो. यातील साहित्यिक कला व काव्यमयता त्याच्या मनावर प्रभाव पाडते. म्हणून मनुष्य पूर्ण देववादी कधीही बनत नाही. कारण त्याला अनुभव शिकवतो. संमिश्र मनःस्थितीत तो काम करत असतो. शुद्ध तर्कशुद्ध प्रयत्नवाद विरुद्ध 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' यांतील विचार हे द्वंद्व लक्षात घेतले

म्हणजे हे ध्यानात येईल की आपला समाज प्रयत्नवादी बनला तर त्याला नवीन विचारांच्या शिक्षणाची गरज आहे. हे नवीन विचारांचे शिक्षण देणारा शिक्षक मिळणे कठीण आहे. कारण हा शिक्षकच 'ज्ञानेश्वरी' व 'एकनाथी भागवता'चा भक्त असतो.

**प्रश्न : मराठी भाषेचे, वाङ्मयाचे भारतीय भाषांमध्ये तुलनात्मक स्थान काय आहे ?**

**उत्तर :** आपल्या भारतीय भाषांमध्ये म्हणजे साहित्यिक भाषांमध्ये मराठीचे स्थान बंगाली साहित्याच्या उंचीचे आहे असे म्हणणे कठीण आहे. कारण बंगालीमध्ये बंगाली साहित्याची आंतरराष्ट्रीय कीर्ती पसरविणारे दोन तीन साहित्यकार झाले. तसे इतर कोणत्याही भारतीय भाषांमध्ये साहित्यकार झाले नाहीत. परंतु बंगाली साहित्य सोडल्यास इतर साहित्यिक भाषापेक्षा मराठी भाषा कमी नाही एवढे मला म्हणता येईल.

यानंतर माझे प्रश्न संपले होते असे म्हणण्यापेक्षा यासाठी ठरविलेला वेळ संपला होता. कारण त्यानंतर शास्त्रीजींना आणि त्यांचेबरोबर मलाही वाईच्या शासकीय मुद्रणालयाने आयोजित एका कार्यक्रमास जायचे होते. त्या दिवशी मुद्रणालयात विश्वकोशाच्या चौथ्या खंडांच्या जळणीचा नारळ फुटणार होता. त्यामुळे मुद्रणालयाचे व्यवस्थापक आणि कर्मचारी मोठ्या उत्सुकतेने शास्त्रीजींच्या आगमनासाठी खोळंबले होते. या घरगुती समारंभासाठी विश्वकोश कार्यालयातील सर्वच मंडळी उपस्थित होती.

वाई मुक्कामी सुरू झालेल्या विश्वकोश मुद्रण प्रकल्पामुळे शास्त्रीजींसारखी विद्वान मंडळी मुद्रण- प्रयोजनाच्या क्षेत्रात आली आहेत ही मुद्रणक्षेत्राच्या दृष्टीने लाभदायक घटना मानावी लागेल. पूर्वी लेखक, तत्त्वचिंतक, अभ्यासू किंवा वेदांती पंडित आणि मुद्रक यांच्यात मोठी वैचारिक दरी होती. ज्याप्रमाणे लेखक, ग्रंथनिर्मितीचे एक साधन यापलीकडे मुद्रणास अधिक महत्त्व द्यावयास तयार नसत, तद्वत मुद्रकही एका विशिष्ट विचारसरणीमुळे एकांडे राहात आणि स्वतःभोवती निर्माण केलेल्या कोशातून बाहेर जाण्यास तयार नसत. परंतु ज्ञानदायक स्वरूपाचे कार्यक्रम वाढत चालल्यामुळे मुद्रण अथवा मुद्रक ही उपेक्षित गोष्ट नसून तिच्या प्रगतीवरच प्रत्येक कार्यक्रमाचे यश अवलंबून असते हे सत्य आता विद्वतजनांना उमगू लागले आहे.

खरे म्हणजे या अनुषंगाने, ग्रंथनिर्मितीच्या दृष्टीने मुद्रणाचे भवितव्य काय, सध्याच्या मुद्रण क्षेत्रात कोणत्या कमतरता आहेत, इतरेजनांच्या मुद्रणाबाबतचा दृष्टिकोन नेमका कसा आहे, 'आपण कोणत्या क्षेत्रात पदार्पण करावे' असा प्रश्न करणाऱ्या काही तरुणांना शास्त्रीजी 'मुद्रण-व्यवसायाचा अवलंब कर,' असे बिनदिक्कतपणे सांगू शकतील काय, शास्त्रीजींना सत्य अस्वस्थ जीवन सुधारण्याबाबत अभिप्रेत असलेल्या सामाजिक क्रांतिपर्वात मुद्रणाचा सहभाग कोणत्या तऱ्हेने असू शकेल, मुद्रण व्यवसायाने व्यापारी वा आर्थिक हेतूव्यतिरिक्त समाजोपयोगी असे कोणते कार्यक्रम घ्यावेत अशा स्वरूपाचे प्रश्न मला त्यांना विचारायचे होते. तथापि विश्वकोशासाठी वाईमध्ये खास शासकीय मुद्रणालयाची स्थापना करण्याची योजना कार्यवाहीत आणून त्यांनी माझ्या अर्ध्याअधिक प्रश्नांची उत्तरे न बोलता दिलेली आहेत.

मुद्रण हा एक अत्यंत माहितीपूर्ण, स्वतंत्र प्रज्ञेचा प्रांत असून त्यात वैयक्तिक प्रावीण्य आणि टीम-वर्क या दोन्ही गोष्टींना स्थान आहे, हे वेगळे सिद्ध करावयाची आवश्यकता नाही. मात्र मुद्रकांनी या पुढे डोळस होऊन आपले ज्ञान वाढविण्याची, आपल्या कामकाजात विशेष रस उत्पन्न करण्याची आणि सौंदर्यवादाचे अधिष्ठान ठेवून स्वबुद्धीने आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहण्याची आवश्यकता आहे, याची ग्वाही शास्त्रीजींनी निश्चितपणे दिली असती, असे त्यांची वरील स्वरूपाची विचारप्रणाली वाचून आपणास जर पटेल यात शंका नाही. सध्याच्या परिस्थितीत शास्त्रीजींसारखे मार्गदर्शक, तत्त्वचिंतक समाजाला निश्चितपणे हवे आहेत.

**(मुद्रा मासिक, मे, १९९५, पृ. ११ ते १७)**

ooo

१५

# Of Marx and encyclopaedias

**D. Majumder meets Tarkatirtha Laxman Shastri Joshi, revolutionary and man of letters**

With all the attention that the film Gandhi is commandings. interest may be at aroused in the old associates of the Mahatma. Of the many that he had, some staved with him till the end and after : some, without revering him any less went their own way.

Tarkatirtha Laxman Shastri Joshi went his own way, at least to a very large extent. He has had an incredible life, one that encompasses many integral parts of modern Indian history He fought with the Mahatma on the issue of untouchability and in the freedom movement itself. spending time in jail for it; when the radical movement came into being. courtesy M. N. Roy, he was at its forefront. studying marxist philosophy intensively, he has compiled and is compiling voluminous histories of Indian culture; he is certainly one of the country's greatest Sanskrit scholars.

One hallmark event in his life was in 1957, when he acted as the acharya in the opening of the Somenath Temple to lower castes. The again he has a number of books to his credit, perhaps the best known being Vedic Sanskritik Vikash. He has also attended various religious conferences of orientalists in Moscow in 1960.

Further and away the greater part of his later life has been spent compiling mammoth encyclopaedis - the Darma Kosh, the Viswa Kosh and the Antar Bharati. The Dharma Kosh a work which he himself is financing, is an encyclopaedia entirely in Sanskrit. He began it in 1936 and 14 of the

proposed 26 volumes have reached the bookstalls. He has seven assistants helping him with his work.

The Viswa Kosh is different inasmuch as it is financed by the government of Maharashtra. It is a world encyclopaedia written in Marathi and Tarkatitha Joshi has some 35 fulltime assistants. One of the truly remarkable things about the project is that even with the many changes in the state government, there has never been a full in the finances - no mean thing, considering that some Rs four lakhs are spent monthly.

The Antar Bharati is in a way the most ambitious of all. This might be called a work in triplicate : he selects a language, for example in Bengali, then compile a Marathi Bengali dectionary, the literature of Bengal and a history of the great scholars of the language. He intends to do this with every major Indian janguage, the root language always being Marathi.

He's 83 now, but his mind is as alert as ever. While being interviewed he weighs every word he is saying, often going over what he has said, deleting, correcting, improving. Each statement is deliberate and there is no questioning the fact that he means every word he says.

Talking of his life, he speaks of his education, of studying Sanskrit in Varanasi from Narayan Brahmacharan Bhattacharya. He also studied English alongside Acharya Vinoba Bhave in 1917-18, in the Acharya's birthplace itself. His education ran side by side with his patriotic fervour, and he began acquiring fame in literary cirles.

In the early thirties began his participation in the Harijan movement. "I was called by Gandhi to support the movement against untouchability." he says, "On the grounds of Hindu Dharma Shastra." The extent to which Tarkatirtha Joshi was involved can be gauged from the fact that he personally officiated as a priest at the wedding of Gandhiji's son Devdas with C. R. Rajagopalachari's daughter Lakshmi. Gandhi was of course a bania, Rajaji a high caste Brahmin and such wedings, especially in families of such high repute, were in those days unthinkable. He speaks lightly of that epoch-making wedding of June 1933, saying that it was attended by many dignitaries.

It was not very long after this that his Marxist period began. M. N. Roy had begun his leftist movement known as the Radical Party and it was to this that he gave his support "I studied Marxist socialism," he says now, "and was convinced of the world revolution."

Gandhi, he says "lost interest" in him after he joined the radical party (ironically enough, he was to preside over its dissolution fater). But even during the days of their working together. Tarkatirtha had his reservation. "I am a philosopher, I accepted his programme of non-violent approach. I thought that satyagraha and non-cooperation had its limitations as far as the seizure of power went. My doubt was corroborated by the east Pakistan, west Pakistan confrontation." He goes on to quote Mark, who said that the philosophers had tried to explain the world, our task is to change it.

Things were not, however, quite what they seemed and then began his "critical appreciation" of Marxism, "I appreciate the salient features of Marxism - I helieved in it - but when it came to practise I was disillusioned. I expected golden age of human freedom, by the abolition of private property and opulence there would be equality. But it didn't happen. There is still a classridden society, no freedom of expression, a glaring inequality of status."

Speaking of Marxist rule quite natuarally brings him to West Bengal. "Here there has been more than five years of Marxist rule. But I don't see a clear picture of social change. and the bureaucratic framework of this country is dilapidated and degenerated.

"This bureuacracy is not socially responsible. The Politicians and industrialists in the private and public sectors and the bureaucracy joined in a nation wide conspiracy against the common people. Only 30 percent of the citizens of the country are securely placed and 70 percent are sufering under the burden of poverty. ignorance and degenerating cultural conditions."

Nor does the centre escape his tongue. "This Parliamentary future of this country doesen't look bright. The great party ruling during the last 35 years or more is getting disintegrated owing to lack of internal democracy and there is no other party which may replace the ruling party as an alternative

does not exist."

One is tempted to ask him if the situation would have been if people like the Mahatma had been around, and his answer is very flat negative "They would hace checked it. would have sacrificed themselves for it. Their perspective was very different. Gandhiji would have been heart broken."

He seems less critical than most of the administration in his home state. "I see that Maharashtra ruled by the congress (I) is still tolrently good better than here (in west Bengal) He adds that he would have been "elated" is the opposite were true he is as eager as ever to see Marxist rule working the way he solution?"

**(The Telegraph, Calucutta/Encounter, Saturday/26th March,1883)**

❍❍❍

१६

# महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवन

मुलाखतकार - **मे. पुं. रेगे**

**प्रश्न - शास्त्रीजी, सांस्कृतिक संस्थाविषयी काही चर्चा आज आपल्याला करायची आहे. सांस्कृतिक संस्था म्हणजे माझ्या डोळ्यांपुढे मुख्यत: प्राज्ञपाठशाळामंडळ, भारत इतिहास संशोधन संस्था, धुळ्याची समर्थ वाग्देवता मंदिर, राजवाडे संशोधन मंदिर अशा संस्था आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात काही व्यक्तींनी पुढाकार घेऊन या काढल्या होत्या. त्या सरकारी अनुदानावर अवलंबून नव्हत्या. ते एक सोडा; परंतु काहीएक विशिष्ट ध्येय डोळ्यांसमोर ठेवून, अनेक माणसांनी एकत्र येऊन त्या चालवल्या होत्या आणि त्यांनी चांगले कामही केले. गांधीजी असे म्हणत की, अशा प्रकारच्या संस्था या महाराष्ट्राचं एक वैशिष्ट्य आहे. आज त्यांची स्थिती फारशी स्पृहणीय नाही, असं एकंदरीत दिसतं. इतर संस्थांविषयी बोलणं थोडंसं अप्रशस्त ठरेल. पण आपण प्राज्ञपाठशाळा मंडळाविषयी मोकळेपणाने बोलू शकू; पण हे म्हणजे एक उदाहरण म्हणूनच त्यासंबंधी आपण बोलणार आहोत. या विशिष्ट संस्थेच्या काही समस्या आहेत व त्यासंबंधी आपण बोलणार असं नाही, तर एकंदरीत अशा संस्थांची जी पीछेहाट झालेली दिसते त्याची काय कारणे असतील?**

**उत्तर -** या ज्या खाजगी रीतीनं चालविलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातल्या संस्था दिसतात, त्या सुरू होताना परंपरागत, सांस्कृतिक अशी जी व्यवस्था होती तिच्यामध्ये काही बदल करायचा आणि देशकाल परिस्थितीला नव्या परिस्थितीचा अर्थ समजून घेऊन त्या परंपरागत संस्कृतीच्या परिस्थितीला नवा आकार देणं किंवा उजाळा देणं या तऱ्हेची प्रेरणा प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या कार्यकर्त्यांपुढे होती. उदा. हिंदू धर्माचा प्रचार या देशामध्ये करणाऱ्या कीर्तनकार, पुराणिक इत्यादी संस्था होत्या. पाठशाळा होत्या. धर्मशास्त्रज्ञ तयार होत असत; परंतु देशकाल परिस्थिती ओळखून नवी उमेद आणि स्फूर्ती निर्माण करणं, म्हणजे राष्ट्रवादाचा त्यांच्यावर संस्कार करणं, हे

हवं होतं. त्याकरिता इतिहास संशोधनसुद्धा महत्त्वाचं मानलं जात होतं. धर्माचा इतिहास पाहिला पाहिजे, कारण धर्म बदलत असतो. आपल्या इतिहासात काय काय चांगल्या गोष्टी घडल्या, काय अयोग्य घडल्या हे पाहायला पाहिजे. इतिहासाकडे पाहण्याचा राष्ट्रवादी दृष्टिकोन हवा. त्या काळी राजवाडे हे संशोधनाचे मोठे अग्रेसर मानले जात होते. ते वस्तुवादी इतिहास संशोधन करीत असत; पण कित्येक वेळा त्यांच्या संशोधनामध्ये राष्ट्रवादाचा अभिमान फार जोरदार असे. त्या तऱ्हेच्या प्रेरणा स्वातंत्र्योत्तर काळात मंदावल्या. तसेच प्राज्ञपाठशाळेसारख्या संस्थेला काही नवे विद्यार्थी तयार करायचे होते. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे; पण संस्कृतीची प्रेरणा घेतलेले असे. ही जी सगळी नवी ध्येये होती ती स्वातंत्र्योत्तर काळात क्षीण होऊन गेली. त्यामुळे अशा सांस्कृतिक संस्थांना एक तऱ्हेचं यांत्रिक स्वरूप आलं किंवा उतरती कळा लागली. उदाहरणार्थ पाहा की, गांधींच्या डोळयांपुढे कोण होते? राष्ट्रीय पाठशाळा किंवा इतिहास संशोधन मंडळ वगैरे संस्था नव्हत्या. समर्थ वाग्देवता मंदिर त्यांच्यापुढे नव्हते. त्यांच्यापुढे डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या संस्था होत्या. कारण त्यांचे गुरू गोखले, टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर. वगैरे मंडळी तिचे संस्थापक तर शिक्षण आधुनिक झालं पाहिजे व त्यातून पश्चिमी देशांमध्ये ज्या तऱ्हेने एक ताकद आलेली आहे तशी विशिष्ट ताकद आलेली पिढी तयार केली पाहिजे ही त्यांच्यापुढे प्रेरणा होती. त्यामुळे फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य आजच्या मुख्यमंत्र्यांपेक्षाही श्रेष्ठ मानले जात. मुख्यमंत्र्याच्या हातात सत्ता आहे. त्यांच्या हातात सत्ता नव्हती; पण वरच्या दर्जाचं शैक्षणिक, आधुनिक शिक्षणाचं ते कार्य करीत होते; आणि त्या ठिकाणीसुद्धा संस्कृतचं अध्ययन होत होतं. संस्कृतला त्या काळात एक नवा अर्थ आला होता. ऐतिहासिक दृष्टीनं संस्कृतच्या अध्ययनाला पश्चिमी लोकांनी महत्त्व दिलं होतं. मॅक्सम्युलर वगैरेंची नावे येथे गाजत होती. भाऊ दाजींपासूनची मंडळी संस्कृतची संशोधक होती. त्यामुळे संस्कृतला खूप महत्त्व होतं. किंबहुना विद्वान म्हणजे संस्कृत शिकलेला, असा अर्थ होत होता. म्हणजे एक नवं वातावरण निर्माण होत होतं. नव्या पिढया तयार होत होत्या. त्यांच्यामध्ये एक प्रकारचा ताजेपणा दिसत होता. म्हणजे समाजामध्ये ते वेगळे दिसत होते. आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवलेली भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर ही संस्था - त्यांनी महाभारताचं संशोधन केलं. आता महाभारताचं आकर्षण जगातले प्राचीन संस्कृतीचे जे सगळे पंडित, त्यांना फार. उदा. महाभारताच्या अनेक आवृत्त्या आहेत. त्यातली खरी कोणती अशा प्रश्नांबद्दल त्यांना कुतूहल. म्हणजे हे एक नवं जागतिक सांस्कृतिक वातावरण तयार होत होतं. साऱ्या जगाची एक अशी मानवी संस्कृती असून तिला निरनिराळे इतिहास आहेत आणि ते सगळे इतिहास पाहिले पाहिजेत, अशी दृष्टी आली. तर याचाही परिणाम भारताच्या एकंदर विद्याभ्यासाच्या संस्थांवर झालेला आहे, असं मला वाटतं. कारण मी त्या वातावरणातून गेलेलो आहे. पुढे हे सर्व यांत्रिक झालं. नव्या उद्देशांच्या प्रेरणा नव्या राहिल्या नाहीत.

**प्रश्न - शास्त्रीजी, हे बरोबर आहे. तुमच्या बोलण्याचा मी असा अर्थ करतो की, आपला जो सांस्कृतिक वारसा आहे, तो जतन केला पाहिजे. त्याच्याविषयी अभिमान बाळगला पाहिजे; पण त्याची एक चिकित्साही केली पाहिजे, त्याला योग्य असं नवं वळण दिलं पाहिजे आणि हे काम आपण स्वतः केलं पाहिजे या प्रेरणेतून या संस्था सुरू झाल्या. म्हणजे मराठी जुनं काव्य आहे, मराठ्यांचा इतिहास आहे किंवा भारताचा सांस्कृतिक इतिहास आहे. या सर्व गोष्टींकडे आपण आत्मीयतेने व आपला स्वतःचा वारसा म्हणून पाहिलं पाहिजे. त्यांचं संशोधन केलं पाहिजे. ही आपली जबाबदारी आहे. तिच्यात आपली अस्मिता आहे, अशी एक भावना होती. स्वातंत्र्यानंतर तुमचं असं म्हणणं की, काही जुनी उद्दिष्टे यांत्रिकपणे चालू राहिली. तुम्ही डेक्कन एज्युकेशन सोसायटीचं उदाहरण दिलं. पूर्वी तिच्यामागचा उद्देश असा होता की, आधुनिक पाश्चात्त्य विचारांचे संस्कार झालेले असे तरुण निर्माण करायचे, मग ते समाजात आपापली स्थाने असतील त्या प्रकारे सामाजिक जीवनाला नवीन वळण देतील. केवळ अभ्यासक्रम शिकवायचा हा या संस्थेचा उद्देश नव्हता. एक नवीन संस्कृती इथे घडवायची असा उद्देश होता; आणि म्हणूनच कॉलेजच्या प्राचार्यांचं किंवा प्राध्यापकांचं विशिष्ट सामाजिक स्थान आहे, अशी सर्वांची कल्पना होती, त्यांचीही होती. म्हणून त्या कामाला एक महत्त्व होतं. पुढे हे महत्त्व स्वातंत्र्यानंतर काहीसं कमी झालं. याचं कारण आता फक्त वेगवेगळ्या विषयांचं 'ट्रेनिंग' ज्यांना दिलेलं आहे असे विद्यार्थी तयार करणं एवढंच उद्दिष्ट आहे. आता मला जो प्रश्न विचारायचा आहे तो असा की, स्वातंत्र्यानंतरच्या काळात या उद्दिष्टांना एक वेगळं; पण अधिक व्यापक असं स्वरूप कदाचित मिळालं असतं. उदा. इतिहास संशोधन. आता स्वतंत्र झाल्यामुळे आपलं परराष्ट्र धोरण आपण ठरवू शकतो. म्हणून केवळ महाराष्ट्राच्या किंवा भारताच्या इतिहासाचं संशोधन नव्हे तर आशियातल्या वेगवेगळ्या देशांच्या इतिहासाचं संशोधन आपण केलं पाहिजे. ज्या आशियाई देशांचा आता आपला जवळचा संबंध येणार...**

**उत्तर -** पूर्वीही तो आला होता -

**प्रश्न - हो. तर त्या देशांचा इतिहास काय हे पाहावे, त्याचं संशोधन करावं, त्याचे निष्कर्ष लोकांपुढे ठेवावेत अशा प्रकारची प्रेरणा नवीन स्वरूपात का निर्माण झाली नाही? हे सारं यांत्रिकच का झालं?**

**उत्तर -** याच्यात एक गोष्ट अशी आहे की, या संस्थांचं पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी नव्या सरकारवर होती आणि नव्या सरकारने परंपरागत अशा ज्या काही सरकारी शिक्षणसंस्था होत्या त्यांना महत्त्व दिले. या स्वतंत्र रीतीनं चालणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांना फक्त अनुदान द्यायचं, बाकी त्या लोकांनी स्वतःच त्या चालवायच्या अशी सरकारची दृष्टी होती. त्यामुळे या संस्थांचं आर्थिक बळ फार खाली गेलं. उदा. समर्थ वाग्देवता मंदिर व राजवाडे संशोधन

मंदिर, प्राज्ञपाठशाळा, भारत इतिहास संशोधन मंडळ वगैरे. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल यासाठी निधीही निर्माण झाले नाहीत. तसेच पहिल्यासारखी प्रेरणा देणारी मंडळीही उरली नाहीत. असं का झालं, हे सांगता येणार नाही; पण स्वराज्य आल्यावर दुसऱ्या काही प्रेरणा निर्माण झाल्या. उदा. राजकीय पक्षोपपक्ष तयार झाले आणि निरनिराळ्या प्रकारची आकर्षणेही निर्माण झाली. म्हणजे आदर्शवाद बाजूला पडला. विषयांतर होतंय; पण सबंध देशातलं वातावरण आदर्शवादी राहिलं नाही. एक उतरती कळा लागली. आणि हे गांधींनाही वाटायला लागलं. म्हणजे राजकीय पक्षोपपक्ष हे शेवटी विकृत होत असतात, त्यांचे आदर्श हे मलिन होत जातात, हे लक्षात घेऊन निराळे आदर्श व्यवस्थित जपायचे अन् वाढवावयाचे असं पाहणाऱ्या नव्या संघटना निर्माण झालेल्या नाहीत. गेल्या पस्तीस वर्षांत.

**प्रश्न - हे मान्य करूया; पण आता आपले प्राज्ञपाठशाळा मंडळ घेऊ. सुमारे १९३५ सालापासून आपल्याकडे पाठशाळेत शिकायला येणारे विद्यार्थी काही राहिले नाहीत.**

**उत्तर -** नाहीत. ते कमी होत गेले.

**प्रश्न - याचा अर्थ ज्या प्रकारची जीवनवृत्ती या पाठशाळेतून बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावयाची, ती राहिली नाही. म्हणजेच त्यांना इंग्रजी वळणाच्या शिक्षणाकडे गेलेच पाहिजे, अशी परिस्थिती निर्माण झाली हे मान्य; पण धर्मकोशाचं काम पाहा. तुम्ही असं म्हणालात की, हिंदू धर्माचा इतिहास पाहून राष्ट्रवादाची प्रेरणा त्याच्यामध्ये प्रविष्ट करायची. नवीन काळाला अनुसरून ज्या चालीरीती, जे आचार कालबाह्य ठरले होते ते बदलायचे व धर्मात सुधारणा करायची ही प्रेरणा धर्मकोशाच्या कार्यामागे होती; पण त्याबरोबरच आपल्या संपूर्ण सांस्कृतिक इतिहासातला एक प्रवाह समजून घ्यावा, असं एक बौद्धिक उद्दिष्ट होतं की नाही?**

**उत्तर -** परिवर्तनवादी उद्दिष्ट होतं; पण स्वातंत्र्योत्तर काळात ही उद्दिष्टे स्वातंत्र्यपूर्व काळात होती तितकी प्रखर राहिली नाहीत.

**प्रश्न - का? त्यांची आवश्यकता राहिली नाही का?**

**उत्तर -** नाही. ती आवश्यक आजही आहेच. आज सामाजिक परिवर्तन जे पाहिजे आहे, ते हिंदू समाजाच्या रचनेमध्येच पाहिजे आहे. तर त्या तऱ्हेच्या प्रेरणेचे हिंदू धर्माचे प्रचारक, शास्त्रीपंडित, कीर्तनकार यांची परंपराच राहिली नाही. त्याच उद्देशाने प्राज्ञपाठशाळा मंडळ स्थापन झाले होते. एकाच संस्थेबाबत मी म्हणत नाही. एकूण महाराष्ट्रातल्या संस्थांना एक यांत्रिक रूप आलं. टिळक विद्यापीठाचं असंच झालं आहे. राष्ट्राचे सुशिक्षित सेवक तयार करणं हा खरा त्या चळवळीचा हेतू होता, तसं आज तिथं होत नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीत अशा ज्या संस्था उभ्या राहिल्या, त्या अपकर्षाला गेल्या आहेत.



वाय १७८-१६

**प्रश्न - म्हणजे केवळ आर्थिक दुबळेपणामुळं हे घडलं नाही. मुख्य कारण मला असं दिसतंय की, सामाजिक महत्त्व असलेला एक नवीन उद्देश असा या संस्थांपाशी राहिला असे दिसत नाही. म्हणजे एक तर काय करावं हे त्यांना कळत नसेल...**

**उत्तर -** म्हणजे ज्याला मी उच्च अर्थाने ध्येयवादी, धार्मिक वा नैतिक प्रेरणा म्हणतो त्या असाव्या लागतात. सरकारच्या बाहेर आणि राजकीय व्यवहारांच्या बाहेर अशा ज्या लोकशिक्षण देणाऱ्या सामाजिक व लोकशिक्षक तयार करणाऱ्या संस्था असतात त्या निर्माण व्हाव्या लागतात. आता उदा. आमट्यांची आनंदवन ही संस्था- अशा काही राहिलेल्या आहेत.

**प्रश्न - पण बौद्धिक प्रकारचं कार्य करणाऱ्या संस्था व इतर प्रकारे सामाजिक सेवा करणाऱ्या संस्था असा एक फरक मी करतो. आता स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत विकास झाला, म्हणजे निदान असं दिसतं...**

**उत्तर -** नाही. मी तुम्हास दुसरं एक सांगतो. महात्माजींनी जो आश्रम तयार केला त्याबद्दल. सत्याग्रह आश्रम हे त्याचं नाव. केवळ स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी हा आश्रम निर्माण झालेला नव्हता. देशाला कायम उच्च दर्जाचं नैतिक जीवन आणि अंत्योदयी आर्थिक जीवन, स्वावलंबन प्राप्त करण्यासाठी परित्यागी वृत्तीने जगणाऱ्या व्यक्तींचे संघ गांधींना तयार करावयाचे होते. तो उच्च हेतू शून्य झाला.

**प्रश्न - कोणत्या आश्रमाविषयी तुम्ही बोलता आहात?**

**उत्तर -** साबरमतीच्या. नंतर तो वर्ध्याला गेला. सेवाग्राममध्ये. सेवा या शब्दाचा अर्थ लोकसेवक, त्यागी सेवक, सामाजिक सेवक. हे सेवक देशभर पसरावेत व त्यांनी ग्रामराज्य निर्माण करावे अशी दृष्टी होती. म्हणजे आपल्या देशात अशी प्रेरणा आली, की एक नव्या तऱ्हेचे समाजसुधारक, धर्मप्रचारक तयार व्हावेत. सर्व धर्मांच्या लोकांना त्यात समाविष्ट करून घ्यावे. ही अशी थोर संस्था गांधींसारख्या जागतिक कीर्तीच्या व्यक्तीने काढलेली; पण आज ती कुठे आहे? याचं कारण सर्व उच्च आदर्श आता मंदावले आहेत, थिजले आहेत.

**प्रश्न - चक्रनेमिक्रमाप्रमाणे समाज कधी उत्साही असतो, कधी अवनत दशेला असतो, असं तुम्हाला म्हणायचं आहे का?**

**उत्तर -** पण गांधींच्या मनात असे होते की, आता देश स्वतंत्र होणार, जग बदलणार. या स्वतंत्र जगात माणसं ही केवळ ऐहिक स्वार्थाकरिता झटणारी आणि या आपल्या सामाजिक जीवनाच्या जबाबदाऱ्या न ओळखणारी फार होणार. त्यांना नवं वळण देणारी माणसं पाहिजे आहेत. हे जे गांधींचं दर्शन किंवा दृष्टी होती, ती फार महत्त्वाची होती. तसेच एकंदर ३०० वर्षांत जगात ज्या चळवळी झाल्या त्या, मानवी समाजात न्याय आला पाहिजे, नवजीवन आलं पाहिजे, या परंपरा ज्या आहेत त्यांच्यात अन्याय झालेला आहे अशा दृष्टिकोनातून आल्या. हा जो दृष्टिकोन होता तो गांधींपाशी होता. असे आदर्श तेव्हा होते. केवलानंदस्वामी म्हणायचे, 'नित्य दारिद्र्यात रममाण होणारे कार्यकर्ते व धर्मसेवक हवेत.'

**प्रश्न - असं स्वामीजी म्हणावयाचे?**

**उत्तर -** हो. गांधींचा हाच आदर्श होता. तोच नारायणस्वामींनी दिला. त्यांचे प्राज्ञपाठशाळा मंडळाचे जर तुम्ही मागचे अहवाल पाहिलेत तर त्यात अशीच भाषा आढळते. 'नित्य दारिद्र्यात राहून सेवा करणारे' वगैरे. जावडेकरांच्या भाषेत सांगावयाचे तर यतिधर्मी लोक तयार व्हायला पाहिजेत तर यतिधर्मी लोक तयार करणे हा हेतू होता. बरे, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचा काय हेतू होता? गांधींना आकर्षण वाटलं ते गोखल्यांच्या पक्षाचं, टिळकांच्या पक्षाचं नव्हे. कारण शांत, मानवतावादी वृत्तीनं काम करणारी चांगली माणसं त्यांना सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीत दिसत होती. गोखल्यांना काही तुम्ही कोणत्याही संकुचित क्षेत्रात घालू शकत नाही. ते मानवतावादीच होते. रानडे यांचीही हीच गोष्ट आहे. यांच्याकडे जी दिव्य उद्दिष्टे होती, ती फार मोठी. हे जुने जग काही बरोबर नाही, हे मागे पडलं पाहिजे असं त्यांना वाटे. कामामागे या अशा फार व्यापक प्रेरणा होत्या आणि या जागतिक प्रेरणा आहेत, असं माझं मत आहे. त्या मंदावत चालल्या आहेत.

**प्रश्न - म्हणजे तुम्हाला असं म्हणावयाचं आहे, की इतर देशांतही त्या मंदावताहेत?**

**उत्तर -** हो. सगळीकडेच मंदावताहेत.

**प्रश्न - तरीपण परत माझा एक प्रश्न आहे. बौद्धिक क्षेत्रात काम करणाऱ्या ज्या संस्था...**

**उत्तर -** नाही; पण त्या बौद्धिकतेच्या पाठीमागेही नैतिकता होती, असली पाहिजे.

**प्रश्न - मान्य आहे. आणि मला वाटतं, असं खोलात शिरून पद्धतशीर रीतीने जी बौद्धिक कामं केली जातात, त्यांच्यामागे नैतिकता असतेच.**

**उत्तर -** अहो, सत्याचा शोध हा नैतिकच असतो.

**प्रश्न - मी एवढंच म्हणत नाही. हा सत्याचा शोध आपल्याला का महत्त्वाचा वाटतो, तर त्याला नेहमीच एक सामाजिक संदर्भ असतो.**

**उत्तर -** हो.

**प्रश्न - पण तसा एक नवीन सामाजिक संदर्भ मिळाला होता. मघाशी मी म्हटलं तसं. आता आपण जर राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्वावलंबी, स्वायत्त होणार, तर वेगवेगळ्या प्रकारचं ज्ञान आपण चांगल्या रीतीनं, त्याचा वापर व्यवहारात व्यवस्थित करता येईल अशा प्रकारे कमावलं पाहिजे. मग ज्यांचा आपण विचार व अभ्यास करू, ते अर्थशास्त्रातील प्रश्न असतील, इतिहासातले प्रश्न असतील, भाषाशास्त्रातले प्रश्न असतील.**

**उत्तर -** हो ना. ज्ञानाची सर्वच क्षेत्रं ही सामाजिक जीवनाला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे पूरकच असतात.

**प्रश्न - पण मग तसं असताना, हे बौद्धिक जीवन का क्षीण झालं? ते जर तसं झालं नसतं, तर या संस्था वेगळ्या स्वरूपात भरभराटीस आल्या असत्या. आता भारत इतिहास संशोधन संस्था, उदाहरणार्थ**

**उत्तर -** ती हल्ली सगळ्यात क्षीण झालेली संस्था आहे.

**प्रश्न - ते ठीक आहे; पण तशी ती झाली नसती. तिथे केवळ महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास झाला नसता, इतर अनेक देशांच्या इतिहासाचा झाला असता. महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासाचं संशोधन झालं असतं.**

**उत्तर -** तशा संस्था स्थापन झाल्या आहेत. उदा. धनंजयराव गाडगीळांनी काढलेली गोखले इन्स्टिट्यूट ही एक संस्था. ती फार महत्त्वाची संस्था आहे.

**प्रश्न - पण ज्या संस्था अगोदरपासून काम करीत होत्या, त्यांच्यात एक सातत्य राहणं, त्यातून एक बौद्धिक परंपरा निर्माण होणं हे व्हायला हवं होतं ना?**

**उत्तर -** हो. या संस्था काम करताहेत; परंतु पूर्वी जे तेज होतं, ते आता दिसत नाही. किंवा हल्ली गरजा मोठ्या झाल्यामुळे त्यांनी ज्या प्रकारे काम चालविले आहे, ते आता अपुरं पडतं. अधिक मोठ्या प्रश्नांचा उलगडा व्हायचाय. त्यांच्या मागे लागण्याइतका त्यांचा विकास झाला नाही. धनंजयरावांच्या संस्थेमागील प्रेरणाही मोठ्याच होत्या. आज महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात जे नवं आर्थिक नेतृत्व उभं आहे, त्यांच्या पाठीमागे हे पुण्यातले पंडित धनंजयराव उभे होते, हे विसरून चालणार नाही.

**प्रश्न - म्हणजे काही प्रमाणात नव्या परिस्थितीस अनुरूप अशा संस्था निर्माण झाल्या.**

**उत्तर -** पण त्यांना आता अधिक उजाळा मिळेनासा झाला. उभारी राहिली नाही. त्यांची उच्च उद्दिष्टे, त्यांची उच्च नैतिकता हळूहळू नाहीशी होत चालली. उच्च नैतिकतेचे रंग फिके पडत चालले.

**प्रश्न - पण या परिस्थितीतून तुम्हाला काही मार्ग दिसतो का?**

**उत्तर -** उच्च दर्जाची उद्दिष्टे आणि त्यांच्यासाठी काम करणारी माणसं हवीत; पण ज्या परिस्थितीत सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी स्थापन झाली, राष्ट्रीय शिक्षणसंस्था तयार झाल्या, त्या परिस्थितीहून वेगळ्या प्रकारची परिस्थिती आज आहे. म्हणून आज विचारसुद्धा फार व्यापक पाहिजेत. त्यावेळी राष्ट्रीयता ही एक उच्च प्रेरणा होती. आता या राष्ट्रीयतेत एक उच्च दर्जाचा असा मानवतावादी सूर आला पाहिजे. ही राष्ट्रीयता म्हणजे मानवतेचा एक भाग आहे. अशा तऱ्हेने इथं कार्य व्हायला पाहिजे. बौद्धिक उपासनानिष्ठा निर्माण होण्याची गरज आहे.

**प्रश्न - ती निर्माण कशी होईल? याविषयी काही स्पष्ट मार्ग नाही?**

**उत्तर -** नाही. कार्यक्रम आखावे, संस्था काढाव्यात. काही संस्थांना मुळं फुटतात. निसर्गात असं चालतं. धडपड चालू ठेवावी; पण मला कार्यक्रम देता येणार नाही.

**प्रश्न - मला वाईट कशाचं वाटतं, तर इंग्लंडसारखा देश आहे. तिथं शेकडो वर्षं टिकलेल्या संस्था आहेत. उदा. रॉयल सोसायटी. ती दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीत निर्माण झाली. तिची मुळं तशी अनौपचारिक होती. म्हणजे ऑक्सफर्डचे काही तत्त्ववेत्ते, वैज्ञानिक हे जमत, चर्चा करीत. त्यातून ती संस्था पुढे औपचारिकपणे स्थापन झाली व आजही सातत्याने टिकून आहे. आपल्या संस्था अशा टिकून राहिलेल्या, आपण निवडलेलं काम आजही उमेदीने करीत असलेल्या आढळत नाहीत, याचं वाईट वाटतं.**

**उत्तर -** त्यासाठी असणारी चिकाटी आपल्याकडे पश्चिमी संस्कृतीपेक्षा कमी आहे. त्या संस्कृतीस स्वतःची अशी एक उमेद आलेली आहे. याउलट आपली संस्कृती अजून परावलंबी व अनुकरणशाली आहे. आपण आपली उमेद अजून उभारलेली नाही. म्हणजे आपलं स्वतःचं असं नवं अनुदान जगाला, जगाच्या प्रगतीला आपण दिलेलं नाही. ते आपण देऊ शकलो, तर आपल्या ठिकाणी आत्मविश्वास येईल. आज आपल्यापाशी आत्मविश्वासाने निर्माण होणारी आत्मशक्ती नाही. म्हणजे नव्या संस्था आल्या, नवी संस्कृती आली; पण नवा आत्मविश्वास आला नाही. त्यामुळे आपल्या संस्थांत यांत्रिकता आहे, अनुकरण आहे. पण पश्चिमी संस्कृतीही कदाचित विनाशाकडे जाईल अशी आज जागतिक संस्कृतीची स्थिती वाटते.

**प्रश्न - तुम्ही जे म्हणालात, की दारिद्र्यात रमणारे कार्यकर्ते हवेत, तसे कार्यकर्ते आज महाराष्ट्रात तरुण पिढीत नाहीत असं नाही. म्हणजे ते राजकीय पक्षोपपक्षात काम करतात असं नाही; पण त्याबाहेर सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात - विशेषतः वेगवेगळ्या गरीब थरांत - काम करणारे, त्यांना संघटित करणारे तरुण आहेत.**

**उत्तर -** जर असे आहे, तर या मंडळींचं सर्वेक्षण करून त्यांना एकमेकांशी अनुसंधान बांधता येईल, असे प्रयत्न केले पाहिजेत.

**प्रश्न - तसेही प्रयत्न चालू आहेत.**

**उत्तर -** अशा मंडळींची संख्या वाढली तर नवी गुणात्मकता येईल.

**प्रश्न - हं. पण मग जसं हे त्या क्षेत्रात दिसतं, तसं बौद्धिक क्षेत्रात का दिसत नाही?**

**उत्तर -** नाही. बौद्धिक क्षेत्रातही तशी उदाहरणं आहेत. उदा. हे अनिल अवचट आहेत. त्यांचं क्षेत्र बौद्धिकच आहे, असं मला वाटतं. वैद्यकीय व्यवसाय बाजूला ठेवून ते आज सामाजिक निरीक्षणाच्या क्षेत्रात आहेत. अनुभव गोळा करून ते निष्कर्ष काढतात. अशी अनेक मंडळी निर्माण व्हायला हवीत. त्यांच्यात दळणवळण व्हायला हवे. आणि मोठ्या संस्थेत जे प्रतिष्ठित आहेत, त्यांनी त्यांच्यावर दबाव न आणता त्यांना महत्त्व दिलं पाहिजे.

**प्रश्न - आणि असं झालं तर याचे पडसाद बौद्धिक क्षेत्रातही आपोआप उमटतील, असे तुम्हाला सुचवायचे आहे? पण आता तुम्हाला एक अडचणीत टाकणारा प्रश्न विचारतो. प्राज्ञपाठशाळा मंडळ ही संस्था घ्या. ३०-४० वर्षांपूर्वी या संस्थेने अशी कार्यकर्ती मंडळी**

**तयार केली. आज काही अशी मंडळी दिसत नाहीत व जी आहेत ती वृद्ध आहेत.**

**उत्तर -** आणि जे काही बौद्धिक कार्य चालतं आहे ते चाललं आहे.

**प्रश्न - तर आता याला जर अधिक जोमदार स्वरूप यायचं असेल आणि जे या संस्थेच्या कार्यक्षेत्रात स्वाभाविकपणे बसेल असं जर काही महत्त्वाचं काम सुरू करायचं असेल, तर ते कोणतं आणि त्यासाठी कोणत्या प्रकारची माणसं तुम्हाला लागतील?**

**उत्तर -** त्याचा शोध केला पाहिजे. आता पटकन सांगता येण्यासारखं नाही.

**प्रश्न - मला एक मात्र वाटतं. साधारणपणे सर्वजण कुंठित झाल्यासारखे दिसतात.**

**उत्तर -** मी तर फारच कुंठीत आहे. मला तर काही मार्गच दिसत नाही.

**प्रश्न - आता असं पाहा, प्राज्ञपाठशाळेला भारतीय तत्त्वज्ञानाच्या संशोधनाचं कार्य करता येण्यासारखं आहे. त्या संस्थेचे हे स्वाभाविक काम आहे. अशा कामाला पैसा अपुरा आहे, असंही नाही. अनेक प्रकारच्या यंत्रणा या कामासाठी मदत करू शकतात.**

**उत्तर -** पण तशा तऱ्हेची जोमदार...

**प्रश्न -माणसं आढळत नाहीत ! आणि जी काही चार-पाच माणसं असतात, त्यांच्यावर मग एवढं वेगवेगळ्या प्रकारचे 'क्लेम्स' येतात की त्यांची धांदल उडते.**

**उत्तर -** हो.

**प्रश्न - शिवाय एखाद्या संस्थेत राहून त्या संस्थेच्या कामाला वाहून घेणं, ते काम म्हणजेच आपलं जीवनक्षेत्र समजणं ही पूर्वीची प्रवृत्ती आता कमी झाली आहे, असं तुम्हाला वाटतं का?**

**उत्तर -** हो. याच खऱ्या अडचणी आहेत; पण मला त्यातून मार्ग दिसत नाही.

**(नवभारत मासिक, मे-जून, १९८४, पृ. ७९)**

ooo

१७

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ

मुलाखतकार - **श्रीराम पुजारी**

**पुजारी - नमस्कार शास्त्रीजी !**

**शास्त्रीजी -** नमस्कार !

**पुजारी - आपण या स्टुडिओत आल्याबद्दल आभार! आपल्याला सर्वात जुनी स्वातंत्र्यचळवळीतील कोणती आठवण लक्षात आहे?**

**शास्त्रीजी -** साधारणपणे लोकमान्य टिळकांना सन १९०८ साली शिक्षा झाली. मला आठवंच वर्ष होतं. तेव्हा माझे गाव धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर. त्या ठिकाणी अनेक मंडळी माझ्या घरी जमली, माझ्या ओटीवर आणि अतिशय खेद, संताप त्यांना प्राप्त झालेला मला आढळला. आणि माझा तिथे माझ्या ओटीवर लोकमान्य टिळकांच्या दैनिक 'केसरी'चे वाचन होत असे. मंगळवारी 'केसरी' निघायचा (प्रकाशित व्हायचा); परंतु तो उशिरा गुरुवारी तिथे यायचा.

**पुजारी - मंगळवारी नि शुक्रवारी निघायचा ना?**

**शास्त्रीजी -** नाही, तो आठवड्यातून एकदाच मंगळवारी निघायचा. त्याचे वाचन गुरुवारी आमच्या ओटीवर अनेक लोक जमून करीत असत. आणि ती आठवण पहिल्यांदा आहे. आणि एकटेच लोकमान्य टिळक शिक्षा होऊन ६ वर्षे (राजद्रोहाच्या अपराधाखाली) तुरुंगात गेले आणि त्यांना मंडाले (ब्रह्मदेश) तुरुंगात पाठवलं. यावेळेस भोवतालचे जे लोक मी पाहिले ते चांगले तरुण, मध्यमवयीन, त्यांच्यावर दुःखाची छाया होती. गावात सभा होऊन लोकमान्य टिळकांच्याबद्दलची भाषणे झाली. ही माझी पहिली आठवण. दुसरी आठवण म्हणजे लोकमान्य टिळक हे १९१४ साली पहिलं महायुद्ध सुरू झालं होतं, ते मंडालेच्या तुरुंगातून सुटून आले. सुटून आल्यानंतर 'गीतारहस्य' छापलं गेलं आणि 'गीतारहस्य'ची प्रत लोकमान्यांच्या सहीसकट माझ्या गुरूंना आली आणि त्यानंतर लोकमान्य टिळक हे वाईला मी शिकत होतो तिथे आले. त्यांना भाषणबंदी होती. तो काळ आठवतो.

**पुजारी - आपले गुरू नारायणशास्त्री मराठे नंतर स्वामी केवलानंद सरस्वती झाले, त्यांचा नि टिळकांचा कितपत स्नेह होता?**

**शास्त्रीजी -** ते टिळकांचे भक्त होते. केवलानंद सरस्वती ते तरुण, तर टिळक वयस्क होते. टिळकांचं जे 'गीतारहस्य' लिहिलं गेलं, त्याला सनातनी लोकांचा विरोध होता. त्यांनी (टिळकांनी) कर्मयोगपर अर्थ केला आणि तोच आमच्या गुरुवर्यांनी मान्य केला. ते स्वतः संन्याशाचे शिष्य होते; परंतु शंकराचार्यांचा संन्यासवाद खोडलेला आणि कर्मयोग प्रतिपादन केलेला हा त्यांना मान्य होता. आणि त्यामुळे ते टिळकांचे एका तऱ्हेने अनुयायी आणि आमच्या प्राज्ञपाठशाळेमध्ये जे विद्यार्थी आणि शिक्षक दोन्ही काम करत होते, अशा तऱ्हेचे क्रांतिवादी लोक होते. त्याच्यामध्ये दिनकरशास्त्री कानडे हे सशस्त्र क्रांतिवादी होते. त्या पहिल्या महायुद्धाच्या काळामध्ये या देशामध्ये क्रांतिकारक उठाव करण्याकरिता म्हणून सशस्त्र क्रांतीकरिता जी गुप्त चळवळ चालवली जात होती, तीमध्ये दिनकरशास्त्री कानडे होते; आणि ते पहिल्यांदा तळेगाव दाभाडे इथल्या समर्थ विद्यालयाचे शिक्षक आणि विद्यार्थी आणि ते सरकारने बंद केल्यानंतर तेथील मंडळी वेदान्त शिकायला आमच्या गुरूपाशी आली. ते वेदान्ताबरोबर सशस्त्र क्रांतीची चर्चा करत. १९१७ साली दुसरे एक मोठे सशस्त्र क्रांतिवादी नव्हे, तर गांधीवादी, गांधींचे पुढे प्रसिद्ध झालेले अनुयायी विनोबा भावे आले. तिथे दोन विचार मांडले जात होते. विनोबा भावे अहिंसेचे समर्थन करीत होते आणि दिनकरशास्त्री कानडे सशस्त्र क्रांतीशिवाय देश स्वतंत्र होणार नाही अशा विचारांचे पुरस्कर्ते होते.

**पुजारी - विनोबा किती काळ वाईत होते?**

**शास्त्रीजी -** सरासरी एक वर्ष. त्या ठिकाणी ते वेदान्तच शिकायला आलेले होते. शांकर भाष्य शिकण्यास आलेले होते.

**पुजारी - शास्त्रीजी, टिळक तुरुंगातून सुटून आल्यानंतर टिळकांच्या मृत्यूपर्यंत आपणास त्यांची किती भाषणे ऐकण्यास मिळाली? व भेट किती वेळा झाली?**

**शास्त्रीजी -** मला त्यांची तीनदा भेट झाली. भेट म्हणजे दर्शन ! पाया पडलो मी त्यांच्या. टिळकांच्या विचारांमध्ये सशस्त्र क्रांतिवाद आहे, असे काही म्हणत; परंतु त्यावेळी मी थोडासा प्रौढ झालो होतो. तर ते निःशस्त्र प्रतिकार व्हायला पाहिजे, लोकांमध्ये उठाव व्हायला पाहिजे, या विचाराचे होते. आणि त्यांनी नवा जो जहाल पक्ष निर्माण केला होता त्यांच्या प्रेरणेने, तीन प्रेरक होते या जहाल पक्षाचे. लाल, बाल आणि पाल. लाल म्हणजे लाला लजपतराय, बाल म्हणजे बाळ गंगाधर टिळक व पाल म्हणजे बिपीनचंद्र पाल. ही मंडळी जी आहेत ती स्वातंत्र्याची चतुःसूत्री सांगत नि तिचा प्रचार करीत. स्वातंत्र्याची चतु:सूत्री म्हणजे स्वदेशी, कष्ट सोसून जाडाभरडा कपडा घेऊन वापरायचा, परदेशी आकर्षक माल घ्यायचा, वापरायचा नाही. अशा विचारांचे म्हणजे स्वदेशी कष्ट सोसूनसुद्धा स्वदेशी, परदेशी मालाचा बहिष्कार म्हणजे मँचेस्टरचा जो कपडा आहे तो घ्यायचा नाही, त्याचा बहिष्कार करायचा आणि वेळोवेळी त्याची

होळी करायची. त्या बहिष्काराच्या होळयाही मी पाहिल्यात. आणि तिसरी गोष्ट म्हणजे राष्ट्रीय शिक्षण. ते राष्ट्रीय शिक्षण म्हणजे क्रांतिकारक विचाराचे तरुण तयार करायचे. त्याच्याबरोबरच औद्योगिक क्रांतीकरिता या देशामध्ये आधुनिक तंत्रज्ञान आलं पाहिजे आणि तंत्रज्ञानाच्या योगाने इथे माल तयार व्हायला पाहिजे याकरिता ते राष्ट्रीय शिक्षण पाहिजे असे ते राष्ट्रीय शिक्षण. हा ठराव १९०६ साली दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे जे अधिवेशन झाले तिथे तो पास झाला आणि हा जहाल पक्ष काँग्रेसमध्येच वाढत होता. टिळक तुरुंगातून सुटून आले सहा वर्षांची शिक्षा भोगून. या देशात जो नेमस्त पक्ष होता, गोखले त्यांचे पुढारी होते, महादेव गोविंद रानडे यांचा ज्याला पाठिंबा होता, त्याची संख्या सुशिक्षितात कमी झाली आणि जहाल पक्ष वाढू लागला, काँग्रेसमध्ये. आणि काँग्रेस ही संघटना होती, त्या काँग्रेसमध्ये देशाचा जो राष्ट्रवाद, की सगळ्या भाषा, सगळे धर्म, ते सर्व धार्मिक समाज यांना समाविष्ट करणारा असा मोठा राष्ट्रवाद टिळक सांगायला लागले आणि त्यामध्ये टिळकांचं वजन यामुळे वाढायला लागलं. परत महात्मा गांधी हे दक्षिण आफ्रिकेची चळवळ संपवून भारतात आले; पहिल्या महायुद्धाच्या काळामध्ये. आणि ते पहिल्यांदा ब्रिटिश सरकारला युद्धात मदत करण्याकरिता सैनिक द्यायला पाहिजे अशा विचाराचे होते; पण टिळकांचा विचार असा होता की, जर ब्रिटिश स्वराज्याचे हक्क देणार असतील या ठिकाणी, तर त्यांना आपण सहकार्य द्यावं. म्हणजे ज्याला म्हणता येईल की, 'रिस्पॉन्सिह को- ऑपरेशन' म्हणजे मर्यादित अर्थानेच सहकार्य करायचं. जर सरकार आपले प्रश्न सोडवत असेल, तर त्यांना आपण मदत करायची, असा टिळकांचा नि गांधींचा मतभेद होता. पुढे तो याच युद्धामध्ये अमृतसरला मोठी सभा भरली त्यामध्ये बायका, पोरं, सामान्य माणसं, सुशिक्षित लोक असे सहभागी होते. ती सभा प्रचंड होती. ती सरकारला मान्य नव्हती. त्यावर डायर या लष्करी अधिकाऱ्याने गोळीबार केला.

**पुजारी - जालियनवाला बागेत ना?**

**शास्त्रीजी -** हो, जालियनवाला बागेत. आणि तिथे शेकडो लहान-मोठी माणसे मेली. तर हे झाल्याबरोबर महात्मा गांधींनी ते जे सहकाराचं धोरण होतं, ते सोडून दिलं आणि या देशामध्ये प्रचंड खळबळ उडाली. त्याकरिता ते (गांधी) पंजाबमध्ये काय झालं हे पाहण्याकरिता निघाले, तेव्हा पंजाबच्या गव्हर्नरने पंजाबमध्ये त्यांनी शिरू नये म्हणून बंदी हुकूम काढला. तो गांधींनी मोडला.

**पुजारी - शास्त्रीजी, मी इथे असा प्रश्न विचारू इच्छितो की, लोकमान्य टिळक हे महाराष्ट्रातले पहिले असे पुढारी, की ज्यांना सर्व हिंदुस्तानची मान्यता मिळाली.**

**शास्त्रीजी -** हो !

**पुजारी - म्हणजे ते अनेक ठिकाणी गेले. त्यांना हिंदुस्तानचे अनेक पुढारी येऊन भेटले. त्यात योगी अरविंद घोष होते.**

**शास्त्रीजी -** योगी अरविंद घोष यांची गाठ पडली...

ते टिळकांचे अनुयायी झाले होते एका अर्थी. कारण टिळकांना ते साक्षात्कारी पुरुष मानत असत.

**पुजारी - योगी अरविंद घोष ना?**

**शास्त्रीजी -** हो, अरविंद घोष यांनी भगवतद्गीतेवर जे निबंध लिहिले आहेत, त्यात टिळकांचं वर्णन 'साक्षात्कारी पुरुष' असं केलं आहे. त्यातून त्यांनी टिळकांची सूचक अर्थाने भलामण केली आहे.

**पुजारी - टिळकांचा असा जो प्रभाव सबंध देशावरती पडला; आणि मग पुढे गांधीजी आले... टिळकांच्या मृत्यूनंतर.**

**शास्त्रीजी -** नंतर गांधी आले. हा जो जालियनवाला बागेमध्ये अत्याचार झाला, त्यामध्ये दीड वर्षे टिळक आपण या देशामध्ये 'असंतोषाचे जनक' नाही, हे सिद्ध करण्याकरिता इंग्लंडला गेले. तिथे ते दीड वर्ष होते; आणि गांधीजी या देशामध्ये जालियनवाला बाग प्रकरण झालं, त्यानंतर हिंडायला लागले. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात अनुयायी वर्ग मिळाला. टिळक येथे उपस्थित नसतानाच गांधी हे लोकांपुढे नेते म्हणून उभे राहिले. टिळक जेव्हा विदेशातून परत आले इंग्लंडहून, तेव्हा त्यांची आणि गांधींची सिंहगडला मुलाखत झाली. त्यामध्ये चर्चा झाली, की या देशामध्ये स्वराज्याची ही चळवळ कशी उभारायची. तर निःशस्त्र प्रतिकार केला पाहिजे, कायदेभंगसुद्धा वेळेवर केला पाहिजे; पण हे ब्रिटिशांचे राज्य जे आहे ते टिकू देता कामा नये; परंतु मी एकटाच गेलो तुरुंगात, कोणीच आलं नाही. लोक आहेत कुठे तयार? गांधी म्हणाले, 'मी तुम्हाला कायदेभंगाकरिता निःशस्त्र प्रतिकाराकरिता पाहिजे तितकी मदत देतो,' हे जे ते म्हणाले, दक्षिण आफ्रिकेत जेव्हा ते होते तेव्हा त्यांना जो अनुभव आला, की सामान्य माणूस, निरक्षर माणसंदेखील सत्याग्रहाकरिता लढायला तयार होतात, हा जो अनुभव लोकमनाचा तो त्यांना जो इथे दिसला तो अधिक प्रभावी होता. 'तुम्ही त्याची काळजी करू नका. आपण त्या दृष्टीने लढा करू'. त्या सुमाराला अवंतिकाबाई गोखले यांनी गांधींचे एक चरित्र, दक्षिण आफ्रिकेचा त्यांचा एकंदर कार्यक्रम आणि वर्णन केले आहे. त्याचे वर्णन - त्यास टिळकांनी प्रस्तावना लिहिलेली आहे - त्यात लिहिले आहे की, 'या देशात जो स्वातंत्र्याचा लढा होईल, त्याचा नेता हा पुढे येतो आहे.'

**पुजारी - गांधीजींचे मोठेपण टिळकांनी ओळखलेलं होतं तर?**

**शास्त्रीजी -** अगदी उत्तम तऱ्हेने.

**पुजारी - आणि तसं लिहूनही ठेवलं होतं ना?**

**शास्त्रीजी -** हो.

**पुजारी - पुढे गांधीजींनी ही स्वातंत्र्याची चळवळ आपल्या हाती घेतली होती, तिची वैशिष्ट्ये काय होती? आणि आपण त्या चळवळीत केव्हा केव्हा होता?**

**शास्त्रीजी -** मी त्या चळवळीच्या सन १९२० सालापासूनच प्रचारात होतो, आणि मी भाषणं

देत असे; परंतु जेव्हा गांधींनी असहकारितेची चळवळ उभारली सन १९२० साली या देशामध्ये, तेव्हा सुशिक्षित मध्यमवर्गावर त्याचा फार प्रभाव पडला. फार मोठमोठे वकील, सरकारी कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी यांनी भाग घेतला आणि सामान्य लोकांनी. सरकारला सहकार्य द्यायचं नाही, त्यांच्या कोणत्याही कार्यात, एका वर्षात स्वराज्य मिळेल, हे राज्य कोसळून पडेल. ते सशस्त्र क्रांतिकारक म्हणायचे, की असं राज्य थोडंच कोसळून पडतं? अरे तर्कशास्त्रदृष्ट्या त्यांचं म्हणणं खरं की लोकांनी या देशात सहकार्य करायचं नाही सरकारशी, तर सरकार चालणार कसं? हे तर्कशास्त्रदृष्ट्या खरं होतं. म्हणून त्यांनी जो लढा उभारला असहकारितेचा, त्या लढ्यामध्ये जनतेचा मोठा उठाव झाला आणि एका मोठ्या प्रचंड सभेमध्ये. चौरीचौरा या गावी फार खळबळ माजली आणि पाच पोलीस मारले गेले. त्याबरोबर गांधींची अट काय तर...

**पुजारी - ही किती सालची चळवळ?**

**शास्त्रीजी -** ही १९२०-२१ सालची चळवळ होती. त्यात गांधींना एकदम फार वाईट वाटलं की, या चळवळीचे व्रत म्हणजे सत्ताधारी जो आहे, त्यावर शस्त्र चालता कामा नये. त्याचा जीवही तितकाच पवित्र आहे आणि त्याचं हृदय बदलायचं आहे, ते हृदय आपण सगळ्यांनी सर्व तऱ्हेचे कष्ट सोसून बदलायचं आहे. आणि त्याला हा डाग लागलेला आहे. म्हणून पाच दिवसांचा गांधींनी उपवास केला आणि ती चळवळ परत घ्यायला ते तयार झाले. तसा ठराव केला आणि त्याच्यामध्ये १९२१ साली बारडोलीला ते कायदेभंगाची आणि करबंदीची चळवळ करणार होते, तर ती चळवळ यामुळे त्यांनी रद्द केली. बारडोलीला वल्लभभाईंच्या नेतृत्वाखाली करबंदीची चळवळ झाली होती आणि मी स्वतः बारडोलीला दोन महिने होतो. गांधींच्या उपवासाच्या शेवटच्या दिवशी मी तिथे हजर राहिलो आणि तेव्हापासून दोन महिने तिथे होतो आणि मगनलाल गांधी त्यांचे अत्यंत जवळचे मित्र आणि अनुयायी बारडोली आश्रम चालवत होते. वल्लभभाई येऊन - जाऊन होते आणि तिथं जी काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली, त्यात बारडोलीचा सत्याग्रह आता करायचा नाही, असा निर्णय झाला. त्यावेळेस मला असं आठवतं की, न. चिं केळकर त्या कार्यकारी मंडळात होते. त्यांनी गांधींना बरीच मदत केली होती. आंदोलन परत घेतलं पाहिजे अशा मताचे ते होते; परंतु नंतर त्यांनी 'केसरी'त अग्रलेख लिहिला होता, 'बारडोलीचा बार फुकट गेला' शीर्षकाचा. अंबालाल साराभाईंची बहीण गांधींची अनुयायी होती. तिनं त्या ठिकाणी 'केसरी'चा तो लेख मराठीमधून उत्कृष्टपणे वाचून दाखविला. तेव्हा गांधी म्हणाले, 'यांनी तर मला परवाच्या दिवशी मदत केली होती. हे असे कसे लिहितात? पण ते साहित्यकार होते ( केळकर ). नंतर गांधींना चळवळ मागे घ्यावी लागली. त्यांनी आपल्या साहित्यिक भाषेत, थोडं विनोदी शैलीत गांधींना लागेल असं लिहिलं. त्यामुळे गांधींना थोडंसं वाईट वाटलं; पण त्यानंतर गांधी लगेचच पकडले गेले. त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. तेच कलम गांधींना लावण्यात आले, जे टिळकांना लावले होते. त्याच कलमाखाली जेव्हा गांधींवर खटला सुरू झाला, तेव्हा गांधी नि लोकमान्यांत काय फरक

दिसला? टिळकांनी काय सांगितलं, 'मी राजद्रोह केला नाही. वरची सत्ता (ईश्वर) जाणते,' आणि गांधी म्हणाले, 'टिळकांना ज्या कायद्याखाली शिक्षा झाली, त्याच कायद्याखाली मला होते आहे, याचे भूषण वाटते, आनंद वाटतो. मी राजद्रोह केला आहे.' म्हणजे टिळकांचा काळ आणि गांधींचा काळ एवढ्यात इतका राजकीय फरक घडलेला होता.

**पुजारी - सारं वातावरण बदलून गेलं होतं आणि स्वातंत्र्याच्या लढ्याला सूचक, पूरक असं वातावरण निर्माण झालं होतं. आणि मग गांधींनी पुढे ज्या चळवळी केल्या त्यात आपला काय काय सहभाग होता?**

**शास्त्रीजी -** म्हणजे १९३५-३६ नंतर गांधींनी विधायक कार्याकडे म्हणजे स्वदेशी, चरखा, ग्रामोद्योग या कार्यक्रमांना महत्त्व दिलं. १९३० सालापर्यंत हिंदू-मुस्लिम युनिटी - हिंदू - मुस्लिम ऐक्य याला त्यांनी महत्त्व दिलं, त्यावर भर दिला आणि त्याच्याकरिताच त्यांनी १९२०-२१ साली खिलाफत बुडली होती, तर भारतातील मुसलमान होते ते खिलाफत म्हणजे धर्मवेत्त्यांच्या बाजूचे होते. पुन्हा खिलाफत स्थापन व्हावी अशी इथल्या मुसलमानांची भावना होती. तिला गांधींनी मदत केली. खिलाफतीची चळवळ असहकारिता चळवळीबरोबर होती. हिंदू-मुसलमानांमध्ये ऐक्य असलं पाहिजे. त्यांनी खांद्याला खांदा देऊन लढलं पाहिजे, असा दृष्टिकोन गांधींचा होता आणि टिळकांचाही तोच होता. मुसलमानांनी हिंदूंशी एक होऊन लढलं पाहिजे. १९२० साली टिळकांनी लोकशाही पक्ष काढला. त्याच्या कार्यक्रमात हिंदू - मुस्लिम ऐक्याचा दृष्टिकोन त्यांनी ठेवला; आणि मग पुन्हा उठाव करण्याकरिता १९३० साली गांधी असहारितेच्या चळवळीबरोबरच या सरकारचा कायदा गरिबांना पिडणारा आहे, गरिबांचं दारिद्र्य वाढतं आहे, ते काही कमी होत नाही, म्हणून त्यांनी नागरी असहकारिता (सिव्हिल डिसओबिडियंट), सविनय कायदेभंग म्हणजे कायदा मोडायचा आणि हे दाखवायचं की, हे राज्य गरिबांच्या हिताचं कार्य करीत नाही. म्हणून असा कायदा त्यांनी शोधला की, गरिबांना मीठ स्वस्त मिळालं पाहिजे, गरिबांना मीठ स्वतः करता आलं पाहिजे. त्याच्यावर सरकारने कर घेता कामा नये. हा मुद्दा अगदी सगळ्या जगाला पटण्यासारखा होता. इथे गरिबी आहे, तर त्यांनी सूचक अशा प्रकारचा कार्यक्रम हाती घेतला. कायदेभंगाचा आणि या कायदेभंगाच्या चळवळीत मी स्वतःही सामील होतो आणि मलाही त्यामध्ये शिक्षा झालेली आहे. मी धुळे जेलमध्ये बंदिस्त होतो त्या काळामध्ये.

**पुजारी - त्या काळामध्ये, आता पूर्वी जालियनवाला बागमध्ये लोकांवर गोळ्या चालविण्यात आल्या; परंतु त्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळीदेखील सत्याग्रहींवर लाठीमार झाला होता ना?**

**शास्त्रीजी -** झाला होता. तो प्रसिद्ध आहे. आणि नंतर पुन्हा गांधींनीही चळवळ मागे घेतली. नंतर गांधी-आयर्विन ॲक्ट झाला, समझोता झाला. इंग्लंडमध्ये राऊंड टेबल कॉन्फरन्स - गोलमेज परिषद झाली. तिच्यामध्ये अनेक भारतीय प्रतिनिधी सहभागी होते. त्यात गांधी होते, परत डॉ. आंबेडकर होते आणि डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांकरिता निराळ्या मतदारसंघांची मागणी केली.

तो प्रश्न काढला तेव्हा गांधी फार अस्वस्थ झाले. गांधींनी त्याचवेळी अस्पृश्यता निवारणाची चळवळ धसास लावली होती आणि हा १९३२ सालापर्यंतचा इतिहास आहे आणि त्यानंतर ही चळवळ १९३४ सालापर्यंत चालली. अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला खूप महत्त्व आलं. गांधी अगोदरच अस्पृश्यता निवारण करणारे होते.

**पुजारी - म्हणजे राजकारणाबाबतीत लोकजागृती होत असताना सामाजिक बाबतीतही लोकजागृती झाली पाहिजे, या दोन्ही बाबतीत गांधीजींचे पाऊल पुढे होते ना?**

**शास्त्रीजी -** हो, पुढे पुढे पडत होते.

**पुजारी - मला असं दिसतं की, १९३० सालापासून स्वातंत्र्यचळवळीत लोकांचा सहभाग वाढला हे खरे ना?**

**शास्त्रीजी -** १९२० आणि २१ सालामध्ये सगळा देश पेटलेला होता; पण काही काळ ती चळवळ मंद होती. काही काळ लोक थंडे होतात. तशाच तऱ्हेने ते थंडे झाले; पण पुन्हा तितक्याच जोराने १९३०-३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये पुन्हा सामील झाले. पुन्हा ही चळवळ १९३४ सालपर्यंत चालली. पुढे विधायक कार्यक्रमांना गांधींनी खूप महत्त्व दिलं आणि कुटीरोद्योगांना, अस्पृश्य निवारणाला, हिंदू - मुसलमान ऐक्य कार्यक्रम हाती घेतला आणि या कार्यक्रमांना ते फार महत्त्व देत होते. आणि मग नंतर महायुद्ध सुरू झालं.

**पुजारी - १९३५ च्या कायद्याने (मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा) गांधीजी आणि त्यांचे सहकारी यांच्यात मतभेद झाले होते का?**

**शास्त्रीजी -** हो, म्हणजे कायदेमंडळात सामील व्हावं की नाही याबाबत मतभेद होते. स्वराज्य पक्ष निर्माण झाला होता. त्यामध्ये मोतीलाल नेहरूसुद्धा होते १९३० सालानंतर. जवाहरलाल नेहरूंचे वडील; पण ती चळवळ जी होती, तिने ग्रीप, गती काही घेतली नाही. लोक गेले निवडून; पण शेवटी गांधींनी जी १९४२ ची 'भारत छोडो' चळवळ सुरू केली, त्यात परत लोक सामील झाले.

**पुजारी - त्या अगोदर १९३९ साली शास्त्रीजी, गांधीजींनी जो व्यक्तिगत सत्याग्रह सुरू केला त्यातपण लोक होते ना?**

**शास्त्रीजी -** होते, त्यात विनोबाही सामील होते. त्यास तितकं महत्त्व नव्हतं; पण लोक ज्यात मोठ्या संख्येने सामील झाले ती १९४२ ची चळवळ होती. तो जनतेचा उठाव होता आणि ब्रिटिश सरकारवर प्रभाव अशा तीन महत्त्वाच्या घटना होत्या. त्यातील तिसरी 'भारत छोडो' ही होती. दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडचा पराभव दिसू लागला. तेव्हा गांधींनी 'भारत छोडो' चळवळ सुरू केली आणि त्या चळवळीचा अंत सन १९४५ साली झाला. मधे अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या; पण त्या इतक्या महत्त्वाच्या नव्हत्या. पण १९४५ साली दोस्त राष्ट्रांचा विजय अनपेक्षितपणे झाला. ॲटम बॉम्ब त्यांना मिळाल्यामुळे. आणि मग ब्रिटिशांनी

भारत सोडण्याचा संकल्प जाहीर केला. मग काँग्रेसने भारताची घटना समिती निर्माण केली आणि त्या घटना समितीच्या योगाने भारताची जी उच्च दर्जाची संसदीय लोकशाहीची घटना होती, ती अस्तित्वात आली. एक राष्ट्र - १४ महत्त्वाच्या भाषा बोलणारं - इथलं एक एक भाषिक राज्य म्हणजे युरोपातील एक एक राष्ट्र होतं. युरोपात एकच मुख्य धर्म होता, तो म्हणजे ख्रिश्चन. इस्लामी राष्ट्रांमध्ये इस्लाम; पण भारतातून पाकिस्तान निर्माण झालं तरी भारतात इतके मुसलमान असताना एक राष्ट्र निर्माण झालं. हे जगातील कोणत्याही राष्ट्रीयत्वाशी तुलना होऊ शकत नाही इतक्या उच्च दर्जाचं आहे की, जगातले सर्व धर्म इथे राहतात, ते त्यात सामील आहेत. एवढी मोठी राष्ट्रे जगात आहेत. भारताने त्यात उच्च दर्जाचे राष्ट्रीयत्व निर्माण केले. जरी एका अर्थाने त्या चळवळीला मर्यादा पडली ती म्हणजे भारताची फाळणी झाली, पाकिस्तान निर्माण झालं, तरी त्या राष्ट्रीयत्वाचा एक मोठा अर्थ होता - जो टिळकांनी, गांधींनी, दादाभाई नौरोजींनी केला होता. तो पंडित जवाहरलाल नेहरू यांनीपण केला होता - तो अनेक भाषा, अनेक धर्म, मानव जाती- मानवी हक्कांकरिता एकत्र आल्या, असा स्वातंत्र्याचा संग्राम तयार झाला. या स्वातंत्र्य संग्रामातून भारतीय राष्ट्र उदयाला आलं. काँग्रेसमुळे स्वातंत्र्य मिळालं यापेक्षा उच्च दर्जाचं लोकशाही राष्ट्र निर्माण झालं काँग्रेसच्या प्रभावाखाली, पण या चळवळीचं हे प्रमुख वैशिष्ट्य व यश होतं.

**पुजारी - शास्त्रीजी, आपण जी माहिती दिली, ज्या चळवळीत आपण भाग घेतला, स्वातंत्र्य मिळालेलं पाहिलं. तो अनुभव श्रोत्यांना ऐकायला मिळाला त्याबद्दल आपले आभार ! धन्यवाद !!**

**शास्त्रीजी -** तुम्हालाही धन्यवाद ! तुम्ही फार महत्त्वाचे प्रश्न विचारलेत त्याबद्दल तुम्हालाही धन्यवाद !!

**(सौजन्य - आकाशवाणी केंद्र, जळगाव, ध्वनिमुद्रण - २५ डिसेंबर, १९८५)**

OOO

१८

# सुटलेली कोडी

## मुलाखतकार - **प्रा. मे. पुं. रेगे**

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'रिडल्स ऑफ हिंदुइझम' या पुस्तकाच्या संदर्भात प्रा. मे. पुं. रेगे, संपादक, नवभारत यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची घेतलेली मुलाखत.)

शास्त्रीजी, डॉ. आंबेडकरांच्या 'रिडल्स ऑफ हिंदुइझम' - 'हिंदू धर्मातील कोडी' - या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे महाराष्ट्रात वादळ निर्माण होईल, अशी चिन्हे दिसत होती; पण सुदैवाने सर्वांनी सामंजस्य दाखविल्यामुळे हे वादळ शमले. आंबेडकरांचे हे पुस्तक हिंदू धर्माच्या समीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणार यात शंका नाही. त्यांचा तसा अधिकार होता. या समाजावर त्यांची खोल निष्ठा होती. समाजाचे विचार आणि आचरण सुधारावे अशी त्यांची तळमळ होती. समाजसुधारक, धर्मसुधारक म्हणून त्यांनी ही समीक्षा हाती घेतली असणार. तेव्हा या समीक्षेकडे सर्वांनी ही मूलतः विधायक समीक्षा आहे अशा दृष्टीने, तटस्थपणे आणि गुणग्राहक वृत्तीने पाहिले पाहिजे; पण याबरोबरच हेही उघड आहे की, आंबेडकरांनी केलेल्या या समीक्षेला काही मर्यादा आहेत. त्यांची अध्ययनशीलता प्रख्यात आहे; पण त्यांना संस्कृत भाषा येत नव्हती. तेव्हा त्यांना भाषांतरावर भिस्त ठेवावी लागत असे. दुसरी आणि कदाचित अधिक महत्त्वाची असलेली गोष्ट अशी की, इतर अनेक विषयांप्रमाणे भारतीय संस्कृतीचेही त्यांनी अध्ययन केलेले असले तरी सबंध आयुष्य एखाद्या विषयाच्या व्यासंगात आणि चिंतनात घालविलेल्या, त्या विषयात मुरलेल्या पंडिताला जसे त्याचे सूक्ष्म आणि खोल ज्ञान असते तसे आंबेडकरांना भारतीय संस्कृतीचे असणे शक्य नव्हते. उदा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर किंवा पां. वा. काणे यांचा जो अधिकार होता तो काही आंबेडकरांचा नव्हता.

आता तुमची विद्वत्ता भांडारकर - काणे यांच्या पठडीतील आहे. वेद, इतिहास-पुराणे, दर्शने, धर्मशास्त्र यात तुम्ही मुरलेले आहात. शिवाय धर्मपरिवर्तनवादी प्राज्ञपाठशाळा मंडळाचे प्रतिनिधी आणि नेते म्हणून महाराष्ट्र तुम्हाला ओळखतो. तेव्हा आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या केलेल्या

समीक्षेची समीक्षा करायला तुमच्यापेक्षा अधिक अधिकारी व योग्य व्यक्ती सुचणे कठीण आहे. तुम्ही या समीक्षेकडे एक पंडित म्हणूनही पाहू शकता आणि एक समाजसुधारक म्हणूनही पाहू शकता. तेव्हा तिच्याविषयीचे तुमचे विचार तुम्ही मांडावे अशी विनंती आहे.

**प्रश्न - माझा पहिला प्रश्न असा की, आंबेडकरांना हिंदू धर्मात ही जी कोडी सापडली आहेत त्यांचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे? ही कोडी सोडविण्याची जबाबदारी त्यांनी हिंदू समाजावर सोपविली असेल; पण ज्यांना ते कोडी म्हणतात ती त्यांना कोडी या स्वरूपात का दिसतात?**

**उत्तर -** या ग्रंथाविषयी - 'हिंदू धर्मातील कोडी' या ग्रंथाच्या एकंदर स्वरूपाविषयी मी प्रथम थोडे बोलतो. हिंदू धर्माची आपण करीत असलेली समीक्षा शक्य तितकी व्यापक, सर्वांगीण व्हावी, हिंदू धर्माचे कोणतेही अंग, हिंदू संस्कृतीतील कोणताही महत्त्वाचा विषय राहून जाऊ नये म्हणून त्यांनी टिप्पणे सुरू केली. मॅक्सम्युलर, विल्सन, मूर यांच्यापासूनच्या हिंदू संस्कृतीच्या पश्चिमी पंडितांच्या ग्रंथांचे अध्ययन त्यांनी केले आणि त्यांना जे प्रश्न पडले त्यांच्यावरून त्यांची धारणा अशी झाली की, हिंदू धर्माच्या पाशातून हा समाज बाहेर पडला पाहिजे. त्याशिवाय त्याची प्रगती होणार नाही. आपली धार्मिक - सांस्कृतिक परंपरा परिपूर्ण, निर्दोष आहे असे जे समाधान त्याला आहे ते नाहीसे केले पाहिजे आणि त्याने नवीन गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत. त्याच्यात मुळापासून बदल झाला पाहिजे. अशा मूलगामी दृष्टिकोनातून त्यांनी ही कोडी मांडलेली आहेत.

पण त्यांच्यातील अनेक कोडी आज सुटलेली आहेत किंवा सुटण्याच्या मार्गावर आहेत. गेल्या दोनशे वर्षांत हिंदू समाजाचे जे श्रेष्ठ धार्मिक, सामाजिक नेते आणि तत्त्वचिंतक होऊन गेले त्यांनी श्रुति-स्मृति-पुराणोक्त धर्माच्या पलीकडे जाऊन नव्या युगाला अनुरूप अशी पावले टाकली आहेत, हे आपल्या ध्यानात येईल. त्यातून बरीचशी कोडी सुटली आहेत.

**प्रश्न - अशा सुटलेल्या कोड्यांची काही उदाहरणे देता?**

**उत्तर -** उदा. जातिसिद्ध म्हणजे जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाजरचना. अशी समाजरचना हिंदू समाज आता मानीत नाही. आज जो हिंदू कायदा आहे त्याच्याप्रमाणे कोणत्याही दोन जातींच्या व्यक्तींनी केलेला विवाह कायदेशीर म्हणून मान्य झाला आहे. वैवाहिक आणि कौटुंबिक संबंधांविषयीचे स्मृतींवर आधारलेले धर्मशास्त्र आज टाकून देण्यात आले आहे. तेव्हा हे कोडे राहिलेले नाही. ते सुटले आहे.

दुसरी गोष्ट वेद हे धर्मग्रंथ अपौरुषेय आहेत आणि निर्दोष, परिपूर्ण आहेत, सर्व सत्ये त्यांच्यात ग्रथित आहेत ही जी श्रद्धा होती तिला एका अर्थाने सांभाळले आहे आणि एका अर्थाने टाकले आहे. टाकले आहे कसे? तर टिळकांसारखे वेदान्ती, राजकीय द्रष्टे आणि नेते, जे हिंदू परंपरेचे समर्थक म्हणून मानले जातात ते 'धि आर्क्टिक होम इन धि वेदाज्' हा ग्रंथ लिहितात. म्हणजे ते वेद कुठे निर्माण झाले याचा शोध घेतात. म्हणजे वेद अपौरुषेय आहेत असे ते मानीत नाहीत. आर्य ही प्राचीन काळातली जी एक जमात होती त्या जमातीने रचलेले साहित्य म्हणून ते वेदाकडे

पाहतात.

पण या ग्रंथांना एवढे महत्त्व देण्याचे कारण काय हा प्रश्न उपस्थित होतो. आंबेडकरांनीही 'वेदाचे सार तरी काय आहे?' असा प्रश्न विचारला आहे. आता पहिला मुद्दा असा की, मानवजातीचा प्राचीन असा विचारसंग्रह लिखित स्वरूपात ऋग्वेदाच्या रूपानेच मिळतो. आंबेडकर म्हणतात की, ऋग्वेदामध्ये तात्त्विक दृष्टीने महत्त्वाचे असे काहीच नाही. ऋग्वेदात विश्वाकडे कसे पाहिले आहे? या विश्वात ज्या शक्ती आहेत त्या दिव्य शक्ती आहेत ह्या भावनेने वैदिक ऋषींनी विश्वाकडे पहिले आहे. ही भव्य भावना आहे. आपण सर्व ह्या दिव्य शक्तींच्या प्रपंचाचे भाग आहोत. या दिव्य शक्तींचा आणि आपला घनिष्ठ संबंध आहे - हा जो तारकागणांचा प्रचंड पसारा आहे तो आपला पिता आहे - द्यौष्णिता - पृथ्वी आपली माता आहे, हे विश्व एक कुटुंब आहे, पित्याच्या छत्राखाली, मातेच्या मांडीवर सर्व प्राणिमात्र आहेत, मनुष्य आहे, हा जो विश्वाविषयीचा उच्च दर्जाचा विश्वास आहे तो ऋग्वेदापासून जसा मिळतो तसा इतर कशापासून मिळणार नाही.

तसेच पाहा - तत्त्वज्ञान हे मौलिक प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही. ऋग्वेदामध्ये हे विश्व म्हणजे एक महान प्रासाद आहे, 'किंस्वित् वनम् क उ स वृक्ष आस यतो द्यावा पृथिवी निष्टतक्षुः ।' द्यूलोक आणि पृथ्वी हा जो प्रासाद तासलेल्या लाकडांपासून बनविला आहे, ती लाकडे कोणत्या वनापासून आणली होती? तत्त्वज्ञानातले प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तो कोण देव ज्याला आम्ही अर्पण करीत आहोत, त्याचे नाव काय आहे, तो जो प्रजापती विश्वाचा स्वामी आहे तो कोण?' 'कस्मै देवाय हविषा विधेम?' असे सबंध सूक्त आहे. - ऋचांचे. कोणत्या देवाला आम्ही हे हवन करीत आहोत, हे विश्व त्याने कसे निर्माण केले, ही प्राणिसृष्टी कशी छान जगते आहे, वगैरे विचार त्यात मांडले आहेत. आणि 'तो कोण?' या प्रश्नात, त्याच्या स्वरूपाचे विवरण करणे माणसाच्या सामर्थ्याच्या पलीकडचे आहे असे सूचित आहे. आधुनिक पश्चिमी पंडित, ज्यांनी कान्ट-हेगेल पचविलेले आहेत - उदा. मॅक्सम्युलर. त्याने कान्टच्या 'क्रिटिक ऑफ प्युअर रीझन'चे भाषांतर केले आहे - ते नासदीय सूक्ताने चकित होतात. 'विश्व प्रारंभी कसे होते, होते की नव्हते, होते तर त्याचे स्वरूप काय होते, हे सगळे अंधाराने, म्हणजे अज्ञानाने झाकले गेले आहे,' असे नासदीय सूक्तात म्हटले आहे. अशी सूक्ते पाहिली म्हणजे असे वाटते की, याची नीट चर्चा जर बाबासाहेबांपुढे झाली असती तर त्यांनी ऋग्वेदात काही सार आहे मान्य केले असते.

त्यांना एक प्रश्न आहे की, ऋग्वेद बहुदेवतावादी आहे की एकदेवतावादी आहे? आता असे आहे की एकदेवतावादात बहुदेवतावाद येऊ शकतो, असे ऋग्वेदातच म्हटले आहे. पहिल्या मंडलामध्ये ६४ व्या सूक्तात 'एकं सद् विप्रा : बहुधा वदन्ति' हे वचन आले आहे. सत् एकच आहे पण त्याचे वर्णन विप्र, म्हणजे शहाणे लोक निरनिराळ्या रूपांनी करतात. म्हणजे सर्व धर्मांना हिंदू धर्माच्या पोटात घेणारा विचार ऋग्वेदकाळातच झाला होता. बाबासाहेब म्हणतात,



वाय १७८-१७

'हा chaos आहे.'. हा chaos नाही तर सर्वसंग्रह आहे आणि हा सर्वसंग्रह विशिष्ट तत्त्वांच्या आधारे केला आहे. तेव्हा हे कोडेही सुटलेले आहे.

**प्रश्न - शास्त्रीजी, मघाशी तुम्ही म्हणाला की, या समीक्षेत काही न्यून राहू नये म्हणून बाबासाहेबांनी काळजीपूर्वक टिप्पणे केली होती. प्रश्न असा उपस्थित होतो की, या टिप्पणांवर योग्य प्रकारे संस्करण झाले आहे का? हा ग्रंथ व्यवस्थित स्वरूपात प्रकाशित झाला आहे का?**

**उत्तर -** नाही. या टिप्पणांत अनेक दोष राहिले आहेत. उदा. त्यांनी अनेक ठिकाणी ब्रह्मसूत्रांचा निर्देश केला आहे. उदा., 'ब्रह्मसूत्र, ९', 'ब्रह्मसूत्र, १०' अशाप्रकारे संदर्भ दिले आहेत; पण असे संदर्भ देता येणार नाहीत. ब्रह्मसूत्राचे चार अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत आणि प्रत्येक पादातील सूत्रांचे क्रमांक आहेत. तेव्हा संदर्भ या पद्धतीने दिले पाहिजेत. 'ब्रह्मसूत्र ९' म्हणजे काय असू शकेल? १६ पाद आहेत. तेव्हा '९' हा सूत्रक्रमांक १६ वेळा आलेला आहे. अध्याय व पाद देऊन मग सूत्रक्रमांकाकडे आले पाहिजे.

दुसरी गोष्ट पाहा. ज्यांच्यावरून या कोड्यांपासून प्रथम वावटळ सुरू झाली ती म्हणजे राम आणि कृष्ण यांच्याविषयीची विधाने. या संदर्भात पाहा. दशरथाला संतती होत नव्हती, म्हणून त्याने ऋष्यशृंग मुनीकडून पुत्रकामेष्टी यज्ञ करविला ही वाल्मीकी रामायणातील कथा; पण 'रिडल्स'मध्ये 'ऋष्यशृंग' हे नावच सापडत नाही. फक्त शृंग मुनी सापडतो. 'रिडल्स'मध्ये दशरथाच्या राण्यांना पिंड देण्यात आले होते असे म्हटले आहे. पिंड नव्हे तर पायस देण्यात आला होता. म्हणजे एक प्रकारची खीर दिली होती. 'अयोध्या' म्हणजे आधुनिक वाराणसी असे विधान आहे. अयोध्या वाराणसीहून वेगळी आहे (सध्या तेथे रामजन्मभूमी-बाबरी मशीद हा वाद आहे). रामाला बारा वर्षे वनवासात पाठविले असे या पुस्तकात सांगितले आहे. बारा नव्हे, चौदा वर्षे. रावणाने सीतेला राजवाड्यात ठेवले असे म्हटले आहे. रावणाने सीतेला अशोकवनात ठेवले होते. असे मूळच्या ग्रंथात जे सांगितले आहे त्याच्याशी विसंगत असलेले असे अनेक संदर्भ या पुस्तकात देण्यात आले आहेत. या टिप्पणांपासून मुद्रणप्रत नीट तयार करण्यात आली असती तर या चुका राहिल्या नसत्या.

अशा चुका फार राहिल्या आहेत. मी ज्यांचा निर्देश आतापर्यंत केला त्या सर्वसाधारण सुशिक्षित माणसाच्या सहजपणे ध्यानात येतील अशा आहेत. पण पुढील विधान पहा. मैत्रनिणी संहिता आणि काठक संहिता यांचा शुल्कयजुर्वेदाच्या संहिता म्हणून निर्देश करण्यात आला आहे. त्या वास्तविक कृष्णयजुर्वेदाच्या आहेत. ही चूक सर्वसाधारण लोकांच्या ध्यानात येणार नाही, अशा अनेक चुका आहेत.

**प्रश्न - याचा एक अर्थ असा की, या पुस्तकांची मुद्रणप्रत पुरेशा काळजीने करण्यात आली नाही. दुसरा अर्थ असा की, स्वतः बाबासाहेबांनी मुद्रणप्रत तयार केली असती, तर आज ज्या स्वरूपात हे पुस्तक लोकांपुढे आले आहे, त्या स्वरूपात ते आले नसते.**

**त्यात बहुधा अनेक बदल झाले असते.**

**उत्तर -** होय. उदा. बाबासाहेबांनी असे म्हटले आहे की, पुराणांना जेव्हा महत्त्व देण्यात येते तेव्हा श्रुतींना डावलण्यात येते. आता असे आहे की, पुराणात जे विषय आहेत तो हा जो मूर्तिपूजक असा हिंदू समाजाचा मोठा भाग आहे, त्याच्या मूर्ती, तीर्थयात्रा, व्रते इत्यादी, त्यांच्याशी संबंधित आहेत. तेथे वेदप्रस्तुत नाहीत. या विशिष्ट संदर्भात पुराणांना महत्त्व आहे; पण याचा अर्थ पुराणे मानली, की वेद टाकले असा होत नाही. येथे विषयभेद आहे. याचे आणखी एक उदाहरण. उपनिषदांनी वेदांची निंदा केली आहे असे या पुस्तकात म्हटले आहे. उदा. मुण्डकोपनिषदात. निंदा वेदांची नाही, तर वेदातील यज्ञसंस्थेची. जेव्हा ज्ञानाला महत्त्व येते तेव्हा यज्ञांचा अधिक्षेप होतो. या संदर्भात पूर्वमीमांसेचा एक नियम ध्यानात घेणे फायद्याचे ठरेल. 'न हि निन्दा निन्द्यं निन्दितुं प्रवर्तते किन्तु प्रकृतं स्तोतुम् ।' ज्ञान महत्त्वाचे आहे हे सांगण्याकरिता, कर्म महत्त्वाचे नाही हे सांगतात व म्हणून कर्माची म्हणजे यज्ञाची निंदा केलेली आहे. शिवाय त्याच्यात तारतम्य आहे. द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे, असा अधिकारभेद आहे.

धार्मिक ग्रंथांचा अर्थ लावण्यासाठी त्या, त्या धर्मात एक विशिष्ट पद्धत घालून दिलेली असते. हिंदू धर्माच्या बाबतीत ही पद्धत स्पष्ट आहे. ती म्हणजे मीमांसेची पद्धत. ही पूर्वमीमांसेने स्पष्ट केलेली पद्धत होय. ती सर्वमान्य आहे. या पद्धतीतील एक धाटणी म्हणजे त्या, त्या प्रकरणातील विषयांचे महत्त्व ठसविण्यासाठी इतर प्रकरणांतील विषयांचे महत्त्व कमी लेखण्यात येते; पण ही जी धाटणी आहे तिला महत्त्व नाही. हा निर्णय मीमांसेतच करण्यात आला आहे. तेव्हा आंबेडकरांना हे जे कोडे पडले आहे ते पूर्वमीमांसेचा सूत्रकार जो जैमिनी त्याने सोडविले आहे. जैमिनी आणि बादरायण (ब्रह्मसूत्रकर्ता) यांनी जी कोडी सोडविली आहेत ती आंबेडकरांना दिसली; पण ती सुटलेली आहेत.

तेव्हा माझे म्हणणे असे की, बरीचशी कोडी पूर्वीच सोडविली होती आणि गेल्या दीडशे वर्षात हिंदूंच्या वरिष्ठ, सर्वसामान्य नेत्यांनी इतर काही महत्त्वाची कोडीही सोडविली आहेत. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मन्वादी - स्मृतीतील सर्व कौटुंबिक कायदे नव्या हिंदू कायद्याने झुगारून दिले आहेत. आजच्या आपल्या राज्यघटनेप्रमाणे अस्पृश्यता रद्द करण्यात आली आहे; पण अस्पृश्यता स्मृतींमध्ये आहे.

हिंदू धर्म जो वेळोवेळी बदलत गेला त्यामुळे तो सनातन आहे. बाबासाहेब प्रस्तावनेत म्हणतात की, हिंदू धर्म सनातन आहे असा दावा करण्यात येतो; पण तो सनातन कुठे आहे? तो सारखा बदलत गेला आहे. माझे म्हणणे असे आहे की, तो बदलत गेला आहे. म्हणून तो सनातन राहिला आहे. वेदातले देव टाकले आणि नवीन देव घेतले असे बाबासाहेबांचे म्हणणे आहे. ते बरोबर आहे. याच्या मागे इतिहास आहे आणि तिच्या या परिवर्तनशीलतेमुळे ही परंपरा टिकून राहिली आहे. ख्रिस्ती धर्मामुळे पूर्वीचा जो रोमन धर्म होता तो टाकून देण्यात आला. जर हिंदू धर्माचा संस्कार ख्रिस्ती धर्मावर असता तर त्याने रोमन धर्म पोटात घेतला असता आणि

ग्रीकांचा धर्मही पोटात घेतला असता; पण हिंदू धर्मामध्ये वेदकाळापासूनच असा दृष्टिकोन होता की, ज्या, ज्या उपासना माणसे श्रद्धेने चालवितात त्या उपासना आणि त्यांच्यामागच्या श्रद्धा आपापल्या पातळीवर प्रमाण आहेत. आपल्या उपासनापद्धतीहून भिन्न असलेल्या उपासना पद्धतीच्या मागच्या श्रद्धा हाणून पाडायच्या टाळीत, त्या आपोआप बदलत, अधिक सात्त्विक होत गेल्या तर या बदलांचे स्वागत करायचे. हिंदूंच्या श्रद्धा वेळोवेळी बदलत गेल्यामुळे हिंदू धर्माच्या ठिकाणी 'सनातनता' आहे. म्हणजे या धार्मिक परंपरेचा प्रारंभ कधी झाला हे सांगता येत नाही इतकी ती प्राचीन आहे आणि ती अजून टिकून आहे. तेव्हा आपल्या इतिहासाची वास्तव जाण पोटात ठेवून हा धर्म सनातन राहिला आहे.

**प्रश्न - शास्त्रीजी, तुम्ही मघाशी अधिकारभेदाचा निर्देश केला. अधिकारभेदाची संकल्पना मानवी समतेच्या तत्त्वाशी विसंगत ठरू शकेल; पण वेगवेगळी माणसे जशी प्रत्यक्षात आहेत तशी घेतली, तर अधिकारभेद स्वीकारणे योग्य आहे असेही वाटते. या विसंगतीमधून असा मार्ग काढता येईल : जरी प्रारंभी तुमचा अधिकार कनिष्ठ असला तरी तुम्ही जर स्वतःची नैतिक व आध्यात्मिक उन्नती साधली तर तुम्हाला श्रेष्ठ अधिकार प्राप्त होतो आणि अशी उन्नती साधणे प्रत्येक व्यक्तीच्या हातात असते.**

**उत्तर -** हे तत्त्व हिंदू धर्माला मान्य आहे. त्याला नाव दिले आहे 'तपःप्रभाव'. तुम्ही जर परिश्रमाने अशी स्वतःची प्रगती केली, तर तुमचा अधिकारही वाढत जातो.

**प्रश्न - आणि मग तुमची श्रद्धाही अधिकाधिक उन्नत होत जाते.**

**उत्तर -** होय. ती अधिकाधिक सात्त्विक बनत जाते आणि मग उच्च दर्जाचे तात्त्विक चिंतन जिच्यात सामावलेले असते अशी उपासनापद्धती तुम्ही स्वीकारता. उदा. मूर्तिपूजा आणि मानसपूजा किंवा तीर्थयात्रा आणि ध्यानधारणा यातील भेद घ्या. मी जेथे बसलो आहे तेथेच देव आहे, तेथेच विठ्ठल आहे, मग पंढरीला जायची जरूरी काय, असे संत विचारतात. अशा स्वरूपाचे उच्च दर्जाचे धर्मचिंतन ज्याला साधले आहे तो मूर्तिपूजा सोडून देतो आणि ही आध्यात्मिक पायरी याच जन्मात गाठता येते.

**प्रश्न - मग या तुमच्या विवेचनातून हिंदू कुणाला म्हणावे या प्रश्नावर प्रकाश पडतो का? बाबासाहेबांचे म्हणणे असे आहे की, मुसलमान कुणाला म्हणावे, ख्रिस्ती कुणाला म्हणावे याची स्पष्ट उत्तरे आहेत. हिंदू कुणाला म्हणावे याचे स्पष्ट उत्तर नाही. उदा. हिंदू असण्यासाठी वेदांचे प्रामाण्य मानणे आवश्यक आहे का?**

**उत्तर -** त्याचे असे आहे की, श्रोतव्य आणि श्रुत यांच्यापलीकडे तो जातो. कोण? ज्याची सर्व आसक्ती संपलेली आहे असा निर्लेप बुद्धीचा माणूस श्रुतीच्या, वेदांच्या पलीकडे जातो असे हिंदू धर्मच सांगतो.

**प्रश्न - बरे ! पुराणे मानली पाहिजेत का?**

**उत्तर -** एक गृहीतकृत्य असे आहे की, फक्त श्रुती हेच प्रमाण आहे. बाकी सर्व श्रुतीचे अनुवादक आहेत. स्मृती म्हणजे वेदांतल्याच स्मरलेल्या गोष्टी. आणि पुराणांना स्मृतित्व आहे. पुराणे या स्मृतीच आहेत. तेव्हा दोनच प्रमाणे श्रुति व श्रुतींना अनुसरणाऱ्या स्मृति.

**प्रश्न - शास्त्रीजी, तुम्ही मघाशी जो एक मुद्दा मांडला त्याला धरून हा प्रश्न विचारतो. धार्मिक ग्रंथांचा अर्थ लावण्याची मीमांसेची एक विशिष्ट पद्धत आहे असे तुम्ही म्हणाला. आता 'रिडल्स' मुळे जी वावटळ उठत होती तिचा काहीसा संबंध रामकथेशी पोहोचतो. रामाच्या चरित्राचे बाबासाहेबांनी जे विश्लेषण केले ते काही जणांना खटकले. मीमांसापद्धतीने तुम्ही रामकथेकडे कसे पाहाल?**

**उत्तर -** रामकथा वाल्मीकी रामायणात आली आहे आणि वाल्मीकी रामायण हे केवळ महाकाव्य आहे आणि राम हा विष्णूचा किंवा परब्रह्माचा अवतार आहे या दृष्टीने काही रामायणे रचण्यात आली आहेत. उदा. आनंदरामायण, अद्भुतरामायण इत्यादी ही पुराणे आहेत. तेव्हा रामायणा - रामायणात फरक आहे. राम हा विष्णूचा अवतार आहे हे जे वाल्मीकी रामायणात आले आहे तो प्रक्षेप आहे. हे आधुनिक चिकित्सक पद्धतीमुळे स्पष्ट झाले आहे. पश्चिमी आणि भारतीय संशोधकांनी रामायणात प्रक्षिप्त भाग कोणते आहेत, मूळ ग्रंथ कोणता, कोणती भर पडली, सुसंगत भर कोणती याची उत्तम मीमांसा केली आहे. मूळचे वाल्मीकीचे रामायण आहे, ते एक उत्कृष्ट, अद्भुतभव्य असे काव्य आहे. काव्यरचनेची जी अलंकारयुक्त, सुंदर शैली संस्कृतमध्ये विकसित झाली तिची मुळे तुम्हाला वेदांपर्यंत नेता येतात; पण या शैलीचे उत्कृष्ट, सुसंगत, सर्व रसांनी पूर्ण असे पहिले बांधीव उदाहरण म्हणजे वाल्मीकी रामायण. त्याची संख्या २४००० आहे. बालकांड आणि उतरकांड हे प्रक्षेप आहेत हे स्पष्ट दिसते. उदा. रामायणात दोनदा विषयानुक्रमणिका आली आहे. एकीत उत्तरकांडाचा निर्देशच नाही. बालकांडात जे अनेक विषय आले आहेत त्यांचा रामकथेशी अर्थाअर्थी काही संबंध नाही. तेव्हा अयोध्याकांडापासून युद्धकांडापर्यंतची पाच कांडे हेच मूळचे रामायण. त्यात वाल्मीकीच्या भव्य प्रतिभेचे रूप स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहे आणि त्याचा प्रभाव दोन हजार वर्षे टिकून आहे. रामायणाचे उत्सव करतात. इंडोनेशिया हे मुसलमान राष्ट्र आहे. तेथे रामायणाचा उत्सव होतो. तेथे रामायणाचे अध्ययन होते. व्हिएतनाम, ब्रह्मदेश, सयाम या देशांतही रामायणाचा उत्सव होतो. तेव्हा गेली दोन हजार वर्षे रामायण हे जागतिक साहित्यात श्रेष्ठ स्थान व्यापून आहे; पण 'रिडल्स'मध्ये बाबासाहेबांनी या एकंदर वस्तुस्थितीला स्पर्श केलेला नाही.

रामाने वालीवध ज्या पद्धतीने केला त्याच्याविषयीची खंत प्राचीन काळापासून व्यक्त झालेली आहे. रामायणामध्येच दोन सर्गाची भर घालण्यात आली आहे आणि त्यात 'तुझे वर्तन अनैतिक आहे' असा वाली रामावर आरोप करतो आणि राम या आरोपाला चुकीचे उत्तर देतो

असे दाखविले आहे. तेव्हा रामाच्या चरित्रावर प्राचीन काळापासून भारतात टीका होत आली आहे आणि हिंदूंनी ही टीका मान्य केली आहे.

**प्रश्न - मग प्रश्न असा उपस्थित होतो - आणि हा बाबासाहेबांचा प्रश्न असणार - की प्रत्यक्षात लोक रामाला देव मानतात, त्याची पूजा-उपासना करतात, त्याची मंदिरे बांधतात. ज्याचे चरित्र असे सदोष आहे तो तुमचा देव कसा होऊ शकतो? तुमची देवाविषयी कल्पना तरी काय आहे? तुम्ही म्हणता, आणि ते योग्य आहे, की हिंदूंनीच रामावरील टीका प्राचीन काळापासून मान्य केली आहे. वालीवध हे अयोग्य कृत्य होते, ते क्षात्रधर्मात बसत नाही इत्यादी. मग हिंदूंनी त्याला देव कसे मानले? हिंदूंची देवाविषयीची कल्पना काय असेल हे बाबासाहेबांपुढील कोडे असणार. याचे काय उत्तर आहे?**

**उत्तर -** ही कल्पना अशी आहे, की राम हा 'लीलाविग्रहधारी' आहे. लीला म्हणजे नाटक. अवतार हे ईश्वराचे नाटक आहे. ते खरे नाही. हा जो राम आम्ही भजतो आणि पूजतो ते परमेश्वराचे मूळचे सत्यस्वरूप आहे आणि रामचरित्र ही केवळ लीला आहे, नाटक आहे.

**प्रश्न - शास्त्रीजी, तुम्ही मघाशी हिंदूंचे धार्मिक तत्त्वज्ञान म्हणून जे सांगितले त्याच्याशी या कल्पना जुळवून घेता येतील. राम ही एखाद्याची कौटुंबिक देवता असेल. तो रामाची, म्हणजे रामायणात रामाच्या ज्या सर्व कृत्यांचे वर्णन केले आहे ते ज्याचे चरित्र आहे अशा रामाची उपासना करतो. राम ही विशिष्ट व्यक्ती हेच त्याचे आराध्य दैवत असते. पुढे त्याची श्रद्धा जेव्हा उन्नत होते तेव्हा तो परमेश्वराची, त्याच्या सत्य, पर्याप्त स्वरूपात उपासना करतो. परमेश्वराला तो राम म्हणतो; पण या आराध्य रामाचे एक विशिष्ट व्यक्ती हे स्वरूप राहिलेले नसते. तेव्हा मूळच्या रामाचे जे चरित्र आहे ते या दुसऱ्या रामापासून - परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपापासून - गळून पडलेले असते; पण ते रामाचे चरित्र असतेच. तेव्हा (मूळच्या) रामाचे चरित्र ही रामाची - परमेश्वराची - गूढ लीला आहे, ते नाटक आहे, परमेश्वराचे शुद्ध स्वरूप त्यात व्यक्त होत नाही असे मानावे लागते. उपासनेचा जो विषय असतो त्याचे स्वरूप अधिकारभेदाप्रमाणे बदलत जाते, असा हा दृष्टिकोन आहे.**

**उत्तर -** तुम्ही हा जो दृष्टिकोन मांडला तो भगवद्गीतेत स्पष्ट झाला आहे.

'अव्यक्त व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धय: ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥'

म्हणजे माझे जे अंतिम सत्यस्वरूप आहे (परं भावम्) ते न जाणणारे मी व्यक्तिरूप धारण करतो असे मानतात. त्यांना खरे ज्ञान नाही. ते 'अबुद्ध' आहेत. खरे ज्ञान हे की, मी अंतिम सत्य आहे आणि अव्यक्त आहे. हा सिद्धांत भगवद्गीतेत सांगितला आहे. श्रीकृष्ण स्वतः अवतार मानला जातो; पण तोच सांगतो की, अवतार हे जे माझे रूप आहे, तेवढेच

जे जाणतात, त्यांना खरे ज्ञान नाही. परभाव, अंतिम, श्रेष्ठ सत्य हे दूरचे आहे.

- बरोबर आहे. श्रीकृष्ण जर घेतला तर त्यात केवढी गुंतागुंत आहे ! श्रीकृष्ण स्वतःचा परमतत्त्व असा उल्लेख करतो. शिवाय त्याचे लौकिक चरित्रही आहे. या दोहोत मेळ घालायची एक रीत होती आणि ती 'लीला' या संकल्पनेवर आधारलेली होती.

दुसऱ्या एका गोष्टीचा मला निर्देश करयचा आहे. हिंदू धर्म हा नैसर्गिक, ऐतिहासिक असा धर्म आहे. जसे ग्रीक किंवा रोमन धर्म होते. या स्वरूपाचा दुसरा एकच धर्म जगात उरलेला मला दिसतो आहे. तो म्हणजे यहुदी धर्म. पण या दोहोत मला एक फरक दिसतो. यहुदी धर्माने स्वतःचे स्वरूप स्थिर राखले आहे. हिंदू धर्माचे स्वरूप, अनेक जातींच्या धर्मपंथांमध्ये देवाणघेवाण होऊन त्यांचे सैलपणे एकीकरण होऊन त्याला प्राप्त झाले आहे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे हिंदू धर्म हा अनेक धर्मांचा संघ आहे. त्याच्या विकासाचे दुसरे महत्त्वाचे अंग असे की, त्याच्यात एक उन्नत आध्यात्मिक तत्त्वज्ञान रचण्यात आले आणि त्याचा प्रभाव सर्व पंथांवर पडला.

**प्रश्न - प्राचीन काळात 'मिथ्स'ना, मिथ्यकथांना आज आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्व होते...**

**उत्तर -** बरोबर आहे. मिथ्स किंवा पुराणकथा आणि धार्मिक विधी, उत्सव यांचा संबंध आहे, आणि त्याची मनुष्याला गरज आहे. ती अपरिहार्य गरज नाही; पण गरज आहे. तुम्ही नाटक - तमाशाला गेला नाही तर काही बिघडत नाही; पण माणसाला नाटक - तमाशाची गरज आहे, तसेच हे आहे. उत्सव, पूजाअर्चा यांची धार्मिक उपासनेत माणसाला गरज असते. अर्थात, हे धार्मिक जीवनाचे बरेचसे बाह्य आणि कनिष्ठ असे अंग आहे. धार्मिक विधी, उत्सव यांचे सतत उन्नयन करीत राहिले पाहिजे. श्रद्धा जसजशी अधिक सात्त्विक बनत जाते तसतसे तिचे हे बाह्य आविष्कारही अधिक सात्त्विक बनत जातात.

**प्रश्न - बाबासाहेबांनी आणखी एका कोड्याची चर्चा केली आहे. ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रम हे ठीक आहेत, असे ते म्हणतात; पण वानप्रस्थाश्रम आणि संन्यास हे कशासाठी असा प्रश्न ते उपस्थित करतात. सामाजिक सेवेला या दोन आश्रमांत काही स्थान नाही. वानप्रस्थाश्रमात तुम्ही एकटेपणे राहायचे असते. बायकोला सोबत घेऊन जा अगर जाऊ नका. आणि तुम्ही शेतीवर अवलंबून राहायचे नसते किंवा गावातील उद्योगधंद्यांवर अवलंबून राहायचे नसते. तुम्ही रानात झोपडी बांधून राहता. समाजाला तुमचा उपयोग काय असा प्रश्न आहे.**

**दुसरा प्रश्न असा की, वानप्रस्थाश्रमापासून संन्यास वेगळा का काढला? संन्याशाला घर नाही, झोपडी नाही, निवास नाही, असा अनिकेत आश्रम का काढला?**

**उत्तर -** याचे उत्तर असे आहे की, हे जे विषयांच्या राशीने भरलेले ऐहिक जग आहे त्याच्यापासून अलिप्तता, विरक्तीचा भाव प्राप्त करून घेण्यासाठी आणि त्याच्यात जे अत्युच्च दर्जाचे समाधान आहे ते मिळविण्यासाठी जी साधकावस्था असते ती म्हणजे वानप्रस्थाश्रम. आणि चित्ताची

ही अवस्था प्रत्यक्ष अनुभवायची, ती म्हणजे संन्यासाश्रम. वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम यांच्यामधील संबंध म्हणजे साधकावस्था व सिद्धावस्था यांच्यामधील संबंध. बाबासाहेबांचा मुद्दा असा की, माणूस जेव्हा वयामुळे दुर्बल झालेला असतो तेव्हा त्याच्यासाठी या आश्रमांची व्यवस्था का करावी? या आक्षेपामध्ये काही तथ्य आहे, यात शंका नाही. तरीपण असे पाहा, की या संस्था या देशामध्ये युगानुयुगे टिकल्या आहेत. तेव्हा त्यांच्यामध्ये काही अर्थ असला पाहिजे, असे प्रथमदर्शनी म्हणता येईल. मला असे वाटते की, या संस्था मनुष्याच्या एका खोल गरजेला प्रतिसाद देऊन तिचे समाधान करतात. ही गरज म्हणजे या जगाच्या मानसिक बंधनातून स्वतःची सुटका करून घेण्याची गरज. या मुद्याकडे बाबासाहेबांनी पुरेसे लक्ष दिले नाही असे मला वाटते.

**प्रश्न - बुद्धानेही संन्यासमार्ग स्वीकारला, नाही का?**

**उत्तर -** होय, भगवान बुद्ध तर श्रवणच होता. त्याने गृहस्थाश्रम सोडला ही केवळ एक कल्पित कथा आहे असे मानणे योग्य होणार नाही. गृहस्थाश्रम सोडल्यानंतर साक्षात्कार होईपर्यंत बुद्धाने काही उपासना केल्या. तो त्याचा वानप्रस्थाश्रम; आणि साक्षात्कार झाल्यानंतरचे त्याचे जीवन हा त्याचा संन्यासाश्रम, असे त्यांचे रूप आहे. बुद्धाच्या जीवनात चारी आश्रम व्यवस्थित आहेत.

**प्रश्न - आणखी एक प्रश्न असा : ब्राह्मणांनी यातील काही कोडी मुद्दाम आपल्या स्वार्थासाठी, लोकांना आपल्या अंकित करून ठेवण्यासाठी रचलेली आहेत, असे अनेक मानतात. उदा. : जोतीराव फुल्यांनी असे मांडले आहे. तुम्हाला या आरोपात किती तथ्य आढळते?**

**उत्तर -** ब्राह्मण हे लोकांचे साधन आहे. म्हणजे असे की, जी समाजव्यवस्था असते तिच्या वैधतेचे, लेजिटिमसीचे, संरक्षण करणारा पुरोहितवर्ग ही सामाजिक गरज असते. जातिसंस्था आणि तिच्यात ब्राह्मणांना असलेले स्थान ही या समाजाचीच गरज होती. इथली उच्च - नीच व्यवस्था एका अर्थाने लादलेली नाही, एका अर्थाने लादलेली आहे. उच्च - नीच अवस्था नाही, अशी समाजव्यवस्था कल्पिता येते, दाखविता येत नाही. जगाच्या इतिहासात अशी स्थिती निर्दिष्ट नाही. आजच्या जगात ती कुठे दिसत नाही. सामाजिक शक्ती समाजव्यवस्था निर्माण करतात आणि प्रचलित समाजव्यवस्था लोकांनी व्यवस्थितपणे बुद्धिपूर्वक सांभाळावी यासाठी पुरोहितवर्गाची गरज असते. ही सामाजिक गरज असते. भारतातील ब्राह्मण पुरोहितवर्गाने स्वतःला एकंदर समाजावर लादलेले नाही. समाजाने त्याला लादून घेतले. समाजाला पाहिजे होता म्हणून. पुरोहितवर्ग जो लादला गेला तो दमनावाचून, दंडावाचून, शारीरिक इजा न करता लादला गेला. याचे कारण समाजाला, सर्वांना त्याची गरज होती. म्हणून इथली पुरोहितसंस्था आणि जातिसंस्था इथला जो फार महत्त्वाचा असा प्रभावी सामाजिक वर्ग आहे त्याने टिकविली आहे. म्हणजे यजमानाने पुरोहित टिकविला आहे. अर्थात पुरोहिताला टिकवायचे तर त्याची प्रतिष्ठा, सामाजिक वजन सांभाळावे लागते. उदा. प्रौढ स्त्रिया सुनांना सासू-सासऱ्यांना नमस्कार करायला लावतात. या प्रौढ स्त्रियाही स्वतः सुना असतात किंवा एके काळी होत्या; पण वडिलांचा

आदर करण्याची व्यवस्था त्यांना टिकवून धरायची असते. जातिसंस्था, तिच्यातील उच्चनीच भाव धरून, ही एक व्यवस्था आहे आणि तिला मानसिक पाठबळ देण्यासाठी पुरोहितवर्ग आवश्यक आहे. तेव्हा जोतीराव फुले आणि निष्ठेने त्यांचा वारसा सांगणारे बाबासाहेब यांचा जो दृष्टिकोन आहे तो त्यांच्या अनुयायांना तपासून पाहावा लागेल. नाहीतर सामाजिक वास्तवाचा अर्थच कळणार नाही. हे कसे काय घडले? लहानसा, निःशस्त्र ब्राह्मण पुरोहितवर्ग वाटेल ते अनिष्ट लादतो आहे आणि बाकीचे सर्वजण हे निमूटपणे मान्य करीत आहेत? असे मानले तर दोन विवेकशून्य गृहिते स्वीकारावी लागतात. एक असे की, सबंध समाज पुरोहितवर्गापुढे दुबळा होता. दुसरे असे की, लोक कशाचा विचारच करीत नाहीत, काहीही लादून घेतात. ज्याच्याकडे संपत्ती आहे, जो शस्त्रास्त्रांनी सज्ज आहे, असा प्रचंड समाज, शस्त्रास्त्रे नसलेल्या, थोडीशीच संपत्ती असलेल्या ब्राह्मणवर्गाच्या आधिपत्याखाली हजारो वर्षे राहतो याची उपपत्ती लागत नाही.

- शास्त्रीजी, तुम्ही इतका वेळ मला दिला याबद्दल मी तुमचा आभारी आहे.

**(नवभारत मासिक, मे-जून, १९८८, पृ. २२ ते २८)**

○○○

१९

# ऋषितुल्य आधुनिक विचारवंत

मुलाखतकार - **डॉ. म. वि. गोखले**

आपल्या ज्ञान-विज्ञानाची साक्ष पटवीत सर्वत्र लोकादर मिळविणाऱ्या मोजक्या व्यक्तींमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे नाव अग्रेसर आहे. विशेषतः त्यांचे विश्वकोशविषयक कार्य मराठी भाषेला ललामभूत ठरणारे आहे. शास्त्रीजी आपल्या लेखनातून आणि भाषणामधून जे विचार मांडत आले, त्याला त्यांची व्यक्तिगत विद्वत्ता उपकारक ठरली आहे. या विद्वत्तेमागे दीर्घोद्योग, परिश्रम आणि ज्ञानलालसा आहे; परंतु आपल्या विद्वत्तेला चिरकालिक स्थैर्य देणारा विश्वकोशाचा प्रकल्प त्यांनी उभा केला आणि यशस्वीतेने पार पाडत आणला यामध्ये त्यांची कार्यकुशलता त्यांनी खऱ्या अर्थाने सार्थ केली असे म्हणावे लागेल.

शास्त्रीजींच्या नावावर आजमितीस बारा-चौदा ग्रंथ आहेत. शिवाय त्यांनी विविध विषयांवर लेखांद्वारे आणि भाषणांमधून व्यक्त केलेले विचार संकलित होऊन त्यांचेही ग्रंथ तयार होत आहेत. निरनिराळ्या ग्रंथांना त्यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्या आहेत; परंतु त्यांनी विश्वकोशाचे प्रमुख संपादक म्हणून केलेले कार्य फार महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने मला त्यांच्याशी समक्ष बोलावे असे वाटले. पूर्वतयारी म्हणून विश्वकोशाच्या प्रथम खंडाची प्रस्तावना वाचली. त्यात शास्त्रीजींनी आपले मनोगत कसे व्यक्त केले आहे ते पाहिले आणि अनेक प्रश्नांनी मनात गर्दी केली. हे प्रश्न घेऊन शास्त्रीजींशी प्रत्यक्ष बोललो आणि त्या भेटीत त्यांच्या तर्कशुद्ध विचारसरणीचा योग्य परिचय झाला. मी वाईला जाऊन ३१ मे १९८७ रोजी त्यांची मुलाखत घेतली.

## विश्वकोशाचे प्रमुख संपादक

डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा उचित गौरव आरंभी करून शास्त्रीजी म्हणतात, ‘‘त्यानंतरच्या गेल्या सुमारे शतकात सर्वच ज्ञानविज्ञानाचा वेगाने विकास झाला. हा विकास संपूर्णपणे लक्षात घेऊन विद्यमान ज्ञानक्षेत्राचा सर्वांगीण परिचय करून देणारा हा

मराठीतील पहिलाच प्रयत्न आहे.''

या विचाराच्या अनुरोधाने मी त्यांना विचारले, "आपण म्हणता ते खरे आहे; पण मग ही कल्पना कोणाची?'' त्यावर त्यांनी निःसंदिग्धपणे ही कल्पना त्यांचीच असल्याचे सांगितले. अर्थात शास्त्रीजींना ही कल्पना सुचली त्यावेळी त्यांचे वय जवळजवळ ५५ वर्षांच्या पुढे गेले होते; परंतु आजचे त्यांचे प्रकृतिमान लक्षात घेता त्या वयात त्यांना अमाप उत्साह वाटत असणार हे स्पष्ट होते.

यानंतर शास्त्रीजींना मी म्हटले, "आपण हे काम स्वीकारले त्यावेळी या विषयीची व्याप्ती, यामध्ये समावेश होणारी विविध शास्त्रे, त्या शास्त्रातले तज्ज्ञ, अन्य सहकारी इत्यादीबाबत अगदी प्रारंभी आपले विचार काय होते?'

शास्त्रीजी म्हणाले, "बरं का गोखले, माझा असा एक विश्वास आहे की, काम करायचे निश्चयाने ठरले की, मला अडचणी वाटण्यापेक्षा उपाय अधिक दिसतात. हा प्रकल्प - म्हणजे विश्वकोष - सिद्ध करण्याच्या कल्पनेबरोबरच त्याचे स्वरूप स्पष्टपणे माझ्या नजरेसमोर आले. हा सर्व विषयसंग्राहक कोश असणार, तेव्हा आपल्याला विविध ज्ञानशाखांतले सहकारी मिळवावे लागतील याची मला कल्पना होती. आम्ही त्यासाठी एक समिती स्थापन केली. वाईला कार्यालय थाटले आणि कामाला आरंभ केला.''

'विश्वकोशाच्या कामाला आरंभ करताना त्याच्या व्याप्तीचा विचार पक्का झाला होता काय?' या प्रश्नाच्या उत्तरात शास्त्रीजींनी पाढे म्हणावे तसे खणखणीत पद्धतीने मला सांगितले. "आम्ही ९२ ते ९८ विषय, एकूण १७ ते २० खंड, सुमारे १७,००० पृष्ठे, या पृष्ठसंख्येची मानव्यविद्यांसाठी ८,५०० आणि विज्ञान व तंत्रविद्यांसाठी ८,५०० अशी विभागणी निश्चित करून कामाला आरंभ केला." शास्त्रीजी माझ्या अवाक् चेहऱ्याकडे पाहत होते.

शास्त्रीजींनी सांगितलेली आकडेवारी आणि कामासंबंधातील सुस्पष्ट कल्पना पाहून मी चकित झालो होतो. मी पुढे विचारले की, "आपण जशी कामाच्या व्याप्तीबाबत काही निश्चिती सांगितली तशी कामाच्या स्वरूपाविषयीही आपली काही नेमकी धोरणं ठरली असतीलच - ती सांगाल?"

"अर्थात या विश्वकोशाच्या कामाचे दोन ठळक प्रकार सांगता येतील. एक लेखनकार्य आणि दुसरा संपादनकार्य. विशिष्ट विषयांतील जाणकारांकडून एखादा लेख लिहून घेतला म्हणजे नंतर तो त्याच विषयातल्या दुसऱ्या जाणकाराने तपासावा. कित्येकदा मूळ लेख - समीक्षित लेख हे दोन्ही रद्द करून नव्याने तो पुन्हा लिहून घेतला जातो. पुन्हा त्याची तपासणी वगैरे सोपस्कार होतातच."

"या कामाच्या स्वरूपात कालव्यय होत असणारच.''

"होतो. त्यामुळेच तर आरंभी आम्ही अपेक्षित गती घेऊ शकलो नाही. अहो, आम्ही लेखकांकडून मागवलेले लेख कित्येकदा अपुरे, सदोष वाक्यरचनेचे, अद्ययावत माहितीने न

लिहिलेले, विसंगत विधानांनी भरलेले असेही आढळले. असे लेख लिहिण्यासाठी आवश्यक असलेले व्यासंगपूर्ण काटेकोर लेखन करण्याची आमच्याकडे परंपराच नाही."

आपली बैठक बदलून शास्त्रीजी स्थिरावले. मग मी म्हटले,

'आपण म्हणता ती अडचण खरी असणार; पण मग असे लेखक विद्वान आपण मिळवू शकलात काय?'

शास्त्रीजी अवसान घेऊन म्हणाले, "अवश्य. यासाठी अभ्यागत संपादक म्हणून प्रतिमास महाराष्ट्रातील आणि अन्य ठिकाणचे विद्वान बोलावून त्यांच्याकडून लेखन-संपादन करून घेण्याची प्रथा आम्ही पाडली आहे. आजवर हजारावर विद्वानांचे आम्हाला लेखनसाहाय्य झाले आहे. हाही उपक्रम नावीन्यपूर्ण आणि पहिलाच आहे."

"आता थोडा तांत्रिक प्रश्न विचारतो. आपण म्हणता तसा हा विश्वकोश सर्व विषयसंग्राहक कोश असल्यामुळे अनेक ज्ञानशाखांतील विषयांचा त्यामध्ये समावेश असणार. साहजिकच परिभाषेचा प्रश्न आपल्यापुढे आलाच असेल. याचे काय?" मी विषयाच्या गांभीर्यानुसार प्रश्न केला.

"अभिव्यक्तीच्या संदर्भातला तुमचा हा प्रश्न आहे; खरं ना? याबाबतीत आमचं धोरण असं होतं की, मराठीनं अव्वल इंग्रजीच्या काळात ज्या ज्या नव्या ज्ञानशाखांत रस घेऊन पुस्तकं तयार केली त्या १९ व्या शतकातल्या ग्रंथांचा उपयोग करून घ्यायचा आणि अगदीच अडलं की नवी परिभाषा सिद्ध करायची." शास्त्रीजींनी समजावणीच्या स्वरात सांगितलं.

"१९ व्या शतकातल्या लेखनाचा खरोखर कितपत उपयोग झाला?''

"अगदी चांगला. आम्हाला विविध जिज्ञासूंना समजतील अशा भाषेत लिहायचे असल्याने १९ व्या शतकातल्या प्रारंभिक प्रयत्नांचा पुष्कळ उपयोग झाला.''

"शास्त्रीजी, आपण मूलतः संस्कृत परंपरेतले. त्या विषयात पारंगत; परंतु आपला दृष्टीकोन एवढा व्यापक झाला याचं खरोखर..." मी अडखळलो.

"अहो, माणसानं सतत जिज्ञासू राहिलं पाहिजे. तुम्ही म्हणता तसा मी मूळचा संस्कृताच्या पठडीतला हे खरंच. पुढे मी इंग्रजी शिकलो, अनेक विषयांवरची त्या भाषेतली पुस्तकं वाचली, परदेशात प्रवासही केला. या अनुभवाचा मला निश्चित या विश्वकोशाच्या उद्योगात लाभ झाला."

"शिवाय धर्मकोशाच्या संपादनाचा अनुभवही आपल्यापाशी होताच." मी विषयाला येणारे वेगळे वळण टाळण्यासाठी म्हटले.

"धर्मकोशाच्या संपादनाचा माझा अनुभव होताच. त्यावरून मला तुम्हाला असं सांगावसं वाटतं की, मराठी भाषेपुरतं बोलायचं तर मराठीत विषयवार कोशरचना बरीच झाली आहे आणि होते आहे. उदाहरणार्थ : व्यायाम ज्ञानकोश, प्राचीन - मध्ययुगीन - अर्वाचीन चरित्रकोश, भारतीय संस्कृती कोश, तत्त्वज्ञानकोश, असे कोश निर्माण केले आहेत; परंतु आमच्या दृष्टीने सर्व विषयसंग्राहक कोशामुळे विशिष्ट विषयवार कोशरचनेला अधिक चालना मिळेल असं

आम्हाला वाटतं.'' शास्त्रीजी धर्मकोशाविषयी प्रतिपादन करत न बसता एकूण कोशरचनेच्या संदर्भात बोलले.

''आपलं प्रतिपादन ऐकल्यावर साहजिक एक प्रश्न मनात आला आहे की, आपल्या या विश्वकोशरचनेच्या प्रकल्पाचा प्रारंभ झाल्यानंतर आपण म्हणता त्याप्रमाणं या कोशाच्या आधारे अन्य काही ग्रंथ वा कोश किंवा चरित्रग्रंथ यांच्या निर्मितीला चालना मिळाली का?" माझ्या तोंडून हा प्रश्न विचारला जाताच शास्त्रीजी काहीसे संकोचल्या स्वरात म्हणाले,

''नाही. तसं काही घडलेलं दिसत नाही-निदान माझ्या माहितीप्रमाणं.''

शास्त्रीजींकडून इथवर कोशविषयक माहिती मिळाल्यावर त्यांच्या प्रत्यक्ष सहभागावर प्रकाश पाडणारा प्रश्न विचारावा असं वाटून मी म्हटलं, ''शास्त्रीजी, आपण संस्कृत, संस्कृती, धर्मविचार, सामाजिक व राजकीय विचारप्रणाली अशा अनेक विषयांचे जाणकार आहात; पण आपण प्रमुख संपादक असलेल्या या विश्वकोशात आपण स्वतः काही लेखन केलं आहे का या विषयीचं माझं कुतूहल लक्षात घेऊन आपण काही सांगावं.''

''मी स्वतः काही नोंदी लिहिल्या आहेत हे मला सांगायला पाहिजे. माझ्या संबंधात आपण जे म्हटलंत ते विषय तर माझ्या आवडीचे आणि अभ्यासाचे आहेतच; पण मला राज्यशास्त्रामध्येही काही कळतं. विश्वकोशासाठी लिहिल्या गेलेल्या विषयाच्या काही नोंदी मी वाचल्या आणि त्या योग्य नाहीत असं मला वाटलं. त्यानंतर त्या नोंदी मी स्वतः दुरुस्त केल्या आहेत. एवढंच नाही, तर काही नोंदी मी संपूर्ण नव्याने लिहिल्या आहेत.''

प्रमुख संपादक म्हणून शास्त्रीजी करीत असलेल्या कार्याची एवढी ओळख मला पुरेशी वाटली. मी विश्वकोशाविषयी जेवढं जाणलं त्यातून माझी जिज्ञासा पूर्ण झाली. याबरोबरच माझा एक प्रश्न राहिला होता तोही विचारायचं ठरवून मी म्हटलं,

''शास्त्रीजी, आता शेवटी एक प्रश्न विचारतो.''

''विचारा - तुम्ही चांगलं विचारताय.'' शास्त्रीजी म्हणाले.

''आपण प्रस्तावनेत असं म्हटलंय की, 'विश्वकोशाची ही पहिली आवृत्ती प्रकाशित झाल्यानंतर हे कार्य पूर्ण झालं असं म्हणता येत नाही. हा प्रकल्प शासनाने स्थायी स्वरूपाचा केला आहे. त्याचा उद्देश असा की, या विश्वकोशात ज्या विद्यांचा संग्रह केला आहे, त्या सतत वाढत आहेत.' पुढे आपण हेही सांगितलंय की, 'या कोशात समाविष्ट झालेल्या माहितीत दुरुस्ती करणे, भर घालणे या गोष्टी संपादकांना सतत कराव्या लागणार आहेत आणि प्रतिवर्षी पुरवणी खंड म्हणजे वार्षिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा कार्यक्रम चालू ठेवायचा आहे.' शासनाकडून आपल्याला यासंबंधात प्रतिसाद मिळेल?''

''तुमचा हा प्रश्न गोखले, मोठा सूचक आहे. मला वाटतं ते सांगतो - शासनाला सांस्कृतिक मूल्यांची कदर असेल तर हे कार्य चालू राहील. आमच्या आरंभीच्या प्रस्तावात याविषयीचा संकेत आम्ही गृहीत धरला आहे. आता शासनामधल्या लोकांच्या संस्कृतीवर हे कार्य चालू

ठेवणं वा बंद करणं अवलंबून राहणार आहे.'' हे सांगत असताना शास्त्रीजी एकीकडे गंभीर; पण काहीसे सूचक नजरेनं माझ्याकडे रोखून पाहत होते.

मी काय उमगायचं ते उमगलो आणि आता काय प्रश्न करायचा याचा विचार करू लागलो. विश्वकोशाविषयी आपण खूप प्रश्न विचारले आहेत आणि प्रत्यक्षात शास्त्रीजींशी बोलून उत्तर मिळवली आहेत. त्याचप्रमाणं या प्रत्यक्ष भेटीचा आणखी थोडा फायदा करून घ्यावा म्हणून शास्त्रीजींच्या परवानगीनं त्यांच्या लेखनाशी संबंधित असे काही प्रश्न विचारायचे ठरविले. शास्त्रीजींनीही मोकळ्या मनाने उत्तेजन दिलं, त्यामुळं आमचं सहेतुक संभाषण पुढे चालू राहिलं.

## बुद्धिप्रामाण्याची साक्ष

शास्त्रीजींच्या हिंदू धर्मशास्त्राच्या अभ्यासाचा आणि हिंदू तत्त्वज्ञान, वैदिक परंपरा यांच्या मूलगामी संशोधनाचा परिपाक त्यांच्या धर्मकोशविषयक उपक्रमात आणि उपनिषदांच्या भाषांतरात आढळतो. ते सहज समजण्यासारखेही आहे. परंतु त्यांनी अगदी आरंभी केलेल्या लेखनातील (१९३४) 'शुद्धिसर्वस्वम्' या संस्कृत भाषेतील लेखनात त्यांच्या तर्कशुद्ध विचारसरणीचा एक वेगळाच पैलू प्रत्ययास येतो. माझे हे मत कितपत सयुक्तिक आहे याचा खुलासा करून घेण्यासाठी त्यावरच प्रथम प्रश्न विचारायचे ठरवून मी म्हटले, ''शास्त्रीजी, 'शुद्धिसर्वस्वम्' हा ग्रंथ आपण संस्कृत भाषेत लिहिलात. तो का?''.

'शुद्धिसर्वस्वम्' चे नाव मी काढताच शास्त्रीजी सावरून ताठ बसले आणि एखाद्या न्यायाधीशाच्या थाटात म्हणाले, ''संस्कृत भाषेचा अभिमान बाळगून, त्या भाषेच्या अभ्यासाची ऐट मिरवणाऱ्या धर्मशास्त्र्यांना मला काही सांगायचं होतं म्हणून मी तो संस्कृतात लिहिला. त्यावेळी मी स्वतःही संस्कृत भाषेच्याच छायेत होतो.''

''धर्मशास्त्रातल्या शुद्धिप्रक्रियेवर आपल्याला काही साधायचं होतं काय !''

''खरं सांगायचं तर धर्मशास्त्रातल्या शुद्धिकल्पनेवर मला अभ्यास करायचा होता. धर्मांतराचा प्रश्न कसा हाताळला पाहिजे हे मला सांगायचं होतं.''

शास्त्रीजींना या विषयावर खूप काही बोलायचं आहे हे माझ्या लक्षात आलं. मी त्या दृष्टीनं प्रश्न केला, ''धर्मांतर केलेल्यांविषयी आपल्याला जे या लेखनात म्हणायचं होतं, ते आज आपण कोणत्या पद्धतीनं सांगता?''

''गोखले, तुम्हाला आश्चर्य वाटेल; पण माझं स्पष्ट मत सांगतो. आम्ही धर्म, धर्मशास्त्र याविषयी खूप बोलतो; पण आमचं त्याविषयीचं अज्ञान इतकं भयंकर आहे की, आम्ही त्यामुळे शतकामागून शतकं हानी सोसली आहे. आता हा धर्मांतराचा प्रश्न पाहा. धर्मपरिवर्तन नव्हे, धर्मांतर. हजार-बाराशे वर्षांपूर्वी यवनांनी आणि अलीकडे ख्रिस्ती धर्मानुयायांनी केलेली धर्मांतरे म्हणजे काय होतं? केवळ भाबड्या कल्पनांचा तो खेळ होता. अहो, एखाद्या हिंदू व्यक्तीच्या खाण्यात परधर्मीयांच्या हातचे काही आले की ती व्यक्ती बाटली ही आमची समजूत अत्यंत चुकीची. या अन्नग्रहणानं फार तर आहारदोष पदरी यावा. त्याचा धर्म बदलण्याशी काही संबंध

नाही. गोव्यातल्या धर्मांतराच्या हकीगती हेच सांगतात की, पावाच्या तुकड्यांनी गाव बाटलं. सगळा दांभिकपणा.''

''शास्त्रीजी, आपण यावर नेमकं काय उत्तर दिलं आहे?''

''अहो, माझं उत्तर स्पष्ट आहे. अशा एखाद्या व्यक्तीला आपण पुन्हा हिंदू म्हणून स्वीकारलं पाहिजे. अन्नदोषाचं उदाहरण घडलं तर त्यावर प्रायश्चित्त हा उपाय करता येईल. यात त्या व्यक्तीला धर्माबाहेर ठेवण्याचा काय संबंध? यासाठीच 'शुद्धिसर्वस्वम्'चा आम्ही प्रपंच केला.'' शास्त्रीजी ठामपणे बोलत होते.

''आपण म्हणता त्यातलं मर्म लक्षात येतंय आणि त्याच वेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि मसूरकर महाराज यांच्या कार्याची आठवण होते आहे.''

''अगदी बरोबर. शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन अगदी योग्यच होता. त्यांना राज्यशास्त्राबरोबर धर्मशास्त्राचीही योग्य जाण होती. मसूरकरादी मंडळींनी अलीकडे चालविलेलं शुद्धिकार्य हाही एक स्तुत्य उपक्रम होता.''

## हिंदुधर्माची समीक्षा

शास्त्रीजींच्या या प्रतिपादनामधून व्यक्त होणाऱ्या बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोनाची साक्ष पटत होती. साहजिक माझ्या मनासमोर त्यांच्या 'हिंदूधर्माची समीक्षा' या ग्रंथातील विचारसरणी आली. या ग्रंथाचं स्वरूप व्याख्यानांच्या संकलनाचं आहे, तरी त्यातील तर्कशुद्ध मांडणीचा गौरव केलाच पाहिजे. या ग्रंथांच्या प्रस्तावनेत शास्त्रीजींनी म्हटलंय, ''या व्याख्यानात हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक पद्धतीने व ऐतिहासिक समाजशास्त्राच्या दृष्टीने केली आहे.'' त्याचप्रमाणे या समीक्षेच्या मुळाशी असलेली प्रेरणा सांगताना शास्त्रीजी म्हणतात, 'The criticism of religion is a beginning of all criticism.'- Karl Marks या विचाराची प्रेरणा आहे.

शास्त्रीजींनी या ग्रंथात धर्मसमीक्षेची भूमिका मांडताना म्हटलंय की, 'धर्मसमीक्षा ही मानवेतिहासशास्त्राचीच एक शाखा आहे.' शास्त्रीजींना धर्माचा समाजहितकारक दृष्टिकोन नेहमीच आवडत असतो. त्या दृष्टीने या ग्रंथात 'धर्माचे लक्षण आणि प्रमाण' या दुसऱ्या प्रकरणात (व्याख्यान २ रे) पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारधारेच्या अनुषंगाने त्यांनी विस्तृत विवेचन करून धर्माचे यथार्थ मर्म विशद केले आहे. यापुढील लेखनात त्यांनी 'धर्मप्रमाण' कसे निश्चित करावे याची मार्मिक चिकित्सा केली आहे. प्रस्तुत ग्रंथातील सर्व विषय तपशिलाने देणे शक्य नाही; परंतु यातील विवेचनाला मार्क्सवादी विचारसरणी आधारभूत असल्याचे मात्र जाणवते. १९४० सालामधील हे लेखन असल्याने ते शास्त्रीजींवरील मार्क्सच्या विचारांचा आणि मानवेंद्रजी रॉय यांच्या विश्लेषणाचा प्रभाव दाखविणारे असावे हे स्वाभाविक ठरते.

या ग्रंथाच्या वाचनानंतर माझ्या मनात एक प्रश्न आला होता. तोही मी शास्त्रीजींना विचारला. ''हिंदूधर्माची समीक्षा करताना आपण नीच आणि उच्च प्रवृत्तींचा ऊहापोह कोणत्या दृष्टिकोनातून केला आहे?'' या माझ्या प्रश्नावर त्यांनी ''कर्मकांड, जातिभेद यामुळे हिंदू धर्माचे जे स्थूल स्वरूप

जनमानसापुढे आहे त्यापेक्षा हिंदू धर्म संकल्पना विशुद्ध स्वरूपात मांडावी असा माझा प्रयत्न होता,'' असे निःसंदिग्ध शब्दात सांगितले.

## 'आनंदमीमांसा' आणि 'जडवाद'

शास्त्रीजींचा एकूण दृष्टिकोन समाजहितदक्षतेचा असल्याचे जाणवल्यावर त्यांच्या 'जडवाद' आणि 'आनंदमीमांसा' या दोन ग्रंथांविषयी केवळ भूमिका स्पष्ट करून घेणारेच प्रश्न विचारावेसे मला वाटले. त्या अनुरोधाने बोलणे सुरू केल्यावर शास्त्रीजींनी सूत्ररूपाने जे सांगितले तेवढेच येथे नमूद करीत आहे.

''वैदिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास जसजसा होत गेला तसतसा काही विशिष्ट विषयांचा माझा मलाच उलगडा होत गेला. 'आनंद' ही अशीच एक विचारणीय संकल्पना मला वाटली. त्यासंबंधी 'आनंदमीमांसा' लिहून वैदिक तत्त्वज्ञानाच्या विकासक्रमात समाविष्ट असलेली एक प्रवृत्ती म्हणून तिच्याकडे पाहता येईल असे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.''

''भारतीय दृष्टिकोन आणि पश्चिमी दृष्टिकोन यांच्या संबंधात 'जडवाद' कसा वेगवेगळा अन्वयार्थ प्रकट करतो हे मी यात दिग्दर्शित केले आहे.''

या दोन्ही विषयांवरील भाष्यांमधून एकाएकी आमचे बोलणे 'एकात्मता' या विषयाकडे वळले. शास्त्रीजींनी या विषयाची फार मार्मिक चिकित्सा केली. तिचा सारांश सांगण्याचा मोह आवरता येण्यासारखा नाही.

''असं पाहा, एकात्मतेला उपकारक अशी एक बाब युरोपात दिसते. ती म्हणजे तिथे एकच धर्म आहे. त्यांच्यात जरी जुने-नवे, प्राचीन आणि आधुनिक असे वेगळे दृष्टिकोन आढळले तरी मूळ धर्मकल्पनेत ते सारे एकजिनसी आहेत. इस्लाम धर्मीयातही काही प्रमाणात असाच प्रकार आहे. या उलट भारतातील परिस्थिती आहे. इकडे अनेक प्रकारांनी धर्मभेद तर जाणवतोच; परंतु धर्मांतर्गत व्यवस्थेत जातिभेदासारख्या काही अडचणी आहेत. एक राष्ट्र आणि त्याचा एक धर्म आणि सामाजिक समता या गोष्टी भारतीय समाजात रुजल्या नाहीत, हीही अडचण आहे. त्यामुळे आम्ही एकात्मतेचा विचार खऱ्या अर्थाने पचवू शकत नाही. आचरणात तो प्रभावीपणे आणू शकत नाही.''

## सहेतुक संभाषणाची आवड

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांची जनमानसातली प्रतिमा ही पंडित, विचारवंत, धर्मज्ञ अशी असल्यामुळे त्यांच्याशी काय बोलावे अशी शंका कित्येकांच्या मनात डोकावेल; परंतु आपल्याजवळ खरोखरीच काही प्रश्न असतील, काही जाणून घेण्याचा हेतू असेल तर शास्त्रीजींशी बोलताना कसलाही संकोच बाळगायचे कारण नाही. मला व्यक्तिशः अतिशय चांगला अनुभव आला आहे. त्यावरून मी म्हणू शकतो की, शास्त्रीजींना बहुतेक संभाषणाची आवड आहे. आपल्याजवळ हे आहे ते इतरांना हवे असेल तर देण्याची इच्छा आहे.

आम्ही ३१ मे ८७ च्या सकाळी १० वाजल्यापासून तब्बल दोन तास बोलत होतो. शास्त्रीजींना आधी वेळ विचारून ठरवली होती. ते आपले आन्हिक उरकून नेहमीच्या पोषाखात (जाकीट-टोपीसह) तयार होते. गेल्याबरोबर त्यांना मी पूर्वभेटीच्या स्मरणाचा संदर्भ दिला. मात्र त्यांच्या स्मरणशक्तीने मला थक्कच केले. शास्त्रीजींना अवांतर बोलणे करून त्यांचा वेळ घेणे आवडेल न आवडेल म्हणून मी लगेच माझ्या मनातले प्रश्न एक-एक करीत विचारण्यास आरंभ केला. त्या प्रश्नांची आणि शास्त्रीजींनी दिलेल्या उत्तरांची ध्वनिफीत मी त्याच वेळी घेतली. आमच्या सहेतुक संभाषणाची अखेर शास्त्रीजींच्या 'छान विचारलेत' या उत्तेजनपर शब्दांनी झाली. मराठी भाषेला ललामभूत ठरणाऱ्या विश्वकोशाचे कार्य आता अंतिम टप्प्यावर आले असल्याचा आनंद त्यांच्या बोलण्यात आणि वयस्क चेहऱ्यावर प्रकट होत होता. विश्वकोशासारख्या मोठ्या प्रकल्पाचा संकल्प सोडला गेला आणि विश्वकोशाच्या प्रमुख संपादकाची जबाबदारी शास्त्रीजींनी स्वीकारली. त्यावेळी त्यांचे वय काही कमी नव्हते. १९६० मध्ये या प्रकल्पाला आरंभ झाला त्यावेळी शास्त्रीजी ६० वर्षांच्या सीमेवर होते. (जन्म १९०१) आज एवढी प्रदीर्घ तपश्चर्या फळाला आल्याचा आनंद शास्त्रीजींना वाटणे स्वाभाविक होते. आमची ही भेट सार्थ झाली, असे समाधान माझ्याही मनाला वाटले.

## 'वैदिक संस्कृतीचा विकास'

पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी, व्याख्यानमाला गुंफण्याच्या निमित्ताने सहा व्याख्यानांच्या मर्यादेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजींनी वैदिक संस्कृतीचा विकासक्रम मांडून एक फार मोठे कार्य केले आहे. पुढे ही व्याख्याने ग्रंथरूपाने एकत्रित प्रसिद्ध झाली. शास्त्रीजींच्या प्रमुख ग्रंथांत या ग्रंथाचा समावेश केला जावा एवढी त्याची योग्यता आहे. या ग्रंथाची प्रस्तावना ग्रंथविषयीच्या मांडणीचे स्वरूप स्पष्ट करणारी आहे. "वैदिक संस्कृतीच्या विकासक्रमात ज्या ज्या विशिष्ट प्रकारच्या प्रमुख प्रवृत्तींनी भाग घेतला आणि विद्यमान स्वरूप निर्माण केले त्या सर्वांचा संकलनात्मक व सारभूत परामर्ष घेण्याचे काम या पुस्तकाने केले आहे." यापुढे शास्त्रीजी म्हणतात, "भारतीय संस्कृती या महान समन्वयात भागीदार होऊन (नवी मानव संस्कृती परंपरागत सर्व संस्कृतींच्या महासमन्वयाची शक्ती म्हणून अस्तित्वात आली पाहिजे, या दृष्टीने) त्या विशाल शक्तीचे पोषण करू शकेल, अशा तिच्या अंतःप्रवृत्ती आहेत, ही गोष्ट आम्ही वैदिक संस्कृतीच्या विकासाच्या मीमांसेत सिद्ध केली आहे.''

वेदकालीन संस्कृतीच्या रचनेची आणि विकासाची मीमांसा शास्त्रीजींनी केली आहे. वैदिक वाङ्मयातील विचारांच्या अनुषंगाने भारतीय भौगोलिक सीमेत पडलेल्या सांस्कृतिक विकासाचा आलेख येथे दिला आहे. नंतर वेदांच्या विविध संहितांचा, त्यातील तत्त्वज्ञानाचा आणि त्यातील उपास्य दैवतांचा परिचय सुबोध रीतीने करून देण्यात आला आहे. वेदांच्या वर्चस्वाचा काळ उभा करताना स्त्रिया व कनिष्ठ वर्ग यांच्या संबंधात कोणती भूमिका होती ते दिग्दर्शित करताना शास्त्रीजींनी आपली आधुनिक विचारसरणी वापरून वस्तुनिष्ठ चिकित्सा केली आहे. तसेच

परमपुरुष कल्पना, ब्रह्मकल्पना, तार्किक विचारांचा आविष्कार, ग्रंथरचना, दर्शने, चार्वाकमत, आयुर्वेद इत्यादींची माहिती दिली आहे.

वैदिक संस्कृतीच्या विकासक्रमाचे ज्ञान होण्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी पहिल्या दोन भागांत तयार केल्यावर मगच शास्त्रीजींनी त्यातील गुंतागुंतीच्या विषयांना स्पर्श केला आहे. तिसरा भाग 'वैदिकांची कुटुंबसंस्था आणि समाजसंस्था' यांचा विचार करणारा आहे. यामध्ये नीतिशास्त्राचे तत्कालीन स्वरूप विशद केल्यावर विवाह, कुटुंबसंस्था, वर्णसंस्था, जातिसंस्था यांसारख्या विषयांवर मतप्रदर्शन केले आहे. शास्त्रीजींनी भारतीय समाजरचनेत जे दौर्बल्य शिरले त्याची येथे जातिभेदाच्या अनुषंगाने परखड मीमांसा केली आहे. चौथा भाग 'इतिहास-पुराणाची आणि रामायणाची संस्कृती' या शीर्षकाचा असून, त्यामध्ये पुराणांचा वैदिक वाङ्मयाशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. या स्पष्टीकरणामध्ये शास्त्रीजी अनेक पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संशोधकांच्या मतांची समीक्षा करताना आढळतात. पुढे पुराणामधून विकृती अशी दिग्दर्शित झाली आणि त्याचे परिणाम काय झाले याचे विवेचन आहे. महाभारत, भागवत आणि रामायण इत्यादी ग्रंथातील ललितकलेला कशी व कोणती प्रेरणा दिली याचे सुबोध विवेचन करून भारतीय नाटकाच्या उगमासंबंधातही शास्त्रीजी काही विचार मांडताना भागवत धर्माच्या तात्त्विक बैठकीचा ऊहापोह करून त्यांनी तुकारामांपर्यंत त्यांची बैठक कशी होती याचीही चिकित्सा केली आहे.

'बौद्ध व जैन यांचा धर्मविजय' या पाचव्या भागात शास्त्रीजींच्या वेदाभिमानी डोळस असल्याचा प्रत्यय आपल्याला येतो. बुद्ध धर्म निर्मितीकारण, बुद्ध धर्माचे तत्त्वज्ञान, दु:खवादाची मीमांसा करून थांबले नाहीत, तर बौद्ध आणि जैन यांची चातुर्वर्ण्यविषयक भूमिका, त्याचे सामाजिक व राजकीय क्षेत्रावरील परिणाम अशा विविध अंगांनी शास्त्रीजींनी विवेचन केले आहे. बौद्ध आणि जैन धर्मांच्या संस्थापकांची विचारदिशा सांगता सांगता त्यांनी त्या धर्माचे संस्थापक - जे अनुक्रमे गौतम बुद्ध आणि महावीर - त्यांच्या कार्याचे यथायोग्य मूल्यमापनही केले आहे, तसेच त्यांच्या हिंदू संस्कृतीशी असलेल्या साम्यभेदाचेही स्पष्ट दर्शन घडविले आहे.

या ग्रंथातील पहिली पाच प्रकरणे वैदिक संस्कृतीचा विकासक्रम स्पष्ट करण्यासाठी लिहिली आहेत, हे त्यातील विवेचनाच्या कक्षा लक्षात घेता सहज लक्षात येते. सहाव्या भागात शास्त्रीजी आपल्या विशिष्ट तर्कशुद्ध दृष्टिकोनातून 'आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलना'ची चिकित्सा करतात. आमच्या संस्कृतीचा इस्लाम, ख्रिस्ती इत्यादी बाह्य संस्कृतीशी संबंध आला आणि परिणामतः आमच्याकडील सांस्कृतिक मूल्यांत बदल पडत गेला. नवी व्यापक मूल्ये आम्हाला आकृष्ट करू लागली. आर्यसमाज, सत्यसमाज, शूद्रांची जागृती यासारख्या नव्या प्रेरणांबद्दल भारतात कशी प्रवृत्ती झाली यांचे दिग्दर्शन करून शास्त्रीजींनी राजा राममोहन रॉय, लोकमान्य टिळक, योगी अरविंद, महात्मा गांधी, भाई मानवेंद्रनाथ रॉय अशा विचारवंतांच्या नवनवीन विचारांचा परिचय करून दिला आहे. सर्वधर्मसमन्वय, विश्वधर्म, वैज्ञानिक दृष्टी यांचा

भारतीय संस्कृतीशी संबंध आल्याने जे घडले त्याचाही ऊहापोह या ठिकाणी शास्त्रीजींनी आवर्जून केला आहे.

भारतीय संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती या दृष्टीने प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत जो विकासक्रम दिसून येतो त्याचे सर्वांगीण दर्शन अत्यंत सुबोध आणि तर्कशुद्ध रीतीने केलेले असल्यामुळे हा ग्रंथ मौलिक ठरणार आहे.

## समाजाच्या गरजेनुसार निर्मिती

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संस्कृत वाङ्मयात पारंगत होऊन नंतर आधुनिक काळाशी जवळीक साधण्याच्या दृष्टीने इंग्रजी भाषा आत्मसात केली. त्यानंतर इंग्रजीतील वैचारिक वाङ्मयाचे त्यांनी जाणीवपूर्वक अवलोकन केले. त्यांच्या उमेदीच्या काळात भारतात जी सामाजिक आणि राजकीय आंदोलने उभी राहिली त्यांचा केवळ अन्वयार्थ लावत न बसता शास्त्रीजी त्या आंदोलनांमध्ये सहभागी झाले होते. त्यांच्या आधुनिकतेशी असलेल्या संपर्कामधून त्यांना वेळोवेळी अनेक सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात विचार करावासा वाटला आहे. यामुळेच त्यांनी कधी विचारप्रदर्शनार्थ काही निवडक लेखसंग्रह संपादित केले आहेत.

'लोकमान्य टिळक लेखसंग्रह', 'राजवाडे लेखसंग्रह' यांचे स्वरूप अशा प्रकारचे आहे की, सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात त्या मान्यवरांनी लिहिलेल्या लेखांचा हा विशिष्ट दृष्टीने केलेला संग्रह आहे. या दृष्टीवर प्रकाश पाडणारे एक वाक्य वानगीदाखल देता येईल. राजवाडे लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत शास्त्रीजी म्हणतात, "१४ व्या शतकातील युरोपच्या पुनरुज्जीवनापेक्षा १९ व्या शतकातील भारतीय पुनरुज्जीवनाची पार्श्वभूमी अत्यंत निराळी दिसल्यामुळे राजवाडे यांनी त्याला ऐतिहासिक जाणिवेचे अधिष्ठान पाहिजे असे निश्चित केले." या वाक्यामधून सूचित होणाऱ्या दृष्टिकोनाचे शास्त्रीजींच्या दृष्टिकोनाशी बरेच साम्य आहे. अर्थात या संग्रहातील लेखांची निवड पाहिली तर त्यात इतिहास, नाट्य, भाषेतिहास, महाराष्ट्राची वसाहत, मराठ्यांचा इतिहास, साहित्य अशा विविध विषयांवरचे लेख आहेत.

अशा प्रकारे १९४७ मध्ये स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असलेल्या महाराष्ट्रीय समाजाला 'ज्योतिनिबंधा'च्या रूपाने त्यांनी समाजहिताचा मार्ग दाखविला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचे क्रांतिकारी जीवन आणि त्यांचे जीवनकार्य यांची आपल्या समाजाला जाण करून देण्याची आवश्यकता शास्त्रीजींना वाटली. त्यासाठीच त्यांनी हे काम केले.

## साहित्यशास्त्राला स्पर्श

शास्त्रीजींच्या व्यासंगाला कोणते तरी आवाहन लागते असे दिसते. संस्कृत भाषेतील आणि इंग्रजी भाषेतील साहित्यशास्त्राचे शास्त्रीजींनी जे अध्ययन केले त्याचा लाभ अन्य अभ्यासकांना होण्यासाठी शास्त्रीजींनी काही लिहावे असे कोणालाही वाटेलच; परंतु शास्त्रीजी तसे लेखन करतील कसे? त्यामुळेच त्यांच्या व्यासंगाला आवाहन करण्याची गरज निर्माण होते. पुणे

येथील व्हीनस प्रकाशन संस्थेतर्फे एका व्याख्यानमालेमध्ये शास्त्रीजींना आमंत्रित केले. व्याख्यानमालेसाठी आधुनिक मराठी साहित्याच्या संबंधातला विषय हवा होता. शास्त्रीजींनी 'प्राचीन आणि अर्वाचीन साहित्यशास्त्रातला रससिद्धांत' हा विषय निवडला. त्याचे पुस्तक उपलब्ध आहे. या पुस्तकातील विवेचन पाहिले म्हणजे शास्त्रीजींच्या अध्ययनाची बैठक किती पक्की आहे हे लक्षात येते.

प्राचीन साहित्यशास्त्रातील रसविचार प्रथम सविस्तर मांडून शास्त्रीजींनी नंतर आपले रससिद्धांतविषयक विवेचन मांडले आहे. या प्रयत्नातील त्यांचे अध्ययन किती अद्ययावत आहे याचा प्रत्यय येथे येतो. संस्कृत आणि मराठी भाषेतील विविध ग्रंथांचे उल्लेख या विवेचनात इतके आहेत की, शास्त्रीजींच्या परिश्रमाची कल्पना येते. एवढेच नव्हे, तर शास्त्रीजींनी या विषयाचा उपसंहार करताना आधुनिक साहित्यशास्त्रांनी केलेली रसचर्चा विचारात घेऊन त्याची नावनिशीने केलेली चिकित्सा अत्यंत स्पष्ट, निर्भीड आणि सखोल आहे. अर्थात यामध्ये प्राचीनाचा अभिमान आणि आधुनिकाचा अधिक्षेप असा प्रकार नसून मराठीच्या साहित्यशास्त्राने कोणत्या दिशेने गेले पाहिजे याचे दिग्दर्शन आहे हे लक्षात घेतले पाहिजे. शास्त्रीजी या विवेचनात संस्कृत पंडितांपासून मर्ढेकर, गंगाधर गाडगीळापर्यंत सर्वांचेच विचार लक्षात घेतात हे लक्षणीय आहे.

## विखुरलेले ज्ञान संग्रहित करावे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गेली अनेक वर्षे विविध संमेलने, सभा, प्रकाशने, व्याख्याने आणि नैमित्तिक लेख या स्वरूपात विविध विषयांवर बोलत आणि लिहीत आहेत. त्यांच्या या लिहिण्या-बोलण्याला विषयांचे बंधन नाही असे दिसते. शास्त्रीजींच्या व्यासंगामुळे कोणत्याही प्रसंगात ते जी अभिव्यक्ती करतात तीमध्ये ज्ञान-विज्ञानाचे मौलिक विवेचन असते. आता अशी वेळ आली आहे की, त्यांच्या या विखुरलेल्या ज्ञानकणांचा संग्रह करायला हवा. ही कल्पना काही जणांच्या मनात येऊन त्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाली आहे.

प्रा. रा. ग. जाधव यांचे 'विचारशिल्प' हे पुस्तक म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निवडक निबंधांचा संग्रह आहे. प्रस्तावनेत संग्राहक म्हणतात, 'शास्त्रीजींच्या लेखनाला एक प्रकारचे सामाजिक निमित्त आहे.' या दृष्टीनेच असे संग्रह आवश्यक आहेत हे समजून येते. या संग्रहात शास्त्रीजींच्या अन्य लेखनातील निवडक भाग समाविष्ट झाला आहे. सर्वविषयसंग्राहक असे या संकलनाचे स्वरूप आहे. धर्म, संस्कृती, विज्ञान, परिभाषा, मार्क्सवाद, गांधीवाद इत्यादी अनेक विषयांवरील लेखन यामध्ये समाविष्ट आहे.

अगदी अलीकडील एक नवा प्रयत्न या दिशेने झालेला आहे. 'लेखसंग्रह' या शीर्षकाने दोन बृहत् खंड प्रकाशित करण्याचा मनोदय झाला आहे. त्यातील पहिला खंड १९८२ मध्ये प्रसिद्धही झाला आहे. हा खंडच जवळजवळ ६०० पृष्ठांचा झाला आहे. त्यावरून या कामाची व्याप्ती लक्षात येईल.

लेखसंग्रहाच्या या पहिल्या खंडामध्ये तीन विभाग आहेत. पहिला 'भौतिकवाद (वैज्ञानिक व ऐतिहासिक)' या शीर्षकाचा असून त्यात जडवाद, कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान हे विषय प्रामुख्याने आले आहेत. दुसऱ्या विभागाचे शीर्षक 'धर्म व समाज' (भारतीय संदर्भास प्राधान्य) असे असून त्यामध्ये काही दैवते, धर्माची आवश्यकता, विविध धर्म, अंधश्रद्धा, वेद, गीता, शास्त्रे, धर्मसुधारणेची आंदोलने, जातिव्यवस्था यांसारख्या विषयावरील लेख समाविष्ट झाले आहेत. तिसरा विषय 'तत्त्वज्ञान' या विषयांवरील लेखांचा आहे. तत्त्वज्ञानाची भारतीय व्याख्या, त्यासंबंधात उपयुक्त ठरणारे ग्रंथ, भिन्न विचारसरणीचे तज्ज्ञ ऋषी, पंडित आणि मीमांसक यांच्यावरील लेख यात आहेत.

शास्त्रीजींच्या चौरस ज्ञानाचा हा आविष्कार पाहिल्यावर मनात असा विचार येतो की, शास्त्रीजी केवळ लेखनच करते तर किती बरे झाले असते; परंतु शास्त्रीजींचा पिंड केवळ पंडिताचा नाही, तर क्रियाशील पंडिताचा आहे. त्यामुळेच महाराष्ट्राच्या प्रबोधनाचे कार्य करीत ते सतत सर्वत्र जात असतात. देश-विदेशी भ्रमणाने त्यांच्या पांडित्याला ताजेपणा आला आहे. साहजिकच ठिकठिकाणी आणि ठायी ठायी शास्त्रीजींनी भिन्न भिन्न विषयांवर जे विचार व्यक्त केले आहेत. त्यांचा संग्रह झाला आणि ते विचार एकत्रितपणे प्रसिद्ध झाले, तर मराठीतील वैचारिक वाङ्मयाचे दालन अतिशय समृद्ध होईल यात संशय नाही.

शास्त्रीजींना आपण विचारवंत म्हणतो; पण स्वतः त्यांची विचारवंताची व्याख्या काय आहे हेही समजून घेण्यात औचित्य आहे. एका मुलाखतीत ते म्हणाले आहेत, ''आदर्श विचारवंत म्हणजे जो विचारांच्या नव्या कक्षांकडे सतत ओढला जातो, तो होय.'' या त्यांच्या व्याख्येवरूनच या लेखाला 'ऋषितुल्य आधुनिक विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' हे शीर्षक द्यावेसे वाटले.

**('साहित्यरंग' - डॉ. म. वि. गोखले, श्रद्धा प्रकाशन, पुणे, २७ मे, १९९०)**

OOO

२०

# परंपरेला धक्के बसले तरच परिवर्तन शक्य

मुलाखतकार - **प्रा. म. द. हातकणंगलेकर, श्री. दत्ता सावळे व प्रा. अरूण चव्हाण**

**शास्त्रीजी -** माझा जो हा प्रवास ९० वर्षांचा आहे. ९१ वं वर्ष मला सुरू आहे, आणि बालपणापासून आतापर्यंत माझ्या जीवनामध्ये अनेक महत्त्वाचे बदल झालेले, तसेच भारताच्या आणि जगाच्या इतिहासामध्ये अनेक महत्त्वाचे बदल झाले, त्यांच्याशी माझे जीवन मी जुळवून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे माझ्या आत्मचरित्रामध्ये प्रबोधनाच्या अशा फार महत्त्वाच्या गोष्टी येऊ शकतात. मी मुळात भारतीय जुन्या संस्कृतीच्या परिसरामध्ये वाढलो. म्हणजे परंपरागत रूढींच्या बंधनामध्ये पहिल्यांदा वाढलो; परंतु मी जेव्हा एका खेड्यातील ब्राह्मणी वातावरणातून वाईसारख्या, एकाअर्थी नागरिक जीवन आहे आणि खेड्यातील रूढींची बंधनंही आहेत, अशा ठिकाणी वयाच्या १४ व्या वर्षी आलो. त्यावेळी मी जे जग पाहिलं, ते मी ज्या ग्रामीण जीवनामध्ये होतो, त्याच्यामध्ये प्रश्न उत्पन्न करणारे लोक मला आढळले. उदा. प्रार्थनासमाजी आणि आर्यसमाजी लोक माझ्या खेड्यात काही मला भेटले नाहीत; परंतु धार्मिक, भक्ती आहे; पण कोणत्याही विशिष्ट धर्माला, धर्माच्या ग्रंथांना पूर्ण प्रामाण्य देऊन भक्ती करणारे नव्हेत. उदा. डॉ. भांडारकर यांचा प्रार्थना समाज, तसेच आर्यसमाजी मंडळी ही पौराणिक मूर्तिपूजेच्या विरुद्ध; परंतु वेद हे ईश्वरोक्त आहेत असे मानणारे आणि सगळे धर्मग्रंथ माणसांनीच केलेले आहेत आणि माणसांमध्ये एक प्रकारची वरिष्ठ अशी नियंत्रण करणारी दिव्य जी शक्ती आहे, तिच्याबद्दल एक जाणीव आहे. सगळ्यांनाच ती असते असे नाही; पण ती माणसांना परंपरेनं जागृत केलेली, प्राप्त झालेली असते आणि तिच्यावर निरनिराळे वैचारिक संस्कार झालेले असतात. त्या संस्कारामध्ये भारतीय परंपरेमध्ये षड्दर्शनांची परंपरा आहे. त्या षड्दर्शनामध्ये अगदी भौतिकवादी चार्वाकाचं इहवादी तत्त्वज्ञान आहे. मोक्षपुरुषार्थ आणि धर्मपुरुषार्थ, परलोक आणि पुनर्जन्म चार्वाक मानत नाही. इहवादच तो मानतो. कारण जे दिसतं तेच खरं. जे दिसत नाही ते कल्पित आहे असं मानणारा चार्वाक. जेव्हा वाईमध्ये माझ्या गुरुपाशी म्हणजे नारायणशास्त्री मराठे, नंतर केवलानंद सरस्वती यांच्यापाशी भारतीय दर्शनांचा अभ्यास करू लागलो, तेव्हा

इहवादी दृष्टिकोन व्यवस्थितरीतीने माझ्यासमोर मांडला गेला. त्याबरोबरच वेद न मानणारं बौद्ध तत्त्वज्ञान मला माझ्या गुरुंनी शिकवलं. जैन तत्त्वज्ञान वेद न मानणारे, दिव्य जीवन मानणारे मुक्तात्मे जे आहेत - सर्वज्ञ, त्यांना प्रमाण मानणारे जैन, यांचंही तत्त्वज्ञान माझ्यापुढे आलं. त्यामुळे पारलौकिक, धार्मिक परंपरेमध्ये अनेक शाखा आहेत, प्रवाह आहेत हे लक्षात आलं. म्हणून त्या सर्वांबाबतीत अंतिम निर्णय आपल्या विवेकानेच केला पाहिजे, बुद्धिवादाशिवाय दुसरा मार्ग नाही असा दृष्टिकोन मला भारतीय षड्दर्शनांच्या अभ्यासाने आला. वयाच्या १७-१८ व्या वर्षीच मी संस्कृतचं उच्च शिक्षण घेऊ लागलो, त्यामुळे माझा दर्शनांचा अभ्यास अधिक सूक्ष्म होऊ लागला. असा हा माझ्या अध्ययनाचा इतिहास लक्षात घेतला म्हणजे जेव्हा मी विचार करू लागलो, वयात आलो तेव्हा केवळ परंपरेला चिकटून नव्हतो, हे ध्यानात येईल. सुधारक मंडळी माझ्यासमोर येत होती, त्याचप्रमाणे मार्क्सवाद माझ्यासमोर आला - भौतिकवाद आणि भांडवलशाहीवर टीका होऊ लागली. भांडवलशाही ही समाजामध्ये दारिद्र्य कायम टिकवते. कारण त्यांना कामगारवर्ग मिळावा लागतो, तर भांडवलशाहीमध्ये जो स्वार्थ आहे, त्यामुळे समाजामध्ये आर्थिक वर्ग पडलेले आहेत आणि हे आर्थिक वर्ग समाजामध्ये भांडवलशाही आहे तोपर्यंत टिकणारच. त्यासंदर्भात अर्थशास्त्रामध्ये प्रवेश करणं भाग पडलं. अर्थशास्त्राकडे गेलंच पाहिजे ही गोष्ट कम्युनिस्ट मॅनिफेस्टो, कार्ल मार्क्स आणि एंगेल्स मी वाचला तेव्हा लक्षात आलं, की मानवी जीवनाचा अभ्यास करायचा आणि इतिहासाचा अभ्यास करायचा, तर मानवी आर्थिक प्रयत्न समजून घेतले पाहिजेत आणि मनुष्याचं सृष्टीबद्दलचं ज्ञान आणि आर्थिक जीवन निर्माण करण्याची जी प्रवृत्ती आहे, त्याचा विचार केला पाहिजे. मी स्वतः मार्क्सवादी, समाजवादी, मार्क्सवादामध्येच मानवेंद्रनाथ रॉय होते. त्यामुळे मीही त्यांच्या विचाराकडे ओढला गेलो. मानवेंद्रनाथ रॉय यांची मला जी प्रेरणा मिळाली त्याचं आणखी एक कारण आहे, ते एक तत्त्वज्ञानी, क्रांतिकारक विचारांचे होते हे खरंच; पण भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात सशस्त्र क्रांतिवादी म्हणून जी परंपरा पहिल्यापासून निर्माण झाली, त्याच्यामध्ये वयाच्या १७-१८ व्या वर्षीच मानवेंद्रनाथ रॉय भाग घेऊ लागले. त्यांचा परिणाम म्हणजे कृतिशील अशा तऱ्हेचा जो शौर्य दाखवणारा आणि त्याचबरोबर उच्च दर्जाचा ध्येयवाद आणि उच्च दर्जाची बौद्धिक संस्कृती ज्याच्यामध्ये दिसते असे त्यांचे व्यक्तिमत्त्व बनले. मानवेंद्रनाथ एक मोठे तत्त्ववेत्ते आणि ध्येयवादी म्हणून नव्हे, तर कृतिशील क्रांतिकारक म्हणून त्यांचा मोठा प्रभाव माझ्या मनावर पडला आणि मी त्यांच्याकडे ओढला गेलो. भारतीय परंपरेमध्ये जी धार्मिकता आहे ती धार्मिकता ही श्रद्धेशिवाय म्हणजे प्रश्न विचारून निकालात निघणारी नसते, तर तुमच्या ठिकाणी भावनाप्रधानता किती आहे त्याच्यावर ती अवलंबून असते. पण ही श्रद्धा सुद्धा मार्क्सवादाचा प्रभाव पडल्यानंतर तपासण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. कारण मार्क्सने व्यक्तीकडे दुर्लक्ष केले आणि सामुदायिक जीवनाकडे फार लक्ष ओढून घेतलं, की सगळा इतिहास हा वर्गविग्रहाचा इतिहास आहे आणि हे वर्ग आर्थिक वर्ग आहेत आणि समाजामध्ये पिळणारा वर्ग आणि पिळला

जाणारा वर्ग असे भेद असतात अशा तऱ्हेचा जो विचार कार्ल मार्क्सने सांगितला, त्याची मनावर फार लवकर पकड बसते. गेल्या शतकाच्या इतिहास आणि विशेषतः रशियन क्रांतीनंतरचा जो इतिहास आहे, त्याचा प्रभाव मानवी इतिहासामध्ये दोन प्रवाह निर्माण करण्यामध्ये झाला. समाजवादी क्रांतीकडे ओढले जाणारे आणि सामाजिक सबंध रचना मुळापासून बदलली पाहिजे असा क्रांतिकारक विचार एका गटामध्ये आला. आज क्रांती होऊन ७०-८० वर्षे झाली - रशियन क्रांती, चीनमधली क्रांती झाली, इतर अनेक देशांमध्ये समाजवादी दृष्टिकोनाने क्रांतिकारक संघटनांचे परिणाम - जिथे भांडवलशाही समाजरचनाच आहे; परंतु कामगारवर्गामध्ये प्रभावी राहिला; परंतु एकंदरीत कामगारवर्गाचे हक्क कढत गेले. राज्यकर्त्याला आणि त्यांचे हित आणि सत्तेला कामगार वर्ग आणि बहुजन समाज याच्या हिताचाच विचार करावा लागला; आणि ही जी दोन टोके, एक वरिष्ठ भांडवलदार वर्ग, पिळवणूक करणारा वर्ग आणि पिळला जाणारा वर्ग असे समाजाचे दोन विभाग राहिले नाहीत. समाजामध्ये तिसरा मोठा मध्यमवर्ग निर्माण झाला आणि त्याला कोणी मॅनेजरियल रेव्होल्युशन म्हणू लागले. उद्योगधंदे व्यवस्थितरीतीने यशस्वी करणारे तंत्रज्ञ हे मॅनेजर्स झाले आणि त्यामुळे हा मोठा असा मध्यमवर्ग देशात उत्पन्न झाला. म्हणून पिळणारे आणि पिळले जाणारे अशी दोन टोके राहिली नाहीत, तर एक मोठा प्रचंड मध्यमवर्ग आणि पिळला जाणारा कामगारवर्ग, त्याचेसुद्धा हक्क वाढले. त्यामुळे तो नुसता पिळला जाणार नाही, तर उद्योगधंदे वाढवणारा आणि उद्योगधंद्यांमध्ये ज्याचं स्थान अपरिहार्य आहे, अविचल आहे असा कामगारवर्ग म्हणून राहिला. एकंदर मार्क्सवादी विचारसरणीमध्ये सुद्धा बदल केला पाहिजे, समाजाचं चिंतन नव्या दृष्टीने केलं पाहिजे असं दिसून आलं, आणि आता रशियन राज्यक्रांतीच्या बाबतीत जो गोर्बाचेव्हप्रमाणे नवा विचार आला पाहिजे. इतर विचारांना बंदी नको आणि उत्पादकशक्ती जी आहे, तिचे मार्गदर्शक नफ्याकडे लक्ष देणारे नव्हे, तर उत्पादनवाढीकडे लक्ष देणारे आणि नवं नवं तंत्रज्ञान उत्पादनामध्ये वापरलं पाहिजे असे म्हणणारे लोक पाहिजेत. ते भांडवलशाही राष्ट्रात आले आणि त्यामुळे युरोपमध्ये समर्थ - फॉर्मिडेबल - असे सात देश पुढे आले. त्यामानाने रशियन राज्यक्रांतीतून आर्थिक जीवन संपन्न होण्याऐवजी आर्थिक प्रश्न सुटलेच नाहीत. ही जी नवीन सात राष्ट्रे - फॉर्मिडेबल - समर्थ - पुढे आली, त्यांनी गोर्बाचेव्हला आश्वासन दिलं, "पद्धत बदला समाजशासनाची, आम्ही तुम्हाला मदत करतो आणि तुम्हाला आम्ही आर्थिक दुरवस्थेतून बाहेर काढतो," असे त्यांनी नुकतंच आश्वासन दिलं आणि त्यामुळे गेल्या शतकात जे मोठमोठे ध्येयवादी, क्रांतिकारक असे प्रयत्न झाले, त्यांच्यामध्ये मौलिक असे फरक आता होऊ लागले आहेत, असा हा विचार केला पाहिजे. एक महत्त्वाचा मुद्दा हा की, भांडवलशाहीत सुबत्ता जी आली आणि समाजवादी क्रांतीच्या देशांत सुबत्ता आली नाही, याचं मोठं कारण म्हणजे भांडवलशाही समाजरचनेमध्ये उत्पादनवाढ जास्तीत जास्त कशी होईल, आर्थिक सामर्थ्य कसं होईल इकडे लक्ष देणारे, केवळ नफ्याकडे नव्हे, असे कारखानदार निर्माण झाले. अर्थात काही भांडवलदार हे मोठे होतातच.

या देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये म. गांधी यांनी फार महत्त्वाची अशी ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. असहकारितेच्या वेळेस एक सुशिक्षित समाज या देशातला ओढला गेला. नंतर सामान्य जनतेला स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये भागीदार केलं. १९३०-३३ च्या कालखंडामध्ये आणि सामान्य जनता कायदेभंगाच्या चळवळीमध्ये इतकी ओढली की, देशातील कारागृहांमध्ये जागा राहिली नाही. म्हणून कारागृहांच्या बाहेरच्या मैदानांमध्ये काटेरी कुंपण घालून कैदी घालावे लागले. अशी मोठी प्रचंड चळवळ गांधींच्या प्रेरणेने निर्माण झाली आणि १९४५ ते ४७ साली 'भारत छोडो' ही चळवळ निर्माण झाली, आणि ब्रिटिशांच्याही लक्षात आलं, की आता साम्राज्यशाहीचे दिवस संपले.

तर साम्राज्यशाही जी संपली त्याचं कारण सामान्य जनता ही राजकीयदृष्ट्या जागृत झाली. भारतामधील सामान्य जनता राजकीयदृष्ट्या जागृत १९२० सालापर्यंत नव्हती. काही व्यक्ती, राजकीयदृष्ट्या प्रयत्नशील होत्या; परंतु मोठी जनता क्रांतीत सामील झाली हा जो एक मानवजातीच्या इतिहासातला अनुभव आहे, आणि साम्राज्यशाहीचा जगामध्ये अंत झाला, १९४७ मध्ये भारत मुक्त झाला, त्यावेळेस जगामध्ये शंभर राष्ट्रे साम्राज्यशाहीच्या बंधनातून मुक्त झाली. असा हा इतिहास आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे आणि म्हणून आताचे जे प्रश्न आहेत, ते साम्राज्यशाहीच्या बाहेर पडलेल्या मुक्त राष्ट्रांचे प्रश्न आहेत, आणि या मुक्त राष्ट्रांमध्ये संसदीय लोकशाही भारतात निर्माण झाली हे एक फार महत्त्वाचं उदाहरण आहे. एवढ्या मोठ्या देशामध्ये संसदीय लोकशाही गेली ४०-५० वर्षे चालली, निर्वेध चालली आहे. अर्थात ती संकटात सापडते आहे. कारण त्याच्यामध्ये पक्षोपपक्ष वाढत चाललेले आहेत; पण जर ही संसदीय लोकशाही टिकवता आली, तर हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका टळेल; पण हुकूमशाहीचा धोका मानवजातीला टाळता येतोच असं म्हणता येणार नाही. हिटलर निर्माण झाला, मुसोलिनी निर्माण झाले, प्रगत अशा युरोपमध्ये हुकूमशहा निर्माण होतात, तर तो धोका टाळता येणं कठीण आहे, तो टाळता आला पाहिजे अशा रीतीने देश पुढे गेला पाहिजे. असं एकंदर माझ्या विचारांचं स्वरूप आहे.

एक मुद्दा लक्षात ठेवला पाहिजे, तो हा की, मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे आणि स्वातंत्र्याचा शोध करणारा प्राणी आहे. मानवेंद्रनाथ रॉयनी ही एक महत्त्वाची गोष्ट सांगितली की, हे जे प्रश्न आहेत मानवजातीचे, ते सोडवायचे तर माणसाच्या ठिकाणी सत्याचा शोध आणि स्वातंत्र्याचा शोध या दोन मुख्य प्रेरणा लक्षात ठेवल्या पाहिजेत. मनुष्याला मुळातच बंधन नको आहे. म्हणून मनुष्याची अंतःप्रेरणा ही द्विमुखी आहे, त्याला सत्य पाहिजे. सत्य मिळालं पाहिजे, म्हणून धर्माचा इतिहास जर पाहिला, की धर्मग्रंथांत जे सांगितलं आहे, त्याच्यापेक्षा विज्ञान निराळं काही सांगतंय. तिथं धर्म आणि विज्ञान यांचा विरोध आलाच, आणि त्यामुळे युरोपमध्ये धर्मविरोधी विज्ञान असा झगडा सतराव्या शतकापासून सुरू झाला. कारण बायबलमध्ये सृष्टीचं स्वरूप आणि उत्पत्ती यासंबंधी जे काही म्हटलं आहे, त्याच्यापेक्षा विज्ञान निराळं काही सांगायला

लागलं आणि त्यामुळे युरोपमध्ये धर्म विरुद्ध विज्ञान असा झगडा सुरू झाला. भारतामध्ये उत्पन्न होण्याचं कारण नाही. कारण आता विज्ञानाशिवाय गत्यंतरच नाही. ही गोष्ट सगळ्या जगातल्या देशांना मान्यच करावी लागते, की विज्ञानाशिवाय तंत्रज्ञान नाही आणि तंत्रज्ञानाशिवाय मनुष्याचा विकास नाही. उदा. छापखान्याचं यंत्र सतराव्या शतकात एका जर्मन तंत्रज्ञानं काढलं. सामान्य माणसांना पुस्तकं भराभर मिळायला लागली. नाही तर पुस्तकं लिहून काढण्याकरिता पंचाईत व्हायची. दोन हजार लोकांमध्ये, दहा हजार लोकांमध्ये एखादं पुस्तक वाचायचं, ते मिळायला पंचाईत असायची. छापखाना सुधारल्याबरोबर, निर्माण झाल्याबरोबर पुस्तकांची लोकशाही आली. सगळ्यांना पुस्तकं मिळायला लागली, तर असं हे तंत्रज्ञान माणसाला मुक्त करतं. म्हणजे अज्ञानातून मुक्त करण्याला तंत्रज्ञानाचा कसा उपयोग प्रत्यक्ष होतो, याचं उदाहरण म्हणजे छापखाना. अशा तऱ्हेने सामान्य माणसंही सगळं जग पाहू शकतात. अशा तऱ्हेचं हे वाहतुकीचं साधन केवढं वाढलं आहे. जगातली सगळी राष्ट्रं आता जवळ आली आहेत. ऑस्ट्रेलियातल्या माणसाने लावलेला शोध पाच हजार मैलांवर भारतातला माणूस वापरू शकतो. अशा रीतीनं एकमेकांना मिळालेलं जे कौशल्य आहे ते कौशल्य देता येतं. मानवजात आता फार जवळ आलेली आहे, एकमेकांना उपयुक्त होऊ लागली आहे; आणि म्हणून आता अमेरिकेतला मुलगा आणि मुलगी जे शिकते, तेच भारतातला मुलगा आणि मुलगी शिकू शकतात. अर्थातच अमेरिकेत गेल्याशिवाय ते ज्ञान पुरं होत नाही, कारण इथे सूक्ष्म, दैनंदिन होणारी वैज्ञानिक प्रगती नोंदली जात नाही. म्हणून इथल्या मुलाला अमेरिकेत आणि इंग्लंडमध्ये जावंच लागतं, अशी परिस्थिती आहे. अजून ही विषमता, हा फरक आहे; परंतु आधुनिक हे जे मीन्स ऑफ क्विक कम्युनिकेशन - एकमेकांना एकमेकांची विचार आणि एकमेकांची कला ही भराभर, त्वरित मिळणं ही गोष्ट मनुष्यजात आता विकासाच्या एका हमरस्त्यावर आली आहे. काही थोडे पुढे आहेत, काही मागे आहेत इतकेच. असा हा मनुष्य जातीचा इतिहास लक्षात घेतला पाहिजे. म्हणून ''फोर्सेस ऑफ हिस्टरी'' - इतिहासाच्या शक्ती, हा जो कार्ल मार्क्सचा विचार, या शक्ती लक्षात घेतल्याशिवाय प्रगतीचा अर्थ समजायचा नाही. म्हणून फोर्सेस ऑफ हिस्टरी इतिहासाच्या शक्ती याच प्रगतीचा अर्थ आपल्याला दाखवू शकतात.

**प्रश्न - शास्त्रीजी, एक प्रश्न शिल्लक राहतोय, तो म्हणजे प्राज्ञपाठशाळेमध्ये आपल्याबरोबर आणखीन विद्यार्थी होते; पण प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास आणि त्यानंतर मार्क्सवाद आणि रॉयवादाचा पल्ला मला वाटतं आपल्याएवढा आणखी कुणी गाठलेला नाही, तर हे कसं घडलं?**

**उत्तर :** ही धार्मिकता जी आहे, ही आपण म्हणतो अत्यंत खोल अशी मानवी मनाची प्रेरणा आहे; परंतु प्रत्येक धर्माला इतिहास आहे आणि त्यामध्ये सगळे समाज धार्मिक आहेत. धार्मिक नसलेला समाज नाही. याचा अर्थ, धार्मिक रूढी जगात भिन्न भिन्न आहेत आणि त्यामुळे आपण त्याचं सामान्यीकरण करतो की मानवी हृदयाचं धार्मिकता हे खोल रूप आहे. मूळ तत्त्वाचा

शोध हे मनुष्याच्या ठिकाणची बौद्धिकता आहे त्याच्यामध्ये आपण धार्मिकतेला घालू शकतो; परंतु धार्मिकता ही मौलिक भावना आहे असं म्हणण्यात मूळ तत्त्वाचा शोध ही मौलिक भावना बनू शकते. संस्काराने ती खोल होऊ शकते. तिचाच एक आविष्कार धार्मिकता हा आहे; परंतु धार्मिकता मौलिक आहे म्हणण्यापेक्षा मौलिक तत्त्वाचा शोध करण्याची प्रवृत्ती माणसाच्या बुद्धिवादामध्ये निर्माण होते. बुद्धिवादाचा तो भाग आहे. कारण बुद्धी ही शोध करत असते - तत्त्व शोधत असते आणि त्याच्यातच विज्ञानही वाढत असतं. ही मानवी बुद्धीची प्रेरणा आहे - तत्त्वबोध, सामान्य तत्त्वशोध, त्याच्यातच विज्ञान निर्माण होतं. न्यूटन जो निर्माण झाला - एक कवी रसेलनं तो उद्र्धृत केलाय. त्याची एक लाईन आहे.

नेचर ॲण्ड नेचर्स लॉज्<br>
वेअर हिडन<br>
गॉड सेड लेट देअर बी न्यूटन<br>
ॲण्ड देअर वॉज ऑल लाईट

की निसर्गाने निसर्गाचे नियम हे सगळे झाकलेले होते. देव म्हणाला - बायबलच्या स्टाईलमध्ये - लेट देअर बी न्यूटन गॉड सेड लेट देअर बी लाईट. त्याच्याऐवजी न्यून हा लाईट असं तो कवी म्हणतो. याचा अर्थ निसर्गाचे नियम शोधणं ही जी मानवी प्रवृत्ती, त्या प्रवृत्तीचं हे उत्कृष्ट उदाहरण जीनियस, म्हणजे एक प्रतिभासंपन्न मनुष्य. आणि तो न्यूटन होऊन गेला. तर सायंटिस्ट कसा असतो. न्यूटनसारखा, डार्विनसारखा. अजून युरोपमध्ये आणि अमेरिकेमध्ये काही विद्यालयांमध्ये तिथले भटजी लोक डार्विन शिकवायला विरोध करतात. कारण तो (डार्विन) विकासवादी आहे. तो बायबलमधील जेनेसिस मान्य करत नाही.

**प्रश्न : शास्त्रीजी, तो एक मुद्दा शिल्लक राहतोय. या वेदाभ्यासापासून मार्क्सपर्यंतची आपली वाटचाल कशी झाली? ते आमचे कुतूहल आहे.**

**उत्तर :** १९१६-१७ साली मी वाईला आलो, तेव्हा एका अगदी परंपरेच्या अंधश्रद्ध जगातून एकदम चिकित्सक जगात आलो. त्याने माझं मन परंपरेपासून अधिक दूर जायला लागलं. आता सुधारकांचे विचार, उदा. : आगरकरांचे विचार. आगरकरांचे विचार मी अभ्यासले. आगरकर हे परंपरेवर टीका करणारे, सुधारक. त्यांचे लेख वाचले. सोळाव्या-सतराव्या वर्षी टिळक जसे मी वाचत होतो, तसे. आगरकर हे सुधारक. टिळकांपासून फुटून निघालेले. ते परंपरेवर हल्ला करू लागले. त्याचा परिणाम माझ्यावर झाला. ते फार चिकित्सक हल्ला करत. तर आगरकरांच्या ओघाने, मी जो ऑर्थोडॉक्स परंपरेतला, त्याच्यावर अतिशय खोल अशा तऱ्हेचे संस्कार उमटले. कारण तो हल्ला परंपरेविरुद्धचा. आगरकरांचा फार मोठा हल्ला आहे. ती जी टीका आहे, ती मोठी सूक्ष्म आहे. मिल स्पेन्सरचे विचार त्याच्यामध्ये आहेत आणि स्पेन्सरनं आणि मिलनं मानवी स्वातंत्र्याचा आणि विचार यांचा इतिहास कसा घडला याचं फार चांगलं विवरण केलेलं आहे. त्यामुळे त्याचा परिणाम माझ्या मनावर झाला.

**प्रश्न : याच्या पुढचा मुद्दा असा आहे की, मानवजातीच्या मुक्तीच्या दिशेने होणाऱ्या प्रयत्नांमध्ये धार्मिकतेला स्थान असणे आपल्याला अपरिहार्य वाटते काय?**

**उत्तर :** तुम्ही अगदी अद्यावत प्रश्न विचारलाय. आजचा जो अडचणीचा प्रश्न आहे. भारतीय लोकमानसातील धार्मिकता नाकारायची नाही, टाळायची, दुर्लक्ष करायचं आणि इहवादी दृष्टिकोनातून लोकांना लोकशाहीकडे वळवायचं. शेजारी मुसलमान आहे की हिंदू आहे. हिंदूने दत्ताच्या देवळात जाऊन, मुसलमानाने मशिदीत जाऊन - दोघांनी एकमेकांना निरोप द्यावा. जाताना तू जाऊन ये, मी जाऊन येतो; परंतु त्या बाबतीतला जो विरोध आहे तो विरोध मानता कामा नये. आज बुद्धिवादाची जरूर आहे ती एकाच कारणासाठी. धर्म हा खोटा आहे, कल्पित आहे हा विचार सामाजिक होऊ शकणार नाही. कारण आजचे समाज धर्मबद्ध आहेत; परंतु तिकडे दुर्लक्ष केलं पाहिजे. याचा धर्म आणि त्याचा धर्म. या दोघांनी एकमेकांच्या धर्माकडे दुर्लक्ष करायला पाहिजे. ते आपण अजून शिकत नाही आणि आपण शिकत नाही याचं कारण आपली जातिबद्ध समाजरचना. हिंदू आणि मुसलमान शेजारी शेजारी राहतात आणि एकमेकांच्या स्वयंपाकघरांमध्ये एकमेकांच्या घरातल्या महिला प्रवेश करतायत, असं सामाजिक जीवनामधलं संमेलन सुरू झालं पाहिजे. हे जे संमेलन आहे, अजून मराठ्याच्या घरात ब्राह्मणाची सून जात नाही, हे बदललं पाहिजे. एकराष्ट्रीयत्व म्हणायचं; पण त्याच्यामध्ये दार नसलेल्या भिंती आडव्या आहेत. एकमेकांचं जे गृहजीवन आहे त्यामध्ये एकमेकांचं येणं - जाणं पाहिजे. संमेलन पाहिजे. ही जी जातिभेदाची परंपरा इतकी दृढ आहे ती मुद्दाम मोडू शकतो आपण. आणि हे आता अधिक शक्य आहे. आता कोणत्याही हॉटेलमध्ये कोणीही जाऊ शकतं. रोटीबंदी जी होती ती आता मोडली गेली आहे. ती पक्की मोडली गेली पाहिजे. रोटी करणाऱ्या बायका एकमेकांच्या घरात गेल्या पाहिजे. आहारात फरक होता - व्हेजिटेरियन, नॉनव्हेजिटेरियन - ते आता गेलं. ब्राह्मणांच्या सुशिक्षित बाया, पोरी आणि मुलगे हे आता मटणावर ताव मारायला लागलेत. घरातदेखील करतात. म्हणजे जातिभेदाच्या ज्या काही रूढी आहेत त्या मोडल्या गेल्या तरच हिंदू-मुसलमान एक होतील. अगोदर मराठा आणि ब्राह्मण, माळी आणि लोहार हे एकत्र आले पाहिजेत. चांभार, महार आणि ब्राह्मण हे एकत्र आले पाहिजेत; पण माझा अनुभव व्यक्तिशः अगदी वेगळा आहे. माझ्या घरात वाईला (परंपरागत पद्धतीनं जगलेली गृहसंस्था जिथं प्रभावी आहे, तिथं माझ्या घरात माझ्या स्वयंपाकघरात) मेणवलीची म्हारीण येते आणि ती स्वयंपाक करते, आणि आता वाईमध्ये लोक काही बोलत नाहीत. माझ्या घरामध्ये आता हल्ली तुम्हाला म्हारणीची पोळी मिळेल. तिनं केलेली भाकरी आणि भाजी मिळेल, जातिभेद हा धार्मिक होता, ती गोष्ट आता गेली. जात मोडणं म्हणजे धर्म मोडणं हे आता गेलं. ते गेलं पाहिजे आणि ते दोन तऱ्हेनी - हिंदू कायद्यानं जाती - जातीतली लग्नं मान्य करणं. ब्राह्मणाची मुलगी एखाद्या महाराशी लग्न करून पुढे आली तर काही कुणी बोलू शकणार नाही. कायद्याने त्यांच्यापासून झालेली संतती वारस होते, हा हिंदू कायदा आहे आणि तो हिंदू कायदा खानदेशमधला एक वकील

ब्राह्मण पाटस्कर यांनी केलेला आहे. त्यांना आंबेडकर असा एक कायदा करा म्हणत होते. पं. जवाहरलाल नेहरूंना जमले नाही, पाटस्करला जमले आणि हिंदू कायदा झाला. त्यामुळे आता हिंदू-महार आणि हिंदू-ब्राह्मण यांचे आपसांमध्ये लग्न व्यवहार जर झाले तर ते कायदेशीर आहेत. आता हा कायद्यानं बदल झाला आहे; पण कायद्याचा बदल हा व्यवहारामध्ये आलेला बदल नाही. याची आवश्यकता आहे आणि ते झालेलं आहे.

**प्रश्न : हा जो धार्मिक बाबतीतला मुद्दा आहे, तो जरा वेगळ्या पद्धतीनं मांडायचा मी प्रयत्न करतो. साधारणपणे ज्याला आपण मटेरियालिझम म्हणतो - जडवाद, हा पंधराव्या आणि सोळाव्या शतकांमध्ये युरोपमध्ये आणि पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये जो एक ऑर्थोडॉक्स रिलीजनच्या आधारे सबंध जीवनक्रम व्यवस्थित चालत असे त्याला एक प्रकारचा प्रतिघात किंवा रिॲक्शन त्याच्याविरुद्ध म्हणून रेनेसान्सची सुरुवात झाली आणि त्यातून मग मटेरियालिस्टिक फिलॉसॉफीचा जन्म झाला आणि ही फिलॉसॉफी आपल्या आधुनिक विचारवंतांनी जशीच्या तशी उचलली आणि या भारतीय समाजामध्ये आणि समाजमानसामध्ये कलम करण्याचा प्रयत्न केला. ही एका अर्थानं मेकॅनिकल कलम करण्याची पद्धत झाली काय, आणि युरोपियन लोकांचं मानस आणि भारतीय लोकांचं मानस यामध्ये धार्मिकतेच्या बाबतीत फरक आहे की काय आणि आपल्याकडे जो भक्ती कल्ट आहे, त्यामध्ये सुद्धा अनेक पॉझिटिव्ह इलेमेंटस् आहेत, ह्युमॅनिझम आहे आणि एका अर्थानं ते मूर्तिपूजा तर मानतच नाहीत. तर ही लोकांच्या मनाला आणि भावनेला जबरदस्त पकड घेऊ शकणारी जी मानसिकता आहे, त्याचा उपयोग जडवादालासुद्धा थोडंसं पुढं रेटून नेण्याच्या बाबतीत आपण करू शकतो का? कारण गांधीजींनी सुद्धा हा उपयोग राष्ट्रीय चळवळीमध्ये एका प्रकारानं घडवून आणलेला आहे.**

**उत्तर :** नैतिक प्रेरणा धार्मिक प्रेरणेपेक्षासुद्धा अधिक प्रभावी वाटते. कारण गांधी पश्चिमी जगामध्ये राहून आल्यावर दक्षिण आफ्रिकेमध्ये पहिली त्यांची उमेद गेली आणि भारतात आले तेव्हा फार व्यापक असा पश्चिमी संस्कृतीचा अनुभव घेऊन आले, त्यामुळे भारतामध्ये देव आहे की नाही, असा प्रश्न फार जुना आहे. पुनर्जन्मानंतर पुढे आत्मा आहे की नाही हे जुने प्रश्न आहेत. गांधी म्हणत की, तुला नैतिक जीवन मान्य असेल, तर धार्मिक जीवनाची काळजी करू नकोस. तुम्ही सत्य मानता की नाही? मग ठीक आहे. मग तुम्ही देव मानताच. हा जो गांधींचा नास्तिक आणि आस्तिक या दोघांना खोडणारा, गुंडाळणारा नैतिक विचार आहे तो फार महत्त्वाचा आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्याकडे जात असताना जे नेतृत्व मिळालं ते मोठं व्यापक मिळालं. गांधीसारखं उत्कृष्ट नेतृत्व सगळ्या जगाला मान्य आहे. ही आपली मोठी महत्त्वाची - जगाच्या एकंदर राजकारणामध्ये महत्त्वाची - अशी गांधीरूपाने मिळालेली प्रेरणा आहे. ही गांधींची देणगी जागतिक, राजकीय जीवनाला अतिशय प्रेरक अशी आहे. गांधींची धार्मिकता आम्हाला श्रद्धा

आहे की नाही, तुम्हाला नैतिक मूल्यं मान्य आहेत की नाही या मुद्यांवर उभी आहे.

**प्रश्न : उर्दूभाषी सूफी हा एक पंथ आहे आणि सूफीझमचा आपल्या भक्ती कल्टवर फार मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असं मानलं जातं आणि भक्ती संप्रदायाचा आपण वस्तुनिष्ठ विचार केला तर कर्मठपणा नाही. त्यांचा भर भावनेवर, प्रेमावर आहे आणि ईश्वर प्रेमस्वरूप असं ते मानतात आणि ते मूर्तिपूजक नाहीत आणि ही जी मानवतावादी प्रेरणा त्यांची आहे त्याची नाळ आपण तोडायची का? आणि ती नाळ न तोडता त्याचा आपण सामाजिक पुनरुत्थानासाठी कसा वापर करू शकतो?**

**उत्तर :** हे आपण करू शकतो आणि त्याच्या ओघाने हिंदू-मुसलमानांमध्ये एक प्रकाराचं संधान अधिक पक्कं होऊ शकतं. दूरत्व नाहीसं करण्यासाठी तो एक महत्त्वाचा उपाय आहे.

**प्रश्न : आणि म्हणून हा जडवाद आपण जसाच्या तसा पाश्चिमात्यांकडून उचलला, ती मला वाटतं आपली एक चूक झाली असावी.**

**उत्तर :** मुसलमान सुशिक्षित समाज आणि हिंदू सुशिक्षित समाज हे अजून एकमेकांत तसे मिसळले गेले नाहीत. याचं कारण मुसलमान समाजामध्ये शिक्षणाचा प्रभाव फार कमी आहे. हा प्रश्न मुस्लिम समाजामध्ये आधुनिक शिक्षण अधिक वेगाने पसरलं तर शक्य आहे. याची आवश्यकता आहे. आधुनिक शिक्षण मुसलमानात अधिक आलं पाहिजे.

**प्रश्न : आपल्याकडे सध्या जो हिंदुत्वनिष्ठ असा ऑब्स्क्युरॅटिझम, रिव्हायव्हलिझम, फंडामेंटॅलिझम असंही म्हणतो, याचा प्रतिकार आपण केवळ जडवादाने करू शकू काय?**

**उत्तर :** बुद्धिवादानं.

**प्रश्न : पण त्याचबरोबर माणसाच्या भावनांना हात घालण्याची ताकदसुद्धा या बुद्धिवादामध्ये आहे.**

**उत्तर :** नाही. ती भावना काही फार खोल नाही. जीवनाची जी गरज आहे, ती फार महत्त्वाची आहे, की हिंदू-मुसलमानांचं जे सामाजिक जीवन एक व्हायला पाहिजे. ही जी गरज आहे ती गरज अधिक महत्त्वाची.

**प्रश्न : इथे असं म्हटलंय, की १९१७ सालच्या रशियन राज्यक्रांतीनंतर मार्क्सवादातील तत्त्वांवर आधारित व्यवहार एका अजस्त्र समाजात सुरू झाला. या व्यवहाराचे स्वरूप असे घडत गेले की, ज्यामुळे मार्क्सच्या तत्त्वज्ञानातील मानवतावादी अंत:प्रेरणा क्षीण होत गेली. त्यामुळे उद्भवलेल्या भ्रमनिरासातून रॉयवादाचा उदय झाला असेल, असे म्हणता येईल काय?**

**उत्तर :** बरोबर आहे...

**प्रश्न : पण रॉयिस्टांनी मार्क्स पूर्णपणे नाकारलाय का?**

**उत्तर :** नाही.

**प्रश्न : त्यांनी काय नाकारलं आणि काय स्वीकारलं?**

**उत्तर :** मार्क्सवाद सामुदायिक विचार करतो. व्यक्तीचं महत्त्व मार्क्सनं एका ठिकाणी फार चांगल्या रीतीनं मांडलं आहे. रॉयनं ते त्याला महत्त्व दिलं - की फ्रीडम ऑफ इंडिव्हज्युअल इज् दि फ्रीडम ऑफ ऑल - हे कम्युनिस्ट मॅनिफेस्टोतलं वाक्य आहे. हा रॉयवाद.

**प्रश्न : आणखीन एक मुद्दा असा आहे की, व्हिएटनामचा नेता हो चि मिन्ह यानं असं म्हटलेलं आहे की, माझ्या देशाचा मीच महत्मा गांधी होतो. म्हणजे तो कम्युनिस्ट तर होताच आणि भारतीय कम्युनिस्टांची सर्वांत महत्त्वाची चूक जर कोणती असेल, तर महात्मा गांधींचा सिग्निफिकन्स काय, त्यांचे कॉन्ट्रिब्युशन काय हे त्यांना कळलंच नाही. आणि असं दिसतं की, आपली बरीच वर्षे त्यांनी गांधीजींना विरोध करण्यात आणि त्यांच्यावर टीका करण्यातच घालविली; पण हीच गोष्ट पुन्हा एम. एन. रॉय यांनासुद्धा लागू पडते. कारण रॉय आणि गांधीजींचं कधी जमलं नाही. याचं काय कारण?**

**उत्तर :** याचं कारण एम. एन. रॉय हे भक्तिमार्गापासून दूर आणि गांधी भक्तिमार्गी. ते त्यांचं सकाळ-संध्याकाळचं भजन - ते त्यांनी नाकारलं. रॉय जेलमधून सुटले १९३३ साली आणि गांधींना भेटले आणि म्हणाले, "मला मदत करा." गांधींनी विचारलं, "आमच्या संध्याकाळच्या प्रार्थनेला याल का?" रॉय म्हणाले, "नाही." गांधींजी म्हणाले, "मग मी नाही मदत करणार."

**प्रश्न : पण यामध्ये खरं काय घडलं? म्हणजे आता या दोघांमधलं जे अंतर दिसतंय त्याबद्दल जर आपण विचार केला तर असं वाटत नाही की, रॉयनासुद्धा गांधीजी पूर्णपणे कळले नाहीत?**

**उत्तर :** बरोबर आहे. असं म्हणता येईल. कारण त्यांची ती नैतिक प्रेरणा होती, त्याचा अर्थ करायला पाहिजे होता, तो रॉयनी केला नाही. तो फार महत्त्वाचा आहे.

**प्रश्न : मग याचं जरा थोडंसं पुढं स्पष्टीकरण कराल का?**

**उत्तर :** म्हणजे असं आहे की, माणसाच्या प्रवृत्तीमध्ये जी सामाजिक जाणीव आहे, ती अहिंसा शब्दाने व्यक्त होते आणि हा अर्थ रॉयनी केला नाही, तो करायला पाहिजे होता. अहिंसेला गांधींनी जे महत्त्व दिलं ते फार महत्त्वाचं होतं. मानवी जीवन प्रेमाने, अहिंसेने व्यवस्थित रीतीनं प्रेरित व्हायला पाहिजे, तर जे पीडित आहेत, उपेक्षित आहेत, त्यांच्या जीवनाला आधार देण्याची जी समर्थांची प्रवृत्ती असावी लागते, तिच्या पाठीशी अहिंसा वृत्ती आहे आणि ती महत्त्वाची आहे. गांधींनी ती धरली आणि गांधी मोठमोठे व्यापारी - बिर्ला आणि बजाज यांच्याबद्दल माझं गांधींशी बोलणं झालेलं आहे, तर ट्रस्टी आहेत ते मालक नाहीत. तर मी गांधींना विचारलं, हे आपण कसं म्हणता? गांधी म्हणाले, मी या देशातले दोन मोठे भांडवलदार पाहिले आहेत

- घनश्याम आणि जमनालाल बजाज, तर हे दोघेही असे आहेत की त्यांना त्यांच्या संपत्तीचं, वैभवाचं काही महत्त्व वाटत नाही. ते लोकांकरिता आमचं हे वैभव आहे, असं मानणारे आहेत, असे गांधीजींनी मला सांगितलं.

**प्रश्न : आता अलीकडे रशियामध्ये आणि कम्युनिस्ट जगतामध्ये जी काही मोठी स्थित्यंतरं व्हायला लागली आहेत, याचं कारण काय? म्हणजे एकंदर ७०-७५ वर्षांची ही क्रांतीची परंपरा एका दणक्यात उखडून गेली काय?**

**उत्तर :** याचं कारण असं आहे की, आर्थिक विकास नीट झाला नाही, जो भांडवलशाही राष्ट्रांचा झाला. भांडवलशाही राष्ट्रांमध्ये उपाशी मरणारा मनुष्य नाही. कोणीही उपाशी मरू शकत नाही आणि या कम्युनिस्ट क्रांती झालेल्या देशामध्ये माणसांना अन्न मिळेनासं झालं आहे. याचं कारण, हा जो शेतात काम करणारा मनुष्य आहे, तो मनापासून शेत कल्टिव्हेट करत नाही. कारण ते शेत त्याचं नाही. आपला इथे अनुभव असा आहे की, आपल्या इथे शेताचा मालक आपल्या शेताच्या उत्पन्नाची जितकी खबरदारी घेतो, तशी तिथला मजूर घेत नाही. म्हणून शेतमजुराचा प्रश्न आपल्या इथले सत्ताधारी सोडवण्याचा प्रयत्न करणार आहेत. म्हातारा जो शेतकरी आहे, त्याला शंभर रुपये महिन्याला देणार आहेत. अशाने प्रश्न सुटायचे नाहीत. शंभर रुपयांनी काय होणार आहे? त्याची दररोजची भाकरीही शंभर रुपयांत मिळणार नाही. आता प्रश्न असा येतो की, मार्क्सचे जे इतिहासाबद्दलचे ॲनालिसिस आहेत, त्यामध्ये असं दिसतंय की, पहिल्यांदा राष्ट्रांमध्ये भांडवलदारी समाजपद्धती ही प्रगतीच्या एका ठराविक टप्प्यापर्यंत जाणार आणि त्यानंतर मात्र तो समाज उत्क्रांत होऊन किंवा क्रांतीच्यानंतर तिथं समानतेवर आधारलेलं...

**प्रश्न : तसं तर काही घडलेलं नाही. उलट मानवी इतिहासात आपण काही पावलं मागं गेलो आहोत का?**

**उत्तर :** नाही, तसं काही होणं शक्य नाही. परंतु माणूस या नात्याने जगण्याचा अधिकार प्रगत भांडवलशाही राष्ट्रामध्ये प्रत्येक माणूस बजावतो आहे, ही महत्त्वाची गोष्ट. तो समान आहे की नाही हा प्रश्न आहे, तो माणूस या नात्याने जगू शकतो की नाही, त्याच्या मुलाबाळांना शिक्षण मिळतंय की नाही हे प्रश्न. आणि आता हा प्रश्न अमेरिकेत सुटला होता. पण आता असं दिसून येऊ लागलंय, अडचण उत्पन्न झाली. शिक्षण महाग झालंय अमेरिकेमध्ये. गरिबाला शिक्षण मिळालंच पाहिजे. त्याला पैसा नाही म्हणून शिक्षण नाही असं होता कामा नये. असं जग निर्माण करणं ही आपली जबाबदारी आहे. जगात कुठेही माणसाला पैसा नाही म्हणून शिक्षण नाही असं होता कामा नये, असं जग निर्माण झालं पाहिजे. म्हणजे माणसाच्या कर्तृत्वाला ज्या गोष्टीची गरज आहे, ती मिळाली पाहिजे. माणसाच्या ताटामध्ये वाढायचं नाही, माणसाने आपल्या ताटामध्ये वाढता येईल, असे पदार्थ निर्माण केले पाहिजे.

**प्रश्न : पण आता एक अर्थ यातून असा निघू शकतो की, खाजगी मालमत्तेवर आधारलेली भांडवलशाही समाजपद्धती किंवा अर्थव्यवस्था ही साम्यवादाला अभिप्रेत असलेल्या अर्थव्यवस्थेपेक्षा निकृष्ट ठरते...**

**उत्तर :** असं आहे, साम्यवादामध्ये खाजगी घर ॲबॉलिश नाही झालेलं. माझं घर, माझी गाडी ही ॲबॉलिश नाही झाली. म्हणजे काही प्रमाणात प्रॉपर्टी फॉर यूज आणि प्रॉपर्टी फॉर प्रॉडक्शन ही सामाजिक; प्राण प्रॉडक्टिव्ह फोर्सेस सामाजिक नाही. परंतु प्रायव्हेट यूज्ची - प्रॉपटी फॉर यूज् ही व्यक्तीची आहे, मार्क्सला तीच अडचण पडली. प्रायव्हेट यूजची - माझी गाडी, माझं घर, माझं अंगण नसेल तर माणसाला काय प्रेरणा राहील?

**प्रश्न : आता ज्याला आपण आधुनिक तंत्रविज्ञान म्हणतो, टेक्नॉलॉजी, याच्या दृष्टीने जर विचार केला तर आधुनिक तंत्रज्ञान हे भांडवलदारी समाजव्यवस्था ज्या राष्ट्रांमध्ये आहे तिथं आणि साम्यवादी राष्ट्रांमध्ये ही एकाच प्रकारचं तंत्रविज्ञान...**

**उत्तर :** पण त्याच्यामध्ये फरक असा आहे, फार मोठी चूक झालेली आहे समाजवादी क्रांतीमध्ये. तो जो तंत्रज्ञ आहे, तो कंट्रोल्ड आहे, आणि भांडवलदारीमध्ये कंट्रोल नाही. म्हणजे त्याची जी इन्साईट ती फ्री आहे आणि माणसाची इन्साईट जर फ्री नसेल, तर प्रगती नाही.

**प्रश्न : अलीकडे असा एक विचार जास्त प्रमाणात पुढे येतोय, तो म्हणजे आपल्यासारख्या प्रगतिशील देशांमध्ये हे जे पाश्चिमात्य पद्धतीचं तंत्रज्ञान आपण स्वीकारलं आणि त्या तंत्रविज्ञानाच्या जोरावर आपण या देशाचा भौतिक विकास करण्याचा प्रयत्न करत आहोत, आणि त्यामुळेच ज्या काही नकारात्मक किंवा विध्वंसक प्रेरणा या जास्तीत जास्त प्रमाणात मूळ धरताना आपल्याला दिसतायत. यातला हा एक मूलभूत मुद्दा म्हणून मांडला जातोय की, या तंत्रज्ञानामध्येच मूळ असा काहीतरी घोटाळा आहे.**

**उत्तर :** काही नाही, तंत्रविज्ञानात काही दोष नाहीत. ते दोष तंत्रविज्ञानाच्या अडचणी तंत्रविज्ञानच उलगडून दाखवू शकतं. ती प्रायव्हेट की सार्वजनिक याचा तिथं काही संबंध नाही.

**प्रश्न : त्यातलं म्हणणं असं आहे की, तंत्रवैज्ञानिक प्रगतीत उत्पादनवाढ नक्कीच होते; पण आधुनिकता यांच्या जोडीला जीवन अधिक निकृष्ट होणं, असंस्कृत होणं, माणसं जास्त हिंसक बनणं, जास्त लोभी होणं, जास्त स्वार्थी होणं असा...**

**उत्तर :** स्वार्थ आणि परमार्थ विचार हा महत्त्वाचा नाही.

**प्रश्न : पण आपला समाज हा पूर्वी जितका अधिक इंटिग्रेटेड होता तसा आज वाटत नाही. तो जास्त विस्कळीत होतो की काय असं वाटतंय?**

**उत्तर :** आपला समाज विस्कळीत आहे ही गोष्ट खरी आहे; पण तो काही स्वार्थ - परार्थ या दृष्टिकोनातून नाही. आपल्या विकासामध्ये काही दोष आहेत, त्यामुळे हे आहे, स्वार्थ - परार्थ हा प्रश्न नाही.

**प्रश्न : विकासात दोष म्हणजे कोणत्या प्रकारचे? म्हणजे विकासप्रक्रियेमध्ये दोष आहेत?**

**उत्तर :** असं आहे की, तंत्रज्ञानामध्ये ज्या प्रकारची विद्वत्ता लागते, ती एक्स्पर्टाईज ते बरोबर वापरली पाहिजे. त्याची गरज आहे.

**प्रश्न : पुढचा मुद्दा असा आहे की, विसाव्या शतकाला "मेल्टिंग पॉट ऑफ ऑल ईझम्स्'' असं म्हटलंय.**

**उत्तर :** नाही, हे खरं नाही. असं आहे की, जुने ईझम्स मेल्टिंग पॉटमध्ये जातात, नवा विचार पुढे येत असतो. आज मानवजात इतकी जवळ आली आहे की, आता युनायटेड नेशन्स अधिक प्रभावी व्हायला लागलं आहे. मेल्टिंग पॉटचं ते लक्षण नाही. मनुष्य जात आता रिइंटिग्रेट व्हायला पाहिजे. कारणं जवळ आली फार. कम्युनिकेशन जे वेगाने जवळ आणतं आहे, त्यामुळे मेल्टिंग पॉट नाही. गिव्ह अॅण्ड टेक हे वेगाने होताय.

**प्रश्न : मार्क्सवादावर आधारलेलं जे साम्यवादी तत्त्वज्ञान होतं, त्याचा एक प्रयोग रशियामध्ये आणि अन्य पूर्वेच्या राष्ट्रांमध्ये झाला आणि तो प्रयोग आज ते डिस्मँटल करतायत. कारण त्यातले दोष दिसून आले. आणखी आपण म्हणालात त्याप्रमाणं या शतकाच्या सुरुवातीला ज्या प्रकारची भांडवलदारी व्यवस्था होती, ती आज राहिलेली नाही. त्यामुळे वेल्फेअर स्टेट वगैरे या गोष्टी नवीनपणे आलेल्या आहेत. आणि काही प्रमाणात मार्क्सवादाचा परिणाम म्हणूनही तसं झालेलं आहे.**

**उत्तर :** नाही, मार्क्सवादाचा परिणाम त्याच्याबाबतीत इतका, की लेनिनग्राड हा शब्द काढून टाकलाय. म्हणजे क्रांतीचा जो पूजनीय नेता आहे, त्याचं नावसुद्धा नकोय अशी परिस्थिती आली. सिग्निफिकंट आहे, पेट्रोग्राड शब्द नकोय, सेंट पीटर्सबर्ग. तर ते फार अधःपतित आहे. टाईपरायटर घ्यायचा झाला तर सरकारची परवानगी घ्यावी लागेल.

**प्रश्न : आपण रशियाला गेला होतात काय?**

**उत्तर :** हो दोनदा, १९६१ साली आणि १९७२ साली.

**प्रश्न : मग त्यावेळी पाहायला मिळालं का? खरा रशिया बघायला मिळाला?**

**उत्तर :** हो पुष्कळ, मला दिसलं, त्याबद्दल त्यावेळेस मी लिहिलंय. मी सांगतो एक उदाहरण, माझा अनुभव. मी तिथे १० दिवस होतो. १९७२ सालचा अनुभव. मला मार्गदर्शक म्हणजे गाईड एक बाई होती. मला एका हॉटेलमध्ये तिनं पोहोचवलं. ती दिवसभर माझ्याबरोबर असायची, रात्री ९ वाजल्यानंतर मला माझ्या हॉटेलमध्ये पोहोचवून जायची. मला त्यांनी पॉकेट मनी म्हणून ९० रुबल्स आणि ७५ डॉलर्स दिले. डॉलर्स कशाला हे मला काही कळलं नाही. कोणताही चांगला माल इंपोर्टेड आणि त्यामुळे डॉलरमध्ये. मला जे काही पाहिजे ते तिथेही रुबलमध्ये घेतलं; पण तो दुकानदार म्हणायचा, तुमच्याजवळचे डॉलर मला द्या की, तर ती बाई जी मला

एअरपोर्टवर भारताकडे पोहोचवायला निघाली, तर माझ्यापाशी जवळजवळ ६०-७० रुबल्स होते, त्याचा म्हटलं मला काही उपयोग नाही, तू ते घेऊन टाक. ती म्हणाली, तुमच्यापाशी डॉलर आहेत, त्यातले ५ डॉलर मला द्या. मी म्हटलं का, तर ती म्हणाली मला चांगले शूज काही रुबलमध्ये मिळत नव्हते. चांगला शू म्हणजे इंपोर्टेड. मी म्हटलं, दोन घे मी तुला दहा डॉलर देतो. मला दया आली तिची. तुझ्या मैत्रिणीला काय पाहिजे ते दे. कारण मला डॉलर माझ्या देशात मिळतात. तिथे काही अडचण नाही आणि चांगला मालही माझ्या रुपयात मिळतो, तर त्याचा काही विचार नको. तर मालसुद्धा चांगला तयार करत नाहीत, सगळं ते सरकारी. म्हणजे खाजगी उत्तम माल तयार करून मार्केट इकॉनॉमी नाहीशी झाली आहे. मार्केट इकॉनॉमी हा आता शब्द रशियात उचललाय. बाजारात माल ठेवा, गिऱ्हाईक हा ठरवील तुमचा माल कसा आहे ते. तर मार्केट इकॉनॉमी याचा अर्थ कॉम्पिटिशन, मालाची क्वालिटी. याच्याशिवाय जगात चालत नाही. ह्यूमन नेचरशी भिडलंय ते, की तुमचं स्कील हे कॉम्पिटिशनमध्ये टिकलं पाहिजे. तुमचा तोफखाना हा रशियातला तुम्ही नाही घेणार - बोफोर्स - तोफखाना लढाईमध्ये टिकला पाहिजे. तर क्वालिटी ही कॉम्पिटिशनमध्येच येते. तेव्हा जगाचाच नियम आहे. ह्यूमन नेचरमध्ये आहे. निसर्गात तसं आहे - सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट.

**प्रश्न : गेलं शतक जवळजवळ आपल्यासमोर गेलेलं आहे आणि दोन अत्यंत महत्त्वाच्या अशा घडामोडी, म्हणजे रशियन राज्यक्रांतीचा उदय आणि त्याचा अस्त या दोन्ही तुम्हाला पाहायला मिळाल्या आहेत. तर हिंदुस्थानात जर पाहिलं तर गांधीजींसारख्या आणि एम. एन. रॉयसारख्या दोन अत्यंत भिन्न प्रवृत्तीच्या व्यक्तिमत्त्वांशी आपला जवळचा संबंध आला. या सगळ्या घटनांमध्ये एक असं दिसतं की, या सगळयामध्ये कुठलंही एक अत्युच्च असं ग्रँड डिझाइन म्हणजे मनुष्यसमाजाचं एखादं स्वप्न एखाद्यानं प्रत्यक्षात मांडलं आणि त्याला लोक - त्याचा मागोवा घेतलाय असं काही दिसत नाही. आपल्याला काय वाटतं?**

**उत्तर :** मानवसमाज हा इतिहासबद्ध आहे. त्याच्यामध्ये निरनिराळ्या अवस्थेतून तो समाज जात असताना या गोष्टींचे प्रभाव समाजरचनेवर पडले, ते जे प्रभाव करणारे भाग जीवनाचे आहेत, त्यांचं समग्र आकलन करून त्यांना वळण देणारा असा कोणताही जाणीवपूर्वक प्रयत्न होऊ शकला नाही आणि जो होऊ शकणार नाही. कारण अनाकलनीय आहेत गोष्टी. समाज ज्याच्या योगाने बदलत असतो, बनत असतो, रचना घेत असतो, त्या ज्या शक्ती, त्या शक्तींचं समग्र आकलन मनुष्याला होत नाही. माणसं इतिहास बदलतात, इतिहास बनवतात; परंतु इतिहासाला वळण, दिशा माणसं जाणीवपूर्वक देऊ शकत नाहीत. त्यांच्या कृतीनंच इतिहास बनत असतो; परंतु त्यांच्या कृतीमागे जी उद्दिष्टं असतात, ती उद्दिष्टं आणि इतिहासाच्या शक्तींचे होणारे परिणाम यांच्यामध्ये संगती साधता येत नाही. याचं कारण, मनुष्याच्या सामर्थ्याच्या बाहेर इतिहासाला वळण मिळत असतं. म्हणून मी जरी हा गेल्या शतकातला इतिहास पाहिला,

त्याच्यामध्ये जाणीवपूर्वक भाग घेतला आणि भाग घेणाऱ्या मंडळीबरोबर काम केलं; परंतु त्या मंडळींनासुद्धा इतिहासाला कोणतं वळण मिळणार याच्या संबंधानं माहिती नव्हती हे लक्षात ठेवलं पाहिजे. आणि भौतिक जीवनामध्ये जो भौतिक भाग आहे, तो मानवाने प्रयत्न करून जी जीवनाची साधनं निर्माण केलेली आहेत, त्या साधनांचा प्रभाव आहे. उदा. : आयर्न एज. म्हणजे मनुष्याला लोखंड वापरता येऊ लागलं. लोखंड वापरता आल्याबरोबर त्याला मोठमोठी वनं तोडता आली. इमारती बांधता आल्या आणि वस्त्र निर्माण करता येऊ लागलं. अन्न निर्माण करण्याकरता शेती मनुष्य निर्माण करू शकला. केवळ आयर्न एज, म्हणजे नांगराला जो फाळ आहे, तो फाळ क्रांतिकारक शक्ती आहे. त्या फाळानं माणसाला आश्वासन मिळालं की, मी जमिनीवर जर अवलंबून राहिलो; आणि जमिनीमध्ये जर पाणी देऊ शकलो, तर मी जगणारच. हे जे जगण्याचं आश्वासन आहे हे मनुष्याला शेतीच्या अगोदर मिळत नव्हतं. प्रयत्न खरा होता. पशुपालनावस्था होती, त्यामुळे त्याला जगण्याचं महत्त्वाचं साधन मिळत होतं; पण पशुपालन अवस्थेतून तो कृषी अवस्थेमध्ये गेल्याबरोबर पुढे आला. त्याचप्रमाणे त्याला वाहतुकीची साधनं फार चांगल्या रीतीनं मिळाली. उदा. इजिप्तच्या किनाऱ्यावर, नाईलच्या किनाऱ्यावर त्याला नौकानयन करता येऊ लागलं. त्यामुळे समुद्राच्या काठाकाठानं तो चीन आणि जपानपर्यंत जाऊ शकला. तो काही खुष्कीच्या मार्गाने जाऊ शकत नव्हता. कारण निर्वेध, संकटरहित असं दूर जाणं ही शक्यता नौकानयनानेच शक्य झाली. ही अशी भौतिक साधनं जी आहेत, त्यांचा मनुष्याच्या एकंदर आर्थिक स्थितीवर चांगला परिणाम होतो, निरनिराळी राष्ट्रे समाज जवळ येतात, त्यांची जी कौशल्यं आहेत ती एकमेकांना मिळतात आणि अशा तऱ्हेने मानवसमाज सहकार्याने आणि स्पर्धेने वर येत असतो. असा हा इतिहास आहे आणि आज जी मोठी क्रांती झालेली आहे - पहिली माणसाला क्रांती म्हणजे त्याला विस्तव निर्माण करता आला. घर्षणातून म्हणजे गतीतून त्याला उष्णता मिळाली. ती साधनांत आहे आणि उष्णतेतून त्याला गती मिळाली, म्हणजे वाफेचा शोध. या दोन क्रांत्या जर पाहिल्या तर सगळं मानवी जीवन हे भौतिक साधनांच्या योगाने पुढे जात आहे. आणि माणसाची जी नैतिक शक्ती आहे, तिला साधुसंतांनी फार महत्त्व दिलेलं आहे. त्याची जी सद्भावना आहे एकमेकांबद्दलची, त्याला फार महत्त्व दिलेलं आहे, तर त्या सद्भावनेला साधन लागतं. भुकेल्याला अन्नदान केलं तर दयेला अर्थ आहे. भुकेल्याला अन्नदान करता येत नाही, तर रडण्यात काय अर्थ आहे? या दृष्टीनं भौतिक साधनं ही मनुष्याच्या नैतिक जीवनाचीसुद्धा साधनं आहेत. चांगल्या तऱ्हेनं आणि नैतिक जीवन आणि भौतिक जीवन यांच्यामध्ये विरोध नाही, संमती आहे. पश्चिमी संस्कृती ही भौतिक आहे आणि भारतीय संस्कृती आध्यात्मिक आहे हा अलंकार आहे. याला काही अर्थ नाही. पश्चिमी संस्कृतीमध्येही नैतिकता आहेच. ख्रिश्चन धर्मामध्ये नैतिकतेला केवढं महत्त्व आहे.

याच्यातला जो नैतिक आदेश आहे तो केवढा मोठा आहे, व्यापक आहे. तर नैतिक जीवन आणि भौतिक जीवन यांच्यामध्ये एक संस्कृती भौतिक आणि एक अध्यात्मविरोधी अहंकार

आहेत. याला काही अर्थ नाही. मानव हा नैतिकही आहे, आध्यात्मिकही आहे आणि भौतिकही आहे. यांच्यामध्ये विरोध जो आलाय तो अहंकारातून आला आहे, असं माझं एकंदर जीवन मी जे पाहिलं त्यातून माझ्या लक्षात आलं. म्हणून मानव संस्कृती मी एक धरतो. तिच्या प्रेरणा मुळातल्या एक मानतो. म्हणून मानव हा एक आहे. मानवतावाद याचा अर्थ सगळा मानव एक आहे. त्याचं जितकं सहकार्य वाढेल, त्यांच्यातला संघर्ष कमी होत जाईल, त्या मानाने माणूस पुढे जाईल. अजून संघर्ष पुरे झालेले नाहीत. संघर्ष आहेत, स्पर्धा आहेत. परंतु जसा संघर्ष कमी होईल, नाहीसा होईल आणि मानवी सहकार्य विश्वव्यापी कसं निर्माण होईल हीच खरी चिंता आजच्या जगाला आहे. असं मला एकूण आजच्या आणि भूतकाळातल्या जीवनाचा एकंदर अर्थ समजून घेत असताना दिसून आलेलं आहे. हे दर्शन आहे.

**प्रश्न : आता जो प्रश्न विचारला, त्यामध्ये या शतकामध्ये जे तीन मोठे चिंतक होऊन गेले, मार्क्स, गांधी आणि रॉय, त्यांनी मानवी समाजाच्या उद्धाराची जी स्वप्नं पाहिली, ती प्रत्यक्षात का येऊ शकली नाहीत आणखीन. या सगळ्यांचा आपला अभ्यास आहे, या संबंधी आपला अभिप्राय काय? आपण आता जे मानवी संस्कृतीसंबंधी तात्त्विकदृष्ट्या त्या पातळीवर जे सांगितलंत, ते योग्यच आहे; पण या शतकात जे घडलं -**

**उत्तर :** या शतकामध्ये फार चांगलं घडत आहे. नवे-नवे प्रयोग करताहेत. राजकीय क्रांत्या ज्या या शतकात झाल्या, त्याच्यामध्ये मनुष्याला फार नवा, ऐतहासिक अनुभव आलेला आहे. त्याच्या अपेक्षा सफल झाल्या नाहीत; पण त्याला जीवनाचं एकंदर स्वरूप समजायला त्या प्रयोगाने मदत मिळालेली आहे. आता लेनिनग्राड हा शब्दसुद्धा मान्य नाही. पेट्रोग्राडही नाही, सेंटस् पीटर्सबर्ग घाला, लेनिन कुठला आला? असं जेव्हा रशियातला नागरिक म्हणायला लागला, त्याचा अर्थ, तो जो मोठा प्रयोग झाला, समाजवादी क्रांतीचा, त्याच्यामध्ये जी राज्यरचना निर्माण झाली, ती जबरदस्त, माणसाला बंधनात टाकणारी, बंधन घालणारी, त्यामुळे रशियन राज्यक्रांतीनंतर सोव्हिएट युनियनमध्ये वैभवशाली अशी अर्थव्यवस्था तयार होईल, अशी अपेक्षा होती, तिला काही आधार मिळत नाही, उलट आज जिथे समाजवादी क्रांती नाही, समाजवादी पक्ष आले; पण भांडवलशाही तथाकथित आली आणि ती जी भांडवलशाही तीमध्ये नफ्याचा स्वार्थी दृष्टिकोन जरी होता, तरी नफ्याच्या स्वार्थी दृष्टिकोनाने पुढे गेलेली नाही. अर्थव्यवस्था अधिक संपन्न निर्माण करू शकली. म्हणून भांडवलशाही अर्थशास्त्राचा पहिला समग्र असा सिद्धांत मांडणारा ॲडम स्मिथ याने म्हटलेलं आहे की, कोष्टी हा स्वतःच्या जगण्याकरता आणि जीवनाकरता कापड विणतो; पण त्याच्यामध्ये स्त्रियांची अंगं झाकली जातात. त्यांना झाकण्यासाठी तो कापड विणत नाही. तो कापड स्वतःचा प्रपंच चालण्याकरता निर्माण करतो, तर समाजामध्ये स्वार्थाची प्रेरणा आहे की परमार्थाची प्रेरणा हा खरा मुद्दा नाही. खरा मुद्दा हे घडतंय त्यामुळे समाजाची आर्थिक व्यवस्था ही संपन्न होते की नाही, हा खरा प्रश्न आहे. म्हणून भांडवलशाही राष्ट्रे सात आज पुढे आहेत, ती फॉर्मिडेबल आहेत. आजचा जर्मनी

घ्या. पूर्व जर्मनी हा सोव्हिएट युनियनमध्ये होता, त्यातनं तो निसटला - निसटू दिला आणि पश्चिम जर्मनी हा भांडवलशाही प्रवृत्तीचा. तर हे दोन्ही एकत्र आल्याबरोबर जर्मनीमधल्या विज्ञाननिष्ठ संस्कृतीच्या योगाने त्यांची निर्माणशक्ती वर आली. सर्जनशक्ती वर आली आणि त्यामुळे आज 'जर्मन युनिफाईड' जगाला धोका होईल असं लोकांना वाटत होतं. चर्चा चालली होती गेल्या २-३ वर्षांत, की हा जर्मनी पुन्हा जगामध्ये महायुद्ध आणेल की काय; परंतु कोल्हा म्हणाला की, आम्ही आता नवं युद्ध आणत नाही, भिऊ नका. आम्ही जग आर्थिकदृष्ट्या पुढे कसं जाईल, मागासलेली राष्ट्रं पुढे कशी येतील, त्यांच्या आर्थिक प्रवृत्ती अधिक मुक्त कशा होतील यासाठी प्रयत्न करणार आहोत. तर असं हे जग आज संक्रमणावस्थेत आहे. वरच्या दर्जाचं जागतिक राजकारण, जागतिक सहकार्य निर्माण करायचं आहे आणि असं दिसतंय की, ज्या ठिकाणी वंश पक्षपात, उदा. दक्षिण आफ्रिकेत वंश पक्षपात अजून आहे आणि म्हणून तिथले जे काळे लोक आहेत ते ओरडतायत आज, की हा गोऱ्यांचा वंश पक्षपात थांबलेला नाही. म्हणजे जगाचे प्रश्न आज स्पष्ट होतायत, झाकले जात नाहीत हे लक्षात ठेवलं पाहिजे. आज आपण संक्रमणावस्थेतून जात आहोत आणि जागतिक राजकारण हे मुख्य बनत आहे आणि राष्ट्रीय राजकारणाचा भाग बनत आहे असं आपल्याला दिसत आहे. म्हणजे निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये काय - काय चाललं आहे. उदा. अगदी इस्रायल हा प्रश्न अजून सुटलेला नाही. उदा. हा ज्यू मानववंश आहे, तो केवढासा आहे; पण त्या ज्यूंचा प्रश्न, त्यांच्याकडे पश्चिमेकडील गोरा समाजसुद्धा संशयाने बघतो. म्हणजे ज्यूमध्ये मोठं टॅलेंट आहे. मी अमेरिकेत एका युनिव्हर्सिटीत गेलो असताना - मला माहीत नव्हतं की, तिथला प्राचार्य ज्यू आहे म्हणून. मी म्हटलं, अहो, एवढं तुम्ही ज्यूंबद्दल म्हणता; पण आजच्या जगातील अत्यंत बुद्धिमान आणि संशोधक ज्यूंनी दिलेत. कार्ल मार्क्सच्या अंगात ज्यू रक्त. त्याच्या मागच्या पिढ्या ज्यू होत्या. त्याच्या बापानं वकिली नीट करता यावी म्हणून ज्यूपणा सोडून दिला. म्हणजे आधुनिक जगावर प्रभाव गाजवणारा कार्ल मार्क्स, त्याच्या अंगात ज्यू रक्त होतं. दुसरा म्हणजे वैज्ञानिक क्षेत्रामध्ये अतिशय वरिष्ठ प्रश्न हाताळणारा आणि एका अर्थानं सोडवणारा आईन्स्टाईन हा ज्यू आहे. म्हणजे आज जगातले बौद्धिक प्रश्न, सामाजिक प्रश्न आहेत, त्यामध्ये वरिष्ठ तीन ज्यूच आहेत. तो म्हणे, 'आय ॲम ऑल्सो ए ज्यू' आणि मला जी गाईड बाई आली होती ती म्हणाली, तोंडाकडे पाहिलं म्हणजे ज्यू कळतो. ती स्वस्थ उभी राहिली आणि नंतर आम्ही दोघंही बाहेर आलो. तिने मला मोटारीतून तिथे नेलं होतं. ती म्हणाली, 'शी डिडन्ट रेकग्नाईज् मी ॲज् ए ज्यू. आय एम ए ज्यू' तर असं हे जग आहे. जगामध्ये जी संक्रमणावस्था आहे, ती फार चांगली आहे आणि जगाचं नव्या समंजस अशा स्वरूपामध्ये पुनर्निर्मितीचं तंत्र प्रभावी बनतं आहे.

आणि एम. एन. रॉयबद्दल तुम्ही म्हटलंत - तर एम. एन. रॉय हे मार्क्सवादाच्या परंपरेत होते. भारतातला मोठा मार्क्सवादी कम्युनिस्ट डांगे याला त्यांनी मार्क्सवाद आणि कम्युनिस्ट पक्षाकडे ओढलं आणि स्वतः कालांतराने कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडले. कम्युनिझम प्रश्न

सोडवू शकत नाही हे त्यांनी ७० वर्षांपूर्वी ओळखलं. एम. एन. रॉयनी लिहून ठेवलं आहे की, रशियन रिव्होल्युशन जी आहे, ती काही सफलतेच्या मार्गावर नाही. 'रशियन रेव्होल्युशन' म्हणून हजार पानी निबंध लिहिला आहे, त्यात त्यांनी म्हटलं आहे की, रशियन क्रांती सफल होणं शक्य नाही. कारण त्यांना समजलं की, माणसाच्या ज्या प्रवृत्ती आहेत, त्यामध्ये त्याची जी स्फूर्ती आहे निर्माणस्फूर्ती, तिला बंधन पडता कामा नये. आणि भांडवलशाहीमध्ये हा गुण आहे की भांडवलशाहीमध्ये व्यक्तीच्या स्फूर्तीवर बंधन नाही. म्हणून आज जगातली, युरोपातली सात राष्ट्रं भांडवलशाही असूनदेखील संपन्न झाली आहेत आणि त्यांनी रशियन नेत्याला सांगितलं, तुमची जुनी पद्धत तुम्ही बदलताय, आम्ही तुम्हाला मदत करतो. तुमची जी आर्थिक दुरवस्था आहे, तिच्यातून आम्ही आता तुम्हाला बाहेर काढतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे हे नवं जग जे आहे, ते प्रयोग करतं, त्या प्रयोगातले जे काही दोष आहेत ते जाणून घेतं आणि त्या कार्यक्रमाला बाजूला टाकून नवा कार्यक्रम स्वीकारतं, असं हे आजचं जग आहे.

**प्रश्न : एकोणिसाव्या शतकात साधारणतः विकासाविषयी अशी एक कल्पना होती की, सायन्स आणि टेक्नॉलॉजी, ज्याला आपण लिमिटलेस ग्रोथ शक्य आहे अशी त्या वेळची धारणा होती. पण साधारणतः जे जाणवायला लागलेलं आहे, की निसर्गाच्या साधनांना मर्यादा आहेत आणि निसर्गाच्या साधनांची ही मर्यादा ही अपरिहार्यपणे मानवी समाजावर आणि माणसावरही परिणाम करते. मार्क्सच्या डोळ्यासमोरसुद्धा असं होतं की, स्केअर्सिटीच्या जगामध्ये माणसाचं विघटीकरण होतंय, तर तो अशी एक कल्पना करतो की, सायन्स आणि टेक्नॉलॉजीमुळे असं एक ॲफ्ल्युएन्सचं जग शक्य आहे; पण आता साधनांच्या कमतरतेमुळे साधारणतः असं दिसतं की, भांडवलशाहीचासुद्धा विकास - गेल्या शंभर वर्षांतला विशेषतः जर लक्षात घेतला, तर ॲफ्ल्युअन्स जो निर्माण झालेला आहे तो अनावश्यक वस्तूंचा. आणि आवश्यक वस्तूंची स्केअर्सिटी आजही आहे. उलट, अधिकाधिक जीवनावश्यक वस्तू अधिकाधिक स्केअर्स होतायत. हवा स्केअर्स होतीये, पाणी स्केअर्स होतंय. म्हणजे जीवनाचे आधारच नष्ट करून जर वस्तू निर्माण करीत राहिलं आणि वस्तू उपभोगत राहिलात, तर एक प्रचंड प्रमाणात क्रायसिस - गेल्या शतकातला वेगळा पण एक विचित्र क्रायसिस या शतकात निर्माण होईल....**

**उत्तर :** हा जो दृष्टिकोन आहे, तो सायन्स आणि टेक्नॉलॉजीच्या बाबतीत जो काही माणसामध्ये आशावाद आहे, त्याच्या विरोधी असलेला हा दृष्टिकोन आहे. स्केअर्सिटी घालवता येते. उदा. आज एनर्जीचा प्रश्न आहे. फार मोठी एनर्जीची स्केअर्सिटी नष्ट करण्याची ताकद माणसात आहे. सायंटिस्टांनी ओळखलं आहे, आणि म्हणून सूर्याच्या गर्भात जी काही प्रचंड नवी-नवी एनर्जी निर्माण होते, तशी माणसाला अणूच्या गर्भात निर्माण करता येईल अशी आशा आहे. त्यामुळे स्केअर्सिटीच्या बाहेर मनुष्य पडतोच आहे. एकीकडे स्केअर्सिटी दिसते, दुसरीकडे ती दिसत नाही. एवढा मोठा आफ्रिका खंड, अन्कल्टिव्हेटेड केवढं मोठं आहे. या अन्कल्टिव्हेटेड आफ्रिका

खंडाला जर तुम्ही कल्टिव्हेशनची शक्यता निर्माण केलीत, तर मानवजातीला जे महत्त्वाचे प्रश्न आहेत ते सोडवता येतील. आज स्केअर्सिटी; परंतु अन्कल्टिव्हेटेड एवढा मोठा आफ्रिका खंड आहे. ज्यामध्ये मानवी वस्तीसुद्धा अजून फारशी नाही. आणि मानव कुठे उत्पन्न झाला? तर पहिल्यांदा आफ्रिकेत. आता जो मानवाबद्दलचा प्रश्न, म्हणजे मानवप्राणी पहिल्यांदा आला कुठे? हा फिजिकल अँथ्रोपालॉजीमधला प्रश्न आहे. भौतिक मानवशास्त्राच्या मते आफ्रिका हे मानवाच्या उत्पत्तीचं मुख्य स्थान आहे. तिथून तो युरोपमध्ये गेला, हवा-पाण्याच्या योगाने त्याच्या त्वचेतला कृष्णपणा गेला. भारताकडे तो आला, भारतात मानव पहिल्यांदा उत्पन्न झाला की नाही - सगळा भारत हा इमिग्रेशन - दुसऱ्या प्रदेशातूनच मानव इथे आलेला आहे. त्यामुळे मानव हा पहिल्यांदा भटक्या प्राणी आहे; आणि तो लाख दोन लाख वर्ष मनुष्य - होमोतोरा म्हणतात, तर हा जो होमो इरक्टस् पहिल्यांदा जो अमानव स्थितीतून वर आला, त्याचं कारण म्हणजे तो ताठ उभा राहिला. आणि हाताचा तो उपयोग अगोदर करीत होता, तो जास्त चांगल्या रीतीने करायला लागला आणि दोन लाख वर्ष हिंडतच होता. फूड गॅदरिंग स्टेज - अन्नसंपादनाची, अन्न गोळा करण्याची स्टेज. म्हणून मी नेहमी म्हणतो, अरे बसू नका. डायबेटिस अपरिहार्य आहे. चाला, म्हणजे डायबेटिस झाला तरी बाधणार नाही. चाललं पाहिजे आणि काम केलं पाहिजे - शरीरश्रम. म. गांधींनी शरीरश्रमाला फार महत्त्व दिलेलं आहे. प्रत्येकाने काम केलं पाहिजे. छे घंटे काम करना, तर सहा तास प्रत्येकाने काम करावं, हे जे गांधींनी सांगितलं आणि चरखा दिला. तर हाताने काम करणं ही माणसाची मूळची गरज आहे आणि ती सुटता कामा नये हा म. गांधींनी हाताने काम करण्याचा मंत्र दिलाय. बुद्धीनं करा; पण हातानं काम करत असतानाच बुद्धी विकसित झालेली आहे. मेंदू माणसाचा जो विकसित झाला त्याचं कारण तो हात आणि मेंदू या दोघांच्या सहकार्यानं. तो जेव्हा हातांनी पदार्थ उचलतो तेव्हा त्याचं वजन पाहतो, वास घेतो, रंग पाहतो, आवाज ऐकतो. याचा अर्थ त्याची जी पंचेंद्रिये आहेत, ती तो वापरतो हाताच्या योगानं. म्हणून हा जो अंगठा हाताचा, ती एक मोठी देणगी आहे. ती त्याच्या आतल्या प्रेरणेनंच निर्माण झालेली आहे. ही पाच बोटं आहेत ही दहा झाली. भारतामध्ये दशांक पद्धती आहे. याचं कारण इथे यज्ञाजवळ बसलेला जो माणूस आहे, तो दोन्ही हातांनी मोजायला लागला. त्यामुळे नवांक, दशांक पद्धती आली. जगात दशांक पद्धती नव्हती आणि शून्य आलं. कारण गंगायमुनांच्या काठी जो मोठा व्यापार झाला त्यामध्ये अफाट संपत्ती निर्माण करत होता आणि वाहून नेत होता. ती मोजण्यासाठी त्याला शून्याची गरज भासली. शून्य आणि दशांक पद्धती भारतात आली ती इथला व्यापार वाढला म्हणून, देवघेव वाढली म्हणून. म्हणजे मी जे सांगितलं की, भौतिक जीवन आणि बौद्धिक जीवन यांचं एकमेकांशी जे संगनमत असतं, त्यातूनच माणसाची प्रगती होत असते. उदा. मनुष्य अक्षर लिहायला शिकला. क्षर म्हणजे पाझरणारा. न पाझरणारं म्हणजे नष्ट न होणारं. तो लिहायला शिकला आणि त्याचं ज्ञान जे आहे ते साठायला लागलं. ज्ञान साठायला लागलं याचं कारण तो लिहायला लागला. आणि छापखाना आल्याबरोबर सगळयांना पुस्तकं

भराभर मिळायला लागली. प्राज्ञ पाठशाळेच्या हस्तलिखित ग्रंथामध्ये हजार दोन हजार पानांची पुस्तक हातांनी लिहिलेली सुंदर अशी आहेत, आणि त्यामुळे एकाच्या घरात पुस्तक असायचं. आता कोकणामध्ये बुद्धिमत्ता फार आहे असं म्हणतात. तर कोकणामध्ये एकही पुस्तक दोनशे वर्षांपूर्वी तयार झालं नाही. झालं देशामध्ये. याचं कारण कोकणामध्ये पुस्तक लिहिलं की वाळवी खाऊन टाकायची. त्यामुळे वाळवी हा संस्कृतीचा शत्रू आहे आणि देशामध्ये लिहिलं ते टिकलं. उदाहरण सांगतो, राजवाड्यांनी इतिहासाचे २६ खंड प्रसिद्ध केले - इतिहासाची साधनं. पहिला खंड वाईच्या एका माळ्यामध्ये पानिपतचं दप्तर - पानिपतच्या लढाईमध्ये पेशव्यांच्याबरोबर गेलेल्या कारकुनाचं दप्तर हे तसंच होतं. राजवाडे हे निरनिराळ्या ठिकाणी असलेली साधनं गोळा करत असत, तर वाईमध्ये त्यांना कुलकर्ण्यांच्या माळ्यामध्ये पानिपतचं दप्तर सापडलं. याचं कारण वाळवी आणि कसर लागली नव्हती. तर वाळवी आणि कसर न लागलेलं दप्तर हाती लागलं. हे अक्षर. तर अक्षराचा जो महिमा आहे तो निराळा आहे. म्हणून बुद्धिमान विद्यार्थी देशावर - वाईला, कराडला, कोल्हापूरला यायचे, अध्ययन करायचे आणि कोकणात जाऊन विसरून जायचे आणि पोथ्या वाळवीनं खाऊन टाकायच. म्हणून विद्वत्ता ही ब्रिटिशशाहीपर्यंत कोकणात नव्हती, देशावर होती. आणि इथे शिकायचं. व्याकरण सांगलीला शिकायचं. माझे गुरुजी नारायणशास्त्री मराठे कोकणातनं आले. इथे एक आचार्य नावाचे कानडी पंडित होते आणि आचार्यांची पाठशाळा होती. ते कानडीच बोलायचे; पण मराठी बोलायला शिकले. त्यांच्यापाशी माझे गुरुजी पहिल्यांदा व्याकरण शिकले. तर जिथे ग्रंथ तिथे अध्ययन हा नियम आहे. देशावर ग्रंथ, म्हणून देशावर अध्ययन झालं. कोकणात एकही पुस्तक तयार झालं नाही. ब्रिटिश येण्यापूर्वी. देशावरच झालं. याचा अर्थ तेव्हा कळतो की, कोकणात पुस्तकं राहत नसत. त्यांच्या ओघानं विद्या वाढतात, टिकतात आणि मनुष्याला नवे नवे विचार येतात, ध्येयवाद येत असतात.

**प्रश्न : शास्त्रीजी, आपण मानवाच्या समतेसंबंधी विवेचन आतापर्यंत केलंत. प्रश्नाचा रोख असा होता की, मानवी समाज वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या काळात राहत असताना त्यांचे संबंध समतेचे आणि न्यायाचे हे कसे राहायचे नाहीत?**

**उत्तर :** असं आहे, राज्यसंस्था जी आहे राजकीय सत्ता, तर राज्य कशाकरता? याचा विचार ग्रीक संस्कृतीमध्ये चांगला झाला. आपल्याकडे झाला; पण आपल्याकडे मोनार्की - चांगला राजा - ही होती. म्हणजे आपण महाभारत आणि मनुस्मृती जर पाहिली, तर राजाच्या ठिकाणी सगळ्या तऱ्हेच्या दैवी शक्ती त्यांनी धरलेल्या आहेत, तर मोनार्की डिजनरेट होते. दुसरी म्हणजे प्रज्ञाशील अनेक असे ॲरिस्टोक्रॅट्स - ॲरिस्टॉक्रसी त्याचं सामुदायिक नेतृत्व होतं. त्यांचं डिजनरेशन सरदारशाही. म्हणजे मोगल बादशहा होते; पण त्यांचे सरदार ठिकठिकाणी होते आणि ते मोगलाई टिकवत होते. ती डिजनरेट होते. आणि तिसरी म्हणजे लोकशाही; पण ती लोकशाही केवळ लहानशा प्रदेशातच टिकते. ग्रीकांनी लोकशाही कल्पिली; पण दहा हजार,

पाच हजार वस्तीत लोकशाही असायची. ज्याला डायरेक्ट डेमॉक्रसी आणि प्रतिनिधीप्रधान लोकशाही म्हणतात. आता लोकांना राजा पाहिजे असतो. गागाभट्टांनी शिवाजीला सांगितलं, तुम्हाला जे लढावं लागतंय, अभिषेक करा. म्हणजे राजा मिळेल, मग राजासाठी लोक लढायला तयार होतात, मग आक्रमक भितात की, यांची ताकद मोठी आहे. हे शिवाजीची दोन चरित्रं लिहिलेल्या बेंद्र्यांनी लिहिलेलं आहे. त्यांनी खूप साधनं एकत्र करून ही चरित्रं लिहिली आहेत - तर बेंद्र्यांनी लिहिलंय - अभिषेक करा. अभिषेक केला की राजा आलाय. लोकांना पाहिजे असतं ते. लोकांना व्यवस्थित राज्यसंस्था आणि कायदा पाहिजे असतो. लोकांना राज्य पाहिजे असतं आणि ते कायद्याचं राज्य ही समाजाची एक आपोआप निर्माण होणारी अपेक्षा आहे; आणि ही जी माणसाची जाणीव आहे ती फार महत्त्वाची आहे. आणि शिवाजी महाराज आणखीन दहा वर्षे जगायला हवे होते. म्हणजे इथले आजचे प्रश्न तेव्हाच निकालात निघाले असते. शिवाजी महाराजांना हे दिसत होतं. त्यावेळी काही जणांनी लिहिलेलं आहे की, हा अलेक्झांडरसारखा दिसतो, रोमन सम्राटासारखा दिसतो. म्हणजे त्याच्यात ते तेज, प्रतिभा होती. नुसता लढाऊ, शूर नव्हे, तर समाज जवळ करण्याची ताकद त्याच्यात होती. त्याला कळलं होतं मोगलांचं फेल्युअर. तो जर दहा वर्षे आणखी टिकला असता, तर मोगलांना जे जमलं नाही ते जमलं असत. त्याचं एक तंत्र फार सिग्निफिकंट आहे. राज्य कशासाठी आहे? तर हिंदू की मुसलमान, हा प्रश्न नाही. राज्य प्रजेकरता. प्रजेला वाटलं पाहिजे की, हे राज्य टिकलं पाहिजे. ही जी शिवाजीला राज्यविषयक प्रतिभा होती, ती फार महत्त्वाची आहे. तो दहा वर्षे लवकर गेला, सगळा इतिहास बदलला. बर्ट्रांड रसेलनं म्हटलं आहे की, एखाद्या लहानशा घटनेनं इतिहास बदलतो. ज्या दिवशी युरोपमध्ये पूर्वेकडच्या फ्रंटवर लेनिन जायला निघाला, तेव्हा त्या वेळच्या जर्मन कमांडरनं "हा बरा आहे, तिथं गोंधळ घालायला" म्हणून त्याला पाठवला. लेनिनला. त्याच्याने इतिहासाला कलाटणी मिळाली. रसेलनं म्हटलं आहे की, लहानशी घटना असते. लेनिनला तिथे पाठविल्याबरोबर एकदम इतिहासाला निराळा रंग येतो. शिवाजी महाराज दहा वर्षे अगोदर गेले. बायका भांडत होत्या घरात; आणि काहींचा संशय आहे की, त्या बायकांच्या भांडण्यातच ते गेले. आणि तो संशय बेंद्रेंनी सूचित केलेला आहे. बेंद्रे हे फार चांगले अभ्यासू. त्यांनी संभाजीचाही अभ्यास फार चांगला केला आहे. त्यांचं संभाजींचं पुस्तक फार गाजलेलं आहे.

**प्रश्न : आता आपण जसं म्हणालात, शिवाजीच्या काळातच युरोपमधून आलेली राष्ट्र, इथं मोगलांचा पर्याय - इथं हिंदुस्थानचा शत्रू कोण? तर युरोपमधून आलेली नव्या विज्ञानाची, नव्या बंदुका वगैरे घेऊन आलेली ही जी मंडळी होती - इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, डच - तर दहा वर्षे शिवाजी जरी जगले तरी नव्या शत्रूचा...**

**उत्तर :** ते त्यांना कळलंच होतं. शिवाजी महाराजांना नवं जे घडतंय त्याबद्दल अतिशय आकर्षण होतं. त्यांनी सुरतेवर हल्ला केलाच होता. एकदा लूट केली होती. इथे त्यांना त्या गोऱ्या लोकांची वसाहत वगैरे पाहिल्यानंतर हे काही निराळं आहे, हे त्यांना कळलंच. त्यांना लगेच

कळलं असतं. कारण पोर्तुगाल हे चांगले लढवय्ये आहेत, त्यांची साधनं, त्यांचा तोफखाना चांगला आहे हे शिवाजी महाराजांना दिसलं होतं. कारण ते कोकणातून इकडून तिकडे जात होते. त्यांना कोकणचा राजाच म्हणत आणि रायगडवर त्यांनी राजधानी केली. यामध्ये फार दूरदर्शीपणा आहे. आधी राज्याभिषेक रायगडावर केला. पावसाळ्यात आरंभी प्रचंड जंगल. त्यामुळे राज्याभिषेक झाला त्याच्या तिसऱ्या दिवशी बातमी औरंगजेबाला कळली; आणि इकडे साऊथमधल्या बादशहाला विजापूरला कळली, तर औरंगजेब एकदम गलितगात्र झाला. “हे अल्ला, तू या पाखंड्याला म्हणजे काफरला राज्य दिलंस!” तीन दिवस जेवला नाही. कारण त्यांना राजा बनणं म्हणजे काय, राजा आणि प्रजा हे काय नातं आहे हे त्यांना फार चांगलं माहीत होतं. ते फार चांगले शास्ते होते आणि त्यांना हे कळलं होतं. एकदम तीन दिवस औरंगजेब आणि खालचा बादशहा गलितगात्र झाला आणि जेवला नाही, हे लक्षात घेतलं पाहिजे. हे लिहिलंय बेंद्र्यांनी. फार मार्मिक आहे बेंद्र्यांचं लिखाण. त्यांनी पुरावे गोळा नीट केले; पण त्यांना लेखन सुंदर, नीटस नाही करता आलं; पण साधनं केवढी निर्माण केलीत. शेजवलकरांना आवाका खरा; परंतु साधनं याला जी उपलब्ध झाली, त्यानं गोळा केली ती फार महत्त्वाची. शेजवलकरांचा ग्रंथ एवढा मोठा प्रसिद्ध आहे.

**प्रश्न : पण शास्त्रीजी, या सगळ्या तुमच्या चर्चेतून मला असा एक मुद्दा सुचतो की, या राज्याच्या, राज्यप्रकारच्या पद्धती बदलत आल्या; पण हिंदुस्थानच्या बाबतीत मला असं वाटत की, लोकांच्या मनामध्ये जे एक स्वातंत्र्याचं बी रुजलं पाहिजे, ते रुजलेलंच नाही. कोणाची तरी कैद हवी आहे. म्हणजे त्याच्यापासून मोकळं होणं, आपला आपण विचार करणं हे नाही. मग तो छोटा नेता असू दे, धार्मिक पुढारी असू दे, एखाद्या देवानी ते बांधलेलं असू दे, मुक्त विचार करण्याची सबंध हिंदुस्थानात म्हणा, अगदी दक्षिणेपर्यंत तेच आहे. उत्तर हिंदुस्थानात म्हणा. उत्तर हिंदुस्थानात तर गोंधळच आहे; परंतु राजासाठी मी शिर कापून देईन वगैरे. म्हणजे कोणीतरी आपल्याला हा राजा असला पाहिजे ही एक जाण सबंध यामध्ये आहे, हा फार मोठा धोका आहे.**

**उत्तर :** आहे. डिप्रेस्ड कल्चरचं ते लक्षण आहे. आणि अगदी पारखून घेण्याची जी पद्धत, ती आपल्याकडे नाही. म्हणजे विनोबा भावे खाली आल्याबरोबर आचार्य अत्रे लोटांगण घालायला मोकळे. म्हणजे त्यांच्यासारखे मोठे, दान देणारे वगैरे वगैरे आणि तेच पुढे ‘विनोबा की वानरोबा’. म्हणजे ही जी असली प्रवृत्ती, म्हणजे गॉड मेकिंग ही आपली प्रवृत्ती आहे आणि साहित्यातही तीच प्रवृत्ती आहे. म्हणजे कुणातरी लेखकाला धरून बसलेली आहे आणि मग तेच लेखक चांगले, वाईट, अमूक-तमूक, सर्वंकष असं, एकाच माणसाचं काही चांगलं आणि काही वाईट असू शकतं ही स्वतंत्र प्रज्ञा अगर बुद्धी आहे. कुमार गंधर्वांचं गाणं म्हणजे ते अगदी उत्तमच असं राम पुजाऱ्यांनी म्हणायचं ही स्लेव्हिशनेस आहे. हे जे पारखणे आहे, ते आपण हरवून बसलेलो आहोत. हातकणंगलेकर हे माझे कितीही चांगले मित्र असले तरी समजा त्यांनी एक वाईट टीका

लेख लिहिला, तर नाही बुवा तुमचा मला लेख आवडला.

**प्रश्न : हाच एक प्रश्न मी इथे तयार केलेला आहे - अगोदर की, आपली जी संस्कृती आणि समाज आहे, त्याच्यामध्ये वैचारिक संगती ही वेगळ्या प्रकाराने समजावून घेण्याची आवश्यकता आहे का? म्हणजे ज्या तर्कशुद्ध पद्धतीनं आपण इतर संस्कृतींचा आणि तिथल्या वागण्याचा विचार करतो, त्यापेक्षा वेगळं असं काही आपल्याकडे गरजेचं आहे का?**

**उत्तर :** हो. प्रत्येक संस्कृतीमध्ये काही एक वेगळेपणा असतो आणि तो लक्षात घेऊनच त्याची मीमांसा करावी लागते. म्हणून संस्कृतिशास्त्रांमध्ये आपण म्हणता त्याप्रमाणे प्रत्येक संस्कृतीत एकंदर निर्मिती, विकास, अवनती ही निराळ्या पद्धतीने होते, असा एक संस्कृतिशास्त्रज्ञांचा वर्ग आहे. त्याच्यामध्ये हे तुमचं बसतं.

**प्रश्न : तरीदेखील आपण तर्काच्या आधारे विचार करताना संगती हा शब्द लावतो आणि मग ती प्रत्येक संस्कृतीतल्या माणसांची संगती अशीच आपण गृहीत धरतो; पण ते वेगळेपण आपण जे म्हणता, त्यामुळे संगतीचाही वेगवेगळा अर्थ लावावा लागतो का? दुसरे, आतापर्यंत आपलं जे विवेचन झालं, ते मला असं जाणवतं की ते अधिक तात्त्विक अशा पातळीवरच, आणखीन सगळं काही समजावून घेणार असं वाटलं, तर या अवस्थेमध्ये परिवर्तनाची काही एक गरज आहे, असं आजदेखील तुम्हाला वाटतं की नाही?**

**उत्तर :** फारच. परिवर्तन आपल्या समाजाचं अनेक अंगांनी व्हायला पाहिजे.

**प्रश्न : पण ते आपोआप होईल का?**

**उत्तर :** नाही प्रयत्न व्हायला पाहिजेत. वैचारिक क्रांतीची, प्रबोधनाची गरज आहे. प्रबोधनाचे प्रयत्न व्हायला पाहिजेत.

**प्रश्न : म्हणजे इतका आता रेनेसान्सच्या काळापासून प्रबोधनाचा प्रारंभ आणि सहा तरी शतक गेली तरीदेखील आपण अशा अवस्थेत आहोत की, प्रबोधनाची आणखीन गरज आहे...**

**उत्तर :** हो. युरोपची स्वतःची ती प्रेरणा आहे. युरोपने आपल्या परंपरेला धक्के दिले. तसे धक्के आपल्याला बसत राहिले पाहिजेत.

**(१९९२, प्रकाशन - 'उगवाई' (दिवाळी) १९९४)**

ooo

२१

# विश्वबंधु शास्त्रीजी

मुलाखतकार - **रामभाऊ जोशी**

नियंत्रण करणारी दिव्य जी शक्ती आहे, तिच्याबद्दल एक जाणीव आहे. सगळयांनाच ती असते असे नाही; पण ती माणसांना परंपरेनं जागृत केलेली, प्राप्त झालेली असते आणि तिच्यावर निरनिराळे वैचारिक संस्कार झालेले

विसाव्या शतकाने महाराष्ट्राला, किंबहुना संपूर्ण भारत देशाला सौजन्यमूर्ती सात्त्विक आणि शांततेचे महामेरू असे जे वंदनीय ज्ञानऋषी दिले त्यांमध्ये वाई क्षेत्रनिवासी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे अग्रनामांकित ज्ञान-महर्षिपद भूषविणारे व्यक्तिमत्त्व होय. निरनिराळ्या निमित्तांनी त्यांच्याशी माझा तीस-पस्तीस वर्षे संबंध येत राहिला. कुटुंबीय मंडळींप्रमाणे मीही त्यांना 'आबा' या नांवाने संबोधित असे.

आबांच्या भेटीगाठी वाई येथील त्यांच्या प्राज्ञपाठशाळेच्या वाड्यात व्हायच्या. केव्हाही गेले तरी 'सुरेख...वा...या....!' असे स्वागत व्हायचे. प्राज्ञपाठशाळेच्या वाड्यात आबांच्या बैठकीच्या दोन जागा होत्या. एक त्यांची आतील भागातील खासगी खोली आणि दुसरी मधल्या दालनातील अभ्यासिका भेटीगाठीची प्रशस्त जागा. खासगी खोलीत छोट्याशा मंचावर आबा लोडाला टेकून प्रसन्न मुद्रेने बसलेले असत. अंगावर शुभ्र खादीचा अंगरखा, जाकीट, डोक्यावर कडक घडीची टोपी, पांढरे स्वच्छ धोतर आणि चष्मा हा त्यांचा नित्याचा पोषाख शेजारी. एक-दोन ग्रंथ असायचेच. बैठकीच्या खोलीशेजारी स्वयंपाकगृह. स्वयंपाकगृहाच्या खिडकीतून कृष्णेच्या प्रशांत पात्राचे दर्शन सहज घडते. प्राज्ञपाठशाळेची प्रशस्त इमारत कृष्णा नदीच्या पात्रावर बांधलेल्या फरसबंद घाटाच्या सान्निध्यातच आहे. आबांचे वाचन, मनन, चिंतन कृष्णेच्या प्रशांत प्रवाहाकडे पहात पहात सुरू असावयाचे.

शास्त्री पंडित, विद्वान, सामान्यजन कार्यकर्ते, राजकीय नेते, साहित्यिक, विचारवंत, संशोधक यांचा त्यांच्याकडे नेहमीच राबता असे. कोणी चर्चेसाठी, सल्ला-मसलतीसाठी, शंका निवारण्यासाठी यायचे तर कोणी वेद, व्याकरण, न्याय, मीमांसा, उपनिषदे, यज्ञयाग, धार्मिक

कर्मकांड यांतील कूटस्थळांचा खुलासा करून घेण्यासाठी किंवा नेमका संदर्भ टिपून घेण्यासाठी येत असत. कोणीही येवो, आबांचे ज्ञानभांडार सदैव खुले राहिले. त्यांनी लहान-मोठा, विद्वान-अविद्वान, गरीब-श्रीमंत, जात-पात असा भेद कधी पाहिला नाही- दर्शविला नाही.

संस्कृत भाषेचे ते महापंडित होते. भारतीय वैदिक संस्कृतीचे श्रेष्ठ जाणकार होते. देशातील विद्वानांमधील ते श्रेष्ठ विद्वान होते. राजकारणातील पंतप्रधानांपासून तो मुख्यमंत्र्यांपर्यंत अनेकांची त्यांच्याकडे ये-जा होती. अनेक मान-सन्मान आपण होऊन त्यांच्यापर्यंत पोहोचले. त्यांनी ज्ञानाव्यतिरिक्त अन्य कशाचा हव्यास धरला नाही. त्यांनी कोणतीही विद्यापीठीय पदवी धारण केलेली नव्हती. परंतु पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ज्ञान-विज्ञानाचे महापंडित ही त्यांची प्रतिमा अन्य अनेक विद्यापीठीय पदव्यांच्या शिरोभागी तळपणारी अशी तेजस्वी ठरली. अशी सर्वांगीण गुणवत्ता असूनही त्यांनी तिचा कधी अहंकार दर्शविला नाही. किंवा विद्वत्तेच्या मोठेपणाचा गर्व त्यांना कधी स्पर्श करू शकला नाही. समाजात, सर्वसामान्यांत वावरताना त्यांचा हा निगर्वीपणा प्रकर्षाने जाणवत असे. त्यांच्या ठिकाणच्या जन्मजात सात्त्विकतेचा हा परिणाम असावा!

विद्वानांच्या, पंडितांच्या विचारांचा, मतांचा आदर करण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. मला आठवते, शास्त्रीजींचा नव्वदावा वर्धापनदिन प्राज्ञपाठशाळेत, वाई येथे साजरा झाला. म्हटलं तर तसा तो घरगुती समारंभ होता. ग्रामस्थ मंडळी शुभेच्छा व्यक्त करून, अभिष्टचिंतन करून जात होती. शास्त्रीजी सर्वांच्या शुभेच्छा स्वीकारून प्रत्येकाला पेढ्याची गोड भेट देत होते. सकाळी अकराच्या सुमारास पु.ल. देशपांडे आणि सातारा येथून प्रा. देवदत्त दाभोलकर प्राज्ञपाठशाळेत आले. प्रा. मे. पुं. रेगे यांनी त्यांचे स्वागत केले. शुभेच्छा, गुलाबाची फुले, पेढे यांची देवाण-घेवाण झाली आणि मग गप्पा सुरू झाल्या. हास्यविनोद झाले. पु.लं.च्या बैठकीत ते स्वाभाविकही होतं. पु.ल. आणि शास्त्रीजी यांच्यातील विनोदी जुगलबंदीने तो वाढदिवस भलताच रंगला.

मला आता पु.लं.चा तो प्रश्न नेमका आठवत नाही; पण गप्पा आणि हास्य-विनोदाच्या ओघात पु.लं.नी शास्त्रींच्या रोखाने एक कूट-प्रश्न खुलासा करून घेण्याच्या उद्देशाने फेकला. क्षणार्धात गप्पांचा ओघ गंभीर चर्चेत रूपांतरित झाला. शास्त्रचर्चा, धर्मचर्चा, वेदचर्चा, मीमांसा, पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्याचा दृष्टिकोन, प्राचीन आध्यात्मिक बैठक आणि अर्वाचीन वैज्ञानिक विचारसरणी, बुद्धिवाद, मानवतावाद इत्यादींचे विश्लेषण करीत असताना शास्त्रीजी आपले ज्ञानभांडार खुले करीत असल्याची प्रचिती मिळून गेली.

वस्तुतः पु.लं. नी एकच प्रश्न विचारला होता. त्याचे दोन-चार वाक्यांत उत्तर देणे शास्त्रीजींना सहज शक्य होते. तसे न करता त्या प्रश्नाच्या भोवती विविध प्रश्नांचा चक्रव्यूह शास्त्रीजींनी स्वतःच उत्तराच्या ओघात उभा केला आणि मग प्रत्येक प्रश्नाचा छेद करीत करीत मूळ प्रश्न पूर्णपणे निकाली काढून संपूर्ण चक्रव्यूहाचा यशस्वी भेद केला. महायुद्धातील चक्रव्यूहाचा भेद अर्जूनसारखा सिद्धहस्त योद्धा करू शकतो. ज्ञान-संग्रामातील चक्रव्यूहाचा भेद करावयाचा तर आयुष्याची दहा

दशके एकचित्त ज्ञानसाधना करणारे पारंगत, सिद्ध असे ज्ञानऋषी शास्त्रीजीच करू शकतात. ती ज्ञान-चर्चा मी श्रवण केली. पण या श्रवणभक्तीने माझ्या मनात काही प्रश्न निर्माण केले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या चौऱ्याण्णव वर्षांच्या सहवासाने, अनुभवाने आणि ज्ञानाने महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा समृद्ध झाली. माझ्यासारख्या पत्रकाराला त्यांच्या सहवासाचा आणि बैठकीतील चर्चेचा, मार्गदर्शनाचा लाभ घडला. भारतीय ज्ञानपरंपरेसोबतच आधुनिकता, प्रागतिकता आणि ज्ञानाच्या पाश्चात्त्य परंपरेच्या परिघातील त्यांचे अत्युच्च स्थान हा त्यांच्या आदर्श व्यक्तिमत्त्वातील विशेष सर्वांनाच प्रकर्षाने जाणवत राहिला.

नव्वदाव्या वाढदिवशीची ज्ञान-चर्चा श्रवण केल्यावर माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झाले हे खरे; पण त्यावर मी विचारपूर्वक ठरविले की, तर्कतीर्थांची दहा दशकांची जीवनाची जी वाटचाल झाली त्यातील महत्त्वाच्या टप्प्यांबाबत त्यांचे मनोगत त्यांच्याकडून ऐकावे. आयुष्याची नऊ दशके त्यांनी पूर्ण केली होती. दहाव्या दशकाची अर्धी वाटचाल पूर्ण होत असतानाच नियतीने त्यांच्या वाटचालीचा मार्ग बदलला. परलोकच्या मार्गाने नियती त्यांना घेऊन गेली. पण त्यापूर्वी त्यांचे मनोगत ऐकण्याचा योगायोग जमून आला.

या ज्ञान-ऋषीला मी भेटलो, चर्चा केली आणि व्यक्त केलेले मनोगत ऐकले. त्यावेळी एका क्षणी मला असे जाणवले की, या ज्ञानमहर्षीला आपल्या आयुष्याची संध्याकाळ जवळ आली आहे याची चाहूल लागली असावी.... ''माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी मी एक चांगली घटना पहातो आहे. तिसरे महायुद्ध म्हणजे अणुयुद्ध पडून विश्वविनाशाचे भय आता राहिलेले नाही ही फार चांगली घटना आहे. मनुष्यजातीला भव्य भवितव्य आहे आणि मानवी बंधुत्वाचे नवे युग अवतरत आहे याचे दर्शन मला होत आहे. त्यामुळे मला मानवी विश्वाच्या भावी स्वास्थ्याचे दर्शन घडत आहे. जी राष्ट्रे आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेली आहेत त्यांना उच्च दर्जाची अर्थव्यवस्था आणि बौद्धिक संस्कृती यांचा लाभ होऊ शकेल असे भवितव्य दूर नाही असा अंदाज येत आहे'' असं एक उज्वल आशादायी भवितव्याचं चित्र मनःचक्षूंसमोर दिसत असल्याचं तर्कतीर्थांनी सांगितलं.

शास्त्रीजींच्या आयुष्यातील पहिली पाच दशके पारतंत्र्याची आणि त्यापुढील चार दशके स्वातंत्र्याची आहेत. स्वातंत्र्याचे पाचवे दशक ते पूर्ण उपभोगू शकले नाहीत. तरीपण या दोन कालखंडांतील पहिली दोन दशके किंवा थोडी अधिक वर्षे त्यांनी वेद, उपनिषदे, न्याय, मीमांसा, व्याकरण यांच्या अध्ययनात व्यतीत केली. तिसऱ्या दशकापासून ते महात्मा गांधींच्या विचारांचे पुरस्कर्ते बनलेले व त्यांच्या सहवासात त्यांचे सल्लागार म्हणून वावरलेले दिसतात. चौथ्या दशकात त्यांच्यावर एम.एन. रॉय यांच्या विचाराचा आणि त्याच सुमारास मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा पगडा निर्माण झालेला आढळतो.

अध्यात्मापासून आधिभौतिक विचारसरणीपर्यंतच्या त्यांच्या या नव्वद वर्षांच्या प्रवासाबाबत त्यांचे जे चिंतन आहे आणि मनोगत म्हणून त्यांनी जे व्यक्त केले ते विसाव्या शतकाच्या संपूर्ण

कालखंडावर प्रकाश टाकणारे आहे.

मनोगत व्यक्त करताना ते सांगतात की, ''माझे मी भाग्य समजतो की, विसाव्या शतकात मोठमोठ्या राजकीय उलथापालथी झाल्या. त्यामुळे समाजवादी क्रांतीमुळे मानवसमाजाला एका उच्च दर्जाच्या समतेच्या युगात प्रवेश करता येईल, अशी अपेक्षा होती ती निष्फळ ठरली. तरीपण सोविएत युनियन आणि अमेरिका या दोन वरिष्ठ सत्तांचा संघर्ष आता एकदम कमी झाला आहे. सोविएत युनियनने विश्वव्यापी अणुयुद्धाची तयारी ठेवली. परंतु विश्वव्यापी क्रांतीपासून ती दूर गेली. सोविएत युनियनमध्ये जो नवा नेता निर्माण झाला तो तथाकथित भांडवलशाही राष्ट्राला देखील आणि अमेरिकेला देखील मान्य झालेला जगाचा नेता होय. म्हणून आता तिसरे महायुद्ध म्हणजे अणुयुद्ध घडून विश्वविनाशाचे भय राहिलेले नाही. ही फार चांगली घटना माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी मी पहात आहे.''

''भारत स्वतंत्र झाला त्याबरोबर जगातील शंभरापेक्षा अधिक राष्ट्रे पश्चिमी साम्राज्यशाहीच्या बंधनातून मुक्त झाली. वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षांपर्यंत ही पश्चिमी साम्राज्यशाहीची समाप्ती स्पष्ट दिसत नव्हती. ती दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस हळूहळू स्पष्ट झाली.''

''मी दोन महायुद्धे पाहिली. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी जगातील राजकीय तत्त्वचिंतकांना आधुनिक, वैज्ञानिक क्रांतीपासून जग हे सुवर्ण युगात जाईल, अशी अपेक्षा होती. परंतु त्या बाबतीत निराशा झाली.

''दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर जगामध्ये, विशेषतः युरोपमध्ये डावी हुकूमशाही रशियन राज्यक्रांती होऊन लेनिनने निर्माण केलेली. रशियन क्रांती आणि १९३० नंतर जर्मनीत व इटलीत उजवी हुकूमशाही अस्तित्वात आली. संसदीय लोकशाहीविरोधी आणि मूलभूत मानवी मूल्याच्या विरोधी असे हे मानवाला पारतंत्र्यात टाकणारे दोन हुकूमशाहीचे प्रवाह अस्तित्वात आले. स्टॅलिन डाव्या हुकूमशाहीचे प्रतीक तर हिटलर उजव्या हुकूमशाहीचे प्रतीक मूलभूत मानवी मूल्यांना हे दोन्ही धोके होते.

''दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी हे दोन्ही धोके कमी झाले. परंतु विश्वव्यापी अणुयुद्धाचा धोका उभा राहिला. त्या धोक्यातून जग हळूहळू बाहेर पडत आहे. रशिया आणि अमेरिका यांचे संयुक्त नेतृत्व उदयाला येत आहे. त्यामुळे जग निर्भय बनू शकते असे दिसते. माझ्या आयुष्यातील दोन प्रदीर्घ कालखंडांची मीमांसा मी अशी करीन.''

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीचा ज्ञान-पिंड रुजला, अंकुरला आणि बहरला तो प्राज्ञपाठशाळेच्या पवित्र भूमीत आणि ज्ञानयोगी स्वामी केवलानंद यांच्या सान्निध्यात, मार्गदर्शनाखाली होय. वेद, उपनिषदे, न्याय, वेदान्त, भगवद्गीता, मीमांसा आदी आध्यात्मिक विषयांचे त्यांचे अध्ययन प्राज्ञपाठशाळेत केवलानंदांच्या सान्निध्यातच झाले. त्यामुळे शास्त्रीजी हे अध्यात्मवादी मानले जाणे स्वाभाविक ठरते. परंतु धार्मिक रूढी, समाजजीवन, जातपात, वर्णव्यवस्था, अज्ञान, दारिद्र्य, संस्कृती, दैववाद अशांसारख्या काही विषयांवरील शास्त्रीजींची आधिभौतिक

विचारसरणी ऐकत असताना सर्वसामान्यांच्या मनामध्ये गोंधळ निर्माण होत असे की शास्त्रीजी हे अध्यात्मवादी की भौतिकवादी? लोकांच्या मनांतील या शंकेबद्दल अगदी सुस्पष्ट खुलासा त्यांनी केला की, ''सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींचा आधार भारतीय अध्यात्मवाद हा आहे. उपनिषदे आणि भगवद्गीता यांच्या अध्ययनाने हा विचार दृढ होऊ शकतो. ते अध्ययन मी केलेले असल्याने त्या विचारानुसार आचरण करण्याचा प्रयत्न केला. यातही महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींची सांगड व्हायला पाहिजे ही गोष्ट प्राज्ञपाठशाळेच्या वातावरणात महत्त्वाची ठरली आहे. महत्त्वाची मानली गेली आहे. या वातावरणात मी वाढलो आहे. मी पूर्ण भौतिकवादी कधीच झालो नाही. भौतिकवाद हा माणसाच्या आर्थिक परिवर्तनाचा आधार म्हणून स्वीकारला पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या आधाराने संबंध सामाजिक जीवन बदलता येते. तेव्हा मृत्यूनंतर काय होईल हा जो अध्यात्मवादाचा भाग, त्याच्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. माणसाचे ऐहिक, सामाजिक जीवन समृद्ध केले पाहिजे हा जो मार्क्सचा सिद्धान्त आहे तो त्याचा दृष्टिकोन, मार्क्सवादाच्या प्रभावाखाली मी बाळगला. सर्व मानवजातीची एकता स्थापन होऊन राष्ट्रा-राष्ट्रांतील संघर्ष मिटणे आणि मानवजातीमध्ये विश्वव्यापी बंधुतेची स्थापना करणे हे माणसाचे वरिष्ठ कर्तव्य आहे. मग तुम्ही भौतिकवाद स्वीकारा अथवा अध्यात्मवाद स्वीकारा, हे मान्यच करावे लागते.''

''हिंदुधर्मातील अध्यात्मवादाच्या, नीतिशास्त्राच्या दृष्टीने अस्पृश्यतानिवारणाची चळवळ ही अत्यंत समर्थनीय आहे असा विचार मी महात्मा गांधींना सांगितला. जातिभेद नष्ट करणे हे हिंदुधर्म तत्त्वज्ञानाशी सुसंगत असेच आहे. जातिभेद हा नष्ट करायलाच पाहिजे. हिंदुधर्मशास्त्रविषयक माझे विवेचन महात्मा गांधींना मान्य होते. त्यामुळे त्यांनी मला अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीत भाग घेण्यासाठी या देशातील निरनिराळ्या भागांत पाठविले.''

''महात्मा गांधींच्या सहवासात मी वावरलो, त्यांच्या काही विचाराची सोबत केली हे सर्व खरे; परंतु मला हेही मान्य केले पाहिजे की, महात्माजींच्या सर्वच विचारांना आणि आचारांना मी स्वतःला बंदिस्त करून घेऊ शकलो नाही. अहिंसावादी गांधी सान्निध्यात मी माझ्या वयाच्या १७ व्या वर्षापासून आलो. विनोबा भावे यांनी गांधींच्या अहिंसाधिष्ठित राजकारणाचा विचार शिकविला. म. गांधी यांच्या अहिंसावादी राजकारणावर विनोबा भावे यांची अपार श्रद्धा होती. तशी श्रद्धा माझ्या ठिकाणी निर्माण होऊ शकली नाही. व्यवहार म्हणून अहिंसावादी राजकारण योग्य होय असे माझे मत बनले. देशात त्याकाळी सशस्त्र क्रांतिकारकही उठाव करीत होते. परंतु सशस्त्र क्रांतीने भारत कधी स्वतंत्र होईल असे मला वाटले नाही. सशस्त्र क्रांतिकारकांबद्दल मनात आदर मात्र होता. कारण त्यांच्या ठिकाणी उदात्त अशी आत्मयज्ञाची प्रवृत्ती होती.''

"यामध्ये आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला महत्त्वाचा वाटतो. तो असा की, महात्मा गांधींच्या ध्येयवादात, बहुजनसमाजातील भयानक दारिद्र्य घालविण्याचा उपाय मीमांसला नव्हता. भारताच्या स्वातंत्र्याबरोबर भारतीय समाजातील बहुजनसमाजाचे दारिद्र्य नष्ट करण्यासाठी

सामाजिक क्रांती घडून आणण्याची गरज होतीच. गांधींच्या ध्येयवादात, चळवळीत आर्थिक विषयाला प्राधान्य मिळून काही आर्थिक उलथापालथ पडण्याची चिन्हे मला दिसत नव्हती.''

''परंतु समाजवादी विचारसरणीच्या अभ्यासातून आणि अध्ययनातून मानवी इतिहासाची भौतिक वा आर्थिक उपपत्ती मार्क्सच्या सिद्धान्ताप्रमाणे चांगली करता येते हे मला पटले. मार्क्सवादी विचारसरणीचा खोल प्रभाव माझ्यावर पडू लागला. दारिद्र्य नष्ट होण्यासाठी समाजवादी क्रांती व्हायला पाहिजे असा एम.एन. रॉय यांचा विचार होता. त्या विचाराचाही माझ्यावर प्रभाव पडला. म. गांधी, मार्क्स, एम.एन. रॉय अशा विविध विचारप्रणालींचा मी अभ्यास केला. त्या विचारांशी निगडित राहिलो. भौतिकवाद स्वीकारला परंतु मूळ अध्यात्मवादाची सोबत निरंतर बाळगली. जातिभेद नष्ट व्हावा आणि ऐहिक, सामाजिक जीवन समृद्ध बनलेले पहावयास मिळावे हे उद्दिष्ट समोर ठेवून समाजपरिवर्तन घडवून आणण्याच्या भूमिकेतून मी माझ्या शक्ती, बुद्धीनुसार सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.''

आयुष्याची नव्वदी ओलांडलेल्या आबांशी त्यांच्या खासगी बैठकीच्या खोलीत मी संवाद करीत होतो. त्यांच्या दैनंदिन जीवनक्रमात कसला खंड नव्हता. नित्य योगसाधना, मानसपूजा, पहाटेच्या प्रशांत वेळी स्वच्छ हवेतील फेरफटका येथपासून त्यांच्या दिनक्रमाचा प्रारंभ व्हायचा. नंतर मग आल्या-गेल्याशी संवाद, प्राज्ञपाठशाळा, विश्वकोशाचे काम, धर्मकोशाचे काम, अभ्यागतांशी विचारविनिमय, संशोधित टिपणाची तपासणी, सूचना, समारंभ त्यासाठी दूरदूरचे प्रयास हे सर्व सुरू असायचे.

शताब्दीच्या जवळपास पोहोचलेल्या अशा या श्रेष्ठ समाजसुधारक, प्रबोधनकार, ज्ञानऋषीच्या ठिकाणचा उदंड उत्साह, स्मृतीचा मौलिक साठा आणि सुसूत्र मांडणी हे सारे थक्क करणारे होते. परंतु ''हे सर्व तुम्ही कसे साध्य केले? या वयातही तुमची बैठक पक्की असून चर्चा-संवाद, लेखन, भाषण, प्रवास सर्व काही उत्साहाने सुरू आहे.'' असे मी त्यांना विचारले नाही.

नव्वदाहून अधिक पावसाळे ओलांडलेल्या या चतुर ज्ञानी पुरुषाने मला काय म्हणायचंय ते ओळखले असावे. मला मध्येच थांबवून म्हणाले, ''खरं आहे तुम्ही म्हणता ते. बऱ्याच जणांना याबद्दल अचंबा वाटतो. तो साहजिक आहे. मला तसा अचंबा वगैरे काही वाटत नाही. असं पहा, वटवृक्ष असतो. तो जसा जसा दीर्घायुषी होत जातो त्या प्रमाणात त्याच्या पारंब्या पृथ्वीकडे झेपावतात. मूळ धरतात. तो सबंध वृक्ष प्रचंड डेरेदार बनतो. पण त्यांला स्वतःला त्याचा कधी अचंबा वाटला आहे का?''

''वटवृक्षाशी मी माझी तुलना करणे बरोबर नाही. कारण मी वटवृक्ष आहे का आणखी कोणी हे मला माहिती नाही. पण एक गोष्ट खरी की, माझं लहानसं बीज जीवनबीज म्हणा अगर ज्ञान-बीज म्हणा माझे गुरू स्वामी केवलानंद यांनी या वाईक्षेत्रीच्या भूमीत, प्राज्ञपाठशाळेत रुजवलं. इथेच ते अंकुरलं. निसर्गनियमानुसार ते वाढीस लागलं. सर्वांगीण वाढीची जिम्मेदारी सहधर्मचारिणी-पत्नी सत्यवती यांनी स्वीकारली. अर्धशतकाहून अधिक काळ त्यांनी माझी

जोपासना तर केलीच शिवाय सातत्याने प्रेरणा दिली. पत्नी सत्यवती यांचा विशेष उल्लेख मी यासाठी करतो की, आमच्या संसाराचा बावन्न वर्षांचा प्रवास सहधर्मचारिणी आणि सहविचारी असा झाला. धर्म, सामाजिक सुधारणा, जातीयता यासंबंधी जे माझे विचार होते, कृती होती तसेच सत्यवतींनी जाणीवपूर्वक केले. १९७८ मध्ये त्या गेल्या. देहाने आज त्या दिसत नाहीत. परंतु त्यांच्या विचारातील आणि कृतीतील शाश्वत दिव्यत्व प्रसन्नपणे माझ्या मनःचक्षुंसमोर उभे असते. त्यांची ती प्रसन्न मूर्ती मला माझ्या कामासाठी उदंड उत्साह देत असते.''

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात शास्त्रीजींच्या निखळ सूत्रबद्ध वाणीतून संपूर्ण विसाव्या शतकातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक, नैतिक, सांस्कृतिक, बौद्धिक उलथापालथीचा, देशातील आणि जगातील राष्ट्रा-राष्ट्रांतील घटनांचा मागोवा ऐकण्याची संधी या संवादातून मला मिळाली. विसाव्या शतकाच्या इतिहासाचे साथीदार आणि साक्षीदार असलेले शास्त्रीजी या शतकात त्यांनी जे पाहिले, अनुभवले, घडविले त्याचा निष्कर्ष म्हणून काय मत व्यक्त करतात ते ऐकण्यास मी उत्सुक असतानाच अंतःस्फूर्तीने ते म्हणाले-

''विसाव्या शतकात घडायचे ते घडून गेले. परंतु आता सगळी मानवजात ही सुसंवादी आणि संघर्षरहित अशा राजकीय जीवनामध्ये बांधली गेली पाहिजे हा विचार बळावत आहे. अशा तऱ्हेचा काळ जवळ येत चालला आहे. जगात नांदायचे तर विश्वबंधुत्वाच्या नात्याने, भावनेनेच वागावे लागेल. 'माणूस' बनून मानवतावादाची जोपासना करा असा विसाव्या शतकानं जगाला घालून दिलेला धडा आहे. त्याचं भान ठेवावं लागेल.''

संवाद आवरता घेणं आवश्यक होतं. कारण त्यांना पुण्याला आणि दुसऱ्या दिवशी आळंदी येथे कार्यक्रमासाठी पोहोचावयाचे होते. आळंदीपर्यंत मी त्यांची सोबत केली. आळंदीत पोहोचल्यावर शास्त्रीजींना श्रीज्ञानेश्वरांच्या दर्शनासाठी तेथील मंडळींनी नेले. शास्त्रीजींनी तेथे समाधीची पंचामृत पूजा केली. शांतपणे नमस्कार केला. प्रसाद घेतला. आळंदी संस्थानच्या कार्यालयात आम्ही येऊन बसलो. श्रीज्ञानेश्वरांच्या समाधी मंदिराकडे पहात शास्त्रीजी म्हणाले, ''माझ्या आयुष्यातील आजची ही सकाळ मोठी प्रसन्न आहे.''

वाईतील शास्त्रीजी, तर्कतीर्थ शास्त्रीजी, बुद्धिवादी शास्त्रीजी आणि आळंदीतील शास्त्रीजी मला एक वेगळंच दर्शन घडून गेलं!!

मनुष्यजातीला भव्य भवितव्य आहे. मानवी बंधुत्वाचे नवे युग अवतरत आहे. मला मानवी विश्वाच्या भावी स्वास्थ्याचे दर्शन घडत आहे. माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी, मी ही एक चांगली घटना पहात आहे... शास्त्रीजी

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, जन्मशताब्दी विशेषांक, कार्यकारी संपा. यशवंत कळमकर, प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, २३ जानेवारी, २००१)**

ooo

*

(क)

# व्यक्ती व विचार

*

# लोकमान्य टिळक

*

२२

# लोकमान्य टिळक : लोकशाहीचा खंबीर पुरस्कर्ता

मुलाखतकार - **अनिल जोशी**

**प्रश्न : लोकमान्य टिळकांची स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, ही घोषणा प्रसिद्धच आहे. तेव्हा स्वराज्य शब्दाच्या अर्थामध्ये परकीयांचे राज्य नको हे गर्भित आहेच; परंतु स्वतःचे म्हणजे एखाद्या भारतीय राजाचे राज्य असाही अर्थ त्यांच्या मनात असावा काय? किंवा हिंदूंचे राज्य असा अर्थ असेल काय? का स्वतः म्हणजे सर्व भारतीय जनता व तिचे राज्य म्हणजे भारतीय लोकशाही असाच अर्थ आहे काय? स्वराज्य शब्दाचा अगदी स्पष्ट अर्थ म्हणजे भारतीय लोकशाही, दुसरा कसलाही नाही, असे लोकमान्यांच्या लेखांवरून निश्चित होते काय?**

**उत्तर :** 'स्वराज्य' म्हणजे भारतीय लोकशाहीच ! स्वदेशी राजांचे किंवा हिंदूंचे राज्य असा अर्थ त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही. जीवनभर त्यांचा सर्व प्रयत्न लोकशाहीकरिताच होता. गोऱ्या लोकांचे राज्य गेले म्हणजे सर्व पावले असे त्यांना कधीही वाटले नाही. बरेच ब्राह्मणेतर पुढारी व बरेच मुसलमान पुढारी इंग्रज सरकारला विनवीत असत की, स्वराज्याचे हक्क दिल्याने आमच्या जमातीची कुचंबणा होईल. स्वराज्य म्हणजे सर्व जाती-जमातींची समान राजकीय सत्ता असाच अर्थ पटवून देण्यात टिळकांचा जन्म गेला. तुम्ही अशी शंका का विचारता, तेच मला समजत नाही.

**प्रश्न : हिंदू-मुसलमानांचा विग्रह टिळकांच्या काळी सारखा विकोपास जात होता. अशा वेळी टिळकांनी हिंदूंची बाजू फार उचलून धरली आहे. मुसलमानांना जवळ करण्याचा त्यांनी लखनौ कराराच्या रूपाने प्रयत्न केला हे खरे आहे; परंतु त्यात त्यांची कल्पना अशी असावी की, मुसलमान स्वराज्य मागत नाहीत. केवळ हिंदूंचीच स्वराज्याची मागणी आहे. म्हणून भारताला स्वराज्य कसे देता येईल, असे इंग्रज म्हणत होते. इंग्रजांच्या या आरोपाला उत्तर म्हणून टिळकांनी मुसलमानांना जवळ करण्याचा प्रयत्न**

**केला असे का म्हणू नये.**

**उत्तर :** महाराष्ट्राबाहेर तुमच्या प्रश्नात सूचित असलेला गैरसमज पुष्कळ विचारवंतांमध्ये स्पष्ट किंवा अस्पष्ट स्वरूपात प्रसृत झालेला दिसतो. ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. टिळक जातीयवादी कधीच नव्हते. हिंदू-मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी भेद स्वराज्याच्या आड येऊ नयेत या तळमळीने ते प्रयत्न करीत होते; परंतु त्यांचे बरेचसे लेखन मराठीतच उपलब्ध असल्याने महाराष्ट्राच्या बाहेर त्यांच्यासंबंधी विनाकारण गैरसमज राहिलेले आहेत. ही एक भारताच्या इतिहासातील खेदजनक कथा आहे. लोकमान्यांची हिंदू-मुसलमानांवरील भाषणे व विशेषत: लेख या प्रश्नावर विदारक प्रकाश टाकतात. हिंदू-मुसलमानांचे दंगे वारंवार का होतात व का व्हावेत, याची लोकमान्यांनी केलेली मीमांसा फार उद्बोधक आहे. या मीमांसेवरून लोकमान्यांची जातिधर्मभेदनिरपेक्ष लोकशाहीवरची निष्ठा स्पष्ट लक्षात येते.

**प्रश्न : भारतीय लोकशाहीच्या ध्येयावर लोकमान्यांची अपार निष्ठा होती, असे आपण म्हणता व ते खरे आहे. कारण लोकमान्यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांची मनधरणी करण्याच्या नेमस्त पक्षांच्या नीतीला कडाडून विरोध केला आणि लोकजागृतीचाच मार्ग अनुसरला. आपण एकदा लो. टिळकांवर बोलत होतो तेव्हा असे विधान केले होते की, या देशात विचार व आचार यांची सांगड घालणारे किंवा तात्त्विक विचारसरणीची प्रयत्नवादाला जोड देणारे पहिले क्रियावान पंडित टिळक हेच होते. नेमस्तपक्षीय पुढारी लोकजागृतीपेक्षा म्हणजे लोकशिक्षणापेक्षा ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मनधरणीचाच प्रयत्न महत्त्वाचा मानीत होते. लोकजागृतीच्या प्रयत्नाने टिळकांच्या मनात स्वराज्याची प्रेरणा निर्माण करण्याचा उद्देश होता यात शंका नाही. म्हणूनच त्यांच्यावर अनेक वेळा कारागृहवास पत्करण्याची पाळी आली. हे सर्व खरे असले तरी टिळकांनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीस विरोध का केला? सामाजिक सुधारणा लोकशाहीला उपकारकच असते ना?**

**उत्तर :** यासंबंधी लोकमान्य टिळकांचा दृष्टिकोन असा होता की, सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर दिल्यास सनातनी व सुधारक असे तट प्रत्येक जमातीत पडतील व त्यामुळे स्वराज्याच्या प्रयत्नाकरिता आवश्यक असलेली जनतेची एकजूट किंवा प्रचंड फळी उभी राहणार नाही. सामाजिक सुधारणेची तत्त्वे त्यांना मान्य होतीच व सामाजिक सुधारणा लोक राजकीय सत्ता हातात आल्यास आपोआपच करू लागतील. आधी स्वराज्य व नंतर सामाजिक सुधारणेची चळवळ असा क्रम त्यांनी सांगितला होता.

**प्रश्न : भारतीय लोकशाही स्थापन होऊन पंचवीस वर्षे झाली. या लोकशाहीच्या संदर्भात असा प्रश्न उपस्थित होतो की, जे आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रश्न पारतंत्र्यात उत्पन्न होते व जे प्रश्न सोडविण्याकरिता स्वराज्याची गरज आहे असे टिळकांनी म्हटले**

**होते ते कोणते प्रश्न होते? व त्यांची सोडवणूक करण्याकरिता आवश्यक असलेला कार्यक्रम टिळकांनी आपल्या लिखाणामध्ये सांगितला आहे काय?**

**उत्तर :** 'काँग्रेसमधील लोकशाही पक्षाचे धोरण' (केसरी, २ एप्रिल १९२०) या लेखात लोकमान्यांनी लोकशाही पक्षाचा जो कार्यक्रम दिला आहे, त्यावरून आपणास लक्षात येते की, आज जे जे आर्थिक, शैक्षणिक व राजकीय प्रश्न आपल्या देशापुढे आहेत, त्यातील बरेचसे प्रश्न लोकमान्यांच्याही डोळ्यांसमोर होते. 'गरिबी हटाव' हे आजचे जे ब्रीदवाक्य आहे, त्या ब्रीदवाक्याची सर्व पार्श्वभूमी टिळकांनी शेकडो लेखांत प्रतिपादिली आहे. किंबहुना हे ब्रीदवाक्य हा टिळकांच्या या शेकडो लेखांचा प्रतिध्वनी होय. शेती-सुधारणा केल्याशिवाय व शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर केल्याशिवाय भारताचा आर्थिक उत्कर्ष होऊ शकणार नाही, असे टिळकांनी अगणित वेळा सांगितले आहे. आधुनिक उद्योगधंद्यांची उभारणी केल्यानेच भारताला समृद्धियुगाचा पाया घालता येईल, ही गोष्ट टिळकांनी अनंत वेळा बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक शिक्षणाच्या बाबतीत टिळकांनी तरुणांपुढे जे स्वावलंबनाचे ध्येय ठेवले होते ते गाठण्याकरिता आपल्याला अपरंपार प्रयत्न करावे लागतील. टिळकांनी त्यासंबंधी जे जे लिहिले ते सर्व आजही अनुकरणीय आहे. सहकारी चळवळ व ग्रामपंचायत यांना टिळकांनी फार महत्त्व दिले आहे. भारत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावयास पाहिजे, असेही टिळकांनी आग्रहपूर्वक मांडले आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीचे ते खऱ्या अर्थाने प्रवर्तक ठरतात.

**(केसरी, २९ जुलै, १९७३)**

❍❍❍

२३

# लोकमान्य टिळकांची वाङ्मयीन महात्मता

मुलाखतकार - **अनिल जोशी**

**प्रश्न : महाराष्ट्राच्या किंवा भारताच्या राजकीय नेत्यांमध्ये लो. टिळक यांचे स्थान वरच्या पातळीवर असलेल्या महापुरुषांमध्ये आहे ही गोष्ट आता आधुनिक भारताच्या इतिहासाला पूर्णतया मान्य आहे; परंतु मला एक निराळाच प्रश्न, अगदी अनपेक्षित प्रश्न आपणास विचारावयाचा आहे. साहित्यकार या नात्याने टिळकांच्या लेखनाचे मूल्यमापन काय होऊ शकते? कविता, कादंबरी, लघुकथा, नाटक आदी ललित साहित्य प्रकारांमध्ये अंतर्भूत होईल असे साहित्य त्यांनी लिहिले नाही हे उघड आहे. त्यांचे सहकारी व अनुयायी म्हणून चार व्यक्तींची नावे मराठी साहित्यात तळपून गेली आहेत व काहींची अद्याप तळपत आहेत. कै. शिवराम महादेव परांजपे हे उत्कृष्ट वक्ते आणि उपरोधिक पद्धतीने मार्मिक टीकानिबंध लिहिणारे म्हणून खूप नावाजले गेले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तर कवी, आत्मचरित्रकार म्हणून मराठी साहित्यात अढळ स्थान मिळविले आहे. कै. न. चिं. केळकर हे सव्यसाची लेखक म्हणून गाजले; परंतु त्यापेक्षाही साहित्यमीमांसक म्हणून अजूनही त्यांचे नाव अगत्याने घेतले जाते. कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी नाटककार म्हणून उत्तुंग यश मिळविले. असे थोर सहकारी व अनुयायी ज्यांना लाभले त्या लोकमान्यांचे साहित्यकार या नात्याने काय मूल्यमापन होऊ शकते? तसे कोणी केल्याचे दिसत नाही.**

**उत्तर :** मी स्वतः तयार केलेल्या त्यांच्या निवडक लेखांचा संग्रह दिल्लीच्या साहित्य अकादमीने प्रसिद्ध केला आहे. त्याच्या प्रस्तावनेत लोकमान्य टिळकांच्या साहित्याची वाङ्मयीन महात्मता अगदी संक्षेपाने मी निदर्शनास आणली आहे. लोकमान्य टिळकांच्या कृतीने म्हणजेच त्यागाने भारत राष्ट्र जागे झाले असे म्हणतात आणि ते खरेही आहे; परंतु केवळ त्यांची त्यागमय कृती भारताच्या जागृतीला पुरी पडली नसती. त्यांची प्रतिभासंपन्न व विचारघन तेजस्वी लेखणी

हे एक विलक्षण अमोघ शस्त्र होते. त्यात विलक्षण प्रवर्तकता होती. हे झोपी गेलेले राष्ट्र जागे होऊन उभे राहिले, याचे कारण लोकमान्यांच्या त्यागमय कृतीला विलक्षण ताकद असलेल्या साहित्याची जोड मिळाली. त्यांच्या साहित्याच्या मुळाशी वाङ्मयीन महात्मता होती असे मी जे म्हणतो त्याचे स्पष्टीकरण असे आहे. वाङ्मयीन महात्मता ही शब्दावली महाराष्ट्रातील नवकाव्याचे मुख्य प्रवर्तक बा. सी. मर्ढेकर यांनी पहिल्यांदा वापरली आहे. हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सौंदर्यतत्त्वज्ञ व समीक्षक होते. त्यांनी काव्यसमीक्षेच्या निकषांमध्ये वाङ्मयीन महात्मता हा काव्याचा एक मुख्य निकष सांगितला आहे. हा निकष म्हणजे अनुभूतीची शुद्ध निष्ठा होय. वैचारिक साहित्यालासुद्धा कित्येकदा कलात्मकता किंवा सौंदर्य येते हे अनुभूतीच्या शुद्ध निष्ठेमुळेच. विशेषतः विविध राजकीय व सामाजिक विचार हा व्यापक अनुभवांच्या आधारेच निर्माण होत असतो. हा अनुभवांचा आधार आणि विचार जेव्हा एकरूप झालेले असतात व त्यातून जे लेखन तयार होते तेव्हा त्याला कलात्मकता अवश्यमेव येते, असे आधुनिक काव्यसमीक्षकही प्रतिपादितात. टिळकांच्या 'केसरी'तील लेखसंभाराला व 'गीतारहस्या'ला कलात्मक साहित्याची महत्ता प्राप्त झाली आहे हे नाकारणे म्हणजे प्रज्ञेचे सौंदर्य नाकारणे होय. प्रज्ञेमध्ये सत्य आणि सौंदर्य यांची एकात्मता असते.

**प्रश्न : टिळकांचे साहित्य हे कलात्मक आहे असे आपण म्हणता; परंतु त्यात तार्किक मीमांसा फार आहे. साधकबाधक चर्चा आहे. तो नुसता भावनांचा आविष्कार नाही. खऱ्याखुऱ्या भावनांचा आविष्कार म्हणजेच कला होय. कलात्मक सौंदर्य ही त्यातील एक गौण गोष्ट आहे, असे म्हणता येईल. टिळकांनी लोकांचा विचार जागृत केला तो केवळ गणितातल्या वा विज्ञानातल्या विचारांसारखा भावनारहित शुद्ध विचार नव्हता. भारतीय माणसाच्या जीवनातले जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्याकरिता मांडलेला तो विचार असल्यामुळे त्यांना भावनांचा रंग असणारच यात शंका नाही; परंतु भावनांना त्यात दुय्यम स्थान आहे. म्हणून त्यातील कलात्मकता दुय्यम आहे असे म्हणता येईल काय?**

**उत्तर :** तुमचा आक्षेप दिसायला सरळ वाटावा असा आहे; परंतु जरा खोलवर जाऊन विचार करा. भारतीय माणसाच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे, मौलिक जिव्हाळ्याचे प्रश्न राजकीय पारतंत्र्याच्या पार्श्वभूमीवर उत्पन्न झालेले लक्षात घेऊन जेव्हा लो. टिळक विचार मांडतात, सोपपत्तिक मांडणी करतात, साधकबाधक खंडण-मंडण करतात तेव्हा हे लक्षात घेतले पाहिजे की, या विचारांचे अधिष्ठान भारतीय मानवांचे जीवन आहे. जीवन भावनामय असते. त्यामुळे माणसांच्या सुखदुःखाचे प्रश्न म्हणजेच मूलभूत भावनांचे प्रश्न! या भावनात्मक अनुभवांवरच साधकबाधक विचार निर्माण झालेला असतो. भावनांचा आणि विचारांचा कार्यकारणभावात्मक संबंध असतो. त्यात एक प्रकारचा एकजीवपणा असतो. हीच अनुभूतीची निष्ठा होय. त्यामुळे ही निष्ठा ज्या ठिकाणी अबाधित राहते तेथे कलात्मकता अपूर्व रूप घेऊन झळकू लागते.

ही कलात्मकतेची झळाळी टिळकांच्या शेकडो लेखांमध्ये पसरली असून, त्या लेखांमुळे भारतीय माणसांची मने उजळून निघाली. त्यावरील मोहावरण नष्ट झाले आणि अखेरीस भारतीय माणसाच्या जीवनामध्ये आत्मज्ञानाचा साक्षात्कार होऊन राष्ट्रीय भावना दृढमूल झाली. टिळकांच्या साहित्यात कलात्मक प्रभाव नसता तर पराभूत वृत्तीने दबलेले भारतीय मन सगळ्या जुन्या भावनांची बंधने तोडून स्वातंत्र्याभिमुख झाले नसते. टिळकांच्या साहित्यात अपार शक्ती होती, म्हणूनच ते अजूनही वाचत असताना आपल्या या अपार शक्तीने वाचकांचे मन भारावून टाकते. तर्कबुद्धी आणि भावना या दोन्हींचा मिलाफ त्यांच्या लेखनामध्ये आहे. तर्कबुद्धीला आव्हान देणारे आणि उत्साहित करणारे वाद हा त्या लेखांचा गाभा आहे. मात्र हे वाद म्हणजे पंडितांची प्रत्यक्ष जीवनाशी असंबद्ध असलेल्या प्रश्नांची भवति न भवति नाही. केवळ तत्त्वज्ञानाच्या निरंतरच्या प्रश्नांचे खलही नव्हेत, वैय्याकरण व भाषाशास्त्र यांच्यातील शब्दांच्या व्युत्पत्तीचे व वाक्यांच्या अन्वयाचे कीस पाडत चालणारी चर्चाही नव्हे, अथवा कायदेपंडितांच्या वाक्यार्थाने नाना उलटेसुलटे अर्थ सांगणाऱ्या कसरतीही नव्हेत. टिळकांच्या लेखनातील वाद शब्दांच्या रूपात प्रकट झालेले भारतीय जीवनातील राजकीय व सामाजिक संघर्ष आहेत. त्यातील मुख्य प्रतिपक्षी किंवा प्रधान मल्ल ब्रिटिशांच्या साम्राज्यसत्तेचे धुरंधर गोरे कर्मचारी आहेत. या संघर्षाला एक प्रकारची भरती - ओहोटी दिसते. या संघर्षाचे समग्र विहंगमावलोकन केल्यास त्याचा परिणतिक्रम निदर्शनास येतो. लहान विग्रहांकडून मोठ्या विग्रहांकडे हा परिणतिक्रम गेलेला दिसतो. तो पुढे पुढे अधिक वाढत आहे आणि व्यापक स्वरूप धारण करीत आहे, हे प्रत्ययास येते.

**प्रश्न : आपण हे जे समालोचन करीत आहात त्या समालोचनाचा विषय म्हणजे 'केसरी'तील टिळकांचे अनेक वर्षे गाजलेले लेखनसाहित्य होय. म्हणजे हे साहित्य प्रासंगिक विषयावरचे आहे. टिळकांचे चिरस्थायी साहित्य कोणते म्हणू शकाल? 'केसरी'तील लेख हे चिरस्थायी साहित्य म्हणता येईल काय? आपण चिरस्थायी साहित्य म्हणून 'गीतारहस्या'कडे बोट दाखवाल. त्याशिवाय ज्यात कलात्मक साहित्याचे गुण आहेत असे दुसरे काय उरते? 'केसरी'तील लेखसंग्रह म्हणजे गतइतिहास होय. तो काळ कायम मागे सरून दूर गेला आहे. वर्तमान तरुण पिढी आणि तो काळ यांच्यामध्ये केवढे तरी मोठे अंतर आहे. त्या साहित्याचे वर्तमान तरुण पिढीला विशेष आकर्षण का वाटावे? कारण आजच्या प्रत्यक्ष राष्ट्रीय जीवनाशी त्याचा काही संबंध नाही.**

**उत्तर :** अगदी प्रत्यक्ष संबंध आहे. त्या काळातूनच सलगपणे आजचा प्रत्यक्ष स्वतंत्र भारत निर्माण झाला आहे. या स्वतंत्र भारताची घडण होण्याची पूर्वपीठिका समजल्याशिवाय या स्वतंत्र भारतातील घडामोडींचा अर्थ नीट उलगडणार नाही. स्वातंत्र्याच्या आंदोलनाला प्रवृत्त होणारा भारत आणि स्वातंत्र्याचे आंदोलन सफल झाल्यानंतरचा भारत या दोन विशाल दृश्यांचा

परस्परसंबंध लक्षात घेण्याकरता टिळकांच्या लेखनसाहित्याचे वाचन व चिंतन करणे हे वर्तमान तरुण पिढीचे कर्तव्य आहे. इतिहास हे राजनीतीचे मुख्य अधिष्ठान होय. तो इतिहासच टिळकांच्या लेखनामध्ये डोळयांसमोर प्रत्यक्ष उभा राहतो. इतिहास हा ते ते विशिष्ट प्रसंग व विशिष्ट घटना यांनी बनलेला असतो; परंतु त्यांचे शब्दमय चित्रण हे मानवी ज्ञानभांडारामध्ये चिरंतन साहित्य म्हणून स्थान मिळवीत असते. टिळकांचे लेखन म्हणजे तो स्वातंत्र्याचा इतिहास घडविणारेही लेखन आहे. केवळ स्वातंत्र्याच्या आंदोलनातील घटनांचे विवरण करणारे लेखन नव्हे. म्हणजे प्रत्यक्ष इतिहास घडविणाऱ्याच्या हातून निर्माण झालेले साहित्य आहे व ते इतिहास घडविणारे साहित्य आहे. या दृष्टीने त्याचा महिमा लक्षात घेतला पाहिजे.

**प्रश्न : विष्णुशास्त्री चिपळूणकरांची 'निबंधमाला' ही मराठीचे आद्य उत्कृष्ट गद्य म्हणून मान्यता पावली आहे. चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'शी टिळकांच्या लेखनसाहित्याची तुलना आपण कशा प्रकारे करता?**

**उत्तर :** महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या इतिहासात चिपळूणकरांच्या लेखनाला एक विशिष्ट महत्त्व आहे यात शंका नाही. येथील सुशिक्षित समाजामध्ये देशाभिमानाचे बीजारोपण करणारे साहित्य म्हणून 'निबंधमाले'चे महत्त्व मान्यच केले पाहिजे; परंतु भारतीय नागरिकांमध्ये किंवा सामान्य जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करून प्रत्यक्ष राजकीय प्रेरणा देणारे साहित्य म्हणून टिळकांच्या साहित्याचे जे महत्त्व आहे ते 'निबंधमाले'ला खासच नाही. मूलभूत मानवी हक्कांच्या अधिष्ठानावर निर्माण झालेल्या राजकीय स्वातंत्र्याची किंवा स्वराज्याची वैचारिक बैठक निर्माण करणारी आधुनिक तात्त्विक विचारसरणी 'निबंधमाले'त नाही. ती प्रथम व्यापक व तेजस्वी स्वरूपात टिळकांच्या लेखनात स्पष्ट झाली आहे.

दुसरे असे की, 'निबंधमाले'चे गद्य हे अवघड आहे. लांबलचक वाक्यरचना, प्रौढ, क्लिष्ट संस्कृत शब्दावली इत्यादिकांनी ते भरलेले आहे. त्याच्या उलट टिळकांची वाक्यरचना आहे. टिळक मोठे संस्कृत पंडित असूनही त्यांचे शब्दप्रयोग व वाक्यरचना साधी, सुबोध व प्रसन्न आहे. संस्कृत शब्दांच्या ऐवजी साधेसुधे परंतु धार्मिक रीतीने अर्थबोध करून देणारे शब्द वापरण्यावर टिळकांचा कटाक्ष दिसतो. कारण त्यांना सर्वसामान्य माणसांना मोठे विचार द्यावयाचे होते. साधे मराठी शब्द व वाक्यप्रयोग वापरल्यामुळे उच्चतम विचार गंगौघाप्रमाणे प्रसन्नपणे प्रकट होतात. टिळकांच्या गद्याला त्यामुळे काव्याची अवीट शोभा आली आहे. ते एक मराठीचे उत्कृष्ट गद्य म्हणून प्रतिष्ठा पावले आहे.

**प्रश्न : टिळकांचे साहित्य कलात्मक आहे त्याचबरोबर ते कृतिप्रेरकही ठरले असे आपण म्हणता. येथील सामान्य मनुष्यात त्याने आत्मविश्वास उत्पन्न केला व त्याला राजकीय कृतीला प्रवृत्त केले या विधानांमध्ये थोडीशी विसंगती आहे असे वाटते. कलात्मक म्हणजे ते स्वयंरमणीय असले पाहिजे व वाचल्याबरोबर आनंद व समाधान निर्माण**

**झाले म्हणजे ते काव्य कलात्मक होय, असे म्हणता येते. म्हणून काव्याचा कृतीशी संबंध जोडण्याची जरूर नसते. बा. सी. मर्ढेकर म्हणतात त्याप्रमाणे कलात्मक साहित्यावर किंवा काव्यावर अशी भलतीच जबाबदारी टाकू नये.**

**उत्तर :** साहित्यमीमांसक या बाबतीत नेहमीच गोंधळ करतात. कलात्मक साहित्याचा किंवा काव्याचा आशय काय आहे याच्यावरून त्यातून कृतीची प्रेरणा निर्माण होते की नाही हे ठरते.

रुसो, व्हॉल्टेअर, बायरन आदी महान साहित्यिक क्रांतीचे प्रेरक म्हणून इतिहासाने नोंदलेले आहेत, ते त्यांच्या लेखनांतील आशयामुळेच.

**(केसरी, २७ जुलै, १९७५)**

OOO

२४

# साम्राज्यशाहीला धक्का देणारे महापुरुष : लोकमान्य टिळक व महात्मा गांधी

मुलाखतकार - **अनिल जोशी**

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या दोघांचे गेल्या तीनशे वर्षांतील जागतिक साम्राज्यशाहीच्या इतिहासामध्ये अनन्यसाधारण असे स्थान आहे. १८ व १९ व्या शतकात पश्चिमी साम्राज्यशाही आणि विशेषतः ब्रिटिश साम्राज्यशाही विश्वव्यापी बनली. या साम्राज्यशाही राजकारणाला जागतिक इतिहासात धक्का देणारा पहिला महापुरुष लोकमान्य टिळक होय. रशियन क्रांतीचे संस्थापक लेनिन यांनी हे प्रथम सांगितले आणि पश्चिमी साम्राज्यशाहीला अखेरचा प्राणघातक धक्का देणारा महापुरुष म्हणजे महात्मा गांधी होय, ही गोष्ट आधुनिक इतिहासाला मान्य करावी लागेल. या दोघांचे या साम्राज्यशाही आंदोलनातील एक महत्त्वाचे साम्य म्हणजे दोघांचाही लढा अहिंसक प्रतिकाराचा होता; परंतु या दोघांमधील महत्त्वाचा फरक म्हणजे टिळकांनी आयुष्यभर अहिंसक लढा दिला असला तरी आशियातील आणि आफ्रिकेतील सशस्त्र लढ्यांची प्रेरणा टिळकांपासून मिळाली आहे.

## वास्तववादी तत्त्वज्ञान

गांधींनी जागतिक राजकारणामध्ये निःशस्त्र प्रतिकाराचे राजकारण हे एक महान तत्त्व अंतिम मानवी कल्याणाच्या दृष्टीने आवश्यक म्हणून स्वीकारले. कारण मानवजातीचे भवितव्य हिंसक युद्धाचे राजकारण नष्ट झाल्याशिवाय सुरक्षित नाही याचा अंतःप्रत्यय किंवा नैतिक साक्षात्कार महात्मा गांधींना झाला होता. हा अद्भुत कल्पनारम्य असा गांधींचा ध्येयवाद आहे. याच्या उलट टिळकांचे राजकीय तत्त्वज्ञान हे गांधींप्रमाणे अद्भुतरम्य ध्येयवादावर आधारलेले नव्हते. ते अध्यात्मवादी असले तरी वास्तववादी होते. मानवी जीवनामध्ये जी हिंसक प्रवृत्ती रुजलेली आहे, त्या प्रवृत्तीचा वारसा जीवविज्ञानाप्रमाणे या पृथ्वीवरील प्रथम-जीवोत्पत्तीपासून प्राप्त झाला आहे, याची स्पष्ट दखल डार्विनच्या 'जीवनार्थ लढा' या विकासवादी सिद्धांतामध्ये मिळते. अगणित जीवजाती नष्ट झाल्या त्या जीवनार्थ झगड्यामुळे आणि या जीवनार्थ झगड्यात

मनुष्यापर्यंतच्या लक्षावधी जीवजाती टिकून राहिल्या आणि विकसित झाल्या याचे श्रेय जीवनार्थ हिंसक लढ्याला आहे. या तत्त्वाचा निर्देश लोकमान्य टिळकांनी, गीतारहस्यातील नीतिशास्त्रात अहिंसा हे शाश्वत नीतिमूल्य स्वीकारून केला आहे.

गांधींप्रमाणे टिळकांनाही अहिंसा हे सत्याइतकेच अंतिम नीतिमूल्य आहे, ही गोष्ट मान्य आहे; परंतु सत्य आणि अहिंसा यामध्ये अंतर्विरोध जीवनामध्ये दिसतो, त्यामुळे हा प्रश्न निकालात निघत नाही असा विचार गीतारहस्यात टिळकांनी मांडला आहे. गांधी हे टिळकांसारखे पंडित आणि मीमांसक नव्हते. त्यांचा सर्व भरवसा अंतःसाक्षात्कारावर होता. टिळकांनाही अंतःसाक्षात्काराचा आधार होताच; परंतु त्याला पंडिती मीमांसेची जोड होती. त्यामुळे त्यांनी माणसाच्या सार्वजनिक जीवनात नैतिक मूल्यांचा अंतर्विरोध लक्षात घेऊन व्यावहारिक दृष्टीने वारंवार तडजोडीचा व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारला.

परंतु दोघांचे शील आणि चारित्र्य तुल्यबळ होते. स्वार्थनिरपेक्ष आत्मयज्ञाकरिता दोघेही निरंतर सज्ज होते. खाजगी जीवनात एकपत्नीव्रत, स्वावलंबन, असहाय जनतेविषयी कळवळा, मित्रनिष्ठा, संकटकाळी धैर्य, सत्त्वनिष्ठा, परस्परांविषयी निःस्पृहता, साधी राहणी, सढळ दातृत्व, बिनतोड युक्तिवाद, न्याय आणि कायदा यांचे सूक्ष्म विश्लेषण करणारी बुद्धिमत्ता हे गुण दोघांमध्येही सारख्याच प्रकर्षाने वसत होते. या साधुत्वाच्या कसोट्या आहेत. या गुणांचा कसदारपणा लोकांच्या निदर्शनास आणून देणारे प्रसंग वेळोवेळी उद्भवले. त्या गुणांच्या तेजाने लोकांचे अंतःचक्षू दिपून गेले आणि त्यामुळे ते दोघेही लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले. सौ. अवंतिकाबाई गोखले यांनी मराठीत लिहिलेल्या महात्मा गांधींच्या चरित्राच्या प्रस्तावनेत गांधींबद्दल टिळक लिहितात - ''परंतु शील किंवा चारित्र्य, ज्यामुळे या कर्ममय भूमीत मनुष्याची सभोवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालू शकते आणि ज्यामुळे निरनिराळया गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नास सिद्धी प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो, ते शील व चारित्र्य ज्या उदाहरणावरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनास येईल, अशी चरित्रे आपल्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. गांधींच्या चारित्र्याचे जे काही वैशिष्ट्य आहे ते हेच होय. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय किंवा इतर मतांपैकी काही मते कित्येकांना कदाचित पसंत पडणार नाहीत. विद्वत्तेने त्यांना मागे टाकणारे दुसरे पुष्कळ गृहस्थ असतील; पण शील, चारित्र्याची जी महती वर सांगितली त्या दृष्टीने विचार केला असता महात्मा गांधी यांचे चारित्र्य खरोखरच सामान्य मनुष्यास आदर्शभूत होण्यासारखे आहे.''

## टिळकांचा वारसा

ब्रिटिश साम्राज्यशाही कोलमडल्यास भारतास स्वराज्य मिळेलच; परंतु त्याबरोबर जगातील सर्व परतंत्र देश मुक्त होतील, म्हणून सामाजिक सुधारणेच्या आंदोलनापेक्षा राजकीय स्वातंत्र्याचे आंदोलन हेच परतंत्र जगाच्या कल्याणाच्या दृष्टीने, मानवी हिताच्या दृष्टीने सद्यःस्थितीत योग्य आहे, असा विचार टिळकांच्या कर्तृत्वाच्या मुळाशी होता. याच विचारांचा पगडा महात्मा

गांधींवर बसला. न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्य नामदार गोखले, त्यांचे शिष्य महात्मा गांधी होते. आधी राजकीय की सामाजिक या प्रश्नावर न्यायमूर्ती रानड्यांशी टिळकांचा वाद झाला होता. रानडे यांचा दृष्टिकोन गोखले यांनाही मान्य होता; परंतु या गुरुशिष्यांच्या मतांशी महात्मा गांधींचे राजकीय जीवन, त्या सर्व जीवनाचा आढावा घेत असताना सुसंगत राहिले नाही हे स्पष्ट दिसते.

राजकीय लढ्यासच गांधींच्या जीवनात महत्त्व आले. याचे कारण टिळकांचे विचार व कृती यांचा वारसा होय. गांधींच्या चरित्राच्या प्रस्तावनेत टिळक हाच मुद्दा विशद करून सांगतात :

"अलीकडे दुसरी एक अशी समजूत होत चालली आहे की, हिंदुस्तान देशाची स्थिती सुधारण्यास प्रथमतः हिंदी समाजाची स्थिती सुधारली पाहिजे आणि ही सुधारेल तेव्हा मग पुढे राजकीय गोष्टींचा विचार करण्याची वेळ येईल. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून वरील मत किती अयथार्थ आहे हे वाचकांस सहज कळून येणारे आहे. देशातील सर्व काही सुधारणा घडवून आणण्यास त्या देशातील सत्ता, पूर्ण नाही तरी बऱ्याच अंशाने, देशातील कर्त्या आणि विचारी पुरुषांच्या मागे असावी लागते. सत्तेशिवाय शहाणपण फुकट जाते. इतकेच नव्हे तर कर्तृत्वही निर्माल्यवत होते, म्हणून देशाची स्थिती सुधारण्यासाठी जे प्रयत्न करावयाचे ते विशेषेकरून प्रथमतः या सुधारणांना अवश्य लागणाऱ्या मूलभूत बाबतीतच झाले पाहिजे. म. गांधींचे असे मत नसते तर ते राजकीय सुधारणेत बिलकूल पडले नसते. आफ्रिकेतील वसाहतीत गेलेल्या हिंदी मजुरांच्या कल्याणार्थ त्यांनी जे प्रयत्न केले ते केवळ सामाजिकच होते असे नाही. आफ्रिकेतील राज्यव्यवस्थेशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध होता. याचा गांधी यांच्या मनावर स्वभावतःच असा परिणाम झाला की, राज्यव्यवस्थेत सुधारणा झाल्याखेरीज आफ्रिकेतील हिंदी लोकांची स्थिती सुधारणार नाही. आफ्रिकेतील हिंदी लोकांस त्यांच्या विपन्नावस्थेतून सोडविण्यास गांधी यांनी काय केले, याचे जरा सूक्ष्मरीत्या अवलोकन केले पाहिजे. एखाद्या ठिकाणची राज्यव्यवस्था अन्यायाची असली तर ती सुधारण्याचा प्रयत्न करणे हा काही न्यायदृष्ट्या राजद्रोह होऊ शकत नाही. याला राजद्रोह म्हणणे हे राज्यकर्त्यास न्याय नको, नीती नको, अन्यायाचा प्रतिकार करावयास नको, आपल्या प्रजेस समतेचे हक्क द्यावयास नकोत असे म्हणण्यासारखे आहे. आम्ही असे समजतो की, प्रजेचे कल्याण हेच राजसत्तेचे खरे ध्येय व सामर्थ्य आहे. हा सिद्धांत एकदा पत्करला म्हणजे मग ज्या ठिकाणी अन्याय आहे तेथे त्याचा प्रतिकार करून तो दूर करणे म्हणजे एक प्रकारे राजसत्तेच्या ध्येयाची अंमलबजावणी करण्यास मदत करणे होय असा त्यातून सहज दुसरा सिद्धांत निघतो." (लोकमान्य टिळकांनी ही प्रस्तावना १६ मार्च १९१८ रोजी लिहिली.).

महात्मा गांधींच्या अंतापर्यंतच्या सर्व जीवनाचे सारभूत रहस्य भविष्यवादी द्रष्ट्याप्रमाणे टिळकांनी या छोट्याशा प्रस्तावनेत सांगितले आहे.

## दोघांचे सूत्र एकच

टिळक आणि गांधी यांच्या राजकीय लढ्याच्या कार्यक्रमात शिक्षण, स्वदेशी आणि अर्थकारण यासंबंधी समान कार्यक्रम होता. म्हणजे टिळकांचीच परंपरा महात्मा गांधींनी पुढे

व्यापक प्रमाणात कार्यान्वित केली. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत मात्र महात्मा गांधी टिळकांप्रमाणे दोलायमान राहिले नाहीत. त्यांनी अस्पृश्यतानिवारणाचा कार्यक्रम इतर कार्यक्रमांइतकाच महत्त्वाचा मानला. शिक्षणाच्या बाबतीत सरकारी शिक्षणपद्धतीबद्दल दोघेही सारखेच नाराज होते. नोकऱ्या शोधणारा शिक्षित वर्ग निर्माण करणे हे सरकारी शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट होते. सुशिक्षित विद्यावंत नागरिक हा स्वावलंबी व्हावा हे उद्दिष्ट त्यात नव्हते. त्याकरिता राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन करण्याचा प्रारंभ टिळकांनी केला. नंतर गांधींनी आपल्या आंदोलनामध्ये देशभर राष्ट्रीय शिक्षणाचा कार्यक्रम अधिक व्यापक केला आणि माध्यमिक आणि उच्च विद्यालये तसेच विद्यापीठे निर्माण करण्याची प्रेरणा दिली. त्या बाबतीतले दोघांचे सूत्र एकच होते. ते टिळकांच्या पुढील उक्तीत स्पष्ट झाले आहे -

''राष्ट्रातील लोकांस जर खरे शिक्षण द्यावयाचे तर ते स्वतंत्र लोकांनी स्वतंत्र खासगी शाळांतून दिले पाहिजे व ते देणे शक्य आहे.''

टिळकांनी तळेगाव-दाभाडे येथे समर्थ विद्यालय नावाची संस्था काढली. त्याकरिता दौरा काढून व्याख्याने दिली. त्यातील एका व्याख्यानात ते म्हणतात, ''स्वतःच्या हिमतीवर पोट भरण्याचे सामर्थ्य जर राष्ट्रीय शिक्षणाने अंगी येणार नाही, तर ते राष्ट्रीय शिक्षणच नव्हे.''

## शिक्षणाचे दुष्टचक्र

स्वातंत्र्य प्राप्त होऊन २३ वर्षे झाली तरी ब्रिटिश राजवटीत परावलंबी सुशिक्षित वर्ग निर्माण झाला तसाच आजही देशभर मोठ्या प्रमाणात विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठे निर्माण झाली असली तरी बेकार, नोकरीकरिता भटकणारा निराश असा शिक्षित नागरिकवर्ग प्रचंड प्रमाणात निर्माण झालेला दिसतो. जवळजवळ दोन कोटी सुशिक्षित बेकार निराशाग्रस्त होऊन जीवनाकडे भकासपणे बघत आहेत. टिळक आणि गांधी यांना स्वातंत्र्योत्तरकालीन शिक्षणाची अशी दुर्दैवी दशा होईल याची कल्पनाही नसावी. भारतीय शिक्षणाचा हा कूट प्रश्न बनला आहे. ते एक दुष्टचक्र बनले आहे. मोठमोठ्या शिक्षणतज्ज्ञांनी व तत्त्वज्ञांनी हा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले आहेत; परंतु या राष्ट्राला अजून हा दुष्टचक्रातून सुटण्याचा मार्ग दिसलेला नाही.

टिळक व गांधी यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व केले. या नेतृत्वाच्या मुळाशी परदेशी लोकांची राजकीय सत्ता नष्ट करून स्वदेशी लोकांची सत्ता स्थापन करणे एवढाच विचार नव्हता. स्वकीयत्व किंवा परकीयत्वभावना त्यांच्या मनात विशेषेकरून नव्हती. ते दोघेही विश्वव्यापी अशा भारतीय अध्यात्मवादाने प्रेरित झालेले होते. ब्रिटिशांच्या राज्यामुळे देश दरिद्री बनला आहे म्हणून देशाचे दारिद्र्य नाहीसे करण्याकरिता स्वकीयांच्या हातात राजकीय सत्ता आली पाहिजे आणि त्यामुळे भारताचे दारिद्र्य नाहीसे होऊ शकेल असा विचार त्यांच्या मनात निश्चित घोळत होता. म्हणून टिळक एके ठिकाणी म्हणतात की, राजा स्वकीय असो किंवा परकीय असो - लोककल्याणार्थ तो राज्य करतो की नाही, हा खरा मूलभूत मुद्दा आहे. मानवजातीचे कल्याण आणि सर्वभूतहित हीच या दोघांची प्रेरक नैतिक तत्त्वे होती.

## औद्योगिक क्रांतीचे उद्दिष्ट

आर्थिक उद्योगाच्या किंवा आर्थिक उत्पादनाच्या कार्यक्रमावर अधिष्ठित असे राष्ट्रीय शिक्षण पाहिजे, असा टिळक व गांधी या दोघांचाही दृष्टिकोन होता. परंतु टिळकांच्या पुढे नव्या आर्थिक उत्पादनपद्धतीच्या विकासाने भारतात पश्चिम युरोपप्रमाणे औद्योगिक क्रांती व्हावी हे उद्दिष्ट होते. म्हणून आधुनिक विज्ञान व तंत्रविज्ञान यांचे समग्र शिक्षण म्हणजे राष्ट्रीय शिक्षण होय, असे टिळक मानीत. भारताचे आधुनिक समाजामध्ये रूपांतर नव्या आर्थिक पद्धतीच्या आधारावरच होणार असा सामाजिक क्रांतीचा विचार त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा पाया होता. याच्या उलट महात्मा गांधींना आधुनिक तंत्रज्ञानावर अधिष्ठित अर्थव्यवस्था बिलकूल मान्य नव्हती. आधुनिक तंत्रविज्ञानाच्या आधारावर उभारलेल्या अर्थव्यवस्थेच्या योगाने पश्चिमी समाजाचा अधःपात होत चाललेला आहे, म्हणून मनुष्याच्या शारीरिक श्रमावर अधिष्ठित अशी, प्राचीन भारताच्या ग्रामोद्योगावर अधिष्ठित अशी अर्थव्यवस्था पुन्हा निर्माण करावी व तिच्या आधारावर ग्रामराज्याची उभारणी करावी, अशी विचारसरणी गांधींनी आपल्या आर्थिक दृष्टिकोनाच्या मुळाशी स्वीकारली होती. साथीचे रोग, तंत्रविज्ञानावर अधिष्ठित अशा रेल्वेआगबोटी इत्यादी साधनांनी पसरतात. घाणेरड्या शहरांची वाढ ग्रामीण उद्योगधंदे डबघाईस आल्यामुळे जगामध्ये होत आहे. मोठ्या प्रमाणात बेकारीचा असुर जगाला छळू लागला आहे. शरीरश्रमाधिष्ठित उद्योगापासून वंचित व यंत्रोद्योगावर अवलंबित माणसे आरोग्य घालवून बसतात. संहारक शस्त्रे व अस्त्रे यांच्या योगाने एक सामर्थ्यशील राष्ट्र अनेक राष्ट्रांना साम्राज्यशाहीच्या नियंत्रणाखाली आणते. अनेक राष्ट्रे परतंत्र होतात इत्यादी अनेक प्रकारचे दुष्परिणाम माणसाच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर होत आहेत. म्हणून अस्तंगत झालेले किंवा डबघाईस आलेले ग्रामोद्योग पुनर्जीवित करून शांतताप्रधान अहिंसक सामाजिक क्रांती घडवून आणता येईल, अशा तऱ्हेची विचारसरणी गांधींच्या महात्मतेची प्रेरक ठरली. त्यांची महात्मता म्हणजे अशा प्रकारचे द्रष्टेपण होय. ही त्यांची विचारसरणी सगळया आधुनिक मानवसमाजाचे अत्यंत कठीण असे प्रश्न लक्षात घेऊन निर्माण झाली आहे. केवळ भारतापुरती मर्यादित ही विचारसरणी नाही.

आता भारताचे आर्थिक नियोजन आधुनिक अर्थव्यवस्थेच्या निर्मितीकरिता गेली ३५ वर्षे सुरू आहे. त्याच्या मुळाशी लोकमान्य टिळकांचाच दृष्टिकोन आहे. महात्मा गांधींचे नाव एक पुण्यप्रद व पवित्र मंत्र म्हणून उच्चारले जाते; परंतु त्यांची ग्रामोद्योगप्रदान अर्थव्यवस्थेच्या मुळाशी असलेली विचारसरणी आणि ध्येयवाद पूर्ण विसरला गेला आहे. आजचा भारत टिळकमार्गाने चालला आहे, गांधीमार्गाने नव्हे.

**(केसरी, १ ऑगस्ट, १९८०)**

ooo

२५

# 'केसरी'चे पंचानन

मुलाखतकार - **अनिल जोशी**

गेल्या दीडशे वर्षात भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांमध्ये वृत्तपत्रसृष्टीत स्थिरावलेली इंग्लिश किंवा अन्य भारतीय भाषांमधील अनेक नियतकालिके, साप्ताहिके आणि दैनिके प्रसिद्ध झाली आहेत. त्यातील काही अजूनही महत्त्वाच्या स्थानावर टिकून राहिली आहेत. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये फार मोठी कामगिरी या नियतकालिकांनी बजावली आहे. मोठमोठे राजकीय व सामाजिक प्रख्यात विचारवंतही या नियतकालिकांच्या संपादकमालिकेमध्ये झळकत राहिले, निघून गेले व अजूनही काही झळकत आहेत. त्या सगळ्यांशी तुलना करताना केसरीचे अनुपम किंवा अतुलनीय वैशिष्ट्य म्हणजे केसरीच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्राला किंवा भारताला विविध क्षेत्रांत चिरस्थायी मूल्यांचे प्रदान केलेले आणि भारताच्या किंवा महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अविस्मरणीय स्थान मिळविलेले असे पंचानन झाले. ते म्हणजे - विष्णू कृष्ण चिपळूणकर (१८५० ते १८८२), गो. ग. आगरकर (१८५६-१८९५), बाळ गंगाधर टिळक (१८५६-१९२०), न. चिं. केळकर (१८७२-१९४७) आणि कृ. प्र. खाडिलकर (१८७२-१९४८) हे होत. या महनीय पुरुषांनी राजकारण, सामाजिक सुधारणा, वाङ्मय व कला, इतिहास आणि तत्त्वज्ञान या पाच क्षेत्रांना नवजीवन प्राप्त करून दिले. नव्या भारताच्या उभारणीला या नवजीवनाच्या प्रेरणा दीर्घ कालपर्यंत उपयोगी पडतील यात शंका नाही.

## लोकशाहीचे दर्शन

अवघ्या ३२ वर्षांच्या जीवितामध्ये राजकारण, मराठी साहित्य व भाषा, नियतकालिकातील व्यवसाय, इतिहाससृष्टी या क्षेत्रांत प्रभावी कर्तृत्वाच्या विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यासारख्या व्यक्ती महाराष्ट्राच्या इतिहासात फारच थोड्या सापडतील.

भारताच्या स्वातंत्र्य - आंदोलनाला आवश्यक असलेली भावनात्मक चेतना चिपळूणकरांनी दिली. ती म्हणजे स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा अभिमान होय. चिपळूणकर हे एक शुद्ध

चारित्र्याचा आदर्श होते. परकीय सरकारच्या सेवेचे बंधन त्यांनी तोडले. विचारस्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य या लोकशाहीच्या मूल्यांचे दर्शन त्यांच्या वाङ्मयकृतीत चांगले होते. हिंदू धर्मावर आघात करण्याचा अव्याहत प्रयत्न १८ व्या व १९ व्या शतकांत ख्रिश्चन मिशनरी किंवा पाद्री करत होते. त्याचा प्रखर प्रतिकार चिपळूणकर करू शकले. हिंदू धर्माची समीक्षा नव्या भारताच्या सामाजिक परिवर्तनाकरिता आवश्यक होती आणि आहे, असे असतानाही चिपळूणकरांनी अनेक महान धर्मसुधारकांनाही विरोध केला. हे जरी खरे असले तरी त्यांचा हा प्रतिकाराचा उत्कृष्ट अभिनिवेश मिशनऱ्यांच्या आंदोलनाच्या संदर्भात काही प्रमाणात क्षम्य ठरतो. त्या बाबतीत त्यांचे अंतर्मन द्विधा झालेले दिसते. ही गोष्ट त्यांच्या 'लोकभ्रम' या निबंधावरून सूचित होते. मराठी भाषा आणि साहित्याच्या दृष्टीने चिपळूणकरांच्या कामगिरीचे मूल्यमापन करीत असताना त्यांना आद्यस्थान आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासाने दिले आहे ते योग्यच आहे. 'विद्वत्व आणि कवित्व' या त्यांच्या निबंधात आधुनिक पाश्चात्त्य साहित्यिक विचारसरणीचे त्यांनी स्वागत केले आहे. परंपरागत काव्यसमीक्षा खऱ्या काव्यरसग्रहणाला मदत करू शकत नाहीत असे मत त्यांनी त्यात स्पष्टपणे नोंदले आहे. इतिहासाच्या क्षेत्रात त्यांची इतिहास निबंधातील विचारसरणी ही प्रतिक्रियात्मक आहे. पश्चिमी इतिहासकार विशेषतः इंग्रजी इतिहासकार भारताचा इतिहास हे साम्राज्यवादी दृष्टिकोनातून लिहितात, त्यामुळे इतिहासाचा विपर्यास होतो. ते ऐतिहासिक तथ्यांचा पिर्यास करतात ही गोष्ट गेल्या दीडशे वर्षातील भारतीय आधुनिक इतिहासकारांनी मान्य केली आहे. त्यांच्या निबंधमालेने मराठी साहित्याला वक्तृत्वाची शैली दिली आणि गुंतागुंतीची तर्कशुद्ध वाक्यरचना कशी करावी, याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून मराठी निबंधमाला साहित्यिकांच्यापुढे ठेवली आहे.

## सामाजिक सुधारणा

श्री. गो. ग. आगरकर आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना चिपळूणकर हे गुरुस्थानी होते. भारताच्या समाजरचनेमध्ये मौलिक परिवर्तन आवश्यक आहे याचा साक्षात्कार आगरकरांपूर्वी राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती यांच्यासारख्या महापुरुषांना झाला होता. या महापुरुषांनी परंपरागत हिंदू धर्मातील ग्राह्य काय आणि अग्राह्य काय याचा विचार करून आधुनिक भारताच्या धर्मपरिवर्तनाची दिशा ठरवून दिली. राजा राममोहन रॉय आणि त्यांच्यानंतरच्या रवींद्रनाथ ठाकूरांपर्यंतच्या अनुयायांनी हिंदू धर्मास विश्वधर्माचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. धार्मिक मानवतावाद हे त्यांचे अधिष्ठान होते. आगरकर हे शुद्ध इहवादी होते. परलोक, परमेश्वर या बाबतीत ते अज्ञेयवादी होते. आधुनिक नैतिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांची पार्श्वभूमी घेऊन त्यांनी समाजपरिवर्तन आणि समाजसुधारणा यांचे तत्त्वज्ञान मांडले. केसरीचे संपादक असताना त्यांनी भावी लोकशाही, भारताच्या निर्मितीच्या दृष्टीने राजकीय विचार आणि सामाजिक विचार मांडण्यास प्रारंभ केला. मानवी स्वातंत्र्याच्या मूल्यांचे अधिष्ठान

त्यांच्या राजकीय व सामाजिक विचारांच्या मुळाशी होते. त्यांचे सामाजिक विचार फार प्रखर आणि त्या वेळच्या सामान्य जनाला न पचणारे होते. मराठी भाषेचे शास्त्रशुद्ध नवे अध्ययन व्हावे आणि पश्चिमेकडून आलेली साहित्य आणि कलेची प्रेरणा आत्मसात करावी, या दृष्टीने त्यांनी वाक्यमीमांसा, 'कवि काव्यरति' इत्यादी निबंध लिहिले. त्यांना दीर्घायुष्य लाभले नाही; परंतु मराठी कविता, मराठी नाटक आणि मराठी कादंबरी ही प्रामुख्याने सामाजिक सुधारणा आणि मानवतावाद यांचा पुरस्कार करणारी झाली. याचे मुख्य श्रेय आगरकरांकडे जाते. त्यांनी त्याचा वैचारिक पाया निर्माण केला. हरी नारायण आपटे आणि केशवसुत यांच्या साहित्याचे अधिष्ठान आगरकरांची विचारसरणी होय.

## टिळक व आगरकर

लो. टिळक आणि आगरकर ही जोडी केसरीला लाभली; परंतु ही जोडी फार वेळ एकत्र नांदू शकली नाही. लो. टिळक आणि सुधारकाग्रणी आगरकर यांचा मुख्य मतभेद 'आधी सामाजिक की आधी राजकीय' या मुद्यांवर होता. टिळक हे भारताच्या राष्ट्रवादाचे शिल्पकार ठरले याचे कारण त्यांच्या मुळाशी असणारा मतभेदच होय. टिळकांचे असे मत आहे की, भारताला स्वायत्तता किंवा स्वतःची राजकीय सत्ता लाभल्यावरच सामाजिक सुधारणेची पावले पुढे पडू शकतील. राजकीय स्वातंत्र्याच्या प्रयत्नांमध्ये सामाजिक अंतर्विरोध हा विक्षेप उत्पन्न करील. प्रत्येक जातिजमातीत इनमीन साडेतीन समाजसुधारणेच्या बाजूने आणि बहुजनसमाज विरोधी राहील. समाजसुधारणाही फार खोल विचारपरिवर्तनामुळेच घडू शकते. त्याला दीर्घकाळ जावा लागतो. स्वराज्य ही अत्यंत निकडीची व तातडीची गरज आहे आणि त्याकरिता राष्ट्रीय एकजुटीची आवश्यकता आहे. याउलट, समाजसुधारकांचे मत होते, की स्वराज्य हे लोकांचे स्वराज्य व्हावयाचे तर जन्मसिद्ध उच्चनीच आणि स्त्री-पुरुषविषमता या गोष्टी लोकशाही समाजरचनेला बाधक ठरतील, हे निश्चितपणे ध्यानात ठेवले पाहिजे. भारताच्या इतिहासातून राजकीय स्वातंत्र्याची प्रेरणा लाभावी म्हणून टिळकांनी इतिहासपूर्व काळावर दृष्टिक्षेप केला. वेदांचे ऐतिहासिक दृष्टीने मंथन करून आर्यांच्या मूळ स्थनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता त्यांनी वेद हे अपौरुषेय व अनादि आहेत हा हिंदूंचा परंपरागत दृष्टिकोन सोडून दिला आणि वेद हे मानवनिर्मित आहेत या दृष्टीने वेदांचे चिंतन केले. भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात टिळकांनी भारतीय अध्यात्मवादाची नवी मांडणी केली. त्याकरिता गीतारहस्य लिहिले. गीतारहस्याच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे की, भारतीय तरुणाच्या कर्तृत्वाला, धैर्य आणि उत्साह या गुणांना उत्तेजित करणारे विचार मिळावेत म्हणून आम्ही हा ग्रंथ लिहिला आहे. टिळकांच्या केसरीतील लेखांमध्ये प्रसाद व विवेकनिष्ठा हे गुण प्रामुख्याने आढळतात. सरळ आणि सुबोध अशी उच्च विचारसरणी व्यक्त करणारी व सामान्य माणसाला भारावून टाकणारी वाङ्मयीन शैली या लेखांमध्ये दिसते. टिळक जेव्हा लिहीत होते तेव्हा सशस्त्र क्रांतिवादी आणि निःशस्त्र राजकीय सुधारणावादी असे दोन पंथ होते. सशस्त्र क्रांतिवाद्यांना टिळक हे आपल्यातलेच आहेत असा

विश्वास होता. हा विश्वास निर्माण करण्यामध्ये टिळकांची विलक्षण कुशलता दिसून येते. कारण कायद्याची सीमा उल्लंघायची नाही; परंतु सशस्त्र क्रांतिवाद्यांच्या उत्साहाला अडथळा येता कामा नये, अशी तारेवरची कसरत त्यांच्या तार्किक विवादपटू बुद्धिमत्तेमुळेच शक्य झाली; परंतु त्यातूनच धोकाही निर्माण झाला. त्यांना अनेक वेळा कारावास भोगावा लागला.

लो. टिळकांच्या सहवासात राहून अनेक वर्षे केसरीचे संपादन न. चिं. केळकर आणि कृ. प्र. खाडिलकर यांनी केले. ब्रिटिशांच्या राज्यपद्धतीविरुद्ध टीका करताना खाडिलकर कित्येक वेळा टिळकांच्याही पुढे जाऊन कठोर टीकास्त्र सोडीत असत. न. चिं. केळकर यांची टीका मार्मिक, उपरोधिक व सौम्य असे. सर्वच क्षेत्रांत त्यांनी तडजोडवादी भूमिका आयुष्यभर घेतली. नर्मविनोद हा त्यांच्या लेखनाचा व भाषणाचा स्थायीभाव होता. केसरीचे प्रमुख संपादक या नात्याने केळकर यांनी पुष्कळ वर्षे टिळकांच्या निधनानंतर काम केले. केळकर हे बहुश्रुत व चतुरस्त्र विचारवंत होते. त्यांच्या स्वभावामध्ये माधुर्य होते. त्यामुळे भिन्न भिन्न पक्षांतल्या व्यक्तींना व कार्यकर्त्यांना ते आकर्षून घेत. राजकारण, समाजसुधारणा, धर्म, साहित्य, इतिहास, कला इ. विषयांमध्ये त्यांच्या कथालेखनाचा संचार अप्रतिहत होता. ते स्वतः सौम्य समाजसुधारक होते. त्यांच्या उक्तीत व कृतीत मेळ होता. लो. टिळकांच्या निधनानंतर त्यांची केसरीतील विचारप्रवर्तक मीमांसा अखिल भारतीय विचारवंतांपर्यंत पोहोचत होती. इंडियन नॅशनल काँग्रेसमध्ये एक समतोल विचारवंत म्हणून त्यांनी प्रतिष्ठा मिळविलेली होती. म. गांधींच्या या सर्वच आंदोलनांना त्यांनी मर्यादित स्वरूपात केसरीद्वारे पाठिंबा दिला; परंतु कित्येक वेळा म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या काँग्रेसच्या अनेक ठरावांना विरोधही केला. संपूर्ण असहकारिता गांधींनी पुकारल्यानंतर कालांतराने केळकरांनी या संपूर्ण असहकारितेला पाठिंबा दिला नाही. ब्रिटिश शासनाचे जे कायदे व जी धोरणे लोकहितानुवर्ती दिसली त्यांना पाठिंबाही देणे आवश्यक आहे, तसेच लोकप्रतिनिधींच्या कायदेमंडळात लोकहितानुवर्ती कायदे व विधेयके मांडली जाऊन मान्य होत असताना त्यांना समंजस व न्याय्य वळण देण्याकरिता कायदेमंडळात घुसले पाहिजे असा विचार त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने मांडला. 'रुसू नका, घुसा' असा त्यांनी संदेश दिला. संपूर्ण सहकारितेच्या ऐवजी 'प्रतिसहकारिता' हे तत्त्व त्यांनी पुरस्कारिले. त्यामुळे भारतातील एक थोर, निर्भय विचारवंत म्हणून त्यांची ख्याती झाली. मराठी साहित्यक्षेत्रात 'साहित्यसम्राट' म्हणूनच मराठी साहित्यिकांनी त्यांच्यावर अभिषेक केला. त्यांची साहित्यमीमांसा या क्षेत्रात नव्या वाटा शोधणारी होती. साहित्याच्या आणि कलेच्या आस्वादाने एक सुंदर सूत्र एका भारतीय प्राचीन तत्त्वज्ञानातील योगदर्शनाचे त्यांनी केलेले चिंतन होय. त्यांचे वक्तृत्व अगदी वेगळ्या प्रकारचे होते. अस्खलित नाट्यपूर्ण वक्तृत्व करणारे अलौकिक वक्ते काळकर्ते शि. म. परांजपे होते. तसेच वक्तृत्व केळकर करू शकले नाहीत; परंतु शिक्षित समाजात केळकरांच्या वक्तृत्वाची परांजपे यांच्या वक्तृत्वाइतकीच ओढ होती. ते अडखळत, खाकरत बोलले तरी त्यात सहज नर्मविनोद येत असे, त्यात एक प्रकारचा खेळकरपणा होता. असा खेळकरपणा परांजपे यांच्या वक्तृत्वात

नव्हता. परांजपे हे संस्कृत पंडितही होते. त्यांच्या बोलण्या-चालण्यात पंडिती ऐट होती. ती सहज दिसून येत असे. तशा ऐटीत केळकर कधी बोलत नसत. श्रोतृवर्गाशी मधुर साम्ययोग त्यांनी साधला होता. इतिहासाच्या संदर्भात असे म्हणता येते की, भारत परतंत्र झाला याची मीमांसा त्यांनी स्वाभिमानी इतिहासंशोधकापेक्षा अधिक तटस्थ भूमिका घेऊन भारताच्या पारतंत्र्याचा अर्थ लावला. या दृष्टीने त्यांचे गाजलेले पुस्तक म्हणजे 'इंग्रज व मराठे' हे होय. या पुस्तकास इतिहासंशोधक खरेशास्त्री यांची प्रस्तावना आहे. राष्ट्राभिमानाने एककल्ली झालेल्या मनाला बोचणारी अशी प्रस्तावना खरेशास्त्री यांनी लिहिलेली आहे.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात न. चिं. केळकर जसे साहित्यसम्राट ठरले, तसेच कृ. प्र. खाडिलकर हे नाट्याचार्य म्हणून अढळपद मिळवून चिरंजीव झाले आहेत. लोकमान्य टिळकांप्रमाणेच ते जहाल राजकीय विचारवंत होते. सशस्त्र क्रांतिवादाचा पाठपुरावा त्यांनी पूर्वायुष्यात केला. लोकमान्य टिळक सहा वर्षांची शिक्षा भोगत असताना केळकर आणि खाडिलकर यांनी ललित साहित्यकृती निर्माण केल्या, नाटके लिहिली. लो. टिळकांच्या गंभीर, ध्येयवादी, तपस्वी लढाऊ प्रवृत्तीला आधुनिक ललित साहित्य मानवणारे नव्हते. त्यामुळे असे म्हणतात की, 'या पोपट-मैनांच्या प्रणयकथांनी देश काय पुढे जाणार आहे?' अशा अर्थाचे त्यांचे उद्गार ते मंडालेल्या तुरुंगातून बाहेर आल्यावर बाहेर पडले. नाट्याचार्य खाडिलकर यांची नाट्यकृती पौराणिक व ऐतिहासिक अशी आहे; परंतु त्यात वर्तमान परिस्थितीचाही संदर्भ सूचित केल्याखेरीज ते राहिले नाहीत. विशेषत: 'कीचकवध' हे नाटक कर्झनशाहीच्या विरुद्ध निर्माण केलेले रूपक होते. त्यामुळे या नाटकाला काही काळ ब्रिटिश सरकारने बंदी घातली होती. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीच्या कालखंडात खाडिलकरांनी केसरी सोडला आणि त्यांनी आपला वृत्तपत्र व्यवसाय स्वतंत्रपणे सुरू केला. याचे कारण केसरीचे मुख्य संपादक न. चिं. केळकर यांच्याशी म. गांधींच्या स्वातंत्र्यसंग्रामाबाबतीतला मतभेद होता. मुंबईस प्रथम 'लोकमान्य' दैनिकाचे ते संपादक झाले आणि नंतर 'नवा काळ' हे दैनिक त्यांनी स्वतःच्या हिमतीने सुरू केले. टिळकांचे दोन श्रेष्ठ अनुयायी म्हणजे काळकर्ते शि. म. परांजपे आणि नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर हे म. गांधींशी समरस झाले.

एकाच नियतकालिकात प्रथम असल्याने अनेक नियतकालिकांचे संपादक म्हणून गाजलेले खाडिलकर व केळकर हे होत. मराठी साहित्याच्या विकासाचा भक्कम पाया या केसरीच्या पंचकाने घातला. भारताच्या राष्ट्रीय अस्मितेचे सर्वांगीण दर्शन त्यांच्या कृतीत आणि लेखनात उत्कृष्टपणे होते. महाराष्ट्राचा आणि भारताचा गेल्या १५० वर्षांचा इतिहास या पंचकाला मानवंदना केल्याशिवाय राहणार नाही.

**(केसरी, ४ जानेवारी, १९८१)**

OOO

२६

# भारतीय राष्ट्रावादाचे महर्षी : लोकमान्य टिळक

मुलाखतकार - **अनिल जोशी**

"लोकमान्य टिळक यांच्या व्यक्तिमत्त्वाचा चांगलाच पगडा त्या काळी माझ्या मनावर बसलेला होता. त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचा योगही मला आला होता. प्राज्ञपाठशाळेतील त्या वेळचे माझे गुरुजी दिनकरशास्त्री कानडे हेदेखील लोकमान्यांच्या गीतारहस्य पंथाचे एका अर्थाने अनुयायीच होते. गीतारहस्याचे ते समर्थक होते. मी वाराणसीला उच्च शिक्षणासाठी निघालो असता दिनकरशास्त्री कानडे यांनी मला पुणे येथे जाऊन लोकमान्य टिळकांचे दर्शन घेण्यास सांगितले होते आणि मी पुण्याच्या गायकवाड वाड्यात जाऊन टिळकांच्या प्रत्यक्ष दर्शनाने व आशीर्वादाने भारावून गेलो होतो !''

९२ वर्षांचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाई येथील त्यांच्या निवासस्थानातील अभ्यासिकेत बसून लोकमान्य टिळक यांच्याबद्दलचा आपला आदर व्यक्त करण्यात रंगून गेले होते. भूतकाळात ज्या घटना त्यांनी पाहिल्या होत्या त्यांचे स्मरण ताजे होते. लो. टिळक, गोपाळ गणेश आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले व महादेव गोविंद रानडे यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा परिणाम आपल्या मनावर व व्यक्तिमत्त्वावर झालेला आहे, असा उल्लेख ते स्वतःच अनेक वेळा करत होते. ते स्वतःला गीतारहस्य पंथाचे अनुयायीच मानतात. ते पुढे म्हणाले, "लोकमान्य टिळकांच्या राजकीय, सामाजिक व तत्त्वज्ञानाविषयीच्या विचारांबद्दल माझ्या मनात प्रचंड आदर असून त्या सर्वांचा माझ्यावर चांगलाच प्रभाव पडलेला आहे. १९१५ ते १९२० या काळातील लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख मी मनापासून वाचलेले आहेत. एवढेच नव्हे तर त्यातील काही लेखांचे मी अक्षरशः पारायणच केलेले आहे.''

टिळक व आगरकर यांच्यातील राजकीय व सामाजिक विचारांबद्दल बोलताना शास्त्रीजी म्हणाले, "टिळक आणि आगरकर हे मित्र होते. त्यांनी राजकीय व सामाजिक मते सारखी होती; परंतु सामाजिक मतांना प्राधान्य न देता राजकीय ध्येयवादाला टिळकांनी प्राधान्य दिले.

स्वातंत्र्यानंतर स्वराज्यात स्वतः समाजच सामाजिक सुधारणेकडे वळेल असे टिळक म्हणत; परंतु आगरकरांची सामाजिक दृष्टी आणि ध्येयवाद त्यांना आदरणीय वाटत असे. चार जुलै १९१६ या दिवशी केसरीत आगरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त टिळकांनी लेख लिहिला. हा लेख म्हणजे आगरकरांची वाङ्मयीन पूजाच होय. आगरकरांना त्यांनी महात्मा म्हटले आहे. आगरकरांनी आजन्म दारिद्र्याची शपथ वाहिली होती, अशी माहिती त्यांनी दिली आहे. सत्यनिष्ठा, करारीपणा, एकनिष्ठा आणि स्वार्थत्याग हे गुण आगरकरांच्या ठिकाणी होते, असे त्यांनी म्हटले आहे.''

''राजकीयदृष्ट्या ज्यांच्याशी टिळकांचे जन्मभर मतभेद होते असे नेमस्त नेते गोपाळ कृष्ण गोखले हे होत. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या निधनानंतर लिहिलेल्या मृत्युलेखात लो. टिळक म्हणतात, ''आमचे कितीही मतभेद असले तरी निष्काम देशभक्ती या गुणाबद्दल मतभेद नाहीत. इंद्रियशक्ती शाबूत आहेत, शरीर स्वास्थ्यासाठी उद्योग करण्यास समर्थ आहे, संसारातील सुखाचे स्वरूप सतत मनोहर दिसते. अशा वेळी सगळी सुखे बाजूला सारून देशकार्यास गोखले यांनी वाहून घेतले. गोपाळरावजींचे उद्योग, त्यांनी केलेली कामगिरी नीतिदृष्ट्या, देशहितदृष्ट्या आणि पुरुषार्थदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची होती असे कोणासही वाटल्यावाचून राहणार नाही. गोपाळ कृष्ण गोखले हे एक भारताच्या राजकारणाला वैचारिक अधिष्ठान देणारे संत-सज्जन होते असे सार निघावे, असे लो. टिळकांनी केलेले वर्णन आहे,'' असे शास्त्रीजी म्हणाले.

शास्त्रीजींनी सांगितले, ''महादेव गोविंद रानडे आणि लोकमान्य ही दोन नावे त्या वेळच्या भारतीय राजकारणातील दोन स्पर्धक पक्षांची नावे आहेत, हे भारताच्या राजकीय आंदोलनाच्या इतिहासाच्या अभ्यासकांच्या लक्षात येते; पण महादेव गोविंद रानडे यांच्याबद्दल लो. टिळकांच्या मनात नितांत आदर होता. त्यांच्याबद्दल टिळकांनी जे लिहिले आहे ते म्हणजे देवतेच्या स्तोत्रासारखे आहे. रात्रंदिवस देशहितार्थ तन, मन, धन अर्पणारा एखादाच माधव-रावजींसारखा पुरुष निर्माण होतो,'' असे टिळक म्हणतात.

''टिळक सर्व मानवजातींच्या इतिहासाचे परिशीलन केलेले महापुरुष होते. म्हणून ते भारताच्या राजकारणाला भविष्यकाळाची दिव्यदृष्टी देऊ शकले. आधुनिक भारत ज्या काही निवडक महापुरुषांच्या योगाने निर्माण झाला, त्यात लो. टिळक अग्रस्थानी आहेत. ते आधुनिक तत्त्वज्ञानाचाही व्यासंग करीत होते. हर्बर्ट स्पेन्सर हा अज्ञेयवादी तत्त्ववेत्ता होय. त्याचेही टिळकांनी सखोल अध्ययन केले होते. आधुनिक भौतिकवादाचेही त्यांनी चिंतन सतत चालविले होते. ते स्वतः अध्यात्मवादी होते; पण भौतिकवाद हा त्यांच्याः मनाला झोंबून बसला होता, असे त्यांच्या गीतारहस्यातील लेखनावरून लक्षात येते,'' असे शास्त्रीजी म्हणाले.

''मॅक्सम्युलर आणि टिळक यांची परस्परांशी दाट ओळख होती. मॅक्सम्युलरच्या मनात टिळकांबद्दल खोल आदर होता. म्हणून ब्रिटिश सरकारने टिळकांना कारागृहात डांबू नये, असे स्पष्ट मत मॅक्सम्युलरने व्यक्त केले होते. मिल्ल आणि स्पेन्सर हे टिळकांच्या कालखंडात भारतीय

आधुनिक तत्त्वचिंतकांच्या अध्ययनाचे विषय होते. टिळकांच्याही अध्ययनाचे ते विषय होते. तात्पर्य, टिळक हा आधुनिक समाजनेत्या सुशिक्षितांचा आदर्श होता आणि हा आदर्श या आधुनिक काळातला जागतिक नेत्यांमध्ये शोभणारा असा आदर्श होऊन गेला. हे जागतिक मानवी नेतृत्व होते. त्यात समाजभेद, राष्ट्रभेद, संस्कृतिभेद यांना दुय्यम स्थान होते. त्यांच्या ज्ञानामध्ये आजच्या जगाच्या बौद्धिक संस्कृतीचे स्वच्छ प्रतिबिंब पडलेले हाते.''

''टिळक हे भारताच्या राष्ट्रवादाचे एक दिव्य प्रणेते म्हणून मान्य झालेले आहेत; परंतु हा राष्ट्रवाद जागतिक व्यापक मानवसंस्कृतीच्या अधिष्ठानावर उभारला गेला होता. हिंदुत्व, भारतीयत्व या मर्यादा टिळकांच्या राष्ट्रवादाला अडचण उत्पन्न करत नव्हत्या. हिंदू-मुसलमान हे भेद तर टिळकांच्या राष्ट्रीय एकात्मतेला यत्किंचितही अडचण निर्माण करीत नसत. ब्रिटिश हे राज्य करीत असताना 'फोडा आणि झोडा' हे तत्त्व पाळून हिंदू-मुसलमानांचे दंगे पेटवत असत. टिळक त्यांची जबाबदारी स्वार्थी, दुष्ट ब्रिटिशांवर टाकीत. ते म्हणत, आम्ही हिंदू-मुसलमान एकत्र सहाशे वर्षे शांततेने नांदलो आहोत, हा ब्रिटिश राज्यकर्ता आमच्यात फुटीरपणा निर्माण करून वाढवीत आहे. टिळकांच्या राजकीय विचारात हिंदू-मुसलमान यांच्या संबंधाचे जे निरूपण आले आहे ते आजच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रेरणेने भारलेले आहे. लो. टिळक हे शुद्ध भारतीय राष्ट्रवादाचे द्रष्टे महर्षी होते.''

**(केसरी, १ ऑगस्ट, १९९२)**

❍❍❍

२७

# 'गीतारहस्य' हे आचारशास्त्रच

मुलाखतकार - **अनिल जोशी**

'गीतारहस्य' हे नीतिशास्त्र आहे. म्हणजे सर्व मानवजातीला मार्गदर्शन करणारे आचारशास्त्र आहे. हिंदू समाज किंवा भारतीय समाज नव्या नव्या सुधारणा अंगीकारत असताना आवश्यक असणारे अधिष्ठानभूत तत्त्वज्ञान गीतारहस्यापासून मिळते. गीतारहस्याच्या प्रारंभी 'समर्पणम्' म्हणून संस्कृत श्लोकामध्ये हे व्यक्त झाले आहे. कर्तव्य आणि अकर्तव्य यांचा निर्णय करण्यास आवश्यक अशी विचारपद्धती आम्ही जनतेला देत आहोत, असे लोकमान्य टिळक या समर्पणात लिहितात आणि जनता हाच ईश्वर म्हणून त्यास गीतारहस्य अर्पण करतात. 'स्त्री, वैश्य, शूद्र या पापयोनी आहेत हे गीतेचे मत नाही. जनात प्रचलित असलेल्या मताचा गीतेने उल्लेख करून पुण्ययोगी व पापयोगी या सगळ्यांना उच्च आदर्श दिलेला आहे. त्याचा उच्चनीच हा दृष्टिकोन मान्य केला नाही, त्याचा निर्देश आहे; पण त्यास मान्यता नाही.'

'धर्मग्रंथांच्या आधारे सदाचरणाचे महत्त्व परंपरागत समाज मान्य करत असतो. सगळ्याच धार्मिक समाजांची ही पद्धती आहे. धर्मग्रंथाचे तात्त्विक विवरण किंवा तत्त्वज्ञान हे सांप्रदायिक स्वरूप घेत असते. कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट हे ख्रिश्चन धर्मातील दोन प्रसिद्ध संप्रदाय तत्त्वज्ञानाचे स्वरूप वेगवेगळे धरून निर्माण झाले आहेत.'

भारतामध्ये आर्यसमाज आणि ब्राह्मसमाज हे दोन नवे धार्मिक संप्रदाय निर्माण झाले. हे दोन्हीही सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारे होते. आर्यसमाज जातिधर्माला विरोध करतो. स्वामी दयानंद यांनी जातिभेद हा अदर्म्य आहे, गुणकर्मविभागशः प्रत्येक समाजात मतभेद असतोच, जातिभेदाची रूढी निर्माण होऊन भारतीय समाज हा फुटीर व दुर्बल झाला, असा विचार मांडला.

ब्राह्मसमाज आर्य समाजापेक्षा पुढे गेलेला आहे. धर्मग्रंथ पूर्णप्रमाण नव्हेत. धर्मग्रंथ चिकित्सेने तपासायचे नसतात असा दृष्टिकोन ब्राह्मसमाजास मान्य नाही, म्हणून एका अर्थी ब्राह्मसमाज बुद्धिप्रामाण्यवादी सर्व जनांना लागू होणारा धर्मविचार सांगतो. महादेव गोविंद रानडे हे ब्राह्मसमाजाचे पुरस्कर्ते होत. आर्यसमाज काय आणि ब्राह्मसमाज काय, हे हिंदू समाजात किंवा

भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात पसरले नाहीत; परंतु त्यांच्यामुळे समाज बदलू लागला. नव्या सुधारणा समाजामध्ये मान्य होऊ लागल्या आणि सगळा हिंदू समाज हा परंपरेपासून दूर जाऊ लागला. त्याचा परिणाम म्हणजे येथील भिन्न भिन्न जातीतील विवाह होत. ब्राह्मण मुलगी ब्राह्मणेतर मुलाशी लग्न करते, तिकडे समाज दुर्लक्ष करतो, अशी परिस्थिती निर्माण झाली. म्हणून आज जो हिंदू कायदा आहे, तो कायदा भिन्न जातीतील संकरविवाह मान्य करतो. तो विवाह कायदेशीरच मानला जातो.

मुख्य मुद्दा असा की, हिंदू समाज कोणतीही नवी सुधारणा उघडपणे झपाट्याने मान्य करत नाही; परंतु हळूहळू स्तब्धपणे आत्मसात करतो. ही एक विलक्षण समाजपरिवर्तनाची पद्धत हिंदू समाजात निर्माण झालेली आहे, हे गेल्या सुमारे दोनशे वर्षांचा इतिहास दाखवतो. समाजवादी क्रांतीचा ध्येयवाद पुरस्कृत करणारे पक्ष हिंदू समाजात निर्माण झाले. त्यात काही मार्क्सवादी क्रांतीचा अंगीकार करणारे पक्ष निर्माण झाले. अशा रीतीने नवा विचार व नवा कार्यक्रम समाजाच्या दृष्टिपथात आला आणि समाज परिवर्तनाला गती आली आहे.

'गीतारहस्य ते तर्कट' असे कोणी म्हणत असेल, तर ते सदोष तर्काचे आहे असे म्हणणाऱ्यांचा अभिप्राय दिसतो, कारण हे 'तर्कटशास्त्र' आहे, म्हणजे त्यातील 'ट' हा सदोष या अर्थाचा आहे. दोष न दाखवता सदोष म्हणणे बरे नव्हे. विधान केल्यानंतर, विधानाचे प्रमाण द्यावे लागते, तो दोष दाखवावा लागतो. केवळ दोष आहे असे म्हणून चालत नाही. दर्जाचे लेखन म्हणजे सप्रमाण विधान करणारे लेखन होय.

फार महत्त्वाचे वैचारिक संघर्ष महाराष्ट्रात झाले. त्यातील एक अविस्मरणीय संघर्ष राजकीय व सामाजिक सुधारकांमध्ये झाला. आधी राजकारण व ते यशस्वी झाल्यावर समाजकारण असा एक स्वातंत्र्यवादी पक्ष होता. राजकारण व समाजकारण, सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा हे समकालीनच व्हावयास पाहिजे असा आगरकरांचा विचार होता. टिळकांचा पक्ष हा आधी राजकारण व ते यशस्वी झाल्यावर समाजकारण पुढे येईलच, असा स्वातंत्र्यवाद्यांचा पक्ष होता. पण समाजसुधारणेचा विचार हा आधुनिक राजकारणाचा भाग आहे. त्याशिवाय आधुनिक राजकारण संपूर्ण स्वरूपात मांडले जाऊ शकत नाही. हा विचार स्वातंत्र्यवाद्यांपैकी सर्वांनाच मान्य झाला नाही, तरी हा विचार तत्त्वतः योग्य विचार होय असे मानावेच लागते.

'आधुनिक धर्मनिरपेक्ष शिक्षणपद्धती भारतात व महाराष्ट्रात सुरू झाल्यावर आधुनिक पद्धतीचे गद्य साहित्य निर्माण होऊ लागले. वैचारिक गद्य साहित्य आपणास पहिल्यांदा लोकहितवादीच्या शतपत्रांमध्ये दिसते. बुद्धिवादी विचारसरणी मराठीमध्ये प्रथम नीट सुरू झाली. त्यात निबंधसाहित्य हे प्रभावीपणे पुढे आले. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे उत्कृष्ट निबंधलेखक होते; पण त्यांचे पुत्र विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी मराठी ही भाषा उच्च दर्जाच्या गद्याचा आविष्कार करू शकते हे सिद्ध केले. निबंधमाला हा त्याचा उत्कृष्ट पुरावा आहे. अनेक गद्यग्रंथ मराठीत विष्णुशास्त्रींच्या काळापासून निर्माण होऊ लागले.'

**(दैनिक केसरी, पुणे, काल अनुपलब्ध)**

○○○

२८

# लोकमान्य टिळक : एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ

मुलाखतकार - **अनिल जोशी**

**प्रश्न : भारतात इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यावर व विशेषतः विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पश्चिमी तत्त्वज्ञानाचा नवा प्रवा वाहू लागला. तर्कशास्त्रदृष्ट्या चिकित्सा करणारे, विश्वाच्या व जीवनाच्या तत्त्वांची चर्चा करणारे, नवविद्याविभूषित पंडित चमकू लागले. अशा पंडितांमध्ये लोकमान्य टिळकांचे काय स्थान आहे? ते तर नित्याच्या धकाधकीच्या मामल्यात गुंतले होते. सूक्ष्म विद्याव्यासंग व पांडित्याला वेळ तरी कोठे होता?**

**उत्तर :** लो. टिळक विद्यापीठीय पंडितांप्रमाणे तर्कशास्त्रीय चिकित्सेने भरलेले तत्त्वज्ञान सांगणारे पंडित नव्हते. ते चतुरस्र पंडित होते हे जरी खरे असले तरी तत्त्वज्ञानातून केवळ बौद्धिक आनंद प्राप्त होण्याकरिता त्यांनी तत्त्वज्ञानाचा व्यासंग केला नाही. राष्ट्रीय जीवन बदलणारे व राष्ट्रीय जीवनाला सामर्थ्य देणारे तत्त्वज्ञान त्यांनी भारताला दिले. भारताला अत्यंत समृद्ध असा वैविध्यपूर्ण तत्त्वज्ञानाचा वारसा लाभला आहे. लोकमान्यांच्या समोर जो भारत होता तो राजकीय, सांस्कृतिक व नैतिक दृष्टीने पराभूत असा भारत होता. या पराभवाचे कारण केवळ राजकीय नव्हते, हा सर्वांगीण पराभव होता आणि त्याचे कारण सबंध जीवनसृष्टीच भ्रमात व गोंधळात सापडली होती. जीवनमूल्यांचा गोंधळ झालेला होता. भारतीयांची जीवनदृष्टी शुद्ध करणे आणि जीवनमूल्यांना शुद्ध वैचारिक दिशा दाखविणे हे कार्य केवळ महान बुद्धिमान पंडिताला झेपणारे नव्हते. यासाठी प्रज्ञावंत द्रष्ट्याची गरज होती. असा प्रज्ञावंत द्रष्टा या दृष्टीने लोकमान्यांचे गेल्या दीडशे वर्षातील भारतीय तत्त्ववेत्त्यांमध्ये सर्वोच्च स्थान आहे.

**प्रश्न : तत्त्ववेत्ता पंडित व प्रज्ञावंत द्रष्टा यांच्यात आपण फरक करता असे दिसते; परंतु ज्ञानविज्ञानाने संपन्न अशा पश्चिमी बौद्धिक संस्कृतीच्या प्रवाहाखाली आलेल्या विद्वानांमध्ये टिळकांना जे उच्च स्थान प्राप्त झाले त्यासाठी त्यांना बौद्धिक पांडित्यही उपयोगी पडले असे म्हटले पाहिजे. म्हणजे बौद्धिक पांडित्य आणि द्रष्ट्याची प्रज्ञा यांचा**

**संगम त्यांच्यामध्ये झाला होता, असे म्हणावे लागते. त्यांची तत्त्वज्ञानातील वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी थोडक्यात सांगता येईल काय?**

**उत्तर :** होय, असे सांगता येईल. टिळकांनी परंपरागत भारतीय जीवनपद्धतीला आध्यात्मिक, प्रवृत्तिवादी विचारांचे नवे अधिष्ठान प्राप्त करून दिले. भक्तिमार्ग, योगमार्ग, कर्मकांड आदी परंपरागत धार्मिक व आध्यात्मिक मार्ग हे निवृत्तिवादाने हजारो वर्षे प्रभावित झाले होते. त्यामुळे ऐहिक प्रपंचाला व ऐहिक जीवनपद्धतीला गौणत्व आले होते. ध्यानधारणा व भजनपूजन हाच परमार्थ होय असा विचार किंवा अशी श्रद्धा इतकी दृढमूल झाली होती, की त्यामुळे ऐहिक, सामाजिक व कौटुंबिक जीवनपद्धती विषाद व दौर्बल्य यांनी पछाडली होती. संन्यास व वानप्रस्थ न घेतलेल्या संतांच्यावरही निवृत्तिवादाची छटा उमटली होती. या इंद्रियगम्य विश्वाच्या जाणिवेला व आकर्षणाला बंधन व भ्रम समजून त्यापासून पराङ्मुख होणे म्हणजेच ईश्वरी तत्त्वाकडे जाणे अशी श्रद्धा दृढमूल झाली होती. अनेक सहस्र वर्षे बाह्य विश्वाला आणि ऐहिक प्रपंचाला अव्हेरणाऱ्या दृष्टीमुळे भारतीय समाजाचे सामर्थ्य लोप पावले होते. प्रपंचाला परमार्थाच्या शक्तीची जोड देणारी तत्त्वदृष्टी नष्ट झाल्यामुळे भारतीय समाजाचा सर्वांगीण नैतिक अधःपात झाला होता. या नैतिक अधःपातातून बाहेर पडण्याकरिता आवश्यक असणारी नवी जाणीव निर्माण करणारे तत्त्वज्ञान लो. टिळक यांनीच भारताला दिले.

**प्रश्न : भारताचे नैतिक पुनरुत्थान करणारे तत्त्वज्ञान टिळकांनी सांगितले असे आपण म्हणता; परंतु टिळकांनी भारतीय संस्कृतीच्या परंपरेला यत्किंचितही धक्का न लावता भारतीय परंपरेतीलच तत्त्वज्ञान अधिक सुसंगत रीतीने मांडले. भारतीय संस्कृतीमध्ये विकास व परिवर्तन झाल्याशिवाय नैतिक पुनरुत्थानाचा प्रश्न सुटत नाही अशा स्थितीत ते भगवद्गीतेकडे का वळले? हजारो वर्षांपूर्वीची भगवद्गीता नव्या युगाच्या नव्या गरजांचे, प्रश्नांचे उत्तर देण्यास आणि विकासाचा मार्ग दाखविण्यास कशी समर्थ होऊ शकते? आधिभौतिक शास्त्रे पूर्वी नव्हती. ती आता वाढीस लागली आहेत. अशा स्थितीत गीतेतील विचार मागे पडणे व कालबाह्य होणे स्वाभाविक नव्हे काय?**

**उत्तर :** या प्रश्नात काहीसे तथ्य आहे. परंपरागत संस्कृतीच्या मूलभूत किंवा बीजभूत अधिष्ठानाला सोडणारे हे तत्त्वज्ञान नव्हते; परंतु भारतीय संस्कृतीच्या विकासाचे तत्त्वज्ञान भारतीय परंपरेमध्येच निर्माण झाले होते. ते म्हणजे भगवद्गीता होय. टिळकांनी तिचे मर्म किंवा रहस्य पुनः विशद करून सांगितले. या तत्त्वज्ञानाच्या आधाराने धार्मिक व आध्यात्मिक विचारांच्या गोंधळातून बाहेर पडण्याचा मार्ग टिळकांनी भारतीयांना दाखविला. नव्या युगातील ज्ञान, प्रश्न व जबाबदाऱ्या यांचे स्वरूप इतके भिन्न आहे की, त्यास मार्गदर्शन करू शकेल असे तत्त्वज्ञान भगवद्गीतेत असू शकेल काय, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो हे खरे. या प्रश्नाचे उत्तर टिळकांनी 'गीतारहस्या'त असे दिले आहे,- ''गीतेतील धर्म सत्य व अभय खरा; पण तो ज्या काळी व ज्या स्वरूपाने सांगण्यात आला त्या देशकालादी परिस्थितीत पुष्कळ फरक पडल्यामुळे

कित्येकांच्या डोळ्यात त्याचे तेज आता पूर्वीप्रमाणे भरत नाहीसे झाले. शिवाय आधिभौतिक ज्ञानाची अर्वाचीन काळी पाश्चिमात्य देशांत जी वाढ झाली, त्यामुळे अध्यात्मशास्त्राला धरून केलेली प्राचीन कर्मयोगाची विवेचने हल्लीच्या काळास पूर्णपणे लागू पडणे शक्य नाही, अशीही कित्येक नव्या विद्वानांची समजूत झालेली असते. हे समज खरे नव्हते. मोक्षधर्म व नीती हे दोन्ही विषय आधिभौतिक ज्ञानाच्या पलीकडेच असल्यामुळे प्राचीन काळी आमच्या शास्त्रकारांनी या बाबतीत जे सिद्धांत केले आहेत, त्यांच्यापुढे मानवी ज्ञानाची गती अद्याप गेलेली नाही.''

लो. टिळकांनी भारतीय आध्यात्मिक विचाराला नवी दिशा दाखविली. पदार्थविज्ञान, सृष्टिशास्त्र, इतिहास, विकासवाद, मानवशास्त्र व सामाजिक शास्त्र या नव्या शास्त्रांचे अध्यात्मविद्येस उपकारक किंवा अधिक अर्थपूर्ण करणारे अभिप्रायशोधन, अध्यात्मविद्येची पुनर्रचना करण्याची गरज त्यांना भासली होती; परंतु सर्व आयुष्य राजकीय झगड्यात निघून गेल्याने व वृद्धपणा आल्यामुळे ही अपूर्णता भरून काढण्यास वेळ शिल्लक राहिला नाही, असे त्यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे.

गतिशील समाजव्यवस्थेचे अनुसंधान करणारे कर्मयोगशास्त्र वर्तमानकाळास आवश्यक आहे. मनुष्य, समाज व निसर्ग यांच्या स्वरूपाचे व परस्परसंबंधाचे जे नवे अर्थ कळले आहेत, त्यांचाही कर्मयोगशास्त्राने परामर्श घेतला पाहिजे. मनुष्याला अनपेक्षित परिस्थिती प्राप्त झाली असता अभिनव मार्ग शोधून काढावा लागतो. जुनी वर्णव्यवस्थेची कल्पना सर्व देशांच्या व सर्व काळच्या समाजरचनांना लागू पडणारी कल्पना नाही. वर्तमानकाळातील समाजधारणेच्या प्रश्नांचा उलगडा करण्यास ही कल्पना उपयोगी पडत नाही, हे प्रत्यक्ष अनुभवाने व समाजशास्त्राच्या कसोटीने सिद्ध झाले आहे. म्हणून भगवद्गीतेतील वर्णव्यवस्थेची व स्वभावकर्म ठरविण्याची कसोटी जरी ग्राह्य ठरली नाही, तरी प्रखर बुद्धिवादावर तावूनसुलाखून घेतलेले, सूक्ष्म प्रज्ञेने जाणलेले, दीर्घ व खोल अनुभवांशी पडताळून पाहिलेले अनेक शाश्वत सिद्धांत भगवद्गीतेत सांगितले आहेत. या सिद्धांतांच्या आधाराने भारताचे नैतिक पुनरुत्थान होऊ शकेल, असा विश्वास टिळकांच्या ठिकाणी होता.

**प्रश्न : एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस टिळकांच्या ऐन उमेदीत स्वामी विवेकानंद भारतीय अध्यात्माचा संदेश पश्चिमी जगाचासुद्धा उद्धार करू शकेल, असे सांगू लागले. त्यानंतर योगी अरविंद, डॉ. राधाकृष्णन प्रभृती मोठमोठे तत्त्वज्ञ पुढे आले. त्यांनीही भारतीय अध्यात्माचे पश्चिमी ज्ञानविज्ञानाशी तुलनात्मक अध्ययन करून विवरण प्रसिद्ध केले व आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली. म्हणजे टिळकांनी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जे कार्य केले तेच विवेकानंद, अरविंद, डॉ. राधाकृष्णन इत्यादिकांनी केले. टिळक आणि हे तत्त्वज्ञ यांच्यामध्ये या संदर्भात खास निराळे असे काही सांगता येण्यासारखे आहे काय? टिळकांना आपण भारतीय तत्त्ववेत्त्यांमध्ये सर्वश्रेष्ठ स्थान देता म्हणून हा प्रश्न.**

**उत्तर :** माझे हे मत योगी अरविंदांच्या गीतेवरील निबंधाच्या वाचनाने बनले आहे. अरविंद एके ठिकाणी म्हणतात, "गीता हे पुस्तक असे आहे की, त्याची बांधणी असामान्य स्वरूपाची आहे, त्यात ताजेपणा आहे, त्याचे खरे सार अगदी नवे आहे. अनुभवाने त्यात नावीन्य पुन्हा प्राप्त होते." हिंदुस्थानातील सर्व धार्मिक विचारांवर त्याचा प्रभाव आहे. तो साक्षात आणि जिवंत आहे. राष्ट्र आणि संस्कृती यांचा जीर्णोद्धार किंवा पुनरुज्जीवन करण्यास आवश्यक असलेला सामर्थ्यशाली असा रचनाकारी तो भाग आहे. एका अधिकारवाणीने (लो. टिळकांनी) नुकतेच सांगितले आहे की, आपणास आवश्यक असलेल्या आध्यात्मिक जीवनाचे आध्यात्मिक सत्य गीतेत सापडते.

मॅक्समुल्लरने एके ठिकाणी म्हटले आहे की, "भारताचे धार्मिक व आध्यात्मिक जीवन जगाला मार्गदर्शक ठरेल इतके समृद्ध आहे. पण भारताचा इतिहास पाहिला तर राजकीयदृष्ट्या अत्यंत दुर्बल किंवा राजकारणापासून हजारो वर्षे पराङ्मुख असलेला असा हा देश आहे." भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासातील हे वैगुण्य लोकमान्य टिळकांनी स्वतःच्या राजकीय अध्यात्मवादी प्रेरणेने नष्ट केले. भारताला राजकीय प्रेरणेने संपन्न असलेला असा आत्मा लो. टिळक यांच्या आत्मसमर्पणाने प्राप्त झाला आहे. भारताला राजकीय प्रज्ञा लाभली ती टिळकांच्यामुळे. भगवद्गीतेतील अध्यात्माचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे टिळकांनी प्राप्त करून दिलेली राजकीय प्रज्ञा होय.

टिळकांचे व्यक्तिमत्त्व म्हणजेच ही मूर्तिमंत प्रज्ञा होय. असे व्यक्तिमत्त्व विवेकानंद, राधाकृष्णन किंवा अरविंद यांचे नाही. विवेकानंदांची व्याख्याने आध्यात्मिक चिंतनाची स्फूर्ती देतात आणि योगी अरविंदांची ग्रंथसंपत्ती आपल्या गूढ अध्यात्मवादाला गंभीरता प्राप्त करून देते आणि राधाकृष्णन यांचे ग्रंथ आपल्या तात्त्विक विचारांना चतुरस्रता प्राप्त करून देतात; परंतु राजकीय प्रज्ञेने भरलेले आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व हे केवळ टिळकांच्याच ठिकाणी पाहावयास सापडते.

**(दैनिक केसरी, पुणे, काल अनुपलब्ध)**

ooo

*

# अन्य व्यक्तींच्या मुलाखती

*

२९

# अजूनही यशवंतराव चाचपडत आहेत

## मुलाखतकार - **सतीश कामत, प्रतिनिधी, साप्ताहिक माणूस**

नुसते विद्यागुरू नव्हत, तर त्यांचे परमार्थाचे गुरू - प्रज्ञानंद सरस्वती हे होते आणि त्यांच्यापाशी ते वेदांतशास्त्र शिकले.

यशवंतराव चव्हाणांच्या गुणविशेषांची चर्चा करताना एक मुद्दा नेहमी मांडला जातो-त्यांची लोकसंग्रह करण्याची वृत्ती. यशवंतरावांनी पहिल्यापासूनच निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेक माणसं जोडली; अनेकांशी जवळीक साधली. त्यांच्यामध्ये साहित्यिक आहेत, कलाकार आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत आणि विचारवंतही आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा आणि यशवंतरावांचा जवळजवळ चाळीस वर्षांचा स्नेह! त्यामुळेच यशवंतरावांच्या जीवनावर आणि त्यातून त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तींवर अनेक दृष्टिकोनांमधून प्रकाश पडेल या अपेक्षेने तर्कतीर्थांची खास भेट घेतली. सुमारे तीन तास झालेल्या या मुलाखतीमध्ये यशवंतरावांच्या स्वभावविशेषांचे आणि वर्तनाचे व्यापक पातळीवरून शास्त्रीबोवांनी पृथक्करण केले. या मुलाखतीतील काही महत्त्वाचा भाग येथे देत आहे.

**प्रश्न : यशवंतरावांनी भारताच्या राजकारणात स्वतःचं असं एक स्थान निर्माण केलं आणि टिकविलं आहेच; पण याचबरोबर एक रसिक कलाप्रेमी म्हणूनही त्यांना ओळखतात. साहित्यावर त्यांचं विशेष प्रेम. या दृष्टीने यशवंतरावाबद्दल आपण काय सांगू शकाल?**

**उत्तर :** तसं बरंचसं सांगता येण्यासारखं आहे; पण थोडक्यांत सांगतो. यशवंतरावांची वाढ अत्यंत सुसंस्कृत वातावरणात झाली. संत-साहित्य आणि आधुनिक मराठी साहित्य यांची चर्चा करणाऱ्यांच्या वातावरणात ते वावरत होते. तसेच नवे राजकीय, डाव्या विचारसरणीचे, मार्क्सवाद, समाजवाद यांच्याविषयी जे अभ्यासवर्ग चालत. त्या अभ्यासवर्गांनाही यशवंतराव जात आणि तेथील चर्चेत भाग घेत. त्यामुळे यशवंतराव पदवीधर झाले तेव्हा साहित्याचे आणि बौद्धिकतेचे

संस्कार घेऊन ते बाहेर पडले. त्यामुळे सबंध राजकीय कारकिर्दीत गेल्या पाच-सहा वर्षांचा काळ सोडला तर, राजकीय विचारवंत या नात्याने महाराष्ट्राच्या व भारताच्या ध्येयधोरणांच्या सल्ला-मसलतीत, समतोल विचाराचे म्हणून यशवंतरावांना मान्यता मिळाली. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृत मंडळ स्थापन करण्याचीही कल्पना त्यांचीच! चांगले साहित्यिक आणि विचारवंतांची पुस्तके छापून प्रकाशित करण्याच्या कामी त्यांना बिनशर्त मदत करणं हे शासनाचं कर्तव्यच असतं या विचारातून या मंडळाची स्थापना झाली, मत्ताधारी पक्षाला वा शासनाला ज्या व्यक्ती अमान्य होत्या किंवा विरोधी पक्षात होत्या त्यांच्याही पुस्तकप्रकाशनाला यशवंतरावांनी विरोध केला नाही. मंडळाचे आतापर्यंतचे लेखकांना अनुदान देण्याचे निर्णय बिनहरकत अंमलात येऊ शकले याचं कारण यशवंतरावांनी पाडलेला विचारस्वातंत्र्याचा पायंडा होय. स्थानबद्ध लेखकांच्याही पुस्तकांना अनुदानं दिली गेली हे याचंच उदाहरण आहे. मंडळाचे नेमले गेलेले सदस्य (साहित्यिक / कलाकार) यांची निवड शासनाने केली नाही तर माझ्यासारख्या शासनाबाहेरील व्यक्तीने केली हा सारा यशवंतरावांच्या धोरणाचाच प्रभाव होय!

यशवंतरावांच्या साहित्य-रसिकतेबद्दल बोलताना हे सांगितलंच पाहिजे की त्यांचं वाचन विविध आणि विपुल आहे. एखादी विशेष प्रकारची, मला मोलाची वाटलेली- साहित्यकृती मी यशवंतरावांना भेटीदाखल देत असतो; पण बऱ्याच वेळा मला असं आढळून येतं की, ती साहित्यकृती त्यांनी अगोदरच विकत आणून वाचलेली असते. यशवंतरावांचा ग्रंथसंग्रह फार मोठा आहे आणि तो सतत वाढत असतो. मराठी कवितेचे ते मोठे रसिक श्रोते आणि वाचक आहेत. साहित्यिकाची मैत्री त्यांना फार महत्त्वाची वाटते. कलेचाही अनावर मोह यशवंतरावांना आहे. पुष्कळ वेळा उत्कृष्ट नाटक रंगमंदिरात आलं तर ते आपल्या महत्त्वाच्या मुलाखतीसुद्धा पुढे ढकलून .....योगाची तिकिटं काढून प्रेक्षकगणांत जाऊन बसतात. साहित्यिकांच्या गप्पागोष्टीत ते खूप रंगतात. साहित्यिक आणि कलाकार याची मंत्री यशवंतरावांना फार मोलाची वाटते.

**प्रश्न :** आताच आपण यशवंतरावाच्या विचारस्वातंत्र्याच्या आणि साहित्यकलेवरील प्रेमाविषयी बोललात; पण याचं प्रत्यंतर त्यांच्या वर्तनामध्ये कधीच कसं दिसलं नाही? त्याचप्रमाणे त्यांची लोकशाहीवरील निष्ठाही अलीकडे कसास उतरली नाही, याचा अन्वय आपण कसा लावाल?

**उत्तर :** इंदिराजींच्या अकरा वर्षांच्या कारकिर्दीत काँग्रेसमधील विचारस्वातंत्र्य घटत गेलं. एक प्रकारची अधिकारशाही वाढत गेली आणि इंदिराजींचं एकतंत्री वर्चस्व बळकट झालं. अशा परिस्थितीत यशवंतरावांनी जी सहनशीलता दाखवली ती दाखवली नसती तर फार चांगलं झालं असतं; परंतु त्यामुळे मग काँग्रेसपक्षामधून झटकून बाहेर पडण्याची पाळी त्यांच्यावर आली असती. यशवंतराव ध्येयवादी आहेत. त्यांच्या सामाजिक निष्ठाही शंकातीत आहेत; परंतु काँग्रेस पक्षातून बाहेर पडून वनवासी जीवन जगण्याची त्यांची मानसिक तयारी नव्हती. कारण त्यांचं सगळं जीवनच काँग्रेसच्या परिसरात वाढलं. त्यामुळे काँग्रेस सोडणं यशवंतरावांच्या जिवावर आलं. यावर कुणी असं म्हणेल की, इंदिराजींच्या अधिकारशाहीशी जुळणारी अशी त्यांची

राजकीय दृष्टी असणं फार शक्य आहे; पण मला तसं वाटत नाही. कारण त्यांनी स्वतः द्विभाषिक मुंबई राज्य आणि महाराष्ट्र प्रदेश राज्य यामध्ये असताना काँग्रेस पक्षाचं नेतृत्व केलं; महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची ताकद वाढवली. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मोरारजींच्या नेतृत्वाखाली काम केलं आणि नंतर स्वतःच्याही नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ चालवलं. यात कुठंही अधिकारशाही प्रवृत्ती होती असं प्रमाण नाही. मला असं वाटतं की, मोरारजी जरी ताठर प्रवृत्तीचे प्रशासक म्हणून प्रसिद्ध होते तरी प्रशासन-यंत्रणेत त्यांनी कधीही अधिकारशाहीची प्रवृत्ती दाखवली नाही.

कायद्याचं राज्य हे राज्यशास्त्राचं एक मूलभूत तत्त्व आहे. या तत्त्वाला मोरारजीभाईंनी मोठ्या निष्ठेनं महत्त्व दिलं. हीच निष्ठा यशवंतरावांच्याही प्रदेश राज्यामधल्या आणि केंद्रराज्यातल्या प्रशासकीय वर्तनाची खूण ठरली. हे तत्त्व इंदिराजींच्या कारकिर्दीमध्ये अत्यंत गौण ठरत गेलं, पण यशवंतरावांच्या कारकिर्दीमध्ये तसं एकही उदाहरण नाही. मला ते एकदा म्हणाले होते की, ''प्रशासनशास्त्रातील माझे गुरू मोरारजीभाईच आहेत!'' कायद्याचं राज्य हे प्रशासनयंत्रणेचं अधिष्ठान आहे. त्याचं पावित्र्य स्वातंत्र्योत्तर काळात ज्या काही थोड्या व्यक्तींमध्ये प्रतिबिंबित झालेलं मला दिसतं. त्यामध्ये मोरारजी आणि यशवंतरावांची नावं सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी आहेत!

**प्रश्न : हे सगळं जरी मान्य केलं तरी यशवंतरावांच्या गेल्या दोन वर्षांमधील वर्तणुकीचं समर्थन काय करता येईल ?**

**उत्तर :** एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे की, प्रसंगविशेषी धोका पत्करूनही पावलं टाकण्याची जर वेळ आली तर तसा धोका पत्करण्यास यशवंतराव कधीही तयार नसतात आणि त्यांच्यावरील ही टीका त्याच्या अगदी निकटच्या निष्ठावंत अनुयायांनीही माझ्याजवळ अनेक वेळा बोलून दाखविली आहे. अधिकारशाहीची यंत्रणा जर यशवंतरावांच्या हातात पक्की आली तर ते कसे वागतील, असाही एक प्रश्न राजकीय विचारवंतांनी मला विचारला होता. माझी अशी धारणा आहे की, यशवंतराव अधिकारशाहीची यंत्रणा जशीच्या तशी राबवणार नाहीत. तिला अधिक उदारमतवादी रूप देण्याचा ते प्रयत्न करतील. कारण यशवंतरावांचा मनपिंडच अधिकारशाहीला जुळेल असा नाही; परंतु काँग्रेस पक्षामध्ये पहिल्यापासूनच अशा उच्चपदस्थ व्यक्तीचा फार मोठा भरणा झाला आहे, आणि गेल्या दहा-बारा वर्षांत तो वाढला आहे. या सगळ्या इंदिराजींच्याच लहान-मोठ्या प्रतिमा आहेत. म्हणून काँग्रेस पक्षाच्याच लोकशाही नीतीबद्दल मी साशंक आहे; पण यशवंतरावांच्या बाबतीत हे मला पुन्हा एकदा सांगावंसं वाटतं की, प्रस्थापिताविरुद्ध बंड करून उठेल, अशी त्याची मनोग्रंथीच नाही.

**प्रश्न : १९६२ सालापासून १९७७ सालापर्यंत यशवंतराव भारताच्या केंद्र सरकारात राहिले, असा एखाद-दुसराच मंत्री इतक्या दीर्घकाळपर्यंत केंद्र सरकारात टिकला असेल. इंदिराजींना काही काळानंतर ते नकोसे झाले होते. तरी इंदिराजींनी त्यांची हकालपट्टी का केली नाही हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.**

**उत्तर :** याची कारणं दोन आहेत. एक, महाराष्ट्रासारख्या मोठया प्रदेश राज्याचं नेतृत्व त्यांनी कायम टिकवलं. गेली सोळा वर्षं ते दिल्लीत राहिले; परंतु महाराष्ट्राच्या नेतृत्वाची किल्ली यशवंतरावांनी आपल्या हाती कायम ठेवली. याचं कारण त्यांच्यासारखं प्रसन्न आणि आत्मविश्वास संपन्न असं महाराष्ट्रातील नागरी व ग्रामीण अशा दोन्ही वर्गांना पसंत पडणारं दुसरं नेतृत्व पुढे येऊच शकलं नाही. त्यामुळे इंदिराजी मनात असूनही यशवंतरावांना डावलू शकल्या नाहीत. डावलण्याची त्या वाट पहात होत्या.

दुसरं कारण असं की, यशवंतराव हे अत्यंत सावधचित्ताचे गृहस्थ आहेत. स्वामी रामदासांच्या 'सावधान' हा इशारा त्यांनी कायम लक्षात ठेवला, हा इशारा व्यवहारात आणि परमार्थात, दोन्हीकडे लक्षात ठेवणं योग्य आणि आवश्यक असतं. यशवंतरावांनी ते केल्यामुळे त्यांची पावलं नेहमीच जपून पडतात. विरोधाचे प्रसंग यशवंतराव शक्यतो टाळतात. 'जे जे होईल ते ते पहावे, तुका म्हणे उगी राहावे' असंही धोरण ते ठेवतात. ही एक प्रकारची अलिप्त राहण्याची प्रवृत्ती आहे. हा राजकारणी चातुर्याचाही भाग आहे. अर्थात हे जसं यशाचं कारण आहे. तसंच अपयशाचंही कारण होऊ शकतं; पण राजकीय यशाला राजमार्ग क्वचितच असतो.

**प्रश्न : हे आपलं सगळं बोलणं फार सावधपणाचं आहे. आपल्या मित्राला दुखवेल असं काहीही बोलण्याचं आपण टाळत आहात. स्पष्टच बोलायचं तर, आपण ज्याला 'सावधानता', 'संघर्ष टाळण्याची वृत्ती' आणि 'अलिप्तता' म्हणता त्यालाच अनेक राजकीय निरीक्षक आणि यशवंतरावांबरोबर केंद्रामध्ये अनेक वर्षं काम केलेले नेतेही 'संधिसाधू' हे विशेषण लावतात. यावर आपलं काय मत आहे ?**

**उत्तर** : अहो, तो राजकीय पक्ष प्रचाराचाच एक प्रकार आहे. यशवंतरावांनी गट बदलले असतील; पण आपला पक्ष कधीही बदलला नाही. काँग्रेस पक्षातच टिकून राहण्यासाठी जे जे करावं लागलं ते सर्व केलं. संधिसाधूपणा नेमका कशास म्हणावयाचा याचा निश्चित निकष दाखवल्याशिवाय असं का बरं म्हणावं? पण म्हणतात त्यांना म्हणू द्यात. कारण राजकीय रंगमंचावरील पात्रांनी एकमेकांवर असे आरोप-प्रत्यारोप केल्याशिवाय खटकेबाज संवाद तयार होत नाहीत. राजकारणाला रंग भरत नाही.

**प्रश्न : आज काँग्रेस जनता पक्षाला अखिल भारतीय स्तरावरील पर्यायी पक्ष म्हणून उभा आहे. त्यादृष्टीने त्याच्या भविष्यकालाविषयी काय म्हणता येईल ?**

**उत्तर :** आज काँग्रेस सत्तास्थानी पर्यायी पक्ष म्हणून टिकण्याची शक्यता पुष्कळच आहे. कारण गेल्या नव्वद वर्षांच्या इतिहासात भारताच्या सर्व प्रदेशांमध्ये, ग्रामीण आणि नागरी भागात तो पसरला आहे. ज्या राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला आहे, तेथेही तो पक्ष आपलं अस्तित्व टिकवून आहे. एवढंच नव्हे तर, जनता पक्षाच्याही मनात सतत भीती राहावी इतक्या प्रमाणात टिकवून आहे.

परंतु सर्वत्र नेतृत्व मात्र आपापसांतील स्पर्धेमुळे मलीन मनाचे बनले आहे. नवे प्रभावी विचार या मनाला सुचत नाहीत. त्यामुळे सत्तारूढ पक्षाचे दौर्बल्य आणि दोष हेच आपलं बलस्थान अस मानण्याची सवय वाटू लागली आहे. आपल्या पक्षाच्या ध्येयधोरणाची व्यवस्थित पुन्हा तपासणी व मांडणी करण्याची गरज आहे असंही वाटेनासेच झाले आहे. स्वतःच्या ध्येय-धोरणाची प्रखर समीक्षा करणारी बुद्धिवादी प्रवृत्ती आणि नवी दिशा दाखवणारी प्रतिभा याच्या खुणाही सध्याच्या काँग्रेसमध्ये दिसत नाहीत. सगळे शिळया कढीला ऊत आल्यासारखे वातावरण आहे. इंदिराजी सत्ताधारी होण्यापूर्वीचा काँग्रेसचा इतिहास नव्या नव्या नेत्यांच्या नव्या नव्या विचारकक्षा दाखविणाऱ्या प्रतिभाषा इतिहास आहे. अशा एक वा अनेक नेत्यांचा १२-१५ वर्षांच्या प्रत्येक कालखंडानंतर उदय दिसतो. ते पूर्वकाळाकडे सारखे पाठ करून पुढे पुढे जात असतात; परंतु सध्याचे प्रचंड पराभवानंतरचे उच्च स्थानावरील काँग्रेस नेते भविष्यकाळाकडे पाठ करून पूर्वकाळाचीच शिळी गाणी गात लोकांना आवाहन करत बसले आहेत. जनता पक्ष काही नवं सांगतो आहे; परंतु तोसुद्धा, त्याच्यातील अनेक गट व त्यांचे नेते भूतकालाकडे ओढले गेलेले दिसतात. क्रांतिवादी समाजवादीसुद्धा याला फार अपवाद नाहीत.

श्री. मधू लिमये म्हणतात की, 'पर्यायी पक्षा'ची आवश्यकताच नाही. प्रत्येक प्रांतात प्रांतिक पक्ष आहेत. त्यांच्यामुळे अधिकारशाहीला पायबंद बसू शकतो. काँग्रेस पक्ष तर पर्यायी पक्ष होऊच शकत नाही; तो मृतवत् आहे आणि तो पुन्हा सबळ झाल्यास देशाला अधिकारशाहीमध्ये ढकलण्यास सिद्ध होईल! परंतु मला हे योग्य वाटत नाही. भारतीय संसदीय लोकशाहीला पर्यायी पक्षाची नितांत आवश्यकता आहे. तो नसेल तर सत्ताधारी पक्ष हा कितीही लोकशाही स्वातंत्र्याची आणि समतेची तत्त्वे उराशी बाळगणारा असला तरी त्यांना हळूहळू मुरड घालून परिणामशून्य करू शकतो. कारण राजकीय पक्षाचे मुख्य उद्दिष्ट सत्तेमध्ये टिकून राहण्याचे असते आणि कोणताही पक्ष याला अपवादभूत असू शकत नाही. मधु लिमयेंनी पश्चिमी राज्यशास्त्रज्ञांनी केलेली राजकीय पक्षाची मीमांसा पुन्हा अभ्यासावी आणि श्री. मानवेंद्र रॉय यांनी केलेल्या पक्षमीमांसेकडे विशेष लक्ष द्यावे. जनतेला सत्तारूढ पक्ष खाली ओढण्याची संधी तितकाच मोठा, प्रबल विरोधी पक्ष असला तरच मिळते. लोकशाहीचे रक्षण नेते करू शकत नाहीत. जागृत, समंजस असा कोणत्याही पक्षाशी घट्ट बांधिलकी नसलेला स्वातंत्र्यप्रिय नागरिकवर्गच ते करू शकतो. आव्हान देणारा पर्यायी पक्ष नसल्यास सत्ताधारी राजकीय पक्ष काय करतो याचा प्रत्यक्ष ताजा अनुभव असतानाही असं बोलणं हे केवळ रम्य कल्पनाविलासाचेच उदाहरण म्हणावे लागेल.

**प्रश्न : 'आता मी आक्रमक भूमिका घेणार!' असं यशवंतरावांनी नुकतंच म्हटलं आहे. त्या दृष्टिकोनातून विरोधी पक्षाचा नेता म्हणून यशवंतराव कितपत यशस्वी होतील? इंदिराजीच्या पुनरागमनाचा त्यांच्यावर काय परिणाम होईल?**

**उत्तर :** यशवंतरावांच्या नेतृत्वासंबंधी बोलताना हे स्पष्ट केलंच पाहिजे की, अजूनही

यशवंतराव चाचपडतच आहेत, असं मला वाटतं. 'आक्रमक भूमिका घेणार' असं ते म्हणतात; पण नुसतं म्हणून भागणार नाही. या भूमिकेत वावरताना भविष्यकालावर प्रकाश टाकणारे आणि मार्ग दाखविणारे काही नवे विचार जर त्यांना सुचले, असे काही नवे विचार जर त्यांनी दिले तरच यशवंतराव आपल नेतृत्व टिकवू शकतील !

इंदिराजींबद्दल मला फारशी आशा वाटत नाही. कारण आत्मपरीक्षण आणि स्वतःच्या झालेल्या कारकिर्दीचं परीक्षण करण्यास उच्च मनोबल आवश्यक असतं. हे मनोबल इंदिराजींजवळ आहे असं मला वाटत नाही.. 'नित्य नवा दीस जागृतीचा' ही संतोक्ती राजकीय नेत्यालाही उद्बोधक होऊ शकते. तसा काहीच बोध इंदिराजींनी घेतलेला दिसत नाही.

शास्त्रीबोवांच्या बोलण्यामध्ये परखडपणा होता; पण त्याचबरोबर एक प्रकारची चिंताही त्यांच्या बोलण्यात होती. म्हणूनच शेवटी ते म्हणाले, 'काँग्रेस पक्षाच्या लोकशाही नीतीबद्दल तर मी साशंकच आहे; पण जनता पक्षाच्या बाबतीतही मी तितकाच साशंक आहे. समाजवाद हा तर नुसता मंत्रच झाला आहे त्याचे अनेक अर्थ काढले जातात आणि त्यामुळे ती एक निरर्थक शब्दावली बनली आहे. म्हणून एकूण भारताच्याच लोकशाही राजनीतीवद्दल मी निराशाग्रस्त आहे.'

**(साप्ताहिक माणूस, पुणे, दि. ८ ऑक्टोबर १९७७, पृ. ५ ते ७)**

ooo

३०

# स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ

मुलाखतकार - **एक जिज्ञासू**

(ब्र. भू. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे व्यक्तिमत्त्व आणि प्राज्ञपाठशाळेद्वारा त्यांनी केलेले हिंदूधर्मसुधारणेचे आंदोलन या विषयावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची एका जिज्ञासूने घेतलेली मुलाखत. ते बोलले त्याच शब्दांमध्ये जशीच्या तशी पुढे दिली आहे.)

**प्रश्न - स्वामीजींची गुरुपरंपरा कोणती?**

**उत्तर -** स्वामीजींची गुरुपरंपरा निरनिराळ्या प्रकारची आहे. त्यांची वेदाध्ययनाची परंपरा वाईतील आहे. मेणवलीकर जोशी हे त्यांचे ऋग्वेदाचे अध्यापक. कृष्णयजुर्वेदाचे त्यांचे अध्यापक हे बाळशास्त्री रानडे म्हणून होते. त्यांची शास्त्राध्ययनाची परंपरा वेगळी होती. धोंडशास्त्री डेंगवेकर हे त्यावेळचे एक मोठे नैय्यायिक होते. ते पुण्याच्या विश्रामबाग पाठशाळेचे अध्यापक होते. ही पाठशाळा पेशवाईत सुरू झाली आणि तिच्यात फार मोठे पंडित अध्यापक म्हणून काम करीत. ब्रिटिशांनी सत्ता संपादन करून पुण्यावर कब्जा केल्यानंतरही ही पाठशाळा त्यांनी चालू ठेवली. तिच्यात नीळकंठशास्त्री थत्ते, मोरशास्त्री साठे वगैरे मंडळी अध्यापक होती. डेंगवेकर शास्त्र्यांचे वडील हे नव्यन्यायाचे मोठे पंडित तेथे अध्यापक होते. त्यांच्यापाशी ते नव्यन्याय शिकले. त्यांचा अधिकार अनेक शास्त्रांत होता. प्लेगामध्ये त्यांचा एकुलता एक पुत्र वारल्यानंतर ते पाचवडला आले आणि पाचवडहून काही दिवसांनी वाईत येऊन राहिले. ते अयाचित वृत्तीने राहत असत. त्यांची शास्त्रे त्यांच्या जिभेवर होती. पुस्तक पाहून ते फारसे शिकवीत नसत. ते स्वतः उभे राहून सगळा पाठ देत असत आणि नव्यन्यायाच्या अगदी प्राथमिक पाठांपासून ते अगदी उच्च असे गादाधरी, जागदीशी इत्यादी ग्रंथ आणि त्यांची क्रोडोपत्रे यापर्यंत ते ग्रंथ न पाहता शिकवीत असत. या गुरुंकडे स्वामीजी न्यायशास्त्र शिकले. त्याचे परमार्थाचे गुरू - नुसते विद्यागुरू नव्हत, तर त्यांचे परमार्थाचे गुरू - प्रज्ञानंद सरस्वती हे होते आणि त्यांच्यापाशी ते वेदांतशास्त्र शिकले. त्यांच्यापाशी त्यांनी प्रस्थानत्रयीचा अभ्यास केला. यानंतर या शास्त्रात त्यांनी पुढे जी प्रगती केली

ती स्वतःच्या बुद्धीच्या जोरावरच केली होती. अशी त्यांची गुरुपरंपरा आहे.

**प्रश्न - त्यावेळी इंग्रजी शिक्षणाची सोय होती, तरी पारंपरिक विद्या शिकावी, अशी प्रेरणा स्वामीजींना कशी झाली?**

**उत्तर -** ते मूळचे कुलाबा जिल्ह्यातील एका खेड्यात राहणारे. त्यांचे वडील शेती करीत असत; पण ते वेदविद्या चांगले शिकलेले होते. घरची गरिबी होती म्हणून ते घर सोडून शिकण्यासाठी म्हणून दुसरीकडे - मिरजेला - आले. मिरजेहून वाईला आले. अत्यंत गरिबीची परिस्थिती आणि संस्कार अतिशय जुने. इंग्रजी विद्या शिकू नये या परंपरेतील ते होते. म्हणून इंग्रजी विद्येकडे न वळता ते शास्त्रांकडे आणि वेदांकडेच वळले; परंतु पुढे काही काळाने त्यांच्या हे लक्षात आले की, इंग्रजी विद्या शिकलीच पाहिजे. पण वाईत आल्यानंतर, बरेच अध्ययन झाल्यानंतर १८९८ च्या सुमाराला त्यांनी पाठशाळा सुरू केली होती. आणि पाठशाळा सुरू करणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने केवळ अध्ययन करणे नव्हते. विद्यार्थ्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून ते सदैव झटत असत. विद्यार्थी कुठे राहतात, खाता-पितात, याकडे त्यांचे बारीक लक्ष होते. ते स्वतः ब्रह्मचारी होते; पण विद्यार्थीवर्ग आणि पाठशाळा हाच त्यांनी आपला गृहस्थाश्रम म्हणून मानला होता. त्याच्यात आपले सबंध लक्ष त्यांनी घातले. पुढे मराठीत विज्ञानावरची जी पुस्तके भाषांतरित झाली होती किंवा संग्रहरूपाने किंवा संक्षेपरूपाने प्रसिद्ध झाली होती - भौतिकी, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी विज्ञानावर अनेक पुस्तके तेव्हा मराठीत झाली होती - स्पेन्सर, मिल, सिजविक यांचे ग्रंथ मराठीत भाषांतरित झाले होते - हे सर्व स्वामीजी वाचू लागले. अगोदर वेदविद्या आणि विशेषतः नव्यन्यायासारखी शास्त्रे चांगले शिकले असल्यामुळे ही इंग्रजी विद्या त्यांच्या बुद्धीला आकर्षक वाटली. तिच्यात ते रमू लागले. त्यांनी इंग्रजी शिकण्याचा काही प्रयत्नही केला. पाच-सहा महिने शिकत होते; पण त्यांना ते फारसे जमले नाही. मी जेव्हा लहानपणी १९१४ साली वाईला आलो तेव्हा ते इंग्रजी पाठ घेत होते; परंतु सगळे लक्ष पाठशाळेकडे असल्यामुळे त्यांना ते जमले नाही; पण पश्चिमी विचारांचा आशय आणि त्यांच्या मनावर होणारे संस्कार यांच्याविषयी त्यांच्या मनात अतिशय आदर निर्माण झाला. ती विचारसरणी त्यांना अतिशय आवडायला लागली.

**प्रश्न - स्वामीजी शिकत होते तेव्हा त्यांचा चरितार्थ कसा चालायचा? आणि पुढे पाठशाळेत विद्यार्थ्यांच्या उपजीविकेची सोय काय होती?**

**उत्तर -** त्यावेळेस वाईमधली विद्यार्थ्यांना 'भिक्षा' घालण्याची परंपरेने चालत आलेली प्रथा फार चांगली होती. विद्यार्थी दहा-बारा घरी गेला की, दोन्ही वेळचे पुरेसे अन्न त्याच्या झोळीत पडत असे. स्वामीजींची परिस्थिती अतिशय गरिबीची असल्यामुळे ते याच पद्धतीने भिक्षा मागत असत. भिक्षा मागून शिकत असत. शिकविण्यासाठी काही घ्यायचे नाही ही परंपराही त्यांनी पुढे उत्तम रीतीने सांभाळली. यामुळे त्यांचे सबंध आयुष्य भिक्षेवरच गेले. भिक्षा हेच त्यांचे शेवटपर्यंतचे उपजीविकेचे साधन राहिले. शेवटपर्यंत त्यांचा एक विचार असा होता की, आपण

गृहस्थाश्रम मानाने करू शकणार नाही. वकील, डॉक्टर, जमीनदार, सावकार यासारख्या सधन गृहस्थांवर भिक्षुकी स्थितीत आपल्याला अवलंबून राहावे लागेल. त्यापेक्षा आपण आयुष्यभर नैष्ठिक ब्रह्मचर्याने राहू. अशी प्रतिज्ञा घेऊन मानाने जगणे त्यांना श्रेयस्कर वाटले. त्यांच्या नैष्ठिक ब्रह्मचर्याला अतिशय पोषक असे वातावरण वाईमध्ये होते. अनेक संन्यासी येथे राहत - विद्वान आणि फार सच्चरित्र संन्यासी - विशेषतः त्यांचे गुरू प्रज्ञानंद सरस्वती हे वयाच्या पस्तिसाव्या वर्षी विधुर झाल्यानंतर संन्यासी झाले. त्यांची वृत्ती, जीवनाकडे बघण्याचा त्यांचा शांत, पवित्र दृष्टिकोन यांचा स्वामीजींवर फार परिणाम झाला. त्यांच्यापाशी उपनिषदे आणि शांकरभाष्य शिकत असताना एकदम तैत्तिरीय उपनिषदातील वाक्य पुढे आले. 'सत्यम् ज्ञानमनन्तम् ब्रह्म' या वाक्यावरचे प्रवचन ऐकत असताना त्यांना एकदम साक्षात्कार झाला. त्यांनी कायम ब्रह्मचर्य पाळायचे व शेवटी संन्यास घ्यायचा असा निर्णय घेतला. ही त्यांच्या आयुष्याची पार्श्वभूमी आहे.

**प्रश्न - पण नंतर त्यांनी जी प्राज्ञपाठशाळा सुरू केली ती वेगळ्या प्रकारची, आधुनिक स्वरूपाची संस्था होती असे मला वाटते. कारण आपल्या परंपरेप्रमाणे जो कुणी अधिकारी ज्ञानी असेल त्याच्याकडे विद्यार्थी जात आणि तो त्यांना त्यांच्याकडून काही न घेता शिकवीत असे. याप्रमाणे स्वामीजींकडे काही विद्यार्थी जमले असणार. पण एक संस्था सुरू करावी, तिचे सातत्य राखावे, विद्यार्थ्यांची व अध्यापकांची सोय करावी या स्वरूपाची व्यवस्था आपल्याकडे पूर्वी होती का? की ही स्वामीजींना नवी प्रेरणा झाली?**

**उत्तर -** पाठशाळापद्धती ही जुनीच होती. तिला अनुसरून त्यांनी पाठशाळा स्थापन केली. गुरूने विद्यार्थ्यांच्या योगक्षेमाकडे लक्ष द्यावे ही जुनी परंपराच आहे. विद्यार्थ्यांच्या चोवीस तासांच्या जीवनक्रमावर लक्ष ठेवणे, त्याला वळण लावणे, ज्याला आचारधर्म म्हणतात तो त्यांच्यात मुरविणे, त्यांच्यामध्ये पवित्र जीवनपद्धती निर्माण करणे हा दृष्टिकोन जुनाच आहे; पण मी अगोदर सांगितल्याप्रमाणे समाजशास्त्र स्पेन्सर, लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाचा प्रवर्तक मिल यांचे ग्रंथ वाचल्यानंतर त्यांना असे वाटू लागले की, विद्यार्थ्यांच्या ठिकाणी नवे विचार यावेत, नवा दृष्टिकोनही यावा. तथापि स्वामीजींचा दृष्टिकोन समन्वयात्मक होता. परंपरा राखावी, परंपरेतील थोर मूल्ये राखावी; पण विचार जो आहे तो पुढे न्यावा असा हा दृष्टिकोन होता. आपल्या देशात विज्ञान निर्माण झाले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यांनी विज्ञानावरची अनेक पुस्तके जमविली होती. उदा. 'साऊंड' - ध्वनी - हे पुस्तक त्यांनी उत्तम रीतीने वाचले होते, तसेच विद्युतशास्त्रावरील पुस्तके त्यांनी वाचली होती. स्वतः प्रयोग करून ही पुस्तके ते विद्यार्थ्यांना शिकवीत असत. असा त्यांचा एकंदर दृष्टिकोन असल्यामुळे ते हळूहळू स्वतःही बदलत गेले व त्यांच्याभोवती जमलेले आम्ही जे विद्यार्थी होतो ते आम्हीही बदलत गेलो.

पण विशेष सांगायची गोष्ट अशी की, पाठशाळेला हा जो नवीन आधुनिक आकार आला तो तळेगाव दाभाडे - पुणे - मुंबई मार्गावरील तळेगाव - येथे समर्थ विद्यालय म्हणून जी राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन झाली होती तिच्यामुळे. या विद्यालयात सशस्त्र क्रांतिकारक शिक्षक आणि

विद्यार्थी जमले होते. हे विद्यालय जेव्हा भारत सरकारने बंद पाडले तेव्हा त्याच्यातील अनेक विद्यार्थी व शिक्षक प्राज्ञपाठशाळेत आले. उदा. दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर आणि असे अनेक विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेत येऊन राहू लागले. त्यांना असे वाटत असे की, क्रांतीच्या मागे वेदान्ताची प्रेरणा पाहिजे. खुदिराम बोस भगवद्गीता हृदयाशी धरून फासावर गेला, ही कथा आम्ही त्यांच्या तोंडून नेहमी ऐकत असू. पहिले महायुद्ध सुरू होण्याचा तो काळ होता. भारतामध्ये मोठमोठ्या क्रांतिकारक प्रवृत्ती सुरू झाल्या होत्या. गट निर्माण झाले होते. त्या गटामध्ये प्राज्ञपाठशाळेतील काही माणसे सामील झाली होती. भारत प्रगत व्हायचा तर भारतामध्ये नवीन राजकीय आणि सामाजिक विचार आले पाहिजेत, एकराष्ट्रीयत्वाची भावना बाणली पाहिजे अशी तीव्र जाणीव या मंडळीत होती. प्राज्ञपाठशाळेचे वातावरण असे राष्ट्रीय होते. इथे गांधीवाद उशिरा आला. विनोबा भावे १९१७ साली प्रस्थानत्रयी शिकण्यासाठी इथे आले. येथे ते सात-आठ महिने राहिले. अगोदरच त्यांची चांगली तयारी होती. त्यांनी शांकरभाष्य स्वामींच्याकडे ऐकले आणि त्यांच्याबरोबर गांधीविचार प्राज्ञपाठशाळेत आला. असे अनेक आधुनिक विचार, राष्ट्रीय प्रेरणा देणारे विचार इथे आल्यामुळे इथे एक नवीन वातावरण तयार झाले होते. त्यामुळे धर्मसुधारणा आणि सामाजिक सुधारणा यांनाही फार महत्त्व आहे, असा दृष्टिकोन येथे निर्माण झाला.

**प्रश्न - एक गौण प्रश्न. स्वामीजींनी आधुनिक ध्वनिशास्त्राचा अभ्यास केला होता. आता वैशेषिक दर्शनात ध्वनीसंबंधी काही विचार आहे. उदा. ध्वनी हा आकाशाचा गुण आहे इत्यादी. मग हा विचार स्वामीजींनी त्याज्य मानला होता का? या स्वरूपाचे जे काही विज्ञानविषयक सिद्धांत आपल्या पारंपरिक शास्त्रात होते, जे अनुभवाने आणि अनुभवावर आधारलेल्या उपपत्तीने खंडित झाले आहेत, त्यांचा आता ऐतिहासिक दृष्टीनेच अभ्यास झाला पाहिजे. एकेकाळच्या वैज्ञानिक उपपत्ती कशा होत्या याची माहिती देण्यापुरतेच महत्त्व आता त्यांना आहे, असे स्वामीजी मानीत होते? की ही पारंपरिक शास्त्रे त्यांच्या पारंपरिक स्वरूपात आपण शिकत राहिले पाहिजे, असे त्यांचे मत होते?**

**उत्तर -** ती शास्त्रे परंपरेने शिकलीच पाहिजेत आणि व्यवस्थित चाललीच पाहिजेत; पण या शास्त्रातील जे भौतिकी, वैज्ञानिक विचार आहेत ते बदलले पाहिजेत, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे पारंपरिक शास्त्र शिकवायचे तर त्याच्यामध्ये नवीन, निराळा अर्थ भरायचा नाही, त्याचा जो अर्थ आहे तोच स्पष्ट करायचा; पण नवीन विचारांचा स्वीकार करायचा अशी त्यांची भूमिका होती. ते होते खरे वेदान्ती. सृष्टीबद्दलचे जे विविध विचार आहेत ते विचार शेवटी अंतिम जे तत्त्व आहे तेथे पोहोचविणारे आहेत, म्हणून ते विकल्पाने स्वीकारले पाहिजेत, असा विचार ते सांगत असत. यामुळे त्यांनी मला प्रथम जी वेदान्तातील कारिका सांगितली, सुरेश्वराचार्यांची कारिका, ती म्हणजे -

यया यया भवेत् पुंसां व्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि ।
सा सैव प्रक्रिया ज्ञेया साध्वी सा चानवस्थिता ।।

म्हणजे जी जी विचारसरणी जे अंतिम तत्त्व (प्रत्यगात्मन्) आहे त्याचा बोध करण्याला उपयुक्त ठरेल ती, ती चांगली आहे; पण अशी कोणतीही एकच निश्चित विचारसरणी नाही, अशा अनेक चांगल्या विचारसरणी असू शकतील आणि त्यांच्यात परस्परविरोध असू शकेल. आत्मशुद्धीला आणि शेवटच्या, अंतिम सत्याच्या बोधाला सगळया विद्या उपकारक ठरतात असे त्यांचे मत होते. उदा. ते काय सांगत, की गांधर्व विद्या, म्हणजे संगीत विद्या ही जे ऐहिक विषयोपभोग आहेत त्यांच्याशी संबंधित आहे; परंतु याज्ञवल्क्यस्मृतीत सांगितल्याप्रमाणे 'वीणावादनंतत्त्वज्ञः' म्हणजे वीणावादनतत्त्वज्ञ जो आहे, स्वरशास्त्रज्ञ जो आहे तोसुद्धा परमार्थसाक्षात्काराला अधिकारी होतो, हा दृष्टिकोन त्यांनी सांगितला होता. म्हणजे सगळे जीवनामध्ये विश्वाविषयीचे जे वेगवेगळे विचार आहेत ते एकाच महान सत्याच्या वेगवेगळया भागांचे विचार आहेत, असा त्यांचा दृष्टिकोन असल्यामुळे ते त्या त्या शास्त्रांचे ते ते अर्थ मानीत, त्यांना मर्यादा आहेत, ते काही प्रमाणात चूक असतील हे ते स्वीकारीत. शंकराचार्यांचे एक वाक्य ते सांगत असत. 'नहि अयं सृष्ट्यादिप्रपंचः प्रतिपिपादयिषतः, न तत्प्रतिबद्धः कश्चित् पुरुषार्थोऽस्ति ।' हा सृष्टीचा प्रपंच कसा आहे हे सांगणे हे वेदांचे कार्य नाही. सृष्टीच्या प्रपंचाविषयी वेदांत जे सांगितले आहे तो उपाय आहे, उपाय कसला, तर अंतिम तत्त्व जे आहे त्याच्याकडे पोहोचण्याचा. म्हणून त्याचा स्वीकार करायचा. सगळया विद्या, सगळी शास्त्रे, सगळया कला शेवटी त्या अंतिम तत्त्वाचा साक्षात्कार करून देतात असा त्यांचा दृष्टिकोन होता.

'मृल्लोहविस्फुलिङगाद्यैः सृष्टिर्या चोदितान्यथा ।
उपायः सोवताराय नास्ति भेदः कथंचन ।।'

ते अद्वैतवादी होते; पण ते अद्वैत, म्हणजे शास्त्रार्थपद्धतीने अद्वैत सिद्ध करता येते; आणि दुसरा मार्ग सिद्ध करता येत नाही, असे ते म्हणत नसत. ते मध्वाचार्यांचे विचार मोठ्या आनंदाने शिकवीत. त्याचप्रमाणे विशिष्टाद्वैतही अगदी प्रसन्न रीतीने शिकवीत. कारण त्यांना असे वाटत असे की, हे सगळे शेवटी आपल्याला त्या बोधाकडे नेते असा त्यांचा अध्यात्मवादी दृष्टिकोन असल्यामुळे आधुनिक शास्त्र, आधुनिक विद्या यांच्याविषयी त्यांना फार आदर होता आणि या विद्या पुढे गेल्या पाहिजेत, असा त्यांचा विचार होता.

**प्रश्न - आता धर्मसुधारणेकडे वळू या. तर धर्मसुधारणा झाली पाहिजे, असे त्यांना कशामुळे वाटू लागले? धर्मसुधारणा करण्यामागच्या त्यांच्या प्रेरणा काय होत्या?**

**उत्तर -** हा अगदी मूलगामी प्रश्न आहे. मूलगामी म्हणण्याचे कारण असे की, राजा राममोहन रॉय, जोतिबा फुले यांच्यासारखे जे भारतातले, महाराष्ट्रातले महापुरुष धर्मसुधारणेकडे वळले आणि त्यानंतरचे आगरकर वगैरे सुधारक, त्यांचा दृष्टिकोन कसा होता? तर समाजामध्ये अन्याय

होतो आहे, लोक दुःखीकष्टी आहेत, त्यांची दैना होते आहे, स्त्रियांचे पारतंत्र्य असह्य आहे, दलितांवर कायमचा अन्याय होत आहे असा त्यांचा दृष्टिकोन होता. हा स्वामीजींचा पहिल्यांदा प्रेरक दृष्टिकोन नव्हता. जरी हे वेदान्ती होते, परमार्थी होते, तरी त्यांच्यावर पहिला प्रभाव जो पडला तो राष्ट्रवादाचा. हे राष्ट्र एकजीव आणि एकसंघ बनायचे तर समाज बदलला पाहिजे. या राष्ट्रामध्ये जो भेदभाव आहे, उच्चनीचभाव आहे, त्यामध्ये एकतेचा दृष्टिकोन नसल्यामुळे येथे एकराष्ट्रीयत्व नाही आणि एकराष्ट्रीयत्व नसेल तर या प्रचंड ब्रिटिश साम्राज्यसत्तेशी आपण मुकाबला करू शकणार नाही. तेव्हा येथे राष्ट्रीय एकतेची जाणीव निर्माण केली पाहिजे आणि तिची पायाभरणी करायची तर समाजसुधारणा, समाजपरिवर्तन, धार्मिक परंपरेतील परिवर्तन घडवून आणले पाहिजे असा त्यांचा विचार होता. बाकीच्या समाजसुधारकांचा जो न्यायाचा दृष्टिकोन होता तो त्यांनी मान्य केला होता; पण स्वामींभोवती जे वातावरण होते ते क्रांतिकारकांचे होते आणि त्यांच्यामध्ये ते तन्मय होऊन गेले होते. याचे एक कारण असे असावे की, ज्यांच्या हातून पेशवाई निसटली त्या लोकांपैकीच ते होते. त्यामुळे ही निसटलेली पेशवाई का निसटावी? आपल्यातच काही दोष आहे, आपल्यामध्ये राष्ट्रीय एकता नाही, आपल्या जीवनामध्ये सर्वांनी एकत्र यावे, राष्ट्राचे रक्षण करावे, राष्ट्राकरिता लढावे ही प्रेरणा नाही. याचा त्यांच्यावर प्रभाव पडला असे माझे अनुमान आहे. मी याविषयी त्यांच्याशी चर्चा केलेली नाही; परंतु ते जेव्हा पहिल्या एका परिषदेमध्ये गेले, ब्राह्मण परिषद म्हणून अकोल्याला १९२७ साली त्यांच्याच अध्यक्षतेखाली भरली होती, तिच्यात त्यांनी जे भाषण केले त्याच्यात त्यांनी असे सांगितले की, मानवजात एक आहे, असा त्यांनी विचार सांगितला. ही नैतिक भावना त्यांनी व्यक्त केली. याचा अर्थ असा की, त्यांच्या राष्ट्रीय एकतेच्या भावनेमागे काही एक नैतिक जाणीव होती; परंतु झाला कसा हा विचार? हा प्रवास कसा सुरू झाला? तर त्यांचा प्रथमप्रवासबिंदू जर कोणता असेल तर तो म्हणजे राष्ट्रीय एकता. आपली सत्ता गेली, आपली पेशवाई गेली, आपली मराठेशाही गेली याच्याबद्दलचे जे दुःख होते ते मुख्य होते, असे मला वाटते.

**प्रश्न - या जाणिवेमागे स्पेन्सर आणि मिल यांचे त्यांनी जे वाचन केले होते त्याचा काही प्रभाव असू शकेल का? प्रश्न असा आहे की, तुम्ही ज्याला भेदभाव म्हणता, उच्च-नीच भाव म्हणता त्याला आपल्या धर्मशास्त्राप्रमाणे प्रामाण्य आहे. तेव्हा हे धर्मशास्त्र बाजूला सारून किंवा त्याचा नवीन अर्थ लावून ही एकता निर्माण केली पाहिजे. राष्ट्रीय चैतन्यासाठी. याच्यामागेसुद्धा एक नवीन विचार आहे.**

**उत्तर -** धर्मशास्त्राचे त्यांचे अध्ययन सखोल होते. वेदांपासून तो अगदी अठराव्या शतकातल्या ग्रंथांपर्यंत त्यांनी अध्ययन केले होते. त्यामुळे त्यांना असे दिसले की, आपला धर्म वेळोवेळी परिवर्तन पावलेला आहे. जातिभेदाला पारलौकिक महत्त्व आहे आणि जातिभेद हा देवनिर्मित आहे असे म्हणता येत नाही. या गोष्टीवर त्यांचा कधीच विश्वास नव्हता. कारण एके काळी जाती नव्हत्या आणि वर्ण जे आहेत ते बदलत होते असे पुराणवाचनानंतर त्यांचे निश्चित मत झाले होते. श्रीमद्भागवत जे आहे, वैष्णव भागवत, त्याचे ते पारायण करीत असत. वर्षाच्या काठी सात

दिवस ते भागवत सांगायचे, सकाळी चार तास भागवत वाचायचे व दुपारी चार तास चूर्णिका, म्हणजे भागवताचे गद्य, त्याचे भाषांतर करून ते मराठीत सांगायचे. असा त्यांचा एक वार्षिक कार्यक्रम असे. भागवतामध्ये निरनिराळे वर्ण खालीवर गेले याविषयीचे आधार फार सापडतात. अनेक गोत्रांची, महर्षींची, मोठमोठ्या सप्तर्षींची अशी उदाहरणे त्यांना त्यात सापडली. यावरून त्यांची खात्री पटली की, हा काही जातिनिष्ठ समाज नाही. हा समाज एकेकाळी बदलणारा असा होता व म्हणून आपण जातिसंस्था बदलू शकतो. त्याचप्रमाणे प्रौढविवाह. त्यांनी वाचलेले, पुनर्विवाहाविषयीची धर्मशास्त्रातील वाक्ये वाचलेली, त्याचप्रमाणे घटस्फोटाविषयीची वाक्ये नारदस्मृतीतील वाचलेली; तेव्हा देशकालपरिस्थितीप्रमाणे हा धर्म बदलतो असा त्यांचा विचार झाला. तेव्हा देशकाल परिस्थितीप्रमाणे आणि समाजाला उपकारक ठरेल अशा रीतीने हा धर्म बदलला पाहिजे ही त्यांची भूमिका दृढ झाली. म्हणजे स्पेन्सरचे व मिलचे ग्रंथ वाचीत असताना त्यांना आपल्याही देशांत मोठे परिवर्तन झालेले आहे, हा समाजही बदलत गेलेला आहे, असा त्यांचा विचार झालेला होता. आणि म्हणून माझ्यासारखा जो विद्यार्थी त्यांच्यापाशी असे - असे अनेक विद्यार्थी होते, महादेवशास्त्री दिवेकर होते, दिनकरशास्त्री कानडे होते. दिनकरशास्त्री कानडे तर सशस्त्र क्रांतिकारकच आयुष्यभर राहिले. नंतर ते काँग्रेसमध्ये गेले, सत्याग्रहात भाग घेतला हे खरे; पण पहिल्या महायुद्धाच्या काळी सशस्त्र क्रांतिकारकांचा जो प्रचंड वर्ग होता त्या वर्गातीलच ते होते. त्यांनी तर येथे शस्त्रास्त्रे आणून ठेवली होती. मॉसर पिस्तुलासारखी सहा-सहा, सात-सात पिस्तुले आणून ठेवली होती, करोल अशी छान ते जवळ बाळगीत होते. तर ही सारी मंडळी समाज बदलला पाहिजे, समाजपरिवर्तन झाले पाहिजे, अशा विचाराची असल्यामुळे स्वामींच्या भोवती असा एक वर्गच निर्माण झाला होता.

या साऱ्या मंडळीत मी सर्वांत लहान. मी धर्मशास्त्र वाचीत होतो, विशेषतः मी त्यांचा न्यायाचा आणि वेदान्ताचा विद्यार्थी. मी या प्रश्नांकडे अधिक कठोर रीतीने पाहत असे; पण माझेही विचार ते ऐकून घेत असत. मी आगरकरांच्या विचारांना फारच उचलून धरीत होतो. कित्येक वेळा ते फारच रागावले आहेत माझ्यावर. माझा एक विद्यार्थी महादेव गोखले - गोखल्यांचे एक घराणे आहे मिरजेला, गवई घराणे आहे. त्यातला महादेव हा माझा न्यायशास्त्राचा विद्यार्थी. त्याला आगरकरांचे विचार आमच्या इथल्या एका साप्ताहिक सभेत मी मांडायला सांगितले. आगरकरांचे पाखंडी विचार ऐकून स्वामी अतिशय गरम झाले. नंतर त्यांनी सांगितले की, हे असे बोलायचे नाही. मी त्यांना म्हटले की, तुम्ही स्पेन्सर आणि मिल वाचायला सांगता. आता आगरकरांनी आपल्या समाजावर प्रत्यक्ष टीका केली आहे; पण त्या टीकेचे मूळ स्पेन्सर व मिल आहे. मग इतके रागवायचे कारण काय? मग ते शांत झाले. त्यांची वृत्ती शांत होती; पण अशी मतभेदाची आणि गरम होण्याची पाळीही यायची.

**प्रश्न - पण शास्त्रीजी, तुम्ही सुचविता आहात तितके हे सोपे नाही. कारण शेकडो वर्षे हे सारे ग्रंथ पंडितांपुढे होते, त्यांचा त्यांनी कसून अभ्यास केला होता. पण स्वामीजींपूर्वी**

**आणि त्यांच्यासारख्या विचारांच्या मंडळीपूर्वी कुणीही हा आपला धर्म परिवर्तन पावत आलेला आहे असे म्हटलेले नाही. या ग्रंथांपासून असे निष्कर्ष काढण्याची प्रवृत्ती नव्हती. कारण हा ऐतिहासिक दृष्टिकोन नव्हता. तेव्हा ही स्वामीजींची नवीन 'कॉंट्रिब्युशन' आहे की नाही?**

**उत्तर -** ही स्वामीजींची नवीन 'कॉंट्रिब्युशन' आहे. काय आहे, असे थोडे थोडे शास्त्री झाले आहेत. उदा. राजारामशास्त्री भागवत होऊन गेले. ते शास्त्री होते. त्याचप्रमाणे शास्त्री म्हणून नव्हत; पण पारंपरिक विद्येमध्ये प्रवीण असलेले लोकहितवादी होते. 'स्वाध्याय' हे जे लोकहितवादीचे पुस्तक आहे - टिंगल उडविणारे - ते स्वामींनी वाचलेले होते; पण महाराष्ट्रातील या परंपरेला स्वामींच्या पाठशाळेमुळे आणि चांगले शिकलेले विद्यार्थी त्यांच्याभोवती जमल्यामुळे - म्हणजे त्यांनी शिकवून तयार केल्यामुळे - सामर्थ्य प्राप्त झाले. पण माझे म्हणणे असे आहे की, अशा चळवळीमागे जी उत्कट उत्कंठा आवश्यक असते ती या चळवळीमागची उत्कंठा राजकीय होती. या उत्कंठेच्या बाहेर जाऊन या देशात विचार करणारे जे सुधारक झाले ते मागे पडले. ही परिस्थिती दिसत होती. स्वामीजी धर्मसुधारक होते पण ते बंधनात होते; पण त्या बंधनाच्या मर्यादेपर्यंत अशा ठिकाणी ते आले होते की, त्या बंधनाच्या एकदम पलीकडे ते काही प्रमाणात जाऊ शकले; पण मोठ्या प्रमाणात नाही. हिंदू महासभेची चळवळ सुरू झाली होती. हिंदू महासभा ही सावरकरांची प्रेरणा घेऊन पुढे आलेली होती. त्याचाही त्यांच्या मनावर प्रभाव पडला होता, म्हणून हिंदूधर्मसुधारणा ही आवश्यक आहे ही गोष्ट मान्य होत चालली होती.

**प्रश्न - म्हणजे आता हिंदुधर्मशास्त्राविषयीच्या दोन भूमिका पुढे आल्या. एक परिवर्तनवादी, देशकाल परिस्थितीप्रमाणे धर्म बदलतो. स्मृतिकारांनी किंवा धर्मशास्त्रकारांनी वारंवार जसजशी परिस्थिती बदलली त्याप्रमाणे धर्म बदलत आणलेला आहे आणि आता जी परिस्थिती आहे तिला अनुसरून धर्मात परत परिवर्तन केले पाहिजे हा एक दृष्टिकोन. आणि धर्म अपरिवर्तनीय आहे असे समजणारा तो दुसरा दृष्टिकोन. या दुसऱ्या दृष्टिकोनाला 'समन्वयवादी' असे म्हणता येईल का?**

**उत्तर -** असे म्हणता येईल.

**प्रश्न - तेव्हा परिवर्तनवादी आणि समन्वयवादी अशा या दोन भूमिका. आता हिंदुधर्मशास्त्राची मूळची, स्वतःची, 'ऑथेन्टिक' भूमिका समन्वयवादी होती, नाही का?**

**उत्तर -** होय. तुम्ही जिला समन्वयवादी असे नाव दिले आहे ती दृष्टी म्हणजे मीमांसापद्धती, आणि आमचे वाईकर आणि महाराष्ट्रातील इतर धर्मसुधारणावादी शास्त्री - पंडित यांचा जसा एक गट होता तसाच शास्त्री-पंडितांचा एक फार मोठा गट समन्वयवादी दृष्टीचा, धर्म हा अपरिवर्तनीय आहे असे मानणारा होता. शास्त्रात जो धर्म सांगितला आहे त्या धर्माप्रमाणेच आजची जातिसंस्था आहे, विवाहसंस्था आहे, बालविवाहाची प्रथा आहे, विधवाविवाहनिषेध आहे, वधू-वरांच्या वयांमध्ये बदल करता कामा नये, शास्त्रात जे वय विवाहाचे म्हणून सांगितले

आहे तेच पाळले पाहिजे, जाती-जातीत आणि पोटजातीतसुद्धा लग्ने होता कामा नयेत अशा तऱ्हेच्या विचारांचे समर्थन करणारे जे परंपरावादी पंडित होते त्यांचा फार मोठा गट आमच्या काळी होता, म्हणजे वीस-पंचवीस साली जेव्हा आम्ही धर्मसुधारणावाद सांगू लागलो तेव्हा होता. पूर्वमीमांसापद्धती म्हणजे मीमांसापद्धतीचा अवलंब करून सबंध शास्त्रांचा समन्वय केला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. हा समन्वय म्हणजे असा की, श्रुति, स्मृति आणि त्यानंतर झालेले निबंधग्रंथ यांच्यात कोणत्याही तऱ्हेने जे सांगितले आहे ते मान्य केले पाहिजे. श्रुति-स्मृतिपुराणे यांच्यामध्ये सुसंगती आहे, एक विचार आहे, विरोध नाही, कालमानाप्रमाणे धर्मात बदल झालेला आहे याचा अर्थ असा की, कोणत्या काळी काय बदल करावा हे त्यात सांगितलेले आहे. म्हणजे कलियुगामध्ये कसे वागावे हे त्यात सांगितले आहे, द्वापारयुगात कसे वागावे हे त्यात सांगितले आहे, असे चारही युगांचे धर्म सांगितले असल्यामुळे शास्त्रात विसंगती नसते आणि विसंगती जर आढळली तर ती केवळ दिसणारी विसंगती असते, खरी विसंगती नसते, शास्त्रात सुसंगतीच आहे. आजचा जो रूढ, सनातनी, परंपरावादी धर्म आहे तो श्रुति-स्मृतिपुराणांशी सुसंगत असाच आहे, त्याच्यापेक्षा वेगळा नाही, असा हा समन्वयवादी दृष्टिकोन होता आणि वेदांमध्ये सांगितलेले जे धर्म आहेत ते धर्म अपरिवर्तनीय आहेत, वेद हा पूर्ण प्रमाण आहे. अपौरुषेय आहे - म्हणजे माणसांनी केलेला नाही, ईश्वराने केलेला आहे किंवा तो कुणी केलेलाच नाही, अनादिसिद्ध आहे. म्हणून हा वेद प्रमाण होय. स्मृति आणि पुराणे यांच्यामध्ये निराळे विचार, निराळे धर्म, निराळ्या तऱ्हेचे आचार सांगितले आहेत; पण तेसुद्धा वेदमूलकच आहेत. काही वेद आपल्याला आता दिसतात, काही दिसत नाहीत; परंतु ज्या ऋषींनी स्मृतिपुराणे सांगितली त्यांना सर्व वेद माहीत होते. जो, जो परंपरागत धर्म आहे तो तो वेदोक्तच आहे. शूद्रांचे, चंडालांचे म्हणजे पतितांचे, आज ज्यांना दलित म्हणतात त्या सर्वांचे आचारधर्म वेदोक्तच आहेत. ते तसेच त्यांनी पाळले पाहिजेत. ते पाळले नाहीत तर पाप लागेल, पाळले तर पुण्य लागेल, पापनाश होईल, असा हा विचार होता. आपल्याला म्हणजे मानवी बुद्धीला धर्मामध्ये परिवर्तन करण्याचा अधिकार नाही, केवळ शास्त्रोक्त, धर्मशास्त्रोक्त जे आहे तेच मान्य केले पाहिजे आणि धर्मशास्त्र म्हणजे श्रुतिस्मृतिपुराणे ; आणि एवढेच नव्हे तर आज जे रूढीने पवित्र मानलेले आचार आहेत ते पवित्र मानावे आणि अपवित्र मानलेले आचार आहेत ते अपवित्र मानावे.

हा आचारधर्मही वेदोक्तच आहे फक्त आज तो अवशिष्ट वेदात सापडत नाही अशी समन्वयवादी भूमिका होती. शास्त्रात परस्परविरोधी वाक्ये सापडली तर त्यांचा कालभेदाने, युगभेदाने सुसंगत अर्थ लावायचा, व्यवस्था लावायची, असा हा समन्वयवादी विचार होता. त्याच्याप्रमाणे मानवी बुद्धीला धर्मशास्त्रात प्रवेश नाही, पूर्णपणे प्रवेश नाही असे नाही. काही प्रवेश आहे. शास्त्रवचनांचा अर्थ कसा लावावा याबाबतीत प्रवेश आहे; पण माणसाला धर्मांत परिवर्तन करता येते, नवा देशकाल पाहून, नवी परिस्थिती पाहून समाजाच्या संरक्षणाकरिता

आणि विकासाकरिता आणि अवनती टाळण्याकरिता नवे धर्म सांगितले पाहिजेत असे जे म्हणणे आहे ते चूक आहे, तो अपराध आहे, शास्त्रांच्या विरुद्ध अपराध आहे, असा दृष्टिकोन समन्वयवादी मीमांसापद्धतीमध्ये येतो. आणि ही मीमांसापद्धती मानणारे काशी, कलकत्ता, मद्रास, त्रिवेन्द्रम, नाशिक या ठिकाणचे पंडित होते. थोडक्यात म्हणजे, मानवी बुद्धीचा प्रवेश धर्मामध्ये परिवर्तनाच्या दृष्टीने होऊ शकत नाही, धर्मग्रंथांचा सुसंगत अर्थ लावणे एवढेच मानवी बुद्धीचे कर्तव्य आहे असा तो विचार आहे. आणि आम्ही, म्हणजे आमच्या स्वामींच्या नेतृत्वाखाली जमलेल्या मंडळींनी मीमांसापद्धती न स्वीकारता इतिहासपद्धती स्वीकारावी, वेद हे माणसांनीच, फक्त थोर आणि पवित्र अशा माणसांनी केलेले आहेत, स्मृति अशाच माणसांनी केलेल्या आहेत, असा दृष्टिकोन मांडला. म्हणजे

'धारणात् धर्मम् इत्याहु: धर्मो धारयति प्रजा:।
यः स्यात् धारणसंयुक्त: स धर्म इति निश्चय: ॥'

हे जे महाभारतातील एक प्रसिद्ध वाक्य आहे त्याच्या दृष्टीने अखेरीस धर्म आणि अधर्म यांची समाजधारणा हीच कसोटी, असा विचार आम्ही मांडला. आणि म्हणून धर्मात मानवी बुद्धीला या दृष्टीने प्रवेश आहे असे आम्ही मानीत होतो. आणि आम्ही आधार काय घेतला तर वेळोवेळी ऋषी परिवर्तन करीत आलेले आहेत; देशातील, समाजातील श्रेष्ठ बुद्धीचे, निष्काम वृत्तीचे पुरुष, कामक्रोध बाजूला सारून, पक्षपात सोडून विचार करणारे पुरुष नवीन धर्म सांगतात आणि त्यांना तो अधिकार आहे. या पायावर आम्ही असा विचार मांडला की, समाजधारणा ही कसोटी आणि सांगणारा हा पक्षपाती नाही, दयावान आहे आणि सर्व भूतांचे क्षेम चिंतणारा आहे, तर त्याला परिवर्तन करण्याचा अधिकार आहे. धर्मपरिवर्तन करण्याचा अधिकार वाटेल त्या मानवी बुद्धीला नाही तर जी बुद्धी समाजहिताच्या दृष्टीने विचार करते आणि समाजहिताच्या दृष्टीने आचरणाला प्रेरणा देते अशी मानवी बुद्धी या ठिकाणी गृहीत धरलेली आहे.

**प्रश्न - याचा अर्थ असा शास्त्रीजी, की तुम्ही लोकांनी स्वामीजींच्या नेतृत्वाखाली परंपरा पूर्णपणे नाकारली. कारण परंपरागत काही आचार असतील; परंतु समजा आजची परिस्थिती काही वेगळी आहे. आता या परिस्थितीत सर्वभूतहिताची काळजी करणारे, अतिशय निष्काम, निर्लोभ, पक्षपाताला ज्यांच्या अंत:करणात थारा नाही अशा व्यक्तींनी नवीन आचाराची काही एक संहिता लोकांपुढे ठेवली, तर तो आजचा धर्म होईल. या नवीन आचाराचा आणि परंपरेने चालत आलेल्या आचाराचा काही संबंध असेलच असे नाही. यामुळे आचारात पूर्णपणे क्रांती करायलाही तुमची भूमिका अनुकूल होती. मग या परंपरेशी सांधा जोडायचा तुम्ही कसा काय प्रयत्न केला? उदा. जातिभेदाला अजिबात थारा देऊ नका, अशी क्रांतिकारक भूमिकाही तुम्हाला स्वीकारता आली असती.**

**उत्तर -** आम्ही जी भूमिका गृहीत धरली तिच्यामध्ये एक मध्यममार्ग स्वीकारला.

आमच्यासमोर जो समाज होता, परंपरा मानणारा, त्याला नवे बदल पाहिजे आहेत; पण मौलिक बदल त्याला काही पचायचे नाहीत आणि ते तो करायचा नाही हे आम्हाला दिसत होते. मग सुधारणेचा सारा प्रयत्न अधांतरी राहतो. उदा. जोतिबा फुले हे अधांतरीच राहिले. जातिभेद सबंध नष्ट करायचा हा त्यांचा मूळचा दृष्टिकोन; पण तो सारा मागे पडला आणि निराळ्याच तऱ्हेने जातिभेदाला महत्त्व आले. ब्राह्मण वगळायचा; पण जात सारखी कडक ठेवायची, असेच त्याचे पर्यवसान झाले. ते होऊ नये म्हणून आम्ही असाच कार्यक्रम आखला, की उदा. पोटजाती ज्या आहेत त्यांच्यात लग्ने होत नव्हती. एकमेकांचे संबंध त्यांच्यात सुधारत नव्हते. ब्राह्मणांत अशा अनेक पोटजाती होत्या, की त्या एकमेकांबरोबर जेवत नसत, एकमेकांना मुली देत नसत. तेव्हा या ब्राह्मण पोटजातींच्या एकीकरणाचा कार्यक्रम आम्ही हाती घेतला. आम्ही सर्वेक्षण केले तेव्हा आम्हाला असे आढळून आले, की महारष्ट्रात ब्राह्मणांच्या सत्तावीस पोटजाती आहेत. त्यांचे एकमेकांविषयी काही चमत्कारिक पूर्वग्रह आहेत.

हे काढून टाकण्याचा आम्ही प्रयत्न केला. आम्ही हा सिद्धांत सांगत अर्थात मांडत होतो की, चातुर्वर्ण्य जे आहे ते काही जातिबद्ध नाही. चातुर्वर्ण्य 'गुण-कर्मविभागशः' आहे, ते नैसर्गिक आहे. अनेक उच्च-नीच असे निरनिराळे व्यवसाय असतात, कित्येक व्यवसायांचे विशिष्ट महत्त्व असते, तेव्हा चातुर्वर्ण्य राहतेच; परंतु कोणतीही जात जी आहे ती कोणत्याही अधिक उच्च मानल्या गेलेल्या जातीचा व्यवसाय करू शकते, अधिक चांगले गुण संपादन करू शकते हा दृष्टिकोन आम्ही मांडत होतो. पण व्यवहारामध्ये आम्ही थोडेसे किंवा पुष्कळ बाबतीमध्ये तडजोडवादी धोरण स्वीकारले होते, असे म्हणता येईल. उदा. विवाहाच्या बाबतीत. विधवाविवाह बऱ्याच पांढरपेशा जातीत रूढ नव्हता. त्याला मान्यता देणारा कायदा झाला होता; पण या कायद्याला महत्त्व दिले जात नव्हते. आम्ही त्याला महत्त्व दिले, त्याचप्रमाणे प्रौढविवाहाला आम्ही महत्त्व दिले. त्याचप्रमाणे आचारधर्म जे आहेत ते खूप लांबलचक होते, ते दोन-दोन, तीन-तीन दिवस चालायचे. उदा. विवाहाचा संस्कार दोन-दोन, तीन-तीन दिवस चालायचा, तर याला फाटा द्या, तो एक तासात, दोन तासांत करा असा विचार आम्ही सांगू लागलो. अशा आम्ही बारक्या, बारक्या सुधारणा, ज्या समाजाला ताबडतोब पचतील आणि समाज ज्या ताबडतोब ग्रहण करील त्या सांगू लागलो. भिन्न जातींमधील लग्ने आम्ही मान्य केली. त्यांची संतती बाजूला पडू नये असा आम्ही विचार सांगितला. अशी आमची तडजोडवादी भूमिका आम्ही मांडत राहिलो..

**प्रश्न - तुमची भूमिका व्यवहारात जरी तडजोडवादी होती तरी तुमची सैद्धांतिक भूमिका पूर्णपणे विवेकवादी (रॅशनलिस्ट) होती, असे म्हणणे योग्य ठरेल की नाही? म्हणजे रॅशनलिस्ट भूमिका आणि तुमची भूमिका यांच्यात सिद्धांताच्या दृष्टीने काही फरक नव्हता.**

**उत्तर -** मला असे म्हणायचे आहे की, आमच्या भूमिकेत परलोकवादी दृष्टिकोन होताच. म्हणजे मोक्ष, पुनर्जन्म अशा तऱ्हेचे हिंदू धर्माचे किंवा बौद्ध, जैन धर्माचे जे सिद्धांत आहेत ते

आम्ही गृहीत धरले, त्यांच्यावर आम्ही टीका केली नाही. या दृष्टीने असे म्हणता येईल की, आम्ही धार्मिक होतो. धर्म आम्ही मानीत होतो. आम्हाला धर्मसुधारणा करायची होती. भौतिकवादी दृष्टिकोन जो आहे तो आम्ही मानीत नव्हतो. ही एक मर्यादा आमच्या विचाराला होती. म्हणून मग स्वामींनी निरनिराळ्या तऱ्हेचे जे संस्कार आहेत, विधी आहेत ते लहान करून टाकले. त्याचा विस्तार नाहीसा केला. यज्ञामध्ये पशुहिंसा करीत असत आतापर्यंत. तर पशुहिंसारहित यज्ञ करा असा विचार सांगितला. पशुहिंसेचा जो आचार आहे तो प्राथमिक समाजस्थितीला जुळेल अशा स्वरूपाचा आहे तेव्हा तो बंद करा, बळी देण्याची प्रथा बंद करा असे आम्ही सांगितले. म्हणजे बुद्धाने जो सांगितला किंवा जैनांनी जो सांगितला तोच विचार आम्ही सांगितला. परंतु बौद्ध धर्म सोडला आणि जैन धर्म पाहिला तर हा जो परंपरागत जातिभेद आहे तो त्यांच्यातही अगदी पक्का दृढ आहे. अस्पृश्यतानिवारणाला स्वामींनी मदत केली. उदा. जेव्हा आम्ही महात्मा गांधींकडे गेलो - ३२ साली - तेव्हा जी मंडळी आमच्याबरोबर होती, त्यांचे नेतृत्व स्वामींकडे होते.

अस्पृश्यतानिवारण झालेच पाहिजे हा दृष्टिकोन त्या ठिकाणी स्वामींनी पत्करला. अस्पृश्यांशी व्यवहार केल्याने पाप लागत नाही, पाप लागते ते उच्च दर्जाच्या नैतिक तत्त्वांशी विरोध केल्याने, त्यांच्या विरुद्ध आचरण केल्याने, आणि या नैतिक तत्त्वाच्या पाठीशी परमेश्वर उभा आहे, असा हा आमचा धर्मसुधारकांचा दृष्टिकोन होता. म्हणून असे म्हणता येईल की, बुद्धिवाद ज्याला म्हणतात, विवेकवाद हल्लीचा अगदी पक्का, परलोकांच्या बाबतीत अज्ञेयवाद स्वीकारणारा किंवा परलोक नाहीच, हाच जन्म आहे असे मानणारा विवेकवाद, तो आमचा दृष्टिकोन नव्हता. स्वामी तर काय होते, ज्याला भौतिकवाद म्हणतात, मटिरिॲलिझम, तो भौतिकवादही एक तऱ्हेचे अद्वैत आहे, असे ते मानीत. भौतिक अद्वैत असा लेख त्यांनी लिहिला आहे, त्याच्यात भौतिक अद्वैतवादाचा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. विचारक्षेत्रात ते अतिशय बंधनरहित रीतीने विचार करीत; परंतु प्रत्यक्ष जीवन जे त्यांचे होते ते अतिशय पारमार्थिक होते, मोक्षवादी होते.

**प्रश्न - तुम्ही आता गांधींचा उल्लेख केला. त्यावरून एक प्रश्न विचारावासा वाटतो. समन्वयवादी किंवा मीमांसावादी शास्त्री-पंडित आणि तुम्ही सुधारक, म्हणजे धर्मसुधारक यांच्यात झालेल्या झटापटीची काही हकिगत सांगा ना.**

**उत्तर -** पहिली झटापट जी झाली ती म्हणजे वाईमध्ये १९२३ साली ब्राह्मण परिषदेत झाली. ब्राह्मण परिषदेमध्ये ब्राह्मण पोटजातीच्या एकीकरणाचा मुद्दा निघाला. त्या मुद्यावर मी उठून उभा राहिलो. मी म्हटले की, ब्राह्मणांच्यामध्ये एकमेकांविषयी ज्या आख्यायिका आहेत - अमुक एक पोटजात का बहिष्कृत करावी, तर परशुरामाने कोळ्यांना पवित्र करून घेऊन त्यांना ब्राह्मण बनविले म्हणून, तेव्हा त्यांच्याशी विवाह करू नयेत किंवा कऱ्हाडे जे आहेत ते (क्षमा करा) विधवापुत्र आहेत अशा तऱ्हेच्या अनेक कथा होत्या - या कथांना मी विरोध केला आणि हा जो स्कंदपुराणातील सह्याद्रिखंड आहे त्याच्यात अशा तऱ्हेच्या चमत्कारिक कथा एकाएका पोटजातीविषयी सांगून या पोटजाती खरोखरच भिन्न आहेत आणि त्यांचे एकमेकांविषयीचे

जे आचार आहेत त्यांना प्रामाण्य आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यालाही मी विरोध केला. त्या कथा मी तेथे सांगितल्या. अमुक एक जात कोळयांची, म्हणजे अंत्यजांची बनलेली आहे, अमुक विधवापुत्र आहेत हे मान्य करू नये असे मी म्हटले. तेव्हा वाईमध्ये त्या सभेत प्रक्षोभ झाला आणि सभा मोडायची पाळी आली.

स्वामी उभे राहिले आणि म्हणाले की, अहो याने जे सांगितले ते म्हणजे धर्मशास्त्रामध्ये ज्याला अर्थवाद म्हणतात तो अर्थवाद त्याने सांगितला. अर्थवाद मानू नये असे धर्मशास्त्रात म्हटलेले आहे, एवढाच त्याचा अर्थ आहे, तेव्हा तुम्ही या बाबतीत इतका आग्रह धरू नका. हा पहिला वाद. दुसरा वाद सोनगीर येथे, धुळयापासून नरढाणा रेल्वे स्टेशनकडे जाणारा मार्ग आहे त्या ठिकाणी सोनगीर नावाचे एक लहानसे खेडे आहे. तेथे केशवदत्त महाराज म्हणून एक बुवा होते. तेथे एक पंडितांची परिषद भरवली. ती म्हणजे कुकुरमुंडे येथील एका वैष्णव संस्थानाचे अधिपती त्यांनी भरवली. त्यांनी भारतातील पाच पीठांचे आचार्य बोलावले होते. गुजरातेतील वल्लभपंथाचे पुष्टिमार्गी आचार्य जे होते त्यांना बोलावले होते, त्याचप्रमाणे शारदापीठाचे शंकराचार्य, तसेच पुरीचे शंकराचार्य मोठे विद्वान, संस्कृतचे, इंग्रजीचे व गणिताचे प्राध्यापक होते ते मद्रासला, त्यांना बोलावले, कुर्तकोटी शंकराचार्य, त्यांना बोलावले, अशी अनेक पीठांचे आचार्य असलेली मंडळी बोलावली. काशी, कलकत्ता, मद्रास येथील मोठमोठे पंडित, अनंतकृष्णशास्त्री कलकत्त्याचे मोठे वेदान्ती पंडित, लक्ष्मणशास्त्री द्रविड, राजेश्वरशास्त्री द्रविड असे लोक जमविले. आणि त्याच्यामध्ये आम्ही जी धर्मसुधारक मंडळी होती त्यांना बोलावून सांगितले की, तुमचा विचार धर्मशास्त्रदृष्ट्या बरोबर आहे की नाही हे तपासायचे आहे. तुम्ही आले पाहिजे. आम्ही गेलो. त्या ठिकाणी शास्त्रार्थ सुरू झाला. स्वामी वादविवाद, भाषणे करीत नसत. आम्हाला ते शिकवीत असत (काही लोकांना सभा नसते, म्हणजे सभा साधत नसते). त्यांचा विद्यार्थी म्हणून मी उभा राहिलो. त्यांनी मला बोलायला सांगितले, त्यांच्या सांगण्यावरून मी पहिल्यांदा शास्त्रार्थ सुरू केला, तो म्हणजे आपण मघाशी जे बोललो, मीमांसापद्धती विरुद्ध ऐतिहासिक पद्धती. ऐतिहासिक पद्धतीचा दृष्टिकोन मी मांडला.

मानवी बुद्धीला धर्मपरिवर्तन करता येते हे ऐतिहासिक पद्धतीने सिद्ध करता येते असे मी सांगितले. वेद, स्मृति, पुराणे यांच्यामध्ये परस्परविरोधी जे आचार सांगितले आहेत ते वेळोवेळी ऋषिमुनींनी कसे बदलले आहेत याचे मी प्रतिपादन केले. ऐतिहासिक पद्धतीच बरोबर आहे हा विचार त्या ठिकाणी मी स्थापन केला. वेद हे पौरुषेय की अपौरुषेय अशी चर्चा त्या ठिकाणी सुरू झाली. तेव्हा मी असे सांगितले की, वेद हे पौरुषेयच आहेत. थोर माणसांनीच केलेले आहेत. म्हणून बदल केला पाहिजे. तेव्हा अनंतकृष्णशास्त्री हे महापंडित उभे राहिले आणि म्हणाले की, भगवत्पूज्यवाद आचार्यांनी, म्हणजे शंकराचार्यांनी 'शास्त्रयोनित्वात्' हे जे ब्रह्मसूत्रातले तिसरे सूत्र आहे त्या सूत्रावरील भाष्यात असे म्हटलेले आहे की, वेद हा स्वयंसिद्ध प्रमाण आहे आणि म्हणून तो मानलाच पाहिजे. मग मी एकदम उठून उभा राहिलो आणि म्हटले की, शंकराचार्य हे

जे आहेत तेसुद्धा माणूसच आहेत. त्यांची वाक्ये जी आहेत ती माणसाची वाक्ये धरली पाहिजेत, ती काही त्रिकालदर्शी ऋषींची वाक्ये नाहीत. असे म्हटल्याबरोबर एकदम क्षोभ झाला व सभा मोडायची पाळी आली. तेव्हा आमचे स्वामी उभे राहिले आणि म्हणाले की, आपली जी पद्धती आहे, दार्शनिक पद्धती, ती अशी आहे की, चार्वाकाचा पक्षसुद्धा पूर्वपक्ष म्हणून मांडायचा - शंकराचार्यांनी मांडलेला आहे - बौद्ध पूर्वपक्ष मांडायचा, बौद्ध व जैन हे अवैदिक, त्यांचेही मत मांडायचे. त्याप्रमाणे लक्ष्मणने हा पूर्वपक्ष मांडला आहे. तेव्हा सभा न मोडलेली बरी. मंडळींनी हे मानले आणि शास्त्रार्थ पुढे चालू राहिला.

**प्रश्न - गांधीजींच्या आणि स्वामींच्या काही गाठी पडल्या होत्या, असे तुम्ही मघाशी म्हणाला. या गाठी कोणत्या निमित्ताने पडल्या?**

**उत्तर -** म. गांधींनी येरवड्यामधून अस्पृश्यतानिवारणाची चळवळ सुरू केली. १९३२ साली. आणि राजकीय चळवळ जी आहे ती जोपर्यंत आपण कारावासात आहोत तोपर्यंत करणार नाही असे आश्वासन त्यांनी सरकारला दिले. अस्पृश्यतानिवारणासाठी गांधींनी अनेक मोठमोठ्या विद्वानांना, देशातल्या विचारवंतांना, नेत्यांना निमंत्रण दिले. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे अस्पृश्यतानिवारण होऊ शकते हा विचार सांगणाऱ्या मंडळींनाही बोलावले. वारंवार सभा होत असत. बाबू भगवानदास, आचार्य आनंदशंकर ध्रुव इत्यादी आधुनिक शिक्षण घेतलेली जी मोठमोठी मंडळी होती त्यांना जसे बोलावले, तसेच जुने जे पंडित, काशी, कलकत्ता, मद्रास, वाई, नाशिक येथील त्यांनाही बोलावले. दोन्ही बाजूंची मंडळी बोलावली. सनातनी मंडळी, अस्पृश्यतानिवारण करणे पाप आहे असे म्हणणारी मंडळी बोलावली आणि अस्पृश्यतानिवारण धर्मशास्त्राप्रमाणे होऊ शकते असे म्हणणाऱ्या मंडळींनाही बोलावले. याच्यामध्ये आम्हा वाईकरांबरोबर स्वामींनाही बोलावले. स्वामींनी चर्चेसाठी यायचे कबूल केले. बाबू भगवानदास होते, प्रि. ध्रुव होते, केशव लक्ष्मण दप्तरी होते, महामहोपाध्याय पाठक अशी मंडळी होती. स्वामींना अकराची वेळ दिली होती. ती त्यांच्या भिक्षेची वेळ. तेव्हा म. गांधींना त्यांनी सांगितले की, "माझी भिक्षेची वेळ झालेली आहे. आता ती मी बदलू शकत नाही." तेव्हा गांधी म्हणाले, "मीच तुम्हाला येथे भिक्षा घालतो." आणि त्याप्रमाणे त्यांना तेथे येरवडा जेलमधील भाकरी आणि वरण दिले. त्यांनी ते खाल्ले. ते म्हणाले, "काय छान लागते आहे, गोड आहे." म. गांधींनीही विचारले, "कसे काय अन्न आहे?" म्हणून. स्वामी म्हणाले, "फार छान आहे." मग चर्चेला सुरुवात झाली.

मुख्य चर्चेचा विषय होता तो असा की, अस्पृश्यतानिवारण धर्मशास्त्रदृष्ट्या होऊ शकते असे म्हणणारे जे धर्मशास्त्रज्ञ पंडित होते त्यांच्या तर्फे एक जाहीरनामा काढायचा होता. गांधींनी 'हरिजन' हे साप्ताहिक सुरू केले होते त्याच्यामध्ये तो जाहीरनामा प्रसिद्ध करायचा होता. तेव्हा जाहीरनाम्याची सूत्रबद्ध मांडणी करायची. मंडळींनी सांगितले की, स्वामींनी ती करावी, स्वामी म्हणाले, की हा इथे शेजारी माझा शिष्य बसला आहे तो ते सगळे लिहील, मी ते तपासीन आणि

मग तुमच्यापुढे सगळे मांडीन. त्याप्रमाणे मी अस्पृश्यतानिवारणाची सिद्धांतपद्धती मांडली, मसुदा तयार केला, स्वामींना दाखवला, त्यांनी तो मान्य केला आणि मग तो दप्तरींना दाखवला. दप्तरींचे म्हणणे असे होते की, आज जी अस्पृश्यता आहे ती केवळ अस्वच्छतेमुळे आहे. तेव्हा अस्वच्छता गेली पाहिजे. म्हणजे ते स्पृश्य होऊ शकतात. म. गांधींना ते मान्य नव्हते. कारण अस्वच्छ सर्वच असतात, असू शकतात अगदी स्वच्छ असे थोडेच लोक असतात. तेव्हा 'हे काही बरोबर नाही', असे म. गांधी म्हणाले. दप्तरी हे ऐकेनात. तेव्हा आम्ही त्यांना बाजूला घेतले. स्वामींनी सांगितले, 'विचार करा. जे आपण शरीराने स्वच्छ आहोत असे म्हणतो ते शरीर स्वच्छ कुठे आहे? ते स्वच्छ नाही. म्हणून, त्यांनी योगसूत्रभाष्यातील एक वाक्य सांगितले. 'कार्य आधेयशौचत्वात् पंडिता ह्यशुचि विदुः' शेवटी दप्तरींनी ते मान्य केले आणि आमच्या सगळयांचा मिळून जाहीरनामा तयार झाला आणि 'हरिजन' च्या तिसऱ्या की चौथ्या अंकामध्ये तो आमच्या सर्वांच्या सह्यानिशी प्रसिद्ध झाला.

जुन्या पंडितांच्या सभा चालूच होत्या. ते गांधीजींकडे मधून मधून यायचे. तेव्हा गांधीजींच्या आज्ञेवरून मला उपस्थित राहावे लागे. एकदा पंचानन तर्करत्न भट्टाचार्य हे महानैय्यायिक तिथे आले. महात्मा गांधींना त्यांनी सांगितले, 'तू इतका थोर, पवित्र महान पुरुष आहेस, तुझी भावना फार चांगली आहे; पण अस्पृश्यता निवारणाचा हा जो तू विचार केलेला आहेस आणि ही जी चळवळ चालविली आहेस ती आपल्या हिंदुधर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे; आणि धर्मशास्त्राच्या विरुद्ध जर पारमार्थिक पुरुषाने आचरण केले तर परमार्थ साधणार नाही. आणि तू तर खरा हिंदू आहेस म्हणून मिरवितोस, तर हे बरोबर नाही,' असे त्यांनी गांधींना सांगितले. गांधींनी मला जी हकिकत सांगितली त्यावरून मी हे सांगतो आहे. त्या दिवशी मी स्वतः हजर नव्हतो.

पंचानन तर्करत्न भट्टाचार्य गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी गेलो तेव्हा गांधींजी म्हणाले, 'तुम्हाला काल बोलवायचे राहिलेच, भट्टाचार्य अचानक आले, चर्चा झाली.' 'काय झाले?' मी विचारले, तर गांधीजी म्हणाले, 'तू खरा हिंदू आहेस, पारमार्थिक आहेस, असे हिंदूधर्मशास्त्राच्या विरुद्ध वर्तन करू नको, पाप लागेल,' असे त्यांनी मला सांगितले. मी महात्माजींना विचारले, 'तुम्ही त्यांना काय उत्तर दिले?' गांधी म्हणाले, 'मी त्यांना सांगितले की, मी इंग्लंडमध्ये होतो, तिथला जो आर्चबिशप आहे त्याच्या लक्षात आले की, माझी बायबलवर फार श्रद्धा आहे. मी ख्रिस्ताला फार मानतो. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तुला खरोखर जर पश्चात्ताप झाला असेल तर तुला इकडेच आले पाहिजे, ख्रिश्चन झाले पाहिजे. तेव्हा मी त्यांना उत्तर दिले की, मी खरा हिंदू राहून खरा ख्रिश्चन राहू शकतो, अशी माझी श्रद्धा आहे. मी ख्रिश्चन धर्मात आल्याने मी दोष केला असे होईल. कारण कोणताही मनुष्य ख्रिस्तावर श्रद्धा ठेवून आपापल्या धर्मात राहू शकतो, असे माझे मत आहे आणि आपला धर्म त्याने सोडला तर ते पाप होईल. तेव्हा ते आर्चबिशप म्हणाले, तू हिंदूच राहा. तू खरा प्रामाणिक माणूस आहेस. ईश्वर तुला क्षमा करील. गांधी पुढे म्हणाले की, मी भट्टाचार्यांना उत्तर दिले की, 'मी खरा हिंदू आहे आणि खरा हिंदू म्हणून जर मी अस्पृश्यता

पाळली तर मी पाप करीन. अस्पृश्यता पाळल्याने माझ्या मोक्षाच्या मार्गामध्ये मी धोंड उभी केली असे होईल, मी पाप उभे केले असे होईल, म्हणून ते पाप नाहीसे करायला मी उभा आहे, नाहीतर मला मोक्ष मिळणार नाही.' एवढे बोलणे झाले असे सांगून गांधीजींनी मला विचारले, 'स्वामीजी पुन्हा कधी येतील?' मी म्हटले, 'स्वामीजी वादविवादामध्ये भाग घेणारे गृहस्थ नाहीत, परमार्थी मनुष्य आहे, ते तुम्हाला सल्ला देऊन गेले, आता वाद करायचा जर झाला तर मी त्यांचा शिष्य आहे, मी वाद करायला उभा आहे तुमच्या शेजारी.' तेव्हा गांधींजी म्हणाले, 'आणखी एक सात-आठ दिवसांमध्ये हिंदुस्तानातील विशेष पंडित बोलावले आहेत आणि त्यांच्याशी वाद आहे, तर उपस्थित राहा.' असे त्यांनी मला उपस्थित राहावयाला सांगितले.

त्या दिवशी, आता मला नेमका दिवस माहीत नाही; पण केसरीमध्ये नरसिंह चिंतामण केळकर हे त्यावेळी संपादक होते. त्यांनी त्यासंबंधाने काही स्वतःचे टीका-टिप्पण केलेले आहे. सकाळी दहाला ही परिषद भरणार होती. दहाला काही मंडळी, त्याप्रमाणे उपस्थित राहिली नाहीत. वैद्य पंचानन कवडीशास्त्री यांच्याकडे ही काशी, कलकत्ता, मद्रास येथील पंडितमंडळी उपस्थित झाली होती. महाराष्ट्रातली शास्त्रीमंडळीही जमली होती. ही मंडळी बरोबर एक वाजता आली. दहाची वेळ काही पाळली नाही. त्यांच्या पूजा-अर्चा वगैरे सगळ्या गोष्टी व्हायच्या होत्या. ती मंडळी आली. दरवाजातून त्यांना एकदम आत घेण्याकरता महात्मा गांधींनी माणसे पाठविली. ते म्हणाले, आम्ही येणार नाही आत असे एकदम. हा कागद घ्या आणि या कागदावर तुम्ही तुमचे जे कोणी पंडित असतील त्यांनी सह्या कराव्यात, तरच आम्ही आत येऊ. महात्माजींनी त्यांना निरोप पाठविला की, 'तुम्ही इथे या, तुमचा कागद आम्हाला दाखवा, आपण चर्चा करू आणि मग त्यावर सह्या होतील.' राजेश्वरशास्त्री त्यांचे पुढारी होते. महान नैय्यायिक. त्यांनी सांगितले की, 'हा वाद आहे आणि त्यामुळे वादामध्ये समयबंध असतो. म्हणजे कोणत्या भूमिका निश्चित मान्य करून पुढे बोलायचे हे समयबंधामध्ये ठरवायचे असते, तर तो समयबंध आम्ही केलेला आहे. त्याशिवाय आसनपरिग्रह शक्य नाही.' हे म्हणणे पुन्हा महात्मा गांधींना कळविले गेले. मी तिथे बसलोच होतो गांधीजींच्या शेजारी. तर गांधींनी उत्तर दिले की, 'अरे, तुम्ही गुरू आहात, मला वाद करायचा नाही; पण मला तुमच्यापासून उपदेश घ्यायचा आहे. समजून घ्यायचे आहे. म्हणून तुम्ही आत या.' त्यावर ते म्हणाले, 'गुरू आणि शिष्य यांचासुद्धा वाद असतो.'

चर्चा म्हणजे वाद आणि त्यांच्यामध्ये काही निश्चित भूमिकेच्या आधारावर पुढचा विचार होत असतो. भूमिका निश्चित नसेल तर विचार आणि वाद होऊ शकत नाहीत. हं तर, 'गुरुशिष्यसब्रह्मचारिभिः वादः प्रयोक्तव्यः' या न्यायसूत्रानुसारे राजेश्वरशास्त्री यांनी अशी समयबंधाची मागणी केली. म्हणून ते म्हणाले, 'हा कागद घ्या आणि सह्या पाठवा.' तो कागद आत आला. त्याच्यामध्ये संस्कृत व हिंदी भाषेत सांगितलेली आठ-नऊ कलमे होती. त्याच्यामध्ये, 'श्रुतिस्मृतिपुराणानाम् प्रामाण्यम्' ही पहिली अट होती. मी म्हटले मान्य आहे. दुसरी गोष्ट, 'श्रुतिस्मृतिपुराणांचा ऐतिहासिक पद्धतीने अर्थ लावायचा नाही. मीमांसापद्धतीनेच अर्थ लावायचा' हे दुसरे कलम होते. तिसरी गोष्ट म्हणजे, 'वादाचा विषय कोणता?' त्याच्यामध्ये

हिंदी आणि संस्कृत दोन्ही प्रकारांनी मांडणी केली होती. गांधींकरता हिंदी आणि आमच्याकरता संस्कृत. तर तिसरा समयबंधातला मुद्दा असा की, आज जी हिंदूंची देवतामंदिरे आहेत, त्यांच्यामध्ये अस्पृश्यांचा प्रवेश होऊ शकतो, असे तुमच्या पंडितांनी मांडायचे आणि प्रवेश होऊ शकत नाही, पाप लागते, असे आम्ही मांडू आणि या मुद्यावर वाद होईल. अशा तऱ्हेचे सात-आठ मुद्दे होते. तेव्हा गांधींच्यापुढे ते मुद्दे मांडल्यावर गांधींनी मला ते दाखविले. मी म्हटले, 'हे सगळं मला मान्य आहे. श्रुतिस्मृतिपुराणानाम् प्रामाण्यम् । मान्य आहे. मीमांसापद्धतीने वाद होईल, ऐतिहासिक पद्धतीने नाही, मान्य आहे. तिसऱ्या मुद्याबद्दल म्हटलं, एक थोडा फरक करावा; आणि तो कोणता? मी म्हटले, संस्कृमध्ये अद्य अस्पृश्यत्वेन अभिमतानाम् । आणि हिंदीमध्ये 'आज माने हुए अछूत ।' असे घाला. म्हणजेच, 'अछुतों का हिंदू मंदिरो में प्रवेश हो सकता है, कोई पाप नहीं लग सकता ।' तर याच्यामध्ये मी 'आज माने हुए' एवढीच शब्दावली घातली. बाकी काही नाही. कागद परत पाठविला. त्या कागदावर माझी आणि गांधींची सही केलेली होती. त्यावेळी आम्ही दोघेच तिथे होतो.

अरे हो, आठवलं म्हणजे माझे मित्र आणि शिष्य तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोगजे आम्ही दोघेच इकडे होतो, आणि बाकीचे पन्नास मोठमोठे पंडित तिकडे जमलेले होते. मी हे अभिमानाने सांगत नाही; पण खरोखरच आमच्या बाजूने अगदी थोडे लोक होते. त्यानंतर त्यांनी तो कागद परत पाठविला आणि राजेश्वरशास्त्रींनी असे सांगितले की, 'आम्ही काही वकील नाही, तुम्ही वकिली केली आहे आणि त्यामुळे आम्ही काही आत येऊ शकत नाही' आणि अशा रीतीने संध्याकाळी पाच वाजेपर्यंत लिखापढी चालली आणि निकाल लागला नाही. म्हणून ती सभा होऊ शकली नाही. दुसऱ्या दिवशी केसरीमध्ये 'म. गांधींनी हे असे करणे योग्य नव्हते. अशा अटी घालायला नको होत्या,' असे नरसिंह चिंतामण केळकरांनी लिहिले. मला वाटतं, 'स्फुट - सूचना' मधून जे काही असे, त्याच्यामध्ये हे लिहिले होते. दुसऱ्या दिवशी जेथे ही मंडळी जमली होती तेथे मला बोलावून नेले. हे सगळे शास्त्री पूजा करीत होते. पूजा झाली, भोजन व्हायचे होते. काहीतरी बारा वाजून गेले होते. शास्त्रार्थ करूया, असे ते म्हणाले. मी म्हटले, तुम्ही भोजन करून घ्या. कारण किती वेळ लागेल सांगता येणार नाही. त्याप्रमाणे त्यांनी भोजन केले. आम्ही एक वाजता बसलो चर्चेला आणि संध्याकाळी पाचपर्यंत चर्चा झाली. शास्त्रार्थ झाले आणि ते जुन्या मीमांसा पद्धतीने झाले.

एकच मुद्दा या ठिकाणी सांगतो, तो असा की, स्मृतींमध्ये अस्पृश्यांची जी व्याख्या केली आहे, 'ब्राह्मण्याम् शूद्रात जातः चंडालः' - ब्राह्मण स्त्रीच्या ठिकाणी शूद्राने - म्हणजे चातुर्वर्ण्यातील चौथ्या वर्णातील कुणी, अस्पृश्याने नव्हे, निर्माण केलेली संतती म्हणजे चंडाल संतती आणि नंतर त्यांच्यापासून निर्माण होणारी संतती ही चंडाल संतती. तेव्हा मी त्यांना म्हटले की, आजचे जे अस्पृश्यवर्ग म्हणून या देशात आहेत, ज्या अस्पृश्य जमाती आहेत त्या आपण अशा प्रतिलोम संकराने निर्माण झाल्या आहेत असे मानता का? आणि इतर असे मानतात का? असा मी प्रश्न टाकला. यांना 'चंडाल' असेही म्हणत नाहीत. महाराष्ट्रात 'महार' म्हणतात, कुठे 'धेड'

म्हणतात, तुम्ही शास्त्रीपंडित त्यांना 'चंडाल' म्हणता, ते स्वतःला तसे मुळीच म्हणत नाहीत. अशा स्थितीत 'चंडाल' ही जी संज्ञा आहे त्या संज्ञेचा अर्थ स्पष्ट केलेला आहे आणि आज जे अस्पृश्य म्हणून मानले जातात ते संकरज नाहीत असे माझे मत आहे; आणि ते संकरज असतील तर तुम्ही तसे जाहीर करा. ते पंडित म्हणाले, 'अरे असे आम्ही म्हटले तर आमच्या घरावर दगड पडतील, आमची घरे जाळतील, उगीच काय? असे आम्ही बोलणार नाही.' मग म्हटले, 'ठीक झाले, आता प्रश्न नाही. वादाचा मुद्दा मिटला' इतर फार मुद्दे निघाले. चार तास आमचा अगदी मोठा घनचक्कर शास्त्रार्थ झाला आणि मग मी त्यांचा निरोप घेतला.

**प्रश्न - हे वादविवाद रोमहर्षक आहेत; पण स्वामीजींनी व त्यांच्या शिष्यांनी या क्षेत्रात शांतपणे विधायक कार्य केले असणार. त्या संबंधी काही माहिती?**

**उत्तर -** महाराष्ट्रातील मोठमोठी विद्याविभूषित पण संस्कृतमध्ये पारंगत असलेली मंडळी, चिंतनशील अशी मंडळी स्वामींच्या भोवती जमली होती. उदा. महामहोपाध्याय काणे. त्यांचा 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' हा प्रचंड, जगमान्य ग्रंथ आहे. महामहोपाध्याय काणे स्वामींचे शिष्य. ते त्यांचा जगमान्य ग्रंथ लिहीत असताना, इतिहास लिहीत असताना काही असले की, स्वामींना प्रश्न विचारायचे आणि त्यातून समजून घ्यायचे. अशा रीतीने त्यांनी हा ग्रंथ लिहिला आणि आपल्या ग्रंथात त्याच्या पाचव्या खंडात त्यांनी मुद्दाम स्वामीजींचा उल्लेख केला आहे. 'आता स्वामीजी नाहीत, मी त्यांना पत्रव्यवहाराने अनेक प्रश्न विचारीत होतो.' तसेच महत्त्वाचे समाजचिंतक ना. गो. चाफेकर, हे या शिष्यमंडळीत होते.

नागपूरचे दप्तरी, पुण्याच्या लॉ. कॉलेजचे संस्थापक ज. र. घारपुरे, अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींचे एक मंडळ स्वामीजींनी स्थापन केले - धर्मपरिवर्तन मंडळ किंवा तत्त्वनिष्ठ धर्मपरिवर्तन मंडळ (धर्मनिर्णय मंडळ) अशी संस्था स्थापन केली आणि त्या संस्थेच्या द्वारे अनेक लहान लहान पुस्तिका प्रसिद्ध केल्या, संस्कार थोडक्यात कसे करावेत हे सांगितले, भिन्न भिन्न शास्त्रांचे जे ब्राह्मण आहेत त्यांचे भिन्न भिन्न कर्मकांडाचे प्रकार राहू नयेत म्हणून त्यांना एक समान कर्मकांड सांगितले, विधवा विवाहाचे कर्मकांड काय असावे हे सांगितले. अशा रीतीने बारीक बारीक सुधारणा त्यांनी सुचविल्या. त्या त्या वेळी जे सामाजिक प्रश्न उत्पन्न होत असत त्यांची चर्चा हे मंडळ करीत असे आणि परिषदा भरवीत असे. महादेवशास्त्री दिवेकर हे त्यांच्यातले एक अत्यंत प्रखर प्रचारक होते. त्यांनी धर्मसुधारणेची चळवळ महाराष्ट्रात वेगाने पसरवून टाकली आणि जे नवीन आचार घालून देणे आवश्यक होते त्यांना आधारभूत असे ग्रंथ त्यांनी लिहिले. 'विद्यार्थीधर्म' म्हणून त्यांनी एक पुस्तक लिहिले, पोटजातींचे एकीकरण करण्याचा प्रयत्न केला, अस्पृश्यता निवारणावर निबंध लिहिला, असा अनेक प्रकारे त्यांनी प्रचार केला. त्याचप्रमाणे स्वामींचा एक दृष्टिकोन असा होता की - आणि सामाजिकदृष्ट्या त्याला फार महत्त्व होते - हे जे जादूगार साधू पुढे येतात ते सर्व खोटे असतात असे त्याचे मत होते. त्यामुळे वाईमध्ये असा कुणी साधू आला आणि आपण चमत्कार करतो असे त्याने म्हटले की, ते आम्हा सगळ्या विद्यार्थ्यांना

सांगत की, असे चमत्कार होऊ शकत नाहीत.

सृष्टीचे जे नियम आहेत, विज्ञानाने सिद्ध झालेले, त्यांच्या बाहेर काहीही घडत नाही आणि ज्या चमत्कारांच्या कथा पुराणात दिल्या आहेत ते केवळ अर्थवाद आहेत, त्या केवळ चांगल्या कर्माचे स्तवन करतात आणि निंद्य कर्माचा निषेध करतात, त्यांच्यावर विश्वास ठेवू नका असे आम्हाला ते नेहमी सांगत असत. तेव्हा उपासनीबुवा किंवा नारायण महाराज केडगावकर अशी जी साधूमंडळी तेव्हा वावरत होती, त्यांच्या भोवती प्रचंड जमाव जमत असे. नारायण महाराजांच्या केडगावला उत्सव असला, तर पुण्याहून मोठमोठ्या रेल्वेगाड्या भरून जायच्या. हे जे महाराष्ट्रात चालले होते त्याच्याकरिता 'बुवाबाजी'वर - 'बुवाबाजी' हा शब्द मी स्वतः वापरीत नाही. कारण तो काहीसा अपमानकारक आहे आणि मला कुणाचा अपमान करायचा नाही. लोकांच्या प्रामाणिक श्रद्धेचा अपमान करायचा नाही - फार मोठा प्रखर हल्ला करणारे लेख महादेवशास्त्र्यांनी लिहिले. महादेवशास्त्र्यांच्या लेखांमागे जी प्रेरणा होती, जे स्पष्टीकरण होते ते स्वामींकडून त्यांना लाभले होते. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोगजे यांनी धर्मनिर्णयमंडळ स्थापन केले आणि आपण स्वतः त्याचे सचिव बनले. तेही असे धर्मसुधारणेचे प्रश्न उपस्थित झाले की, बैठका बोलवायचे आणि चर्चा घडवून आणायचे.

**प्रश्न - आता शेवटचा प्रश्न. आज अनेकजण असे म्हणतील की, हे धर्मपरिवर्तनाचे कार्य मुख्यतः ब्राह्मण व तत्सम जाती यांच्यापुरते मर्यादित राहिले. अस्पृश्यता आणि जातिभेद या प्रश्नांना मध्यवर्ती स्थान देऊन त्यांच्यावर हल्ला करण्याचे काम या मंडळींनी केले का?**

**उत्तर -** जरूर केले; पण त्या बाबतीत ते विचार सांगत असत. प्रत्येक जण, चातुर्वर्ण्य गुणकर्मविभागशः असेच आहे, जातिसंस्था बरोबर नाही, ती बदलत आली आहे हा विचार मांडत असे आणि हा विचार अतिशय उत्तम रीतीने जागतिक ग्रंथात - म. म. काण्यांच्या 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' या ग्रंथात मांडला गेला आहे. अस्पृश्यतानिवारणाचा विचार अतिशय स्वच्छ रीतीने मांडण्यात आला आहे. हीच मंडळी याच्यात प्रमुख होती आणि ते आमच्या चळवळीचे आधार होते आणि ती अगदी चांगली तयार अशी मंडळी होती; परंतु या चळवळीत या ज्या लहान लहान धार्मिक सुधारणा होत्या त्याना जास्त महत्त्व दिले गेले; पण बाकीचे विचारही ते व्यवस्थित रीतीने मांडत असत.

**(नवभारत मासिक, डिसेंबर, १९७८ व जानेवारी १९७९, पृ. १ ते १४)**

ooo

३१

# सत्तेपासून दूर राहिलेला संघटक व क्रांतिकारक : किसन वीर

मुलाखतकार - **अनिल जोशी**

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांच्याविरुद्ध अनेक उलाढाल्या करून आणि प्रसंगी स्वतः प्राण धोक्यात घालून स्वतःच्या मनात असणाऱ्या क्रांतीच्या भावनांना व विचारांना प्रत्यक्षात उतरविणारे महाराष्ट्रातील जे साहसी देशभक्त यशस्वी झाले त्यांच्यात किसन महादेव ऊर्फ आबासाहेब वीर यांचे कार्य अनेकांना प्रभावित करणारे ठरले.

ऐन तारुण्यात किसन वीर यांनी केलेल्या क्रांतिकार्याची नोंद देशाच्या स्वातंत्र्येतिहासात कायमस्वरूपी झालेली आहे हे निर्विवाद आहे. १९४२ च्या 'भारत छोडो' घोषणेचा आधार घेऊन कै. वीर व त्यांच्या सहकाऱ्यांनी उचललेल्या पावलाबद्दल त्यांना कारावास पत्करावा लागला आणि येरवडा तुरुंगात भिंतीवरून त्यांच्या इतर सहकाऱ्यांसह वीर यांनी घेतलेली उडी व ब्रिटिश पोलिसांच्या हातावर दिलेल्या तुरी, साऱ्या महाराष्ट्रात परिचित झाली. आपल्या या देशकार्याने कै. वीर यांनी अनेकांना प्रभावित केलेले होते; पण त्यापेक्षाही स्वातंत्र्योत्तर काळात बदललेल्या परिस्थितीबरोबर जो वैचारिक बदल घडून येणे आवश्यक आहे, तो त्यांच्यात फार मोठ्या प्रकर्षाने घडला आणि म्हणूनच क्रांतिकारक म्हणून ते जितके गाजले तितके किंबहुना त्यापेक्षा अधिक प्रमाणात ते संघटक म्हणून पुढे आले. कै. आबासाहेब वीर यांच्या क्रांतिकार्याने प्रभावित झालेली महाराष्ट्रातील जी अनेक उच्चपदस्थ व विद्वान मंडळी आहेत, त्यांच्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचाही समावेश आहे. औपचारिक शिक्षणाचा फारसा संबंध न येताही कै. वीर यांच्या वैचारिक झेपेने प्रभावित झालेली ही मंडळी होती. एम. एन. रॉय, अच्युतराव पटवर्धन, गोवर्धनदास पारीख, न. र. फाटक, एस. एम. जोशी, प्रा. वि. म. दांडेकर यांच्यासारखी विद्वान मंडळी कै. किसन वीर यांच्या कार्याशी परिचित होती. एवढेच नव्हे तर श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मनात कै. किसन वीर यांच्याबद्दल असणारा आदर व प्रेम अजोड स्वरूपाचे ठरले.

## ग्रामस्वराज्याची कल्पना

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी किसन वीर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अगदी जवळून अभ्यास केलेला आहे. त्यांच्या स्वभावातील धाडसी वृत्तीचे कौतुक केलेले आहे. गेली सुमारे ४५ वर्षे त्या दोघांचा जो अतूट संबंध आला त्याबद्दल बोलताना तर्कतीर्थ जोशी म्हणाले की, ''माझा एका सशस्त्र क्रांतिकारक गटाशी स्वातंत्र्यपूर्व काळात सहानुभूतीचा संबंध आला होता. क्रांतिकार्यात जरी मी नव्हतो तरी त्या क्रांतिकारकांच्या विचारांशी मी सहमत होतो. स्वातंत्र्यवीर सावरकर व सेनापती बापट यांच्या कार्याने मला प्रभावित केलेले होते आणि त्याच सुमारास किसन वीर व त्यांचे त्या वेळचे सहकारी वामनराव कुलकर्णी यांच्याशी माझा संबंध आला. वाई प्राज्ञपाठशाळेचे त्या वेळचे सचिव मधुकर शंकर साठे सशस्त्र क्रांतिकार्यास पाठिंबा देणारे होते आणि त्या वेळी किसन वीर यांच्याशी माझा प्रत्यक्ष संबंध येण्यास या सर्व गोष्टी कारणीभूत ठरल्या. १९३६ च्या अखेरीस एम. एन. रॉय सुटून आले आणि त्यांनी स्वतः वामनराव कुलकर्णी यांना स्पष्टपणे 'राज्यक्रांती ही सशस्त्र रीतीनेच यशस्वी होते असे नाही, हे प्रयत्न भावनाप्रधान असतात' याची कल्पना दिलेली होती व क्रांतीसाठी लोकशिक्षणाची गरज असते हा विचार त्यांनी त्यावेळी बिंबविला होता. अच्युतराव पटवर्धन हे स्वतः किसन वीर यांच्या हुशार व्यक्तिमत्त्वाने व धाडसी स्वभावाने त्या वेळी प्रभावित झाले होते. ग्रामराज्याची कल्पना म्हणजे त्यांच्यातील क्रांतीचा ध्येयवादच असा मर्यादित अर्थ होता. क्रांतीच्या दृष्टीने वैचारिक जुळणीही तेथे झालेली होती.''

## नम्रता व मुत्सद्देगिरी

त्यांची काम करण्याची जी पद्धत होती त्यात उमदेपणा होता. लहान-मोठे या सर्वांना सांभाळून घ्यायचे, त्यांना समजावून द्यायचे. आपण शिकलेले नाही या जाणिवेने त्यांच्यात नम्रता होती. विद्यालयीन शिक्षण नसताना माणसे शहाणी व मुत्सद्दी असतात याचे उदाहरण म्हणजेच किसन वीर होय. त्यांच्या मुत्सद्देगिरीचे एक असे उदाहरण सांगता येण्यासारखे नाही; पण त्यांचे जे व्यवहार आहेत त्यावरून ते स्पष्टपणे दिसून येते. या सर्व गोष्टी मला प्रभावित करत होत्या.

## संघटनाशक्तीचे सूत्र

स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक क्रांतिकारक आपणास परिचित आहेत. पण स्वातंत्र्योत्तर काळात ही क्रांतिकारक मंडळी कार्याच्या दृष्टीने थांबलेली आहेत. त्यांचा सार्वजनिक क्षेत्राशी संपर्क थांबलेला आहे आणि किसन वीर थांबलेले नाहीत, पुढे सरसावले, याचे कारण काय? असे विचारता शास्त्रीजी म्हणाले, ''स्वातंत्र्योत्तर काळात माणसे सत्तेत आल्यानंतर सत्ता आणि आर्थिक व्यवहार यात प्रगती करण्यातच गुंतली; पण किसन वीर हे सत्तेपेक्षा सत्तेच्या पाठीमागे असणाऱ्या संघटनेस अधिक महत्त्व देणारे होते. संघटनाशक्ती ही फार महत्त्वाची आहे, हे त्यांच्या लक्षात आलेले होते. सत्तेमध्ये जाण्यास संधी मिळूनही त्यांनी तिचा स्वीकार केलेला नव्हता.

त्यांचा प्रतिसरकारचा प्रयोग एका अर्थाने फसला; पण त्यातून संघटनाशक्तीचे सूत्र त्यांनी पूर्णपणे हस्तगत केले होते. संघटक म्हणून ते पुढे आले. कार्यकर्त्यांशी वागण्याची त्यांची पद्धती अत्यंत कुशलतेची, समंजसपणाची होती.''

## दुरुपयोग बोचत असे

'रमा-रमी आणि रम' यांच्यात आमचे उच्चपदस्थ रमले आहेत, असे इशारे देणारे उद्गार त्यांनी पक्षकार्यकर्त्यांच्या एका शिबिरात काढले. कारण त्यांना ते बोचत होते. उच्च सत्तेत असणारी माणसे शुद्ध जीवन जगू शकत नाहीत, सत्तेचा ती दुरुपयोग करतात. सत्तेवर गेलेली त्यांच्या भोवतालची माणसे आर्थिक दृष्टीने गबर होत आहेत, हे त्यांना बोचत होते. काँग्रेस पक्ष डळमळीत झाला याला जी अनेक कारणे आहेत, त्यातले हे एक महत्त्वाचे कारण ठरले. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल त्यांना निष्ठा होती. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल आदर होता.'

## भेदाभेद नाही

श्री. जोशी म्हणाले, ''जो कोणी येईल त्याचा परामर्श घ्यायचा, त्याचे ऐकून घ्यायचे, त्याला मदत करायची, लहान-मोठा असा भेद नाही. माणूस कितीही दुबळा असला, कितीही नडलेला असला तरी अत्यंत मोठे कारखानदार, संस्थाधिपती, मोठमोठे प्राचार्य यांच्याशी जितक्या सरळपणे, मनमोकळेपणे, विनयाने ते वागत असत तोच विनय, तोच आदरभाव सामान्यांच्याबद्दलही त्यांच्या मनात होता आणि म्हणूनच त्यांच्या वर्तनात माणुसकीचा समभाव होता. माणसाची आंतरिक समानता ओळखणारे ते गृहस्थ होते. श्रीमंत-गरीब, विद्वान-अविद्वान यांच्यात कधीच त्यांनी भेदाभेद केला नव्हता. हा त्यांच्या वर्तनातला मोठा आकर्षक भाग होता. हे आकर्षक तत्त्व होते.

त्यांनी आपल्या जीवनात मैत्रीचे मूल्य फार मोठे मानले. ते अखेरपर्यंत जोपासले. शेकडो मित्र त्यांनी जोडले. मित्राकरिता आपल्या स्वतःचा विचार न करता सर्वस्व द्यायचे, ही मैत्रीची कसोटी त्यांनी दाखवून दिलेली होती. या कसोटीस उतरणारे यशवंतराव चव्हाण व किसन वीर यांच्यातले संबंध सर्वपरिचित आहेत. यशवंतराव चव्हाण केवळ सत्तेत होते म्हणून त्यांनी आपली मैत्री टिकवून ठेवली होती असे नाही, तर चव्हाण निवडून आल्यानंतर ते सत्तेत जावेत यासाठी किसन वीर प्रयत्नशील होते.''

## शीलास अधिक महत्त्व

किसन वीर व यशवंतराव चव्हाण यांच्यातील मैत्री महाराष्ट्रात परिचित आहे; पण विरोधी पक्षातल्या एखाद्या नेत्याबद्दल तितक्याच उच्च प्रतीची मैत्रीची भावना किसन वीर यांनी जोपासलेली होती याची उदाहरणे सांगता येतील का? आणि त्याची कारणे कोणती? असे विचारता ते म्हणाले, ''विरोधी पक्षातील एस. एम. जोशी यांच्यासारख्या नेत्यांबद्दल किसन वीर

यांच्या मनात नितांत आदर होता. कै. प्रा. गोवर्धनदास पारीख यांच्याशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. न. र. फाटक व किसन वीर यांना एकमेकांविषयी नितांत आदर होता. या सर्वांपाठीमागे असणारे महत्त्वाचे कारण म्हणजे नेत्याच्या राजकीय यशापयशापेक्षा त्याच्या शीलास किसन वीर अधिक महत्त्व देत असत.''

**(केसरी, २८ जानेवारी, १९८०)**

ooo

३२

# वऱ्हाडचे टिळक : बापूजी अणे

मुलाखतकार - **अनिल जोशी**

बापूजी अणे यांचा टिळकयुगात जन्म, बालपण व तारुण्य गेले. त्या युगातील सगळे राजकीय विचारांचे आणि संघर्षाचे संस्कार घेतलेले प्रौढ व्यक्तिमत्त्व असे बापूजी अणे, गांधी युगामध्ये १९२० च्या सुमारास महाराष्ट्रात विशेषतः विदर्भाचे नेते म्हणून प्रकट झाले.

त्यांचा जन्म वैदिक विद्वान ब्राह्मणाच्या कुळात झाला. त्यांचे आचारविचार अस्सल सनातनी विचारपरंपरेचे होते. माझ्या - त्यांच्या गाठीभेटी अनेक वेळा झाल्या. त्यात त्यांच्या सुसंगत आचारविचारांचा आणि निर्मळ दिलदार मनाचा प्रत्यय आला.

## बापूजींशी पहिली भेट

१९३४ साली प्रयाग येथील मदनमोहन मालवीय यांनी भरविलेल्या सनातन धर्मपरिषदेचे अधिवेशन आटोपून मी वाराणसी येथील हिंदू विद्यापीठाच्या परिसरातील मदनमोहन मालवीय यांच्या निवासस्थानी परतलो. त्या परिषदेमध्ये अस्पृश्यतानिवारणाची बाजू धर्मशास्त्राधारे मांडण्याकरिता मालवीयजींनी मला निमंत्रण दिले होते. मालवीयजींबरोबरच मी वाराणसीमध्ये त्यांच्या निवासस्थानी आलो. संध्याकाळ झालेली होती. एका निराळ्या खोलीत मला जागा देण्यात आली होती. रात्री भोजन केल्यानंतर काही वेळ वाचन करून झोपलो. पहाटे पाच वाजता जाग आली. जाग आली तेव्हा शेजारच्या खोलीमध्ये शुद्ध व मधुर स्वरात कोणीतरी ऋग्वेदातील उषेची व भगदेवतेची सूक्ते म्हणत होते. मी त्या सुरात माझा सूर मिळविला. सूक्तपठण झाल्याबरोबर एक तेजस्वी मूर्ती माझ्या खोलीचा दरवाजा उघडून आत आली. मी पाहतो तो बापूजी अणे ! तत्पूर्वी अनेक वेळा गाठीभेटी झालेल्या असल्यामुळे आम्ही एकमेकांस चट्‌दिशी ओळखले. बापूजी मला म्हणाले, "सनातन धर्मपरिषदेमध्ये शास्त्रार्थ चर्चा करून आपण इकडे आलात हे मला मालवीयजींनी काल रात्री सांगितले." मला असे वाटत होते की, बापूजी अणे हे सनातन धर्माचे मोठे पुरस्कर्ते. त्यांना अस्पृश्यतानिवारणाचे विचार मान्य नसावेत; परंतु बापूजींनी मोठ्या

उत्सुकतेने मला उत्तेजन देऊन विचारले की, ''कोणकोणती शास्त्रवचने तुम्ही उद्धृत केलीत?'' मी ती वचने म्हणू लागल्याबरोबर तेही तीच वचने बिनचूक रीतीने पाठ म्हणू लागले. त्यांनी मला सांगितले की, ''देशकालपरिस्थितीप्रमाणे धर्मशास्त्राचा अर्थ करण्याची ही तुमची पद्धती फार चांगली आहे. आपली श्रेष्ठ परंपरा मोडावयाची नाही; परंतु तिच्यामध्ये योग्य असा बदल करणे आवश्यक आहे. कारण आपला धर्म हा सनातन धर्म आहे. सनातन धर्म म्हणजे बदलत्या परिस्थितीवर मात करून समाजाला सन्मार्गामध्ये ठेवणारा शाश्वत धर्म होय.'' मला बापूजींचे हे म्हणणे ऐकून काहीसे आश्चर्य वाटले व त्याबरोबरच आनंद झाला.

## गीतारहस्याचे समर्थक

बापूजी अणे हे लोकमान्यांचे निष्ठावंत अनुयायी होते. ते लोकमान्यांच्या गीतारहस्याचे उत्कृष्ट समर्थक होते. लोकसंग्रहार्थ जीवनमुक्त सिद्ध पुरुषांनी कर्मयोगाचे आचरण केले पाहिजे, परंपरागत साधुसंन्याशांप्रमाणे सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनाकडे दुर्लक्ष करून केवळ भजनी मार्गाचा आणि यज्ञयागादिकांचा प्रचार करून स्वस्थ बसू नये. भगवद्गीतेतील लोकसंग्रह म्हणजे लोकशिक्षण होय आणि राजकारणामध्ये लोकशिक्षण म्हणजे परकीय साम्राज्यशाहीचा सशस्त्र वा निःशस्त्र प्रतिकार करण्यास उद्युक्त होण्याकरिता लोकांस जीवनाच्या सर्व बाजूंचा अर्थ समजावून सांगणे, त्यामुळेच लोकांमध्ये खरी सामाजिक शक्ती निर्माण होते आणि लोक प्रतिकारास समर्थ होतात. राजकीय सत्ता प्रतिकाराशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही, असा टिळकांच्या विचारांचा भावार्थ बापूजी अणे यांनी काढला होता.

गणेशोत्सव आणि शिवाजी उत्सव ही लोकांच्या राजकीय शिक्षणाची उत्कृष्ट साधने लोकमान्य टिळकांनी निर्माण केली होती. या साधनांचा नागविदर्भामध्ये चांगला फैलाव करण्याचे काम लोकमान्यांच्या अनुयायांनी चालविले होते. विदर्भाचे लहान-मोठे राजकीय पुढारी या माध्यमांमधून राजकारणाचे शिक्षण जनतेस देत होते. त्यात बापूजी अणे प्रामुख्याने भाग घेत होते. बापूजी अणे हे संस्कृतचे उत्तम पंडित होते आणि त्या त्यांच्या पांडित्याला त्यांनी आधुनिक धर्ममीमांसेचीही जोड दिली होती. त्यांनी गणेश देवतेची उपपत्ती मांडलेली आहे. ती या दृष्टीने फार उद्बोधक आहे. ऋग्वेदातील आर्यांचा ब्रह्मणस्पती म्हणजे विद्याधिपती आणि अनार्यांचा हस्तिमुख गणपती यांचा समन्वय होऊन अथर्वशीर्षातील गणपती कसा बनला याची उपपत्ती त्यांनी मांडलेली आहे. एका देशात वा प्रदेशात राहणाऱ्या जातिजमाती धार्मिक व सांस्कृतिक देवघेव कशी करतात याचे उदाहरण म्हणून त्यांनी वरील उपपत्ती सांगितली आहे. त्यांच्या पाठीमागे भारतात आणि महाराष्ट्रात ज्या भिन्न भिन्न जमाती, भिन्न समाज राहतात त्यांच्यामध्येही एकमेकांचे धर्मस्वातंत्र्य राखून एकजूट निर्माण होणे आवश्यक आहे, असा विचार होता. हिंदू-मुसलमानांचा प्रश्न हा भारतीय राजकारणातील अत्यंत गुंतागुंतीचा असा कूट प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर धर्मस्वातंत्र्याच्या तत्त्वांवर आधारले पाहिजे, असा लोकमान्यांचा विचार होता. तोच विचार बापूजींनीही चांगल्या रीतीने जनतेला समजावून सांगितला. भारताचे

एकराष्ट्रीयत्व म्हणजे केवळ हिंदूंचे एकराष्ट्रीयत्व नव्हे, तर हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या विस्तृत प्रदेशात राहणाऱ्या विविधधर्मीय जमातीचे एकराष्ट्रीयत्व होय अशा तऱ्हेची श्रद्धा बापूजींच्या राष्ट्रवादाच्या मुळाशी होती.

## बापूजींची विचारसरणी

महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीशी बापूजींचे मौलिक मतभेद होते; पण या मतभेदांचा कल नेमस्त पक्षाप्रमाणे सहकार्याकडे वळलेला नव्हता. लोकमताची भक्कम बाजू मांडण्याची आणि लोकमतजागृती करण्याची सर्व प्रकारची साधने वापरणे हे आवश्यक आणि सयुक्तिक आहे म्हणून विधिमंडळामध्ये आणि विधिमंडळाच्या बाहेर लोकांची परकीय सत्तेशी सामना करण्याकरता प्रतिकारशक्तीही वाढविली पाहिजे, सशस्त्र प्रतिकार हा निर्वाणीचा उपाय म्हणूनही जनतेच्या मनात रुजविला पाहिजे; परंतु आज सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग व्यवहार्य नाही म्हणून निःशस्त्र प्रतिकाराची शक्ती वाढविली पाहिजे, अशी विचारसरणी बापूजींनी आपल्या सुरेख युक्तिवादाने मांडलेली आहे.

बापूजींनी तत्कालीन भारतीय नेत्यांच्या बरोबरीने कामे केली आणि अनेक राजकीय संघटनांमध्ये नेतृत्व केले. त्यांच्या उत्कृष्ट वादपटुत्वामुळे देशबंधू चित्तरंजनदास, पंडित मोतीलाल नेहरू, बॅ. विठ्ठलभाई पटेल, राजगोपालाचारी, सरहद्द गांधी यांच्यावर त्यांची छाप पडत असे. या बड्या नेत्यांशी मतभेद झाला असता तो मतभेद ते प्रांजलपणे आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला पटेल तसाच मांडायचे.

## पूजा-अर्चा आणि परमार्थ

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात काँग्रेसच्या नेत्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. ब्रिटिश सरकारशी पूर्ण असहकार पुकारला होता; परंतु बापूजी अणे यांनी ४१-४२ च्या सुमारास व्हॉइसरॉयच्या कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून प्रवेश केला होता. व्हॉइसरॉयचा कौन्सिल सदस्य म्हणजे त्या वेळच्या केंद्र राज्याचा एक मंत्रीच होय; परंतु सत्ता आणि धर्मलोभाने यांनी ते सदस्यत्व पत्करले नव्हते. बापूजी त्या वेळी दिल्लीस मोठ्या सरकारी बंगल्यात राहत होते. मीही एकदा त्यांचा पाहुणा म्हणून एक आठवडाभर त्यांच्या बंगल्यात मुक्काम केला होता. तेथे बापूजींचा दिनक्रम जुन्या सनातनी ब्राह्मणासारखा होता. सूर्योदयाअगोदर स्नानसंध्या आटोपून बापूजी आपल्या सुंदर देव्हाऱ्यासमोर बसून यथासांग पूजा करीत. जवळजवळ तीन तास.

सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत रुद्राभिषेक, पोथीवाचन, जप व अखेर आरती करून नऊ वाजता बाहेर येत. माझी व त्यांची संध्याकाळच्या भोजनाच्या वेळी भेट व्हायची. बापूजींना मी विचारले की, ''रामशास्त्र्यांनी माधवराव पेशव्यांना सांगितले की, पूजा-अर्चा करण्यात वेळ घालवू नका. यावर आपले काय म्हणणे आहे?'' बापूजी हसत म्हणाले, ''मी बाकी सबंध १४ तास (झोपेची वेळ सोडून) राज्यकारभारातच असतो. त्याकरिता मनाला सामर्थ्य पुरविण्याचे कार्य ही माझी

पूजा-अर्चा करत असते. त्यामुळे माझा विचार अधिक सकस आणि परिणामकारक असा बनतो. कोणी पाहिले आहे देव आहे की नाही आणि स्वर्ग आहे की नाही? परंतु धार्मिक उपासना मला बळ देते याबद्दल मला मुळीच शंका नाही. देव आहे आणि स्वर्ग आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे; पण तुम्हा तार्किकांना मी हे पटवू शकत नाही. कारण परमार्थ हा तर्कवितर्कांच्या पलीकडे असतो.''

**(केसरी, २४ ऑगस्ट, १९८०)**

❍❍❍

३३

# मानवेंद्रनाथ रॉय यांची वैचारिक वाटचाल

मुलाखतकार - **प्रा. मे. पुं. रेगे**

*१९३० साली मानवेंद्रनाथ रॉय भारताला परतले. भारताच्या राजकारणात पदार्पण केल्यावर त्यांना जे निष्ठावान अनुयायी लाभले आणि ज्यांनी रॉय यांना आयुष्यभर साथ दिली त्यातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे एक ज्येष्ठ कार्यकर्ते होत. त्यांची मे. पुं. रेगे यांनी घेतलेली मुलाखत.*

**प्रश्न - शास्त्रीजी, रॉय जेव्हा १९३० च्या सुमाराला भारतात परतले तेव्हा ती एक तुलनेने अनोळखी, अप्रसिद्ध व्यक्ती होती. मग तुम्ही, वसंतराव कर्णिक आणि इतर तरुण कार्यकर्ते रॉय यांच्याकडे विशेषेकरून आकर्षित कसे झाला? रॉय हे त्या वेळी मार्क्सवादी होते. तुम्हा मंडळींचा मार्क्सवादाकडे ओढा असल्यामुळे तुम्ही रॉय यांच्याभोवती गोळा झाला असे म्हणावे तर त्या वेळी भारतात अधिकृत कम्युनिस्ट पक्ष होता. रॉय यांच्यात तुम्हाला विशेष काय आढळले?**

**उत्तर -** एम. एन. रॉय १९३० पूर्वी सशस्त्र क्रांतिकारक म्हणून भारतात खूप प्रसिद्ध होते. ते १९३१ मध्ये भारतात परतले व गुप्तपणे वावरायला लागले. त्यावेळी माझा आणि त्यांचा काही संबंध नव्हता आणि त्यांच्या अनुयायांचा व माझाही विशेष संबंध नव्हता. ३१ मध्ये जी कराची काँग्रेस झाली तेव्हापासून काँग्रेसच्या धोरणात आर्थिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व येऊ लागले. समाजामध्ये जो आर्थिकदृष्ट्या दुबळा असलेला गरीब वर्ग आहे, त्याच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा लढा लढला पाहिजे असा विचार मांडणारा आणि त्यांच्या अनुरोधाने आर्थिक कार्यक्रमाची आखणी करू पाहणारा महत्त्वाचा ठराव कराची काँग्रेसमध्ये झाला. आम्ही नंतर असे ऐकले की, या ठरावामागे डॉ. महमूद म्हणून कोणी होते. हे डॉ. महमूद म्हणजे एम. एन. रॉय हे मला पुढे समजले. रॉय तेव्हा गुप्तपणे वावरत होते. याचे कारण असे की, तेव्हा त्यांच्याविरुद्ध वॉरंट होते.

कानपूर कटाचा खटला २३ साली उभारला गेला. २४ साली त्याचा निकाल लागला. त्यात ब्रिटिश राज्य उलथून टाकण्यासाठी कट करण्याचा आरोप ज्यांच्याविरुद्ध शाबीत झाला आहे, असा निर्णय देण्यात आला, ते बहुतेक सर्व कम्युनिस्ट होते- डांगे, मिरजकर, रणदिवे, फिलिप , स्प्रॅट इत्यादी. या सर्व दोषी ठरविण्यात आलेल्या आरोपींमध्ये पहिला क्रमांक एम. एन. रॉय यांचा होता. तेव्हा ब्रिटिश राज्याविरुद्ध उठाव आणि बंड करण्यात पुढारी कोण? तर एम. एन. रॉय, ही गोष्ट लोकांच्या मनावर एकदम ठसली.

दुसरी गोष्ट अशी की, सशस्त्र क्रांतिकारक गटाचे एक प्रमुख म्हणून एम. एन. रॉय यांच्याविषयीच्या कथा त्या वेळी प्रसृत होऊ लागल्या होत्या. विशेषतः भारतातील राजद्रोही प्रवृत्तीचा बंदोबस्त करण्यासाठी म्हणून रौलट ॲक्ट हा जो कडक कायदा करण्यात आला होता, त्यापूर्वी अशा कायद्याची आवश्यकता दाखवून देणारा रौलट कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला होता. त्याच्यात पहिल्या महायुद्धाच्या काळात भारतात सशस्त्र उठाव करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक व्यक्तींची आणि गटांची माहिती सविस्तर देण्यात आली होती. त्यात उदा. कोमाटोमा प्रकरणातील पंजाबी शिखांची माहिती दिली होती. बंगाली क्रांतिकारकांविषयीची माहिती होती आणि त्यात एम. एन. रॉय यांनी परदेशात जाऊन भारतात सशस्त्र उठाव घडवून आणण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले, लक्षावधी रायफली आणि त्यांना लागणारा दारूगोळा भारतात पाठविण्याची कशी खटपट केली याची सविस्तर कथा वर्णन केली होती. आम्हाला त्यामुळे हे एक अत्यंत अद्भुतरमणीय व्यक्तिमत्त्व आहे असे वाटले.

शिवाय भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात, त्याला लागणारा निधी पुरविण्यात आणि पक्षाचे मार्गदर्शन करण्यात एम. एन. रॉय यांची भूमिका अध्वर्यूची होती. हे कार्य त्यांनी थर्ड इंटरनॅशनलतर्फे केले असे आम्हाला ऐकू येत होते. आता मी स्वतः काँग्रेसचा कार्यकर्ता होतो. काँग्रेसमध्ये अधिक भरभक्कम क्रांतिकारक गट संघटित व्हावा, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना अधिक क्रांतिकारक वळण लागावे म्हणून बाहेरून प्रयत्न करणाऱ्यांमध्ये रॉय होते. ते अर्थात त्या वेळी देशात परतू शकत नव्हते. पहिल्या महायुद्धाच्या काळी देश सोडल्यानंतर त्यांनी ज्या एकंदर खटपटी केल्या त्यांचे स्वरूपच असे होते की, ते देशात परतले असते तर त्यांच्यावर खटला भरण्यात आला असता आणि त्यांना दीर्घ कैद झाली असती. म्हणून ते देशाबाहेर राहूनच काँग्रेसचे नेतृत्व अधिक क्रांतिकारक बनावे म्हणून प्रयत्न करीत होते. काँग्रेसचे नेतृत्व गांधींकडे होते. असहकारितेची चळवळ सुरू होती. ही चळवळ अत्यंत महत्त्वाची आहे, कारण तिच्यात जनतेचा उठाव आहे अशीच रॉय यांची धारणा होती. काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नव्हे, काँग्रेस हे जनतेने स्वातंत्र्यासाठी चालविलेले आंदोलन आहे, देशात क्रांतिकारकांचे जे अनेक भिन्न गट होते त्यांच्या प्रयत्नांनी स्वातंत्र्य लाभणार नाही, त्यासाठी जनतेचा उठाव झाला पाहिजे हा रॉय यांचा दृष्टिकोन होता आणि तो ते स्पष्ट शब्दांत मांडत असत. पहिल्या महायुद्धाच्या काळात निवडक, सर्व प्रकारच्या स्वार्थत्यागाला तयार असलेले आणि धाडसी प्रवृत्तीचे क्रांतिकारक

कार्यकर्ते संघटित करून त्यांच्याकरवी स्वातंत्र्यासाठी लढा देण्याचे प्रयत्न झाले होते; पण अशा प्रयत्नांनी फारसे काही साधणार नाही, सबंध जनता स्वातंत्र्यासाठी उठली पाहिजे आणि जनतेचा असा उठाव घडवून आणण्यासाठी काँग्रेस योग्य दिशेने प्रयत्न करीत आहे, इतरही अनेक गट असेच प्रयत्न करीत आहेत; पण त्यांच्यात काँग्रेस प्रमुख आहे, म्हणून जनतेचे आंदोलन हेच काँग्रेसचे स्वरूप आहे, असे रॉय यांच्या विचारांमागचे सूत्र आहे, असेही आमच्या कानी येत होते.

मी स्वतः काँग्रेसचा कार्यकर्ता होतो. पुढे जे कार्यकर्ते 'रॉयवादी' झाले त्यांच्यामधील कोणी कम्युनिस्ट पक्षात नव्हते. ते सर्व काँग्रेसच्या चळवळीतले होते. उदा. व. भ. आणि द्वा. भ. कर्णिक, तारकुंडे इत्यादी हे काँग्रेसमध्ये होते. पारीख तेव्हा विद्यार्थी होते. हे कोणी कम्युनिस्ट नव्हते. रॉय यांच्या पुढाकाराने जो भारतीय कम्युनिस्ट पक्ष निर्माण झाला होता, त्याचे धोरण काँग्रेसच्या राजकीय कार्यक्रमाला अधिक मूलगामी आणि क्रांतिकारक वळण द्यावे असे नव्हतेच. या उद्दिष्टासाठी ते हिरीरीने प्रयत्न करीतच नव्हते. यामुळे आम्ही कम्युनिस्ट पक्षाकडे आकृष्ट होणे फारसे संभवनीय नव्हते. आम्ही काँग्रेसच्या म्हणजे जनतेच्या प्रचंड आंदोलनात सामील होतो. असहकारितेची चळवळ, नंतरची ३० सालची सविनय कायदेभंगाची चळवळ, नंतर काही विश्रामानंतर ३२ साली परत सुरू झालेली तीच चळवळ यात आम्ही सहभागी होतो. यामुळे आम्ही कम्युनिस्ट पक्षाकडे ओढलो जाणे कठीण होते. कम्युनिस्ट कार्यकर्तेही काँग्रेसकडे ओढले जात होते; पण कम्युनिस्ट पक्षाचा दृष्टिकोन ही जनतेची मोठी चळवळ आहे, असा नसून ही भांडवलशाही नेतृत्वाची चळवळ आहे असा होता.

रॉय आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्या दृष्टिकोनात हा मूलभूत भेद होता. रॉय यांच्याकडे आकृष्ट होण्याची अनेक कारणे होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती असलेल्या अद्भुतरम्यतेच्या वलयाचा मी मघाशी उल्लेख केला; पण आणखीही महत्त्वाची कारणे होती. रॉय हे इतर कोणत्याही भारतीय कम्युनिस्ट नेत्यापेक्षा युरोपीय कम्युनिस्ट नेत्यांसारखे होते. म्हणजे असे की, रॉय हे समकालीन राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडींविषयी सतत विचार करीत आणि त्यांची मीमांसा करणारे लेखन करीत. त्यांनी साम्राज्यशाहीची मीमांसा केली. जगातील भांडवलशाही (त्या काळी) कोणत्या अवस्थेला पोहोचली होती याची मीमांसा त्यांनी केली आणि काँग्रेसला नवीन वळण लागावे म्हणूनही ते सतत लेखन करीत. उदा. १९२३ साली जर्मनीमध्ये त्यांनी 'व्हॅनगार्ड' म्हणून साप्ताहिक सुरू केले. त्यात भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाविषयी मीमांसा येत असे. तेव्हा हा उत्तम प्रकारचा विचारवंत आहे, अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. चळवळीत राहायचे, संघटना उभारायच्या, कार्यकर्त्यांना विचार द्यायचे, मार्क्सवादी दृष्टीने सामाजिक घटनांची मीमांसा करायला शिकवायचे अशी रॉय यांची पठडी होती. हे लिखाण आमच्या हातात पडत असे.

त्यांच्या लिहिण्यात आणि बोलण्यात एक प्रकारची स्वच्छता होती. तांत्रिक परिभाषेचे

अवडंबर त्यांच्या साहित्यात नव्हते; पण वैचारिक स्पष्टता होती. एकामागून एक असे विचार सुसूत्रपणे मांडण्याची त्यांची शैली होती. ते वक्ते नव्हते. ज्याला प्रवाही वक्तृत्व म्हणतात ते त्यांच्याकडे नव्हते. अनेकांची लोकांवर छाप पडते ती त्यांच्या वक्तृत्वामुळे, तसे त्यांचे नव्हते. त्यांच्या बोलण्यात-लिहिण्यात जी वैचारिक गुणवत्ता होती त्याची छाप मात्र माझ्यावर पडली. मी स्वतः ललित साहित्य काय ते वाचलेले आणि या साहित्याचे गुण म्हणजे वाक्यांची पक्की बांधणी, मुद्देसूदपणा आणि विचारातली विवेचकता म्हणजे युक्तिवाद हे होत आणि हे गुण मला रॉय यांच्यात दिसले. माझे शिक्षण परंपरागत पद्धतीने झालेले आहे आणि माझे मुख्य अध्ययन दर्शनांचे आहे. तेव्हा युक्तिवाद चांगला असला की, माझ्यावर छाप पडत असे. रॉय यांच्या विचारात असा युक्तिवाद होता आणि भारताचा जो राजकीय इतिहास घडत होता त्याच्याविषयीची आपली मीमांसा ते व्यवस्थितपणे मांडत. त्यांच्या लेखनाशी माझा संबंध १९३३ पासून जुळून आला.

रॉय यांच्यावर १९३१ मध्ये खटला होऊन त्यांना ६ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. प्रथम ती १२ वर्षांची होती; पण पुढे ती कमी करण्यात येऊन ६ वर्षांची झाली. काटजू त्यांचे वकील होते आणि पंडित जवाहरलाल नेहरूही त्यांच्या खटल्याच्या कामात लक्ष घालीत होते. म्हणजे काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीही त्यांना महत्त्व दिले होते. या सगळ्या गोष्टींमुळे माझे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले होते. १९३६ साली मला कळले की, तुरुंगात त्यांचे नवीन चिंतन चालू होते. आधुनिक विज्ञानामध्ये, विशेषतः भौतिकीमध्ये जे बदल झाले होते त्यांची ते समीक्षा करीत होते. आइन्स्टाइनच्या उपपत्तीचा ते परामर्श घेत होते आणि या विषयावर त्यांनी बरेच लिहिले आहे (ती बाडे पुढे आम्हाला पाहायला मिळाली !). तेव्हा बौद्धिक दृष्टीने जीवनाकडे पाहणारा, मूलगामी दृष्टिकोन असलेला, मार्क्सवादी समीक्षापद्धतीने इतिहासाचे आणि सामाजिक परिस्थितीचे समालोचन करणारा, प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणारा - ॲक्टिव्हिस्ट आणि विचार करणारा असे त्यांचे जे संपन्न व्यक्तिमत्त्व होते ते मला पटत गेले. १९३६ च्या शेवटी ते तुरुंगातून सुटून आले. काँग्रेसबद्दल फार मोठी आशा घेऊन ते बाहेर आले. फैझपूर काँग्रेसला ते हजर राहिले. सगळ्या वृत्तपत्रांनी त्यांच्याकडे लोकांचे लक्ष वेधले.

एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. म. गांधींचे आणि त्यांचे काही जुळले नाही. फैझपूरला गांधींची आणि त्यांची भेट झाली. गांधींनी त्यांना विचारले, ''प्रार्थनेला येणार का?'' त्यांनी उत्तर दिले, ''मी प्रार्थनेला येऊ शकत नाही. कारण माझी तशी श्रद्धा नाही;'' पण त्या वेळचे काँग्रेसचे जे इतर नेते होते ते प्रार्थनेला हजर राहत. रॉय हजर नसत. ही गोष्ट गांधीजींच्या लक्षात आली. हा आपल्यातला नव्हे अशी खूणगाठ त्यांनी बांधली असणार. तिकडे मोठमोठ्या क्षेत्रांत काम करणारा, प्रत्यक्ष लेनिनसोबत बरोबरीचे काम करणारा हा माणूस, माझ्या राजकारणात, जेथे माझे नेतृत्व आहे त्या राजकारणात त्याचे जमू शकत नाही ही त्यांच्या मनाची खात्री झाली असणार. कम्युनिस्टसुद्धा त्यांच्याजवळ जात; पण रॉय जात नसत. गांधीजींनी त्यांना बाजूला करायचे

ठरविले हे आमच्या लक्षात आले. पुढे रॉय यांनी गांधींना एक पत्र पाठवले. 'मला एक वृत्तपत्र काढायचे आहे, तुम्ही मला काही मदत देऊ शकाल का?' अशा आशयाचे ते होते. गांधींनी उत्तर दिले की, 'तुम्ही मौन धारण करूनच देशाला मदत करू शकाल !!'

फैझपूर काँग्रेसच्या वेळी वल्लभभाईंनी १९३७ च्या ज्या निवडणुका व्हायच्या होत्या त्यासाठी करायच्या प्रचारात तुम्ही भाग घ्या, अशी रॉय यांना विनंती केली. रॉय यांनी ती मान्य केली. या कामासाठी ते देशभर फिरले; पण त्या वेळी एक गोष्ट लोकांना दिसून आली. रॉय यांची राहणी, चालचलणूक पाश्चात्त्य होती. कार्यकर्त्यांचा जो गट ते सोबत घेऊन फिरत, त्यात स्त्रियाही असत. आपल्या परंपरागत पद्धतीमध्ये ही गोष्ट बसत नसे. मणिबेन कारा या प्रवासात त्यांच्याबरोबर असत. कित्येकांना वाटले की, या त्यांच्या पत्नीच असणार. ते मद्यही घेत असत. ही त्यांची जीवनपद्धती लोकांना काहीशी खटकली. काँग्रेसचा वेगवेगळया पातळीवरच्या नेत्यांचा जो वर्ग होता आणि त्यांचे जे क्रियाशील अनुयायी होते त्यांचा आणि रॉय यांचा सांधा नीट जुळला नाही.

**प्रश्न - तुमची त्यांची वैयक्तिक गाठ कशी पडली?**

**उत्तर -** ते तुरुंगातून सुटल्यावर जेव्हा पुण्याला आले तेव्हा डॉ. कर्णिकांच्या घरी त्यांची माझी प्रथम गाठ पडली. मी त्यांना म्हटले, "काँग्रेसच्या चळवळीविषयीची तुमची मीमांसा मला पटली आहे. विशेषतः सामान्य जनतेचे आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्न सुटले पाहिजेत हा जो तुमचा विचार आहे तो मला मान्य आहे. मार्क्सवादी दृष्टी उपयुक्त आहे यात शंका नाही; पण असे पाहा, वेद आम्ही श्रद्धेने पत्करले होते. आता आम्ही वेदांकडे विवेकबुद्धीने पाहतो. दिव्य आणि ईश्वरप्रणीत असे काही आहे असे आम्ही मानीत नाही, तरीही वेदाविषयी आम्ही आदर बाळगतो. तसाच मार्क्सवादाविषयी तुमचा जो आदर आहे तो मी मान्य करतो. मार्क्स हा एक जंगी विचारवंत आहे. जगाच्या राजकारणावरही मार्क्सचा प्रचंड प्रभाव आहे, विशेषतः रशियन राज्यक्रांतीनंतर; पण सबंध मार्क्स जसाचा तसा पत्करायचा हे काही आम्हाला पचण्यासारखे नाही." रॉय म्हणाले, "असे करायची काहीच आवश्यकता नाही. I am also a non-conformist Marxist मीसुद्धा विवेकपूर्ण रीतीने मार्क्सचा वापर केला पाहिजे असे मानतो; परंतु आज विचार करण्यासाठी जे सर्वोत्कृष्ट साधन आहे ते म्हणजे मार्क्सवाद. मानवी इतिहासाचे रहस्य चांगल्या रीतीने स्वतःमध्ये साठविलेला आणि मानवी जीवनाविषयी सर्वात प्रगत असा दृष्टिकोन बाळगणारा असा हा विचार आहे. आतापर्यंतच्या मानवी विचाराचे सर्वोत्कृष्ट फलित म्हणजे मार्क्सवाद; पण हा विचारही विवेकबुद्धीने तपासत गेले पाहिजे हे मला मान्य आहे." मी म्हटले, "मीही पूर्ण मार्क्सवादी नाही; पण मार्क्सवादी मीमांसा जिथे जिथे पटेल तिथे तिथे स्वीकारणारा आणि या दृष्टीने मार्क्सवादाकडे पाहणारा आहे," अशी आमची पहिली चर्चा झाली.

पुढे रॉय यांचे वसंत व्याख्यानमालेत भाषण झाले. प्रा. वा. गो. काळे अध्यक्षस्थानी होते. रॉय इंग्रजीतून बोलले. मी मराठीत उपभाषण केले. मी असे सांगितले की, डायलेक्टिक्सच्या दृष्टीने

आपण जगाकडे पाहिले पाहिजे आणि ही दृष्टी भारतीय परंपरेला पूर्णपणे परकी आहे असे नाही. जैनांचा जो अनेकांतवाद आहे तो डायलेक्टिक्सचाच विचार आहे. मी अर्थात दहाएक मिनिटेच बोललो. माझा त्या वेळचा वेश म्हणजे धोतर, उपरणे, शेंडी असाच होता. शेंडीवाला मार्क्सवादी म्हणून मी बोललो. हा ३७ सालचा प्रसंग आहे.

यानंतर मी गांधींपासून दूर गेलो, अशी वार्ता गांधींकडे गेली आणि गांधींना ते आवडले नाही, हेही मला कळले; पण त्यानंतर गांधींची व माझी गाठही पडली नाही.

**प्रश्न - आता माझा एक प्रश्न आहे. रॉय यांच्या प्रभावामुळे 'रॉयवाद्या'चा असा एक गट तयार झाला. 'गट' हा शब्द मी चांगल्या अर्थाने वापरतो आहे. आता प्रश्न असा आहे...**

**उत्तर -** हा जो गट तयार झाला तो काँग्रेसमध्येच तयार झाला. 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमेन' असे नाव त्याने धारण केले.

**प्रश्न - मग हा मार्क्सवादी रॅडिकल गट आणि कम्युनिस्ट पक्ष यांचे संबंध काय होते? काँग्रेसने जे आंदोलन चालविले होते त्याविषयीचे कम्युनिस्ट पक्षाचे मूल्यमापन काय होते?**

**उत्तर -** हे मूल्यमापन काहीसे संदिग्ध, धरसोडीचे होते. रॉय यांचे म्हणणे असे होते की, आपण काँग्रेसमध्येच पूर्णवेळ काम करीत राहिले पाहिजे, काँग्रेसच्या कार्यक्रमाला अधिक मूलगामी आशय दिला पाहिजे. म्हणजे ज्याच्या योगे जनता उठाव करायला तयार होईल, असा कार्यक्रम काँग्रेस स्वीकारील यासाठी प्रयत्न करीत राहिले पाहिजे आणि याला साजेसा बदल काँग्रेसच्या नेतृत्वात घडवून आणला पाहिजे. काँग्रेसला असा शंभर टक्के पाठिंबा देण्याचे कम्युनिस्ट पक्षाचे धोरण नव्हते. त्यांचा स्वतःचा पक्ष होताच आणि तो त्यांना वाढवायचा होता. आपला वेगळा पक्ष राखून काँग्रेसला मदत करणे शक्यच नव्हते. हा विरोध त्यांच्या भूमिकेत होताच. आम्ही जे रॉयमागून गेलो त्यांच्यापुढे असा पेच नव्हता. म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्ष जनतेपासून आतापर्यंत जो दूर गेलेला आहे त्याची बीजे त्यांच्या या धोरणात आढळतात. अलीकडच्या काळात अर्थात बंगाल आणि केरळ या प्रदेशात ही परिस्थिती बदलली आहे; पण हा अलीकडचा अपवाद आहे. पूर्वी तेथेही हीच परिस्थिती होती.

**प्रश्न - प्रश्न असा आहे की, त्या वेळी रॉय मार्क्सवादी होते, पोथीनिष्ठ मार्क्सवादी नव्हते; पण त्यांची विचारसरणी, दृष्टिकोन मार्क्सवादी होता. आता मार्क्सवादीच्या दृष्टीने कोणत्याही ऐतिहासिक परिस्थितीत एक क्रांतिकारक वर्ग असतो. हा वर्ग क्रांती घडवून आणतो. रॉय यांचे भारतीय परिस्थितीच्या संदर्भात काय विश्लेषण होते? भारतात कोणता वर्ग क्रांतिकारक होता? कामगार वर्ग की शेतकरी वर्ग? की आणखी कोणता वर्ग? आणि हा वर्ग किंवा हे वर्ग बऱ्याच प्रमाणात काँग्रेसशी एकरूप झाले आहेत, काँग्रेस त्यांचे प्रतिनिधित्व करीत आहे, असे त्यांचे विश्लेषण होते का?**

**उत्तर -** काँग्रेसच्या पाठीमागे जनता आहे; पण तिला राजकीय शिक्षण देऊन जागृत केले पाहिजे हे त्यांच्या धोरणाचे सूत्र होते. ही जनता म्हणजे शेतकरी - कामकरी वर्ग आणि मध्यमवर्ग. जनतेचे हे थर क्रांतिकारक आहेत. म्हणजे क्रांतिकारक बनण्याची क्षमता त्यांच्यात आहे, असे त्यांचे निदान होते. इथला बुर्जाजी (भांडवलदारवर्ग) आणि साम्राज्यशाही यांचे सूत जुळत चालले आहे, असा दृष्टिकोन ते मांडत होते. म्हणजे भारतीय भांडवलदारवर्गाची क्रांतिकारकता संपुष्टात येत चालली होती. याबद्दल थर्ड इंटरनॅशनलमध्ये त्यांच्यावर टीका झाली होती. भारतीय भांडवलदारवर्ग आणि साम्राज्यशाही यांचे संगनमत घडून येत चालले आहे, हा रॉय यांचा निष्कर्ष थर्ड इंटरनॅशनलच्या नेत्यांना अमान्य होता. थर्ड इंटरनॅशनलमध्ये रॉय यांना महत्त्वाचे स्थान होते; पण या मतभेदामुळे ते थर्ड इंटरनॅशनलमधून वगळले गेले.

रॉय यांचे वैशिष्ट्य असे की, शेतकरी-कामगारवर्गाप्रमाणे मध्यमवर्ग, म्हणजे सामान्य मध्यमवर्ग किंवा मध्यम मध्यमवर्ग पेटी बुर्ज्वा हाही एक सुप्तपणे क्रांतिकारक असलेला वर्ग आहे; आणि म्हणून त्याचे राजकीय शिक्षण करून त्याची क्रांतिकारकता जागृत केली पाहिजे. अशी त्यांची भूमिका होती. कार्ल मार्क्सच्या सिद्धांताप्रमाणे मध्यम-मध्यमवर्ग काही क्रांतिकारक नव्हे; पण रॉय यांनी त्याला क्रांतिकारकवर्ग हे स्थान दिले. जगातील कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांची विचारसरणी आणि रॉय यांची विचारसरणी यांच्यात हा महत्त्वाचा भेद होता. दोघेही मार्क्सवादी; परंतु मध्यमवर्गाच्या क्रांतिकारक क्षमतेविषयीचे त्यांचे विश्लेषण वेगळे होते.

मध्यमवर्ग जगात सर्वत्र वाढलेला आहे. ज्यांना भांडवलशाही देश म्हणून ओळखण्यात येते त्यांच्यातही तो वाढलेला आहे. तो काही संकोच पावत जाईल अशी लक्षणे नाहीत. मार्क्सवादामध्ये अधिक खोलात शिरून त्याच्यात त्यांनी ही भर घातली असे म्हणावे लागेल. ही भर म्हणजे मध्यमवर्ग क्रांतिकारक भूमिका वठवू शकतो हा सिद्धांत. रॉय यांच्या दृष्टीने क्रांतीचे नेतृत्व मध्यमवर्गाकडे असते. कामगारवर्ग क्रांतीचे नेतृत्व करतो, हा मार्क्सवादी सिद्धांत खरा; पण वस्तुतः हे नेतृत्व मध्यमवर्गाचे असते, असे रॉय यांचे म्हणणे होते. म्हणून वसाहतीमध्ये, जित देशांमध्ये जी क्रांती व्हायची होती तिच्यात मध्यमवर्गाचे स्थान अपरिहार्य आहे, असा रॉय यांचा दृष्टिकोन होता.

आणखी एक मुद्दा - 'वैज्ञानिक समाजवाद' - सायन्टिफिक सोशलिझम ही शब्दावली एंगेल्सपासून आली. रॉय यांनी 'वैज्ञानिक राजकारण' - सायन्टिफिक पॉलिटिक्स - शब्दावली प्रचारात आणली म्हणजे वैज्ञानिक दृष्टीने राजकारण आचरणात आणणे. याची सर्वच देशांत; पण विशेषतः साम्राज्यशाहीच्या अंकित असलेल्या देशांत फार गरज आहे असे त्यांचे म्हणणे होते. या वैज्ञानिक राजकारणाच्या संकल्पनेला फार मोठा धक्का इटली व जर्मनी यांच्यामध्ये हुकूमशाही राजवटीचा उदय होऊन विचारस्वातंत्र्य, माणसांचे मूलभूत हक्क यांची गळचेपी होऊ लागली त्याने बसला. म्हणजे फॅसिस्ट आणि नात्सी राजवटींकडून बसला. या घटनेमुळे ते फार

अस्वस्थ झाले. फॅसिझमवर त्यांनी निबंध लिहिला आहे. त्यांची अस्वस्थी त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वांना जाणवत होती. तिचा आविष्कार वैचारिक चिंतन आणि विश्लेषण यांच्या द्वारा झाला. त्यांच्यासमोर जी ऐतिहासिक परिवर्तने वेगाने होत होती त्यांच्याविषयी ते नेहमी चिंतन करीत आणि ते त्यांच्या लिखाणातून प्रकट होई. फॅसिझमवरील त्यांचा निबंध हे या प्रवृत्तीचे उदाहरण आहे.

भारताच्या संदर्भात ते इस्लामचा विचार करू लागले. गांधीजी हिंदू-मुसलमान ऐक्याला अतिशय महत्त्व देत होते आणि स्वातंत्र्याचे आंदोलन बळकट करण्यासाठी हिंदू-मुसलमान ऐक्य आवश्यक आहे हे उघड होते. इस्लामचा धर्म आणि संस्कृती ही माणसाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक विकासातील एक महत्त्वाची पायरी आहे, असा रॉय यांचा दृष्टिकोन होता. शिवाय आजच्या नव्या जगात पुढे जाण्याची ताकद इस्लाममध्ये आहे, असाही विचार त्यांनी मांडला.

**प्रश्न - त्या वेळचा रॉय यांचा दृष्टिकोन जर असा मांडला, तर ते बरोबर ठरेल का पाहा. ज्याला तुम्ही मध्यम-मध्यमवर्ग म्हटले आहे त्या वर्गाचेच प्रतिनिधित्व त्या वेळची काँग्रेस करीत होती; पण साम्राज्यशाहीच्या अंकित असलेल्या वासाहतिक देशांत जो क्रांतिकारक वर्ग असतो तो मध्यम-मध्यमवर्गाप्रमाणे शेतकरीवर्ग व कामगारवर्ग यांचाही बनलेला असतो. या वर्गांची मिळून समाजातील क्रांतिकारक शक्ती बनलेली असते. तेव्हा काँग्रेसचा वर्गीय पाया अधिक विस्तृत करून शेतकरीवर्ग व कामगारवर्ग हेही त्यात प्रविष्ट होतील, असे पाहिले पाहिजे. काँग्रेसचे नेतृत्व जर मध्यम-मध्यमवर्गापुरते मर्यादित राहील, तर त्याच्या क्रांतिकारक स्वरूपालाही मर्यादा पडेल. तेव्हा काँग्रेसची क्रांतिकारी प्रेरणा अधिक प्रखर करण्यासाठी शेतकरी आणि कामगार वर्गांनाही तिच्यात ओढून घेतले पाहिजे.**

**उत्तर -** हे वर्णन बरोबर आहे आणि हे साधण्यासाठी शेतकरी आणि कामगार यांच्या प्रश्नांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. उदा. ‘कसेल त्याची जमीन’ ही रॉय यांची एक घोषणा होती. तिच्याने जमिनीवर कष्ट करणारा जो वर्ग आहे त्याला त्यांनी काँग्रेसमध्ये येण्याचे आवाहन केले.

जी क्रांती भारतात किंवा इतर वासाहतिक देशांत व्हायची होती, ती मध्यमवर्गाच्या नेतृत्वाखाली होणारी क्रांती असली तरी राष्ट्रीय क्रांती होती. ‘ए बुर्ज्वा रेव्हॉल्यूशन विदाऊट बुर्ज्वाजी’ ही रॉय यांची शब्दावली होती. बुर्ज्वाजीचे साम्राज्यशाहीशी सूत जमलेले होते; पण शेतावर काम करणारा मोठा वर्ग होता. त्यात शेतमजूर होते. जमिनीच्या लहान तुकड्यांचे मालकही होते. हे स्वतःच्या जमिनीवर कष्ट करणारे शेतकरी होते. जमीनदारांप्रमाणे इतरांच्या कष्टावर जगणारे नव्हते. या वर्गात जमिनीचे योग्य वाटप झाले पाहिजे, हा रॉय यांच्या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग होता. तसेच कामगारांचे आर्थिक प्रश्न सुटले पाहिजत, त्यांना योग्य वेतन, राहायला घरे, म्हातारपणची पेन्शन मिळाली पाहिजे इत्यादी.

**प्रश्न - अर्थात, ही जी नेतृत्वाशिवायची बुर्ज्वा क्रांती भारतात होणार होती तो क्रांतीचा एक टप्पा असणार आणि त्याच्या आधारावर साम्यवादी क्रांती घडून येणार असाच रॉय यांचा दृष्टिकोन असणार.**

**उत्तर -** होय. 'अवर टास्क इन इंडिया' - 'भारतात आपल्यापुढे असलेले काम' - हे त्यांचे जप्त झालेले पुस्तक होते; पण ते आमच्या वाचनात होते. त्यात त्यांनी हा सगळा दृष्टिकोन मांडला होता (आम्ही ते १९३६ साली गुप्तपणे छापूनही घेतले होते). मला सिमल्याला काही बंगाली मार्क्सवादी - कम्युनिस्ट मार्क्सवादी भेटले होते. मी त्यांना असे सांगितले की, माओ जे म्हणत आहेत ते माओपूर्वी रॉय यांनी म्हणून ठेवलेले आहे. शेतकरीवर्ग हा क्रांतिकारकवर्ग आहे, असे मानून माओ यांनी आपला विचार सांगितला. ते शेतकऱ्यांचेच नेते होते, स्वतः शेतकरी कुटुंबातील होते.

**प्रश्न - आता माझा प्रश्न जरा वेगळा आहे. भारतीय परिस्थिती आणि तिच्यात असलेल्या सुप्त, अर्धजागृत, जागृत अशा क्रांतिकारक प्रेरणा यांच्याविषयीचे रॉय यांचे विश्लेषण भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या विश्लेषणाहून वेगळे होते, हे तर आहेच. भारतीय कम्युनिस्ट पक्ष थर्ड इंटरनॅशनलच्या त्या त्या वेळच्या सिद्धांतांना, थीसिसना अनुसरून आपले धोरण आखत असणार. रॉय यांचे विश्लेषण भारतीय परिस्थितीला अधिक जुळणारे होते, असे कुणीही तटस्थ निरीक्षक म्हणेल असे मला वाटते; पण माझा प्रश्न असा आहे, की १९३६ साली मॉस्को खटले होऊन गेले होते. स्टालिनची अत्यंत क्रूर, विकृत अशी जी दडपशाही सोव्हिएट रशियात निर्माण झाली होती, तिचे स्वरूप स्पष्ट झाले होते. म्हणजे ज्यांना पाहण्याची इच्छा होती त्यांना हे स्वरूप दिसणे शक्य झाले होते. सोव्हिएट रशियात मार्क्सवादी क्रांती झाली आणि लेनिनसारख्या मार्क्सवादाच्या अधिकारी जाणकाराने घडवून आणलेली ती क्रांती होती. ही क्रांती जर असे विकृत स्वरूप धारण करू शकते, तर मार्क्सवादाच्या मूळ सिद्धांतात आणि त्यांच्यावर आधारलेली मार्क्सवाद्यांची कार्यपद्धती यांच्यातच काही मूलभूत दोष असावा असे रॉय यांना वाटले नाही का?**

**उत्तर -** त्यांना हे जाणवत असावे. कारण रॉय यांना जो धक्का बसला तो फॅसिझम - नात्सीझमच्या उदयाने. सुधारलेल्या देशांत, जेथे लोकशाही शंभर-दीडशे वर्षे नांदली अशा देशांत लोकशाहीविरोधी हुकूमशाही राजवटी स्थापन झाल्या. मूलभूत मानवी मूल्यांना बाजूला फेकून देण्यात आले, तेव्हा त्यांना खरा धक्का बसला. स्टालिन आपल्या सहकाऱ्यांचे जे शिरकाण करीत होता ते रशियात एकमुखी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरता असे त्यांना वाटत होते; पण त्याबरोबरच वरिष्ठ वर्गाचे आधिपत्य टिकून राहावे म्हणून जी हुकूमशाही इटलीत स्थापन झाली किंवा वंशश्रेष्ठतेच्या कल्पनेवर आधारलेली जी नात्सी हुकूमशाही जर्मनीत स्थापन झाली त्यांचा प्रतिकार करणारी शक्ती रशियातच आहे, अशी त्यांची श्रद्धा होती आणि ती श्रद्धा त्यांनी

दीर्घकाळ जपली होती. मुसोलिनीने फॅसिस्ट राजवटीमागची उपपत्ती मांडली होती. रॉय यांनी फॅसिझमची जी मीमांसा केली ती अशी होती की, अवनतीला लागलेल्या भांडवलशाहीची प्रतिगामी प्रक्रिया म्हणजे फॅसिझम. जोपर्यंत भांडवलशाही प्रगतिपथावर असते तोपर्यंत भांडवलदारवर्ग सर्व समाजाचा विचार करीत असतो आणि संसदीय लोकशाही अस्तित्वात येते, वाढते, पोसली जाते; पण संसदीय लोकशाही भांडवलदारवर्गाला परवडत नाही, अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होते, म्हणजे भांडवलशाहीला जेव्हा उतरती कळा लागते तेव्हा संसदीय लोकशाही हुकूमशाहीचे रूप धारण करते अशी ही मीमांसा होती. तेव्हा या हुकूमशाहीला जो विरोध होईल तो भांडवलशाही देशांकडून होणार नाही, तो रशियाकडूनच होईल, अशी त्यांची पक्की श्रद्धा होती. तिला, जेव्हा हिटलर पोलंडविरुद्ध आक्रमणाची योजना आखत असताना स्टालिनने हिटलरशी अनाक्रमणाचा करार केला तेव्हा मोठा धक्का बसला. या कराराने रॉय हे अत्यंत अस्वस्थ झाले. हिटलर युरोपमध्ये वेगाने विजय मिळवीत होता. रॉय यांना धक्क्यामागून धक्के बसत होते. आम्ही ही सर्व त्यांच्या या भावनांशी एकरूप झाले होते. हिटलरच्या विजयाचे परिणाम काय होतील, हे आम्हाला दिसत होते. आमचीही मनःस्थिती प्रक्षुब्ध होती. त्यांनी या सुमाराला मला असे विचारले की, मी वेदान्ती आहे अशी त्यांची समजूत होती. म्हणून त्यांनी मला हे विचारले असेल. मी वेदान्त बोलत नसे तरी त्यांची तशी समजूत असावी. - No response from the Cosmic Consciousness, Shastriji? म्हणजे 'ती जी सर्वातीत चैतन्यशक्ती आहे तिची काही प्रतिक्रिया या घटनांना दिसत नाही?' यात गर्भित आशय असा होता की, मूलभूत मानवी हक्कांवर आधारलेली लोकशाही हे माणसाला त्याच्या इतिहासातून लाभलेले एक मोठे श्रेय आहे आणि ही लोकशाहीच आज उखडली जात आहे. इतिहासाला काही पलीकडचे असे उद्दिष्ट असते हे मार्क्सवादामध्ये गर्भित आहे. ते अर्थात भौतिकवादाशी विसंगत आहे; पण तो मार्क्सवादाला हेगेलपासून लाभलेला वारसा आहे. इतिहास हा सतत प्रगती आणि विकास यांच्या दिशेनेच चालला आहे ही जी मार्क्सवादाची श्रद्धा आहे ती हेगेलिन तत्त्वज्ञानातून आली आहे. ती गृहीत धरून रॉय यांनी आपला प्रश्न मला विचारला.

**प्रश्न - तुम्ही म्हणायचे की ही सर्व वैश्विक चैतन्यशक्तीचीच लीला आहे.**

**उत्तर -** मी म्हटले, "या महान विश्वात पृथ्वी केवढी आहे? हा एक बारीकसा तुकडा, एक कण आहे विश्वाच्या तुलनेने. मानवी संस्कृतीचा पृथ्वीवर झालेला विकास हे एक क्षुद्र रूप आहे. चैतन्य शक्तीचा हा अल्पसा खेळ आहे. त्याचे तिला काही महत्त्व नाही." पण माझ्या हे लक्षात आले की, मार्क्सवाद हा एका अंगाने चैतन्यवादच आहे, विकासवादच आहे. राज्यसंस्था ही मानवी इतिहासाच्या विकासाची अंतिम परिणती आहे, या हेगेलियन दृष्टिकोनातून काही मार्क्स वाचला नाही आणि रॉयसाहेबही त्यातून बाहेर पडले नव्हते आणि त्यातून ते कधी बाहेर पडले नाहीत. कारण त्यांच्याही भौतिकवादात निसर्गाच्या प्रक्रियेतून हा जो माणूस घडलेला आहे तो नैतिक प्राणी म्हणून घडलेला आहे, असा रॉय यांचा दृष्टिकोन होता. कृतिशील असा जो

विचारवंत असतो त्याच्या कृतीला मोठी नैतिक उद्दिष्टे असावी लागतात. म्हणजे मोठ्या नैतिक उद्दिष्टांना धरून निसर्ग असावा लागतो.

**प्रश्न - आता तुम्हाला एक दुहेरी प्रश्न विचारतो. तुम्ही गांधींच्या खूप जवळ गेला होता आणि त्या वेळच्या राजकीय आंदोलनाचे नेतृत्व गांधींकडे होते. असे असून तुम्ही रॉय यांचे अनुयायी झाला. तेव्हा त्या वेळी तुम्हाला गांधीवादात कोणती वैगुण्ये आढळली आणि रॉय यांच्या विचारात आणि कार्यक्रमात तुम्हाला पटण्यासारखे असे काय आढळले?**

**उत्तर -** गांधींच्या विचारात अंतिम नैतिक मूल्यांवर जी निष्ठा आहे ती माझी कधीच सुटली नाही; परंतु बहुजन समाजाचे या देशातील दारिद्र्य आणि श्रीमंत वर्गाचे स्थान याविषयी गांधीजींचे जे म्हणणे होते ते असे की, श्रीमंत वर्ग हा संपत्तीचा विश्वस्त आहे, संपत्ती निर्माण करण्यात त्याचे नेतृत्व असते आणि या नेतृत्वाची समाजाला गरज असते. हा दृष्टिकोन मला कधी मान्य नव्हता. कारण संपत्ती निर्माण करणारा हा श्रमिकवर्गच असतो, मग तो शेतावर श्रम करणारा असो किंवा कारखान्यात श्रम करणारा असो; आणि या वर्गातून नेतृत्व निर्माण होऊ शकते. कारण संपत्तीचा विस्तार करण्यात या वर्गाचे हित असतेच. या परिस्थितीत संपत्तीच्या उत्पादनाचे नेतृत्व करणारा हा निराळा विश्वस्तवर्ग असला पाहिजे असे मानायचे कारण नाही आणि ज्या विशाल संपत्तीची मालकी त्याच्याकडे असते तिला आपण होऊन विश्वस्तनिधीचे रूप तो देईल हेही काही शक्य नाही. तेव्हा वरिष्ठ वर्ग हा विश्वस्त आहे हा गांधीजींचा विचार मला कधीही पचला नाही.

**प्रश्न - पण हा जो प्रश्न आहे त्याला समाजवादाकडूनही उत्तर मिळू शकेल. मी समाजवाद आणि मार्क्सवाद यात भेद करीत आहे. संपत्ती आणि मालकीहक्क यांचे समाजात न्याय्य वितरण कसे करायचे याविषयी समाजवादाकडे उत्तर आहे हे कितपत सुसंगत आणि व्यवहार्य असे उत्तर आहे याचा आता विचार करायचे कारण नाही. माझा प्रश्न असा आहे की, रॉय यांचा सबंध विचार तुम्ही जेव्हा ऐकला तेव्हा जडवाद, ऐतिहासिक भौतिकवाद ही सबंध विचारप्रणाली ती तुम्हाला मान्य झाली का? ती तुम्ही स्वीकारली का?**

**उत्तर -** ही एक महत्त्वाची विचारप्रणाली आहे, अशी तिच्याकडे पाहण्याची माझी दृष्टी होती. माझी मान्यता दोन पातळ्यांवर होती. अमूक एक दृष्टिकोन संपूर्ण आहे असे मला आयुष्यात कधीही वाटले नाही; परंतु मार्क्सवादी, म्हणजे भौतिकवादी दृष्टिकोन मला या कारणासाठी ग्राह्य वाटला. या विश्वाच्या पाठीमागे नियंत्रक चैतन्यशक्ती आहे आणि ती या विश्वाचा प्रपंच चालविते असे मानण्याऐवजी या विश्वाचे स्वतःचे जे नियम आहेत ते वैज्ञानिक दृष्टीने तपासावे आणि माणसाच्या जगासकट या साऱ्या विश्वात होणाऱ्या घडामोडींचा उलगडा करण्याचा प्रयत्न करावा हे अधिक चांगले. कारण त्याच्याने अधिक ज्ञान होते. हे जे सर्व चाललेले आहे त्याच्यामागे काही उद्दिष्ट आहे आणि ते चांगले असणार हा जो धार्मिक दृष्टिकोन आहे तो न स्वीकारता उद्दिष्ट

आहे की नाही हे तपासून पाहणे अधिक चांगले. कारण त्याने मनुष्याच्या ज्ञानात भर पडण्याची शक्यता निर्माण होते.

**प्रश्न - असा अपक्ष, तटस्थ मार्क्सवादी असू शकत नाही. तुम्ही मार्क्सवादाकडे एक पर्यायी दर्शन म्हणून पाहत होता; पण रॉय यांची दृष्टी अशी नव्हती.**

**उत्तर -** रॉय मार्क्सवादाकडे पर्यायी दर्शन म्हणून पाहत नव्हते. ते अखेरपर्यंत भौतिकवादीच राहिले. एक पर्यायी दर्शन म्हणून मार्क्सवादाकडे पाहता येईल ही कल्पना त्यांना होती; पण ही दृष्टी त्यांनी स्वीकारली नव्हती. उलट मी नेहमी पर्यायी दर्शने विचारासाठी स्वीकारणारा आणि त्यातून काही प्रकाश मिळतो का ते पाहणारा होतो. हा आमच्यात फरक होता.

**प्रश्न - तरीही कृतीच्या पातळीवर तुम्ही पूर्णपणे रॉयवादी होता.**

**उत्तर -** अगदी. काही कार्यक्रम आखला जात असे आणि त्याच्या अनुरोधाने मीमांसा करण्यात येत असे. उदा. 'कसणाऱ्याला जमीन' हे आमचे एक घोषवाक्य आणि त्यावर आधारलेला कार्यक्रम होता. आता जमीनदाराची जी लुटारू वृत्ती असते, म्हणजे स्वतः कष्ट न करता इतरांनी केलेल्या कष्टांची फळे लुबाडून घ्यायची त्यांची प्रथा, तिच्यावर मार्क्सवादी दृष्टीने केलेली टीका किंवा नैतिक दृष्टीने केलेली टीका ही एकच असते. मार्क्सवाद जेव्हा कृतीच्या पातळीवर आपण आणतो तेव्हा सामाजिक विकास, प्रगती साधावी आणि या प्रगतीत समाजाचे सर्व घटक सहभागी व्हावे, त्यांचा योगक्षेम चांगला चालावा हाच विचार असतो. सबंध समाजाचा, त्याच्या सर्व घटकांचा योगक्षेम साधण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन उपयुक्त असतो.

येथे थोडीशी गुंतागुंत आहे. हे नैतिक तत्त्व घेऊ : मी जे उत्पन्न करतो त्याच्यावर, म्हणजे मी समाजाचे जे देणे लागतो ते माझ्या उत्पादनातून देऊन झाल्यावर जे उरेल त्याच्यावर माझा हक्क असतो हे एक नैतिक तत्त्व म्हणून स्वीकारू, म्हणजे मी स्वकष्टाने जमीन कसून जे पीक काढीन त्यातून कर वगैरे सर्व देऊन झाल्यावर जे उरेल ती माझी प्राप्ती असली पाहिजे; पण असे एक नैतिक तत्त्व आहे हे काही मार्क्सवाद मान्य करणार नाही. उदा. स्टालिनने काय केले? इतिहासाच्या नियमाप्रमाणे रशियात आता उद्योगप्रधान समाज झाला पाहिजे. त्यासाठी जी भांडवलनिर्मिती आवश्यक आहे ती शेतकऱ्यांच्या श्रमातूनच होणार. तेव्हा शेतकरी स्वतःच्या कष्टाने पीक काढतो म्हणून त्या पिकावर त्याचा हक्क आहे; या म्हणण्याला काही अर्थ नाही. हे पीक भांडवल म्हणून त्याच्यापासून हिसकावून घेणे योग्य आहे. कारण इतिहासाच्या आजच्या टप्प्यावर तसे करणे आवश्यक आहे. तेव्हा नैतिक काय आहे आणि अनैतिक काय आहे हे इतिहासाच्या त्या त्या वेळच्या अवस्थेवर जी समग्र परिस्थिती असेल आणि तिच्यात ऐतिहासिक विकासाची जी दिशा गर्भित असेल त्याच्यावरून ठरते.

म्हणजे ही गोष्ट सापेक्ष आहे. कोणती समाजपद्धती आहे आणि कोणती समाजपद्धती राबवायची आहे त्यावरून नैतिक काय आहे हे ठरते; जी समाजपद्धती राबवायची आहे तिच्याशी सुसंगत ते योग्य.

आणि काय सुसंगत आहे आणि समाजपद्धती कशी बदलत जाईल हे वस्तुनिष्ठ ऐतिहासिक नियमांना अनुसरून ठरते. तेव्हा हे अधिक चांगले, ते कमी चांगले असा निरपेक्ष नैतिक दृष्टिकोन काही असत नाही. मार्क्सवाद स्वीकारणे म्हणजे हा समग्र दृष्टिकोन, विचारव्यूह स्वीकारणे आणि तो रॉय यांनी त्या वेळी स्वीकारला होता.

रॉय यांना मार्क्सवादात नीतिशास्त्र दिसत होते. पुढे रॉय हे मार्क्सवादाचे आलोचक, टीकाकार झाले. पण त्यापूर्वीही, तुरुंगातून सुटून आल्यावर मार्क्सवादात नैतिकता आहे या आशयाचा लेख त्यांनी लिहिला होता. मार्क्सवादामध्ये नैतिकता आहे असे म्हणणारे आजही अनेक मार्क्सवादी विचारवंत आहेत आणि अशातीलच रॉय होते. खरे म्हणायचे तर या बाबतीत मार्क्सवादामध्ये एक पक्का अंतर्विरोध आहे.

हे म्हणणे योग्य आहे. माणसे अनेक बाजूंनी मार्क्सवादाकडे येऊ शकतात. काही नैतिक बाजूनेच येतात, काही वैज्ञानिक बाजूने, काही सर्वंकष तत्त्वज्ञानाच्या बाजूने.

**प्रश्न - तुमच्या, म्हणजे रॉय संप्रदायातील कार्यकर्त्यांचा सर्वांत बिकट कालखंड म्हणजे फॅसिझमचा उदय आणि दुसऱ्या महायुद्धाचा काळ. त्या वेळचे रॉय यांचे एक भाकीत त्यांच्या विश्लेषणावर आधारलेले होते. ते असे की, या युद्धामध्ये साम्राज्यशाहीवादी राष्ट्रे फॅसिस्ट राष्ट्रांविरुद्ध लढत आहेत असे जरी चित्र दिसत असले तरी ही साम्राज्यशाहीवादी राष्ट्रे लोकशाही प्रवृत्तीची आहेत. बाहेर जरी ती साम्राज्य स्थापन करीत असली तरी आपल्या स्वतःच्या देशात लोकशाही पाळतात आणि या युद्धाचा परिणाम असा होणार आहे की, साम्राज्यशाहीची शक्ती क्षीण होईल आणि तिच्या अंकित असलेले देश स्वतंत्र होतील.**

**उत्तर -** हा त्यांचा दृष्टिकोन त्यांनी १९४० साली मांडला. मार्क्सवादामुळे त्यांना राजकीय जीवनात जो दूरदृष्टीचा लाभ झाला त्याचा हा दृष्टिकोन हे एक फळ आहे. या युद्धामध्ये जो संघर्ष आहे तो केवळ. किंवा मुख्यत: आर्थिक असून तो दोन ध्येयवादांचा संघर्ष आहे, अशी त्यांची भूमिका होती. स्टालिन आणि रशिया युद्धात ओढले जाण्यापूर्वीच हे युद्ध हे जनतेचे युद्ध आहे. फॅसिझमविरोधी युद्ध आहे हा विचार जगातील कम्युनिस्ट पक्षांनी आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाने मांडण्यापूर्वी रॉय यांनी मांडला. रशिया युद्धात पडल्यानंतर या पक्षांनी हा विचार स्वीकारला; परंतु हे युद्ध फॅसिझमसारख्या दुष्ट विचारप्रणालीविरुद्ध उच्च ध्येयवादाने लढले जात आहे हा विचार रॉय यांनी पहिल्यापासून मांडला होता. याचा अर्थ असा की, रॉय हे याच वेळेपासून मार्क्सवादापलीकडे गेले होते. हे युद्ध काही आर्थिक हितसंबंधांच्या विरोधातून उद्भवलेले नाही, उच्च दर्जाच्या राजकीय जीवनपद्धतीचा पाशवी राजकीय पद्धतीशी झालेला संघर्ष असे त्याचे स्वरूप आहे, म्हणून साम्राज्यशाह्यांच्या विरुद्ध या वेळी लढता कामा नये, या साम्राज्यशाह्या संसदीय लोकशाहीला मानणाऱ्या आहेत, त्यांची बाजू आपण घेतली पाहिजे, फॅसिस्ट हुकूमशाही प्रथम नाहीशी केली पाहिजे, नाहीतर जित वासाहतिक देश अधिक घोर

गुलामगिरीत अडकतील, असा रॉय यांचा विचार होता. हा विचार घेऊन आम्ही रॉयवादी जेव्हा लोकांपुढे गेलो तेव्हा आम्हाला कमालीची अप्रियता सहन करावी लागली. भारतातल्या ब्रिटिश सरकारने आम्हाला प्रचाराकरता महिना रु. १३,०००/- दिले. आता तेरा हजार रुपयांत काय प्रचार करणार? हे आमचे चुकले. आम्ही ते स्वीकारायला नको होते; पण रॉय यांना असे वाटत होते की, अखेरीस जनता आपल्या पाठीशी येईल. तसे काही झाले नाही. जी 'भारत छोडो' चळवळ झाली तिच्यात बरीच जनता सामील झाली आणि सबंध जनतेची सहानुभूती एकंदरीत या चळवळीशीच होती. आम्ही मात्र 'ही चळवळ बरोबर नाही, ही चळवळ छोडो' या मताचे राहिलो, कारण जगातली लोकशाही जगली तरच साम्राज्यशाहीखालचे देश मुक्त होतील, नाहीतर ते मुक्त होणार नाहीत, तेव्हा भारत मुक्त व्हायचा तर या वेळी हिटलर-मुसोलिनीविरुद्ध लढणाऱ्या दोस्त राष्ट्रांशी सहकार्य केले पाहिजे, अशी भूमिका आम्ही घेतली आणि सर्वसाधारण भारतीय जनता आम्हाला दुरावली. आमच्या मनाला विलक्षण ताण देणारा असा तो काळ होता. रॉयसाहेबांचा भरवसा होता की, जनता अखेरीस आपल्या बाजूला येईल. मी त्यांना म्हटले, 'हे अशक्य आहे.'

१९४० साली आम्ही कलकत्त्याच्या कॉफी हाऊसमध्ये बोलत होतो. हिटलरचे रशियाविरुद्धचे आक्रमण नुकतेच सुरू झाले होते. रॉय अतिशय आनंदात होते. त्यांना वाटले की, आता भारतीय जनतेचे डोळे उघडतील, ती आपल्या बाजूला येईल. मी म्हटले, 'हे अशक्य आहे.' त्या वेळी मी जी शब्दावली वापरली ती त्यांना अतिशय मजेदार वाटली. वादविवादात दुसऱ्या पक्षाची बाजू ऐकून घ्यायला ते नेहमी तयार असत. मी म्हटले, 'Here, the reality is impotent ! इथे जी सामाजिक वस्तुस्थिती आहे ती तृतीयप्रकृती आहे. इथे तुम्हाला प्रतिसाद मिळायचा नाही.' ते मोठे भविष्यवादी होते. या युद्धामुळे सर्व जित देश साम्राज्यशाहीच्या कचाट्यातून मुक्त होतील असे त्यांचे भविष्य होते. इतर कुणालाही ते सांगता आले नाही, त्यांनी एकट्याने ते सांगितले. मी लोकांमध्ये काम करणारा, मला त्यांची मनोवृत्ती माहीत होती. मी त्यांना म्हटले की, येथे लोकशाह्या जगल्या काय आणि मेल्या काय, कुणालाच त्याचे काही महत्त्व नाही. इथला सुशिक्षित वर्ग, काँग्रेसवाले सर्व याविषयी तटस्थ आहेत.

**प्रश्न - तुमचे हे म्हणणे मान्य केले, तरी भारतीय जनतेच्या बाजूने एवढे म्हणता येईल की, लोकशाहीच्या तत्त्वासाठी हे युद्ध चालू आहे असे मानायला फारसा आधार नव्हता. इंग्लंड, अमेरिका ही राष्ट्रे अंतर्गत लोकशाही पाळणारी होती, यात शंका नाही. रशिया कोणत्या अर्थाने लोकशाहीवादी होता? या दोहोंची युती होते ती कोणत्या लोकशाही तत्त्वाच्या, दोघांना मान्य असलेल्या अशा कोणत्या लोकशाहीच्या तत्त्वाला धरून होते?**

**उत्तर -** ती प्रासंगिक युती होती.

भारतीय जनता कमकुवत आहे, दुबळी आहे हे मान्य करू या; पण तिने एवढा विचार केला असणे शक्य आहे की, लोकशाही मूल्यांसाठी चाललेले हे युद्ध आहे हे म्हणणे टिकण्यासारखे

नाही. चर्चिलचे वाक्य असे होते की, ब्रिटिश साम्राज्याचे विसर्जन करायला काही मी ब्रिटिश पंतप्रधान झालेलो नाही. ते कोणत्या लोकशाही मूल्यांचे निदर्शक होते? आता रॉय यांचे भाकीत असे असेल की, युद्धामुळे परिस्थितीच अशी घडून येईल की, ब्रिटिशांना येथे राज्य करणे अशक्य होईल. साम्राज्यशाह्यांनाच राज्य करणे अशक्य होईल. त्या थकतील, थकल्या होत्याच; पण फ्रेंच साम्राज्यशाही लढत राहिली.

आणि ब्रिटिशांनी तशीच मूर्खपणाची जिद्द दाखविली असती तर तेही लढू शकले असते.

पण फ्रेंचांना व्हिएतनाम सोडावा लागला तसा ब्रिटिशांनाही हा देश सोडावा लागला असता. त्यांना येथे राज्य करणे अशक्य झाले असते.

तेव्हा एकंदरीत असे म्हणता येईल की, रॉय यांनी केलेले भाकीत बरोबर होते. त्यांना लोकशाही राष्ट्रांविषयी जी आस्था वाटत होती ती योग्यच होती; परंतु लोकशाही मूल्यांसाठी चाललेले हे युद्ध आहे असे दर्शन भारतीय जनतेला होणे कठीण होते.

**प्रश्न - माझा पुढचा प्रश्न रॉय यांच्या मार्क्सवाद ते नवमानवतावाद या वाटचालीविषयीचा आहे. मार्क्सवादाचा रॉय मूलभूत पुनर्विचार करीत आहेत हे तुम्हाला प्रथम कधी जाणवले?**

**उत्तर -** स्टालिनने हिटलरशी करार केला तेव्हा हा पुनर्विचार करणे त्यांना आवश्यक वाटले. असा करार होऊ शकतो याचा अर्थ मार्क्सवादातच काही वैगुण्य असले पाहिजे असे त्यांचे मत झाले. रशियातील जनता या कराराविरुद्ध प्रतिक्रिया करीत नाही याचा अर्थ रशियात सत्तेचे केंद्रीकरण झाले आहे, असा त्यांनी लावला. मार्क्सवादी क्रांतीचे स्वरूपच असे आहे, की क्रांतीनंतर सत्तेचे केंद्रीकरण होणे अटळ आहे. ते वगळता येणार नाही असे त्यांचे मत झाले. कारण क्रांतीनंतर सत्ता कामगारवर्गाच्या म्हणजे कम्युनिस्ट पक्षाच्या हाती येते आणि ही सत्ता अपरिहार्यपणे केंद्रीभूत होते. एक तर क्रांतीच्या मार्क्सवादी सिद्धांतापासून हे निष्पन्न होते. या सिद्धांतात हे गर्भित आहे आणि रशियात ते प्रत्यक्ष घडूनही आले आहे, या निष्कर्षाला ते आले. रशियन क्रांती फसली आहे असा त्यांचा निर्णय झाला. क्रांतीचा तेथे गर्भपात झाला आहे, अशी रशियन क्रांतीची मीमांसा ते करू लागले.

मी तुम्हाला मघाशी सांगितले की, त्यांना जे राजकीय, सामाजिक अनुभव येत त्यांचे विश्लेषण करून त्यांची उपपत्ती लावणाऱ्या वैचारिक ग्रंथांची रचना ते करीत. ते चीनमध्ये गेले आणि नंतर चिआंग-कै-शेकचा विजय झाल्यावर चीनमधल्या घडामोडीवर 'रेव्होल्यूशन ॲट काऊंटर-रेव्होल्यूशन इन चायना' - 'चीनमधील क्रांती व प्रतिक्रांती' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्याच्यात त्यांनी निष्कर्ष काढला तो असा की, हा क्रांतीचा गर्भपात आहे. दुसऱ्या महायुद्धात त्यांना रशियाचे जे अनुभव आले त्यावरून या निर्णयाला ते आले.

क्रांती अशी का फसते याचे निदान करण्यासाठी ते राजकीय पक्ष या स्वरूपाच्या संघटनेचे विश्लेषण करू लागले. सत्ता काबीज करणे हेच राजकीय पक्षाचे उद्दिष्ट असल्यामुळे राजकीय

पक्षाला त्यात यश आले, की सत्ता त्याच्या हातात जाते आणि जनता सत्तेपासून वंचित राहते. तेव्हा सत्तेचे वितरण सर्व जनतेत झाले पाहिजे, म्हणजे मूलगामी लोकशाही (रॅडिकल डेमॉक्रसी) आली पाहिजे आणि लोकांनी लोकशाही वागवली पाहिजे, तिच्या तत्त्वांचा वापर आपल्या प्रत्यक्ष जीवनात केला पाहिजे, असा त्यांचा विचार बनत गेला. लोकांचे सार्वभौमत्व हे केवळ औपचारिक स्वरूपाचे, मधूनमधून मतपेटीच्याद्वारे व्यक्त होणारे एवढेच राहून भागणार नाही. सत्ता जनतेतून खेळती राहिली पाहिजे, सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे, सत्ता समाजामध्ये आली पाहिजे आणि राहिली पाहिजे, ही भूमिका त्यांनी स्वीकारली. नात्सीझम व फॅसिझम यांच्या उदयापासून जी एक गोष्ट ध्यानात आली ती ही की, लोक सत्ता गमवायला तयार होतात. रशियन क्रांतीच्या फसगतीपासून हाच धडा मिळतो. लोक सत्ता गमवायला तयार होतात याचे कारण त्यांच्या मते हे की, व्यक्ती परमाणूसारख्या एकमेकांपासून अलग अशा आण्विक स्थितीत (atomised) राहतात, त्या विखुरलेल्या असतात. म्हणून त्यांच्यामध्ये असहायतेची भावना असते. पण व्यक्ती जर आत्मशासनाच्या, आत्मदिग्दर्शनाच्या उद्देशाने संघटित झाल्या तर त्या सहजी सत्ता गमवायला तयार होणार नाहीत आणि गमावणार नाहीत. तेव्हा जनतेवर सत्ता गमावण्याची पाळी येऊ नये हे साधायचे असेल तर केवळ संसदीय लोकशाहीने भागणार नाही, त्यासाठी मूलगामी लोकशाहीची व्यवस्था स्वीकारली पाहिजे हा सिद्धांत त्यांनी मांडला. म्हणजे माणूस, मानवी व्यक्ती हे लोकशाहीचे अधिष्ठान आहे, या अधिष्ठानाचे स्वरूप समजून घेण्यासाठी माणसाच्या मूलभूत प्रेरणा तपासून पाहिल्या पाहिजेत, या दृष्टीने त्यांनी चिंतन सुरू केले.

माणसाची जी एक मूलभूत प्रेरणा त्यांना गवसली ती म्हणजे स्वातंत्र्याची प्रेरणा. मनुष्याला स्वातंत्र्याची स्वाभाविक इच्छा असते. स्वातंत्र्य म्हणजे त्याच्या इच्छांवर, त्याच्या इच्छांचे समाधान होण्यावर जी बंधने असतात त्यांचा निरास होणे. मनुष्याच्या इतिहासाकडे आपण भौतिक बाजूने पाहिले तर तो साधने घडविणारा इतिहास आहे. साधने कशासाठी तर त्याच्या गरजांची तृप्ती करण्यासाठी. तेव्हा 'freedom consists in elimination of restrictions on the satisfaction of human desires' अशी स्वातंत्र्याची व्याख्या करून त्यांनी माणसाच्या इतिहासाकडे आणि त्याच्या आजच्या अवस्थेकडे पाहायला सुरुवात केली. हे स्वातंत्र्य म्हणजे जग बदलण्याचे त्याचे जे स्वातंत्र्य आहे ते, त्याच्या सत्याच्या ज्ञानावर अवलंबून आहे. तेव्हा सत्याचा शोध हीसुद्धा माणसाची मूलभूत प्रेरणा आहे. कारण त्याची जी स्वातंत्र्याची गरज आहे, तिच्याशी सत्याचा शोध बांधलेला आहे.

**प्रश्न - सत्याचा शोध हे साधन आहे का ?**

**उत्तर -** सत्याचा शोध हे साधनही आहे आणि साध्यही आहे. माणसाच्या ज्या मूलभूत प्रेरणा असतात त्या केवळ साधनरूप नसतात, त्या साध्यरूपही असतात. हा प्रेरणांचा स्वभावच आहे. मूलभूत प्रेरणा ही कधीही केवळ साधनरूप प्रेरणा नसते. ती सध्यारूपही असते. केवळ साधनरूप प्रेरणा ही पुढे विचारपूर्वक निर्माण होते; पण सत्य शोधण्याची जी वासना आहे ती नैसर्गिक आहे,

असे रॉय यांनी मानले आहे. माणसाचा सत्याकडे नैसर्गिक ओढा आहे. सत्यप्राप्तीमध्ये त्याला आनंद असतो. तेव्हा स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी यत्न आणि सत्याचा शोध या माणसाच्या नैसर्गिक प्रेरणा आहेत.

**प्रश्न - म्हणजे आपण नवमानवतावादाशी येऊन ठेपलो.**

**उत्तर -** होय; पण पुढे असे की, स्वातंत्र्यप्राप्ती आणि सत्याचा शोध या प्रेरणांचा धारक असलेला जो माणूस आहे त्याच्यावर सत्ता असणे योग्य नाही. तो सत्ताधारी असला पाहिजे, त्याच्या हातात सत्ता असली पाहिजे.

**प्रश्न - रॉय यांच्या नवमानवतावादात त्यांच्या दृष्टीने 'नव' काय होते?**

**उत्तर -** माणूस जो आहे, मानवी व्यक्ती जी आहे तिचे अस्तित्व सामाजिक असल्यामुळे माणूस हा समाजाचा केवळ भाग आहे, एवढेच माणसाचे सबंध स्वरूप आणि स्थान आहे अशी जी एक पारंपरिक दृष्टी होती तिचा त्याग रॉय यांनी केला. माणूस जसा एका अर्थी निसर्गाचा आणि समाजाचा भाग आहे तसाच तो स्वतंत्रही आहे हा दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला. हे नवीन आहे. हा दृष्टिकोन मार्क्सवादातही आहे; पण मार्क्सवादाने तो स्वच्छपणे स्वीकारलेला नाही. त्याचा सुसंगत वापर मार्क्सवादात झालेला नाही. दुसरी गोष्ट अशी की, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वैज्ञानिक ज्ञान यांच्याशी सुसंगत अशी जीवनसृष्टी आपण स्वीकारली पाहिजे हा नवमानवतावादाचा आग्रह हाही 'नवीन' आहे. नवमानवतावादाला रॉय वैज्ञानिक मानवतावाद म्हणतात. त्यात वैज्ञानिक निष्कर्षांना प्राधान्य आहे.

**प्रश्न - याच्याशी संबंधित अशा एका मुद्याला तुम्ही मघाशी स्पर्श केला होता. रॉय यांनी तुरुंगात असताना नवीन भौतिकीवर - म्हणजे आइन्स्टाइनचा सापेक्षतावाद, 'क्वॉन्टम मेकॅनिक्स' इ. - लिखाण केले होते. हा परामर्श घ्यावा असे त्यांना का वाटले?**

**उत्तर -** कारण काही भौतिकशास्त्री या नवीन उपपत्तीचा अध्यात्मवादी आणि अज्ञेयवादी अर्थ लावीत होते. तो त्यांना मान्य नव्हता. त्यासाठी त्यांचा विचार त्यांना करावा लागला.

**प्रश्न - म्हणजे मार्क्सवादाचा त्यांच्यावरील प्रभाव कायम राहिला. जडवाद आणि चैतन्यवाद हेच तत्त्वज्ञानातील दोन प्रमुख पक्ष आहेत आणि त्यातील जडवाद हा पुरोगामी पक्ष आहे हा मार्क्सवाद्यांचा एक प्रमुख सिद्धांत आहे.**

**उत्तर -** होय. मार्क्सवादाचा त्यांच्यावरील प्रभाव टिकून राहिला. परंतु एक गोष्ट, 'मॅटर' हा शब्द त्यांना काहीसा खटकत होता. 'मटीरिॲलिझम'ला कमी गैरसमज निर्माण करणारा पर्याय म्हणून 'फिजिकल रिॲलिझम' हा शब्द ते कधी कधी वापरीत. म्हणजे वास्तव जग आहे आणि ते जग चैतन्यरूप नाही किंवा चैतन्याची निर्मिती नाही म्हणून 'फिजिकल रिॲलिझम.'

**प्रश्न - 'मॅटर' हा शब्द त्यांना का खटकत होता?**

**उत्तर -** कारण 'मॅटर' ही दुसऱ्याने वापरायची सामग्री असा अर्थ या शब्दातून ध्वनित होतो.

ही भौतिक सत्ता - फिजिकल रिॲलिटी - जी आहे ती स्वायत्त आहे, त्याच्या पलीकडच्या कशाला सापेक्ष नाही हा त्यांचा मूलभूत सिद्धांत होता.

**प्रश्न - आता शेवटचे दोन प्रश्न. जो समाज त्यांना घडवायचा होता तो भारतीय समाज होता. या समाजाला एक नवीन रूप त्यांना द्यायचे होते. तेव्हा या समाजाच्या ज्या दोन प्रमुख परंपरा आहेत, हिंदू आणि इस्लामी, त्यांच्याविषयीचे त्यांचे मूल्यमापन काय होते?**

**उत्तर -** जो दार्शनिक हिंदू विचार आहे त्याच्यात आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे नेऊ शकतील असे अनेक घटक आहेत, असे त्यांचे मत होते. उदा. कपिल-कणाद यांचा विचार. हे जग केवळ माया आहे आणि चैतन्यालाच खरेखुरे अस्तित्व आहे, असे त्यांचे मत नाही. हे जग खरोखरच अस्तित्वात आहे हा सिद्धांत त्यांनी स्वीकारला. घटना कार्यकारणनियमांना अनुसरून होतात हे तत्त्वही या दर्शकांनी स्वीकारले.

रॉय यांची चिंता अशी होती. हा जो भारतीय हिंदू आहे तो हे जग खरोखरच अस्तित्वात आहे असे मानीत असेल तरच ते बदलण्याचा तो प्रयत्न करील. हे जग जर केवळ माया असेल, तर या जगाशी त्याचे काही कर्तव्य राहणार नाही. एका अर्थाने त्याचा जडवाद हा असा प्रयोजनवादी होता, अर्थात एका अर्थाने. या संस्कृतीवर जो मायावादाचा प्रभाव आहे किंवा लीलावादाचा प्रभाव आहे, म्हणजे ईश्वराची जी परमार्थसतत्ता आहे तिच्या हातातले माणूस हे केवळ साधन आहे आणि जगात जे काही घडते ते तिच्या अधीन आहे, या दृष्टीचा प्रभाव त्यांना अनिष्ट वाटत होता. या दृष्टीऐवजी हे जग स्वतंत्र आहे, ते ईश्वराच्या इच्छेवाचून अस्तित्वात आहे ही दृष्टी उदा. कपिलाची प्रकृती किंवा कणादाचे नित्य अणू हे ईश्वराच्या इच्छेवाचून अस्तित्वात आहेत - त्यांना श्रेयस्कर वाटत होती. हे जग स्वतंत्र आहे, मनुष्य त्याच्यात उभा आहे आणि हे जग त्याने बदलले पाहिजे, हे जग मनुष्य नियंत्रित करू शकतो असा विचार जर हिंदूंमध्ये दृढ झाला तरच ते नवा समाज घडवायला प्रवृत्त होतील, असे त्यांना वाटत होते. म्हणून 'जडवाद' - 'मटिरिॲलिझम' म्हणून जी लेखमाला त्यांनी लिहिली तिच्यात कपिल, कणाद इत्यादिकांच्या विचारांचा परामर्श त्यांनी घेतला होता.

**प्रश्न - आणि इस्लामी परंपरेविषयी त्यांची काय दृष्टी होती?**

**उत्तर -** 'इस्लामचे क्रांतिकार्य' म्हणून त्यांनी जो निबंध लिहिला त्यात मुख्यतः जे विचारसूत्र आढळते ते हे की, इस्लामने एकेश्वरवाद स्वीकारला आणि एकेश्वरवादाखाली मानवजातीतील भेद मिटवून तिला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. आणि एकेश्वरवादाचे पुढचे पाऊल म्हणजे निरीश्वरवाद. म्हणजे येथे फक्त माणूस आहे आणि त्याच्यापुढे जग आहे आणि काही नाही, हा दृष्टिकोन इस्लामी समाज लवकर स्वीकारू शकतो असे त्यांना वाटत होते. इस्लाममधील मूळची प्रेरणा त्यांना फार महत्त्वाची वाटत होती. म्हणजे अरबांच्या इस्लामची प्रेरणा. पण इस्लाम जेव्हा

जगात इतरत्र गेला तेव्हा, विशेषत: जेव्हा तो मागासलेल्या जमातीत गेला, तेव्हा इस्लामची मूळची सांस्कृतित प्रेरणा काही त्यांना पचली नाही. आणि त्याला काहीसे प्रतिगामी स्वरूप आले.

भारतात जो इस्लाम आला तो या स्वरूपाचा होता. अरबांच्या पुरोगामी इस्लाम जर इथे आला असता तर भारतीय मुसलमान अधिक पुरोगामी झाला असता असे एकंदरीत त्यांचे निदान होते. भारतीय मुसलमानांचे लक्ष इस्लाममधील मूळच्या मानवतावादी प्रेरणेकडे आणि अरबी मुसलमानांनी वैज्ञानिक संस्कृतीच्या विकासात जी महत्वाची भर घातली तिच्याकडे वेधायचा त्यांचा प्रयत्न होता.

**प्रश्न - म्हणजे जोतिबा फुले यांची इस्लामविषयक जी भूमिका होती, तिच्याशी बरीचशी जुळणारी होती, नाही का?**

**आता रॉय यांचे एक वैशिष्ट्य तुम्ही जे सांगितले ते असे की, ते एक खरेखुरे विचारवंत होते. म्हणजे त्यांना त्यांच्या प्रत्यक्ष कार्याच्या संदर्भात जे राजकीय, सामाजिक अनुभव येत त्यांचे विश्लेषण करून, त्यांची संगती लावण्याचा प्रयत्न करून त्यांचे सैद्धांतिक आकलन करून घ्यावे, अशी त्यांची वृत्ती होती. ही ज्ञानोदयापासूनची (enlightenment) युरोपियन परंपरा आहे आणि रॉय तिचे प्रतिनिधी होते. आता प्रश्न असा की, नवमानवतावादाची मांडणी केल्यानंतर त्याच्याविषयीचा त्यांचा पुनर्विचार चालू होता, की हा आता एक अंतिम आणि स्थिर असा सिद्धांत आहे, अशी त्यांची दृष्टी होती?**

**उत्तर -** त्यांनी काय केले, की आतापर्यंत इतिहासात ज्या क्रांत्या होऊन गेल्या आहेत त्याचे नवमानवतावादाच्या दृष्टिकोनातून त्यांनी मूल्यमापन केले. ते ‘रीझन, रोमॅन्टिसिझम ॲण्ड रेव्होल्युशन’ या ग्रंथात त्यांनी मांडले.

**प्रश्न - त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात युद्ध संपले होते, भारत स्वतंत्र झाला होता. महासत्तांच्या भावी स्पर्धेची किंवा वितुष्टाची चिन्हे दिसू लागली होती. या परिस्थितीत पुढे काय होणार आहे आणि त्यात भारताची भूमिका काय असावी याविषयी त्यांचे काय विचार होते?**

**उत्तर -** भारताची आर्थिक पुनर्रचना जर चांगल्या पायावर झाली आणि येथे मूलगामी लोकशाही चांगल्या प्रकारे रुजली तर भारत जगाला प्रकाश देऊ शकेल, असे त्यांना वाटत होते. ते १९५५ साली गेले. त्या वेळी शीतयुद्धाला सुरुवात झाली होती; पण रशिया - अमेरिका यांना महासत्तांचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. पण या सत्तांपासून त्यांना काही आशाही दिसत नव्हती. उलट त्यांच्यापासून मानवजातीला व संस्कृतीला भविष्यात एक फार मोठा धोका संभवतो असेच त्यांना वाटत होते. तो धोका म्हणजे अणुयुद्धाचा.

अणुयुद्धाविषयीचा त्यांचा विचार असा होता की, पश्चिम युरोपने अणुयुद्धात भाग घेऊ नये. अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी देऊन जर रशिया आक्रमण करू लागला तर खुशाल रशियाला आक्रमण करू द्यावे. कारण मानवजातीचा हा सुसंस्कृत विभाग कम्युनिस्ट सत्तेचे सगळे स्वरूप, तिची प्रशासनपद्धती बदलून टाकील अशी त्यांची खात्री होती. कम्युनिस्ट क्रांती एका मागासलेल्या देशात झाल्यामुळे तिला मानवी स्वातंत्र्याला विरोधी असे रूप आले. कम्युनिस्ट राजवट जर सुसंस्कृत देशात पसरली तर मानवी स्वातंत्र्याला अनुकूल असे तिचे स्वरूप बनेल, असा हा विचार होता. तेव्हा इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादी देशांनी अणुयुद्धापासून दूर राहावे, असा विचार रॉय यांनी मांडला. अणुयुद्धाची तयारी सुरू आहे आणि त्याचे परिणाम मानवी संस्कृतीच्या नाशात होणार आहेत हे भय त्यांना वाटत होते. हा नाश टाळावा आणि कम्युनिस्ट आक्रमकांना आत येऊ द्यावे, असा त्यांचा सल्ला होता. प्रगत सत्ता जेव्हा मागासलेल्या जगात जाते तेव्हा ती बिघडते; पण सत्ता जेव्हा अधिक विकसित प्रदेशात जाते तेव्हा ती सुधारते असा इतिहासापासून त्यांनी निष्कर्ष काढला होता.

- बर्ट्रांड रसेल यांनीसुद्धा 'बेटर रेड दॅन डेड' - 'मरण्यापेक्षा कम्युनिस्ट सत्तेखाली राहणे पसंत करावे' - अशी भूमिका स्वीकारली होती.

**प्रश्न - लोकांना एक प्रश्न असा पडतो की, रॉय यांनी जेव्हा आपला पक्ष विसर्जित केला तेव्हा ज्या कार्यकर्त्यांचा तो पक्ष बनला होता त्यांनी काय करावे, अशी त्यांची अपेक्षा होती?**

**उत्तर -** त्यांनी सत्तेच्या बाहेर राहून लोकांचे राजकीय आणि सांस्कृतिक शिक्षण करावे, त्यांना समंजसपणे मतदान करण्याचे आवाहन करावे.

**प्रश्न - म्हणजे संसदीय लोकशाहीची चौकट त्यांना कायम ठेवायची होती?**

**उत्तर -** होय. संसदीय लोकशाहीचे त्यांना पक्षहीन लोकशाहीत परिवर्तन करायचे होते ते पंचायती राज्याच्या स्वरूपात. आणि हे खरे लोकराज्य म्हणून कसे चालवायचे याचे शिक्षण लोकांना देणे आवश्यक होते. त्यांच्या बावीस कलमी विचारप्रणालीत हा दृष्टिकोन त्यांनी मांडला आहे. हे एका दृष्टीने मार्क्सचे अनुकरण आहे. मार्क्सचे फॉएरबाखवरील सिद्धांत त्यांच्यासमोर होते.

**प्रश्न - रॉय यांच्या कालखंडातील सर्वात प्रभावी भारतीय नेते म्हणजे गांधी. गांधीवादाविषयी रॉय यांची भूमिका काय होती?**

**उत्तर -** गांधींचा ग्रामीण उद्योगावरील जो भर होता तो रॉय यांना अमान्य होता. या अर्थव्यवस्थेला भवितव्य नाही, असे त्यांचे मत होते. याचे कारण असे की, अशा मागासलेल्या साधनांनी उत्पादकता वाढू शकत नाही आणि त्यामुळे ग्रामीण समाजाचा आर्थिक पाया कमकुवत राहील. माणसाच्या आजच्या ज्या गरजा आहेत त्यांचे समाधान होऊ शकणार नाही.

दुसरी गोष्ट अशी की, जी माणसे भजनात, प्रार्थनेत रमतात त्यांची दृष्टी एक प्रकारे दैववादी बनते. या दैववादामुळे माणूस स्वतःच्या ताकदीवर उभा राहू शकत नाही. गांधींची जी गूढवादी परलोकवादी दृष्टी आहे, तिच्यामुळे आधुनिक मनुष्य निर्माण होऊ शकणार नाही. गांधीवाद स्वतंत्र नागरिक म्हणून स्वतःचे जीवन घडविणारा माणूस तयार करायला असमर्थ आहे, असे त्यांना वाटत होते. अदृश्य अलौकिक शक्तींवर भिस्त ठेवणारा, परावलंबी दृष्टिकोनाचा माणूस नवीन जीवन कसे निर्माण करू शकेल? गांधीवादी दृष्टिकोनामध्ये जे महत्त्वाचे घटक आहेत ते स्थितीवादी आहेत, तो क्रांतिवादी दृष्टिकोन होऊ शकत नाही, असे त्यांचे मूल्यमापन होते.

- मला वाटते जी स्थिती होती ती गांधीजींना नैतिकदृष्ट्या अमान्य होती; पण रॉय यांना असे म्हणायचे असेल की, गांधीजींचा जो कार्यक्रम होता तो पार पाडण्यात आला तर त्यामुळे ही स्थिती अधिक दृढच झाली असती. गांधीजींना परिवर्तन घडवून आणायचे होते; पण त्यांच्या मार्गाने ते घडून आले नसते असे म्हणणे अधिक न्यायाला धरून होईल.

**प्रश्न - शेवटचा प्रश्न : तुम्ही गांधीजी धरून अनेक महान नेत्यांच्या सहवासात आला; पण अखेरीस तुम्ही रॉयवादी झाला. त्याच्या सैद्धांतिक कारणांचा निर्देश तुम्ही आतापर्यंत केला; पण रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या कोणत्या वैशिष्ट्यांची छाप तुमच्यावर पडली?**

**उत्तर -** त्यांच्या स्वभावाचे कुणालाही जाणवले असते असे एक वैशिष्ट्य सांगतो. अगदी तरुण वयात सशस्त्र क्रांती घडवून आणायला ते घराबाहेर पडले. देशात असताना, परदेशात गेले तरी पोलिसांचा ससेमिरा सतत त्यांच्यामागे असे. सर्व हालचाली लपूनछपून कराव्या लागत. अमेरिकेत कॅलिफोर्नियामधील विद्यापीठात ते काही काळ वसतीला होते, तेव्हाही ते गुप्तपणे, नाव बदलून राहात होते. याचा परिणाम असा झाला की, अनोळखी माणसांची थोड्याच सहवासानंतर स्वभाव वैशिष्ट्ये हेरण्यात, कुणावर विश्वास ठेवावा, कुणावर ठेवू नये याची पारख करण्यात ते वाक्बगार झाले. त्यांचे बोलणे नेहमी सौम्य, मृदू, सावध असे. त्याबरोबरच माणसांना जिंकून पूर्णपणे आपलेसे करण्याची कला त्यांना साधली होती. ज्यांना ते आपले मानीत त्यांच्याविषयी ते पूर्ण भरवसा बाळगीत. त्यांची सर्व प्रकारची काळजी घेत, त्यांना चांगले खाऊपिऊ घालीत. हे त्यांचे वागणे क्रांतिकार्यासाठी सहकारी कार्यकर्ते मिळविण्याचे केवळ साधन नव्हते. ती त्यांची स्वाभाविक वृत्तीच बनली होती. आणि या त्यांच्या वृत्तीला त्यांच्या मूळ प्रवृत्तीचे अधिष्ठान असले तरी त्यांना आलेले अनुभव, त्यांची साध्ये आणि जीवनसरणी यांच्यामुळे ही मूळ प्रवृत्ती दृढ झाली असणार यात शंका नाही.

त्याचे आयुष्य ही लौकिक अर्थाने अपयशाची एक मालिकाच होती. महान प्रयत्न करावे. सर्व घाट जमून येत आहे, असे दिसावे, साध्य हातात येणार अशी आशा निर्माण व्हावी आणि सर्व ओंफस व्हावे हा अनुभव त्यांना वारंवार आला; पण ते कधी नाउमेद झाले नाहीत आणि त्यांनी प्रयत्न कधी सोडले नाहीत. एकदा काही कारणाने मी अत्यंत विषण्ण मनःस्थितीत होतो, तेव्हा ते मला म्हणाले, ‘शास्त्रीजी, तुम्ही वेदान्ती ना? मग असे काय? तुमची तृष्णा अजून

ओसरली नाही?'

ही एक खोल मानसिक शांती, स्थैर्य, कधी विचलित न होण्याची वृत्ती बहुधा त्यांच्या चिंत्तनशीलतेतून त्यांना लाभली होती. ते सदैव उच्च दर्जाच्या चिंतनात मग्न असत. जे घडले असेल आणि घडत असेल ते इष्ट-अनिष्ट कसेही असले तरी ते समजून घेण्याचा, त्याचा व्यवस्थित अर्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न असे. हे चिंतन नेहमी कृतीला जोडलेले असले, भावी कृतीचे मार्गदर्शन करण्यासाठी म्हणून करण्यात आलेले असले तरी त्या चिंतनातून एक प्रकारची तटस्थताही त्यांना लाभत असे.

खाण्यापिण्याच्या बाबतीत ते रसिक होते. पाश्चात्त्य आणि बंगाली पदार्थ बनविण्यात ते प्रवीण होते. त्यांची या बाबतीतील रुची सर्वस्पर्शी होती. मी एकदा डेहराडूनला त्यांच्याकडे गेलो तेव्हा उशीर झाला होता म्हणून बाहेर जेवून त्यांच्या घरी गेलो. त्यांनी मला विचारले, 'शास्त्रीजी, जेवणाचे काय?' मी म्हटले, 'मी जेवून आलो आहे. डाळ-रोटी खाल्ली.' माझ्या चेहऱ्यावरचा नापसंतीचा भाव त्यांनी ओळखला. ते म्हणाले, 'का? आवडली नाही? फार रुचकर पदार्थ आहेत ते.'

पाश्चात्त्य संगीत विशेषतः निग्रो स्पिरिच्युअल्स त्यांना आवडत. रवींद्र संगीतात ते तल्लीन होत. बागकामाचा त्यांना छंद होता. विविध प्रकारची फुलझाडे त्यांच्या बंगल्याच्या आवारातील बागेत होती. बागकामाची सर्व आवजारे त्यांच्याकडे होती. बागेची निगा ते स्वतः राखीत.

त्यांच्या चिंतनातून एक प्रकारची पूर्णपणे ऐहिक अशी कृतिप्रवण आध्यात्मिकता त्यांनी कमावली होती. म्हणून सतत कार्यरत राहूनही ते यशपयशाच्या पलीकडे गेले होते.

**(नवभारत मासिक, फेब्रुवारी-मार्च, १९८७, पृ. १ ते १६)**

○○○

३४

# विश्वसंस्कृतीची मूल्ये जपणारा नेता : पंडित नेहरू

मुलाखतकार - **अनिल जोशी**

**प्रश्न - पंडित नेहरूंचे समाजवादाचे स्वप्न होते. त्याप्रमाणे हा देश नेहरूंच्या नंतर त्या आदर्शाकडे प्रवास करतो आहे का? का तो त्यापासून बाहेर गेला आहे?**

**तर्कतीर्थ :-** नेहरूंचा समाजवाद हा गेल्या दोनशे वर्षांत समाजवादाचे तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम विविध स्वरूपात मांडण्यात आला त्या तऱ्हेचा नव्हता. कारण एक मौलिक समाजवादी किंवा साम्यवादी क्रांती १९१८ मध्ये रशियात झाली. रशिया हे प्रचंड राज्य उभे राहिले. त्यामध्ये पंचवार्षिक नियोजने अमलात येऊ लागली. स्टॅलिनची कारकीर्द दीर्घ काळपर्यंत चालली. त्यामुळे एक पोलादी राजकीय चौकट निर्माण झाली. नागरिक व्यक्तिशः स्वातंत्र्य गमावून बसला. भांडवलशाही गेली. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपातील अनेक देशांमध्ये लाल सैन्याने समाजवादी राजवटीची स्थापना केली आणि समाजवादाचा असा मोठ्या प्रमाणात प्रयोग सुरू झाल्यानंतर त्याचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम जगभर जाणवू लागले. त्यानंतर भारत स्वतंत्र झाला. पं. नेहरू महामंत्री झाले. त्यांनी तत्त्ववेत्त्याचा समाजवाद किंवा अमलात आलेल्या क्रांतिकारकांचा समाजवाद नीट तपासला आणि आपली स्वतःची समाजवादाची संकल्पना भाषणात, लेखनात आणि काँग्रेसच्या ध्येयधोरणात स्पष्ट केली. त्यात भांडवलशाही अर्थव्यवस्था नष्ट करण्याचा मुद्दा अमान्य करण्यात आला. जगातील त्यापूर्वीच्या सर्व समाजवादी तत्त्ववेत्त्यांनी खासगी उद्योजक नाकारला होता. तो नेहरूंनी नाकारला नाही. ब्रिटिशांच्या कारकीर्दीतच अनेक महत्त्वाचे उद्योग सार्वजनिक म्हणजे सरकारी उद्योग म्हणून अस्तित्वात आले. उदाहरणार्थ रेल्वे, पोस्ट, तारायंत्र इत्यादी. त्याच सार्वजनिक उद्योगांच्या शासकीय परंपरेला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न नेहरूंनी केला आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेले सर्व उद्योग बनवावेत आणि देश समृद्ध होऊन इहवादी दृष्टिकोनाने चाललेल्या संसदीय लोकशाहीत समर्थपणे नांदावा आणि सामाजिक न्यायाची स्थापना व्हावी हे नेहरूंचे स्वप्न होते. १९५५ च्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात 'सोशालिस्ट सोसायटी' असा शब्दप्रयोग न करता 'सोशालिस्ट पॅटर्न

ऑफ सोसायटी' अशी शब्दावली नेहरूंनी वापरून आपला समाजवादाचा कार्यक्रम स्पष्ट केला.

**प्रश्न - भांडवलशाही आणि समाजवादी अर्थरचना यांच्यात नेहरूंनी तडजोड केली. त्यामुळे वर्गहीन समाजरचना हा शब्दप्रयोग त्यांनी आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकात केला तो का? खासगी उद्योजकही नेहरूंच्या समाजवादाच्या संकल्पनेत मान्य केला गेला आहे, तो कसा?**

**तर्कतीर्थ :-** खासगी उद्योजक मान्य करणे भाग झाले. कारण संसदीय लोकशाही पद्धतीने पश्चिम युरोप आणि अमेरिका यांच्यात खासगी उद्योजक सर्व देशाला संपन्न करतो आणि दारिद्र्याच्या रेषेवरून सगळ्यांना बाहेर आणतो, व्यक्तीचे उत्पन्नमान नागरिकाला दारिद्र्यात खितपत पडू देत नाही हे चित्र नेहरूंना दिसत होते. त्यामुळे तडजोडवादी भूमिका घेणे त्यांना अपरिहार्य झाले.

**प्रश्न - पंडितजी गेल्यानंतर त्यांचे समाजवादी धोरणाने चालणारे देशाचे राजकारण टिकले आहे का?**

**तर्कतीर्थ :-** नक्कीच टिकले आहे. काँग्रेस पक्षात नेहरूंच्या काळी लोकशाहीपद्धती चांगली सांभाळली जात होती. वरिष्ठांच्या आज्ञा मोठ्या युक्तीने अमलात आणल्या जात असल्याने पक्षांतर्गत लोकशाहीस मर्यादा पडूनही ती बंधनात सापडते आहे असे दिसत नव्हते. नेहरू गेल्यानंतर हळूहळू मंद गतीने पक्षांतर्गत लोकशाही आटत गेली व संपुष्टात आली. असे असले तरी संसदीय लोकशाही भारतात रुजली आहे याचे प्रत्यक्ष पुरावे मिळू लागले. अनेक प्रदेशराज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता नष्ट झाली आहे आणि प्रादेशिक पक्ष प्रबळ झाले आहेत. परंतु संसदीय लोकशाहीवरची आणि मानवी मूलभूत हक्कांवरची श्रद्धा स्थिरावलेली दिसते. आता काही जातीयतावादी पक्ष डोके वर काढू लागले आहेत. ते जर प्रबळ झाले, तर भारतीय लोकशाहीला मोठाच धोका निर्माण झाला आहे, असे म्हणावे लागेल. भारतीय लोकशाही ही पाश्चिमात्त्य देशांना आश्चर्यकारक वाटते. हे आश्चर्य संपून जाईल अशी शक्यता आहे. परंतु द्रविड मुन्नेत्र कळहम व अण्णा द्रविड मुन्नेत्र कळहम हे प्रादेशिक पक्ष जातीयतावादी पक्ष नाहीत. त्यांची संसदीय लोकशाहीवर श्रद्धा आहे. त्यामुळे संसदीय पक्ष धक्के देत असले तरी ही लोकशाही धोक्यात सापडलेली दिसत नाही. याचे मुख्य श्रेय नेहरूंना आहे.

**प्रश्न - ग्रामीण भागात सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आणि दारिद्र्यनिर्मूलनाच्या दृष्टीने ज्या प्रकाराची राजकीय आणि सामाजिक संवेदना निर्माण व्हावी, त्या तऱ्हेची अद्याप का दिसत नाही? विशेषतः उत्तर भारतात बिहारसारख्या प्रांतात आज अराजकाची स्थिती वाढत असल्यासारखी दिसते याची कारणमीमांसा काय असू शकेल?**

**तर्कतीर्थ :-** पं. नेहरूंना शेतीच्या मालकीचा प्रश्न हा महत्त्वाचा प्रश्न म्हणून जाणवला नाही. उत्तर भारतात विशेषतः बिहारमध्ये जमीनदारांची सत्ता होती. उत्तम तऱ्हेची जमीन असूनदेखील

आवश्यक तितके धान्योत्पादन होत नाही आणि ग्रामीण भागात गरिबीमुळे नागरिक निस्तेज झाले आहेत. उत्तर भारतात नेहरूंना हा जमिनीचा प्रश्न तातडीने सोडवायला पाहिजे, असे वाटले नाही. त्याचे दूरवर परिणाम भारताला भोगावे लागणार आहेत.

**प्रश्न - भारताचे धर्मनिरपेक्ष इहवादी राज्य या संकल्पनेला नेहरू, इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या वक्तव्यांमध्ये विशेष महत्त्व दिलेले दिसते ते का?**

**तर्कतीर्थ :-** पं. नेहरूंचे व्यक्तिमत्त्व आणि स्वतंत्र भारताची राजकीय सामाजिक संरचना यांच्यामध्ये एक प्रकारचा मेळ बसलेला आहे. ते निरीश्वर आणि भौतिकतावादी नव्हते; परंतु कोणत्याही धर्माचे निष्ठावंत अनुयायीही ते नव्हते. उच्च काश्मिरी ब्राह्मण कुळात जन्म, इस्लामी रीतिरिवाजांची नेहरू कुटुंबाला मिळालेली डूब आणि आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली झालेले सर्व शिक्षण यामुळे आधुनिक इहवादी लोकशाहीशी सुसंगत असा प्रसन्न, आधुनिक विश्वसंस्कृतीची मूल्ये जीवनात जपणारा असा अलौकिक नेता पं. नेहरूंच्या रूपाने भारतास लाभला. त्यामुळे भारताचे भवितव्य फार उज्ज्वल आहे, असा आशावाद व्यक्त केल्याशिवाय राहवत नाही.

**(केसरी, ४ डिसेंबर, १९८८)**

❍❍❍

३५

# बहुस्पर्शी विद्वान : लोकहितवादी देशमुख

मुलाखतकार - **अनिल जोशी**

गोपाळ हरी देशमुख हे पंडित होते. त्यांची विद्वत्ता बहुस्पर्शी होती. त्यामुळे त्यांचा सुधारणेचा दृष्टिकोन जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्श करणारा होता. ते लोकशाहीचे मोठे पुरस्कर्ते होते. त्यांच्यासमोर इंग्लंडची लोकशाही होती. ब्राह्मणांच्या चालीरीतींवर त्यांनी विशेष करून बुद्धिवादी दृष्टिकोनाने हल्ला केला. लोकहितवादींनी, समाजसुधारणा व धर्मसुधारणा यांना वैचारिक अधिष्ठान दिले. त्यांचे आचरण ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांच्या बरोबरीला त्यांना बसवेल इतके उदात्त होते. त्यांनी फार मोठे धैर्य विचारांची व्यवस्थित मांडणी करून सिद्ध केले आहे. जीवनाच्या विविध अंगांवर त्यांनी आपला सुधारणेचा प्रकाश टाकलेला होता. मनुष्य चालत असताना शंभर पावले चालला तर त्यातील काही पावले नागमोडी असणार. अशी अनेक पावले त्यांच्या पुरोगामित्वात दिसतात. त्यांची 'शतपत्रे' भारतीय समाजास अजूनही मार्गदर्शक वाटतील अशीच आहेत. असे चिरंतन साहित्य त्यांनी भारतीय समाजाला दिले आहे. त्यांचा दृष्टिकोन इतिहासनिष्ठ होता. यात आधुनिकता प्राप्त होण्यासाठी एक ऐतिहासिक विचारांची पार्श्वभूमी आवश्यक आहे. त्यांची इतिहासावरील अनेक पुस्तके व भाषांतरे प्रसिद्ध ठरली.

संस्कृत न येणाऱ्या सुशिक्षितांना परंपरांचे ज्ञान व्हावे म्हणून धर्मशास्त्रीय ग्रंथांचे त्यांनी भाषांतर केले. लोक परंपरानिष्ठ, रूढिनिष्ठ असतात; पण परंपरांचे व्यापक ज्ञान त्यांना नसते. ते त्यांनी विविध ग्रंथ लिहून दिले. लोकहितवादी बहुभाषाकोविद होते. त्यांना गुजराती भाषा मातृभाषेइतकीच सहज येत होती. ते न्यायधीशपदावर काम करीत होते. अहमदाबाद शहरात त्यांचा दीर्घकाळ निवास होता. तेथे त्यांनी जी सामाजिक सेवा केली तिचा अनुकूल परिणाम सुसंस्कृत समाजावर फार चांगला झाला. गुजराती कवींनी त्यांच्यावर काव्य लिहिले आहे. त्यांनी अहमदाबाद सोडले तेव्हा लोकांना वियोगाचे दुःख झाले. जनतेच्या सुखदुःखाचे प्रश्न ते फार युक्तीने आणि समयसूचकतेने सोडवीत असत. जेथे ते राहिले तेथील जनता त्यांनी वश करून



वाय १७८-२६

घेतली. ते आधुनिक संत होते. आपण संतांचे चरित्र वाचतो, त्यात अद्भुत कथा असतात, तशी एकही अद्भुत कथा ज्यांच्या जीवनात सापडत नाही तरी ते एक महान संत होते, अशी छाप आपणावर पडते. त्यांनी इतिहासाचा अभ्यास केला व त्यावरून समाजात बदल होत असतो, परंपरा बदलत असतात आणि मनुष्याचा इतिहास समाजाला प्रगतिपथावर नेत असतो याचे प्रकट दर्शन या पंडित साधूला झाले होते.

वेद हे एक प्राचीन श्रेष्ठ, धार्मिक साहित्य आहे. त्यामुळे अनेक इंग्लिश, जर्मन, फ्रेंच व संस्कृत पंडितांना ते आवडले, त्याप्रमाणे लोकहितवादींनाही ते आवडले. हा आधुनिक वेदप्रामाण्यवाद आहे. कोणताही सुशिक्षित माणूस चांगल्या साहित्याचे आकलन करतो, स्तवन करतो याचा अर्थ त्या साहित्याला तो अंतिम सत्य म्हणून बिलगतो असे नाही. श्रद्धावान हिंदू, मुसलमानी धर्मग्रंथांकडे पाहतो तसे ते वेदांकडे पाहत नव्हते; परंतु वेदांशिवाय अन्य जे हिंदुधर्मीय साहित्य आहे त्यांचे प्रामाण्य, परंपरानिष्ठ, रूढिनिष्ठ हिंदू ब्राह्मणांप्रमाणे ते मानीत नव्हते. हे सगळे ग्रंथ मानवप्रणीत आहेत हा दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला होता. दयानंदांच्या आर्य समाजाचे ते ट्रस्टी होते. स्वामीजींनीच त्यांना ट्रस्टी केले होते. त्यांच्या मतांशी लोकहितवादींची मते १०० टक्के जुळणारी होती असे नव्हते. पण आधुनिक सुसंस्कृत लोकांच्या समाजात हे परस्परांचे स्नेहसंबंध शंभर टक्के ऐक्यमतावर आधारलेले नसतात, हे अनेक आधुनिक सुशिक्षितांना समजत नाही याचे आश्चर्य वाटते. वेद चांगले ग्रंथ आहेत या म्हणण्याने वेद शाश्वत सत्य प्रतिपादणारे आहेत, असा अर्थ होत नाही. मी स्वतः कुराण आणि बायबल हे ग्रंथ चांगले आहेत, असे म्हणत असतो, याचा अर्थ मी मुसलमान किंवा ख्रिश्चन आहे असा होत नाही. त्याचप्रमाणे लोकहितवादींना वेद हे उत्कृष्ट साहित्य म्हणून पसंत पडले. याचा अर्थ ते श्रद्धाळू ब्राह्मणाप्रमाणे वेदप्रामाण्य श्रद्धा स्वीकारणारे होते, असा होत नाही.

हिंदूंची धार्मिक कार्ये संस्कृतमध्ये चालतात. त्याचा अर्थ यजमानांना कळत नाही. हे संस्कार स्वभाषेत समजतील असे करावेत. संस्कृतमध्ये कोणतेही कर्म करणे जरूर नाही, कारण पुष्कळ लोकांना संस्कृत येत नाही, असे ते म्हणत असत. परंपरागत रूढीपेक्षा नैतिक मूल्ये मानावीत आणि रूढी टाकावी. स्त्रिया पिंपळाला प्रदक्षिणा घालतात यावर ते म्हणत की, हा वेडेपणा आहे. जोतीराव फुले सत्य असेल ते घ्यावे, धर्मग्रंथांत काय म्हटले आहे इकडे लक्ष देऊ नये असे म्हणत असत. असा दृष्टिकोन लोकहितवादींनीही मांडला आहे.

इंग्रजांचे राज्य आले. त्याचे लोकहितवादींनी स्वागत केले. याचे कारण स्वकीय लोकांच्या हातात राज्य असताना मनमानी कारभार होतात हे त्यांना माहीत होते. स्त्रियांच्या बाबतीतील परंपरागत दृष्टिकोन त्यांनी धिक्कारला आहे. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रियांना खालचे स्थान दिले आहे याचा त्यांनी निषेध केला आणि पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. देशाची आर्थिक दुःस्थिती लक्षात घेऊन स्वदेशीचा पुरस्कार करणारे लोकहितवादी होते. हिंदुस्थान देशास दारिद्र्य येण्याच्या कारणांनी त्यांनी मीमांसा केली. मुसलमानांनी हा देश जिंकला याचे कारण त्यांच्यापाशी अधिक

प्रभावी शस्त्रे म्हणजे बंदुकीची दारू होती. ती हिंदूंना माहीत नव्हती. इंग्रजांनी येथे राज्य सुरू केले. हे इंग्रज कोठे राहतात, मूळचे कोठले याची माहिती येथील पुढारलेल्या वर्गालाही नव्हती. या देशातील लढाऊ जहागीरदारांमध्ये स्वदेशभक्तीची कल्पनाच नव्हती.

सदाशिवरावभाऊ पेशवे हे जबरदस्त सेनापती होते. या बामणाचा गर्वहरण झाला तर बरे, असे होळकर सरदार म्हणू लागले. हिंदुस्थान पराधीन होण्याची कारणे त्यांनी शोधली आहेत आणि इंग्रजी राज्याचे स्वागत भारतीयांनी का केले याची मीमांसा त्यांनी केली आहे. 'इंग्रजी राज्यापासून लाभ' किंवा 'इंग्लिश राज्यापासूनची फळे' असे निबंध त्यांनी लिहिले आहेत. इंग्रजी राज्याचे गुणावगुण व देशी राज्याचे गुणावगुण याचे कोष्टक त्यांनी 'राज्यतुलना' या निबंधात दिले आहे. तो निबंध वाचला म्हणजे त्यांची व्यापक दृष्टी, ऐतिहासिक चिंतन, खोल चिंतनशीलता याचा आपल्याला प्रत्यय येतो. लोकहितवादींचे विचार अथांग आहेत आणि म्हणून त्यांच्यावर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी जो हल्ला केला तो अनाठायी होता याची खात्री पटते. आत्मनिरीक्षण करून स्वतःमधील दोष शोधण्याकरिता जो एक विवेकशील स्वभाव लागतो, तो लोकहितवादीमध्ये होता हे त्यांच्या शतपत्रांमधून लक्षात येते.

लोकहितवादी आणि महादेव गोविंद रानडे यांच्या विचारांमध्ये आणि विद्वत्तेमध्ये साम्य होते. विद्वत्तेच्या दृष्टीने दोघांची उंची फार मोठी होती. दोघेही एकमेकांना मानत असत. रानडे हे विद्वान व विचारशील होते; पण लोकहितवादींच्या ठिकाणी जी तडफ आणि निर्भयपणे रूढींवर हल्ला करणारी लेखणी दिसते, तशी रानडे यांच्या ठिकाणी दिसत नाही. याचे कारण त्यांचा अधिक शांत मधु-मृदु स्वभाव हेच होय.

**(केसरी, २७ ऑक्टोबर, १९९१)**

ooo

३६

# प्रतिभासंपन्न संगीततज्ज्ञ : कुमार गंधर्व

मुलाखतकार - **अनिल जोशी**

वैदिक काळात सामवेद हा संगीताचा एक उच्चतम आविष्कार होता. तो सामवेद भाषिक स्वरूपात आतापर्यंत वेदपाठकांनी टिकविला; परंतु त्याची कलात्मकता ते टिकवू शकले नाहीत. संगीतासारखे लोभनीय असे अन्य नाही. ही लोभनीयता पंडित कुमार गंधर्वांनी आपल्या प्रतिभेने अभिनंदनीय केली. ते परंपरागत शास्त्रीय संगीत उत्कृष्ट, आदर्श स्वरूपात सादर करीत; पण त्याचबरोबर स्वतःची नवनिर्मिती करून रसिकाला आनंदाच्या अनुभवाकडे खेचून नेत.

भारतातील एक श्रेष्ठ गायक म्हणून पंडित कुमार गंधर्व यांनी कीर्ती संपादन केली होती. त्यांचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी नवे राग निर्मिले, नवीन बंदिशी बांधल्या, गायकीला नवीन आकृतिबंध दिला. हा नवा आकृतिबंध परंपरेपेक्षा अगदी वेगळा आहे, ही गोष्ट सर्वसाधारण रसिकाच्याही चट्दिशी ध्यानात भरते. त्यांनी जुन्या रागांमध्ये सुद्धा केलेले काही फेरबदल संगीताच्या विशेषतज्ज्ञांनी मान्य केले आहेत. त्यांनी नवीन बंदिशी, नवीन कविता रचून त्या स्वरबद्ध करून निर्मिल्या आहेत. त्यांना ग्रंथरूपही दिले आहे. उदा. अनुपराग विलास.

संगीतकारांनी चीज म्हणून जी कविता रचलेली असते तिला काव्य म्हणून तितकेसे महत्त्व नसते; परंतु अपवाद म्हणून उत्कृष्ट काव्यही बंदिशीमध्ये बसविता येते. उदा. संत कबीर, मीराबाई, सूरदास, गुरुनानक, रामदास, तुकाराम इत्यादींची उच्च भावार्थाचा सागर असलेली कविताही कित्येक वेळा बंदिशीचे सूर आणि लयी यांची आरास सहज मान्य करते. संतांची कविता ही संगीताच्या रागविलासाकरिता निर्माण झालेली नसते. ती देवाच्या आळवणीकरिता असते, दिव्य अनुभवाच्या आविष्काराकरिता असते. मोक्षमार्ग सहज आक्रमिता यावा याकरिता असते. किंबहुना मोक्षमार्गातील फुलांनी भरलेली अशी ही उंच उंच जाणारी सोपानपरंपरा असते. तिला जर संगीताचा बहर आला, तर मोक्षमार्गाचा साहसी मार्ग सहज आक्रमून संगीतकार भक्त प्रत्यक्ष मोक्षाच्या परमानंद रसात मग्न होऊन जातो आणि श्रोत्या-रसिकांनाही त्या आनंदरसाच्या अनुभवाचा भागीदार बनवितो.

कुमार गंधर्व मोक्षानुकूल भावस्थिती स्वतः अनुभवत आणि त्या तऱ्हेची श्रोत्यांची मनोभूमी निर्माण करीत. त्याकरिता स्वररचनेचा आणि शब्दार्थाचा मेळही त्यांच्या कवितेत साधलेला असे. नृत्य आणि संगीताची प्रधानदेवता म्हणजे श्री नरनारी-नटेश्वर होय. या नटेश्वराच्या नृत्याची आपण गायक भक्त म्हणून साथ करीत आहोत अशा भक्तिभावाने कुमार गंधर्वांनी आपल्या चिजा गायल्या आहेत. ईशस्तवन, शंकराराधना, सरस्वतीस्तवन, गुरुभजन, संगीतमहिमा, ऋतुवर्णन, शृंगार, विरहिणीची व्यथा, श्यामसुंदराची बासरी इत्यादी त्यांच्या कविता स्वररचना व शब्दार्थ यांचा सुसंवाद साधत आहेत याचे भान रसिकांस झाल्याशिवाय राहत नाही.

भारतीय संगीत विकास आणि विस्तार पावत आहे किंवा नाही, ते केवळ परंपरागत व्यक्तिनिष्ठ किंवा व्यक्तिप्रधान एकांतिक बंदिशीतच बंदिस्त होऊन पडलेले राहणार काय? या प्रश्नाचे उत्तर कुमारांच्या अनन्यसाधारण नवनिर्मितीने मिळते. त्यांनी परंपरागत भारतीय संगीताला विकासाचा मार्ग दाखवून दिला आहे. माळव्यातील सामान्य जनसंगीताच्या लयी, स्वररचना आणि भाषाविष्कार यांचे सार त्यांनी आत्मसात केले. त्यामुळे एक विशेष आविष्कार असलेली रागरचना त्यांना स्फुरली.

संगीत क्षेत्रात स्वतःच्या नवनिर्मितीने उच्चतम स्थान मिळविणारे पंडित कुमार गंधर्व इहलोक सोडून गेले याची हुरहुर भारतीय रसिकाला बेचैन करेल.

**(केसरी, १९जानेवारी, १९९२)**

○○○

३७

# कृष्णाकाठचा माणूस : सुसंस्कृत नेतृत्व

मुलाखतकार - **अरूण शेवते**

चव्हाण साहेबांनी सामान्य कार्यकर्त्यांपासून लेखक, कवी, विद्वान, पत्रकार, राजकारणी इत्यादी विविध क्षेत्रातील लोकांशी आयुष्यभर उत्तम संबंध ठेवले. कधीही कटुता येऊ दिली नाही. वेळप्रसंगी ज्यांनी टीका केली, त्यांच्याविषयी मनात कटुता ठेवली नाही. सर्व थरातल्या लोकांना त्यांचे वागणे नैसर्गिक वाटत होते. कृत्रिमपणा त्यांच्या वागण्यात कुणाला आढळला नाही. लहानपणापासून त्यांना विद्वानांचे आकर्षण होते. त्यांच्याबरोबर वावरताना त्यांनी आनंदयात्रिकाची भूमिका बजावली. त्याबरोबरच राज्यकर्ता म्हणून अनेक चांगल्या गोष्टी महाराष्ट्रात निर्माण केल्या.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी त्यांचा विद्यार्थीदशेपासून संबंध आला. ते राजकारणात मोठे झाल्यानंतर शास्त्रीजींच्या विद्वत्तेचा व्यासंगाचा उपयोग त्यांनी महाराष्ट्रासाठी करून घेतला. साहित्य संस्कृती मंडळ निर्माण करून त्याचे अध्यक्षपद शास्त्रींना दिले. शास्त्रीजी त्यांची जडणघडण विद्यार्थीदशेपासून पाहत होते. दोघांनीही स्वतःचे व्यक्तिमत्त्व वेगळे ठेवून एकमेकांना आपापल्या क्षेत्रात सहकार्य दिले. शास्त्रीजींना वाईला भेटायला गेलो असताना अनेक वर्षांचा पट डोळ्यासमोर उभा होता. साहेबांच्या आठवणीचे अनेक धागे मला समजून घ्यायचे होते.

**प्रश्न - साहेबांना प्रारंभापासून तुम्ही पाहिलेले आहे. त्यांची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाची जडणघडण तुम्हाला माहीत आहे. त्यांच्या जीवनात तुमचाही सहभाग आहे. साहेबांच्या संदर्भात तुमच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. या संवादातूनच अनेक घटनांचा मागोवा घेता येईल असे मला वाटते.**

**उत्तर -** चव्हाणांचा आणि माझा संबंध १९३० सालापासून आला. मुख्यतः मी कऱ्हाडला १९२० सालापासून परिचित आहे. यशवंतराव टिळक विद्यालयात शिक्षण घेत होते. १९२० सालीसुद्धा कऱ्हाडला माझी भाषणे आणि प्रवचने झाली आहेत. १९३० साल उजाडलं. ते

साल महात्मा गांधींची दुसरी चळवळ सुरू होण्याचा काळ. गांधीजींनी या देशात एकंदरीत ३० ते ४० वर्षे मोठमोठ्या स्वराज्याच्या चळवळी उभारल्या. पहिली चळवळ असहकारितेची. ती त्यांनी १९१२ पासून सुरू केली. ती जवळ जवळ १९२२ सालापर्यंत होती. नंतर दुसरी जी प्रचंड चळवळ उभारली ती सविनय कायदेभंगाची. सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळेस त्यांनी, कार्यक्रम जो आखला त्या आखणीचा कार्यक्रमाचा सामान्य गरीब जनतेच्या जीवनाशी संबंध त्यांनी ठेवला. स्वराज्य कशाकरिता तर गरिबांचे जीवन चांगले चालावे, त्यांना मीठभाकरी तरी सुखाने मिळावी असा दृष्टिकोन त्यांनी धरला. आणि त्या चळवळीमध्ये मी प्रचाराकरिता जो निघालो तो महात्मा गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला त्यावेळेस कऱ्हाडला गेलो. कऱ्हाडला माझी मार्चमध्ये ७ व्याख्याने झाली. त्या चळवळीत यशवंतराव तेव्हा टिळक हायस्कूलचे विद्यार्थी होते. ते त्या कृष्णेच्या घाटावरच्या मोठ्या अशा सभेमध्ये माझ्या शेजारी येऊन माझे भाषण ऐकत असत.

स्वातंत्र्याच्या जगातील स्वातंत्र्याचा इतिहास सांगत होतो. निरनिराळी राष्ट्रे कशी मुक्त झाली, विशेषत: जोसेफ मॅझिनी यांनी १९ व्या शतकात आपला देश स्वतंत्र करण्याकरिता जी चळवळ उभारली त्याच्या पाठीमागे जे राष्ट्रवादाचं तत्त्वज्ञान होत, त्या तत्त्वज्ञानाचा मी अर्थ सांगितला. अशा रीतीने आपल्या देशाच्या दारिद्र्याचा एकंदर इतिहास सांगितला. ब्रिटिशांनी या देशात कशी पिळवणूक केली, इथले मूळचे उद्योगधंदे, त्यांच्या व्यापाराने कसे बुडले, कसे बुडवले आणि हा देश त्यांनी कसा ताब्यात ठेवला या संबंधाचे विवरण केले.

व्याख्यान झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी ते माझ्याकडे आले आणि म्हणाले, मी तुमच्या भाषणाची टिपणे काढली आहेत. त्यांनी मला ती टिपणे दाखवली. मी विचारले तू कुठे असतोस ? कारण ते त्यावेळी १० वीतले विद्यार्थी होते. ते म्हणाले, मी इथे टिळक हायस्कूलमध्ये शिकतो. पाठक नावाचे शिक्षक आहेत. ते मला चांगले शिकवतात. तुमची व्याख्याने मला फार आवडली. तुमचे नाव लोक फार घेतात, तुमची भाषणे ही ज्ञान देणारी असतात असे मला पाठक गुरुजींनी सांगितले आहे. तर मी म्हटलं मी अभ्यास करून भाषण करतो.

जेव्हा स्वातंत्र्याची चळवळ चालली तर स्वातंत्र्य कशाकरता पाहिजे, स्वातंत्र्याचं ध्येय कसलं पाहिजे, स्वराज्याचा आकार कसा पाहिजे, जनता आणि स्वराज्य यांचे संबंध कसे असले पाहिजेत इत्यादी गोष्टींच्या संबंधाने मी विवरण केले. हे करत असताना जगामध्ये ज्या स्वातंत्र्याच्या चळवळी झाल्या आणि आधुनिक जो ध्येयवाद आला त्या ध्येयवादाचे विवरण मी केले. मी सांगितलं, की राष्ट्रवाद हा धार्मिक ध्येयापेक्षा निराळा आहे. या जगातला वैश्विक ध्येयवाद आहे आणि त्या नैतिक ध्येयवादाच्या दृष्टीने जगात स्वातंत्र्याच्या चळवळी झालेल्या आहेत. जोसेफ मॅझिनीचे चरित्र स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भाषांतरित केलं होतं. त्याच्यामध्ये जगातील सगळी राष्ट्रे साम्राज्यशाहीच्या पद्धतीच्या पकडीतून मुक्त व्हायला पाहिजेत. प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र राहण्याचा हक्क आहे. हा जो विचार आहे, हा विचार म्हणजे एक अर्थी मानवतावाद.

आणि एका अर्थी राष्ट्रवाद असा जो जोसेफ मॅझिनीचा सिद्धांत आहे. आणि त्याच्या पाठीमागे ईश्वराचा संकेत आहे. ईश्वराने माणूस निर्माण केला. राष्ट्रे निर्माण केली आहेत. ती कुणाच्या साम्राज्यशाहीच्या बंदीत राहण्यासाठी नाही तर स्वतंत्र राहण्याकरिता हा ईश्वरी संकेत आहे. हा विचार मी त्या व्याख्यानात मांडत होतो. आणि त्यामुळे व्याख्यानाची गर्दी वाढत गेली. तेव्हा त्यांचा माझा परिचय झाला. ते मला टिपणे दाखवीत होते. ते चळवळीत सामील व्हायला तयार झाले, तर मी म्हटलं चळवळीत या; परंतु स्वत:च्या पायावर शिक्षणाने उभी राहण्याची तयारी करा, फंडावर जगू नका, तर स्वतःच्या उद्योगाने जगावे. देशाची सेवा करावी. मी म्हणालो, शिक्षण पूर्ण कर. ही चळवळ असली तरी चळवळ ही सारखी चालत नसते. चळवळ ही मधे मधे थांबत असते. जशी मागची असहकारितेची चळवळ ५ ते ६ वर्षं चालली. मग विधायक कार्यक्रम गांधींनी पुकारला, तर त्यावेळेस शिकावं. ते म्हणाले मला मान्य आहे. आणि त्याप्रमाणे १९३२ ची चळवळ पुन्हा सुरू झाली. त्यातही ते सामील झाले.

पण शेवटी ते शिकले. पण शिकण्याचा त्यांचा दृष्टिकोन खोल आणि सूक्ष्म होता.

आजच्या विद्यार्थ्यांमध्ये, त्या काळच्या विद्यार्थ्यांमध्येसुद्धा इतका सूक्ष्म आणि शिक्षणशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचा दृष्टिकोन नव्हता, पण त्यांच्या ठिकाणी तो दिसून आला.

ते जेलमध्ये गेले, तेव्हा कारागृहामध्ये निरनिराळे देशभक्त जमले होते. आचार्य भागवतांसारखी मंडळी त्या ठिकाणी व्याख्याने देत. निरनिराळ्या विषयावर वाद होत असत. समाजवाद, लोकशाही, हुकूमशाही म्हणजे काय याची चर्चा होत असे. साहित्याच्या संदर्भातही चर्चा होत. गडकरी, केशवसुत, आचार्य अत्रे इ. लेखकांच्या साहित्यावर चर्चा होत. कादंबऱ्यांची चर्चा होत असे. अशा रीतीने कारागृहामध्ये सत्याग्रही देशभक्ताचा एक मेळावाच भरलेला होता. त्यामध्ये शिकलेले विद्वान असत. विद्यार्थीही होते. त्यांच्यापासून ते शिकले. म्हणजे शिकण्याची त्यांना तहान होती, तृष्णा होती. त्या तहानेमुळे ते खूप शिकले. त्यांनी आपले जे कृष्णाकाठ हे आत्मचरित्र लिहिले आहे ते त्याची साक्ष देते.

ते जेलमध्ये गेले असताना ते जेल त्यांना विद्यापीठच वाटले. त्यांनी त्या ठिकाणी अध्ययन केले. यशवंतराव कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्ये बी. ए. झाले. ३४ सालच्या सुमारास कायद्याच्या शिक्षणासाठी ते पुण्याला आले. त्यावेळेस त्यांच्या माझ्या भेटीगाठी आणि चर्चा होत होत्या.

**प्रश्न - त्यांनी तुम्हाला तुमच्या भाषणाची जी टिपणे काढून दाखवली त्या टिपणांविषयी तुमचे मत काय झाले ?**

**उत्तर -** त्यांनी जी टिपणे काढून मला दाखवली त्याविषयी माझे मत चांगले झाले. मुळातच ते बुद्धिमान होते. पण बुद्धिमान असला तरी एखाद्या विषयाची चांगली जिज्ञासा नसेल तर ते ज्ञान घेता येत नाही. जिज्ञासा चांगली असली तर ज्ञान घेता येते. आणि म्हणून त्यांची ती टिपणे अतिशय व्यवस्थित होती. मुद्देसूद होती.

**प्रश्न - साहेबांना जी साहित्याची आवड निर्माण झाली त्याची बीजे तुम्हाला विद्यार्थीदशेपासूनच पहायला मिळाली.**

**उत्तर -** विद्यार्थीदशेपासूनच मला त्यांच्या अनेक चांगल्या गुणांचा परिचय झाला. विशेषतः कारागृहामध्ये त्यांना विद्वान, व्यासंगी अशा सत्याग्रही लोकांचा सहवास लाभला. त्यांच्याबरोबर अनेक चांगल्या साहित्याच्या चर्चा होत असत. कवितेचीही चर्चा कारागृहात होत असे. त्यामुळे नुसतीच समाजवाद, लोकशाही, स्वातंत्र्य यांची चर्चा नाही, राजकारणाची चर्चा नव्हे, तर अर्थकारणाचीही चर्चा होत असे. त्याबरोबरच साहित्याच्या मूल्यांची चर्चा होत असे. अशा अनेक पद्धतीने त्यांना त्याचा लाभ झाला. ते आधुनिक ज्ञान आणि विचार यांच्या क्षेत्रात ज्यांचे ज्ञान आणि विचार जिवंत होते अशांच्या सहवासात आले. जे केवळ शिक्षण व्यवसाय म्हणून शिकवतात ते त्या ज्ञानाचा जिवंतपणा अनुभवत नाहीत. विचारांचे सामर्थ्य ज्यांच्या लक्षात नसते, ज्याचा मनुष्याच्या कृतीशी सबंध जोडला जात नाही किंवा ज्याच्यामध्ये सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा नसते अशा तऱ्हेचे ज्ञान काही माणसाला बदलत नाही. यशवंतराव बदलले. हा एक चांगला आधुनिक विचार करणारा, खोलात विचार करणारा, आणि व्यावहारिक दृष्टिकोन असलेला असा उत्तम मनुष्य होता. विशेष म्हणजे गरिबीतून ते वर आले होते. त्यांच्या घरची अत्यंत गरिबी होती. कऱ्हाडला त्यांची जी राहण्याची जागा होती तिथे मी गेलेलो आहे. दोन खोल्यांची जागा. त्याच्या पलीकडे स्वयंपाक वगैरे असायचा. अलीकडे मंडळीने राहायचं. अंथरायला साध्या सतरंज्या, बसलेले असताना टेकायला भिंत अशा तऱ्हेचं ते अतिशय साधं जीवन होतं. अशा गरिबीत ते राहिले होते. या गरिबीमधून स्वातंत्र्यासाठी ते लढले. त्याच्यामधून स्वतःची गरिबी नाहिशी होत नाही, देशाच्या हिताकरिता स्वातंत्र्य पाहिजे हा विचार त्यांच्यामध्ये होता. तो त्यांनी व्यवस्थित रीतीने आपल्या आयुष्यात पचवला आणि ध्येयवादी बनले.

यशवंतराव हे राजकारणात सत्तेकरिता आले नव्हते. कारण त्यावेळेस सत्ता नव्हतीच. त्यावेळेस त्याग होता. त्यागी जीवनाला त्यांनी प्रारंभ केला. स्वराज्य आल्यानंतर या त्यागी जीवनामध्ये बुद्धिमत्ता होती. बहुजन समाजामधूनच ते आले. बहुजन समाजाशी कायम संबंध ठेवला. आणि बहुजन समाजातीलच कार्यकर्ते त्यांनी गोळा केले. त्यांच्यामध्ये कार्यकर्ते गोळा करण्याची युक्ती फार चांगली होती. १९३७ साली ते रॉयवादाच्या सहवासात आले. एम्. एन्. रॉयचे विचार जे आहेत ते त्यांना फार पसंत पडत होते. तेव्हा ते जे आले याचे कारण हेच. सातारा जिल्हा त्यावेळी जो होता त्याच्यामध्ये एक प्रभावी तरुण, बहुजन समाजातला महत्त्वाचा तरुण म्हणून ते पुढे आले. अनेक तरुण आले. सातारा, पुणे, सांगली, कोल्हापूर या भागामधून अनेक तरुण त्यांच्याभोवती गोळा होऊ लागले. कारण, त्यांच्यामध्ये विचाराच्या देवाणघेवाणीची शक्ती चांगली होती. ते मांडणी चांगली करत असत. दुसऱ्याला पटवून देत असत, त्यांचे वक्तृत्व जे होतं ते फार दणदणीत नव्हतं. परंतु मार्मिक असे. अशा मार्मिक भाषणाने ते लोकांना विचार पटवत. त्यांच्यामध्ये एक प्रकारची विनोदबुद्धीही होती. त्या विनोदबुद्धीने ते लोकांना एक तऱ्हेचं

मनोरंजक होईल असं भाषण देत असत अशी त्यांची एकंदर रीत होती.

आमचे संबंध जे आले ते वाढत गेले. मधे काही अंतर आले नाही. ३७-३८ साली काँग्रेसमध्ये होते. मीही होतो. रॉयवादाचा प्रभाव त्यांच्यावर होता; परंतु १९४० साली रॉयवादी म्हणजे आम्ही काँग्रेसमधून बाहेर पडलो, तेव्हा ते आमच्या बरोबर आले नाहीत. त्याचं कारण असं की आम्ही या दुसऱ्या जागतिक महायुद्धामध्ये ब्रिटिशांना विरोध करू नये, अशा मताचे होतो. कारण ते जे जागतिक युद्ध होते त्या जागतिक युद्धामध्ये लोकशाहीचा शत्रू हिटलर आणि मुसोलिनी विजयी होऊ लागले. साम्राज्यशाहीचा अगदी आशिया खंडातल्या साम्राजशाहीचा अगदीच मुख्य अशा तऱ्हेचा आधारस्तंभ म्हणजे जपान. जपानमध्ये त्याकाळी लोकशाही नव्हती, तर लोकशाहीच्या विरोधी शक्ती जगातल्या हिटलर आणि मुसोलिनी यांच्या भोवती जमा झालेल्या. अशा स्थितीमध्ये ब्रिटिशांना जर विरोध केला तर त्यांचा विजय होईल, आणि जगात कुठेच लोकशाही होणार नाही. म्हणून यावेळी दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांना विरोध करू नये, अशा तऱ्हेचा दृष्टिकोन धरून आम्ही चले जावच्या चळवळीत सामील झालो नाही. आणि त्याच्या अगोदरच आम्ही काँग्रेसमधून बाहेर पडलो. कारण काँग्रेसने पहिल्यांदा तटस्थ भूमिका घेतली, आणि नंतर राजीनामे दिले. या देशामध्ये काँग्रेसने सगळीकडे विजय मिळविला होता तरी ब्रिटिशांशी सहकार करायचा नाही म्हणून राजीनामे दिले. ४२ साली छोडो भारत म्हणून त्यांच्याविरुद्ध चळवळ केली. ते अगोदरच हिटलर, मुसोलिनी आणि जपानच्या विरोधामध्ये उभे होते. हिटलरचा युरोपमध्ये प्रचंड विजय झाला. सबंध युरोप त्यांनी इंग्लंडशिवाय जिंकला. या स्थितीमध्ये जरी इंग्लंडचा दोस्त राष्ट्रांचा पराभव पूर्ण झाला असता तर जगातील लोकशाहीच नाहीशी झाली असती. हिटलरचा जो विचार होता तो भारताला स्वतंत्र करायचा नव्हता. त्याचं मत होतं, की ब्रिटनने भारताला जे गुलाम केले ते अगदी बरोबर आहे. गुलाम राहायला भारत लायकच आहे, असा त्याचा विचार होता. म्हणून त्याला मदत होईल अशा तऱ्हेचा लढा करू नये, अशादृष्टीने आम्ही बाहेर पडलो. रॉयवादी यशवंतराव काही आमच्या बरोबर आले नाहीत. ते काँग्रेसबरोबरच राहिले. छोडो भारत चळवळीत ते सामील झाले, असा फक्त २-४ वर्षांचाच काळ सांगता येईल की वैचारिकदृष्ट्या आम्ही बरोबर नव्हतो. भेट क्वचित होत होती. ते भूमिगत होते त्या काळात एकदा भेट झाली. ती आठवण मोठी मजेशीर आहे.

मी मुंबईहून पुण्याला तिसऱ्या वर्गातून रेल्वेने प्रवास करत होतो, त्यात ते मला दिसले. मी त्यांच्याकडे बघितले नाही असे केले. त्यांनीही माझ्याकडे बघितले नाही असे केले. एक पुस्तक माझ्याजवळ होते. मनात आले त्यांना ते पुस्तक द्यावे. म्हणून मी ते पुस्तक 'यशवंतराव यास भेट' असे लिहून त्यांच्यापाशी दिले. त्यांनी ओळखले. विचारपूस केली. मी म्हणालो, माझ्याशी तुम्ही बोलू नका. तुम्ही भूमिगत आहात.

भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये मारामाऱ्या सुरू झाल्या. त्या जिल्ह्यातले चंद्रोजी पाटील एक महत्त्वाचे भूमिगत कार्यकर्ते होते. स्वातंत्र्यसंग्रामात सामील झालेले, छोडो भारतच्या चळवळीत

सामील झालेले जे भूमिगत कार्यकर्ते होते. त्यांचे प्रति सरकार झाले. त्यालाच पत्री सरकार म्हणतात. प्रतिसरकार खरे, पण खेडेगावामध्ये शिक्षण नव्हते. त्यामुळे ते प्रतिसरकारला पत्रीसरकार म्हणायचे. त्या पत्रीलाही अर्थ होता. ब्रिटिशांना आणि पोलिसांना सामील झालेले म्हणून ज्यांच्याबद्दल शंका असत त्यांना पकडायचे. बैलाला ज्याप्रमाणे पायाला पत्र्या मारतात, तशा पत्र्या त्यांच्या पायाला मारायच्या. अशा तऱ्हेचे अनेक प्रकार झाले. काहींना पत्र्या ठोकल्या गेल्या. मी स्वत: असे २-४ प्रकार पाहिलेले आहेत. अशा प्रकारातूनच पुढे खुनाखुनी सुरू झाली. यशवंतरावांचा एक महत्त्वाचा मित्र त्यामध्ये मारला गेला. चंद्रोजी पाटील. त्यांचा शत्रू तोही मारला गेला. त्यामुळे त्याच्या मुलाने पुन्हा मारामाऱ्या सुरू केल्या. असं कऱ्हाडमध्ये कुऱ्हाडीचे राजकारण सुरू झाले. त्यात यशवंतराव नव्हते. पण यशवंतरावांचे त्यात काही मित्र होते. यशवंतराव जेलमध्ये होते.

नाना पाटील आणि साहेब ही दोन मोठी माणसे. प्रत्येकाने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. दोघांच्या पद्धती भिन्न होत्या. आम्ही दोघांनाही जवळून पाहिले आहे. दोघांच्यामध्ये एकवाक्यता कधी आली नाही. दोघांच्यामध्ये एकवाक्यता येऊ शकत नाही. नाना पाटील हे काही शिक्षित नेते नव्हते. यशवंतराव उच्चशिक्षित होते. नुसते ते बी. ए. एल्.एल्. बी असले तरी, चांगल्या डॉक्टरेट झालेल्या विद्वानासारखे त्यांचे ज्ञान परिपक्व होते, तर अशा यशवंतरावांची तुम्ही नाना पाटलांशी तुलना कशी करू शकता ? ते जवळ येऊ शकत नाहीत. मला नाना पाटलांचे महत्त्व कमी लेखायचे नाही. त्यांचे महत्त्व मला माहीत आहे. त्यांचे चलेजाव चळवळीतले मित्रही मला भेटलेले आहेत. लाड मंडळीही मला माहीत आहेत. त्यांना मी वेळप्रसंगी विरोधही केलेला आहे. बोरगावचे आत्माराम पाटील आमच्यात सामील झाले. ते काही यशवंतरावांबरोबर गेले नाहीत. पण यशवंतरावांना पुढे आणण्यामध्ये बोरगावचे आत्माराम नाना पाटील हे फार महत्त्वाचे होते. आत्माराम नाना पाटील हे यशवंतराव हा आमचा जवाहरलाल नेहरू म्हणून सातारा जिल्ह्यामध्ये यशोगान करीत होते. पण छोडो भारत चळवळ सुरू झाल्यानंतर आत्माराम पाटीलही दूर झाले. पण आत्माराम पाटील यांच्या गावाचा एक पाटील ते त्या भारत छोडो चळवळीत सामील झालेले होते. मी बोरगावला आलो. तिथे मी राजकीय अभ्यास वर्ग घेणार होतो. तर त्यांनी मला सांगितलं (त्याचं नाव मला आठवत नाही.) तुम्ही इथे वर्ग घेऊ शकणार नाहीत. त्यांना असा संशय होता की माझ्यापाशी पिस्तूल आहे. त्यामुळे त्यांना भीती वाटली. मी पिस्तुलधारी आहे अशी लोकांची फार दिवस समजूत होती. लोकांना पिस्तुले आणून दिलेली आहेत. पण पिस्तूल धारण केलं नाही. जवळ ठेवलं नाही. लोकांना दिली, ही गोष्ट खरी आहे; परंतु पिस्तुलधारी मी नव्हतो. कारण मला पिस्तूल चालवण्याकरिता जे कौशल्य लागतं ते कधीही नव्हतं. मी विचार शिकवू शकत होतो. पण हत्यार चालवणे मला येत नव्हते. मी कुणाला शिकवूही शकत नव्हतो. अशा दोन प्रवृत्तीमध्ये फरक आहे.

दुसरं महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटन विजयी झाले. आम्ही रॉयवाद्यांनी सांगितलं होतं की ब्रिटन

विजयी झाल्यानंतर जगातल्या साम्राजशाह्या कोसळणार. हा विचार सांगणारा निबंध आम्ही १९४० साली प्रसिद्ध केला. त्यात सांगितले होते की, ब्रिटिश जर वाचले तर साम्राज्यशाही राहणार नाही. जगातली सगळी राष्ट्रे स्वतंत्र होतील. हा एम्. एन्. रॉय यांचा सिद्धांत. ४७ साली भारत मुक्त झाला, जगातील अनेक देश मुक्त व्हायला लागले. काहींना लढावे लागते. आपल्या देशामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस लढत होते. छोडो भारत या सत्याग्रहीच्या चळवळीमध्येही एक प्रकारचे घातपात होतेच. ती काही महात्मा गांधींच्या सिद्धांताप्रमाणे चळवळ चालली नाही. त्यामध्ये जयप्रकाश होते, अच्युतराव पटवर्धन होते. या सगळ्यांनी काही ती जी भूमिगतांची चळवळ होती ती काही गांधीच्या अहिंसावादाप्रमाणे चालली नव्हती. ते धाकदपटशहा करत असत लुटालूटही करत. रेल्वे लुटत असत. इथे महाराष्ट्रामध्ये पोस्टातला खजिना लुटला गेलेला आहे. असं त्या चळवळीचं रूप आहे. तर ते सगळं त्याच्यामध्ये होतं. परंतु त्याच्यामध्ये यशवंतराव सामील नव्हते. घातपात, लुटालूट, जाळपोळ यात यशवंतराव सामील नव्हते. ते सरळ काही काळ भूमिगत राहिले. चळवळ पसरावी म्हणून जेलमध्ये गेले. हे त्या घातपाती चळवळीमध्ये आणि यशवंतराव यांचा त्याच्यामधला सहभाग याच्यामध्ये फरक लक्षात ठेवला पाहिजे. हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

**प्रश्न - तुम्ही हा जो कालखंड मला सांगितला, या कालखंडामध्ये यशवंतराव चव्हाण ज्या पद्धतीने वागले त्यावरही त्यांचे समकालीन लोक टीका करतात.**

**उत्तर -** यशवंतराव महात्मा गांधींना नेते मानत. ते त्यांच्या आज्ञेप्रमाणे जेलमध्ये गेले. गांधींच्या अहिंसेच्या खऱ्या मर्यादेबाहेर ती चळवळ गेली. त्यात यशवंतराव आले नाहीत. हे यशवंतरावांना श्रेय आहे. आम्ही सरकार सामील आहोत अशी लोक टीका करत, साम्राज्यशाहीचे आम्ही दोस्त म्हणून लोक आम्हाला हिणवत होते. पण आमचं एक रॉयवाद्यांचं तत्त्वज्ञान आहे, आम्ही नुसते राष्ट्रवादी नाही. आम्ही मानवतावादी आहोत. मानव मुक्त व्हावयाचा तर तो लोकशाहीशिवाय मुक्त होत नाही. लोकशाही धोक्यात आल्यानंतर राष्ट्रवाद बाजूला ठेवला जातो.

मी लोकांना पिस्तूल देत असे, असे मी तुम्हाला सांगितले तो विषय जरा समजून सांगतो. असं काही मी त्या चळवळीमध्ये असे म्हणत होतो की, त्या दोन्ही चळवळी चालल्या पाहिजेत. केवळ सत्याग्रहाने देश स्वतंत्र होईल, असे त्यावेळी वाटत नव्हतं. तर त्या करिता सुभाषचंद्रांची चळवळ चालली पाहिजे. म्हणजे सशस्त्र प्रतिकाराची चळवळ चालली पाहिजे हाही दृष्टिकोन होता. कारण मी शुद्ध सत्याग्रहवादी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालो आणि माझं मत असं आहे की, मी सशस्त्रवादाला जो पाठिंबा दिला ती माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाची चूक आहे, असं मी म्हणतो. कारण सशस्त्र लढाया या पुढे जगामध्ये माणसाला नाशाला नेतील असं माझं मत आहे. म्हणून मी आता पूर्ण गांधीवादी आहे. जगात शस्त्रवादच नको.

**प्रश्न - साहेबांनी महाराष्ट्राचा मंगलकलश आणला. त्यांना अनेक मानसिक यातनांमधून**

**जावे लागले. प्रचंड प्रमाणावर मतभेदाला तोंड द्यावे लागले. या सगळ्या परिस्थितीमध्ये तुमच्याशी त्यांचा जो संवाद झाला असेल तो तुम्ही सांगणे महत्त्वाचे आहे. यातूनच त्या कालखंडाचे चित्रण होऊ शकेल.**

**उत्तर -** स्वातंत्र्योत्तर काळात भाषिक प्रांतरचनेचा प्रश्न उभा राहिला. प्रत्येक भाषिक प्रदेश राज्य निरनिराळं व्हावं, आणि लोकभाषेत व्यवहार चालावा, उदाहरणार्थ द्विभाषिक मुंबई राज्य होतं. आणि १९६० पर्यंत स्वातंत्र्योत्तर काळात १९५२ सालापासून ते १९६० सालापर्यंत म्हणजे भारतीय राज्यघटना अमलात आल्यापासून ८ वर्षांपर्यंत द्विभाषिक मुंबई राज्य होतं. त्यामध्ये कर्नाटकही होता. गुजरात होता. महाराष्ट्राचा काही भाग मध्यप्रदेशमध्ये सामील होता. वऱ्हाड, नागपूर आणि निजामशाही जी होती ती त्याने खलास केली. मराठवाडा होता. तर हे सगळे महाराष्ट्राचे जे निरनिराळे भाग एकत्र येऊन एक महाराष्ट्र निर्माण व्हावा अशा तऱ्हेची मागणी १९४६ साली सुरू झाली. बेळगावाला माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली जे साहित्य संमेलन झाले, तिथे ही मागणी झाली. चळवळ सुरू झाली. म्हणजे ही चळवळ राजकारण्यांनी सुरू केली नसून ती साहित्यिकांनी सुरू केली. संयुक्त महाराष्ट्र उभा राहिला पाहिजे, संयुक्त याचा अर्थ विभक्त झालेला जो महाराष्ट्र आहे, म्हणजे मध्यप्रदेशात गेलेला आणि निजामशाहीत गेलेला मराठवाडा आणि मुंबई राज्यातला महाराष्ट्र हे सगळे एक व्हावेत. कर्नाटकात कानडी जिल्हे जावेत. गुजरात स्वतंत्र व्हावा. अशा तऱ्हेचा आणि महाराष्ट्र अलग व्हावा आणि भाषिक राज्य होऊन त्या त्या भाषेमध्ये विधिमंडळे चालावीत नाहीतर इंग्रजी अधिक राहिली असती. राहिली होती. कारण अनेक प्रांतांचे अनेक भाषिक लोक जेव्हा एकत्र राज्य करतात तेव्हा त्यांना एक संपर्क भाषा लागते. त्यावेळेस इंग्रजी होती. हिंदी फारसे लोक शिकत नव्हते. अजून हिंदी महत्त्वाची मानत नाहीत. कारण ज्ञानाची भाषा म्हणून इंग्रजी लोकांना मान्य आहे. इंग्रज गेले पण हिंदी ज्ञानाची संपर्क भाषा नाही. परंतु ज्ञानाची भाषा इंग्लिश म्हणूनच लोकांनी मान्य केली, तर अशा स्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य व्हायला पाहिजे. त्याचा लढा सुरू झाला. त्या लढ्यामध्ये महाराष्ट्र राज्य व्हावे हा सिद्धांत यशवंतरावांना मान्य होता. माझं म्हणणं की, अनेक भाषिक प्रदेश एकत्र राहिले तर काय बिघडले? भारत एकराष्ट्र आहे असा माझा सिद्धांत आहे. हा माझा सिद्धांत तो आहे, जो मी माझा जो राष्ट्रवाद होता त्या राष्ट्रवादाचा एक भाग होता म्हणून मी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लढ्याने नाही करायची, विनंती अर्ज करून करायची असा माझा सौम्य दृष्टिकोन होता; पण लढ्यामध्ये सामील व्हायचे असेल तर काँग्रेसमधून बाहेर पडलं पाहिजे, असं मी यशवंतरावांना सांगितलं. ते काँग्रेसनिष्ठ होते. लढा व्हायला पाहिजे. असे म्हणणारे परंतु काँग्रेसमधून बाहेर पडायला ते तयार नव्हते. म्हणून ते माझ्या बरोबर राहिले. ते माझ्या बरोबर राहिले याचा अर्थ माझे सिद्धांत त्यांना मान्य होते असे नाही. माझा जो राष्ट्रवाद त्यात प्रांत नकोत. प्रांत तुम्ही कसेही आडवे तिडवे पाडा या मताचा मी होतो. ही माझी नैतिक भूमिका होती. यशवंतरावांची भूमिका भिन्न होती. असं असून देखील आम्ही एकत्र आलो.

लोकांमध्ये माझी अशी प्रसिद्धी होती, की यांच्या सल्ल्यामुळे यशवंतराव हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून बाहेर पडले. आणि हे खरे आहे. कारण मी त्यांना पाठिंबा दिला, धैर्य दिले. आता संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूला नसलेले मंत्री त्यांच्या बरोबर राहिले. उदाहरणार्थ फलटणचे निंबाळकर त्यांच्या बरोबर राहिले. ते काही माझ्या सिद्धांताचे नव्हेत. माझ्या सिद्धांताचे मोरारजी देसाई मिळाले. मोरारजी हे संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध होते. नाशिकचे भाऊसाहेब हिरे हे महाराष्ट्राचे नेते होते. यशवंतराव हे भाऊसाहेब हिऱ्यांच्या बाजूने होते. पण भाऊसाहेब हिरे प्रमुख होते. त्यांचे सहकारी म्हणून यशवंतराव होते. म्हणून यशवंतराव हे महाराष्ट्राचे स्वतंत्र नेते जेव्हा झाले, तेव्हा भाऊसाहेब हिरे आणि त्यांच्यामध्ये फारकत झाली.

१९५६ साली निवडणुका झाल्या. जेव्हा असं दिसलं की, काँग्रेस पक्षामध्ये निवडून आलेल्या संयुक्त महाराष्ट्रवादी आणि द्विभाषिक मुंबई राज्यवादी असे फरक पडले. तेव्हा मोरारजी देसाई म्हणाले की, आपल्या काँग्रेस पक्षात अशी जर दुफळी असेल तर मी काही राज्य करणार नाही. कारण राज्य करताना मला त्रास होईल. मग त्यांनी सांगितलं, की यशवंतरावांना मुख्यमंत्री होऊ दे. बहुमत यशवंतरावांना देतो. गुजरातचे आणि महाराष्ट्राचे बहुमत मिळून ते महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा नाश करण्याकरिता मोरारजी देसाईंनी शस्त्रघात केला, आणि १०५ बळी घेतले. यशवंतरावांनी सांगितलं माझ्या हातात सत्ता आलेली आहे. शस्त्र चालवणार नाही. चळवळीच्या विरुद्ध ही पहिली गोष्ट त्यांनी केली. कारण त्यांना ती चळवळ मान्य होती. ते स्वतः सामील नव्हते; पण ती चळवळ व्हायला पाहिजे, भाषिकराज्य व्हायला पाहिजे, अशी त्यांची निष्ठा होती. मला ते म्हणत की तुमचा जो राष्ट्रवाद आहे. की जो भाषिक प्रांतवादाला सामील करून घेत नाही तो माझा नव्हे तेही मला मान्य होते. तुमचा दृष्टिकोनसुद्धा समर्थनीय आहे असं मी त्यांना सांगत असे. तुमच्या दृष्टिकोनाप्रमाणे जर भारताची रचना झाली तर ती मला अधिक पसंत आहे. पण त्याकरिता लढायला मी तयार नाही असे मी सांगितले. आज पंजाबमध्ये फूट पडली आहे. केंद्रीय सत्ताधाऱ्यांनी पंजाबकडे दुर्लक्ष करण्याचा प्रमाद केला आहे. महाराष्ट्रात हे जे दोन भाग होते. भाषिक प्रांतवादी आणि द्विभाषिक मुंबई राज्य, पण गुजरातमध्येसुद्धा गुजराथ भिन्न राज्य व्हावे अशी चळवळ सुरू झाली. जेव्हा पोटनिवडणुका व्हायला लागल्या तेव्हा काँग्रेसवादी पडायला लागले. १९६० साली पं. नेहरू आणि यशवंतरावांची गाठ पडली. ती वारंवार पडत होती. ते मराठवाड्यात जायला निघाले तेव्हा विमानात यशवंतरावांनी नेहरूंना सांगितले, महाराष्ट्र आणि गुजराथमध्ये पुढच्या ज्या निवडणुका होतील त्यामध्ये काँग्रेस काही बहुमताने येणार नाही. काँग्रेसचा पराभव होईल. मी द्विभाषिक राज्य प्रामाणिकपणाने राबवायला तयार आहे; परंतु कोणाच्याही शक्तीच्या बाहेर ही गोष्ट गेलेली आहे. आता काँग्रेसचे राज्य महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये राहणार नाही. त्यावर नेहरू म्हणाले, चर्चा करू, तुम्ही दिल्लीला या. यशवंतराव मुंबईला परतले. मला आणि किसन वीरांना बोलावून घेतले. किसन वीरांना

म्हणाले, मी दिल्लीला चाललो आहे. संयुक्त महाराष्ट्र होतो आहे. मला म्हणाले, नागपूरचे, वऱ्हाडचे नेते, कन्नमवार हे संयुक्त महाराष्ट्राला पाठिंवा देतील की नाही याबद्दल मला शंका आहे. तुमचे ते मित्र आहेत. तर तुमचे मत काय आहे? मी म्हटलं तुम्ही त्याची काळजी करू नका. तुम्ही दिल्लीला जा. कन्नमवार, बापूजी अणे यांच्या बाजूचे नाहीत, कारण बापूजी अणे हे संयुक्त महाराष्ट्रामध्ये यायला तयार नव्हते. निराळा विदर्भ त्यांना हवा होता. ते विदर्भवादी होते. कन्नमवार तुमच्या बाजूचे आहेत. त्यांना मुंबई राज्य झाल्यानंतर नागपूरचा, वऱ्हाडचा मुंबईशी संबंध तुटावा असे त्यांचे मत नाही. त्यांचे माझे विचार मिळतेजुळते आहेत. माझ्याकडे वाईला अनेकदा येतात. आमच्या गप्पा होतात. चर्चेमध्ये त्यांनी मला सांगितले की, विदर्भ निराळा काढला तर मुंबईसारखं आर्थिकदृष्ट्या संपन्न असे सुधारलेले, पुढारलेले शहर त्याचा आमचा संबंध कमी होणार ते मला पटत नाही. अधिक हक्काने आम्हाला मुंबईशी संबंध ठेवला पाहिजे. म्हणून मी यशवंतरावांना म्हटले ते तुमच्यावरोबर राहणार आहेत. तुम्ही दिल्लीत जावं त्या दिवशी वेणूताईंनी फार उत्तम जेवण केलेलं होतं, अजूनही त्याची आठवण आहे.

ते दिल्लीत जाऊन आले. त्यानंतर ते म्हणाले, की ऑल इंडिया काँग्रेसची बैठक चंदीगढला आहे. तुम्ही माझ्या बरोबर चला. मीही त्यांच्या बरोबर गेलो. तिथे संयुक्त महाराष्ट्राबद्दल ठराव मान्य झाला. इंदिरा गांधी अध्यक्ष होत्या. संयुक्त महाराष्ट्र व्हावा या बाबतीत इंदिरा गांधींचा आग्रह होता. त्यांनीही पंडितजींना आग्रहाने सांगितले की, संयुक्त महाराष्ट्र व्हायला पाहिजे. ही गोष्ट लोकांनी विसरता कामा नये. इंदिराजींनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला अनकूलता दर्शवली यात त्यांचे वेगळेपण दिसून येते. त्यांना एक प्रकारचा राजकीय होरा फार चांगला होता. त्यामुळे त्यांनी अनेक वर्षे राज्य केले. एवढंच आहे की, त्या होऱ्यामधून त्यांना पंजाब कळला नाही. पंडितजींना तर पंजाब कळलाच नाही; परंतु इंदिराजींना जर कळला असता तर पंजाबचा प्रश्न सुटला असता. पंजाबचा प्रश्न जेव्हा पेटत चालला तेव्हा मी कऱ्हाडला यशवंतरावांना म्हणालो, जे काही चालले आहे बरोबर नाही. सुवर्ण मंदिरातून भिंद्रनवाल्यांचे राजकारण सुरू झाले. कऱ्हाडला एका कार्यक्रमासाठी मी गेलो होतो. तिथे मी माझ्या भाषणात सरकारवर टीका करणारे भाषण केले. लोकांना फार आवडले. यशवंतराव तसे बोलू शकत नव्हते. ते पक्षनिष्ठ होते. त्यांनी मला सांगितले की, मी १९७२ साली केंद्रामध्ये गृहमंत्री होतो, तेव्हा पंजाबमध्ये जाऊन आलो. तेव्हा चंदीगढ अर्धा अर्धा करावा हे लोकांना मान्य होते. पाण्याचा प्रश्न सोडवला पाहिजे. तडजोडीला ते लोक तयार आहेत. आणि पंजाबचा प्रश्न उत्तमरीताने सोडवायला पंजाबचे शीख नेते तयार आहेत. मी दिल्लीत आलो. इंदिराजींना भेटलो. त्यांना सांगितले की, पंजाबचा प्रश्न सुटू शकतो. माझे म्हणणे ऐकून घेतले. आणि त्या एकच वाक्य बोलल्या (We will have to go through dark period).

आपल्याला काळ्याकुट्ट अंधारातून जावे लागेल. अंधकार युगातून जावे लागले, तो कालखंड संपला नाही, हा जो मी संदर्भ तुम्हाला सांगितला तो यशवंतरावांची आणि माझी

राजकीयदृष्ट्या शेवटची मुलाखत झाली, नंतर यशवंतरावच्या पत्नी गेल्या. पत्नी जाण्याच्या अगोदर त्यांचा अत्यंत कार्यक्षम कर्तृत्ववान पुतण्या गेला. हे दुःखाचे डोंगर त्यांच्यावर कोसळत राहिले. माझी भेट होत राहिली. वेणूताई गेल्यानंतर मी जेव्हा त्यांना भेटायला गेलो, ते रडायला लागले. ते म्हणाले, अश्रू गाळू नका असे लोकांना मी सांगत आलो आणि आज मीच रडतो आहे. माझे अश्रू पवित्र आहेत. कारण ज्यांच्या बरोबर आपण आयुष्य काढलं त्यांच्याबद्दलची जी कृतज्ञता आहे ती अश्रूंनी व्यक्त होते. शब्दापेक्षा त्या अश्रूने जेव्हा बोलता येतं, गळा दाटून येतो. ज्यांच्या बरोबर आयुष्य काढले, त्यांच्याबद्दल त्यांचं जे प्रेम, जे साहचर्य या सगळयाबद्दल आपली ती कृतज्ञतेची भाषा आहे.

मी एका वृत्तपत्राला यशवंतरावांच्या संदर्भात मुलाखत दिली. त्या मुलाखतीत वेणूताईबद्दल म्हणालो, वेणूताई हे यशवंतरावांचे देवघर होते. वेणूताई या राजकारणामध्ये कधीही शिरल्या नाहीत. केवळ त्यांचा बालेकिल्ला उत्तमपणे राखला आणि त्यांच्या राजकारणामध्ये घरात जे आदरातिथ्य लागते ते आदरातिथ्य त्यांनी आयुष्यभर केले. त्यामुळे यशवंतरावांची प्रतिमा अधिक उजळली. पुष्कळ वेळा मुख्यमंत्र्यांच्या स्त्रिया या मुख्यमंत्र्यांचं जे सत्ताधारित्व असतं त्या सत्तेचा दुरुपयोग करत असतात. त्याच स्वत: मुख्यमंत्र्यांसारखं वागायला लागतात. ही एक मोठी भ्रष्ट परंपरा भारताच्या लोकशाहीत शिरलेली आहे. ती यशवंतरावांच्या घरात शिरली नाही. याचं कारण वेणूताई, त्या अलिप्त होत्या; पण पारतंत्र्याच्या काळात त्या सत्याग्रही होत्या. पहिली सक्रांत त्यांची जेलमध्ये झाली. वेणूताई खूप मोठ्या होत्या, समर्थपणे त्यांनी यशवंतरावांना साथ दिली.

महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे हे यशवंतरावांचं जे वादग्रस्त विधान आहे, ती एक अतिशयोक्ती आहे. ते जरा वेगळया पद्धतीने समजून घेण्याची गरज आहे. पंडित नेहरू याचा अर्थ काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष राहिला तर भारत एक राहतो. ही त्यावेळची परिस्थिती होती. नेहरू म्हणजे काँग्रेस. काँग्रेस म्हणजे भारताचे लोकशाही राज्य, सत्ता टिकवायला त्यावेळेस कोणी पर्यायी पक्ष नव्हता. तर हे त्यांचं बोलणं हे एक राजकीय धोरण म्हणून हुशारीचं लक्षण आहे. या संदर्भात त्यांच्यावर जी टीका झाली ती योग्यच आहे. परंतु हे जे वाक्य आहे. ती त्यांची चतुराई आहे याचं दर्शक आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत फलटणला जी सभा झाली त्यामध्ये यशवंतराव हे फार एका बाजूला जाऊन बोलले. देशी वसाहतवाद... असे काहीतरी बोलले. त्यांचे बोलणे वेगळे होते. ते फार समतोल बोलणारे होते. समतोल विचार करणारे होते. पण एखाद्या वेळेस तोल जो आहे तो जायचाच झुकायचाच, दुसऱ्या बाजूला. ते म्हणायचे, मी कुंपणावर आहे. त्यांनी असं म्हणायचं कारण ते एकूण दोन्हीही भागातले सत्य शोधण्याचा प्रयत्न करीत. त्याचं कारण असं आहे की, नुसतं पक्षीय राजकारण करायचं नाही. देशाचं राजकारण म्हणजे सर्व पक्षांचं आणि पक्षातील जनता यांचं राजकारण करायचं असल्यामुळे कुंपणावर राहणं हे शहाणपणाचं लक्षण

आहे. म्हणजे पक्षाचा अभिनिवेश हा अत्यंत अयोग्य आहे. लोकशाहीमध्ये पक्ष मान्य करावा. पक्षाला महत्त्व द्यावे. पक्षाला सत्ता आणावी. परंतु पक्ष हा सर्वस्व नव्हे. पक्ष म्हणजे देशाची लोकशाही नव्हे. कित्येक वेळा पक्ष आणि लोकशाही यांच्यामध्ये विरोधही असू शकतो, आणि येतो. म्हणून पक्षाला एवढे महत्त्व देणे अयोग्य आहे. पक्ष उभे राहतात, मरतात; पण देश राहतो. हे लक्षात ठेवले पाहिजे. पक्ष म्हणजे देश नव्हे. पक्ष हे लोकशाही राखतीलच असा नियम नाही. पक्ष लोकशाहीच्या पोटातून येतात, पण लोकशाहीला मारतात.

**प्रश्न - महात्मा गांधीच्या हत्येनंतर फार मोठ्या प्रमाणात जाळपोळ झाली. गोडसे हे ब्राह्मण असल्यामुळे ब्राह्मणांची घरे जाळली गेली. त्या परिस्थितीत यशवंतराव नेते म्हणून कसे राहिले याबद्दल तुम्ही बोला, कारण त्यावेळचे वातावरण तुम्हाला माहीत आहे.**

**उत्तर -** यशवंतराव हे जाळपोळीच्या विरुद्ध होते. एका ब्राह्मण जातीतल्या माणसाने गांधींची हत्या केली म्हणून त्या जातीला त्रास देणे या क्षुद्र मनोवृत्तीचा त्यांनी धिक्कार केला. निषेध केला. स्पष्टपणे ते विरोधी होते. त्यांनी कऱ्हाडची जाळपोळ होऊ दिली नाही. पुढारीपण घेतले. हे त्यांचे यश आहे. वाईला आणि इतर परिसरात खेड्यापाड्यात मोठ्या जाळपोळी झाल्या. साताऱ्यात रात्री होळी, पेटली आहे असे वातावरण दिसत होते. ब्राह्मणांची घरे जळत होती. अशी स्थिती होती, पण यशवंतरावांचे कऱ्हाड जळाले नाही. त्यांनी या सर्व गोष्टींचा धिक्कार केला. पण एकटे यशवंतराव काही करू शकत नव्हते. लोकांच्या भावना भडकल्या होत्या.

यशवंतरावांबद्दल माझ्या मनात अनेक आठवणी आहेत. त्यांना पुस्तकांबद्दल विलक्षण प्रेम होते. त्यांनी स्वत:ही खूप चांगले आणि सुंदर लिहिले आहे. राजकारणाने ते गुंतून पडल्यामुळे लिहायला जी सवड लागते ती त्यांना अधूनमधून मिळत असे. ते कऱ्हाडला आले की सवड काढून माझ्याकडे वाईला यायचे. नव्या नव्या पुस्तकांबद्दल माहिती घ्यायचे. माझ्याकडे नवे पुस्तक असले की त्यांना देत असे. विश्वकोशामध्ये यायचे. तिथेही ते येऊन पुस्तके पाहायचे. एखादे पुस्तक चांगले दिसते की ते मनसोक्त दाद द्यायचे. जागतिक कलेबद्दलचा विश्वकोशाचा भारताबद्दलचा एक खंड मी त्यांना दाखवला. त्यांना तो खूप आवडला. मुंबईला तो कोठे मिळेल याची माहिती त्यांनी माझ्याकडून घेतली. आणि मुंबईला गेल्याबरोबर तो खंड विकत घेतला. त्यावेळेस त्या काळात त्या सर्व खंडाची किंमत जवळ जवळ ३ हजार रुपये होती. त्यांनी ते भरले आणि सर्व पुस्तके विकत घेतली. त्यांना केवळ साहित्यातल्या पुस्तकांचीच आवड नव्हती, तर इतर क्षेत्रातल्या पुस्तकांची त्यांना आवड होती. विज्ञानाची पुस्तके ते आवडीने वाचत असत. अमेरिकेतल्या एका शास्त्रज्ञाचे अंतराळासंबंधी लिहिलेले पुस्तक त्यांना आवडले होते. मी त्यांना वारंवार इंग्रजी साहित्यातील नव्या नव्या विचारांची पुस्तके देत असे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर काय प्रगती होते आहे आणि याचे माहात्म्य कसे वाढेल हा दृष्टिकोन त्यांचा असल्यामुळे त्यांनी साहित्य संस्कृती मंडळ हे माझ्या अध्यक्षतेखाली ते मुख्यमंत्री असताना सुरू केले. त्यांचा त्या पाठीमागचा हेतू असा की मराठीमध्ये ललित साहित्य, कथा, कादंबऱ्या, नाटक होत

असतात. पण मराठीमध्ये वैचारिक साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञानाचं साहित्य निर्माण होत नाही तर, मराठी माणसांच्या हातात, कारागिराच्या हातात आधुनिक मराठी तंत्रज्ञानाचे आणि विज्ञानाचे पुस्तक गेले पाहिजे. जगातले महत्त्वाचे साहित्य मराठीत रूपांतरित व्हायला पाहिजे असा त्यांचा विचार होता. भिन्नभिन्न भाषांतले साहित्य मराठीत आणणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. कुठल्याही माणसाला दुसरी भाषा शिकताना अडचण येऊ नये म्हणून निरनिराळ्या भाषेतले शब्दकोश मराठीत आणले गेले. यशवंतरावांचे हे फार मोठे उपकार महाराष्ट्रावर आहेत. त्यांना साहित्यात आणि संस्कृतीत प्रगत झालेला महाराष्ट्र केवळ अभिप्रेत नव्हता. तर नवा आधुनिक महाराष्ट्र त्यांना घडवायचा होता. त्या दृष्टीनेच त्यांनी भक्कमपणे महाराष्ट्राची उभारणी केली. महाराष्ट्राबद्दल त्यांचा दूरगामी विचार होता. मराठी भाषेचे भवितव्य आधुनिक ज्ञान, विज्ञानाच्या दृष्टीने फार मोठे व्हायला पाहिजे. मराठीमधूनच ज्ञान विज्ञान चांगल्या रीतीने मिळायला पाहिजे. हा त्यांचा विचार होता. असा विचार आता कुणामध्ये फारसा अजूनही आलेला नाही.

**प्रश्न - आणीबाणीच्या काळात कऱ्हाडला साहित्य संमेलन झाले. त्या संमेलनाचे एक साक्षीदार म्हणून त्यावेळच्या वातावरणाविषयी तुम्ही तुमच्या आठवणी सांगा.**

**उत्तर -** मी माझे भाषण लिहून आणले होते. आणीबाणीमध्ये काही गोष्टी बदलायला पाहिजेत अशा तऱ्हेचा विचार मी सांगितला होता. पण तो माझा विचार सत्ताधाऱ्यांना इतका कठोर वाटला की माझ्या भाषणातला तो भाग वृत्तपत्रात कुठेही येऊ नये अशा तऱ्हेचे आदेश निघाले. दुर्गाबाई भागवतांच्या लेखी भाषणात असे काही नव्हते. पण त्या बोलल्या. माझे उद्घाटनाचे भाषण होते. माझा विचार यशवंतरावांना मान्य होता, पण ते सत्ताधारी असल्यामुळे त्यांना काही बोलता येईना. माझे ते भाषण छापलेले आहे. ते होण्याच्या अगोदर किसन वीर माझ्याकडे आले. मी मंचावर बसलेलो होतो. ते सभामंचावर माझ्याकडे आले आणि म्हणाले, आणीबाणीवर तुमच्या भाषणात जी टीका आहे ती काढता येणार नाही का ? मी म्हणालो नाही. किसन वीरांशी माझा महत्त्वाचा आयुष्यातील जो मतभेद झाला तो याचवेळी झाला. किसन वीरांना ते फार वाईट वाटले. किसन वीर यशवंतरावांकडे गेले आणि त्यांना म्हणाले शास्त्री माझे ऐकत नाहीत. यशवंतराव म्हणाले, मी शास्त्रीजींना सांगू शकत नाही. म्हणजे त्यांना माझे विचारस्वातंत्र्य मान्य होते. याचा अर्थ त्यांना त्या आणीबाणीमध्ये काही गोष्टी मान्य नव्हत्या.

संमेलनानंतर आमची अनेकदा भेट झाली. माझा संपर्क कधीच तुटला नाही. यशवंतराव गुप्तपणे शास्त्रीजींच्या पाठीशी असावेत असे काही लोक मनातल्या मनात म्हणत होते. परंतु ते माझ्या पाठीशी नव्हते. पण किसन वीरांना त्यांनी स्पष्ट सांगितले, की शास्त्रीजींचे भाषण आपण बंद करू शकत नाही. किसन वीरच नाही तर साताऱ्यातल्या काँग्रेस पुढाऱ्यांचेच मत होते, की शास्त्रींचे भाषण होता कामा नये. पण त्या पुढाऱ्यांनाही त्यांनी सांगितले, की मी काही करू शकत नाही. हा जो त्यांचा राजकीय शहाणपणाचा भाग आहे तो विशेष लक्षात ठेवण्यासारखा भाग आहे. तो राजकीय दृष्टीने महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्रामध्ये टिळकांनंतर निर्माण झालेले ते मोठे मुत्सद्दी नेते होते. यशवंतरावांना महाराष्ट्राचा शिल्पकार म्हणतात ते खरे आहे.

**प्रश्न - यशवंतराव तुम्हाला गुरू मानत होते ही गोष्ट खरी आहे काय ?**

**उत्तर -** यशवंतराव मला गुरु मानत नव्हते. मी स्वतःगुरु म्हणून कुणाचाही स्वीकार केलेला नाही. आणि तेही कुणाला गुरू मानत नव्हते. आम्ही दोघे मित्र. मी त्यांचा वडीलधारी मित्र होतो. ते माझ्याशी अनेक विषयावर बोलत. वेळ आली तर माझा सल्लाही विचारत. पण ज्यावेळेस त्यांनी काँग्रेस सोडली त्यावेळी त्यांनी मला विचारले नाही. त्यांनी काँग्रेस सोडली ही त्यांची चूक होती असे माझे मत होते. आणीबाणीत मी टीका केली होती. म्हणून काँग्रेसमधून मी ठराव न होता काढला गेलो. नंतरच्या काळात मी मात्र त्यांना काँग्रेसमध्ये जायला सागितले. ते वाईला आले होते. त्यावेळेस मी त्यांना म्हणालो तुम्ही काँग्रेसमध्ये कमीपणा पत्करून रहा. काँग्रेसशिवाय मार्ग नाही. तुमच्या खांद्यांवर काँग्रेसचा झेंडा आहे असे तुम्ही म्हणता; पण काँग्रेस इंदिराजींच्या पाठीमागे आहे. अशा स्थितीमध्ये तुम्ही काँग्रेसच्या बाहेरच आहात. झेंडा घेऊन काय उपयोग? काँग्रेस तुमच्या पाठीमागे नाही. शरद पवार त्यांच्या बरोबर काँग्रेसमध्ये गेले नाहीत, ही खंत त्यांच्या मनात नव्हती. कारण ते त्यावेळेस उत्साहात नव्हते. त्यांना कळले होते, की आपला राजकीयदृष्ट्या मार्ग चुकला होता. त्यामुळे शरदराव आले की नाही हा मुद्दा नव्हता. त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात काही विकल्प नव्हता. साहेबांना त्याचं दुःख नव्हतं. त्यांची भूमिका स्वच्छ होती. ते कमीपणा स्वीकारूनच काँग्रेसमध्ये शिरले. त्यांचे निधन झाले नसते तर राजीवबरोबर त्यांनी वेगळ्या पद्धतीने राजकारण केले असते. राजीवच्या राजकारणालाही वेगळी कलाटणी मिळाली असती. राजीवला त्यांनी आधार दिला असता. राजीवचे राजकारण अधिक तेजस्वी आणि निरोगी झाले असते.

त्यांनी आयुष्यभर बेरजेचे राजकारण केले. बेरजेचे राजकारण म्हणजे उत्तम राजकारण, वजाबाकी ही अपरिहार्य म्हणून करावी लागते. पण बेरीज हीच मुख्य. त्यांचे राजकारण भारताची लोकशाही, भारताचा समाजवाद, भारतातील ग्रामीण जीवनाचे पुनरुज्जीवन, ग्रामीण जीवनाला नवीन उच्च संस्कृती मिळावी, आधुनिक तंत्र विज्ञान, सबंध भारत पुढे जावा. बहुजन समाज जो आहे तो समाजवादी दृष्टीने दारिद्र्यातून पूर्ण बाहेर पडावा, याकरिता ग्रामीण भागामध्ये खरीखुरी लोकशाही निर्माण व्हावी. नुसती विधानसभा आणि लोकसभेमध्येच लोक निवडून जाऊन लोकशाही राहायची नाही. मूलगामी लोकशाही निर्माण व्हावी असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांचा राजकीय दृष्टिकोन फार सखोल आणि सामर्थ्यशाली होता. निःस्वार्थी होता. सत्तेचा त्यांनी कधीही स्वार्थाकरिता उपयोग केला नाही. अलीकडे काँग्रेस पक्षात, बाहेरच्या पक्षात लोक राजकारणात सत्ता हातात आल्यानंतर सर्व दृष्टीने उपयोग करतात. तशा तऱ्हेचा राजकारणाचा, सत्तेचा कधीही अयोग्य असा वापर यशवंतरावांनी आयुष्यात केला नाही. ते निष्ठावंत देशभक्त होते. आता राजकारणात निष्ठावंत देशभक्त सापडणे कठीण आहे. राजकारणात शिरताना जी

माणसे साधी असतात ती माणसे राजकारणातून बाहेर पडताना अफाट वैभवाचे मालक झाली. असे आजच्या राजकारणाचे चित्र आहे.

यशवंतरावांसारखा अष्टपैलू नेता होणे यापुढच्या काळात कठीण आहे. ते खूप वेगळे होते. आपले वेगळेपण त्यांनी आयुष्यभर जपले. 'कृष्णाकाठ' सारखे सुंदर असे आत्मचरित्र लिहिले. ते एक उत्कृष्ट आत्मचरित्र आहे. साहित्यदृष्ट्याही ते एक चांगले पुस्तक आहे. आत्मचरित्र अपूर्ण राहिले आहे याचे वाईट वाटते. त्यांचे आत्मचरित्र सोडून इतर जे लेखन आहे, तेही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या वेगळेपणाचीच ते साक्ष देतात. त्यांची भाषणे ही एका लेखकाची, विचारवंताची व जाणत्या नेत्यांची भाषणे असत. लोकशाहीवादी, मानवतावादी व्यापक दृष्टिकोनाचा राष्ट्रीय आणि जागतिक राजकारणाचा उत्तम अभ्यास केलेला असा मुत्सद्दी नेता भारताला आणि महाराष्ट्राला मिळाला ही भाग्याची गोष्ट आहे. असा नेता पुन्हा महाराष्ट्रात होणार नाही. सर्व गुणांचा, कलांचा मनापासून चाहता असणारा लोकशाहीच्या माध्यमातून समाजाला पुढे नेणारा दुर्मिळ नेता यशवंतरावांच्या रूपाने महाराष्ट्राला लाभला होता.

**(* कृष्णाकाठचा माणूस. संपा. अरुण शेवते, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई - ६३, १ मे १९९३. पृ. ११२ ते १३१.)**

ooo

३८

# यशवंतराव चव्हाण : बांधिलकी आणि साहित्य विशेष

मुलाखतकार - **अनिल जोशी**

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेणाऱ्या ब्राह्मणेतर समाजातील तरुणांना ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद बाजूला टाकण्याची जबाबदारी पार पाडावी लागली. महाराष्ट्राचे त्या वेळचे राजकीय जीवन ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या संघर्षाने राष्ट्रीय एकात्मता सिद्धांताला बाधक होते आणि यशवंतराव ज्या मर्यादित प्रादेशिक क्षेत्रात स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेऊ लागले, तो प्रदेश या संघर्षाचे महत्त्वाचे केंद्र होते. कोल्हापूर हे सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे प्रेरणास्थान होते. अशा स्थितीत यशवंतरावांनी या संघर्षाला जाणूनबुजून बगल दिली. हे त्यांना फार सोपे झाले. याचे कारण पुणे येथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचे जेधे-मोरे इत्यादी म्होरके त्या ब्राह्मणेतर चळवळीची धुरा वाहत असतानाच त्या चळवळीच्या तरुण पिढीला देशाच्या मुख्य राजकीय आंदोलनात सामील करून घेत होते. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळयांशी आपले कसलेही नाते असणार नाही आणि दिसणार नाही याची खबरदारी यशवंतरावांच्या बरोबरच्या पिढीस सहज साधता आली. त्यावेळी सातारा जिल्ह्यात आत्माराम पाटील हे यशवंतरावांपेक्षा वयाने थोडे वडीलकीचे होते.

ब्राह्मणेतर चळवळीत सापडलेल्या तरुणांना स्वतःबरोबर घेऊन राजकारणात खेचण्याचे काम आत्माराम पाटील मोठ्या कुशलतेने करीत होते. परंतु रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आणि यशवंतरावांचा तरुण गट यांचा सांधा काही नीट जमला नाही, स्वातंत्र्योत्तर काळात जमला. तोसुद्धा फार उशिराच. स्वातंत्र्यपूर्व काळात या केवळ सामाजिक ब्राह्मणेतर चळवळीला बगल देण्याचे काम यशवंतरावांना फार सोपे गेले. याचे कारण ते समाजवादी विचारसरणीच्या आणि ध्येयवादाच्या प्रभावाखाली आले आणि सामाजिक परिवर्तनात भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाची सूत्रे आणि आर्थिक शोषणाची सूत्रे कोठून हलवतात याचा विचार यशवंतरावांना करावा लागला. याची मीमांसा सारखी चालू होती. त्यात परकीय साम्राज्यशाहीच्या शोषणतंत्रामध्ये ब्राह्मण आणि व्यापारीवर्ग

यांच्यावर कसलीच नैतिक जबाबदारी पडू शकत नव्हती. सबंध देशाच्या दारिद्र्याचा विचार सुरू होता आणि साम्राज्यशाहीची शोषणयंत्रणा ही भारताच्या दारिद्र्यास कारणीभूत आहे, ही गोष्ट इथल्या अंतर्गत आर्थिक विषमतेकडे लक्ष देऊ देत नव्हती. अत्यंत व्यापक अशा आंतरराष्ट्रीय शक्तीचा विचार सुरू झाल्यानंतर स्थानिक मर्यादित प्रमाणातल्या सामाजिक विषमतेकडे उपेक्षेनेच पाहणे अपरिहार्य झाले. हा सगळा सामाजिक बांधिलकीचा संदर्भ राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात स्पष्ट झाला होता, हे लक्षात ठेवले पाहिजे.

१९३० ते १९५० या वीस वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राच्या साहित्यिक जीवनात काव्य, कादंबरी, नाटक आणि लघुकथा या साहित्यिक प्रकारांचा विकास होत होता. खाडिलकरांची नाटके सूचक होती. ती इथल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामाला प्रेरणा देत होती. त्याहीपेक्षा वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्या आणि कथा तरुणांना वाचनाची गोडी लावत होत्या. वि. स. खांडेकर हे सामाजिक विषमता आणि शोषण या विचारांवर केंद्रित असे, आपले ललित-साहित्य लिहीत होते. कुसुमाग्रजांसारखे कवी ‘गर्जा जयजयकार, क्रांतीचा गर्जा जयजयकार,’ अशा गेय काव्यरचनांच्या योगाने प्रत्यक्ष स्वातंत्र्यसंग्रामात गुंतलेल्यांचे नैतिक धैर्य दुर्दम्य रीतीने पोशीत होते. ‘कोलंबसाचे गीत’ ही कुसुमाग्रजांची कविता ‘प्रचंड ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढलेच पाहिजे, अफाट शस्त्रसमृद्धी असलेल्या साम्राज्याला निःशस्त्र जनतेने आव्हान देऊन लढलेच पाहिजे,’ अशी दुर्दम्य मनीषा दृढ करीत होती. ‘अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा,’ अशा प्रकारे त्या वेळच्या असंख्य महाराष्ट्रीय तरुणांना अस्वस्थ ठेवत होती. मराठीतील त्या वेळची सगळी चांगली कविता यशवंतरावांनी प्रातःस्मरणीय पवित्र स्तोत्राप्रमाणे वाचण्याचा परिपाठ ठेवला होता. ते मातृभक्त असल्यामुळे त्यांना राजकवी यशवंत यांची ‘आई’ ही कविता मुखोद्गत होती.

असे हे महाराष्ट्राच्या अद्ययावत साहित्याच्या स्फूर्तीच्या वलयामध्ये संघटनेचे कार्य करीत असताना वैज्ञानिक क्रांतीचा आणि सामाजिक क्रांतीचा एकत्र समन्वय समाजवादी क्रांतीमध्ये होणार हे त्यांना दिसत होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिक वैज्ञानिक क्रांती ज्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून झाली, तो दृष्टिकोन भारतीयांना आणि महाराष्ट्रीयांना प्राप्त व्हावा, ललित साहित्यापेक्षा वैचारिक साहित्य भारतीय भाषांमध्ये आणि मराठीमध्ये विस्तृत प्रमाणात निर्माण व्हावयास पाहिजे याची त्यांना ओढ लागली होती. कारण भारतीय जीवनात आर्थिक क्रांती व्हावयाची तर विज्ञाननिष्ठ तंत्रज्ञानाच्या आधारे सगळया उद्योगक्षेत्रात काम करणारे कुशल कामगार आणि निरनिराळ्या खालच्या वरच्या श्रेणीतील अभियंते आणि तंत्रज्ञ यांना अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध व्हावयास पाहिजे. थोडे इंग्लिश भाषेत उच्च पदवी किंवा पदविका घेतलेले तरुण वा तरुणी मोठी अद्ययावत आर्थिक क्रांती करू शकणार नाहीत आणि उलट समाजात एक नवा लहानसा इंग्लिश शिकलेला तंत्रज्ञांचा वर्ग निर्माण होणार म्हणजे विषम समाजरचना कायम राहणार. हे संकट टाळण्याकरिता यशवंतराव विचारमग्न होते. सामान्य भारतीय कुशल

कामगारास नवे तंत्रज्ञान त्यांच्या मातृभाषेत उपलब्ध व्हावे या दृष्टिकोनातून ते शिक्षणाकडे आणि शैक्षणिक साधनांकडे पाहत होते. अद्ययावत ज्ञान मातृभाषेतून मिळाले पाहिजे व ज्ञान देणारी पुस्तके ललित साहित्याइतकीच मनोरंजक रीतीने लिहिली गेली पाहिजेत, असा उद्देश बाळगून ते महाराष्ट्राच्या आणि भारताच्या नवीन शैक्षणिक दिशांचा विचार करीत राहिले होते.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर त्यांनी साहित्य-संस्कृती मंडळ स्थापून तत्संबंधी आपले उद्देश आणि अपेक्षा जाहीर केल्या. त्यात त्यांच्या या साहित्यविषयक दृष्टिकोनाचे दिग्दर्शन मिळू शकते. मोठमोठ्या विद्यापीठांच्या आणि महाविद्यालयांच्या समारंभांमध्ये त्यांचा हा वरील दृष्टिकोन वारंवार स्पष्ट झालेला आढळतो.

त्यांनी आपले स्वतःचे खासगी ग्रंथालय चांगल्या रीतीने निवडक पुस्तकांचा संग्रह करून वाढविले. त्यात त्यांची ही दृष्टी स्पष्ट होते. ब्रिटन किंवा अमेरिका इत्यादी देशांमध्ये गेले असताना ते आपल्या सचिवांना आणि उपसचिवांना बरोबर घेऊन फुरसतीच्या वेळेत संपन्न अशा पुस्तकांच्या दुकानांना भेटी देत आणि आपल्या आवडीचे ग्रंथ निवडत. यशवंतरावांच्या बौद्धिक बहुश्रुततेचे आणि साहित्यिक रसिकतेचे उत्कृष्ट प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे त्यांनी केलेला हजारो ग्रंथांचा संग्रह होय.

त्यांना साहित्यिक लेखनाची आवड होती; पण सवड मिळणे फार कठीण होते. त्यांनी राजकीय जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या होत्या; परंतु त्यातल्या त्यात महत्त्वाचे प्रसंग आपल्या स्वतःच्या विचारांच्या मांडणीकरता त्यांनी वारंवार वापरले. त्यांची विचार-संपदा म्हणजे त्यांनी या प्रसंगी केलेली शेकडो भाषणे होती. त्यात प्रभावीपणे आपले विचार मांडले आहेत. 'सह्याद्रीचे वारे', 'ऋणानुबंध', 'युगांतर' आणि 'भूमिका' यांमध्ये त्यांची भाषणे आहेत. त्यांनी आत्मचरित्र लिहिण्यास सुरुवात केली. जन्मापासून राजकारणामध्ये पाय पक्केपणे रोवला, इथपर्यंत आयुष्याचा भाग 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्र खंडात सुरेख रीतीने लिहिला आहे. पुढील दोन खंड सागरतीर आणि यमुनातीर हे जर लिहून पूर्ण झाले असते, तर महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकीय जीवनावर मोठा प्रसन्न प्रकाश पसरलेला वाचकांना पाहावयास मिळाला असता. कृष्णाकाठ या आत्मचरित्राच्या खंडाने अशी उत्कट आशा निर्माण झाली होती.

आतापर्यंत जेवढे काही साहित्य त्यांच्या लेखणीतून उतरले त्यामध्ये विवेक, तर्कशुद्ध संगती व तात्त्विक गांभीर्य आणि प्रसन्नता हे महत्त्वाचे गुण वाचकांच्या प्रत्ययास येतात. एक तत्त्वचिंतक राजकारणी आणि मुत्सद्दी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी कामगिरी करून गेला, याचे उत्कृष्ट प्रत्यंतर आपल्याला त्यांच्या लेखनशैलीमधून मिळते.

**(दैनिक केसरी, पुणे, काल अनुपलब्ध)**

ooo

३९

# शिवाजीराव नि शास्त्रीबुवा

मुलाखतकार - **सुधीर गाळगीळ**

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेणाऱ्या ब्राह्मणेतर समाजातील तरुणांना ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद बाजूला टाकण्याची जबाबदारी पार पाडावी लागली. महाराष्ट्राचे त्या वेळचे राजकीय जीवन ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या संघर्षाने राष्ट्रीय एकात्मता सिद्धांताला बाधक होते आणि यशवंतराव ज्या मर्यादित प्रादेशिक क्षेत्रात स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेऊ लागले, तो प्रदेश या संघर्षाचे महत्त्वाचे केंद्र होते. कोल्हापूर हे सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे प्रेरणास्थान होते. अशा स्थितीत यशवंतरावांनी या संघर्षाला जाणूनबुजून बगल दिली. हे त्यांना फार सोपे झाले. याचे कारण पुणे येथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचे जेधे-मोरे इत्यादी म्होरके त्या ब्राह्मणेतर चळवळीची धुरा वाहत असतानाच त्या चळवळीच्या तरुण पिढीला देशाच्या मुख्य राजकीय आंदोलनात सामील करून घेत होते. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळयांशी आपले कसलेही नाते असणार नाही आणि दिसणार नाही याची खबरदारी यशवंतरावांच्या बरोबरच्या पिढीस सहज साधता आली. त्यावेळी सातारा जिल्ह्यात आत्माराम पाटील हे यशवंतरावांपेक्षा वयाने थोडे वडीलकीचे होते.

ब्राह्मणेतर चळवळीत सापडलेल्या तरुणांना स्वतःबरोबर घेऊन राजकारणात खेचण्याचे काम आत्माराम पाटील मोठ्या कुशलतेने करीत होते. परंतु रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आणि यशवंतरावांचा तरुण गट यांचा सांधा काही नीट जमला नाही, स्वातंत्र्योत्तर काळात जमला. तोसुद्धा फार उशिराच. स्वातंत्र्यपूर्व काळात या केवळ सामाजिक ब्राह्मणेतर चळवळीला बगल देण्याचे काम यशवंतरावांना फार सोपे गेले. याचे कारण ते समाजवादी विचारसरणीच्या आणि ध्येयवादाच्या प्रभावाखाली आले आणि सामाजिक परिवर्तनात भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाची सूत्रे आणि आर्थिक शोषणाची सूत्रे कोठून हलवतात याचा विचार यशवंतरावांना करावा लागला. याची मीमांसा

कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमावर वसलेल्या 'कऱ्हाड' च्या विश्रामधामात दोन ज्ञानी वक्त्यांची एकत्र भेट होण्याचा योग जुळून आला शिवाजीराव भोसले आणि लक्ष्मणशास्त्री जोशी.

नाम. शाम अष्टेकरांच्या सत्कारासाठी दोघे कऱ्हाडात आले होते. सभेची वेळ टळली, तरी उत्साही कऱ्हाडवासीयांची गुलाल उधळत मिरवणूक चालूच होती. यशवंतराव चव्हाणांनंतर 'कऱ्हाड' शहराला मंत्रिपद न मिळण्याचं रौप्यमहोत्सवी वर्ष चालू असतानाच कऱ्हाडच्या एका अगदी सामान्य कार्यकर्ता खेळाडूला शरदरावांनी मंत्रिपद दिल्याने जनसामान्यांचा 'सागर'च आनंदोत्सव साजरा करत होता. साहाजिकच दोनही पाहुणे सर्किट हाऊसच्या 'सूट'मध्ये विश्रांती घेत होते.

शास्त्रीबुवा प्रवासातून येऊन झोपले असतील म्हणून खोलीत डोकावणार नव्हतो. एवढ्यात रामभाऊ कोल्हटकरांनी (शास्त्रीबुवांचे चिटणीस) हाक मारली. 'झोपले असतील शास्त्रीबुवा तर व्यत्यय नको म्हणून....' माझं खुलासेवजा वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच रामभाऊ म्हणाले, 'दुपारी झोपत नाहीत, यांना या वयातही (८८चालू) रोज रात्री साडेनऊ ते पहाटे साडेचार अशी सात-आठ तास उत्तम झोप लागते. बाकी मग दिवसभर कामात व्यग्र असतात, डुलकीही येत नाही.

अठ्ठ्याऐंशी वर्ष चालू म्हणजे लोकमान्य (टिळक) गेले तेव्हा शास्त्रीबुवा विशीतले... प्रत्यक्ष दोघांची भेट झाली होती?

केसरीवाड्यात १९१९ मध्ये टिळकांना भेटून मगच तर अध्ययनासाठी शास्त्रीबुवा काशीला शिकायला गेले-रामभाऊ सांगतात. शास्त्रीबुवांना काही स्पष्ट शंका विचारू का? म्हटल्यावर ते म्हणतात, ''बेलाशक.''

शास्त्रीबुवा तुम्ही या राजकारणी मंडळींच्या खूप सहवासात म्हणून विचारतो, ''साहेबांच्या (यशवंतराव) डोक्यात कधीच जातपात डोकावली नाही का हो?''

''नाही, यशवंतरावांच्या मनात कधीच जातपात नव्हती; पण 'जात' हा राजकारण करताना लक्षात ठेवण्याचा भाग आहे याचं भान त्यांना होतं.''

''यशवंतरावांसारखा सुसंस्कृत माणूस राजकारणाच्या चढउतारांनी कधी खचत नाही का हो?''

''खचतो ना! पण याचा अर्थ त्यांनी कधी धीर गमावला नाही.''

''ते राज्याचे मुख्यमंत्री झाले. एकदम मोठी जबाबदारी त्यावेळी हा आवाका पेलताना यांना थकवा आला होता का?'' नाही. कारण भावनेच्या भरात काय येतं आणि काय येत नाही याविषयाची स्पष्ट जाणीव त्यांना होती आणि आपणास माहीत नसलेली गोष्ट समजून घेण्याची यांना इच्छा, ओढ होती. ते मुख्यमंत्री झाले यावेळी एक वरिष्ठ, जुने शिक्षणाधिकारी गृहखात्याला होते यांना बोलावून घेऊन ते म्हणाले की, ''हे पहा, मला आपल्या बऱ्याच गोष्टी समजत नाहीत. तेव्हा आपण मला येत्या १५ दिवसात सारं थोडक्यात समजून द्या.'' शिकण्याची ही त्यांची मनोवृत्ती अखेरपर्यंत जागृत होती.

''प्रत्येक खात्यामधल्या प्रश्नांचा पूर्वाभ्यास ते नियमितपणे करत. यामुळे विधानभवनात ते गडबडलेले, गोंधळलेले, यांची फजिती झाली, असे कधीच झाले नाही. रोज अध्ययन करीत. रात्री एकपर्यंत जागून वाचत असत. शास्त्रीबुवा सांगत होते. शेवटी म्हणाले वेणूताईंना लिहिलेल्या पत्रांचं नवं पुस्तक (विदेशदर्शन) सर्वार्थाने सुंदर आहे. तुमच्या पुण्यातील राजाभाऊंनीच ((जोशी) काढलंय ते.''

एवढ्यात पाटील सर नामक स्थानिक आयोजक आले. फोटो काढायचाय म्हणाले. चटदिशी उठून शास्त्रीबुवा अगदी ताठपणे फोटोला उभे राहिले. यांच्याकडे पाहिल्यावर वय अठ्ठ्याऐंशी चालू आहे, असे वाटत नव्हते.

''अहंकारावर योग्य नियंत्रण आणि निद्रेचा नियमितपणा असेल तर धावपळीचं जीवन असूनही तब्येत दगा देत नाही.'' शेजारच्या 'सूट'मध्ये शिवाजीराव भोसले राहात होते.

''मी पूर्णपणे शाकाहारी जेवतो. रात्रीच्या वेळी दूध-भात आणि एखादं फळ असेल तर उत्तम झोप लागते. व्याख्यानं नसतील तर मी जागरण टाळतोच, पहाटे उठून वाचन, चिंतन, मनन उत्तम होतं.''

सूर्यनमस्कार आणि आसने मी रोज करतो. त्यापैकी आधी काय करावे हा मला प्रश्न होता. आधी नमस्कार, घातल्याने शरीर मोकळे होऊन मग 'आसने' करावीत असा अनेकांचा सल्ला; पण आता शास्त्रीबुवा म्हणाले की आधी आसने करावी. त्यांचेच ऐकायला हवे.

शिवाजीरावांना भेटायला फुटाणे नावाचे गृहस्थ आले. त्यांना कऱ्हाडात संत फुटाणे म्हणतात. शिवाजीराव म्हणाले की, 'ज्ञानेश्वरी' मुखोद्गत असलेला हा माणूस आहे. शब्दांचं खंडन आणि मंडन यावर दोघे बोलले. "शब्दांना अर्थ नाही आणि शब्दांशिवाय अर्थ नाही" असं त्यांच्या चर्चेचं सार होतं. संत फुटाणे गेल्यावर बाजूस बसलेले पाटील सर म्हणाले, "एकदा पंतप्रधान पंडित नेहरूंना भगवद्गीतेतील काही श्लोकांचा अर्थ समजून घ्यायचा होता.

त्यांनी यशवंतरावांकडे विषय काढला. सुदैवाने त्यावेळी संत फुटाणे साहेबांकडे होते. त्यांनाच घेऊन साहेब पंडितजींकडे गेले आणि गीतेवर चर्चा झाली. फुटाणेंकडे पाहिल्यावर वाटलं, "या गावागावांतील ज्ञानी माणसांची प्रसारमाध्यमांना ॲलर्जी का?"

अष्टेकरांच्या सत्कारस्थळी जाण्यासाठी गाडी आली. गाडीत सत्कार मार्गावर तरुण, उत्साही कार्यकर्त्यांची गर्दी होती.

प्रत्येकाला अष्टेकरांविषयी भरभरून बोलायचं होतं.

''अहो, मंत्रिपदाचं बोलावणं आलं तेव्हा पाचशे रुपये उसने घेऊन गेले. पाचशे पुरतील की नाही एवढीही कल्पना नसलेला हा साधा माणूस आहे.''

''शामरावांच्या सत्कारासाठी आम्ही कुणा उद्योगपतीकडे हात पसरलेले नाहीत. गावोगावच्या कार्यकर्त्यांनी ३२ हजार रुपये जमवून खर्च भागवलाय.''

''ज्या पी.डी. पाटलांना पाडून श्यामराव निवडून आले, तेच आज नगरपरिषदेच्या वतीने

पहिला हार घालणार आहेत. योग आहे ना?''

कऱ्हाड नगरपरिषदेत जकात कारकून, तिथेच नगरसेवक, तिथेच उपाध्यक्ष आणि आता मंत्री हा प्रवास गमतीशीर आहे ना?

कमानी, पताका, गुलालाचा जल्लोष कराडभर होता. मैदान तर भोवतालच्या भिंतीसह पॅक होतंच. खेरीजस्टेजवर पाहुण्यांवर अनेकजण हारासह अक्षरश: कोसळत होते.

श्यामरावांना घालण्यासाठी हार हातात घेतलेल्यांच्या चेहऱ्यावर आपलेपणाची भावना होती. सारी घराघरांतील साधी माणसं होती.

शिवाजीराव भोसले शब्दांची आतषबाजी सुरू झाली. यांच्याकडे पाहून 'खोडखोड' हसण्यामध्ये काही करणे शक्य नाही. अशा सत्ताधाऱ्यांना 'खो' देऊन श्यामरावांसारखा खेळाडू सत्तेवर आला आहे. आता ते कुणाला 'खो' देतात बघायचं.

''क्रीडांगण गाजवणारे समरांगण रणांगण गाजवतात हे नेपोलियनचं म्हणणं मला आत्ता आठवतंय.''

''खेळाडू असल्यानं ज्यांचं मैदान स्थिर आहे, पाय जमिनीवर आहेत; पण जीवन गतिमान आहे, असे श्यामराव आहेत.''

''सर्वसामान्य माणसाच्या घरी मंत्रिपद येतं, ही परवापरवापर्यंत नवलाची वाटणारी गोष्ट श्यामरावांच्यामुळे खरी ठरलीय. ते साधे-सरळ आहेत. ते तसेच राहावेत. यासाठी कार्यकर्त्यांनी त्यांच्याकडे वाकडी कामं घेऊन जाता कामा नयेत.''

शिवाजीराव बोलतच होते. हशा-टाळ्या फुटत होत्या. जनसागराचा नि त्यांचा सूर जमला होता.

त्यांना म्हणालो की, ''शिवाजीराव साक्षात तुमच्यात सरस्वती उतरलीय.'' तर ते पटकन उतरले, ''नव्हे,नव्हे सरस्वती तर समोर (श्रोते) आहे. मी फक्त आरसा झालोय!''

**(थेट भेट, रविवार सकाळ, पुणे, १९८९)**

OOO

*

(ड)

# धर्म, संस्कृती व तत्त्वज्ञान संबंधी मुलाखती

*

४०

# भारतीय संस्कृती : काही समस्या

मुलाखतकार - **श्री. पु. भागवत**

संपादक, साप्ताहिक मौज, मुंबई

**प्रश्न : अलीकडे भारतीय संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचे उद्घोष सर्वत्र ऐकू येऊ लागले आहेत; परंतु भारतीय संस्कृती म्हणजे काय आणि तिचे पुनरुज्जीवन करावयाचे म्हणजे काय काय करावयाचे, याचे व्यवस्थित स्पष्टीकरण करण्याची काळजी मात्र फारशी कोणी घेत नाही. पुनरुज्जीवनाचा घोष मात्र फार जीव तोडून कंठशोष होईपर्यंत केला जात आहे. यासंबंधी पुष्कळच शंका, एकदम मधमाशा मस्तकाभोवती घोंघावू लागाव्या त्याप्रमाणे, येऊ लागतात. त्यापैकी काहींची निवड करून तुम्हास विचारतो. उत्तरास भरपूर वेळ आहे ना? प्रथम प्रश्न असा की, भारतीय व अभारतीय असे जे संस्कृतीचे भेद केले जातात ते केवळ भौगोलिक आहेत की, त्यात अधिक प्रदेशविशेषमूलक गुण गृहीत धरले आहेत?**

**उत्तर :** तुमचे प्रश्नच फार महत्त्वाचे असल्यामुळे वेळ नसला तरी वेळ काढला पाहिजे. शब्दांचे व कल्पनांचे अर्थ नीट रीतीने ठरवून विचार करण्याची पद्धती यावयास बुद्धिवादी संस्कृती उत्पन्न व्हावी लागते. ज्ञानाचे पावित्र्य सर्व पावित्र्यांत उच्चतम आहे, अशा भावनेने भरलेले शैक्षणिक वातावरण उत्पन्न व्हावे लागते. ते अजून आपल्या विद्यापीठात व महाविद्यालयांत उत्पन्न व्हावयाचे आहे. सॉक्रेटीसने मनुष्याच्या वैचारिक प्रपंचात शब्दांच्या व कल्पनांच्या स्पष्टार्थाला प्रथम महत्त्व आणले. प्राचीन काळी सूत्रकालात असंदिग्ध शब्दार्थ हे एक मोठे ज्ञानमूल्य मानले जात होते.

भारतीय व अभारतीय हे केवळ संस्कृतीच्या भौगोलिक स्थानाचे निदर्शक शब्द नाहीत. भारतवर्ष नामक भूप्रदेशात चिरकाल वस्ती करणाऱ्या मानवसंघांनी तेथील निसर्गशक्तीच्या अधिष्ठानावर निर्माण केलेली संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती होय. विशिष्ट व्यवस्था व संगती असलेली मानवी कर्मपद्धती किंवा मानवी जीवनपद्धती म्हणजे संस्कृती होय. किंवा मनुष्य स्वतःवर व आम्हा विश्वावर हे संस्कार करतो, या संस्काराची पद्धती व त्या पद्धतीची इष्ट परिणती म्हणजे संस्कृती होय, किंवा मानवी सृजनशीलतेचा व्यवस्थित व प्रगतिपर आविष्कार म्हणजे

संस्कृती होय. सृजनशीलतेच्या अंतर्मुखतेने संस्कृतीचे आध्यात्मिक वा मानसिक आविष्कार होतात. काव्य, वाङ्मय, नीती, धर्म, आचार, तत्त्वज्ञान व विज्ञान हे सृजनशीलतेचे अंतर्मुख आविष्कार होत. सृजनशीलतेच्या बहिर्मुखतेने स्थापत्य, कृषी, पशुपालन, वाहन, वस्त्र, पात्र, हत्यारे, यंत्रे इत्यादी रूपाने भौतिक संस्कृती तयार होते. आतला निसर्ग व बाहेरचा निसर्ग या दोघांवर आत्मार्थ विजय हे संस्कृतीचे फलित होय. कामविकार हा निसर्ग होय. वैवाहिक प्रेम हा आतल्या निसर्गावरील विजय होय. मनुष्य मनोरथ रचतो, कल्पनातरंगाबरोबर वाहत जात असतो, हा मनुष्याचा निसर्ग होय. मनावर संस्कार करून काव्य व शास्त्र निर्माण होतात. हा अंतरंगातील निसर्गावर मिळवलेला विजय होय. धरणे बांधणे, जनावरे माणसाळविणे, खाणीतील धातू शुद्ध करून वापरणे, वाफ व वीज वापरणे हा बाह्य निसर्गावरील विजय होय. समाजव्यवस्था, अंतर्बाह्य निसर्गावरील विजयाचे साधन व फल होय. व्यवस्था (order) व प्रगती (progress) ही संस्कृतीची दोन मुख्य लक्षणे होत. या दोन लक्षणांत परस्परपूरकता असते व विरोधही असतो. समाजव्यवस्था चांगली असताना यांत्रिक शक्तीचे भाग तयार झाले, म्हणजे प्रगती झाली. यांत्रिक शक्तीचे भाग मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आल्यावर पूर्वीची समाजव्यवस्था मोडून पडली. परिस्थितीला वश करून नवीन नवीन साधने होऊ लागली, की पूर्व व्यवस्थेत बदल होत जातो. तीच साधने कायम राहिली, तर पूर्वव्यवस्था कायम राहू शकते. प्रवाहिता व परिस्थितीशी अनुरूप असा सतत बदल करणे हा जीवतत्त्वाचा धर्म आहे. परिस्थितीने दिलेल्या नव्या व विलक्षण आव्हानांचा स्वीकार करून त्यावर योग्य तोड काढणे हे मानवी साफल्याच्या इतिहासाचे स्वरूप आहे. संस्कृती ही नित्यप्रवाही व परिवर्तनशील अशी मानवी स्थिती (Human Situation) आहे.

संस्कृतीच्या भौगोलिकतेसंबंधी तुम्ही प्रश्न विचारलात. त्याचे उत्तर वरील पार्श्वभूमी लक्षात घेतली असता, तुम्ही स्वतःच काढू शकाल. ज्या भौगोलिक परिस्थितीत संस्कृती उत्पन्न होते व वाढते त्या भौगोलिक परिस्थितीचा भाग त्या संस्कृतीत असतोच. प्रत्येक भौगोलिक परिस्थितीचे निराळे वैशिष्ट्य असते. ते वैशिष्ट्य संस्कृतीच्या अंगप्रत्यंगांत प्रतिबिंबित झालेले असते. समुद्रालगतच्या प्रदेशात राहणाऱ्या समुद्रोपजीवी लोकसंस्थेत नाविक जीवनाचा ठसा उत्कृष्ट रीतीने उठलेला असतो. उदाहरणार्थ, प्राचीन क्रीटची संस्कृती व आधुनिक ब्रिटिश संस्कृती पाहा. नाईल नदीच्या प्रवाहावर जन्म व मरण अनुभवलेल्या प्राचीन इजिप्तचे उदाहरण संस्कृतीच्या भौगोलिकतेचा अभ्यास करणाऱ्यांस मार्गदर्शक असेच आहे. प्राचीन इजिप्तचे सृष्टिशास्त्र म्हणजे नाईल नदीच्या परिसराने उत्पन्न केलेला कल्पनाविलासच होय.

उष्ण कटिबंधातील आहार-विहार-पोषाख आणि समशीतोष्ण कटिबंधातील आहार-विहार-पोषाख यांच्यातला फरक भौगोलिक परिस्थितीने निपजलेला असतो हे सहज ध्यानात येते. देवता, कर्मकांड, संस्कारविधी, उत्सव इत्यादिकांवर ही भौगोलिकतेची छाप असते. पर्वतप्रदेशांत दुर्गा व नदीप्रदेशांत गंगा ही देवता असते. उत्तर हिंदुस्थानात जत्रा व मेळे विशेषतः थंडीच्या दिवसांत भरतात. कारण पावसाळ्यात चिखल फार व उन्हाळ्यात गर्मी फार असते. काव्यादि ललित

कलेवर भौगोलिकतेची भूमिका परिणाम करीत असते. युरोपियन कादंबऱ्यांतील बर्फवृष्टी व भयंकर थंडी आपल्या कादंबऱ्यांत सापडत नाही. सापडली तर त्यास आंबटशौक या सदरांत ढकलतील. भौगोलिकता हा संस्कृतीचा गाभा घडविते, असे जे कित्येक संस्कृतिशास्त्रज्ञ म्हणतात ते मात्र सांस्कृतिक इतिहासास धरून नाही. मानवी बुद्धी ही संस्कृतीची विधात्री आहे. बुद्धितत्त्व सर्व जगातील मानवगणांत सारख्याच नियमांनी व्यापार करीत असते. म्हणून तात्त्विक स्वरूपात संस्कृती ही मूलतः एकाच मानव्यरूपी साराने रसरसलेली आहे. जेथे ते सार कमी प्रमाणात आविर्भूत होते, ती संस्कृतीची अंगे लवकर लयाला जातात. टिकून राहिली तर माणसाला लयाला नेतात.

एकाच भौगोलिक परिस्थितीत भिन्न भिन्न संस्कृती कालक्रमाने एकातून दुसरी अशा पद्धतीने जन्मतात. युरोपात प्रथम क्रीटची संस्कृती होती. नंतर ग्रीसची संस्कृती उदय पावली. ती अस्तंगत होत असता रोमन संस्कृती अस्तित्वात आली. खिश्चन धर्माच्या प्रतापाने ती संस्कृती विदीर्ण होऊन मध्ययुगीन ख्रिश्चन संस्कृती अवतरली. नंतर १५ व्या शतकापासून मानव्य व बौद्धिक स्वातंत्र्य यांची नवजीवनात्मक चळवळ उद्भवली व त्यातून नव विज्ञानाचा आविष्कार होऊन आधुनिक पाश्चात्त्य संस्कृती प्रादुर्भूत झाली. एकाच भौगोलिक परिसरात इतकी स्थित्यंतरे घडून भिन्न आकार (patterns) धारण केलेल्या संस्कृती क्रमाने उदयास आल्या. मानवी शाश्वत सृजनशक्ती संस्कृतीची जननी असते. पुराणबंधनांचा व पुरातन आकाररूपी प्रकारांचा उच्छेद करून नवी नवी सांस्कृतिक शरीरे धारण करण्याचे कार्य ही मानवजीवनशक्तीच करते. संस्कृती हा आत्मसर्ग होय, आत्माविष्कार होय.

**प्रश्न : भारतीय व हिंदू संस्कृती एकच की त्यात काही फरक आहेत? भारतीय संस्कृती अनेक प्रवाहांनी मिळून झाली आहे की नाही? इस्लाम, ख्रिश्चन इत्यादी संस्कृतीचा तिच्यावर परिणाम किंवा एकमेकांत देवाणघेवाण झाली आहे की नाही?**

**उत्तर :** मला वाटले की, माझे वरील रुक्ष तात्त्विक विवेचन ऐकून पहिल्याच प्रश्नात तुम्ही गार होणार व निरोप घेणार. खरे पाहता शुद्ध बुद्धीच्या क्षेत्रांतही रस असतो. रमेपर्यंत रुक्षता वाटते. हेगेलचे ग्रंथ वाचत असता मला रोज प्रथम १०-१५ मिनिटे नकोसे वाटावयाचे; परंतु एकदा विषय मनात भरू लागला म्हणजे सूक्ष्म आनंदाचा अनुभव येत विषयात समाधी लागत असे. विल ड्युरंट याने हेगेलच्या ग्रंथांबद्दल तक्रार केली आहे, म्हणून मी माझा अनुभव सांगितला, विषयांतर नको.

आज भारतीय संस्कृती म्हणून जिच्याबद्दल सगळीकडे चर्चा सुरू आहे, ती हिंदू संस्कृतीच होय. वस्तुतः हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन व पारशी म्हणून जे सुसंस्कृत सामाजिक गट हिंदुस्थानात आहेत, त्यांची सर्वांची मिळून एक अशी जी संस्कृती ती भारतीय, असे म्हणणे योग्य होय; परंतु भारतीय संस्कृती म्हणताना हे विसरलेले असते. हिंदुस्थानातील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन व पारशी यांची निरनिराळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहेत, त्या सर्वांची मिळून जी संस्कृती आहे, तिच्यावर हिंदुत्वाची छाप अधिक आहे. भाषा, आहार, वाङ्मय, ललितकला, व्यवसाय या



वाय १७८-२८

बाबतीत त्यात हिंदुत्वाचा रंग उतरलेला आहे. पारशांची भाषा गुजराती आहे. पंजाबी, सिंधी, बंगाली इत्यादी मुसलमानांची भाषा प्रांतीय आहे. उर्दू मातृभाषा असलेले मुसलमान हिंदी भाषा बोलणाऱ्या प्रांतांमध्येच आहेत. गोमांस वगळल्यास आहार-विहार पद्धतीवर त्या त्या प्रांतांची वैशिष्ट्ये त्या त्या प्रांतांतील मुसलमानांनी उचललेली आहेत. उर्दूसुद्धा हेच सुचविते की, हिंदुस्थानातील मुसलमान हा अर्धा हिंदू आहे. ख्रिश्चन लोक तर आपापल्या प्रांतांतील धर्मविषयक बाबी सोडून इतर बाबतींत आपापल्या प्रांतांतील हिंदूंशी सांस्कृतिकदृष्ट्या एकरूप झालेले आहेत. भाषा हे सांस्कृतिक मूल्यांचे सर्वात वरिष्ठ केंद्रस्थान असल्यामुळे मी त्याचा मुद्दाम निर्देश केला आहे. भाषेत संस्कृतीचे भूत व भविष्य साठलेले असते. हिंदुस्थानात अस्सल व उच्च दर्जाची इस्लामची संस्कृती विशेष प्रमाणात आली नाही. ती अरबांपाशी होती. अरब हिंदुस्थानच्या किनाऱ्याला नुसते शिवून निघून गेले. येथे येऊन स्थिर झाले, ते मुस्लिम अरबांच्या मानाने फार मागासलेले होते. परंतु त्यांच्याबरोबर आलेले मुस्लिम संस्कृतीचे विशेष-म्हणजे कला, साहित्य, भाषा, आहारातील काही प्रकार, पोषाखांतील काही विशेष, दरबारातील काही रिवाज, इमारतीच्या विशिष्ट रचना, राज्यव्यवहाराची वैशिष्ट्ये, अत्तरे, सतरंज्या, तक्के इत्यादी उपयोगाच्या व विलासाच्या जिनसा इत्यादी गोष्टी हिंदूंच्या संस्कृतीत बेमालूमपणे किंवा स्पष्टपणे मिसळलेल्या दिसतात. हिंदू संस्कृतीची शस्त्रक्रिया केली, तरी मुस्लिम संस्कृतीची मिसळलेली अंगे काढून टाकता येणार नाहीत. कदाचित त्यामुळे जीवाला धोकाही पत्करावा लागेल. ख्रिश्चन संस्कृतीचा परिणाम पुष्कळसा नकळतच झाला आहे व होत आहे. उदाहरणार्थ, काँग्रेसच्या तत्त्वज्ञानातील सेवा ही परिभाषाच ख्रिश्चन मिशनरी भावनेची द्योतक आहे. ब्राह्म समाज व आर्य समाज या हिंदुसंस्था ख्रिश्चन विचारांचा परिणाम होऊन उत्पन्न झाल्या आहेत. महाराष्ट्रातील सत्यशोधक समाज व प्रार्थना समाज यांच्या विचारांचा संबंध खिश्चन धर्माशी जोडण्याचा प्रयत्न करून त्यांचा अधिक्षेप महाराष्ट्रातील सनातन्यांनी केला, त्याचे कारण उघड आहे.

जगाच्या सगळ्याच प्राचीन व अर्वाचीन संस्कृती या देवाणघेवाण किंवा अनुकरण करून जगल्या व जगत आहेत. मनुष्याच्या मुख्य मेंदूच्या रचनेशी याचा संबंध आहे. मनुष्यत्व ज्या मेंदूच्या अंशामुळे उत्पन्न झाले व वाढीस लागले, तो अंश सर्वसंस्कारक्षम, सर्वानुकरणक्षम आणि परंपरेतून व पूर्व संस्कारांतून उत्तीर्ण होणे इष्ट असल्यास तसे करण्यास पूर्ण समर्थ, असा आहे. इष्ट तेथे तद्रूप होणे व अनिष्ट जे असेल त्यातून मुक्त होणे, याचे सामर्थ्य माणसाला त्या मानव्यमूलक मेंदूमुळे प्राप्त झाले आहे. दुसऱ्या संस्कृतीतील इष्ट किंवा योग्य काय याचा विवेक करून उचलण्याचे सामर्थ्य संस्कृतींच्या ठिकाणी नष्ट झाले, म्हणजे ती संस्कृती जरठ झाली, असे खुशाल समजावे. भिन्न भिन्न संस्कृतीचा समागम ही मानवी इतिहासातील अत्यंत मंगल घटना असते. उच्चतम प्रतिभा वा अलौकिक बुद्धिसामर्थ्य हा काही एका विशिष्ट मानवगटाचाच सवता सुभा नाही. म्हणून भिन्न भिन्न संस्कृतीच्या देवाण-घेवाणीची क्रिया प्रगतीची शक्ती होय, असेच संस्कृतिशास्त्रास मान्य करावे लागते. मी पुनः तात्त्विक चर्चेत शिरलो. आणखी काही प्रश्न?

**प्रश्न : तात्त्विक चर्चेचा आम्हास कंटाळा नाही. मूर्त उदाहरणांनी तत्त्वांचा उलगडा चांगला होतो. प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांचा अर्थ म्हणजेच तत्त्वे होत. तत्त्वांशिवाय घटना अर्थशून्य भासतात. मला ज्या महत्त्वाच्या गोष्टींकडे तुमचे लक्ष वेधून घ्यावयाचे आहे, त्याकरिता लागणारे आवश्यक तितके विवेचन झाले आहे. मुख्य प्रश्न असा : जडवादी विज्ञाननिष्ठेमुळे विनाशाकडे जाणाऱ्या जगाला भारतीय संस्कृतीच तारील. कारण जगातील अतिप्राचीन संस्कृती नष्ट झाल्या, तरी ती अजून तगून राहिली आहे, असे विचार गव्हर्नर जनरल राजगोपाळाचार्य यांच्यापासून तो सरसंघचालक गोळवलकरांपर्यंतचे सार्वजनिक महत्त्वास पावलेले लोक व्यक्त करीत आहेत. भारतीय संस्कृतीची खास वैशिष्ट्ये कोणती? आजतागायत कोणत्या गुणवैशिष्ट्यांमुळे ती जगली आहे? बरे, दुसरे असे की, युरोपियन वैज्ञानिक संस्कृतीपुढे ती पराभूत झाली नाही, हे खरे आहे काय? झाली असल्यास ती का झाली? जिच्या पुढे ती पराभूत झाली, तिच्याहून ती श्रेष्ठ कशी? पाश्चात्त्य संस्कृतीला ती कशी तारणार? या सर्वांचा विचार करता तिच्या पुनरुद्धाराची किंवा पुनरुज्जीवनाची भाषा बरोबर आहे काय? व ती तशी असली तर ती कितपत? पुनरुद्धार किंवा पुनरुज्जीवन कसे करणार?**

**उत्तर :** तुम्ही प्रश्नांची एकदम सरबत्तीच सुरू केलीत. हे प्रश्न कसले? आक्षेपच म्हटले पाहिजेत. माझ्या मागील उत्तरांवरून निघणारे निष्कर्षच जणू काय आक्षेपांच्या रूपाने तुम्ही मांडत आहात असे वाटते. माफ करा, मी जरा माझ्याकडे मोठेपणाची भूमिका घेऊन बोलतो. निदान तुम्ही ती तशी मला दिली आहे, असे गृहीत धरून मी बोलतो.

विज्ञान जडवादी नाही किंवा अध्यात्मवादीही नाही. जडवाद किंवा अध्यात्मवाद हे तत्त्वज्ञानाच्या प्रांतांतले विचार आहेत. विज्ञानाची काही एक संशोधन पद्धतीची मूलभूत गृहीत कृत्ये असतात व संशोधनास मार्गदर्शक आणि संशोधनाची अंगभूत अशी तत्त्वे असतात. त्यांच्या अनुसाराने विज्ञानाचे संशोधन चालते. त्यात आध्यात्मवादाच्या मुख्य प्रमेयांचा किंवा धर्मातील ईश्वर, अदृष्ट, पाप-पुण्य, कर्मविपाक इत्यादी कल्पनांचा काही उपयोग नसतो. ईश्वरभक्त, पापपुण्ये किंवा अदृष्ट मानणारा वैद्यसुद्धा रोगाचे निदान ठरवताना ईश्वराच्या अवकृपेने रोग झाला व कृपेने, आराधनेने बरा होईल, असे विचार मांडत नसतो व तसे विचार करीत नसतो. तसे तो करू लागला तर त्यास धार्मिक लोकही सांगतील की, तुम्हांस हे निदान सांगण्यास बोलाविले नाही. त्याकरिता देवळातला हरदास, पुराणिक किंवा एखादा गोसावडा बोलाविला असता. रोगाची भौतिक उपपत्ती जो जाणतो किंवा तार्किक उपपत्ती जाणतो, तोच वैद्य किंवा डॉक्टर होय. तसेच विज्ञानाचे आहे. ईश्वर, मोक्ष, बंध इत्यादी कल्पनांचा विज्ञानाच्या संशोधनाला काहीही उपयोग नाही. आस्तिक असला, म्हणजे तो काही त्या कारणास्तव संशोधनात भर घालू शकतो व नास्तिक असला तर त्यात कमी पडतो, असे यत्किंचितही नाही. स्वयंपाक बिघडला व आस्तिक नवरा रागावला, तर 'स्वयंपाक तुमच्या पूर्वकर्माने बिघडला' हे आस्तिक्यशास्त्राप्रमाणे

संपूर्णपणे खरे असलेले उत्तर देऊन बायकोची सुटका कोणताही आस्तिकशिरोमणी करील काय? माणसाने प्रत्येक व्यवहारात व विचारात आस्तिक्यशास्त्राची उपपत्ती उपयोगात आणावयाची ठरविली, तर त्याला कृष्ण, ख्रिस्त, महंमद व आद्य शंकराचार्य सुद्धा वेड्याच्या रुग्णालयांत बरा होईपर्यंत डांबतील.

विज्ञान हे सृष्टीचे यथार्थ ज्ञान अथवा सत्य प्राप्त करून देते. मनुष्यप्राण्याच्या अस्तित्वाचा, सृष्टीचे यथार्थ ज्ञान हा आधार आहे. विज्ञान संपूर्णपणे मालवा, माणूसच समूळ नष्ट होईल. या भूलोकांतील मानवाच्या जीवनाचे अपरिहार्य साधनच विज्ञाननिष्ठ आहे.

भारतीय व पाश्चात्त्य यांच्यात गेल्या चारशे वर्षांत जो फरक पडला तो एकदाच की, भारतीय हे विज्ञानात मागे पडले, पाश्चात्त्य विज्ञानात पुढे गेले. भारतीय विज्ञानात मागे पडले, कारण त्यांची अध्यात्मवादी प्रवृत्ती फार खोल होती व पाश्चात्त्यांची फार उथळ होती, म्हणून नव्हे.

भारतीयांपाशीदेखील एक प्रकारचे विज्ञान हजारो वर्षे आहे. विज्ञानाची मात्रा जितकी अधिक तितकी अध्यात्माची मात्रा कमी, असे जर समीकरण मानावयाचे असेल, तर कातकरी, गोंड, मध्य आफ्रिकेतील नीग्रो व मध्य ऑस्ट्रेलियातील झुलु बंटु अध्यात्मात फार श्रेष्ठ होत, असे सिद्ध होते. मग आद्य शंकराचार्य, बुद्ध, ख्रिस्त, महात्मा गांधी यांना अध्यात्माच्या पूर्तीकरिता त्यांच्यात जन्म घेतला पाहिजे.

- दुसरे असे की, तात्त्विक जडवाद हा नैतिक अधःपातास अधिक कारण होतो किंवा तात्त्विकदृष्ट्या अध्यात्मवादी हा नैतिकदृष्ट्या अधिक चांगला असतो, या दोन्ही विधानांचे समर्थन करण्यास काडीचाही आधार नाही. ईश्वरश्रद्धा व परलोकशरणता असलेले लोक नैतिकदृष्ट्या अधिक सकस असतात, यास अजून प्रमाण सापडावयाचे आहे. आणखी असे की, पाश्चात्त्य देशांत ईश्वरश्रद्धा व परलोकवाद हिंदुस्थानपेक्षा विज्ञानाच्या वाढीमुळे कमी झाला आहे, असेही नाही. आज मोठमोठे विज्ञानवेत्ते अध्यात्मवादी आहेत. कामगारपक्षात ख्रिश्चन समाजवादी कामगारांचा मोठा पक्ष आहे.

विज्ञाननिष्ठेमुळे इतका परिणाम मोठ्या प्रमाणात झाला आहे, की मूर्खपणाच्या, भोळ्या भावाच्या लोकभ्रमात्मक उपपत्तींचा निरास झाला आहे. जादूटोणा, मंत्रतंत्र, भुतेखेते, जागृत दैवतस्थाने, बुवाबाजी आणि अन्य खुळचटपणाच्या विश्वविषयक व सृष्टिघटनाविषयक समजुती यांना ओहोटी लागली आहे. भारतीय संस्कृतीतील म्हसोबा, बिरोबा, जागृत ज्योतिर्लिंगे, बोवालोकांची भोळ्या लोकांस फसवून लुबाडणारी धर्मपीठे, मंदिरे, तीर्थमाहात्म्य, पोथीमाहात्म्य, शनीमाहात्म्य यांची प्रस्थे विज्ञाननिष्ठेमुळे ढासळून पडतील. हीच जर अध्यात्मवादी संस्कृतीची लक्षणे असतील, तर ती मानवी आत्म्याच्या दैन्याची अवलक्षणे होत, हे सांगण्यास विशेष संस्कृतिविशारदांची गरज नाही.

पाश्चात्त्य जगाचा जडवादी विज्ञाननिष्ठेमुळे अधःपात झाला, म्हणे ! तुमचा गेल्या हजार वर्षांचा अधःपात व्हावयास जडवादी विज्ञाननिष्ठा कारण नाही, हे तरी खरे की नाही? जे आंधळे

नसतील त्यांना गेल्या हजार वर्षांचा भारतीय इतिहास काय दाखवीत आहे ! युद्धे, बेबंदशाही, कारस्थाने, कुटिल कारवाया, भोंदूपणा, व्यभिचार, ढोंगधत्तुरा यांच्यामुळे राज्यसिंहासने व धर्मपीठे नष्टचर्यांनी ग्रासलेला इतिहास आर्त करुणस्वराने तुम्हास सांगत आहे. अशोक, गुप्त, हर्षवर्धन इत्यादिकांच्या इतिहासाची स्वप्ने पाहत भारतीय संस्कृतीचे गुणगान करावयाचे असेल, तर त्यास प्रत्यवाय नाही. तसा थोर इतिहास प्रत्येक संस्कृतीला लाभला आहे. भारतीय वैशिष्ट्य म्हणून काहीतरी असेल; परंतु आजच्या पाश्चात्त्य जगाने त्यापासून काय शिकावयाचे हे मात्र कोणी सांगत नाही. वैराग्य, त्याग इत्यादी गोष्टी प्रत्येक धर्मात आहेत. ख्रिस्ताची, प्लेटोची, संत फ्रान्सिस असिसीची अध्यात्मिक परंपरा पाश्चात्त्यांनाही लाभलेली आहे.

भारतीय संस्कृती गेल्या हजार-बाराशे वर्षांच्या इतिहासात जीर्णावस्थेस किंवा जरठावस्थेस पोहोचली आहे. आजचे भारतीय नागरिक जीवन पाहा व पाश्चात्त्य नागरिक जीवन पाहा. आत्मसंभावितत्व वा सांस्कृतिक मिथ्याभिमान ही आसुरी संपत्ती होय. राजाजी व गोळवलकर यांनी ती वाढविण्यास मदत करण्याचे सोडून पाश्चात्त्य माणसांत जाऊन दोन, तीन वर्षे राहावे. त्यांना म्हणावे, ‘इंग्लंडांत जा, व्यथित दुर्दैवी फ्रान्समध्ये जा, नव्हे मृत्युग्रस्त जर्मनीत जा आणि तेथील शेतकऱ्यांत, व्यापाऱ्यांत, मजुरांत आणि गरीब मध्यमवर्गीयांत राहा, अनुभव येईल की, तेथील माणूस अधिक शीलसंपन्न, अधिक नम्र, अधिक कनवाळू, मनाने धीर आणि नेकीचा दिसेल. चंद्रगुप्ताच्या आणि रामाच्या राज्यातला नागरिक हिंदुस्थानात राहिला नाही. विज्ञाननिष्ठा ही एक मानवी आत्म्याची धन्यता आहे, ती एक दैवी संपत्ती आहे. त्याचा धिक्कार करणारे अध्यात्माच्या वाऱ्यासही राहण्यास अपात्र आहेत. हिंदुस्थानची संस्कृती तुम्ही म्हणता त्याप्रमाणे खरोखरच पराभूत आहे. विज्ञानाचा अधिक्षेप हे त्याच पराभूत मनावृतीचे अवलक्षण आहे.’

पाश्चात्त्य लोक युद्धपिपासू आहेत, भारतीय नाहीत, असे जर कोणास म्हणावयाचे तर या तुलनेस आधार नाही. सत्याग्रहाची चळवळ ही निःशस्त्राचे राजकारण होते. शस्त्र हाती आल्याबरोबर आम्ही ते पाश्चात्त्यांप्रमाणेच चालविण्यास सज्ज आहोत. म. गांधी नसतील, तसे अनेक पाश्चात्त्य नाहीत. म. गांधींच्या युद्धविरोधी अनुयायांच्या संख्येपेक्षा कितीतरी पटीने अधिक युद्धविरोधी पाश्चात्त्य देशांत आहेत.

प्राचीन भारतीय संस्कृतीने अगोदर आजच्या भारतीयाला तारावे. विज्ञाननिष्ठेचा अव्हेर करू नये. वैज्ञानिक जीवनसाधनांचाही अव्हेर करू नये. नैतिक अधःपाताचा विज्ञानाशी व यांत्रिक उद्योगधंद्यांशी संबंध बांधणे हे बादरायणसंबंध बांधण्यासारखे आहे. पाश्चात्त्य कंबरेइतके रुतले असतील, तर भारतीय गळ्याइतके बुडले आहेत. गळ्याइतके रुतलेला कंबरेपर्यंत रुतलेल्याला कसा उद्धरू शकेल? मोतीबिंदू होऊन मंददृष्टी झालेल्यास दृष्टी ठार झालेला अंध कसा मार्गदर्शक होईल?

प्राचीन भारतीय संस्कृतीची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. हजारो वर्षे ती जगली, नव्हे तिने येथील मानवकुल जगविले, हेच त्याचे एक प्रत्यंतर आहे. सर्वच चिरजीवन हे प्रशस्त असते असे नाही; परंतु चिरजीवन हेही एक असे मूल्य आहे की, ते एक प्रशस्ततेचे लक्षण आहे.

प्राचीन भारतीयांच्या समकालीन संस्कृतीमध्ये - उदाहरणार्थ, इजिप्त, सुमेर, बाबिलोन, ग्रीक, रोम इत्यादिकांच्यामध्ये गुलामगिरीची संस्था फार जबरदस्त होती. ती भारतवर्षात अत्यल्प प्रमाणात होती. शूद्र येथे तेव्हापासून आहे. परंतु शूद्र म्हणजे त्यांच्या अर्थाने दास नव्हे. हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील दासमूलक अशा सर्व संस्कृती कालवश झाल्या, याचे कारण दाससंस्था होय.

हिंदू संस्कृती त्या कालप्रभावातून शिरसलामत कशीबशी सुटली, याचे कारण दाससंस्थेचा प्रचंड पिरॅमिड येथे नव्हता, तसा असता तर त्या पिरॅमिडवर आधारलेली संस्कृती जमीनदोस्त झाली असती. पश्चिमेतील पुरातन संस्कृतीच्या थडग्यांप्रमाणे येथेही संस्कृतीचीच थडगी सापडली असती. तात्पर्य, दाससंस्थेचा अभाव एका मानवी मूल्याचा उत्कर्ष होय.

दुसरे वैशिष्ट्य म्हणजे 'सर्वधर्मी समानत्व' हे होय. प्राचीन वैदिक कालापासून विविध प्रकारच्या धर्मश्रद्धांचे पूर्ण स्वातंत्र्य धार्मिक तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून भारतीयांनी मान्य केले आहे. भारतीयांची म्हणजे हिंदूंची परधर्मसहिष्णुता ही फार खोल अशा धार्मिक अनुभूतीचे बाह्य आविष्करण होय. विश्वाचे परम सत्य हे अप्रमेय आहे, सर्व संकेतांच्या व वाङ्मयाच्या आवाक्याबाहेर आहे, सर्व धर्मपीठे, सर्व धर्मग्रंथ, धर्मानुष्ठाने त्याची सूचक आहेत, वाचक नाहीत, असा त्या खोल धार्मिक अनुभूतीचा अर्थ आहे. हे सर्वधर्मी समानत्व आजच्या सर्व संस्कृतींना आजही मार्गदर्शक आहे. राष्ट्रवाद वा राष्ट्रीयत्वाचा अभिनिवेश हा आजच्या भारतीयांना व अभारतीयांना बाधलेला भयंकर शाप आहे. तो या वृत्तीने कदाचित उतरेल. प्राचीन भारतीय संस्कृतीचे तिसरे वैशिष्ट्य 'निष्काम कर्मयोग' हे तत्त्व होय. या तत्त्वाच्या अंगीकाराने आध्यात्मिक संस्कृती व आधिभौतिक संस्कृती हा विरोध मिटतो. याचा विस्तार केल्याशिवाय मी काय म्हणतो, हे नीट समजणे कठीण आहे; परंतु वेळ फार लागेल म्हणून नुसता निर्देश करून पुनः केव्हा तरी गाठ पडली म्हणजे विशेष उलगडा करू. हे मात्र ध्यानात ठेवले पाहिजे की, पाश्चात्त्य संस्कृतीतील वैज्ञानिक दृष्टिकोन ज्यांच्या जीवनात उतरलेला असतो, त्यांच्यात निष्काम कर्मयोगाच्या उच्चतम संस्कृतीची भूमिका परिपक्व झालेली असते. वैज्ञानिक दृष्टिकोन हा निष्काम कर्मयोगाच्या संस्कृतीचा अग्रदूत आहे. त्या सूर्याचा तो उषःकाल आहे. हा उषःकाल आज भारताच्या क्षितिजावर झालेला नाही. तो पश्चिम संस्कृतीच्या क्षितिजावर झालेला आहे.

होय, तुमचा एक मुद्दा विसरलो होतो, त्याची मला आताच योग्य क्षणी आठवण झाली. प्रश्न असा की, भारतीयांचा अधःपात व पराभव का झाला? भारतातील भिन्न भिन्न जातींच्यामध्ये परस्परांत अंतर राहिल्यामुळे सामाजिक दौर्बल्य पराकाष्ठेस गेले, सामाजिक आरोग्य राहिले नाही, म्हणून भारताचा अधःपात झाला. सांस्कृतिक समरसता न आल्यामुळे भिन्न भिन्न सामाजिक गटांच्यामध्ये खिंडारे राहिली, जिव्हाळा राहिला नाही, गृह्य संस्कृती विसदृश राहिली, म्हणून भारताचा अधःपात झाला. भिन्न भिन्न जमातींच्या जीवनक्रमात व गृह्य संस्कृतीत युरोपातील भिन्न भिन्न राष्ट्रांच्या जीवनक्रमांपेक्षा व गृह्य संस्कृतीपेक्षा अधिक अंतरे आहेत. त्यामुळे येथील सांस्कृतिक जीवन डबघाईस आले. कसलाही तजेला राहिला नाही. भिन्न भिन्न जातींतल्या नागरिकांत व्यावसायिक कोरड्या संबंधांपेक्षा अधिक जिव्हाळ्याचा संबंधच या जातिभेदाने ठेवला नाही. जातिभेद ही हिंदी संस्कृतीला लागलेली महाव्याधी आहे, त्यामुळे भारतीय संस्कृती

पराभूत झाली आहे.

पराभवाचे दुसरे तितकेच महत्त्वाचे कारण म्हणजे विज्ञानात्मक दृष्टिकोनाने परिपूत, बौद्धिक स्वातंत्र्याने युक्त व श्रद्धाजाड्यापासून मुक्त अशी शैक्षणिक व ज्ञानविषयक परंपरा लुप्त झाली, हे होय. त्यामुळे आर्थिक दौर्बल्यही उत्पन्न झाले. पाश्चात्त्य संस्कृती भारतीयांस दोन गोष्टी शिकवीत आहे. तो त्या शिकला नाही, तर त्याला भविष्यकाळ जिंकता येणार नाही. त्या म्हणजे मानवी मूलभूत हक्क व विज्ञाननिष्ठा.

जगातील प्रत्येक संस्कृतीने दुसऱ्या संस्कृतींपासून शिकण्यासारख्या मोठमोठ्या गोष्टी असतात. भारतीय संस्कृती गुरू व इतर संस्कृती शिष्य होत, ही व्यर्थ घमेंड आहे. ही घमेंडखोरी वाढवून भारतीयांचा सांस्कृतिक संसार यत्किंचितही न सुधारता आणखी मोठ्या आपत्तीस आव्हान देण्याची तरतूद मात्र त्यामुळे चांगलीच होईल.

**प्रश्न : मागील प्रश्नांची सर्व उत्तरे संपण्याच्या अगोदर मागील प्रश्नांतीलच एका मुद्यास धरून अनुषंगाने उत्पन्न होणारा मुद्दा अगोदर मांडतो. दोन्ही मुद्यांचे एकदमच उत्तर मिळाले म्हणजे ठीक होईल. भारतीय संस्कृतीचा पुनरुद्धार किंवा पुनरुज्जीवन करण्याचा मुद्दा मागील प्रश्नांत विचारला होता. पुनरुज्जीवन हे मुख्यतः शिक्षणाद्वारेच होते. शिक्षणाला भारतीय वळण लावावे, त्यात, वाङ्मयात व कलेत भारतीय मूल्यांची स्थापना करावी, असा आग्रह डॉ. राधाकृष्णन, आ. रा. देशपांडे यांच्यासारखे लोक करीत आहेत. मला वाटते, या घोषणांची परीक्षा केली पाहिजे.**

**उत्तर :** चर्चा बरीच लांबू लागली आहे. तुम्ही कदाचित लवकरच कंटाळू लागाल, अशीही भीती वाटू लागली आहे. तुमचा प्रश्न असतो थोडक्यात; परंतु मला उतर विस्ताराने दिल्याशिवाय समाधान वाटत नाही. तुमच्या प्रश्नांच्या स्वरूपावरून बैठक कितीही लांबली तरी तुमची तयारी आहे, असे मानावयास हरकत नसावी. तुम्ही विषयच फार भानगडीचा व लोकांच्या अभिमानबुद्धीशी संबद्ध असा उपस्थित केला आहे. त्यामुळे मला सावधपणा राखावासा वाटतो; परंतु साधत मात्र नाही. माझ्यावर लोक नाराजही होतात. त्यातल्या त्यात समाधान एवढेच की, लोकांच्या नाराजीची सवय अता अंगी मुरू लागली आहे...

पुनरुज्जीवन या शब्दाचे दोन भावार्थ आहेत. म्हणून समाजसुधारक आणि रूढीनिष्ठ व सनातनी हे दोघेही भिन्नार्थांनी हाच शब्द वापरतात. जुन्या संस्कृतीत कसलाही महत्त्वाचा फरक न करता कालानुरूप जुजबी वरवरची साफसफाई करून त्याच जुन्या लव्याजम्यासह किंवा अंगोपांगासह सर्व कर्मकांड, चालीरीती, समजुती व पुराणकल्पना यांची स्थापना (revival) करण्याचा प्रयत्न म्हणजे पुनरुज्जीवन असा अर्थ सनातन्यांचा असतो. यास पुनरुद्धार हा शब्द अधिक समर्पक अर्थाचा आहे.

जुन्या संस्कृतीतील चिरंतन व विश्वव्यापक रहस्यांचा वा मूल्यांचा विवेकपूर्ण अर्थ समजावून घेऊन त्यांनी नव्या परिस्थितीच्या शरीरासह पुनर्जन्म (renaisance) होणे म्हणजे पुनरुज्जीवन

होय, हा दुसरा भावार्थ होय. पहिल्या अर्थाने पुनरुज्जीवनाची चळवळ जेव्हा सुरू होते व ती यशस्वी होते, तेव्हा प्रगतीच्या आध्यात्मिक व आधिभौतिक शक्तींचा पराभव होतो. समाज निरुद्धगतिक होतो व जीवनाला साचलेल्या पाण्याच्या डबक्याचे स्वरूप प्राप्त होते. दुसऱ्या अर्थाने जेव्हा पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू होते व ती यशस्वी होते, तेव्हा समाज नव्या उच्चतर ऐतिहासिक युगात पदार्पण करतो. इतिहासाची पुनरावृत्ती न होता अभूतपूर्व असे नवजीवन लाभते. पश्चिम युरोपात फ्लॉरेन्स शहरात डांटे, लिओनार्दो द विंची, मायकेल अँजेलो, मॅकीव्हेली इत्यादी मानववादी, बुद्धिवादी व वास्तववादी कलाकार, विज्ञानवेत्ते व समाजवेत्ते जन्मले व त्यांनी पुनरुज्जीवनाची चळवळ निर्मिली. त्यातून १७ व्या शतकाच्या अखेरीस नवा युरोप जन्मला. त्या चळवळीने पुराण संस्कृतींच्या विरुद्ध मर्यादांचा नाश केला. बुद्धिस्वातंत्र्याची नौबत झडू लागली. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मानवी मूलभूत हक्कांची द्वाही फिरविणारी उन्नततर अध्यात्मपूर्ण संस्कृती उदयास येऊ लागली. आधिभौतिक सुधारणा वाढीस लागली.

प्रत्येक संस्कृतीतील चिरंतन मूल्यांत विश्वव्यापकता असते. भारतीयांची भगवद्गीता ही सर्व मानवांच्या परमार्थाची सूचक असेल, तरच ती भारतीय संस्कृतीची श्रेष्ठ संपत्ती ठरते. इंग्लिश संस्कृतीतील शेक्सपिअर हा नुसता इंग्रजांचाच नाटककार नाही, तो सर्व सुधारलेल्या माणसांचा असतो. सॉक्रेटिसाचे व्यक्तित्व सर्व सुसंस्कृत जगाचा अमर ठेवा असतो. सुसंस्कृतीतील चिरंतन मूल्य हे सर्वव्यापी मानवी संस्कृतीचे शाश्वत वैभव असते. भारतातील गंगा हिंदूलाच स्वच्छ करीत नाही. जे भारतीय चिरंतन मूल्य भारतीय व अभारतीय असा अहंभावकारक भेद सूचित करीत असेल ते भिकार आहे. ते भारताला बेकार बनवील.

शिक्षणाला भारतीय वळण लावावे, जरूर लावले पाहिजे; परंतु वाल्मीकीबरोबर व कालिदासाबरोबर होमर व एस्किलसही शिकवले पाहिजेत. भास्कराचार्यांच्या गणिताबरोबर अद्ययावत गणित भारतीयांना आले पाहिजे. आयुर्वेदाबरोबरच आजचे सर्व आरोग्य व रोग यासंबंधाचे शास्त्र व तंत्र भारतीयांनी शिकले पाहिजे. भारताच्या भौगोलिक मर्यादित जे आधिभौतिक व आध्यात्मिक ज्ञान पिकते, तेच जर येथील बालकांना द्यावयाचे राधाकृष्णन यांच्या व आ. रा. देशपांडे यांच्या भारतीय शिक्षणशास्त्राच्या व कला-वाङ्मयाच्या कार्यक्रमात ठरावयाचे असेल, तर अभारतीय प्रदेशात उगवणाऱ्या चंद्रसूर्यांना व ताऱ्यांना भारतात उगवण्याची बंदी करावी लागेल, भारताबाहेरून येणाऱ्या पर्जन्यावर बहिष्कार घालावा लागेल. अशाने भारतीय संस्कृती श्वासोच्छवास तरी करू शकेल काय[१]?

**संदर्भ :**

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मुद्दाम विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी संगतवार वरील लेखांत लिहिली आहेत.

**(साप्ताहिक 'मौज', मुंबई, दिवाळी अंक, १९८९, पृ. ४५ ते ५१)**

ooo

४१

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित समाज

## मुलाखतकार - **सतीश कुलकर्णी**

मध्ये जेथे सती जाण्याचा विधी सांगितलेला आहे, तेथे तो विकल्पाने सांगितला आहे, म्हणजे पतिमरणानंतर संयमाने जगणे अथवा सती जाणे असा तो विकल्प आहे. सतीचे एवढे मोठे माहात्म्य ही सामान्यांची अविवेकी भावना आहे. धर्मग्रंथांमध्ये अशा तऱ्हेची अतिरेकी भावना कोठेही व्यक्त झालेली नाही.''

प्रातःस्मरणीय परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर  हा माझा अत्यंत आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय. गेली दहा वर्षे मी ह्या विषयाच्या छायेत आहे. डॉ. आंबेडकर हे विश्वातील पांडित्याच्या नि सहृदयतेच्या हिमालयाचे उत्तुंग शिखर होते, अशी माझी धारणा असल्यामुळे साहजिकच मी महाराष्ट्रातील एक प्रकांड पंडित व राष्ट्रीय कीर्तीचे एक थोर विचारवंत माननीय तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांची बाबासाहेबांच्या कार्याबद्दल, तत्त्वज्ञानाबद्दल, ग्रंथांबद्दल काय मते आहेत हे जाणून घेण्यास अनेक वर्षांपासून उत्सुक होतो. त्यांच्या सहवासात राहूनही तसा योग पूर्वी कधी आला नाही. पण तो योग आला माझे स्नेही प्रा. गंगाधर पानतावणे व 'अस्मितादर्श ह्यांच्यामुळे. आपल्या लेखणीने, वाणीने तर्कतीर्थांनी विषम सामाजिक रचनेवर प्रखर प्रहार केल्याचे मला विदित होते. डॉ. आंबेडकरांच्याबद्दल तर्कतीर्थांना विशेष आपुलकी वाटते. त्यांच्या निवासस्थानी गेल्यावर आपल्याला प्रथमदर्शन घडते ते प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या भव्य प्रतिमेचे! बाबांच्या भव्य छायाचित्राकडे पाहात असतानाच माझ्या मुखातून शब्द बाहेर पडले, ''किती सुंदर फोटो आहे हा!''

शास्त्रीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व आपली प्रत्यक्ष भेट केव्हा झाली? कोणत्या निमित्ताने ? आपले त्यांच्याबद्दल प्रथमदर्शनी काय मत झाले?

'माझे हिंदुधर्माची समीक्षा' हे पुस्तक १९४२ साली प्रसिद्ध झाले. कै. चित्रे हे डॉ. आंबेडकरांचे सहकारी व मित्र होते. ते माझेही मित्र होते. त्यांनी हे पुस्तक वाचले व डॉ. आंबेडकरांना ते

वाचावयास दिले. वाचल्यावर त्यांनी चित्रे ह्यांस सांगितले की, ब्राह्मणांच्या पिळवणुकी तंत्राचे इतके सप्रमाण विवरण हा पहिलाच ब्राह्मण करीत आहे. ह्याला भेटलेच पाहिजे. मला निरोप चित्रे ह्यांनी महाड येथील गणेशोत्सवाच्या माझ्या व्याख्यानाच्या अखेरीस दिला. माझ्या व्याख्यानात परंपरागत हिंदू धर्मावर विशेषतः जातीसंस्थेवर मी सडकून टीका केली होती. ही टीका ऐकून चित्रे हे फार खूश झाले. महाड येथील पांढरपेशा वर्गाला, प्रतिष्ठित वर्गाला माझे भाषण मुळीच आवडले नाही. परंतु मी धर्मशास्त्राचे आधार देऊन माझे मुद्दे सिद्ध केले होते. त्यामुळे रागावलेल्या प्रतिष्ठित मंडळींना माझे भाषण जरी आवडले नाही, तरी गप्प बसावे लागले. त्यानंतर चित्रे ह्यांच्या निरोपावरून मी बाबासाहेबांची भेट घेतली; ती त्यांच्या मुंबई येथील निवासस्थानी. पहिल्याच भेटीत माझे व बाबासाहेबांचे संभाषण खूप रंगले. बाबासाहेब म्हणाले, ''मी वेद व स्मृतिशास्त्र ह्यांची इंग्लिश भाषांतरे वाचली आहेत. महाविद्यालयीन शिक्षणात मी संस्कृत घेतले नव्हते. त्यामुळे प्रत्यक्ष संस्कृत प्रथांवरून मी अध्ययन करू शकलो नाही. आता वर्णव्यवस्थेबद्दल तुमचे व माझे एकच मत असल्यामुळे वारंवार भेटत जाऊ.'' ''मी 'मनुस्मृति' जाळण्याचा समारंभ केला. याबाबतीत तुमचे मत काय झाले?'' मी त्यांना सांगितले की, ''ऐतिहासिक दृष्टीने आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीच्या सामाजिक व धार्मिक इतिहासाचे 'मनुस्मृति' हे उत्कृष्ट साधन आहे. म्हणून त्यातील काही भाग कधीही जळणार नाही असा आहे.'' अर्थात असा भाग फार थोडा आहे. मी लगेच कधीही जळणार नाही. असा भाग दाखवून दिला. त्याबरोबरच ते म्हणाले की, ''हा भाग मनुस्मृतीतील जातीसंस्थेच्या विचारांशी विसंगत आहे.'' मी हे मान्य केले. ह्या चर्चेनंतर डॉक्टर साहेबांची व माझी मुंबईत भेट वारंवार होत होती. दिल्लीस ते घटना समितीवर गेले. मंत्री झाले तेव्हा मी त्यांच्या अभिनंदनाप्रीत्यर्थं लोकसभेच्या इमारतीत गेलो होतो. माझ्या धर्मकोशाचे खंडही त्यांना भेट म्हणून त्यावेळी दिले.''

शास्त्रीजी बाबासाहेबांच्या आठवणी सांगत असताना अगदी रंगून गेले होते. बाबासाहेबांच्या ग्रंथनिर्मितीने जगातील अनेक विचारवंतांना पुनर्विचार करण्यास चालना दिली आहे. मी शास्त्रीबुवांना म्हणालो,

''महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, मानवेंद्रनाथ रॉय व डॉ. आंबेडकर ह्या विचारवतांच्या लेखनशैलीत आपणास कोणाची शैली विशेष आकर्षक वाटली? डॉ. आंबेडकरांच्या कोणत्या ग्रंथातील विचार आपणास वादग्रस्त वाटतात? त्यांचा कोणता ग्रंथ आपणांस विशेष आवडतो? का ?''

"शास्त्रीबुवा संथपणे सांगत होते, ''ह्या मोठ्या मंडळींपैकी प्रत्येकाच्या लेखनशैलीची काही वैशिष्ट्ये आहेत. बाबासाहेब हे उत्तम विवादपटु असल्यामुळे पुराव्यांची मांडणी करण्यात त्यांची लेखणी खूप धारदार आहे. ह्या सर्व मंडळींप्रमाणेच स्वतःच्या विचारांची नितांत निष्ठा त्यांच्याही लेखनात पूर्णपणे दिसून येते. त्यांच्या लेखनात व भाषणात असलेला कडवटपणा हा अन्यायाविरुद्ध बंड करणाऱ्यास अत्यंत शोभून दिसणारा आहे. प्रत्येकाचे निराळे वैशिष्ट्य

असल्यामुळे तुलनात्मक मूल्यमापन करणे मात्र कठीण आहे. त्यांचा बौद्ध धर्मावरील ग्रंथ मला अत्यंत आवडला आहे. विलक्षण बंडखोर मनाला भगवान बुद्धाचा धर्म सर्वश्रेष्ठ वाटला. हे एक भावनांच्या विरोधविकासाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. बुद्ध हा जगातील मानवी विश्वातील पहिला सर्वश्रेष्ठ विश्वशांतीचा प्रेषित आहे. ह्या प्रेषिताशी तन्मय होणे हे बंडखोर वृत्तीची उत्कृष्ट परिणती दर्शित करते.

बाबासाहेबांचे सर्वच ग्रंथ वादग्रस्त व प्रक्षोभक आहेत. विचारांना चालना देण्यास प्रक्षोभकता व वादग्रस्तता ही आवश्यक असते. त्यांचे बहुतेक निष्कर्ष मला मान्य आहेत. परंतु काही उपपत्त्या मला पटत नाहीत. पटत नसल्या तरी विचारार्ह वाटतात. उदाहरणार्थ, अस्पृश्यतेच्या उत्पत्तीची त्यांची मीमांसा संपूर्ण अर्थाने मला मान्य नाही. परंतु त्यातील काही महत्त्वाचा युक्तिवाद मला मान्य आहे. उदाहरणार्थ, बौद्ध धर्मीय हिंदुंना जो बहिष्कार पडला त्यातून अस्पृश्यता आली हे कै. विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले असले, तरी काही प्रदेशातील बौद्ध हे अस्पृश्य बनले, सर्वत्र नव्हे. अशी माझी माहिती आहे. गोमांसभक्षण हेही अस्पृश्यतेचे कारण बाबासाहेबांनी दाखविले आहे, परंतु अस्पृश्यतेचे तेवढेच एक कारण पुरे पडत नाही. अस्पृश्यतेची मीमांसा फार जटिल, गुंतागुंतीची आहे. बाबासाहेबांचे विचार ह्याबाबतीत फार महत्त्वाची भर आहे, ह्यांत शंका नाही, परंतु ती मीमांसा अपुरीच राहाते.''

''शास्त्रीजी, आपण मघाशी म्हणालात की युद्ध हा जगातील मानवी विश्वातील पहिला सर्वश्रेष्ठ विश्वशांतीचा प्रेषित आहे. आपल्या मताशी मी सहमत आहे. मग असे सांगा, डॉ. आंबेडकरांनी दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मात राहून आपल्या समाजाचा उद्धार होणार नाही, असा त्यांनी अखेरीस निर्णय घेतला. बाबासाहेबांचा हा निर्णय योग्यच होता असे मला वाटते. तुम्हाला तसे वाटते का ?'' मी.

''तर्कतीर्थ तत्त्वप्रतिपादन करताना समजावून देतात. त्याचा प्रत्यय मला ह्यावेळीही आला. ते लगेच म्हणाले, ''बौद्ध धर्माचा स्वीकार केला हे चांगलेच झाले. परंतु अस्पृश्यतेचा प्रश्न त्यामुळे लवकर सुटेल असे मला वाटत नाही. अस्पृश्य जमातींना एक उच्च, धार्मिक व नैतिक संस्कृती निर्माण करण्याची प्रेरणा त्यामुळे मिळत आहे आणि त्यामुळे न्यूनतेची किंवा कमीपणाची भावना नष्ट होत आहे. त्याचाच परिणाम कालांतराने हळूहळू अस्पृश्य समाजाला सामाजिक प्रतिष्ठा मिळू शकेल, अशी आशा बाळगणे युक्त ठरते. अस्पृश्यतानिवारणाची समस्या केवळ एका बाजूने सुटू शकत नाही, सुटू शकणार नाही, स्पृश्य समाजामध्येही सांस्कृतिक क्रांतीची जरुरी आहे त्यासाठी सांस्कृतिक क्रांतीची गरज आहे. अस्पृश्यतानिवारणाची प्रक्रिया वेगाने वाढली पाहिजे. नाही तर तथाकथित स्पृश्य समाजातील नैतिक शक्ती वाढणार नाही.

नैतिक शक्तीनेच समाज व राष्ट्र सामर्थ्यशाली बनते. अस्पृश्यता जोपर्यंत राहील तोपर्यंत भारतीय राष्ट्रीयदृष्ट्या दुर्बलच राहील. हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट असलेले सत्य स्पृश्य समाजाच्या

ध्यानात जितक्या लवकर भरेल तितक्या लवकर अस्पृश्यता निवारणाची समस्या सुटू शकेल.''

''शास्त्रीजी, दुर्दैवाने स्पृश्य समाज अद्यापही डॉ. आंबेडकरांना केवळ अस्पृश्यांचे नेते मानतो व दलितांतही बाबासाहेब आपले उद्धारकर्ते 'महात्मा' होते ह्या भावनेशिवाय दुसरी भावना नाही. अस्पृश्यतानिवारण्याच्या कार्याव्यतिरिक्त आंबेडकरांचे दुसरे कोणते कार्य तुम्हाला विशेष उल्लेखनीय वाटते?'' माझी नकळत शंका.

''वा! शास्त्रीबुवा म्हणाले, तुमचा प्रश्न चांगला आहे. भारताची राज्यघटना व लोकशाही राज्य हे त्यांच्या कार्यापैकी एक महान कार्य आहेच; परंतु त्यापेक्षाही भारताच्या प्रबोधनयुगाचे एक थोर प्रेषित हे त्यांचे स्थान आंतरराष्ट्रीय दृष्टीने तर फारच मोलाचे आहे. भारताला सांस्कृतिक क्रांतीची गरज आहे. ह्या सांस्कृतिक क्रांतीचे एक थोर देवदूत म्हणून त्यांनी कार्य केले. आधुनिक जगाच्या इतिहासात दलित व पिळलेल्या वर्गांचा त्यांच्यातच निर्माण झालेला इतका मोठा माणूस मला दिसत नाही.''

''शास्त्रीजींच्या ह्या उत्तरातून माझा प्रश्न निर्माण झाला - 'बाबासाहेब सांस्कृतिक क्रांतीचे घोर देवदूत होते; एक मग त्यांच्यानंतर दलित समाजात तेजस्वी नेतृत्व का निर्माण होऊ शकले नाही?''

''हे पहा सतीश कुलकर्णी, महान नेता उत्पन्न होतो तो आकस्मिक रीतीनेच. अशा नेत्याविषयी भविष्य कधीच करता येत नाही. सम्राट अशोक, अकबर, लिंकन, म. गांधी अशासारखे थोर पुरुष उत्पन्न होण्याच्या अगोदर त्यांच्याबद्दल कोणालाही भविष्यवाद वर्तविता आलेला नाही. अद्वितीय नेत्यांशिवायही समाजक्रांती करू शकतो. 'अद्वितीय नेत्याने दिलेला विचार हाच खरा नेता होय.' हा विचार प्रज्वलित राहिला व त्याप्रमाणे कृती घडत राहिली म्हणजे नवा इतिहास घडू लागतो. अद्वितीय नेत्याची व्यक्तिशः प्रगतीला व क्रांतीला गरज लागतेच असे नाही. सामुदायिक शक्तींनी उठाव करावा लागतो. सामुदायिक शक्तीचा पाठिंबा नसेल तर नेता उत्पन्न होऊनही विशेष काही घडत नाही. म. गांधींचे महान नैतिक नेतृत्व भारताला मिळाले होते. परंतु गांधींच्यानंतर स्वराज्यप्राप्ती झाल्यानंतर गांधींची प्रेरणा शून्यवत् झाली. नुसत्या नेत्याने काहीही भागत नाही. सामुदायिक शक्ती वर याव्या लागतात; आणि लहान लहान माणसेच सामुदायिक शक्तींना वर आणू शकतात.''

शास्त्रीजींचा मी बराच वेळ घेतला होता. मी आवराआवर करण्याची गडबड करू लागलो. तेवढ्यात माझ्या हाती असलेला 'अस्मितादर्श' चा अंक खाली पडला. अंक उचलताना माझी त्यातील एका गाजलेल्या लेखकाच्या नावावर दृष्टी पडली. मनात चटकन विचार चमकला, 'शास्त्रीबुवांची दलित साहित्याबद्दल काय मते असतील?' हा प्रश्न विचारून पुन्हा शास्त्रीबुवांचा वेळ घ्यावा की न घ्यावा ह्या विचारात मी पडलो. तथापि, त्यांचे ह्या विषयावरील मत जाणून घेण्यास दलित साहित्याचे पुरस्कर्ते, टीकाकार उत्सुक आहेत हे मला माहीत होते. म्हणून मी शास्त्रीजींना म्हटले, ''शास्त्रीजी, माफ करा. आपला बराच वेळ घेतला. आता एक शेवटचाच प्रश्न विचारतो,

''दलित साहित्याकडे आपण कोणत्या दृष्टिकोनातून पाहता?''

''प्रश्न फारच महत्त्वाचा आहे, असे म्हणून शास्त्रीबुवा पुढे म्हणाले, 'दलित साहित्य' ह्याचा काय अर्थ ? दलितांनी निर्माण केले साहित्य एवढाच अर्थ असेल तर त्याला विशेष महत्त्व नाही. दलितांनी निर्माण केलेल्या साहित्याचा गाभा व त्यातून येणारी प्रेरणा कशी आहे हे तपासले पाहिजे. दलितांची दुःखे, कुचंबणा, गुलामगिरी, कौटुंबिक, अधःपात, विपन्नावस्था विटंबना ह्याबरोबरच दारिद्र्यातही तळपणारे सामर्थ्य, शौर्य, माणुसकी इत्यादी सर्वांगीण जीवनाचे कलात्मक शैलीचे साहित्य म्हणजेच दलित साहित्य होय. असे साहित्य काही दलितांनी निर्माण केले आहे व काही दलित निर्माण करीत आहेत हे मला माहीत आहे. परंतु उच्चवर्णीयांचे साहित्य असो वा दलितांचे साहित्य असो त्यात तारतम्य असतेच. उत्कृष्ट साहित्य हे थोडेच व मोजकेच असते. संस्कृत साहित्य हे एक जागतिक साहित्यामध्ये मोठे स्थान असलेले साहित्य आहे. ह्या साहित्याचे मूल्यमापन करताना 'ध्वन्यालोक' ह्या काव्यशास्त्रावरील उत्कृष्ट ग्रंथात असे म्हटले आहे की, संस्कृत साहित्याच्या हजारो कवींमध्ये दोन-तीनच कवी खरे कवी म्हणून आदरास पात्र आहेत.''

डॉ. आंबेडकर व दलित समाज ह्या माझ्या जिव्हाळ्याच्या विषयावरील तर्कतीर्थांची ही मुलाखत घेऊन मी घरी परतलो तेव्हा मला बाबासाहेबांच्यावरील लेखनास एक नूतन संजीवक प्रेरणा मिळाल्याचे प्रतीत झाले. शास्त्रीजींच्या सहवासात डॉ. आंबेडकर : विचार मंथनार्थ तीन तास गेल्याचे मला भानच राहिले नव्हते. माझ्या आयुष्यातील हे लाख मोलाचे क्षण मी सतत जपणार आहे.

**(अस्मितादर्श मासिक, दिवाळी, १९७३, पृ. ७३ ते ७७)**

OOO

४२

# सती प्रथेला धर्मशास्त्राचा आधार नाही

मुलाखतकार - **अनिल जोशी**

"सतीची चाल ही माणुसकीचा घात करणारी आहे. कारण अगणित निरपराध बालिका आणि महिला त्यांचे युगानुयुगे भारतीय खून पाडत होते. हे नाकारण्यात अर्थ नाही. राजस्थानमध्ये नुकतीच जी तरुण महिला सती गेली त्यापाठीमागे माणुसकीविरुद्ध असलेले असे गुन्हेगार होते. सतीचे मंदिर बांधणे म्हणजे अशा गुन्हेगारीचे मूर्तिमंत समर्थन करणे होय." - तर्कतीर्थ जोशी.

धर्मशास्त्रामध्ये सतीच्या चालीच्या संदर्भात काही आधार आहे काय आणि असल्यास ते समर्थनीय आहे काय, मी असे विचारता श्री. जोशी म्हणाले, "सतीची चाल भारतातील काही प्रदेशांमध्ये आणि काही जमातींमध्ये अतिप्राचीन काळापासून किंवा इतिहासपूर्व काळापासून हजारो वर्षे रूढ होती."

"अनिवार्य धर्म म्हणून पतीच्या मृत्यूनंतर साधेपणाने व संयमाने सतीने राहावे. अखेरपर्यंत ती एका पद्धतीने राहिली म्हणजे तिला पुत्रसंतती असो वा नसो, तिला स्वर्ग प्राप्त होतो, असे मनु इत्यादी धर्मशास्त्रज्ञांनी स्पष्टपणे सांगितले आहे. मनुस्मृती आणि याज्ञवल्क्यस्मृती या दोन स्मृतींमध्ये सतीप्रथेचा उल्लेखच नाही. केवळ वैधव्यधर्माचा उपदेश केलेला आढळतो. मनुस्मृती आणि याज्ञवल्क्यस्मृती या दोन्ही स्मृती भारतामध्ये आजपर्यंत सार्वत्रिक मान्यता पावलेल्या आहेत."

"परंतु सती जाण्याची चाल फार प्राचीन आहे, याचे उदाहरण महाभारतात आढळते. पांडवांचा पिता पंडू मरण पावल्यावर माद्री ही त्याची दुसरी पत्नी सती गेली आहे. विष्णुस्मृती यासारख्या काही स्मृतींमध्ये जेथे सती जाण्याचा विधी सांगितलेला आहे, तेथे तो विकल्पाने सांगितला आहे, म्हणजे पतिमरणानंतर संयमाने जगणे अथवा सती जाणे असा तो विकल्प आहे. सतीचे एवढे मोठे माहात्म्य ही सामान्यांची अविवेकी भावना आहे. धर्मग्रंथांमध्ये अशा तऱ्हेची अतिरेकी भावना कोठेही व्यक्त झालेली नाही."

“कुंती सती गेली नाही. वैधव्यधर्माने ती राहिली आणि तिची पूज्यता महाभारतात वारंवार वर्णिलेली आहे. वेदांमध्ये कोठेही सतीची चाल सांगितलेली नाही. उलट ऋग्वेदामध्ये पतीच्या चितेजवळ बसलेल्या स्त्रीला ‘घरी परत जा, दिराबरोबर संसार कर’ असेही म्हटले आहे.”

“पती हा देव आणि स्त्री ही त्याची भक्त असलेली दासी हा दृष्टिकोनसुद्धा प्राचीन काळी बदलत गेलेला आहे. धार्मिक विधीमध्ये सप्तपदीत स्त्री ही सखी म्हणजे विवाहाने मित्र बनते, असे स्पष्टपणे दिसते. ती भक्त आणि दासी बनते, असे हिंदू धर्मविधीवरून सूचित होत नाही; परंतु पतिव्रताधर्म हिंदू ग्रंथात वारंवार प्रशंसिलेला आहे आणि पत्नी मेल्यानंतर दुसरी पत्नी करण्याची परवानगी हिंदू धर्मशास्त्र देते. ती परवानगी वंशसातत्याकरिता दिलेली आहे.”

“एकंदर विचार करता धर्मशास्त्रामध्येसुद्धा वारंवार बदल होत गेलेला आहे आणि ते बदल ऋषिमुनींनी देश, काळ, परिस्थिती पाहून केलेले आहेत.”

“हिंदू धर्मशास्त्राकडे ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले असता सतीच्या चालीची बंदी ब्रिटिश राजवटीत करण्यात आली आणि ती धर्मशास्त्राच्या तात्त्विक भूमिकेला सोडून नाही असे स्पष्ट म्हणता येते. लॉर्ड बेंटिंगने सतीची चाल बंद करणारा कायदा ब्रिटिश राजवटीत केला. त्यावेळी राजा राममोहन रॉय इत्यादी धर्मसुधारकांनी धर्मशास्त्राचा आणि हिंदू धर्मग्रंथांचा चांगला ऊहापोह केला आहे. मी जे वरील सतीचालीचे वैकल्पिकत्व सांगितले त्याबद्दल परंपरावादी पंडितांमध्येसुद्धा मतभेद नाही व तो कधीही नव्हता.''

“सतीच्या चालीचा भयानक दुरुपयोग होत गेला आहे याबद्दल कोणताही शहाणा, समंजस मनुष्य अथवा कोणताही सज्जन मनुष्य वाद करणार नाही.''

**(केसरी, १६फेब्रुवारी, १९८०)**

○○○

४३

# धर्मांतर थांबविण्यासाठी चार शंकराचार्य एकत्र येणे अभिनंदनीय, पण आता विलंब झाला आहे

मुलाखतकार - **द. न. पटवर्धन**

जाणे असा तो विकल्प आहे. सतीचे एवढे मोठे माहात्म्य ही सामान्यांची अविवेकी भावना आहे. धर्मग्रंथांमध्ये अशा तऱ्हेची अतिरेकी भावना कोठेही व्यक्त झालेली नाही.''

(द. न. पटवर्धन यांजकडून) वाई : चार पीठांचे शंकराचार्य हरिजन कल्याणाचा कार्यक्रम आखण्यासाठी व धर्मांतरे थांबविण्यासाठी एकत्र, जमत आहेत ही घटना अभिनंदनीय आहे; परंतु आता फार उशीर झाला आहे, असे मत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी येथे व्यक्त केले.

'हरिजन आणि धर्मांतरे' या विषयावर चर्चा करताना त्यांना प्रश्न केला की फार उशीर झाला असे आपण म्हणता?

ते म्हणाले : म. गांधींनी हरिजन उद्धारासाठी आंदोलन सुरू केले तेव्हा त्यांना शंकराचार्यांनी सहकार्य केले नाही किंवा हिंदुधर्माची अस्पृश्यतेबाबतची स्पष्ट कल्पनाही दिली नाही. उलट गांधींच्या आंदोलनाला विरोध केला. संकेश्वरपीठाचे शंकराचार्य वाईला आले असताना एका सार्वजनिक सभेत अस्पृश्यतेचे समर्थन केले आणि माझा (तर्कतीर्थ जोशी) निषेध केला. सोमनाथ प्रतिस्थापनेच्यावेळी द्वारकापीठ शंकराचार्यांनी उपस्थित रहावे म्हणून विनंती केली असताना त्यांनी अट घातली होती की, अस्पृश्यांचा मंदिर प्रवेश होता उपयोगी नाही. हा इतिहास १९५१ सालचा आहे. हरिजनातील धर्मान्तराविरुद्ध म. गांधींनी आंदोलन सुरू केले तेव्हा शंकराचार्यांसारख्या आचार्यांनी गांधींना सहकार्य केले असते तर आजची स्फोटक परिस्थिती निर्माण झालीच नसती.

**धर्मगुरूवर अधिक जबाबदारी**

**प्रश्न- ही जबाबदारी फक्त आचार्यांवरच पडते काय?**

**उत्तर-** समाजावरही जबाबदारी पडतेच. परंतु समाजाचे धार्मिक नेते म्हणजे गुरू यांचेवर ही जबाबदारी अधिक पडते. कारण शंकराचार्य समाजाचे शिक्षक आहेत. धर्मांतरासंबंधी ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करता या देशांत प्रथम हजार-बाराशे वर्षांपूर्वी धर्मांतराची लाट

सुरू झाली. सिंध प्रांतावर झालेल्या परधर्मियांच्या आक्रमणापासून आणि नंतर काश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश आणि बंगाल या प्रांतात सामुदायिक धर्मांतरे तलवारीच्या जोरावर झालेली आहेत. हिंदु धर्मपीठांनी तेव्हाच कंबर कसली असती तर आज हा प्रश्नच भेडसावला नसता.

**……….. का पुसली नाहीत?**

**प्रश्न : ज्याचे सक्तीने धर्मांतर झाले त्यांनी शुद्धीकरणासाठी पूर्वी कधी मागणी केली होती काय ?**

**उत्तर :** छान प्रश्न विचारलात! ५०० वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये बहुजन समाजाची तलवारीच्या जोरावर मोठ्या प्रमाणात धर्मांतरे झाली तेव्हा धर्मांतर झालेला बहुजन समाज काश्मिरी ब्राह्मण आणि धर्माचार्य यांचेकडे प्रायश्चित्तपूर्वक शुद्धीकरण मागावयास गेला होता, त्यावेळी ब्राह्मणांनी आणि आचार्यांनी शुद्धीकरण नाकारले. त्यावेळी हिंदू धर्मपीठांनी जर समाजाचा आणि परिस्थितीचा धर्माचा अर्थ लक्षांत घेऊन जबरदस्तीने झालेली धर्मांतरे पुसून टाकली असती तर भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासावर आणि राष्ट्रीय समतेवर असा प्रतिकूल परिणाम झाला नसता.

**विचार बदलले पाहिजेत!**

**प्रश्न: शंकराचार्य अस्पृश्यतेच्या प्रश्नावर मौलिक मीमांसा करू शकतील काय?**

**उत्तर:** म. गांधी आणि ज्यो. फुले या समाजसुधारकांनी आंदोलन सुरू केले; पण फारसे यश आले नाही. अस्पृश्यतानिवारण कायदा झाला; पण अंमलबजावणी झाली नाही; चातुर्वर्णीय आणि जातिभेद यावर आधारित हिंदूधर्माची रचना आहे. जाती-धर्मामुळे सोवळे ओवळे सामान्यजनांच्या मनांत खोल रुजलेले आहे. आणि ग्रामीण भागांतील जी पुढारी जात आहे. ती जातिभेद मानणारी आहे. स्वतःच्या जन्मजात उच्च जातस्थानाला धक्का लागू नये म्हणून ग्रामीण भागातील हा पुढारी अस्पृश्यता कायम कशी राहील, असा प्रयत्न करीत आहे. पूर्वी जातीभेद फार होता म्हणूनच पुढारी जात निष्काळजी होती. आता लोकशाही पद्धतीने राजकीय सत्ता त्याच्या हाती आहे. जोपर्यंत ग्रामीण भागातील पुढारी जातीविचार बदलत नाहीत तोपर्यंत अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणार नाही.

**पुढारी जाती!**

**प्रश्न: या पुढारी जाती कोणत्या? त्यांचा नामनिर्देश आपण का करीत नाही?**

**उत्तर:** भाषिक प्रदेशांत निरनिराळ्या पुढारी जाती आहेत. राजस्थान, पंजाब, उ. प्रदेश यांमध्ये जाट तर महाराष्ट्रात मराठा, वाणी, माळी इत्यादि. आंध्रमध्ये शेट्टी, कर्नाटकांत लिंगायत या सर्व पुढारी समाजसुधारणेच्या विरोधी जाती आहेत.

**आता यश अल्पच!**

**प्रश्न- सगळ्यात पुढारलेली आणि जबाबदार जी ब्राह्मणजात त्याचा उल्लेख तुम्ही का टाळता?**

**उत्तर:-** बरोबर आहे! मी उल्लेख मुद्दाम टाळला. तुमचा आक्षेप बरोबर आहे. १५० वर्षांत समाजसुधारकांच्या चळवळी झाल्या त्याला ब्राह्मण जबाबदार धरले आहेत. मीही माझ्या हिंदू धर्माची समीक्षा या पुस्तकांत ब्राह्मण जातीला दोष दिला आहे, परंतु परिणाम असा झाला की, समाजसुधारणेची जी प्रक्रिया गेली १००-१५० वर्षे चाललेली आहे, तिला वेग नाही आणि ती मंदगतीने चाललेली आहे, याचे कारण ब्राह्मणांना सगळा दोष देऊन समाजसुधारणा घडणार नाही. ब्राह्मणाचे हाती सामाजिक वर्ग म्हणून राजकीय सत्ता नव्हती, फक्त तो धार्मिक पुरोहित किंवा भिक्षुक होता. खराखुरा जातिभेदातील शोषणाचा फायदा उपटणारा वर्ग राजकीयदृष्टीने बळकट होता. अजूनही ब्राह्मणेतर वर्गच बळकट आहे आणि तोच अस्पृश्यता दृढ ठेवण्याकरिता दंड थोपटून उभा आहे तो वर्ग बोलत नाही; पण कृती करतो. त्यामुळे धर्मपीठे आता जागृत झाली तरी यश अल्पच!

**'तसे' घडले नाही!**

**प्रश्न - ज्यो. फुले, भालेकर, लोखंडे, भास्करराव जाधव, शाहू महाराज आदी ब्राह्मणेतर नेत्यांनी जे प्रयत्न केले ते तुम्ही विसरला काय ?**

**उत्तर:** नाही. मी त्यांना विसरलो नाही. तर पुढारी जाती त्यांना विसरल्या आहेत. वर्षाकांठी फक्त त्यांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी करावयाची आणि दुसरीकडे जातिभेद व्यवस्थितरीतीने पक्का ठेवण्यासाठी सिद्ध रहावयांचे. ज्यो. फुले यांचा संदेश मानावयाचा नाही. परंतु त्यांच्या तसबिरीला फुले वहावयाची, हाच उद्योग ग्रामीण जाती गेल्या शतकभर करीत आहेत. आमचे मित्र प्रा. साळुंखे म्हणतात, मराठ्याच्या हातातील सत्ता गेली, परंतु त्यांचे म्हणणे खरे नाही. स्वातंत्र्यानंतर मराठ्यांच्या हाती सत्ता आली तेव्हा ती सत्ता त्यांनी समाजसुधारणेसाठी वापरावयास हवी होती, तशी त्यांनी वापरली नाही. तसे घडते तर राजकीय सत्ता कायम राहिली असती.

**प्रश्न : सांप्रदायिकतेची व्याख्या आपण काय करता?**

**उत्तर:** आपआपल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरांना सर्वश्रेष्ठ मूल्य आहे, असा आग्रह म्हणजे संप्रदाय सर्वश्रेष्ठ म्हणण्याचे कारण राष्ट्रीय एकात्मता या सांप्रदायिक आग्रहापुढे व अहंकारापुढे दुर्बल ठरते. उदा. हिंदुंची जातीसंस्था आणि त्या संस्थेच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरा अथवा भारतातील मुस्लीम संप्रदाय किंवा ख्रिश्चन संप्रदाय या संप्रदायामध्ये नवे इहवादी राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट मर्यादितपणातच स्वीकारले जाते. मर्यादित म्हणजे तात्पुरतेच. मुसलमानांना हिंदूच्या बरोबरीचे समान हक्काचे नागरिक म्हणून राहाण्याची आणि चांगल्यारीतीने जगण्याची खोल भावना नाही. परंपरागत हिंदुत्व संप्रदाय हा इतर धार्मिक, सामाजिक गटांशी समाना नागरिक म्हणून राहाण्यास तयार नाही. त्याबाबतीत त्याची नाखुषी आहे. ते हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार करतात. ख्रिश्चन धर्मीयांना हे अल्पसंख्याक म्हणून राज्यशासन शासकीय सेवा, आर्थिक व्यवहार, शिक्षणसंस्था यांच्यामध्ये विशेष सवलती मिळाव्यात असे ख्रिश्चन नेत्यांना वाटते.

त्याकरिता त्यांच्या संघटनांनी तसे ठरावही संमत केले आहेत. अशी ही राष्ट्रीय एकात्मतेला दुर्बळ करणारी प्रवृत्ती या देशातील भिन्न भिन्न धार्मिक संप्रदायामध्ये वाढीस लागली आहे.

**प्रश्न : संप्रदायाशिवाय धर्माचे जिणे शक्य आहे काय?**

**उत्तर :** सांप्रदायिक अहंकाराला मर्यादा घालून अनेक संप्रदायांचे सहजीवन हे नेहमीच शक्य असते. उदा. हिंदुस्थानात शैव व वैष्णव अत्यंत धार्मिक जीवन जगत असूनही एकमेकांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत आले आहेत व त्यात यशही मोठे आले आहे. परधर्म- सहिष्णुता हे हिंदू संस्कृतीचे मोठे वैशिष्ट्य म्हणून इतिहासाने मान्य केले आहे. स्वत: चाच धर्म खरा आणि दुसऱ्याचा खोटा अशी ताठर भूमिका न घेता धर्मजीवन चांगल्या रीतीने चालू शकते. किंबहुना चांगल्या जीवनाला हा ताठरपणा घातक ठरतो. आपल्या धर्माशिवाय इतर धर्मांशी बंधुत्वाचे नाते निर्माण करणाऱ्याला आवश्यक अशी उदार व्यापक बुद्धी जो देईल तोच खरा धर्म होय, असा विचार धर्माचार्यांनी आपआपल्या धर्मानुयायांना शिकविला पाहिजे. आज तर त्याची फारच गरज आहे. कारण सगळे धर्म किंवा धार्मिक समाज अगदी जवळजवळ राहू लागले आहेत. त्यांचे एकमेकांचे ऐहिक हितसंबंध एकमेकांत फारच मिसळू लागले आहेत. परंतु धर्माचार्य हा बहुतेक आज कोंदट संकुचित वातावरणात जगणारा प्राणी बनला आहे. तो सर्व मानवजातीचा व जगाचा उत्कट आत्मीयतेने विचारच करण्यास असमर्थ ठरला आहे. त्याला काही थोडे धर्माचार्य अपवाद आहेत.

**प्रश्न : ठरावीक प्रेषिताला दैवी अवतार किंवा ईश्वर साक्षात्कारी समजण्याच्या पद्धतीतून सांप्रदायिकता निर्माण होते किंवा देववाणी ऐकण्याचे वरदान एका विशिष्ट व्यक्तीलाच मिळाले आहे, असे सांप्रदायिकतेमध्ये गृहीत धरलेले असते. मग एकमेकांमध्ये सामंजस्य कसे निर्माण व्हावे?**

**उत्तर :** अमुक एक व्यक्ती प्रेषित आहे किंवा अवतार आहे किंवा देवाची वाणी ऐकण्याची शक्ती प्राप्त झालेली आहे असे त्या त्या धर्मांचे अनुयायी आजपर्यंत मानत आले आहेत. परंतु त्याला पुरावा म्हणजे प्रेषिताने, अवताराने किंवा दैवी सामर्थ्य असलेल्या व्यक्तीने केलेले अद्भूत चमत्कारच होत. हे सगळे अद्भुत चमत्कार खरे आहेत असे मानले तर सगळे धर्मसंप्रदाय खरे मानले पाहिजेत. त्यातून एकाच माणसाचा चमत्कार किंवा अवताराचा चमत्कार खरा मानण्यास अंधश्रद्धेशिवाय काय पुरावा आहे? काहीच नाही. त्यामुळे एक तर सगळेच संप्रदाय खरे मानले पाहिजेत किंवा खोटे मानले पाहिजेत. त्यातील एकच धर्मसंप्रदाय खरा मानण्यास पुरावा नाही. एकच खरा मानणे म्हणजे माथेफिरूपणा होय. असे माथेफिरू प्रत्येक धर्मांत आहेत. मुसलमानांत खूप आहेत. हिंदूतही कमीअधिक आहेत. ख्रिस्ती धर्मातही आहेत. हे सगळे माथेफिरू लोकच या जगाचा नाश करण्यास कारण होणार आहेत.

**(दैनिक तरुण भारत, पुणे, दि. ५ सप्टेंबर, १९८१)**

ooo

४४

# समान संधी देणारी राज्यपद्धती अनुभवास यायला हवी

प्रतिनिधी - **अजिंठा मासिक, औरंगाबाद**

**प्रश्न : सांप्रदायिकतेची व्याख्या आपण काय करता ?**

**उत्तर :** आपआपल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरांना सर्वश्रेष्ठ मूल्य आहे, असा आग्रह म्हणजे संप्रदाय. सर्वश्रेष्ठ म्हणण्याचे कारण राष्ट्रीय एकात्मता या सांप्रदायिक आग्रहापुढे व अहंकारापुढे दुर्बल ठरते. उदा. हिंदूची जातिसंस्था आणि न्यायसंस्थेच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरा अथवा भारतातील मुस्लीम संप्रदाय किंवा ख्रिश्चन संप्रदाय या संप्रदायामध्ये नवे इहवादी राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट मर्यादितपणातच स्वीकारले जाते. मर्यादित म्हणजे तात्पुरतेच. मुसलमानांना हिंदूच्या बरोबरीचे समान हक्काचे नागरिक म्हणून राहाण्याची आणि चांगल्या रीतीने जगण्याची खोल भावना नाही. परंपरागत हिंदुत्व संप्रदाय हा इतर धार्मिक सामाजिक गटांशी समाना नागरिक म्हणून राहाण्यास तयार नाही. त्या बाबतीत त्याची नाखुषी आहे. ते हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार करतात. ख्रिश्चन धर्मीयांना हे अल्पसंख्याक म्हणून राज्यशासन शासकीय सेवा, आर्थिक व्यवहार, शिक्षणसंस्था यांच्यामध्ये विशेष सवलती मिळाव्यात असे ख्रिश्चन नेत्यांना वाटते. त्याकरिता त्यांच्या संघटनांनी तसे ठरावही संमत केले आहेत. अशी ही राष्ट्रीय एकात्मतेला दुर्बळ करणारी प्रवृत्ती या देशातील भिन्न भिन्न धार्मिक संप्रदायामध्ये वाढीस लागली आहे.

**प्रश्न : संप्रदायाशिवाय धर्माचे जिणे शक्य आहे काय ?**

**उत्तर :** सांप्रदायिक अहंकाराला मर्यादा घालून अनेक संप्रदायांचे सहजीवन हे नेहमीच शक्य असते. उदा. हिंदुस्थानात शैव व वैष्णव अत्यंत धार्मिक जीवन जगत असूनही एकमेकांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत आले आहेत व त्यात यशही मोठे आले आहे. परधर्मसहिष्णुता हे हिंदू संस्कृतीचे मोठे वैशिष्ट्य म्हणून इतिहासाने मान्य केले आहे. स्वत: चाच धर्म खरा आणि दुसऱ्याचा खोटा अशी ताठर भूमिका न घेता धर्मजीवन चांगल्या रीतीने चालू शकते. किंबहुना

चांगल्या जीवनाला हा ताठरपणा घातक ठरतो. आपल्या धर्मांशिवाय इतर धर्मांशी बंधुत्वाचे नाते निर्माण करणाऱ्याला आवश्यक अशी उदार व्यापक बुद्धी जो देईल तोच खरा धर्म होय असा विचार धर्माचार्यांनी आपआपल्या धर्मानुयायांना शिकविला पाहिजे. आज तर त्याची फारच गरज आहे. कारण सगळे धर्म किंवा धार्मिक समाज अगदी जवळजवळ राहू लागले आहेत. त्यांचे एकमेकांचे ऐहिक हितसंबंध एकमेकात फारच मिसळ लागले आहेत. परंतु धर्माचार्य हा बहुतेक आज कोंदट, संकुचित वातावरणात जगणारा प्राणी बनला आहे. तो सर्व मानवजातीचा व जगाचा उत्कट आत्मीयतेने विचारच, करण्यास असमर्थ ठरला आहे. त्याला काही थोडे धर्माचार्य अपवाद आहेत.

**प्रश्न : ठरावीक प्रेषिताला दैवी अवतार किंवा ईश्वर साक्षात्कारी समजण्याच्या पद्धतीतून सांप्रदायिकता निर्माण होते किंवा देववाणी ऐकण्याचे वरदान एका विशिष्ट व्यक्तीलाच मिळाले आहे, असे सांप्रदायिकतेमध्ये गृहीत धरलेले असते. मग एकमेकांमध्ये सामंजस्य कसे निर्माण व्हावे?**

**उत्तर :** अमूक एक व्यक्ती प्रेषित आहे किंवा अवतार आहे किंवा देवाची वाणी ऐकण्याची शक्ती प्राप्त झालेली आहे असे त्या त्या धर्मांचे अनुयायी आजपर्यंत मानत आले आहेत. परंतु त्याला पुरावा म्हणजे प्रेषिताने, अवताराने किंवा दैवी सामर्थ्य असलेल्या व्यक्तीने केलेले अद्भुत चमत्कारच होत. हे सगळे अद्भुत चमत्कार खरे आहेत असे मानले तर सगळे धर्मसंप्रदाय खरे मानले पाहिजेत. त्यातून एकाच माणसाचा चमत्कार किंवा अवताराचा चमत्कार खरा मानण्यास अंधश्रद्धेशिवाय काय पुरावा आहे? काहीच नाही. त्यामुळे एक तर सगळेच संप्रदाय खरे मानले पाहिजेत, किंवा खोटे मानले पाहिजेत. त्यातील एकच धर्मसंप्रदाय खरा मानण्यास पुरावा नाही. एकच खरा मानणे म्हणजे माथेफिरूपणा होय. असे माथेफिरू प्रत्येक धर्मांत आहेत. मुसलमानांत खूप आहेत. हिंदूतही कमीअधिक आहेत. ख्रिस्ती धर्मातही आहेत. हे सगळे माथेफिरू लोकच या जगाचा नाश करण्यास कारण होणार आहेत.

**(अजिंठा, दीपावली विशेषांक, १९८२)**

○○○

४५

# मानवी जीवनात तत्त्वज्ञानाइतकेच तंत्रज्ञानास महत्त्व

मुलाखतकार - **प्रा. डॉ. सुधीर रसाळ**

**प्रस्तावना**

शास्त्रीजी आपण आकाशवाणीमध्ये आलात आणि आकाशवाणीच्या श्रोत्यांना आपल्या विचारांचा हा जो लाभ होतो आहे, त्याबद्दल मी प्रथमच आभार मानणार आहे आणि काही प्रश्न मी आपणास विचारणार आहे. या प्रश्नांमधून आपल्या विचारांचा लाभ व्हावा अशी अपेक्षा आहे. आपल्याकडे पाहिल्यानंतर पहिल्यांदा मनामध्ये असा विचार येतो की, ज्या काळामध्ये इंग्रजी शिक्षण घेण्याचं जबरदस्त असं आकर्षण होतं, अशा काळात आपण मात्र वाईसारख्या ठिकाणी किंवा काशीसारख्या ठिकाणी गेलात आणि तेथून भारतीय विद्या आत्मसात केलीत.

**प्रश्न - त्या काळाच्या प्रवाहाविरुद्ध आपण शिक्षण कसं घेतलत ?**

**उत्तर -** माझी गृहस्थिती एकंदर गरिबीची होती. अर्थात गरिबी धट्टीकट्टी होती; परंतु दूरगावी जाऊन इंग्रजी विद्या घेण्यासाठी जी एकंदर परिस्थिती लागते, ती माझ्याकडे नव्हती. माझ्या गावापासून जिथे हायस्कूल आहे असं गाव म्हणजे धुळे. माझ्या गावापासून लांब सेहेचाळीस मैलांवर, त्यामुळे मी तिथे शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकलो नाही, पण तिथे (वाईस) गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था व तरतूद असल्याने सन १९१४ साली मी गेलो. तिथे केवलानंद सरस्वती अर्थात् नारायणशास्त्री मराठे होते. त्यांचे एक मित्र श्री. देवकुळे माझ्या वडिलांचे मित्र होते. त्यांनी माझ्या वडिलांकडे आग्रह धरला की अशा थोर गुरूंकडे माझं शिक्षण व्हावं. तिथं गेलो आणि त्या ठिकाणी जी क्रांतिकारकांची राजकीय संघटना होती, त्या राजकीय क्रांतिकारकांच्या संघटनेत सापडल्याने मी जरी प्रत्यक्ष त्या चळवळीत सामील झालो नाही, तरी त्या चळवळीतील महत्त्वाचे असे वाद होते. ते अहिंसा मार्गाने स्वराज्य मिळवायचे की सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने हा प्रमुख वाद होता. असे वाद करणारे अनेक देशसेवक विद्यार्थी तिथे माझे सहकारी म्हणून लाभले.

**प्रश्न - त्यांचा संस्कारही आपल्यावर झाला तर...**

**उत्तर -** त्यांचा संस्कार माझ्यावर झाला. ती जरी जुन्या पद्धतीची पाठशाळा असली, तरी तिथे इतर ठिकाणापेक्षा निराळं वातावरण होतं. ते एकदम अलग होतं. त्यामुळे माझं आकर्षण पश्चिमी विद्येपेक्षा भारतविद्येकडे झालं.

**प्रश्न- आपल्या वडिलांना प्राचीन विद्येचा अभिमान होता, म्हणूनही कदाचित त्यांनी आपणास या प्रकारचं शिक्षण द्यायचं ठरवलं का?**

**उत्तर -** हो, तुम्ही अगदी बरोबर ओळखलंत, कारण वाड-वडील ज्या प्रवृत्तीचे, त्या प्रवृत्तींचा प्रभाव मुला-बाळांवर होत असतो.

**प्रश्न - आता मला एक असं वाटतं, की या वयात आजूबाजूला आपल्या वयाची मुलं पाश्चात्त्य वळणाचं शिक्षण घेताहेत आणि ही विद्या आपणही मिळवली पाहिजे असा काही विचार आपल्या मनात कधी आला नाही का?**

**उत्तर -** पण माझ्याशी ज्यांचा संवाद घडत होता, ते इंग्रजी शिकलेले विद्यार्थी संस्कृत विद्या शिकत होते. उदाहरणार्थ तळेगाव दाभाडे या ठिकाणी समर्थ विद्यालय म्हणून एक मोठी राष्ट्रीय शिक्षण संस्था होती. ती ब्रिटिश सरकारनी बंद पाडली. ते सगळे विद्यार्थी इंग्रजी शिकलेले वाईच्या प्राज्ञपाठशाळेत आले. आणि ते जे वातावरण होतं, ते वातावरण परंपरागत भारतीय संस्कृतीचा जयजयकार करणारं होतं. कारण राष्ट्र पारतंत्र्यमुक्त करायचं होतं. परंतु त्याजबरोबर आधुनिक विद्यांची गरज आहे असं वाटणारंही ते जग होतं. त्यामुळे मी इंग्रजी विद्येकडे आढलो गेले.

**प्रश्न - मी असं ऐकलं आहे की, विनोबांनी आपणास इंग्रजी शिकवलं आहे, हे खरे कां?**

**उत्तर -** हो. विनोबा त्या ठिकाणी विद्यार्थी म्हणून वेदांत शिकण्याकरिता आलेले होते. ते आमच्या गुरूपाशी. शांकरभाष्य त्यांना शिकायचं होतं, तेव्हा तिथे त्यांचा नि माझा परिचय झाला. ते वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत वर्षभर होते. त्यांच्याशी संवाद घडून आला. मग त्यांच्याकडे बडोद्याला मी इंग्रजी शिकण्यासाठी गेलो. त्यांनी मला इंग्रजीमध्ये चांगला प्रवेश करून दिला.

**प्रश्न - आता विनोबांसारख्या एका महान भारताच्या सुपुत्राचा नि आपला सहवास घडून आला आहे. त्यासंबंधातल्या काही वेगळ्या प्रकारच्या आठवणी आपल्याकडे असणार. त्या सांगाल का?**

**उत्तर -** विनोबा इथे जेव्हा उपनिषद भाष्य शिकले. ते शिकत असता महात्मा गांधींशी पत्रव्यवहार सुरू होता. कारण ते अहमदाबादच्या साबर आश्रमाचे सदस्य होते. प्रतिज्ञा घेऊन विनोबा त्या आश्रमात गेले होते. महात्माजींची अनुमती घेऊन ते वेदांत विद्या घेण्यासाठी नारायणशास्त्री मराठे ऊर्फ केवलानंद सरस्वती यांच्याकडे आले. आणि काय काय शिकले ते त्यांनी एका पत्रात लिहून महात्माजींना कळवले. एक वर्ष जवळजवळ झाले. त्या काळात ते

बरेच शिकले. विनोबा अतिशय तीव्र बुद्धीचे, सूक्ष्म बुद्धीचे होते. त्यांची ग्रहणशक्ती विलक्षण होती. आध्यात्मिक प्रवृत्तीचे ते होते. वेदान्ताचं पुष्कळ अध्ययन अगदी थोड्या वेळात विनोबांनी केलं.

विनोबांनी हे सर्व महात्मा गांधींना पत्राद्वारे कळवले. महात्माजी वाचून चकित झाले. महात्माजींचं उत्तर आलं. त्यात लिहिलं होतं, 'ऐ गोरख, तुमने मच्छिंद्र को भी जीता है।' त्या पत्रातील ही ओळ आजही माझ्या लक्षात आहे. दुसरी गोष्ट अशी की, माझ्या प्राज्ञपाठशाळेत टिळक संप्रदायाचे असे लोक भरलेले होते, की ज्यांची अशी पक्की धारणा होती, की सशस्त्र क्रांतीला पर्याय नाही. टिळक जरी स्वतः सशस्त्र क्रांतीमध्ये सहभागी होते की नाही, याबाबत अजून वादविवाद सुरू आहे; परंतु त्या लोकांवर मात्र क्रांतीचा प्रभाव होता, छाप होती. पहिल्या महायुद्धाचा तो काळ होता. त्यावेळी भारतात सशस्त्र क्रांतीचा उठाव करणारी मंडळी होती. तशी मंडळी प्राज्ञपाठशाळेतही होती. त्यामुळे आपसात वाद होत असे. तो हिंसा वा अहिंसा मार्गाचा असे. सोमवारी प्राज्ञपाठशाळेत वादशाळा होत असे. त्यात विनोबाही भाग घेत असत. दिनकरशास्त्री कानडे यांच्यासारखे जे शिक्षक होते, त्यांच्याही चर्चा चालायच्या. त्या चर्चांमधून विचारांचे स्पष्टीकरण होत असे. त्यातून तात्त्विक मंथन होत होते. त्या काळात विनोबांची भाषणे मी मनःपूर्वक ऐकली.

**प्रश्न - आपणास कधी त्या वयात सशस्त्र लढ्याचं आकर्षण वाटलं का?**

**उत्तर -** फार दीर्घकाळपर्यंत मी या विचाराकडे आकर्षित होतो - सशस्त्र लढ्याच्या संबंधाने. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की सशत्र लढ्यात पडायचं तर निशाणबाजी आली पाहिजे, तर माझी वेद विद्येमध्ये जी साधना सुरू होती, त्यात माझ्या गुरूंना निशाणबाजी मान्य होती. परंतु या विषयामध्ये माझे स्नायू मला मदत करत नाही, ही माझी अडचण होती. म्हणूनही आणि आपण सामर्थ्याने सशस्त्र क्रांतीमध्ये भाग घेऊ शकू, पुढारीपण करू शकू, हे कधी मला वाटलं नाही, आणि अनुयायी होण्याची कधी वासना झाली नाही. पण त्या लोकांशी माझा संबंध फार वर्षांपर्यंत होता. हा संबंध होता, हे पंडित मदन मोहन मालवीय यांनाही माहीत होतं. मदन मोहन मालवीयांच्याकडे मी सन १९३४ साली गेलो, तेव्हा काही सशस्त्र क्रांतीकारकांना जे मद्रासच्या तुरुंगात अटकेत होते, त्यांना पत्र पाठवून मदत करण्यासाठी मदनमोहन मालवीय तत्पर असत. अशी काही पत्रे त्यांनी माझ्याकडे सुपूर्द केली होती, कारण त्यांचाही सशस्त्र क्रांतीशी अप्रत्यक्ष संबंध होता. त्यामुळे सशस्त्र क्रांतिकारकांशी माझे असलेले संबंध त्यांना ठावूक होते.

**प्रश्न - आपला हा वेगवेगळी वैचारिक वळणे घेत झालेला प्रवास दिसतो म्हणजे राजकीय दृष्टीने बोलायचं झाल्यास सशस्त्र लढ्याच्या विचारापासून ते रॉयवादापर्यंत आपण मजल मारलेली आहे. आणि या दोन टप्प्यांच्या मध्ये अनेक वळणे आहेत, टप्पे आहेत असं दिसून येतं. या प्रवासाबद्दल आम्हा सर्व मंडळींना अतिशय कुतूहल**

**वाटतं. आपण स्वतः इंग्रजी शिकला, इंग्रजी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, वेगवेगळ्या समाजशास्त्रांचा अभ्यास केला आणि या सगळ्या अभ्यासामध्ये जी सगळी ज्ञानशाखा धर्मातीत (Secular) अशा स्वरूपाची आहे, त्याचा एक प्रभाव आपल्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला दिसतो. आता हे सगळं मिळवल्यानंतर आपण जे सुरूवातीला धर्मशास्त्र शिकलात आणि धर्मशास्त्राशी संलग्न अशी इतर शास्त्रे-संस्कृतमधून वेदविद्या शिकलात, तेव्हा पाश्चात्त्यांचं नवं ज्ञान मिळवल्यामुळे आपल्या परंपरेकडे पाहण्याचा आपला असा काही वेगळा दृष्टिकोन असणार-तो काय होता?**

**उत्तर -** त्या दृष्टिकोनामध्ये मला सांगायचं आहे की त्यातून मला ऐतिहासिक दृष्टी लाभली. धर्मामध्ये मनुष्य मुख्यत: सारखा बदल करत आला आहे. जे मोठमोठे प्रेषित झाले आहेत, त्या प्रेषितांच्या विचारसरणीची पार्श्वभूमी पाहिली, की लक्षात येतं की हा एक इतिहास आहे- मनुष्याच्या भावनांचा आणि धार्मिक जीवनाचा- त्यात बदल झाला आहे. पूर्वी बहुदेवतावाद होता त्याआधी पितृपूजा होती. मग एकेश्वरवाद आला. तो एकेश्वरवाद स्थूल स्वरूपाचा होता. पुढे तो अतिशय सूक्ष्म झाला. असा धर्म विचाराचा विकास झाला. आणि ही ऐतिहासिक दृष्टी पश्चिमी विद्या अभ्यासाने माझ्यात आली. त्याप्रमाणे पश्चिमी तत्त्वज्ञानामध्ये ही ग्रीक विचारसरणी जी प्लेटो, ॲरिस्टॉटलमध्ये जी वैचारिक खोल परंपरा आहे, ती आपल्या भारतातही आहे, षड्दर्शनांच्या रूपात. ही सारी षड्दर्शने एका मताची नाहीत. त्यांच्यात परस्परविरोधी विश्वदृष्टी आहे. विश्वाबद्दलची पर्यायी दृष्टी- तत्त्वदर्शने मला त्यात आढळली. त्यामुळे माझे मन मोकळे झाले. परंपरेला चिकटून राहायचे नाही, अशी जी माझी मनःस्थिती निर्माण झाली, त्यामुळे मी पुढे जावं, आपल्या देशाची धर्मस्थिती बदलावी व आपल्या देशाला सामर्थ्य यावं असं वाटू लागलं. आपला देश समर्थ देश राहिला नाही, याचं कारण आपण धर्मामध्ये, सामाजिक आचरणीमध्ये धर्माचा जो परिणाम घडतो, त्यामध्ये आपण परंपरेला चिकटून बसतो, तसे न बसता बदल करावा आणि आधुनिक दृष्टीने भारतीय राष्ट्र बदलले पाहिजे, त्याची रचना बदलली पाहिजे असा दृष्टिकोन मला लाभला. तो लाभला याचे कारण पश्चिमी दर्शने आणि पश्चिमेची इतिहास दृष्टी लाभली आणि त्या दृष्टीने मी भारतीय परंपरांचा अभ्यास केला. असे दिसून आले आहे, की वेळोवेळी भारतीय विचारवंतांनी, प्राचीन तत्त्वज्ञान्यांनी धर्मात बदल केला आहे. हा बदल देश, काल, परिस्थिती पाहून करण्यात आलेला आहे. म्हणून आज सर्व परंपरावाद्यांनी आपली दृष्टी बदलली पाहिजे. हा समाज एकजीव, एकजूट कसा होईल, जाती बंधनातून कसा बाहेर पडेल अशा दृष्टीने धर्मसुधारणा केली पाहिजे. ही चळवळ भारतामध्ये, हिंदू समाजामध्ये विशेषतः पावणेदोनशे वर्षे सुरू आहे.

**प्रश्न - आपण वाईमध्ये धर्मसुधारणेची प्रत्यक्ष चळवळ केली, तर त्या चळवळीची उद्दिष्टे आपण आत्ता सांगितलीच आहेत. आपणाला काय वाटतं? या चळवळीत कितपत यश आलं ? या सुधारणांना सनातन्यांचा जो विरोध झाला, त्या विरोधाचं स्वरूप काय होतं ?**

**उत्तर -** तो जो त्यांचा विरोध होता, तो विरोध त्यावेळी म्हणजे १९२७ ते १९३० सालच्या काळात प्रगटपणे एका आघाडीच्या रूपात होता. आम्ही त्या विरोधात जी चळवळ उभी केली त्यातून हे समजावलं, की धर्म बदलता येतो, स्त्रियांचे हक्क प्रस्थापित करता येतात, स्त्री-पुरुष समतेचे हक्क आम्ही सांगत होतो. त्यास विरोध होत होता; परंतु त्यात जात बहिष्काराचं वा सामाजिक बहिष्काराचं जे शस्त्र होतं, ते त्या काळापर्यंत दुबळं होऊन गेलं होतं, ते लंगडं पडलं होतं.

**प्रश्न - आपणाला त्याचा कधी त्रास झाला होता का ?**

**उत्तर -** त्रास नाही; पण विरोध झाला होता. टिळकांना ज्याप्रमाणे वा आगरकर प्रभृतींना जसा त्रास झाला, तसा तो झाला नाही. कारण जे पन्नास वर्षांपूर्वी घडलं होतं, तो काळ बदलून गेला होता. किंवा आपल्या मुलींची लग्नं झाली तर त्यांना काय त्रास होईल असा जो पूर्वीच्या समाजसुधारकांना प्रश्न पडायचा, तो काही माझ्या काळात राहिला नाही. हा काळ १०० वर्षांपूर्वीच्या पूर्वसुरींच्या काळापेक्षा हिंदू समाज हा फार सहिष्णू झाला होता, धर्मसुधारणांच्या बाबतीत त्यामुळे हिंदु धर्मामध्ये मौलिक सुधारणा करण्याविषयीची विचारसरणी चांगली रूजली, पसरलेली होती. अशा काळात आम्ही धर्म परिवर्तनवादी झालो. याचा अतिशय उत्तम उपयोग झाला. त्यामुळे अस्पृश्यता निवारणाची जी चळवळ झाली, त्या चळवळीलाही विशेष विरोध झाला नाही. जो विरोध आहे, तो आजही आहे; पण गुप्त. खेड्यापाड्यामध्ये अजून अस्पृश्य जाती वेगळ्या आहेत. ते वेगळेपण अस्पृश्य व सवर्ण यांच्या हितसंबंधांशी जुळून आहे, जोडून आहे. प्रश्न कठीण आहे, सुटायचा आहे; पण सोडवला पाहिजे.

**प्रश्न - महात्माजींचा आपल्यावर अतिशय विश्वास आणि अस्पृश्यतेच्या निमित्ताने प्राचीन परंपरावादी जे धर्ममार्तंड-त्यांच्याशी चर्चा करायला त्यांनी सुधारणावाद्यांचे प्रतिनिधी म्हणून आपणास पाचारण करण्यात आले होते. त्यावेळी आपण जो युक्तिवाद केला, त्याचा काही परिणाम या सनातनवाद्यांवर झाला का त्या काळात ?**

**उत्तर -** त्या सनातनवाद्यांवर झाला नाही. पण आमच्या युक्तिवादाचा इतर जो समाज होता, साधा समाज, त्यावर मात्र झाला. म्हणजे धर्माच्या आधारावर आपण समाज बदलू शकतो, जुन्या चालीरीती बदलू शकतो असा जो सकारात्मक परिणाम नव्या पिढीवर घडून आला, यामुळे नव्या पिढीचा धर्मसुधारणांना विरोध राहिला नाही.

**प्रश्न - मी थोड्या वेगळ्या प्रकारचा प्रश्न विचारतो. आपण पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, मार्क्सवादाचा अभ्यास केला आणि वेगवेगळ्या पंथांचा, विचार प्रवाहांचा अभ्यास केला, त्यामुळे आपला जो वैचारिक पिंड बनला, त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेचे काही नवं मूल्यमापन केलं पाहिजे, असं आपल्याला वाटलं का? आणि असं जर वाटलं असेल तर या दृष्टीनं आपण कोणत्या स्वरूपाचं मूल्यमापन करताहात?**

**उत्तर -** पहिली गोष्ट अशी आहे की हे मूल्यमापन करत असताना भारतीय संस्कृतीमध्ये विचारस्वातंत्र्य होतं. प्राचीन काळामध्येही होतं, त्यामुळे तत्त्व संशोधनाच्या वाटा मोकळ्या होत होत्या, हे प्राचीन भारतीय परंपरेचं वैशिष्ट्य आहे. म्हणजे प्राचीन भारतीय संस्कृती जी वाढत गेली, विस्तारत गेली त्याच्यामध्ये विचारस्वातंत्र्य ते एक मूल्य आहे.

**प्रश्न - पण ते नंतरच्या काळात राहिलं नाही ना?**

**उत्तर -** नंतर कोणताही मोठा विचार आला आणि त्याप्रमाणे बदल झाला तो बदल फार वेळ टिकत नाही. त्याला पुन्हा मर्यादा उत्पन्न होतात, उदाहरणार्थ भारतीय संस्कृतीचं जागतिक संस्कृतीला काय योगदान आहे, काय महत्त्व आहे म्हणून मला विचाराल तर उच्च दर्जाची सार्वभौम नैतिकता, जसे की प्राणिमात्राबद्दल एकात्म बुद्धी, प्राणिमात्रांच्या जीवनाचं मूल्य हे पवित्र मूल्य आहे. अशा प्रकारचा दृष्टिकोन - 'सर्वभूतेहिते रताः' हे ज्ञानी पुरुषाचं नि भक्ताचं लक्षण सांगितलं आहे. तर ही जी विश्वाशी एकात्मता सांगितली गेली आहे, ती अनुभवणं आणि त्यामुळे नैतिक जीवनाला एक तऱ्हेची उच्च अशी भूमिका प्राप्त होते, ते एक भारतीय संस्कृतीचं विश्व संस्कृतीला दिलेलं योगदान आहे, असं मला वाटतं. म्हणजे मी जे विचार स्वातंत्र्यासारखं मोठं मूल्य आहे, कारण सत्य संशोधनाला पुढे जायला विचारस्वातंत्र्य उपयुक्त आहे. आणि ते अत्यंत आवश्यक आहे. आजची जी भारतीय लोकशाही आहे, ती टिकण्याची शक्यता त्याचमुळे आहे. भोवतालचं जग, आशिया खंड साम्राज्यशाहीतून मुक्त झाला आहे, तिथं भारतासारखी लोकशाही नाही. इंग्लंड, अमेरिका इथं जी लोकशाही मूल्ये आहे, ती इथल्या लोकशाहीत का आली इतर इथली जी राज्यघटना समिती आहे, इथली संसदीय पद्धती आहे, स्वतंत्र भारताचं जे संविधान आहे, ते कशाचं निदर्शक आहे, तर आमच्या या लोकशाहीला पायाभूत असलेलं मूल्य आहे - विचारस्वातंत्र्य आणि नैतिक समता हे जे तत्त्व आहे, या दोन गोष्टी भारतीय संस्कृतीच्या मूळ देणग्या आहेत. म्हणून इथे लोकशाहीची मुळं रुजणं शक्य आहे, ती अजून रुजलेली नाहीत.

**प्रश्न- ते बरोबर आहे; परंतु आज जो विचारस्वातंत्र्याचा मुद्दा आपण घेतो किंवा ही जी मूल्ये आपण घेतो, ती आमच्या परंपरेतही आहे, त्याचं आपणास भान नाही. ते पाश्चात्त्य मूल्य म्हणूनच आपण घेतो, अशा भूमिकेतूनच सर्व विचार होताना दिसतो. कारण मध्यंतरीच्या काळात ही प्राचीन मूल्यपरंपरा खंडित झाली. मला जो प्रश्न विचारायचा आहे तो असा की आजच्या काळाच्या संदर्भात आणि आज विज्ञानप्रणीत जी जीवनप्रणाली आपण कितीही म्हटले तरी येणारच. या संदर्भात भारतीय परंपरा जी प्राचीन ज्ञानाची, तत्त्वज्ञानाची, त्यात नवं काही आपल्या जीवनात आणता येईल का? त्याचे पुनरुज्जीवन करता येईल का? की जेणेकरून आपण नवं जीवन जगू शकू... त्याला तोंड देऊ शकू? अस काही आपल्या भारतीय तत्त्वज्ञानात आपणास जाणवतं का?**

**उत्तर -** तर पहिली गोष्ट अशी आहे की, जुनं जे जग आहे, जुना जो विचार आहे त्याच्यामधे

बरचसं जुनं असतं, आणि ते कालबाधित असतं. असं कालबाधित भारतीय विचारातही खूप आहे. जगातले जे सर्व प्रस्थापित धर्म आहेत, इस्लाम आहे, ख्रिश्चानिटी आहे, सगळयांमध्ये कालबाधित फार आहे हो! असणारच. तर त्याच्यातून जे निष्कर्ष निघतात, त्यात काहीतरी अबाधित असतात. असे निष्कर्ष भारतीय परंपरेतही आहेत. पण भारतीय साहित्य घेतलं तर मनुष्याच्या प्रतिभेला अतिशय उत्कृष्टतेने पुढे न्यायला उपयोगी असं काही आहे. त्यामुळे तुम्ही आज पाश्चात्त्य उचलू शकता. तुम्ही जे पाश्चात्त्य संस्कृतीचं स्वागत केलंय, विशेषत: हिंदू संस्कृतीच्या लोकांनी, इथल्या इस्लामनी तसं केलंय की नाही हा वादाचा प्रश्न आहे. पण हिंदूंनी, सगळयांनी पाश्चात्त्य संस्कृतीतून काही मूल्ये घेतली आहेत, याचं कारण तुमच्याशी त्यांचा संवाद आहे. तुमचे परंपरागत संस्कार या नव्या आव्हानांशी जुळणारे आहेत. असं असल्यावाचून तुम्ही ते स्वीकारणार नाही.

**प्रश्न - अगदी बरोबर आहे. तुम्ही फार महत्त्वाचा मुद्दा सांगितला आहे. मला वाटतं यावर आपण थोडसं अधिक बोलावं. भारतीय परंपरेत असं काय आहे की त्यामुळे आपण स्वागतशील बनतो ?**

**उत्तर -** महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, किंवा महादेव गोविंद रानडे किंवा रामकृष्ण गोपाळ भांडारकर ही जी मंडळी होऊन गेली, या मंडळींमध्ये या दोन्ही संस्कृतींचा अतिशय उत्तम मिलाफ, सुसंगती आहे. महात्मा गांधी आजच्या जगाला त्याच्या प्रश्नांना राजकीयदृष्ट्या उत्तर देऊ शकतात. हे भारतीय परंपरेमधलंच आहे. त्यांचा अहिंसा नि सत्य या अंतिम मूल्यांकडे जे आकर्षण आहे, त्यांनी त्यांना जो एक विशिष्ट अर्थ दिला, तो राजकीय जीवनात महत्त्वाचा आहे. ती त्यांची भारतीय परंपरा आहे. नैतिक मूल्यांवरील निष्ठा पाहा. त्यांना इंग्लंडमधील बिशप म्हणाला, 'अरे, तुझे विचार 'बायबल' शी जमलेले आहेत, तर तू ख्रिश्चन का होत नाहीस?' तर महात्मा गांधी म्हणाले की माझ्या 'भगवद्गीता' मधून मला तेच मिळतं आहे. 'बायबल' आणि 'भगवद्गीता' एकच सांगते. तर खिश्चन नि माझा धर्म यात विरोधच नाही तर नवा धर्म का?' आता तुम्ही साहित्यिक आहात, साहित्याचे टीकाकार आहात म्हणून तुम्हाला मी सांगतो की कालिदासाचे 'शाकुंतल' नाटक हे पश्चिमी जगालासुद्धा अतिशय विलक्षण, आश्चर्यकारक वाटलं. ते पाश्चात्त्य सुद्धा विस्मित झाले. विस्मयानंद जो आहे, हा एक अतिशय उच्च दर्जाचा कलानंद आहे, हे तुम्हीही मान्य कराल. तर विस्मय अनुभवला गटेसारख्या महाकवीने, किंवा अनेक मोठ्या पाश्चात्त्य टीकाकारांनी. याचं कारण आहे, तो संवाद आहे. ती जी परंपरा आहे, ती जागतिक अशी विश्वसंवादी परंपरा आहे. याशिवाय मनुष्य पुढे जात नाही. इतिहासातील जो प्रगतिवाद आहे की माणसाचा जो इतिहास आहे, तो त्याच्या प्रगतीचा इतिहास आहे असा सिद्धांत आहे. एकोणीसाव्या शतकामधे इतिहास वादा होता. तो वाद आता आगे पडला आहे. कारण मानव प्रगत होता होता खड्ड्यातही जाऊन पडू शकतो, असे भय आता वाटू लागले आहे.

परंतु माणसाची प्रगती आत्तापर्यंत झालेलीच आहे. याचे कारण काय, तर मागे माणसाने काही मिळवले आहे म्हणून तो पुढे जातो. शून्यातून कोणी पुढे जात नाही. तो पुढे जातो आहे, तो वरच्या पायरीवरून वरच्या पायरीवर जातो आहे. म्हणून भारतीयांनी तसं काही मिळवलं आहे. त्या पायरीवरून भारतीय पश्चिमी जगाचं स्वागत करत आहे, ते आत्मसात करत आहे. अनुकरणावस्था आहे, ही गोष्ट खरी आहे. तंत्रज्ञान किंवा हल्ली सगळ्या विद्यांच्या बाबतीत आपण अनुकरणावस्थेत आहोत, ही गोष्ट खरी आहे. पण हे अनुकरण करण्याची जी आपली जिद्द आहे आणि ती दिसते आपल्या देशात. तर ती जिद्द आहे याचे कारण आपण तिथपर्यंत पोहोचलो आहोत. आपलं मन ते ग्रहण कराण्यास उद्युक्त आहे. का उद्युक्त आहे? तुमचे तसे संस्कार आहेत, म्हणून उद्युक्त आहे.

**प्रश्न - हा आपला मुद्दा फारच महत्त्वाचा आहे. परंतु तरीही यातून असा एक प्रश्न निर्माण होतो की भारतीय एकूण जीवनप्रणाली आणि जीवनाकडे पाहण्याचा म्हणून जो खास दृष्टिकोन आहे, ज्याला आपण भारतीय म्हणू, ज्यामध्ये इहवादापलीकडे जाऊन काही एक चैतन्याचा विचार अधिक प्रमाणात येतो आणि जीवनाला या संदर्भात अर्थ देण्याची एक पडती आहे, ती पाश्चात्त्यांमध्ये नाही. तेव्हा ही जी जीवन जगण्यासाठी आवश्यक अशी जी गोष्ट आहे, जी संवेदनशीलता मला मिळवावी लागते, ती मी कशी मिळवणार? म्हणजे आता गांधीजींच्या बाबतीत पाहायचं झालं तर गांधीजींचा मूळ पिंड आध्यात्मिकच होता. त्यामुळे गांधीजींनी काही यंत्रयुगाचं स्वागत केलेलं नाही. मला मात्र ते करावं लागणार आहे. आजच्या भारतीय माणसापुढचा हा प्रश्न आहे. तेव्हा हा आपण कसा काय सोडवणार ?**

**उत्तर-** आधिभौतिक संस्कृती आणि ही जी तंत्रज्ञानाची क्रांती झालेली आहे, जग किती जवळ आलेलं आहे. एका आधुनिक दळणवळण शास्त्रज्ञाने म्हटलेले आहे की, 'Humanity lives in a Globle Villege.' पृथ्वी नावाच्या एका खेडयात जग राहते. इतकं जग जवळ आलेलं आहे. त्यामुळे आधिभौतिक संस्कृती आणि आध्यात्मिक संस्कृती यांच्यामधील जो अंतर्विरोध आहे, तो वस्तुस्थितीतूनच आलेला आहे आणि मनुष्य हा भौतिक पिंडाच्या पलीकडे जाऊन अशा अंतिम चैतन्याकडे जात आहे. ते जे चैतन्य आहे, त्याचे स्वरूप वाणी आणि मनाच्या पलीकडे आहे. पण त्याचा परिणाम मनुष्यावर होतो.

पश्चिमी जगातील मनुष्यावरही तो होतो. कारण तिथेही धर्मपरंपरा आहे. तिथे ख्रिश्चन धर्माचा जो पगडा आहे, तो विलक्षण आहे. तो आजही दिसतो ती जी तिथली परंपरा आहे, ती पाहिली की असे म्हणता येत नाही, की भारतीय आध्यात्मिक आहेत नि पाश्चात्त्य आधिभौकिक. आमचा भौतिकवाद आहे तो आहेच. कारण आम्ही शेती करीत होतो. आमचं रहाटगाडगं होतं. आमचा चरखा होता. आमच्याकडे काही आयुर्वेद, वस्तुशास्त्रासारख्या विद्या होत्या. म्हणजे त्या भौतिक विद्याच होत्या. या भौतिक विद्या पुढे गेलेल्या आहेत. तंत्रज्ञानाशिवाय मनुष्य कुठेच जगू शकत

नाही. मध्ययुगातही तंत्र होतं. टेक्नॉलॉजी प्राचीन युगातही होती. लोखंडाशिवाय त्या काळी मनुष्यास जगता येत नव्हतं. लोखंड निसर्गातलं नाही. त्यानी धाव बनवली. तर तंत्रज्ञानाशिवाय मनुष्य जगू शकत नाही, मग तो भारतीय असो वा अभारतीय असो. पाश्चिमात्त्य तंत्रज्ञान हे पुढे गेलेले आहे. तिथे आपण जात आहोत. कारण प्रगतीची ओढ आध्यात्मिक ही केवळ मनुष्यजातीतच आहे. नुसत्या भारतीयांत ती नाही. कारण आध्यात्मिक दृष्टिकोन जो आहे, तो मानवी दृष्टिकोन आहे. एवढंच आहे की त्यामध्ये ज्या विसंगती आहेत, त्या काढायला पाहिजेत. इस्लाम, हिंदुइझम, ख्रिश्चानिटी या आध्यात्मिक परंपरा आहेत. त्या परमेश्वर पूजेच्या परंपरा आहेत. यांच्यातील विसंगती काढल्या पाहिजेत. नाहीतर मानवजात या लहानशा जागतिक खेडयात जगायची नाही. पृथ्वी हे आज लहानसं खेडं झालेलं आहे. वाहतुकीच्या साधनांच्या योगाने हे घडलं. त्यात जर तट पडले, तटात आणखी तट पडले तर भांडत राहून या सुंदोपसुंदीने मानवजात समाप्त होईल. हा मार्क्सवादी हा बिन मार्क्सवादी, ही सुपर पॉवर नि ती सुपर पॉवर अशी जर भांडणं राहिली तर हे खेडं दुर्गतीला जाईल. मनुष्यजातीचं हे पृथ्वी नावाचं जे खेडं आहे, इतकं लहान आहे की, इथं मनुष्यजातीला जगायचं झालं तर अध्यात्माचा म्हणजे 'सर्वभूती समानत्व'चा एकात्म दृष्टिकोन सर्वाठायी आपल्या नैतिक जीवनात पाहिजे. तंत्रज्ञान त्याच्याशी विसंगत नाही. देह आहे, देहास तंत्रज्ञान पाहिजे, देह भजनाने जगू शकत नाही. तो भोजनानंच च जगू शकतो.

**प्रश्न - हे बरोबर आहे. मनुष्यास धर्म हवा. पण या आधुनिक काळात कोणत्या स्वरूपाचा हवा?**

**उत्तर -** असं आहे, की मनुष्य हा अपरिपक्व आहे. पूर्णतेकडे त्याचा ओढा ही जी द्विधा मन:स्थिती आहे, ही नुसत्या रशियातच नाही, सगळीकडे ही मन:स्थिती आहे. एका बाजूला माणसाला भौतिकतेचं प्रचंड आकर्षण आहे आणि दुसऱ्या बाजूला, दिसणाऱ्या जीवनाच्या पलीकडे काय आहे, याच्याबद्दलचा ओढा आहे, कारण तिकडे जायचंच आहे. त्या अव्यक्तामधे सगळ्यांनाच लीन व्हायचं आहे. त्यामुळे त्याचेही आकर्षण आहे. हा माणसातला 'ॲबीव्हॅलन्स' (निरंतर । संघर्ष) वा द्विधा मनःस्थिती नित्य आहे.

**समारोप** - शास्त्रीजी, आपण फार मूलगामी असे विचार आकाशवाणीच्या श्रोत्यांसाठी व्यक्त केलेले आहेत. आपण या ठिकाणी आलात, आपल्या विचारांचा लाभ आपण आम्हाला आणि आकाशवाणीच्या सर्व श्रोत्यांना दिलात - याबद्दल मी आपले आभार मानतो आणि असे योग वारंवार यावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मराठीचे समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी आकाशवाणी केंद्र, औरंगाबादसाठी दि. ३ फेब्रुवारी, १९८५ रोजी ध्वनिमुद्रित केलेली मुलाखत. अवधी ३२ मिनिटे ३३ सेकंद)**

ooo

४६

# बुद्धिप्रामाण्यवाद : एक कठीण वसा

मुलाखतकार - **माधव गडकरी**

*(दि. २७ जानेवारी १९८७ रोजी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ८७ व्या वर्षात पदार्पण केले. महाबळेश्वरच्या प्रकाशक परिषदेहून परतताना वाई येथे त्यांची भेट घेऊन अभीष्टचिंतन केले, त्यांचे आशीर्वाद घेतले आणि त्यांच्या प्रिय विषयावर त्यांची एक मुलाखत घेतली. सरकारची मतांसाठी वाढत चाललेली धर्मपरायणता, वैयक्तिक जीवनातील वाढत्या समस्यांमुळे समाजाची विविधधर्मीय मंदिरांकडे चाललेली धाव पाहिली की या समाजाला बुद्धिप्रामाण्यवादाकडे कसे न्यायचे असा प्रश्न मनात येतो. या विषयाची चर्चा तर्कतीर्थांशी या भेटीत केली. वेदशास्त्रसंपन्न, तर्कतीर्थ म्हणून गौरवलेले शास्त्रीजी काय सांगतात हे तरी लोकांना महत्त्वाचे वाटावे. प्रश्नोत्तररूपाने ही मुलाखत पुढे देत आहे.)*

**प्रश्न - शास्त्रीजी, तुम्ही मूळ रॉयवादी आहात आणि त्यामुळे बुद्धिप्रामाण्यवादाचा वसा स्वीकारणे तुम्हाला कठीण वाटले नाही, वेगळे वाटले नाही; परंतु तुम्ही अतिशय अल्पमतात आहात आणि लोक मात्र धर्म आणि देव यांच्यामागे लागलेले दिसतात. त्यांना तुमचा बुद्धिप्रामाण्यवाद कसा समजून सांगाल?**

**उत्तर -** धर्म अगर देव हे काही बुद्धिवादी दृष्टिकोनातून निर्माण झालेलं सत्य नाही. भास्कराचार्यांनी दशांक पद्धती शोधून काढली आणि ती जगानं स्वीकारली. कारण ते सत्य होतं. वाफेतून ऊर्जा निर्माण होऊ शकते हे विज्ञानानं सिद्ध होणारं सत्य. असं सत्य हे वैश्विक असतं. गणेश, हनुमान, देवी यांची देवस्थाने-तीर्थस्थाने ही कल्पिते असत. वास्तव सत्य हे बुद्धीने तपासता येतं; परंतु धर्माचे तसे नाही. हिंदूंचे वेद मुसलमानांना मान्य होण्याचं कारण नाही, त्यांचं कुराण हिंदूंना मान्य होत नाही किंवा ख्रिश्चनांचं बायबल हिंदू अगर मुसलमानांना मान्य होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. याचे कारण धर्म हे काही गणिती सत्य नाही. वस्तुशोधावरून निघालेले सत्य नाही आणि देव हे सर्व मान्य करतात. धर्म आणि देव मनुष्याने संरक्षणाचे निर्माण केलेले सर्व मानसिक उपाय आहेत.

**प्रश्न - तुम्ही ईश्वर मानता काय?**

**उत्तर -** नाही. मी ईश्वर अगर देव मानीत नाही. काही वर्णन करून आपण देवाचं रूप ठरवतो. धर्माप्रमाणे देव हेसुद्धा बुद्धीनं शोधलेलं सत्य नाही. मी काही देवळात जात नाही. देवाबद्दलची लोकांची समजूत काय आहे? देव सर्वज्ञ आहे. तो सर्वशक्तिमान आहे. तो जर सर्वशक्तिमान आहे, तर माणसाचे मागचे कर्म पुसून टाकून त्यास नवा जन्म देताना त्याचं भलं का करीत नाही? तो सर्वव्यापी आहे अशी एक समजूत. तो पूर्ण निर्दोषी आणि कृपावंत आहे, न्यायी आहे. तो न्यायी आहे हे काही जगातील परिस्थितीवरून सिद्ध होत नाही. कोणत्याही तऱ्हेची समान वाटणी तो करीत नाही. काही लोकांच्या वाट्यास आलेले दुर्दैव दूर करीत नाही. तो करुणानिधी, करुणेने दुःख पुसून टाकतो असे दिसत नाही. देव हा सत्य रूपाने कुठेही नाही.

**प्रश्न - बुद्धीला अगम्य असे काही या जगात आहे असे म्हटले जाते. त्याला नियती, योगायोग अगर नशीब असे काही नाव द्या. या तिन्ही गोष्टी तुम्ही मानता काय?**

**उत्तर -** असं मानणं ही वरच्या विचाराच्या अगदी विरुद्ध अशी गोष्ट ठरेल. आता माझ्या आयुष्याबद्दल विचार करायचा तर दोन गोष्टींचा विचार मनात येतो. माझ्या आयुष्यातील सर्वात दुर्दैवी घटना म्हणजे माझ्या पत्नीचं निधन. तिला रक्तदाबाचा त्रास होता. त्यामधून तिचं निधन झालं. आता हा त्रास अनेकाना असतो आणि तो रोग असलेले अनेकजण अनेक वर्षे जगतात. आता या घटनेला नियती, योगायोग अगर नशीब मानायचे का? आज वैद्यकीय शास्त्र इतके पुढे गेलेले आहे की असे मानणे बरोबर नाही. मी खानदेशातून वाईत आलो. अनेकजण माझ्यासारखे विद्यार्थी म्हणून आले. दोन ते सहा वर्षे ते वाईत राहिले आणि परत गेले. मी कायम राहिलो. ही नियती मानायची काय? नाही. मला येथील काम आवडले म्हणून मी राहिलो. आज माझी मुले अमेरिकेत स्थायिक झाली आहेत. यामागे नियतीची इच्छा होती असे म्हणणे बरोबर होणार नाही. कारण तेच स्पष्टीकरण देऊ शकतात. अमेरिकेत इलेक्ट्रॉनिक्समध्ये मुलगा पीएच. डी. झाला, त्याला कंपनीने चांगली नोकरी देऊ केली, त्यामुळे तो तेथे राहिला. ती देऊ केली नसती तर तो परत आला असता. अशा प्रत्येक घटनेमागे कार्यकारणभाव असतो. याउलट देव जर माणसाचे संरक्षण करतो असे म्हणतात, तर गणेशोत्सवासाठी अगर देवाच्या यात्रेसाठी निघालेली बस बुडते आणि माणसं मरतात असे का?

**प्रश्न : बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा जाहीरनामा तुम्ही लोकांपुढे ठेवावा अशी माझी तुमच्याकडे मागणी आहे. देव मानणारे काही लोक स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी समजतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जुन्यानव्यांचा मेळ घालणारे म्हणजे देव आणि बुद्धी एकत्र आणणारे असा गैरसमज काहींचा आहे. तो एकदा घालविण्याची गरज आहे. तुम्ही देवळात जात नाही असं सांगितलं आहे; परंतु तुम्ही काही ठिकाणी देवळात गेलेले आहात?**

**उत्तर :** देवळात गंमत म्हणून जातो. नुकताच गोव्यात काणकोणला गेलो होतो. तेथे

मल्लिकार्जुनाच्या मंदिरात गेलो. ते देवळाचं आवार, आजूबाजूचा निसर्ग यामुळे प्रसन्न वाटलं. धार्मिक भावनेनं मी देवळात जात नाही, ऐतिहासिक भावनेनं जातो. वास्तुशास्त्राच्या आकर्षणानं जातो. वाईच्या ठोल्या गणपतीच्या मंदिराची भिंत पाडावी अशी मागणी आहे. ती साडेतीन फूट रुंद आहे. वास्तुशिल्प म्हणून ती ठेवावी, अशी माझी भूमिका. आता पंढरपूरच्या देवळाला भूवैकुंठ म्हणतात. पृथ्वीवरचं ते वैकुंठ आहे. परंतु किती अस्वच्छ ! नामदेवाची पायरी पाहताना त्याचे अभंग आठवतात. परंतु म्हणून देवाचे अस्तित्व सिद्ध झाले असे वाटत नाही.

**प्रश्न - तुम्ही कधी पंचांग उघडता का? दिवस, मुहूर्त पाहून गोष्टी करता का?**

**उत्तर -** मुळीच नाही.

**प्रश्न : लोक हे सार कशासाठी करतात? हल्ली मुंबईत बँकात मजल्यामजल्यावर सत्यनारायणाच्या पूजा चालतात. धर्म-देव यांच्या संगतीनं लोकांची उत्सवप्रियता भरमसाठ वाढत चालली आहे. त्याची कारणमीमांसा मग कशी करावयाची?**

**उत्तर :** याचे दोन विभाग पडतात. असं केल्यानं फळ मिळतं, पुण्य मिळतं, कल्याण होतं असा एक विचार आहे. त्यामुळे सश्रद्ध माणसं त्यात सामील होतात. पंढरीची वारी, काशी यात्रा, एकादशी, संकष्टीचा उपवास, सत्यनारायणाच्या पूजा त्यामधून येतात. पापं नाहीशी होतात अशी एक समजूत असते. मला तसे काही दिसत नाही. गंगेत लोक स्नान करतात, त्यामुळे पुण्य संपादन होते असे नाही. काहींना मानसिक स्वास्थ्य मिळत असेल. खोल व्यथा असलेल्यांना उल्हसित वाटत असेल. मनोविश्लेषणाचा हा भाग आहे. याचे पुन्हा सामाजिक आणि वैयक्तिक असे दोन भाग आहेत. वैयक्तिक कर्मकांडे करणाऱ्यांना देव भेटतो असे मला मुळीच वाटत नाही. सामुदायिक स्वरूप काही वेळेस आनंददायक वाटते. सामुदायिक प्रार्थना, कीर्तन, यात्रा यामुळे जनसामान्यांना बरे वाटते. शेवटी हे सर्व मानसिक उपचाराचे भाग आहेत. प्रत्येक माणसाला जीवनात काही व्यथा असतात. त्यावर तो औषध शोधीत असतो. डॉक्टराकडे जावे तसा तो देवाकडे जातो. जप, उपवास, भजन, व्रत करून आपले प्रश्न सुटतील असे त्यास वाटत राहते. खरे पाहता परिस्थिती बदलल्याने ते सुटत असतात. परंतु त्याचे श्रेय देवाला मिळते.

दुसरा विभाग नैतिक सदाचरणाचा आहे आणि माणसाला त्याची गरज आहे. माणूस हा सामुदायिक प्राणी आहे. दुष्ट कृत्य टाळून, तोच संस्कृती करीत चांगल्या तऱ्हेनं जगू शकतो. आपली कर्तव्ये पूर्ण करीत माणूस स्वास्थ भोगू शकतो. माणसाच्या नैतिक जीवनाला दोन आधार आहेत. १. त्याची गरज आहे. २. सत्याचे मूल्य. करुणेचे मूल्य याला मानवी जीवनात मोठे स्थान आहे. माणसाची आयुष्यातील काही कर्तव्ये असतात. मुलाबाळांचे संगोपन, कौटुंबिक जबाबदाऱ्या या त्याला टाळता येत नाहीत. त्यासाठी तो खस्ता खातो. कुटुंबसंस्था टिकविण्याची गरज आहे. मानवसमाजाची चांगल्या तऱ्हेने धारणा होण्यासाठी ज्या तऱ्हेची जीवन-पद्धती अंगिकारावयास हवी त्यात अंतिम नैतिक मूल्यांना फार महत्त्व आहे. या मूल्याचं



वाय १७८-३०

समर्थन बुद्धिवादानं करता येतं. काही जण ईश्वराच्या, धर्माच्या आधाराने करतात. परंतु त्यात परलोकाचं भय असतं. तिथे चूक होते. कारण परलोक अस्तित्वातच नाही हे निखळ सत्य आहे. नीतीबद्दलचा ऊहापोह हा बुद्धीने करता येतो. धर्म आणि ईश्वर याबद्दलचे भय मानून जे नीतीचा आधार घेतात ते टिकत नाहीत. त्यांचे वर्तन दुटप्पी असू शकते. ईश्वर, धर्म हे सारे अदृश्य, पारलौकिक, त्याच्या मागे लागण्यापेक्षा जन्मापासून उत्तम नैतिक जीवनासाठी शिक्षण देणे हे महत्त्वाचे आहे. धर्म आणि ईश्वराच्या भयाने नव्हे, तर शिक्षणाने जी विवेकबुद्धी तयार होते, त्यामधून निरोगी मने चांगली तयार होऊ शकतात. नीतिमान पिढ्या निर्माण होऊ शकतात. शिक्षण ही खरी मानवी उत्कर्षाची वरदायिनी आहे. माणुसकीचा तिला स्पर्श असावयास हवा. माता ही या प्रक्रियेतील पहिली शिक्षिका, बाळाचं शिक्षण कसं चाललंय या प्रश्नाचं उत्तर, ज्या घरात व्यवस्थित मिळतं ते घर सर्वात चांगलं. स्त्रीकडे दुर्लक्ष झालं ही समाजानं केलेली फार मोठी चूक. गुन्हेगार का निर्माण होतात, अणुयुद्धाचं भय राष्ट्रांना का वाटतं? तमाम मनुष्यजातीच्या शिक्षणाचा प्रश्न सुटला नाही यात त्याचं रहस्य साठवलेलं आहे. स्त्रियांना जे राष्ट्र अशिक्षित ठेवतं तिथं अंधश्रद्धा, परलोकविचार वाढीस लागतो. जुन्या तत्त्ववेत्त्यांनी हे लिहून ठेवलं; परंतु कुटुंबसंस्थेनं त्याची कार्यवाही केली नाही. पुढील १०० वर्षात हे परिवर्तन झालं तर देवळे कमी होतील, त्यांची जागा विज्ञानसंस्था घेतील आणि अणुयुद्धाचा जगाला असलेला धोका टळेल.

**प्रश्न - असा धोका आहे, असं तुम्हाला खरोखरच वाटतं काय?**

**उत्तर -** होय. सत्ताधाऱ्यांच्या हातून मोठ्या चुका होऊ शकतात. हिटलर आणि स्टालिन हे जगानेच उभे केले. त्यांनी अनेक भयानक गोष्टी केल्या. देवाला त्या थांबविता आल्या नाहीत. ईश्वर नावाचा कुणी खरोखरच अस्तित्वात असता तर महायुद्धेच झाली नसती. आज चालणाऱ्या कत्तली त्याच्या करुणेनं थांबल्या असत्या.

**प्रश्न - भारत सरकार, तेथील राज्यकर्ते किंवा राज्यांचे सूत्रधार हे काही बुद्धिप्रामाण्यवादी नाहीत. परंतु त्यांनी घटनेने दिलेले धर्मातीततेचे ब्रीद स्वीकारले आहे. असे असताना धार्मिक समारंभात राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यांचे प्रमुख भाग घेतात हे कितपत बरोबर आहे?**

**उत्तर -** हे साफ चूक आहे. धर्म ही खाजगी बाब आहे. खाजगी जीवनात, मनाच्या स्वास्थ्यासाठी, आरोग्यासाठी हवे, तर त्याने त्याचे आचरण करावे; परंतु सार्वजनिकरीत्या त्याचे प्रदर्शन करणे आणि त्यात राज्यकर्त्यांनी भाग घेणे हे चूक आहे. मंत्र्यांचे नारळ फोडणे हे चूक, प्रत्येक धर्माच्या उत्सवात भाग घेणे हे चूक, आणि हे त्याचे दूरदर्शनवरील प्रदर्शन तर साफच चूक. या प्रसारातून समाजात धर्मप्रधानता वाढविण्याची घोडचूक सरकार करते, आणि मग राष्ट्रीय ऐक्याला तडे पडतात. म्हणून राज्यकर्ते ओरडत बसतात. यात धर्माची 'अपीज्मेंट'च दिसते. राजकीय पक्षांची गरज म्हणून ती केली जाते. परंतु त्यामधूनच धर्मवेडेपणाची वाढ होत

राहते, समाज दुभंगतो. शिक्षणाने केलेले संस्कार धर्मपरायणता धुऊन टाकते. जोतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जी शिक्षणासाठी चळवळ केली, ती यामुळे वाया जाण्याची वेळ आली आहे. आज महाराष्ट्रात बुद्धिवादाची कास फारच थोडे लोक धरत आहेत. इंग्रजांनी हे उच्च शिक्षणाचे लोण भारतात आणले. लोकमान्य टिळक आणि गोपालकृष्ण गोखले यांनी भारतीय स्वातंत्र्याचा पुकारा केला, परंतु आधी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. फर्ग्युसन कॉलेज काढले. गोखले यांच्यासारख्यांचा मोठेपणा गांधीजींनी जाणला. याचे कारण हा शैक्षणिक दृष्टिकोन. माणूस पटावा लागतो. पंजाबराव देशमुखांनी विदर्भात मोठे शैक्षणिक कार्य उभारले. हे सारे समाजचिंतक होते. धोंडो केशव कर्व्यांपर्यंत सर्वांनी शिक्षणाला महत्त्व दिले. आज नेमके त्या शिक्षणक्षेत्राचे अधःपतन झाले आहे, त्यामुळे समाज कर्मकांडापासून दूर जाण्याऐवजी जवळ जातो आहे.

इहवादी जीवन पद्धती स्वीकारणे, परलोक अस्तित्वातच नाही, हे मनात बिंबवणे, हा यावरचा एकमेव मार्ग आहे. सर्वधर्मीयांनी ही इहवादी पद्धती स्वीकारण्याची गरज आहे. तेव्हा ऐक्य, समानता, बुद्धिप्रधानता समाजात निर्माण होईल.

यासाठी इहवादी लोकांनी एकत्र यायला हवे. व्यापार, शिक्षण आणि सांस्कृतिक जीवन या तीन क्षेत्रात इहवादी विचारसरणीचा नुसता, स्वीकार नव्हे, तर अंमलबजावणी करावयास हवी यासाठी जीवनदृष्टीची गरज आहे. विविध राजकीय धर्माचे समाज, राजकीय जीवनात नव्या निष्ठा घेऊन एकजीव व्हायची गरज आहे. त्याकरिता सर्व धर्मीयांचे धार्मिक स्तोम बंद व्हायला हवे.

गौतम बुद्धाचं मोठं कार्य असं की त्यांनी प्रथम हा व्यापक धर्माचा विचार मांडला. धर्माला इहवादी त्याने बनविले, डॉ. आंबेडकरांनी त्याला समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदेशास्त्राची बैठक दिली. धार्मिक तत्त्वज्ञानाची दिली नाही परंतु त्यांच्या चाहत्यानी डॉ. आंबेडकरानाच देव बनविल्याने ती वैचारिक पातळी राहिली नाही. या पृथ्वीवर जे आहे, त्याचा मी विचार करीन या एका सिद्धान्ताने सारे जोडले जावयास हवेत. विज्ञान युग अवतरलेले असताना कर्मकांडात जे गुंततात, ईश्वरावर आपल्या भवितव्याची जबाबदारी जे टाकतात, ते स्वतःची फसवणूक करतात.

तर्कतीर्थांच्या या विचारदर्शनाने बुद्धिप्रामाण्यवाद्यांची भूमिका तरी पूर्णपणे स्पष्ट व्हावी. मुस्लिम आणि ख्रिश्चन ह्या दोन्ही समाजातील बहुसंख्य जनता त्यांच्या धर्मगुरुंच्या जोखडाखालीच आहे. धर्म हा लोकशाहीला पोषक नाही असा विचार वसईजवळच्या एका कार्यक्रमात मी व्यक्त केला; तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या माझ्या कॅथॉलिक धर्मगुरू मित्राने त्याचा उत्तरपक्ष केला, आश्चर्य असे की, नंतर एका वाचकाचे पत्र आले आणि त्याने त्या धर्मगुरूप्रमाणेच प्रतिपादन केले होते. जे धर्म मानतात, ते धर्मप्रधान लोकशाही मानतात आणि धर्मप्रधान मतदान झाले तर मात्र तक्रार करतात! गोवा हे याचे उत्तम उदाहरण आहे. लोकशाही आणि धर्मातीतता यांचा विचार जोपर्यंत बुद्धिप्रामाण्यवादाच्या चौकटीत होत नाही तोपर्यंत खरी लोकशाही, खरी धर्मातीतता आणि वैयक्तिक जीवनातील विज्ञाननिष्ठ इहलोकी भूमिका मूळच धरणार नाही. हा वसा कठीण

आहे. मंदिर दिसले की हात जोडले जातात हा संस्कार. देवाशी वाकडे कशाला, तो पाठीशी असलेला बरा. हा सोयीचा विचार, यात आजचा माणूस अडकलेला आहे. परंतु त्यामुळे तो दुर्बल बनतो आहे यामध्ये काही सुवर्णमध्य आहे काय याचाही विचार केला. तो नाही, परंतु हा प्रवास कठीण वाटत असेल तर पायरीपायरीने जायला कोणती हरकत आहे? धर्म आणि देव यांचे स्तोम थांबविण्यास सर्वांनी मदत करावयास हवी. शाळांना फळे हवे असताना लाखोंची नवी नवी मंदिरे बांधली जातात, ती थांबवावयास हवीत. धर्म आणि देव यांना घरापुरते आणि व्यक्तीपुरते मर्यादित ठेवण्यास आपण का तयार होऊ नये? कार्यालयातील सत्यनारायणाच्या पूजांइतका असत्यपणा दुसरा नाही. ज्याच्याकरिता वेतन घेतले जाते ते काम करण्याचे सोडून कर्मचारी सत्यनारायणाच्या महापूजा कार्यालयात आणि ऑफिसच्या वेळात करतात. त्या थांबल्या पाहिजेत. मंत्र्यांनी सार्वजनिक कार्यक्रमातील पूजाअर्चा थांबविण्याची अतिशय गरज आहे. दूरदर्शनचे सर्वधर्मप्रदर्शन तर हास्यास्पद आहे. आज हे सारे मर्यादा सोडून पुढे चालले आहे, म्हणून बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीच्या कक्षा शास्त्रीजींच्या मुखातून एकदा स्पष्ट केल्या आहेत.

जितके पटेल तितके तरी उचलायला काय हरकत आहे?

**(रविवार, लोकसत्ता, दि. १५ फेब्रुवारी १९८७)**

❍❍❍

४७

# तत्त्वज्ञानातून मी बाहेर पडलो आहे

मुलाखतकार - **डॉ. प्रदीप गोखले, डॉ. राजेंद्र व्होरा आणि डॉ. सदानंद मोरे**

*(हिंदू धर्म हा एक सर्व विचारांचा महासमन्वय आहे, असं सांगणारे तर्कतीर्थ दुसरीकडे सध्याच्या हिंदुत्ववादी लाटेला माथेफिरूपणा म्हणतात. शंकराचार्यांची महती गाताना बुद्धाची चार अर्धसत्येच खरी असल्याचं सांगतात. बुद्धिवंतांच्या या भीष्माचार्यांच्या जीवननिष्ठांबद्दल एक स्वच्छ प्रदीर्घ मुलाखत. ती घेतली आहे सर्वश्री डॉ. प्रदीप गोखले, डॉ. राजेंद्र व्होरा आणि डॉ. सदानंद मोरे यांनी. ती सन १९८८ च्या 'अक्षरदीप' दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती.)*

आधुनिक भारतातील एक महत्त्वाचे दर्शनकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. गेली तीस वर्षे महाराष्ट्रातल्या विचारविश्वावर त्यांचा प्रभाव आहे. १९०१ मध्ये जन्म. प्रथम घरी, नंतर वाईच्या प्राज्ञपाठशाळेत केवलानंद सरस्वतींकडे. मधल्या काळात काशीच्या पंडितांकडे प्राचीन शास्त्रांचे सखोल अध्ययन. त्याचबरोबर धर्माकडे सनातनी नव्हे, तर परिवर्तनाभिमुख दृष्टीने पाहणारे राष्ट्रवादी, समाजवादी दृष्टिकोनाचे वारे डोळसपणे अंगावर घेणारे, पचवणारे जिवंत व्यक्तिमत्त्व. त्यातूनच भारतीय तत्त्वज्ञानाची विद्वत्तापूर्ण तरीही ताजीतवानी चिकित्सा तरुण व प्रौढ वयातच केली. 'आनंदमीमांसा' 'जडवाद अर्थात् अनिश्वरवाद' (निरीश्वरवाद), 'हिंदुधर्माचीसमीक्षा' हे ग्रंथ त्याची साक्ष.

कोणत्याही ज्ञानाकडे खुलेपणे पाहण्याचा स्वभाव व सूक्ष्मदर्शी बुद्धी यामुळे विविध पाश्चात्त्य विचारवंतांचाही सखोल अभ्यास. अनेकांचा प्रभाव स्वीकारूनही कोणाच्याच आहारी न जाणारं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व यातून साकार झालं. टिळकांचे ऋण मानून मानवेंद्रनाथ रॉय व त्यानंतरही महात्मा गांधी यांचे राजकीय नेतृत्व स्वीकारून राजकीय व सामाजिक चळवळीला विशिष्ट योगदान. तो प्रभाव स्वीकारतानाही त्याच्याकडे साक्षेपी चिकित्सक दृष्टीने पाहणारे लक्ष्मणशास्त्री शिल्लकच राहतात.

अशा या तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाची धार स्वातंत्र्यानंतर जरा बोथट झाल्यासारखी वाटते. पण एकाअर्थी स्वतंत्र भारतात कठोर नकारात्मक क्रांतिकारकतेपेक्षा बेरजेचे राजकारण व

विश्लेषणापेक्षा संश्लेषक, समन्वयात्मक दृष्टिकोन यांची निकड निर्माण झाली असावी. यादृष्टीने तर्कतीर्थांचे नंतरचे कार्यही काळाची गरज ओळखणारे, स्वागतार्हच ठरावे. सूक्ष्मता व व्यापकता यांचा संगम हेच त्यांच्या राजमान्यतेचे व लोकमान्यतेचे रहस्य नाही ना? या काळात त्यांच्या कर्तृत्वाची धारा मात्र विशाल झाली. 'नवभारत', 'साहित्य आणि संस्कृती मंडळ, धर्मकोश', 'विश्वकोश' ही तर्कतीर्थांच्या समृद्ध कर्तृत्वाची, चिन्हे आहेत.

पण तरीही तर्कतीर्थांचे विपुल वाङ्मय व राजकीय - सामाजिक कर्तृत्व यांचे अवलोकन करूनही काही प्रश्न अनुत्तरित राहत होते. भारतीय दर्शनावर अधिकारवाणीने लिहिण्या - बोलणाऱ्या तर्कतीर्थांचे स्वतःचे दर्शन कोणते आहे, कोणत्या दर्शनाशी त्यांची जवळीक आहे ते लक्षात येत नव्हते. चाळीस साली हिंदू धर्माची कठोर चिकित्सा करणारा हा विद्वान, अलीकडच्या लिखाणातून, व्याख्यानांतून हिंदू धर्माकडे 'महासमन्वय' म्हणून आदराने पाहताना दिसू लागला होता. त्याच्या या वैचारिक बदलाचा शोध घ्यावयाचा होता. विविध परस्परविरोधी व्यासपीठांवरून सारख्याच मोकळेपणाने वावरताना तर्कतीर्थांची स्वत:ची भूमिका कोणती हा प्रश्न राहत होता. हिंदुधर्माला 'महासमन्वय' म्हणत असतील तर हिंदू मूलतत्त्वांकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन कोणता, हा प्रश्न पडत होता.

असे विविध प्रश्न घेऊन आम्ही शास्त्रीबुवांकडे गेलो. अठ्ठ्याऐंशी वर्षे वय असूनही या चिरतरुण विद्वानाने शांतपणे, प्रसन्नपणे व तरीही ठामपणे साऱ्या प्रश्नांची उत्तरे दिली.

**प्रश्न - डॉ. प्रदीप गोखले, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. सदानंद मोरे, प्रा. गोखले - 'आनंदमीमांसा' हा आपला ग्रंथ तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातले एक महत्त्वाचे योगदान आहे. त्यात आपण संपूर्ण भारतीय तत्त्वज्ञानात विखुरलेल्या दुःखवादावर साक्षेपी टीका केली असून त्यात आढळणाऱ्या अनेक विचारधारांचा आपण वेळोवेळी पुरस्कार केला आहे. त्यापैकी आपला वैचारिक कल कोणत्या विचारधारेकडे आहे ?**

**तर्कतीर्थ -** माझं स्वत:चं मत असं आहे की, बुद्धाने सांगितलेल्या चार आर्यसत्यांमध्ये फार मोठं तथ्य आहे. या आर्यसत्यांमधला अष्टांग मार्ग मनुष्याने स्वीकारला नाही, तर तो दु:खात सापडून नाहीसा झाला असता. सम्यक् आचरणाची माणसाला गरज आहे. योग्य आचरण केले तरच तो आर्थिक जीवन जगू शकतो. ते आर्थिक जीवन मनुष्यात संयम असेल तरच व्यवस्थित राहू शकते. म्हणून परलोक माना, न माना, ईश्वर माना न माना, तुम्हाला या अष्टांग मार्गाची गरज आहे. दु:खनाशाचे उपाय आहेत व दुःखनाश होऊ शकतो ही दोन सत्ये या आर्यसत्यांत आहेत. याकडे पाहिलं की समजलं, की बुद्धाला दर्शन झालं ते देव, देवांचा आवाज ऐकणारा प्रतिनिधी, देवदूत यापैकी कुणाचंच नसून माणसाचा विवेक जीवनाकडे पाहण्याचा बुद्धिवादी दृष्टिकोन तोच माणसाला उपयोगी पडतो, हे दर्शन झालं. या दृष्टीनं मी जीवनाकडे पाहतो. मनुष्याची आई बाजूला गेली तर त्याला किती दुःख होईल? त्याची अर्थोत्पादनाची साधनं काढून ठेवली तर किती उपासमार होईल? अशा रीतीनं मी विचार करतो. म्हणून बुद्धाला दिसलेली चार आर्यसत्यं

ही खरी सत्यं आहेत, अशा निर्णयाला मी येऊन पोचलो आहे.

माझ्या 'आनंदमीमांसे'त आत्तापर्यंत मला महत्त्वाचं वाटलं ते हे की, ''आनंदेत खलु इमानि भूतानि जायन्ते, आनंदेन आनंदेन जातानि जीवन्ति, आनन्दं प्रयन्ति अभिसंविशति'

हा आनंदब्रह्माचा उपनिषदातला विचार वेद, वैदिक कर्मकांड गृहीत धरतो. वैदिक समाज दु:खवादी नहता. बुद्धोत्तर काळातील सर्व दर्शनं ''दुःखत्रयाभिघातात जिज्ञासा, तद्पघातके होतो.'' त्या दुःखत्रयाचा निरास करण्यासाठी साधन कोणते अशा विचारातून आली. हा प्रगल्भ तात्त्विक संस्कृतीतला विचार आहे. मात्र वैदिक संस्कृती, यज्ञसंस्था, वैदिक कर्मकांड उत्पन्न होत असताना सृष्टीकडे एका भावुक दृष्टीनं पाहिलं जाई. म्हणजे या आयुष्यातल्या सगळ्या संकटांबाहेर जाण्याचं साधन या सृष्टीकडे व जीवन सुखमय होऊ शकतं- असा विचार होता. म्हणून उपनिषदांत एके ठिकाणी म्हटलं आहे,

को ह्येवान्यात क:प्राण्यात्

यदेष आकाश आनंद: न स्यात्

म्हणजे, "हा व्यापार सर्वव्यापी आनंद नसता तर कोण श्वासोच्छवास करू शकेल." हा जगण्याचा, अस्तित्वाचा व्यापक आनंद या सृष्टीबद्दलचा व्यापक आदरभाव हा उपनिषदपूर्व वैदिक काळातला दृष्टिकोन आहे. तो उपनिषदोत्तर काळात, अधिक प्रगल्भदशेत कमी होऊ लागला. म्हणून, "भूमा वै सुखम् अस्ति." दास, सोनं- नाणं, जमीन, भार्या असणं यात दुःख आहे; हे सगळं अल्प आहे असा विचार डोकावू लागला. पुढच्या षड्दर्शनांपैकी चार्वाक आणि बार्हस्पत्य दर्शन सोडलं तर बाकी सर्व दर्शनं "जीवन हे दुःखाने भरलेले आहे, या जीवनापलीकडे दुसरं जीवन मिळवलं पाहिजे, किंवा त्याच्याही पलीकडे मोक्ष मिळवला पाहिजे." हा अशाश्वत सृष्टीच्या बाहेर पडू पाहणारा मोक्षवादी दृष्टिकोन आला. परंतु भारतीय राजनीतिशास्त्र, दंडशास्त्र मात्र विवर्गवादी किंवा चतुर्वर्ग पुरुषार्थवादी आहे. म्हणजे धर्म, अर्थ, काम ही तीन उद्दिष्टे माणसाला पहिल्यांदा दिसली. राज्य व शासन व्यवस्था ही त्रिवर्ग साधनेसाठी, लोक यांचेसाठी आहे. म्हणजेच समाजसुधारणा होय. कसातरी समाज टिकला पाहिजे असं नसून तो पुरुषार्थी असला पाहिजे. हे तिन्ही पुरुषार्थ परस्परांवर अवलंबून आहेत. 'मनुस्मृती' व 'कौटिलीय अर्थशास्त्रात' हे सांगितलं आहे. आणि पुढे त्यांना मोक्ष दिसू लागला. त्या मोक्षासाठीही त्रिवर्ग साधना आवश्यक आहे, असं दंडनीतिशास्त्रात म्हटलेलं आहे. हा महत्त्वाचा विचार आहे. हा 'आनंदमीमांसा' संदर्भातील खुलासा.

**डॉ. मोरे : या आनंद कल्पनेच्याच बाबतीतील एक शंका अशी : शंकराचार्यांनी ब्रह्माचे स्वरूप आनंद हे मान्य केले आहे. पण त्यांचे ब्रह्म ही पुरुषतंत्र नसलेली भूतवस्तू आहे. या भूतवस्तूचे आनंद हे स्वरूप असेल तर ते आनंद या मानसिक अवस्थेपेक्षा वेगळे असेल. मग ब्रह्माचे स्वरूप असलेला आनंद व आनंद ही मानसिक अवस्था यांची संगती कशी लावणार ?**

**तर्कतीर्थ -** सत्-चित्-आनंद असे हे स्वरूप आहे. शंकराचार्यांच्या दृष्टीने असत नव्हे, अचिंत नव्हे व अनानंद नहे असं ते एकच एक अखंड रूप आहे. हे अखंड रूप शब्दातीत आहे. म्हणून तुमच्या प्रश्नाचं उत्तर शब्दातीत आहे. कारण ते (ब्रह्म) सूचित होतं, लक्षित होतं. विवेचित करून सांगता येणार नाही. ते 'नेतिनेति' असंच होणार. नकारात्मक दृष्टीतनंच ते सांगता येईल.

हे श्री शांकर अद्वैत, मायावाद या दृष्टिकोनातून सांगतो. पण मायावादाचादेखील नीट, स्वच्छ खुलासा होत नाही. कारण शंकराचार्यांनी बौद्धतत्त्वज्ञ धर्मकीर्ती यांच्या विज्ञानवादाला विरोध केला. धर्मकीर्ती हा बौद्धांच्या योगाचार पंथातला तत्त्वज्ञ. तो आतलं नि बाहेरचं असं मानतच नाहीत. सर्व एकच आहे आणि तेही क्षणिक आहे, तो प्रवाह आहे, असं ते मानतात. त्याचं खंडन करताना शंकराचार्यांनी बाह्य वस्तू आहे असं सांगितलं. जर त्यांच्यासमोर टेबल असता तर त्याच्यावर मूठ हाणून त्यांनी सांगितलं असतं. या भाषेत त्यांनी शारीक भयाच्या नर्कवादात सांगितलं आहे. 'ब्रह्म सूत्रभाष्या'त बौद्धमताचा निरास करताना त्यांनी म्हटलं- नील नाही, बाहेर मग 'बाहेर' शब्द उच्चारलाच कसा?

बाह्य या शब्दाला अर्थ पाहिजे. बाहेर नाही म्हणतो म्हणजे आहे. अशा रीतीने त्यांनी बाह्य पदार्थाचं समर्थन केलं आहे. मग त्याच्या खाली वाचस्पती मिश्रांची 'भामतीटीका' आहे. ते म्हणतात की, "या विधानाचं समर्थन करायला अडचणी आहेत. अनिर्वचनीय आहे" असा हा मायावाद आपल्याला संशयवादाकडे (Scepticism) नेणारा आहे. अनेक गोष्टींचा निकाल लागत नाही. संबंध नाकारण्याची - संबंध अनुपपत्ती वृत्ती उत्तरकाली चार्वाकांनी दाखवली. कार्यकारणाची अनुपपत्ती त्यांनी दाखवली. पुढे 'तत्वोपप्लवसिंह' या ग्रंथात डेव्हिड ह्यूमचीही विचारसरणी आली आहे. श्री हर्षाच्या 'खंडनखंडनखाद्य' या ग्रंथात तर म्हटलचं आहे, की बृहस्पतीचे अनुयायी (चार्वाक), बुद्धाचे अनुयायी आणि आम्ही या बाबतीत एकाच पातळीवर आहोत. अंतर्बाह्य संबंधांच्या बाबतीत हा प्रश्न आहे.

**प्रा. मोरे - आपण सध्या शंकराचार्यांच्या चरित्राचा शोध घेत आहात. शंकराचार्यांनी बौद्ध धर्माचा पाडाव केला असे म्हटले जाते. आता हा पराभव मुख्यत्वे तत्त्वज्ञानाच्या आणि व्यवहाराच्या पातळीवर केलेला असणार. शंकराचार्यांनी तो नेमका कसा केला? कोणती स्ट्रॅटिजी वापरली?**

**तर्कतीर्थ -** तात्त्विक पातळीवर जसे शंकराचार्यांनी बौद्धाच खंडन केलं आहे, तसंच द्वैती हे तात्त्विक पातळीवर मायावादाचं खंडन करतात. परंतु अंतिम निर्णयाला नेत नसतात. व्यावहारिक पातळीवर शंकराचार्यांनी निरनिराळया तत्त्ववेत्त्यांशी वादसभा करून जिंकल्या. ते वक्तृत्वसंपन्न आणि वादकुशल होते. त्यामुळे त्या काळच्या प्रभावी तत्त्ववेत्त्यांना त्यांनी वाकवलं आहे. आणि त्यावेळी वाद ही एक प्रभावी संस्था होती. ती कालपर्यंत होती. या शतकात वाराणसीत वाद होत असत. वाद ही संस्था भारतीय संस्कृतीची महत्त्वाची बाजू आहे. 'बुद्धचरित्रा'त देखील बुद्धाच्या चर्चेचे उल्लेख आहेत. ही प्राचीन काळची संस्था होती. त्यातून एक स्पष्ट होतं की

परस्परांच्या विचाराचा, मतांचा संघर्ष हा बौद्धिक पातळीवर व्हावा. तो राजकीय पातळीवर व्हायचा नाही. राजकीय पातळीवरच्या भारतातला इतिहास हा छळापेक्षा समन्वयाकडेच जास्त जातो. भारतातील राज्यांमध्ये शैव व वैष्णवांचे असे सशस्त्र छळ होत नव्हते. क्वचित झाला असेल. मात्र इथल्या निरनिराळ्या धार्मिक मतांचा संघर्ष वादातून झाला. तटस्थ वादसभेपुढे बाजू मांडायच्या. त्यांचे नियम असत. वादांच्याही तीन पद्धती आहेत. एक, तत्त्वत: बुभुत्सी कथावाद. तत्त्वांच्या जिज्ञासेने केलेला वाद; दुसरा विजिगीषुकथा - परस्परांवर बौद्धिक विजय मिळविण्यासाठी व तिसरा प्रकार - शून्यवादी वितंडा. म्हणजे आमचं काही तत्त्वज्ञान नाही. तुमचं चूक आहे. वादछल वितंडा. या तिन्ही प्रकारात शंकराचार्य प्रतिभाशाली वादपटू होते. याला एक पुरावा आहे. शंकराचार्यांची 'शंकरविजय' नावाची चरित्रं ती फार उत्तरकालीन आहेत. 'आनंदाश्रम संस्कृत उपदेश'- सीरिज मधला विद्यारण्यांचा ग्रंथ. हा सोळाव्या शतकातला आहे. त्यात अनैतिहासिक फार आहे. सहाव्या व सातव्या शतकातील पंडित (अभिनव गुप्त, बाणभट्ट) शंकराचार्यांशी वाद करतात. यातील मंडन मिश्रांची म्हणून सांगितलेली मतं ही मंडन मिश्रांच्या ग्रंथात नाहीत! त्या ऐवजी शंकराचार्यांचे प्रत्यक्ष शिष्य सुरेश्वराचार्य यांचे पाच ग्रंथ उपलब्ध आहेत. 'नैष्कर्म्यसिद्धी', बृहदारण्यक उपनिषदावरचं वार्तिक, तैत्तरीय उपनिषदावरचं वार्तिक, पंचीकरण वार्तिक व शंकराचार्यांच्या दक्षिणामूर्ती स्तोत्रावरचं वार्तिक ('नैष्कर्मसिद्धी', बृहदारण्यकोपनिषद्-भाष्य वार्तिक,' 'तैत्तरीय वार्तिक', पंचिकरण वार्तिक', 'मानसोल्लास') असे पाच ग्रंथ यांत शंकराचार्यांच्या वादपटुत्वाचे उल्लेख आहेत. हा आमचा गुरू कसा? ज्याने सबंध पृथ्वी वादाने जिंकली आहे. हे सूर्यासारखे तळपत आहेत. मोठमोठे वादी भिऊन पळताहेत, असं वर्णन त्यात आहे.

**प्रा.व्होरा : असा जर वादातच पराभव करण्याचा प्रकार असेल तर बौद्ध धर्म भारतात अजिबातच कसा काय शिल्लक राहिला नाही ?**

**तर्कतीर्थ :** भारतातून बौद्ध धर्म कसा गेला हे मोठे गूढ आहे. त्याचा थोडासा उलगडा होऊ शकतो. भारतात बौद्ध भिक्षुकांनी पौरोहित्य केलं नाही. पूजाविधी, लग्न, मुंजी, गृहप्रतिष्ठा, श्राद्ध ही पुरोहित कर्म ब्राह्मणांकडेच राहिली. त्यामुळे गृहस्थाश्रमी बौद्ध भिक्षूंकडे केवळ उपदेश, प्रवचन यासाठीच जायचे. म्हणून परंपरागत धर्म राहिला; बौद्ध धर्म पौरोहित्य न केल्याने परागंदा झाला. मात्र चीन, जपान, श्रीलंका, तिबेट, ब्रह्मदेश या बाहेरच्या जगात तो पौरोहित्य करायला लागला म्हणून टिकला. पुरोहित संस्था पक्की केली की धर्म टिकला. भारतात पुरोहित संस्था ब्राह्मणांकडेच राहिली, म्हणून बौद्ध धर्म गेला अशी एक उपपत्ती मी सांगतो. कोंक्षे नावाचा प्रसिद्ध जर्मन बौद्ध पंडित आहे. त्याच्याशी माझी चर्चा झाली. तो ब्राह्मण्याच्या विरुद्ध. त्यालाही मी हेच सांगितलं.

**प्रा. गोखले - जैनांमध्ये पुरोहित जैनांचेच होते ?**

**तर्कतीर्थ -** नाही. परंतु जैनांचे गृहस्थाचार अतिशय कडक आहेत. त्यामुळे त्यांचा विस्तार झाला नाही, तसा नाशही झाला नाही. जैनांकडे कर्मकांडासाठी ब्राह्मणच जातो, हे मी पाहिले आहे. ते टिकले पण किती प्रमाणात? बौद्ध धर्म फार विस्तारला होता. महाराष्ट्र हे बौद्धस्थान होतं. बौद्धांचे महत्त्वाचे विहार कोरले आहेत. अजिंठ्यासारखी महत्त्वाची कला बौद्धांचीच. दक्षिणेत कांचीत बौद्ध, जैन मठ आहेत. तत्त्वज्ञानाच्या बाबतीत गौडपादांवर (शंकराचार्यांचे गुरू) बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे. गौडपादांच्या अनेक कारिका बौद्ध तत्त्वज्ञानातील कारिकांशी जुळणाऱ्या आहेत, असं विधुशेखर भट्टाचार्यांनी दाखवून दिलं आहे. एक काहीतरी 'सत्य' माना एवढंच झालं की त्यांचं (बौद्धांचं) आणि आमचं बाकी सर्व जमतं एवढाच शंकराचार्यांचा शेवटी युक्तिवाद उरतो. मिथ्या म्हणण्यासाठी कोणतेतरी एक सत्य मानावं लागतं असं त्यांचं म्हणणं. शून्यवाद-विज्ञानवादाच्या

खंडनात (ब्रह्मसूत्र भाष्य) व गौडपादकारिका भाष्यात शंकराचार्य म्हणतात- "एवढंच तुमचं आमचं जमत नाही."

**प्रा. मोरे - शंकराचार्यांना 'प्रच्छन्न बौद्ध'म्हणतात, ते याच दृष्टीने ना?**

**तर्कतीर्थ -** आचार्यांना प्रच्छन्न बौद्ध म्हटलं,, ते मुख्यतः द्वैताद्वैतवादी भास्करानं ब्रह्मसूत्राच्या भाष्यात म्हटलं. ते शंकराचार्यांनंतर पन्नास वर्षांनी झाले. रामानुजाचार्यदेखील शंकराचार्यांना प्रच्छन्न बौद्ध म्हणतात.

**प्रा. गोखले - मागे 'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदे'च्या स्थापनेवेळी भेटला होता, त्यावेळी तुम्ही सहज म्हटलं होतं, की नागार्जुनाच्या भूमिकेसारखी तुमची भूमिका आहे. म्हणजे वेगवेगळ्या भूमिकांमधल्या त्रुटी दाखवून देणं. कुठलीच भूमिका अंतिमतः टिकत नाही, हे दाखवणं हा त्या भूमिकेतला महत्त्वाचा भाग आहे. तुमच्या या उद्‌गारांमुळे तुमच्या तात्त्विक भूमिकेवरही प्रकाश पडतो असं वाटतं. हे जरा विशद करून सांगाल का? तुमच्या या वेगवेगळ्या भूमिकांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे?**

**तर्कतीर्थ -** पहिल्यांदा असं, विश्वाचं जे माणसाला दर्शन होतं, प्रत्यक्ष इंद्रियांनी जो अनुभव येतो, तो सापेक्ष आहे. आपल्या इंद्रियरचनेच्या अपेक्षेने हे अनुभव येतात. आपल्या शरीररचनेच्या सापेक्ष वस्तुदर्शन आहे. जसे निरनिराळे आरसे निरनिराळे आकार दाखवतात, तसे इंद्रिय हे निरनिराळे आरसे आहेत. ते सृष्टीचे निरनिराळे गुण दाखवतात. म्हणून सृष्टीचं सत्य अस्तित्व-वास्तव रूप याबद्दल माणसाला बरोबर प्रत्यय येईल असं काही साधन आहे का ? हाच प्रश्न आहे. म्हणून ज्या काही तत्त्वज्ञानात्मक विचारसरण्या आहेत, त्या विचारांचा आनंद देतात. अनुभवांशी काही बाबी जमतात, परंतु सगळे प्रश्न त्याच्याने सुटत नाहीत, असं एकंदर लक्षात येतं. उदाहरणार्थ, कार्यकारणभावाच्या बाबतीतला मुद्दा ह्या व्याप्ती Induction या तत्त्वाच्या बाबतीत चार्वाक, ह्यूम यांचा व आता नव्या Quantum Physics यांचा आक्षेप आहे. नव्या विचारानुसार Randumness महत्त्व आहे. म्हणजे नियम कुठे बदलतो, हे संभावनेवरून

लक्षात येतं म्हणून आता सर्व नियम अपवाद आहेत अशा तऱ्हेचं आधुनिक - भौतिक विज्ञान आपल्याला दाखवत आहे.

या भौतिक विज्ञानामुळे सापेक्ष असलेलं जग अधिक विस्तारानं समजू लागलेलं आहे. जीवविज्ञानात अलिकडे क्रांती झाली की त्यायोगे मनुष्याची जग ओळखण्याची जन्मजात पात्रता ती त्याच्या जीव स्वरूपाच्या मूळच्या कणापासून आली आहे, असं सिद्ध होतं म्हणजे पूर्वानुभव धरून ही पात्रता येते. उदाहरणार्थ, बालक एकदम दूधच ओढतं, दुसरं काही नाही. पूर्वानुभव आहे; ते भितं - पूर्वानुभव आहे, ते हसतं- पूर्वानुभव आहे. नाहीतर भिणं आणि हसणं हे पूर्वानुभवाशिवाय शक्य नाही. म्हणजे फार मोठा अनुभव घेऊन आपले बीजऋण आले आहेत. आपल्या बीजकणांनी डोळा, नाक रचलं. ही रचना इतकी सूक्ष्म आहे की ती कितीही तपासली तरीही ते आपल्याला रचता येणार नाही. ते बीजकणच ही रचना करू शकतात. ही कुशलता त्यांनी संपादिली आहे, मागच्या बीजकणांकडून. एकपेशीय जीवापासून अगणित बहुपेशीय जीवांपर्यंत हा जीवात्मा अनुभव घेत आला आहे.

असं अलीकडे ज्ञान वाढतंय, म्हणून माझं म्हणणं असं की तत्त्वज्ञानापासून मी बाहेर पडलो आहे. तत्त्वज्ञानानं मला विचार दिला आहे. तत्त्वज्ञान मी सोडत नाही. मात्र तत्त्वज्ञान हे जे जे ज्ञान मिळेल त्याच्यावर उभं राहतंच. आजचं जे ज्ञान त्याच्यावरही तत्त्वज्ञान होतंच, परंतु विज्ञान वाढतंय, ते थांबणार नाही असं नाही. मध्ययुगात जसं शेकडो वर्षं ज्ञान थांबलं, तसं ते आता थांबणार नाही. पण ते अजून विश्रांती घेत नाही.

**प्रा. गोखले - एक तर्कशास्त्रविषयीचा प्रश्न. भारतीय तर्कशास्त्र हा आपला व्यासंगाचा विषय. पाश्चात्त्य तर्कशास्त्राचाही आपला अभ्यास आहे. बऱ्याचदा भारतीय व ग्रीक तर्कशास्त्र यात तुलना केली जाते व त्यांच्यात मूलभूत साम्य आहे असं सांगितलं जातं. पण त्यांच्यात काही मूलभूत फरकही आहेत का?**

**तर्कतीर्थ -** आहे. ॲरिस्टॉटलने जे सोळा-सतरा Valid Moods सांगितले. ते पृथक्करण भारतीय तर्कशास्त्रात नाही. भारतीय तर्कशास्त्रात अन्वयी-व्यतिरेकी असे दोनच प्रकार आहेत. परंतु व्याप्ती संकल्पना ही ग्रीक तर्कशास्त्रात नाही. हे भारतीय तर्कशास्त्राचं वैशिष्ट्य आहे.

**प्रा. मोरे - तुमचं श्रीकृष्णावरचं लिखाण वाचलेलं आहे. एक ऐतिहासिक व्यक्ती म्हणून श्रीकृष्णाचं मूल्यमापन आपण कसं कराल?**

**तर्कतीर्थ -** असं आहे, पुराण कथांच्या दोन तऱ्हा असतात. पहिली म्हणजे ऐतिहासिक घटनांच्या आधारे अद्‌भुतरम्य कथा Mytholigies निर्माण होतात. आणि दुसरं, मनुष्याला काल्पनिक विश्वात रमण्याची नेहमीच हौस असते. गेल्या दोनशे- तीनशे वर्षांत छापखाना निघाल्यापासून कल्पनानिर्मित साहित्य व वस्तुज्ञानात्मक साहित्य यांची तुलना केली तर काल्पनिक साहित्य लक्षपट आहे कमीत कमी! ही स्वाभाविक प्रवृत्ती अदम्य आहे. ती जर दमन करता आली तर त्याची पुष्कळशी महत्त्वाची ऊर्जा वाचेल. पण ते कठीण आहे. ही मनाची

भ्रमर प्रवृत्ती - 'काल्पनिक विश्व' निर्माण करायचं, त्यात राहायचं, फिरायचं आणि दमायचं या स्वभावातून पुराणकथा (Myth) जन्माला येत असते. कृष्ण, राम, परशुराम हे ऐतिहासिक आहेत. पण रावणाला दहा तोंडं होती म्हणजे काय? तर ती नऊ तोंडे म्हणजे त्याचे नऊ मंत्री आहेत. हनुमान वगैरे म्हणजे मानवाच्या प्राथमिक अवस्थेमधले कल्पित पूर्वज (Totem) आहेत. हनुमान-सुग्रीव इत्यादीचं Totem वानर होत. तेच कृष्णाच्या बाबतीत म्हणता येईल. कृष्णाच्या सर्व अद्‌भूत कथा, या वास्तव कृष्णाच्या पूजेला उत्तेजन देणाऱ्या आहेत.

याचं पूर्वमीमांसेत उत्तम स्पष्टीकरण आहे. बाळ कृष्णाची किंवा वीर कृष्णाची पूजा करा. हा 'विधी' आहे. त्याला उत्तेजन देणारा 'प्रशंसा अर्थवाद' म्हणजे या कथा 'स्तुत्यंमर्थेन विधिनास्युः' या कथा कर्मकांड (विधि) याचे स्तावक आहेत. वीर पूजेचे स्तावक असे हे अद्‌भुत कथाभाग म्हणून विधीला ही कथा परिपुष्ट करते. जगामध्ये धर्मसंस्थेनं या अत्भुतरम्य कथासृष्टीचा उपयोग केला आहे. आश्चर्य निर्माण करून माणसाच्या ठिकाणी पूजनीयतेची भावना निर्माण केली आहे. उदाहरणार्थ आपण सर्वच स्त्री-पुरुषाच्या संभोग वासनेतून जन्मलो; पण ख्रिस्त नाही तसा. म्हणजे आश्चर्य नाही का? संभोग वासनेतून माणसानं इतिहासात फार गोंधळ, मारामाऱ्या खुनाखून केले. तसं अजूनही आपण पाहतोच ना! तसं ख्रिस्ताच्या बाबत नाही. अद्‌भुत कथा ही अर्थवाद आहे आणि तो पूजाविधीचाच भाग आहे. म्हणजे Ritual and Myth go together. म्हणजेच धर्माच्या इतिहासात कर्मकांड विधिविधानाच्या जोडीला पुराणकथा पोथी ही असेलच असं दिसतं. म्हणजे, सत्यनारायणाची पूजा आहे. ती सुरेख असते. लोक जमतात, प्रसाद वाटला जातो, केळीचे खांब छान लावलेले असतात, पूजाद्रव्य असतं. हे सगळं छान असतं - एक कथा त्याला लावून दिली. ती कथा कधीही कुणी खरी मानली नाही. तरी खरी मानली. ती कथा ऐकायचीच. वाण्याची बोट - नौका तरणं हे कुणी खरं मानत नाही. अशा या कथाच मिथ्या असतात. पण त्या कर्मकांडाला पोषक असतात.

**प्रा. मोरे - आपल्या पिढीवर 'गीतारहस्या'चा प्रभाव होता. आपल्यावर होता का? असल्यास आपण त्यातून बाहेर कसे आलात?**

**तर्कतीर्थ -** 'गीतारहस्या'चाच नाही, तर आपल्या सगळयाच धार्मिक परंपरेचा दीर्घकाळपर्यंत माझ्यावर प्रभाव होता. वयाच्या २२-२३ वर्षांपर्यंत. मी हळूहळू आगरकर वाचायला लागलो. आगरकरांनी स्पेन्सर वाचलेला होता. स्पेन्सरनं धर्म-देवता यांची निर्मिती कशी झाली याची चर्चा केली आहे. त्याचा प्रभाव माझ्यावर पडला. त्यामुळे धर्म हा मनुष्यानं कल्पनेनं निर्मिलेला आहे असा प्रभाव हळूहळू माझ्यावर येऊ लागला. त्याच्या अगोदर मी अतिशय धार्मिक, कर्मकांड करणारा होतो.

**प्रा. गोखले - आपण 'हिंदुधर्माची समीक्षा' हा ग्रंथ अशाच चिकित्सक दृष्टीतून लिहिला आहे. यानंतर त्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत आपली अशी भूमिका आहे की, धर्मसंस्था ही सर्व देशांत अटळ आहे. म्हणून धर्मसंस्थेची विवेकबुद्धीने पुनर्रचना करावी. तसेच दुसरी एक भूमिका मांडली की, 'गीता' किंवा 'वेदांत' यांत एक सर्व**

**धर्मांचा महासमन्वय दिसतो. हा आपल्या भूमिकेतला बदल म्हणता येईल का?**

**तर्कतीर्थ -** नाही. मी धर्मनिरपेक्ष दृष्टीचा मनुष्य आहे. यापुढे समाजनियंत्रण बुद्धिप्रामाण्याच्या आधाराने चालले पाहिजे. प्रातिनिधिक लोकशाहीच्या पद्धतीने नियम घडायला पाहिजेत. अनुभवाने ते बदलत गेले पाहिजे. विज्ञान सारखं बदलत आहे. त्या विज्ञानाच्या आधाराने सामाजिक जीवनाचं प्रशासन व्हायला पाहिजे. धर्मसहिष्णुता हवी. सगळया धर्मांनी सहिष्णुतेने एकत्र राहिलं पाहिजे. कारण भिन्न धार्मिक समाजांनी एकत्र राहण्याचं युग आलं आहे. जग इतकं जवळ आलं आहे की, मानव समाज हा आता राष्ट्रीय- भिन्न राष्ट्रीय समाज असा नाही. दळणवळण वेगवान होत आहे. त्यामुळे माणूस फार वेगाने एकमेकांजवळ येत आहे. माणसं मनाने जवळ नाहीत. ती मनाने जवळ आली पाहिजेत म्हणून धार्मिक भेद सहन करावेत; परंतु त्यांना महत्त्व देऊ नये. धार्मिक मूलवादी (Fundamentalist) लोक हे आपण नव्या आधुनिक तत्त्वज्ञानावर अधिष्ठित जगात राहतो, इकडे दुर्लक्ष करतात.

हिंदू धर्म हा महासमन्वय आहे, हे माझे विश्लेषण आहे. ते मी मान्यच करतो. जसे इस्लाम-ख्रिश्चन हे वेगवेगळे धर्म आहेत, तसा हिंदू धर्म नाही. हा अनेक धर्मांचा संघ आहे, Federatia of Religions.

**प्रा. व्होरा - पण यामुळे हिंदू धर्म हा याबाबतीत इतर धर्मांपेक्षा श्रेष्ठ आहे असं म्हणता?**

**तर्कतार्थ -** श्रेष्ठ आहे याचा अर्थ तो इतर धर्मांना कमी लेखत नाही. याचं कारण असं की, अनेक धर्म एकत्र येण्याची ही प्रक्रिया आहे. तिच्या पाठीमागे एक तत्त्वज्ञान आहे. ते म्हणजे नकळत सगळे धर्म एकाच तत्त्वाची उपासना करतात हे होय. दोन श्लोक मी सांगतो म्हणजे लक्षात येईल.

- य शैवा: समुपासते शिवंति ब्रह्मेति वेदान्तिनी
बौद्धा बुद्ध इति प्रमाण पटव: कर्तेति नैयायिका:
अहन्नित्य च जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः|
सोऽ य वो विद्धातु वांछितफल त्रैलोक्यनाथी हरि:||

याच्यात एकाचीच उपासना निरनिराळ्या प्रतिमांच्या रूपाने सांगितली आहे. हा वैष्णव दृष्टिकोन. शैव दृष्टिकोन सांगतो-

त्रयी सांख्य योगः पशुपति मतं वैष्णवमिति
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमद:पथ्यमिति च ॥
रुचीनां वैचित्र्यात ऋजुकुटिलनाना पथजुषाम्
नृणामेको गम्यस्तमसि पयसामर्पण इय ॥

आता याच्यात यज्ञधर्म, सांख्य, योग, वैष्णव, वेगळा शैवपंथ, भक्तिमार्ग हे निरनिराळे मार्ग आहेत. प्रत्येकजण म्हणतो हाच योग्य आहे. प्रत्येकाची अभिरूची वेगळी आहे. यापैकी काही मार्ग सरळ, काही वळण घेऊन जातात. प्रत्येकाने आपापला मार्ग घ्यावा. दुसऱ्यावर अभिप्राय

देऊ नये. अशा रीतीने "नृणामेको गम्य:" माणसाला एकाच तत्त्वाकडे जायचं आहे - हा दृष्टिकोन हिंदू परंपरेत आहे.

हिंदू धर्म म्हणजे धर्मसंघ आहे. या संघाचे काही नियम असतात. हिंदू धर्म हा धर्म नाही. म्हणून त्याचं हिंदू धार्मिक राज्य होऊ शकत नाही (Theocratic State), कारण त्यासाठी एक पुस्तक लागतं. तसं पुस्तक इथं नाही. कारण अनेक भिन्न भिन्न मतांची पुस्तकं आहेत.

**प्रा. व्होरा - हे पटतंय. पण त्यामुळे आपण हिंदू धर्माला इतर धर्मांपेक्षा वेगळा काढतो असं मला वाटतं. एकीकडे सर्व धर्माची मूलतत्त्वे सारखीच आहेत असे म्हणतो. त्याचवेळी हिंदू धर्म हा सर्वसमावेशक समन्वयवादी आहे असं म्हणतो. म्हणजे एका अर्थाने हिंदू धर्माची तरफदारी करतोय असं वाटतं. हिंदू धर्माचे अनुयायी जे स्वत:ला हिंदू म्हणवून घेतात व भारतातले इतर धर्मीय अनुयायी यांच्यात आपण फरक करतो, असं याच्यावरून वाटतं.**

**तर्कतीर्थ -** असं नाही. माझं म्हणणं हे की असा फरक करू नये म्हणून या विचाराला मी महत्त्व देऊ लागलो. आम्ही सर्व धर्मांना जवळ करणारे आहोत. मुसलमान, ख्रिश्चन, यहुदी सगळ्यांनाच आमचे मानतो असं मी म्हणतो. जसं तुम्ही (अन्य धर्मीय) आम्हाला गैर आहात असं मानता तसं आम्ही (हिंदू) यांच्याबाबत मानणार नाही. यातून Hindu fundamentalism उभा राहू शकत नाही. आजचा हा मूलवाद राजकीय आहे.

**प्रा. व्होरा - पण धर्म तत्त्वज्ञान आजच्या हिंदुत्ववादी संघटनांना समर्थन मिळत आहे...**

**तर्कतीर्थ -** नाही. या उलट अशा संघटनांमुळे राष्ट्रीयत्वाला जो धोका उत्पन्न होतो, तो आपण टाळतोय. त्यांना आपण आपला दृष्टिकोन देतो आहोत. कारण असं की, या देशात ८-९ कोटी लोक हिंदू नाहीत. ते जर या ठिकाणी वेगळे पडले, तर इथे ज्याला पंचम स्तंभीय म्हणतात - तेवढा मोठा पंचमस्तंभ समर्थ राष्ट्रवादाला देखील पराभूत करील. म्हणून पंचमस्तंभ निर्माण होणार नाही असं वर्तन हिंदुत्ववाद्यांचं व्हायला पाहिजे. सध्याचा वाढणारा हिंदुत्ववाद हा माथेफिरूपणा आहे. हा आत्मनाशक आहे. तो आत्मद्रोह आहे. इथल्या ९ कोटी प्रजांना बाजूला वगळणारा असा अहंकार इथं पोसला जात आहे. यामुळे राजकीयदृष्ट्या मोठ्या पराभवाची पार्श्वभूमी तयार होत आहे.

**प्रा. गोखले - मला यात अशी शंका येते की ज्या ईश्वरवादी विचारधारा आहेत - त्यात मुस्लिम - ख्रिश्चनही येतील, त्यांच्यात एकाच ईश्वराची उपासना, अंतिम ध्येय एकच ही भूमिका चटकन समजण्यासारखी आहे, पण ईश्वरवादी व निरीश्वरवादी (बौद्ध, जैन, चार्वाक इ.) या सर्वांना एकत्र बांधणं व त्या सर्वांचं प्राप्तव्य एकच असं म्हणणं कितपत स्वीकारार्ह आहे?**

**तर्कतीर्थ -** मानवी कल्याणाचं तत्त्व, अंतिम हिताचं तत्त्व जी विचारसरणी सांगते- अशा सर्वच विचारसरण्या परस्परांशी सुसंगत आहेत, असं म्हणता येईल. ते कल्याणाचं रूप आणि

मार्ग याबाबत मात्र मतभेद असतील तर मात्र अडचण आहे.

**प्रा. गोखले - गांधींच्या बाबत अशी शंका घेतली जाते, की सत्य हा ईश्वर आहे व ईश्वर हाच सत्य आहे अस त्यांचं म्हणणं निरीश्वरवाद्यांना जवळ करण्यासाठीची मखलाशी आहे असं मानता येतं. तसं इथंही शक्य आहे. आमचं प्राप्तव्य एकच आहे, असं आस्तिक व नास्तिकांनी म्हणणं हे नास्तिकांनाही आपल्याच तंत्रात ठेवण्याच्या आस्तिकांच्या युक्तीचा भाग असू शकतो.**

**तर्कतीर्थ -** (मोकळेपणाने हसून) असं तुमच्यासारखे तत्त्वज्ञानाच्या पद्धतीतले लोक म्हणू शकतात. त्यांना असं वाटणं स्वाभाविक आहे.

**प्रा. व्होरा - आपण काँग्रेस पक्षालाही सर्वसमावेशक म्हणतो. त्यामुळे काँग्रेसकडं अलोट सामाजिक गट आकृष्ट होऊन एका छत्राखाली येतात. एवढं झालं तरी काँग्रेस काही विशिष्ट जाती वर्ग व जातींचं वर्चस्व आहे हे आपल्या लक्षात येतं. तसं हिंदू धर्म कितीही सर्वसमावेशक व महासमन्वयवादी आहे असं म्हटलं तर तात्त्विकदृष्ट्या त्यात चुकीचं नाही. तरीही आता हिंदू धर्म हा काही लोकांच्या हातात आहे. क्षत्रिय व ब्राह्मणांचं वर्चस्व हिंदू धर्मात आहे...**

**तर्कतीर्थ -** वैश्यांचंही आहे. आता हल्ली त्यांचं महत्त्व फार आहे.

**प्रा. व्होरा - हे वरिष्ठ वर्णाच्या वर्चस्वाला न जुमानणाऱ्या वर्गांन आपण कितीही समावेशक म्हटलं तरी त्यांना आकृष्ट करू शकत नाही.**

**तर्कतीर्थ -** त्यांना आपण जसं आकृष्ट करू शकत नाही, तसंच ते प्रबळ होऊ शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. ते वर्ग संघटित होऊन काँग्रेसला पर्यायी होऊ शकत नाहीत. ते विस्कळीत आहेत. आज हे चित्र आपल्याला दिसतंच आहे. राजीव गांधी मोठमोठ्या चुका करत आहेत. मात्र या विरोधी पक्षाच परस्परात जमत नाही 'आमचे अहंकार फार मोठे आहेत,' असं हेगडेच म्हणत होते. सगळ्यांनाच पंतप्रधान व्हायचं आहे! तसंच विरोधी, उपेक्षित समाजदेखील संघटित नाहीत. उपयोग काय? तुमचं म्हणणं बरोबर आहे.

**प्रा. व्होरा - मग आपण हिंदू धर्मातली सर्वसमावेशकता Reject करतो. त्यामुळे आपण एका अर्थानं भ्रम निर्माण करतो का? उपेक्षित गटांना म्हणजेच दलित, मुस्लिम, अल्पसंख्याकांना ओढण्यासाठी म्हणून आपण हिंदू धर्माची तरफदारी करतो का?**

**तर्कतीर्थ** - ...नाही, ही हिंदू धर्माची तरफदारी नाही. हिंदुत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्यांना हा इशारा आहे. तो मी मागेच सांगितला आहे.

**('अक्षरदीप', दिवाळी, १९८८ पृ.५ ते १०.)**

❍❍❍

४८

# बंधनात टाकणाऱ्या श्रद्धांची चिकित्सा हवी

मुलाखतकार - **अनिल जोशी**

"जे विचार श्रद्धा बनतात आणि वैचारिक प्रगतीला बंधन घालू लागतात त्यांची चिकित्सा करीत राहिले पाहिजे, असा माझा दृष्टिकोन आहे. म्हणून मी हिंदू धर्माच्या श्रद्धा जशा तपासल्या, तशा अद्ययावत श्रद्धा पण तपासत असतो. आजचा सगळ्यात प्रगत मानला गेलेला विचार म्हणजे मार्क्सवाद, याची पण मी मीमांसा केली आहे."

"'हिंदुधर्माची समीक्षा' आणि 'वैदिक संस्कृतीचा विकास' ही दोन पुस्तके मी वाचकांपुढे ठेवली आहेत आणि आतापर्यंत अशी चिकित्सा व संशोधक दृष्टी पुरस्कारली आहे."

साहित्य अकादमीने देशातील ज्या प्रख्यात विद्वानांचा पुरस्कार देऊन नुकताच बहुमान केला, त्यामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनाही गौरविले आहे. तर्कतीर्थ जोशी यांनी या पुरस्कारासंबंधी साहित्य अकादमीची भूमिका विशद केली. "ज्यांनी वैचारिक साहित्य निर्माण केले, काव्यनिर्मिती केली वा ललित साहित्य निर्माण केले, त्यांचे साहित्य व जीवनाबद्दल मूल्यमापन निराळे असते. अशी उच्च दर्जाची साहित्यनिर्मिती करणाऱ्यांना साहित्य अकादमीतर्फे पुरस्कार देण्यात येतात. देशातील वयोवृद्ध साहित्यिकांमध्ये ज्यांचा समावेश करण्यात आला, त्यामध्ये माझ्याबरोबर कन्नड कवी श्री. गोकाक यांनाही हा सन्मान मिळाल्याचा मला एक वेगळा आनंद आहे."

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विविध धर्मांची मीमांसा व चिकित्सा आजपर्यंत केली. "मी मीमांसक आहे. वैचारिक साहित्य लिहिणारा आहे. मी हिंदू धर्माची चिकित्सा केली. सामाजिक जीवनाला अनुकूल अशा हिंदू धर्मातील प्रवृत्ती कोणत्या आणि मागासलेपण दर्शित करणाऱ्या कोणत्या याची मी मुख्यतः मीमांसा केली आहे," असे सांगून तर्कतीर्थ म्हणाले, "माझ्याबरोबरच कन्नड कवी गोकाक यांना गौरविण्यात आले आहे. ते श्रद्धेमध्ये आनंद मानणारे आहेत. आमची दोघांची मैत्री आहे. कारण आमच्या दोघांमध्ये संवाद होऊ शकतो. कित्येक श्रद्धावंतांचा आणि चिकित्सकांचा संवाद होऊ शकत नाही. भारतीय परंपरा ही श्रद्धाळू

आणि चिकित्सक यांच्या संवादाची परंपरा आहे.'' नुकत्याच घडलेल्या जागतिक वैचारिक क्षोभाचे उदाहरण देताना तर्कतीर्थ म्हणाले, 'सटॅनिक व्हर्सेस' या कादंबरीचा लेखक कुराणातील उपदेशावर टीका करणारी कादंबरी लिहितो आणि त्याला ठार करण्याचा आदेश इस्लामी धर्मगुरू देतो. भारतीय परंपरा यापेक्षा वेगळी आहे. चार्वाकाची वेदांवर भयंकर टीका आहे. ती 'सटॅनिक व्हर्सेस'सारखीच आहे. चार्वाक म्हणतो, 'वेद हे नपुंसक आणि निर्बुद्ध पोटभरू भटजींनी लिहिलेले आहेत,' ही चार्वाकाची टीका शंकराचार्यांच्या पीठावर बसलेल्या चौदाव्या शतकातील विद्यारण्यांनी सरळ सरळ उद्धृत केली आहे आणि त्याला उत्तर दिले आहे. त्याचा तिरस्कारसुद्धा केला नाही.

कोणत्याही शाब्दिक आक्षेपांना किंवा हल्ल्यांना शाब्दिक उत्तरच हिंदूंनी दिले आहे. ही हिंदूंची वैचारिक स्वातंत्र्याची प्रथा मॅक्सवेबरसारख्या समाजशास्त्रज्ञाने व टायमबीसारख्या विश्वेतिहासज्ञाने हिंदू संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणून महान आदराने प्रशंसिली आहे, अशी ही विचारविमर्शाची हिंदूंची परंपरा मी मनःपूर्वक जोपासली आहे.

**(केसरी, २६ फेब्रुवारी, १९८९)**

❍❍❍

४९

# तर्कतीर्थ : कृतिप्रवण विचारांची आगळीवेगळी खाण

मुलाखतकार - **अनंत दीक्षित**

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना साहित्य अकादमी, नवी दिल्ली यांनी महत्तर सदस्यत्व (फेलोशिप) हा सर्वोच्च सन्मान देऊन गौरविले. त्याप्रीत्यर्थ दैनिक सकाळ, कोल्हापूरचे मुख्य संपादक श्री. अनंत दीक्षित यांनी घेतलेली मुलाखत.)*

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजे कृतिप्रवण विचारांची एक आगळीवेगळी खाणच आहे. आज वयाच्या नव्वदाव्या वर्षी ही त्यांच्या जीवनाला विचारांचे नवनवे धुमारे फुटत असतात. नवे विचार स्वीकारण्याची व अभ्यासण्याची त्यांची तयारी अलौकिकच आहे. सोलापुरात नुकतेच ते येऊन गेले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत तीन समारंभ झाले. त्यानंतर रात्री नऊ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या अतिथी कक्षात त्यांची भेट घेतली. तीन समारंभ, प्रत्येकी तीन तासांचे होऊनही त्यांचा बोलण्याचा, चर्चा करण्याचा उत्साह अवर्णनीय होता. सुमारे तासभर त्यांच्याशी काही प्रश्नांच्या अनुषंगाने झालेली सूत्रबद्ध चर्चा अशी-

**प्रश्न : आपल्या देशापुढील प्रश्नांबाबत सातत्याने बरीच चर्चा होते. नैतिकता, अंधश्रद्धा, धार्मिक भूमिका, अर्थकारण अशा असंख्य प्रश्नांची मांडणी कमी-अधिक तीव्रतेने सातत्याने होत असते. सर्वार्थाने वडिलधारे या नात्याने आपण आपल्या देशापुढे नेमका प्रश्न कोणता आहे, या विषयी जरा सांगावे**

**तर्कतीर्थ :** आपल्या देशाचे प्रश्न राजकीय, सामाजिक दृष्टीने आणि सामुदायिकदृष्ट्या तपासले पाहिजेत. तुकारामांच्या भाषेत बोलायचे तर व्यक्तिश: नागरिक या नात्याने वयात आलेला नागरिक प्रामाणिकपणे व्यवसाय करून स्वावलंबनाने आणि आत्मविश्वासाने सत्त्वशील होईल अशा तऱ्हेचे शिक्षण त्याला मिळाले पाहिजे. विज्ञान आणि तंत्र यांची क्रांती झालेल्या आजच्या जगात समर्थपणे जगायचे तर अशा तऱ्हेचे शिक्षण प्रत्येक नागरिकाला मिळाले पाहिजे. परंपरेची बंधनं त्या माणसाला विवेकाने बाजूला सारता आली पाहिजेत. परंपरेची बंधने म्हणजे व्यापक अर्थाने अंधश्रद्धाच असतात. शिक्षण पद्धतीचा पाया विवेकनिष्ठच असायला हवा. विवेक दोन

स्वरूपाचा असावा. आधुनिक ज्ञान - विज्ञान हवे आणि आधुनिक तंत्रज्ञानही हवे.

आधुनिकता ही नित्य विवेकानेच शक्य आहे. परंपरेची बंधने म्हणजे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आदी धर्मांची परंपरा धार्मिक परंपरेला बगल देऊन विज्ञान -तंत्रज्ञान वाढवायला पाहिजे. कारण धर्मपरंपरेचे समर्थक हे अंधश्रद्धेचे समर्थक होते, हे ख्रिश्चन धर्माच्या चारशे वर्षांच्या इतिहासावरून स्पष्ट होते. त्यांना या परंपरेविरुद्ध झगडावे लागले. आता हिंदूंना त्यांच्या धार्मिक परंपरांविरुद्ध झगडावे लागेल.

हिंदू धार्मिक परंपरेतला जातिभेद, उच्चनीचता खोटी आहे. याचा योग्य विचार झाला तर तो विचार समजू शकेल. तो विचार खोटा आहे, चुकीचा आहे, याचं ज्ञान मिळालं पाहिजे, दुसऱ्या बाजूनं धर्माचा विचार करताना मंत्र- तंत्र, कर्मकांड, भजन-पूजन, नवस वगैरेबाबत स्पष्टता आली पाहिजे. बुद्धिप्रामाण्यवादाने या दोन गोष्टी जाऊ शकतात. अर्थात् हा बुद्धिप्रामाण्यवाद लहानपणापासूनच रूजला पाहिजे.

स्त्रिया या अधिक अंधश्रद्ध असतात. कारण त्या अधिक संख्येने आपणच अशिक्षित ठेवल्या आहेत. स्त्रीवर्गावरील संस्कार बुद्धिप्रामाण्यवादापासून दूर राहिले. त्यासाठी शिक्षणातूनच बुद्धिप्रामाण्यवाद दिला पाहिजे. बुद्धिप्रामाण्यवाद नसल्यानेच मंत्र-तंत्रावर विश्वास बसतो.

धर्माची आणखी एक बाजू म्हणजे भक्तिमार्ग. तो धार्मिक तत्त्वज्ञानानेच अधिक स्वच्छ होतो. त्यामुळेच डोळे उजळतात. उच्च दर्जाचा जो भक्तिमार्ग आहे, त्यातून बाहेर पडलेला नागरिक इहवादी व नास्तिक क्वचित असतो. सामान्यतः बुद्धिप्रामाण्यवादी माणसातही धार्मिक श्रद्धा असतातच; पण त्यामागे काही एक बुद्धिवाद असतो, त्याला फार तर धार्मिक तत्त्वज्ञान म्हणता येईल.

आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही कायम धोक्यात आहे. आपली अर्थव्यवस्था प्रथम इंग्रजी साम्राज्यशाहीने धोक्यात ठेवली. देशी उद्योगधंदे बुडाले. नवे उद्योगधंदे २० व्या शतकात सुरू झाले. मेडिकल म्हणजे औषधोपचाराने मोठी क्रांती झाली. त्यामुळे रोगराईपासून प्रजा वाचू लागली. अशा स्थितीत लोकसंख्येचा स्फोट ही आशिया खंडाची मोठी चिंता बनली, भारत-चीन यासारख्या देशांना हा लोकसंख्येचा स्फोट बाधक आहे. युरोपमध्ये प्रत्येक चौरस मैलात जेवढी प्रजा आहे, ती भारताएवढी आहे, पण त्या ठिकाणी भारताएवढी प्रजावाढ नाही. त्यामुळे तेथील अर्थव्यवस्था बरीच सुरळीत आहे. अर्थव्यवस्थेला सहन होणार नाही, एवढा ताण आपल्याकडे लोकसंख्येचा आहे.

आणखी एक गोष्ट म्हणजे इथल्या संस्कृतीत दोष आहेत. स्वतःच्या श्रमातून निर्मिती करावी, यांचं मूल्य श्रेष्ठ आहे असं इथल्या माणसाला वाटत नाही. इथल्या विवेकबुद्धीत स्वावलंबनाला स्थान नाही. जपानची अर्थव्यवस्था पश्चिमेच्या तोडीची आहे. याचे कारण आपल्या कामाची उत्तम गुणवत्ता राखण्याची जपानी माणसाला स्वाभाविक प्रेरणा आहे. ही जपानची संस्कृती आहे. या दृष्टीने आपल्या संस्कृतीला अवनत अवस्था आली आहे. आपली सांस्कृतिक मूल्ये

भ्रष्ट झाली आहेत.

आपली एक गोष्ट म्हणजे भ्रष्टाचार जगभर आहे, गुन्हेगारीही आहे; परंतु भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी ज्या प्रमाणात असते त्यावर त्या संस्कृतीची मूल्ये ठरतात. उदाहरणार्थ आपला शिक्षक. आपल्या शिक्षकाला उत्तम शिक्षण देण्यात आनंद वाटत नाही. ती एक कष्टाची आणि त्रासदायक जबाबदारी आहे, असे आपल्या शिक्षकाला वाटते. उत्तम शिक्षण देणे हा शिक्षकाला असह्य बोजा वाटतो. हीच गोष्ट सर्व प्रकारच्या उद्योगात, शासकीय कर्मचाऱ्यांत दिसते. राज्य चालवायचे ही आपली नैतिक जबाबदारी आहे याचे भान हवे. कर्तव्याबद्दलची जाणीव हवी. अशा पवित्र व उच्च दर्जाच्या नैतिक जाणिवेची आवश्यकता आहे. आपल्या जबाबदाऱ्या पवित्र आहेत याविषयीची जाण सर्व आघाड्यांवर हवी. यालाच ऐहिक उच्च ध्येयवादाची म्हणजेच समाजसेवेची जाणीव म्हणता येईल. जबाबदारी हा समाजसेवेचाच भाग असतो. प्रत्येकाला सामाजिक कर्तव्य आहे. यादृष्टीने नुकताच प्राध्यापकांचा जो संप झाला त्याबद्दल असे म्हणता येईल, की आपल्याकडे जबाबदारीची जाणीव मंद आहे. याचेच ते लक्षण आहे. त्यामुळेच शिक्षक हा समाजाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे, असे समाजालाही वाटत नाही. शिक्षकवर्ग कर्तव्य पवित्र मानतो, हे जर समाजाला दिसले असते तर समाजालाही त्यांच्याविषयी आपुलकी वाटली असती. ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही, असे वाटते.

सामाजिक व्यवहाराची ही स्थिती आहे, उदात्त ध्येयवादाने सामाजिक जीवन प्रभावित आहे, अशी स्थिती नाही. जुने ध्येयवाद धार्मिक स्वरूपाचे होते. ते आता मागे पडले आहेत, तो ध्येयवाद आता फक्त राजकीयदृष्ट्या म्हणजेच पर्यायाने मतांसाठी उपयोगी पडतात. समाजधारणेच्या दृष्टीने ते तकलादू आहेत, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

**प्रश्न : साहित्य अकादमीचा सर्वोच्च सन्मान आपल्याला मिळाला आहे. त्यामुळे मराठी साहित्यासंबंधीही आपण थोडं बोलावं. मराठीला दोन ज्ञानपीठ पुरस्कार मिळाले. कन्नडसारख्या शेजारी भाषेच्या मानाने हे यश कमी आहे. शिवाय पश्चिमेच्या अनुकरणातही बरीच मराठी शक्ती खर्च झाली. या पार्श्वभूमीवर मराठीला कधी नोबेल पुरस्कार मिळेल, असे आपल्याला वाटते काय ?**

**तर्कतीर्थ :** बंगालीला रवींद्रनाथांच्या 'गीतांजली'मुळे नोबेल पुरस्कार मिळाला. विज्ञानात रमणना मिळाला. मराठीला जर नोबेलपर्यंत पोहोचायचे असेल, तर त्यासाठी साहित्यविषयक चळवळी, आंदोलने हवीत. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, कला, साहित्य अशा सर्व आघाड्यांवर वैचारिक साहित्यनिर्मितीचे प्रमाण वाढले पाहिजे. हे प्रमाण आज अल्प आहे. मोठमोठे नाटककार, अर्थशास्त्रज्ञ, सामाजिक तत्त्वज्ञानाचे चिंतक निर्माण व्हावयाचे असतील, तर तसे आंदोलन हवे. आज वैचारिक अथवा ललित लेखन डोळ्यात भरेल, असे होताना दिसत नाही.

अर्थात काही मराठी साहित्यकृती मात्र आंतरराष्ट्रीय आकर्षणाला कारण ठरल्या आहेत. दलितांची भटक्या-विमुक्तांची आत्मचरित्रे यांना आंतरराष्ट्रीय मागणी आली आहे याचे

कारण म्हणजे त्या आत्मचरित्रातून एका विशिष्ट सामाजिक तळातला अनुभव आला आहे. जो सामाजिक तळ झाकलेला होता, दृष्टिआड होता तो एकदम बाहेर आला आहे. उत्कृष्ट साहित्यनिर्मितीसाठी नवा प्रकाश मिळावा लागतो. साहित्य आंदोलनांचे प्रवाह क्षीण अथवा खंडित होता कामा नयेत. व्यापकताही तेवढीच हवी.

**प्रश्न : महात्मा फुलेंविषयी मध्यंतरी एक वादळ झाले. त्यात तुमचेही संदर्भ काही ठिकाणी होते, तुम्ही त्याविषयी काही सांगाल?**

**तर्कतीर्थ :** खरे तर 'सोबत'मध्ये महात्मा फुलेंविषयी जे लेखन आले त्याची उपेक्षाच करायला हवी होती. ज्या शैलीत आणि सुरात 'सोबत'कारांनी लिहिले आहे, ते पाहता त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. त्यावर इतके रागवण्याचे कारण नाही. त्या लेखनाला कसलाही साहित्यगुण नाही. त्याची उपेक्षाच करणे योग्य.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंच्या शब्दात सांगायचे तर 'गुलामगिरी' हे महात्मा फुले यांचे पुस्तक म्हणजे रानफळ आहे. जोतिबा एक समाजसुधारक म्हणून मोठेच आहेत. त्यांची भाषा उच्च दर्जाची, भारदस्त आहे की नाही यापेक्षा त्यांनी सामाजिक आंदोलने निर्माण केली याला महत्त्व आहे. त्यांनी सत्यशोधक समाज निर्माण केला हे ऐतिहासिक काम आहे. एकजिनसी, आधुनिक समाज निर्माण करण्याचा जोतिबांचा प्रयत्न मोठा आहे. सत्यशोधक समाजाची निर्मिती हे त्यांचे खरे कार्य आहे. या अनुषंगाने त्यांचे मूल्यमापन बाळ गांगलना करता आले नाही. अशा लेखनाकडे लक्ष देऊच नये.

**प्रश्न : सलमान रश्दी यांच्या 'सॅटेनिक व्हर्सेस' या पुस्तकामुळे अलीकडे मोठे वादळ निर्माण झाले आहे. अशा प्रकारचे लेखन करावे काय ?**

**तर्कतीर्थ :** ते पुस्तक मी पाहिलेलेही नाही. त्यामुळे त्याविषयी फार काही सांगता येणार नाही. परंतु या पुस्तकासंदर्भात इराणी राष्ट्रपतींनी जो प्रकोप व्यक्त केला आहे तो अनावश्यक आहे. कारण कुराण या धर्मग्रंथाचे मानवी इतिहासातील कार्य मोठे आहे, विशाल आहे. त्यामुळे कोणी एखादी कादंबरी लिहिली किंवा ती भरपूर खपली तर त्याकडे दुर्लक्ष करायला हवे.

प्रेषित महंमदाने आणि कुराणने केवढा मानवी इतिहास बदलला. त्यांच्यासंबंधी जर काही अस्थानी, अयोग्य लेखन झाले तर त्याकडे लक्ष देऊ नये, अशी उपेक्षेची भूमिका हिंदुत्वाने केली आहे. चार्वाकाने वेदांविषयी कितीतरी लिहिले. पण त्याने केलेली निंदा आम्ही मजेने सांगतो. त्याच्या टीकेमुळे आम्ही वेद सोडलेले नाहीत किंवा भगवद्गीतेविषयी आदर कमी झालेला नाही. आजही आम्ही अभिमानाने सांगतो की भारत हा तत्त्ववेत्त्यांचा देश आहे. जगही त्याला मानते.

"त्रयो वेदाः बुद्धिपौरुषहीनानां जीविका," असे म्हटले गेले. ज्याला बुद्धी नाही, पौरुष नाही, हीन दर्जाचे आहेत त्यांचे वेद आहेत, असा याचा अर्थ. असे लिहूनदेखील वेदांचा अर्थ आम्हासीच ठावा, असे तुकारामाने म्हटले आहे. ज्या धर्माने, धर्मग्रंथाने मोठा इतिहास घडवला,

त्यांच्यावर साहित्य लिहिलं म्हणून रागवायचे नसते.

**प्रश्न : महाराष्ट्रात आज काही नवे वारे वाहत आहेत. ज्या राज्याने सुधारकांची पिढी घडवली तिथे सामाजिकदृष्ट्या मागे जाण्याचे हे वारे आहे, असे म्हटले जाते. त्याविषयी आपले मत काय? शिवसेना, हिंदू एकता यासारख्या संघटनांना पंजाबमधील अकालींसारखे स्वरूप येईल काय ?**

**तर्कतीर्थ :** अंधश्रद्धा टिकविल्यामुळे आणि सत्तेच्या खेळाने महाराष्ट्राची आजची अवस्था आली आहे. त्यामुळे आपण निश्चित मागे जात आहोत. मात्र पंजाबमधील अकालींप्रमाणे इथे काही घडणार नाही. प्रबोधनाला मोठे शत्रू उत्पन्न झाले आहेत हे खरे, परंतु प्रबोधन ही सहजसाध्य गोष्टच नव्हे, ती फार मोठी जबाबदारीची गोष्ट आहे. मध्यंतरीच्या एका कालखंडात काँग्रेस पक्ष जसा चालायला हवा तसा चालला नाही. त्यामुळे जी पोकळी निर्माण झाली त्यावर हे नव्या वाऱ्यांचे थर आले आहेत.

**प्रश्न : तुम्ही अध्यात्माला पूर्ण नकार देत नाही. यामागे तुमची भूमिका कोणती ?**

**तर्कतीर्थ :** अध्यात्म हा विश्वाच्या अस्तित्वाचा विचार आहे. मानवी जीवाचे भवितव्य काय, याचा विचार झाला पाहिजे.

**प्रश्न: हा विचार मृत्यूच्या अथवा अन्य स्वरूपाच्या भयापोटी होतो काय ?**

**तर्कतीर्थ** : भयापोटी हा विचार होत नाही. माणसाला जे जीवन मिळाले आहे, त्यापेक्षा श्रेष्ठ जीवनाची योजना ठरविण्यासाठी तसा विचार व्हावा लागतो.

**(दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. २६ फेब्रुवारी १९८९)**

○○○

५०

# हिंदुत्वाचे राजकारण होऊ देऊ नये

मुलाखतकार - **ना. वा. ढवळे**

सातारा, ता. २५ हिंदुत्व हे एक सांस्कृतिक मूल्य आहे. हिंदू धर्म हा शब्द हिंदूंच्या धर्मग्रंथात नाही. हिंदू हा शब्द संस्कृत भाषेत कुठेही नाही. तो श्रुतिस्मृती पुराणात, वेदात, महाभारतात किंवा रामायणात कुठेही नाही. आपण भारतीय आहोत. भारतीयत्व हा शब्द येतो. भारत हा एक मोठा समाज आहे, राष्ट्र आहे, ही जाणीव वेदकाळापासून आहे म्हणून भारतात वेदकाळापासून आतापर्यंत निरनिराळ्या जातीजमाती निर्माण झाल्या, परंतु त्यांच्यामध्ये हिंसकविग्रह कधीही नाही, असा माझा भारतीयत्व पर्यायाने हिंदुत्व याबद्दल दृष्टिकोन आहे. म्हणूनच आपल्या घटनाकारांनी या देशाला भारत असे नाव दिले आहे, असे प्रतिपादन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले.

उद्या (शनिवार) ते नव्वदीत प्रवेश करीत आहेत. त्यानिमित्त ते पत्रकारांशी विविध विषयांवर बोलत होते.

ते म्हणाले, 'हिंदुत्व हे इतिहासाने निर्माण केलेले सांस्कृतिक, व्यापक, उदात्त तत्त्व आहे. जगातील अन्य धर्मांच्या इतिहासामध्ये मानवी विग्रह व हिंसा दिसते, ती हिंदूंच्या इतिहासात दिसत नाही, असा समाजसंघटक असलेला धर्मसमुदाय आहे. हिंदू धर्म एक पुस्तक, एक आराध्य दैवत मानत नाही. तो पुस्तके, अनेक दैवते मानतो. याचे कारण अनेक पुस्तकांच्या, अनेक आराध्य दैवतांच्या मुळाशी एक वाणी आणि मनाच्या पलीकडे असलेले जोडणारे, ऐक्य निर्माण करणारे, महानुभूती, प्रेम, विश्वात्म भावना अशा तऱ्हेचे अद्वैत निर्माण करणारे एक तऱ्हेचे तत्त्व आहे. हे लक्षात घेतले म्हणजे हिंदुत्व हे एक सांस्कृतिक मूल्य आहे, हे लक्षात येईल.'

हिंदू, खऱ्या अर्थाने हिंद हा शब्द बहुधा परकीयांनी दिलेला आहे. सिंधूच्या भोवताली आणि सिंधू जिथून वाहते त्या प्रदेशाला परकीयांनी हिंद म्हणून निर्दिष्ट केले आहे. वेदकाळापासून हा शब्द आला आहे. भाषांमध्ये 'स' चा 'ह' होतो. म्हणून सिंध म्हणजे हिंद आणि नद्या आणि देशाचे वाचक शब्द हे प्रजेचेही वाचक शब्द होऊ शकतात. विश्वबंधुत्व हे हिंदच्या सांस्कृतिक

मूल्यांचे रहस्य आहे. हे आध्यात्मिक मूल्य उलगडून सांगताना स्वामी विवेकानंदांनी सांगितले, की वेदाकाळापासून निरनिराळी आराध्ये आणि धर्म आहेत. त्यांच्या मुळाशी एक असे सूचित तत्त्व आहे आणि ऋग्वेदातील एका ऋचेत ते सांगितले आहे.

'एक संत विप्रा बहुधा वदन्ति' अर्थाता एकच सत्तत्त्व आहे. शहाणे लोक निरनिराळ्या रुपाने त्यांचे वर्णन करतात. ख्रिस्त एका रूपाने. महंमद दुसऱ्या मोझेससारखे धार्मिक द्रष्ट्ये निराळ्या शब्दांनी ते सांगतात. भाषा बदलतात. त्याची सूचक अशी चिन्हे बदलतात, प्रतीके बदलतात; परंतु भिन्न प्रतीकांमध्ये एकच अंतिम शुद्ध तत्त्व आहे, हा दृष्टिकोन वेदाकाळापासून आहे त्यामुळे ख्रिश्चन, इस्लाम, यहुदी, हिंदु यांच्यामधील जी सूचित आणि महत्त्वाची खोल जाणीव आहे. त्यामध्ये भांडण असावयाचे कारण नाही. उलट सहानुभूती नि संवादित्वच असले पाहिजे, असे सांगून शास्त्रीजी म्हणाले, 'हिंदुत्वाचे राजकारण होऊ नये. तो राजकीयदृष्ट्या अदूरदर्शीपणा होईल. विशेषतः आज जग व्यापक नैतिकतेची एक नवी दिशा घेत आहे. या दोन वर्षांत जग एकदम पालटलंय. समाजाचे प्रश्न अधिक चांगल्यारीतीने सोडवायचे आणि मनुष्याला विसंगती, दारिद्र्य आणि अवनतीतून बाहेर काढायचे, हा दृष्टिकोन आता जगात प्रभावी होणार आहे. त्याचे शुभचिन्ह म्हणजे जग. ज्या दोन शक्तींच्या संघर्षामध्ये नष्ट होण्याचा धोका होता, तो टळला आहे. जग एक होते आहे. जगाचे राजकारण एका दिशेने चालू लागले आहे. दोन विरोधी शक्ती संघर्ष सोडून सहकार्य करू लागल्या आहेत. अशा अवस्थेत हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन हे क्षुद्र झगडे कशासाठी? हिंदू धर्माचा अभिमान कसला बाळगता? धर्म हा मानवाला मुक्त करणारा, उच्च दर्जाचे नैतिक जीवन देणारा आहे. मानवाने एकत्र राहायला पाहिजे, ही काय अभिमान बाळगायची गोष्ट आहे. तुमच्या देशातील दहा कोटी मुसलमान परके समजून वागण्यात काय अर्थ आहे? पाकिस्तानालाही मित्रराष्ट्र आपण बनवू लागलो आहोत. किंबहुना सगळी राष्ट्रे ही मित्रराष्ट्र बनावीत, अशी आजची परिस्थिती आहे.

आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, दळणवळणाची साधने यामुळे सगळे जग एकत्र आले आहे. 'मैन लिव्हज इन ए ग्लोबल व्हिलेज' अशी त्याची अवस्था आहे. या जगाची एक वेगळी संस्कृती बनली आहे. माणूस जवळ आला आहे. त्यांचा सांस्कृतिक संगम झाला आहे. हे ज्ञान-विज्ञानाचे जग एवढे मोठे आहे की त्यापुढे हिंदुत्व मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व असले परंपरागत सांस्कृतिक धन अगदीच लहान आहे, असेही ते म्हणाले.

तर्कतीर्थ जोशी यांनी आपल्या या विस्तृत मुलाखतीत अनेक विषयांवरील परखड विचार मांडले. आपल्या जीवनाच्या वाटचालीतील महत्त्वाचे टप्पेही विशद केले. १९१८ साली काशीला जाऊन आपण शास्त्रांचे शिक्षण कसे घेतले व कलकत्त्याच्या संस्कृत महाविद्यालयांतून शेवटची पदवी संपादन करून तर्कतीर्थ शास्त्री कसे झाले, हे तर त्यांनी सांगितलेच; पण १९२९ ची काशीची ब्राह्मण महामंडळाची मोठी परिषद, सोमनाथ मंदिर जीर्णोद्वार, अस्पृश्यतानिवारण कार्य येथपासून महात्मा गांधींच्या दांडी मार्चपासून आपण राजकारणात कसे आलो, हेही त्यांनी विशद केले.

साहित्य संस्कृती मंडळाची कल्पना स्पष्ट करताना ते म्हणाले, ''आधुनिक ज्ञान, विज्ञान वैचारिक लेखन मराठीत होत नाही. मराठी भाषा आधुनिक ज्ञान, विज्ञानाची विद्यापीठीय भाषा व्हावी, याकरिता हे प्रयत्न होते. ज्या ग्रंथांना प्रकाशक मिळत नाही, वाचक कमी असतो, त्यांना अनुदान द्यावे. मराठीत शास्त्रीय विषयांवरचे ग्रंथ लिहून घ्यावेत, अशी कल्पना होती. मराठीत सगळ्याच विषयांवरचे प्रतिपादन होऊ शकते, हे दाखविण्यासाठी विश्वकोशाची कल्पना निघाली. १७ खंड कल्पिले. त्यापैकी तेरा प्रकाशित झाले असून, चौदावा महिन्याभरात प्रकाशित होईल. एक सूची खंड, जगातल्या सगळ्या राष्ट्रांचा नकाशा खंड व एक परिभाषा खंडही निघणार आहे. भारतीय भाषांत आधुनिक ज्ञान-विज्ञान सांगता येते, याचा हा यशस्वी प्रयोग आहे."

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. २६ जानेवारी, १९९०)**

ooo

५१

# धर्मविरोध आणि राजकीय फारकत

मुलाखतकार - **अनिल जोशी**

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळून पंचेचाळीस वर्षांहून अधिक काळ उलटला आणि त्यातील सुमारे चाळीस वर्षे केंद्र सरकारची सत्ता ही काँग्रेस पक्षाकडे राहिली. एवढेच नव्हे तर देशातील बहुसंख्य राज्ये ही काँग्रेस पक्षाच्या हातीच राहिली होती; परंतु गेल्या काही वर्षांत या काँग्रेस पक्षाच्या सत्ता टिकवून धरण्याच्या प्रयत्नांना अपयश येत चालले आहे आणि आगामी काळात केंद्रातील किंवा देशाच्या अन्य राज्यांतील सत्ता केवळ काँग्रेसकडेच राहील, असे सांगण्याची स्थिती सध्या तरी दिसत नाही. भारतीय जनता पक्ष या सत्तास्पर्धेमध्ये उतरत आहे. काही ठिकाणी तो यशस्वी होतो आहे व त्यामुळे काँग्रेस पक्षातील अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ नेत्यांच्या मनात एकप्रकारचा गोंधळ निर्माण झाला आहे, असे दिसते. अनेकविध प्रकारचे कायदे करून काही बंधने घालून ही राजकीय सत्ता आपल्या हाती राहावी, यासाठीचे काँग्रेस पक्षाचे चाललेले प्रयत्न व त्यांच्या विरोधात उभा राहिलेला भारतीय जनता पक्ष हे एकमेकांस शहप्रतिशह देण्यात गुंतले आहेत आणि म्हणून राजकारण व धर्म यांची फारकत करण्याची कायदेशीर तयारी काँग्रेस पक्ष करतो आहे, तर दुसरीकडे सर्व शक्तिनिशी विरोध करतो आहे. या सर्व गोंधळाच्या स्थितीविषयी ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जे मत व्यक्त केले ते मत अनेक अर्थांनी विचार करण्यास लावणारे आहे.

आजच्या निवडणूक कायद्याचा उल्लेख करून तर्कतीर्थ जोशी म्हणाले, "आज अस्तित्वात असणाऱ्या या निवडणूक कायद्यात भर टाकून अधिक गोंधळ माजण्याची शक्यता आहे. आज त्यामध्ये गोंधळ नाही. ही स्थिती पुढे कायम ठेवली पाहिजे. जे कायदा आणू पाहत आहेत, त्यांचे मन गोंधळात अडकलेले दिसते. देशातील मुसलमान हे अल्पसंख्याक असले तरी ती भारतातील अल्पसंख्या म्हणजे एका मोठ्या राष्ट्राची बहुसंख्या इतकी जबरदस्त आहे. त्यांनाच अनुकूल होईल, अशी येथील निवडणूक कायद्याची स्थिती नाही; पण त्यांना प्रतिकूलही नाही. अशा स्थितीत हिंदू नेत्यांनी आजच्या कायद्यात भर टाकणे योग्य नाही. त्यामुळे समाजस्वास्थ्य बिघडेल.

हिंदू-मुसलमान यांच्या संबंधात अधिक गुंतागुंत नको. आजची कायद्याची स्थिती योग्य आहे. जोपर्यंत हिंदू, मुसलमान हे या देशात नागरिक या नात्याने एकमेकांत मिसळून जात आहेत, तोपर्यंत कोणताही कायदा आवश्यक नाही. आज इहवादी दृष्टिकोन वाढतो आहे. हा दृष्टिकोन अधिक वेगाने वाढण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. मुसलमानांत शिक्षणाचा वेग नाही. त्यांच्या नेत्यांनी तो वेग आणल्यास हिंदू-मुसलमान हा प्रश्न गोंधळ निर्माण करणार नाही. उच्च शिक्षणाच्या प्रेरणा असल्याशिवाय इहवादी दृष्टी निर्माण होणार नाही.''

गेल्या सुमारे एक दशकाच्या कालावधीत दीर्घकाळ सत्तेवर असणाऱ्या काँग्रेसच्या स्थितीचा उल्लेख करताना तर्कतीर्थ जोशी यांनी त्या पक्षातील नेत्यांच्या सत्ताभिलाषेवर टीका केली. ''काँग्रेसचे कार्यकर्ते व नेते यांनी आजची परिस्थिती सुस्थिर केली पाहिजे. वास्तविक त्यांच्या ध्येयवादाप्रमाणे आजची स्थिती चांगली आहे. कारण हिंदू-मुसलमान हा भेद आणि त्यांचे संघर्ष हे काँग्रेसच्या ध्येयाशी विसंगत आहेत, हे त्यांनी ध्यानात ठेवले पाहिजे. मी स्वतः गेली सुमारे पन्नास वर्षे काँग्रेसच्या विचाराचाच होतो आणि एका अर्थाने मी काँग्रेसचाच होतो. त्या पक्षाचे अखिल भारतीय स्थान जबरदस्त होते, आज ते राहिले नाही. सत्तास्पर्धेत या पक्षातील नेते अधिकाधिक गुंतलेले दिसतात. त्यातून अलग राहणारे नेते आज उपलब्ध नाहीत. ही स्थिती त्या पक्षाच्या एकूण दुर्बलतेस कारणीभूत आहे. सत्तेच्या बाहेर राहून कार्य करण्याची क्षेत्रे त्यांना दिसत नाहीत. सत्तेबाहेर कार्य न केल्यास येथील लोकशाहीनिष्ठा दुर्बल होईल. आज या देशामध्ये लोकशाहीपद्धतीची मुळे अधिक खोलवर नेणारे नवीन कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. निरपेक्ष राजकीय समाजसेवक उपलब्ध झाले पाहिजेत. असे सेवक या देशात पुढे येऊ शकतील. त्यांचीच अधिक गरज आहे. ही जाणीव आवश्यक आहे. दुर्दैवाने ही जाणीवच नष्ट होत चालली आहे.''

आज या देशामध्ये धर्माच्या नावावर निवडणुका लढविण्याची काही राजकीय पक्षांची ध्येयधोरणे आहेत. यासंबंधी तर्कतीर्थ जोशी यांना विचारले असता ते म्हणाले, ''धर्माच्या नावावर निवडणुका लढायच्या असतील तर लढू द्या; पण उघडपणे त्या लढता येत नाहीत, ही येथील स्थिती पण चांगली आहे. त्यासाठी वेगळे कायदे करण्याची गरज नाही. तसे वेगळे कायदेच केल्याने अधिक धोका निर्माण होऊ शकतो. मी स्वतः काँग्रेसच्या ध्येयधोरणांचा समर्थक आहे. माझा अधिक काळ त्यांच्यातच गेला आहे म्हणून मी हे तळमळीने बोलत आहे.''

धार्मिक मतांचा पगडा असणाऱ्या राष्ट्रांची आजची स्थिती लोकशाही राज्यपद्धतीस अनुकूल नाही, याची अनेक उदाहरणे देता येतील. पाकिस्तानसारखे राष्ट्र भारताच्या लोकशाही राज्यकारभारात अस्वास्थ्य निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे, याकडे तर्कतीर्थ जोशी यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, ''पाकिस्तानसारखे राष्ट्र भारतामध्ये अस्वास्थ्य निर्माण करण्याचा प्रयत्न करणारच. याचे कारण त्या देशात लोकशाहीपद्धती निश्चितपणे दृढमूल झालेली नाही. इस्लामिक परंपरेचा प्रभाव मुसलमानी समाजावर फार जबरदस्त स्वरूपात आहे. अजून

त्या ठिकाणी इहवादी दृष्टिकोन आलेला नाही. हिंदुत्व हे इहवादासारखेच व्यक्तीस धार्मिक बंधनापासून मोकळे ठेवते. कारण हिंदू धर्म म्हणून एक सुसंघटित धर्म अशी त्याची अवस्था नाही. त्याचा चांगला परिणाम भारतीय लोकशाहीवर आहे. इस्लाम, पक्का संघटित करणारा धर्म आहे. लोकशाहीपद्धती इस्लामी पद्धतीत येण्यास वेळच लागणार आहे. तेथे इहवादी दृष्टी येणे कठीण आहे. हिंदूंना लोकशाहीसाठी इहवादाची गरज नाही. एक पुस्तक आणि एकच भविष्यवेत्ता अशी येथील स्थिती नाही. हा धर्म सनातन आहे. त्याचा स्थापक एक नाही. याचे एक धर्मपीठ नाही. त्यास एक धर्मपीठ, एक धर्मद्रष्टा अशी निष्ठा असलेली परंपरा येथे नाही.''

देशातील धर्म व राजकारण या वादाचा उल्लेख करताना श्री. जोशी म्हणाले की, ''काँग्रेसवाल्यांनी धर्म व राजकारण यांची फारकत नीट सांभाळली पाहिजे. धर्मविरोधाने ती सांभाळता येणार नाही. धर्माकडे पाठ फिरविली पाहिजे. मतदार कोणत्याही धर्माचा असो, हिंदू असो वा अन्य कोणी असो. बौद्ध, जैन हे तर हिंदूच आहेत; पण ही एका तऱ्हेची विविधता सांभाळायची तर आजचा कायदा त्यासाठी अतिशय अनुकूल आहे. ही गोष्ट काँग्रेसवाल्यांनी जाणून घेतली पाहिजे. धर्म म्हणजे काय हे हिंदूंना सांगता येत नाही. धर्मसंस्थापक एक नाही. पवित्र पुस्तके ठराविक नाहीत. कोणी वैदिक आहेत, कोणी पौराणिक आहेत. स्मृतीवाले एका अर्थी आहेत एका अर्थी नाहीत. याचे स्पष्टीकरण महाभारतातील एका श्लोकात आहे. तो अत्यंत सुंदर श्लोक आहे.''

**व्यास : -**

तर्कोऽ प्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम् ।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः ॥

ही व्यासांची उक्ती आहे; परंतु व्यासांनी निराशेचे उद्गार काढले आहेत. (वेद आहेत ते वेगवेगळया मतांचे आहेत, म्हणून त्या मतांचा समन्वय व्यासांनी ब्रह्मसूत्रात केला आहे. स्मृतयो विभिन्न : स्मृतीमध्येदेखील मतभेद आहेत.) (मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृती अशा अठरापेक्षा जास्त स्मृती आहेत).

''मतभेदाचे एक उदाहरण असे की, प्राचीन स्मृती म्हणजे गृह्यसूत्रे आणि धर्मसूत्रे यामध्ये भिन्न भिन्न जातींमध्ये विवाह सांगितले आहेत. ब्राह्मणास चारही वर्णांच्या बायका सांगितल्या आहेत. अनेक ऋषींची चरित्रे तशीच आहेत. वसिष्ठांनी शूद्र वर्णातील स्त्री केली होती. ती धर्मशास्त्रकारांना सारखी खटकत राहते. म्हणून ऋषींचे कूळ पाहू नये, अशी आपल्याकडे म्हण आहे. याज्ञवल्क्य स्मृतीत म्हटले आहे की, शूद्र स्त्री करू नये. मनुस्मृतीमध्ये शूद्र स्त्रीशी विवाह मान्य केला आहे.''

''कोणताही ऋषी नाही की, जो प्रमाण होय. म्हणून 'कलौ पाराशराः स्मृतः' म्हणजे कलियुगात 'पराशरस्मृती' प्रमाण होय; परंतु अलीकडे 'धर्मसिंधू', 'निर्णयसिंधू' इत्यादी 'पराशरस्मृती'स प्राधान्य देत नाहीत. हे धर्मनिबंध हिंदूंना मान्य असे निबंध आहेत. तात्पर्य,

‘धर्मस्य तत्त्वं निहितं गुह्यम्’ धर्माचे रहस्य गुप्त आहे, असे म्हणावे लागते. मोठे लोक - मोठा माणूस म्हणजे समाजातील नेता ज्या मार्गाने जाईल त्या मार्गाने जावे असे व्यासांचे म्हणणे आहे. व्यास अठरा पुराणांचा व महाभारताचा प्रणेता आहे. गीता त्यानेच लिहिली आहे. या भगवद्गीतेला लोकमान्यांनी फार महत्त्व दिले आणि नीतिशास्त्राचा श्रेष्ठ ग्रंथ म्हणून मार्गदर्शक आहे असे लक्षात घेऊन गीतारहस्य हे उत्कृष्ट भाष्य लिहिले. ते हल्लीच्या देशकाल परिस्थितीस उपयुक्त आहे. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्याच्या चळवळीला राष्ट्रव्यापी स्वरूप दिले तेव्हा असे म्हटले आहे, ‘पश्चिमी साम्राज्यशाहीने जवळ जवळ शंभर राष्ट्रे काबीज केली आहेत. त्या सर्वांच्या मुक्तीची चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्याची चळवळ होय.’ लोकमान्य टिळक हे मानवतावादी होते हे स्पष्ट आहे.’’

**(केसरी, १० ऑक्टोबर, १९९३)**

ooo

५२

# भारतीय संस्कृतीतील साहित्य तरुणांना उपयुक्त

मुलाखतकार - **बाबूराव शिंदे**

आपल्या भारतीय संस्कृतीतील उच्च दर्जाचे साहित्य तरुण पिढीने वाचल्यास तरुण पिढीची गुणवत्ता वाढेल. तरुण पिढीने अधिक वाचन करण्याची गरज आहे.

तर्कतीर्थ जोशी म्हणाले, ''माणसाने प्रबुद्ध व्हावे या भावनेने मी चांगले ग्रंथवाचन करू लागलो. वाई येथील 'धर्म' मासिकाचे संपादक पंडित लेले यांनी केलेले विविध लेखन व महाभारताचे भाषांतर वाचले. आपल्या संस्कृतीतील उच्च दर्जाचे जे साहित्य आहे त्या साहित्याच्या वाचनाने आपली मान्यता वाढणार आहे. स्वामी केवलानंदनंतर प्राज्ञपाठशाळेचे अध्यक्षपद तर्कतीर्थांकडे चालून आले. यानंतर पन्नास वर्षांहून अधिक काळ या प्राज्ञपाठशाळेच्या अध्यक्षपदाची धुरा ते सांभाळीत आहेत. या प्राज्ञ पाठशाळेच्या स्थापनेविषयी व आजपर्यंतच्या वाटचालीविषयी विचारले असता ते म्हणाले, भारतीय संस्कृतीचा इतिहास हा मानवजातीच्या इतिहासातील विशेषतः ज्ञात इतिहासातील महत्त्वाचा भाग आहे. मानवी संस्कृतीचा इतिहास हा मनुष्याने निसर्गामध्ये बदल करून जीवन स्थिर व समृद्ध करण्याचा इतिहास आहे. आज जीवन सुसंस्कृत करण्याची गरज असून, काळाने ते आव्हान आपणापुढे ठेवले आहे. ते लिखित स्वरूपात नाही. कारण मौर्य काळापूर्वीचे लेखन उपलब्ध नाही. सिंधू संस्कृतीमधील लेखन उपलब्ध आहे; परंतु त्याचा अजून उलगडा झालेला नाही. ऋग्वेद हे माणसाचे सर्वात जुने साहित्य आहे. ऋग्वेदकालीन भारतीय समाजाची रचना जातिभेदाविरहित आजच्या युरोपीय समाजासारखी होती, असे मॅक्सम्युलरसारखे वेदाध्ययन केलेले पंडित म्हणतात. चातुर्वर्ण्य संस्था सूक्तात वर्णिली आहे; परंतु ते सूक्त सगळ्यात अलीकडचे ऋग्वेदातील सूक्त आहे. वाई येथे ब्राह्मण समाजात वेदाध्ययन फार निष्ठेने आतापर्यंत चालू होते. आता वेदाध्ययनाची परंपरा जवळजवळ लुप्त झाली आहे. कारण वेदाध्ययन केलेल्याला निश्चित व्यवसाय आज मिळत नाही. आज वेदाध्ययन कालबाह्य मानले जाते; पण ते चूक आहे.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. २५ जानेवारी १९९४)**

❍❍❍

५३

# चैतन्य हेच ईश्वराचे रूप

मुलाखतकार - **अरुण शेवते**

कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक वैचारिक आणि सामाजिक बदलते प्रवाह पाहिले. त्याचबरोबर व्यक्ती म्हणून आपले व्यक्तिमत्त्व त्यांनी महाराष्ट्रात सतत लोकांसमोर ठेवले. कुठल्याही खेड्यातून त्यांना वैचारिक शिबिराचे निमंत्रण आले की, पंचविशीच्या उत्साहात ते जात. लोकांशी संपर्क साधत. रोखठोक भाषेत आपले विचार ते लोकांसमोर मांडत.

ईश्वर आहे की नाही याबद्दलची चर्चा समाजजीवनात सतत चालू असते. ईश्वर नाही असे मानणारा वर्ग समाजात संख्येने थोडा असला तरी त्यांची वैचारिक भूमिकेची दखल ईश्वर आहे असे मानणाऱ्या बहुसंख्य समाजाला घ्यावी लागते. ती बदलून चालत नाही. तर्कतीर्थांसारख्या विचारवंतांकडून त्यांच्या भूमिकेचा मागोवा घ्यावयाच्या हेतूने मी त्यांची मुलाखत घेतली. व्याख्यानमालेच्या निमित्ताने अहमदनगर येथे मुक्कामी होते. त्यावेळेस हा लाभ झाला.

**प्रश्न : ईश्वर आहे की नाही?**

**उत्तर :** माझी ईश्वराची जाणीव ही विश्वाचे चैतन्यमय अधिष्ठान आणि चैतन्याचा आविष्कार, अशी ही माझी जाणीव आहे. तो ईश्वर सच्चिदानंद स्वरूप असा मात्र जाणवतो. माझा श्वासोच्छवास जसा मला जाणवतो, तसेच त्याचे अस्तित्व मला जाणवते, ते काही कोणी माणूस नियंता अशासारखा नाही. वेदादी धर्मग्रंथ किंवा भगवद्गीतेसारखे धर्मग्रंथ त्याने माणसाला दिले असे मला वाटत नाही. कारण धर्मग्रंथ विशिष्ट भाषेत वैशिष्ट्यपूर्ण असतात. मी ईश्वराबद्दल जे विवरण केले ते भाषेत असले तरी नाही. ईश्वराबद्दलची भाषा आहे. त्याचे स्वरूप शांत, शुद्ध, अविनाशी, निर्गुण असेच आहे. त्याच्या जाणिवेने मन शांत होते. आपली संकटे, आपत्ती, दुःखे याच्याने मन अस्वस्थ होते; पण निर्गुण व शांत मनाला स्वस्थ करता येते.

**प्रश्न : जगाचा पसारा म्हणजे नाटक**

**उत्तर :** या जगात दुःखे आहेत, दुष्टावा आहे, हिंसा आहे, हे आपण नित्य पाहतो. मग जगातही ही दुःखे, दुष्टावा पाहिल्यावर तो परमात्मा आहे याची संगती कशी लागते, याचे उत्तर

माझ्यापाशी नाही. साधुसंतांपाशी याचे उत्तर नाही. महात्मा गांधींपाशी याचे उत्तर नव्हते. याचे एकच उत्तर असू शकते. या जगाचा पसारा म्हणजे एक नाटक आहे. त्याने दाखविलेले एक नाटक आहे आणि दुःखांतिका हे उत्कृष्ट नाटक आहे, असे ॲरिस्टॉटल मानतो; पण नाटक म्हणजे एक भास, प्रचंड भास आहे असे वाटते. आकाशात वादळे येतात आणि जातात तसे हे विश्व. त्या ईश्वरमय शुद्ध आकाशात वादळासारखे उद्भवलेले असते. मी माझी ही ईश्वरविषयक श्रद्धा किंवा जाणीव कधीही प्रवचनरूपाने कथा, कीर्तनरूपाने दाखविलेली नाही. आता आयुष्याचे अखेरचे दिवस दिसताहेत, अशावेळी माझ्याबद्दल शंका राहू नये. मला त्या ईश्वराला निर्देश करणारा एक शब्द योगाशास्त्राने मान्य केलेला ओंकार अथवा प्रणव आहे. ओंकार याचा अर्थ संस्कृत भाषेत 'होय' असा आहे.

**प्रश्न : चैतन्य हेच ईश्वराचे अंतिम रूप मानता का?**

**उत्तर :** चैतन्य हेच ईश्वराचे रूप आहे. मी जरी काही बोललो तरी आणि कोणी काही जरी त्याच्याबद्दल कोणत्याही भाषेत बोलते तरी त्या बोलण्याच्या पलीकडे तो राहतो. त्याचे आकलन माणसाच्या कुवतीत नाही. आकलन करता येण्याइतकी कुवत माणसात नाही.

लोक भजन करतात. जसे कविता म्हणतात तसे भजन आहे. तुकारामाचे अभंग फार आवडतात, गावेसे वाटतात याचे कारण ते काव्य आहे. संगीत जसे आवडते तसे भजन आवडते. म्हणून ज्यांना भजन आवडते असे लोक सर्व जगभर आहेत आणि निसर्गाची शोभा जशी आपण उत्कंठतेने पाहतो तशा उत्कंठतेने संतांच्या उक्ती गाव्याशा वाटतात. मनाला स्वास्थ्य लाभते. मनाचे स्वास्थ्य निर्माण करणारी ईश्वराची जाणीव आणि भजनातील भक्ती आहे. ईश्वर असो, नसो माणसाने ईश्वर नसला तरी अस्तित्वात असलेला, दाखवलेला आहे. त्या माणसांमध्ये मुख्यतः ऋषीमुनी आणि संत हे प्रमुख आहेत; परंतु साधी माणसेदेखील त्याला जाणतात, शरण जातात. शरण जाण्याची क्रिया अजाणपूर्वक होत नाही. शरण जाणे म्हणजे पूर्ण निश्चयांती स्वतःची विशिष्ट कृती ठरते.

**प्रश्न : संताच्या अभंगात ईश्वराचे जे रूप जाणवते त्याविषयी तुम्हाला काय वाटते?**

**उत्तर :** पौराणिक कथांमध्ये मूर्तरूप ईश्वर संतांना भावलेला आहे. कथेने व्यक्त केलेले मूर्तरूप संतांना भावलेले आहे; पण ते भावलेले रूप हे साहित्यातल्या कल्पित कथांसारखे आहे. माणसे कल्पिक साहित्य वास्तव साहित्यांच्या ज्ञानापेक्षा अगणित पटीने निर्माण करतात, त्यात रमतात. हे आपण मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन या सगळ्या भाषांमध्ये संतसाहित्य कथांच्या आणि कवितांच्या रूपाने निर्माण होते यावरून लक्षात येईल. कल्पितांमध्ये रमणारा मनुष्य आहे. दशमुखी रावण होता की नाही हा प्रश्न नाही; पण तो होता आणि त्याने सीतेचे अपहरण केले ही गोष्ट सगळ्या जगाला आवडलेली आहे. रामायण हे जगामध्ये आवडलेले काव्य आहे. म्हणजे तात्पर्य असे की, कल्पितामध्ये जास्तीत जास्त रमणारा मनुष्य नावाचा प्राणी आहे. त्यामुळे संतांच्या साहित्यात ज्या लीला वर्णिलेल्या आहेत त्या कल्पित आहेत, असे

म्हटले तरी माणसाला आस्था असणारच आहे, राहणारच आहे.

**प्रश्न : साहित्यातून ईश्वराचे स्तोत्र आपणाला दिसते. ईश्वरी संकल्पनेच्या आहारी का गेले?**

**उत्तर :** संत साहित्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी असलेल्या अनैतिक प्रवृत्तीला आणि दुष्ट वासनांना एकदम मर्यादा पडतात. मनुष्याचे शिक्षण करणे, मनुष्याला सदाचारी करणे हे संतसाहित्याचे एक महत्त्वाचे कार्य आहे. संतसाहित्याची श्रेष्ठता त्याच्या कलात्मकतेतच आहे. कलात्मकता माणसाचा वर्तनक्रम सुधारते. म्हणजे मनुष्याला वळण लावण्याचे कार्य त्या साहित्याने होते. मनुष्याच्या मनात एक उन्नत अशा भावनांमध्ये रंगून जाण्याचे काम संतसाहित्याने होते. मनुष्याचा सुसंस्कृतपणा संत साहित्याच्या रूपाने अधिक गंभीर आणि समर्थ बनतो. मनुष्याचे नैतिक शौर्य संतसाहित्याने निर्माण होते. जगातील धर्मग्रंथाच्या त्या त्या अनुयायांच्या मनावर मोठा पगडा आहे; परंतु धर्मग्रंथ मानवप्रणीत असल्यामुळे मानवी दोष त्यात चितारलेले आहेत; पण ते बाजूला केले पाहिजे. सगळ्या धर्मपरंपरांमध्ये हे दोष कमी-जास्त प्रमाणात आढळतात. हे युग धर्मग्रंथांच्याबद्दल आस्था ठेवू नये. धर्मग्रंथावरील श्रद्धा ही अधिक विवेकपूर्ण करण्याचे आहे.

**प्रश्न : हे 'विश्वचि माझे घर' असे ज्ञानेश्वर म्हणतात. संतांनी येथे साहित्यातून जीवनाची व्याप्ती शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिभा आणि बुद्धी याचा अतिशय सुंदर मिलाफ संतसाहित्यात आढळतो. असे असूनही ईश्वरी संकल्पनेने हे सगळे संत व्यापून गेलेले आहे, असे का?**

**उत्तर :** संताची ईश्वराच्या अस्तित्वावर पूर्ण श्रद्धा असते. असे असूनही तो भेटत नाही, म्हणून ते खंत व्यक्त करतात, दुःखी होतात, ईश्वरावर रागवतात. तो जर सर्वत्र आहे तर तो भेटलेलाच आहे, तो भेटत नाही म्हणून तक्रार करण्यात काय अर्थ आहे.

त्या तक्रारीचा अर्थ आहे, बाप, राजा, मित्र इत्यादिकांसारखा व्यक्तिरूप आहे; पण सर्वत्र आहे. याचा अर्थ तत्त्वरूप आहे आणि व्यक्तिरूप आहे, असे संतांना वाटते आणि त्यांना भेटतोही तो. उदाहरणार्थ, पंढरीला गेल्यावर त्या देवळात कर कटावर ठेवून उभा असलेला दिसला, की तो भेटला आहे, असे वाटते; पण तो सर्वत्रच आहे. तो भेटलेलाच आहे; पण हा भावनेचा अंतर्विरोध बाजूला कसा करायचा? हा अंतर्विरोध बाजूला करण्याची गरज नाही..

भावनांचे रंग असतात आणि भाविक हे रंग अनुभवतो. हे जसे रंग आहेत तशी रूपे आहेत. त्याच्यातही मनुष्य दंग होतो. हे सगळे मनुष्याच्या उत्कंठतेतून उत्पन्न होतात. मनुष्याला व्यक्त आणि मूर्तरूप याचा ओढा असतो. कारण अस्तित्व म्हणजे सगुणरूप आणि मनुष्याचे अनुभवाचे ते जग आहे. त्या जगाची बंधने माणसाला आहेत, टाळता येत नाही. तात्त्विक, तर्कशुद्ध, तत्त्वज्ञान अपुरे पडते. मूर्त आणि सृष्ट आणि दुष्ट असे हे विश्व. अशा या विश्वात मनुष्य जगतो आहे. त्यामुळे ईश्वराच्या संबोधातदेखील ते विश्व शिरतेच. ते बाजूला करता येत नाही. मन त्याच्यावाचून स्वस्थ बसत नाही.

**प्रश्न : ईश्वर आणि संत साहित्याविषयीची तुमची भूमिका इतकी स्पष्ट असताना तुम्ही तुमच्या आयुष्यात कर्मकांडाला स्थान का दिले?**

**उत्तर :** वयाच्या २० व्या वर्षांपर्यंत मी कर्मकांड करत होतो. स्वातंत्र्यकाळामध्ये १९३० साली जेलमध्ये गेलो. तिथे कर्मकांड सुटले. तिथे मूर्तिपूजा वगैरे करणे शक्य नव्हते, ते आपोआप सुटले.

**प्रश्न: कर्मकांडामधला निष्फळपणा तुम्हाला कसा जाणवला?**

**उत्तर :** कर्मकांडामध्ये निष्फळपणा हा एक मर्यादित अर्थाने खरा आहे. कर्मकांड आवश्यक असतेच. पूजा, भजन हे कर्मकांड आहे. धर्मग्रंथ पठण हे कर्मकांड आहे. धर्मग्रंथपठण हे माझ्यापाशी कायम राहिलेले आहे. त्यामुळे धर्मग्रंथ माझ्या डोळ्यासमोर आहे.

**प्रश्न : पूजा, भजन यांना आपण कर्मकांड कशामुळे मानता?**

**उत्तर :** ते आवडते म्हणून. ज्यावेळेस तात्त्विकता, चिंतन नव्हते तेव्हापासून हे चालले आहे. या जडलेल्या सवयी आहेत. आता हळूहळू आपोआप सुटलेल्या आहेत.

**प्रश्न : संतांच्या ईश्वरी संकल्पनेमुळे सामाजिक परिवर्तनात अडसर निर्माण झाला का? तो कसा?**

**उत्तर :** संतांच्या ईश्वरी संकल्पनेमुळे सामाजिक परिवर्तनात अडसर निर्माण झालेला नाही. ईश्वर हा सर्वांना पिता, माता, बंधू, मित्र, सखा असा आहे. समाजातले उच्चनीचभाव, जातिभेद वगैरे ते सामाजिक निर्बंध आणि आचार आहेत. ईश्वराबद्दलची आस्तिक्यबुद्धी त्याचे समर्थन करू शकत नाही. भयापोटी ईश्वराचे अस्तित्व मानले तरी भय हा नास्तिकपणाचा पुरावा नाही. तो आहे की नाही या संबंधाने निराळ्याच विचारसरणीचा आश्रय घेतला पाहिजे.

**प्रश्न : आपण आस्तिक आहात की नास्तिक?**

**उत्तर :** मी पूर्ण आस्तिक आहे; परंतु नास्तिकालाही मी आस्तिक समजतो. कारण ते स्वतःचे चैतन्य नाकारत नाही आणि चैतन्य हेच ईश्वराचे तत्त्व आहे.

**प्रश्न : चैतन्य हेच जर तुम्ही ईश्वराचे रूप मानता तर ते माणसाच्या आकलनाच्या पलीकडे आहे, असे तुम्ही कसे म्हणता? चैतन्य हे प्रत्येक माणसाच्या ठायी असते, तर विकृती आणि प्रवृत्ती यांच्या संघर्षात चैतन्याचे अस्तित्व कुठे असते?**

**उत्तर :** पाणी, प्रकाश, आकाश, तारांगण हे सगळे माणसाच्या प्रत्ययास येणारे विषय आहेत; पण त्याचे खरेखुरे आकलन माणसाला झालेले नसते. पाणी आणि प्रकाश हे विज्ञानाचे विषय आहेत. तारांगण हा प्रकाशगणच आहे. त्याचे आकलन केवळ काही अंशाने विज्ञानवेत्त्यांना असते. सामान्यज्ञान माणसांना नसते. पाणी आणि अन्न यांच्या साहाय्याने प्राणधारणा चालते; पण ती कशी चालते याचे ज्ञान माणसांना नसते. असे खोलातील आकलन चैतन्याबद्दल कोणालाच नाही.

**('ऋतुरंग' वार्षिक (दिवाळी), मुंबई, १९९४)**

ooo

५४

# भारतीय तत्त्वज्ञान आणि सर्वधर्मसमभाव

मुलाखतकार - **अनिल जोशी**

भारतीय संस्कृती किंवा हिंदू संस्कृती हिचा इतिहास जगातील अन्य संस्कृतींपेक्षा अधिक प्राचीन आहे. मॅक्सम्युलरसारखे भारतीय हिंदू संस्कृतीचे व वेदांचे पश्चिमी पंडित इ. स. पूर्व १२ शे ते १५ शे हा काळ वैदिक संस्कृतीच्या व वेदांच्या स्थापनेचा काळ आहे असे मानतात, आणि सर्वधर्मसहिष्णुतेच्या तत्त्वाचा प्रथम पुरस्कार वेदांनीच केला असे सांगतात. ऋग्वेदात म्हटले आहे की, "एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति।' (एकच अंतिम सत्य शहाणे विचारवंत अनेक प्रकारांनी सांगत असतात). म्हणजे धर्मविषयक विचार अनेक प्रकारचे असतात; पण त्यांचे लक्ष्य सूक्ष्म असे एकच असते. सगळे धर्म हे एकाच अंतिम सत्याकडे भक्ताला नेऊ इच्छितात. त्यामुळे भारतात हिंदू परंपरेत भिन्न धार्मिक समाजांचा निवास एकाच प्रदेशात संघर्ष न करता हजारो वर्षे शांततापूर्ण राहिला. एका धर्मातून दुसऱ्या धर्मात लोक प्रविष्ट झाले आहेत; परंतु जबरदस्तीचे धर्मांतर मूळच्या भारतीय धर्मांमध्ये नाही. याच भारतीय परंपरेचे उत्कृष्ट आविष्करण, अत्यंत तर्कशुद्ध स्पष्टीकरण जैन धर्मात आहे. जैन धर्माचा अनेकांतवाद किंवा स्यादवाद हा अनेक धार्मिक समाज प्रेमाने आणि सहभावाने एकत्र व्हावेत याचा दर्शक आहे. जैन धर्म हा खराखुरा धर्म आहे; परंतु धर्मपरंपरेमधील उच्च दर्जाची अहिंसक सहिष्णुता त्यात प्रकट झाली आहे. जैन धर्म हा अनाक्रमक आहे. तसाच बौद्ध धर्म आहे. बुद्धाला बौद्ध धर्मग्रंथात 'जिन' या संज्ञेने निर्दिष्ट केलेले आढळते. जैन धर्मात बुद्धालाही जवळ केले आहे. भारतामध्ये उद्भवलेल्या धर्मांचा इतिहास पाहा. बौद्ध धर्म भारताबाहेर दूर दूर पसरला. चीन, जपामध्ये गेला; पण कोठेही संघर्ष नाही. ही आश्चर्याची गोष्ट आहे. आजच्या विचार स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा उदो उदो करणाऱ्या लोकशाही राज्यपद्धतीने बौद्ध आणि जैन धर्म यांची उपासना करावी. धर्मच पाहिजे असेल तर हे दोनच धर्म (जैन-बौद्ध) विश्वधर्म बनू शकतात. इतर कोणतेही धर्म विश्वधर्म बनू शकत नाहीत. कारण त्यांचा इतिहास शुद्ध, शांतिमय, निर्भेळ नाही. जबरदस्ती आहे, तलवार आहे. मंदिरे पाडल्याची ऐतिहासिक नोंद आहे. आजही पाडलेल्या मंदिरांच्या जागा पाहावयास मिळतात. हा

असहिष्णुतेचा इतिहास डोळ्यांना दिसतो. चक्षुर्वैसत्यम् आहे. वैदिक धर्माने सर्व धर्मांचे एकच पूजनीय अंतिम सत्य असे सांगितले व त्यामुळे धर्मप्रसाराचा इतिहास हा पूर्ण शांतिमय इतिहास घडला हे बौद्ध धर्माच्या इतिहासावरून दिसते.

माझे काही मित्र, विशेषतः जैन मित्र विचारतात, ‘‘बौद्ध धर्म जगभर आशियात पसरला; पण जैन धर्म भारताच्या सीमांच्या पलीकडे गेला नाही हा फरक का?’’

याचे एकच उत्तर आहे की, जैन साधू हे कठोर संयमव्रताचे अनुष्ठान करणारे आहेत. शेवटी देहत्याग, उपवास करून, अन्नत्याग करून ऐहिक जीवितयात्रा संपविणारे. ही केवळ ऐतिहासिक कथा नाही. आजसुद्धा संथारा व्रताने, अन्न-पाण्याचा त्याग करून वृद्ध श्रावक आणि श्राविका इहलोकीची यात्रा संपवितात, हे आपण प्रत्यक्ष पाहतो. त्यामुळे हा धर्म कठोर व्रतांचा धर्म आहे, असा सामान्य माणसांच्या मनावर परिणाम होतो. बौद्ध धर्माचे तसे नाही. तो अत्यंत सौम्य, सुसह्य जीवनपद्धती मान्य करतो हे लक्षात भरते; परंतु जैन तत्त्वज्ञान मात्र सर्वधर्मसहिष्णुता स्वीकारण्याकरिता मनुष्याच्या बुद्धीची तयारी करते.

आधुनिक काळात या वर्तमानयुगात हिंदू धर्मामध्ये सर्वधर्मसहिष्णुतेचे आदर्श संत निर्माण झाले. रामकृष्ण परमहंस हे त्यांचे अग्रणी होत. त्यांनी वेदोपनिषदांचे आपल्या प्रार्थनेत गायन केले. ख्रिश्चन पद्धतीची उपासना केली. इस्लामची प्रार्थना उच्चरवाने अनुभवली. विवेकानंदांसारखा सर्वधर्मपरिषदेमध्ये प्रभाव गाजविणारा संतशिष्य म्हणून निर्माण केला. महात्मा गांधी हे आपल्या धर्मश्रद्धेच्या अधिष्ठानावर उभे राहून राजकारणामध्ये नेतृत्व करून गेले. जगाच्या राजकीय इतिहासामध्ये महात्मा गांधींचे स्थान अनुपम आणि अद्वितीय आहे. अलीकडचे हिंदुत्ववादी हे हिंदुत्वाचे विश्वधर्मस्वरूप झाकाळून टाकत आहेत.

**(दैनिक केसरी, पुणे, काळ अनुपलब्ध)**

❍❍❍

(इ)

# विविध दृष्टिकोनविषयक मुलाखती

## राजकारण

*

५५

# लोकशाही शासनपद्धतीचा कायापालट जरूरी

मुलाखतकार - **अनिल जोशी**

**प्रश्न : "शास्त्रीजी आता आपणास ७५ वे वर्ष लागले! तिथीप्रमाणे रथसप्तमी हा आपला जन्मदिवस. आपण याज्ञिक, वैदिक कुटुंबात जन्मलेले. वडील याज्ञिक, वैदिक व ज्योतिषी होते. त्यामुळे त्या इतक्या जुन्या काळी परंपरेप्रमाणे आपले शिक्षण होणे आणि परंपरेचा व्यवसाय चालविणे हाच आपल्या शिक्षणाचा उद्देश असावा, असे मानल्यास बरोबर ठरेल, नव्हे का?''**

"याज्ञिक, वैदिक, शास्त्री-पुराणिक, कीर्तनकार व ज्योतिषी आमच्या घराघरांत झाले आहेत. त्याप्रमाणे संस्कृत विद्येचे अध्ययन करावे व तीत प्रावीण्य मिळवावे, अशी महत्त्वाकांक्षा माझ्या मनात माझ्या वडिलांनी बिंबविली होती. माझे वडील याज्ञिक, वैदिक असले तरी ते कट्टर टिळकभक्त होते. मंगळवारच्या 'केसरी'तील अग्रलेख सामुदायिक रीतीने वाचण्याचा समारंभ दर गुरुवारी आमच्या ओटीवर असावयाचा. मूळचे माझे गाव धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर हे होय. कै. कृष्णराव करमरकर, कै. रामदासपंत वैद्य इत्यादी माझ्या वडिलांचे मित्र आमच्या ओटीवर संध्याकाळी गप्पागोष्टीकरता अधूनमधून येत असत. आमची ओटी म्हणजे या देशभक्तांचा अड्डाच होता. खुदीराम बोस, सावरकर इत्यादी क्रांतिकारकांच्या कथाही माझ्या कानावरून जात, त्याचाही माझ्या मनावर फार परिणाम झाला.''

## क्रांतिकारकांचे केंद्र

"माझे वेदाध्ययन १३ व्या वर्षी एका मर्यादेपर्यंत पूर्ण झाले. केवळ शिक्षण न होता संस्कृत शास्त्राचेही शिक्षण त्याच्या जोडीस पाहिजे म्हणून हरिद्वार-कांगडी येथे गुरुकुलात शिक्षणास्तव पाठविण्याचा माझ्या वडिलांचा बेत होता; परंतु वाई येथील माझे गुरू स्वामी केवलानंद यांचे मित्र दादासाहेब देवकुळे यांनी माझ्या वडिलांचे मन वळविले व मला वाईत प्रथम पाठवा, नंतर कांगडीला जावयाचे का नाही हे ठरविता येईल असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे मी १९१४ च्या

फेब्रुवारीस वाईस आलो. तळेगाव-दाभाडे येथील ज्वलज्जहाल राष्ट्रीय शिक्षणसंस्था म्हणजे समर्थ विद्यालय ब्रिटिश सरकारने बंद पाडले होते. त्या विद्यालयातील प्रौढ विद्यार्थी केवलानंद सरस्वती यांच्या प्राज्ञपाठशाळेत शिकत व शिकवीतही होते. वाई प्राज्ञपाठशाळा हे त्या वेळी - म्हणजे १९१४ च्या सुमारास सशस्त्र क्रांतिकारकांचे एक गुप्त केंद्र म्हणूनही काम करीत होते. ही मंडळी स्वतःला लोकमान्य टिळकांचे अनुयायी व भक्त समजत होती."

"माझ्या शिक्षणाच्या ध्येयाला व्यापक आकार आला. त्याकरिता इंग्रजीही शिकले पाहिजे, अशी जाणीव झाली. नंतर खासगी रीतीने इंग्रजी शिकलो. १९१७ साली प्राज्ञपाठशाळेत प्रसिद्ध गांधीवादी आचार्य विनोबा भावे हे श्री केवलानंद सरस्वती यांच्यापाशी शांकरभाष्यांच्या अध्ययनास येऊन राहिले होते. त्यांच्याही गांधीवादी तत्त्वज्ञानाचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. या प्राज्ञपाठशाळेच्या वातावरणात मी पश्चिमी विचारांच्याही अध्ययनास प्रारंभ केला. तात्पर्य असे की, माझ्या शैक्षणिक ध्येयामध्ये, शैक्षणिक साधनेमध्ये स्थित्यंतरे झाली; परंतु प्रथमपासून सुरू असलेल्या शैक्षणिक ध्येयाचा धागा अखंडच राहिला. माझ्या परंपरेचे कर्तव्य कायम राहिले; परंतु मी व्यवसायाला आधुनिकतेची बैठक मिळविली. एका अर्थी परंपराच संपूर्णपणे मूलतः बदलली.''

**प्रश्न : "प्रत्यक्ष राजकारणात तुम्ही कधीपासून भाग घेऊ लागलात? त्याचप्रमाणे म. गांधींच्या नेतृत्वाखाली आपण अनेक वर्षे काम केले हे आम्हांस माहीत आहे; परंतु सशस्त्र क्रांतिवादी व निःशस्त्र अहिंसक राजकारण यापैकी तुम्ही निश्चितपणे कोणता मार्ग पत्करला?''**

**उत्तर :**

"या एका प्रश्नात अनेक प्रश्न गोवले आहेत. प्राज्ञपाठशाळेमध्ये वयाच्या १४ व्या वर्षी मी आलो, म्हणजे एका अर्थी राजकारणातच शिरलो असे म्हणता येते. एका अर्थी असे म्हणावयाचे कारण की, प्राज्ञपाठशाळेत त्या वेळी शिकत असलेले निम्म्यापेक्षा अधिक विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेतील क्रांतिकारक शिक्षकांच्या राजकीय ध्येयवादापासून अगदी अलिप्त होते. त्या ध्येयवादाची अनेक प्रवचने ऐकूनही त्यांच्यावर काही परिणाम झाला नाही. मी व माझे थोडे सहाध्यायी मात्र त्या क्रांतिकारक विचारांनी विलक्षण झपाटलो गेलो. सशस्त्र क्रांतीशिवाय भारत ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जोखडातून मुक्त होऊ शकणार नाही, असा विचार माझ्या मनावर खोल बिंबला होता; परंतु असहकारितेच्या चळवळीतील किंवा कायदेभंगाच्या चळवळीतील जनतेचे व सुशिक्षित मध्यमवर्गाचे उठाव पाहून मला असे दिसू लागले की, अखेरची स्वातंत्र्यप्राप्ती सशस्त्र होवो अथवा निःशस्त्र; परंतु महात्मा गांधींच्या अहिंसात्मक चळवळीच्या लाटा जनजागृतीकरता अत्यंत आवश्यक होत. म. गांधींच्या सहवासात मी १९३२ सालापासून आलो तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, सशस्त्र क्रांतीशिवाय भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन यशस्वी होण्याची शक्यता आहे; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीकरता अहिंसावादाचाच आश्रय केला पाहिजे, अशी अंतिम

निष्ठा मात्र माझ्या ठायी कधीही निर्माण झाली नाही."

**प्रश्न : "शास्त्रीजी, तुमच्या सांगण्यावरून असे दिसते की, अहिंसक क्रांतीचा मार्ग हा निश्चित सफल होतो, असा विश्वास तुम्हास कधीच नव्हता, हे कसे काय?''**

**उत्तर :** "भारताला स्वातंत्र्य मिळाले ते निःशस्त्र आंदोलनामुळे हे काही अंशीच खरे आहे; परंतु यावरून निःशस्त्र राजकीय क्रांतीचा सिद्धांत निघू शकत नाही. एक असे की, गांधींच्या कारकीर्दीत ज्या तऱ्हेचे राजकीय निःशस्त्र उठाव झाले ते निर्भेळ नव्हते. सावरकर, शामजीकृष्ण वर्मा, खुदीराम बोस, गदर पक्ष, एम. एन. रॉय, भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस व त्यांची सशस्त्र मुक्तिसेना ही सशस्त्र क्रांतिकारकांची परंपरासुद्धा ध्यानात घ्यावी लागते. एवढेच नव्हे तर म. गांधींच्या 'छोडो भारत' चळवळीचा एक कार्यक्रम जाळपोळ, घातपात हाच होता. जाळपोळ, घातपात अनेक महिने भारतभर चालू होता. त्यात संपत्तीची प्रचंड नासधूस झाली होती. ही म. गांधीजींच्याही मताने हिंसाच होती. इंडोचीनमध्ये फ्रेंचांचेही साम्राज्य त्याच वेळी होते. ब्रिटिश फ्रेंचांसारखे हटवादी असते तर सशस्त्र क्रांतीयुद्ध सुरू होऊन भारताचाही इंडोचीन झाला असता. बांगलादेश स्वतंत्र होण्याअगोदर शेख मुजीब - अर - रहमान यांनी १०० टक्के असहकार किंवा निःशस्त्र प्रतिकार अमलात आणला; परंतु तो व्यर्थ गेला. हिटलर किंवा मुसोलिनीसारखा ब्रिटिश सत्ताधारी असता, तर अहिंसक राजकीय चळवळ पहिल्याच क्षणी दडपली गेली असती. या गोष्टींचा विचार केला म्हणजे असे म्हणावे लागते की, अहिंसा हे राजकीय शस्त्र म्हणून नेहमीच उपयोगी पडणारे शस्त्र मानता येत नाही.''

## मौन कशासाठी?

**प्रश्न : "स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राजकारणासंबंधी पूर्वीच्या अपेक्षा कितपत सफल झाल्या? आज असंख्य भारतीय नागरिक दारिद्र्याच्या किमान पातळीखाली आयुष्य कंठित आहेत. उच्च शिक्षणसंस्थांमधून दरवर्षी लक्षावधी पदवीधर निराशेतच बाहेर पडत आहेत. गुजरात प्रदेशातील लोकनियुक्त प्रतिनिधींचे राज्य विद्यार्थ्यांनी उधळून लावले आहे. बिहारची जनता शासनाविरुद्ध जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली लढा देत आहे. या परिस्थितीबद्दल तुम्ही मौन का धारण केले आहे?''**

**उत्तर :** "मार्ग सापडत नाही म्हणून मी मौन धारण केले आहे. ही परिस्थिती अत्यंत निराशाजनक आहे. शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल व्हावयास पाहिजे, यात शंका नाही. आर्थिक नियोजन गेली २५ वर्षे अमलात आणले जात आहे; परंतु जनतेच्या आर्थिक स्वास्थ्याचे ध्येय स्वप्नाप्रमाणे मिथ्या ठरत आहे. सत्ताधारी पक्षाचे मोठे सुदैव म्हटले पाहिजे की, त्यांना आव्हान देणारा व सत्तेपासून त्यांना पदच्युत करू शकेल असा एकही राजकीय पक्ष दिसत नाही. त्याला अपवाद म्हणजे जयप्रकाश नारायण हीच एक शक्ती आहे. ते कोणत्याही पक्षाचे नेते नव्हते. जयप्रकाश नारायण यांचे व्यक्तिमत्त्व हे कोणत्याही विरोधी राजकीय पक्षापेक्षा मोठे आहे व

ते काँग्रेसच्या स्वातंत्र्यसंग्रामात घडले गेले आहे, हे काँग्रेसनेही विसरून चालणार नाही. ते व्यक्तिमत्त्व विशाल झाले. कारण राजकीय सत्तेपासून अलिप्त राहिल्याने व त्यास प्रतिज्ञाबद्ध आहे म्हणून सत्ताधारी पक्षाची झोप उडविण्याची ताकद या एकाच व्यक्तीमध्ये आहे. नजीकच्या भविष्यकाळी निवडणूक घेतल्यावर ते अनेक राज्यांतील सत्तास्थानावरून विद्यमान सत्ताधारी पक्षास पदच्युत करू शकतील यातही शंका नाही; परंतु त्यांच्यातर्फे जे नवीन सत्ताधारी येतील ते कसे वागतील याचा निर्वाळा स्वतः श्री. जयप्रकाश नारायण नव्हे, तर ब्रह्मदेवही देऊ शकणार नाही, हीच खरी चिंतेची गोष्ट.''

"लोकशाहीची परंपरागत पद्धती आता प्रचंड जमावाच्या समाजपद्धतीला अपुरी पडत आहे, असमर्थ ठरत आहे. पक्षहीन लोकशाहीचे नवे राज्यशास्त्र अवलंबिले पाहिजे. त्या राज्यशास्त्राची अस्पष्ट साद म. गांधींच्या ग्रामराज्यविषयक विचारसरणीत येते. पक्षहीन लोकशाही हे जयप्रकाशांचे ध्येय अमलात आणावयाचा त्यांचा तपशीलवार कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्याच नव्हे, तर जगातील लोकशाहीला यापुढे मानवी स्वातंत्र्याच्या आणि समतेच्या रक्षणार्थ परंपरागत रूढी, पद्धती अपुऱ्या पडू लागल्या आहेत, हे मान्यच केले पाहिजे. भारतातीलच काय जगातील लोकशाही शासनपद्धतीला लोकशाही जीवनमूल्यांचे रक्षण करावयाचे तर पूर्ण कायापालट केला पाहिजे. त्या कायापालटाची पद्धती कोणती असावी यासंबंधी श्री. जयप्रकाश नारायण प्रयोगांनी सिद्ध करण्यास पुढे आले आहेत. श्री. जयप्रकाश यांना एक फार महत्त्वाचा लोकशाहीच्या नव्या सत्तेचा प्रयोग करण्यास संधी मिळेल व तो प्रयोग यशस्वी झाल्यास भारतीय व जागतिक राजकारणाला नवा प्रकाश मिळेल.''

**(दैनिक केसरी, पुणे; १९७६)**

○○○

५६

# सार्वत्रिक निवडणुका : यशापयशाची मीमांसा

मुलाखतकार - **अनिल जोशी**

"महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली इंदिरा काँग्रेस पक्ष यशस्वी झाला, याचे कारण विरोधकांनी निर्माण केलेल्या इतिहासाच्या भ्रमापेक्षा व जातीयवादापेक्षा पवार यांनी मांडलेली यथार्थ वस्तुस्थिती पटली हे आहे."

"देशातील अन्य राज्यांमध्ये काँग्रेसची पीछेहाट झाली असताना महाराष्ट्रामध्ये मात्र काँग्रेसने आपली सत्ता टिकवून धरली आहे. धर्म व जाती यांच्या आधारे काही राजकीय पक्ष उत्तरेकडे यशस्वी झाले, तर महाराष्ट्रामध्ये मात्र त्यांना लक्षणीय यश संपादन करता आले नाही व यावेळचे विधानसभा निवडणुकीचे निकाल एका अर्थाने अनपेक्षित असे आहेत, तर दुसऱ्या अर्थाने राज्याराज्यांतून स्थिर शासनाची शाश्वती देणारे पक्ष सत्तेवर आले आहेत."

"महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांच्या युतीस, अल्पसंख्य असे का होईना, यश लाभलेले आहे, हे लक्षात आल्यासारखे आहे; परंतु त्यांनी बहुमतात येण्याची अपेक्षा धरली होती. या अपेक्षेच्या मागे आवश्यक असणारा वाचेचा संयम त्यांना राखता आला नाही. पक्षीय मंडळींना भडक बोलण्याने उत्साह मिळतो, असा नेत्याला भास होतो; पण पक्ष उच्च दर्जाच्या वैचारिक भूमिकेच्या आधारावरच नीटपणे आत्मविश्वासाने कार्य करू शकतो. जातीयवादी प्रचार जिथे खरोखर जातीय संघर्ष आहे, तेथे उपयोगी पडतो. येथे जातीयवादी प्रचार काही प्रमाणात उपयुक्त ठरतो. कारण महाराष्ट्राच्या मराठेशाहीचा इतिहास होय."

"महाराष्ट्रात अल्पसंख्य जमाती या विशेषत्वाने केव्हाही प्रभावी होणार नाहीत; पण इतिहास भ्रम निर्माण करतो. भगव्या झेंड्यामागे उभे राहण्याचे आवाहन हा भ्रम आहे. त्यापेक्षा यथार्थ वस्तुस्थितीच अधिक उपयोगी पडते. श्री. पवार यांना ही यथार्थ वस्तुस्थिती पाठबळ देऊन समर्थ करती झाली आहे आणि ही वस्तुस्थिती श्री. पवारांच्या चांगली लक्षात आहे हे त्यांच्या भाषणावरून दिसते."

## जनता दल म्हणजे काँग्रेसच

"देशातील विशेषतः उत्तरेकडील राज्यांमध्ये काही ठिकाणी जनता दल बहुमताने सत्तेवर आले आहे. उत्तरेकडील जनता दल हा काँग्रेसचाच वेगळ्या नेतृत्वाच्या आधारे निर्माण झालेला पक्ष आहे, म्हणून एका अर्थी नामांतर झालेले ते काँग्रेसचेच रूप आहे."

"काँग्रेस पक्ष केंद्रातील आपली सत्ता टिकवू शकला नाही. देशात काँग्रेसचे केंद्रवर्ती नेतृत्व नैतिकदृष्ट्या परिणामकारक राहिले नाही. नैतिकदृष्ट्या परिणामकारक व्यक्तिमत्त्व राजकीय पक्षांना आवश्यक असते. नेहरूंच्या दोन पिढ्या नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ होत्या. त्या म्हणजे मोतीलाल नेहरू व जवाहरलाल नेहरू, श्रीमती इंदिरा गांधींना या दोन नेत्यांच्या पुण्याईचा लाभ झाला. त्या स्वतः स्वातंत्र्यसैनिक होत्या. स्वातंत्र्याच्या लढ्यात त्या पुढे होत्या; पण सध्या जे केंद्रवर्ती काँग्रेसचे नेतृत्व आहे, त्यास नैतिक सामर्थ्याचे वलय राहिले नाही आणि नैतिक सामर्थ्याच्या वलयाशिवाय सत्ताधारी पक्ष फार काळ लोकशाहीच्या रीतीने सत्तेवर टिकत नाही. हुकूमशाही पद्धत नीतिभ्रष्ट नेत्यांना परवडते; परंतु जनता दल तयार झाल्यामुळे नीतिभ्रष्ट वरिष्ठ सत्ताधाऱ्यांना हुकूमशाही मार्गावर जाऊन सत्ता काबीज करण्याची संधी राहिली नाही. जनता दलाचे मोठे ऐतिहासिक कार्य हे आहे, असे म्हणावे लागेल."

"राखीव जागांना विरोध, अशा तऱ्हेचे प्रश्न ज्या राज्यांमध्ये तीव्र स्वरूपात भडकले तेथेही काँग्रेसची सत्ता राहिली नाही याचे कारण असे की, "गुजरातमध्ये राखीव जागांना विरोध आहे. याचे कारण सवर्ण जमातींमध्ये बेकार, सुशिक्षितांचे प्रमाण वाढलेले आहे. वस्तुतः गुजरात हा उद्योजकांचा प्रदेश आहे. उद्योजकांच्या जगामध्ये सुशिक्षितांच्या बेकारीपोटी एवढे मोठे आंदोलन व्हावे हे योग्य नव्हे. महाराष्ट्र हा उद्योजकांचा प्रदेश म्हणून प्रसिद्ध नाही; पण महाराष्ट्रात शेतकरी समाजातून उद्योजक प्रवृत्ती असलेले कार्यकर्ते पुढे येत आहेत आणि हा साखर कारखान्यांचा प्रदेश म्हणून पुढे आला आहे. त्यामुळे येथे काँग्रेस टिकली. या कारखानदारीला महाराष्ट्राच्या काँग्रेस सरकारने पाठबळ दिले आणि ते सर्व धोरण यशवंतराव चव्हाण यांच्या कारकीर्दीत स्पष्टपणे ठरविले गेले. उत्तर भारतात जनता दल आणि भारतीय जनता पक्ष या दोघांचे वजन वाढले आहे. प्रदेश राज्यांमध्ये भारतीय जनता पक्ष अधिक प्रभावी दिसत आहे. उत्तर भारतात जातीय संघर्ष जुना आहे, कारण तेथे मुसलमान अल्पसंख्य शहरोशहरी आणि गावोगावी ठळकपणे सामाजिक जीवनात प्रभाव निर्माण करत असतात. त्यामुळे तेथे एक प्रकारची स्पर्धा निर्माण होत असते."

**(केसरी, ६ मार्च, १९७८)**

OOO

५७

# मंडल आयोग : अहवालाची चिकित्सा

मुलाखतकार - **अनिल जोशी**

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची घोषणा केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी केली आणि देशाच्या कानाकोपऱ्यात त्यासंबंधात उलटसुलट प्रतिक्रिया उमटू लागल्या. काही राज्यांतून या आयोगाचे समर्थक व विरोधकांच्यामध्ये असलेला तरुणवर्ग यांच्यात संघर्ष निर्माण होऊन आंदोलनाचे स्वरूप तीव्र होऊ लागले आहे. या पार्श्वभूमीवर मंडल आयोगाने जे उपाय सुचविलेले आहेत त्याचे आपण पडसाद पाहत आहातच. आपले या बाबतीतील मत काय आहे, असे विचारता ख्यातनाम विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले, "मागासलेल्या जातिजमाती कोणत्या आणि त्यांचे मागासलेपण किती प्रमाणात आहे याचे व्यवस्थित मोजमाप त्या त्या वस्त्यांमध्ये जाऊन घेतलेले नाही. त्यामुळे केवळ मागासलेल्या जातींची नावे ठरवून मागासलेपण निश्चित करण्यात आले. त्याचप्रमाणे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मागासलेपण घालवून पुढारलेल्या सामाजिक गटांबरोबर प्रयत्न करण्यात आवश्यक उपाययोजना करायच्या तर मागासलेपणातील दैन्यमय जीवनदशा कोणत्या मागासलेल्या जाती असह्यपणे भोगत आहेत याचा प्रत्यक्ष हिशोब घ्यावयास पाहिजे होता. सामाजिक आणि शैक्षणिक मागसलेपण हा शाब्दिक आविष्कार पूर्ण सत्याचा आविष्कार ठरत नाही. मागासलेपणावर उपाययोजना करण्यास दैन्यग्रस्त मागासलेपण निश्चित केले पाहिजे. ते मंडल आयोगाने केले नाही."

"मागासलेपणाच्या महत्त्वाच्या तीन श्रेणी आहेत. समाजाने म्हणजे समाजातील पुढारलेल्या जमातींनी दडपलेल्या जातिजमाती म्हणजे अस्पृश्य आणि आदिवासी, त्याचप्रमाणे भटक्या जमाती ही एक श्रेणी होय. दुसरी श्रेणी म्हणजे ज्यांचा जातवारीने निर्देश करणे कठीण आहे अशा झोपडपट्टीसारख्या वसतिस्थानात राहणारा सामाजिक गट आणि तिसरा म्हणजे ज्यांना निश्चित असा स्वपोषण आणि कुटुंबपोषण करण्यास उपयुक्त व्यवसाय नाही असा वर्ग. या तीन प्रकारच्या श्रेणींना राखीव जागा देणे अत्यंत जरूरीचे आहे.''

राखीव जागांसंबंधात मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीबाबत केंद्र सरकारने घेतलेली जातिनिष्ठ भूमिका समर्थनीय आहे असे आपणास वाटते काय, असे विचारता तर्कतीर्थ जोशी म्हणाले की, ‘‘महत्त्वाचे असे सार्वत्रिक नियोजन ग्रामीण आणि नागरी भागांमध्ये कार्यान्वित करणे आणि त्या नियोजनाचे अंग म्हणून राखीव जागा शिक्षणात, उद्योगधंद्यात आणि सरकारी सेवांमध्ये आवश्यक आहेत. या तीनही प्रकारांत सत्तावीस टक्के राखीव जर असेल तर सामाजिक न्याय अमलात येईल एवढेच नव्हे तर प्रत्ययास येईल. आज देशामध्ये मंडल आयोगाच्या अंमलबजावणीविरुद्ध अराजक संघर्ष उभा राहिला आहे, याचे कारण सत्ताधाऱ्यांना अशी प्रतिक्रिया उत्पन्न होईल असा अंदाज आला नाही. त्यांना वाटले की, देशातील बहुजन समाजाला सुखद असा धक्का बसेल; परंतु सुखद धक्का बसण्याऐवजी अराजकतेचा भयंकर धक्का बसू लागला आहे आणि याचे कारण म्हणजे सत्ताधाऱ्यांची राजकीय अपरिपक्वता होय. फार चांगल्या गोष्टी लोकांना सांगून स्वतःकडे आकर्षित करण्यामध्ये त्यांनी जी घिसाडघाई केली त्यात त्यांनी बोध घेतला नाही आणि आता तर ते अतिरेकी भाषा बोलू लागले आहेत.

पंतप्रधान व अर्थमंत्री शांत, संयमपूर्वक, अंतर्मुख होऊन आपली चूक लक्षात न घेता आतषबाजीच्या फंदात पडले आहेत. फार चांगल्या योजना अशा रीतीने संकटात सापडतात.’’ मंडल आयोगाने सुचविलेल्या राखीव जागांच्या अंमलबजावणीस देशाची सद्यःस्थिती अनुकूल आहे काय, असे विचारता तर्कतीर्थ जोशी म्हणाले की, ‘‘मंडल आयोगाची दृष्टी उच्च नैतिक आहे; पण त्यातून सामाजिक विद्रोह निर्माण होणार नाही अशा तऱ्हेचे धोरण स्वीकारावयास पाहिजे होते.’’ असे सांगून जोशी म्हणाले, ‘‘ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक होते की, ५२ टक्के म्हणजे ४५ कोटी लोक मागासलेले म्हणून गृहीत धरणारे मंडल आयोगाचे समर्थक हे उपाययोजना केवढ्या प्रचंड कराव्या लागतील आणि त्या शासनाच्या सामर्थ्याबाहेर आहेत याबाबत अनभिज्ञ आहेत हे खचित. चाळीस वर्षांपूर्वीची जनगणना धरून मंडल आयोग विचार करतो आहे; पण चाळीस वर्षांत झालेले फेरफार व बदल मंडल आयोगाच्या पुरस्कर्त्यांच्या ध्यानात येत नाहीत. प्रजेच्या वाढीचा प्रचंड स्फोट सतत सुरू आहे. तो मंडल आयोगाने स्पष्टपणे मांडला नाही. त्यामुळे कितीही शहाणपणाची उपाययोजना असली तरी ती अपुरीच पडणार. असा हा दुस्तर व कोणत्याही मानवी शक्तीच्या कह्याबाहेर असलेला मागासलेपणाचा प्रश्न स्पष्ट करावयास पाहिजे होता. जवळजवळ मानवी बुद्धीला आणि प्रयत्नांना हे प्रचंड आव्हान आहे. मंडल आयोग नैतिक ध्येयवादाच्या दृष्टीने आदरणीय वाटतो; पण त्यातील सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणी मानवी बुद्धीच्या आणि कर्तृत्वाच्या कक्षेबाहेर आहे हे सत्ताधाऱ्यांनी ध्यानात घेतले पाहिजे.’’

शासकीय सेवा, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रांत राखीव जागा ठेवणे यातून देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा वेग अपेक्षेप्रमाणे साध्य होणे शक्य आहे काय, या संबंधात आपले मत व्यक्त करताना तर्कतीर्थ जोशी म्हणाले, ‘‘मागासलेल्यांच्या विकासाला अनुकूल अशा

आर्थिक योजना, शैक्षणिक योजना आणि राखीव पदांच्या तरतुदी यांचे स्पष्टीकरण व्हावयास पाहिजे. राखीव जागांची भरती मागासलेल्यांच्या गटातील व्यक्तींच्या योगाने करण्याचे तंत्र कोणाच्या हातात असणार? ते सरकारी सेवकांच्या हातात असणार. त्यामुळे राखीव जागा रिकाम्या राहण्याचे भय आहे. आजच अगणित राखीव जागा रिकाम्या राहिल्या आहेत याचे कारण ती सरकारी अधिकाऱ्यांची मक्तेदारी असल्याने सरकारी अधिकाऱ्यांपुढे मागासलेल्या समाजातील व्यक्ती मागणी करण्यासाठी जाण्यास भितात. त्यामध्ये भ्रष्टाचाराला फार मोठे क्षेत्र उपलब्ध होते. या क्षेत्रास 'कुरण' असा निंदास्पद शब्द लागतो. सरकारी कर्मचाऱ्यांच्या खुशीवर राखीव जागांची भरती अवलंबून राहिल्यामुळे त्या राखीव जागा रिकाम्या राहणार आणि आजही राहिल्या आहेत. म्हणून मंडल आयोगातील तरतुदी अनेक कारणांस्तव अव्यवहार्य दिसतात. त्यांना संस्थात्मक रूप दिले पाहिजे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या इच्छेच्या अधीन त्या असता कामा नयेत. सरकारी कर्मचाऱ्यांची मनमानी योजना असा त्याचा अर्थ होता कामा नये. त्याचप्रमाणे त्या तरतुदींचे प्रत्यक्ष स्वरूप काय याचे तपशीलवार विवरण जगापुढे आल्यास संघर्ष मंदावेल, संपेलही. कारण नडलेल्या-अडलेल्यांना स्वास्थ्याचा आणि सुस्थितीचा मार्ग उपलब्ध करून देणे याबाबतीत पुढारलेल्या जातिजमातींना रोष असण्याचे कारण नाही. कारण राखीव जागा समाजसेवेच्या जागा होत."

मंडल आयोगातील तरतुदींच्या अंमलबजावणीमधील दोषांबद्दल आपले मत काय, असे विचारले असता श्री. जोशी म्हणाले, "यामधून एक महत्त्वाचा दोष पुढे येतो आणि तो म्हणजे जातिजमातींना सवलती उपलब्ध होणार. त्यामुळे जातिजमातींना मदत करून जातीची जाणीव क्षीण करणे, एकात्म भारतीय मसाज निर्माण करणे हे जे भारतीय संविधानाचे उद्दिष्ट होते ते साध्य होण्यास जातिजमातींचा निर्देश ही अडचण आहे. त्यातून शासन कसे बाहेर पडणार याचे उत्तर सत्ताधाऱ्यांपुढे नाही. त्यामुळे संघर्ष पेटतो आहे. राखीव जागा या कार्यक्षम व्यक्तींनी भरल्या जातात, असा अनुभव समाजास यायला हवा."

देशातील विविध प्रश्नांच्या संबंधात निर्माण झालेल्या अडचणींचा उल्लेख करताना श्री. जोशी म्हणाले, "आपल्या देशातील मूलभूत प्रश्न म्हणजे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण सार्वत्रिक चांगल्या रीतीने मुलांना आणि मुलींना मिळाले पाहिजे; परंतु आज एकूण चित्र पाहता नैराश्य निर्माण होते. शिक्षकाला कुटुंबपोषणास व स्वपोषणास वेतन हवे; पण आवश्यक ते अध्यापनाचे काम होत नाही असे दिसून येते. हे शिक्षणाचे खेदकारक रूप नाहीसे व्हायला पाहिजे. शिक्षकांमध्ये देशभक्तीची प्रेरणा असेल तरच शिक्षण सुधारू शकेल. देशभक्तीची प्रेरणा आणि त्या तऱ्हेची फार मोठी सार्वत्रिक चळवळ उभारली गेली पाहिजे. चीन व रशिया या देशांमध्ये अशी चळवळ उभारली गेली आहे. एक महत्त्वाची राष्ट्रीय चळवळ, सुराज्यप्राप्तीसारखी चळवळ उभारली गेली तरच कार्यक्षमता निर्माण होईल. राखीव जागांचा प्रश्न नीट सुटू शकेल.''

"दुसरे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे कारखान्यांमध्ये कामगारांना पुरेसे वेतन व हक्काच्या सुट्या मिळत असतात. कामाचे तास मर्यादित असतात. कामगार चळवळींनी सर्व कायदेशीर तरतुदी मिळविल्या आहेत; पण जपानसारखा कामावर प्रेम आणि आसक्ती असणारा कामगारवर्ग येथे उपलब्ध नाही. कामगार नेत्यांच्या ठिकाणी ही राष्ट्रीय दृष्टी नाही. अनेक कामगारनेते मोठे फंड जमा करून परिपुष्ट होतात; पण कामगारांचे कर्म-संस्कृतीचे चित्र त्यांना राष्ट्रीयतेला धरून निर्माण करता येत नाही. म्हणून आपला देश जपानसारखी अधिक प्रगती करू शकत नाही. तेथील कामगार सवलती मिळवितो; पण काम ध्येयवादीपणे करतो. काम नीट करणे ही त्याची उच्च दर्जाची प्रेरणा आहे, ती येथील चळवळीमध्ये दिसत नाही."

**(केसरी, १२ सप्टेंबर, १९८०)**

ooo

५८

# विश्वराज्याच्या दिशेने वाटचाल

मुलाखतकार - **अनिल जोशी**

रशिया आणि अमेरिका या मोठ्या दोन शक्ती एकमेकांच्या अविरोधाने पुढे जातच राहिल्या पाहिजेत. जगात आवश्यक असणाऱ्या एकंदरीत स्वास्थ्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरणारी आहे. गॉलब्रेथ नावाचे अमेरिकन राजदूत यांनी एक फार सुंदर शुभभविष्य वर्तविले होते. ते म्हणजे अमेरिका व रशिया यांचे अर्थकारण व राजकारण यांचा एक प्रकारचा समन्वय निर्माण होणार आहे.

गॉलब्रेथ यांचे हे भविष्यकथन अजून सत्य होण्याची शक्यता आहे. गोर्बाचेव्ह यांचे पतन हे कायमचे पतन नाही. कारण जगाचे राजकीय व आर्थिक जीवन एकमेकांत फार मोठ्या प्रमाणात मिसळून गेले आहे. विश्वराज्य निर्माण होण्याची शक्यता आहे. ती दूरची शक्यता असली तरी ते व्हावेच लागेल. त्याप्रमाणे ते पुन्हा सत्तेवरही आले आहेत.

रशिया आणि चीन यांच्यामध्ये जी राजकीय, सामाजिक व आर्थिक क्रांती गेल्या ८०-९० वर्षांत सुरू झाली, तिला डावी हुकूमशाही असे नाव दिले जाते. याचे कारण मार्क्सवादी ध्येयवादानुसार समाजपरिवर्तन करण्याचा कार्यक्रम त्यांनी अंगीकारला. समाजपरिवर्तनाची शक्ती संसदीय लोकशाहीत जशी आहे, त्यापेक्षा या डाव्या हुकूमशाहीत अधिक जबरदस्त आहे, अशी धारणा मार्क्सवादी क्रांतिवादाचा अंगीकार करणाऱ्यांची असते; परंतु मार्क्सवादी क्रांती जेथे जेथे झाली, तेथे व्यक्तीचे स्वयंस्फूर्त कर्तृत्व लक्षात घेतले गेले नाही, ते दडपले गेले. त्यामुळे तथाकथित मार्क्सवाद नाकारणाऱ्या भांडवलशाही राष्ट्रांमध्ये व्यक्तीच्या प्रतिभेला, स्फूर्तीला व कार्यप्रवणतेला जो वाव असतो त्यात अर्थव्यवस्था अधिक संपन्न होत जाते. असा अनुभव मान्य करण्यात आवश्यक असलेली मुक्त मनःस्थिती गोर्बाचेव्ह यांच्यासारख्या कार्यकर्त्यांमध्ये आविर्भूत होते. गोर्बाचेव्ह आणि त्यांच्या सहकाऱ्यांना व्यक्तींच्या कर्तृत्वाला व विचारस्वातंत्र्याला मुक्त केले पाहिजे हा विचार स्पष्टपणे मांडण्याची संधी सत्ता मिळाल्यामुळे साधली. जगाचा तुलनात्मक अनुभवही स्वस्थ बसू देईना आणि समाजवादी राष्ट्रे भांडवलशाही



वाय १७८-३३

राष्ट्रांपेक्षा आर्थिक विकासाच्या बाबतीत मागे पडत आहेत हे नाकारता येईना. म्हणून गोर्बाचेव्ह यांच्यासारख्यांना प्रामाणिकपणे बोलणे भाग पडले ते विवेकबुद्धीच्या दबावामुळेच. गोर्बाचेव्ह यांना साथ देणारा फार मोठा गट सोव्हिएट युनियनमध्ये आहे व तो दिसतोही आहे; पण गेल्या ८०-९० वर्षांत डावी हुकूमशाही प्रवृत्ती नांदल्यामुळे तिला चिकटून राहणारे सुशिक्षित कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांनी गोर्बाचेव्ह यांना ही नवी क्रांती सांभाळू दिली नाही. त्यांना खाली ओढले. गोर्बाचेव्ह व त्यांच्या सहकाऱ्यांनी पावले अधिक जपून टाकावयास हवी होती, असे कोणी म्हणेल; पण अशी पावले टाकण्यास जागाच नसते. त्या समाजवादी क्रांत्यांनी इतकी बंधने निर्माण केली की, त्यात स्वतंत्र विचारवंत सामावले जाणे शक्य नव्हते. म्हणून आज जग गोंधळात सापडले आहे; परंतु अर्थव्यवस्था पुढे जाणे ही मूलभूत गरज आहे. ती पुढे जाणे हे एकंदर राजकीय व सामाजिक व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्वाचे लक्षण आहे, म्हणून गोर्बाचेव्ह आज अयशस्वी झाले तरी पुढे जाणारी, औद्योगिक क्रांती झालेली पाश्चिमात्य राष्ट्रे धीमेपणाने आपली ताकद सांभाळून समाजवादास आव्हान देत राहतीलच.

भारताला समाजवादाचा मंत्र फार आवडला आहे. कारण आपण अजून मंत्रांच्या संस्कृतीमध्ये आहोत. तो मंत्र बोलत राहायचा आणि खासगी उद्योगधंद्यावर आधारलेली, आधुनिक विज्ञानावर उभारलेली अर्थव्यवस्था - यशवंतराव चव्हाण यांच्या भाषेत कृषि-औद्योगिक अर्थव्यवस्था - धरूनच राजकारण आणि समाजकारण पुढे न्यावे लागणार आहे. कारण येथील उद्योजक नेत्यांची भारतीय राजकारणावर चांगली पकड आहे. त्यामुळे काही सुशिक्षित समाजवादी क्रांतिकारक मंडळी निराश होतील; परंतु भारतीय राजकारणाची दिशा समाजवादी क्रांत्यांच्या दिशेने कधीही वळणार नाही आणि भारताचे एकंदर राजकारण आणि अर्थकारण निराशाजनक राहणार. भारतीय अर्थव्यवस्थेला भ्रष्टाचारी नेतृत्वाच्या पाशातून मुक्त करणारी राजकीय शक्तीच या देशात दिसत नाही.

दुसरे असे की, भारताचा राजकीय दृष्टिकोन हा एका अवास्तव राष्ट्रवादाच्या पकडीत सापडलेला आहे. त्यामुळे फुटीरपणा प्रांतोप्रांती दिसू लागला आहे. केंद्रशक्तीला महत्त्व देणे हा आपल्या राजकारणातला मूलभूत भ्रमात्मक दृष्टिकोन आहे. प्रदेश राज्यांची स्वायत्तता मान्य करून केंद्राकडे उर्वरित गोष्टी राहिल्या पाहिजेत. आज त्याच्या उलट प्रकार सुरू आहे. त्यामुळे राष्ट्राला गोंधळात टाकणाऱ्या प्रवृत्ती उफाळून वर येत आहेत. तामिळनाडूच्या हातची सत्ता केंद्राने काढून घ्यावी हा विचार देशास अधिक संकटात घालीत आहे. केंद्राकडे केवळ संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, आंतरप्रदेशीय दळणवळण यासारखी खाती असणे आवश्यक आहे.

सोव्हिएट युनियनमधील घडामोडींपासून आपल्या राज्यकर्त्यांनीही धडा घेणे आवश्यक आहे.

**(केसरी, २३ ऑगस्ट, १९८१)**

ooo

५९

# काँग्रेस (आय)च्या विजयाची मीमांसा

मुलाखतकार - **अनिल जोशी**

तुम्ही म्हणता हा विजय अनपेक्षित असा झाला; पण मला हा अपेक्षित होता यात शंका नाही. मला अपेक्षित होता याची अनेक कारणे आहेत. काँग्रेस (आय) चे स्थान घेईल, असा एकही पक्ष या देशात अस्तित्वात नाही व अनेक दशके अस्तित्वात येणार नाही, अशीही माझी खात्री आहे. म्हणून तो पक्ष भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी आवश्यक आहे असे माझे ठाम मत आहे; परंतु विरोधी पक्षांच्या बजबजपुरीपुढे आणि काँग्रेस (आय) च्या अंतर्गत भांडणामुळे हा पक्ष टिकाव धरील की नाही, याबद्दल मला मधून मधून शंका वाटते.

मला सहानुभूतीची लाट दिसली नाही, याचे कारण मी या निवडणुकीच्या रणांगणात पूर्वीप्रमाणे प्रत्यक्ष भाग घेतला नाही. तो घेतला असता तर मलाही ही प्रचंड लाट दिसली असती. मी दूर राहून तटस्थपणे या निर्वाचन क्षेत्रातील रणधुमाळीकडे पाहत होतो; परंतु माझ्या काही मित्रांना ही प्रचंड लाट दिसली. त्या अनेक मित्रांपैकी एक मित्र अलीकडे राजकारणापासून वयामुळे निवृत्त झाले आहेत. ते म्हणजे माझे गेल्या ५० वर्षांचे राजकीय सहप्रवासी कामगार नेते (रॉयिस्ट) श्री. व. भ. कर्णिक हे होत. ते मला मुंबई येथील कामगारांचे प्रसिद्ध वकील श्री. फडके यांच्याकडे निवडणुकीपूर्वी भेटले असता म्हणाले की, ‘‘शास्त्रीजी, ही पाहा सहानुभूतीची प्रचंड लाट ! राजीव गांधी त्या लाटेवर स्वार झालेले मला दिसत आहेत.’’ मी उत्तरलो, ‘‘बाबासाहेब, मला ती लाट दिसत नाही. तुम्हास दिसते आणि तुमचेच दर्शन हे सत्यदर्शन असण्याची जास्त शक्यता आहे.’’

ही लाट म्हणजे इंदिरा गांधींना या राष्ट्राने शोकग्रस्त होऊन वाहिलेली श्रद्धांजली आहे आणि या देशाचे जागतिक राजकारणातील स्थान इंदिराजींचा पुत्रच टिकवू शकेल, एवढेच नव्हे तर त्याने टिकवावे म्हणून त्या शोकग्रस्त पुत्रास धीर देऊन बळ देण्याचा उद्देश या श्रद्धांजलीच्या मुळाशी आहे. ही जनतेच्या हृदयातील वेदना म्हणजे केवळ भावना आहे, असे समजू नये. त्या भावनेच्या मागे प्रचंड मतदारवर्गाचा राजकीय दृष्टिकोन आहे ही विचारनिष्ठ भावना आहे.

देशावर संकट येत आहे, देशाची अखंडता संकटात आहे, दुसरा एक देश सरहद्दीवर शस्त्रसज्ज झाला आहे, हे इंदिराजींचे म्हणणे विरोधी पक्षांना नीट रीतीने समजून घेता आले नाही, पटले नाही. सामान्य जनतेस जे पटत होते ते विरोधी पक्षनेत्यांना का पटले नाही आणि का पटू नये, याचा उलगडा राजकीय विचारवंतांनी करावयास पाहिजे. कारण परकीय आक्रमणाचा धोका आणि अखंडतेस असणारा धोका या गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट असताना विरोधी पक्षनेत्यांना त्या का पटू नयेत? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पाकिस्तानची अनेक आक्रमणे झाली. गेल्या काही वर्षांत अमेरिकेची अद्ययावत शस्त्रास्त्रे पाकिस्तानला प्रचंड प्रमाणात मिळत आहेत. अशी शस्त्रास्त्रे अमेरिका सोव्हिएटच्या आक्रमणापासून आत्मरक्षणाकरिता पाकिस्तानला देत आहे, असे असूनही पाकिस्तानने वारंवार भारतावर आक्रमण करण्यासाठी वापरली आहेत, ही गोष्ट इतिहासाने सिद्ध केली आहे. इंदिराजी निवडणुकीच्या वेळी नेहमीच असे धोके दाखवीत असत, हे विरोधी पक्षाचे म्हणणे खरे असले तरी इंदिराजींचे म्हणणे त्यामुळे खोटे ठरत नाही आणि जनतेला ते नेहमीच पटले आहे.

तुम्ही म्हणता, काही मंडळी या देशामध्ये काँग्रेस (आय) ला पर्यायी पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाकडे अलीकडे बोट दाखवीत होती, तो पक्ष या निर्वाचनाच्या लाटेमध्ये साफ बुडाला हे कसे काय झाले? याचे उत्तरही फारसे शोधावयास नको. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक सुप्रसिद्ध कार्यकर्ते आणि विधायक कार्याकरिता आणि ग्रामीण जनतेच्या विकासाकरिता सेवेची आजन्म दीक्षा घेतलेले श्री. नानाजी देशमुख यांनी राजीव गांधींना संघाने पाठिंबा द्यावा हे जाहीर केले. त्यानंतर आर. एस. एस. च्या इतर नेत्यांनी म्हटले की, ते नानाजींचे वैयक्तिक मत होय; परंतु त्या मताचा त्यांनी निषेध केला नाही. यात खरी सगळी मख्खी आहे. नानाजींनी जनसंघाशी आणि त्याचाच अवतार असलेल्या भारतीय जनता पक्षाशी आपल्या गुंतलेल्या हितसंबंधांना न जुमानता राजीव गांधींना पाठिंबा देण्याचे ज्या जिव्हाळयाने जाहीर केले, त्याच्या मुळाशी नुकत्याच घडलेल्या पंजाबच्या भयंकर घटनेचा संबंध आहे. अतिरेक्यांकडून होणाऱ्या हिंदूंच्या नाहक हत्यांचे जे सत्र चालू होते, त्याच्यावर इंदिराजींनी जो जालीम, कठोर लष्करी दंडशक्तीचा उपाय योजला आणि तो उपाय योजल्यानेच इंदिराजी बळी गेल्या. त्यातून निघणारी ती हिंदुत्वनिष्ठ भावना नानाजींच्या मुखातून बाहेर आली आणि विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही तीच वेदनामय मूक भावना होती, त्या भावनेला वाचा नानाजींनी दिली. चरणसिंगांनी म्हटले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काँग्रेस (आय) च्या पाठीशी होता, हे पूर्ण सत्य आहे.

दुसरी एक महत्त्वाची डोळ्यांत भरणारी घटना म्हणजे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांची मुंबईत निवडणुकीच्या संदर्भात झालेली एकजूट होय. हा करार मराठी भाषिकाहून अन्य भाषिकांना दूर लोटणारा करार आहे. शिवसेनेचा मुंबईतील इतिहास मुंबईतील उत्तर हिंदुस्थानी, दक्षिण हिंदुस्थानी, तामिळी, कानडी इत्यादी जमाती इतक्या लवकर कशा विसरणार? आणि त्याचे पडसाद अखिल भारतीय स्तरावर उमटले नसते तर नवल नसते का झाले? भारतीय जनता

पक्षाच्या नेतृत्वात उत्कृष्ट वक्तृत्व आहे व ध्येयवाद आहे, तरी भारतीय जनता पक्षाने एवढा मोठा पराभव स्वतः ओढवून घेतला आहे.

काँग्रेस (आय) च्या नेत्यांचे, विशेषतः राजीव गांधींचे राजकीय डावपेच टाकण्याचे कौशल्यही भारतीय जनता पक्षाच्या पराभवाच्या मुळाशी आहे, हे पण विसरून चालणार नाही. याची अनेक गमके आहेत. त्यातील दोन गमके सहज ध्यानात भरण्यासारखी आहेत. भारतीय जनता पक्षाचा मोहरा हरला याचे कारण माधवराव शिंदे यांना अगदी आयत्या वेळी उभे केले, हे धक्का देणारे उदाहरण होय. अगोदर कल्पना असती तर वाजपेयी यांनी नरसिंहराव यांच्याप्रमाणे दुसरीकडेही आपला हातचा राखला असता. मुंबईमध्ये एक लोकप्रिय नट, राम जेठमलानींना सहज हरवेल असा उभा केला.

तुम्ही म्हणता विरोधी पक्षांची एकजूट झाली असती, तर या काँग्रेस (आय) च्या विजयाला मर्यादा पडल्या असत्या की नाही? यावर माझे उत्तर असे की, फार थोडा फरक झाला असता. आज विरोधी पक्ष आणि अपक्ष मिळून यांचे उमेदवार शंभराच्या आतबाहेर निवडून आले आहेत. एकजूट असती तर विरोधीपक्षीय हे दीडशेच्या आत-बाहेर निवडून आले असते. फटकारा जो बसला तो बसलाच असता. मात्र लोकसभेमध्ये आज विरोधी पक्षाची जी केविलवाणी स्थिती झाली आहे, ती तितकी झाली नसती. वाजपेयी, हेमवतीनंदन बहुगुणा, राम जेठमलानी यांच्याप्रमाणे उत्कृष्ट प्रवक्ते लोकशाहीच्या कारभाराला विवेकाची जोड देऊ शकतात. विरोधी पक्षाची विवेकपूर्ण टीका ही सत्तारूढ पक्षाला लगाम घालते. विरोधी पक्ष दुबळा असेल, तर सत्तारूढ बेलगाम बनून विवेकभ्रष्ट होत जातो. विरोधी पक्ष ही लोकशाहीची नैतिक गवसणी आहे.

आता सत्तारूढ काँग्रेस (आय) पक्षाला अमर्याद शक्ती प्राप्त झाली आहे. ही शक्ती दंभ आणि अहंकारास कारण होऊ शकते किंवा फार मोठ्या जबाबदारीची जाणीव देऊन नम्रपणे विवेकाने पाऊल टाकण्याचीही सूचना देत असते. काय घडणार, यातून निष्पन्न काय होणार याचे उत्तर भविष्यकाळच देईल.

सत्तारूढ पक्षाची कसोटी लागणार आहे. प्रथम पंजाबच्या प्रश्नाच्या संदर्भातच - १) पंजाबच्या बंदिस्त नेत्यांना बंधमुक्त करून, २) लगेच पंजाबी भाषिक गावे, तालुके आणि जिल्हे पंजाबमध्ये अंतर्भूत करण्याचे आश्वासन देऊन, ३) चंदीगड पंजाबची राजधानी बनविण्याचे मान्य करून, ४) रावी-बियास पाण्याच्या तंट्याचा पंजाबच्या बाजूने निकाल होईल, अशी तरतूद करून, ५) पंजाबमध्ये काँग्रेस (आय) चे राज्य होईल की नाही, याची चिंता न करता पंजाबी भाषिकांचे हे प्रदेशराज्य आहे, अशी पंजाबी भाषिकांची आणि शिखांची खात्री व्हावी या दृष्टीने पावले टाकून आणि अखेरीस, ६) खालसा तख्त आणि पंजाबी हिंदू जमात यांच्यात एकात्मतेची भावना वाढीस लागण्याकरता आवश्यक असणाऱ्या सगळ्या व्यवहार्य योजना निर्माण करून पंजाबचा प्रश्न निकालात काढावा. शीख नेतृत्वाची वैफल्यग्रस्तता नष्ट करणे हे केंद्रीय सत्ताधारी मुत्सद्यांचे

पहिले कर्तव्य आहे. नाहीतर हे शीख - हिंदू द्वैत म्हणजे जालिम विष आहे, हे भयंकर जहर आहे. हे देशाच्या अखंडतेच्या राजकारणाला बाधणारे जहर आहे. कारण शीख जमात ही जेवढी पंजाबमध्ये आहे, तेवढीच ती जगात इतरत्र पसरली आहे. याचा नीट अंदाज केंद्रीय सत्ताधाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे.

राजीव गांधींच्या या विस्मयजनक यशाचे जागतिक राजकारणावर फार महत्त्वाचे परिणाम घडत असल्याचे दिसू लागले आहे. राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश केला तो अत्यंत साधेपणाने. प्रवेश केल्याबरोबर काँग्रेस (आय) ने अखिल भारतीय स्तरावर मोकळ्या मनाने त्यांचे स्वागत केले आहे. त्यानंतर जबरदस्त अशा तीन ऐतिहासिक घटना घडल्या. सुवर्णमंदिरावर झालेली लष्करी कारवाई, इंदिराजींचा गेलेला बळी आणि हे विस्मयजनक पक्षीय यश आणि त्यानंतर फार मोठी सत्ता राजीव गांधींच्या हाती आली आहे. त्यात त्यांच्याही मुत्सद्दीपणाचा आणि राजकीय शहाणपणाचा भाग आहेच. त्यांनी कोठेही क्षणभरदेखील न थांबता ज्या वेगाने अनेक कृती केल्या त्या सगळ्या विवेकपूर्ण कृती दिसतात. मोठ्या हिकमतीने आणि धैर्याने जुनी, काँग्रेसच्या मानगुटीस बसलेली जरठ मंडळी सहजगत्या बाजूस केली आणि वचनपूर्तीचे राजकारण आरंभिले आहे. ते कमी बोलणारे आहेत. कालिदासाने रघुवंशामध्ये म्हटले आहे की, रघुवंशातील राजे मितभाषी झाले याचे कारण त्यांना सत्य बोलायचे होते.

**सत्याय मितभाषिणाम् ।**

**(केसरी, २ जानेवारी, १९८५)**

ooo

६०

# अण्वस्त्र बंदी झाल्यासच विकास

मुलाखतकार - **अनिल जोशी**

अमेरिका हे राष्ट्र सर्वांगीण विकासाच्या मानवी प्रयत्नात सर्व राष्ट्रांमध्ये आघाडीवर आहे. समाजवादी आणि साम्यवादी मंडळींना अर्थात हे मूल्यमापन मान्य होणार नाही; परंतु वस्तुवादी दृष्टिकोनातून हे विधान मी केलेले आहे. मी स्वतः समाजवादी आहे. रशिया हा पहिला साम्यवादी देश; परंतु तो अजून अन्नधान्याच्या बाबतीत अमेरिकेवर अवलंबून आहे. अमेरिका मात्र सर्वांगीण, स्वावलंबी म्हणून पुढे गेलेले राष्ट्र आहे, हे मान्य करावे लागते.

साम्यवाद, समाजवाद, भांडवलशाही, लोकशाही इत्यादी राजकीय ध्येयवादाच्या पाठीमागे समाजकल्याण हे उद्दिष्ट असते. त्या दृष्टीने समाजकल्याणाचा आटोकाट प्रयत्न अमेरिकन समाजपद्धतीमध्ये चाललेला आढळतो. आर्थिकदृष्ट्या सुस्थिर झालेले, उंचावलेले, सामान्य जनतेचे जीवनमान अमेरिकेइतके दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आढळत नाही. जपानमधील दरडोई उत्पन्न अमेरिकेशी तुलना करता खूप उंचावले आहे; परंतु जपानमध्ये भौतिक विज्ञानाचे संशोधन लक्षात भरले असे अजून होत नाही. तंत्रज्ञानाच्या बाबतीत जपान अमेरिकेच्या आणि पश्चिम युरोपच्या बरोबरीचा देश आहे; परंतु अमेरिका आणि पश्चिम युरोप यांच्यापासून उसने घेतलेले तंत्रज्ञान अर्थव्यवहारात वापरून जपान हा विकसित राष्ट्रांच्या आघाडीवर उभा आहे. म्हणून जपानचे महामंत्री 'जपानमध्ये शैक्षणिक क्रांती व्हावयास पाहिजे. जपानमध्ये भौतिक संशोधन होत नाही, ते शैक्षणिक क्रांतीने साधता येईल,' असे म्हणत आहेत; परंतु सांस्कृतिक परंपराही या संदर्भात लक्षात घ्यावी लागते.

## लोकशाही संस्कृती

अमेरिकेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य आणि वैयक्तिक स्वावलंबन निर्माण करणारी लोकशाही संस्कृती गेल्या चारशे वर्षांत वाढली. अमेरिकेत अनेक पिढ्या वस्ती केलेल्या इंग्लिश लोकांनीच पुढाकार घेऊन इंग्लंडशी स्वातंत्र्याकरिता सशस्त्र लढा दिला आणि थोड्या अवधीतच एक प्रचंड

लोकशाहीनिष्ठ राष्ट्र निर्माण केले. तेथील व्यक्तीच्या मनोरचनेत स्वावलंबनाने सर्वांगीण विकास करण्याची प्रेरणा महत्त्वाची आहे. म्हणून तेथे अनिर्बंध अर्थव्यवस्था दीर्घ काळ राहूनही त्या अर्थव्यवस्थेचे दोष आणि त्यातून येणाऱ्या आपत्ती यांच्यातून त्या राष्ट्राने जगातील सर्वात संपन्न राष्ट्र म्हणून जागतिक जीवनात मानाचे स्थान आज निर्माण केले आहे. भारत हा आपण शेतीप्रधान देश म्हणतो; परंतु स्वतःच्या राष्ट्राला अन्न पुरवून जगातील अन्य राष्ट्रांना अन्न पुरविणारी शेती अमेरिकाच निर्माण करू शकली. कपड्याकरिता लागणारा धागा आणि पोटासाठी लागणारे अन्न स्वतःला लागते त्यापेक्षा दुप्पट अमेरिका निर्माण करते.

आज अमेरिकेत बारा टक्के जनता दारिद्र्यात आहे. वयात आलेली एकही व्यक्ती निरक्षर नाही. अशा तऱ्हेची अमेरिकेची परिस्थिती आहे, असे अमेरिका वीस वर्षे म्हणत आहे; परंतु नुकतीच फेरतपासणी झाली, त्यात बारा टक्के प्रजेच्या दारिद्र्याचे मूळ बारा टक्के जनता निरक्षर आहे यात सापडले. शिकायलाच नको, शिकून काय करायचे अशा मनःस्थितीत काही माणसे जगात असतातच. या बारा टक्के दारिद्र्यात राहणाऱ्या अमेरिकनांमध्ये नऊ टक्के कृष्णवर्णीय (निग्रो) लोक आहेत. कृष्णवर्णीयांमध्ये कुटुंबसंस्था स्त्रीप्रधान आहे. अनेक शतके त्यांच्यावर गुलामगिरीचे निर्बंध होते. ते आता कायद्याने संपूर्ण नष्ट झाले असले तरी त्यांच्या मागे राहिलेले दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतच आहेत. जगात कोठेच गुलामगिरी आणि वर्णविद्वेष राहता कामा नये, हा मानवतावादी ध्येयवाद पश्चिमी संस्कृतीमध्ये अधिक प्रकर्षाने निर्माण झाल्यामुळे पश्चिमी राष्ट्रांमध्ये संघर्ष आणि पेचप्रसंग निर्माण झाला आहे.

### संपन्नता २४ टक्क्यांची

दक्षिण आफ्रिका हा देश मुख्यतः निग्रोंचा, त्यात गोऱ्या डच लोकांनी आपले वर्चस्व स्थापले आणि वर्णविषमतेच्या तत्त्वावर राज्यघटना निर्माण केली. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने दक्षिण आफ्रिका हे राष्ट्र अत्यंत संपन्न आणि विकसित राष्ट्र आहे; परंतु ही संपन्नता केवळ चोवीस टक्के गोऱ्या प्रजेची आहे. कृष्णवर्णीय प्रजा तेथे चौऱ्याहत्तर टक्के आहे आणि त्यांना मानवी मूलभूत हक्कांपासून कायद्याने वंचित केले आहे. त्या कायद्याला वर्णवैषम्यावर आधारलेला कायदा असे म्हणतात. या कायद्याच्याविरुद्ध जगातील सर्व गोरी राष्ट्रे आणि अमेरिकेतील जनता आहे; परंतु ब्रिटन आणि अमेरिका यांचे आर्थिक व्यापारी संबंध दक्षिण आफ्रिकेत गुंतले आहेत म्हणून आर्थिक नाकेबंदी करण्याचा जो आग्रह पश्चिमी राष्ट्रे आणि अमेरिकेची संसद धरत आहे, त्या बाबतीत ब्रिटिश आणि अमेरिकन राज्यकर्ते अडचणीत सापडले आहेत आणि दक्षिण आफ्रिकेचे महामंत्री बोथा हे मूलभूत मानवी हक्कांवर आधारलेली लोकशाही राज्यघटना निर्माण करण्यास नाखूश आहेत. किरकोळ सुधारणा करण्यास आणि हळूहळू बदल करण्यास ते तयार आहेत. पश्चिम युरोपातील राष्ट्रे आणि अमेरिका यांनी या बाबतीतील क्रांतिकारक धोरण अंमलबजावणीत आणले नाही, तर दक्षिण आफ्रिकेतील चौऱ्याहत्तर टक्के कृष्णवर्णीय लोक

कम्युनिस्ट बनून दहशतवाद कायमचा चालू ठेवतील यात शंका नाही. आफ्रिकेतील राष्ट्रे ही रशियाच्या छायेखाली येण्याची शक्यता आहे. **दोन महत्त्वाचे प्रश्न**

आजच्या पुढारलेल्या जगापुढे दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. पहिला महत्त्वाचा प्रश्न रशियन साम्यवाद विरुद्ध व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेवर आधारलेली राज्ययव्यस्था आणि दुसरा प्रश्न अणुयुद्ध पूर्ण बंद होईल, अशी अण्वस्त्रबंदी जगातील सगळ्या राष्ट्रांवर आणण्याचा होय.

पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत शक्यता अशी आहे : आजची अनेक समाजवादी आणि साम्यवादी राष्ट्रे तथाकथित भांडवलशाही राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीने प्रभावित झाल्यामुळे आपली आर्थिक व्यवस्था मर्यादित अर्थाने व्यक्तिप्रधान करण्यास तयार होत आहेत. रशियालाही असा बदल करणे अपरिहार्य वाटू लागेल असे दिसते. जगातील सर्वांत मोठे साम्यवादी राष्ट्र म्हणजे चीन होय. हळूहळू तेथेही अमेरिकेचे आणि पश्चिम युरोपातील राष्ट्रांचे अनुकरण सुरू झाले आहे. निदान अर्थव्यवस्थेचा विचार बदलू लागला आहे. याचे कारण अमेरिकेच्या प्रभावाने जपान तंत्रज्ञानात पश्चिमी विकसित राष्ट्रांच्या आघाडीवर अल्पावधीत आला. दक्षिण कोरिया, तैवान, सिंगापूर इत्यादी लहान देश तंत्रज्ञानात आघाडीवर आले आहेत व अमेरिकेशी स्पर्धा करू लागले आहेत. दक्षिण कोरियाची मोटार आज अमेरिकन आणि जपानी मोटारीपेक्षा जगाच्या बाजारपेठेत स्वस्त झाली आहे. याचा परिणाम उत्तर कोरिया या साम्यवादी राष्ट्रावर झाल्याशिवाय राहिला नाही.

## खात्री पटवावी

अण्वस्त्रबंदीच्या बाबतीत रशिया अमेरिकेपेक्षा दहा वर्षे पुढे आहे, असे अमेरिकेतील लष्करी तज्ज्ञ म्हणतात. त्यामुळे अण्वस्त्रबंदीसंबंधी रशिया आणि अमेरिका यांची बोलणी आणि तडजोडीचे प्रयत्न चालू असले तरी रेगन आणि गोर्बाचेव्ह हे चर्चेकरिता एकत्र येणार आहेत; परंतु यामुळे अणुस्फोट होणार नाही याबाबत गोर्बाचेव्ह यांनी रेगन यांची खात्री पटविली पाहिजे. जगात कोठेही अणुस्फोटाचा प्रयत्न झाला तरी त्याची बिनचूक रीतीने नोंद घेणे कसे शक्य आहे हे गोर्बाचेव्ह यांना पटवून दिले पाहिजे. 'स्टारवॉर्स' हा जो कार्यक्रम अमेरिका अमलात आणू इच्छिते त्याचा मुख्य उद्देश अणुबाँब कोठूनही आणि केव्हाही होऊ लागला तरी फुसका ठरावा याचे तंत्रज्ञान निर्माण करण्याचा आहे; पण याचे तंत्रज्ञान अजून शोधावयाचे आहे. त्याकरिता अणुस्फोटाचे प्रयोगही करावे लागणार आहेत. हा नवा अण्वस्त्रविरोधी तंत्रज्ञानाचा कार्यक्रम अमेरिकेने सोडून द्यावा, अशी रशियाची इच्छा आहे. हा अण्वस्त्रविरोधी तंत्रज्ञानाचा कार्यक्रम फार गुंतागुंतीचा आहे. फार मोठ्या अर्थसंकल्पाचा आहे. हा प्रचंड अर्थसंकल्प हाती घेतल्यास अमेरिकेला विकासार्थ आवश्यक असलेल्या अनेक योजनांना मर्यादा घालाव्या लागतील; परंतु या कार्यक्रमात अनेक पश्चिमी राष्ट्रे सहभागी होण्यास तयार आहेत. कारण त्यात फार मोठा पैसा अमेरिकेकडून प्राप्त होण्याची शक्यता त्यांना दिसत आहे; परंतु अण्वस्त्रबंदीच्या बाबतीत

अमेरिका आणि रशिया यांच्यात समझोता झाल्यास जगाचे अण्वस्त्रयुद्धाचे संकट दुरावेल आणि मानवजात निर्भयपणे जीवनाच्या उच्च उद्दिष्टांकडे प्रवास करू शकेल.

जीवनाच्या उच्च उद्दिष्टांकडे प्रवास करण्याकरिता लागणारी शिक्षणपद्धती अमेरिकेने यशस्वी केली आहे, याचे अत्यंत महत्त्वाचे गमक म्हणजे भौतिक विज्ञानाच्या बाबतीत आणि प्रगत विज्ञानाच्या बाबतीत, विशेषतः इलेक्ट्रॉनिक्समध्ये आणि जीवविज्ञानात अमेरिका जगातील सर्व राष्ट्रांत पुढे आहे. जागतिक अण्वस्त्रबंदी झाल्यास जगातील सर्व राष्ट्रांचा संरक्षणव्यवस्थेवरील खर्च कमी होईल आणि सांस्कृतिक विकास आणि दारिद्र्यनाश यांच्याकडे अर्थव्यवस्थेचा ओघ वळेल.

**(केसरी, १९ जून १९८६)**

❍❍❍

६१

# महाराष्ट्र : काल, आज, उद्या

मुलाखतकार - **रमेश जोशी**

*(महाराष्ट्राने गेल्या २५ वर्षांत जे काही घडवले आहे त्याचे चित्रण निश्चितपणे आशादायक तर आहेच. केन्द्र सरकारने या काळात महाराष्ट्रावर ज्या जबाबदाऱ्या टाकल्या होत्या त्या महाराष्ट्रात पार पाडल्या आहेत. २५ वर्षांच्या कार्यामुळे या राज्यात एक प्रकारची ताकद आली आहे. एक प्रगत राज्य म्हणूनच महाराष्ट्राकडे केन्द्र सरकार पाहते असे गौरवाचे उद्गार विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'लोकराज्य'साठी दिलेल्या मुलाखतीत काढले.)*

**प्रश्न: महाराष्ट्राची स्थापना पंचवीस वर्षांपूर्वी झाली. गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्राने अनेकविध प्रयत्नाने विकास साधला तेव्हा महाराष्ट्राच्या स्थापनेमागे मूळ प्रेरणा कोणत्या होत्या?**

**उत्तर:** पहिली प्रेरणा होती भाषेची, भाषिक राज्याची. भाषिक राज्य झाले म्हणजे त्या त्या भाषेतले जे सामर्थ्य आहे ते वाढीस लागते. भाषेचे सामर्थ्य म्हणजे भाषा बोलणाऱ्या समाजाचे सामर्थ्य असते. भाषा ही मनुष्याच्या आणि समाजाच्याही अंतःकरणाचे पूर्ण प्रतिबिंब आहे हे प्रतिबिंब संस्कृतीचे असते. संस्कृतीची सर्व अंगे त्यात प्रकट होत असतात, म्हणूनच भाषा ही माणसाची सर्वांत मोठी शक्ती आहे. ती एका अर्थाने राजकीय शक्तीही असते. समाजाची संघटना करणारे जे एक महत्त्वाचे तत्त्व आहे, ते तत्त्व म्हणजे भाषा. भाषेने माणसं जवळ येतात. माणसांना ही जवळ आणणारी शक्ती असल्यानेच ती प्रभावी अशी राजकीय शक्ती आहे. देशात भाषिक राज्ये झाली तर त्या त्या भाषिक राज्यातील शक्ती अधिक वाढीस लागेल हा विचार महाराष्ट्राच्या निर्मितीमागील पहिली प्रेरणा होती.

**प्रश्न : भाषेमुळे राज्याची शक्ती कशी वाढते ?**

**उत्तर :** भाषिक राज्य झाले म्हणजे त्या त्या भाषेतूनच सर्व प्रकारचे शिक्षण मिळू लागते

अगदी उच्च शिक्षणा पर्यंतचे शिक्षण मिळेल इतकी भाषेची वाढ व्हावयाला पाहिजे पश्चिमी राष्ट्रात ब्रिटन, फ्रान्स यांसारख्या राष्ट्रांतून इंग्रजी आणि फ्रेंच या भाषांमधून प्रामुख्याने शिक्षण दिले जाते. इतर भाषांचा अभ्यास होतो, परंतु त्यांना दुय्यम दर्जा आहे. म्हणूनच हे देश पुढारलेले आहेत.

या दृष्टीने भाषा ही राजकीय शक्तीच आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण एक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आलो. भाषिक राज्यामुळे ही राज्ये स्वतंत्र होतील, मूळ एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेपासून विलग होतील, अशी शंका राजकीय नेत्यांना वाटत होती. परंतु ती शक्यता नव्हती. कारण स्वातंत्र्यामागे बहुभाषिक प्रेरणा होती स्वराज्यामागे सर्व राज्यांचे हितसंबंध एकच होते. त्यामध्ये विरोध निर्माण होणे कदापिही शक्य नव्हते. किंबहुना, भारताचे राष्ट्र भाषिक राज्यामुळे अधिक संघटित होण्यास मदत झाली असती आणि तशी ती झाली आहे.

**प्रश्न : आपण प्रेरणांबद्दल बोलत होतो...**

**उत्तर :** महाराष्ट्रासाठी जे आंदोलन झाले ते एक वैशिष्ट्यपूर्ण आंदोलन होते. स्वराज्यासाठी देशात १५० वर्षे वेगवेगळी आंदोलने झाली. या सर्व आंदोलनात सत्याग्रही आंदोलनच अधिक प्रभावी आणि यशस्वी ठरले. महाराष्ट्राच्या भाषिक आंदोलनाच्या वेळीही याच सत्याग्रही आंदोलनाची कसोटी लागली. पळवळीच्या विरोधकांनी हिंसा केली असेल, परंतु सत्याग्रही आंदोलकांनी हिंसा म्हणून केली नाही. मोडतोड केली असेल, पण माणसे मारली नाहीत, जीव मारले नाहीत. तेव्हा ही जी अहिंसक प्रेरणा आहे ही महत्वाची प्रेरणा महाराष्ट्राच्या स्थापनेमागे आहे.

**प्रश्न : महाराष्ट्राच्या स्थापनेमागे के यशवंतराव चव्हाण यांची राजकीय मुत्सद्देगिरी कारणीभूत ठरली, ही एक वस्तुस्थिती आहे. तेव्हा यशवंतरावांचे हे जे ऐतिहासिक कार्य आहे त्याबद्दल थोडे सांगा.**

**उत्तर :** मी यशवंतरावांचा निकटवर्ती होतो, त्यांचा मित्र होतो आणि सल्लागारही होतो. महाराष्ट्राच्या स्थापनेत यशवंतरावांनी राजकीय मुत्सद्देगिरी दाखवली, हे अगदी बरोबर आहे. जेव्हा संयुक्त महाराष्ट्रवादी आंदोलकांचे आंदोलन अगदी भडकले तेव्हा यशवंतराव चळवळीतून बाजूला झाले. त्यामुळे त्यांच्यावर आरोप होऊ लागले. खरे तर यशवंतरावांचे मत भाषिक राज्याच्या बाजूचेच होते मी मात्र या भाषिक राज्याच्या आग्रहाच्या बाजूचा त्या वेळी नव्हतो. आता आहे. परंतु पेच असा होता की, देशाची जी वरिष्ठ नेतेमंडळी होती त्या नेतेमंडळींचे मन वळवूनच महाराष्ट्र येईल, त्यांच्याशी अटीतटीचा सामना करून हेतू दुरावेल हे यशवंतरावांनी हेरले होते. त्यांना ते पटले होते. कोणत्याही परिस्थितीत अखिल भारतीय नेतृत्वाची शक्ती कमी न करता आणि ते कोणत्याही प्रकारे क्षीण न करता महाराष्ट्राची स्थापना घडवून आणायची, असा त्यांचा विचार होता आणि त्या विचारानुसार त्यांनी राजकीय नेत्यांना महाराष्ट्राच्या बाजूने वळवून महाराष्ट्राचा मंगल कलश आणला.

**प्रश्न : नवीन राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यकारभाराची दिशा ठरवावी लागते. काही संकल्पना असतात महाराष्ट्राने कोणती दिशा स्वीकारली, तिची आगळी वैशिष्ट्ये जाणवतात काय ?**

**उत्तर :** महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवताना यशवंतरावांच्या पुढे स्वातंत्र्यपूर्व काळातला नव्हे तर ब्रिटिश राजवटी पूर्वीचा महाराष्ट्र डोळयासमोर होता तो महाराष्ट्र, त्या महाराष्ट्रातील आचार-विचार-धर्म मोठा व्हावा ही त्यांची कल्पना होती. एक आदर्श राज्याची कल्पना त्यांनी महाराष्ट्राच्या स्थापनेच्यावेळी बाळगली होती.

**प्रश्न : ही आदर्श राज्याची कल्पना कोणती ?**

**उत्तर :** स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये समाजवादाचा अभ्यास होऊ लागला. समाजवादाचा अभ्यास करीत असतानाच समाजातल्या सर्व शक्ती वर आल्या पाहिजेत, हे येथील आंदोलकांना आणि विचारवंतांना पटले होते यशवंत रावांनाही हे मनोमन पटले होते. परंतु समाजातील विशेषकरून ग्रामीण भाग हा बराचसा मागासलेला होता. सांस्कृतिकदृष्ट्यासुद्धा मागासलेला होता. यशवंतराव याच ग्रामीण समाजातून लहानाचे मोठे झाले होते. हा समाज जागृत व्हावा असे यशवंतरावांना वाटायचे या ग्रामीण समाजाचा विकास, उन्नती हे ध्येय, आदर्श राज्याच्या कल्पनेत प्रामुख्याने अभिप्रेत होते ही जी प्रेरणा आहे ती यशवंतरावांच्या स्वानुभवातून आलेली होती. ग्रामीण जीवन किती खुरटले आहे, हे त्यांनो अनुभवले होते. या जीवनाचा सर्वांगीण विकास व्हायचा तर त्यासाठी उत्तम शिक्षणाची व्यवस्था हवी, या समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारायला हवी. खेडी संघटित व्हायला हवी. खेड्यातील माणसे शहराकडे येऊन ते कामकरी बनतात. तेव्हा हा ग्रामीण भागातील माणसांचा ओघ शहराकडे न येऊ देता शहरावरील कामकऱ्यांचे ओझे कमी करून त्यांचाही विकास साधायला हवा. हा विचारही आदर्श राज्याच्या कल्पनेत आहे. म्हणूनच कृषी औद्योगिक विकासाची संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. बहुजन समाजातील लोकांना अल्पवेतन घेणाऱ्यां अल्पभूधारकांना शिक्षणाच्या बाबतीत अडचण येऊ नये म्हणूनही त्यांनी पावले टाकली. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होय. तेव्हा आदर्श राज्याच्या कल्पनेत व्यापक सामाजिक आणि आर्थिक आशय होता.

**प्रश्न : सांस्कृतिक दृष्टिकोन होता ?**

**उत्तर :** हो सांस्कृतिक दृष्टिकोनही होता. मराठी भाषा विकसित व्हावी व तिला विद्यापीठीय दर्जा प्राप्त व्हावा म्हणून फार मोठे प्रयत्न त्यांनी केले.

**प्रश्न : पंचवीस वर्षांपूर्वी ही जी ध्येयधोरणे महाराष्ट्राने स्वीकारली होती, त्या संदर्भात आज महाराष्ट्राने केलेली प्रगती किंवा वाटचाल कशी वाटते? महाराष्ट्राने या काळात अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले आहेत, देशातील इतर कोणत्याही राज्याने ते घेतले नाहीत ?**

**उत्तर :** हे खरे आहे. यशवंतरावांनी वेगाने कार्याला प्रारंभ केला. परंतु ते अल्पावधीतच दिल्लीत जाऊन बसले. नंतर तो वेग राहिला नाही. अर्थात पिछेहाट झाली नाही महाराष्ट्राच्या रोप्य महोत्सवाच्या वर्षी हा सर्वांगीण वेग वाढविण्याच्या दृष्टीने विचार व्हायला हवा आणि प्रयत्नही व्हायला हवेत.

**प्रश्न: यशवंतराव मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राचे प्रश्न आणि त्यानंतरच्या काळातले प्रश्न यांचे स्वरूप बदलत गेले आहे असे नाही का तुम्हाला वाटत ?**

**उत्तर :** आजच्या परिस्थितीत अडचणी अधिक आहेत हे खरे आहे. आज ग्रामीण भागात महाराष्ट्राची आणि भारताची दलित शक्ती उभी राहिली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेले आणि खंगलेले हे घटक आहेत, त्यांची शक्ती उभी आहे. हे वर्ग असंतुष्ट आहेत. त्यांच्या आकांक्षाही वाढलेल्या आहेत. या सर्व गोष्टींचे दडपण मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेले आहे. हा बोजा यशवंतरावांच्या कारकिर्दीत नव्हता. त्यामुळे वेग आणावयाचा असेल तर तो वेगळ्या उपायांनी आणावा लागेल.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज अगदी लहान खेडेवजा शहरांतूनही झोपडपट्टी नावाची सगळ्यातऱ्हेने अस्वच्छ अशी वसाहत जागोजाग उभी राहिली आहे. तिथे संस्कृती नाही तर विकृती आहे. त्यांच्या वेळी अशा वसाहतींचा प्रश्न नव्हता. ग्रामीण भागात खेडोपाडी शाळा आहेत, महाविद्यालयेही आहेत, पण आज शिक्षणाची जी दुरावस्था आहे तशी त्या वेळी नव्हती

**प्रश्न : या अवस्थेमागील कारण काय असावे ?**

**उत्तर :** कारण असे की उत्तम शिक्षकवर्ग आपण त्यांना पुरवू शकत नाही. आता त्यात आणखी दुसरी अडचण निर्माण झालेली आहे. मागासवर्गीयांना आज आपण शैक्षणिक सवलती देत आहोत. त्या दिल्या पाहिजेत. परंतु गुणात्मक प्रगतीच्या बाबतीत सवलत देता कामा नये, कारण त्यामुळे प्रगती करतो आहोत असा भास निर्माण होईल, परंतु खरी प्रगती होणार नाही. ५०० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या प्रत्येक खेडपात प्राथमिक शाळा देण्याचे तुम्ही म्हणता, परंतु तेथील शाळा कशी आहे? ती शाळा सुधारण्यासाठी तुम्हाला पुरेशी आर्थिक तरतूद करायला हवी. आपली आर्थिक परिस्थिती तेवढी समर्थ नाही. पुढचा मुद्दा असा की, महाराष्ट्राच्या स्थापनेच्यावेळी, पंचवीस वर्षापूर्वी, जो अर्थव्यवस्था होती, जी उत्पादनक्षमता होती, ती मधल्या काळात नव्या अडचणी आणि नव्या समस्यांना तोंड देत राहिल्यामुळे पूर्वीसारखी राहिली नाही या अर्थव्यवस्थेत काही व्यंग निर्माण झाले आहे. म्हणूनच ग्रामीण भागातही या अर्थव्यवस्थेमुळे दोन वर्ग निर्माण झाले आहेत. ज्यांना जमीन नाही, घरदार नाही असा खंगलेला वर्ग आणि ज्या ज्या ठिकाणी साखर कारखान्यांसारखे उद्योग आहेत त्या कारखान्यांच्या भोवताली नव्याने निर्माण झालेला सुस्थितीतील दुसरा वर्ग ग्रामीण भागातील या दोन्ही वर्गात आता वर्गविग्रह निर्माण झाला असून तो पुढे आणखी वाढणार आहे ही एक मोठी समस्या आहे.

**प्रश्न: आणखीही काही आर्थिक समस्या आहेत?**

**उत्तर:** आहेत ना. शेतमालाला योग्य बाजार भाव देण्याचा प्रश्न आहे. त्यासाठी चळवळ सुरू आहे. ही जी चळवळ आहे ती सुस्थितीतील जो शेतकरी आहे त्याच्या पुढारीपणाखाली चालली आहे. परंतु योग्य बाजारभाव दिल्यास शेतात काम करणारा जो बहुसंख्य दारिद्र्यरेषेखालील शेतमजूर आहे त्यांचाही त्यामुळे फायदा होईल, अशी या वर्गाची भूमिका आहे. हे सर्व नवे प्रश्न आहेत. प्रगतीचा वेग रोखण्यामागे आणखीही अगदी महत्त्वाचे कारण आहे. अलीकडच्या काळात जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका आणि विधानसभा यांच्या ठिकाणी जे निवडून आलेले प्रतिनिधी आहेत त्यांच्या ठिकाणी आपण लोकप्रतिनिधी आहोत, आपण लोकांचे प्रश्न मांडायला हवेत ही भावना उरली नाही, त्यापेक्षा स्वतःच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. अर्थात हे केवळ महाराष्ट्राला लागू आहे असे नाही, तर संपूर्ण भारतालाही लागू आहे.

**प्रश्न: स्थापनेनंतर आपण सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारले व ते अंमलातही आणले. हा विचार संपूर्ण देशात महाराष्ट्रात प्रथम केला. लोकशाहीचे फायदे तळागाळापर्यंत पोहोचावे, नवे नेतृत्व उदयाला यावे, अशी भूमिका विकेंद्रीकरणामागे होती. या प्रक्रियेचा ग्रामीण भागाला किती फायदा झाला?**

**उत्तर :** विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत लोकप्रतिनिधींची महत्त्वपूर्ण भूमिका असते. परंतु आज लोकप्रतिनिधी महत्त्वाकांक्षी झालेले आहेत. विकेंद्रीकरणातून जनतेची शक्ती, लोकांची शक्ती वाढविण्यासाठी जो काही राजकीय ध्येयवाद असायला हवा, तो त्यांच्या ठिकाणी उरला नाही. विकेंद्रीकरणाचा सर्वसामान्य माणसाला फायदा झाला नाही असे नाही. फायदा होणारच परंतु विकेंद्रीकरण राबविणाऱ्या ज्या संस्था आहेत त्या टिकविण्यासाठी ध्येयवाद असायलाच हवा. ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा यांमधील जे प्रतिनिधी आहेत त्यांच्यावर गावांच्या, तालुक्यांच्या आणि जिल्ह्याच्या काही वाढत्या जाबबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. त्या जबाबदाऱ्या पार पाडल्या जात आहेत, परंतु या संस्था दुर्बळ किती प्रमाणात झाल्या आहेत आणि प्रगती किती झाली आहे हा हिशेब महत्त्वाचा आहे. दुर्दैवाने विरोधी पक्षसुध्दा या संस्था शुद्ध राखण्याच्या बाबतीत सावधान नाहीत आणि प्रयत्नशीलही नाहीत.

**प्रश्न: विकेंद्रीकरणाच्या बाबतीत ज्या अनिष्ट प्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत त्या सामाजिक प्रवृत्तींचेच प्रतिबिंब आहे असे वाटत नाही का?**

**उत्तर :** समाजाच्या दुःस्थितीत चांगला नेता उत्पन्न होणे, ही त्या समाजाच्या संस्कृतीच्या अंतर्गत शक्तीची कसोटी असते. गेल्या पाच वर्षांचा इतिहास आपण पाहिला आणि गेल्या विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुकांमधील निकाल पाहिले तर काँग्रेसच्या बाहेर नवीन नेते निर्माण झाले असल्याचे आपल्याला दिसेल. असे नेतृत्व वैयक्तिक नेतृत्व वरती यावे लागते. आज पावेतो हे नेते दिसत नव्हते. ऐकू येत नव्हते. आंध्रात रामाराव, तामिळनाडूमध्ये

रामचंद्रन. रामचंद्रन हे तामिळनाडूच्या लोकांचे देव झाले आहेत. लोकांना अशी माणसे दिसायला लागतात. ती तारक आहेत असं वाटायला लागते. रामचंद्रन हे लोकांना तारक वाटतात. ते आजारी पडले तर संपूर्ण तामिळनाडू आजारी पडले. तेव्हा असे नवे नेतृत्व त्या त्या भागात येऊ शकते. इतकेच आहे की असे नेते आणि कार्यक स्वतःच्या ताकदीने पुढे यायला हवेत निदान अशा नेत्यांना पुढे आणीत असे नेतृत्व मोठा नेत्यांच्या ठिकाणी असायला हवे.

**प्रश्न : असे नेतृत्व म्हणजे कोणते नेतृत्व आपल्याला अभिप्रेत आहे?**

**उत्तर:** यशवंतरावांसारखे, महात्मा गांधींसारखे. या नेत्यांनी नवे नेते पुढे आणले. महात्मा गांधींनी आपल्या भोवताली बडे बडे लोक उभे केले. ही माणसं जगाला दिपवतील अशा ताकदीची होती. राजगोपालाचारी, चित्तरंजनदास, मोतीलाल नेहरू आणि पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल ही सारी मोठी मागसे होती. जो स्पर्धेत इतरांना बाजूला हटवतो तो खरा नेता नव्हेच.

**प्रश्न: महाराष्ट्राच्या प्रगतीच्या संदर्भात आपण बोलतो आहोत. पंचवीस वर्षांपूर्वी आपण कृषी औद्योगीकरणाच्या दिशेने पाऊल उचलले. आज महाराष्ट्रात त्यामुळे काय बदल झाले आहेत?**

**उत्तर:** कृषी औद्योगीकरणाचा मोठा फायदा म्हणजे ग्रामीण भागात नवीन नवीन चांगल्या शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या आहेत. उदाहरणार्थ, कृषी विद्यापीठे निर्माण झालीत. एरव्ही ही विद्यापीठे निर्माण झालीच नसती. दुसरीकडे पंजाब सोडल्यास अशी प्रगत विद्यापीठे नाहीत. व्यावसायिक प्रशिक्षणाला वाव मिळाला आहे. नवीन नवीन तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था जिल्हा, तालुका पातळीपर्यंत उघडल्या गेल्या आहेत. ग्रामीण भाग विकसित होत आहे हे याचेच गमक आहे. सहकारी साखर कारखाने हे तर महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाची मर्मस्थाने आहेत सहकाराच्या चळवळीमुळे हे साध्य झाले यशवंतरावजीकडे त्याचे श्रेय जाते

**प्रश्न: सहकाराच्या बाबतीत तर महाराष्ट्राने संपूर्ण देशात अग्रस्थान प्राप्त केले आहे.**

**उत्तर:** सहकारातून प्रगती झाली असली तरी सहकारी चळवळीत दोष आहेतच. सहकाराच्या नावाखाली काही लोक आपला विशिष्ट गट तयार करतात, त्यामुळे गटबाजी झाली आहे. हे टाळता येऊ शकते. ग्रामीण भागात जो विकास होत आहे तो सहकारामुळेच होत आहे.

**प्रश्न: खेडी बदलत आहेत असं दिसतंय आपल्याला काय वाटतं?**

**उत्तर :** सगळीच खेडी बदललेली नाहीत, काही बदलली आहेत. पण सुख-सुविधांच्या दृष्टीने खेडी स्वयंपूर्ण व्हायला हवीत. त्यांचे शहरीकरण होणं वाईट नागरीकरण व्हायला हवं.

**प्रश्न: कामगार आघाडी किंवा औद्योगिक शांतता यांबद्दल आपलं काय म्हणणं आहे ?**

**उत्तर :** महाराष्ट्रातील कामगारांचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे. येवली जी कामगार चळवळ आहे तिला स्वतःचे नेतृत्व नाही. माथाडी कामगारांना स्वतःचे नेतृत्व आहे, पण गिरणी

कामगारांना तसे नाही. कामगारांतूनच नेतृत्व निर्माण व्हायला हवे. तसं ते निर्माण होत नाही. म्हणूनच मुंबईतील असंख्य उद्योग मृतवत झालेले आहेत. ग्रामीण भागातील जे शेतीचे उद्योग आहेत त्यात कामगारांना जे किमान वेतन मिळायला पाहिजे ते देण्याइतकी ताकद शेतीच्या उद्योगात नाही.

**प्रश्न : शेती आणि शेतकऱ्यांच्या संदर्भात महाराष्ट्राने अगदी सुरुवातीपासून क्रांतिकारक उपाय योजले आहेत सवं देशात हे उपाय प्रागतिक असे आहेत. कुळकायदा, शेतजमिनीची कमाल मर्यादा, कसेल त्याची जमीन, आदिवासींच्या जमिनी याबावत जी भूमिका महाराष्ट्राने घेतली तिचा फायदा दुर्बल घटकांना निश्चितपणे झाला आहे.**

**उत्तर :** उत्तर भारतातला शेतकरी तसा दुर्दैवीच आहे. महाराष्ट्रातला शेतकरी रयतवारीमुळे सुदैवी आहे. तरीसुद्धा विदर्भासारख्या प्रदेशात फार मोठी जमीन पडून आहे. या जमिनीचे संगोपन व्हायला हवे. शेतीचा मगदूर वाढला पाहिजे. उत्पादनाच्या बाबतीत आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्यासाठी उपलब्ध सोयी शेतकऱ्याला परवडत्या पाहिजेत, हा महत्त्वाचा भाग आहे. महाराष्ट्रात कोरडवाहू जमीन जवळजवळ चौपट पाचपट आहे. या कोरडवाहू जमिनीचा प्रश्न वैज्ञानिक दृष्टीने सोडविणे आवश्यक आहे आणि हा ग्रामीण भागातील कठीण असा आर्थिक प्रश्न आहे त्यासाठी आर्थिक ताकद हवी.

**प्रश्न : ग्रामीण भागातील हे जे प्रश्न आहेत, त्यातूनच बेरोजगारी निर्माण झाली आहे. बेरोजगारी हटविण्यासाठी शासनाने उपाययोजना केली आहे. रोजगार हमी योजना सुरू करून रोजगाराशी उत्पादकतेची सांगड घालण्यात आली. जगात अशा प्रकारची योजना अन्यत्र नाही.**

**उत्तर :** रोजगार हमी योजनेमुळे ग्रामीण बेरोजगारी हटवता आलेली नाही. या योजनेची उद्दिष्टे चांगली आहेत, पण योजनेच्या अंमलबजावणीत अनेक दोष शिरले आहेत. परिस्थिती कठीण आहे. या योजनेतील जो भ्रष्टाचार आहे त्याचे आकलन शासनाला पूर्णपणे होत नाही. त्यामुळेच ही चांगली योजना निरुपयोगी ठरत आहे. तिचे प्रत्यक्ष फायदे-थोड्यांनाच मिळतात.

**प्रश्न: आपण म्हणता तसे दोष आहेत असे गृहीत धरले, तरी आपण या योजनेतील कामांचा उत्पादकतेशी संबंध जोडला आहे. या उत्पादक कामातून नवीन साधन संपत्ती निर्माण व्हावी व तिचा उपयोग पुढील पिढीला मिळावा अशी भूमिका या योजनेमागे आहे.**

**उत्तर :** ही चांगली भूमिका आहे. परंतु योजनेत दोष आहेतच.

**प्रश्न: पण काही काळानंतर उत्पादक कामे संपणार नाहीत काय? त्यासाठी पुन्हा नवी उत्पादक कामे शोधायला हवी ही व्यावहारिक अडचण येणारच.**

**उत्तर:** उत्पादक कामे संपणार नाहीत. उदाहरणच द्यायचे तर ग्रामीण आरोग्याचे देता येईल. ग्रामीण आरोग्य सुधारायचे तर गावात रस्ते नीट करावे लागतीलच. स्वच्छतेची कामेही करावी



वाय १७८-३४

लागतील. हे काम कायम पुरणारे आहे. आरोग्य हा न संपणारा विषय आहे. ग्रामीण उद्योगही वर यायला हवे. त्यासाठी ऊर्जा निर्माण करता येईल. गोबर गॅस सारखे ऊर्जा निर्मितीचे काम न संपणारे काम आहे. जनावरे चांगली ठेवणे, गोबर गॅस प्लँटचे चांगले नियोजन करणे, ही ऊर्जा पुरवठ्याची यंत्रणा आहे, ती कायम लागणारी यंत्रणा आहे. म्हणजे कायम स्वरूपाचे काम आहे. त्यातून उभे राहणारे उद्योगही कायम स्वरूपाचे आहेत. ग्रामीण भागात क्रीडांगणे नाहीत शाळांसाठी पक्क्या जागा, इमारती नाहीत. स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करून शाळांसाठी इमारती उभारण्याचे काम हाती घेतले तर ते न संपणारे काम आहे. अशा अगणित गोष्टी आहेत या कामांना उत्पादक समजायचं किंवा नाही हा खरा प्रश्न आहे.

**प्रश्न: ग्रामीण भागाबद्दल आपण आपले विचार सांगितले. शहरांच्याबद्दल काय? ग्रामीण भागातच अनेकविध योजना राबविल्या जातात शहरे उपेक्षित राहतात, असा अनेकदा आक्षेप घेतला जातो. मुंबईचा प्रश्न तर आपणास ठाऊक आहेच.**

**उत्तर :** शहरे उपेक्षित राहतात, हा आक्षेप खरा आहे. शहरातील परिस्थिती फार जाचक. परवाच आपले मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई ही नरकनगरी झालेली आहे. महाराष्ट्रातील पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक ही सर्व मोठी शहरे बकाल झालेली आहेत. तेव्हा शहरांचा जो प्रश्न आहे तो शहरात उत्पन्न झालेला पैसा जोपर्यंत ग्रामाकडे जात राहील तोपर्यंत वाढत राहणार. शहरांना पडिकपणा येत राहणार, विकृती येणार. मुंबईतील अर्धे लोक तर झोपडपट्टीतच राहतात.

**प्रश्न : औद्योगीकरणामुळे हा बकालपणा आला आहे, असे आपल्याला नाही का वाटत?**

**उत्तर :** हा परिणाम औद्योगीकरणाचा नाही. शहरांचे व्यवस्थापन ही अगदी वेगळी गोष्ट आहे. ही नगरसेवकांची जबाबदारी आहे. लोकप्रतिनिधींबद्दलचे माझे मत मी अगोदरच सांगितले आहे.

**प्रश्न : महाराष्ट्रातील सांस्कृतिक कार्य हा आपला अगदी जिव्हाळ्याचा विषय आहे. साहित्य संस्कृती मंडळाची धुराच आपण सांभाळली होती. महाराष्ट्रातील सांस्कृतिक विकासाबद्दल आपले काय विचार आहेत?**

**उत्तर :** सांस्कृतिकदृष्ट्या आपण निश्चितपणे प्रगती करीत आहोत. ती होतच राहणार. महाराष्ट्रातील रंगभूमी, नाट्यकलेने देशात एक उच्च दर्जाची कला म्हणून लौकिक मिळविला आहे. नवे नवे नाटककार पुढे येत आहेत. महाराष्ट्र कलेच्या क्षेत्रात, विशेषतः नाटकाच्या क्षेत्रात पुढारलेले राज्य आहे. संगीताच्या बाबतीतही चांगली प्रगती आहे. अर्थात या प्रगतीस खाजगी प्रयत्न कारणीभूत आहेत. सांस्कृतिक विकासाच्या बाबतीत कारणीभूत आहेत. सांस्कृतिक विकासाच्या बाबतीत जागरूक प्रशासक महाराष्ट्राला लाभल्याचा हा परिणाम आहे. साहित्य, संगीत, नाटक, लोकनाट्य यासारख्या लोककला यांना यशवंतरावांनी महत्त्व दिले होते. आज ही परंपरा कायम आहे. दुसरी गोष्ट अशी की महाराष्ट्रातील जनतेलाही या कलांची बूज आहे. आच आहे. वारकरी संप्रदायाने येथील लोकांना अनेक शतके प्रभावित केले आहे. आणि या

संप्रदायातील जे साहित्य आहे तेच मूळातून कलेचा उत्कृष्ट आविष्कार आहे. या संस्कारातून येथील मराठी मन जडले घडले आहे. त्यातून उच्च अभिरुची आणि रसिकता निर्माण होते या साहित्यातली जी भजने आहेत ती लोकप्रिय आहेत. भीमसेन जोशी यांच्यासारखे उच्च श्रेणीचे गायक ही भजने आणि अभंग आपल्या प्रतिभेने संपूर्ण भारतात पोहोचवीत आहेत. भीमसेन यांनी जे भजनसंगीत निर्माण केले आहे ते अजोड आहे. शासन नवीन कलावंत निर्माण होण्याच्या दृष्टीने, कलेची जोपासना करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत. परंतु विद्यापीठीय पातळीपर्यंत उच्च शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे.

**प्रश्न : साहित्य संस्कृती मंडळ आणि विश्वकोश हे उपक्रम सुरू करण्यामागची भूमिका कोणती होती ?**

**उत्तर :** यशवंतरावांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने जे धोरण आखले होते त्या धोरणात महाराष्ट्रातील जो विचारवंत आहे त्याचे लेखन बाजूला पडता कामा नये, हे विचारधन प्रकाशात यायला हवे, अशी भूमिका स्वीकारली होती. वैचारिक लेखनाला इतर साहित्य प्रकाराइतकी मागणी नसते म्हणून हे वैचारिक लेखन प्रयत्नपूर्वक प्रकाशित होणे आवश्यक आहे. मराठी भाषा ही पाश्चात्त्य देशातील इतर कोणत्याही देशाइतकी संपन्न आहे, परंतु मराठीतून उच्च दर्जाचे ज्ञान आणि शिक्षण विद्यापीठीय पातळीपर्यंत सर्वार्थाने देऊ शकत नाही, तोपर्यंत ते माध्यम होत नाही हे माध्यम म्हणूनच जर स्वीकारायचे तर त्या भाषेत उच्च दर्जाचे वैचारिक, तांत्रिक, वैज्ञानिक, शास्त्रीय साहित्य प्रसिद्ध व्हायला हवे. इतर भाषांतील उच्च दर्जाचे साहित्य मराठीत यायला पाहिजे. ही भूमिका स्वीकारून साहित्य संस्कृती मंडळाची उभारणी झाली विश्वकोशाच्या बाबतीतसुद्धा सामाजिक ज्ञान, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, दलित साहित्य, साहित्य या संदर्भातील आधुनिक ज्ञान देण्याचा विचार आहे. सगळे खंड झाल्यानंतर पुन्हा पुन्हा वार्षिक काढून त्यातील ज्ञान अद्ययावत करण्याची प्रक्रिया पुढेही चालूच राहील, त्यामुळे विश्वकोषाची प्रक्रिया ही सततची प्रक्रिया आहे.

**प्रश्न : गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्र सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात दमदार पावले टाकीत आहे. परंतु आज देशाचे जे चित्र आहे त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने जे काही केले आहे, घडविले आहे त्याबद्दल आपण समाधानी आहात का?**

**उत्तर :** महाराष्ट्राने गेल्या पंचवीस वर्षांत जे काही घडवले आहे त्याचे चित्र निश्चितपणे आशादायक तर आहेच. केंद्र शासनाने या काळात महाराष्ट्रावर ज्या जबाबदाऱ्या टाकल्या होत्या. त्या महाराष्ट्राने पार पाडल्या आहेत. २५ वर्षांच्या कार्यामुळे या राज्यात एक प्रकारची ताकद आली आहे. एक प्रगत राज्य म्हणूनच महाराष्ट्राकडे केंद्र शासन पाहात आहे, हा त्याचा पुरावा आहे. विशेष म्हणजे या राज्यातील प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कधी केंद्र सरकारशी अटीतटीची भाषा किंवा कृती केली नाही. तो जीवन मरणाचा प्रश्न बनविला नाही. भारत हे एक

राष्ट्र आहे आणि या राष्ट्राच्या एकात्मतेला कधी बाधा येणार नाही, असा दृष्टिकोन ठेवून आम्ही आमचे प्रश्न सोडविले आहेत. इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्राची ही भूमिका वैशिष्ट्यपूर्ण आणि आगळी राहिली आहे. राजकीयदृष्ट्या महाराष्ट्राने संपूर्ण देशात आज वेगळे स्थान प्राप्त केले आहे. लोकसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर आज केंद्रीय मंत्रिमंडळात आणि केंद्रीय प्रशासनात महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आज श्री. शंकरराव चव्हाण यांच्याकडे गृहमंत्रिपदाची सूत्रे देण्यात आली आहेत. हे महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासनिक कुशलतेचे द्योतक आहे. गृहखाते हे देशाच्या राजकारणाचे मर्मस्थान आहे महाराष्ट्राचे माहात्म्य त्यामुळे सिद्ध झाले आहे. २० वर्षांपूर्वी यशवंतरावांनी अशीच जबाबदारी एका वेगळया संदर्भात राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी स्वीकारली होती, तेव्हा इतिहासाची पुनरावृत्ती महाराष्ट्राच्या बाबतीत पुन्हा पुन्हा होत आहे. त्यामुळे गेली २५ वर्षे देशाच्या राजकारणात प्रशासनात महाराष्ट्राचे स्थान अटळ राहिले आहे.

गेल्या पंचवीस वर्षात समाजातील मागास आणि दुर्बल घटकांच्या बाबतीतही बरेच काही घडले आहे या घटकांचे प्रश्न आम्ही चांगल्यारीतीने मांडले आहेत. दलित साहित्याचा जो उदय होत आहे, विकास होत आहे तो महत्त्वाचा आहे त्यामुळे सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया गती घेत आहे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे बुद्धिमान नेतृत्व महाराष्ट्रातील दलितांनी अगदी जवळून अनुभवले त्यामुळेच इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रो तील दलितांनी वैचारिकदृष्ट्या चांगली प्रगती केली आहे. म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर पोकळी निर्माण झाली नाही. तसा नेता निर्माण झाला नाही हे खरे. परंतु त्यांच्या विचाराला दलित साहित्याच्या रूपाने आकार आला. महाराष्ट्रातील दलितांची चळवळ म्हणूनच उर्वरित देशाच्या मानाने अधिक चांगल्यारीतीने पुढे येत आहे. दलित हा जागरुक झाला आहे. तो तापलेला आहे. ही तापण्याची जी प्रक्रिया आहे. ती परिवर्तनाच्या दृष्टीने अधिक हितकारक असते.

**प्रश्न : दलित आणि दलितेतर समाजातील पारस्पारिक संबंधाबद्दल आपले काय म्हणणे आहे?**

**उत्तर :** हे संबंध चांगले आहेत. आम्ही त्यांच्याशी जुळवून घेत आहोत. दलितांचे साहित्य आणि आंदोलन वर येत असताना, जे तथाकथित सवर्ण म्हणून समजले जातात त्यांची दृष्टी आत्मीयतेची आहे, सहानुभूतीची आहे. याचे कारण असे की, महाराष्ट्रात गेली दीडशे वर्षे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया चालू आहे आणि ती फार मोठ्या लोकांनी हाताळली आहे. समाज परिवर्तनाच्या दृष्टीने महाराष्ट्रात जे वैचारिक आंदोलन सुरू आहे ते देशाच्या तुलनेने असाधारण असेच आहे. मुस्लीम सत्यशोधक समाज हा केवळ महाराष्ट्रातच निर्माण होऊ शकतो, हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. हा समाज म्हणजे सामाजिक परिवर्तनातील महत्त्वाचा अंकुर आहे. स्त्री मुक्तीचं आंदोलन भारतात आहे. परंतु महाराष्ट्रात या आंदोलनाला अधिक आकार आला आहे. त्याला नेतृत्त्व मिळालं आहे. या सगळया आंदोलनांच्या बाबतीत संपूर्ण

समाज आत्मीयतेने बघतो, हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे.

**प्रश्न : गेल्या २५ वर्षात महाराष्ट्राला लाभलेले जे नेतृत्व आहे ते बहुतांशी ग्रामीण भागातूनच आलेल आहे. हा योगायोगही असेल, परंतु या नेतृत्वाचा महाराष्ट्राच्या जनजीवनाला किती फायदा झाला आहे?**

**उत्तर :** या नेतृत्वामुळेच महाराष्ट्रात लोकशाही स्थिरावण्याची, दृढ होण्याची शक्यता निर्माण झाली कारण असे की, ग्रामीण भागातून हे नेतृत्व आल्याने आपल्यातला माणस नेता बनतो असा विश्वास ग्रामीण भागात निर्माण झाला. कोणी तरी नेता व्हावं, शहरी संस्कृतीतील व्यक्तींनी पुढाकार घ्यावा आणि आपण नुसतं मागे जावं, ही ग्रामीण भागाची भूमिका त्यानंतर बदलली लोकशाही कारभाराचे आपण अविभाज्य घटक आहोत आणि आपण ती राबवू शकतो, नेतृत्व करु शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या ठायी निर्माण झाला. ग्रामीण भागात कौटुंबिक जिव्हाळ्याचं नातं निर्माण झालं. यशवंतराव हे आपल्या पैकी आहेत असं त्यांना वाटू लागलं. वसंतदादा हे आपल्यापैकीच आहेत, कुटुंब प्रमुख आहेत, असं त्यांना आज वाटत आहे. शरद पवार आपल्यातलेच आहेत, ही भावना त्यांच्या वाढीस लागली. हा ग्रामीण नेतृत्त्वाचा मोठा फायदा आहे.

**प्रश्न : महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचे या प्रगतीत नेमकं स्थान कोणतं?**

**उत्तर :** विरोधी पक्ष या काळात तसे वाढले नाहीत. पण वाढीस लागण्याचे चिन्ह दिसत आहे. शे. का. पक्ष हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा पक्ष होता पण तो विस्तारला नाही. हे पक्ष खुरटले. त्याचे कारण ग्रामीण भागातून जे नेतृत्व आलं त्यातूनच शे का पक्ष आला आहे. आणि ग्रामीण भागाची जी अस्मिता असते ती येथील काँग्रेस पक्षाने जोपासली. काँग्रेसपेक्षा नवा कार्यक्रम त्यांच्याजवळ नाही. त्यामुळे अंमलबजावणीतील दोष दाखविण्यापलीकडे त्यांच्याकडे कार्यक्रम उरला नाही. पुन्हा हे पक्ष ज्यांनी निर्माण केले ते पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. ही अभ्यास करण्यासारखी परिस्थिती आहे. विरोधी पक्ष का वाढू शकत नाही. त्याचे उत्तर आपल्याला त्यातून मिळेल. रिपब्लिकन पक्ष हा दलितांचा पक्ष. पुढे तुकडे होऊन फुटला आणि विरोधी पक्ष म्हणून मूळ धरू शकला नाही. त्याला वजनच आले नाही. याचे कारण, दलित वर्गाच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सत्ताधारी पक्ष नेहमीच उत्सुक राहिला. सत्ताधारी पक्षाने सर्वसमावेशक धोरण ठेवल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

**प्रश्न : भाषिक मराठवाडा, विदर्भ हे प्रदेश महाराष्ट्रात आले. आज विकासाच्या दृष्टीने काही असमतोल निर्माण झाला आहे ?**

**उत्तर :** असमतोल निर्माण झाला हे खरं आहे आणि तो घालवला पाहिजे. परंतु त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवे आहेत. हा काही निव्वळ शासनाचाच प्रश्न नाही. सर्वांचा आहे. असे प्रश्न निर्माण झाले असले तरी त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांचे भावनिक संबंध मात्र अधिक दृढ

झालेले आहेत. ही भावनिक एकात्मता अतुट आहे.

**प्रश्न : चालू वर्षं हे युवा वर्ष म्हणून आपण साजरे करीत आहोत युवा शक्तीला विधायक वळण देण्यासाठी काय करावे अशी अपेक्षा आहे?**

**उत्तर :** युवा म्हणजे जो शिकत आहे तो. म्हणजे साधारणत पंचवीशीतल्या आतला. या युवा वर्गात काही नवीन उणीवा निर्माण झाल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर कॉपी करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. हा रोग सर्व विद्यापिठा तील विद्यार्थ्यांत आहे. आजचा युवक सरळ मार्गाने गेला पाहिजे. खोट्या मार्गाने जाता नये पण हा विद्यार्थी विद्यार्थी न राहता भल्या-चुन्या मार्गाने पुढे सरकणारा झालेला आहे हा फार मोठा दोष आहे. शिक्षणाने गुणा त्मक वाढ होते, माणूस नवा बनतो त्याच्या व्यक्तिमत्वात भौतिक फरक पडत असतो शिक्षणाने त्यांचा पुनर्जन्म होत असतो हे त्याला समजत नाही. महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील युवांच्या वावतीत ही दुर्देवी गोष्ट आहे. विद्यापीठे ही महिनोन्महिने बंद राहतात. ही अधोगती आहे. विद्यार्जन करताना दिया है निरपेक्ष ध्येय असायला हवे हा सांस्कृतिक दृष्टीकोन मंदावला आहे.

**प्रश्न: आता अखेरचा प्रश्न विचारतो. आपले पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी वैज्ञानिक आणि तांत्रिक दृष्टी ठेवून विकास साधण्याचा नवा विचार दिला आहे. महाराष्ट्राला हे आव्हान कसे स्वीकारता येईल?**

**उत्तर :** महाराष्ट्रात चागले वैज्ञानिक आहेत. महाराष्ट्र हा वैज्ञानिकदृष्ट्या निश्चितपणे, पुढे जाऊ शकतो. जीव रसायनाच्या दृष्टीने महाराष्ट्राचं वातावरण अनुकूल आहे कारण इथे पांच कृषी विद्यापीठे आहेत. विज्ञानाच्या आधारावरच ही कृषी विद्यापीठे कार्यरत असतात. शास्त्राच्याबाबतीतही महाराष्ट्र पुढे आहे. वैद्यक महाविद्यालये आहेत. महाराष्ट्रात आज ज्या विविध प्रकारच्या तांतिक, वैज्ञानिक शिक्षणाच्या सोयी आहेत त्या पाहता इथे विज्ञान युगाला सामोरे जाण्याची महाराष्ट्राची तयारी आहे. फक्त भर कशावर द्यायचा हे ठरवावे लागेल.

**(लोकराज्य, १ मे, १९८५, महाराष्ट्र स्थापना रौप्य महोत्सव अंक (१९६०-८५) - पृ. २४ ते ३१)**

○○○

६२

# राष्ट्रासाठी जीवन समर्पण हाच राष्ट्रवाद

मुलाखतकार - **अनिल जोशी**

स्वतंत्र झाल्यावर भारताने लगेच एक मोठी राष्ट्रीय समस्या सोडवून मानवी इतिहासात राष्ट्रवादाला नवा अर्थ प्राप्त करून दिला. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात राष्ट्रवादाचा उदय होऊन राष्ट्रवाद हा ऐहिक ध्येयवाद म्हणून प्रगत राष्ट्रांनी स्वीकारला. अठराव्या शतकापूर्वी मानवी समाजामध्ये धार्मिक ध्येयवाद होते. माझे राष्ट्र स्वतंत्र राहून प्रत्येक नागरिकाचे कल्याण होईल याकरिता सतत प्रयत्नशील राहील, मी माझ्या राष्ट्राचा नागरिक म्हणून त्या राष्ट्राच्या संरक्षणाकरिता आणि प्रगतीकरिता माझे जीवन समर्पित करीन असा राष्ट्रवादाचा अर्थ आहे. युरोपात आणि अमेरिकेत हा ऐहिक ध्येयवाद मुरला; परंतु राष्ट्र म्हणजे एकेका भाषिक प्रदेशाचे, त्या भाषिक प्रदेशातील नागरिकांनी मान्य केलेले राज्य होय. उदा. ब्रिटन हे एक राष्ट्र आहे. इंग्लिश प्रादेशिक भाषिक प्रदेश हा त्या राज्याचा आधार होय. फ्रान्स म्हणजे फ्रेंचभाषिक प्रदेश. फ्रेंच राष्ट्रवाद निराळा आहे. जर्मनी, इटली, स्पेन इत्यादी राष्ट्रे म्हणजे भाषिक प्रदेशांवरील राज्ये होत. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका हेसुद्धा इंग्लिशभाषिक राष्ट्र आहे. याला थोडेच अपवाद आहेत. स्वीत्झर्लंड, कॅनडा अशी काही अनेकभाषिक राष्ट्रे आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिक साम्राज्यशाही विसर्जित झाली. आशिया, आफ्रिका खंडांमधील जवळजवळ शंभर देश मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली. भारत हे त्यामध्ये मुक्त झालेले स्वतंत्र राष्ट्र जन्मास आले; परंतु जवळ जवळ चौदा ते पंधरा भिन्न भिन्न भाषांचे प्रदेश एकत्रित येऊन भारत हे राष्ट्र उभे राहिले आणि दुसरी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली ती ही की, संसदीय लोकशाहीचे संविधान किंवा घटना निर्विवादपणे एकमताने राष्ट्राने मान्य केली. एवढी मोठी जनसंख्या असलेली संसदीय लोकशाही जगात कोठेच नाही. प्रादेशिक भाषा ही मानवी इतिहासामध्ये अलीकडे गेल्या दोनशे वर्षांत राजकीय शक्ती झाली आहे. त्यामुळे या राजकीय शक्तीच्या आधारावर जगातील प्रगत राष्ट्रे उभी राहिली आहेत. भारत हा सगळयात मोठा अपवाद आहे.

भारताचे दुसरे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, भारत सोडल्यास जगातील सगळी राष्ट्रे एकधार्मिक आहेत. काही राष्ट्रे ख्रिश्चनधर्मी आहेत (उदा. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली इ.). काही राष्ट्रे मुसलमानधर्मी आहेत. भारत हा हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन इत्यादी जगातील अनेक मोठ्या धर्मांचे राष्ट्र झाला आहे. पाकिस्तान आणि भारत अशी फाळणी झाली तरी भारतात पाकिस्तानइतके किंबहुना अधिकच मुसलमान आहेत. मध्यम प्रतीच्या ख्रिश्चन राष्ट्रात जितके ख्रिश्चन नागरिक असतात तितके भारतात आहेत. अनेक सहस्र वर्षे महाराष्ट्रात ज्यू जमात राहिली आणि केरळमध्ये ख्रिश्चन जमात राहिली. असा हा बहुधर्मीय देश जगातील सगळयांत मोठी संसदीय लोकशाही राबवत आहे.

या संसदीय लोकशाहीची जी राज्यघटना किंवा संविधान आहे त्याचे तत्त्वज्ञान मानवतावादी आहे. आज सगळ्या जगाला तिसऱ्या महायुद्धाचा धोका आहे. याचे कारण राष्ट्रांच्या स्पर्धा होत. रशिया आणि अमेरिका या वरिष्ठ सत्तांमध्ये स्पर्धा आहेत. सर्व मानवजात एक आहे या तत्त्वाचा पुरस्कार भारताची राज्यघटना करते. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव हे मूलभूत मानवी हक्क अबाधित ठेवणे हे भारतीय राष्ट्रवादाचे उद्दिष्ट आहे. सामाजिक न्याय निर्माण करणे, प्रत्यक्ष जीवनात त्याचा अनुभव घेणे हे भारतीय राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे आणि जगामध्ये राष्ट्राराष्ट्रांतील स्पर्धा, युद्धपर्याय होणार नाहीत याकरता आंतरराष्ट्रीय शांततेचे प्रयत्न यशस्वीपणे सुरू ठेवणे, हे भारताच्या जागतिक राजकारणाचे मूलभूत सूत्र आहे.

आज भारतामध्ये ही जी राष्ट्रीय क्रांती झाली, त्या क्रांतीला आतूनच आव्हान मिळू लागले आहे. प्रदेशवाद वर येत आहेत. पंजाबचा आणि आसामचा प्रश्न धोकादायक स्वरूप धारण करून गेली बारा-पंधरा वर्षे देशामध्ये अस्वस्थता माजवीत आहे. भाषिक प्रदेशांचे वादांचे आणि मतभेदाचे प्रश्न विकोपास जाणार नाहीत, याबद्दल खबरदारी बाळगण्यास अपयश येत आहे. या प्रादेशिक विरोधांचे योग्य मूल्यमापन करणे आवश्यक आहे. तडजोडीने आणि देवघेवीने प्रदेशवाद कसे मिटतील याचे अध्ययन करण्याची तरुणांची जबाबदारी आहे.

भारताची राज्यघटना किंवा संविधान इहवादी आहे म्हणजे देशाच्या प्रगतीकरिता आणि प्रदेशांच्या विकासाकरिता शिक्षण, व्यापार, आर्थिक व्यवहार, शिक्षणसंस्था, आर्थिक आणि व्यापारी संस्था, शासन, प्रशासन, नागरिक मूलभूत हक्क या सर्वांमध्ये धार्मिक भेदाला भारताच्या संविधानाने जागा ठेवली नाही. हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन धर्म, शीख धर्म यांच्या धर्मग्रंथांना किंवा धर्मगुरूंना किंवा धर्मपीठांना हस्तक्षेप करण्याचा कसलाही अधिकार ठेवला नाही; परंतु अलीकडे हे धार्मिक समाजांचे विद्रोह मधून मधून डोकी वर काढत आहेत. या बाबतीत तरुण वर्गाने धर्मातीत, इहवादी जीवनदृष्टी पुरस्कृत केली पाहिजे. त्यांच्यामध्ये शिथिलता येऊ लागली आहे. तरुणांमध्ये जातीयवादी प्रवृत्ती असल्यामुळे धर्मवेड शिरते आणि दंगली माजतात. तरुणांची ही जबाबदारी आहे की, मी भारतीय आहे हीच जाणीव जीवनात, व्यापारात, शिक्षणात, सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आणि व्यवहारात प्रकट व्हायला पाहिजे. हिंदू, मुसलमान, खिश्चन

यांच्यामध्ये बंधुत्वाची आणि ऐक्याची जाणीव दृढ होईल याकरिता कार्यक्रम आखले पाहिजेत. तशा तऱ्हेच्या धर्मभेदांना महत्त्व राहणार नाही, अशा संघटना सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रांत उभारल्या पाहिजेत. आपण प्रासंगिक रीतीने झगडे उसळणार नाहीत याकरिता मधून मधून प्रयत्न करतो; पण हे प्रयत्न जातीयवाद आणि निधर्मीवाद यांना नष्ट करू शकत नाहीत. त्या बाबतीत ते अपयशी ठरले आहेत. उदा. गणेशोत्सव किंवा दुर्गोत्सव सुरू झाला म्हणजे हिंदू-मुसलमानांचे दंगे उसळू नयेत म्हणून आपण प्रयत्न करतो; पण ते प्रयत्न तात्पुरते, वरपांगी असतात. त्यांना खोल, व्यापक राष्ट्रीय बंधुत्वाचा आधार नसतो. राष्ट्रीय बंधुत्वाची भावना अत्यंत खोलवर रुजविणारे सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रयत्न सतत सुरू राहिले पाहिजे. त्या बाबतीत तरुणांनी अभ्यासमंडळे आणि मित्रमंडळे जागोजाग स्थापन केली पाहिजेत.

या देशाची ही संसदीय लोकशाही टिकायची तर ती मुळापर्यंत गेली पाहिजे. ग्रामपंचायती राज्य किंवा ग्रामराज्य हे राष्ट्राच्या संसदीय लोकशाहीचे सामर्थ्यशाली मूळ झाले पाहिजे. हे मूळ अत्यंत दुर्बल आहे. गाव हे राज्य आहे. गावातील जनता ही राजकीयदृष्ट्या जागृत आणि सुसंघटित आहे, गावात आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रश्न स्वतंत्ररीत्या आत्मविश्वासाने सोडविले जात आहेत याचे दर्शन अजूनही कोठे होत नाही. मोठ्या शहरांमध्ये बकालपणा असतो. शेजारी कोण राहते याची दखल नसते; परंतु ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था हळूहळू रूपाला येऊ लागली आहे, तरी तिच्यामध्ये हुरूप दिसत नाही. भरपूर पाणी असणाऱ्या कोणत्याही खेडेगावामध्ये निर्मळपणा आणि स्वच्छता दिसत नाही. रस्त्यात खड्डे असतात, नीट आखीव रस्ते नसतात. उकिरडे घाणच असतात. संडासाची व्यवस्था नसते. त्यामुळे परदेशी पाहुणे भारताच्या खेड्यांना भेट देतात तेव्हा त्यांना उबग येतो. खेड्यांतील अस्वच्छता आणि मलमूत्राची घाण हे सांस्कृतिक अवनतीचे लक्षण असते. गाव हजार-पंधराशे वस्तीचे असते; पण ते एक कुटुंब म्हणून जगत नसते. ते तसे जगले पाहिजे. शेजाऱ्याने शेजाऱ्याची काळजी वाहायला पाहिजे. एक गाव म्हणजे एका ग्रामपंचायतीने चालविलेले सबळ राज्य आहे. तेथील पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा ही सरस्वतीची उपासना करण्याची पवित्र मंदिरे आहेत. शिक्षक विद्यार्थी - विद्यार्थिनींनाच मनापासून शिकवण्यात रस घेतो असे शिक्षणसंस्थांचे चित्र मनावर बिंबले पाहिजे. ग्रामपंचायती ग्रासमभा बोलवत नाहीत. गावाचे प्रश्न एकत्र जमून चर्चिले जात नाहीत. एकत्र सभा झाल्यास भांडणाची भीती वाटते. विचारविनिमयाची सुंदर संधी म्हणजे ग्रामसभेची बैठक असे वाटत नाही. या ग्रामसभा भरत नाहीत याचे कारण गावामध्ये भांडणारे अनेक गट असतात. त्यांच्यात गटबाजी असते. त्यातून गावाने बाहेर पडले पाहिजे. या देशाची लोकशाही दिवसेंदिवस डळमळीत होत आहे. हा लोकशाहीचा प्रचंड, आकाशाला भिडलेला इमला जगाला चकित करणारा असला, तरी तो केव्हा कोसळेल याचा नियम नाही. कारण मूलगामी लोकशाही, पंचायत राज्य किंवा जिल्हा परिषदा या कार्यक्षम लोकसेवकांच्याविना दुबळ्या राहिल्या आहेत.

परंतु काही आदर्श निर्माण होत आहेत. साखर कारखान्यांच्या काही केंद्रांच्या भोवताली

ग्रामीण जीवन अधिक चांगल्या रीतीने सुसंघटित होत आहे. त्यांचे आर्थिक जीवन अधिक उन्नत होत आहे. सामान्य जनतेचे सुसह्य आर्थिक जीवन हाच ग्रामराज्याचा पाया होय. ग्रामराज्याप्रमाणेच नगरपालिकासुद्धा अधिक कार्यक्षम आणि नगराच्या सर्वांगीण विकासात दक्ष कशा राहतील याची जबाबदारी तरुणांनी घेतली पाहिजे. ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांनी शिक्षणसंस्था मजबूत करण्याकरिता चांगल्या शिक्षकांची परंपरा निर्माण करण्याकरिता लक्ष दिले पाहिजे. गावामध्ये आणि नगरपालिकांमध्ये सार्वजनिक विस्तृत उद्याने आणि क्रीडास्थाने निर्माण करण्याची ताकद आली पाहिजे. दक्षिण कोरियामध्ये नुकताच आशिया खंडातील राष्ट्रांचा क्रीडा महोत्सव झाला. त्यात चीन प्रथम क्रमांकावर, जपान दुसऱ्या क्रमांकावर, भारत पाचव्या क्रमांकावर आला. असे जे आंतरराष्ट्रीय क्रीडोत्सव आहेत त्यात क्रिकेट सोडल्यास भारत कोठेच चमकत नाही. क्रीडा, मैदानी आणि मर्दानी खेळ हे संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. उत्कृष्ट क्रीडास्थाने आणि उद्याने भारतभर कशी पसरतील याची चिंता तरुणांनी करायला पाहिजे. उत्कृष्ट शिक्षणसंस्थांचा क्रीडामंडळ हा भाग झाला पाहिजे. भारतीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडाप्रकारांत भारतीय तरुण-तरुणींनी आपले नैपुण्य प्रकट करावे, अशी परिस्थिती ग्रामराज्य आणि नगरपालिका निर्माण करतील तो सुदिन होय.

**(दै. ऐक्य, १८ ऑक्टोबर, १९८६)**

OOO

६३

# विधेयकावर चर्चा आवश्यक

मुलाखतकार - **अनिल जोशी**

"महामंत्री राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड बहुमताने लोकसभा व राज्यसभा अनेक विधेयके संमत करीत आहेत. इतके प्रचंड बहुमत संसदेमध्ये काँग्रेस पक्षाला पूर्वी कधीही नव्हते, म्हणून विधेयके संदुरुस्त करणे किंवा त्यात भर घालणे याकरिता ही अपूर्व संधी आहे यात शंका नाही. लोकशाही अधिक बळकट करण्याकरिता सर्व नागरिक प्रत्यक्ष भाग घेऊन ही लोकशाही राबवीत आहेत, असे चित्र तयार व्हावयास पाहिजे."

"एकोणीसशे पन्नास सालापासून दोन पक्षांमध्ये म्हणजे केंद्र आणि राज्य सरकारमध्ये लोकशाही कारभार चालवण्याकरिता आवश्यक असे कायदे होत असले तरी ग्रामपंचायती सर्व भारतभर, सर्व राज्यांमध्ये कार्यवाहीत असलेल्या नाहीत. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल यांमध्ये ग्रामपंचायतीला चांगले महत्त्व आले आहे. महाराष्ट्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदा, तालुका पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निर्माण करणारे विधेयक संमत झाले; परंतु नियमितपणे ठराविक कालावधीनंतर ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदा यांच्या निवडणुका झाल्या नाहीत. त्यांची उपेक्षा झाली. म्हणून ग्रामपंचायतीचे विधेयक संमत करून घेण्यात येत आहे ही गोष्ट अत्यंत स्वागतार्ह आहे."

"त्यामध्ये स्त्रिया आणि मागासवर्गीयांना राखीव जागा देऊन त्यांची ग्रामपंचायतीच्या वरच्या स्तरावर निश्चित निवड व्हावी याचीही तरतूद या नवीन विधेयकात केली आहे. हे नवे विधेयक मान्य झाल्यावर हा लोकशाहीचा मूलभूत पाया चांगला समर्थ होईल, अशी अपेक्षा आहे. पैसा अगदी खालपर्यंत निश्चितपणे पोहोचेल अशीही तरतूद या विधेयकामध्ये आहे; परंतु हा पैसा राज्यांच्या अधिकारातून खाली पोहोचावा हे निश्चित व्हावे. केंद्राकडून राज्य सरकारांची पर्वा न करता मुळाकडे पैसा जाणार, अशी तरतूद यात असेल, तर आजचा सत्ताधारी पक्ष (इंदिरा काँग्रेस) आपले बहुमत टिकविण्यासाठी पक्की व्यवस्था करीत आहे, असा अर्थ होतो. हे विधेयक

खऱ्याखुऱ्या पक्षातील लोकशाहीला बाधक आहे असे म्हणावे लागेल. आज संघटनास्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य हे घटनेच्या मूलभूत मानवी हक्कांमध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे एकाच पक्षाच्या हातात सत्ता टिकविण्याचे कारस्थान निर्माण होऊ शकत नाही. आज अनेक पक्ष एकत्र येऊन लोकशाही चालवू शकतात आणि अशा आघाड्या यशस्वी होत आहेत, याचेही निदर्शन पश्चिम बंगाल आणि केरळ येथे दिसत आहे. काँग्रेस पक्षाच्या हातात सत्ता टिकविणारी कायदेशीर व्यवस्था या नव्या ग्रामपंचायतीच्या विधेयकात केल्यास व्यापक लोकशाहीला पक्षीय बंधनात पकडण्याचा तो डाव आहे, असा आक्षेप येऊ शकतो.''

''लोकशाहीनिष्ठा नागरिकांच्या ठिकाणी निर्माण करणे ही येथील लोकशाही नेतृत्वाची जबाबदारी आहे. हे विधेयक सार्वजनिक चर्चेकरता अगोदर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. सर्वांगीण चर्चा झाल्यानंतर विधेयक संसदेने संमत करणे अधिक समंजसपणाचे ठरेल; परंतु आता अशा सार्वजनिक चर्चेला आवश्यक तितका काळ राहिला की नाही हे सत्ताधाऱ्यांनाच माहीत. इतके महत्त्वाचे विधेयक सार्वजनिक चर्चेवाचून संमत करणे लोकांच्या राजकीय शिक्षणाच्या दृष्टीने बरे नव्हे. लोकांनी ज्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या आहेत त्या जबाबदाऱ्यांचे तपशीलवार स्वरूप नेमके काय आहे आणि काय असावे हे सार्वजनिक चर्चेद्वारे कळते. ग्रामपंचायतीचे हे नवे विधेयक अत्यंत स्वागतार्ह आहे; पण हे स्वागत करताना मन अस्वस्थ होते.''

''सत्ताधारी काँग्रेस पक्ष पक्षांतर्गत लोकशाही गमावून बसलेला पक्ष आहे. गेली १५-१६ वर्षे पक्षांतर्गत निवडणुका झाल्या नाहीत. सगळ्याच नेमणुका झाल्या आहेत. लोकशाहीच्या मूल्यांची पर्वा नसलेला असा पक्ष झाला आहे. त्यामुळे या पंचायत राज्य विधेयकाची रचना लोकशाहीच्या प्रेरणा अधिक स्वच्छ आणि सामर्थ्यशाली करील की नाही, याबद्दल मन साशंक होते.''

**(केसरी, १ ऑगस्ट, १९८९)**

ooo

६४

# रामजन्मभूमीला ऐतिहासिक आधार नाही

मुलाखतकार - **प्रतिनिधी, नवी दिल्ली, दैनिक सकाळ, पुणे**

आज जेथे बाबरी मशीद आहे, तेथे पूर्वी रामजन्मभूमी होती, असा दावा परंपरेच्या, श्रद्धेच्या आधारावर केला जातो; परंतु त्याला ऐतिहासिक प्रमाण नाही.

"अमूक ठिकाणी रामजन्मभूमी होती. म्हणून सध्या तेथे असलेली बाबरी मशीद पाडा, अशी मागणी केली जाते. पण हिंदू तत्त्वज्ञानात अशी मागणी बसत नाही. गेल्या हजार वर्षांच्या काळात हिंदूंची देवालये, तीर्थक्षेत्रे पाडली जात होती, भ्रष्ट होत होती; परंतु हिंदू धर्माचे स्वरूप सहिष्णूच राहिले. मुसलमान, ख्रिश्चन आदींचा धर्म हाणून पाडणे हा विचार हिंदू तत्त्वज्ञानाशी पूर्णपणे विसंगत आहे."

हिंदू धर्माला परधर्मीयांची हिंसा मान्य नाही, असे सांगून पुरोगामी दृष्टिकोनामागे हिंदूंनी आपली ताकद ठेवली नाही.

"हिंदू राजकीयदृष्ट्या संघटित झाला नाही, याचे मूळ जातीच्या रचनेत आहे. सध्याची देशातील परिस्थिती यादवीसारखी झाली असून, एकात्मता व शांतता टिकविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे."

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. २४ ऑगस्ट १९८९)**

○○○

६५

# मंडल आयोग मागे घ्यावाच लागेल

## मुलाखतकार - **प्रतिनिधी, नवी दिल्ली, दैनिक सकाळ, पुणे**

'साम्यवादी क्रांत्या उलथून पडत आहेत. त्यामानाने मंडल आयोगाचा अहवाल फारच दुबळा आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय केंद्र सरकारला मागे घ्यावाच लागेल', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आज येथे केले.

येथील सरकारी विश्रामधामावर आज 'सकाळ' शी बोलताना तर्कतीर्थ म्हणाले, 'मंडल आयोगाचा अहवाल वाचत असताना एक गोष्ट ध्यानात येते, की आयोगाच्या सदस्यांनी धार्मिक परंपरांचा व धर्मशास्त्रांचा नीट अभ्यास केलेला नाही. उदाहरणार्थ अहवालात महाभारताविषयीचा जो निर्देश आहे तो अत्यंत चुकीचा आहे. मागासवर्गाची परिस्थिती सुधारण्याकरिता महत्वाचा कार्यक्रम सुचविणे हा मंडल आयोगाचा उद्देश आहे. परंतु मागासलेले किती, याचा विचार त्यांनी केल्यानंतर भारतातील ५२ टक्के प्रजा मागास असल्याचा त्यांनी निष्कर्ष काढला. म्हणजे ४० कोटींपेक्षा अधिक प्रजा मागास या सदरात येते. रशिया वगळता संपूर्ण युरोप एवढी ही प्रजा आहे. त्यांच्याकरिता राखीव जागा म्हणजे अनेक राष्ट्रांचाच व्यवहार होय. ज्यांनी मंडल आयोगाला उचलून धरले आहे त्या सत्ताधाऱ्यांना व सामाजिक, राजकीय नेत्यांना हा विराट प्रश्न सोडविण्यासाठी फार मोठी यंत्रणा उभी करावी लागेल. याचा अर्थ राखीव जागा थोड्या थोडक्या नसणार, निरनिराळ्या क्षेत्रांत असणार. त्यात गुणवत्तेशिवाय कार्ये होणार नाहीत, कार्यक्षमता राहणार नाही, दर्जा ढासळेल, अशी अगणित कार्यक्षेत्रे राहतील. त्यातच राखीव जागांमध्ये मागासलेल्यांची तरतूद करणे, हे शासकीय व सत्ताधारी अधिकाऱ्यांचेच काम आहे. या पार्श्वभूमीवर वशिलेबाजी करण्यास सत्ताधाऱ्यांना व शासकीय अधिकाऱ्यांना वाव मिळेल. भ्रष्टाचाराचा पूर वाहू लागेल. त्यात राष्ट्राचा विनाश आहे. परंपरागत अन्याय बाद करण्याकरिता एक मोठे अन्याय्य जगड्व्याळ उभे केल्यासारखे होईल.

ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे यांचा नामोल्लेख करून तर्कतीर्थ म्हणाले, नानासाहेबांसारखे सदिच्छेचे नेते डोळेझाक करून, नीट पृथक्करण न करता मंडल आयोगाला आशीर्वाद देत

आहेत. अभ्यास करून त्याच्या अनुकूल-प्रतिकूल बाजू मापून नानासाहेबांनी मंडल आयोगाला आशीर्वाद दिला असता तर त्यांना कोणीही पाठिंबाच दिला असता. परंतु पुष्कळ वेळेला सद्भावना नरकाच्या मार्गाला नेतात, त्याचेच हे उदाहरण आहे.'

तर्कतीर्थ पुढे म्हणाले, 'मागासलेल्या जातींची मापक लक्षणे कोणती? कोणत्या जाती मागासलेल्या व कोणत्या मागासलेल्या नाहीत, हे कसे ठरविणार ? साडेतीन हजार जाती आहेत. त्यात दोन हजार जाती मागास ठरविणार, त्या मागासलेपणात कमी-जास्तपणाचे जातवार प्रमाण वेगळे असते, परंपरेने जे दलित-अस्पृश्य आहेत, त्यांच्यातले मागासलेपण भयानक आहे. परंतु

जे अस्पृश्य नाहीत व मागे आहेत त्यांना कोणी मागे ठेवलेले नाही. अशांना राखीव जागांची सवलत देणे, हा दलितांवरचा अन्याय आहे. कारण दलितांना या सवलती अल्पप्रमाणात उपलब्ध होतील, असा पृथक्करणात्मक सूक्ष्म विचार केंद्रीय सत्ताधाऱ्यांनी केलेला नाही. परिणामांची क्षिती न बाळगता विचारशून्यरीत्या जाहीर केलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा, अन्यथा देश रसातळाला जाईल. सत्ताधाऱ्यांच्या हातानेच हे काम होईल, हे त्यांनी ध्यानात ठेवावे.'

यावेळी झालेली काही प्रश्नोत्तरे अशी :

**प्रश्न : अन्य मागासवर्गीयांना राखीव जागा ठेवल्या तर वशिलेबाजी, भ्रष्टाचार वाढेल, असे आपण म्हणता. तशा जागा राखीव न ठेवता आज तशीच परिस्थिती आहे ना ?**

**उत्तर :** आज प्रमाण कमी आहे. ते उद्या वाढेल. आजच त्याबद्दल तक्रारी सुरू आहेत. फार महत्त्वाची कार्ये अडचणीत सापडली आहेत. नालायकांचा भरणा झाल्याने कामाचा उठाव होत नाही.

**प्रश्न : अन्य मागासांना राखीव जागांचा फायदा दिल्याने दलितांचा तोटा होईल, असे आपण म्हणता. परंतु एखादे सूत्र स्वीकारल्यानंतर त्याची परिणती काही तरी होणार, सहकार चळवळीचा अथवा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा फायदा एका विशिष्ट वर्गासच होईल, असे म्हणून मूळ विचारच सोडावा काय ?**

**उत्तर :** सहकारी चळवळीचा केवळ धनदांडग्यांनाच फायदा झाला असेल, तर ते त्या चळवळीचे अपयश आहे. जागृत नसलेला सदस्य सहकारात असल्याने चळवळ दुबळी झाली.

**प्रश्न : मंडल आयोगाने अहवालात असे म्हटले आहे, की धर्माचा उपयोग सामान्य समाजासाठी अफूसारखा जर कुठं झाला असेल तर तो हिंदुस्थानात झाला. इथे धर्मगुरुच्या अगदी छोट्या वर्गाने जवळजवळ सर्व समाजाला अशी मोहिनी घातली, की पिढ्यानपिढ्या हा बहुजन, समाज निमूटपणे सेवकवृती धारण करून राहिला...... यावर आपली भूमिका ?**

**उत्तर** : धर्मगुरू सर्व जाती-जमातीत असतात. धर्माला अफूची उपमा देणे अडाणीपणाचे आहे. धर्म ही कल्पना माणसाच्या आतल्या जाणिवेतून आली आहे. धर्म ही माणसाची गरज

आहे. धर्माला अफू म्हणणे हे वेड्या लोकांचे बोलणे आहे. ज्यांना हा विषय समजत नाही, मानवी जाणिवेचा अर्थ कळत नाही. अशा मूर्ख लोकांनी मांडलेला हा विचार आहे. धर्म हे तत्त्वज्ञान आहे. त्यात मानवी बुद्धीचा प्रकर्ष होतो. शंकराचार्य, कपिल, कण्व हे धर्माचे प्रवक्ते झाले, हे कसे दिसत नाही ?

मंडल आयोग अडाणी लोकांनी लिहिलेला आहे. धर्माला, अफूची गोळी म्हणणारे माणसाचे शत्रू आहेत. धर्माला तसे संबोधून मंडल आयोगाने लेखणी विटाळली आहे.

**प्रश्न : आपण धर्मनिरपेक्ष भूमिकेचे अभ्यासक व समर्थक आहात. या पार्श्वभूमीवर या विवेचनाचा अर्थ कसा लावायचा ?**

**उत्तर :** धर्माबद्दल संकुचित अहंकार बाळगणे चूक आहे. प्रत्येक धर्माला प्रतिष्ठापूर्वक वागविले पाहिजे, अशीच माझी भूमिका आहे, माझाच धर्म श्रेष्ठ असा विचार करू नये.

**प्रश्न : हिंदू धर्माविषयी आक्षेप विनाशकाची रामाने केलेली हत्या अथवा एकलव्याची कथा सांगितली जाते, त्यावर आपले काय उत्तर आहे ?**

**उत्तर :** प्रत्येक धर्मात सामाजिक अपचार घडले आहेत. सॉक्रेटिसला विषाचा प्याला दिला गेला, ख्रिस्ताला क्रूसावर चढविले, अपचार असणाऱ्या सामाजिक अहंकाराचे हे परिणाम आहेत. केवळ हिंदू धर्मात हे दोष नाहीत त्यातही हे दोष समाजाचे आहेत. धर्माचे हे दोष आहेत, असे म्हणणे चूक आहे.

**प्रश्न : ज्या समाजात विषमता आहे तिथे खुल्या स्पर्धेने समानता कशी येणार ? सुदृढ व रोगी माणसाला एकाच रांगेत आणण्याचाच हा प्रकार नाही काय ?**

**उत्तर :** मागासलेपणाचे असे समर्थन करू नये. स्पर्धेत टिकाव धरण्यासाठी मनोबल लागते. ते वापरले जात नाही. खरे आई-बाप मुला-मुलींना मनोबल शिकवितात. मागासलेल्यामध्येही मनोबल आहे. परंतु ते ते वापरत नाहीत. संधी नाही हे गेल्या १५० वर्षांत म्हणायचे कारण नाही. डॉ. आंबेडकरांना संधी मिळाली की नाही? त्यांना कोणी राखीव जागेद्वारे पुढे आणले नाही. त्यांना प्रणाम करून घटना समितीचे नेतृत्व दिले. त्या जागी शोभेल असा समर्थ व उंच माणूस म्हणून आंबेडकरांची ही नियुक्ती झाली. आंबेडकरांचे वडील हेच त्यांच्या मोठेपणाला कारणीभूत आहेत.

**प्रश्न : विनाअनुदान तत्त्वावरील शिक्षण संस्था म्हणजे धनाढ्य मंडळींसाठी राखीव जागाच नव्हेत काय ?**

**उत्तर :** तो एक संपूर्णतया वेगळा प्रश्न आहे. शैक्षणिक क्षेत्रातील हा गोंधळ स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. प्रचंड भ्रष्टाचाराची ती भूमी आहे. प्रतिष्ठा, राजकीय ताकद, पैसा अशा बऱ्याच बाबी त्यात आहेत.

**प्रश्न : मंडल आयोगावर विचार करताना त्याचे फायदे कसे मिळणार, याची आपण चर्चा करतो. या पार्श्वभूमीवर एक गोष्ट लक्षात आणून द्यावी वाटते, की मोफत शिक्षण करूनही त्याचा फायदा अद्याप तळापर्यंत पोहोचलेला नाही.**

**उत्तर :** याचा अर्थ कोणाकडे क्षमताच नाही, असा नव्हे. मोफत शिक्षणाबाबत हयगयीची भूमिका नडते जे परिश्रम करतात ते खेळात पुढे येतात. मैदानी खेळात ऑलिम्पिकमध्ये उत्तर कोरिया चमकला, हे याचे उत्तम उदाहरण आहे. अत्यंत मागासलेला देश असूनही उत्तर कोरियाच्या युवकांनी अंगमेहनत करून ऑलिम्पिकमध्ये चमत्कार घडवला. त्यांच्या शिस्तीचा ध्येयवादाचा समजून घ्या.

**प्रश्न : मंडल आयोगाच्या अहवालाला सर्व राष्ट्रीय, राजकीय पक्षांचा पाठिंबा आहे.**

**उत्तर :** ते मुद्दा तपासत नाहीत. डोकी वापरत नाहीत.

**प्रश्न : तुम्ही आजवर सातत्याने प्रबोधन, परिवर्तन या स्वरुपाच्या चळवळींना विचार दिला. या पार्श्वभूमीवर आजच्या आपल्या भूमिकेबद्दल जनसामान्यांत संभ्रम निर्माण होईल.**

**उत्तर :** मी आजही प्रबोधनाचीच भूमिका बजावत आहे. जगात अजून कोठेही समानता आलेली नाही. साम्यवादी क्रांत्या उलथून रडत आहेत. हत्ती उलथून पडले. तिथे किडे काय करणार? साम्यवादी क्रांतीपुढे मंडल आयोग कुठे आहे ? पृथक्करण करणे हे प्रबोधनाचेच काम आहे. जात हा निकषच होऊ शकत नाही. निरनिराळ्या जातीत मागास व सुधारलेले आहेतच.

**प्रश्न : लोकशाही आपण स्वीकारली आहे. त्या पार्श्वभूमीवर मंडल आयोग स्वीकारावा असा एक सूर आहे.**

**उत्तर :** संसदीय लोकशाही मार्गाने आजवर परिवर्तन घडत आले आहे.

**प्रश्न : मंडल आयोगाचे नेमके दोष कोणते ?**

**उत्तर :** मागासवर्गीयांचे दोन स्तर आहेत, हे आयोगाने लक्षात घेतलेले नाही. दलितांना स्पृश्यांनी दडपले म्हणून काही काळापर्यंत त्यांना राखीव जागा देणे योग्य ठरेल. परंतु जे संधी असूनही मागारा राहिले, अशा इतर मागासवर्गीयांना सवलती देणे हा भ्रष्टाचाराचा दरवाजा आहे.

**प्रश्न : मंडल आयोगाच्या शिफारशी केवळ शासकीय नोकऱ्यापुरत्या आहेत. शिक्षण प्रवेशासाठी नाहीत.**

**उत्तर :** शासकीय नोकऱ्या जबाबदारीच्या असतात. जबाबदाऱ्यांना गुणांची गरज असते. त्यामुळे गुणांबाबत धरसोड होता कामा नये. न्यायाविषयीची जनतेची आदरभावना अशा आरोगाने नष्ट होते.

**(दैनिक सकाळ, कोल्हापूर)**

○○○

६६

# लोकशाहीबाबत भविष्यकाळ आशावादी नाही

मुलाखतकार - **प्रा. रा. ग. जाधव**

**प्रश्न: आदिमानवापासून आधुनिक मानवापर्यंत मानवी समाजाने केलेल्या वाटचालीचे मर्म नाना अंगोपांगांनी विशद करण्याचे कार्य आपण गेल्या सहा तपांहून अधिक काळ करीत आला आहात, या पार्श्वभूमीवर आता अखेरच्या दशकात पदार्पण करणाऱ्या या विसाव्या शतकाचे. एकंदरीत मानवी संस्कृतीच्या पदयात्रेत कोणते वेगळेपण आपणास जाणवते?**

**उत्तर:** समाजवादी क्रांती आणि अणुशक्तीवर आधारलेले वैज्ञानिक तंत्रज्ञान यांच्या योगाने जगातील सगळ्या मागासलेल्या आणि विकसित झालेल्या जनतेला समृद्धीचे आणि सर्वांगीण विकासाचे सामाजिक जीवन साध्य करता येईल, असा जबरदस्त आशावाद निर्माण झाला. मार्क्सवादाने या आशावादात अर्थशास्त्रीय दृष्टिकोनाचे महत्त्व स्थापित केले. त्यामुळे तो आशावाद बळकट झाला.

**प्रश्न: मार्क्सवाद आणि जागतिक साम्यवादी क्रांती यांचा इतिहास १९१७ ते १९८५ या अवघ्या सुमारे ७० वर्षात घडला, आणि संपला. मानवी इतिहासाच्या संदर्भात म्हणजे इतिहासाला एक क्रांतिकारक वळण देण्याच्या अर्थाने कार्ल मार्क्सपक्ष लेनिन आणि लेनिनपेक्षा गोर्बाचेव्ह अधिक महत्त्वाचे, असे म्हणता येईल काय? साम्यवादी संस्कृतीचा इमला उभारणारे नि तो उभा इमला पाडून टाकणारे यांची ऐतिहासिक मूल्यदृष्टीने तौलनिक मीमांसा कशी करता येईल?**

**उत्तर :** साम्यवादी क्रांती आणि मार्क्सवाद यांनी सामुदायिक प्रयत्नांना आणि व्यक्तीच्या सामाजिकतेला महत्त्व दिले आणि व्यक्तीच्या स्वयंप्रेरणांना उपेक्षित केले त्यामुळे व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेला आणि स्फूर्तीला महत्त्व देणारी भांडवलशाही राष्ट्रे, विशेषतः पश्चिम युरोपमधील राष्ट्रे आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका यांच्यातील कामगारवर्गाचे हितसंबंध भांडवलशाहीच्या

प्रभावाखाली अधिक सुधारले. कामगारवर्ग आणि मध्यमवर्ग सुस्थितीमध्ये जगू लागला. परंतु मार्क्सवादी क्रांतीने थंड युद्धमय विप्रवस्था विसाव्या शतकात ताणतच राहिलो. लेनिनच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या किंवा मावत्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या साम्यवादी क्रांतीने व्यक्तीची प्रेरणा उपेक्षित केल्यामुळे सामाजिक क्रांतीतून अपेक्षिलेला समताप्रधान व समृद्ध समाज निर्माण झाला नाही. लेनिनचे हे अपयश आहे आणि गोर्बाचेव्हचे यश म्हणजे क्रांतीच्या वैफल्याची स्पष्ट कबुली जगाला मिळाली. त्यामुळे जगातील विकसित राष्ट्रे आणि साम्यवादी क्रांतीची राष्ट्रे यांच्यातील अणुयुद्धापर्यंत विश्वविनाशकारी चाललेली स्पर्धा थांबली, गोर्बाचेव्ह हा मार्क्सवादी क्रांतीचा पुत्र होय. त्या क्रांतीमध्ये सर्व मानवजातीचे कल्याण करणाऱ्या आर्थिक शक्ती मंदावल्या आणि तथाकथित भांडवलशाही राष्ट्रांच्या संसदीय लोकशाहीवर अधिष्ठित असलेल्या राज्यसंस्था स्थिरावल्या: त्या राष्ट्रांचे सतत आर्थिक समृद्धीकडे पडणारे पाऊल आणि बहुजन समाज, कामगारवर्ग यांचे समाधानकारक जीवन गोर्बाचेव्हच्या प्रत्ययास आले आणि अत्यंत प्रामाणिकपणे त्यांनी साम्यवादी क्रांतीची परागती स्पष्ट केली आणि सोव्हिएत युनियनला बाजारात टिकाव धरणारी अर्थव्यवस्था महत्त्वाची म्हणून मान्य करावयास लावली. एकंदरीत मार्क्सवाद हा वैचारिक दृष्टीने अनेक वैगुण्यांनी भरलेला आहे, हे लक्षात आहे. मार्क्सवादी क्रांतीचे एक प्रवक्ते मानवेंद्रनाथ रॉय यांनी गोर्बाचेव्हच्या अगोदरच ६० वर्षे मार्क्सवादी क्रांती ही क्रांतीचा गर्भपात आहे, असे मूल्यमापन केले आहे आणि त्यांनी म्हटले की, या विसाव्या शतकाच्या अखेरीस समाजवादी क्रांतीविरुद्ध भांडवलशाही समाज अशी परिस्थिती राहिली नाही. भारत, मुसलमानी राष्ट्रे आणि चीन यांमध्ये साठ टक्के मानवजात भरलेली आहे. यांचे प्रश्न आणि यांच्या समृद्धीचे प्रश्न अजून सुटले नाहीत. प्रजावाढीचा स्फोटक विस्तार आवरता येण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे मानवी समाजाचे भवितव्य सर्वांगीण दृष्टीने समाधानकारक निर्माण करणे एकविसाव्या शतकात शक्य नाही.

**प्रश्न : मार्क्सवादी ध्येयवादाने अथवा युटोपियाने जगभर गेल्या दीड शतकात पिढ्यांमागून पिढ्या भारून टाकल्या होत्या. त्या ध्येयवादाचा वा युटोपियाचा स्वप्नाळू नि वास्तव असा दुहेरी अर्थ वेगवेगळ्या जागतिक समाजात आणि व्यक्तींमध्ये, त्यांच्या त्यांच्या सांस्कृतिक संदर्भात केला जात असे. आता ही मार्क्सवादाची देवता अंतर्धान पावली आहे, असे आपणास वाटते काय? असे असले, तर मार्क्सविना जग ही स्थिती ध्येयवादोत्सुक मनांनी कशी सहन करावयाची? मार्क्सवादाला पर्याय आहे काय? स्वप्रदर्शी आणि वास्तव?**

**उत्तर :** मार्क्सवादीरूपी देवता अंतर्धान पावली आहे, हे विधान वस्तुस्थितीला पूर्ण धरून आहे. परंतु मार्क्सवादाला पर्याय नाही. या पार्थिव मानवसृष्टीला संपूर्णपणे शुभ आणि समृद्ध जीवन लाभेल काय? याबद्दल स्वप्नाळू ध्येयवादी काहीही उत्तर देवोत; परंतु खरेखुरे उत्तर वस्तुस्थितीचे मूल्यमापन करता सापडत नाही. या पृथ्वीची मानवी समाजास कल्याणकारक

जीवन देण्याची समर्थता दिसत नाही. अपरंपार ऊर्जा माणसाला मिळवून देण्याची समर्थता पृथ्वीमध्ये दिसत नाही. पेट्रोल आणि डिझेल हे पृथ्वीच्या पोटात मर्यादित प्रमाणातच आहेत. मानवाला भविष्यकाळात सुसह्य व समृद्ध जीवन सार्वत्रिक स्वरूपात लाभायचे, तर अमर्याद ऊर्जेची आराधना करावी लागेल. सूर्याची ऊर्जा अपरंपार आहे; परंतु ती ऊर्जा औद्योगिक प्रयत्नांमध्ये कशी राबवायची याचे तंत्रज्ञान माणसाला अजून साध्य व्हावयाचे आहे. ते साध्य झाले, तर एकविसावे शतक हे विकासाचा मार्ग निर्वेधपणे आक्रमू शकेल.

**प्रश्न : क्रांतीची आकांक्षा ही मानवी समूहजीवनाची प्रवृत्ती मानली, तर रशियन क्रांतीचा इतिहास हा त्या प्रवृत्तीला दिलेला सर्वात मोठा प्राणांतिक धक्का समजता येईल काय? मार्क्सवादासारखा एकेकाळी चिरनूतन मानल्या गेलेल्या विचारप्रणालीचा प्रयोग फसला असेल, तर एकूणच क्रांतीवाद अनाथ, पोरका झाला आहे, असे म्हणता येईल काय? साम्यवाद आणि त्याचा अधिष्ठाता मार्क्सवाद यांच्या पीछेहाटीमुळे आधुनिक मानव अधिक तर कंगाल झाला आहे, असे आपणास वाटते काय?**

**उत्तर :** मानवसमाज हा विचारपूर्वक जगू लागला, ते आकाशातील सूर्य-चंद्रादी प्रकाशज्योतींच्या चिंतनाने, गणित आणि कालमान यांचा सांधा व्यवस्थित या चिंतनातून दिसला. काळाचे आकलन आणि गणितशास्त्र यांच्यामुळेच मनुष्य काळावर मात करू लागला. मृत्यूवर विजय मिळवू लागला. शेतीला ऋतुमानाचे ज्ञान आवश्यक असते, हे जीवन आणि कालज्ञान यांचे उत्कृष्ट निदर्शक आहे. अनंत आकाशात माणसाच्या जीवनात उपयुक्त अशी महान शक्ती आहे, अशी अंतर्दृष्टी माणसाला प्राप्त झालेली आहे. त्यामुळे तो देवाची प्रार्थना आकाशाकडे पाहून करतो. गायत्रीमंत्र म्हणजे सवितादेवीची उपासना.

**प्रश्न : मार्क्सवादात चिरंतन टिकेल असे काय आहे? आणि साम्यवादी प्रयोगात क्षणभंगुर ठरले ते काय होते?**

**उत्तर :** समाजाची शोषित आणि शोषक अशी जी विभागणी मार्क्सवादाने केली, त्यामुळे सामाजिक क्रांतीच्या उलाढाली या शतकात झाल्या. पण त्यातून समताप्रधान समाज निर्माण होऊ शकला नाही. पण समताप्रधान समाज निर्माण करण्याइतका ध्येयवाद आणि इतिहासाच्या शक्तीचे तत्त्व या दोन गोष्टी मार्क्सवादाने माणसाच्या मनात भरवल्या. त्यांचे वैज्ञानिक महत्त्व नाकारता येत नाही.

**प्रश्न : साम्यवादी चीन हा आज उद्याच्या जगात विझणारा दिवा आहे, उजळत जाणारा रशियातून हद्दपार झालेली देवता चीनमध्ये पुनः प्रतिष्ठित होईल काय? विशेषतः जागतिक मानवी समाजाच्या संदर्भात ?**

**उत्तर :** भारताप्रमाणेच चीनलाही प्रजावाढीचा स्फोट आर्थिकदृष्ट्या पाय मागे ओढणारा ठरत आहे. मार्क्सवादाचा दिवा चीनमध्ये उजळत आहे की मिणमिणता आहे, या प्रश्नाचे उत्तर

निश्चितपणे आजची परिस्थिती देत आहे. ''एक काळ असा होता, की चीनची लाल क्रांती भारतीय ध्येयवाद्यांनाही भुरळ पाडत होती.'' आता तसे काही राहिलेले नाही. मार्क्सवादामुळे एक महत्त्वाचे सत्य दृष्टिआड झाले. ते म्हणजे व्यक्तीची सर्जनशीलता. त्यामुळे मार्क्सवादात जे जातात ते फसतात, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**प्रश्न : भारत १९२० ते १९९० यासंबंधी आपणास जाणवणारी ठळक वैशिष्ट्ये कोणती?**

**उत्तर :** पहिले मोठे वैशिष्ट्य म्हणजे अनेक भाषिक प्रदेश, भिन्न भिन्न राष्ट्रे म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात उभे राहिले नाहीत. ते अनेक भाषिक प्रदेशांचे एक राष्ट्रीयत्व भारताचे प्रथम वैशिष्ट होय. पश्चिम संसदीय लोकशाही ही सामान्य जनतेला स्वीकारार्ह वाटू लागली. ही भारतीय सामान्य जनता मोठ्या प्रमाणात निरक्षर आहे. इतके असूनही लोकशाही अजून टिकली आहे. मात्र, भविष्यकाळ व लोकशाहीबद्दल निश्चित आशा देत नाही.

**प्रश्न : आपण शंभर वर्षे जगण्याची आकांक्षा मागे व्यक्त केली होती? आता काय वाटते?**

**उत्तर :** मानवी जीवनाला साधारणपणे शंभर वर्षांची मर्यादा निसर्गाने दिली आहे. आता अखेरीच्या काळात निरोगी स्मरणशक्ती शाबूत असलेली जोवर चालली पाहिजे, जीवनाचा वीट आलेला नाही आणि प्राप्तकर्तव्ये टाळावीशी वाटत नाहीत.

**(दैनिक लोकसत्ता, मुंबई, दि. २६ जानेवारी, १९९१)**

○○○

६७

# भारताचे संविधान

मुलाखतकार - **अनिल जोशी**

आसेतुहिमाचल म्हणजे हा भारत प्रदेश होय. अशा या खंडप्राय देशामध्ये जी माणसे राहतात, त्यांच्या जाती किंवा धर्माच्या योगाने त्यांची राष्ट्रीयता वेगळी ठरत नाही. राष्ट्र म्हणजेच हा प्रदेश होय. त्यातील राजकीय सत्ता एकच. या दृष्टिकोनामुळे येथील मानवसमाज एक आहे, त्याचे मानवी हक्क मूलभूत आहेत, हे मानवी हक्क जगात सर्वत्र मान्य झाले पाहिजेत, असा युनोचा आग्रह आहे आणि तो नैतिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. मानवजातीचा प्रपंच सुखावह व समाधानकारक व्हावा याकरिता मानवी हक्क हे मूलभूत, अपरिवर्तनीय व शुद्ध स्वरूपात अबाधित राहिले पाहिजेत, हा आग्रह आपल्या देशाच्या संविधानाच्या मुळाशी आहे. मानवी समाजाच्या सर्व संघटना या ऐतिहासिक दृष्टीने लक्षात घ्याव्या लागतात. उदाहरणार्थ : - मनुष्याला संघटित करणाऱ्या दोन शक्ती होत. एक म्हणजे भूभाग व दुसरी भाषा होय. भूभागामध्ये मनुष्य केव्हातरी आलेला व वस्ती करून राहिलेला आहे, हे लक्षात घ्यावे लागते. मूळ मानव आफ्रिकेतून आला असे मानववंशशास्त्रज्ञ म्हणतात. आजचे जे समाज दिसतात, ते एकेकाळी नव्हते हे मानावे लागते.

भारतामध्ये आर्य बाहेरून आले, अशा तऱ्हेचा इतिहासाचा एक कालखंड ऐतिहासिक मानवजातीशास्त्रज्ञ गृहीत धरतात. कोठून आला यातील मूळ स्थान सांगता येत नाही; परंतु युरोपात किंवा इराणात राहणारी जी प्रजा आहे व भारतात राहणारी जी प्रजा आहे, यांचे भाषिक भेद लक्षात घेतले तर ते एका भाषाकुळातील आहेत असे अनुमानित होते. पाच हजार मैलांवर असलेली इंग्लिश भाषा आणि भारतातील हिंदी, मराठी, बंगाली वगैरे भाषा यांचे भाषिक समानकुलत्व लक्षात घ्यावे लागते. उलट दक्षिणेतील तमीळ, तेलगू, कन्नड, मल्याळम इत्यादी भाषा या भिन्नकुलीन आहेत असे भाषिक इतिहासज्ञ म्हणतात. अशा या मानवजातीच्या एका स्थळाहून दुसऱ्या स्थळात, तेथून तिसऱ्या स्थळात वसाहती करण्याच्या प्रवृत्ती लक्षात घ्याव्या

लागतात. भारतामध्ये बाहेरून जमाती आल्या आणि त्या येथे स्थिरावल्या हे लक्षात घ्यावे लागते. म्हणून भारताची राज्यघटना ही मानवी एकता आणि मानवी मूलभूत हक्क यांचा स्वीकार करून आधार म्हणून तयार झालेली आहे.

स्वातंत्र्याचा लढा हा भारतव्यापी झाल्यामुळे ही भारतातील सर्व भाषिक प्रदेशांची विभागणी दुय्यम ठरते. येथील सांस्कृतिक परंपरेमध्ये व सांस्कृतिक इतिहासामध्ये जातिभेद हा उघड दिसतो; परंतु या जातिभेदात्मक रचनेला डावलूनच भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा इतिहास घडला आहे. भारतातील धर्मसुधारक आणि समाजसुधारक या जातिभेदाला नष्ट करण्याकरिता उदात्त विचारसरणी व तत्त्वज्ञान यांचे मोठ्या आग्रहाने प्रतिपादन करतात आणि ते तत्त्वज्ञान म्हणजे सर्व मानवांचे ऐक्य होय. ते जर मान्य केले नाही, तर भारताची राष्ट्रीयता आणि राष्ट्रीय एकात्मता निराधार ठरून दुबळी व केव्हाही कोलमडून पडू शकेल अशी ठरेल हे लक्षात घ्यायला पाहिजे.

आपल्या येथील भाषिक प्रदेश म्हणजे राष्ट्रीयता नव्हे. फ्रान्सची राष्ट्रीयता ही एकभाषिक प्रदेशाची आहे. स्पेन, इटली, अमेरिका यांची राष्ट्रीयता भाषिक प्रदेशाची आहे. आपली राष्ट्रीयता भाषिक भेदांच्या पलीकडची आहे. येथे भाषिक प्रदेशाच्या ज्या अस्मिता असतात, त्या अस्तास गेलेल्या आहेत. मूलभूत हक्कांसाठीच आपला स्वातंत्र्यलढा झाला. आपली राष्ट्रीयता मानवतेच्या आधारावर उभी आहे. येथे कोणकोणत्या धर्मात जन्मास आला हे गौण आहे. तरीदेखील देशाची सद्यःस्थिती लक्षात घेता त्यात फुटिरतावाद आला आहे. पंजाब, आसाम, काश्मीर व थोडाफार तामिळनाडू या ठिकाणी वेगळे सूर निघू लागले आहेत. प्रादेशिक स्वायत्तता ही नक्की मानली पाहिजे; पण हा दृष्टिकोन केंद्रास पचलेला नाही. आता संघराज्याचे स्वरूप म्हणूनच याकडे पाहावे लागेल. केंद्राचा दबाव एका मर्यादेच्या बाहेर प्रादेशिक राज्ये सहन करीत नाहीत, हे दिसू लागलेले आहे आणि याचाही जाणीवपूर्वक विचार करण्याची गरज निर्माण होत आहे, हे दुर्लक्षिता येत नाही.

**(सुशिंपाज मासिक, वाई, सप्टेंबर १९९१)**

००० 

६८

# समान नागरी कायद्याची टाळाटाळ भोवणारी

मुलाखतकार - **प्रतिनिधी, दैनिक सकाळ, सातारा**

भारतात समान नागरी कायदा व्हायलाच पाहिजे. आजपर्यंत त्या बाबतीत झालेली टाळाटाळच देशाला भोवते आहे.

राजकारणात धर्माला अधिष्ठान प्राप्त होता कामा नये, हा बळकट विचार रुजविण्याचे काम सुरू असतानाच दुसरीकडे सत्तारूढ काँग्रेस (आय) मुस्लिमांचा अनुनय करीत आहे, असा भारतीय जनता पक्ष व इतर पक्षांचा आरोप आहे. त्याबरोबरच शाहबानो खटला, समान नागरी कायदा याबाबत काँग्रेसची भूमिका त्यांच्या अनुनयावर शिक्कामोर्तब करणारीच नाही काय, असे विचारता, "अशा प्रकारचा अनुनय योग्य नाही. सर्वांना बरोबर घेऊन जायचे असेल तर सर्वांनाच समान कायदा हवा. त्या बाबतची टाळाटाळच आज देशाला भोवते आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

सहा डिसेंबर रोजी अयोध्येत उद्ध्वस्त करण्यात आलेल्या वादग्रस्त वास्तूबाबत व सहा जानेवारीपासून मुंबईत व इतरत्र उसळलेल्या दंगलीबाबत ते म्हणाले, "खरे हिंदुत्व हे म्हणजे मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, यहुदी इत्यादी जगातील कोणत्याही धर्माचा हेवा किंवा द्वेष करीत नाही. कारण इतर धर्माला संस्थापक, प्रेषित असतो, धर्माचे पुस्तक असते. जसे यहुदी धर्माला बायबलचा पूर्वार्ध, खिश्चन धर्माला ख्रिस्ताच्या उपदेशाचा उत्तरार्ध आहे. सनातन हिंदू धर्माला सनातन श्रुती, स्मृती, पुराणे आदी सगळे धर्मग्रंथ आहेत. सत्य, अहिंसा, अपरिग्रहता ही धर्माची मूलभूत नैतिक मूल्ये आहेत, अशी नैतिक मूल्ये लागू नाहीत असा मानव समाज नाही. म्हणूनच सर्व मानव समाज मूलतः सनातनधर्मीय आहे. आज हिंदू-मुस्लिमांत संघर्ष दिसतो. वस्तुतः हिंदूनी संघर्षाची भाषा करू नये. संघर्ष योग्य नाही, असे मात्र बोलावे. मंदिर-मशीद असा भेद मानू नये. इतिहास काळातील संदर्भ आज लागू होत नाहीत. आजच्या विज्ञान युगात हा इतिहास उकरून काढू नये. सर्व धर्मीयांमध्ये बंधुभाव हा मुख्य धर्म मानून वर्तन व्हावे. कारण मानव हिंदूंच्या दृष्टीने स्वधर्मीयच आहे."

आजच्या परिस्थितीतून देश सुखरूप बाहेर पडेल काय, असे विचारले असता शास्त्रीजी म्हणाले, मुळातच उच्च दर्जाचे नेतृत्व लाभणे ही देशाच्या भाग्याची गोष्ट असते. ते नेहमीच मिळते असे नाही. दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्यासारखे प्रभावशाली नेतृत्व आता नाही. गांधीजी तर केवळ भारताचेच नव्हे तर ते एक जागतिक नेतृत्व होते. आइनस्टाइननेदेखील महात्मा गांधींसारखा मानव पृथ्वीतळावर हिंडू शकतो याबद्दल आश्चर्य व्यक्त केले होते. त्या पार्श्वभूमीवर त्या उंचीच्या नेतृत्वाचा आज अभाव आहे. आजच्या नेतृत्वाला मर्यादा पडतात. त्यामुळे भविष्याबद्दल भाष्य करणे कठीण जाते.''

गेल्या पाऊण शतकाचा कालावधी आपण जवळून पाहिला आहे. त्या इतिहासाच्या दर्शनातून आपण आजच्या समाजाला काय सांगू शकाल, या प्रश्नावर शास्त्रीजी उत्तरले. ''भारताची फाळणी झाली, मात्र कोणाच्याच हिताची ठरली नाही. मुस्लिम बहुसंख्येने असणारांना पाकिस्तान मिळाले; परंतु कोणत्याही मुस्लिम देशांपेक्षा भारतात मुस्लिमांची संख्या जास्त आहे, हे मुस्लिमांनी ओळखले पाहिजे. त्यांनी संघर्षाची भूमिका ठेवली तर तेही संकटात येतील. सर्वांनीच गुण्यागोविंदाने राहून भारतीय संस्कृतीचे संवर्धन केले पाहिजे.''

भावी संकल्पाबद्दल विचारले असता ते म्हणाले, ''जे घडत असते त्याचा विचार करून त्या त्या वेळी उत्तर ठरवितो. अगोदरच मी काही ठरवीत नाही. विश्वकोशाच्या खंडनिर्मितीचे अगोदरच नियोजन केल्याप्रमाणे ते पूर्ण करण्याचा माझा मानस आहे; पण तज्ज्ञ व्यक्तींचा अभाव व प्रकाशनाला लागणारा वेळ यामुळे या गोष्टीला विलंब लागत आहे; पण यातून मार्ग काढीत खंडनिर्मितीचे कार्य चालू आहे.''

**(दैनिक सकाळ, पुणे, दि. २६ जानेवारी १९९३)**

○○○

*

# शिक्षण

*

६९

# ग्रामीण कॉलेजे प्रभावी कशी होतील?

मुलाखतकार - **प्रतिनिधी, दैनिक सकाळ, सातारा**

*('ग्रामीण विभागात अधिकाधिक कॉलेजेस सुरू होणं ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. विश्वविद्यालयीन शिक्षणाची आकांक्षा तेथील विद्यार्थ्यांमध्ये आज वाढत्या प्रमाणात दिसू लागली आहे. एम. एस. सी. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही प्रतिवर्षी वाढत आहे. अशा स्थितीत कॉलेज शिक्षणासाठी स्वतःचे गाव सोडून शहरात कोठे तरी येण्याऐवजी गावातल्या गावात कॉलेज शिक्षणाची सोय झाली, तर विद्यार्थ्यांचे हितच होईल,'' असे उद्गार वाई येथील ग्रामपाठशाळा मंडळाच्या आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजचे संचालक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'सकाळ'साठी दिलेल्या मुलाखतीच्या प्रसंगी काढले.)*

**ग्रामीण व नागरी संस्थांचे प्रश्न**

वाई येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज अनेक अडचणींना तोंड देत गेली तीन वर्षे चालू आहे. त्या संदर्भातील आपले अनुभव सांगत असता तर्कतीर्थ यांनी विचार व्यक्त केले.

ग्रामीण भागातील महाविद्यालयाच्या आणि नागरी भागातील महाविद्यालयांचे समस्या यामध्ये काय फरक आहे, याविषयी बोलत असता, तर्कतीर्थ जोशी म्हणाले, "ग्रामीण भागात महाविद्यालयीन शिक्षकांची आकांक्षा वाढत असली, तरी अशी विद्यालये चालवण्यास आवश्यक आर्थिक सुस्थितीत असलेला वर्ग तेथे नाही. त्यामुळे ग्रामीण महाविद्यालये दृढ आर्थिक पायावर उभी राहू शकत नाहीत. याकरिता नागरी भागातील धनिक वर्ग व उद्योगपती यांचेकडून आर्थिक साहाय्य मिळवण्यावाचून गत्यंतर राहत नाही. ग्रामीण भागातील महाविद्यालये स्थिर आर्थिक पायावर उभी करणे, हे सार्वत्रिक शिक्षणप्रसाराच्या दृष्टीने समाजाचे एक कर्तव्यच आहे आणि नागरी समाजाला ते पटवून देणं ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे.

**वाईत आलेला उलटा अनुभव**

ग्रामीण महाविद्यालयाच्या संचालनाबाबतचे आपले अनुभव सांगत असता, तर्कतीर्थ

जोशी म्हणाले, ''ग्रामीण भागांतील महाविद्यालयांच्या काही निरनिराळ्या समस्या आहेत. याची मला प्रथम कल्पना नव्हती. अलीकडे सगळीकडे महाविद्यालय निघत आहेत. आपणही काढावे, म्हणून आम्ही ग्रामीण नेत्यांच्या निकडीच्या मागणीमुळे वाईस महाविद्यालय काढले, ते केवळ अनुकरणप्रियतेमुळे. समस्यांची कल्पना असती, तर कदाचित इतक्या घाईने आम्ही हे धाडस केले नसते. नागरी महाविद्यालयांना ज्या गोष्टी सहजी अनुकूल असतात, त्याच ग्रामीण महाविद्यालयांनाही अनुकूल आहेत, असे समजून वाई येथील महाविद्यालय आम्ही सुरू केले. खेडोपाडी अनेक माध्यामिक विद्यालये (हायस्कूले) आज सुरू झाली आहेत. त्यांमधून एस. एस. सी. परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दूर शहरात जाऊन उच्च विद्यापीठीय शिक्षण घेणे परवडत नाही, त्यांची सोय लावावी, हा पहिला साधा उद्देश होता. परंतु अनुभव मात्र उलटा आला. ग्रामीण भागांत पसरलेली माध्यमिक विद्यालये (हायस्कूले) यांतून एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण होणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने महाविद्यालयीन शिक्षणाला आवश्यक असलेली पात्रता दाखवीत नाहीत. मुख्यतः इंग्रजी, गणित, संस्कृत विज्ञान हे विषय न घेतलेले विद्यार्थीच पुष्कळ असतात.''

### मिळणारे विद्यार्थी खूपच कच्चे

ग्रामीण माध्यमिक विद्यालयाचा क्षणिक दर्जा फार खालावलेला असतो. एवढंच नव्हे, तर शंभर शंभर वर्षे नावाजलेल्या नागरिक शिक्षण संस्थांनी, तर्कतीर्थ जोशी अथवा इतर संस्थांनी काढलेली ग्रामीण भागातील माध्यामिक विद्यालयेसुद्धा केवळ व्यापारी बनलेली आहेत. 'घाटे-परुळेकर स्कीम'प्रमाणे जास्त पगार द्यावयास लागू नये म्हणून मॅट्रिक झालेली मुलेच मॅट्रिकपर्यंत शिकवीत असतात. मग ग्रामीण भागांत कार्याचा व्याप वाढविणाऱ्या शिक्षण संस्थांनी काढलेली माध्यामिक विद्यालय कशी असतील, याची कल्पनाच केलेली बरी. याचा अर्थ, विद्यार्थ्यांची संख्या नव्या विद्यालयांना भरपूर प्रमाणात मिळत नाही व मिळालेले विद्यार्थी फार कच्चे सापडतात.''

### अनुभवी प्राध्यापकांची उणीव

ग्रामीण महाविद्यालयांसमोरील अन्य समस्यांचे विवरण करीत असता, तर्कतीर्थ जोशी म्हणाले, ''कसलेल्या अनुभवी उच्च- शिक्षित प्राध्यापकवर्गाची उणीव ही आमच्यासमोरील आणखी एक मोठी समस्या आहे. असा प्राध्यापक वर्ग ग्रामीण भागांत जाऊन काम करण्यास नाखूष असतो, असे शिक्षक प्रथम मिळत नाहीत, मिळाले तरी ते टिकत नाहीत. वस्तुतः ज्याला खरा विद्याव्यासंग करावयाचा आहे, त्या प्राध्यापकाला निवांत आणि निरामय वातावरणाचा लाभ नागरी भागांपेक्षा ग्रामीण भागांत अधिक मिळतो. दुसरे असे की, शहरात राहण्याच्या जागांची माडी फार वाढलेली आहेत. ग्रामीण भागांत उलट अत्यंत अल्पभाड्यात राहण्याची जागा मिळते.''

तर्कतीर्थ जोशी पुढे म्हणाले, ''ग्रामीण भागांतील महाविद्यालयांसमोरील आणखी एक समस्या म्हणजे वसतिगृहांची होय. महाविद्यालयाच्या परिसरांत स्वस्त राहण्याची व भोजनाची सोय असलेली वसतिगृहे महाविद्यालयांच्या स्थैर्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असतात. कारण त्यामुळे विद्यार्थ्यास चोवीस तास अभ्यासाचे वातावरण उपलब्ध होऊ शकते, असे वातावरण घरीदारी मुळातच जेथे अनुपलब्ध आहे, अशा ग्रामीण भागांत वसतीगृहांची उणीव शहरापेक्षाहि विशेष प्रकर्षाने जाणवते.''

ग्रामीण आणि नागरी अशा सर्वच भारतीय विद्यापीठांना एकत्रपणे भेडसावणाऱ्या आणखी एका समस्येबाबत बोलताना ते पुढे म्हणाले, ''महाविद्यालयाची जीवितोद्देशाशी सांगड आम्हास अद्याप घालता आलेली नाही. ही समस्या भारतीय विद्यापीठीय शिक्षणाची मूलभूतच समस्या म्हणून सांगता येईल. खासगी, सार्वजनिक व सरकारी नोकऱ्या मिळविणे हाच आमच्या विद्यापीठीय शिक्षणाचा प्रमख उद्देश आजवर बनलेला आहे. स्वतंत्र बाण्याचा स्वावलंबी नागरिक निर्माण करण्याचे शिक्षणाचे उद्दिष्ट आज नजरेआड झालेले आहे व म्हणूनच ते जवळजवळ असाध्य ठरले आहे.''

**गरीब विद्यार्थ्यांचा दुहेरी लाभ**

या विशिष्ट समस्येमधून बाहेर पडावयाचे असेल, तर ग्रामीण भागांत शिकलेला विद्यार्थी ग्रामीण भागांतच स्थिरावणे आवश्यक आहे, असे सांगून तर्कतीर्थ पुढे म्हणाले, ''तो तसा स्थिरावेल, या दृष्टीने ग्रामीण महाविद्यालयांचा शिक्षणक्रम तयार करणे व विशेषतः तो कार्यवाहीत आणणे, ही गोष्ट प्रथम आवश्यक आहे. यासाठी काय करणे आवश्यक आहे, याची काल्पनिक उत्तरे अनेक सापड शकतील. परंतु व्यावहारिक उत्तरं मिळाली पाहिजेत. कृषि, कृषिसंबंधी व ग्रामसंबंधी नवे तांत्रिक उद्योग, ग्रामांची नवी रचना, हे महत्त्वाचे तीन उद्देश सफल होतील, अशा प्रकारच्या नवीन महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची आज गरज आहे. विद्यार्थ्यांना शेतावर, ग्रामीण भागांतील औद्योगिक क्षेत्रांमध्ये कारखान्यांत तीन-चार तास काम मिळावे व बाकीचा वेळ त्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयीन अध्ययनात घालवावा, अशी व्यवस्था निर्माण करता आली पाहिजे.''त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना स्वपोषण व उच्च शिक्षण असा दुहेरी लाभ होईल.

''परंतु याला मी काल्पनिक उत्तर समजतो. अद्ययावत पद्धतीने चालणारी बागायत शेती किंवा फळबागा, कोंबडी, डुकरे, गाई, म्हशी इत्यादिकांचे पालन, भाजीपाला, फळफळावळ टिकविण्याची, कारखाना, दुग्धोत्पादन अशा प्रकारचे विविध अर्धतांत्रिक व तांत्रिक उद्योग-व्यवसाय ग्रामीण भागांत जोरावणे हीच अत्यंत महत्त्वाची गरज आहे.''

**ग्रामीण कॉलेजांची जबाबदारी**

''इतिहास, साहित्य, भाषा, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, व्यापार आदींच्या अध्ययनाचीही ग्रामीण भागात नागरी महाविद्यालयाइतकीच गरज आहे'', असे सांगत तर्कतीर्थ जोशी म्हणाले

''ग्रामीण भागांतील माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणक्षेत्रात व राष्ट्राच्या उद्योगधंद्याच्या विविध प्रशासन केंद्रात उत्तम शिक्षकाची, प्रशासकांची व व्यवस्थापकाची आज गरज आहे. व्यवसायाच्या क्षेत्रात त्वरित अवसर मिळवून देणारी इंजिनियरिंग, मेडिकल विषयाची महाविद्यालये अलीकडे फारच महत्त्व पावली आहेत. तीव्र बद्धीचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी याचे व्यवसायलक्ष्य अभ्यासक्रमाकडे मोठ्या प्रमाणात भरती होऊ लागले आहेत. त्याचा दुष्परिणाम थोड्याच दिवसांत दिसू लागेल, नव्हे, तो आजच दिसू लागला आहे.''

तर्कतीर्थ जोशी पुढे म्हणाले, ''हा तुटवडा दूर करण्याचे कामी ग्रामीण भागातील महाविद्यालयांचे महत्त्वपूर्ण सहाय्य होण्यासारखे आहे. वैद्यकीय, शेतकी आणि इंजिनियरिंगची महाविद्यालये आर्ट्स कॉलेजेसपेक्षा संख्येने कमीच निघतात आणि निघतात ती बहुधा मोठ्या शहरांचे परिसरांत निघतात. अशा स्थितीत उत्तम प्रशासक, शिक्षक वा व्यवस्थापक निर्माण करण्याचे दृष्टीने ग्रामीण भागांतील महाविद्यालयांनी शक्तर एकवटली पाहिजे.''

## वाई कॉलेजांचे शिक्षणाचे ध्येय

वाई येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजची वाढ कोणत्या दिशेने करण्यात येत आहे, याचे दिग्दर्शन करीत असता, तर्कतीर्थ जोशी म्हणाले, ''नागरी भागांतील हुशार विद्यार्थी-विद्यार्थिनी व्यवसायप्रधान तांत्रिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयात प्रवेश मिळवितात, ही गोष्ट ग्रामीण भागाला लागू नाही. हीच आम्ही अनुकूल संधी समजतो. शिक्षण प्रशासन आदि क्षेत्रांत पडू इच्छिणाऱ्या होतकरू मुलांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी वाई येथील आमचे कॉलेज मोठ्या निष्ठेने प्रयत्न करीत आहे.''

**(दै. सकाळ. पुणे, २५ मार्च, १९६५)**

○○○

७०

# राष्ट्रीय शिक्षणाचा इहवादी दृष्टिकोन

मुलाखतकार - **अनिल जोशी**

भारतीय राष्ट्रवादाचे श्रेष्ठ निर्माते म्हणून लोकमान्य टिळकांचे नाव आधुनिक भारताच्या इतिहासात चिरंतन झाले आहे. याचे कारण ते कर्मयोगी तत्त्वज्ञानी होते. त्यांच्या राष्ट्रवादाचे अधिष्ठान संपूर्ण मानवजातीचे एकच भवितव्य हे होते. माझेच राष्ट्र, मग ते कसेही असले तरी श्रेष्ठ आहे, अशा तऱ्हेचा फॅसिस्ट दृष्टिकोन त्यांचा नव्हता. म्हणून आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या विकासाशी सुसंगत असे भारतीय व्यक्तिमत्त्व निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट त्यांनी दृष्टीपुढे ठेवून राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडली. जगातील सगळ्या प्रगत राष्ट्रांतील आधुनिक जीवनाच्या प्रेरणा आत्मसात करून सर्जनशील बनलेला कर्मयोगी शिक्षक हाच या राष्ट्रीय शिक्षणाचा आधारस्तंभ होय आणि अशा कर्मयोगी शिक्षकांची संघटना म्हणजे विद्यापीठ होय, असा विचार यांनी मांडला. त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या सांगितली आहे ती अशी : "अनेक विज्ञाने, शास्त्रे, उद्योगधंदे, व्यापार व कला यांमध्ये निष्णात, पारंगत होऊन स्वपराक्रमाने व बुद्धिवैभवाने पुढे येणारी व नोकऱ्यांचा शोध न करणारी माणसे ज्या शिक्षणाने तयार होतील, तसेच देशाचे राजकीय, औद्योगिक, सामाजिक व बौद्धिक वैभव राखण्यास व वाढविण्यास समर्थ तरुण पिढी ज्या शिक्षणाने तयार होईल त्यास राष्ट्रीय शिक्षण म्हणता येईल."

असे शिक्षण ब्रिटिशांच्या राजवटीतील विद्यापीठे व शिक्षणसंस्था यांच्यामध्ये मिळू शकत नाही. त्यामुळे स्वराज्याच्या आंदोलनाचे नेते अत्यंत अस्वस्थ होते. ती अस्वस्थता लो. टिळकांनी केसरीमध्ये निरनिराळ्या संदर्भात सरकारी शिक्षणातील उणिवा व दोष या रूपांनी दाखविली. भारतात त्या वेळी पश्चिमी शिक्षणपद्धती ब्रिटिश सरकारने अमलात आणली होती; परंतु बाह्य देखावाच पश्चिमी शिक्षणपद्धतीचा होता; पण पश्चिमी शिक्षणपद्धतीतील ज्ञानविकासाच्या आणि व्यक्तिमत्त्वविकासाच्या प्रेरणा नव्हत्या. ती पद्धती तकलादू होती. या मुद्यांसंबंधी लोकमान्य टिळक म्हणतात :

## पाश्चात्त्य ज्ञानावर विश्वास

"इंग्रजी वाङ्मय, इंग्रजी शास्त्रे वगैरे विद्या कोणाही विद्यार्थ्यांचे मन विकसित करून त्यांच्या अंगात व मनात हुरूप व देशाभिमानाचा सद्गुण उत्पन्न करण्यास लायक आहे, याबद्दल वाद नाही. बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानातील न्याय-व्याकरणादी प्राचीन शास्त्रे कितीही जरी उपयोगी असली तरी देशाभिमान, राज्यव्यवस्था, राजनीती, देशाची नैतिक व सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्राराष्ट्रांचा परस्परसंबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्यास ज्या विषयांचे ज्ञान लागते, त्या विषयांचे शिक्षण या आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रापासून मिळत नाही आणि मिळणेही शक्य नाही." पाश्चात्त्य शिक्षण अत्यंत मोलाचे आहे. आमच्या परंपरागत प्राचीन विद्यांचा भावी प्रगत हिंदुस्तानास विशेष असा उपयोग नाही, हा विचार टिळकांच्यापूर्वी लोकहितवादी, जोतीराव फुले इत्यादी धर्मसुधारक व समाजसुधारक यांनी पाऊणशे वर्षापर्यंत जोराने मांडला. टिळकांना नक्की माहीत होते की, अशा जोरदार नव्या शिक्षणात परंपरागत भारतीय समाजसंस्थेचा व संस्कृतीचा कायापालट होईल. त्यांना तो अत्यंत इष्ट वाटत होता. आधुनिक पश्चिमी संस्कृतीचे व्यक्तिस्वातंत्र्य हे मूलभूत मूल्य आहे व त्या मूल्याच्या अधिष्ठानावरच सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य विकास पावेल व तसे पावावे हेही त्यांना इष्ट व उत्कृष्ट ध्येय म्हणून मान्य होते.

परंतु पाश्चात्त्य शिक्षणपद्धतीची इंग्रज सरकारने स्थापना करून पाऊण शतक झाले तरी ते इष्ट दिशेने फलद्रूप होत नाही, हे पाहून त्यांची निराशा झाली. खरे विद्यापीठ कोणते? (दि. २५ फेब्रुवारी १८९६) या लेखामध्ये ते म्हणतात, "नेमके जे घडावयास पाहिजे तेच घडत नाही, असे दिसून आले. दुधाने ज्याप्रमाणे ताकाचे अनुकरण करावे त्याप्रमाणे युरोपियन विद्यापीठांचे आमच्या देशातील विद्यापीठ हे अनुकरण होय. संस्था जशा असाव्यात तशा नसल्यामुळे कोणत्याही शास्त्राचा शोधक बुद्धीने आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ अलीकडे पैदा होत नाहीत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धी अथवा योग्यता आमच्या अंगात नाही असे नाही. ज्या देशात पाणिनी, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य वगैरे विद्वान पूर्वकाळी होऊन गेले, त्यात सध्या पाश्चर, एडिसन, मिल्ल वगैरे गृहस्थांप्रमाणे विद्वान का निपजू नयेत, याचे खरे कारण शोधून काढून त्याचा प्रतिकार करणे हे प्रत्येक विद्याबुद्धी इच्छिणाराचे कर्तव्य आहे. सुधारलेल्या देशांत विद्यापीठांची व्यवस्था गुरूंकडे असते. आयुष्य अध्ययन व अध्यापन यांत ते घालवितात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे खरे प्रश्न अथवा अडचणी त्यांना समजून येतात. गुरूंच्या विद्याभ्यासाचा व वर्तनाचा परिणाम शिष्यांच्या मनावर होण्यास गुरुजी खरोखर विद्याव्यसनी असून, छात्रवर्गाशी प्रेमभावाने वागणारे असले पाहिजेत. तसला प्रकार आमच्याकडे नाही. मुंबई विद्यापीठ १८५७ साली स्थापन झाले; पण तेव्हापासून या संस्थेतून एकही जगप्रसिद्ध हिंदू विद्वान निघू नये, हे आश्चर्य नव्हे काय? तेलंग, रानडे, भांडारकर वगैरे काही विद्वान यापूर्वी निघाले आहेत; पण

त्यापैकी काही इतर धंद्यांत शिरल्यामुळे शास्त्राभ्यासाच्या कामी त्यांचा जसा उपयोग व्हावा तसा झालेला नाही. बरेचसे कायद्याच्या अभ्यासात गढून गेले आहेत. मग त्याचा उपयोग काय? ज्याने समरांगणी अश्वारूढ होऊन दोन हात करावयाचे त्याने आपले कौशल्य घरात बायकोच्या नथेतून तीर मारण्यात खर्च करावे, तसा प्रस्तुतचा प्रकार आहे. आमच्या विद्यापीठात खरे विद्याव्यासंगी गुरू व उपगुरू नाहीत. पदव्यांचे शिक्के ठोकण्यापलीकडे काही काम चालत नाही. विद्यापीठे परीक्षा घेणारी रजिस्टर्ड कंपनी झाली आहे, असे म्हटले तरी चालेल."

## राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोजन

ब्रिटिश राजवटीतील सरकारी शाळांतून आणि महाविद्यालयांतून मिळणारे शिक्षण अपुरे, नेभळे व परावलंबी बनविणारे आहे हे जाणून त्या वेळी खासगी शिक्षणसंस्था या देशात निरनिराळ्या प्रांतांत लोकांनी स्थापन केल्या. त्याही शिक्षणसंस्था नीट चालू शकत नाहीत व भरभराटीस येत नाहीत. म्हणून ते लोक सरकारी अनुदान भरपूर घेऊ लागले. त्यामुळे त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्यावर सरकारने अनेक अटी लादल्या व त्यामुळे सरकारी शिक्षण व खासगी शिक्षण यांच्यातील अंतर नाहीसे होऊन खासगी शिक्षणसंस्थांचा सकस राष्ट्रीय वृत्तीचे व स्वावलंबनाचे शिक्षण देण्याचा हेतूही विफल झाला. प्रत्येक सुधारलेल्या स्वतंत्र देशातील सरकार आपल्या नागरिकास ज्या प्रकारचे शिक्षण देऊन स्वावलंबी व समर्थ नागरिक निर्माण करते, तशा प्रकारचे शिक्षण देणाऱ्या म्हणजेच राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था निर्माण करणे हा राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचा हेतू होता, तो सफल झाला नाही.

हा राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचा हेतू सिद्ध करणाऱ्या शिक्षणसंस्था या देशात अजूनही निर्माण झालेल्या नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणसंस्थांच्या आणि विद्यापीठांच्या वाढीचा वेग दसपट झाला. ज्या प्रदेशात दोन किंवा तीन विद्यापीठे असावयाची त्या ठिकाणी निरनिराळ्या प्रकारची दहा-वीस विद्यापीठे आज निर्माण झालेली दिसत आहेत. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक - दोन वा काही तालुक्यांत पाच-सात महाविद्यालये निर्माण झाली आहेत. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सरासरी आठ ते दहा माध्यमिक विद्यालये निर्माण झालेली आहेत. नुसते महाराष्ट्र राज्य घेतले तरी त्यामध्ये विद्यापीठे, महाविद्यालये व माध्यमिक विद्यालये यांची मिळून संख्या दहा हजारांहून अधिक आहे; परंतु लोकमान्य टिळकांची ज्या तऱ्हेची शैक्षणिक उद्दिष्टे स्वराज्यात पूर्ण होऊ शकतील, मूर्त स्वरूपात दिसतील अशी विद्यापीठे कोठे आहेत? निदान त्या उद्दिष्टांच्या मार्गाने धीमेपणाने आणि निश्चयाने पावले टाकणाऱ्या शिक्षणसंस्था किती आहेत व कोठे आहेत, याचा शोधच करणे बरे !

## शिक्षणातला विश्वास उडाला

भारतीय शिक्षणसंस्थांचा पसारा अवाढव्य झालेला आहे; परंतु त्यातील शिक्षकवर्ग ध्येयवादी दिसत नाही. अध्यापन हा केवळ प्रपंच चालविण्याचा धंदा म्हणूनच तो मानतो.

विद्यार्थिवर्गाचा शिक्षणाच्या सामर्थ्यावरील विश्वास उडालेला आहे. विद्येवरील श्रद्धा नाहीशी झालेली आहे. त्यामुळे विद्यार्थिशक्ती (Student power) उच्छृंखल, बेदरकार व बेलगाम बनलेली आहे. याचे कारण लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचे जे फलित ठरविलेले होते, ते फलित विद्यार्थिवर्गाच्या हाती लागत नाही. अशी ही स्वतंत्र भारताच्या शिक्षणाची समस्या अत्यंत गुंतागुंतीची झालेली आहे.

**(केसरी, २९ जुलै, १९७९)**

ooo

७१

# कुटुंबच नैतिक शिक्षणाचे विद्यापीठ

मुलाखतकार - **अनिल जोशी**

अनुकरणापासून व नियंत्रित वर्तनातून माणूस शिकत असतो आणि त्यातूनच त्याच्या वर्तनाची प्रगती होत असते. त्या दृष्टीने कुटुंब हे नैतिक शिक्षणाचे विद्यापीठ आहे.

नैतिक शिक्षणाचा आरंभ हा माणसाच्या जीवनाच्या आरंभापासून होत असतो. जगायचे म्हणजेच जगाशी वागायचे. ते वागण्याचे स्वरूप कसे असावे याचा विचार करताना नैतिकतेच्या विचारास आरंभ होतो. आपल्या वागण्यातून आपण काही मिळवतो व काही गमावतो. शिक्षणाला मर्यादा नसतात. नैतिक प्रश्न हे अशा माणसाच्या आयुष्याच्या उद्दिष्टांशी निगडित आहेत.

सौंदर्य आणि कुरूपता, इंद्रियांना सुखद व दुःखद गोष्टींचा अनुभव, यश- अपयश, आरोग्य, अनारोग्य यासारख्या व्यापक अर्थ असणाऱ्या मूल्यांचे शिक्षण म्हणजेच नैतिक शिक्षण होय. "या नैतिक शिक्षणाच्या जडणघडणीमध्ये अनेक घटकांचा समावेश होतो. कुटुंब, समाज आणि निसर्ग यांच्याकडून सातत्याने मिळणाऱ्या सूचना आणि मार्गदर्शन यांमधून मिळणारे शिक्षण हे जरी आपोआप मिळत असले तरी ते शिकावे लागतेच. मात्र त्यासाठी वेगळा अभ्यासक्रम किंवा वेगळ्या पाठ्यपुस्तकांची गरज नाही. नैतिक शिक्षणाचा वेगळा असा अध्ययन कार्यक्रम नसतो. उत्तम अध्यापकाच्या अध्यापनातून कृतज्ञता, कौशल्य, प्रसन्नता, मनमोकळेपणा, स्नेह यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये आपोआपच रुजतात."

या नैतिक शिक्षणाशी केवळ कुटुंब आणि शाळा यांचा जसा संबंध येतो तशा आणखी इतर काही गोष्टी त्याच्याशी निगडित आहेत. आज देशातील शिक्षणपद्धतीचे स्वरूप अनेक अर्थाने बेचैन करून सोडणारे आहे. पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालय या चारही स्तरांवर गुरु-शिष्य नात्यामध्ये पूर्वीप्रमाणे एक प्रकारची दृढता दिसून येत नाही आणि त्याचाही परिणाम नैतिक शिक्षणाच्या बाबतीत घडून आलेला आहे. उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण आज उपलब्ध नाही हीच आजच्या शिक्षणपद्धतीतील सर्वांत अधिक खेदाची बाब आहे.

या नैतिकतेच्या प्रश्नाशी सामाजिक आणि आर्थिक प्रश्नाचा संबंधही जोडलेला असतो. आपल्याकडे पासष्ट टक्के लोक दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगत असल्याने आपल्या नैतिक विचाराला या आर्थिक स्थितीचा संबंध जोडणे क्रमप्राप्त आहे. दारिद्र्यात अनैतिकता जास्त असते असे म्हणणे जरी फारसे बरोबर नसले, तरीसुद्धा कुटुंबामध्ये आई-वडील व मुले यांचे संबंध जिव्हाळ्याचे राहत नाहीत हे नाकारता येणार नाही.

नैतिक शिक्षण हे अप्रत्यक्षपणेच देणे आवश्यक आहे. कारण ते वर्तनातूनच दिसले पाहिजे. ते भावनांचे व विचारविवेकाचे शिक्षण आहे. आपले जीवन प्रेमाचे, सहानुभूतीचे व परस्पर सामंजस्याचे असेल तरच तिथे उच्च नैतिकता आढळून येईल आणि समाज प्रगत होईल. नैतिकतेची जाणीव असलेले, विद्यार्थ्यांना सकस शिक्षण देणारे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे आणि गुणवत्तेची आवड निर्माण करू शकणारे शिक्षक आज विपुल संख्येने उपलब्ध होणे, यातूनच आपल्या देशातील नैतिक शिक्षणाच्या प्रश्नाची थोडीफार सोडवणूक होऊ शकेल.

**(केसरी, २९ ऑक्टोबर, १९८४)**

○○○

# भाषा आणि साहित्य

*

७२

# मराठी विश्वकोश : ज्ञानभांडाराचे कवाड

मुलाखतकार - **अनिल जोशी**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी १९६० साली राज्य शासनाचे मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली व त्या सूत्रांनुसार साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना झाली. त्या मंडळाने हाती घेतलेल्या प्रमुख प्रकल्पांत मराठी विश्वकोशास खचितच अग्रक्रम आहे. मंडळाचे प्रथमपासूनचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे या मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक म्हणून काम पाहत आहेत. १९६२ मध्ये तर्कतीर्थ जोशी यांनी वाई येथे या मंडळाच्या वतीने मराठी विश्वकोश निर्मितीच्या कार्याचा शुभारंभ केला. तेव्हापासून आज अखेर या प्रचंड कार्याची संपादक या नात्याने असलेली जबाबदारी ते पार पाडत आहेत. साहित्य आणि संस्कृतीस उपकारक अशा अनेक योजना तर्कतीर्थ जोशी यांनी कार्यवाहीत आणल्या आहेत. महाराष्ट्रातील साहित्य संस्थांच्या सुमारे अकरा नियतकालिकांची आर्थिक बाजू हे मंडळ सांभाळत आहे.

### पहिला नकाशासंग्रह

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली वाई येथे सुरू असणारे विश्वकोशनिर्मितीचे कार्य आता चांगलेच आकार घेऊ लागले असून, एकूण वीस खंडांपैकी सात खंडांची छपाई पूर्ण झालेली आहे. विश्वकोशाचे पहिले १७ खंड हे संहिता खंड असून, ते प्रत्येकी सुमारे एक हजार पृष्ठांचे आहेत. १८, १९ व २० या क्रमांकाचे खंड अनुक्रमे परिभाषासंग्रह, नकाशासंग्रह व सूचिखंड आहेत. खास करून नकाशाखंडात महाराष्ट्रातील जिल्हे, भारतातील सर्व राज्ये, जगातील सर्व देश यांबरोबरच सर्व प्रकारचे प्राकृतिक नकाशेही समाविष्ट करण्यात आले आहेत. मराठी भाषेतील हा सर्वांगीण स्वरूपाचा पहिलाच नकाशासंग्रह ठरणार आहे.

हा मराठी विश्वकोश सर्वविषयसंग्राहक स्वरूपाचा आहे. यामध्ये जवळ जवळ १०० विषयोपविषयांच्या अंगोपांगांची सर्वांगीण; पण सारभूत माहिती देणारे लहान-मोठे लेख योजिले

आहेत. त्यात नैसर्गिक विज्ञाने, तंत्रविद्या, मानव्यविद्या या प्रमुख वर्गवारीखाली या सर्व विषयांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तंत्रविद्या व विज्ञान या विषयांतर्गत खालील विषयांतील माहिती देण्यात आली आहे. प्रामुख्याने १) अभियांत्रिकी अणुकेंद्रीय, २) अभियांत्रिकी नाविक, ३) अभियांत्रिकी यांत्रिक, रासायनिक, विद्युत, वैमानिकी, संदेशवहन, स्थापत्य, स्वयंचलन आदींवरील माहिती असून, विज्ञानात अवकाशविज्ञान, उद्योग व व्यापार, कीटकविज्ञान, कृषिविज्ञान, गणितशास्त्र, धातुविज्ञान, प्राणिविज्ञान, भूविज्ञान, भौतिकी, मत्स्योद्योग, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, वनस्पतीविज्ञान, वातावरणविज्ञान, वैद्यक (मानवी, पशू), वैज्ञानिक संस्था, शरीरक्रियाविज्ञान, संग्रहालये, सांख्यिकी व सूक्ष्मजीवविज्ञान आदींवरील लिखाण समाविष्ट आहे.

## मानव विद्या

मानव विद्येखाली येणाऱ्या विषयांत अर्थशास्त्र, अलंकरण, वेश इत्यादी इतिहास, कनिष्ठ कला व कारागिरी, ललित कला, खेळ व मनोरंजन, ग्रंथालयशास्त्र, धर्म, पुरातत्त्व, भाषाशास्त्र, लिपिप्रकार, विधी, वृत्तपत्रविद्या, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, साहित्यप्रकार व साहित्यसमीक्षा व भारतीय भाषा व साहित्ये आदींचा समावेश करण्यात आलेला असून, संबंधित विषयांवरील तज्ज्ञांकडून लिखाण होत आहे.

### खास मुद्रणालय

विश्वकोशाची रचना मराठी वर्णानुसार अकारविल्हे केलेली आहे. पूरक संदर्भ तसेच संदर्भग्रंथ देऊन, प्रत्येक नोंद ही परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. विश्वकोशाचे संपादनकार्य हे चार प्रमुख शाखांमध्ये विभागण्यात आलेले आहे. विज्ञान व तंत्रविज्ञानशाखा, मानव्यशास्त्र, कलाशाखा आणि प्रशासनशाखा यांतून सध्या चाळीस संपादकीय कार्यकर्ते काम करीत असतात. काही शाखांतील तज्ज्ञ अभ्यागत संपादक म्हणून काम करीत असतात. विश्वकोशाचे ग्रंथालय अद्ययावत असून त्यात तीस हजारांहून अधिक ग्रंथांचा समावेश आहे. विश्वकोशाच्या मुद्रणासाठी वाई येथेच शासकीय मुद्रणालय स्थापन करण्यात आले आहे.

या मराठी विश्वकोशाचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यात नैसर्गिक विज्ञाने आणि तंत्रविज्ञ यांना मानव्य विद्यांच्या बरोबरीनेच स्थान दिले आहे. एकूण सतरा हजार पृष्ठांच्या लेखनामध्ये साडेआठ हजार पृष्ठे विज्ञान व तंत्रविषयांना व तेवढीच पृष्ठे मानव्य विषयांना विभागून दिलेली आहेत. यामुळे मराठी माणसाला वैज्ञानिकी ज्ञानाचा परिचय करून देण्याचे कार्य होणार आहे. विदेशी विश्वकोशांमध्ये भारतीय भाषा, साहित्य, कला, लेखक, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक प्रगती त्याचप्रमाणे इतर सांस्कृतिक अंगोपांगे आदींची माहिती त्रोटक असते. मराठी विश्वकोशाद्वारे आधुनिक भारतीय भाषांतील लेखक तसेच कलावंत, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक प्रगती व इतर सांस्कृतिक विषय यासंबंधी पुरेशी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे त्यास भारतीय विश्वकोशाचे स्वरूप येणार आहे.

## दोन हजारांहून अधिक तज्ज्ञ

मराठी विश्वकोशाच्या प्रयत्नांत सुमारे दोन हजारांहून अधिक विविध विषयांचे तज्ज्ञ सहभागी झालेले आहेत. विविध आवश्यक अशी चित्रे, आकृत्या, तक्ते, सूत्रे, समीकरणे आदींचाही समावेश यात करण्यात आलेला असून, त्यासंबंधीचे विविध ठिकाणचे कलाकारही या कार्यात सहभागी झालेले आहेत. त्याचप्रमाणे चित्रे व छायाचित्रांसाठी विविध संस्था व व्यक्ती, कलासंग्रहालये व कलासंस्थांचे सहकार्य घ्यावे लागलेले आहे.

सुमारे ४५ हजार इंग्रजी - मराठी व मराठी-इंग्रजी पारिभाषिक संज्ञांचा १८ वा खंड १९७३ मध्येच प्रसिद्ध करण्यात आला आहे. मराठी विश्वकोशाची उपयुक्तता खास करून उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थिवर्ग, शिक्षित प्रौढ व शिक्षक, अध्यापक, अभ्यासक आदींना फार मोलाची ठरणार आहे.

मराठी प्रज्ञा व प्रतिभा यांचे, महाराष्ट्राच्या बौद्धिक संस्कृतीचे प्रतिबिंब मराठी विश्वकोशात उमटणार आहे. इंग्रजीचे कवाड समाजाच्या दालनात दिवसेंदिवस बंद होत असताना मराठी विश्वकोश जागतिक ज्ञानकोशावर उघडणारी एक खिडकी ठरणार आहे.

**(केसरी, २३ जुलै, १९७७)**

○○○

७३

# साहित्य संमेलनामुळे लोकशिक्षणाचे कार्य

मुलाखतकार - **अनिल जोशी**

पुण्यात ५२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ज्या प्रकारे पार पडले व त्या संमेलनाच्या अखेरच्या दिवशी जो प्रकार घडला, तो मराठी रसिकांच्या मनात विविध विचार निर्माण करणारा असा ठरला. अखेरच्या दिवशी ज्या दंगली व निषेधाचे प्रकार घडले, त्याबद्दल एक ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक या नात्याने तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांना काय वाटते, हे जाणून घेण्यासाठी त्यांची दै. 'केसरी'साठी नुकतीच मुलाखत घेतली. त्या वेळी ते म्हणाले, "या प्रकारांबद्दल काहीच न बोलणे हे अधिक बरे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनास हा एक कलंक लागला आहे. पुण्यासारख्या शहरात असे घडणे म्हणजे पुण्याच्या सांस्कृतिक महिम्यास कमीपणा आणणारे असे हे प्रकार आहेत. हा दंगा म्हणजे लोकशाही जीवनपद्धतीस लागलेला कलंक आहे. एक प्रकारचे दंडुकेशाहीचे हे आक्रमण ठरू पाहत आहे. संमेलनामध्ये गोंधळ झाला व संमेलन अभूतपूर्व गोंधळात समाप्त झाल्याने मी वाचलो. खरे सांगायचे तर नशिबाने मी त्यातून वाचलो. मी त्या वेळी उपस्थित असतो तर त्या अक्राळविक्राळ विश्वरूप दर्शनाने मी चकित झालो असतो.''

**प्रश्न : "या संमेलनामध्ये अनेक गोष्टी गाजल्या. ख्यातनाम विदुषी श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या भाषणाकडे व या संमेलनातील त्यांच्या एकूण वागण्याकडे साऱ्या मराठी रसिकांचे लक्ष लागलेले होते. आपण या संमेलनामध्ये सहभागी झाला होता. संमेलनामध्ये दुर्गाबाई भागवत यांचे भाषण व त्यांचे वर्तन याविषयी आपणास काय वाटले?'' माझा प्रश्न .**

**आरतीची आठवण**

**उत्तर :** "विदुषी श्रीमती दुर्गाबाई भागवत यांचे या प्रसंगीचे एकूण वर्तन पाहून आपल्या महापूजेतील 'दुर्गे दुर्घटभारी' या आरतीची आठवण झाली. वास्तविक या संमेलनामध्ये दुर्गाबाईच्या निषेधाचा किंवा खेदप्रदर्शनाचा ठराव आणण्याची गरज नव्हती. त्या कर्तबगार

महिला आहेत. महाराष्ट्रातील महिलासमाजास त्या भूषणभूत आहेत. ऋषिमुनींमध्ये पण दुर्वासमुनी पूजनीय ठरतातच, हे विसरता येणार नाही. त्यांचे विचार प्रखर; परंतु त्याचप्रमाणे ते पथप्रदर्शक होते ही गोष्ट विसरून चालणार नाही.''

''मराठी साहित्य संमेलन हे राजकारणामध्ये अनेक वेळा हिरीरीने भाग घेते. राजकारणात जशा नकारात्मक बाजू आहेत, तशा विधायकही बाजू आहेत. भारताचे राजकारण लोकशाही पद्धतीने जेव्हा नीट चालते, तेव्हा लोकशाहीने निवडलेला प्रतिनिधी सत्ताधारी होतो. अशा सत्ताधाऱ्यांबद्दलचा दुर्गाबाईंचा दृष्टिकोन हा सहानुभूतीचा असला पाहिजे. साहित्य संमेलनाशी त्याचे अनेक तऱ्हेचे महत्तत्त्व जाणून ते कृतीच्या रूपाने दाखवावयास पाहिजे. राजकारणामध्ये नकारात्मक व निषेधात्मक भाग घ्यायचा, महत्त्वाच्या विधायक मागण्या मांडायच्या आणि त्या मागण्यांची पूर्ती करणाऱ्या सत्ताधाऱ्यांबद्दल मनामध्ये आकस ठेवायचा हे नैतिकदृष्ट्या योग्य की अयोग्य हा समस्येचा विषय होतो. शासनमुक्त समाजाचा ध्येयवाद ज्यांना आहे त्यांनी आपले वर्तन सत्ताधाऱ्यांशी कसे करावे याबद्दल श्रीमती दुर्गाबाईंचे मत मार्गदर्शक ठरते. कारण शासनसंस्थाच दमनसंस्था असल्याने ती मानवी समाजजीवनातील एक गाभा आहे. ही शासनमुक्त ध्येयवादापाठीमागची भूमिका आहे.''

**प्रश्न : ''साहित्य संमेलने ही केवळ साहित्यिकांसाठीच भरविली जातात. त्यामध्ये सामान्यजनांना स्थान असू नये अशा प्रकारचे मत या साहित्य संमेलनात व्यक्त करण्यात आले. हे मत आपणास कितपत योग्य वाटते?'' मी.**

**उत्तर :** यात वाद कसला? वास्तविक या दृष्टिकोनाबद्दल वाद असण्याचे कारण नाही; परंतु मराठी साहित्य संमेलनाची जी परंपरा आहे, त्या परंपरेस सोडून केलेली ही सूचना आहे. साहित्य संमेलनाच्या कुंभमेळयात वाईट काय आहे? कुंभमेळा हा एक महत्त्वाचे सामाजिक कार्य करीत असतो. हे कार्य फार मौलिक स्वरूपाचे आहे. सामान्य माणसाचे मत हल्लीच्या परिस्थितीत राजकारणाबाहेरच्या सांस्कृतिक कार्याकडे वेधून घेते. सांस्कृतिक स्तरावरची सामाजिक जाणीव निर्माण करते. राजकारणाबाहेरही काही उच्चतर मूल्ये आहेत यांचा प्रत्यय येतो. केवळ साहित्यिकांचे संमेलन भरविणे हे साहित्याच्या प्रगतीच्या दृष्टीने मोलाचे ठरेल यात शंका नाही. तर्कशास्त्राच्या भाषेत बोलायचे तर मराठी साहित्य संमेलन व साहित्यिक संमेलन यांच्यामध्ये अंतर्विरोध आहे असे कोणासही आणि कसेही सिद्ध करता येणार नाही. सध्याचे मराठी साहित्य संमेलन लोकशिक्षणाचे कार्य करीत आहे. म्हणून त्याचे आहे तेच स्वरूप कायम ठेवणे गरजेचे आहे.

**प्रश्न : ''बावन्नाव्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष निवडीच्या वेळी जो प्रकार घडला, त्यामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने आपणास काय सुचवावेसे वाटते?''**

''सध्याच्या अध्यक्ष निवडपद्धतीत घटनात्मक उणीव आहे. ती भरून काढावी लागेल. किमान एक वर्ष जो कोणी महामंडळाचा अगर महामंडळाशी संलग्न स्थानिक घटक संस्थांचा

सदस्य असेल, त्यासच मतदानाचा अधिकार दिल्यास जे या वेळी घडले त्यास पायबंद बसेल."

**हे चांगले नाही!**

साहित्यिक व साहित्यिक संस्थांनी शासकीय अनुदान व पारितोषिके घेऊ नयेत, असे मत गेले वर्षभर सर्वत्र चर्चिले जात आहे. परवाही त्याचा उल्लेख झाला. या मताबद्दलची स्वतःची भूमिका स्पष्ट करताना तर्कतीर्थ जोशी म्हणाले, "ज्यांनी ही सूचना केली त्यांनी शासकीय अनुदानाने चालणाऱ्या संस्था, प्रत्यक्ष शासनानेच चालविलेल्या संस्था यामध्ये जाऊन अनेक वर्षे कामे केली आहेत. साहित्य अकादमीसारख्या संस्थेकडून पारितोषिके मिळविली आहेत. आंतरराष्ट्रीय संस्थांचे नोकर म्हणून चांगल्या वेतनावर कामे केलेली आहेत. त्यातली अशी एक संस्था की जिला अमेरिकन सी. आय. ए. ची मदत मिळत होती. या संस्थांमध्ये कामे केलेली ही मंडळी. त्यांची कामे पण तितक्याच मोलाची होती. त्यामध्ये कोणताही भ्रष्टाचार नव्हता, म्हणून मी त्यांना दोष देत नाही; परंतु त्यांनी आता जी भूमिका घेतली आहे ती भूमिका प्रामाणिकपणे विचार बदलला म्हणूनच घेतली. त्यांचा विचार हा नैतिकदृष्ट्या शुद्ध आहे, असे मानण्याचे कारण नाही. एकीकडे म्हणायचे शासनाने, राज्याने अमुक अमुक चांगल्या गोष्टी कराव्यात आणि मग त्यातून विद्वान, साहित्यिक, कलाकार, अन्य क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्ती यांचे सहकार्य घेतले किंवा त्यांना पारितोषिके दिली तर त्याला नावे ठेवायची, नाके मुरडायची आणि तत्त्वनिष्ठेचा आव आणून आपल्या पावित्र्याची शेखी मिरवायची हे चांगले दिसत नाही.''

पुण्याच्या साहित्य संमेलनात वादंग निर्माण करणाऱ्या श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या कवितेचा उल्लेख करताना श्री. जोशी म्हणाले, "या साहित्य संमेलनामध्ये महाराष्ट्राचे वाल्मीकी म्हणून श्री. ग. दि. माडगूळकरांचा निर्देश झाला. त्या वेळी मी फार आनंदित झालो. माडगूळकरांच्या कवितेने महाराष्ट्राच्या सामान्य जनास नैतिक जीवनाच्या सौंदर्याचा वारंवार साक्षात्कार घडवून दिला आहे आणि दुर्गाबाईंनी जी कविता वाचली तिचा कालसंदर्भ लक्षात घेण्याची गरज नाही. ती कविता भ्रष्टाचार माजविणाऱ्या शासनाच्या कोणत्याही कालाचा अर्थ विदारक रीतीने सांगून जाते."

"मी आजपर्यंत अनेक साहित्य संमेलने पाहिली, प्रत्यक्ष आयोजित केली, अध्यक्षस्थान भूषविले. पुण्याच्या साहित्य संमेलनाच्या संयोजनात अधिक समाधान देणारी बाब ठरली ती म्हणजे असंख्य ग्रंथांचे प्रदर्शन ! मराठीमध्ये असंख्य ग्रंथांची निर्मिती हे या संमेलनाचे मुख्य कार्य ठरते. कविता, लघुकथा, कादंबरी आदी ललित साहित्य प्रकारांची निर्मिती महत्त्वाची आहेच; पण मराठी माणसाचे कर्तृत्व, सामाजिकशास्त्रे, तंत्रविज्ञान या ग्रंथप्रदर्शनातूच वाढू शकेल. कोशकारांचा सन्मान ही पुणे संमेलनाची वेगळी महत्त्वाची बाजू आहे, भाषासमृद्धी आणि तिचा विस्तार व अर्थपूर्णता या गोष्टी कोशांवरच अवलंबून आहेत. या संमेलनामध्ये अनेक प्रकारच्या ज्ञानकोशांचे संपादक उपस्थित राहिले ही संमेलनाच्या दृष्टीने अत्यंत भूषणावह बाब आहे.''

**(केसरी, २८ नोव्हेंबर, १९७७)**

OOO

७४

# विश्वकोश कार्य : एक कटाक्ष

मुलाखतकार - **विद्यार्थी, द्रविड हायस्कूल, वाई**

### पद्मभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत

आमच्या शाळेतील इयत्ता ९ अ मधील विद्यार्थी कुमार जमदाडे, गोगटे, घोटवडेकर, देवकुळे, जोशी, महाशब्दे, बापट, महेंद्र कुलकर्णी व श्रीराम कुलकर्णी यांनी घेतलेली मुलाखत

ही मुलाखत होणे अगोदर विश्वकोशाचे प्रमुख व्यवस्थापक श्री. रामभाऊ कोल्हटकर यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण विश्वकोशातील प्रत्यक्ष कामकाजाचे व बहुमोल ग्रंथसंपदेचे दर्शन घडविले. ही ग्रंथसंपदा ४०,००० चे आसपास आहे. उत्तम छपाईबद्दल विश्वकोशामधील सहाव्या व आठव्या खंडास भारत सरकारचे बक्षीस मिळाले आहे.

विद्यार्थी- नमस्कार! संपूर्ण महाराष्ट्रभर एक थोर विद्वान म्हणून आपली प्रसिद्धी आहे. या विश्वकोशाच्या उभारणीमुळे त्यात आणखी दुधात साखर पडल्याप्रमाणे झाले आहे. आम्ही द्रविड हायस्कूलमधील विद्यार्थी आपली मुलाखत घेणेसाठी आलो आहोत, तरी आपण आपला अमूल्य वेळ मुलाखतीसांठी द्यावा, अशी विनंती आहे.

शास्त्रीजी-मुलांनो! विचारा तुम्हारा काय विचारावयाचे आहे ते!

**प्रश्न- ह्या विश्वकोशाच्या निर्मितीची प्रेरणा आपले मनात कशी निर्माण झाली? त्या कामी प्राज्ञपाठशाळेचा आपणास कितीसा उपयोग झाला?**

**उत्तर-** प्राज्ञपाठशाळेध्ये धर्मकोश व नियमांचा कोश हे प्रकल्प विश्वकोशांचे अगोदर सुरू होते. म्हणजे सर्व प्रकारच्या ज्ञानाचा संग्रह करणेची कल्पना प्राज्ञपाठशाळेच्या कार्यकर्त्यांमध्ये पहिल्यापासून होती. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची १९६० अखेर स्थापना झाल्यावर मराठीमध्ये आधुनिक ज्ञानाचा कोश व्हावा म्हणजे, विश्वकोश हा विचार माझ्या मनात प्रथम येऊ लागला व १९६२ साली विश्वकोश निर्मितीस प्रारंभ झाला. महाराष्ट्राचे त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचे भरपूर साहाय्य झाले.

**प्रश्न- धर्मकोशाच्या प्रकाशनातून 'राष्ट्रीय उत्कर्षाचा' कोणता उद्देश दृष्टीसमोर ठेवला आहे?**

**उत्तर :** हिंदुधर्माची तपशीलवार एकत्रित केलेली माहिती भारतीय संस्कृतीच्या विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून धर्मकोश रचला जात आहे. हिंदुधर्म हा भारतीय संस्कृतीतील केन्द्रभूत धर्म आहे. त्याची माहिती प्रत्येक भारतीयास व्हावयास पाहिजे असा राष्ट्रीय उद्देश धर्मकोशाच्या मुळाशी आहे.

**प्रश्न- विश्वकोशाचे इमारतीत दैनंदिन कार्य हे प्रत्यक्षात कसे चालते याविषयी जरा माहिती मिळेल काय?**

**उत्तर :** सकाळी साडेदहा वाजता अभ्यागत संपादक व इतर कार्यकर्ता नियमाने उपस्थित राहतात. सायंकाळी साडेपाचपर्यंत काम चालते. महाराष्ट्रातील व भारतातील अनेक विद्वानांकडून त्यांच्या त्यांच्या विषयावर लेख मागविले जातात. ते लेख विश्वकोशाच्या ठरलेल्या पद्धतीप्रमाणे आहेत की नाही हे प्रथम तपासले जाते. दुसऱ्या त्याच विषयांच्या तज्ज्ञाकडून त्या लेखांची समीक्षा केली जाते. काही लेख येथील विश्वकोश कार्यालयातच विद्वान लेखकांकडून लिहून तयार केले जातात. फार मोठे ग्रंथालय या ठिकाणी आहे. इंग्रजीमध्ये प्रसिद्ध झालेले शेकडो विश्वकोश आहेत. त्या त्या विषयातले उत्कृष्ट ग्रंथही आहेत. या ग्रंथांशी तुलना करून विश्वकोशात अनेक टंकलिखित प्रती तयार होतात, ठरलेल्या मर्यादेत शब्दसंख्या आहे की नाही हे पाहिले जाते, जवळच शासकीय छापखाना आहे. त्या छापखान्यात विश्वकोशाचे खंड छापले जातात. बिनचूक छपाई व्हावी म्हणून प्रयत्न होतो. निरनिराळ्या लेखकांना निर्णय विषयाची गरज असते. ती चित्रे कार्यालयातील चित्रकार तयार करतात. ही चित्रे, रेखाकृत्या, नकाशे विश्वकोशाच्या मजकुराशेजारी छापली जातात. विश्वकोशात चाळीस हजारपेक्षा जास्त ग्रंथ आहेत. ज्ञानाच्या २५० पेक्षा जास्त शाखा आहेत. १५० विश्वकोश आहेत.

**प्रश्न : विश्वकोश कार्याचे व्यापक स्वरूप, त्यास लागणारा कालखंड, आर्थिक तरतूद याविषयी माहिती मिळू शकेल काय?**

विश्वकोश उभारणे हा महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र शासन विश्वकोशाची आर्थिक तरतूद करते. त्याला ८० लाख ते सव्वा कोटी रुपये खर्च येईल. मराठी विश्वकोशाचे एकोणवीस खंड आहेत. आतापर्यंत एकूण आठ खंड प्रसिद्ध झाले आहेत. सतरा खंड पूर्ण होण्यास सहा वर्षे व उरलेले तीन परिशिष्ट खंड पूर्ण होण्यास दोन वर्षे म्हणजे एकूण आठ वर्षात हे वीस खंड पूर्ण होतील.

**प्रश्न : अत्याधुनिक विज्ञानाची अपेक्षा असलेल्या समाजाचे शंका साधारण आणि आपली प्राचीन भारतीय संस्कृती यांचा समन्वय प्रसिद्ध झालेल्या ग्रंथातून कसा साधला आहे?**

वृद्धीची वाढ होईल अशा शास्त्रांचे अध्ययन नित्य करावे असा आदेश धर्मशास्त्राने दिला आहे. ज्ञान हे अनंत आहे असे वेदांमध्ये म्हटले आहे. भारतीय मनुष्याने आपल्या संस्कृतीची प्रेरणा घेऊन नवे नवे आधुनिक ज्ञान संपादन करावे, हा समन्वय आहे.

कुमार श्रीराम कुलकर्णी याने माननीय तर्कतीर्थांचे आभार मानून माननीय शालाप्रमुखांच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ अर्पण केला.

**(वैनतेय वार्षिक, द्रविड हायस्कूल, वाई, १९८१)**

ooo

७५

# प्राचीन भारतीय ग्रंथालये

मुलाखतकार - **अनिल जोशी**

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय भाग घेतल्याबद्दल १९३० व १९३२ साली त्यांना कारावास भोगावा लागला.

भारतामध्ये लेखनकला ही केव्हा आली याच्याबद्दल निश्चित सांगणे कठीण आहे; परंतु काहींच्या मते ऋग्वेदकालापासून म्हणजे इ. स. पूर्व अडीच-तीन हजार वर्षे या सुमारापासून लेखनकला आली असावी. याचे कारण ऋग्वेदामध्ये उल्लेख येतो अक्षर या शब्दाचा. अक्षर हा शब्द उच्चाराचा निर्देश करणारा नाही, हा लेखनाचा निर्देश करतो. म्हणजे जे पाझरत नाही, पाझरून पुसून जात नाही, क्षरण पावत नाही ते अक्षर आणि याचा उल्लेख ऋग्वेदात आलेला आहे. उदा. ऋचो अक्षरे. म्हणजे ऋचेच्या अक्षरामध्ये वर्ण हा दुसरा शब्द वेदांमध्ये येतो. वर्ण म्हणजे अ, आ, इ, ई अशा तऱ्हेची अक्षरे होत. ही जास्तीत जास्त त्रेसष्ठ किंवा चौसष्ठ मानलेली आहेत. यांना वर्ण शब्द का आला, कारण ती रंगाने लिहिली जातात; वर्ण शब्दाचा अर्थ रंग असा आहे; शाई हा रंगच आहे आणि इतर रंगांनीही अक्षर काढत असतात. वर्ण, अक्षर हे शब्द वेदांमध्ये आढळतात. यावरून असे म्हणावे लागते की, वैदिक कालापासून लेखनकला अस्तित्वात आली असावी. परंतु निश्चितपणे असे सांगता येते, की इ. स. पूर्व सुमारे पाचशेच्या सुमाराला पाणिनीच्याकाळी लेखनकला होती. लिपी आणि लिपिकार हे शब्द पाणिनीने वापरले आहेत. शंका का येते वेदकालामध्ये ग्रंथलेखनकला होती की नाही याबद्दल? तर आतापर्यंत वेद हा पठण करायचा, पाठ करायचा आणि चांगल्या रीतीने बिनचूक पाठच करायचा. नुसता वाचायचा नाही, ही पद्धती गेली पाच हजार वर्षांची आहे. वेद हे पाठच केले पाहिजेत आणि पाठ करण्यातच पुण्य आहे ही जी जाणीव होती, त्यामुळे पुष्कळांना असे वाटते की, लेखनकला ही वेदकालांत नसावी, म्हणून पठणाला फार महत्त्व आले. असावे. काही असो; पण वेदकाल जो मानला तो पाच हजार वर्षांपूर्वीच्या सुमाराचा. त्या काळामध्ये जगामध्ये प्रथम लेखन आले होते इजिप्शिअन संस्कृतीमध्ये; असीरिअन बॉबिलॉनिअन संस्कृतीमध्ये लेखन आले होते. त्यांचे

इष्टिकालेख सापडतात. जाड कागदासारखे पपायरस गवत होते त्याच्यावर लेखन करत होते, कातड्यावर करत होते. पोस्ट म्हणजे कातडे. विशेषतः हरणाचे किंवा लहान वासराचे कातडे. त्याच्यावर लेखन करत होते आणि धातूंवरही करत असत. इष्टिकालेख म्हणजे चांगली मऊ माती भिजवून त्याच्या विटा करायच्या, त्याच्यावर अक्षरे कोरायची आणि ती भाजून काढायची. मोठमोठ्या लायब्रऱ्या सापडल्या त्या काळाच्या. असूरबनीपाल किंवा असूरअवनीपाल हा जो बॅबिलॉनचा मोठा सम्राट होऊन गेला. त्याची मोठी इष्टिकालेखांची लायब्ररी सापडली आहे. त्या काळात भारताशी त्या जगाचा संबंध होता. बॅबिलॉनिअनांशी दळणवळण होते. त्या असूर संस्कृतीचे दळणवळण भारताशी होते. भारतात सिंधुसंस्कृती होती. तिच्यामध्ये आपल्याला असे म्हणता येते, की अक्षरलेखन होते. अजून ते वाचता आले नाही. इजिप्तच्या लिप्या वाचता येतात. किंवा बॅबिलॉन, असीरिया ह्या पाच हजार किंवा चार हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृतींतील लेखन वाचता येऊ लागले आहे. त्यासाठी फार विचार करून, फार श्रम करून शोध करावा लागला. तसा काही सिंधुसंस्कृतीतल्या लिपीचा शोध लागला नाही. भारतामध्ये लेखन वेदकाळामध्येसुद्धा होते याचे अप्रत्यक्ष पुरावे सापडतात. भारताचा त्यावेळच्या प्राचीन सुसंस्कृत जगाशी संबंध होता. उदा. फिजिशियन्स त्यांचा पणी असा उल्लेख ऋग्वेदामध्ये आहे. त्यांना लेखनकला येत होती. पण प्रत्यक्ष ग्रंथलेखनास निश्चितपणे, निर्विवादपणे पाणिनीकाली सुरुवात झाली. परंतु आता जे सापडते, ते, सिंधु संस्कृतीतील लेखन. पण ते वाचता येत नाही. अशोकाचे स्तंभ वाचता येतात. त्याची ब्राह्मी लिपी समजते. ते शिलालेख अशोकाच्या साम्राज्यामधील लोकांनी ते आदेश वाचावेत अन् त्याच्यावर वाईट परिणाम कसलाही होऊ नये, नष्ट होऊ नयेत, म्हणून ते पक्के शिलालेख केले. ते अक्षर आहेत. ते पुसून जाऊ शकत नाहीत अशा रीतीने केलेले आहेत.

पुस्तक हा शब्द साधारणपणे पाणिनीकाली आलेला आहे. परंतु वेदामध्ये ग्रथित शब्द येतो. 'ग्रथ' धातू आहे. ग्रथ म्हणजे एकत्र जुळविणे. एकत्र व्यवस्थित रीतीने एकमेकांपासून सुटूनतुटून पडणार नाही अशा रीतीने बांधणे. म्हणजे ग्रंथ हा शब्द आहे, याचा अर्थ गाठ पक्के एकत्र बांधणे असा या धातूचा अर्थ आहे. ग्रंथ शब्द फार जुना आहे. पुस्तक शब्द बहुतेक बाहेरच्या जगातून आला असावा, कारण पोस्ट शब्दाचा अर्थ कातडे असाच आहे, कातड्यावरचे लेख सापडले आहेत; प्राचीन काळचे, तीन हजार, चार हजार वर्षांपूर्वीचे, कातड्यावरचे ग्रंथ सापडले आहेत. म्हणून पुस्तक शब्द हा कातड्यावरचे लेखन आणि कातड्यावरचे पुस्तक या अर्थी आलेला असावा असे पुष्कळांचे मत आहे.

पुस्तक हा शब्द मुळात संस्कृत नाही. तो संस्कृतमध्ये वारंवार बाहेरचे जे शब्द घेतले गेले त्यांच्यातला आहे. कारण बिनआर्य भाषेतील शब्दही संस्कृतमध्ये घेतले आहेत. बिनआर्य म्हणजे म्लेच्छ म्हणतात. त्यातले शब्द ते घेतले असता याला स्पष्ट पुरावा आहे.

पुस्तक लेखनालये होती आणि विद्यापीठे होती. प्राचीन काळी पाणिनीच्याही अगोदर इ.

स. पाचव्या-सहाव्या शतकामध्ये तक्षशिलेला विद्यापीठ होते आणि विद्यापीठामध्ये विविध विद्या शिकत; नुसती वेदविद्या नव्हे. आयुर्वेद, वृक्षविद्या, युद्धविद्या, विविध कला, चित्रकला, मूर्तिकला इ. सगळ्या विद्यांचे शिक्षण त्या तक्षशिला विद्यापीठामध्ये होत होते. तक्षशिला विद्यापीठाचा उल्लेख फार आदरपूर्वक पाली ग्रंथांमध्ये केलेला आहे. बुद्धाच्या पूर्वी आणि बुद्धाच्या काळी लोक तिकडे शिकायला जात होते. तक्षशिला वायव्य सरहद्द प्रांतात होती आणि वायव्य सरहद्द प्रांताच्या पलीकडे अफगाणिस्तान आहे. अफगाणिस्तानही तेव्हा आर्यदेशच होता. उपनिषदामध्ये त्याचा गांधार असा उल्लेख आहे आणि गांधारामध्ये त्या बाजूलाही ब्राह्मणी वेदविद्या होती. जिथे विद्यापीठ असते तेथे ग्रंथालय असलेच पाहिजे. ग्रंथलेखन हे कष्टाचे काम होते, जबाबदारीचे काम होते. ग्रंथलेखन हा व्यवसाय ठरलेला होता. त्याचे स्थान मोठे होते, समाजामध्ये विद्वानही लेखक असत. काही विद्वान संतसुद्धा बिनचूक लिहीत असत. 'यादृशं लिखितं दृष्टं तादृशं लिखितं मया। शुद्ध अशुद्ध वा मम दोषी न विद्यते।' लेखक म्हणत होता की, जरी शुद्ध किंवा अशुद्ध तुम्हाला लिहिलेले सापडले तरी तो माझा दोष नाही. मी जशा तऱ्हेचे पाहिले तशा तऱ्हेचे लिहिलेले आहे. तर जसे पाहिले तसे लिहिणे ही एक व्यवस्थित व्यवसायाची बाजू होती. या व्यवसायाचे शिक्षण फार प्राचीनकाळी घेत असत आणि लेखक मोबदला देऊन ठेवत असत. राजदरबारामध्ये, न्यायालयामध्ये लेखकांची गरजच होती. कारण लेख्य म्हणजे पुरावे तयार व्हायचे आणि लेख्यांच्याद्वाराने आज्ञापत्रे निघायची. लहान-मोठ्या राजांना ग्रंथालयांची गरज असे. म्हणून प्राचीनकाळी ग्रंथालयाची स्थाने म्हणजे मोठ्या पंडितांची विद्यापीठे होती. तक्षशिलेचे अत्यंत मोठे प्रसिद्ध विद्यापीठ म्हणजे नालंदा. ते बिहारमध्ये होते. बंगालमध्ये अनेक विद्यापीठे झाली. ती विद्यापीठांची परंपरा आतापर्यंत चालू आहे. काशी म्हणजे वाराणसी. हे विद्यापीठ होते व अजून ते तसे आहे. काशी हे प्रदेशनाव आहे. हल्ली काशी म्हटल्यानंतर आपण क्षेत्र मानतो. पण काशी हे प्रदेश नाव होते आणि त्या नावाचे लोक होते. बनारस हा वाराणसी शब्दाचा अपभ्रंश आहे. भारतातील मोठमोठी क्षेत्र ही विद्यापीठे होती. तिथे पुस्तकालये असत. पुस्तकालयांना किंवा ग्रंथालयांना प्राचीन शिलालेखांमध्ये सरस्वती भांडार असे म्हणत असत. सरस्वती भांडार, विद्यागार विद्येचे महत्त्वाचे असे स्थान, आगार म्हणजे घर, स्थान, ही विद्यापीठांमध्ये विद्यागारे, सरस्वती भांडारे असत आणि त्याच्या निमित्ताने हा ग्रंथलेखकांचा मोठा वर्ग या देशामध्ये निर्माण झाला. वाईसारख्या ठिकाणी सुद्धा फार चांगले ग्रंथलेखक असत. वाईमध्ये प्राज्ञपाठशाळेला म्हणजे आमच्या गुरूंना जवळजवळ ६ हजार उत्तम लिखित ग्रंथ मिळालेले आहेत. प्राज्ञपाठशाळेत बारा हजार हस्तलिखित पुस्तकांचा संग्रह आहे. त्यांचा मोठा कॅटलॉग आम्ही प्रसिद्ध केला आहे. येथे अनेक दुर्मीळ संस्कृत ग्रंथ आहेत. पुस्तके ही दुर्मीळ असायची छापखान्याच्या कलेच्या अभावी.

प्रथम छापखान्याची कला ही चीनमध्ये आली. सातव्या आणि आठव्या शतकात युरोपमध्ये ती गेली. पण युरोपमध्ये त्याचे अधिक संशोधन झाले. पंधराव्या शतकामध्ये एकेका अक्षराचे

टाईप्स करायचे, हे टाईप करून उत्तम पुस्तके भराभर छापणे ही कला निर्माण झाली. पंधराव्या शतकानंतर सोळाव्या शतकाच्या मध्यंतरी ती युरोपमधील छापखान्यांची कला ही गोव्यांकडे आली. भारतातला पहिला छापखाना गोव्यामध्ये निघालेला आहे. ख्रिस्तपुराण रोमन लिपीमध्ये छापले गेले.

मुख्यतः ग्रंथसंग्रहांचा विद्येकरिता उपयोग करणे ही कल्पना सरस्वती भांडार या शब्दावरून येते. तुमच्या लक्षात येईल की, प्राचीन काळच्या शिलालेखांमध्ये ग्रंथालयाचा उल्लेख सरस्वतीभांडार हा आहे. म्हणून आपल्या लक्षात येईल की, काशीला म्हणजे वाराणसीला जे हस्तलिखित पोथ्यांचे मोठे भांडार आहे त्याला सरस्वतीभवन हे नाव आहे. ग्रंथालये मोगल कालामध्ये मोगल बादशहा ठेवत असत. त्यांना किताबखाना म्हणत असत. खाना म्हणजे संग्रह, किताब म्हणजे पुस्तक. मोगल बादशहा जेव्हा निरनिराळ्या प्रदेशांवर स्वाऱ्या करत तेव्हा तेथील पुस्तकेही लुटून आणत. अकबराला ही फार नाद होता. ती पुस्तके लुटून आणत असे. त्याने ज्यांच्यावर विजय मिळवायचा तिथे धन, संपत्ती वगैरे तर लुटायचीच - युद्धामधली लूट ही सगळीकडेच अपहार मानला जात नाही. त्याप्रमाणे पुस्तकेसुद्धा स्वतः लुटून आणत असे. मोगल बादशहांना ग्रंथांची फार हौस होती. त्यांची सगळ्याच राजांना जरूरच असते. निरनिराळ्या कला आणि विद्या या आपल्या प्रदेशामध्ये लोकांना शिकवाव्या, संपत्ती आणि संस्कृती वाढवावी ही सगळ्याच थोर राजांची इच्छा असे. मुसलमान राजा असेल तर त्यांची मुसलमान संस्कृती वाढावी हीच इच्छा असे.

इ. स. च्या चौथ्या शतकामध्ये एक लक्षात्मक महाभारताचा उल्लेख एका शिलालेखामध्ये मिळतो. एक लक्षात्मक महाभारत पाठ करता येत नव्हते. पाठ करत होते वेद. ऋग्वेदाचे जास्तीत जास्त दहा हजार श्लोक आहेत. अठरा पुराणं आहेत. त्यांची अठरा उपपुराणे आहेत. बृहत्कथा म्हणून मोठा कथासंग्रह पैठणला सातवाहन राजाच्या पदरी असलेल्या महापंडिताने लिहिला, त्याचेच लाखापेक्षा अधिक श्लोक होते. म्हणतात, सात लाख श्लोक होते. ही जरी साधा'रणतः अतिशयोक्ती असली तरी लाख, दीड लाख, दोन लाख एकाच ग्रंथाचे श्लोक म्हणजे इतक्या ओळी असणे हे काय पाठांतराने जिवंत ठेवणे शक्य आहे? ते लेखनानेच शक्य झाले. कारण ते श्लोक एकदा लिहिले म्हणजे हातावेगळे झाले. म्हणून ग्रंथसंपत्ती या देशात फार वाढली. हे एक उदाहरण आहे. या देशामध्ये अठराव्या शतकापर्यंत जवळजवळ लाख संख्येची संस्कृत ग्रंथसंपत्ती निर्माण झाली होती.

हे लेखनकलेशिवाय शक्य नाही. इ. स. पूर्व काळामध्ये, शेकडो ग्रंथ निर्माण झाले होते. त्रिपिटक हा महाभारतापेक्षा तिप्पट आहे. हे लेखन कलेशिवाय कसे शक्य आहे? पाली ग्रंथ, प्राकृत ग्रंथ हे ग्रंथलेखनपद्धती असल्याशिवाय, लेखनकला असल्याशिवाय निर्माण झाले नसते. जिथे विद्यापीठे होती त्यांच्यामध्ये ग्रंथसंपत्ती साठविली जात होती. तिथे विद्यार्थी शिकत आणि आपल्या स्वतःच्या प्रती ते करून घेत किंवा करवून घेत असत. चांगल्या श्रीमंत लोकांची मुले,

लेखकांना पैसे देऊन करवून घेत असत आणि ज्यांच्याजवळ पैसा नाही पण जे बुद्धिमान विद्यार्थी असत, ते स्वतःच प्रती लिहीत असत. अशा तऱ्हेची परंपरा फार जुनी आहे. विद्यापीठांमध्ये ग्रंथालये होती. अयोध्येला विद्यापीठ होते. ते साधारणपणे इ. पू. पहिल्या शतकामध्ये होते. तक्षशिला विद्यापीठ इ. स. पूर्व ५-६ व्या शतकामध्ये होते. बुद्धाचे पूर्वजन्म जे झाले, त्यांत बुद्ध हा तक्षशिलेला जाऊन शिकलेला आहे असे उल्लेख आहेत. त्याच्या जरी कल्पित कथा असल्या, तरी तो बुद्ध पूर्वजन्मी राजपुत्र असताना, ब्राह्मणपुत्र असताना, वैश्यपुत्र असताना तक्षशिलेला जाऊन शिकून आला होता, असे उल्लेख आहेत. याचा अर्थ असा की, बुद्धाच्या पूर्वीच म्हणजे इ. स. पूर्व सहाव्या शतकाच्या अगोदरपासून तक्षशिला, विद्यापीठ चालू असले पाहिजे. त्यास आता तीन हजार वर्षे होत आली.

वाराणसी विद्यापीठ तक्षशीला विद्यापीठाच्याही पूर्वी असले पाहिजे. अयोध्येचे विद्यापीठ तसेच असण्याची शक्यता आहे. उज्जैनचे विद्यापीठ इ. स. पूर्व चौथ्या शतकातले असावे. कांची विद्यापीठ हे इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातले असावे. ते तेराव्या शतकापर्यंत चालू होते. नालंदा विद्यापीठात बौद्धांचे अध्ययन चालत असे. जे चिनी प्रवाशी भारतात आले - त्यांनी चार-पाचशे पुस्तकांची चिनी भाषेत भाषांतरे केलेली आहेत. इत्सिंग नालंदा विद्यापीठात होता. त्याने चारशे ग्रंथ चीनमध्ये नेले आणि त्यांची चिनी भाषेत भाषांतरे केली. त्यांच्यातली अनेक पुस्तके अशी आहेत की, ज्यांचे मूळचे संस्कृतमधले ग्रंथ सापडत नाहीत; परंतु चिनी भाषेतील भाषांतरे सापडतात. तसेच तिबेटमध्ये घडले. जेव्हा मुसलमानांनी इकडे स्वाऱ्या केल्या. इथले धर्मग्रंथ नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा अनेक बौद्ध तिबेटमध्ये निघून गेले आणि तिबेटमध्ये मोठा ग्रंथसंग्रह केला. तिबेटी लिपीमध्ये आणि तिबेटी भाषेमध्ये त्यांची भाषांतरे झाली. लामा यांच्या मठामध्ये शेकडो भारतीय ग्रंथांची भाषांतरे सापडतात. संस्कृतमधील, पालीमधील किंवा प्राकृतमधील एकही शब्द सुटता कामा नये आणि वा, व हे सुद्धा चुकता कामा नये. इतक्या निष्ठेने त्यांनी भाषांतरे केलेली आहेत. बिहारमधील बौद्ध पंडित राहुल सांकृत्यायन यांनी अनेक ग्रंथ तिबेटमधून आणले आणि त्यांतले काही संस्कृत ग्रंथ छापले. धर्मकीर्तीचे ग्रंथ, त्यात आहेत. रवींद्रनाथ टागोरांनी स्थापलेल्या विश्वभारती विद्यापीठात विधुशेखर भट्टाचार्य हे एक मोठे पंडित होते त्यांनी मूळच्या तिबेटी भाषेचा अभ्यास करून मुळात ते ग्रंथ कसे होते हे अभ्यासून संस्कृतमध्ये पुन्हा भाषांतर केले आणि नंतर लक्षात आले की तंतोतंत भाषांतरे झाली आहेत. असा हा ग्रंथालयांचा मोठा इतिहास भारतामध्ये घडला. तो अखेरपर्यंत सापडतो हे लक्षात घेतले पाहिजे.

**('लोकमान्य', लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय, वाई, सुवर्ण महोत्सव स्मरणिका (१९८१-८२) पृ. ७३ ते ७७)**

○○○

७६

# मराठीवर मराठी माणसाचाच विश्वास नाही

मुलाखतकार - **माधव गडकरी,**
**उमाकांत ठोंबरे आणि प्रा. सुभाष भेंडे**

रविवार दि. ८ एप्रिल, १९६४ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मुलाखत माधव गडकरी, उमाकांत ठोमरे आणि सुभाष भेंडे यांनी घेतली. तर्कतीर्थांनी आपल्या आयुष्यातील लहान मोठ्या आठवणी या प्रसंगी सांगितल्या. "सुरुवातीच्या काळात मी जटा ठेवल्या होत्या. त्यामुळे माधुकरी चांगली मिळत असे. अनेक लोक पायांवर डोके ठेवून नमस्कारही करीत असत. पण पुढे जटा काढून टाकल्या तसे लोक नमस्कार करीनासे झाले ! - अर्थात कुत्रीही अंगावर येईनाशी झाली म्हणा !" अशी एक आठवण त्यांनी जाता जाता सांगितली. त्याखेरीज विनोबांकडे घेतलेले इंग्रजी भाषेचे पाठ, गांधीजींना दिलेला धर्मशास्त्राबाबतचा सल्ला, आंबेडकरांनी धर्मग्रंथ जाळला त्यावेळी त्यांच्याशी केलेली चर्चा, इत्यादी प्रसंगांच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या. तर्कतीर्थांचा धर्मशास्त्रातला अधिकार लक्षात घेऊन मुलाखतकारांनी त्यांना अनेक प्रश्न विचारले. "शास्त्रीजी, तुम्ही हे स्पष्टपणे मान्य कराल का, की आजच्या काळात धर्मपीठांचा सामाजिक विकासासाठी अजिबात उपयोग होत नाही ?" या माधव गडकरी यांच्या प्रश्नाला 'मला हे पूर्णपणे मान्य आहे' असे निःसंदिग्ध उत्तर तर्कतीर्थांनी दिले. आजच्या मराठी भाषेला भवितव्य काय ? या प्रश्नाविषयी बोलताना ते म्हणाले, "आज मराठी भाषेची फार कुचंबणा झालेली आहे. तिच्यामध्ये भावाविष्काराची शक्ती मोठी आहे हे खरे, परंतु अजून ती उच्च दर्जाच्या ज्ञान - विज्ञानाची भाषा मात्र झालेली नाही. त्यासाठी परिश्रम घ्यायला हवेत. परंतु तशी शक्ती, महत्त्वाकांक्षा आपल्या विद्वानांमध्ये दिसत नाही. अलीकडे तर ते घरगुती पत्रेही इंग्रजीत लिहू लागले आहेत, हे एक प्रकारचे प्रदूषणच आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी असे नव्हते. आज मराठीवर आपल्या माणसांचाच विश्वास राहिलेला नाही. ही स्थिती अशीच चालू राहिली तर आपल्या समाजाचा विकासही लटपटतच होत राहील."

तर्कतीर्थांच्या या मुलाखतीस मोजकाच परंतु जाणकार श्रोतृवर्ग उपस्थित होता.

**(ललित, मे, १९८४, पृ.४३ व ४४)**

○○○

७७

# संस्कृतींचा मुख्य गाभा म्हणजे भाषा

मुलाखतकार - **दत्ता कुलकर्णी**

श्रीक्षेत्र वाई.

कृष्णामाईच्या काठावर दोन्ही बाजूस वसलेलं एक ऐतिहासिक गाव.

केवलानंद सरस्वतींच्या वास्तव्याने पुनीत झालेले आणि प्राज्ञपाठशाळेच्या अस्तित्वानं उजळून निघालेलं.

याच केवलानंद सरस्वतींच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानसाधना केलेल्या एका शिष्योत्तमानं गावाच्या, महाराष्ट्राच्या, भारताच्या नावलौकिकात भर घातली...

तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी त्यांचं नाव.

आधुनिक मराठीच्या विकासासाठी आधारभूत ठरावा, असा एक संकल्प याच वाईतून सिद्धिप्रत पोहोचला.

वाईजवळून वाहणाऱ्या कृष्णेचा एक तीर मंदिर मालिकांनी सजला आहे.

या मंदिरातील विद्येचं आराध्य दैवत श्री गणेशाच्या भव्य मूर्तीला वंदन करून पुढं गेलं की विश्वकोश निर्मितीचं केंद्र आहे. प्राज्ञपाठशाळा इथंच आहे.

तर्कतीर्थांचं पण वास्तव्य - कार्यक्षेत्र इथंच.

तर्कतीर्थ आज केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील ज्ञानवंतांचं - प्रज्ञावंतांचं आदरस्थान झाले आहेत.

याचं कारण ज्ञानविज्ञानाविषयीचा त्यांचा व्यासंग, त्यांची निष्ठा! प्राज्ञपाठशाळेतून लक्ष्मणशास्त्री जोशींनी ज्ञानगंगेत डुंबायला सुरुवात केली...

त्यांनी १९२३ साली कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी संपादन केली.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय भाग घेतल्याबद्दल १९३० व १९३२ साली त्यांना कारावास भोगावा लागला.

तर्कतीर्थांची ज्ञानसाधना चालूच होती... धर्मकोशाचं त्यांनी संपादन केलं. त्याचे अकरा खंड प्रकाशित झालेत.

स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर ते साहित्य व संस्कृत मंडळाचे पहिले अध्यक्ष झाले. याच काळात महाराष्ट्रातील साहित्य - संस्कृतीच्या जतनाची, संवर्धनाची व विकासाची रूपरेषा ठरली. सर्वत्र मराठीचा वापर व विकासाचा विचार जोमाने सुरू झाला.

सन १९७३ मध्ये 'संस्कृत पंडित' म्हणून व १९७६ मध्ये 'पद्मभूषण' किताब देऊन भारत सरकारने त्यांचा गौरव केला ! मुंबई विद्यापीठाने त्यांना एलएल. डी. ही सन्माननीय पदवी बहाल केली.

प्रकांड पंडित तर्कतीर्थांनी तळागाळातील सामान्यांच्या अभ्युदयाचा सदोदित विचार केला... त्यासाठी विचार दिला.

प्राचीन आचार्य परंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानाचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचार प्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या भारतवर्षातील थोर विचारवंतांच्या परंपरेचे विशेष शास्त्रीजींच्यात प्रकर्षाने आढळतात...

त्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची ही मुलाखत... 'मुलाखत घरीच घेऊ या' तर्कतीर्थांचे चिरंजीव मला सांगतात.

शास्त्रीबुवांचं घर म्हणजे पारंपरिक पद्धतीचा वाडा. पुढे दगडी चौक, मग सोपा, आत बैठकीची खोली.

बैठकीची खोली ग्रंथांच्या पुस्तकांच्या कपाटांनी आतून नटली आहे. टेबलावर काही संदर्भ ग्रंथ आहेत. टी पॉयवर काही नवीन पुस्तके दिसताहेत - मी तर्कतीर्थांच्या जवळ बसतो.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना घरात, विश्वकोशाच्या कार्यालयात, वाईत सर्वत्र सारेचजण "आबा" म्हणतात.

**प्रश्न : आबा, प्रथम मला असं सांगा, भारतीय संस्कृती म्हणजे काय? मुख्यत्वेकरून तिचं दर्शन कुठे घडतं? या भारतीय संस्कृतीत मराठी संस्कृतीचं नेमकं स्थान काय?**

**उत्तर :** मानवी समाज हा अमानवी जीवनापेक्षा स्वतःचं जीवन सारखा समृद्ध करण्याचा प्रयत्न करत असतो. आहे त्या निसर्गावर बाकीची प्राणिसृष्टी अवलंबून असते. आहे या निसर्गामध्ये भर घालणं - विचारपूर्वक फरक करणं ही गोष्ट इतर प्राणिसृष्टीमध्ये घडत नाही. मनुष्य हा जीवनाची साधनं सारखी निर्माण करतो - वाढवतो. त्याकरता आहे त्या निसर्गावर त्याला अवलंबून राहता येत नाही. उदाहरणार्थ, अन्न. अन्न हे निसर्गात असतंच; परंतु त्याला तेवढ्यावरच जगता येत नाही. इतर प्राणिसृष्टी निसर्गातच असलेल्या अन्नावर जगते. त्यात तिला भर घालता येत नाही; परंतु इतर प्राणिसृष्टी अन्न गोळा करते. मनुष्याला गोळाही करावं लागतं व त्यात भरही घालावी लागते. भर घातल्याशिवाय त्याचं जीवन चालू शकत नाही. ही जी भर

तो घालत असतो ती नव्या साधनांच्या निर्मितीने. शेती ही नैसर्गिक नाही, बागायती ही नैसर्गिक नाही. शेती निर्माण करावी लागते - बागायती निर्माण करावी लागते. घर हे निसर्गात नसतं. घर हे निर्माण करावं लागतं. त्याचप्रमाणे कौटुंबिक जीवन म्हणजे सामाजिक संस्था तो निर्माण करतो. या ज्या सामाजिक संस्था निसर्गात नसतात, त्या तयार कराव्या लागतात संकेताप्रमाणे. हे सगळं करत असताना तो निसर्गात बदल करत असतो, त्यासाठी जी साधने निर्माण करतो, त्यात स्वतःमध्येही बदल करत असतो. म्हणजे, भाषेचं उदाहरण घ्या. निसर्गात आवाज काढणारे इतर प्राणी भाषा बोलत नसतात. फक्त आवाज काढतात; पण भाषा ही माणसानेच निर्माण केली. तो ती वाढवत असतो. नवे नवे संकेत निर्माण करणारा मनुष्यप्राणी आहे. माणसाची जी संस्कृती ती म्हणजे निसर्गात मानव हा जो फरक करतो, ही जी भर घालतो ती सगळी संस्कृती भर घालणं, साधनं निर्माण करणं, त्यामध्ये सुधारणा करणं, गुण निर्माण करणं ही जी सगळी प्रक्रिया आहे - म्हणजे संस्कार करणं म्हणजे संस्कृती. निसर्गाला संस्कृत करणं म्हणजे संस्कृती. आणि अशी ही संस्कृती जिथं जिथं मानव समाज कोणत्याही अवस्थेत असतो तिथं तिथं ही संस्कृती निर्माण होत असते. म्हणून जेव्हा तुम्ही मला प्रश्न विचारता भारतीय संस्कृतीबद्दल, तेव्हा ती मानव संस्कृती असते. कारण भारतीय संस्कृती ही मानव संस्कृतीचा एक विशिष्ट आविष्कार आहे.

साहित्य हे सगळ्या जगातील संस्कृतीमध्ये - उन्नत संस्कृतीमध्ये निर्माण होतं. त्याचप्रमाणे लेखनकला. एका विशिष्ट विकासानंतर ही कला मानवात आलेली आहे. सगळ्या मानव समाजात ही लेखनकला नव्हती, ती आदिवासीत नव्हती - नाही. तेव्हा ही लेखनकला आल्यानंतर तो समाज उन्नत झाला. केवळ नैसर्गिक रीतीने राहणारा माणूस जगात पृथ्वीच्या पाठीवर नाही. माणूस म्हटलं की, त्याला बोलावं लागतं, एकमेकांशी - एकमेकांचे विचार कळवावे लागतात. विचारांचं दळणवळण किंवा विचारांची - भावनांची आविष्कृती. म्हणजे भाषा दोन कार्ये करते. आपल्या भावना व्यक्त करते. प्रेम, द्वेष, निराशा वगैरे आणि माहिती पुरवते, स्वतःची आणि मिळवलेली माहिती इतरांना पुरवते. म्हणजे भाषा हा संस्कृतीचा सर्वात पहिला महत्त्वाचा भाग आहे. सगळ्या मानव समाजाला भाषा आहेत, म्हणजेच भारतीय संस्कृती, पश्चिमी संस्कृती, चिनी संस्कृती या ज्या सगळ्या संस्कृती म्हणून आहेत ती माणसाने निर्माण केलेली स्वतःची एक निर्मिती आहे. ती सर्वांची समान निर्मिती आहे. ती कमी-जास्त विकासाच्या पायरीवर असते. ती कमी-जास्त समृद्ध असते. कमी-जास्त विकासाच्या पातळीवर असू शकते; पण ती मानवाने जीवनात सुरक्षितपणे जगावं, यशस्वी व्हावं याकरिता निर्माण केलेली जी सगळी साधनसंपत्ती आहे. यात मनावर संस्कार केलेले आहेत व निसर्गावर संस्कार केलेले आहेत. एक स्वतःत बदल व भोवतालच्या जगात बदल. भोवतालच्या जगात बदल करत असताना त्याच्या स्वतःमध्ये बदल घडत असतोच. म्हणजेच स्वत:मध्ये व जगामध्ये हा जो गुणात्मक बदल होत असतो त्यामुळे त्याचं सामर्थ्य वाढतं. तर ही जीवनासाठी साधनं निर्माण करणं हे संस्कृतीचं रूप असतं व ती विकासाच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असतं.

**प्रश्न : भाषा हा संस्कृतीचा महत्त्वाचा भाग, तर मग महाराष्ट्र साहित्य-संस्कृतीत कुणाकुणाचे योगदान आहे? कसे?**

**उत्तर :** अर्थात. हा विकास करत असताना वैशिष्ट्यही असतातच. उदाहरणार्थ संस्कृत भाषा. संस्कृत भाषा ज्या काळामध्ये वाढली त्या काळात जगात ज्या भाषा वाढल्या त्यात संस्कृत भाषा ही अधिक विकसित झाली. तिला व्याकरण आलं. म्हणजे व्याकरण हे विज्ञान आहे, ते आलं, कोश आले. कारण ग्रंथसंपत्ती वाढली. काही भाषांना ग्रंथ नसतात, पुस्तकं नसतात, लेखन नसतं. त्या ज्या उपभाषा असतात आणि मुख्य भाषाही असू शकतात, त्यात या गोष्टी नसतात. भाषा बोलणारा समाज हा प्रगतीच्या कोणत्या थरावर आहे - स्तरावर आहे, त्याच्यावर अवलंबून असतं हे लक्षात ठेवलं पाहिजे. भारतीय संस्कृती - हिंदू संस्कृती यासारख्या सर्व संस्कृतींचा विकास होत असतो. हा विकास होत असताना संस्कृतीचं आदान-प्रदान होत असतं हा एक निराळा पण महत्त्वाचा मुद्दा. आदान-प्रदानाने संस्कृती वाढत असते, हे लक्षात ठेवलं पाहिजे. निरनिराळ्या जमाती वा निरनिराळी राष्ट्रे ही जेव्हा एकत्र येतात - काही युद्धाच्या ओघाने दुसऱ्या राष्ट्रांना - समाजाला जिंकतात तेव्हा ते आपली संस्कृती तिथं नेतात. उदाहरणार्थ, ब्रिटिश भारतात आले. ते त्यांची संस्कृती घेऊन येथे आले आणि त्यांची संस्कृती इथं आल्यानंतर मराठी भाषा ही उच्च पातळीवर गेली, हा महत्त्वाचा मुद्दा. कारण तोवर ज्ञानेश्वरीपासून ते मोरोपंतांपर्यंत मराठी भाषा ही मुख्यतः पद्यमय होती, गद्यमय होती ती भाषा अल्पप्रमाणात बखरी गद्यात होती; पण उच्च दर्जाचं गद्य मराठीत इंग्लिशच्या सहवासानं आलं. इंग्रजी शिक्षण आलं, कादंबरी आली. कविता जी आली ती नव्या प्रकारे आली. कवितेचा आकृतिबंध व आशय बदलला. मुख्यतः इंग्लिशपूर्व कवितेला धार्मिकता फार होती ती ऐहिक झाली. मराठीत मोठ्या प्रमाणात जी इहवादी कविता आली ती इंग्रजी भाषेच्या संस्कारापूर्वी नव्हे तर त्यानंतरच.

संस्कृत भाषेत नाटक फार वरच्या दर्जाचं होतं; पण संस्कृत भाषेची संस्कृती मराठी, हिंदी, गुजराथी वगैरे देशी भाषांनी घेतलीच नाही. इंग्लिश आल्यानंतर, इंग्रजी भाषा आल्यानंतर तुम्ही 'शाकुंतल' मराठीत आणू शकलात, हे लक्षात घेतलं पाहिजे. म्हणजेच दुसऱ्या संस्कृतीचा, वरच्या दर्जाच्या संस्कृतीचा संपर्क घडला, तो जोरदार व आक्रमक झाला, तर तुमच्या संस्कृतीचा दर्जा वाढतो. हा ब्रिटिश काळातील इतिहास विसरता कामा नये...

हिंदू संस्कृतीत हिंदुत्व आलं; पण त्या हिंदुत्वात नक्की आहे काय? हिंदुत्वात उच्च दर्जाचे धार्मिक व नैतिक विचार आहेत. त्या नैतिकतेचं सार ज्ञानेश्वरीच्या पसायदानात आहे. हे हिंदू संस्कृतीचं जगाला प्रेरणा देणारं असं अनुदान आहे ! जगाला काही द्यायचं नसेल तर ती संस्कृती पुचाट आहे आणि पोचट आहे. हे हिंदुत्व जागतिक पातळीवर मानव समाजाला आकर्षित करतं, ते विश्वबंधुत्वाच्या नात्यानं करतं. हिंदुत्व ही संस्कृती आहे ! हिंदुत्वात अनेक धर्म आहेत. बौद्ध, जैन हे धर्मसुद्धा हिंदुत्वात आहेत ! एका अर्थी शीख धर्मसुद्धा हिंदुत्वात आहे !! शिखांचा जो मूलमंत्र आहे तो वेदांचं सार घेऊनच आलेला आहे. 'ओम' हा त्यांच्या मूलमंत्रांचा प्रारंभ आहे !

म्हणजे हिंदुत्वातील ती जी वैदिक परंपरा आहे ती त्याच्यात राहिली आहे. त्यांच्यावर इस्लामचा संस्कार झाला हे खरे; परंतु त्यांच्यावरचे वैदिक संस्कार पक्के आहेत. एवंच, जेव्हा संस्कृती ही सगळ्या जगाच्या सांस्कृतिक व्यवहाराशी सुसंगत होते तेव्हा ती वाढते !

**प्रश्न : शास्त्रीबुवा, संस्कृती व धर्म याबद्दल आपण सखोल विचार मांडलेत. आजच्या काळात तर ते केवळ चिंतनीयच नव्हे तर मार्गदर्शक ठरणारे आहेत. भाषेच्या अभिवृद्धीत संस्कृतीचं संवर्धन व वृद्धी होते, असं जर मानलं तर मराठी भाषेच्या अभिवृद्धीच्या वा वापराच्या दृष्टीने सध्या चालू असलेल्या प्रयत्नातील त्रुटी, अडचणी व अडथळे कोणते? मराठीच्या भवितव्याबद्दल आपल्याला काय वाटते? - यावर काही उपाय?**

**उत्तर :** संस्कृतीसंदर्भात वर केलेले विवेचन व इतिहास लक्षात घेतल्यावर मराठी संस्कृतीवर इंग्रजीचा प्रभाव फार आहे हे लक्षात येते. इंग्रजीच्या प्रभावामुळे मराठी एकदम विकसित झाली तिचा सर्वांगीण विकास होऊ लागला... परंतु गेल्या दीडशे वर्षांत उच्च शिक्षण इंग्रजीमधूनच चालू आहे. हा निराळा मुद्दा आहे; पण मराठी ही ज्ञान-विज्ञानाची - तंत्रज्ञानाची भाषा न बनल्यामुळे विद्यापीठीय उच्च शिक्षण इंग्लिशमधूनच चालू आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. इथला सामान्य माणूस व त्याची संस्कृती आधुनिक ज्ञानविज्ञानाने संपन्न झाली नाही, तर इथला सामान्य माणूस मागासलेला राहणारअर्धसंस्कृत राहणार... म्हणजे आता त्याची पीछेहाट सुरू आहे. मराठीमध्ये ग्रंथ समृद्धी नसल्यामुळे ज्ञान-विज्ञानाचं उच्च शिक्षण मराठीतून होत नाही. ज्ञान-विज्ञानाचे ग्रंथ जोवर मराठीत येत नाहीत तोवर मराठीची परिस्थिती आहे अशीच राहणार...

म्हणून स्व. यशवंतराव चव्हाण यांनी माझ्या अध्यक्षतेखाली साहित्य व संस्कृती मंडळाचा पाया घातला व मराठीत उच्च दर्जाचे ग्रंथ निर्माण व्हावेत, मराठी ही इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन या पश्चिमी भाषांसारखी समृद्ध व्हावी यासाठी मी व माझ्या अध्यक्षतेखाली इतर सहकाऱ्यांनी फार महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखलाय...

मराठीमध्ये सामाजिक व राजकीय लेखन करणारे फार मोठे द्रष्टे झाले. मुख्यतः टिळक व आगरकर. टिळकांच्या ‘केसरी’ने आणि आगकरांच्या ‘केसरी’ने आणि ‘सुधारका’ने मराठीला फार उच्च स्तरावर नेऊन ठेवण्याचा प्रयत्न केला. मराठी भाषेत सामाजिक, आर्थिक विचारांचा आविष्कार करण्याची शक्ती आणली. त्यांच्यामुळेच मराठी नाटक आणि कादंबरी ही हिंदुत्वाच्या अहंकाराने न पछाडल्यामुळे इहवादी उच्च दर्जाचं साहित्य व्यक्त करू शकली.

मराठीच काय; परंतु एकंदरीत या ज्या साक्षर-साहित्यिक प्रादेशिक भारतीय भाषा आहेत - त्यांची विकासाची पद्धती एकच आहे. मग ती बंगाली असो - ही फार प्रगत भाषा आहे, वा तामिळी असो - ही सुद्धा एक प्रगत भाषा आहे. तर या सगळ्या भाषा यापुढे ज्ञान-विज्ञानाच्या भाषा नाही झाल्या, तर हे सगळे भारतीय सामान्यजन अर्धसंस्कृत राहणार. त्यांना उच्च शिक्षणाकरता इंग्रजी घेता येणार नाही; आणि आपण सारे मराठीचे अभिमानी आहोत ही गोष्ट खरी; परंतु आपली मुले जेव्हा विद्यालयात पाठवतो तेव्हा इंग्लिश माध्यम असलेल्या विद्यालयांकडे प्रथम

जातो, हे स्वाभाविक आहे. मी त्याबद्दल दोष देत नाही... ही कुचंबणा आहे. माध्यम मराठी पण ज्ञान - विज्ञानाचे ग्रंथ मराठीत नाहीत. अशावेळी इंग्लिशकडे जाणे हे सयुक्तिक आहे. इंग्लिश चांगलं यावं म्हणून इंग्लिश माध्यमाची शाळा ! शिवाय इंग्लिश चांगलं शिकवणारे असे मुबलक शिक्षक उपलब्ध नाहीत म्हणून ही कुचंबणा असं मी म्हणतो...

**प्रश्न : ही ग्रंथसंपदा मराठीत येण्यास काही काळ लागेल ना?**

**उत्तर :** या प्रश्नावर शास्त्रीबुवा म्हणाले, ''काळ लागेल; पण ते करायचं ठरवलं - केलं तर ना?... एकदा का हा कार्यक्रम हाती घेतला की किती अवधी लागेल, वेग कसा वाढवावयाचा हे अनुभवानं ठरवता येईल.... एक कार्यक्रम जो माझ्या हातात राहिलाय तो प्रामाणिकपणे अमलात आणत आहे. तो म्हणजे विश्वकोश निर्मिती. यात आधुनिक ज्ञान-विज्ञानाचे सगळे विषय थोडक्यात मांडलेत. ज्याला प्राथमिक स्वरूपाचं काम म्हणता येईल, म्हणजेच भाषेच्या वृद्धीचं साधन. ती व्यवस्था केली आहे. एकूण मूळ १७ खंडांचा हा कार्यक्रम. त्यापैकी १४ प्रकाशित झालेत. तीन खंड राहिलेत. ते झाले की, हे काम पूर्ण होईल. पुढे परिशिष्ट खंड आहेत.

विश्वकोशाचं हे कार्य फार मोठं, महत्त्वाचं व मराठीत ज्ञान-विज्ञानाच्या ग्रंथनिर्मितीसाठी आधारभूत असे आहे. शास्त्रीबुवांच्या कुशल संपादनाखाली हे काम पूर्ण होत आले आहे.

मराठीच्या पोटभाषांविषयी व त्यामधील मतभेदाविषयी विचारलं असता तर्कतीर्थ म्हणाले की, सर्व भाषांत अशा पोटभाषा असतात. इंग्लंडात चार प्रदेशांत चार प्रकारे इंग्रजी बोललं जातं. ज्यात साहित्य नसतं, बोलीभाषा असते. अशा पोटभाषा इंग्लंड, जर्मनी, फ्रान्समध्ये आहेत. भारतात आहेत. स्थानिक लोकव्यवहाराची ती भाषा असते. मराठीत वऱ्हाडी, कोकणी, खानदेशी अशा पोटभाषा आहेत. बोली किंवा उपभाषा म्हणून मुख्य भाषेच्या छायेत व क्षेत्रात ती उपभाषा लोकव्यवहारात उपयोगात आणली जाते...

**प्रश्न : तर्कतीर्थ, संस्कृती, भाषा याविषयी आपण सविस्तर विचार मांडलेत. थोडं मी भविष्यकाळाकडे व भवितव्याकडे वळतो. उद्याच्या उज्ज्वल महाराष्ट्रासाठी आज आणि उद्या ती कशी असावी? महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रगतीसाठी मुख्यत्वे काय अपेक्षित आहे?**

**उत्तर :** "सामाजिक सामरस्य निर्माण झाले पाहिजे. सगळ्या जाती-जमाती यांचा रक्तसंबंध घडून आला पाहिजे. त्याला अनुकूल कायदा आहे. म्हणजे आज महाराच्या पोराने ब्राह्मणाच्या पोरीशी प्रेम केलं-लग्न केलं तर त्यांना होणारी संतती वैध ठरते. कायदा अनुकूल आहे; परंतु सामाजिक जीवन त्या तऱ्हेने मिसळत नाही. मराठ्याच्या चुलीपाशी ब्राह्मणबाई, ब्राह्मणाच्या चुलीपाशी मराठा, माळी, लोहार इत्यादीप्रमाणे कौटुंबिक संबंध निर्माण झाले पाहिजेत. शिक्षणाचा प्रसार होऊ लागला आहे. ते होऊ शकतं..." हे सांगत असतानाच मध्येच शास्त्रीबुवांनी स्वतःबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, "माझ्या घरात गेली पंचवीस वर्षे एक महार स्त्री स्वयंपाक

करते, हे वाईत माहिती आहे.''

आर्थिक दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानांचा सर्वत्र वापर झाला पाहिजे. हे तंत्रज्ञान शेतीसाठी जसे वापरले पाहिजे तसे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उद्योगधंदे गावोगाव निघाले पाहिजेत. प्रत्येक गावात असे उद्योग हवेत. ज्याला कुटिरोद्योग म्हणतात, ते निर्माण केले पाहिजेत. कुटिरोद्योग म्हणजे ज्याच्यावर दीर्घकाळ काम करायचं व त्याच्यावर पोटसुद्धा भरायचं नाही तो कुटिरोद्योग नव्हे. कुटिरोद्योग किफायतशीर, फायदेशीर हवा.

शास्त्रीबुवा सांगत असताना मध्येच त्यांना थांबवून, 'फायदेशीर म्हणजे नक्की कसा?' असं मी त्यांना विचारलं. त्यावर ते म्हणाले, ''जर कुटुंबातील एका व्यक्तीने आठ तास काम केलं तर त्यावरील प्राप्तीवर त्याचं कौटुंबिक जीवन चाललं पाहिजे. फक्त त्याचं पोट भरणं नव्हे, तर त्याच्या कुटुंबाचा निर्वाह झाला पाहिजे.''

शास्त्रीबुवांची ही व्याख्या साधी, सोपी पण बरंच काही सांगून जाणारी आहे. श्रमाचं महत्त्व आणि मोबदला यावर प्रकाश टाकणारी आहे.

''राजकीय प्रगतीच्या दृष्टीने ग्रामराज्य निर्माण व्हायला पाहिजे. सध्या लोकशाहीच्या प्राथमिक संस्था, नगरपालिका व ग्रामपंचायती या अत्यंत दुबळ्या संस्था आहेत... लोकांना, मतदारांना त्यामध्ये रस वाटत नाही... कारण सामान्य सदस्य मतदार त्याकडे दुर्लक्ष करतो. पंचायती ग्रामसभा कधी बोलवत नाहीत, म्हणून या पंचायत संस्थांमध्ये आमूलाग्र बदल केला पाहिजे. या संस्थांमध्ये जिवंतपणा आणि कार्यक्षमता कशी येईल, उत्पन्न होईल व टिकून राहील या दृष्टीने सुधारणा करणे आवश्यक आहे...''

**प्रश्न : आबा, एका व्यापक दृष्टिकोनातून आपण हे विचार मांडलेत; परंतु राजकारणात मतभेदामुळे वैमनस्य येतं, द्वेष फैलावतो तेव्हा ही मतभिन्नता कितपत योग्य आहे?**

**उत्तर :** राजकीय मतभेद असावेत... पण जातवाद जो येतो त्याचा काही उपयोग नाही. जातवाद, हिंदुत्ववाद आले तर मग मानवतावादी दृष्टिकोनाची प्रेरणा असते ती राहत नाही. म्हणजे मानवी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या ज्या प्रेरणा आहेत, उच्च जीवनमूल्ये आहेत. लोकशाहीचा आधार आहे तो मोडून पडतो. त्यामुळे गुंडगिरी निर्माण होते. गुंडांचे गट तयार होतात...

**प्रश्न : आबा, विदेशात अनेक मराठी माणसे स्थायिक झाली आहेत. त्यांची अडचण म्हणजे त्यांना मराठी संस्कृतीचं बाळकडूच मिळत नाही. त्यांच्यासाठी काय करता येईल? आपण काही योजना-विचार सुचवू शकाल काय?**

या प्रश्नावर आबा क्षणभर स्तब्ध राहिले. मग म्हणाले, अहो, माझ्या कुटुंबातील दोन तृतीयांश माणसं विदेशात आहेत. मुलगा, मुलगी, नातवंडे, पुतण्या, पुतणी, त्यांची मुलं, सारे अमेरिकेत आहेत. कुलकर्णी एक सांगतो... त्यांचा अनुभव असा आहे. तेथे आपली भाषा, आपली परंपरा एका पिढीपर्यंत राहू शकते. तिथली जी संस्कृती आहे ती प्रथम घेरते व दुसऱ्या पिढीला ग्रासते!

म्हणून महाराष्ट्रीय किंवा भारतीय संस्कृती ही दुसऱ्या - तिसऱ्या पिढीत नाममात्र असते आणि त्याच्यावर काही उपाय मला माहीत नाही. कारण तिथे ज्या पुढच्या पिढ्या जन्मतात व वाढतात ते मराठी राहत नाहीत. ते अमेरिकन किंवा इंग्लिशमन होतात.

असं एक म्हणतात की, इथले आपले जे परिपाठ आहेत. सांजवातेला शुभंकरोति वगैरे म्हणायचे ते त्यांना सांगितलं जात नाही. सांगायला कोणी नाही. साधन नाही. ही त्यांची अडचण आहे, खंत आहे, असं म्हटलं जातं किंवा गंगा म्हटलं की, आपल्या मनात जसं एक पावित्र्य उभं राहतं... हे संस्कार विदेशातील भारतीयांत नाहीत... मी विचारू लागतो. त्यावर शास्त्रीबुवा पटकन म्हणतात, "हे सांगून उत्पन्न होणार नाही. या ज्या भावना निर्माण होतात, त्या विशिष्ट प्रकारच्या समारोहामुळे-संस्कारामुळे ! ते समारोह कुठे आहेत? त्या तऱ्हेची कर्मकांडं व्हावी लागतात. नित्य ते कानावर पडावं लागतं... कथा, कीर्तने, विधी या सारख्यांतून जो भावनात्मक प्रभाव पडतो त्या गोष्टी तेथे नसल्यामुळे या भावना त्यांच्यात निर्माण होत नाहीत. एखादा कीर्तनकार विदेशात गेला, कीर्तन करून आला तर तो त्याच्या दृष्टीने औत्सुक्याचा विषय असतो. अपवाद म्हणून गंगेचं पावित्र्य त्यांना असायचं कारण नाही. इथं गंगा जन्मात न पाहिलेल्या त्यांच्या ठिकाणी ती गंगेच्या पावित्र्याची भावना असते. कारण कथा-कीर्तनादी संस्कारातून ती भारतीयांच्या मनात रुजलेली असते. विदेशी भारतीयांना वा महाराष्ट्रीयांना याबाबत हवी ती माहिती मिळू शकते; पण त्यांना त्याची गरज नसते. त्यांना ती रिलेव्हंट वाटत नाही आणि तशी ती का वाटावी?''

**प्रश्न : जगभराच्या मराठी माणसांना एकत्र आणू शकणारी काही कल्पना, योजना, विचार आपण सुचवू शकता काय?**

**उत्तर :** या परदेशस्थ स्थानिक मराठी माणसांना केव्हातरी दहा-पाच वर्षांत एकत्र आणू शकता - तेही काही प्रमाणात; पण हा आर्थिक प्रश्न आहे. एकत्र येणं हे तरुण, वयस्क व फुरसत असणारे यावर अवलंबून. ते फार थोडे... शिवाय दुसऱ्या-तिसऱ्या पिढीनंतर आपण मराठी आहोत ही भावनाच तेथे राहत नाही. तिथल्या संस्कृतीत ते एकरूप होऊन जातात... कर्मकांड किंवा विधी दोन-तीन पिढ्यांनंतर नाहीसे होतात. ते मराठी आहेत हा पूर्व इतिहास आहे. ते मराठी आहेत, असा वर्तमानकाळ नाही... आपण मराठी आहोत हा संदर्भ त्यांच्या ठायी जरूर राहतो. जसे अमेरिकेत आयरिश असतात...

महाराष्ट्राबाहेर पण भारतात राहणाऱ्या मराठी माणसाचा तसा प्रश्न नाहीय. कारण तो सारख्याच परिस्थितीत राहतो. येणं-जाणं खर्चिक नाही. भेटी-गाठी होत राहतात... तर्कतीर्थ पुढे सांगतात.

विश्व मराठी परिषदेच्या निमित्ताने विदेशात स्थायिक झालेला मराठी माणूस इथल्या मराठी मातीला, मराठी माणसाला प्रातिनिधिक स्वरूपात भेटायला येत आहे. तेव्हा संस्कृतीच्या आदानप्रदानावर चर्चा होईल. आधुनिक ज्ञान-विज्ञान तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीवर

विचारविमर्श होईल. उद्योग-धंदे, व्यापार उदिमात परदेशस्थ स्थायिक मराठी माणूस इथं काही विचार मांडेल. सहकार्य व आदान-प्रदान यातून छोट्या प्रमाणात का होईना मराठी शारदेच्या मंदिरात विश्वबंधुत्वाची ज्योत पुन्हा एकदा प्रज्वलित होणार आहे. या साऱ्या सोहळ्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजींचे हे विचार मार्गदर्शक ठरतील. विदेशातील मराठी माणसांना ते उपयुक्त वाटतील.

**(दत्ता कुलकर्णी, विश्व मराठी परिषद विशेषांक, पाक्षिक लोकराज्य, मुंबई, १६ ऑगस्ट १९८९)**

❍❍❍

# मुलाखती : संदर्भ सूची

### (अ) आत्मपर

**१) मी व माझे वक्तृत्व**
(अनंत विष्णू पाटणकर, 'मी व माझे वक्तृत्व'
प्रकाशक - अनंत विष्णू पाटणकर, १९५३)

**२) वेदांचे पावित्र्य माझ्या हृदयात खोल रुजले आहे.**
(चंद्रहास जोशी, पुरुषार्थ मासिक, जुलै, १९७३)

**३) माझी घडण**
(प्रा.रा.ग. जाधव, 'विचारशिल्प', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७५)

**४) तर्कतीर्थांच्या यशाचे गमक**
(साप्ताहिक समर्थ, दिपावली विशेषांक १९७५, पृ. १२, १३)

**५) अध्ययन व वैचारिक वाटचाल**
(संपादक, नवभारत मासिक, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, फेब्रुवारी-मार्च १९८१)

**६) जीवन आणि घडण**
(पु.ल. देशपांडे, आकाशवाणी केंद्र, पुणे,)
ध्वनिमुद्रण- २३ एप्रिल, १९८६)

**७) शास्त्री - पंडितांच्या सहवासातील ज्ञानसाधना**
(प्रा. मे. पुं. रेगे, नवभारत मासिक, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.
सप्टेंबर-ऑक्टोबर, १९८७)

**८) नव्वदीतही तर्कतीर्थ उत्साही, विनम्र**
(दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, २५ जानेवारी, १९९०)

**९) दीर्घायुष्याची सूत्रे**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, दि. २३ जानेवारी, १९९१)



वाय १७८-३८

**१०) असा मी, असा मी**

(साप्ताहिक सकाळ, पुणे, दि. ८ फेब्रुवारी, १९९०)

**११) जीवन, ज्ञानप्रवाहात पोहत रहात, तरच तराल**

(साकार बालविकास मंडळ, वाई, प्रस्तुत / मे, १९९२., मूळ दृक्-श्राव्य फितीवरून तयार करण्यात आलेल्या श्राव्य फितीचे शब्दांकन – डॉ. सुनीलकुमार लवटे, निर्मिती/संयोजन : डॉ. राजेंद्र प्रभुणे / सौ. सुलभा प्रभुणे, संकल्पना : डॉ. अ. वि. प्रभुणे, द्रक-श्राव्य चित्रण : सुधीर क्षीरसागर)

**१२) परमार्थ मंदिर किंवा मशिदीत नाही**

(संपादक, बखर, दिवाळी, १९९२)

**१३) तर्कतीर्थ : कार्य व योगदान**

(मधू पटवर्धन व प्रा. मे. पुं. रेगे, 'तीर्थस्वरूप',...)

## (ब) परात्मपर

**१४) ज्ञानासक्तीसाठी पुनरुज्जीवन आवश्यक**

(ज.ग. देवकुळे, 'मुद्रा' मासिक, मे, १९७५)

**15) Of Marx and encyclopaedia**

(D. Mujumdar, The Telegraph, culcutta, Saturday, 26th March, 1983)

**१६) महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवन**

(प्रा.मे. पुं. रेगे, मासिक नवभारत, प्राज्ञपाठशाळा, वाई, मे-जून, १९८४)

**१७) भारतीय स्वातंत्र्य चळवळ**

(श्रीराम पुजारी, आकाशवाणी केंद्र, जळगाव, ध्वनिमुद्रण- २५ डिसेंबर १९८५)

**१८) सुटलेली कोडी**

(प्रा.मे. पु. रेगे, मासिक नवभारत, प्राज्ञपाठशाला, वाई, मे-जून १९८८)

**१९) ऋषितुल्य विचारवंत**

(डॉ. म. वि. गोखले, 'साहित्यरंग', श्रद्धा प्रकाशन, पुणे, २७ मे १९९०)

**२०) परंपरेला धक्के बसले तरच परिवर्तन शक्य**

(प्रा. अरुण चव्हाण, दत्ता सावळे, प्रा. म.द. हातकणंगलेकर, 'उगवाई', दिवाळी, १९९४)

**२१) विश्वबंधु शास्त्रीजी**

(रामभाऊ जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी न्मशताब्दी अंक, २७ मे, २००१, संपा. यशवंत कळमकर)

## (क) व्यक्ती व विचार

### ❍ लोकमान्य टिळक

**२२) लोकमान्य टिळक : लोकशाहीचा पुरस्कर्ता**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २९ जुलै, १९७३)

**२३) लोकमान्य टिळकांची वाङ्मयीन महात्मता**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २७ जुलै १९७५)

**२४) लोकशारीला धक्का देणारे महापुरुष : लोकमान्य टिळक व महात्मा गांधी**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १ ऑगस्ट, १९८०)

**२५) 'केसरी'चे पंचानन**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, ४ जानेवारी, १९८५)

**२६) भारतीय राष्ट्रवादाचे महर्षी : लोकमान्य टिळक**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १ ऑगस्ट, १९९२)

**२७) 'गीतारहस्य' हे आचारशास्त्रच**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १ मार्च, १९९४)

**२८) लोकमान्य टिळक : एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे/ -)

### ❍ अन्य व्यक्तींच्या मुलाखती

**२९) अजूनही यशवंतराव चाचपडत आहेत**
(सतीश कामत, प्रतिनिधी, साप्ताहिक माणूस, पुणे, दि. ८ ऑक्टोबर १९७७, पृ. ५ ते ७)

**३०) स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ**
(एक जिज्ञासू, मासिक नवभारत, प्राज्ञपाठशाळा, वाई, डिसें. १९७८- जाने. १९७९, पृ. १ ते १४)

**३१) सत्तेपासून दूर राहिलेला संघटक व क्रांतिकारी : किसन वीर**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २८ जानेवारी, १९८०)

**३२) वऱ्हाडचे टिळक : बापूजी अणे**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २४ ऑगस्ट, १९८०)

**३३) मानवेंद्र रॉय यांची वैचारिक वाटचाल**
(प्रा. मे. पुं. रेगे मासिक नवभारत, प्राज्ञपाठशाळा, वाई, फेब्रु-मार्च, १९८७)

**३४) विश्वसंस्कृतीची मूल्ये जपणारा नेता : पंडित नेहरू**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, ४ डिसेंबर, १९८८)

**३५) बहुस्पर्शी विद्वान : लोकहितवादी देशमुख**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २७ ऑक्टोबर, १९९१)

**३६) प्रतिभासंपन्न संगीततज्ज्ञ : कुमार गंधर्व**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १९ जानेवारी, १९९२)

**३७) कृष्णाकाठचा माणूस : सुसंस्कृत नेतृत्व**
(अरुण शेवते, 'कृष्णाकाठचा माणूस', ऋतुरंग प्रकाशन, मुंबई-६, १ मे, १९९३)

**३८) यशवंतराव चव्हाण : बांधिलकी आणि साहित्यविशेष**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, काळ अप्राप्त)

**३९) शिवाजीराव नि शास्त्रीबुवा**
(दैनिक सकाळ, पुणे, १९८९)

## (ड) धर्म, संस्कृती व तत्त्वज्ञान

**४०) भारतीय संस्कृती : काही समस्या**
(श्री.पु. भागवत, संपादक, मौज (दिवाळी), १९४९)

**४१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित समाज**
(सतीश कुलकर्णी, अस्मितादर्श, दिवाळी, १९७३)

**४२) सती प्रथेला धर्मशास्त्राचा आधार नाही**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १६ फेब्रुवारी, १९८०)

**४३) चार शंकराचार्य एकत्र येणे अभिनंदनीय, पण आता विलंब झाला आहे.**
(द. न. पटवर्धन, दैनिक तरुण भारत, पुणे, ५ सप्टेंबर, १९८१)

**४४) समान संधी देणारी राज्यपद्धती अनुभवास यायला हवी.**
(संपादक, अजिंठा, दिवाळी, १९८२)

**४५) मानवी जीवनात तत्त्वज्ञानाइतकेच तंत्रज्ञानास महत्त्व**
(प्रा. डॉ. सुधीर रसाळ, आकाशवाणी केंद्र, औरंगाबाद, दि. ३ फेब्रुवारी, १९८५)

**४६) बुद्धिप्रामाण्यवाद : एक कठीण वसा**
(माधव गडकरी, दैनिक लोकसत्ता, मुंबई, दि.१५ फेब्रुवारी, १९८७)

**४७) तत्त्वज्ञानातून मी बाहेर पडलो आहे**
(डॉ. प्रदीप गोखले, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. सदानंद मोरे; 'अक्षरदीप', दिवाळी, १९८८)

**४८) बंधनात टाकणाऱ्या श्रद्धांची चिकित्सा हवी**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २६ फेब्रुवारी, १९८९)

**४९) तर्कतीर्थ : कृतिप्रवण विचारांची आगळीवेगळी खाण**
(अनंत दीक्षित, दैनिक सकाळ, मुंबई, २६ फेब्रुवारी, १९८९)

**५०) हिंदुत्वाचे राजकारण होऊ देऊ नये**
(ना. वा. ढवळे, दैनिक सकाळ, पुणे, दि. २६ जानेवारी, १९९०)

**५१) धर्मविरोध आणि राजकीय फारकत**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १० ऑक्टोबर, १९९३)

**५२) भारतीय संस्कृतीतील साहित्य तरुणांना उपयुक्त**
(बातमीदार, दैनिक सकाळ, पुणे, २७ जानेवारी, १९९४)

**५३) चैतन्य हेच ईश्वराचे रूप**
(अरुण शेवते, संपादक, ऋतुरंग (दिवाळी), मुंबई, १९९४)

**५४) भारतीय तत्त्वज्ञान आणि सर्वधर्मसमभाव**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे/-)

## (इ) विविधविषयक दृष्टिकोन

### ❍ राजकारण

**५५) लोकशाही शासनपद्धतीचा कायापालट जरूरी**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १९७६)

**५६) सार्वत्रिक निवडणुका : यशापयशाची मीमांसा**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, ६ मार्च, १९७८)

**५७) मंडल आयोग : अहवालाची चिकित्सा**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १२ सप्टेंबर, १९८०)

**५८) विश्वराज्याच्या दिशेने वाटचाल**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २३ एप्रिल, १९८१)

**५९) काँग्रेस (आय) च्या विजयाची कारणमीमांसा**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २ जानेवारी, १९८५)

**६०) अण्वस्त्रबंदी झाल्यासच विकास**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १९ जून, १९८६)

**६१) महाराष्ट्र : काल, आज, उद्या**
(रमेश जोशी, लोकराज्य, १ मे, १९८५, पृ. २४ ते ३१)

**६२) राष्ट्रासाठी समर्पण हाच राष्ट्रवाद**
(अनिल जोशी, दैनिक ऐक्य, सातारा, १८ ऑक्टोबर १९८६)

**६३) विधेयकांवर चर्चा आवश्यकच**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, १ ऑगस्ट १९८९)

**६४) रामजन्मभूमीला ऐतिहासिक आधार नाही**
(खास बातमीदार, नवी दिल्ली, दैनिक सकाळ, पुणे, २४ ऑगस्ट १९८९)

**६५) मंडल आयोग मागे घ्यावाच लागेल**
(दैनिक सकाळ, कोल्हापूर)

**६६) लोकशाहीबाबत भविष्यकाळ आशावादी नाही**
(प्रा. रा. ग. जाधव, दैनिक लोकसत्ता, मुंबई, दि. २६ जानेवारी, १९९१)

६७) **भारताचे संविधान**
(अनिल जोशी, मासिक सुशिपांज, वाई, सप्टेंबर, १९९१)

६८) **समान नागरी कायद्याची टाळाटाळ भोवणारी**
(बाबूराव शिंदे, प्रतिनिधी सातारा, दैनिक सकाळ, पुणे, २६ जानेवारी १९९३)

**❍ शिक्षण**

६०) **ग्रामीण कॉलेजे प्रभावी कशी होतील?**
(दैनिक सकाळ, पुणे, २५ मार्च, १९६५)

७०) **राष्ट्रीय शिक्षणाचा इहवादी दृष्टिकोन**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २९जुलै १९७९)

७१) **कुटुंबच नैतिक शिक्षणाचे विद्यापीठ**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २९ ऑक्टोबर १९८४)

**❍ भाषा आणि साहित्य**

७२) **मराठी विश्वकोश : ज्ञानभांडाराचे कवाड**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २३ एप्रिल १९७७)

७३) **साहित्य संमेलनांमुळे लोकशिक्षणाचे कार्य**
(अनिल जोशी, दैनिक केसरी, पुणे, २७ नोव्हेंबर १९८७)

७४) **मराठी विश्वकोश : एक कटाक्ष**
('वैनतेय' वार्षिक, द्रविड हायस्कूल, वाई - १९८१)

७५) **प्राचीन भारतीय ग्रंथालये**
(अनिल जोशी, लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, १९८१-८२)

७६) **मराठीवर मराठी माणसाचा विश्वास नाही.**
(माधव गडकरी, उमाकांत ठोंबरे, , सुभाष भेंडे, ललित मासिक, मे १९८४)

७७) **संस्कृतीचा मुख्य गाभा भाषाच**
(दत्ता कुलकर्णी, विश्व मराठी परिषद विशेषांक, पाक्षिक लोकराज्य,
मुंबई, १६ ऑगस्ट १९८९)

**टिपा :**

१. अनुक्रमणिका आणि संदर्भ सूचीतील मूळ मुलाखत शीर्षके संपादित करण्यात आलेली आहेत.

२. मूळ मुलाखत शीर्षकांचा वापर प्रस्तावनेत करण्यात आला आहे.

❍❍❍

# परिशिष्टे

*

## परिशिष्ट - १

# ऋणनिर्देश

*'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पासाठी आवश्यक संदर्भ, माहिती, मार्गदर्शन, साधने, संपर्कसूत्र इ. चे साहाय्य करून खालील व्यक्ती व संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय अनवधानाने नोंद घ्यावयाची राहिलेल्या इतरांचेही मी स्मरण करतो आणि सर्वांप्रती विनम्र कृतज्ञता व्यक्त करतो.*

* मा. शरद पवार, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* मा. राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश, लखनऊ.
* मा. मंत्री, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. सचिव, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. बाबा भांड, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. आणि संचालक, संस्थापक, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद.
* मा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* मा. डॉ. सौ. मीनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, संपादक, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. अरुंधती खंडकर, सिंगापूर.
* मा. वासुदेव जोशी, वाई, जि सातारा.
* मा. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. संजय कृष्णाजी पाटील, माजी सचिव, (अ.का.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

* मा. प्रा. डॉ, राजा दीक्षित, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* डॉ. शामकांत देवरे, सहा. सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. रवीन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. सरोजकुमार मिठारी, विद्याव्यासंगी सहायक मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* डॉ. जगतानंद भटकर, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* मा. अध्यक्ष, लोकमान्य ग्रंथालय, वाई.
* मा. शरद साठे (भा. प्र. से.), सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* श्री. मोहनराव डकरे, सचिव, प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कन्हाड.
* मा. अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि सातारा.
* श्री. अनिल जोशी, सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि. सातारा.
* मा. ग्रंथपाल, मराठी विश्वकोश ग्रंथालय, वाई, जि सातारा.
* मा. अध्यक्ष, करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* मा. ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* मा. खासदार प्रा संजय मंडलिक, कोल्हापूर.
* श्री. दत्ता क्षीरसागर, संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, पुणे.
* मा. अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे.
* मा. प्रा डॉ प्रसाद जोशीं, कुलगुरू, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* श्री. गोपाळ अवटी, संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे.
* श्री. श्रीराम पवार, समूह संपादक, सकाळ वृत्तपत्र समूह, पुणे.
* श्री सम्राट फडणीस, संपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* श्री. माधव गोखले, उपसंपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* मा. स्वप्नील पोरे, संपादक, दैनिक केसरी, पुणे.
* प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, महावीर विद्यालय, कोल्हापूर.
* श्री. शाम जोशी, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर.
* प्रा. डॉ सौ आशाताई गुर्जर, पुणे.
* डॉ. एच व्ही देशपांडे, माजी प्राचार्य, आजरा महाविद्यालय, आजरा, जि कोल्हापूर.
* डॉ. दिनकरराव पाटील, प्राचार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता करवीर, जि. कोल्हापूर.
* सौ. मनीषा शेणाई, ग्रंथपाल, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. पंडित टापरे, वाई जि. सातारा.
* श्री. रमेश रा. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, जि सातारा.

* प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठा कोल्हापूर.
* प्रा. डॉ. शिवाजी मोटेगावकर, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
* मान. विनोद शिरसाठ, संपादक, साप्ताहिक साधना, पुणे.
* श्री सुदाम सानप, महाराष्ट्र ज्ञानमंडळ, पुणे.
* श्री. समीर दिलावर शेख, साधना साप्ताहिक, पुणे.
* डॉ. राजेंद्र प्रभुणे, वाई, जि सातारा.
* श्री. भालचंद्र मोने, प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, जि सातारा.
* प्रा. सागर कांबळे, न्यू कॉलेज, कोल्हापूर .
* डॉ. आर. डी. पोतदार, अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे मुंबई .
* प्रा. डॉ. प्रदीप देवी, सार्वजनिक वाचनालय, नाशिक.
* प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा. प., पुणे.
* मा. ग्रंथपाल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे.
* मा. ग्रंथपाल डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* मा. ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
* श्री. सुरेश रासकर व सौ. दिप्ती रासकर, मुंबई.
* डॉ. अशोक वेणीमाधवशास्त्री जोशी, अमेरिका.
* श्री. व. सौ. डॉ. शुभदा अरविंद पटवर्धन, मुंबई.
* प्रा. डॉ. व्यंकटेश कोटबागे, बेळगाव.
* श्री विजय एकशिंगे व श्री संजय कळके, कोल्हापूर,
* श्री श्रीकांत भागवत, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* डॉ. सौ. मोनिका गजेंद्रगडकर, संपादक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* श्री. मिलिंद जोशी, व्यवस्थापक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* Hon. Maxion Barlet, Bibliotheque de France, Paris.
* मा. ग्रंथपाल श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा जि. कोल्हापूर.
* मान.- संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, (मुंबई)
* प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
* प्रा. डॉ. कृष्णा पाटील, अधिव्याख्याता, दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
* सर्व कर्मचारी, सहयोगी, साकेत प्रकाशन प्रा .लि., औरंगाबाद
* श्री. अमेय जोशी, अक्षर दालन, कोल्हापूर
* सौ. / श्री. तनुजा व निहाल शिपूरकर, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
* श्री गौरीश सोनार, कोरिएंडर ग्राफिक्स, कोल्हापूर.

* श्री. अशोक पाटील, छायाचित्र विकासक, कोल्हापूर
* श्री. विश्वनाथ यादव, दैनिक लोकमत, कोल्हापूर
* श्री. विवेक जोशी, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर
* श्री. भरत बुटाले, उपसंपादक, दैनिक लोकमत, कोल्हापूर.
* सौ. वीणा पाटील, अक्षर दालन, कोल्हापूर.
* श्री. राजेश दुबे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* श्री. महेश मोघे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* सौ. यशवंती अरुण शिंदे, कोल्हापूर.
* सौ. शुभांगी मोहन भगत, विश्ववेद ग्राफिक्स, कोल्हापूर.

❍❍❍

## परिशिष्ट - २

परिचय

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(२७ जानेवारी, १९०१ - २७ मे, १९९४)

महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जन्म. वडिलांचे नाव बाळाजी आणि आईचे चंद्रभागा. त्यांचे वडीलबंधू वेणीमाधवशास्त्री आयुर्वेदाचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आले. लक्ष्मणशास्त्री वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय-वेदांतादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ मध्ये कलकत्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञाने यांचा स्वप्रयत्नाने त्यांनी सखोल व्यासंग केला. १९२७ मध्ये मुल्हेरच्या (नाशिक जिल्हा) पंडित घराण्यातील सत्यवती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली असून, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर हे अमेरिकेत गणकयंत्रनिर्मिती करणाऱ्या 'इंटरनॅशनल बिझनेस मशिन्स' या उद्योग संस्थेत संशोधन व्यवस्थापक या पदावर होते. वाई येथेच राहून शास्त्रीजींनी प्राज्ञ पाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य आणि आपला व्यासंग अखंडपणे चालू ठेवला होता.

प्राज्ञ पाठशाळेचे वातावरण सनातनी पढीक पांडित्याचे नव्हते; ते पुरोगामी/चिकित्सेचे व राष्ट्रीय स्वरूपाचे होते. परिणामतः राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेण्याची प्रेरणा या वातावरणातून शास्त्रीजींना लाभली. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यास शास्त्रीजींनी हिंदू धर्मशास्त्राचे पूरक भाष्य तयार करून दिले. १९३० ते १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावासही तीनदा भोगावा लागला. १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्याचे सदस्य होते. १९४० पर्यंत व पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात कॉंग्रेस पक्षाशी ते एक विचारवंत भाष्यकर म्हणून निगडित होते.

तर्कतीर्थांच्या नेतृत्वाने प्राज्ञ पाठशाळेला एका व्यापक सांस्कृतिक कार्यकेंद्राचे स्वरूप लाभले. वाईमध्ये हरिजन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, हातबनावटीचा कागद कारखाना, अद्ययावत मुद्रणालय इ. उपक्रम त्यांनी यशस्वीपणे अमलात आणले. वाईच्या महाविद्यालयाचेही ते संस्थापक-सदस्य होते. प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य त्यांनी हाती घेतले. या कोशाचे २५ खंड प्रसिद्ध झाले असून, त्यांत कुटुंबसंस्था, हिंदू संस्कार, जाती, विवाह, मालमत्ता त्याचप्रमाणे हिंदू धर्मविधी, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान इ. विषयांसंबंधी प्राचीन शास्त्रांतील ग्रांथिक माहिती व्यवस्थितपणे संकलित केलेली आहे. पहिल्या १९ खंडांचे संपादन तर्कतीर्थांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून म्हणजे १९६० पासून ते १९८० पर्यंत शास्त्रीजी अध्यक्ष होते. मंडळातर्फे भाषा-साहित्यविषयक अनेक योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख प्रकल्प वीस खंडीय मराठी विश्वकोषाचा आहे. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून विशद करण्याचे हे मौलिक कार्य शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली चालू होते.

शास्त्रीजींनी व्याख्याने, परिषदा इ. निमित्ताने भारतभर प्रवास केला. अमेरिका, ब्रह्मदेश, रशिया तसेच युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकी देशांनाही त्यांनी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून किंवा स्वतंत्रपणे निमंत्रित म्हणूनही भेटी दिल्या आहेत (१९५१). कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषद (१९२५) व वाराणसीचे अखिल भारतीय संस्कृत पंडितांचे संमेलन (१९२९) यांत भाग घेऊन शास्त्रीजींनी धर्मसुधारणेचे सभाष्य समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९५४). याखेरीज अनेक विभागीय व प्रादेशिक मराठी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली.

शास्त्रीजींची ग्रंथसंपदा मोजकी; पण मौलिक आहे. शुद्धिसर्वस्त्रम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत दिलेली तीन व्याख्याने, १९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य १९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, द्वितीय आवृत्ती १९७४), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३) हे त्यांचे ग्रंथ मान्यता पावले आहेत. राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) हे त्यांनी संपादिले आहेत. हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीने त्यांनी केली आहे. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे' या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला आहे. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात केलेली आढळते. या प्रबंधाचे

इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले आहे (१९४८). 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा एक प्रचंड प्रबंध आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होत (१९४९). त्यांत वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्माचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे व म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते. असा पुरस्कार लाभलेला हा पहिला मराठी ग्रंथ.

इतिहासाचार्य राजवाडे आणि लो. टिळक यांचे नमुनेदार लेखसंग्रह संपादित करून शास्त्रीजींनी त्यांना अभ्यासपूर्ण व अत्यंत विचारप्रवर्तक प्रस्तावना लिहिल्या आहेत. आधुनिक मराठी साहित्य व त्याची समीक्षा, संस्कृतातील रससिद्धांत, मराठी संतांचे कार्य यासंबंधीही त्यांनी अनेक लेखांतून नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. रा. ग. जाधव यांनी शास्त्रीजींच्या निवडक लेखांचा संग्रह 'विचारशिल्प' या नावाने संपादित केला आहे (१९७५). गांधीयुगातील एक नमुनेदार कर्मयोगी विचारवंत या नात्याने त्यांच्या विचारकार्याची मीमांसा संपादकाने या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे.

महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंतांची एक थोर परंपरा आहे. बाळशास्त्री म. जांभेकर, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, लो. टिळक, वि. दा. सावरकर, महर्षी शिंदे इ. विचारवंतांच्या परंपरेतच शास्त्रीजींचे कार्य मोडते. प्राचीन आचार्यपरंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानांचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचारप्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या परंपरेचे विशेष होत.

छोट्या शाळा-मंडळांपासून राष्ट्रीय संस्था-संघटनांपर्यंत सर्वप्रकारच्या व्यासपीठांवर दिलेली विचारप्रवर्तक भाषणे हा शास्त्रीजींच्या सामाजिक सेवाव्रताचाच एक अविभाज्य भाग होय. अशी कितीतरी मौलिक विचारांची भाषणे ग्रंथरूपात संग्रहित झालेली नव्हती. उदा. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर दिलेले भाषण किंवा पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली वाचलेला 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉडस्' हा शोधनिबंध. शास्त्रीजींनी शेकडो व्याख्यानांच्या रूपाने व लेखनद्वारा केलेले विचारकार्य प्रकाशात आल्यास हा महाराष्ट्राचा एक बहुमोल असा ठेवा मानला जाईल. १९७५ साली त्यांनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण

केले. त्यानिमित्त स्थापन झालेल्या अमृत महोत्सव समितीने त्यांच्या समग्र लेखनाचे खंड प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. पैकी एक लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. याच वर्षी मुंबई विद्यापीठाने एलएल्.डी. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथोचित गौरव केला. 'संस्कृत पंडित' म्हणून १९७३ मध्ये, 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये, तर 'पद्मविभूषण' म्हणून १९९२ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले. त्यांचा मृत्यू २७ मे १९९४ रोजी महाबळेश्वर येथे झाला. त्यांची अनेक चरित्रे व ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध आहेत. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची काही भाषणे संपादित करून प्रकाशित झाली आहेत.

**(मराठी विश्वकोश खंड-६, पृ. ६०७, ६०८)**

(**टीप :** वरील परिचय अद्यतन करून सुधारित संदर्भ म्हणून इथे देण्यात आला आहे.)

ooo

## परिशिष्ट - ३

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

### तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा

१) **आनंदमीमांसा** (मराठी प्रबंध)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई/पुस्तकमाला, पुष्प ६वे
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०) मूल्य ६ आणे / पृष्ठे - ७०

२) **शुद्धिसर्वस्वम्** (संस्कृत प्रबंध)
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे / पृष्ठे - ३७

३) **भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्** (संस्कृत निबंध)
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९३३ / पृष्ठे - १६

४) **जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** (मराठी प्रबंध)
प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३ / १५, सदाशिव पेठ, पुणे.
वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)
प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर, १९४१ / किं. सव्वा रुपया / पृष्ठे - १०३

५) **हिंदुधर्माची समीक्षा** (भाषणसंग्रह)
श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ,
नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर १९४१
प्रकाशक - प्राज्ञशाळामंडळ, वाई
द्वितीय आवृत्ती, १ मे, १९४२ / मूल्य २ रुपये / पृष्ठे - १४०

६) **ज्योति - निबंध**
भाषण / प्रस्तावना - रा. ना. चव्हाण
मुद्रक व प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
प्रथमावृत्ती - १९४७, मूल्य १२ आणे, पृष्ठे - ३५

७) **वैदिक संस्कृतीचा विकास** (भाषणसंग्रह)
श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९)
पुणे विद्यापीठ, पुणे
प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा
प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध ६, शके १८७३ (१९५१), मूल्य ६ रुपये / पृष्ठे - २८६

८) **भारतस्य संविधानम्**
भारतीय राज्यघटना (१९५२) - संस्कृत भाषांतर.
प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - १९५२ / मूल्य २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे - २९५

९) **राजवाडे - लेखसंग्रह** (लेखसंग्रह)
प्रकाशक - साहित्य अकादेमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती १९५८/मूल्य १२ रुपये / पृष्ठे - २९४

१०) **लोकमान्य टिळक लेखसंग्रह** (लेखसंग्रह)
प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट, १९६९ / मूल्य - १२ रुपये / पृष्ठे - ४५९.

11) **Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts.**
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi

Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June 1970, Pages - 717 / Price - 50/-

12) **Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II )**
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June 1970, Pages - 720-1361 / Price - 50/-

१३) **आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत** (भाषणसंग्रह)
व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला पुष्प ८ वे, १९७२
प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ - क, शनिवार पेठ, पुणे - ३०
मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे - ९
पहिली आवृत्ती - सप्टेंबर १९७२ / मूल्य ६ रुपये / पृष्ठे - ११८

१४) **सर्वधर्मसमीक्षा** (भाषणसंग्रह)
सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १
प्रथमावृत्ती - १९८४ / रु.९५/- / पृष्ठे - ८८

१५) **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १ )**
लेखसंग्रह (संकीर्ण)
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट १९८२ / मूल्य-५५५/- / पृष्ठे - ५९०

१६) **शिखांचा पंथ व इतिहास** (भाषणसंग्रह)
कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १९८४
प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे - ३०
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा
प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर १९८४ / किंमत - ७ रुपये / पृष्ठे - ६०

१७) **ज्योतिचरित्र** (चरित्र)
प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - १

मुद्रक -
प्रथमावृत्ती - शके-१९१४ (१९९२) / किं. ३० रु. / पृष्ठे - १०७

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संपादन कार्य

**१८) धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)**
व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)
उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४ )
संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६ )
राजनीतिकाण्डम् (भाग १ ते ६ )
वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

**१९) मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६५ ते १९९४)**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६५ - १९८०)
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८०-१९९४)

**२०) श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृत महोत्सव )**
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती)
प्रकाशन - मार्गशीर्ष शुद्ध ४ शके-१८७४ / पृष्ठे - २७२

**२१) श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका**
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६० / मूल्य १ रु. / पृष्ठे - २५

**२२) श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ**
प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर
(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ )
मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४
प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च १९६१ / पृष्ठे - १००.

**२३) मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ**
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४
प्रकाशन - २ एप्रिल १९६५ (गुढीपाडवा) / पृष्ठे - १२१

**२४) मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ**
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

मुद्रक - शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे - १
प्रथमावृत्ती - २००३ / मूल्य-रु.१५०/- / पृष्ठे - २५८

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे**

**25 ) A critique of Hinduism**
By tarkteerth Laxmanshastri Joshi
Translated by G. D. Parikh
Publisher - Modern Age Publication Navasari Chembers,
Outram Road, Fort, Bombay-1
Printer - N. E. Chinwalla, Manager,
British India Press, Mazagaon, Bombay
First Edition - Market, 1948 / Price.Rs.5/- / Pages-131

**26) हिंदू धर्म की समीक्षा**
मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - नथूराम प्रेमी
प्रकाशक - नथूराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,
हिराबाग, गिरगाँव, बम्बई -4
पहली बार - दिसंबर 1948 / पृष्ट संख्या - 172

**27) जडवाद और अनीश्वरवाद**
मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार
प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगाँव,
बम्बई - 4
मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, 6, केलेवाडी, बम्बई - 4
पहली बार - मार्च 1950 / पृष्ठ संख्या - 112

**28) वैदिक संस्कृति का विकास**
मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर
प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली - 110001
प्रथम संस्करण - 1957 / पृष्ठ संख्या - 360.
मूल्य 200 रु.

29) **राजवाडे लेखसंग्रह**

मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादक - वसंत देव

प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि., आगरा

मुद्रक - युनिवर्सल आर्ट प्रेस, आगरा

प्रथम संस्करण - 1964 / मूल्य 12 रु.50 पै. / पृष्ठ संख्या - 224.

30) **Jotirao Phule**

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translator - Daya Agrawal

Publisher - National Book Trust, India

First Edition - 1996 / Price - Rs. 75/- / Pages - 94

31) **Critique of Hinduism And Other Religions**

Tarkteerth Laxmanshastri Joshi.

Translated by Suman Oak.

Publisher - Popular Prakashan, 35, C,

Pandit Madan Mohan Malviya Marg, Popular Press Building, Tardeo, Bombay - 400 034 First Published - 1996 / pages - 205

32) **Development of Indian Culture : Vedas to Gandhi**

Tarkteerth Laxmanshatri Joshi

Translated by - S. R. Nene

Published by - Lok Vangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan, 85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai - 400 025

Printed by - New Age Printing Press, Mumbai - 2

First Edition - 2001/ Price - 200 Rs. / Pages - 555

33) **Spiritual Materialism**

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by - Arundhati Khandkar

Publisher - Lokvangmay Griha, Mumbai - 2

Printer - New Age Printing Press, Mumbai - First Edition - November 2004 / Price - 250 Rs. / Pages - 171

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ

**३४) विचारशिल्प** (निबंधसंग्रह)

संपादक - प्रा. रा. ग. जाधव

प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ३

मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रथमावृत्ती - १९७५ / किंमत ५० रु. / पृष्ठे - १४८

**३५) आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार** (भाषणसंग्रह)

संपादक - डॉ. अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेडकर मार्ग, मुंबई - ३१

प्रथमावृत्ती - २७ मे १९९७ / किं. ८० रु. / पृ. - ९५

**३६) साहित्याचे तर्कशास्त्र** (साहित्यिक भाषणांचा संग्रह)

संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.

प्रथमावृत्ती - २०१२ / मूल्य-७५० रु. / पृष्ठे - ४३७

## संदर्भ ग्रंथ सूची

**१. श्री सोमनाथ तीर्थ**

लेखक - त्र्यंबक रघुनाथ ( गौतमबुवा) पाठक

प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)

मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा

प्रथमावृत्ती - जुलै १९५९ / किंमत ५ रु. / पृष्ठे - १७२

**२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक, नवभारत मासिक**

फेब्रुवारी-मार्च, १९८१

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई / किं. ५ रु. / पृष्ठे - ९५

**३. प्रज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३

मुद्रक - कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे

प्रथमावृत्ती - २० जानेवारी १९८५ / किं. १२५ रु. / पृष्ठे - ३४७

४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - सौ. मालती देशपांडे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - जानेवारी, १९९२ / किं. ५० रु. / पृष्ठे - ७५

५. **प्रज्ञानंद : अमृत महोत्सव स्मरणिका**
संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रकाशन - २५ जानेवारी १९९४ / पृष्ठे - ९८

६. **शास्त्रीजी (चरित्र)**
लेखक - रा. ग. जाधव
प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती - २४ ऑगस्ट १९९४ / किं. ७० रु. / पृष्ठे - १५६

७. **तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**
लेखिका - अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई
प्रथमावृत्ती - २७ मार्च १९९५ / किंमत - २७० रु. / पृष्ठे - २६०

८. **तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**
कवी - गोविंद नरहर कुलकर्णी
प्रकाशक - गो. न. कुलकर्णी, ‘दवबिंदू’, वाई
मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१०, रविवार पेठ, वाई
प्रकाशन - १ एप्रिल १९९५ / पृष्ठे - ५०

९. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
संपादन - वसंत पळशीकर
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९६ / किं. २०० रु./ पृष्ठे - १६४

**१०. प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा**
संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे. पुं. रेगे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६ / किं. २५ रु. / पृष्ठे - २३८

**११. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत् चरित्राची साधने**
लेखक - अशोक भट
प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,
मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई
प्रकाशन - १३ ऑक्टोबर १९९९ / विनामूल्य / पृष्ठे - ४२

**१२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक**
कार्यकारी संपादक - यशवंत कळमकर
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी २००१ / मूल्य - २०० रु. / पृष्ठे - ८४

**१३. संवाद : तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - २६ मे २००१ / किं-१५० रु. / पृष्ठे - १५८

**१४. महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर.
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोअर परळ, मुंबई
प्रथमावृत्ती - एप्रिल २००३/ किं.४० रु./ पृष्ठे - ८४

**१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन**
रा. ना. चव्हाण / संपादन - रमेश चव्हाण
प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ / ६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे
मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे
प्रथमावृत्ती - जुलै, २०१० / किं. २५० रु. / पृष्ठे - २६४

**१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)**
अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्री. गंधर्व - वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर, २०१० / किं. - १८०रु. / पृष्ठे - १७८

**१७. प्राज्ञप्रबोध (प्राज्ञपाठशाळामंडळ शताब्दी ग्रंथ)**
संपादक - श्री. मा. भावे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई
प्रथमावृत्ती - डिसेंबर, २०१६ / किं. २५० रु. / पृष्ठे - २४७

**१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : आठवणी आणि विचार**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, 'कृष्णा', पत्रकारनगर, पुणे - ४११०१
मुद्रक - के. सागर ग्राफिक्स अँड प्रिंटर्स, वाई
प्रथमावृत्ती - ९ मार्च, २०१९ / किं.-२०० रु. / पृष्ठे - १७१

**१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा तात्त्विक अभ्यास**
संशोधिका - स्वाती बापूराव भोंगळे / • मार्गदर्शक - डॉ. सदानंद मोरे
संशोधन प्रबंध, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
जुलै, २०१९, पृष्ठे- ३१७

**20. Swimming Upstream (Biography)**
Author - Arundhati C. Khandkar/Ashok C. Khandkar
Publisher - Oxford University Press, India.
Printer - Nutech Print Services, New Delhi
First Edition - 2019 / Price-Rs.-1,195/- / Pages - 193

**२१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन**
लेखक / संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे
प्रकाशक - अक्षरदालन, २१४१ बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ०१२
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी, २०२३, पृष्ठे- ३२६, किं. ५०० रु.

ooo

## परिशिष्ट - ४

# परिचय

# डॉ. सुनीलकुमार लवटे

जन्म ११ एप्रिल, १९५०ला वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर येथे. बालपण व इयत्ता ३री पर्यंतचं प्राथमिक शिक्षण तेथेच. नंतर चौथी ते पदवी शिक्षण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालगृह (रिमांड होम), कोल्हापूरमधून. सन १९६७ला शालान्त परीक्षा उत्तीर्ण. उच्चशिक्षणार्थ श्री मौनी विद्यापीठ, गारगोटीच्या 'कर्मवीर हिंरे ग्रामभारती'मध्ये प्रवेश. तिथे सन १९६७ ते १९७१ या काळात 'डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस (एज्युकेशन)' ही बी.ए.,बी.एड. समकक्ष पदविका प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय ग्रामभारतीत सर्वप्रथम. त्याप्रीत्यर्थ भारत सरकारचा 'रोल ऑफ ऑनर', 'बेस्ट सोशल वर्कर', 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' संपादनाची 'हॅट्-ट्रिक'.

पदवी संपादनानंतर 'आंतरभारती शिक्षण मंडळ'च्या विविध शाळांमधून विविध विषयांचे सन १९७१ ते १९७९ या काळात अध्यापन. समांतरपणे शिक्षण संघटना कार्य. एम.ए., पीएच.डी. (हिंदी) शिक्षणाची पूर्तता. सन १९७९ ते २०१० या काळात हिंदी अधिव्याख्याता व सन २००५ ते २०१० या काळात प्राचार्य म्हणून महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापन, संशोधन, प्रशासन, मार्गदर्शन कार्य. सन १९८० ते २०१० या काळात समांतरपणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या हिंदी अधिविभागात एम.ए., एम.फिल., पीएच.डी. स्तरावर अध्यापन, संशोधन व मार्गदर्शन कार्य.

सन १९८० पासून आजतागायत अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बंदी बांधव, वेश्या, कुमारी माता, परित्यक्त्या, वृद्ध इ. च्या संगोपन, संरक्षण, शिक्षण, सुसंस्कार, पुनर्वसन कार्याशी निगडित वंचित विकास कार्यास समर्पित. अशा संस्थांचं राज्यशासननियुक्त अध्यक्षपद कार्य, 'समाज-सेवा' त्रैमासिक संपादन. या संबंधीच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय वंचित विकास, मानवाधिकार कार्य संदर्भातील राज्यस्तरीय, राष्ट्रीय धोरण निर्धारण व

योजना विकास कार्य याचाच भाग म्हणून भारतीय शिष्टमंडळातून युरोप, आशिया, आफ्रिका खंडांतील १६ देशांचे अभ्यास दौरे. (१९९० ते २०११)

महाविद्यालयीन जीवनापासून लेखन, वाचनात रुची. मराठी-हिंदीत समांतर लेखन, भाषांतर, समीक्षा, संशोधन, संपादन कार्य. आजवर शंभराहून अधिक ग्रंथ प्रकाशित. ग्रंथांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय शासन व अन्य संस्थांचे पुरस्कार. त्यात उत्तर प्रदेश सरकारच्या हिंदी संस्थान, लखनऊचा 'सौहार्द सन्मान' (रुपये दोन लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), महाराष्ट्र सरकारच्या राज्य हिंदी अकादमीचा 'जीवन गौरव महाराष्ट्र भारती सन्मान' (रुपये एक लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), राष्ट्रभाषा प्रचार/प्रसार कार्याचा 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार', (रु. पन्नास हजार, सन्मानपत्र); 'खाली जमीन, वर आकाश' आत्मकथेस महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिकेचा 'अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार.' या आत्मकथेचे विविध आकाशवाणी केंद्रांवरून अभिवाचन प्रक्षेपण, विविध भाषांत अनुवाद, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून अंतर्भाव व संशोधन.

वि.स. खांडेकर समग्र अप्रकाशित, असंकलित साहित्याचे संपादन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय संपादन. डॉ. नरेंद्र दाभोळकर समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर प्रकल्पाचे प्रधान संपादक. वि.स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, शिवाजी विद्यालय कोल्हापूर व शिरोडे; यशवंतराव चव्हाण स्मृतिसंग्रहालय, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतिसंग्रहालय, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी येथे निर्मिती.

विविध सामाजिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याची नोंद घेऊन 'कोल्हापूर भूषण', 'नागरी सत्कार', 'सुधारककार' गोपाळ गणेश आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार, अंनिस डॉ. भीमराव कुलकर्णी साहित्यिक कार्यकर्ता पुरस्कार (मसाप), विविध सीमाभाग, पश्चिम महाराष्ट्र येथे आयोजित साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद. रेडिओ, दूरदर्शन, व्याख्यानमाला, आभासी संवाद इत्यादी माध्यमांतून अनेक मुलाखती, व्याख्याने, मार्गदर्शन, समुपदेशन कार्य.

वरील कार्य, पुरस्कार, लेखन, मानधन इत्यादी पोटी आजवर प्राप्त सर्व रक्कम समाज संकल्पित धन मानून विविध व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांना देणगी म्हणून समर्पित.

○○○


वाय १७८-११०० पु.-आर ८-७.२०२४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

''धर्मच पाहिजे असेल तर दोनच धर्म – जैन, बौद्ध विश्वधर्म बनू शकतात. इतर कोणतेही धर्म विश्वधर्म बनू शकत नाहीत. कारण त्यांचा इतिहास युद्ध, शांतिमय, निर्भेळ नाही. जबरदस्ती आहे, तलवार आहे. मंदिरे पाडल्याची ऐतिहासिक नोंद आहे... आधुनिक काळात, या वर्तमानयुगात हिंदू धर्मामध्ये सर्व धर्म सहिष्णुतेचे आदर्श संत निर्माण झाले. रामकृष्ण परमहंस हे त्यांचे अग्रणी होत. त्यांनी वेदोपनिषदांचे आपल्या प्रार्थनेत गायन केले आहे. ख्रिश्चन पद्धतीची उपासना केली. इस्लामची प्रार्थना उच्चारवाने अनुभवली. विवेकानंदांसारखा सर्व धर्म परिषदेमध्ये प्रभाव गाजविणारा संतशिष्य म्हणून निर्माण केला. महात्मा गांधी हे आपल्या धर्मश्रद्धेच्या अधिष्ठानावर उभे राहून राजकारणामध्ये नेतृत्व करून गेले. जगाच्या राजकीय इतिहासामध्ये महात्मा गांधींचे स्थान अनुपम आणि अद्वितीय आहे. अलीकडचे हिंदुत्ववादी हे हिंदुत्वाचे विश्वधर्मस्वरूप झाकाळून टाकत आहेत.''

**– तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

('भारतीय तत्वज्ञान – सर्वधर्मसमभाव विचार'
'संवाद: तर्कतीर्थांशी'– अनिल जोशी (२००१) मुलाखतीमधून)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई